म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र.

# रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र.

## भाग १ ला.

REFBK-0003331

3339



श्री.

# रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक,

सी. एस्. आय्.

उपाध्यक्ष-रॉयल एशियॅटिक सोसायटी, मुंबई;
सभासद-बेंगॉल एशियॅटिक सोसायटी;
फेलो-रॉयल जिऑग्रॅफिकल सोसायटी
आफ् ग्रेट ब्रिटन व आयर्लॅन्ड.
फेलो-स्टॅटिस्टिकल सोसायटी, लंदन;
फेलो, सिन्डिक व डीन-युनिव्हर्सिटी, मुंबई;
सभासद-कायदेकाउन्सिल मुंबई व कलकत्ता;
सरकारी वकील, हायकोर्ट मुंबई,

# यांचें चरित्र.

## भाग १ ला.

गणेश रामकृष्ण हवलदार, बी. ए. एल् एल्. बी. हेड शिरस्तेदार, मुंबई.

होमरकृत ... चे कर्ते यांनीं लिहिलें.

REFBK-0003331 ८४९

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 3339
ठाणे

---

भाषांतराचे वगैरे सर्व हक्क स्वाधीन.

---

आवृत्ति पहिली.

---

सर्व ग्रन्थ भाग १ व २ मिळून

---

किंमत साडेतीन रुपये.

मुद्रकः—**चिंतामण सखाराम देवळे,** मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई.

प्रकाशकः—**गणेश रामकृष्ण हवलदार** बी. ए. एल् एल्. बी. हेड शिरस्तेदार, हायकोर्ट अपील शाखा, मुंबई.

# अर्पणपत्रिका.

कवण श्रेष्ठ असे बा देवांमाजी व गुरुजनांमाजी ? ।
यक्ष पुसे धर्म कथी सानुक्रम जो पिता व माता जी ॥ १ ॥
विद्या दिलि ज्या गुरुंनीं लोभानें अथ कदापि कोपानें ।
अमरत्व या सुधेनें ये स्वर्गींच्या न त्या सुधापानें ॥ २ ॥
आप्तेष्ट मित्र बांधव ज्यांविण जगती दिसेल दीर्घ वन ।
ज्या रसिक वाचकांविण ग्रन्थ गमे मधुकरांविणें सुमन ॥ ३ ॥
मूका वाचाल करी पंगुस गिरि लंघवी कृपा ज्याची ।
त्यां त्यांस अर्पितों ही कृति मम सेवा विनम्र दासाची ॥ ४ ॥

—ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

गेल्या शतकांत इंग्रजांच्या राज्याची हिंदुस्थानांत प्रस्थापना झाल्यावर त्यांनीं जें उदार शिक्षण लोकांस देण्याचा उपक्रम केला, त्याच्या योगानें पौर्वात्य संस्कृति व पाश्चात्य संस्कृति यांचा संयोग होण्याचा पर्वकाळ आला तेव्हां ज्या पुरुषांनीं आपल्या अंगीं मूळ राखून दोन्हीं संस्कृतींचा संयोग करून दाखविला त्यांत **राव-साहेब विश्वनाथ नारायण मंडलिक** यांची (अथवा जे नुसत्या **रावसाहेब** या नांवानें प्रसिद्ध होते त्यांची ) श्रेष्ठत्वानें गणना होते. सर **रेमन्ड वेस्ट** यांनीं मुंबई युनिव्ह-र्सिटीच्या एका पदवी दानाच्या प्रसंगीं व्हाइस चॅन्सेलर या नात्यानें **रावसाहेबांच्या** विषयीं प्रशंसापर भाषण करतांना त्यांस **सल्पिशस, टहॅरो** व **मसीनास** या थोर **युरोपियन** पुरुषांची पृथक्पणें व सामुदायिक रीत्या उपमा दिली. पृष्ठ ३८० पहा. व प्रोफेसर **गोपाळराव आगरकर** यांनीं **रावसाहेबांचा** मृत्युलेख **सुधारकांत** लिहि-तांना त्यांस पेशव्यांचे सरन्यायाधीश, **रामशास्त्री प्रभुणे**, यांची उपमा दिली. याप्र-माणें हिंदी व इंग्रज या दोन्हीं लोकांत आदर व श्रद्धा उत्पन्न करणारे **रावसाहेबां** सारखे पुरुष फार विरळा. त्यांचा कित्ता गिरविण्यास त्यांच्या चरित्राची हल्लींच्या काळांत आम्हांस फार गरज आहे.

सामाजिक, राजकीय किंवा दुसऱ्या एकाद्या बाबतींत आपलीं व **रावसाहेबांचीं** कांहीं मतें जुळत नाहीं असें **रावसाहेबांची** प्रशंसा करतांना बजावून सांगणाऱ्या त्यांच्या वेळच्या लोकांच्या मताशीं, व खुद्द **रावसाहेबांच्या** मताशीं चालू पिढीच्या लोकांचीं मतें, **रावसाहेबांच्या** निधनानंतर बराच काळ लोटल्यामुळें आतां जुळणार नाहींत म्हणून त्यांच्या चरित्राचा उपयोग आतां तुलनात्मक ऐतिहासिक चर्चेच्या कामीं जेवढा होईल तेवढा उपयोग तरुण पिढीला अनुकरण करण्याच्या कामीं उदाहरण म्हणून होणार नाहीं, अशी कोणी शंका काढल्यास तिला उत्तर एवढेंच आहे कीं **रावसाहेबांनीं** असे कांहीं सद्गुण संपादन केले होते कीं ते जनक, श्रीराम व भीष्म यांच्या वेळेपासून अद्याप पर्यंत श्लाघ्यच राहिले आहेत व ते पुढें कोणत्याही देशांत कोणत्याही कालांत, कोणत्याही परिस्थितींत तसेच श्लाघ्य राहतील. **रावसाहेबांच्या** असल्या गुणांचें वर्णन करतांना " त्यांनीं ( **रावसाहेबांनीं** ) सत्याशिवाय कोणाची पर्वा केली नाहीं; मनोदेवतेशिवाय कोणाची पायधरणी केली नाहीं; लोकहिताशिवाय

कांहीं इच्छिलें नाहीं किंवा न्यायरूप कुलदेवतेशिवाय कोणाचा प्रसाद त्यांस रुचला नाहीं" हा केसरींतील चरित्रकाराचा उतारा देऊन बालबोधकारांनीं पुढें म्हटलें आहेः—राष्ट्रास अत्यंत हितावह असा रावसाहेबांचा गुण म्हटला म्हणजे त्यांचा सत्यशीलतेविषयीं* दरारा हा होता. त्यांच्या मनांत एकादी गोष्ट भरली म्हणजे ती स्पष्टपणें बोलण्यास ते ब्रह्मदेवाची देखील पर्वा करीत नसत! मग इतरांची प्रतिष्ठा काय! काउन्सलामध्यें स्वतः गव्हर्नरसाहेबांस देखील वचकले नाहींत त्यामुळें बाकी सगळे लोक त्यांस वचकत. आणि मोठमोठे युरोपियन अम्मलदार देखील त्यांच्यापुढें बोलत नसत इ० इ०

असे सर्वकालोपयोगी गूण अंगीं असलेले पुरुष आमच्यांत झाले नाहींत अशी तक्रार रावसाहेबांनीं नाहींशी केली व त्यांचें चरित्र हातीं पडल्यावर वैदिशिकांच्या तोंडाकडे पाहण्याची पुढील पिढीला कमी जरूर पडेल; कारण आमच्यातही तसे अनुकरणीय पुरुष निर्माण होऊं शकतात असें पाहून रावसाहेबांची उच्च पदवी प्राप्त करून घेणें आपणास शक्य आहे असा आत्मविश्वास वाचकांच्या मनांत उत्पन्न करील. म्हणून वैदिशिक थोर पुरुषांच्या चरित्रापेक्षां रावसाहेबांचें चरित्र इष्ट परिणाम त्वरित घडवून आणील हें उघड आहे.

रावसाहेबांच्या बरोबर जन्मास येऊन त्याच राजकीय व सामाजिक वातावरणांत ज्याचे दिवस गेले; रावसाहेबांच्या पुढें उभे असलेले प्रश्न काय काय होते; ते प्रश्न त्यांनीं कसे सोडविले; ते सोडवितांना त्यांच्या जवळ काय साधनें होतीं व त्यांचा त्यांनीं कसा उपयोग केला हें ज्याला पूर्णपणें माहीत होतें असा त्यांचा एकादा बाळमित्र, गुरुबंधु, व्यवसायबन्धु अथवा समकालीन भक्त जर त्यांचें चरित्र लिहिता तर फार उत्तम झालें असतें. त्यांचें चरित्र त्यांनींच स्वतां लिहावें असा हेतु त्यांच्या कांहीं मित्रांचा होता. "तुमचें आत्मचरित्रलेखन कोठपर्यंत आलें आहे असें सर जार्ज बर्डवुड, यांनीं त्यांस एकदां विचारलें होतें. परंतु रावसाहेबांची इच्छा तशी नव्हती असें त्यांनीं लिहिलेल्या (५-१-८२ च्या) पुढील उत्तरावरून दिसून येतें. "माझ्या आत्मचरित्रलेखनाबद्दल विचारतां परंतु त्यांतील एक अक्षरहि लिहिलें नाहीं, म्हणून मी आपली क्षमा मागतों. मनुष्याच्या कृतींत त्याचें चरित्र दिसून येतें असें मला वाटतें. वास्तव कोणाचेंही चरित्र लिहावयाचें असेल तर तो स्मृतिवश झाल्यावरच तें लिहावें. या

*अशा सर्व गुणांचें वर्णन "रावसाहेबांचें पौरुष" या प्रकरणांत केलें आहे.

नाहीं त्या, कोठल्या तरी सार्वजनिक कामांत पडून सतत उद्योग करून संतुष्ट राहण्याचें व्रत मी १८४८ पासून पत्करलें आहे. तें मी माझ्या आयुष्याच्या ग्रंथांतील शेवटल्या भागापर्यंत चालविण्याची आशा बाळगतों. ”

अर्थात आपलें आरब्ध कार्य अजून संपलें नाहीं, नव्हे संपतही आलें नाहीं, तेव्हां आतांच चरित्र लिहिण्यांत अर्थ नाहीं असें हें उत्तर देतांना रावसाहेबांस वाटलें असावें व त्याप्रमाणें त्यांनीं यावेळेनंतर आणखी सात वर्षें सार्वजनिक काम करून १८८९ सालीं आयुष्याचा सर्व ग्रंथ संपविला.

यीं पूर्वीं ६ वर्षें म्हणजे २६ आक्टोबर १८८३ रोजीं बडोद्याचे डेप्युटी सुभे, सोराबजी जहांगीर, यांनीं रावसाहेबांस एक पत्र लिहून विनंति केली कीं “मेहेरबानी करून आपण आपल्या आयुष्यांतील घडून आलेल्या विशेष गोष्टींचें टांचण करून पाठवावें. तें एका महत्वाच्या राष्ट्रीय चरित्रमालेंत गुंफावयाचें आहे. ही माला तयारींत आहे. हींत प्रसिद्ध हिंदी व इंग्रज गृहस्थांचे फोटोंसह आयुष्यवृत्तांत यावयाचे आहेत. सर बार्टल फ्रियर, सर टेंपल, ना. गिब्स, सर टी. माधवराव वगैरे वगैरेचीं चरित्रें छापण्यांत येतील. हें काम विद्वान लेखकांकडे सोंपविलें असून पुस्तक विलायतेंत छापावयाचें आहे म्हणून विनंतीस मान द्यावा. ” त्यास जबाब रावसाहेबांनीं लिहिला:–‘ मनुष्याच्या हयातींत चरित्र लिहिणें चुकीचें आहे. ’

त्याचप्रमाणें शेट आर. एच. जालभाई यांनीं रावसाहेबांचें चरित्र मुंबई इलाख्यांतील पुढाऱ्यांच्या चरित्र मालेंत छापण्याचा बेत केला होता, तो रावसाहेबांस मान्य झाला नाहीं.

नंतर प्रसिद्ध मराठी लेखक, बालबोधकार, रावसाहेब विनायक कोंडदेव ओक, यांनीं रावसाहेबांच्या चरित्रलेखनाविषयीं कांहीं माहिती रावसाहेबांस २९।१२।८४ च्या पत्रीं विचारिली होती. त्यांत त्यांनीं मुलांस उत्तम बक्षिस या नांवाच्या आपल्या पुस्तकांत छापण्याकरतां एक फोटोची प्रत मागितली होती. त्यांस उत्तर रावसाहेबांनीं दिलें तें:–“ माझ्या चरित्राविषयीं जसली हकीकत माझ्याकडून मिळेल असें तुमच्या पत्रावरून पहातां तुम्हांस वाटत आहे तसली कसलीही हकीकत मी लिहून ठेविली नाहीं. माझ्या चरित्रांतील विस्तृत माहिती कांहींशी तुम्हांला यशवंतराव आठल्ये यांजजवळ मिळेल. ”

“ गेल्या ३५ वर्षांत जेवढें मी कांहीं बोललों तेवढ्या साऱ्याचीं टांचणें करून ठेविलीं नाहींत व स्थानिक काउन्सिलांत व कलकत्याच्या काउन्सिलांत जें मी काम

卐

केलें त्याची माहिती पाहिजे असल्यास ज्या सरकारी गॅझेटांत माझीं भाषणें प्रसिद्ध झालीं आहेत त्याचीं पानें दाखवून देतों. ”

“ मी पुढील ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले आहेत. १८४९ ते १८५२ पर्यंत मराठी ज्ञानप्रसारकांत कांहीं निबंध; संवयी आणि अभ्यास (मराठींत) २ आवृत्त्या; एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानाच्या इतिहासाचीं मराठींत व गुजराथींत भाषांतरें; यंगकृत बीजगणिताचें सिंधींत भाषांतर; तुकारामाची गाथा, २ आवृत्त्या; रॉयल एशियॅटिक मंडळीच्या हिंदी शाखेच्या सभेपुढें अनेक विषयांवर निबंध; हिंदूंची मध्यंतरीय स्थिति, मराठींत; दत्तक विरुद्ध खालसा ( म्हैसूर प्रकरणावर ) लघुग्रंथ, आवृत्त्या २; कोंकणातील वतनदार खोतांचा इतिहास; मराठींत हिंदुधर्मशास्त्र, २ आवृत्त्या; व्यवहारमयूख व याज्ञवल्क्य, इंग्रजी भाषांतर, प्रस्तावना व पुरवणी यांसह; मुंबईच्या जुन्या लिटररी सोसायटीची कामगिरी, ३ भाग टीपांसह. ”

“ हिंदुस्थानच्या भाविस्थितीविषयींचा जो तुम्हीं अनुक्रम नंबर ७ चा प्रश्न विचारला आहे त्याचें उत्तर मला अशा प्रश्नोत्तररूपी पत्रव्यवहारांत तत्काल देता येत नाहीं म्हणून वाईट वाटतें व त्या प्रचंड विषयांत शिरण्याची माझी तूर्त इच्छा नाहीं व त्याविषयीं चर्चा करण्यास आतां सवड नाहीं. ”

“ तुमच्या शेवटल्या प्रश्नास उत्तर प्रथम द्यावयास पाहिजे होतें व त्या प्रश्नास माझें उत्तर असें आहे कीं मी कांहींच करून ठेविलें नाहीं. त्याचें कारण त्यावर लोक टीका करतील याची भीति नव्हे. मनुष्यानें संसार सोडून संन्यस्त वृत्तीचा स्वीकार केल्यावर, अथवा हें जग सोडून गेल्यावर त्याचें चरित्र लिहिण्यांत यावें व चर्चा करतां तें लोकांपुढें ठेविलें जावें असें माझें पक्कें मत आहे. हेंच आजपर्यंत कांहीं एक न करून ठेवल्याचें कारण आहे. सोलनच्या नांवानें वृत्ति स्थिर ठेऊन क्रीससनें * मारलेली हांक तुम्हांला विदितच आहे. त्याच्याहूनही मनुष्यमात्राच्या मनावर उत्तम ठसा उठविणारें भीष्म चरित्र अवगत आहेच. या दोहोंच्या चरित्रावरून तरी आमची नैतिक दृष्टया केवढी अवनति झाली आहे हें आमच्या कांहीं

---

* क्रीसस हा मोठा सत्ताधीश व कोट्याधीश राजा होता. त्याच्या कडे त्यावेळेला एक शहाणा म्हणून प्रसिद्ध असलेला सोलन नांवाचा तत्त्ववेत्ता गेला. त्यास आपल्या सर्ववित्तराशी दाखवून क्रीससनें विचारिलें “सर्वांत सुखी मनुष्य कोण आहे ?” त्यावर सोलननें फारच अप्रसिद्ध अशा एक दोन मनुष्यांचीं नांवें घेतलीं तेव्हां क्रीसस राजाला फार आश्चर्य वाटलें. अत्यंत गरीब व अप्रसिद्ध लोकांस हा सुखी म्हणतो व

देशबांधवांच्या लक्ष्यांत येण्यासारखें आहे. असो. मी आतां व्यासपीठावर आरूढ होऊन पुराण सांगावयास लागलों असें वाटत आहे. त्याची मला क्षमा करा. ''

रावसाहेबांचे खरे वडिलार्जित स्नेही अथवा स्वार्जित शिष्य बापूसाहेब आठल्ये, बडोद्याचे नायब दिवाण, यांनीं रावसाहेबांचें चरित्र लिहावें असा पुष्कळ मंडळींचा मनोदय होता. व बडोद्याहून सुटल्यावर तें लिहावें असा खुद्द बापूसाहेबांचा मनोदय होता. परंतु बडोद्याहून त्यांची सुटका होण्यापूर्वींच कोणाचेही ध्यानीं, मनीं व स्वप्नीं नसलेली गोष्ट घडून आली. त्यांस उदराची व्याधि एकाएकीं जडून उपचार करावयास वेळही दिल्याशिवाय निर्घृण काळ त्यांस १८९४ सालीं अकालीं घेऊन गेला. डाक्तर जान्सनचा जसा बासवेल तसे बापूसाहेब रावसाहेबांचे शिष्य होते. ते असे स्मृतिशेष झाल्यावर बासवेलकृत जान्सनच्या चरित्रासारखा नमुनेदार चरित्र ग्रंथ निपजावयाची आशा समूळ नष्ट झाली. व रावसाहेबांच्या निधनानंतर लागलींच वर्तमानपत्रांत व लघु आकृतींच्या मासिक पुस्तकांत लघुतर* आकृतींचीं आपल्या वाचकांची तात्पुरती जिज्ञासा तृप्त करणारीं जीं अनेक चरित्रें प्रसिद्ध झालीं त्यांवरच समाधान मानून लोकांस कांहीं काल बसावें लागलें. रावसाहेबांच्या चिरंजिवांनीं रावसाहेबांचीं इंग्रजी भाषणें व लेख १८९६ मध्यें प्रसिद्ध केले. त्यांना जोडून प्रो. दामोदरपंत पाध्ये, एम्. ए. यांनीं एक मार्मिकतेनें इंग्रजींत लिहिलेलें लहानसें चरित्र प्रसिद्ध करण्यांत आलें व पुढें एका विद्वान, पटुमति, अभ्यस्त लेखकानें मुख्यतः रावसाहेबांच्या रोजनिश्या व वरील भाषणें आणि लेख वाचून मराठींत सुन्दर व मध्यमाकार चरित्र लिहून १८९८,१८९९, १९०० त अपूर्णपणें मराठींत सुंदर व हप्त्या हप्त्यांनीं विविधज्ञान विस्तारांत प्रसिद्ध केलें. त्यानंतर बराच काळ गेला. परंतु विस्तृत चरित्र कोणाकडून लिहिलें गेलें नाहीं,

---

मला ऐश्वर्यवानाला म्हणत नाहीं ! पुढें कालचक्र फिरल्यावर क्रीससला शत्रूनें जिंकून त्यावेळेच्या चालीप्रमाणें चिता रचून जीवंत जाळून टाकण्याचा हुकूम केला. तें ऐकून क्रीसस अगदीं ऐनवेळीं चितेला अग्नि लावतांना शत्रूची प्राणदानाकरितां प्रार्थना करावयाची टाकून मोठ्यानें " सोलन ! सोलन ! '' म्हणून ओरडला. त्यावरून त्याच्या शत्रूनें विचारिलें:-अरे बाबा ! तूं माझी अथवा परमेश्वराची करुणा भाकावयाची टाकून हा सोलन कुठला काढलास ? त्यावर त्याला आपली सर्व हकीकत सांगून तो म्हणाला-महाराज ! शेवटपर्यंत कोणीही मनुष्यानें आपल्याला सुखी समजूं नये हें तत्त्व सोलननें मला शिकविलें व तें मला पटलें यावरून हर्षभरित होऊन आतां मी त्याला मोठ्यानें द्विवार हांक मारिली. शत्रूनेंही त्यास जीवदान दिलें हें सांगावयास नको.

* असें एक चरित्र इंग्लंदांतसुद्धां प्रसिद्ध झालें होतें.

हा योगा योगाचा एक प्रकार आहे. तसाच हें चरित्र प्रस्तुत अल्पमति ग्रंथकाराच्या हातांत पडलें हा योगायोगाचा दुसरा प्रकार आहे. तो घडून आल्यावर प्रस्तुत ग्रंथकार या ग्रंथाच्या सामग्रीचें निरीक्षण करूं लागला तेव्हां पर्वताच्या उंचीचा ठाव लावण्याकरतां पायथ्या पासून वर चढत जाणाऱ्या शोधकाची जशी स्थिति होते तशी त्याची स्थिति झाली.

पुढें शिखर दिसत आहे त्यावर पोंचलें असतां सर्व पर्वताचा थांग लागेल, असें वाटतें; परंतु तेथें जावें न जावें तों त्या शिखराच्या मागें त्याहून उंच अशीं अनेक शिखरें दिसूं लागतात. त्यांवरही प्रयासानें पोंचल्यावर अगणित नवीं शिखरें दिसतात व गौरीशंकर हातास लागणार नाहीं अशी भीति वाटते, त्याप्रमाणेंच प्रथम लोकांनीं रावसाहेबांना लिहिलेलीं पत्रें व त्यांना रावसाहेबांनीं दिलेलीं उत्तरें यांच्या वर्षानुक्रमानें बांधलेल्या पुडक्यांचे मोठाले ढीगच्या ढीग पुढें दिसूं लागले. ते दृष्टीखालीं घालून होत आहेत तोंच रावसाहेबांचे वर्तमानपत्रांतील लेख, त्यांचीं सभांतील किरकोळ भाषणें, प्रसिद्ध मासिक पुस्तकांतील निबंध व मुंबईच्या व कलकत्त्याच्या कायदे करणाऱ्या सभांतील वादविवादात्मक भाषणें हीं दृश्यमान झालीं. ह्यांचें निरीक्षण होतांच त्यांच्या रोजनिश्या दुरूनच लक्ष वेधूं लागल्या. त्यांचें आकलन करीत पुढें जातां स्मृत्यादि धर्मग्रंथांची रांग पुढें पसरूं लागली. वृत्त पत्रांतील उतारे व इतर फुटकळ कागदांच्या राशी तर दूरच राहिल्या व एकंदर सामग्रीच्या राशींचा पुरा थांग लावणें अगदीं अशक्य नसलें तरी फार अवघड आहे अशी त्याची कल्पना झाली; तथापि एवढ्या कठीण कार्याला हात कसा घालावा असा विचार त्याच्या मनांत आला त्या बरोबर आकाशाचा अंत लागण्याचा संभव नसतांही पक्षी उच्च अंतरिक्षांत स्वशक्तीप्रमाणें संचार करीत असतो, त्याप्रमाणें रावसाहेबांच्या विस्तृत चरित्र सामग्रीचा ठाव लागला तर पाहण्याचा हेतु मनांत धरून स्वशक्त्यनुसार प्रयत्न करण्यास प्रस्तुत लेखकानें आरंभ केला व उपलब्ध असलेल्या बऱ्याच सामग्रीचें यथामति अवलोकन करून आतां हें चरित्र वाचकांस सादर करीत आहे, मनांत शंका धरीत नाहीं, याचें कारण एवढेंच कीं रावसाहेबांच्या चरित्रांतील मुख्य मुख्य गोष्टींचा नुसता निर्देश केला तरी सुद्धां तें मनोरंजक होईल हा त्यांत विशेष आहे.

तरी या प्रचण्ड सामग्रीचा चरित्रभागांत उपयोग करूं जातां तींतील कोठला भाग घ्यावा याविषयीं जो विचार करावा लागला त्यापेक्षां कोठला भाग गाळावा-याचाच विचार अधिक करावा लागला.

कांहीं पत्रें पाठविणारांनीं आंतील मजकुरावर " खासगी " असा शेरा मारून तो प्रकट करूं नये अशी इच्छा दाखविली, तर कांहींनीं उत्तरांवरही तसेच शेरे मारून तीच इच्छा प्रकट करून ठेविली आहे. याप्रमाणें या शेऱ्यांचा परिणाम या पर्वतप्राय पत्रांच्या राशींवर वज्रप्रहाराप्रमाणें झाला. त्याप्रमाणेंच कांहीं पत्रांत त्या वेळेच्या पुष्कळ लोकांच्या वर्तनावर टीका आलेली आहे. या टीकेचा जबाब देणारे आतां हयात नसल्यामुळें तीही गाळावी लागली व ती गाळावी असा रावसाहेबांचा अभिप्राय होता. यांचे मित्र जनरल जेकब इहलोक सोडून परलोकीं गेल्यावर त्यांच्या पुतण्यानें त्यांचें चरित्र लिहिण्याच्या कामीं रावसाहेबांची मदत मागितली. त्यास रावसाहेबांनीं असें उत्तर दिलें " तुम्हांला माझ्या साह्याची अपेक्षा कोणत्या प्रकारची आहे तें स्पष्ट मला विदित झालें नाहीं. जराशी फुरसुत मिळतांच मी त्यांची सर्व पत्रें गोळा करणार आहें. त्यांतील कोठल्या काळाची तुम्हांस उपयोगी पडतील तें कळवाल तर त्यांच्या नकला करून पाठवीन. कांहीं पत्रांत व्यक्तींवर टीका आहे ती प्रसिद्ध करूं नये असें मला वाटतें. "

हा उपदेश अगदीं शिष्टसांप्रदायाला धरून आहे. म्हणून प्रथम सांगितल्याप्रमाणें या चरित्रांत तश्या टीकेला अगदीं फांटा दिलेला आहे. फक्त जेवढा भाग सार्वजनिक स्वरूपाचा असून लोकांपुढें सार्वजनिक रीत्या येऊन गेलेला आहे, तेवढाच क्वचित्प्रसंगीं अवश्य म्हणून घेतला आहे. त्याचप्रमाणें कांहीं मजकूर मागच्या पुढच्या संदर्भाच्या अभावें दुर्बोध म्हणून घेतला नाहीं. इ० कारणांनीं लेखनकार्याचें क्षेत्र फारच मर्यादित झालें, व पुढचा मार्गही सरळ झाला.

१६–२–१८६६ च्या पत्रांत डॉक्टर बर्डवुड हे रावसाहेबांस इतिहास कसा लिहावा या विषयीं आपलें मत एका प्रसंगीं कळवितांना म्हणाले " मीं गतकालांतील कलंकावह वृतान्त सोडून प्रशस्य तेवढा लिहून ठेवीन. पाप वर्ज्य करून पुण्याचाच तेवढा उल्लेख केला असतां मनुष्याची प्रगति होते; कारण प्रत्येक नवी पिढी पुढें तिच्या समूर उत्तम ध्येयाची स्थापना झाल्यामुळें त्या उत्तम ध्येयाच्या प्राप्तीकरितां झटेल. अशा इतिहासाला म्हणतात तत्त्वज्ञानाचें दृष्टान्त देऊन केलेलें निरूपण व ह्याहून इतिहासाची व्याख्या निराळी नाहीं. "

उत्तम भाग तेवढा इतिहासांत घ्यावा, वाईट तेवढा निवडून टाकावा, हें एकमत झालें. परंतु इतिहास या शब्दाचा अक्षरशः अर्थ पाहूं गेलें तर तो निराळाच होईल. इति+ह+आस इतके शब्द मिळून इतिहास शब्द झाला आहे; व त्याचा

अर्थ म्हटला म्हणजे " असें असें झालें ", कार्यकारण संबंध काय तो पाहूनघ्या. दृष्टांतासहित तत्त्वशोधन करणें तें मागाहून करा. पण त्यांत उत्तमाचा संग्रह व अधमाचा अव्हेर असें कांहीं निघत नाहीं. इतिहास व चरित्र यांत फरक एवढाच कीं चरित्र हें व्यक्तीचा वृत्तान्त व इतिहास हा देशाचा. म्हणून चरित्र हें सुद्धां इतिहासाप्रमाणेंच लिहिलें पाहिजे. म्हणजे चरित्रनायकाच्या आयुष्यक्रमांत जें जसें वृत्त घडून आलें असेल तें तसेंच निवेदन केलें पाहिजे हें दुसरें मत झालें. या दुसऱ्या मताला धरून हें चरित्र लिहिण्यांत आलें आहे.

जरी हें चरित्र विस्तृत आहे तरी अपूर्ण आहे; कारण शेंकडों कागदपत्र वाचावयाचे आहेत. कांहीं पत्रें—जीं प्रथम संदर्भाभावें समजलीं नाहींत म्हणून ज्याचें महत्त्व कळून आलें नाहीं व म्हणून जीं विचारांत घेतलीं नाहींत तीं—आतां सर्व-ग्रंथ छापून झाल्यावर मागाहून दुसरीं पत्रें वाचल्यावर संग्राह्य वाटूं लागलीं आहेत. कांहीं नवे शोध लागण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ पृष्ठ ६ पहा. तेथें " मंडलिक " हें नांव कोणी मिळविलें याचा शोध चालविला असतां विसाजीराम, चरित्र नायकाचा खापर पणजा, याच्या पलिकडे कांहीं शोध लागत नाहीं असें म्हटलें आहे. पण आतां एक वृत्तिपत्राची नक्कल सांपडली आहे तीवरून असें दिसतें कीं श्री नृप शालिवाहन शके १५८२ शार्वरी संवत्सरांत तें वृत्तिपत्र एकाला समस्त मुरूडकर ग्रामस्थांनीं दिलेलें आढळतें. त्यावर तिमाजी, मंडलिकांचा आज माहित असा मूळपुरुष, यांची सही आहे. ती तिमाजी महाजन मंडलिक अशी आहे. यावरून मंडलिक हें नांव मिळविणारा पुरुष तिमाजीच्या अगोदरचा असावा हें उघड आहे. शिवाय तिमाजी हा गांवचा महाजन होता. म्हणून पहिली सही तिमाजीची आहे. अद्यापि मंडलिकांना वार्षिक दुर्गादेवीच्या यात्रेचें आमंत्रण होतें तेव्हां " महाजन चला हो यात्रेला " या वाक्याचा उच्चार होतो. त्याचीही उपपत्ति लागते.

कांहीं पत्रांवरील अक्षरें उडाल्या सारखीं झालीं आहेत. कांहींचीं लागलीं नाहींत तीं परिचयानें लागूं लागतील असा अदमास आहे. कांहीं ज्या शाईनें लिहिलीं गेलीं तिच्यांतील दुर्गुणानें शाईनें व्यापलेल्या पत्रांच्या भागाचें चूर्ण होऊन अवशिष्ट भागाचीं जाळीं उरलीं आहेत. व कांहीं पत्रें जराजर्जित होऊन स्पर्श सहन करण्यास असमर्थ झालीं आहेत. त्यांचा झाला तो उपयोग करून घेतला आहे. परंतु अधिक उपयोग होण्यासारखा आहे.

तथापि राहिलेली कांहीं महत्त्वाची माहिती जी उपलब्ध होईल तिचा विचार दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास होईलच.

रावसाहेबांचे चिरंजीव, नारायण विश्वनाथ मंडलिक बी. ए. एल् एल् बी. जे. पी. यांनीं* ग्रंथ प्रसिद्धीच्या कामीं जुने कागद पत्र वाचावयास देऊन जें हरप्रकारें मोठें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा ग्रंथकर्ता आभारी आहे व तें साहाय्य करतांना जो मनाचा मोठेपणा दाखविला त्याबद्दल अधिक आभारी आहे असें सांगून या आवृत्तीची प्रस्तावना पुरी करण्यांत येत आहे.

फाल्गुन कृष्ण तृतीया शके १८४८ }
मु॥ मुंबई गिरगांव आंग्रेयांची वाडी } **गणेश रामकृष्ण हवलदार**

---

*यांना बी.ए. च्या परीक्षेंत कॉब्डन क्लब मेडल मिळालें. १८९७ सालीं प्लेगाची राष्ट्रीय आपत्ति सुरू झाली. तेव्हां प्लेगग्रस्त लोकांचे क्लेश कमी व्हावे, त्यांस स्वास्थ्य मिळावें व विशेष पथ्या पाण्याची तरतूद व्हावी म्हणून सरकार द्रव्यद्वारा साहाय्य करीत असे. त्यासंबंधाचें काम यांनीं १८९८।९९ सालीं प्लेगाच्या इस्पितळांतून व शहराच्या दूषित भागांत फिरून मि. म्यूलर (जे. पी. प्रोफेसर एल्फिन्स्टन कालेज) यांबरोबर प्लेगाची भीति न बाळगतां स्वयंसेवक म्हणून केलें. त्याबद्दल सरकारानें एक विशेष ठराव करून यांचे आभार मानिले.

१८९४। ९५ सालीं आनररि मॅजिस्ट्रेट; जे. पीं. नीं निवडलेले असे २० वर्षें व सरकारानें नेमलेले असे तीन वर्षें, मिळून २३ वर्षें मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या कारपोरेशनचे सभासद; म्युनिसिपल स्टॅन्डिंग कमिटीचे अनेक वर्षें सभासद व एक वर्ष चेअरमन; म्युनिसिपल स्कूल कमिटीचे १५ वर्षें सभासद व एक वर्ष चेअरमन; डेव्हिड सॅसून रेफर्मेटरीच्या व्यवस्थापक कमिटीचे सरकारनें नेमलेले १९०३ पासून १९२१ पर्यंत सभासद व शेवटलीं तीन वर्षें हिंदी गृहस्थांतून पहिल्यानेंच नेमणूक झालेले चेअरमन; शेपर्ड आफ्टर केअर असोसिएशनचे सभासद व अध्यक्ष; मुंबई इलाख्यांतील वॉर रिलीफ अडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटीचे सभासद व रेन्ट ॲक्ट कमिटीचे सभासद; या नात्यानें यांनीं आजपर्यंत पुष्कळ सार्वजनिक कामगिरी स्वार्थनिरपेक्ष केली आहे.

गोकुळदास तेजपॉल नर्सिंग असोसिएशन; सिनेमाचे चित्रपट तपासणारा बोर्ड; मुंबई नॅचरल हिस्टरी सोसायटी, बंधमुक्त कैद्यांस साहाय्य करणारी मंडळी इ. इ. आठ दहा संस्थांत हे सभासद या नात्यानें काम करीत असतात.

१९११ सालीं आपले परम पूज्य बादशहा पांचवे जॉर्ज यांनीं या देशीं सस्त्रीक येऊन आपल्या प्रजेस दर्शन दिलें. त्या शुभ प्रसंगीं त्या उभयतांचें स्वागत करण्यास नेमलेल्या कमिटीचे हे सभासद होते. तेव्हां त्यांस "दरबार" मेडल मिळालें.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | जन्मवृत्त | १ |
| २ | पूर्वेतिहास | ७ |
| ३ | नाना मंडलिक | १० |
| ४ | रावसाहेबांचें बालपण व आद्य-शिक्षण | १४ |
| ५ | उच्च शिक्षण | २१ |
| ६ | नोकरी ( भुज ) | २७ |
| ७ | नोकरी ( कराची ) | ३५ |
| ८ | नोकरी ( व्हिजिटरची ) | ४७ |
| ९ | १८५७ साल | ७२ |
| १० | सौ॥ अन्नपूर्णाबाई मंडलिक | ७६ |
| ११ | नोकरी ( मुनसफीची ) | ८० |
| १२ | नोकरी ( क्युरेटरची ) | ८८ |
| १३ | नोकरी ( प्रांतीवरील कराच्या कमीशनर साहेबांच्या कचेरींतील) | ९७ |
| १४ | राजिनामा | १०७ |
| १५ | वकिलीचा अभ्यास | ११५ |
| १६ | व्यापार | ११९ |
| १७ | प्रथम ग्रंथलेखन | १२५ |
| १८ | वकिली | १५३ |
| १९ | वकिलीचें रहस्य | १७० |
| २० | नेटिव्ह ओपिनियन | १९२ |
| २१ | मुंबईंतील जुगार | २२१ |
| २२ | रेव्हिन्यू सर्व्हे बिल | २२४ |
| २३ | बाम्बे असोशिएशन | २३५ |
| २४ | ईस्ट इंडिया असोशिएशन | २५२ |
| २५ | धर्मांतर | २६४ |
| २६ | सामाजिक सुधारणा | २७५ |
| २७ | स्टूडन्टस् लिटररि ॲन्ड सायन्टिफिक सोसायटी | ३२४ |
| २८ | वकिलांची सभा | ३२८ |
| २९ | डेकन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी | ३३० |
| ३० | शिष्टदर्शन | ३३२ |
| ३१ | मध्यम ग्रंथलेखन | ३३३ |
| ३२ | म्हैसूर | ३३९ |
| ३३ | विश्वविद्यालय | ३६५ |
| ३४ | रायल एशियॅटिक सोसायटी | ३९७ |
| ३५ | वक्तृत्वोत्तेजक सभा | ४१६ |
| ३६ | नाना मंडलिकांचा प्रपंच | ४१८ |
| ३७ | भाऊ मंडलिक | ४४४ |
| ३८ | रावजी मंडलिक | ४४७ |
| ३९ | रावसाहेबांच्या मातोश्री | ४४८ |
| ४० | रावसाहेबांच्या पत्नीचा अंगरोग | ४५२ |
| ४१ | मुंबई म्युनिसिपॅलिटी | ४६४ |
| ४२ | खोती कज्जा | ५३६ |

| प्रकरण. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४३ | कायदा विरुद्ध व्यक्तिविषयक तारतम्य | ५५५ |
| ४४ | मुंबईचें कायदे काउन्सिल | ५७२ |
| ४५ | महाबळेश्वर | ६४१ |
| ४६ | बडोदें | ६४५ |
| ४७ | श्रीमंत सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल यांचा राज्याभिषेक | ६५० |
| ४८ | प्रिन्स आफवेल्स यांचें आगमन | ६५२ |
| ४९ | दिल्ली दरबार | ६५६ |
| ५० | सरकारी वकीली | ६६५ |
| ५१ | दुष्काळ | ६६९ |
| ५१ अ | ऋष्याश्रम अथवा हर्मिटेज बंगला | ६७५ |
| ५२ | धर्मादाय | ६७९ |
| ५३ | स्त्रीविरह | ६८९ |
| ५४ | चिरंजीवांचें लग्न | ६९५ |
| ५५ | विश्वस्त कार्यें | ६९८ |
| ५६ | रावसाहेबांचा ग्रंथसंग्रह | ७०३ |
| ५७ | शेतकऱ्यांचा कायदा | ७१२ |
| ५८ | लोकमत | ७१७ |
| ५९ | ड्यूक आफ कनाट यांचें या देशीं आगमन | ७२३ |
| ६० | श्रीगंगा | ७२६ |
| ६१ | गोरक्षण | ७२९ |
| ६२ | रावसाहेब व वैद्यविद्या | ७४० |
| ६३ | हिंदुधर्मशास्त्र अथवा मयूख | ७५४ |
| ६४ | कलकत्ता | ७६० |
| ६५ | कलकत्ता काउन्सिल | ७६५ |
| ६६ | लार्ड रिपन | ८०० |
| ६७ | महाराणी व्हिक्टोरिया | ८२१ |
| ६८ | अन्तिम ग्रंथलेखन | ८२६ |
| ६८ अ | समाजसुधारणा विरुद्ध कायद्याची मध्यस्थी | ८३७ |
| ६९ | माधवबागेंतील सभा | ८५२ |
| ७० | दादाजी विरुद्ध रखमाबाई | ८५८ |
| ७१ | समुद्रयान | ८७१ |
| ७२ | ब्रह्मपरिषद् | ८७५ |
| ७३ | हिंदुस्थानविषयक इंग्लंदांत व येथें चळवळ | ८८० |
| ७४ | रावसाहेबांच्या पदव्या | ९०५ |
| ७५ | अन्तकाल | ९०७ |
| ७६ | पत्रव्यवहार | ९४० |
| ७७ | रावसाहेबांचीं मतें | ९७० |
| ७८ | ,, किरकोळ भाषणें | ९९३ |
| ७९ | रावसाहेबांच्या म्हणी | १००५ |
| ८० | ,, रोजनिशा | १०१९ |
| ८१ | रावसाहेबांचे गुरुजी | १०४७ |
| ८२ | ,, मित्र | १०६९ |
| ८३ | रावसाहेबांचें पौरुष | १११७ |
| ८४ | उपसंहार | ११९० |

श्रीगजानन.

# रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र.

## प्रकरण १ लें.

संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3339

## जन्मवृत्त.

। सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी ।
॥ सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ॥
। आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मृष्टान्नपानं गृहे ।
॥ साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ १ ॥

प्रस्तुत चरित्रनायकाचा जन्म, मुक्काम मुरूड, तर्फ पंचनदी, तालुका सुवर्णदुर्ग, जिल्हा रत्नागिरि या गांवीं शके १७५४ फाल्गुन कृष्ण चतुर्थी रोजीं* रात्रौ २८ घ. ४६ पळांनीं झाला. जन्मगृहाची उंच माडी, त्याची कौलारू मांडावण, त्याच्या मोठ्या विस्ताराला शोभतील अशीं पुढें व मागें ह्मणजे पूर्व व पश्चिम बाजूंस व उत्तरेस ह्मणजे उजव्या बाजूस अशीं तीन प्रशस्त अंगणीं, मागें पश्चिमेस लांब व रुंद अशी वृक्षवाटिका व तींत तांबूल, नारिकेल, कर्दली, आम्र व पनस इत्यादि लोकोपयोगी वृक्षांच्या दीर्घराजी, वृक्षवाटिकेंत असलेले जलाढ्य तीन पाषाणमय कूप, त्यांच्या-वर मोठाले रहाट बसवून बलिवर्दादिकांच्या साहाय्यानें वृक्षवाटिकेला जलसिंचन करण्याची व्यवस्था, शिवाय डाव्या बाजूला सवत्स धेनू व

* तारीख ८ मार्च सन १८३३ रोजीं

महिषी यांचा गोठा, व एकाद दुसऱ्या अश्वाकरितां लहानशी शाला, खालीं व माडीवर पांच सहा खोती व इनाम गांवांतून व इतर शेतजमिनींतून आणलेल्या विविध व विपुल धान्यांनीं भरलेलीं कोठारें, प्रतिदिवशीं घरच्या देवांची पूजा अर्चा करण्यास पढिक ब्राह्मण, अपराह्ण समयीं कुटुंबांतील व ग्रामांतील मुमुक्षु जनांस कथा पुराण वाचून दाखविण्यास शास्त्री, घरांतील व बाहेरील काम करण्यास घरच्या स्त्रीपुरुषांस साहाय्य करण्यांत गुंतलेले इतर आज्ञापर सेवक, इत्यादि सर्व इच्छापूर्ण ऐश्वर्याचे धनी, गृहस्थाश्रम धर्माप्रमाणें आतिथिसत्कार करणारे, कुलीन व पुण्यशील असे चरित्रनायकाचे वडील नानासाहेब मंडलिक व त्यांच्याबरोबर त्या घरांत साक्षात् लक्ष्मीप्रमाणें नांदणारी, प्रियभाषिणी व अनुकूल अशी त्यांची आवडती पत्नी लक्ष्मीबाई ( चरित्रनायकाची जननी) हीं दोघें आर्धीची संतति दोन पुत्र व एक कन्या यांसह आनंदांत नांदत होतीं असें आज वाचून एवढ्या मोठ्या ऐश्वर्याची प्राप्ति करून घेणारा महाभाग्यशाली मूळ पुरुष कोण असावा या विषयींची जिज्ञासा कोणाच्याही मनांत सहजच उत्पन्न होईल.

ही जिज्ञासा तृप्त करण्याला थोडींशीं साधनें आहेत. प्रस्तुत चरित्रनायकानेंच १८६५ सालीं त्याचें जन्मस्थान जो मुरूडगांव तो कोणी व कसा वसविला या विषयींच्या इतिहासावर मुंबईच्या रॉयल् एशियॅटिक सोसायटी पुढें निबंध वाचिला. या इतिहासाची मूळ प्रत मोडींत लिहिलेली आहे. तिची भाषा बखरीच्या धर्तीवर आहे. लिपी व भाषा या अंतर्गत गोष्टींचा व इतर बाह्य पुरावा यांचा विचार करतां तो निबंध वाचला गेला त्यावेळेला ती प्रत २०० वर्षांची जुनी असावी असें त्या निबंधकारांनीं मत दिलें आहे. त्यावर आजमितीला ६०।६२ वर्षें लोटलीं. यावरून ती प्रत २६० वर्षांहून जुनी आहे असें धरावयास हरकत नाहीं. मुरूड गांव वसविल्यानंतर त्याचा इतिहास लागलाच किंवा त्याची सर्व

हकीकत लिहिणाऱ्याच्या स्पष्ट ध्यानांत आहे तोंच लिहिला गेला असें धरलें तर निदान २६० पासून ३०० वर्षांपूर्वी मुरूड हा गांव वसविला गेला असें म्हणण्यांत अगदीं चूक होणार नाहीं. तथापि निबंधकाराच्या मतानें त्याच ठिकाणच्या पुरातन देवालयांवरून किंवा अन्य खाणांखुणांवरून व लौकिक दंतकथांवरून हा गांव १३ व्या अथवा १४ व्या शतकांत म्हणजे ७०० वर्षांपूर्वी वसविला गेला असावा.

मुरूड गांवच्या संस्थापनेचा इतिहास अगदीं संक्षेपतः असा आहे. गंगाधरभट्ट या नांवाचा एक सिद्ध पुरुष उत्तर हिंदुस्थानांतून आपल्या एका सुतनिर्विशेष शिष्यासहवर्तमान दक्षिण कोकणांत हा गांव वसविला आहे, त्या जागीं प्राप्त झाला. ही जागा शेजारीं असलेल्या आसूद गांवाची रुद्रभूमि म्हणजे स्मशानभूमि होती. त्या भूमीचें व सन्निकृष्ट भागाचें सूक्ष्म निरीक्षण करतां त्या सिद्ध पुरुषाच्या ध्यानीं आलें कीं ती भूमि वसतियोग्य आहे. म्हणून तेथून चतुष्क्रोशांतरावर जलग्रामीं ( हल्लींच्या जालगावांत ) शेखर वंशांतील जलंधर नामेंकरून एक राजा राज्य करीत होता, त्याच्या सन्निध जाऊन ती जागा व आसमंतात् भागांतील पुष्कळ जागा गांव वसविणाऱ्या लोकांस बक्षिस देण्याकरितां मिळावी अशी विनंति करिता झाला. आज्ञोत्तर मिळतांच त्यानें या नव्या मुरूडगांवीं १३ ब्राह्मणांचीं कुटुंबें आणून तितकीं ठिकाणें त्यांस आंखून देऊन सिमे सिमेवर दगड बसवून बक्षिस दिलीं. गांवामध्यें श्रीदुर्गादेवीची मुख्य देवता म्हणून स्थापना केली. तीशिवाय पुष्कळ ग्रामदेवतांची स्थापना केली व त्यांच्या पूजार्चनाची सोय करून दिली. त्याचप्रमाणें सोनार, सुतार गुरव, न्हावी, कुंभार, तेली, परीट, चर्मकार इत्यादि ग्रामसंस्थेस अवश्य अशा धंदेवाल्यांच्या कुटुंबाची वसाहत करवून त्यांस वतनदार केलें. यवनांकरितां एका शून्यालयाची ( मशीदीची ) उभारणी केली. ग्रामोत्सवाची नियमबद्ध व्यवस्था करून ठेविली. सारांश हिंदुस्थानांतील

खेडें ह्मणजे जें सर्व युरोपियन गृहस्थांस कौतुकास्पद अद्यापिही वाटत असतें, त्या एका खेड्याची नमुनेदार रचना त्या सिद्ध पुरुषानें केली.

यांत सांगावयाचें हें कीं जीं १२ ब्राह्मणांचीं कुटुंबें या गांवीं वसाहत करण्यास प्रथम आलीं त्यांत एक "परांजप्या" ब्राह्मण होता व त्याला इनाम करून दिलेल्या ठिकाणांतच श्रीगंगानारायण या देवतेची स्थापना करून त्या देवतेची पूजा व अर्चा त्या 'परांजप्या' ब्राह्मणाकडे सोंपविलेली होती.

मंडलिकांचें मूळचें आडनांव परांजपे असें होतें. मंडलिक हें नांव मागाहून मिळविलेलें आहे. त्याला एक आधार आहे. प्रस्तुत चरित्रनायकाचे पितामह धोंडदेव मंडलिक यांस पुरुषसंतति नव्हती. ह्मणून त्यांचे जामात श्रीमंत बाजीरावसाहेब (शेवटले पेशवे) यांनीं कुवेशी येथील परांजपे घराण्यांतील एक मुलगा पसंत करून त्यांच्या मांडीवर दिला. आपल्या वंशांतील मुलगा लभ्य नसेल तर सगोत्रांतील तरी मांडीवर घ्यावा असा पूर्वीं कडक नियम असे त्याप्रमाणें ज्या अर्थीं धोंडोपंत मंडलिक यांच्या मांडीवर परांजप्यांच्या कुळांतील एक पुरुष बसविण्यांत आला त्या अर्थीं मुरूड येथील मंडलिकांचें मूळ आडनांव परांजपे होतें, हा समज खरा असावा.

ज्या ठिकाणांत प्रस्तुत चरित्रनायकाचा जन्म झाला व जें अद्यापि मंडलिकांकडे वतन ह्मणून चालत आहे तें ठिकाण व मुरूडगांव वसविण्यांत आला त्यावेळीं श्रीगंगानारायणाच्या पूजे अर्चेकरितां 'परांजप्या ब्राह्मणास' जें ठिकाण वतन करून मागें देण्यांत आलें तें ठिकाण हीं दोन्हीं एकच आहेत. या ठिकाणीं स्थापन केलेल्या श्री गंगानारायणाच्या मूर्तीचा पेंढाऱ्यांनीं एका हल्ल्यांत ध्वंस केला. तथापि देवळाचा चौथरा अद्यापि या ठिकाणांत आढळतो व त्यावरच हल्लींची प्रथम निर्दिष्ट केलेली गोशाळा बांधलेली आहे. सन्निध श्रीगंगानारायणा-

च्या स्नानादिक्रियेकरितां उदक पाहिजे ह्मणून एक तलाव बांधलेला होता. तो जणुं काय दुःखानें आटून केव्हांच शुष्क होऊन बुजून गेला आहे, तरी त्याच्या दगडांचा मागमूस या ठिकाणांत बराचसा लागतो. यावरून एवढें अनुमान काढतां येतें कीं जो 'परांजप्या' ब्राम्हण मुरूडगांवांत येऊन प्रथम वसाहत करता झाला तो मंडलिकांचा मूळपुरुष असावा. हा मूळपुरुष सधन नसावा. असता तर पुजारीपण पतकरून नव्या गांवांत वसाहत करतांना जे साहजिक क्लेश भोगणें अवश्य प्राप्त होतें ते कुटुंबासह भोगण्याच्या भानगडींत दारिद्र्यविमोचनाचा हेतु असल्याशिवाय पडता ना.

या मूळपुरुषाच्या कोणत्या पराक्रमी वंशजानें मंडलिक हें उपनांव मिळविलें हें आतां पाहूं.

चरित्रनायकाचीं एक आते श्रीमंत बाजीराव पेशवे ( शेवटले ) यांस दिली होती. तेव्हां श्वशूरांचा सन्मान करण्याकरतां मंडलिक ही पदवी श्रीमंतांनीं दिली, अशी मंडलिक या आडनांवाची उपपत्ति कांहीं लोक लावतात. चरित्रनायकाचे आजे धोंडो नारायण यांनीं अंजनवेलची मुजुमदारी मिळविली. तिचें काम पहात असतां घरीं पुष्कळ मंडळी जमे म्हणून यांस मंडलिक म्हणूं लागले अशी दुसरी उपपत्ति वरवर विचार करून कांहीं लोक लीलेनें लावतात. परंतु मागील कागद पत्रांचें वाचन केलें असतां असें आढळतें कीं प्रस्तुत चरित्रनायकाचा खापर-पणजा "शेवक विसाजी राम उपनाम मंडलिक वा। का। मुरूड, तालुके पंचनदी, सुभा दाभोळें, यांणीं हुजूर सातारियाचे मुक्कामीं महाराज राजश्री छत्रपति स्वामी व तीर्थस्वरूप राजश्री रावप्रतिनिधि स्वामी सान्निध्य येऊन विनंति केली कीं आपण पुरातन राज्यांतील येकनिष्ठ शेवक. कुटुंबाचें क्षेम चालत नाहीं. याकरितां स्वामींनीं कृपाळु होऊन येक ग्राम इनाम करून देऊन चालविलें पाहिजे म्हणून त्याजवरून येक ग्राम इनाम करून " इत्यादि मजकूर मंडलिकांकडे अद्यापि चालत असलेल्या नाणीज या इनाम

गांवांसंबंधीं जी सनद आहे व तीसंबंधें देशपांडे वगैरे ग्रामाधिकारी यांस जीं आज्ञापत्रें श्रीमंत छत्रपति शाहू महाराज व प्रतिनिधि यांचे प्रतिनिधि म्हणून जगजीवन परशराम पंडित यांच्या नांवें निघालीं आहेत त्यांत आढळतो. ही सनद व आज्ञापत्रें सन १७३२ सालांतलीं आहेत. यावरून असें सिद्ध होतें कीं, सुमारें १९५ वर्षांपूर्वींच विसाजी राम मंडलिक हे मराठी पुरातन हिंदुपद्पातशाहीचे नोकर होते व त्यांचें उपनाम मंडलिक होतें. विसाजीराम विनंति करतात "आपण पुरातन राज्यांतील येकनिष्ठ शेवक" सेवा येकनिष्ठ ठरण्यास श्रीमंत शाहूमहाराजांच्या कारकीर्दीच्या पलिकडे ही जाण्यास हरकत नाहीं व सन्निध गेल्याबरोबर सनद मिळते त्यावरून असें म्हणतां येईल कीं विसाजीराम हे पिढिजात नोकर असावे. निदान स्वतः तरी अनेक वर्षें पर्यंत एकनिष्ठ सेवक होते. या गृहस्थास उपनाम मंडलिक लाविलेलें आहे. परांजपे या नांवाचा उल्लेख नाहीं. तेव्हां हें उघड आहे कीं मंडलिक हें नांव विसाजीराम यांनीं मिळविलें नसून त्याच्या पिढींतील पूर्वजांनीं मिळविलेलें असावें.

याच्या आधीं म्हणजे १७३२ च्या पूर्वीं यांच्या वंशांतील कोण पुरुष हें नांव मिळवून गेला याचा शोध लागत नाहीं. सीताप्राप्तीकरितां लंकेच्या शोधार्थ पाठविलेल्या एका तुकडींतील सुग्रीवाच्या दूतांनीं श्री रामचंद्रास येऊन सांगितलें कीं सोमगिरीच्या पलिकडे जाणें अशक्य आहे. त्या प्रदेशांत सूर्याच्या उजेडाचें नांव नाहीं. तो फार अफाट आहे. त्याच्यापलिकडे आम्हांस कांहीं माहिती नाहीं. *त्याप्रमाणेंच इतिहासाच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं विसाजीराम हा मंडलिक या उपनांवाच्या संबंधें सोमगिरि होय. त्याच्या पलिकडे कांहीं विशेष शोध लागण्याचा तूर्त संभव नाहीं.

---

* एतावद्वानरैः शक्यं गन्तुं, वानरपुंगवाः। अभास्करममर्यादं न जानीमस्ततः परम्।
—रामायण किष्किंधाकांड अ. ४३ श्लोक ५९.

## प्रकरण २ रें.

# पूर्वेतिहास.

। कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततोवा ।
॥ नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥

मंडलिकांच्या घरीं वंशावळ आहे. नाशिक व काशी या क्षेत्रीं मंडलिकांच्या उपाध्यांकडे उपलब्ध असलेल्या वंशावळीशीं ती जुळत आहे. तिचा प्रारंभ तिमाजी नांवाच्या मूळपुरुषापासून झालेला आहे. त्याला रामजी नांवांचा एकच पुत्र होता. त्याला विसाजी नांवाचा पुत्र झाला. तो फार पराक्रमी निघाला. त्यांनीं १७३३ मध्यें श्रीमंत छत्रपति श्री शाहू महाराज व श्रीमंत पंतप्रतिनिधि यांच्याकडून "आपण पुरातन राज्यांतील येकनिष्ठ शेवक" म्हणून कुटुंबाचें क्षेम चालण्याकरतां येक ग्राम इनाम करून घेतला ही हकीकत मागें आलेली आहे. पुरातन राज्याचे विसाजीराम शेवक होते असें सनदेंत दिलेल्या अर्जदारांच्या विनंति कलमांत स्पष्ट आहे व येकनिष्ठ शेवक होते म्हणूनच योगक्षेम चालण्याकरतां गांव इनाम दिला हें उघड आहे. परंतु काय सेवा करीत होते हें त्या सनदेंत नाहीं. किंवा अन्यत्र कोठेंही त्याचा उल्लेख केलेला आढळत नाहीं.

वळणें गांव मंडलिक घराण्यांत चालत आहे तो याच विसाजीराम मंडलिक यांनीं राज्यकार्यधुरंधर संभाजी आंग्रे शिरखेल यांचे वडील तीर्थरूप आबासाहेब यांकडून मिळविला. त्याचप्रमाणें कुंभवें म्हणून मंडलिक यांकडेच चालत असलेला एक गांव आहे तो बेचिराक व उजाड झाला होता तो "दस्तास आणण्याकरतां" विसाजीराम यांनींच मिळविला

विसाजीराम यांना पुत्र सात* होते. हे सर्वजण आपल्या पित्यास जितक्या सुखास हेतु झाले तितक्याच दुःखासही झाले. कारण हे सातही पुत्र विसाजीराम यांच्या देखत मृत झाले. व त्यांतील ६ तर निपुत्रिकच होते. सातवा नारायण १७४५ सालीं मृत्युवश झाला. तेव्हां त्याची स्त्री सती गेली. सुदैवानें त्याच्या मागें एक ४ वर्षांचा पुत्र धोंडू व दोन कन्या आकाबाई व मथुराबाई† अशीं तीन अपत्यें उरलीं होतीं.

ज्या पुत्रांनीं श्राद्धादिसंतर्पणें करून विसाजीराम यांचें पारलौकिक श्रेय संपादन करावयाचें त्याच पुत्रांची क्रिया करावयाचें अशुभ कार्य वृद्धपणीं विसाजीराम यांवर बहुत वेळां पडल्यामुळें जीवित सहन होत नाहींसें होऊन १७५३ सालीं विसाजीराम यांनीं परलोक गांठला.

यांची क्रिया यांच्या बाल्यावस्थेंत असलेल्या १२ वर्षांच्या नातवानें, धोंडूनें केली. या मूळसप्तशाखी वृक्षाच्या उरलेल्या कोंवळ्या उपशाखेला वाढविण्याचें काम विसाजीराम यांनीं कोणाकडे निरविलें होतें व परिक्षितितुल्य धोंडूला कोणी वाढविला, हें कळण्याला मार्ग नाहीं. धोंडू पुढें मोठा झाल्यावर आजोबांप्रमाणेंच पराक्रमी निघाला. त्यानें १७५९ सालीं आंग्रे सरखेल यांच्या अमदानींत अंजनवेलची मुजुमदारी मिळविली. व आंग्रे यांनीं आपल्या कारभाऱ्याची जागा त्यास दिली होती. त्यावेळेस तो अंजनवेलीस जाऊन स्वतः बांधलेल्या घरांत राहत होता. घरवाडी ठिकाण व त्या घराचें स्मारक, त्याचें उरलेलें जोतें, नारायण मंडलिक यांच्या जांवयाच्या वंशाकडे ( आचवलांकडे ) अद्यापि चालत आहे.

धोंडोपंत यांनीं एकामागून एक चार स्त्रिया केल्या, त्या घरीं धन दौलत पुष्कळ होती, तिचा उपभोग घ्यावयास संततीच पाहिजे होती म्हणून केल्या.

* रावसाहेबांच्या दप्तरांतील त्यांचे मित्र सोमण यांनीं केलेल्या एका टिपणांत ही संख्या ५ अशी दिलेली आहे.

† मथुराबाई ही अंजनवेलचे आचवल यांकडे दिली होती.

त्याः—१ सावित्रीबाई, कोणाची मुलगी तें माहीत नाहीं; २ गंगा, गिम्हवणें येथील गोखले यांची मुलगी; ३ रमा, वेळास येथील जोशी यांची मुलगी; व ४ आनंदी (बया), सत्कुंडीचे जोग यांची मुलगी. यांतील पहिली व शेवटली या दोघींजणींपासून संतानप्राप्ति झाली नाहीं. दुसरी स्त्री गंगा हिला दुर्गा नांवाची एक कन्या झाली होती. तिचा विवाह १८।६।१७९३ रोजीं श्रीमंत शेवटले बाजीरावसाहेब यांच्याशीं झाला होता. सासरचें नांव श्रीमंत सरस्वतीबाईसाहेब असें होतें. यांच्याशिवाय ४ मुली गंगाबाईस झाल्या होत्या त्या—१ पुणेकर फाटक यांजकडे; २ गव्हें येथील केळकर यांकडे; ३ आंजर्ले येथील विध्वंस यांजकडे; ४ मुरूड येथील बर्वे यांकडे अशा दिल्या होत्या. यांशिवाय दोन झाल्या होत्या त्या लग्नापूर्वींच मृत झाल्या.

मंडलिकांपैकीं धोंडोपंत हेच पाहिल्यानें पुण्यास रहावयास गेले. त्यांस पालखींचें वतन मिळालें होतें. तींत बसून दररोज एकवेळा सरकारवाड्यांत ते जामातांच्या दर्शनास जात असत. पालखीचें वतन व ९ हमालांचा व एक मशालीच्या तेलाचा खर्च अंजनवेल तालुका कचेरींतून खर्च पडत असे. पुणें येथें असतांना पेशवे यांच्या कारकीर्दींत अंजनवेल येथील कुळकर्ण धोंडोपंतांनीं "रसद म्हणजे नजर ३५००(साडेतीन हजार) भरोन व मागील रसदवाल्याचे १००० रुपये भरोन १७८८ सालीं प्राप्त करोन घेतलें होतें."

धोंडोपंत यांची स्त्री रमाबाई हीस एक चांगला पुत्र झाला होता; पण त्यास मातृसुख अल्प होतें. तो एक वर्षाचा झाल्यावर रमाबाई त्याला सोडून परलोकीं गेल्या. त्यावर ६ वर्षांनीं त्यास पुण्यास १८१३ त नेण्याचा बेत धोंडोपंत यांनीं केला परंतु वाटेंत खामगांव येथें मुक्काम असतांना मातेच्या मागें रहाण्याचें जसें काय त्यास जड वाटून वाटेंतच दुखणें घेऊन पुणें मुक्कामीं गेल्यावर त्यानें मातेचाच पंथ स्वीकारला. या सुमारास १८१३-१४ साल निघालें होतें. धोंडोपंत यांच्या वयाचीं ७०।७२

वर्षें उलटलीं होतीं; इतक्यांत वृद्धपणीं एकुलत्या एक सुताच्या विरहानें त्यांची केवढी हानि झाली! चार स्त्रिया मिळून ६।७ मुलें झालीं. त्यांत मुलगा एक! तोही अल्पायु! पुढें मुलगा होण्याची आशा नाहीं! धोंडोपंतांचा धीर अगदीं खचून गेला व काळ समीप आला असें त्यांस वाटूं लागलें. तें श्रीमंत पेशवे यांनीं जाणन मुरूड येथें मंडलिकांच्या वंशांतील कोणी पुरुष शिल्लक नाहीं असें पाहून कुवेशीकर विद्वान, दशग्रंथी ब्राह्मण मोरभट्ट परांजपे यांचा १२।१३ वर्षांचा मुलगा श्वशूरांच्या मांडीवर देण्याची समक्ष योजना केली. त्याप्रमाणें १८१३।१४ सालीं, मार्गशीर्ष वद्य १ शके १८३५ रोजीं दत्तविधान झालें. मुलाचें नांव नारायण ठेवण्यांत आलें. तेच प्रस्तुत चरित्रनायकाचे भाग्यशाली वडील होत.

---

## प्रकरण ३ रें.

# नाना मंडलिक.

। यदि रामा, यदि च रमा, यदि तनयो विनयधीगुणोपेतः।
॥ तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम् ॥ १ ॥

अर्थः—! सुंदर ललना राजलक्ष्मी गृहीं गुणवान् पुत्रहि ज्याला।
॥ पुत्रापोटीं पुत्र होय तरी स्वर्गाधिक सुख हो त्याला ॥ १ ॥
( किर्लोस्करकृत सं. सौभद्र. )

नानांचा जन्म १८०० ( शके १७२२ ) सालीं झाला. यांस मागें सांगितल्याप्रमाणें मुरूडचे धोंडोपंत मंडलिक यांनीं १८१३।१४ सालीं दत्तक घेतलें. दत्तक घेतल्यावर धोंडोपंत मंडलिक यांचा कैलासवास झाला. पुणें येथें असतांच सातारचे कुलीन गृहस्थ दाजीबास्वामी गोळे यांची कन्या नानांस दिली होती. पुढें १८१८ सालीं श्रीमन्त

बाजीराव पेशवे प्रजापालनक्लेशांतून मुक्त होऊन ब्रह्मावर्तास रहावयास निघून गेले. त्यांच्याबरोबर न जातां नानांनीं मुरूडची वाट धरली; कारण श्रीमंतांस दिलेली नानांची बहीण आधींच निवर्तल्यामुळें मायेचा पाश उरला नव्हता. नानांच्या बरोबर त्यांच्या दोन मातोश्री १, गंगाबाई ( पेशवे यांची सक्खी सासू ) व २, आनंदीबाई ( बयाबाई ) या मुरूडास राहावयास आल्या. गांवीं आल्यावर घरावर मोठा दरवडा पडून ५००० चे दागिने लुटींत गेले. नानांना डोक्यावर एक जखम झाली होती. आनंदीबाई व नाना एकत्र रहात असत. पण गंगाबाईचें व त्यांचें पटत नसे. तिची दुसरी कन्या आवडाबाई मुरूड येथील बर्वे यांकडे दिली होती. तिच्याकडे गंगाबाईचा ओढा फार होता. व तें सहाजिक होतें म्हणून ती निराळी राहत असे. एक बागायत घरवाडीचें इनाम ठिकाण, ( रहाळकरांपैकीं मुरूडमुक्कामाचें ) पेंढे शेत नांवाची भात जमीन व एक कोरेगांव* म्हणून जो मंडलिक यांकडे गहाण होता तो खोती गांव आवडाबाईस चोळीबांगडीबद्दल धोंडोपंत मंडलिक यांनीं दिला होता. ही मिळकत आवडाबाईच्या हयातीपर्यंतच तिजकडे चालावयाची होती असें मंडलिक यांचें म्हणणें होतें. वंशपरंपरा बक्षिस होती असें बर्वे यांचें म्हणणें होतें. या तंट्याच्या कारणावरून चालूवहिवाटींत एक व अव्वल एक असे दोन दावे मंडलिकांनीं बर्व्यां विरुद्ध सांगितले. त्यांचा निकाल बर्वे यांच्या तर्फे झाला.

आनंदीबाई यांची रहाणी साधी असे. कोणाच्या भानगडींत न पडतां दत्तकपुत्र नानासाहेब यांजवळ राहून त्यांनीं आपलें आयुष्य ईश्वरचिंतनांत घालविलें. त्यांना एकदां वरील बर्वेप्रकरणांत साक्ष देण्याचा प्रसंग आला होता ती येणें प्रमाणें:—

“ आनंदीबाई कोम धोंडो नारायण मंडलिक. जात चित्पावन.

* मंडलिक यांच्या म्हणण्याप्रमाणें हा गांव बक्षिसपत्रांत मागाहून प्रविष्ट केला गेला.

उमर वर्षें ३४. सर्व माणसें कुटुंबाचीं पुणें मुक्कामीं होतीं तेथें घरधनी यांजवळ माझी सवत गंगाबाई हिणें विचारिलें कीं चिरंजीव आवडाबाई बर्वी हिचे मुलींस उपजीविकेसाठीं कांहीं दिल्हें पाहिजे. तेव्हां उत्तर जाहलें कीं आम्हीं मूल घेतला आहे व दुसऱ्याही मुली आहेत. त्याही मागूं लागतील. सबब कोणासही कांहीं द्यावयाचें नाहीं. ”

“ ही गोष्ट पुसिलियावर च्यार महिन्यांनीं आजमासें काळ झाला. वर्षश्राद्ध झाल्यावर आजमासें आठ नऊ महिन्यांनीं मी काशीस निघून गेलें होतें. ” आनंदीबाईचा सन १८६० सालीं चैत्रवद्य ६ रोजीं अंत झाला.

गंगाबाई ही फार हुशार होती. सर्व मिळकतीचा व्यवहार स्वतः पहात होती. त्यामुळें नानांस लहानपणीं फार त्रास पडला नाहीं. शिवाय मुरूडास आल्यावर ६।७ वर्षांनीं नानांचे जनक वडील वेदशास्त्रसंपन्न मोरभट्ट हे मुरूडास रहावयास आले. त्यांची नानांस हरएक कामांत मोठी मदत होत असे.

नाना हे वर्णानें गोरे, शरीरानें उंच व सदृढ होते. त्यांची स्त्री वर्णानें गोरी, अंगानें सडपातळ व बांध्यानें ठेंगणी होती.


दोघांचा जोडा नांवाजण्यासारखा होता. यांस कशाची उणीव नव्हती. या दंपत्याच्या प्रीतितरूला लवकर लवकर चांगलीं फळें आलीं. नानांस १८२५ त प्रथम पुत्रफलप्राप्ति झाली. त्या पुत्राचें नांव रामचंद्र असें ठेविलें होतें. त्यांस सारे भाऊ म्हणत. यांच्या पाठीवर १८२८ त नानांस आणखी एका पुत्रफलाची प्राप्ति झाली. त्या पुत्राचें नांव गंगाधर असें ठेविलें होतें. यांस रावजी म्हणत. रावजींच्या पाठीवर एक कन्याफलाची प्राप्ति झाली. कन्येचें नांव काशीताई असें ठेविलें होतें. त्यानंतर त्यांस १८३३ त तिसऱ्या पुत्रफलाची प्राप्ति झाली. त्याचें नांव विश्वनाथ असें ठेवण्यांत आलें. त्यावेळेस हें मूल ( प्रस्तुत चरित्रनायक ) पुढें पराक्रमी होऊन आपलें नांव सार्थ करील असें कोणाच्याही ध्यानांत आलें नसेल. विश्वनाथास पाळ-

ण्यांत घालून बाजेवर पडून पाळण्याचीं सूत्रें हालवितांना हा पुढें मोठा झाल्यावर सर्व देशाचीं सूत्रें चाळवील असें स्वप्न सुद्धां याच्या मातोश्रीस पडलें नसेल. निद्रा आली नाहीं म्हणून गीत म्हणत असतांना हा मोठा झाल्यावर सारें राष्ट्र याचें यशोगीत गाईल अशी कल्पनाही याच्या मातोश्रीच्या मनांत शिरली नसेल. विश्वनाथास सारे अण्णा म्हणत.


यानंतर नानांस आणखी ४ कन्याफळांची प्राप्ति झाली व शेवटीं १८४३ त एक पुत्रफळाची प्राप्ति झाली होती. परंतु तें अकालीं गळून पडलें. याचें नांव जयराम असें होतें. शेवटीं एकंदरींत तीन पुत्र व ५ कन्या अशीं चांगलीं फळें वाढीस लागलीं. सर्व मुली कुलशीलवान घराण्यांत पडल्या होत्या. त्या येणेंप्रमाणें.

१ काशीताई—आयनीचे नऊलाखे कान्हेरे ( भाऊसाहेब ) यांस दिलेली.
२ माई—दाभोळचे दामले यांकडे दिलेली.
३ कृष्णा—अलिबागकर श्रीमंत आंग्रे बिवलकर यांकडे दिलेली.
४ वेणू—केळशीचे नाना केळकर यांकडे दिलेली.
५ आत्या—केळशीचे बिवलकर यांकडे दिलेली.

नानासाहेबांची जन्म-लग्न कुंडली.




रावसाहेबांची जन्म-लग्न कुंडली.



## प्रकरण ४ थें.

# रावसाहेबांचें बालपण व आद्य शिक्षण.

अकीं तुम्हांसि घेउनि, आलिंगुनि, हृष्ट कोण होतात ? ।
कोणास माय म्हणतां ? तुमचा कृतसुकृत कोण हो तात ? ॥
( मोरोपंत. )

अण्णांचा वर्ण उत्तम गोऱ्यापैकीं, डोळे विशाळ व अत्यंत तेजस्वी, चेहरा वर्तुलाकृति, नाक तरतरीत, ओंठ अगदीं लाल, असें त्यांचें बाळपणचें कोंवळें, सुंदर व सुलक्षणसंपन्न शरीर पाहून मथळ्यावर दिलेल्या आर्येतील प्रश्न त्यांस पहाणाऱ्याच्या मनांत विचारावेसे वाटले असल्यास त्यांत नवल नव्हतें. चेहऱ्यांत खोडी काढावयाची म्हणजे त्यांचे ओंठ फार मोठे व जाड होते. परंतु ते तसे करण्यांत परमेश्वराचा हेतु असावा; कारण मोठेपणीं त्यांस आपल्या जवळ जवळ मुक्या देशबांधवांची तरफदारी करून वरिष्ठांकडून दाद लावून घेण्याकरितां एकसारखें बोलण्याचें काम करावयाचें होतें.

प्रातःकाळीं दृश्यमान होणाऱ्या लक्षणांवरून तो दिवस घनांधकारित होईल अथवा सूर्यप्रकाशित होईल तें कळतें अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण* आहे तिचाच अर्थ अधिक स्पष्ट करून सांगणारी दुसरी एक इंग्रजी म्हण‡ आहे. तिचा अर्थ असा आहे कीं आज जें लहान मूल आहे तेंच पुढें मोठें झाल्यावर कसें निघेल याचें अनुमान त्याच्या लहानपणच्या लक्षणांवरून करतां येतें. मूल जरा बसूं लागलें

*The dawn shows the day.

‡ Child is the father of the man.

व हातीं लागेल ती वस्तू काय आहे हें ठरविण्याचें काम मुखाकडे संपवूं लागतें. ती वयोवस्था अण्णांस प्राप्त झाल्या दिवसापासूनच त्यांस पुस्तकें चाखावयाचा नाद लागला कीं काय हें माहीत नाहीं पण तो फार लवकर लागला. त्यावरूनच अण्णा पुढें फार विद्वान निपजतील असें सर्वांनीं खात्रीपूर्वक अनुमान अगोदर काढून ठेविलें होतें व तें खोटें ठरणार नाहीं, अशी खबरदारी त्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या वडिलांनीं घेतली होती.

विद्येच्या नादाशिवाय अण्णांस बुद्धिबळें, * गंजिफा व सोंगट्या या खेळांचा नाद असे असें सांगतात. हे सर्व बुद्धिवर्धक खेळ आहेत. व या खेळांचा नाद वयाच्या ८।९ व्या वर्षी मुलाला लागावा हें विलक्षण आहे. बुद्धिबळांचा डाव हा युक्तीचा, विशेष बुद्धीचा व तर्काचा आहे. हत्तीप्रमाणें सरळ व उंटाप्रमाणें तिरकस अशा दोन गतीनें जाण्याची सत्ता असलेलें वजीरासारखें मोहरें जरी प्रतिपक्षानें हस्तगत केलें तरी हताश न होतां राहिलेल्या मोहऱ्यांवरच सावधपणें लढून प्रतिपक्षाचा पाडाव करणें, निदान आपल्या वर मोठासा डाव होऊं न देणें हें बुद्धिकौशल्यानें शक्य आहे. हत्ती, उंट, घोडा, वजीर व राजा इत्यादि सर्व मोहऱ्यांच्या गती म्हणजे हालचाली नियमबद्ध आहेत. अशा नियमबद्ध, सनदशीर, बुद्धिकौशल्ययुक्त डावाची अण्णांना लहानपणीं आवड होती, या वरून असें म्हणतां येईल कीं बाळपणचे अण्णा हे पुढें रावसाहेब झाल्यावर राजकारणांत ते जे मोठे सनदशीर व बुद्धिमान योद्धे झाले त्याचें पूर्व लक्षण त्यांनीं आपल्या बुद्धिबळाचे खेळावरील प्रेमानें बाळपणींच सुचवून दिलें होतें.

---

* हे सर्व खेळ नानासाहेबांनीं अण्णांना उपपत्तिसह शिकवले होते. असें अनुमान करण्यास थोडा आधार आहे. रावसाहेबांच्या रोजनिशींत बुद्धिबळें व गंजिफा यांची उपपत्ति देणारीं अगदीं जुनीं अशीं टिपणें संगृहीत केलेलीं आढळतात तीं रोजनिशी प्रकरणांत पुढें येतील. रोजनिशींत फक्त गंजिफांनीं खेळल्याचा उल्लेख सांपडतो.

रावसाहेबांच्या म्हणीं पैकीं एक म्हण या चरित्रांत म्हणींच्या प्रकरणांत सांपडेल, ती गंजीफांचे खेळावरून निघालेली आहे. ती अशी कीं अखेरी मारल्याशिवाय डाव पुरा होत नाहीं. अखेरी मारावयाची म्हटली म्हणजे १२० पानांपैकीं काय काय पानें पडलीं व काय काय शिल्लक राहिलीं हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. अखेरी मारणें हें चांगल्या स्मरणशक्तीच्या चिकाटी असलेल्या माणसाचें काम आहे व तें इतर मंदबुद्धिजनांचें मुळींच नाहीं. अखेरी मारली कीं मारणाऱ्यावर लागलेलीं सर्व पानें फिटतात. राजकारणांत जी पुढें रावसाहेबांनीं चिकाटी दाखविली, कोणतेंही अंगीकृत कार्य सर्व बाजूंकडे लक्ष देऊन पल्ल्याला पोंचवण्याचा जो निश्चय दाखविला त्याचें मूळ लक्षण अण्णांनीं बाळंतपणांतच या गंजिफांच्या खेळाच्या प्रेमानें दाखविलें यांत संशय नाहीं.

आधीं सांगितल्याप्रमाणें अण्णांना सोंगट्यांचाही डाव आवडत असे. या खेळामध्यें दान लावण्याच्या चातुर्याबरोबर वक्तशीर व फायदेशीर असें मोजकें दान पडण्यास दैव लागतें. तें अनुकूल नसेल तर फांसा फसवितो व ऐन रंगांत डाव आला असतां सई होत नाहीं. सोंगट्या न उजवतां फिरंगी लागते. तोच फांसा अनुकूल झाल्यास प्रतिपक्षावर आपली सई होऊन दुरंगी करतां येते. या खेळावरील प्रेमानें रावसाहेबांनीं चांगला चट्टा बसेतों कापसाचा सट्टा पुढें केला त्याचें पूर्वलक्षण दाखविलें. यावर कोणी म्हणेल हे तीन खेळ आमचे राष्ट्रीय खेळ आहेत हे थोडेबहुत सर्वांना येतातच. त्यावर उत्तर असें आहे कीं शारीरिक बल वाढविणारे व बुद्धि वाढविणारे आमच्यामध्यें अनेक खेळ आहेत, परंतु त्या सर्वांची आवड अगदीं लहान मुलांस नसते. मोठ्या मुलांस असते. थोरल्या बाजीरावांस आट्यापाट्या, खो खो व हुतूतू हे खेळ लहानपणीं आवडत, त्यामुळें पुढें ते शत्रूंस कोंडींत धरूं शकत. आपण पकडले गेलों असतां ती फोडून

निसटून जाऊं शकत. शत्रूंस खो देत देत एका ठिकाणाहून त्यांस पिटाळून दडून बसलेल्या आपल्या सैन्याच्या तोंडीं अचानक देत असत. अशा रीतीनें सर्व देशभर हुतूतू घालूं शकत. सर्व युरोपाला उलथें पालथें घालणारा नेपोलियन लहानपणीं बर्फाच्या तोफा व किल्ले बांधण्याचा खेळ खेळत असे. अशीं उदाहरणें विश्रुतच आहेत.

नानांचे जनक वडील ह्मणजे वे. शा. सं. मोरूभाऊ परांजपे, घरीं पुराण सांगण्यास ठेवलेले बावधनकर शास्त्री व खुद्द नाना इतक्यांनीं अण्णांचें शिक्षणकार्य * आपल्या शिरीं घेतलें होतें, व त्यांची पद्धतिही अनुकरणीय होती. अण्णांचा हुकूम होईल तसे खेळत व धडे शिकवीत. कांहीं काळ अण्णा गांवच्या शाळेंत जात होते. त्यांचें तेथें उपलभ्य असलेलें मराठी शिक्षण ९ व्या वर्षीं पुरें झालें. त्याचें श्रेय खुद्द नानांस दिलें पाहिजे. मुरुडास शाळेंत असे अण्णा दोन वर्षें जात होते व तेंही त्यांचें जाणें अगदीं नांवाचें होतें.

याशिवाय रूपावली, समासचक्र, अमरकोश यांतही त्यांचा प्रवेश झाला होता. त्याचें श्रेय बावधनकर शास्त्रीबुवांकडे होतें. व रुद्र, पवमान पुरुषसूक्त त्रिकालसंध्या, वैश्वदेव व पूजा हे नित्यकर्माचे भाग त्यांनीं मुखोद्गत केले होते, त्याचें श्रेय वे॥ मोरूभाऊंकडे होतें. पूजा, वैश्वदेव हीं संध्येबरोबर स्वतः अण्णा प्रसंगोपात्त मोठेपणीं करीत असत. रामरक्षा घरच्या मुलांमुलींबरोबर नानांनीं अण्णांस शिकविली होती. तिचा पाठ रावसाहेब मोठेपणींही करीत असत, व नातेवाईकांचीं अथवा स्नेह्यांचीं मुलें भेटावयास आलीं असतां त्यांच्या अभ्यासाची विचारपूस करतांना रामरक्षा येते काय असा प्रश्न विचारीत, इतकी त्यांस तिची आवड होती. इतक्या

* रावसाहेबांचे आजे धोंडोपंत यांच्या मुळें लिपिग्रहणरूपानें रावसाहेबांचा वाङ्मयांत प्रवेश झाला व रावसाहेबांस नानाविध प्रकारचें ज्ञान प्राप्त झालें असें एकानें विविधज्ञानविस्तारांत लिहिलेल्या रावसाहेबांच्या चरित्रांत दुसऱ्या भागांत म्हटलें आहे तें शक्य नाहीं. धोंडोपंत हे पुण्यास १८१४ सालीं मृत झाले. त्यानंतर १९ वर्षांनीं रावसाहेबांचा जन्म झाला.

विद्येच्या भाराचा परिणाम शरीरावर जो व्हावयाचा तो झाला. बाळपणीं अण्णांनीं आंग केव्हांही घरलें नाहीं." * मी ८।९ वर्षेंपर्यंत शरीरानें कृश होतों व पुढें दहाव्यावर्षीं घर सोडून गांवीं गेलों ". मंडलिकांचे वरकस गांव हवापाण्यासंबंधें नांवाजलेले आहेत. तेथें जाऊन स्वस्थ विश्रांति अण्णांनीं घेतली.

अण्णांचा व्रतबंध आठव्या वर्षीं माघ महिन्यांत झाला; व फाल्गुन महिन्यांत मुरूड गांवाच्या नजिक असलेल्या, 'आंजर्लें गांवांतील मातबर, प्रतिष्ठित व कुलीन अशा काणे ऊर्फ हवलदार यांच्या घराण्यांतील बाळदादा हवलदार यांची सात वर्षांची ज्येष्ठ कन्या सखूताई हिच्याशीं झाला.' हुंड्याचें मान त्यावेळीं फार नव्हतें. मंडलिक ह्यांनीं फक्त ४०० रु. हुंडा घेतला. हल्लींच्या मानानें हा खरा बालविवाह होय. त्यावेळेस सर्वत्र अशीच पद्धत होती. परंतु पुढील चरित्रावरून असें आढळेल कीं हा विवाह केव्हांही अपायकारक झाला नाहीं. एवढेंच नाहीं तर हल्लींच्या प्रौढ विवाहांशीं तुलना करून पाहिलें असतां या दंपत्याचें प्रेम फार श्रेष्ठ ठरेल. रावसाहेबांनीं एका प्रसंगीं आपल्या पत्नीला मंदोदरी व अहिल्या या दोघींची उपमा दिली. पृष्ठ ६९१ पहा. कोणत्याही हिंदूस पतिव्रतेची स्तुति याहून अधिक करतां यावयाची नाहीं.

दोन वर्षांनीं म्हणजे १८४५ सालीं रत्नागिरीस शाळा काढून इंग्रजी शिक्षणाची सोय सरकारानें केली, असें समजतांच अण्णा तेथें जावयास निघाले व नानांनीं संमति दिली. खरें पाहिलें असतां इंग्रजी शिक्षण सुरू झालें तेव्हां त्याचा फायदा गरिबांनींच घेतला, कारण त्यांना तेणेंकरून पोट भरावयाचा उत्तम उपायच मिळाला. शिक्षणद्वारें द्रव्यप्राप्ति होण्याच्या अभिषाला श्रीमंत मासे लुब्ध झाले नाहींत. " ज्यांना

* हें आत्मवृत्त १८८७ सालीं रावसाहेबांची प्रकृति बिघडली तेव्हां तिचें मान चिकित्सेकरतां एका वैद्यास लिहिलेल्या यादींत आहे.

विद्या नाहीं ते विद्वांनापेक्षां अधिक श्रीमंत आहेत असें नाहीं का आपण नित्य पहात." याच सुरांत ते लक्ष्मीस्तोत्र म्हणत व विद्येची निन्दा आरंभीत असत. श्रीमंतांच्या डोळांत पुढील काळाची पर्वा न करितां संसारांत मुलांमुलींच्या लग्नाबरोबरच इतिकर्तव्यता संपली असें मानून स्वस्थ बसत असत. अशी लोकस्थिति असतां 'तुह्माला ही विद्या कशाला! तें गरिबांचें काम!' असा मंत्र कोणी अज्ञ खुषमस्कऱ्यानें नानांच्या अथवा अण्णांच्या कानांत फुंकला नाहीं व फुंकला असल्यास तो त्यांनीं मानिला नाहीं. श्रीमंत कुलांत जन्म पावून अण्णा शिक्षणप्राप्तीकरितां अगदीं १३ व्या वर्षी घर सोडून दूर जावयास तयार झाले व वडिलांनीं संमति दिली हें आश्चर्यकारक आहे. मुलाकरितां नाना रत्नागिरीस स्वतः मधून मधून बिऱ्हाड करून असत. त्या शाळेंत हल्लींच्या ४–५ इयत्तां इतकें शिक्षण मिळत असे. रत्नागिरीच्या इंग्रजी शाळेंतील नोंदीचा सहीसूद एक उतारा सांपडतो त्यावरून असें समजतें कीं ४।१०।१८४५ रोजीं अण्णांनीं त्या शाळेंत तिसऱ्या वर्गांत आपलें नांव घातलें. त्यापूर्वी फक्त १४ मुलेंच शाळेंत दाखल झालीं होतीं. त्या वर्षाच्या अखेर एकंदर मुलांची संख्या ४५ सांपर्यंत गेली होती. पुढें दोन वर्षांनीं म्हणजे २९।१०।१८४७ रोजीं तेथील शिक्षण पुरें करून मुंबईस एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें पुढचा अभ्यास करण्याकरतां अण्णा शाळा सोडून गेले. चालचालणूकीच्या सदरांत "बुद्धिमान. वर्तन चांगलें" असा शेरा आढळतो.

राम बाळकृष्णाजी हे मुंबईतील एक सज्जन प्रभु गृहस्थ त्यांचे गुरुजी होते. त्यांनीं रावसाहेबांची हुषारी पाहून त्यांस प्रेमानें शिकविलें. गुरु-शिष्यांचे एकमेकांवर प्रेम जडलें. हे गुरुजी आपल्या हुषारीवर पुढें ४०० रुपये पगारापर्यंत वाढले होते व तसे रावसाहेबही पुढें पुष्कळ वाढले होते. तथापि एकमेकांचें एकमेकांविषयींचें प्रेम आमरणान्त राहिलें. रावसाहेब कराचीस असतां आपला एक आप्त गुरुजींनीं रावसाहेबांच्या स्वाधीन केला होता. एकमेकांस नेहमीं संक्रांतीचा तिळगुळ पाठवीत. गुरुजी म्हणत "तिळ-

गुळ पाठविण्याची आमच्यांतील चाल स्नेहभाव वाढविणारी आहे. व मला ती पाळण्याची आवड आहे.” यांस पुढें रावबहादुर हा किताब मिळाला होता, पण यांचें लोकप्रिय नांव नुसतें ‘ राम ’ असें होतें. हे कष्टम खात्यांत असिस्टंट कलेक्टर होते. हे बंगाल्यांत प्रवास करून विलायतेसही जाऊन आले होते. यांचें शेअर बाजारांत फार नुकसान झालें. नंतर ते फार दिवस वांचले नाहींत. सर्व मुंबई यांच्याकरितां हळहळली. हे दिसण्यांत सुरेख, बोलण्यांत गोड, रितींत सभ्य, व रहाणींत साधे असल्यामुळें फारच लोकप्रिय होते. यांनीं गुरुवार २–८–१८६६ रोजीं अल्पकालीन दुखण्यानें स्वर्लोक गांठला.

रावसाहेब, यांस केवढा मान देत तें त्यांच्या रोजनिशींतील १२।२।१८५६ चा खालील उतारा दाखवितो. “ भाईस भेटलों. उत्तम मनुष्य व माझा पक्का मित्र. ”

मुंबईस जावयास अण्णा निघाले तेव्हां त्यांच्या वयाचीं नुकतीं १४ वर्षें पुरीं झालीं होतीं. तरीही घर सोडून इतकें दूर कसें जावें व त्यांस कसें जाऊन द्यावें हा विचार अण्णांच्या किंवा नानांच्या मनांत आला नाहीं. इतक्या दूरच्या प्रवासाचें व त्यावेळच्या मुंबईतील राहणीची गैर सोय सोसून अण्णांनीं मुंबईस येऊन यश संपादन करण्याचें जें धाडस केलें तें वाखाणणी करण्यासारखें होय. १९०७ सालीं रावसाहेबांचा अमोलिक ग्रंथसंग्रह फर्ग्युसन कॉलेजला त्यांच्या चिरंजीवांनीं रावसाहेबांच्या स्मरणार्थ उदारपणें नजर केला, तेव्हां या ग्रंथसंग्रहाचा उत्घाटन-समारंभ नामदार फुल्टन यांच्या हस्तें झाला. त्याप्रसंगीं रावसाहेबांच्या वरील धाडसाचा गौरव करतांना डॉ. भांडारकर ह्मणाले कीं रावसाहेब हे सरस्वतीचा दुर्ग कसा हस्तगत करावा हें दाखविणारे मागाहून येणाऱ्या आमच्या सैन्यास वाटेंतील काष्ठतरूंचा च्छेद करून व मार्ग शुद्ध करून देणारे त्याकाळचे अग्रेसरच होते.

## प्रकरण ५ वें.

# उच्च शिक्षण.

॥ कुतः सुखार्थिनो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥

वयाला १४ वर्षे होत आहेत तोंच एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट या नांवाच्या पाठशाळेंत दाखल होण्याकरतां रावसाहेब मुंबईस निघून आले. हल्लींचें एल्फिन्स्टन कॉलेज हें याच संस्थेचें रूपान्तर होय. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट, हल्लींचें स्मालकाज कोर्ट ज्या जागेवर आहे, त्याच जागेवरील जुन्या इमारतींत भरत असे. हल्लींच्या इंग्रजी हायस्कूलांतील वरच्या दोन यत्तांत होणारा अभ्यास, व हल्लींच्या कॉलेजांत चार वर्षांत होणारा अभ्यास, मिळून जेवढा अभ्यास होईल तितका अभ्यास या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें कमी अधिक मानानें होत असे. हल्लीं भिन्न विषयांत ऐच्छिक शाखा निघाल्या आहेत. तशा त्यावेळेस नव्हत्या. ऐच्छिक विषय घेऊन कॉलेजमधील बी. ए. ची परीक्षा देणारा विद्यार्थी एल्फिन्स्टन इनास्टिट्यूट मध्यें शेवटली परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यापेक्षां त्या विषयांत आधिक प्रवीण कदाचित् ठरेल. परंतु भिन्न भिन्न विषयांचें त्याचें ज्ञान पाहिलें असतां हल्लींच्या कालेजांतील कोणताही बी. ए. बहुश्रुतपणांत फार कमी भरेल. इतिहास, ज्योतिष, अंकगणित, बीजगणित, भूमिति, त्रिकोणामिति, शून्यलब्धि, वाङ्मय, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र 'इत्यादि विषय तेथें शिकविले जात.

मुंबईस रावसाहेबांचें बिऱ्हाड अनंत ऋषीचे वाडींत होतें. जवळ एक ब्राह्मण स्वयंपाकास होता. धान्य व इतर कांहीं जिनसांचा पुरवठा मूरूडाहून होत असे. रहाण्याची जागा दोन खोल्यांची आकुंचित होती. दर एक

खोली दहा फूट रुंद व बारा फूट लांब होती. भाडें १॥ रु. पडत असे. स्वच्छतेबद्दल त्या वाडीची ख्याति नव्हती.

कॉलेजांत प्रवेश होण्यापूर्वीं एक परिक्षा द्यावी लागे. " *सहा महिन्यांनीं परीक्षा देऊन कॉलेजांत जावयाचा, तों एक मोठा ज्वर सात दिवस पर्यंत आला. त्यावर एका वैद्यानें फार कडक औषध दिलें. त्यापासून तीन वर्षें पर्यंत त्रास झाला."

परीक्षेपूर्वीं आलेला ज्वर रावसाहेबांस नडलेला दिसत नाहीं, कारण सर्व विषयांत ज्यांस चांगले गूण मिळत त्यांस शिष्यवृत्ति देण्यांत येत असे, त्याप्रमाणें पहिल्या वर्षाची त्यांस मिळाली, व नाना मंडलिक यांनीं बोर्ड आफ् एजुकेशन या संस्थेला खालीं दिल्याप्रमाणें करारनामा लिहून दिला.

" ज्या अर्थीं माझा मुलगा विश्वनाथ नारायण यास बोर्ड आफ् एज्युकेशननें क्लेअर स्कालरशिप देण्याचें ठरविलें आहे, त्या अर्थीं या करारनाम्यावरून मी असें लिहून देतों कीं एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें आज तारखेपासून तीन वर्षेपर्यंत त्यास अभ्यास पुरा करण्याकरितां ठेवण्यास मी कबूल आहें. या मुदतीच्या आंत जर मी त्यास काढून घेतला तर वरील शिष्यवृत्तिनिमित्त जेवढी रक्कम मी घेतली असेल तीं सर्व परत देण्यास मी या लेखानें बांधला गेलों आहें. ता. ४।८।१८४८."

त्यावेळचे अध्यापक पूर्वीच्या ऋषीं प्रमाणें शिक्षण हें एकच ध्येय पुढें ठेवून आपलें कर्तव्य करीत असत. "उपाध्यायसहभू दुःशीलता" दाखवीत नसत; या मुळें शिष्याचित्त आपल्याकडे आकर्षण करून घेत. या अध्यापकांत प्रो. हार्कनेस, प्रो. पॅटन, प्रो. रीड व प्रो. ग्रीन हे प्रमुख होते.

रावसाहेब कालेजांत आले त्या वेळेस भास्कर दामोदर पाळंदे, नवरोजी

---

* असें नागपुरकर वैद्यास आपलें प्रकृतिमान कळवितांना ६।३।८७ च्या यादींत रावसाहेबांनीं लिहिलें आहे.

फरदुनजी, नारायण विष्णु बापट, दादाभाई नवरोजी, नारायण भाई दांडेकर, गणपतराव भास्कर इ० तेथें मंडळी होती.

यांतली कोणी मंडळी बुद्धीनें कमी नव्हती; अभ्यासांत आळशी नव्हती. परंतु विद्यार्थी या नात्यानें रावसाहेबांनीं आपली छाप सर्वांवर बसविली. त्यांची बुद्धि हवा तो विषय ग्रहण करण्यास व त्यांत प्राविण्य मिळविण्यास समर्थ होती. या बाबतींत इतर विद्यार्थी मागें पडत. म्हणजे गणितांत एकाची जी मति चाले ती तर्कशास्त्रांत कुंठित होई. व तर्कशास्त्रांत चाले तिला रसायन शास्त्राचें आकलन होत नसे. शेवटल्या परीक्षेपर्यंत रावसाहेब कोणास हार गेले नाहींत. एका विद्यार्थ्यास कालेज मध्यें जेवढीं बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळवणें शक्य होतें तेवढीं त्यांनीं मिळविलीं. या परीक्षेंत ते एकंदरींत पहिले येऊन, शिवाय नऊ विषयांतही पृथक्पणें पहिले आले. ते नऊ विषय म्हणजे १ *लक्ष्मी शास्त्र, २ तर्कशास्त्र, ३ मानसशास्त्र, ४ नीतिशास्त्र, ५ वाङ्मय, ६ इतिहास, ७ रसायनशास्त्र, ८ वनस्पतिशास्त्र व ९ देशीभाषाविषय हे होत. † याप्रमाणें परीक्षेंत त्यांस नऊ बक्षिसें मिळालीं पाहिजे होतीं परंतु दोन विषयांहून अधिक विषयांत बक्षिसें कोणालाही देऊं नयेत असा नियम असल्यामुळें त्यांस दोनच मिळालीं. शेवटल्या परीक्षेंत रावसाहेबांस उत्तम गूण मिळून, नार्मल स्कालरशिप मिळाली व दरमहा तीस रुपयाचें वेतन मिळूं लागलें. याशिवाय त्यांनीं एजवर्थकृत 'लाटरी' यानांवाच्या ग्रंथाचें भाषांतर करून सुंदरजी जीवाजी यांच्या नांवाचें बक्षिस मिळविलें.

अण्णांनीं जी सर्वविषयपारंगता दाखविली ती त्यांच्या गुरुजींच्या

---

* हा शब्द जनुकाका आठले यांनीं पोलिटिकल एकॉनमी याचा समानार्थ शोधून काढलेला आढळतो.

† ही माहिती रावसाहेबांच्या वेळेस खालच्या वर्गांत असलेले परम स्नेही नानासाहेब लिमये यांनीं मुद्दाम लिहवून ठेवलेल्या टिपणांवरून घेतली आहे.

चांगली लक्षांत होती. संधि येतांच ह्मणजे त्याच गुरुजींपैकीं एक प्रो. पॅटन हे रजेवर गेले असतां त्यांच्या जागीं गणित व पदार्थविज्ञान हे दोन विषय तिसऱ्या वर्षाचा अभ्यास करणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांस शिकविण्याकरितां रावसाहेबांची नेमणूक करून त्यांचा सन्मान केला.

वयाच्या अठराव्या वर्षी एवढा मोठा मान एवढ्या मोठ्या संस्थेंत मिळाला या योगानें रावसाहेबांचा लौकिक फार वाढला. अध्यापकाचें काम रावसाहेबांनीं कसें काय केलें तें बोर्ड आफ एजुकेशननें त्यावेळचे गव्हर्नर लार्ड फाकलंड यांस रिपोर्ट सादर केला आहे त्यांतील खालील भाग वाचला ह्मणजे समजेल.

"विश्वनाथ नारायण यांकडे, (ज्यांच्या विषयीं आम्हीं आमच्या मागिल रिपोर्टीत त्या वर्षीं यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांत उत्तम असा प्रशंसापूर्वक उल्लेख केला आहे व ज्यांनीं पुन्हां यावर्षी उत्तमोत्तम असा लौकिक मिळविला आहे ) प्रोफेसर पॅटन यांच्या रजेंत अध्यापकाचें काम होतें व तें काम करण्याची त्यांनीं आपली लायकी सिद्धकरून दाखविली आहे."

एवढें मोठें यश रावसाहेबांस कसें संपादन करतां आलें तें पाहूं. रोजनिशी प्रकरणांत एक अभ्यासक्रमाचें टीपण दिलें आहे. तें बहुधा नानांनीं घरच्या मंडळीकरतां तयार केलेलें असावें. त्याप्रमाणें वागण्याची संवय ज्या विद्यार्थ्यांस लागली असेल त्यांस एवढी यश प्राप्ति झालीच पाहिजे, असें दिसून येईल.

रावसाहेब रात्रौ अभ्यासाकरतां जागत न बसतां निजावयास लवकरच जात. एक झोंप होऊन जागे झाल्यावर कांहीं वेळ वाचन करून फिरून निजत. एवढें करून पुन्हा लवकर उठून स्नानसंध्या आटपून ६ वाजतां सकाळीं अभ्यासाला तयार असत. त्यांस मध्यें कोणी त्रास दिलेला आवडत नसे. अशा सोबत्यास खोलींतून अर्धचंद्रच मिळे.

अभ्यास करतांना जोडीला कोणी विद्यार्थी यांस लागत नसे.

आपल्या वर्गांत असतां पेनसिलीनें साध्या कागदावर लिहून घेतलेलीं टांचणें कागदांच्या वहींत लिहून ठेवण्याच्या वेळीं **गणपतराव भास्कर** मात्र मदतीस जात असत.

कांहीं **पार्शी** विद्यार्थ्यां शिवाय इतर विद्यार्थ्यांशीं **रावसाहेब** फारसे मिसळत नसत. प्रखर अशा ज्ञानरवीचे उपासक, **पार्शी** विद्यार्थ्यांतच अधिक होते म्हणावयाचे.

**रावसाहेबांना** कोणत्याही पुस्तकाची वाण नसे. अभ्यासाचीं पुस्तकें ते सर्व विकत घेत परंतु भरपूर माहितीच्या चांगल्या पुस्तकांची अवश्यकता वाटल्यास त्यांचे प्रोफेसर **रायल एशिऍटिक सोसायटीच्या** संग्रहांतून आणून देत. या पंचदशवर्षदेशीय अलौकिक बुद्धीच्या बटूवर त्यांची मर्जी फार बसली होती. डाक्तर **हार्कनेस** व **प्रो. पॅटन** आपल्या गाडींतून त्यांस फिरावयास नेत असत.

असो. अशारीतीनें या बुद्धिमल्लास विद्यादेवीच्या आखाड्यांत उतरल्या दिवसापासून हार आली नव्हती तीं एकदां बारीकशा प्रसंगीं आली, ती अशी " **पेरीमेडल** " मिळविण्याकरतां एक निबंध लिहावयाचा होता. सामनेवाल्यांस तयारी करण्यास २ महिन्यांचा अवकाश दिलेला होता. या मुदतींत फुरसत न मिळाल्यानें ह्मणा अथवा कशानें ह्मणा **राव-साहेबांनीं** निबंधलेखन शेवटल्या ५।६ दिवसांवर टाकलें व **नारायण भाई दांडेकर** यांचा निबंध उत्तम ठरला.

**प्रो. पॅटन** हे **रावसाहेबांस** विलायतेस **सिव्हिल सर्व्हिसच्या** परीक्षेस बसण्याकरितां बोलावीत होते. जर ते गेले असते तर या परीक्षेंत विजयी होण्याचा मान हिंदी लोकांत **रावसाहेबांस** पहिल्यानें मिळाला असता. पण जातिनिर्बंधाची भीति आड आली किंवा काय अशी शंका येते. ब्यारिस्टर होण्यास विलायतेस जावें असें त्यांच्या मनांत होतें. त्याचा उल्लेख पुढें येईल. व हा जातिनिर्बंध सैल करण्याची परवानगी श्रीशंकराचार्यांकडून **रावसाहेबांनींच** प्रथम आणविली यावरून वरील शंका खरी असावी.

## रावसाहेबांस मिळालेलीं दोन प्रशंसा पत्रें

" एल्फिन्स्टन कालेजमध्यें चार वर्षें अभ्यासाकरतां राहून उत्तम कीर्ति संपादन करून गेल्या नोव्हेंबर महिन्यामध्यें विश्वनाथ नारायण तेथून गेले. त्यांची मला चांगली माहिती आहे. बुद्धिमत्ता व उद्योगशीलता या त्यांच्या गुणांबद्दल माझें मत फार चांगलें आहे. शिकत असतां, व शिकवीत असतां, व स्टुडन्ड लिटररि सायन्टिफिक मंडळीच्या मराठी शाखेचे सेक्रेटरी असतां स्वतांस भूषणावह व दुसऱ्यास हितावह अशी त्यांची वर्तणूक सूक्ष्मरीतीनें पहाण्याचे मला अनेक प्रसंग आले. कालेजमध्यें असतां वाङ्मय विषयांत जशी त्यांनीं चांगलीं प्रसिद्धि मिळविली तशीच शास्त्रीय विषयांत मिळविली. एका परीक्षेंत तर सहा विषयांपैकीं चारांत पहिले आले. "

१२।३।१८५३ आर. रीड.

इंग्रजी भाषाविषय व इतिहास या विषयांचे अध्यापक.

" विश्वनाथ नारायण हे एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें सव्वाचार वर्षें अदमासें होते. त्या काळांत ज्या निरनिराळ्या शिष्यवृत्त्या उपलभ्य होत्या तेवढ्या साऱ्या त्यांनीं मिळविल्या, त्या—क्लेअर वेष्ट, व दुसरी व पहिली नार्मल अशा तीन शिष्य वृत्ती मिळवितांना त्यांनीं प्रत्येकवेळीं इतरांहून आपला श्रेष्ठपणा दाखविला. वार्षिक परीक्षांतून बहुशः ते अभ्यासाच्या कित्येक निरनिराळ्या विषयांत पहिले येत असत ह्मणून त्यांस सर्वांत उच्च मान व उपलभ्य असलेल्या शिष्यवृत्त्या मिळाल्या. शिवाय यांचा स्वभाव विनयशील व गोड आहे. माझ्या अवलोकनांत त्यांच्या ज्या कांहीं गोष्टी आल्या त्यावरून मी असें ह्मणतों कीं त्यांच्या वर्तणुकींत औचित्य एकरूपतेनें आढळून येई.

मुंबई, एल्फिन्स्टन् इन्स्टिटयूशन
१ नोव्हेंबर १८५२

जान् हार्कनेस
मुख्याध्यापक.

## प्रकरण. ६ वें.

# नोकरी. ( भूज )

दिल्ली पतिर्वा जगदीश्वरो वा ।
मनोरथान्पूरयितुं समर्थः ॥
अन्यैर्नृपालैः प्रतिदीयमानम् ।
शाकाय वा स्याल्लवणाय वा स्यात् ॥
जगन्नाथराय.

रावसाहेबांना जेवढें शिक्षण एल्फिन्स्टन इन्स्टिटट्यूट मध्यें मिळणें शक्य होतें तेवढें मिळून त्याची पूर्तता त्याच संस्थेंत त्यांस अध्यापकाची जागा बद्दलीची मिळून झाली. त्यानंतर त्यांचें लक्ष कायमची सरकारी नोकरी मिळविण्याकडे गेलें. राजमान मिळवून राजमान्य होण्याची इच्छा आमच्या लोकांस पुरातनकालापासून चिकटून आहे त्यांत विशेषेंकरून आमचे पंडित ह्मणजे विद्वान लोक, राजाश्रयाचा अभिमान केवढा वहात आले आहेत त बादशहाच्या आश्रयास राहून सुखावलेले राजकवि जगन्नाथराय यांच्या, वरील गर्वोक्तीवरून स्पष्ट दिसतच आहे. रावसाहेबांच्या वेळेला इंग्रजी शिकलेल्या विद्वानांचा विशेषतः रावसाहेबांसारख्या बुद्धिमानांचा शोध करीत राजाश्रयच हिंडत असे. ही गोष्ट स्वतंत्र धंदा करून राहण्याचें वारें रावसाहेबांसारख्या तेजस्वीपुरुषास प्रथमतःच न लागण्यास अनुकूल होती. कालेजांत विद्यार्थी असतांना रावसाहेबांची कच्छचे पोलिटिकल एजन्ट कर्नल ली ग्रॅन्ड जेकब यांची भेट १८५१ सालीं प्रो. पॅटन यांचे घरीं झाली होती. त्यासमयीं यांच्या अंगीं बौद्धिक व नैतिक गूण उच्च प्रतीचे आहेत व १८५१–५२ सालच्या रिपोर्टांत गेल्या वर्षांतील विद्यार्थ्यांत सर्वांत श्रेष्ठ, व चालू सालीं हे पुन्हां मोठ्या प्रसि-

र्द्धीस आलेले आहेत अशी प्रशंसा करून प्रो. पॅटन यांनीं रावसाहेबांची कर्नल जेकब यांशीं ओळख करून दिली होती.

रावसाहेबांच्या गुणांवर कर्नल जेकब फार लुब्ध झाले. व त्यांस होईल ती मदत करण्याची इच्छा कर्नल जेकब यांनीं प्रदर्शित केली. ती औपचारिकच होती कीं काय हें पाहण्याकरतां रावसाहेबांनीं एक पत्र कर्नल जेकब यांस स्मरणार्थ पाठविलें. कांहीं वेळानें एजन्सींतील मुख्य कारकून नानाभाई मन्चरजी यांस आपण अंतरणार असें जाणून कर्नल जेकब यांनीं बोर्ड आफ् एजुकेशन च्या अध्यक्षांस "उत्तम विद्यार्थ्यांची" पत्रीं मागणी केली. व त्यांतच रावसाहेबांचें नांव आपण होऊन सुचविलें व रावसाहेबांस खालील पत्र पाठविलें:—

माडंवी ७ अक्टोबर १८५२

विश्वनाथ नारायण,

तुमच्या पत्राचें उत्तर मी पाठविलें नाहीं तरी तुम्हांला मी दृष्टिआड केलें नव्हतें. याच्या पूर्वीच तुम्हांला कामास येण्याची संधि आली असती तर मी तुमचें काम अगोदर केलें असतें. तुमच्या तर्फे मी आज सर अर्स्किन पेरी यांस लिहिलें आहे. तुम्हांकडून स्वीकार होण्याकरतां कोणती जागा देण्याचें वचन मी देऊं शकलों आहे तें सर्व तुम्हाला प्रो. पॅटन यांजकडून कळेलच. तुम्हीं जागा स्वीकारण्याच्या पूर्वी सर अर्स्किन पेरी व प्रो. पॅटन यांची मान्यता मिळविली पाहिजे. तुमचा ठाम बेत होऊन मला लिहून येईल तर आनंद होईल. व भाविःअभिवृद्ध्यर्थ देऊं केलेल्या जागेवर रुजू होण्याचें जर तुम्हीं ठरवाल तर दुसऱ्यांकडून प्रदर्शित झालेल्या तुमच्या योग्यतेस अनुरूप असें साहाय्य मित्र म्हणून होईल तितकें मी करीन असा भरंवसा असूं द्या.

आपला शुभेच्छु,
एल्. जी. जेकब.

मनाचा मोकळेपणा दाखविणाऱ्या पत्राच्या भाषेवरून व विशेषतः पत्रारंभीं विश्वनाथ नारायण इतकेंच नांव त्याच्या अगोदर कोणतेंही उपचारपद लाविल्याशिवाय लिहिलेलें आहे, यावरून कर्नलसाहेबांचा शिपाईबाणा दिसून येत आहे.

या जागेचें वेतन रावसाहेबांच्या गुणांच्या मानानें अल्पच म्हणजे दरमहा ११० रुपये होतें. पल्ला लांबीचा होता. " सर्व विद्यार्थ्यांत उत्तम " असा नामनिर्देश ज्या अधिकाऱ्यांनीं केला त्यांच्या हातीं रावसाहेबांची अधिक मोठ्या हुद्यावर नेमणूक करून टाकण्याचें नव्हतें असें नाहीं. परंतु त्यांच्याच आग्रहावरून ही जागा रावसाहेबांनीं पतकरली असावी असें खालीं दिलेल्या सर अर्स्किन् पेरी यांच्या पत्रावरून दिसतें.

मुंबई. १६ आक्टोबर १८५२

प्रिय विश्वनाथ,

महिना ११० रुपये वेतनाची, मुख्य हिशेबनीसाची जागा तुम्हांस देऊं केल्याचें वृत्त निवेदन करण्यास मेजर ली ग्रँड जेकब, कच्छ येथील रेसिडेन्ट, यांनीं मला सांगितलें आहे. १८५१ सालीं मि० पॅटन यांनीं तुमची स्तुति केलेली ऐकून व बोर्ड आफ एज्युकेशनच्या गेल्या सालच्या रिपोर्टांत तुमची उत्तम शब्दांनीं प्रशंसा झालेली वाचल्यां दिवसापासून मेजर जेकब यांच्या मनांत तुम्हांस ही जागा देण्याचें भरलेलें आहे. मे. जेकब यांच्या अंगीं इतकें बुद्धिसामर्थ्य, इतकी परिश्रमक्षमता आहे व हिंदी लोकांच्या कल्याणाची ते इतकी कळकळ बाळगतात, कीं त्यांच्या सारख्याचें एकाद्या तरुण सुशिक्षिताकडे अशा विशेष प्रकारानें लक्ष जावें ही गोष्ट मी एक सुदैवाचा प्रकारच समजतों व देऊं केलेली जागा पतकरण्याविषयीं तुम्हांस उपदेश करतों.

या जागेवर तुम्हीं एकदम रुजू व्हावें अशी मेजर जेकब यांची इच्छा आहे. तत्संबंधीं जो खर्च तुम्हांला आगाऊ करावा लागेल तो ते देतील.

सरकारी खात्यांत इतकी वरिष्ठ जागा मिळण्याची ही संधि आली आहे. तीविषयीं माझी अशी प्रामाणिक व ठाम समजूत आहे कीं तुम्हीं आपल्या अमदानींत आपली उपयुक्तता दाखवून फार प्रसिद्धीस याल व एल्फिन्स्टन इन्स्टिटय़ूशनला मोठे भूषणप्रद व्हाल.

आपला सुतराम् शुद्धमति,

ई. पेरी.

ही नोकरी अगोदर पतकरून मग रावसाहेबांनीं वडिलांस घरीं कळविलें व घोड्यावर बसून कोंकणांत रावसाहेब त्वरेनें जाऊन वडील, मातोश्री व इतर आप्तेष्ट जन यांची परवानगी घेऊन आले. भुजेस जावयाचा त्यावेळीं जो ठरींव मार्ग होता त्याप्रमाणें प्रथम बोटीनें सुरतेस जाऊन तेथून काठेवाडांतून भुजेस आपल्या जागेवर १ दिसेंबर १८५२ रोजीं दाखल झाले. तेथें गेल्यावर मेजर जेकब यांनीं आपण केलेल्या नेमणुकीला सरकारांतून मंजुरी मिळविण्याकरितां जो खलिता लिहिला त्यांत रावसाहेबांची प्रथम ओळख कशी झाली व तिचें पर्यवसान या नेमणुकींत कसें झालें तें लिहून पुढें लिहिलें कीं विश्वनाथ नारायण हे येथें तारवांतून उतरून आले आहेत. त्यांची नेमणूक मुख्य हिशेबनीसाच्या जागेवर जी केली आहे तिला नामदार गव्हर्नर इन् काउन्सिल यांनीं मंजुरी द्यावी अशी प्रार्थना करितों. हें काम करण्यास यांचा मला लाभ झाला आहे हें मी माझें मोठें भाग्य समजतों.

इतकें अनुकूल मत मेजर जेकब सारख्या तिऱ्हाइताचें रावसाहेबांबद्दल पहिल्या भेटीला झालेलें होतें.

या प्रांतांतील मनुष्य इतकें लांब गेल्याचें हें पहिलेंच उदाहरण नव्हतें. विष्णू हरि ह्मणून एक रावसाहेबांचा सहाध्यायी पल्टणींत पंडित होता. तो १८५० सालीं एडनला होता, असें त्याच्या २५।९।१८५० च्या इंग्रजी पत्रावरून दिसतें. तो ह्मणतो “ अरेरे! एका शाळेंत एकाच वर्गांत अभ्यास

करीत असलेल्या आम्हां दोघांमध्यें शिरून, अमर्याद समुद्र व वालुकामय प्रदेश आतां अंतर पाडीत आहेत !"

रावसाहेबांच्या बरोबर गांवांतील * बाळ जोशी या नांवाचा १२ वर्षांचा ब्राह्मणाचा मुलगा स्वयंपाक करण्यास गेला होता. नाना मंडलिक यांनीं खालीं दिल्याप्रमाणें याची शिफारस केली होती. "त्याजला मनाचें भूषण दिलें ह्मणजे अनाळशी राहून स्वयंपाक चांगला करी. लिहिण्या वाचण्याविषयीं मात्र मोठा जड; एरव्हीं जाण्या येण्यास हुशार, एक वेळ दाखविल्यानें खुणा व मनुष्याची वळख धरून काम बजाऊन येई."

"घोडा संभाळणेस" असाच एक ग्रामस्थ गडी गोविंद पायऱ्या या नांवाचा होता. रावसाहेबांनीं बाळजोशी यांस ३–४ वर्षांच्या अनुभवानें जें शिफारस पत्र दिलें तें असें आहे.–माझा नोकर बाळा, प्रामाणिक आहे, विश्वासू आहे; पण आपलें तेंच करतो असा हट्टी आहे. तेणें करून इतर सर्व नोकरां इतका एकटा त्रास देतो.

आठ नऊ महिन्यांच्या अवधींतच रावसाहेबांनीं ज्या गुणांनीं वरिष्ठांची मर्जी प्रसन्न करून घेतली त्यांचें वर्णन २२।९।१८५२ तारखेस सरकारास रावसाहेबांच्या कामगिरीबद्दल केलेल्या एका रिपोर्टांत पुढें दिल्याप्रमाणें केलेलें आढळतें.

"एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन मधील विद्यार्थ्यांतून उत्तम म्हणून मागवून आणलेला विद्यार्थी विश्वनाथ नारायण यांनीं सर अर्स्किन पेरी व प्रो. पॅटन यांच्या अपेक्षेप्रमाणें कामगिरी केली; शिवाय इतक्यांतच सरकारी काम करण्याची त्यांनीं फार उपयुक्तता दाखविली आहे व जसे ते वयानें मोठे होत जातील तसे सरकारच्या न्यायखात्यांत, मुलकीखात्यांत किंवा

* याच्यावर रावसाहेबांची फार मर्जी होती. २६५ रुपये लावून त्याचें लग्न रावसाहेबांनीं करून दिलें होतें. उभयतां पतिपत्नी रावसाहेबांचे येथेंच बहुत काळ घरच्या नात्याच्या माणसांप्रमाणेंच वावरत होतीं.

इतर कोणत्याही खात्यांत वाटेल ती नोकरी करण्यास नैतिक व मानसिक गुणांनीं योग्य ठरत जातील.

खरा उतारा
एच्. डब्ल्यू. टेव्हलियान
अ० पोलिटिकल एजन्ट, कच्छ.

मेजर जेकब हे फार उमदा व चाणाक्ष अधिकारी होते. सरळ व चोख रीतीनें सरकारी काम कसें करावें या विषयींचे धडे रावसाहेबांनीं याच साहेबांकडून प्रथम घेतले. मेजरसाहेबांजवळ उत्तम ग्रंथसंग्रह होता व ते स्वतः विद्वान होते. त्यामुळें ज्ञानवृद्धि करून घेण्यास रावसाहेबांस फार प्रोत्साहन मिळालें. पुराणवस्तुसंशोधनाचा नाद त्यांस येथेंच लागला. सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याची गोडी याच साहेबांच्या संगतीनें रावसाहेबांस लागली. एवंच रावसाहेब हे मेजर जेकब यांच्या हाताखालीं सेवानिष्ठ नोकर होते असें म्हणण्यापेक्षां प्रेमळ अन्तेवासी शिष्यच होते असें म्हटलें पाहिजे.

मेजर जेकब यांनीं त्यांच्या देखरेखीखालीं ज्या शाळा ठेवलेल्या होत्या त्यांची तपासणी करून त्यांचें काम कसें चाललें आहे, याविषयीं एक रिपोर्ट करण्याचें काम रावसाहेबांकडे सोंपविलें होतें. या कामाचा अनुभव पुढें रावसाहेब शाळाखात्यांत व्हिजिटरच्या कामावर गेले तेव्हां उपयोगी पडला. भूज येथील हवामान रावसाहेबांस मानवलें नाहीं, व डाक्तरी औषधेंही मानवलीं नाहींत. * त्यांनीं प्रकृतीस अपायच झाला. मेजर जेकब, ज्यांनीं एकाप्रसंगीं रावसाहेबांच्या आजारीपणांत त्यांच्या पलंगाशीं खुर्चीवर बसून जागतांना सारी रात्र घालाविली होती, तेही रजेवर गेले. इत्यादि कारणांवरून रावसाहेबांनीं येथून बदली करून घेण्याचें मनांत आणिलें. हें त्यांचे मित्र रामचंद्र बल्लाळ लिमये यांस

* १६।३।८७ चें एका वैद्यास लिहिलेलें रावसाहेबांचें पत्र.

पसंत नव्हतें व सर्वच आपल्या मनाप्रमाणें झालें पाहिजे असें कोणालाही म्हणतां यावयाचें नाहीं. "खरें बोलावयाचें म्हणजे तरुण माणसास संसारसमुद्र तरून जातांना खवळलेला समुद्र लागलेला बरा, पण शेवटपर्यंत अगदीं संथ समुद्र लागलेला बरा नाहीं. पहिल्या स्थितींत मनुष्य चपळ, व सावध रहातो. दुसरींत आळशी व निष्काळजी राहतो. (२५।१०।१८५४ चे इं. पत्र). मेजर जेकब यांच्या जागेवर मेजर ट्रेव्हलियन यांची नेमणूक झाली होती. कोल्हापूर येथील पोलिटिकल सुपरिन्टेन्डन्ट यांच्या कचेरींतील मुख्य कारकुनाच्या जागेकरतां मेजर साहेबांच्या मार्फत रावसाहेबांनीं २२।४।१८५४ रोजीं अर्ज केला.

हा अर्ज कोल्हापुरास पाठवितांना प्रशंसापर मजकूर मेजर साहेबांनीं लिहिला त्याचा सारांशः—" विश्वनाथ नारायण हे जेथील हवा आपल्या प्रकृतीस अधिक मानवेल तेथें जाण्याची इच्छा करतात. गृहस्थ या नात्यानें त्यांच्या साधारणतः स्वभावाबद्दल माझें मत जितकें चांगलें झालें आहे, तितकेंच सरकारी नोकर या नात्यानें त्यांच्या कामाबद्दल झालें आहे. त्यांच्या कर्तबगारीची किंमत वाढण्यास एकाच गुणाची अपेक्षा आहे तो कोणता, तर अनुभव. एवढ्यानेंच त्यांची रिकाम्या झालेल्या जागेवर शिफारस करण्यास माझें मन वळत आहे. ती जागा रिकामी असून त्यांस खरोखरीच मिळेल तर त्यांच्या नोकरीस व साहाय्यास मी मुकलों म्हणून वाईट वाटेल". मेजर ट्रेव्हलियन यांनीं एक प्रशंसा पत्र २५।५।१८५४ चें रावसाहेबांस देऊन ठेविलें आहे. त्यांत रावसाहेबांचें कामावरील लक्ष व उद्योगासक्ति पाहून चार महिने झाले नाहींत तोंच पूर्ण संतुष्ट झालों असें लिहिलें आहे. तसेंच त्यांनीं हिशेबनीसाच्या कामाशिवाय पत्रव्यवहाराचें काम, (तें काम करणारा नेहमींचा मनुष्य रजेवर असतां) केलें व इतर जें जें काम त्यांस करावयाचा प्रसंग आला तें तें सर्व काम श्लाघ्य प्रकारानें करून ते मोकळे होत, असेंही लिहिलें आहे. असो.

" कोल्हापूर येथील जागा शिक्षणाच्या व बुद्धिसामर्थ्याच्या मानानें हलकी आहे असें रावसाहेब मानीत होते परंतु तशीच परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें या जागेकरतां उमेदवार म्हणून पुढें यावें लागलें " असें प्रो० हार्कनेस यांच्या २।६।१८५४ च्या पत्रावरून दिसतें. ही जागा रावसाहेबांस मिळाली नाहीं. रावसाहेब २५।५।१८५४ पासून * तीन महिन्यांची रजा घेऊन मुंबईस येऊन राहिले. वाळकेश्वरीं जागा घेतली होती व हवाशीर जागा न मिळाल्यास बागुलनाथाचें पाणी पिण्यास न्यावें असा वडिलांनीं उपदेश केला होता.

त्यांस लवकरच म्हणजे पुढच्या जुलै महिन्यांतच सिंधमध्यें कमीशनरच्या हपीसांत १२५ रुपयांची खासगत कारकुनाची जागा कमीशनर मि. बार्टल फ्रियर यांनीं दिली. रजा संपण्यापूर्वी पूर्ववत्प्रकृति दुरुस्त झाली नव्हती तरी नुकसान होतें, सबब या जागेवर १ जुलै १८५४ रोजीं रुजू झाले. या नवीन जागेचा पगार रु. १२० होता.

ही गोष्ट वडिलांस आवडली नाहीं ह्मणून त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें रागानें पत्र लिहिलें.

" पूर्वी भुजेस जाण्यावक्तीं आम्हीं इकडे लांबीचे † पल्यावर. कळवून जबाब नेऊन उत्तर सांगणें; तसें न करतां, पूर्वी कबूल करून मग आलेत. तसेंच हल्लीं राजी देऊन जाण्याचें कबूल करून + लिहितां; त्यांत तीन महिन्यांची रजा प्रकृत बिघडल्यामुळें घेतलीत, तीही भरणें

* मागल्या फेब्रुवारींत आजारीपणाची रजा भोगून आल्यावर रावसाहेब पुन्हां आजारी पडले म्हणून ही रजा घेतली होती.

† पहिली नोकरी आल्यावर आधीं पतकरण्याचें वचन देऊन मग वडिलांस भेटावयास रावसाहेब मुरूडास गेले होते.

+ त्या प्रमाणें पुन्हा दुसरी नोकरी आल्यावर आधीं कबुली देऊन मग रावसाहेबांनीं वडिलांस कळविलें.

असून राजी पाठवितां व या दिवशीं प्रकृत पूर्ववत् झाली नसून जाण्याचा बेत खास करतां, त्यांत नफा नुकसानीचेंही जमेस धरतां, त्यास नफा नुकसानीवरच नजर ठेविली तर गु॥ भुजेस गेल्यापासून दोनवार जाणें येणें व रजा यांतही नुकसान फार झालें, असो. हें तुम्हीं लिहिल्याचा विनोद नव्हे. केलें तें चांगलें समजूनच केलेंत अहांत. आम्हीं लिहितों हें तुम्हांस खेद होण्याकरतां लिहितों असें नव्हे. परंतु कोणतेंही करणें तें विचारें करून सावकाशीनेंच करावें. व तेथेंही विचारण्याजोगे आहेत. तसें केलें नाहीं. हें तुम्हांकडे दोष नव्हे. तुमचे स्वभावाप्रमाणें केलेंत. ”

---

## प्रकरण ७ वें.

# नोकरी ( कराची )

**यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पण्डितान् ।**
**तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिन्दुरिवाम्भसि ॥**

सिंध प्रांतास “तरुण इजिप्त” ह्मणतात ह्मणजे इजिप्त देशांत जशी नील नदी तशी सिंधप्रांतांत सिन्धुनदी महापुरानें तटवर्ती भूप्रदेश पिकवून शस्यसंपन्न करते व लोकांच्या सुखाला कारण होते. “ कर्नल जेकब हे या प्रांतास झोंपी गेलेला कुंभकर्ण असें १५ वर्षांपूर्वी ह्मणत तें खरें आहे. अद्यापि तो घोरतच आहे त्याला जागा करण्याचे प्रयत्न अद्यापि चालूच आहेत ” असें कृष्णाजीपंत नूलकर यांनीं ५।११।८।१८६४ च्या इ० पत्रांत याच प्रांतास उद्देशून लिहिलें आहे.

भूजमधील नोकरी एकतर्फी होती. रावसाहेबांचा फार लोकांशीं संबंध नव्हता. तरी तेथील लोकांच्या विरुद्ध एक तक्रार रावसाहेबांनीं नूलकर

यांस लिहिलेल्या खालील १८।६।१८५४ च्या इंग्रजी पत्रांत आढळते. "माझी इच्छा नसतां या शठांचा सहवास मला घडत आहे व त्यांच्याशीं व्यवहार करावा लागत आहे. यांचें दर्शन झालें कीं मन अतिशयच संत्रस्त होतें. खासगी पत्र व्यवहाराची पवित्रता देवाच्या मंदिरा इतकी असतां माझीं पत्रें फोडणारे हे निरक्षर शठ काय काय करणार नाहींत!" भूज येथील खातें पडलें संस्थानिकांशीं राजकीयसंबंधीं होणाऱ्या व्यवहाराचें, तेथें गुप्तबातमी फोडण्याचे अनीतिलमूलक प्रयत्न होत असावेत असें दिसतें.

सिंधमध्यें असला प्रकार नव्हता. परंतु तेथें रावसाहेबांचा अनेक तऱ्हेच्या अनेक लोकांशीं कचेरींत संबंध येत असे. त्यांस रावसाहेबांची कडक शिस्त आवडत नसे असें रामचंद्र बल्लाळ लिमये यांच्या २५।१० १८५४ च्या खालीं दिलेल्या ( मूळ इं० ) पत्रावरून दिसतें "हृदयांत जळजळ व मनांत मत्सर बाळगण्याविषयीं प्रसिद्ध असलेल्या सहानुभूतिशून्य मंडळींत जाऊन पडल्यामुळें तुह्मांस कचेरीच्या कामांत त्रास पोंचत आहे हें ऐकून वाईट वाटतें. अशी स्थिति केव्हांहीं सुखकारक होत नाहीं असा माझाही अनुभव आहे. मनुष्याचा आत्मविश्वास केवढाही मोठा असूंद्या, कर्तृत्वशक्ति परसाहाय्यावलंबिनी अगदीं नसूंद्या, दानत उत्तम असूंद्या, प्राप्त झालेला हुद्दा केवढाही मोठा असूंद्या, त्याच्या मनाच्या सद्भावनांचा प्रकाश इतरांच्या मनावर पडून त्यापासून प्रेमानें रंगित झालेले किरण परावृत्त झाल्याशिवाय त्याला सुखप्राप्ति होणार नाहीं. मनुष्याला नेहमीं साशंक रहावें लागेल तर आयुष्याचा उपयोग काय? मन मोकळें करून दाखविण्यास एकादा तरी मित्र सन्निध असलाच पाहिजे. तुम्हाला निराश करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण वरिष्ठांचें चांगलें मत ही गोष्ट तुम्हांस फार अनुकूल आहे. म्हणून धीर न सोडतां मन स्थिर करा".

वरील तक्रार नानासाहेबांच्या कानावर गेल्यावर त्यांनीं रावसाहेबांस एका पत्रांत खालीं दिल्याप्रमाणें पोक्त सल्ला दिला होता. "मागील पत्रीं बहुत लोक कठीण, सबब फार कोणाशीं स्नेह ठेवीत नाहीं असें लिहिलें, सबब ऐसीयांसह व्यापार मात्र करूं नये. इष्टत्व बोलण्याचालण्याचें ठेवावें. कोणाशीं भाषण नाहीं तें साहेब लोकांस मात्र नीट. आपले शीलास चांगलें नाहीं. आतां तुम्हांस विद्याव्यसन त्यास हरकत खरी. तत्रापि बोलण्याचा मोठेपणा तसा न बोलण्यांत नाहीं. यद्यपि थोडा वेळ फुकट गेला तरी कामास येईल. आतां ते लोक विद्वान नव्हत, यामुळें त्यांत व्यत्यय आणूं नये असें त्यांचे लक्षांत न येईल तर जसें विद्याभूषण तसेंच आदरसत्कार दुसरेयाचा करणें हेंही भूषण आहे."

कराची येथील कांहीं लोकाविषयीं दोन वर्षें अनुभव घेऊन कृ. ल. नूलकर यांनीं एक शिफारस पत्र देऊन ठेविलें आहे. त्यांचें मत रावसाहेबांच्या मताशीं जुळतें. नूलकर म्हणतातः—" क्ष " मनुष्याच्या अंगचा शाठ्य गुण हा शिक्षातीत आहे. माझ्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत जे जे शठ आले आहेत त्या सर्वांवर याची ताण आहे असें म्हणावयास मला दिक्कत मुळींच वाटत नाहीं. कच्छ येथील शठांची यांशीं तुलना सुद्धां करतां यावयाची नाहीं. सारे चालत्या काळांतील स्नेही आहेत. पुरे! आणखी लिहिलें तर मला मनुष्यद्वेष्टा म्हणाल. ( इं. प. )

सिंधमधील लोकांनीं दाखविलेला मत्सर हा त्या लोकांतील एक विशेष गूण होता असें न मानतां परकीय प्रांतांतील अम्मलदाराचा अम्मल सुरू झाला कीं असा मत्सर उत्पन्न होणें हा मनुष्यस्वभाव आहे असें मानलें पाहिजे. कारण बाहेरचा अम्मलदार आला ह्मणजे कचेरींतील लोकांस वाटतें कीं हा शहाणा म्हणून बाहेरून आणलेला ! आम्हीं काय सारे वेडेच आहोंत ! आमच्यांत एकही याच्या तोडीचा मिळाला नसता काय ? आमच्यांतील मनुष्याला जशी माया आमची वाटेल तशी पर-

क्याला वाटणार नाहीं.त्याला आमचा सोहेर अथवा सुतक यांपैकीं एकाची सुद्धां बाधा व्हावयाची नसते. शिवाय परक्याचें घर लांब असतें. श्रमाचा प्रामाणिक मोबदला म्हणून कां होईना, पण जो पगार तो आमच्या पैशां-तून नेईल तो येथून दूरच नेणार ! आमच्यांतील अम्मलदार असता तर याचा पगार येथेंच राहता ! इ० असो.

सिंधमध्यें रावसाहेबांस कमीशनरच्या स्वारींत फिरावें लागे. रावसा-हेब घोड्यावर बसून प्रवास करीत. ८ मैलांपासून १५।२० मैलांपर्यंत रोज मजल मारीत. घोडे स्वस्त मिळत. रावसाहेबांनीं एक तट्टू बारा रुप-यांनीं विकत घेतला होता. त्याचें जिन मात्र भाड्यानें आणलें होतें. एका सफरीचें भाडें १० रुपये ठरलें होतें. घोड्याला मार्गांत इजा होऊन तो कामांतून गेला तर चालेल पण सफर संपतांच जीन परत दिलें पाहिजे अशी अट होती.

वरील वारूवर बसून जातांना रावसाहेब एकदां पडले होते. हातास दुखापत झाली. ती फार नव्हती ह्मणून परिचित मित्रांकडून पुष्कळ आनंद-प्रदर्शक पत्रें आलीं. परीक्षा केल्याशिवाय रावसाहेब घोडा घेतील व अ-शीच कांहीं त्यांस इजा पोंचेल ती पोंचूं नये ह्मणून रावसाहेबांचे वडील घोड्याच्या शोधार्थ मुरुडाहून सातान्यापर्यंत गेले होते. असो.

सर्वच ठिकाणचें पाणी चांगलें नसे. तूप व दूध कित्येक ठिकाणीं चांगलें मिळे. कधीं कधीं डाळ तांदुळ चांगले मिळत नसत व धने किंवा जिरें मिळत नसे. घोड्याला घास प्रभूतपणें मिळे. कांहीं ठिकाणीं घोड्यामागें दीड आणा घेत. मग तो घोडा एक पेंढी खावो कीं दहा खावो. हवेचें मान सुद्धां स्थिर नसे. एकदां एके ठिकाणीं तळ दिल्यावर रावसाहेब रावटीच्या मध्यभागीं संध्येला बसले होते. इतक्यांत धुळीचें वादळ उठलें व राहुटी खालीं बसली. चुलीवरील स्वयंपाकाचीं भांडीं उलटलीं व अन्न फुकट गेलें. बाळा पांवसकर यांचे कपडे जळाले. दुधावर दिवस काढावा लागला.

स्वारींमध्यें कमीशनर व त्यांचे मतदगार मि० एलिस हे कधीं कधीं दोघे असत. प्रवासामुळें सहवास फार निकट होत गेल्यामुळें दोघांशीं रावसाहेबांची मैत्री लवकर जडली, परंतु मि० एलिस यांची मैत्री अल्पायु होती. मि० एलिस हे १८५४ च्या डिसेंबर महिन्यांत फर्लो घेऊन विलायतेस गेले. त्यावेळेला त्यांनीं खालीं दिल्याप्रमाणें रावसाहेबांस प्रशंसापर दाखला देऊन ठेविला आहे:—

विश्वनाथ नारायण ( जे मी पहिल्यानें पाहिले तेव्हां लहान बटु होते ते.) गेल्या सहामहिने सिंधच्या कमीशनरांचे खासगत कारकून होते. या जागेहून मोठ्या जागांवर पुढें बढती होत जाण्याच्या लायकीची यांची बुद्धिमत्ता व वर्तणूक आहे, असा माझा अभिप्राय कोणी न सांगतां नमूद करून ठेवण्यास मला फार आनंद होत आहे. हा माझा ग्रह होण्याचें कारण असें झालें कीं ते येथें नुकतेच आल्यामुळें त्यांस सिंधी भाषेचें ज्ञान मिळवावयाचें होतें तरीही कराची येथें नार्मल क्लासाची स्थापना करण्यामध्यें यांनीं मला कार्यनैपुण्यानें साहाय्य केलें. सोईगांव, बी. एलिस,

२४ दिसेंबर १८५४ असिस्टंट कमीशनर.

मि० एलिस यांच्या जागेवर मि० गिब्स यांची नेमणूक झाली. मि. गिब्स यांशीं झालेली मैत्री दीर्घायु झाली. फिरतीवर असतां गार वाऱ्यापासून रावसाहेबांस पडशा खोकल्यापासून उपद्रव होई, अथवा खाण्यापिण्याचे चांगले पदार्थ न मिळाल्यामुळें प्रकृति बिघडे तेव्हां मि० फ्रियर व मि० गिब्स हे रावसाहेबांची तरतूद नीट होते कीं नाहीं इकडे लक्ष देत. एकदां रावसाहेबांच्या पोटांत दुखूं लागलें व त्यांस किंचित् ज्वरांशही वाटला. त्यादिवशीं फक्त साबूदाण्याची खीर खाऊन होते. त्यानें अशक्तता आली म्हणून मि० गिब्स यांनीं आपली गाडी रावसाहेबांस बसावयास दिली. असो.

फिरतीवर असताना तिघांचा काळ उपयुक्त माहिती मिळवून ज्ञानार्जनें

करण्यांत मोठ्या आनंदांत गेला. जुनीं पीरांची थडीं, पुरातन कोरींव लेख, * ऐतिहासिक किल्ले, प्रसिद्ध तळीं, देवायतनें, मशिदी, ऊन-पाण्याचे झरे, कालवे इत्यादि दर्शनीय स्थळांचें निरीक्षण केल्या-शिवाय रावसाहेब पुढें जात नसत. चमत्कारिक कन्दमुळें व फळें, शिंपे, जुनीं नाणीं, हीं जमवीत असत. भूच्या गर्भाचा शोध लाव-ण्याच्या कामीं ज्यांचा उपयोग होईल असे कांहीं फत्तरांचे तुकडे दोन तीन पेट्या भरून मुंबई सरकार व मद्रास सरकार यांकडे पाठविण्या करतां तयार ठेवल्या होत्या. कमीशनरच्या हफीसांतील कामाशिवाय राव-साहेबांकडे शाळांची तपासणी करणें हें एक काम असे. तें सुरळीत करतां यावें म्हणून रावसाहेब पर्शियन व सिन्धी या दोन भाषांचा अभ्यास सिंधमध्यें असतांना नित्य नेमानें † करीत असत व त्यांचा तो अभ्यास इतका चांगला झाला होता कीं मि. एलिस व रावसाहेब या दोघांनीं मिळून सिन्धी व हिंदी मूळाक्षरांस क्रमिक पुस्तकांच्या उपयोगाकरतां निश्चित स्वरूप दिलें. त्यानंतर मुंबईंत विश्वविद्यालयाची स्थापना झाल्यावर सिन्धी भाषाविषयांत रावसाहेबांस परीक्षक होण्याचा मान मिळत असे. येथेंच असतांना वो सखारामभट यांजवळ संस्कृत शिक-ण्यास रावसाहेबांनीं प्रारंभ केला.

रावसाहेबांना अनेक भाषांत प्रावीण्य मिळविण्याची जी आवड होती ती विषयीं त्यांनीं आपल्या रोजनिशींत ८.६।१८५५ रोजीं खालील मजकूर लिहून ठेविला आहे.

---

* शक्य तेथें त्यांचा अर्थ लावून टिपून ठेवण्यांत येई अथवा त्यांची आकृति कागदावर काढून घेण्यांत येई.

† ( एके दिवशीं अभ्यासांत खंड पडल्यावर ) अरेरे ! एक घडा म्यां गमा-विला ! केवढा आळशी आहें ! असें रावसाहेबांनीं रोजनिशींत लिहून ठेविलें आहे.

" कस्टम खात्यांतील मि. प्रिन्स यांस भेटण्यास गेलों होतों. माझा चेहरा पाहून ते म्हणाले कीं बहुभाषाकोविद होण्याचीं लक्षणें माझ्या चेहऱ्यावर दिसत आहेत. मात्र परिश्रम केले पाहिजेत. परिश्रम केले पाहिजेत हें जें ते म्हणाले तें खरें आहे, असें माझ्या गेल्या दोन वर्षांच्या अनुभवावरून दिसतें. तथापि यांनीं केलेल्या उपदेशापासून लाभ करून घेतां येईल तर पहातों. "

सिंधमध्यें असतांना रावसाहेबांनीं उमरकोट येथील सोद राजांचा इतिहास लिहिला. तो प्रथम कॅपटन् पेली या नांवाचे एक इतिहास संशोधक गृहस्थ त्या प्रांतांत होते, त्यांनीं वाचून पाहिला, व त्यांस पसंत पडला. या ऐतिहासिक लेखाचें मुंबईच्या रॉयल एशियॅटिक सोसायटी पुढें ८।३।१८५५ रोजीं वाचन झालें. कॅप्टन पेली हे रावसाहेबांस उपयुक्त सुचना करतांना म्हणाले " जुन्या स्थलांचें निरीक्षण करीत असतांना कांहींचीं चित्रें काढीत जावें. पुढच्या भेटीला असलें एकादें चित्र काढून मला दाखवाल अशी इच्छा आहे " *

अशा रीतीनें फिरतींत असतां रावसाहेबांना सिंधप्रांताविषयीं इतकी माहिती झाली होती कीं त्यांस " सिंधप्रांताचे चालते बोलते सर्वसंग्रह कोश " असें कृष्णाजीपंत नूलकर म्हणत.

भुजेस असतां रावसाहेबांनीं कुटुंबास आणिवलें नव्हतें. परंतु कराचीस आल्यावर प्रथम तेथील हवा त्यांस चांगली वाटली म्हणून बरोबर अवश्य व योग्य चाकर माणसें देवून कुटुंबाची रवानगी करण्यास वडिलांस पत्र लिहिलें. पत्र येतांच नानासाहेबांनीं सुनेला रोजगारावर पाठविलें. सून

* त्या प्रो काहीं चित्रें रावसाहेबांच्या रोजानिशींत सापडतात. रायगड किल्ल्यांत नागाप्पाशेटी यांचें स्मारक म्हणून एका दगडावर नाग कोरलेला आहे त्याचें चित्र रावसाहेबानीं रोजानिशींत काढून ठेविलें आहे. व त्याची लांबी रुंदी नमूद करून ठेविली आहे.

बाईचें वय लहान, राहण्याचा प्रदेश फार दूर म्हणून संसाराचा बेत नीट बसविण्याकरतां रावसाहेबांच्या मातोश्रींनीं बरोबर स्वतां जाण्याची तसदी घेतली. त्यांच्याबरोबर रावसाहेबांची सर्वांत धाकटी बहीण आत्याबाई निघाली. बरोबर एक स्वयंपाक करण्याकरतां बाई, साळूबाई जोशी या नांवाची, सोबतीस ग्रामस्थ सोमण व अंनतभट बिवलकर, शिवाय एक आचारीही होता " अक्षरशत्रु म्हणजे कामास चांगला " असें त्यास नानांचें शिफारस पत्र होतें. ही सर्व मंडळी ४ एप्रील १८५५ रोजीं मुरूडाहून निघाली. त्यांच्या बरोबर दोन डोळ्या व त्यांचे वाहक आठ गडी, दोन घोडे, व दोन मोतदार होते. मंडळी पायमार्गानें पेणेकडून मुंबईस निघाली असें आगाऊ पत्र वडिलांनीं रावसाहेबांस लिहिलें.

"मातोश्रींस पाठविण्याच्या बेताचें पत्र लिहून आलें तें पाहून समाधान झालें हें पत्रीं किती लिहावें ! " असें उत्तर रावसाहेबांनीं वडिलांस लिहिलें. चिरंजीवांस आपलें करणें पसंत पडल्यानें वडिलांस आनंद झाला.

सर्व मंडळी १२ एप्रील रोजीं मुंबईस दाखल झाली. याच दिवशीं मंडळी पुढें कराचीच्या बोटीनें रवाना व्हावयाची होती. परंतु त्याच बोटीनें त्या दिवशीं लष्कर रवाना व्हावयाचें होतें म्हणून दुसऱ्या आठवड्यांत २१ तारखेस मुंबईहून विलायतच्या बोटीनें रवाना झाली. ती २४ तारखेस कराचीस सुखरूप पोंचली. नंतर नानासाहेबांनीं कुटुंबास कळविलें कीं आतां विश्रांति घेऊन श्री द्वारकानाथाचें दर्शन घ्यावें व नारायण सरोवराचें स्नान करावें म्हणजे इतकी इजा आम्ही दिली त्याचें सार्थक झालें.

रावसाहेब जरी मुरूडाहून इतके लांब रहात होते. तरी त्यांस कोणत्याही जिन्नसापानसाची वाण पडूं नये अशी काळजी नानासाहेब घेत असत. मुंबईस दादा काळे म्हणून एक दुकानवाले व्यापारी होते. त्यांकडे घराहून जिन्नस नानासाहेब गलबतांतून पाठवीत व दादाकाळे पुढें करा-

चीस गलबतांतून पाठवीत असत. नित्यशः पाठविण्यांत येणारे जिन्नस खालीं दिल्याप्रमाणें असत.

मुरांबे ( आंवळयाचा व महाळुंगाचा ); मेतकूट; लोणचीं ( बोंजाराचें व सुखांबाचें ); बतासे; कणगरें व सूरण; गोटे ( गळींव सुखडीचे ); साजूक तूप; मोहाचे नारळ; गोर्डीच्या सुपाऱ्या; बारीक भाताचे पोहे; हलवा—तवशींच्या बिया बदाम व खसखस घालून केलेला; सुपाऱ्या; आंब्याचीं साठें व आंब्याचा आटींव रस; पायतणें; जोडे मेणवलीहून आणविलेले; गरे हिरवे ( वाळवलेले भाजीकरतां ); अकरा प्रकारचें भाजीचें बीं; बिब्बे; चिंचेचे गोळे; केळयांचें पीठ; सांडगे; आंवळयाच्या वड्या; कोकमसालें; आलें; मध; या शिवाय इतर जिन्नस रावसाहेब मागवीत ते पाठवीत असत.

यांतील बहुतेक जिन्नस कोकणांतील भेट ह्मणून पाठविण्यासारखा आहे. तो घरीं पिकलेला व प्रेमानें वडील मनुष्यानीं पाठविलेला मग त्यांना काय गोडी आली असेल तें अनुभवाशिवाय सांगतां येणार नाहीं.

याशिवाय चिमणसाळ, वंगल व काळीसाळ यांचे तांदूळ दादाकाळे ( मुंबईचे व्यापारी ) हे पाठवीत असत. असो.

सिंध प्रांतांत रोजगारावर असतानां वरिष्ठांची कृपा, विद्वज्जन-संभाषण, तरुणपत्नीसमागम व मातृदर्शन यांचा लाभ घडून रावसाहेब मनांत फार संतोष पावले.

परंतु पुढें अतिपरिश्रमामुळें फिरण्याच्या त्रासानें रावसाहेबांची प्रकृति वारंवार बिघडे. तशांतच पत्नीची प्रकृति दुरुस्त रहात नसे. एवढ्याच करितां त्यांनीं बदलीची खटपट चालविली होती. १८५४ सालीं शाळा खात्याची पुनर्रचना करण्याकरतां विलायतेहून अधिकाऱ्यांचा जो प्रसिद्ध खलिता आला त्यांत ७ व्हिजिटरच्या जागा नव्या करण्यांत आल्या. त्यांतील एकीवर रावसाहेबांची नेमणूक झाली. ती १८५५ च्या जुलै

महिन्यांतील सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाली होती. ( १८।२।८६ चे रावसाहेबांचे मि. नेलर यांस इं० पत्र).

ही जागा सोडतांना सिंधचे कमीशनर मि० एच्. बी. ई. फ्रियर यांनीं खालीं दिल्याप्रमाणें रावसाहेबांस त्यांच्या कामगिरीचा प्रशंसापर दाखला दिला होता:—

मि० विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं शाळा खात्यांत बढतीची जागा पतकरल्यामुळें कमीशनरच्या खासगत कारकुनीचें काम करीत असतां जो थोर उत्साह व बुद्धिसामर्थ्य दाखविलें त्याविषयीं माझा अभिप्राय कागदोपत्रीं नमूद करून ठेवण्याची माझी इच्छा आहे. त्यांचा दृढ व अखण्ड प्रामाणिकपणा व इतर नैतिक गूण यांची गणना फार उच्च दर्जात हरएक कारणांवरून करतों. यांचें भावि चरित्र इतकें उपयुक्त होईल व इतकें सन्माननीय होईल कीं ज्या संस्थेमध्यें ते नामांकित विद्यार्थी होते तीस तें भूषणप्रद होईल अशी निष्कपट भावानें मी आशा करतों.

कराची ९।८।१८५५ एच्. बी. ई. फ्रियर.

सिंधचे कमिशनर.

असो. नंतर रावसाहेबांनीं आपल्या जागेवर आपले मित्र कृष्णाजीपंत नूलकर यांची नेमणूक करून घेतली*, व राजीनामा देऊन १०।८।१८५५ रोजीं मुंबईस जाण्याकरतां निघाले. इतर माणसें बिऱ्हाडींच ठेविलीं होतीं. कारण ठाणें येथील नोकरी कायम नव्हती एकादेवेळीं परत सिंधमध्यें यावें लागण्याचा संभव होता. १४।८।१८५५ रोजीं रावसाहेब मुंबईस पोंचले मि० हार्कनेस यांस भेटून १६ तारखेला आपल्या नव्या

* या करतां २।७।१८५५ चें पत्र लिहून नूलकर यांची संमति रावसाहेबांनीं मिळविली होती.

कामावर रुजू झाले. त्यांनीं ठाणें येथें काणे वाडींत जागा भाड्यानें घेतली होती.

मंडळी कराचीस असतां त्यांस कांहीं कमी जास्त लागल्या संवरल्यास त्याची व्यवस्था करण्याचें काम रावसाहेबांचे मित्र व कुटुंब वैद्य डा. अनंत चंद्रोबा, कृष्णाजीपंत नूलकर व मोरोबा दांडेकर यांकडे सोपविलें होतें. या मंडळीस वाटत होतें कीं रावसाहेब परत येतील. डा० अनंत चंद्रोबा यांनीं एकापत्रीं लिहिलें होतें कीं प्रसंग पाहून तुमच्या धाकट्या बहिणीस मि० फ्रियर यांस भेटविलें तेव्हां तिनें “ माझ्या अण्णांस परत केव्हां आणणार म्हणून विचारलें”. शिवाय मातोश्रींच्या मनांत श्रीद्वारकाधीशाचें दर्शन घ्यावयाचें होतें. त्या तिकडे जावयास निघाल्या तेव्हां त्यांच्या माणसांबरोबर सूनबाई निघाल्या. आपण असतां नुसत्या चाकरमाणसांबरोबर एकट्या सासूबाईस जाऊं देणें त्यांस प्रशस्त वाटेना. २३।१०।१८५५ रोजीं कोठ्यांतून यात्रेस मंडळी निघाली. दुर्दैवानें वादळ उद्भवलें व कोठ्या तडीस लावतां येईना. समुद्रांत दूर एकदोन दिवस रहावें लागलें. सासूबाईचें सोंवळें कडक. स्नान नाहीं म्हणून पाणीही मुखांत घालीनात. अशा स्थितींत सूनबाईसही तसेच निर्जळी उपास काढावे लागले. त्यांतून समुद्र लागल्यामुळें ओकून फार हाल झाले. शेवटीं समुद्र शान्त झाल्यावर कोठ्या मांडवी बंदरांत लावण्यांत आला. तेथें नूलकरांची स्वारी फिरतीवर होती.

त्यांच्या येथें ४।५ दिवस विश्रान्ति घेऊन दुसऱ्या कोठ्यांत बसून द्वारकेस मंडळी गेली. एकदम द्वारकेस जावयाचें असतें तर आगबोटीनें जातां आलें असतें व बरीच हलाखी वांचली असती परंतु मातोश्रींचा हट्ट पायमार्गानें मांडवीहून नारायण सरोवरास जाणेचा, तेथें नाईलाज झाला. असो.

पुढील यात्रा सुखरूपपणें पार पडली व परत कराचीस येऊन ठाणें येथील नोकरी कायम होते कीं नाहीं हें समजण्याची वाट पहात बसली.

ठाणें येथील नोकरी कायमची नव्हती ती कायमची करून घ्यावी असा वडिलांसुद्धां सर्व घरच्या मंडळीचा आग्रह पडला होता. तें डॉ. हार्कनेस यांस रावसाहेबांनीं कळविलें. “ घरच्या मंडळीची अनुज्ञा कराचीस पुन्हां जाण्यांकरितां कशीतरी मिळवा. ” “ संवयीनें हवा मानवूं लागेल ” असें मि. हार्कनेस ह्मणत. समुद्रप्रवास सोसत नाहीं; फिरण्याचें काम होत नाहीं. तथापि सरकारी कामाची गैरसोय होत असेल तर पुन्हां कराचीस जाण्यास रावसाहेब सिद्ध झाले. सिंधी धुळाक्षरांचा त्यांस अधिक विचार करावयाचा होता. यावरून प्रारब्ध कार्य-तडीस नेण्याची जबाबदारी रावसाहेब ओळखून असत व हिच्या पुढें स्वार्थाची अधिक गणना करीत नसत हें सिद्ध होत आहे. असो.

सिंधप्रांतांतील व्हिजिटर ह्मणून पुन्हा त्यांची नेमणूक सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाली. “ घरीं फिरतीवरून आलों तों सिंधला बदली झाल्याचा हुकूम हातांत पडला. आज माझी तबीयेत नादुरुस्त आहे. ज्यांना हवेच्या मानानें हे दिवस सिंधमध्यें वाईट असतात त्यांनीं या दिवसांत तिकडे जाऊं नये असा डाक्टरांचा अभिप्राय पडला. त्यावरून मि. हार्कनेस यांनीं ती बदली रद्द केली. व ठाणें येथील नोकरी कायम केली. ( १८५५ च्या रोजनीशींतील उतारा. )

नंतर कराची येथील मंडळी १८५५ च्या दिसेंबर महिन्यांत ५ व्या तारखेस मुंबईस आली परंतु पुढें ५।६ महिने फिरतीवर जावें लागणार, याकरतां रावसाहेबांनीं पत्नीला मुरूडास मातोश्रींबरोबर रवाना करून दिलें.

## प्रकरण ८ वें.

# नोकरी ( व्हिजिटरची ).

तेथें लहान मंदिरिं करितां गोंगाट, वचक ठेवोनी ॥
शाळेंत शिशुंस शिकवी पंतोजी चतुर, गांविं राहोनी ॥ १ ॥
बहु शिस्त कठिण याची तोंडावरतीं दिसे कठोर कळा ॥
मी या जाणें पुरता बटु हि तसा चुकावि नित्य जो शाळा ॥ २ ॥
ज्ञान तयाचें किति तें वर्णितसे सर्व लोक निःशंक ॥
म्हणती तयास येई " लिहितांना तेंवि मोडितां अंक ॥ ३ ॥
साधी भूचें मापन, वर्तवि तिथिवार ओहटी भरती " ॥
बोलति लोक असेंही " सांगे मावेल कुंभिं तक्र किती " ॥ ४ ॥
याची वादकुशलता मान्य करी गांवचा उपाध्याही ॥
आली हार तरी हा वाद पुढें करित सारखा राही ॥ ५ ॥
विद्वत्तेचे दर्शक, गर्जुनियां, शब्द लांब तो वदतां ॥
साश्चर्य गांवढळ जन निरखिति त्या भोंवतीं उभे असतां ॥ ६ ॥
जों जों निरखिति तों तों चित्तीं आश्चर्य सर्व जन पावे ॥
ज्ञान अशेष तयाचें इतक्या डोक्यांत हो कसें मावे ॥ ७ ॥

स्वकृत ( गोल्डस्मिथकृत निर्जन ग्राम )

यावेळेस शाळा खात्याचे अधिकारी मि. अर्स्किन हे होते. मेजर जेकब व मि. हार्कनेस यांजवळून पत्रें घेऊन त्यांची भेट घेऊन १६।९।१८५५ रोजीं व्हिजिटरच्या कामावर रावसाहेब रुजू झाले. या जागेचा पगार

१५० रुपये होता. फिरतीवर असतां भत्ता रोज तीन रुपये मिळत असे. रावसाहेबांची नेमणूक लोकांस पसंत पडली असें दिसतें. कामाकरितां पहिल्यानें मुंबईस आले तेव्हां रेल्वेच्या स्टेशनावर त्यांस भेटण्याकरितां जगन्नाथ शंकरशेट, बमनजी हारमसजी वाडिया, नारायण दिनानाथजी, श्री धुंडिराज विनायक बिवलकर, प्रभाकरपंत बापट, व एदलजी रुस्तमजी इत्यादि बडी मंडळी हजर होती.

काम हातीं घेतल्या दिवशीं रोजनिशींत रावसाहेबांनीं असें इंग्रजींत लिहून ठेवलें आहे. " कागदपत्र तपासले. पुष्कळ काम करावयाचें आहे. मला वाटलें तितकें अथवा मि. फ्रियर सहित पुष्कळ लोकांस वाटलें तितकें सोपें, हें काम नाहीं; याचा मला आनंदच होत आहे. माहिती मिळवून कामाची व्यवस्था लावण्यास पुष्कळ चातुर्य लागेल. माझ्यानें होईल तेवढी शिकस्त करून पाहीन ". येथील नोकरी करतांना प्रवास करीत हिंडावें लागे त्या विषयीं २०।८।१८५५ च्या रोजनिशींत रावसाहेबांनीं लिहिलें आहे " आठ महिने साऱ्या जिल्ह्याभर हिंडावयाचें; व पावसाळ्यांत चार महिने मुख्य मुख्य शहरीं हिंडावयाचें, म्हणजे आठ महिने प्राकृत व चार महिने संस्कृत प्रवास करीत रहावयाचें असा प्रकार आहे. " हें काम म्हणजे जागोजाग नवीन पद्धतीच्या शाळा स्थापन करून साक्षरता प्रसार करावयाचें होतें. यावरून यापूर्वी शिक्षणाची सोय मुळींच नव्हती असें समजावयाचें नाहीं. जुन्या पद्धतीप्रमाणें खेड्यांपाड्यांतून पंतोजीच्या शाळा असत. त्यांस गांवठी शाळा म्हणत. त्या सार्वजनिक देवालयांत, धर्मशाळेंत अथवा एकाद्या धनिक व उदार गृहस्थाच्या पडवींत भरत असत. पंतोजीला वेतन रोखीनें अथवा धान्यरूपानें मिळत असे. मोडी अक्षर, तोंडचे हिशोब, परवचा, वाचन इत्यादि प्राथमिक विषयांत शिक्षण देण्यांत येई. धूळपाटी व निरुपयोगी झालेले खडें यांवर घालून दिलेलीं अक्षरें गिरवूनच

अक्षर वळविण्यांत येई. कोणी तरी फर्ड्या कारकुनानें लिहिलेल्या लिखितांवरून वाचन शिकविण्यांत येई. पुस्तकाचें नांव नाहीं. असली सामग्री यशस्वी करून दाखविण्यास पंतोजीला एक काय ती छडी सहाय होत असे. " छडी वाजे छम् छम् विद्या येई घम् घम् " या म्हणीचे उत्पादक हेच पंतोजी होत.

त्यांपैकीं बहुतेक चित्पावन ब्राह्मण व गौडसारस्वत ब्राह्मण व प्रभु, या जातींचे असत. कांहीं ठिकाणीं शिंपी, कांसार व मराठे या जातींचे असत. नागोंळच्या बाजूला पार्शी असत. हिंदुस्थानी शाळांत मुसलमान असत. त्यांच्या शाळांस कुराणांच्या शाळा म्हणत. रोहें येथील कुराण शाळेंत एक मुलगी शिकत होती. भिंवडी येथें वयानें मध्यम, पण अकालवृद्ध, मुद्रेनें गंभीर, वृत्तीनें उद्दाम, बद्धमुख, व आपल्याशिवाय इतरांस तुच्छ मानणारा, सभ्यपणें चार शब्द बोलावयास नाखूष, अशा उत्तर हिंदुस्थानांतून आलेल्या एका मुल्लाजीशीं एका कुराण शाळेंत रावसाहेबांची गांठ पडली होती (६।३।१८५६ची रोजनिशी). पनवेलच्या बाजूला गुजराथी पंतोजी असत. घोंसाळें येथें एक शाळा म्हार लोकांच्या आश्रयावर चालली होती. ते वर्षाचे ४० रुपये पंतोजीस देत. या सर्व शाळांतून फी पालकांच्या ऐपतीप्रमाणें अर्ध्या आण्यापासून दोन आणे, चार आणे व क्वचित् आठ आणे पर्यंत असे. थळाजवळ एके ठिकाणीं पंतोजी होता, तो वृद्ध असून अंध होता. "तो लिहावयास व वाचावयास कसें शिकवीत होता तें मला समजलें नाहीं" असा त्याविषयीं रोजनिशींत रावसाहेबांनीं उल्लेख करून ठेविला आहे.

तळें येथील एका शाळेंत मुलांस १०५०२७ ही संख्या वाचतां यइना तशी त्यांच्या पंतोजीसही येईना. पण तेथील कांहीं शाळांत लेखन, वाचन, फाडे, गुणाकार, भागाकार व तोंडचे हिशोब करण्यापर्यंत मुलांची मजल गेली होती. तरी मि. रीड, शाळांचे इन्स्पेक्टर, म्हणत " ज्या

ज्ञानाच्या पायरीपासून शिक्षणाला आरंभ व्हावयाचा त्या पायरीशीं या गांवठी शाळांतील शिक्षणाचा शेवट होत आहे". यांतच घोणकाई, रेवदंडा इ. ठिकाणीं पाद्री लोकांनीं चालविलेल्या शाळा होत्या. त्यांचा खर्च डॉक्तर वुइल्सन देत असत. पंतोजी ज्यू जातीचे असत. वेळेसंबंधें शिस्त चांगली असे. तेथें ख्रिस्ती धर्माचें शिक्षण देण्यांत येई. बालबोध व मोडी लिहावयास व वाचावयास शिकविण्यांत येई. डॉक्तर वुइल्सन यांनीं एक मुलांकरितां मनोरंजक गोष्टींचें पुस्तक पाठविलें होतें त्याचें वाचन वर्गांत चालत असे. रेवदंडा येथील बाळकृष्ण अनंत जोशी यांनीं चालविलेल्या एका गांवठी शाळेंत विदुरनीति, पंचोपाख्यान वेताळ पंचविशी, विक्रम बत्तीशी व इसापनीति, यां सारख्या ग्रंथांचें वाचन मुलांकडून होत असे.

"उपयुक्त ज्ञानसंग्रह" या कोल्हापुराकडील मासिकाचा अंक हातीं पडला होता त्यांतील नैतिक म्हणींचें वाचन नागांव मधील एका गांवठी शाळेंत होत असे. तेथील दुसऱ्या एका शाळेंत गुणाकार व व्याकरण शिकण्यापर्यंत मुलांची मजल गेली होती, व रामदासाचे श्लोक वाचून घेत असत. इंग्रजी शिक्षणाची अलिबाग येथें एक शाळा होती ती डॉक्तर वुइल्सन यांच्या खर्चानें चाले. तींत यत्ता चार होत्या. क्लॉवसचीं इंग्रजी क्रमिक पुस्तकें, आशियाखंडाचा भूगोल, मॉरलक्लास बुक, वुइल्सन यांचे भाषापद्धतीचे धडे, महाराष्ट्राचा इतिहास, हीं पुस्तकें अभ्यासक्रमांत लाविलेलीं होतीं. भूगोल शिकवीत पण नकाशाची कल्पना कोणाला झालेली नव्हती. कलकत्ता, मुंबईच्या दक्षिणेस आहे ह्मणून एका विद्यार्थ्यानें सांगितलें. ऋणनिषेधक बोध, जागती ज्योत, जनावरांचें वर्णन, बाळव्याकरण इ. पुस्तकें अभ्यासक्रमांत लावलेलीं होतीं. त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर नामदार एल्फिन्स्टन साहेब यांनीं आपल्या रहात्या बंगल्यासमोर आपल्या खर्चानें एक शाळा चालविली होती.

333

नवीन पद्धतीच्या काढलेल्या शाळांस सरकारी म्हणत. अशा शाळा रावसाहेबांच्या आधीं मि. होप व मि० बेकर यांनीं कित्येक काढिल्या होत्या. तळोजें, दहिवली, पेण, रोहें, अलिबाग, कोयनड, डहाणू, वांद्रे, कोळवण, मुरबाड, भिवंडी, इत्यादि ठिकाणांत नव्या पद्धतीच्या शाळा स्थापण्याचा हुकूम सर पेरी शाळाखात्याचे त्यावेळचे मुख्य अधिकारी यांनीं देऊन ठेविला होता. नवीन शाळांची स्थापना करावयाच्या पूर्वीं गांवोगांव हिंडून, वजनदार लोकांच्या साहाय्यानें गांवकऱ्यांची सभा भरवून, त्यांस नवीन शाळा स्थापण्यापासून काय फायदे होतील ते रावसाहेब समजून सांगत. लोकांचीं मनें तयार झालीं म्हणजे त्यांच्याकडून अर्ज घेत, व त्या अर्जांत आम्हीं फलाणे फलाणे ग्रामस्थ अमुक वर्गणी वर्षास देत जाऊं असें वचन घेत. शाळेच्या स्थापनेचा निम्मे खर्च करण्यास कंपनी सरकार तयार होती सबब निम्मे खर्च द्यावयाचें अभिवचन लोकांनीं दिलें व तें वचन कांहीं वर्षें तरी निश्चयानें लोक पाळतील अशी खात्री झाली म्हणजेच रावसाहेब सरकारची मंजुरी आणून नवीन शाळा काढीत. "मि. बेकर साहेबांच्या वेळेस स्थापन झालेल्या थोड्याशा शाळांपासून मला जेवढा त्रास झाला तेवढा त्रास सर्व जिल्ह्यांतील शाळांपासून झाला नाहीं." "लोकांचे निश्चय वाळूच्या दोऱ्याप्रमाणें अशाश्वत आहेत" असें रावसाहेब म्हणत. "आम्हीं अमूक वर्गणी दरवर्षास देत जाऊं" असें लोक लिहून देत असत हें अगदीं खरें परंतु हा लेख लिहून देणारे कायद्यानें बांधले जात असत अथवा नसत या विषयीं संशयच होता. निदान कांहीं लोक बांधले जातों, असें मानीत नसत म्हणून जें बंधन मानलें जात असें तें नैतिकच होतें. कांहीं दिवसांनीं एक म्हणे "आतां आमचा मुलगा शाळेंतून निघाला, त्याचें शिक्षण संपलें त्याबरोबर वर्गणी देण्याचें कारण संपलें." दुसरा म्हणे "आम्हांला गांव सोडून जावें लागत

आहे म्हणून वर्गणी देण्याचेंही सोडावें लागत आहे." तिसरा म्हणे "आमची स्थिति बदलली म्हणून वर्गणी देववत नाहीं याबद्दल लाचार आहोंत." मुलगा महिना दोन महिने गैरहजर अथवा रजेवर असला तर वर्गणी किंवा फी न देण्यास सबळ कारण झालें असें पालक म्हणत व तें म्हणणें मान्य होई असा अनुभव भास्कर दामोदर हे नगरास व्हिजिटर असतां त्यांस पुष्कळ आला. लोकांनीं दिलेले लेख कायदेशीर आहेत असें धरून फिर्यादी करून पैन पै वसूल करण्याचा प्रयत्न मामलेदार, महालकरी करीत नसत; तसें केल्यानें लोक वर्गणी देण्याचें कबूल करण्यास पुढें आले नसते व शाळा स्थापणें कठीण गेलें असतें म्हणून लोकांच्या समजुतीवर जास्त भिस्त ठेवावी लागे. या संबंधें आपला प्रथमचा अनुभव रावसाहेबांनीं असा लिहून ठेविला आहे. "वर्गणी देण्यास साधारणपणें लोक खुषी नाहींत. यामुळें मि. होप यांच्या वेळीं स्थापन झालेल्या शाळा आतां डळमळूं लागल्या आहेत. पुढल्यावर्षीं वर्गणी देण्यास आम्हांजवळ पैसे नाहींत; तुमच्या शाळा आम्हांस नकोत असें कांहीं ग्रामस्थ सांगतात. त्या सांवरावयास मला भगीरथ प्रयत्न करावे लागतील." रावसाहेबांकडे एका सोलापूर येथील मास्तरानें ठाणें जिल्ह्यांत माझी बदली करा अशी विनंति करतांना असें पत्र लिहिलें होतें:—"माझा येथें निर्वाह होऊं शकत नाहीं. पगार भागविण्यांत फीच्या पैशांत जी तूट येईल ती भरून काढणें लोकांच्या वर्गणीवर अवलंबून आहे. ती इतके दिवस न आल्यानें मी वर्षभर अर्धपोटी असून सर्व दिवसभर पुरेंपुरें काम करीत आहें." उरण येथील मास्तरानें तक्रार केली होती कीं माझा २ महिन्याचा पगार लोकांकडून येणें आहे. ही स्थिति १८६१ पर्यंत सुधारली नव्हती. २८।८।१८६१ च्या पत्रांत नारायण भाई दांडेकर हे ठाणें व कुलाबा या जिल्ह्यांत रावसाहेबांच्या मागून व्हिजिटर असतां त्यांनीं रावसाहेबांस कळविलें कीं,

परशराम विष्णु या मास्तरानें आम्हांवर दहा रुपयांची फिर्याद केली आहे. तो म्हणतो ही रक्कम लोकांकडून येणाऱ्या वर्गणीची दोन महिन्यांची बाकी आहे.

रत्नागिरी येथील गंगाधरपंत टिळकांनीं रावसाहेबांजवळ गाइलेली कहाणी श्रवणीय आहे. "आजपर्यंत सण नाहीं, वार नाहीं, सुटी नाहीं. सदोदित हमालासारखा काम करीत असें. मी कामाचा स्नेही व काम माझा स्नेही. याशिवाय गुलहौसी स्नेही संपादन करून कधीं त्यांच्या बरोबर सुटींत बाहेर गांवीं टिफिनीस वगैरे आज वीस वर्षांत गेलों नाहीं." पंतोजीपणांत मुलांस फार श्रम घेऊन शिकविलें तरी वार्षिक परीक्षेच्यावेळीं मुलांच्या तोंडून उत्तरें आलीं तर मुलें हुशार आहेत, पंतोजी बरे श्रम घेतो असें दैववशात् म्हणतील आणि आपण शिकवावें येक आणि परीक्षकांनीं विचारावें दुसरेंच असें झाल्यानें मुलांच्याच तोंडून उत्तरें आलीं नाहींत म्हणजे आम्हीं किती जरी श्रम घेतले असले तरी ते व्यर्थ होऊन 'काय बरें! पंतोजी मेहनत घेऊन शिकवीत नाहींत' इत्यादि इनाम मिळालें म्हणजे मरण येईल तर बरें असें वाटतें. सबब शेळीचे कान गोसाव्याच्या स्वाधीन अशी चाकरी करूं लागल्यास हें विसावें वर्ष. म्हणून या चाकरीचा फारच कंटाळा आला आहे. १९ वर्षांत ३॥ महिने रजा घेतली होती." या कहाणीची फलश्रुति खालील स्वकृत श्लोकांत वर्णन करून पत्र पुरें केलेलें आहे.

**सरित् सरसि कंचन द्विजजनं प्रवाहागतम् ।**
**तदुद्धृतिचिकीर्षया निजसुतानयं शिक्षयेत् ॥**
**इमानिति धिया नरान् द्विजवरो विदित्वा तदा ।**
**वरं जनजाशिक्षणान्मरणमेव सोऽमंस्तह ॥ १ ॥**

गरीब, श्रीमंत व वजनदार अशा पुष्कळ लोकांशीं रावसाहेबांनीं संभाषण केलें त्यांत लोकमत असें आढळून आलें कीं, "आपसांत" केलेल्या ठरावानें वर्गणी जमविण्याचें काम लोकांना त्यांचें त्यांनांच

अशक्य वाटतें. जमिनीवरचा जसा कर तसाच शिक्षणाचा कर अल्पसा जमिनीच्या कराबरोबरच वसूल करावयाचा असा ठराव केल्यास नियामित पैसा नियमित काळीं जमेल.

गांवोगांव शाळांची स्थापना व त्यांबरोबर प्रतिष्ठित लोकांची शिक्षणावर देखरेख ठेवणाऱ्या स्कूल कमिट्यांची रचना व स्थापलेल्या शाळांची तपासणी, शाळांच्या खर्चाकरितां व इमारतींकरितां वर्गणी जमविणें इ० कामाकरितां रावसाहेबानीं फार परिश्रम केले. त्यांनीं १८५७–५८ सालीं खुष्कीनें ८३७, जळमार्गानें २९६, व रेलवेनें १६८० मैल प्रवास केला. ते म्हणत " माझ्याकडे सोंपविलेल्या माझ्या लोकांची नैतिक व बौद्धिक स्थिति मी जर अल्पांशानें सुधारूं शकेन तर मी आपणास धन्य मानीन." अलिबागेस एका सभेंत रावसाहेबांनीं बरीच वाटाघाट केली. सभेला मुनसब, मामलेदार हजर होते. लोकांचे मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. त्या प्रसंगाचें वर्णन करतांना रावसाहेबांनीं असें लिहून ठेवलें आहे. "मी दगडांजवळ बोलत होतों असें मला वाटलें." "रोह्यांचे* मेंधळे व अलिबागचे आंग्रे इत्यादि लोकांशीं वादविवाद करतांना माझें सर्व वक्तृत्व वृथा झालें. पोलाद पुरास गेलों, लोकांची सभा भरविली. शाळा मागून घेण्याविषयीं उपदेश केला. शिक्षणाचें महत्व या विषयावर भाषण केलें. मुलां बाळांना शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांच्यावर नीति दृष्ट्या कशी आहे तें सांगितलें. सभेंत बरेचसे वाणी होते. सर्व बोलणें वांया गेलें" ( ८।१।१८५६ची रोजनिशी. ) लोकांची मनें वळवून शाळेच्या खर्चाकरतां पैसे जमविणें कठीण आहे. एक वाईट मनुष्य सर्वांचा बिघाड करतो. एक कृष्णवर्ण मेंढी सर्व कळपाचा बेरंग करते असें त्यांस कोठें कोठें आढळलें. कधीं कधीं शाळास्थापनेच्या आड सामाजिक समजुती

* तथापि अण्णासाहेब मेहेंदळे यांनीं द्रव्य द्यावयाचें कबूल केलें तें खातरकेवास्ते असावें असें रावसाहेबांस वाटलें.

येत. शाळा भरावयास स्वतंत्र इमारत नसल्यामुळें एकाद्या धनिकाच्या पडवींत ती भरावी लागे. तींत जर साहेब इन्स्पेक्टर तपासणीकरतां शिरले तर आम्हांस पतकरणार नाहीं असें गुळसुंदें येथील ग्रामस्थांनीं रावसाहेबांस कळविलें. ही अट इन्स्पेक्टर साहेबांस सहजींच मान्य झाली नाहीं. “ खानिवली येथें २ सुवर्णकार, १ कासार, १ लोहार, व तेथील देशमुख एक मराठा गृहस्थ, एवढेच काय ते ज्ञानी व संभावित लोकांपैकीं होते. रामराव देशमुख हे सज्जन होते. त्यांस ४ मुलगे होते. मोठा मुलगा बळवंतराव पुढें चांगला निघेल अशा लक्षणांचा होता. शिकण्याकरतां या मुलास कोठें तरी ठेवा असें मी म्हटलें. देशमुख म्हणाले ‘ माझ्यापासून दूर करावयास मी कबूल नाहीं. ’ इतरांनीं त्यांची वाहवा कली.” ( १।३।१८५६ ची रोजनिशी). कित्येक ठिकाणीं गांवठी शाळा सरकारी लोकांनीं पाहून जाव्या या कल्पनेबरोबर पंतोजी कपाळाला आंठ्या चढवीत. तथापि उमेद न सोडतां शाळा स्थापन करण्याची ही चळवळ रावसाहेबांनीं अगदीं खेड्यापाड्यांत नेऊन पोंचविली होती. त्यांनीं डॉ. हार्कनेस यांस कळविलें होतें कीं रायगड व राजपुरी तालुक्यांत ४ शाळा स्थापाव्या अशी सुचना मीं करणार आहें. गोरेगांव व निझामपूर येथील लोकांकडून अर्ज येऊं लागले आहेत. मालाड, गोराई व जूं या खेड्यांतून अर्ज भराभर आले. तळें घोसाळ्यांस लोक जमा झाले. परंतु सरकारी अटी त्यांस पसंत पडतना. प्रसिद्ध बंडखोर राघोजी भंग्या याच्या जातीचे जंगलांत रहाणारे कोळी, ठाकूर, ज्यांस पुष्कळ लोक जादू टोणा करणारे समजत ते, व शिकारीवर निर्वाह करणारे कातकरी यांसही शिक्षण कसें देतां येईल याविषयीं रावसाहेब विचार करीत असत. या कामाकरतां पनवेल तालुक्यांत फिरत असतां एके ठिकाणच्या सभेची हकीकत त्यांनीं इंग्रजींत लिहून ठेविली आहे ती फार मनोरंजक आहे.

"मी १६।५।१८५६ रोजीं रा. रा. कृष्णाजी बाबाजी भावे, साई पेट्याचे महालकरी यांच्या विनंतीवरून रावें नामक खेड्यांत शिरलों. येथील रहिवाशी आग्री जातीचे लोक जंगलांत वसति करणाऱ्या त्यांच्या कोळी जातीच्या बांधवांप्रमाणें सुधारणा व तिचे संस्कार यां पासून दूर होते. गांवांत १५२ झोंपड्यांत सुमारें ६६० माणसें रहात होतीं. हे सर्व एका वेळीं फार दिवसांपासून मदिरेचे भक्त बनलेले होते असें त्यांच्याच सांगण्यांत आलें. 'थोड्या दिवसांपूर्वी आह्मीं अगदीं पक्के दारूबाज बनलेले होतों. खिशांत असलेली पैन् पै खर्च होई तों दारू पिण्यानें कित्येकांस उपास काढावे लागत.' दरमहा दरघरीं कमींत कमी एक रुपया दारूपायीं खर्च धरिला तरी या गांवीं वर्षास १८२४ रुपये खर्च होत. यामुळें या गरीब लोकांचे जे हाल होत त्यांस पारावार नसे. परंतु मशारनिल्हे महालकरी या गावांत आल्याबरोबर दारूच्या मक्तेवाल्यांच्या लबाड्या उघडकीस आणून त्यांस दंड करूं लागले, व समाज जमे तेथें या अज्ञान लोकांस, वेळोवेळीं उपदेश करून हाडीं मासीं खिळलेलें हें व्यसन त्यांनीं सतत प्रयत्नानें त्या लोकांस अजीबात सोडावयास लावलें! त्यांच्याकरितां केलेल्या स्तुत्य अविश्रांत श्रमाबद्दल त्या महोत्साह महालकऱ्याला सारा गांव दुवा देऊन कृतज्ञापूर्वक त्याचे गूण माझेजवळ गाऊं लागला. आपण आरंभलेल्या कृत्याची पूर्तता करण्याकरितां व मद्यपानाची अजीबात बंदी झाल्यापासून होणाऱ्या सुधारणेला चिरस्थायित्व आणण्याकरितां कृष्णराव मला घेऊन आपल्या नेहमींच्या परिचित स्थानीं ह्मणजे जेथें त्यांचे उद्योग सतत चालू असत व जेथें उभें राहून मदिरापान व त्याचे दुष्परिणाम यावर इतका गुणकारक उपदेश ते करीत आले तेथें प्राप्त झाले व शिक्षणाचे फायदे काय आहेत ते त्यांस समजून सांगून 'शाळा मागून घ्या' अशी विनंति त्यांनीं केली मात्र तों आपल्या हितकर्त्यानें केलेली विनंति त्या गांवढे-

कऱ्यांनीं फार खुषीनें मान्य केली. व नेहमींचे अटीवर शाळेच्या स्थापने-प्रीत्यर्थ माझेकडे अर्ज आणून दिला. हें सर्व त्या महालकऱ्यांचे उद्योगाचें फळ होय. यांच्या सारखी कृति करण्याची नुसती इच्छा असणारे लोक माझ्या जिल्ह्यांत फार कमी व कृति करूं शकणारे तर नाहींतच" १५।५।१८५६ च्या रोजनिशींत पुढील उतारा सांपडतो. "कृष्णाजी भावे यांची गणना गर्विष्ठ, उद्धट व आगन्तुक कारणानें भाग्योदय पावलेल्या माणसांत लोक करतात परंतु ते माझ्या पाहण्यांत आलेल्या उत्तम माणसांपैकीं आहेत. वर्तनानें सभ्य, मनानें मोकळे व वाचेचे निष्कपटी असून त्यांची मुद्रा गर्वानें लिप्त झालेलीं मुळींच दिसत नाहीं. आंग मेहनत फार घेतात. प्रामाणिक आहेत. व लांचलुचपतीस केव्हांही वश होत नाहीं. सरकारावर त्यांची निष्ठा पूर्ण आहे. स्वतां जास्त शिकण्याची व त्याचप्रमाणें आमच्या लोकांत शिक्षणाची वृद्धि करण्याची इच्छा करतात. साई भागांत मदिराप्रसाराच्या विरुद्ध त्यांना युद्ध चालविलें आहे. ईश्वर त्यांना या कामीं यश देवो. असला मनुष्य माझा मित्र व्हावा अशी मी इच्छा करतों." याप्रमाणें यांची मैत्री जडून ती आमरणांत होती.

रावसाहेबांची शिस्त फार कडक असे. ती पाहून सर अर्स्किन यांनीं त्यांस असें पत्र लिहिलें:-"गैरशिस्त रीतीच्या वर्तनांवर्तनांत फरक असतो, तो निवडण्यांत पुष्कळ काळजी घेतली पाहिजे. एखादे वेळेस गोंधळून गेल्यामुळें, भीतीनें गांगरल्यानें अथवा उपजत मूर्खपणामुळें ह्मणा एखाद्याच्या हातून गैर शिस्त वर्तन झालें तर तें निराळें व जाणून बुजून बुध्या सदोष असें वर्तन केलेलें निराळें." काम करण्यास नालायक, निष्काळजी, केलेला हुकूम मुद्दाम मोडणारे यांस एकवार सावध करूनही वर्तणूक न सुधारणारे अशा मास्तरांचें शासन रावसाहेब करीत असत. कोणास पेनशन देण्याची शिफारस करीत. कोणास कमी पगारावर घाल-

वीत. कांहीं होत नसूनही आजारी ह्मणून खोटा रिपोर्ट करून गैर हजर राहण्याऱ्या एका मास्तरास शाळाखात्यास लाज आणणारें वर्तन करणारा ह्मणून बडतर्फ करावा असें वरिष्ठांकडे लिहून पाठवतांना रावसाहेब ह्मणाले “अशांना पुन्हां पुन्हां सुधारतो का पहा असें ह्मणून नोकरीवर ठेवणें हा सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करणें होय.” त्यांना सर्वांत चीढ आळशी व गचाळ मास्तरांची येई. “××ठिकाणच्या शाळेवरील असिस्टंट मास्तर अगदीं निरुपयोगी आहे. भाराभर चुक्या करतो. कांहीं माहिती मागविली व यानें देण्यास उशीर केला नाहीं असें कधींच होत नाहीं व अशाबद्दल जाब मागितल्यास ‘मी आतां वृद्ध झालों’ अशी सबब सांगत तेव्हांच पुढें येतो व सहस्रशः माफी मागतो, असल्या मूर्खांनीं माझें काम भागावयाचें नाहीं.” तथापि लोक आपल्या विरुद्ध कांहीं तरी तक्रार करतील कीं काय अशी शंका घेऊन कोणी एक पंतोजी विचारल्याशिवाय आपलें म्हणणें सांगूं लागला तेव्हां “तुमच्यावर आरोप ठेविल्याशिवाय तुह्मीं समारोप कसला करितां” असें त्यास विचारून रावसाहेबांनीं वाटेला लाविलें.

रावसाहेबांकडे एकदां पनवेलच्या एका पंतोजीचें प्रकरण आलें होतें. त्या सर्वांचा त्यांनीं विचार करून त्याची कांहीं चूक नाहीं असें ठरविलें. हा सगळा पत्रव्यवहार त्यांच्याकडे नेहमीं येणाऱ्या एका मित्रास वाचावयास मिळाला. तेव्हां त्यानें सखाराम बापू दातार यांजवळ सांगितलें कीं माझ्यामुळें पनवेलचा पंतोजी वांचला. तें ऐकून रावसाहेब म्हणाले. “दुसऱ्या कोणाच्या शिफारशीवरून एखाद्याविषयीं मी जें असत्य आहे तें कसें लिहीन अथवा बोलेन! मला आतां जास्त सावध राहिलें पाहिजे व या मित्राच्या वर्तणुकीवरून धडा शिकला पाहिजे.” (१।१२।१८५५ रो. ई.)

रावसाहेबांच्या कामाच्या खोलींत त्या तारखेपासून कोणालाही, प्रत्यक्ष पत्नीलाही, येण्याची बंदी झाली. असत्य वर्तन रावसाहेबांस खपत नसे.

" संध्याकाळीं बाळाजीपंत अण्णा लिमये खात्यांतील हाताखालील लोकांशीं असलेल्या माझ्या वर्तनाबद्दल माझ्यावर रागावले. कोणता प्रसंग असें विचारतां म्हणाले. पुढच्या मुक्कामावर माझी डांक पाठवूं नको असें बजाविलें असतां शिपायानें डांक पुढें पाठविली व विचारतां तसें केलें नाहीं म्हणाला. असें खोटें बोलल्याबद्दल मी त्यास बडतर्फ केलें. इतकी असत्यता चालूं दिल्यावर जगांत सुरक्षितता राहणार नाहीं " ( १०।२।१८५६ ची रोजनिशी )

मुलांवर रावसाहेबांचें प्रेम असे. त्यांतून हुशार व हजरजबाबी मुलांवर विशेषच. कल्याणास मुक्काम असतां तेथील शाळा तपासण्यास रावसाहेब गेले. वर्गामध्यें धड्यांचें वाचन घेऊन एका मुलास " नागवणें " या शब्दाचा अर्थ रावसाहेबांनीं विचारिला. पुष्कळ मुलांस वेळेवर अर्थ सुचला नाहीं. क्रमानें सर्वांस विचारीत असतां एका लहानशा बटूनें आपली लंगोटी सोडून ती पुढें हातांत धरून सांगितलें " हें पहा नागवणें ! " त्याबरोबर वर्गावरील पंतोजी चपापले. पण रावसाहेबांनीं त्याच्या धीटपणाची व हजरजबाबी बुद्धीची तारीफ करून भविष्य करून ठेविलें कीं तूं पुढें प्रसिद्धीस आल्याशिवाय राहणार नाहींस. हा बटु व नागपूरचे प्रसिद्ध वकील गोरक्षणसभेचे अध्यक्ष कै० गोपाळराव भिडे हे एकच*. पंतोजी कसें शिकवितो तें रावसाहेब पहात बसत व कित्येकवेळां शिकवावें कसें तें स्वतां पंतोजीस शिकवून दाखवीत.

कांहीं दिवसांनीं रावसाहेबांचा कामासंबंधीं बेत चांगला बसला असावा. निळकंठराव नांवाच्या एका स्नेह्यानें ८ जून १८५६ च्या पत्रांत असें लिहिलें कीं बेळगांव प्रांतांतील लोक उदार व धानिक आहेत. + + + + विद्याखात्यांत रा. नारो विष्णु बापट यांच्या सारखे शिकवि-

* ही गोष्ट कै० गोपाळराव भिडे यांनीं प्रस्तुत लेखकास महाबळेश्वरीं एका भेटीच्या प्रसंगीं मोठ्या प्रेमानें सांगितली.

ण्याच्या कामांत मदतगार आहेत. मि. रॉबर्टसन सारख्या वरिष्ठांना लोककल्याणाची आस्था आहे तथापि शिक्षणाप्रीत्यर्थ आम्हीं केलेली कामगिरी तुम्हीं आपल्या निष्कांचन मुलखांत केलेल्या कामागिरीच्या पासंगासही लागणार नाहीं व याच मानानें पहातां इतर जिल्ह्यांतील व्हिजिटरांपेक्षां तुमचेच श्रम सर्वांत अधिक यशस्वी झाले असले पाहिजेत.

*रा. गोविंद नारायण यांनीं खालीलप्रमाणें प्रशंसापर उद्गार एका पत्रांत काढले आहेत. " या प्रांतांत तुम्हीं शिक्षणाचे कामांत दाखविलेलीं मनाची कळकळ व उत्साह हीं सर्वांच्या स्तुतीस पात्र आहेत. आपल्या इतके परिश्रम लोकहितार्थ करणारे फारच विरळा. + + + + + आपल्या-सारखा सामर्थ्यवान व दयाळु व्हिजिटर मिळणें हें येथील लोकांच्या दैवांत आहे खरें पण तसेंच तुमच्या योग्यतेची किंमत कळण्याइतकी अक्कल अंगीं असणें त्यांच्या दैवांत असलें पाहिजे. "

नारायण भाई दांडेकर, रावसाहेबांचे सहाध्यायी हेही रावसाहेबां-प्रमाणेंच अन्यत्र व्हिजिटर होते. ते २९-८-१८५६ च्या एका पत्रांत लिहितात. " आमच्या गावांत शाळा स्थापन करा अशी मागणी करतांना ग्रामस्थ लोक जी लेखी हमी देतात तिचा आपण एक उत्कृष्ठ नमुना योजिला आहे. व मी असें ऐकतों कीं तो इतका चांगला ठरला आहे कीं हमी देणारे लोक फारच थोड्या प्रसंगीं ती मोडतात. म्हणून तो नमुना कसा काय आहे तो पाहण्यास त्याची नक्कल पाठवा. "

रावसाहेबांची कामगिरी जशी लोकांस तशी सरकारासही मान्य झाली. १९-८-१८५६ तारखेपासून त्यांस ठाणें जिल्ह्याच्या शाळां-शिवाय मुंबई शहराच्या शाळांचे व्हिजिटर नेमलें.

इंग्रज सरकारची प्रथमची शिक्षणविषयक कामगिरी थोडक्यांत वर्णन करावयाची ह्मणजे इंग्रज सरकारानें शिक्षण संस्था संघटित स्वरूपाच्या

* हे मुंबईंतील माडगांवकर घराण्यांतील जे या नांवाचे गृहस्थ होऊन गेले ते असावेत.

निर्माण केल्या. शाळांत अमूक एक इयत्तांपर्यंत शिक्षण द्यावयाचें असें ठरवून प्रत्येक इयत्तेंतील अभ्यासक्रम निश्चित करून दिला. व विद्वान लोकांकडून क्रमिक पुस्तकें लिहविलीं. व तीं छापवून लोकांचे हातीं जितकीं स्वस्त देववतील तितकीं दिलीं. हें सर्व रचनात्मक कार्य **रावसाहेब मंडलिक, भास्कर दामोदर पाळंदे, नारायणभाई दांडेकर, प्रो. केरो लक्ष्मण छत्रे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर** इ. बुद्धिमान लोकांकडून करून घेतलें.

प्रवास करीत असतां **रावसाहेबांस** धर्मशाळेंत किंवा एकाद्या देवालयांत उतरावें लागे, तथापि त्यांस तंबूंत राहणें आवडे व या त्यांच्या आवडीची निवड त्यांच्या रत्नागिरी येथील गुरुजींस ह्मणजे **राम बाळकृष्ण** यांस फारच पसंत पडली. ते २१-१-१८५६ च्या पत्रांत ह्मणतात "प्रवासाचे कामांत तुम्हीं तंबूची योजना केलीत तीहून अधिक चांगली योजना तुह्मांला करितां येणार नाहीं. मानी मनुष्यास तंबूशिवाय प्रवास करणें व्हावयाचें नाहीं. एकाद्या मोठ्या खेड्यांत अथवा लहान नगरांत जाणें होतांच जो भेटेल त्या वाईट बऱ्या लोकांपुढें 'आह्मांस जरा थोड्याबहुत सोईची जागा उतरावयास द्या' असें ह्मणून तोंड वेंगाडावें लागतें व आपण सरकारी अधिकारी पडलों ह्मणून पुष्कळ लोकांना मनांत असो अथवा नसो वेडीवांकडी सोय भिडेस्तव करावी लागते. त्यांच्याकडून हें काम खऱ्या प्रेमानें किंवा पैशानें होत नाहीं. जर पतकरत असेल तर गरज ह्मणून गांवाच्या शेवटी बाहेर एखाद्या देवालयांत उतरावें लागतें. अथवा धर्मशाळेचा आश्रय घ्यावा लागतो व कोणी सांगावें या शेवटल्या ठिकाणांत आपण उतरण्यापूर्वींच दुष्ट रोगानें पिडलेले, मलिन व अशुद्ध लोक, नुकतेच राहून गेले नाहींत ह्मणून !"

प्रवास करणें तो बहुधा घोड्यावर बसून **रावसाहेब** करीत. कधींकधीं रस्ता चांगला असल्यास घोड्याच्या बगींत करीत. **पनवेलीहून** येतांना

एकदां घोड्याचा पाय सरला व तो जमिनीवर पडला त्यावेळीं बगीला धक्का बसला त्यासरसे रावसाहेबही खालीं पडले. जरा गळ्याखालीं इजा झाली होती. कित्येक वेळां ते होडीनें प्रवास करीत. एकदां बेलापुराहून येतांना होडींत बसते वेळीं बरोबरचें सामान येण्यास उशीर झाला; होडी तशीच हांकारावी लागली. वाटेंत भूक लागली. उळव्यास होडी लागली. तेथें फराळाचें सामान, केळीं अथवा खजूर यापैकीं कांहीं मिळालें नाहीं. पुढें ओहटी लागल्यामुळें चौकींत उपाशीं निजून रहावें लागलें. अशीच एक रात्र सामान वेळेवर न आल्यामुळें पाचड मुक्कामीं दूध विकत घेऊन तेवढेंच पिऊन रहावें लागलें. प्रवासांत रावसाहेब बरोबरीच्या भारवाहक मंडळीच्या सुखाकडे पहात असत, त्याचें उदाहरण खालीं दिलें आहे.

"मुंबईस मग संध्याकाळीं ३॥ वाजतां घोड्यावर बसून मालाडाजवळ किंचवळीच्या धर्मशाळेंत आलों. तेथें फराळ करून बरोबरच्या मनुष्यांनीं आराम केल्यावर त्यांच्या खुषीनें हळूहळू घोडबंदरास ११ वाजतां येऊन नाना शंकरशेट यांच्या बंगल्यांत येऊन निजलों." (७।११।१८५८ रो.उ.) कधींकधीं प्रवासाचे सोई करितां पहांटेस ३ वाजतां उठावें लागे व तसे उठून स्नानसंध्या करून प्रवासास आरंभ करीत. पण कित्येक ठिकाणीं इक्षुरसाचा लाभ घडत असे व संध्याकाळच्यावेळीं प्रवास केल्यास कल्याणाच्या खाडीवरील झुळझुळ वाहणारा वारा सुखावह होई. रावसाहेब घोड्यावर बसून प्रवास करतेवेळीं घोड्यास जरा दुःखापत झाली तर भाऊ दाजींकडे औषधोपायास पाठवीत. कधीं कधीं पशुवैद्य स्टिफन्स यांच्याकडे पाठवावयास सांगत. व्हिजिटर असतांना रावसाहेब पुष्कळ फिरत असत. तेव्हां फिरतां फिरतां वाटेंत जीं दर्शनीय स्थलें लागत, उदाहरणार्थ वसईचा किल्ला व त्या बाजूला असलेले साखर शुद्ध करण्याचे कारखाने व वज्रेश्वरी येथील ऊन पाण्याचीं कुण्डें, तीं पहावयास जात. पण आपलें काम टाकून प्रसिद्ध स्थळ पहावयास ते केव्हांही वाटेच्या आड गेले नाहींत.

असें एका अपवादानें म्हणतां येईल. तो अपवाद म्हणजे त्यांचें रायगडास जाणें होय. " मी कुतूहलानें रायगडाचे दर्शनास गेलों. माझ्या भागांतील डोंगराळ प्रदेशांतून जाऊन येऊन २० मैलांचा प्रवास करण्याच्या श्रमाचें रायगडावर जेवढें मी पाहिलें तेवढ्यानें चीज झालें. सिंहासनाचा भाग, उध्वस्त मनोरे, शून्य दुर्निर्गम वाटा इ. पाहून कोणत्या हिंदूचें किंवा मराठ्याचें हृदय ऐश्वर्यमाहात्म्यानें भरून जाणार नाहीं !" (ज. जेकब यांस पत्र ) पुढें रायगडच्या दरवाजावरील संस्कृत श्लोक त्यांनीं १३।१।१८५६ रोजीं रोजनिशींत पेणसिलीनें उतरून ठेवला आहे. तो अस्पष्ट आहे, लागला तसा खालीं दिला आहे.

श्रीगणपतयेनमः

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंददोनुज्ञयं[1]।
श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः[2] ॥
शाके षण्णवबाणभूमि[3]गलेनादानंदसंवत्सरे।
ज्योतीराजमहर्त्र्यकेतिमहिते[4] शुक्लेशसापौतिथौ[5] ॥ १ ॥
वापीकूपतडागराजिरुचिरे हर्म्यैर्वनैर्वीथिका-।
स्तंभैः कुंभिगृहैर्नरेन्द्रसदनैरभ्रंलिहैर्महिते ॥
श्रीमद्रायगिरौ गिराभविषये हाराजिता[6] निर्मितो।
यावच्चंद्रदिवाकरौ विलसतः स्तावद् समुज्जृंभतो[7] ॥ २ ॥

---

१ हा शब्द अनुज्ञया असावा. २ हा शब्द अदमासानें ग्रंथकारानें लाविलेला आहे. ३ हीं पांच अक्षरें भूमिगणना असावीं. ४ हा समास महर्तुकेऽति असा असावा. ५ हीं तीन अक्षरें शुक्ले च अशीं असावीं. ६ हा शब्द 'हीराजिना' अशी तृतीया असावी. हिराजी हे इंजिनियर असावेत. ७ शेवटलें अक्षर ताम् असें असावें. ह्मणजे शके १५९६ (इ. स. १६७४) सालीं आनंदनाम संवत्सरांत वैशाख महिन्यांत शुक्ल नवमी रोजीं एवं गुणविशिष्ट प्रासाद सिंहासनाधिष्ठित शिवनृपतीच्या अनुज्ञेनें हिराजीनें बांधून पूर्ण केला, तो यावच्चंद्रदिवाकरौ विराजमान होवो असा सुंदर अर्थ निघतो.

रायगडावरील इतर वस्तूंचें वर्णन दिलें आहे. त्यांत अंधारी खोली ( धान्य सांठविण्याचें कोठार ), महादरवाजा, गंगा तलाव ( ज्यांतील पाणी उत्कृष्ठ आहे ). इंग्रजांच्या सैन्यापैकीं जीवन्त राहिलेल्या युद्धजर्जरित ३ शिपाई व १ नाईक यांच्या झोंपड्या, हत्तीखाना, शिरकाबाईचें देऊळ, बाजार, किल्ल्यांतील व्यापारी नागाप्पा व त्याचें स्मारक म्हणून एका दगडावर कोरलेला ३ फूट लांब व ५ फूट रुंद व ९२ (काय तें लागत नाहीं. ) असलेलें कोरींव चित्र ×, महादेवाचें देवळ ( ज्याचा गाभारा रावसाहेबांनीं दर्शन घेतलें तेव्हां पाण्यानें भरून गेला होता ), शिवरायाच्या सिंहासनाची जागा, राजवाड्याचा पाया, राणीमहाल तोफा डागण्याचा दारूखाना, पालखीदरवाजा, मनोरे, सप्तमहाल, हिरकणीची टेंकडी ( जीवरून हिरकणी नामक गवळण रतिबाचें दूध घेऊन आल्यावर किल्याचें द्वार रात्र होतांच बंद झालें म्हणून आंत अडकून गेल्यामुळें मुलास पाजण्याकरितां खालीं उडी घेऊन किल्ल्यांतून निसटली, व ज्या ठिकाणीं मनोरा बांधून तिचें स्मारक केलेलें आहे ती ) इत्यादि प्रसिद्ध भागांचें वर्णन आहे.

व्हिजिटर असतांना रावसाहेबांच्या हातांत कल्याण करण्याची सत्ता असल्यामुळें पुष्कळ लहान मोठ्या लोकांकडून विनंतिपत्रें येत. "अमक्या साहेबास सांगून मला तमुक जागा देण्यास सांगा. फलाण्या ठिकाणीं माझी बदली करवा. माझ्याविषयीं ×× साहेबाजवळ बोललां असालच" इत्यादि मजकुरांच्या पत्रांचा रावसाहेबांकडे भारा येऊन पडे. "माझ्या हातांत काय आहे" असें ह्मणतील तर त्यांतच "कोऽतिभारः समर्थानाम् " असें उत्तर असे. कांहीं वयानें मोठे व थोडेसे विद्वान अशा लोकांच्या पत्राचे शेवटीं "सुतेषु विस्तरेण अलमिति विनतयः समुल्लसन्तु " अशी सन्मानार्थ विज्ञप्ति आढळते. "कल्पवृक्षाखालीं फलप्राप्तीविषयीं इच्छा धरून बसण्याची पूर्णता

× नागाचें रोजनिशींत एक चित्र रेखिलेलें आहे.

करणें समर्थांकडे आहे " असें एखादा मनुष्य सरळ लिही. कित्येक नातीं उकरून काढीत त्यांत एक रावसाहेबांचे मावसभाऊ निघाले. फल्टनहून रामचंद्र नारायण भावे ( एक तेथील शाळेंतील मास्तर ) लिहितात " आम्हीं आपले सख्खे मावस भाऊ. आईचें नांव वज्रचुडे मंडित ब्रहिणाबाई भावी. " चुकीबद्दल रावसाहेबानीं रिपोर्ट केला तर नुकसान होईल ह्मणून एकानें एका स्नेहयाच्या मध्यस्थीनें प्रसिद्ध केरुनाना छत्रे व कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचेकडे धांव मारून " हा खुळा आहे यास माफी करावी " अशीं पत्रें आणविलीं होतीं. योग्यता पाहून कोणाही मनुष्याचें काम हातीं असल्यास तें करण्याची रावसाहेबांना हौस असे. व तें करीत असतां आपलाच एकादा गृहस्थ आड आला तर त्यांस वाईट वाटे. त्यांनीं प्रो. केरोपंत यांस एका पत्रांत असें लिहिलें होतें " उत्तम पदारूढ होऊन जर लोक मला साहाय्य करणार नाहींत तर ते व त्यांचा देश हीं दोघेंही करुणास्पद होत एवढें मला म्हणतां येईल. या वाक्याच्या कडकपणाबद्दल माफी असावी. मनोविकार प्रबल झाल्यावर तीक्ष्ण शब्द वापरावे लागतात ". मोठ्या वशील्यानें रावसाहेबांच्या दृष्टीनें लायकी येत नसे.

" नेटिव्ह जनरल लायब्ररींत नाना गानू भेटले. मोकळेपणें बोलले नाहींत. आंठी धरून होते. कां तें पूर्णपणें मीं समजलों. अगदीं नालायक, आळशी व ( काय काय नाहीं? ) अशा त्यांच्या मेव्हण्याला मी नोकरी दिली नाहीं म्हणून " (१२।२।१८५६ ची. रो. )

दाजीबा म्हणाले " माझ्या मुलाला कारकुनीची जागा देण्यास मि. पीट यांस सांगा. यांचा मुलगा मूर्ख आहे हें मला ठाऊक आहे. त्याच्या सारख्याची शिफारस करून मला मूर्ख बनावयाचें नाहीं ".

ठाणें येथें असतांना रावसाहेबांस तेथील हवा कधीं कधीं मानत नसे. तेव्हां ते मुंबईस येऊन रहात. नानासाहेब मंडलिक त्यांस पाण्याविषयीं

नेहमीं खबरदारी घ्यावयास लिहीत. " ठाण्याची हवा प्रकृतीस न मानल्याकारणानें वाळुकेश्वरीं अथवा महालक्ष्मीस जाऊन राहण्याचें लिहिलेंत, त्यास जेथें शरीरास सुख तेथें जावें ××× हल्लीं पाणी कापांतील पीत असाल तर मना करून बागूलनाथाच्या विहिरीचें न्यावें" असें बजावीत. कराचीच्या उदाहरणावरून चिरंजीवांस घोडा पाडतो ही भीति नानासाहेबांची अजून गेली नव्हती. " म्याना ठेवावा " असें ते नेहमीं सांगत परंतु " नवा घोडा घेऊंद्या अथवा घरचा पाठवा " असें दोन वेळां रावसाहेबांनीं वडिलांस लिहिलें. तेव्हां त्यांनीं घोडा पाठविला व पत्र लिहिलें त्यांत निगा करून बाळगलेल्या जनावरावरील प्रेम फार व्यक्त होत आहे. " दोन्हीं पत्रांत घोडा पाठविणेविषयीं लिहिलेंत त्या प्रो घोडा व लक्ष्मण पायऱ्या व मणु खोत असे रवाना केले आहेत. गाडीस घोडा घालण्याचें मनांत आणोन लिहिलेंत; हें स्वतां आमचे बेतास न आल्यामुळें पाठविणार नव्हतों, परंतु पाठविला. आज घोडा बाळगला. त्यापासून सूख आपणांस जाहलें व त्याची जी शुश्रूषा ठेवली ती आतां योजना करतां त्यानें व्यर्थ जाणार ह्मणजे अदमासें ५।४ वर्षे फारतर घोडा सोबत देण्यासारखा आहे; तो गाडीला वर्ष दोन वर्षे उपयोग झाल्यास होईल. बाकी आयुष्य या मेहनतीनें सरेल ! "

व्हिजिटर असतांना फार फिरावें लागल्यामुळें होणाऱ्या दगदगीनें रावसाहेबांची प्रकृति नीट राहीना. तेव्हां ते अन्य ठिकाणीं किंवा एका जागेवरील स्थायिक नोकरी शोधूं लागले. वर्षांतून आठ आठ महिने इतस्ततः फिरावें लागे. रावसाहेबांच्या प्रवासांत जरा त्वरा विशेष असे, त्यामुळें त्यांस विसावा मिळत नसे. सतत फिरण्यानें " माझी मानसिक व शारीरिक सुधारणा होत नाहीं. " अशी त्यांची नड होती.

दुसरी नोकरी शोधली पाहिजे याविषयींची गोष्ट एकदां राम बाळ-

कृष्ण यांजवळ रावसाहेबांनीं काढली त्या प्रसंगाचें वर्णन रावसाहेबांनीं केलें आहे.

"मार्गी असतां मीं विचारसृष्टींत मग्न झालों. भाईची व माझी नुकतीच भेट झाली, तेव्हां ज्या ज्या गोष्टी निघाल्या त्या त्या सर्व माझ्या पुढें उभ्या राहिल्या. भाई ह्मणाले 'तुम्हीं अत्याशा करूं नका. कारण निराशा झाल्यास आशेएवढाच खेद उत्पन्न होईल.' आतां असा विचार करूंया. मला महिना शंभर रुपये मिळतात व ९० रुपये भत्ता मिळतो. तेंच दुसऱ्यांकडे पाहूं. त्यांची स्थिति माझ्या स्थितीहून वाईट आहे. मला इतस्ततः वर्षानुवर्ष हेलकावे खावे लागत आहेत. थोडीशी नजर चिरप्रवासी जनांकडे दिली पाहिजे. ते शास्त्राभ्यासाकरतां पृथ्वीचे पाठीवर सर्वतः हिंडत असतात, इंग्लंडाहून निघून कलोन्झ गांठतात, आस्ट्रेलिया देशांत जातात. 'पुढची आशा' त्यांस समाधानहेतु होते. बाकी त्यांची स्थिति माझ्या स्थितीहून वाईट आहे. मग मी चिंता कां करावी! कधीं करूं नये. मला जन्मास घालून पित्याप्रमाणें माझेवर दृष्टि ठेवून जो परमेश्वर माझें रक्षण करतो तोच मला पैल थडीला नेईल. त्याच्या दयाळूपणावर मला श्रद्धा ठेविली पाहिजे व ती श्रद्धा त्याचे गुणानुवाद गाऊन गाऊन निपजविली पाहिजे. मी आतां भाईनां लिहितों कीं होईल तें होवो माझी तयारी आहे." ( ११-२-१८५७ चा रो. इं० भा. ) यानंतर रावसाहेब ३।४ महिन्यांवर स्वस्थ बसले नाहींत. माझी पुढें कशी काय बढती होईल अशी त्यांनीं मि० हेन्स शाळा खात्यांतील इन्स्पेक्टर यांच्याजवळ गोष्ट काढिली. व एका ठिकाणीं राहून काम करण्याची नोकरी मागितली व ती देण्याचें मि. हेन्स यांनीं वचन दिलें.

१८५७च्या जुलै महिन्यांत रावसाहेबानीं धुळें जिल्ह्यांतील डेप्युटी-कलेक्टरच्या जागेकरतां डायरेक्टरांच्या परवानगीनें अर्ज केला होता. परवानगी देतांना मि. हावर्ड यांनीं खालीं दिल्याप्रमाणें पत्र लिहिलें.

पुणें १० जुलई १८५७.

प्रियकर महाराज,

कालच्या तारखेच्या तुमच्या पत्रास उत्तर लिहितांना विज्ञप्तिपूर्वक असें लिहितों कीं कोणत्याही प्रकारानें तुमची बढती होत असेल तर तिच्या आड येण्याची माझी इच्छा नाहीं व मला हक्क नाहीं. सोत्साह-व्यग्रता व नैपुण्य यांनीं स्मरणार्ह झालेल्या तुमच्या नोकरीस मी मुकणार ह्मणून मला वाईट वाटेल.

तुम्हांला जर धुळें येथील डेप्युटी कलेक्टरची जागा मिळाली तर तुमच्या स्वभावांत विनयशीलता व प्रेमळपणा हे गूण जे माझ्या अनुभवास आले तेच मि० मॅन्‌स्फिल्ड यांच्या अनुभवास येतील याबद्दल मला शंका नाहीं.

तुमच्या विषयीं पराकाष्ठेची शुभेच्छा धरणारा सानुराग

इ. हावर्ड.

डा. आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन,

विश्वनाथ नारायण यांस.

पण ही जागा रावसाहेबांना देण्यांत आली नाहीं. कारण काय ? तर रावसाहेब वयानें लहान !

रावसाहेबांचें वय या वेळेस सुमारें २४ वर्षांचें होतें. मित्राचे नात्यानें त्यांनीं ही गोष्ट मेजर जेकब यांस कळविली. “ डेप्युटी कलेक्टरच्या जागेचें काम करण्यास आतां मीं वयानें लहान म्हणून नालायक आहें. पण पुढें कदाचित् जागा मिळावयाची वेळ आली म्हणजे मी फार वृद्ध म्हणून नालायक होईन ! ” त्यावर त्यांनीं १७।१।१८५८ तारखेचें उत्तर पाठविलें “ तुम्हीं इतर सर्व प्रकारें डेप्युटी कलेक्टरच्या जागेला चांगले लायक आहांत तरी मला अद्यापि त्या जागेला तुम्हीं लहानच वाटतां. प्रौढ मनुष्याच्या हातीं दिलेल्या सत्तेचें वजन बहुजन समाजावर जसें पडतें तसें तरुणाच्या हातीं दिलेल्या सत्तेचें पडत नाहीं. ”

" ती जागा आपणास मिळावी हा तुमचा हेतु वाजवी आहे. तो लवकरच सफल होईल यांत मला संशय वाटत नाहीं. व ती जागा मिळाल्यावर आपली लायकीही सिद्ध कराल असा माझा गाढ विश्वास आहे." नंतर १४।५।१८५८ ला बोटीनें निघून मुरूडास जाऊन १८।५।१८५८ रोजीं रावसाहेब परत मुंबईस आले.

पुन्हां एकदां, मुलकी खात्यांत रावसाहेबांनीं जागा मिळविण्याची खटपट १८५७ च्या नोव्हेंबर महिन्यामध्यें केली होती त्या वेळेस मि. हेन्स् अॅ. एजुकेशनल इन्स्पेक्टर यांनीं प्रशंसापत्र देऊन ठेविलें आहे. त्यांत ते म्हणतात " मी शाळा खात्यांत इन्स्पेक्टर असतां मि. विश्वनाथ नारायण यांनीं आठ महिने माझ्या हाताखालीं काढिले त्या अवधींत जें काम त्यांचेवर पडलें तें करतांना त्यांनीं जी विलक्षण कार्यक्षमता दाखविली तिची साक्ष पटवून देण्यास मला फार आनंद होत आहे. बुद्धीची कुशाग्रता, उदार शिक्षण, उच्च नैतिक गुण, या गुणांस विनयशील अकृत्रिम स्वभावाची जोड मिळाल्यामुळें हे या शिक्षण खात्याइतक्याच लायकीच्या दुसऱ्या कोणत्याही कामावर गेले तरी ज्यांच्याशीं यांचा सहवास घडेल, त्यांच्या विश्वासास व आदरास पात्र होण्यावांचून हे राहणार नाहींत." रावसाहेबांच्या मनोदयाप्रमाणें त्यांस एके ठिकाणीं बसून काम करण्याची नोकरी मिळाली; ती वसई मुक्कामची मुनसफी होय.

" मी मि. अर्स्किन यांस भेटलों. त्यांनीं मुनसफीविषयीं विचारलें. त्यांस सांगितलें कीं जर नुकसान न होतां मिळेल तर करण्याची खुषी आहे. त्यांचा अभिप्राय पडला कीं जरी प्रथम नुकसान झालें तरी आपल्यास त्या खात्यांत जाणेंच तर काम थोडेंच असतें तेथें शिकणाऊस चांगलें आणि हुशारी समजल्यावर मग मोठी जागा देण्यास हरकत नाहीं. याचा विचार केला पाहिजे. आजपर्यंत झालें तें नीटच झालें. आतां ईश्वराची

प्रार्थना करून चांगली स्थिर बुद्धि मागून या कामाचा विचार केला पाहिजे. उगाच घाई कामाची नाहीं." ( २९।१८५७ ची रो. इं. )

व्हिजिटर असतांना रावसाहेबांना ज्ञान वाढवावयास वेळ मिळत नसे. तरी त्यांनीं तसले व्यवसाय सोडले नव्हते. एकदां ठाण्याचे पश्चिम बाजूला रानांत वनस्पतीचे शोधार्थ गेले होते. पण फार लाभ झाला नाहीं "वनस्पतिशास्त्र व भूगर्भशास्त्र यांत कांहीं शोध लावण्याची खटपट माझ्यानें होत नाहीं म्हणून वाईट वाटतें. पर्श्यन व संस्कृत यांची हेळसांड करून उपयोग नाहीं. शास्त्री ठेवावा असें मनांत आहे." ( १८।१२।१८५५ ची रोजनिशी )

पर्श्यनचा अभ्यास रावसाहेबांनीं सिंध मध्यें असतांना थोडेसा केला होता. आतां तो पुढें चालविण्याची अवश्यकता त्यांस वाटली कारण "पुढें मागें पर्श्यन शिक्षण ज्यांत दिलें जातें अशा शाळा ( माझा हुद्दाच तसा असल्यामुळें ) तपासाव्या लागतील. तेव्हां जी भाषा मला विशेष समजत नाहीं, त्या भाषेंत परिक्षा घेणें मला शोभणार नाहीं."

याप्रमाणें ते अमरकोश धातुरूपावली यांची संथा नारायण शास्त्री व विठ्ठलवाडींतील तुळसीबागकर पुराणिक यांजवळ घेत असत. त्यांच्याशीं वाचून निघण्टाची आवृत्ति पुरी करून शिक्षा, ज्योतिष व छंद यांची आवृत्ति रावसाहेबांनीं पुरी केली. भागवताचे श्लोक रोज ५ प्रमाणें वाचीत असत. याशिवाय त्यांचें इंग्रजी वाचन सुरू होतेंच. बेकन, स्पेक्टेटर, चेंबर्स मिस्सलेनी, गुरुत्वाकर्षण व त्याच तत्वावर बनविलेले खेळ, हिंदुस्थान व त्याचा कारभार, कीजकृत ईस्ट इन्डिया कंपनीचा कारभार, जेफ्रेजच्या निबंधांतील स्विफ्ट्, पेपीझ, फ्रेड्रिक धी ग्रेट यांच्या चरित्रांवरील निबंध, फ्रेंचराज्यक्रांति, शेरिडनचीं भाषणें इ. इ. पुस्तकें नेमानें रावसाहेब वाचीत असत. शिवाय जिऑग्रॉफिकल सोसायटीच्या व्याख्यानांस जात असत.

ग्रंथलेखनही चालूच होतें. "संवयी आणि अभ्यास" हें पुस्तक व्हिजिटर असतांच छापावयास दिलें व एल्फिनस्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर करावियाचें ठरविलें.

व्हिजिटरच्या कामाशिवाय रावसाहेबांस क्लासबुक कमिटीचे सभासद नेमलें होतें. या कमिटीचें काम निरनिराळ्या इयत्तांतून पुस्तकें कोणतीं नेमावयाचीं तें ठरविण्याचें होतें.

" क्लासबुक कमिटीची सभा डायरेक्टरच्या बंगल्यावर भरली होती. डाक्टर वुइलसन, डाक्टर हार्कनेस, मि. ग्लॅसगो, मि. हावर्ड, रा. गोविंद नारायणजी, रा. भास्कर दामोदर व मीं हजर होतों. पोंकळ गप्पांचा सुकाळ होता. शहाणपणाचीं मतें प्रतिपादनार्थ निघालीं होतीं. परंतु हातांत लेखणी घेऊन दौतींत बुडविली तेव्हां कागदावर लिहीण्यासारखें फार नाहीं असें आढळलें." ( १०।३।१८५७ ची रोजनिशी ). ज्या दिवशीं फिरतीवर जावयाचें नसे त्या दिवशीं रावसाहेब कांहीं तालीम करीत अथवा घोड्यावर बसून एक तास फिरून येत. गंजिफांनीं बापुसाहेब बिनीवाले आले असतां एकदांच खेळले होते.

या शिवाय सार्वजनिक कामांत लक्ष्य घालीत असत. ठाणें येथील लायब्ररीचा क्याटलाग करावयाचा होता त्याकरतां सर्व पुस्तकांचें वर्गीकरण त्यांनीं केलें.

पांडुरंग मोरेश्वर न्हावेरकर ठाण्याचे प्रिन्सिपल सदर अमीन यांनीं ४० वर्षें नोकरी केल्यावर पेनशन घेतलें ते समयीं लोकांनीं जाहीर सभेंत त्यांचा सन्मान केला. सरकारमार्फत यांस शाल अर्पण करण्यांत आली. इंग्रजी मानपत्र जज्ज्यांनीं वाचिलें व मराठी मानपत्र रावसाहेबांनीं वाचलें. दोन्ही मानपत्रांचे नमुने रावसाहेबांच्या हातचे आहेत. व दुसरे दिवशीं रावसाहेबांनीं त्यांस घरीं मेजवानी दिली. रावसाहेबांची व यांची दोस्ती आमरणान्त होती. पुढें रावसाहेब मुंबईस कायमचे रहावयास आल्यावर हे नियमानें त्यांस भेटावयास येत असत.

---

# प्रकरण ९ वें.

## १८५७ साल.

नंतर सुन्दररशना तत्स्त्री नेत्रांत आणुनी पाणी ।
बंदीकृत नगरांतिल हाल जनांचे निवेदिते राणी ॥ १ ॥
प्रथम नरांचें कर्तन, मागुन अग्नींत भस्म नगराचें ।
विस्तृतरशनांच्या मग नारींचें हरण तेंवि बालांचें ॥ २ ॥

( शत्रूनें वेढा दिलेल्या एका नगराचें होमरकृत वर्णनाचें भाषांतर. स्वकृत. )

हिंदुस्थानांत इतरत्र, विशेषत: उत्तर हिंदुस्थानांत बंडाचा वणवा पसरला असतां या प्रांतावर त्याची एक ठिणगी सुद्धां उडाली नव्हती व येथें शांतता किति होती हें मागील एका प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें साक्षरता प्रसाराचें काम किति सुरळीत रीतीनें चाललें होतें तें वाचून कळेल.

रत्नागिरी येथें एक शिपायांची तुकडी होती. तिची चर्या जरा बदललेली दिसल्यामुळें तिला निःशस्त्र करण्यांत आलें. त्या समारंभास गारुड्याच्या खेळ अगर तमाशा पाहण्यास जसे लोक जमतात तसे लोक पुष्कळ जमले होते. *

धुळें येथें सर्व लोकांनीं जमून अखिल हिंदुस्थान देशास भितीनें ग्रासून टाकणाऱ्या या शोकपर्यवसायी संकटाचें शमन व्हावें म्हणून सर्व शक्तिमान परमेश्वराची प्रार्थना केली. †

---

* महादेवराव बर्वे यांचे १६।८।१८५७ चें पत्र.

† नानासाहेब लिमये यांचें २।१०।१८५७ चें पत्र.

हें बंड लवकर मोडेल याबद्दल शंका नव्हती; परंतु शिक्षण वगैरे बाबींस बराच धोका येईल अशी कित्येकांस साहजिक धास्ती वाटत होती. मि. पीट*यांनीं ५।८।१८५७ तारखेचें रावसाहेबांस विलायतेहून पत्र लिहिलें होतें त्यांत ते ह्मणतात "++बंडखोर शिपायांच्या अमानुष क्रौर्याबद्दल माझ्या मनाला बसलेला धक्का अधिक आहे कीं त्यांच्या मूर्खपणाबद्दल वाटलेलें आश्चर्य अधिक आहे हें जरी मला खात्रीनें सांगतां येत नाहीं, तरी असें सांगतां येतें कीं इंग्रज शिपाई हें बंड लवकरच मोडतील. या बंडाचा प्रादुर्भाव आमच्या इलाख्यांत झाला नाहीं याबद्दल मला आनंद होत आहे; पण थोडी अशी भीति वाटते कीं आमच्या शिक्षणकार्याला कांहीं काल प्रतिबंध होईल." इ०

या पत्राला उत्तर ह्मणून खालील पत्र ९।९।१८५७ रोजीं रावसाहेबांनीं लिहिलें तें असें—"++ बंगाल सरकारच्या विरुद्ध शिपायांनीं बंड केल्यापासून प्रत्येकाला जबर धक्का बसला आहे. याचा प्रादुर्भाव कसा झाला याचीं कारणें मला अजून कळून आलीं नाहींत. कारण आमची तूर्त मदार वर्तमानपत्रांवर आहे व तीं तर कधीं कधीं अशा त्रोटक बातम्या पसरवितात कीं त्यांपासून कांहीं एक अनुमान मीं काढूं शकत नाहीं. तें कांहींही असो. हा मतिभ्रममूलक जो स्फोट झाला आहे तें एक आमच्या राष्ट्रावर मोठें अरिष्टच आलें आहे असें मानल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. हिंदुस्थानवासिजनांच्या प्रगतीला तेणेंकरून अनंतकालपर्यंत प्रतिबंध होणार अशी मला भीति पडली आहे. हृदयांत उद्वेग उत्पन्न करणारीं कृत्यें—जीं घडून आल्याची बातमी पसरली आहे तीं—रानटी पशूंचींच कृत्यें आहेत. असले प्राणी

* हे शिक्षण खात्यांत मोठे अम्मलदार होते व अध्यापकांचें काम कसें करावें याविषयीं इंग्लंडांतील प्रसिद्ध संस्थांतून यांना शिक्षण मिळालें होतें. यांच्या हाताखालीं रावसाहेब व्हिझिटर या नात्यानें ठाणें जिल्ह्यांत कामावर होते.

हिंदुस्थानांत अद्यापि कांहीं तरी असतील अशी माझी कल्पनाच नव्हती. याविषयीं माझ्यानें अधिक लिहवत नाहीं. वर्तमानपत्रांतून पुरेशी होऊन उरेल इतकी हकीकत तुम्हांला मिळेल.

मला वाटतें सर्वथा परिपूर्ण अशी राज्यव्यवस्था सर्व जगांत कोठेंही असूं शकणार नाहीं. तुमचें इंग्लंदच घ्याना ? पार्लमेन्ट सभेंत जो सारखा झगडा सुरू आहे तो असें सांगतो कीं मानवी संस्था त्या अखेर मानवीच ! स्वतंत्रतेचा गर्व वाहणारे असे जे अगदीं अग्रेसर अमेरिकन लोक त्यांचीं पुष्कळ विषयांवरील मतें अजून अपक्क आहेत. स्वतंत्रता, समता व विश्वबन्धुता हे जे मनुष्याचे तीन हक्क आहेत त्यांच्या विषयींच्या ज्या कल्पना या यान्की* लोकांच्या झालेल्या आहेत त्यांवर या संयुक्त संस्थानांत गुलामगिरीचें अस्तित्व× हें उत्तम टीका करीत आहे. नंतर आपण जगांतील ( माझ्या मताप्रमाणें ) तिसऱ्या राष्ट्राकडे म्हणजे फ्रेन्च राष्ट्राकडे वळूं. बादशहाची गर्दन उडवण्याकरतां वारंवार केलेले प्रयत्न काय दाखवतात ? दाखवतात कीं मानवी संस्था अपूर्णच आहेत.

जें स्तुतीला पात्र नाहीं त्याची स्तुति मी केव्हांही करणार नाहीं असें तुम्हांला माझ्या पुष्कळ परिचयामुळें ठाऊक आहेच. हिंदुस्थानांतील कंपनीच्या राज्याची शिफारस मीं किंवा दुसरा कोणीही संमजस माणूस ( असें मी तुमच्या परवानगीनें ह्मणतों ) अगदीं बिनशर्थ करूं शकणार नाहीं. तथापि मला वाटतें कीं तें प्रस्तुत परिस्थितीच्या मानानें उत्तम आहे त्यांत 'कंपनीच्या राज्यांत' सुधारणा करण्याची, चुका दुरुस्त करण्याची, पाहिजे असेल त्याला न्याय मिळेल असें करण्याची, इच्छा आहे असा

---

*हें अमेरिकन लोकांचें टोपणनांव आहे.

× १८७४ मध्यें शेवटलें युद्ध संयुक्त संस्थानांत आपआपसांत झालें, तेथपर्यंत गुलामगिरी तेथून नाहींशी झाली नव्हती.

माझा भरंवसा आहे. हल्लीं हल्लीं इंग्लद देशाशीं दळणवळण लवकर लवकर वाढल्यानें व रेलवेच्या प्रसारानें पुष्कळ प्रगति होण्याची आशा उत्पन्न झालेली होती. परंतु आतां या शिपायांच्या उन्मत्तावस्थोचित बंडामुळें आमची किति पिछेहाट होईल तें मला कळत नाहीं. ”

पुढें सर्व देशभर सामसूम झाल्यावर १–११–१८५८ रोजीं “ राणीचें राज्य झालें ये विषयीं जाहिरनामा वाचण्यांत येऊन त्यादिवशीं व दुसऱ्या दिवशीं सर्व सरकारी आफिसांस रजा मिळाली होती. पहिल्या दिवशीं सर्व गांवांत रोषनाई रयतेनें व सरकारनें केली. अशी रोषनाई मुंबईत आजपर्यंत कधींच झाली नाहीं. व पुढें होण्याची आशा नाहीं. हजारों रुपये खर्च करून लोकांनीं नाना तऱ्हेची आरास केली. दुसऱ्या दिवशीं मोठा दरबार भरला होता. व रात्रीं दारूकाम झालें. ”*

इंग्लंदमधील लोकांच्या हक्कांची सनद ह्मणजे मॅग्नाचार्टा आहे. त्याप्रमाणें १८५८ चा राणीसाहेबांचा जाहिरनामा हिंदुस्थानांतील लोकांच्या हक्कांची मोठी सनद आहे असें रावसाहेब ह्मणत. ( १९।१२।१८५८ चें जेकब यांस पत्र ) ही हक्काची सनद लार्ड स्टॅनले यांच्या सरस लेखणींतून उतरली आहे. व प्रजेच्या धर्मांत त्रयस्थ राहण्याविषयीं विश्वासवचन खुद्द राणीसाहेबांच्या सुचनेवरून घातलेलें आहे असें ह्मणतात.

वरील सनदेला जेकबसाहेब हिंदुस्थानांतील “ कोहिनूर ” ह्मणत, तें खरें आहे. या स्यमन्तक मण्यावर हिंदुस्थानची भामा फार फिदा होउन राहिली आहे.

---

* हरि बाळकृष्ण लिमये यांचीं १।१२ नोव्हेंबर १८५८ चीं पत्रें.

## प्रकरण १० वें.

# सौ० अन्नपूर्णाबाई मंडलिक.

पतिपत्नी एकमतें करुनी संसार नांदतात घरीं।
उत्कृष्ट वस्तु ही जगिं हीसम नच अन्य लभ्य, शोध करीं ॥
शत्रूंस खेद होतो मोद हितेच्छूंस तेविं मित्रांस।
आणि विशेषें कळतें त्यांचें त्यांनांच सौख्य दोघांस ॥ २ ॥

( होमरकृत आदेसी नामक काव्यांतील उताऱ्याचें भाषांतर. स्वकृत )

बिऱ्हाड करून स्त्रीसहवासांत राहण्याची संधि रावसाहेब कराचीस नोकरीवर गेले असतां एकदां अल्पकाळ आली होती. ती शिवाय स्वतंत्रपणें बिऱ्हाड करून मोकळेपणें स्त्री सुखाचा अनुभव घेण्यास ठाणें येथील नोकरी कायम होईतों दुसरी संधि मिळाली नाहीं, तों पर्यंत त्यांच्या वयाचीं २०।२१ वर्षें सरलीं. येथपर्यंत रावसाहेबांचें लक्ष पत्नीच्या शिक्षणाकडे नव्हतें असें नाहीं. मात्र आपल्या मातोश्रीमुळें पत्नीच्या शिक्षणास विरोध होतो असें रावसाहेबांस वाटत असल्याचें त्यांच्या रोजनिशींत सापडतें.

मंडलिक घराण्यांतील कांहीं स्त्रियांस लिहितां वाचतां येत असे त्याप्रमाणें रावसाहेबांच्या पत्नीसही येत असे, परंतु पति व पत्नी यांचा पत्रव्यवहार उघडपणें होण्यास त्यावेळची शिस्त आड येत असे. पत्नीच्या नांवावर घरीं पत्र पाठविण्यास चोरीच होती. सहानुभूति असणाऱ्या बाळमित्रा मार्फतच परस्परांस पत्रव्यवहार करावा लागे असें मोरो काशिनाथ यांच्या १९।९।१८५५ च्या पुढील पत्रावरून दिसतें. " आपले वामांगीनें

लिहिलेलें पत्र पाठविलें आहे. शुद्ध अशुद्ध करून पहावें. नूतन अभ्यास आहे."

१८५५ च्या आगष्ट महिन्यांत रावसाहेब कुलाबा जिल्ह्याचे व्हिजिटर असतां ठाणें मुक्कामीं बिऱ्हाड करून पत्नीस रोजगारावर आणलें होतें. घरांत वडील माणसें कोणी नव्हतीं. होतीं तीं, चिर परिचित नोकर माणसेंच होतीं. तेव्हां रावसाहेबांनीं आपल्या पत्नीस चांगलें वाचावयास लिहावयास व हिशोब ठेवणें वगैरे आवश्यक बाबींचें शिक्षण दिलें होतें. स्त्रीशिक्षणाविषयीं त्यांचें ध्येय उच्च होतें. "फॅमेली हेरल्ड मध्यें एक लेख वाचला. किति सुंदर आहे! आमच्या समजांतील चालीरिती अनिष्ट आहेत. लहान वयांत-अगदीं बालपणींच—लग्न झाल्यामुळें हिंदूंनां प्रीतीचें ज्ञान कसें होऊं शकणार! हिंदूंनां फक्त अपत्योत्पति करण्याचे हेतूनें लग्न जुळवावयाचें असतें. बायको म्हणजे दिवसा घरांत काम करणारी व रात्रौ शय्यासमागम ठेवणारी दासी होय. ही बरोबरीची प्रिय सखी, आनंद व दुःख यांची वांटेकरीण ही कल्पना त्यांच्या डोक्यांतही कधीं शिरत नाहीं. बौद्धिक-गुण-संपत्तीकडे कोणी लक्ष देत नाहीं. आतां आपल्याला काय पाहिजे व पुढें काय लागेल त्या सर्वांची तजवीज करण्याचा अधिकार तिला आहे असें शब्दांनीं अथवा कृतीनें तिची समजूत तिला तिचा पति कधींही होऊं देत नाहीं." (३०।१।१८५७ रो. इं. उ.) येवढे विचार मनांत आल्यावर रावसाहेबांचे विचार सहजच आपल्या स्त्रीकडे वळले. "माझ्या बायकोची मूर्ति मनांत आली कीं, मला आनंद होतो. ती गुणांनीं इतर स्त्रियांपेक्षां फार श्रेष्ठ आहे. अजून तिच्या बुद्धीची वाढ होण्यास शिक्षणाची जरूर आहे. व आणखी शिकण्याची तिची इच्छा आहे. कारण तिला माहित आहे कीं, मला एकादा प्राणी केवळ त्याचे डोळे सुंदर आहेत ह्मणून आवडावयाचा नाहीं. तिचें वर्तन तर मला जसें पाहिजे तसें आहे. एकमेकांस जसें एकमेकांचें हृद्गत कळत जाईल

तशीं आह्मीं अधिक सुखी होत जाऊं. हें आमचें सौख्य परमेश्वर पराकाष्ठेला पोंचवो ! तथास्तु. ( ३०।१।१८५७ रो. इं. उ. ) शिक्षण ह्मणजे काय ही वाचकांची जिज्ञासा तृप्त होईल असा उल्लेख दुसऱ्याच दिवशीं रावसाहेबांनीं रोजनिशींत नमूद करून ठेविला आहे.

" देवाविषयीं, स्वतांविषयीं व मनुष्यजातीविषयीं आपलीं कर्तव्यें काय आहेत. सर्व ऐहिक–संपत्ति, ज्ञान–संपत्तीपुढें कशी तुच्छ आहे इ. विषयांवर स्त्रीस पत्र लिहिलें."स्वस्त्रीची योग्यता त्यांस किति कळून आली होती हें दाखविणारा एक उतारा रोजनिशींतून दिला ह्मणजे पुरे होईल " मला बहुतेक असें वाटत आहे कीं माझें स्वतांचें चरित्र ह्मटलें ह्मणजे एक उत्तम कादंबरीचा विषय होईल. त्याचा शेवट काय होईल तें परमेश्वराला ठाऊक. मी इतकें खात्रीनें ह्मणतों कीं मी अद्याप पर्यंत समजून उमजून मिथ्या भाषण केलें नाहीं अथवा अन्यायमूलक कृति केली नाहीं तथापि विविध परिस्थितींचें काहूर जें माझ्या वाटोळें माजून राहिलें आहें त्या योगानें माझ्या चरित्रास इतकें विचित्र स्वरूप प्राप्त झालें आहे कीं त्यावर एक कादंबरी रचितां येईल व तींत माझी बायको एका उपकथेचा विषय होईल. आमची जोड नौका परमेश्वर पैलतीराला सुरक्षित लावो." ( २।५।१८५७ रो. इं. उ. )

या प्रमाणें स्वस्त्रीला समान दर्जा देऊन तिच्याशीं तसेंच वर्तन रावसाहेब ठेवीत असत. वडिलांच्या कर्जामुळें रावसाहेबांस नेहमीं काटकसर करावी लागे. म्हणून पावसाळ्यांत फिरती बंद होऊन जाग्यावर येतांच एक गडी व एक ब्राम्हण कमी करण्याचें त्यांनीं ठरविलें व याप्रमाणें पावसांतही सडे राहिल्यास आणखी खर्च वांचता पण तसें त्यांनीं केलें नाहीं. त्याचें कारण स्त्रीला दिलेलें वचन होय. "बायकोस पावसाळयांत कोंकणांतून आणावी कीं न आणावी हा प्रश्न आहे परंतु आणीन म्हणून तिला वचन दिलें आहे.. वचन पाळलेंच पाहिजे. तिला आणिलेंच पाहिजे." ( १४।२।१८५७ रो. इं. )

पुढें ठाणें सोडून मुंबईस आल्यावर बिऱ्हाड मोडण्याचा सहसा प्रसंग येत नसे त्यामुळें रावसाहेबांस आढळलें कीं "मिळेल तेवढें खर्च करून टाकितों, या बेताची राहणी नेहमींच चालू ठेवणें शक्य नाहीं. माझें स्वतंत्रपणें राहणें, देवऋण, पितृऋण, व मनुष्यजातीचें ऋण या विषयींचे जे माझे विचार आहेत त्याप्रमाणें आचरण करण्यास जो खर्च लागेल तो संभाळावयाचा म्हटलें म्हणजे पुढें मागें माझें असें स्वत्वाचें कांहींच उरणार नाहीं व मला लोकांच्या दयेचा प्रसंगविशेषीं आश्रय घ्यावा लागेल" म्हणून रावसाहेबांनीं काटकसर करण्याचें काम स्त्रीवर सोंपविलें होतें. दोन दोन महिन्यांची सामग्री जिनसांची करीत जावें असें उभयतांनीं प्रथम ठरविलें. ( २०।२।१८६१ रो. इं. उ. )

अशा रितीनें संसार टापटिपीनें करण्यास उभयतां पतिपत्नी मिळून आरंभ केला. सौ० अन्नपूर्णाबाई यांची प्रसिद्धि यांच गुणाबद्दल पाहिल्यानें झाली. सणा सुटीचे दिवशीं रावसाहेबांचे बालमित्र किंवा सहाध्यायी आले म्हणजे भोजनास रहात असत.

सासरे नानासाहेब मंडलिक व दीर रावजी मंडलिक हे कामासंबंधें मुंबईस येत. त्यांचा मानमरातब सौ. अन्नपूर्णाबाई उत्तम ठेवीत असत. रावसाहेब फिरतीवर असले तरी पाहुण्यांचा आदरसत्कार नीट करीत असत.

सौ. अन्नपूर्णाबाईंचा कल धार्मिक कृत्यांकडे विशेष असे. भागवत सांगण्यास त्यांच्या करतां रावसाहेबांनीं शास्त्री ठेविला होता. तें ऐकण्यास रावसाहेब सुद्धां कधीं कधीं बसत. बाहेरील ज्ञान होण्यास रावसाहेब आपल्या पत्नीस ऐतिहासिक चित्रपटांचे खेळ दाखविण्यास नेत व विहारचा तलाव वगैरे स्थलें दाखवून आणीत.

असा पहिला काळ उभयतांचा सुखांत गेला. पुढें आधि व्याधि पाठीस लागून सौ. अन्नपूर्णाबाईचें प्रकृतिस्वास्थ्य नष्ट झालें तरी त्यांनीं संसारयात्रा कशी केली तें वृत्त पुढें येईल.

## प्रकरण ११ वें.

# नोकरी ( मुनसफीची )

शास्त्रज्ञः कपटानुसारकुशलो वक्ता नच क्रोधन-।
स्तुल्यो मित्रपरस्वकेषु चरितं दृष्ट्वैव दत्तोत्तरः ॥
क्लीबान् पालयिता शठान् व्यथयिता धर्म्योन लोभान्वितो।
द्वार्भावे परतत्वबद्धहृदयो राज्ञश्च कोपापहः ॥ १ ॥

( मृच्छकटिकम् )

मुनसफ होण्याची रावसाहेबांची इच्छा होती, परंतु वयाच्या २५ वर्षांपूर्वी मुनसफीचे परिक्षेला बसण्याची परवानगी नसल्यामुळें त्यांना तिकडे इतके दिवस ढुंकूनही पहातां आलें नाहीं. पण २५ वर्षें वयाला झाल्यावर त्यांनीं मुनसफीची परिक्षा दिली नाहीं. ती फार कठीण होती असें नाहीं. हल्लींचें मोठमोठाले कायदे अस्तित्वांत नव्हते. त्यावेळीं अमलांत असलेलीं रेग्युलेशनें वाचावीं लागत. परीक्षेस बसतांना रेग्युलेशनचीं पुस्तकें विकत घेतल्याचा अतिमहत्वाचा दाखला लागत असे. बरोबर आहे. पुस्तकेंच नसलीं तर अभ्यास तरी कसा होणार ! रावसाहेबांना त्यांच्या मनोदयाप्रमाणें १८५८ सालीं मुनसफ होण्याचा योग आला व तोही परीक्षा दिल्याशिवाय. वसई मुक्कामीं नारो सखाराम बिनीवाले या नांवाचे एक मुनसफ होते. ते सहामहिन्याचे रजेवर गेलेकारणानें सदरहू कोर्ट बंद राहिलें, सबब त्या जागेवर रावसाहेबांची बदलीवर नेमणूक झाली व त्यांस तसा हुकूम ( ३-८-१८५८ ) चा कोंकण सिव्हिल कोर्ट ( दिवाणी अदालत प्रान्त कोंकण सन १८३० ) याची

सनद मोहोर बंद आली, व त्यांस वहिवाटीप्रमाणें शपथ घेण्यास जिल्हा कोर्टाचें बोलावणें आलें.

रावसाहेबांनीं ९।८।१८५८ रोजीं सर अर्स्किन यांच्या पुढें शपथ घेतली व १३-८-१८५८ रोजीं सदर जागेचा चार्ज घेतला. ती जागा स्वीकारण्यापूर्वी त्यांना अगोदर शाळा खात्याची परवानगी घ्यावी लागली. सार्वजनिक कामांतील अडचणीचा परिहार करण्याकरितां ही जागा पतकरण्याचा सर अर्स्किन पेरी यांनीं आग्रह केल्यावरून रावसाहेब या जागेवर नारायण भाई दांडेकर यांस व्हिजिटरच्या जागेचा चार्ज देऊन वसईस गेले. ( १३।८।१८५८ चें भाईस पत्र )

कोडताचें काम मराठींत चाले. कोडताचा हुकूम व तो करण्याचीं कारणें हीं मराठींतच ( मोडी लिपींत ) लिहिलीं जात. अशा हुकुमांच्या व ठरावांच्या नकला रावसाहेबांच्या दप्तरांत सांपडतात. रावसाहेब मुनसफीच्या जागेवर असतांना त्यांचें वर्तन नमुनेदार होतें. आपण न्याय देण्याच्या पवित्र कार्याचा अंगिकार शपथपूर्वक केला आहे याची स्मृति त्यांनीं सदैव बाळगिली होती. कोण कसा आहे हें सदैव ध्यानांत ठेवीत. "आज कचेरींत × × × × यानें मला पूर्वीं एकदां दाखविलेला एक कागद दाखविला व बरेंचसें खोडसाळ बोलला. मी त्यास फार रागें भरलों. पहिलाच प्रसंग ह्मणून रिपोर्ट केला नाहीं. फार कठोरपणा पदरांत आला असता. त्याला क्षमा केली परंतु त्यानें एकदांचा जो वाईटपणा मिळविला तो मी केव्हांही विसरणार नाहीं. तो खोटा मनुष्य आहे, दिसतांना बावळा दिसूंद्या !" ( ९।२।१८५९ रो. इं. ) सरकारी कामासंबंधें कांहीं एक पत्र लिहूं नये असें वडिलांस त्यांनीं लिहून ठेविलें. आपल्या प्रतिपक्षाविरुद्ध न्यायाधिशाचें मन कलुषित करण्याकरितां पापडी मुक्कामच्या एका पक्षकारानें भडोचहून एका इसमाचें आपल्या नंबराबद्दल पत्र आणून रावसाहेबांकडे पाठवून दिलें. त्याची भाषा फार खुबिदार होती.

तरी त्यांतील मतलब कळण्यासारखा होता. शिफारसपत्र देणाऱ्याचा * रावसाहेबांनीं चांगलाच पिच्छा पुरविला. " न्यायाधिशाचें जें मूळ-भूषण निःपक्षपातीपणा म्हणजे खरेपणा त्याच्या आड येऊन न्यायाचे कामांत अशी घालमेल करणारे लोकांस योग्य शासन व्हावें " असा अभिप्राय देऊन वरिष्ठांकडे तें प्रकरण १९–८–१८५८ रोजीं रावसाहेबांनीं पाठवून दिलें. दुसऱ्या दोन पक्षकारांस खोट्या साक्षीबद्दल सेशनकमिट केलें.

कित्येकवेळां साक्षीदारांस समन्स म्हणजे हजर राहण्याचा हुकूम मिळाला असूनही हुकमाची अवज्ञा होत आहे असें आढळे. त्यांतून कांहीं वेळां जाणूनबुजून हुकूम मोडला अशी खात्री होतांच दोघा तिघांस त्यांनीं दंड केला.

आजारी मनुष्याची साक्ष घ्यावयास त्याच्या घरीं मुनसफास जावें लागे. कज्जाचो जागा पहावयास जावें लागे. अशा एका प्रसंगीं रावसाहेबांस वाघोबानें भेट दिली. तिचें वर्णन त्यांनीं एका इंग्रजी पत्रांत केलें आहे:— "वसई तालुक्यांत एक वेळ मी तंट्याची जमीन तपासण्याकरितां स्वतः एका खेड्यांत गेलों होतों. त्या जमिनीचा नकाशा काढून जागच्या जागीं साक्षी तपासावयाचे होते. मामलेदारांच्या वहिवाटी विरुद्ध मी आपल्या कचेरींतील लोकांसह गांवाबाहेरच तळ देऊन होतों. माझ्या सोईकरितां आपल्या खर्चानेंच एक तात्पुरता मांडव घातला होता. एका रात्रीं वाघ आमचेवर चाल करून येत आहे अशी ओरड झाली. व आमच्या पैकीं कांहींस माझ्या निजावयाचे जागेपासून ५० यार्डांवर आलेला वाघ दिसला. आमच्या जवळ बंदूक नव्हती, त्यामुळें अगदीं पूर्व युगांतील उपाय, म्हणजे भयंकर आरोळी मारणें, शेकोट्या पेटवणें यांचें अवलंबन करून वाघोबास पिटाळावें लागलें "

* तो सरकारी नोकर होता त्याला कमी पगारावर नोकरी करण्याची शिक्षा झाली.

कोडताचे कामाविषयीं कोणाही गृहस्थास घरीं बोलणें काढून देत नसत. " सुमारें ६½ वाजतां × × × अमुक मुक्कामचे भाऊसाहेब आले होते. त्यांजवळ बोलत होतों. त्यांनीं प्रथम गोष्ट काढली व ते म्हणाले कीं मला समन्स लागलें आहे. तें १४ वींचें आणि मला कामास जावयाचें आहे. " मी म्हटलें " भाऊसाहेब तेवढें आपण बोलूं नये कारण हें कोडतांतलें काम आहे. तेव्हां मग ते उमजले आणि म्हणाले—मी बोलत नाहीं. " ११।२।१८५९ ची रोजनिशी.

फिरतीवर असतां लोकांकडून शिधापाणी घेत नसत व देवालयांत, धर्मशाळेंत किंवा वेळ पडल्यास झाडाखालीं सुद्धां भोजनाचा बेत करीत. ज्या मनुष्यांचा लौकिक चांगला नाहीं त्यांच्यांशीं संबंध ठेवित नसत.

" घोड्यावरून जात असतां बाळू × × यानें पुढें येऊन धीटाईनें हांक मारिली. 'सरकारी कामाकरितां निघालों आहे मला वेळ नाहीं' असें उत्तर दिलें. ' तर मग परत येतांना घर पाहावयास येईन असें वचन द्या ' असें तो म्हणाला. मी उत्तर दिलें 'असें कांहीं वचन देतां यावयाचें नाहीं. ' तो म्हणाला ' तरीपण परत येतांना आपण यालच अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं. ' ' कल्पनाच करावयाची तर हवी ती कल्पना करून मनांत सुखी होण्यास कोणाला केव्हांही हरकत नाहीं ' असें म्हणून मीं पुढें गेलों. या लुच्च्या मनुष्याकडे मला जावयाचें नाहीं " ( २४।२। १८५९ रो. उ. ) दुसऱ्याकडे जाणें येणें अगदींच वर्ज्य नसे. " धर्माजी हिराजी भंडारी याचें घर पहावयास गेलों होतों ( ३।१०।१८५८ रो. उ. ) वकील किंवा इतर कचेरींतील हाताखालचे लोक किंवा गांवांतील मंडळी यांस भीडभाड घालून त्यांचे ओशाळे होऊन बसत नसत.

" नंतर एक पुराणिक आले ते सांगूं लागले मी पुराण सांगणार. त्यांस सांगितलें—फार चांगलें. सांगावें. मला काय द्यावयाचें तें देईन. दुसऱ्यास देण्यास कांहीं सांगणार नाहीं. " ११।२।१८५९ ची रोजनिशी.

येणें प्रमाणें जनांच्या मोहसागरांत उत्पन्न झालेल्या लहरींनीं न्यायाचा तराजू झुकेल या भीतीनें रावसाहेब जनांच्या चळवळीपासून मुनसफ असतांना कसे अलिप्त रहात असत त्याचें उदाहरण २३-५-१८५८ च्या रोजनिशींत एक आढळलें तें असें. " उद्यिक नारळी पौर्णिमेला लोक मिरवणूक काढतात. मिरवणुकींत पुढाकार घेण्यास याल काय ? अग्रेसर व्हाल काय ? अशी विनंती वकीलांनीं मिळून केली तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं मुनसफ या नात्यानें मी स्वतः येणार नाहीं व दुसऱ्यास जा ह्मणणार नाहीं परंतु खासगी नात्यानें येण्यास जर मला आमंत्रण दिलेंत तर येईन; व लोक काय काय करतील तें जसा कथाकीर्तनप्रसंगीं तसा मी प्रेक्षक होऊन स्वस्थपणें पाहीन". याहून जनांपासून अलिप्त राहणारे एक सर मॅथ्यू सॉस* या नावाचे हायकोर्टांत जज्ज होऊन गेले ते कोणास कधीं भेटत नसत. सभेला जात नसत. वृत्तपत्रें वाचीत नसत. ख्रिस्तानुयायी म्हणून दर रविवारीं प्रार्थनालयांत सकाळीं जात, परंतु तेथून व कोडतांत जातां येतां मेण्याचीं+ दारें लावून घेत असत. न जाणो जनाच्या संपर्कानें कांहीं

* न्या० जोसेफ आर्नोल्ड हेही हायकोर्टांत न्यायाधीश होते ते १८६९ सालीं विलायतेस पेनशन घेऊन गेले. त्यांस लोकांनीं त्यांच्या उत्तम स्वभावाबद्दल, विद्वत्तेबद्दल व कर्तव्यदक्षतेबद्दल मानपत्र दिलें त्या समयीं त्यांनीं भाषण केलें त्यांत ते ह्मणाले " मला एकान्तवाशाला लोकांपुढें कशाला आणलें ? मी एक कर्तव्यव्यग्र प्राणी होतों. कर्तव्य केलें त्या पलीकडे कांहीं केलें नाहीं. सार्वजनिक चळवळीचा विचार मला शिवला नाहीं. युनिवर्सिटीच्या चॅन्सेलरचें काम केलें पण ते सार्वजनिक काम करावयाचें होतें म्हणून नव्हे तर सरकारनें नेमलें म्हणून ! मिस कार्पेन्टरच्या भाषणांनीं मला भुलवून स्वमार्गच्युत केलें नाहीं, समाजशास्त्रानें मला मोह पाडला नाहीं. हिंदी स्त्रीसमाजाला शिक्षण देण्याच्या भानगडींत पडलों नाहीं व हिंदी विधवांचीं लग्नें लावलीं नाहींत ! ( हंशा ! ) तथापि माझ्या मनांत तुमच्या विषयीं सहानुभूति होती. व घरीं जातांना तुह्मांला सोडून जातांना तुम्हीं कोणत्याही देशांतील लोकांमध्यें चांगले आहांत अशी स्मृति माउन्टस्ट्युअर्ट एल्फिन्स्टन ह्मणाले त्याप्रमाणें मनांत सदैव बाळगीन".

\+ या काळांत श्रीमंत लोक मेण्यांतून फिरत असत.

वृत्त कळून आपल्यापुढें येणाऱ्या खटल्यासंबंधें पूर्वमत होऊन जाईल !

रावसाहेब वसईस असतां पत्नीस आणून बिऱ्हाड करण्याचा योग आला नाहीं. कारण त्यांच्या पत्नीस याच वेळेला आमवाताचा विकार होऊन उपचारार्थ मुंबईस रहावें लागलें. औषधोपचार डॉ. भाऊंचे चालू होते. उभयतांनीं एकत्र राहूं नये असें पथ्य डॉ. भाऊनीं सांगितलें. त्यामुळें जरा गूण पडल्यावर रावसाहेबांनीं पत्नीस कोकणांत पाठविण्याचें ठरविलें. कमरेंत कळ उठून पाठीच्या कण्याकडे वरवर जात असे. ती वेळींच बरी झाली नाहीं तर जड जाईल असें भाऊंचें म्हणणें होतें. कांहीं औषध त्यांनीं कमरेवर लावावयास दिलें होतें त्यानें पुरीळ उठून फार त्रास होई. याप्रमाणें अगदीं सडे असल्यामुळें व एका जागेची नोकरी मिळाल्यामुळें विश्रांति मिळून रावसाहेबांची प्रकृति चांगली राहिली तीमुळें त्यांचा काळ फार उत्तम गेला. रोजनिशा तपासून पाहिल्या असतां ७ तास झोंप, ३।४ तास स्नानसंध्या, घोड्यावर बसून फिरणें, भोजन, पत्रलेखन, मित्रांच्या भेटी व संभाषण यांत जाऊन बाकीचा वेळ कचेरींतील काम व संस्कृताचा व कायद्याचा अभ्यास यांमध्यें जात असे. कचेरींतील काम× भरपूर असे. एकादे वेळीं फार असे. "६॥ वाजतां उठलों. एक तास स्नानसंध्या भोजन यांत खर्च करून रात्रौ ७ वाजेतों सरकारी काम केलें. भोजनोत्तर अगदीं थकून गेलों सबब निजलों." (१।९।१८५८ची रोजनिशी.) संस्कृताच्या अभ्यासविषयांत अमरकोशाच्या आवृत्तीपासून अष्टाध्यायी, निघंट, माघ, व रघु व भागवत यांचा समावेश होत असे. संस्कृत भाषेंतील सहाध्यायी

× मुनसफीचे कामाशिवाय रावसाहेबांकडे मामलेदार व फौजदार यांची शिल्लक, व सामानसुमान यांच्या तपासणीचें काम असे. त्याचप्रमाणें पुणें येथील कॉलेजांतील विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्यापूर्वी परीक्षा द्यावी लागे. त्या परीक्षेचे रावसाहेबांस परीक्षक नेमित असत. येथें असतां रावसाहेब नित्य घोड्यावर बसून फिरावयास जात,

माधवराव दिवेकर हे होते. व शिक्षकाचें काम बाळंभटजी मराठे यांकडे होतें. काशीनाथपंत वर्तक यांबरोबर वेदान्तग्रंथ पहात. पण पुढें याहू-नही जोरानें संस्कृताचा अभ्यास करण्याकरितां खालील ग्रंथ मागविले होते. किरात, नैषध, वेणीसंहार, ग्रहलाघव, अनेकार्थमंजरी, ज्योतिष-संग्रह ( वही ), मेदिनी कोश, त्रिकांड कोश, वृत्तरत्नाकर, रामायण व आर्यारामायण. कांहीं जुने ग्रंथ छापून निघाले नव्हते ह्मणून ते हातीं पडतां त्यांच्या हस्तलिखित प्रती करून संग्रह करण्याचा नाद रावसाहे-बांस प्रथम येथेंच लागला असें दिसतें. सह्याद्रि खंडाची प्रत त्यांनीं पापडीकर भटजीकडून करून घेतली. इंग्रजी कायद्याच्या अभ्यासांत पुराव्याच्या कायद्यावर विशेष भर होता. मान्टेस्क्यिरस्कृत कायद्याचें रहस्य या पुस्तकाची त्यांना फार आवड होती. " ह्या पुस्तकानें मला अगदीं भारून टाकलें आहे. यांतील तत्त्वज्ञान फार गहन आहे. याचा समूळ अभ्यास केला पाहिजे. या पुस्तकाचे भाग ह्मणजे कायद्याच्या ज्ञानाची किंबहुना सर्वसाधारण ज्ञानाचीं सुद्धां मूळाक्षरेंच होत असें ह्मणतां येईल " ( २३।१।१८५९ ची रोजनिशी ) शिवाय नार्टनकृत पुराव्याचा कायदा वाचीत असत.

रावसाहेब कायद्याचा अभ्यास करीत आहेत असें त्यांचे बंधू रावजी यांस कळलें तेव्हां त्यांनीं असें लिहिलें कीं कायद्याचा अभ्यास करण्या-करतां श्रम करूं नये. फक्त कचेरीचें काम करून स्वस्थ बसावें त्यावर रावसाहेबांनीं उत्तर दिलें कीं मला जन्मभर नोकरी करीत रहावयाचें नाहीं.

याशिवाय राजकीय विषयासंबंधें पुस्तकें वाचीत. " हिंदी वसाहती " विषयीं एक पार्लमेंटच्या सभासदांची कमिटी बसून तिच्यापुढें साक्षी-पुरावा झाला होता, त्याचें वाचन रावसाहेबांनीं लक्ष लावून केलें होतें. '३००० वर्षांपूर्वींचे हिंदुस्थान' ह्या ऐतिहासिक पुस्तकाचें अवलोकन केलें. सर्व रीतीनें सुरळीतपणें काम चाललें होतें. व आपल्या बुद्धीला साजेल

अशी जागा मिळाल्याबद्दल मित्रांकडून अभिनंदनपर पत्रेंही येऊं लागलीं. मुरूडकर बालमित्र महादेव सामल, बाळ बागुळ, विठ्ठलभट वैशंपायन इ० मुद्दाम भेटीस येऊं लागले. तोंच यांच्या बदलीची मुदत सरली व ३।३।१८५९ रोजीं नारायण सखाराम यांस परत चार्ज देऊन मोकळे झाले. रावसाहेबांस पहिल्या जाग्यावर म्हणजे शाळाखात्यांतील इन्स्पेक्टरच्या जागेवर जावें लागलें नाहीं. कारण मुंबई येथील बुक डेपोचे क्युरेटर, भास्कर दामोदर पाळंदे यांची बदली पुण्यास एलिअनेशन् खात्यांत झाल्यामुळें व शाळाखात्यांत रावसाहेब नोकरीनें सर्वांत वरिष्ठ असल्यामुळें सरकारी बुक डेपोच्या क्युरेटरच्या जागीं त्यांचीच नेमणूक ४ मार्च १८५९ रोजीं झाली. येथें यांचा दुसरा हुद्दा मुंबई येथील मराठी शाळांच्या डेप्युटी इन्स्पेक्टरचा होता. येथें बदली झाली हें चांगलें झालें. कारण याच्या अगोदर रावसाहेबांची प्रकृति रेच झाल्यानें नादुरुस्त झाली होती. तेव्हां नानांनीं तर स्पष्ट लिहिलें कीं " वारंवार लिहिणें इतकेंच आहे कीं सध्यां ईश्वरानें पोटापुरती संस्था केली आहे तथापि चाकरी लौकिकाकरितां. तोहि आजपर्यंत संपादन झाला. यास्तव रजा घ्यावी. व न दिल्यास राजी द्यावी. हमालांच्या डोल्या करून ( घरीं ) यावें खर्च फार येईल तो ईश्वरानें दिला आहे. ( १७।३।१८५९ )

पुन्हां एक वर्षानें भास्कर दामोदर परत आल्यावर मुनसफी करण्याचा प्रसंग येणार होता, असा रावसाहेबांचा तर्क होता. व त्याकरतां डेपोमध्यें क्युरेटर असतां सर्व मोकळा वेळ कायद्याचे अभ्यासांत घालविण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. तो मि. हावर्ड, डायरेक्टर, यांस कळल्यावरून त्यांनीं त्यांस थोडा उपदेश केला तो असा " कायद्याच्या अभ्यासाकरितां मुंबईस कांहीं दिवस काढण्याचा आपला बेत असेल तर तो ठीक आहे परंतु इंग्रजी कायद्याच्या नुसत्या परिभाषेवर फार वेळ घालवूं नका.

रोमन लोकांच्या कायद्यांत दिसून येणारीं व्यवहाराला धरून जीं मूलतत्त्वें आहेत तीं व पुराव्याच्या कायद्यांतील तत्त्वें यांतच सर्व कायद्याचे ज्ञानाची मख्खी आहे. म्हणून या दोहोंचा अभ्यास आपण करावा. तसाच कॉन्ट्रॅक्टच्या कायद्याच्या अभ्यास करावा".

त्यांचे मित्र ज. जेकब यांचें मत रावसाहेबांनीं न्याय खात्यांत शिरावें असें होतें. त्यांनीं कोल्हापुराहून यांस असें लिहिलें कीं ' तुम्हीं पुन्हां न्यायखात्यांत शिराल अशी आशा करतों. तुम्हीं त्याच खात्यांतील नोकरीस सर्व प्रकारें लायक आहांत." परंतु तसा योग पुढें आला नाहीं.

## प्रकरण बारावें.

# नोकरी.

### सरकारी बुकडेपोचे ( शालोपयोगी पुस्तकालयाचे ) क्युरेटर.

तद्दिव्यमव्ययं धाम सारस्वतमुपास्महे ।
यत्प्रसादात्प्रलीयन्ते मोहान्धतमसश्छटाः ॥ १ ॥

ज्ञानाचा प्रसार वाढविण्यास लागणारी जी मुख्य सामग्री म्हणजे चांगले ग्रंथ ते सरकार विद्वान् लोकांकडून लिहवी व त्यांस मोबदला देऊन छापवी. शिवाय विलायतेहून शिक्षणविषयक पुस्तकें मागवी. व त्यांचा पुरवठा, मुंबईतील मध्यवर्ती डेपोच्या शाखा पुण्यासारख्या शहरीं होत्या त्यांस करी व तेथून सर्व शाळांस पुस्तकें पुरविण्यांत येत. या सर्व कामाची व्यवस्था ठेवणें हें क्युरेटरचें काम होतें. त्यावर रुजू झाल्यावर रावसाहेबांस असें आढळून आलें कीं डेपोचें काम फार वाढत आहे. १८५७ ते १८५९

सालीं मुंबईत पुस्तकें छापविलीं किती, विलायतेहून आणविलीं किती, येथें रोखीनें व उदारीनें विक्री झाली किती व डेपोच्या भिन्न भिन्न शाखांस पुरवठा केला किती, याचा आढावा काढून हल्लीं असलेल्या कचेरींतील मंडळीस इतकें काम होणार नाहीं असें दाखवून “ कचेरीचें काम बरोबर चालत नाहीं म्हणून जो कोणी सर्वांत नाराज असेल तो मीच ” असें लिहून माणसें जास्त कामावर ठेवावीं असा प्रयत्न रावसाहेबांनीं लागलाच केला. “ डेपोची संस्था शाळाखात्याचें एक मोठें उपयोगी व अवश्यक अंग आहे व फायदेशीर आहे असें सिद्ध करतां येईल. हिशेब ठेवण्याची पद्धति सुधारून तो रोजच्या रोज पुरा करण्याची वहिवाट पाडून क्युरेटरनें ज्यास्त परिश्रम घेतले म्हणजे झालें. पावती बुकापासून सुधारणा करीत आहें. ही संस्था जर शिक्षणखात्याचें एक अवश्य अंग असेल तर केवळ व्यापारी दृष्टीनें तिकडे बघतां कामा नये. ” असें रावसाहेबांचें मत होतें. आणखी महिन्याचे आंत रावसाहेबांस ५० रुपये बढती देऊन मुंबईंतील मराठी शाळांचे इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें. शाळांची तपासणी करण्यांत कधीं कधीं रावसाहेब आपण शिकवून दाखवीत व गुरुजी कसें शिकवितात तें पहात बसत. एकदां जगन्नाथ शंकरशेट यांच्या शाळेंत एका पंतोजीनें प्रश्नोत्तररूपानें लहान अर्भकांशीं बालविवाहाची चर्चा चालविली होती ती रावसाहेबांस मूर्खपणाची वाटली. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट मध्यें २९।३।१८६० रोजीं बक्षिस समारंभ होता. त्यावेळीं मि. मॅलेट हे अध्यक्ष होते. त्यांनीं जमलेल्या हिंदी लोकांस ‘खिस्ती धर्माचा हक्क ’ यांवर व्याख्यान दिलें तें राजकारणी पुरुषाला व विशेषतः सरकारी नोकराला अगदीं अनुचित आहे असें रावसाहेबांस वाटलें. मुंबई येथील वरिष्ठ वर्गांतील शिष्यवृत्ति देण्याकरितां जी परीक्षा घेत असत तींत रावसाहेब येथें असतां परीक्षक असत.

रावसाहेब मुंबईस येतांच त्यांच्या जुन्या सहकारी मित्रांस आनंद

वाटला. रोज अनेक जण भेटीस येऊं लागले, व इतक्या दिवस कित्येक बेत मनांतल्या मनांत जिरून गेले होते ते पुन्हां वर आले असें त्यांस वाटे. विनायकराव भागवत, रा. गो. भाण्डारकर (आतां डाक्तर भांडारकर), विष्णु बाजी गोडबोले, विनायकपंत बेरडे, गणेशपंत वैद्य, भास्कर दामोदर, भाऊ महाजन, महादाजी पेंढरकर, जनार्दन नारायण अभ्यंकर, गंगादास किशोरदास इत्यादि सरस्वतीचे भक्त जमून एक नवा छापखाना, एक मराठी वृत्तपत्र व दिगदर्शनासारखें मासिक इतक्या गोष्टी सुरू करण्याचे विचार रोज करूं लागले. त्यांतून फारसें निष्पन्न झालें नाहीं तथापि ज्ञानप्रसारक व बुद्धिवर्धक सभा यांत रावसाहेब पुन्हा निबंधलेखनाचें व निबंधवाचनाचें काम करूं लागले.

एका ठिकाणची नोकरी मिळाल्यानें प्रवासाचे हाल वांचले, परंतु प्रकृति अगदीं निकोप राहिली असें नाहीं. "कच्छ येथील ज्वर व संग्रहणी हे दोन्हीं व्याधी माझेवर फिदा आहेत असें दिसतें. नियतकालीं मला भेट देऊन जातात!" (१२ ९।१८५९ चे ज. जेकब यांस इ. पत्र) पत्नीची प्रकृति साधारणपणें बरी होती. रोज रोज नव्या औषधाची योजना डा. भाऊ करीत असत. ह्मणून त्यांनीं कांहीं दिवस गोकुळदास तेजपाळ यांच्या बंगल्यांत * बिऱ्हाड केलें होतें. व कांहीं दिवस वाळकेश्वरीं केलें होतें, त्यामुळें त्यांची प्रकृति सुधारली. रावसाहेबांस मात्र एकदां अंतर्गळाची व्यथा झाली होती ती डा० भाऊनीं शस्त्रप्रयोगानें दुरुस्त केली.

रावसाहेबांचें काम सरकारी पुस्तकें छापविण्याचें असे. गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत मराठी पुस्तकें छापलीं जात व नानाभाई राणिना यांच्या युनिअन प्रेसमध्यें मि. हावर्ड यांचीं इंग्रजी पुस्तकें

---

* गांवांमध्यें असतां ढोलकें, टाळ इ. कठोर वाद्यांच्या योगानें त्यांच्या अभ्यासांत व्यत्यय येई. एक दिवस घराच्या गच्चीवर वाणी लोकांनीं नाच केला तेव्हां खालीं आपल्या खोलींत गप्प रावसाहेबांस निजावें लागलें.

छापलीं जात. तेथें त्यांस जावें लागे. तेवेळीं रावसाहेबांचे सरळ व प्रामाणिकपणाचें वर्तन या छापखान्यांच्या मालकांस पसंत पडून त्यांची आमरणांत मैत्री झाली. गणपत कृष्णाजीच्या छापखान्याच्या मालकांनीं रावसाहेबांस आपल्या इस्टेटीचें ट्रस्टी नेमिलें होतें. व नेटिव ओपिनियन पत्र काढण्यास युनियन प्रेसची मदत पुष्कळ झाली तें वृत्त पुढें येईल.

अनेक विद्वान ग्रंथकार आपलीं पुस्तकें सरकारच्या आश्रयाकरितां सादर करीत. त्याचा निकाल करण्याकरितां एक मंडळी नेमलेली होती. तींत डा. हार्कनेस, डा. वुइल्सन, मेजर कॅन्डी, मि० जान पीट, विनायक वासुदेव, भास्कर दामोदर, गोविंद विठ्ठल महाजन, बाळाजी पांडुरंग, गोविंद नारायण, नारायण विश्वनाथ शास्त्री, दादोबा पांडुरंग, इ० होते.

केरुनाना छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, * गंगाधरपंत टिळक, दादोबा पांडुरंग इत्यादि मंडळी ग्रंथ लिहून आश्रयास पाठवीत असत. दादोबांचें व्याकरण याच वेळेला आश्रयास सादर झालें होतें. तत्संबधें आठ कलमी सुचना रावसाहेबांनीं सादर केल्या होत्या त्या सर्व सभासदांकडे व कांहीं शास्त्रीपंडितांकडे पाठविण्यांत आल्या होत्या, त्या विषयीं भास्कर दामोदर यांनीं दादोबांस असें पत्र लिहिलें होतें.

" मत्प्रिय दादासाहेब

रावसाहेब विश्वनाथ यांनीं केलेल्या सुचना मला पसंत आहेत. व तुह्मांसही पसंत पडतील असें धरून चालतों " (५।६।१८५९). त्यावर रावसाहेबांचे व माझे विचार जुळतात ह्मणून दादोबांनीं आनंद-प्रदर्शित केला. डाक्तर रामकृष्ण गोपाळ यांच्या मनांतून बापू छत्रे

* गंगाधरपंत टिळक यांनीं लघुव्याकरण लिहिलें होतें. व तें छापण्याचा हक्क सरकारानें विकत घेतला होता. शिवाय त्यांनीं गोलत्रिकोणमिति लिहून आश्रयार्थ पाठविली होती.

यांच्या बाळमित्राची आवृत्ति छापण्याची होती. ते नेहमीं तीविषयीं रावसाहेबांस भेटून वाटाघाट करीत.

जव्हेरीलाल याज्ञिक यांचें साहाय्य घेऊन रावसाहेबांनीं गुजराथी कवितांचे वेंचे क्रमिक पुस्तकांस घालण्यास तयार केले होते.

रावसाहेबांच्या मनांत कायद्याचा अभ्यास करावयाचा होता तो हेतु आतां साध्य झाला. सरकारानें संध्याकाळीं कायद्याच्या शिक्षणाचा वर्ग काढला होता. त्याला रावसाहेब जाऊं लागले. डा. रीड सारख्या विद्वान प्रोफेसरांच्या शिकवणीचा लाभ झाला. शिवाय कायद्याच्या मूलतत्वांचा अभ्यास रावसाहेबांनीं घरीं चालविला होता, तो कसाकाय झाला आहे तें पाहण्यास विष्णुपंत केळकर यांस " मला प्रश्न विचारा " असा एकदां आग्रह धरिला होता.

मुंबईत असतां विठ्ठलशास्त्री भिडे, पनवेलकर नारायण शास्त्री पुराणिक, अप्पाशास्त्री नाशिककर, थोरात शास्त्री, पांडुरंग गोपाळ गुर्जर इ० प्रमुख विद्वज्जनांचा रावसाहेबांस सहवास घडला. नारायण शास्त्री द्रवीड या नांवाचे विद्वान शास्त्री रावसाहेबांनीं वाळकेश्वरीं रोज संस्कृताचा अभ्यास करण्याकरितां आणून ठेविले होते. त्यांच्या जवळ कौमुदी व भागवत या ग्रंथांचें वाचन रोज रावसाहेब करीत असत. हे शास्त्री कडक होते. ते एक दिवस ह्मणाले " संध्ये प्रमाणें जर संस्कृताच्या वेळीं बोलणें बंद होईल तर बरें " त्यावर उद्यांपासून प्रयत्न करीन असें रावसाहेब म्हणाले. ( २८।८।१८६० ची रोजनिशी )

संस्कृताच्या अभ्यासाशिवाय पुष्कळ महत्वाचीं इंग्रजी पुस्तकें त्यांनीं वाचलीं. वॉरन व ब्लॅकस्टन, कॅमेरानकृत हिंदुस्थान विषयक इंग्लंदाचीं कर्तव्यें, मिल्टनकृत पॅरेडाईस लॉस्ट व पाहिला आल्सिबायडिझ हीं पुस्तकें पेंढरकरां बरोबर वाचिलीं. जातिभेदावर आयरव्हिंग यांचे निबंध, प्लेटो, कोलब्रुककृत निबंध, हॉलकृत सांख्यज्ञान इ० पुस्तकें वाचिलीं. व

एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर पुरें केलें. रोज पहांटेस उठल्याबरोबर व निजावयाच्यापूर्वीं कांहीं तरी भाषांतराचें काम नेमानें करीतच असत. याशिवाय त्यांनीं आपली "कायद्याची चूर्णिका" दुरुस्त केली. असा रोजचा अभ्यासक्रम पाहून एकदिवस संस्कृतकाव्य म्हणणार तोंच शास्त्री बुवा म्हणाले " शरीररक्षणाकडे लक्ष न देतां अतिशय अभ्यासाचा मी निषेध करतों " १३।१।१८६० ची रोजनिशी. रावसाहेब कांहीं बोलले नाहींत.

याशिवाय डाक्तर हार्कनेस, मि. सिंक्लेअर, डॉ. रीड; सर अर्स्किन्, मि. हावर्ड यांच्याशीं कामासंबंधें यांच्या नेहमीं भेटी होत त्यावेळीं त्यांच्या संभाषणाचा फायदा मिळे. त्यावेळीं रावसाहेबांचें वय २६ वर्षांचें होतें. त्यांनीं पुष्कळ विद्वत्ता संपादन केली होती व करीत होते. ज्ञानकलि चांगली फुलूं लागली होती. जेथें विद्वज्जन जमत तेथें विविध विषयांवर चर्चा सुरु असे. हिंदुलोकांतील एक पत्नी जीवंत असतां दुसरी करणें याविषयीं नारायण दाजी यांसह वादविवाद (१३।१।१८५९ च्या रो. उ.) "आज बापुसाहेब कानिटकर यांचे घरीं बाळोबा पाध्ये, राघोबा पाध्ये, विनायकपंत बेरडे वगैरे आले होते. तेथें ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं वगैरे सरस विषय निघाले होते " ( १७ ४।१८५९ ची रोजनिशी.) "जगन्नाथ शंकरशेट यांचे जामात बाबाजी घरीं आले व मला शंकरशेट यांच्या बागेंतील बंगल्यांत घेऊन गेले तेथें विधवाविवाह व नीतिभ्रंशक नाच याविषयीं बोलणें झालें. ( १५।५ १८५९ ची रोजनिशी) आज नारायणशास्त्री यांबरोबर "मृत्युस्वरूप व लोकान्तर करण्याचें सर्वांस येणारें आमंत्रण याविषयीं संभाषण झालें. यावर मी पुष्कळ विचार केला आहे. त्याची दिशा मी स्पष्टपणें ठरविली आहे तथापि हा प्रश्न मला गूढ वाटतो. व तो सोडविणें मनुष्याच्या तर्काबाहेर आहे असें वाटतें " (८।७।१८६० ची रोजनिशी ) 'आमचे लोक

दरिद्री कां झाले याविषयीं पाध्ये यांजवळ बोलत होतों २०।७।१८६० ची रोजनिशी. याप्रमाणें रावसाहेबांचा बराच काळ विद्वद्गोष्टींत गेला.

याशिवाय सार्वजनिक कामांत रावसाहेब लक्ष घालीत असत. कर्नल जेकब यांचें स्मारक (डाक्तर भाऊ व नारायण दिनानाथजी यांच्या साहाय्यानें ), सार्वजनिक व्यायामशाळा ( करसनदास यांच्या साहाय्यानें ), ताम्रपटाचें वाचन ( डाक्तर भाऊकरितां ) इत्यादि कामें करीतच असत. कोठें गेले तरी जवळपासचीं दर्शनीय स्थळें पाहिल्याशिवाय तेथून जात नसत. पुण्यास परीक्षक या नात्यानें गेले असतां माणकेश्वराचे वाड्यांतील आरसेमहाल, व वाटेंत खंडाळ्याचे बोगदे पाहून आले. एकदां घारापुरीचीं लेणीं व विहाडचा तलाव पाहिला. १६।२।६० रोजीं लखमीदास यांबरोबर एका स्नेहाच्या घरीं गुजराथी महाराजांस त्यांचे भक्त झोंपाळ्यावर झुलवीत असतां "पुष्कळ बायकापुरुषांचा एकत्र कल्होळ पहाण्याचा प्रसंग आला". पण पुढें "महाराजा लायबलचे खटल्यांत" त्यांस साक्ष द्यावी लागली. हरिकीर्तनाला वगैरे जाण्यास यांतून वेळ काढीत असत. अद्याप त्यांची जशी शिकण्याची तशी शिकविण्याची हौंस पुरी झाली नव्हती. हरिपंत तात्या लिमये यांच्याकडील मुलांस (दाजी व बापू ) व प्रस्तुत लेखकाच्या वडिलांस इंग्रजी निबंध व भाषांतर शिकवीत असत. व दादाजी खत्री ( गांवांतील रावसाहेबांचे शेजारी ) यांच्या मुलास ( आत्मारामास ) इंग्रजी इतिहास शिकवीत. एवढ्या उद्योगपरंपरेंत आपल्या स्वतःच्या करमणुकीखातर २१४ तासच १८६० सालांत वेळ खर्च केला असेल. रामबाळकृष्णांकडे bagatelle नांवाचा खेळ एक दोन वेळां खेळले. बापूसाहेब बिनीवाले व विष्णुपंत भुपटकर यांबरोबर एक गंजिफांचा डाव खेळले व गोवर्धनपंत छत्र्यांबरोबर करमणुकीकरितां एकदां गायन व इतर गोष्टी झाल्या. या जागेवर असतां एकदां पितृदर्शन लाभ झाला. व त्या-

नंतर नानासाहेबांनीं कोट तुळसी वाहिल्या त्याचे संतर्पणार्थ रजा घेऊन रावसाहेब कोकणांत जाऊन आले. याच सालीं नानांची आई " बया " यांचा वृद्धापकाळीं अंत झाला. शेवटीं वेळेवर मुरूडास जाऊन आजीबाइस भेटूं शकलों नाहीं म्हणून रावसाहेबांस वाईट वाटलें. 'व ईश्वराची मर्जी' असें म्हणून त्यांस स्वस्थ बसावें लागलें. परंतु खरा दुःखाचा प्रसंग तो पुढेंच होता. 'धाकट्या व आवडत्या बहिणीचा ( आत्याबाईचा ) नवरा रत्नागिरि मुक्कामीं आजारानें वारला' असें दुःखकारक वर्तमान हरिपंत तात्यांचा कागद आल्यावरून समजलें. तीर्थरूप व मातोश्री यांचें सांत्वन करण्यास लागलेंच रावसाहेबांनीं पत्र लिहिलें, व " ब्रह्मदेवाच्या चुकीस कोणी प्रायश्चित्त सांगावें " असें म्हणून १८।८।१८६० ची रोजनिशी पुरी केली.

काया वाचा मनें करून रावसाहेब आपल्या जागेचें काम करीत असतां एके दिवशीं खालीं दिलेला प्रकार झाला. " मि. कोक ॲक्टिंग इन्स्पेक्टर यांनीं मला मि. हावर्ड डायरेक्टर यांचा हुकूम दाखविला. त्यांत त्यांनीं मि. कोक यांस डेपोची एकंदर व्यवस्था काय आहे त्याची बारीक तपासणी करावयास सांगितलेलें आहे. मि. कोक बोलतांना ह्मणाले मी बारा वाजतां कचेरींत येईन पण आले मात्र दोन वाजतां शिवाय ते ह्मणाले—प्रत्येक जण तुह्माला शिव्या देत आहे " हें जाणून रावसाहेबांस फार अचंबा वाटला. " अशा रीतीचें शिफारसपत्र मिळण्यास मी काय केलें आहे तें मला समजत नाहीं. मला नोकरी करावयाची आहे तोंपर्यंत मौन स्वीकारलें पाहिजे. माझ्या काय अडचणी आहेत त्या मी प्रथमच मि. हावर्ड यांस कळविल्या आहेत. मि. कोक यांस येथें पाठविण्यांत मि. हावर्ड यांचा मला सतवावें या शिवाय काय हेतु असावा ? " १८।१।१८६० ची रोजनिशी.

रावसाहेबांना ही गोष्ट जरा लागली. खरी स्थिती वर्णन केली म्हणून मी

सदोष कसा हें त्यांस समजेना. मी सत्य तेंच लिहीत जाणार व सत्यमार्गानें जावयास परमेश्वर मला शक्ति देवो असें म्हणून ते घरीं आले. शास्त्री बुवांशीं सत्यमार्गावलंबनाविषयीं थोडें भाषण रावसाहेबांनीं केलें. शास्त्री-बुवा म्हणाले कधीं कधीं असत्याश्रय करावा लागतो तेव्हां तो अदूष्यच्च आहे. त्यावर रावसाहेबांनीं म्हटलें “ असें व्हावयाचें नाहीं निदान असें असूं नये. सत्याविरुद्ध कोणतीही गोष्ट मी ऐकून घेणार नाहीं ” ( १८।१।१८६० ची रोजनिशी ) सेवाधर्म हा आतां रावसाहेबांस थोडासा कठीण वाटला असें दिसतें. स्वतंत्र धंदा करावा कीं काय याविषयीं लागलाच डॉ. भाऊंशीं वाद केला. भाऊनीं विरुद्ध मत दिल्यावर गोष्ट विचारावर राव-साहेबांनीं टाकिली. “ परंतु मुकुंदराव भास्कर यांना माझा स्वतंत्र धंदा करण्याचा विचार आवडला, तरी गोष्ट आणखी विचारावर टाकिली पाहिजे असें ठरविलें” ( २२।३।१८६० ची रोजनिशी ) पुढें चार दिवशीं मंगळदास भेटले. तेथें डा० भाऊही होते. एक शिकवणी रावसाहेबांनीं पतकरावी. अशी सोय डा० भाऊनीं काढली. ती मिळाल्यास नोकरी सोडण्याचा बेत केला. मुकुंदराव भास्कर यांचें तसेंच मत पडलें. पुढें पहातात तों जें काम करावयाचें होतें तें मंगळदास यांच्या युनायटेड स्पिनिंग मिल-च्या सेक्रेटरीचें काम होतें. गिरण्या चालवणाऱ्या कंपन्यांच्या सेक्रेटरीचें काम ह्मणजे दुटप्पी असतें असें कांहीं रावसाहेबांचे मनानें घेऊन तें काम त्यांनीं पतकरण्याचें नाकारिलें. शिवाय ही गोष्ट गुपित ठेवण्याचा संकेत असतां शापूरजीचे कानावर गेली, तेथून विनायकरावाच्या कानावर गेली ह्मणजे ती “ गॅझेटेड् ” झाली इ. प्रकारावरून ती जागा रावसाहेबांनीं विशेषें करून नाकारली. व एक दिवस मि. हावर्ड यांनीं त्यांस मि. गिब्स, प्राप्तीवरील कराचे कमीशनर, यांचें पत्र ३।१२।१८६० रोजचें दाखविलें. त्यांत त्यांनीं रावसाहेबांस आपल्या असिस्टंटच्या जागेवर मागून घेतलें होतें. व मि. हावर्ड यांच्या परवानगीनें त्या जागेवर रावसाहेब

लागलेच रुजू झाले. या जागेचा पगार ३५० रु. होता. प्राप्तीवरील कर कोणी किती द्यावा हें ठरविण्याचा अधिकार त्यांकडे होता. त्यावेळेस १५।११।१८६० रोजीं एक पत्र लिहून मेहेरबान हावर्ड साहेब यांनीं त्यांचें अभिनंदन करून पुढें प्रशंसापर मजकूर असा लिहिला:—" जिच्या चांगुलपणाची कबुली मी तुम्हांला आनंद होईल अशाप्रकारें दिली आहे त्या तुमच्या नोकरीला मी मुकणार ह्मणून मला फार वाईट वाटत आहे. तथापि लायक माणसें वेंचून त्यांस जबाबदारीचे कामावर कोणी योजिलें तर मला आनंदच वाटतो. तुह्मीं आपल्या नव्या जागेवर गेलां तरी ज्या जुन्या खात्यानें तुमच्या भरभराटीस आरंभ करून दिला त्याला तुह्मीं विसरणार नाहीं अशी मी आशा करतों ". रावसाहेबांची नेमणूक जरी येथें झाली होती तरी त्यांचा हक्क पहिल्या क्युरेटरच्या जागेवर ठेवलेला होता. व तेवढ्या करितां क्युरेटरच्या जागेवर ज्यांच्या नेमणुका करावयाच्या त्या पक्क्या करूं नये असा सरकारी ठराव मि. गिब्स यांच्या लिहिण्यावरून झाला होता, त्या योगानें रावसाहेबांचा हक्क त्या जागेवर राहिला होता.

## प्रकरण १३ वें.

# प्राप्तीवरील कराच्या कमीशनर साहेबांच्या कचेरींतील नोकरी.

**तावदाश्रीयते लक्ष्म्या तावदस्य स्थिरंयशः ।**
**पुरुषस्तावदेवासौ यावद्मानान्न हीयते ॥ १ ॥**

या कचेरींत रावसाहेबांचें काम ह्मणजे प्राप्तीवर कर कायद्याप्रमाणें कोणी किती द्यावा हें ठरविणें होतें. तें काम सोपें नव्हतें. तें रावसाहे-

नांस कसें गेलें त्याचें वर्णन जनरल जेकब यांस लिहिलेल्या एका पत्रांत त्यांनीं दिलें आहे. "प्राप्तीवरील कराचा वसूल करतांना आम्हांला फार त्रास पडला. परंतु माझे वरिष्ठ अधिकारी मि. गिब्स यांनीं वापरलेलें व्यवहारज्ञान व धरलेलें सामोपचाराचें वर्तन व कोणाची प्राप्ति किती आहे व कोणास किती कर द्यावा लागतो या विषयीं कांहींही बातमी कोणास कळूं न देण्याची आम्हीं घेतलेली खबरदारी, यांच्या योगानें आमची नौका आह्मीं आरंभींच उठलेल्या वादळांतून तडीस लावली." रावसाहेबांवर मि. गिब्स यांचा इतका विश्वास होता कीं कामाचा सर्व बोजा रावसाहेबांवर त्यांनीं टाकला होता. वरील कराच्या आकारणीविषयीं गुप्तपणा रहावा ह्मणून हिशोब ठेवण्याची एक नवीन पद्धत रावसाहेबांनीं शोधून काढिली होती. लोकांच्या नांवांबद्दल कांहीं सांकेतिक खुणा अथवा अक्षरें यांच्या साहाय्यानें सर्व हिशेब ते ठेवीत. हीं अक्षरें अथवा खुणा यांची जुळणी करून नेमकीं नांवें कशीं ओळखावीं याची लेखी मोडणी मात्र रावसाहेबांच्या खासगी पेटींत कुलपांत ठेवलेली होती. हिंदी लोकांवर जबाबदारी टाकिली म्हणजे काम करण्याची त्यांची योग्यता केवढी आहे हें या गोष्टीवरून समजतें.

मि. जेम्स् गिब्स, कराचे प्राप्तीसंबंधें मुंबई व मुंबई बेट या भागांकरितां मुद्दाम नेमलेले कमीशनर, यांनीं सरकारांत एक रिपोर्ट १८६१ सालीं सादर केला. त्यांत त्यांनीं खालीं दिल्याप्रमाणें रावसाहेबांविषयीं उल्लेख केला होता.

"रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांची कामगिरी नेकनामदार गव्हर्नर साहेबांच्या नजरेस आणल्याशिवाय मला या रिपोर्टाची समाप्ति करितां येत नाहीं. सर बार्टल फ्रियर यांच्या खासगत कारकुनीच्या जागीं अप्रकाश्य स्वभावाचें काम करीत असतांना या गृहस्थांशीं माझी ओळख झाली. तेव्हांच मी जाणलें कीं यांच्या अंगीं प्रचुर बुद्धिसामर्थ्य असून हे पूर्ण विश्रंभपात्र आहेत. यांना हिंदुसमाज व त्याचे व्यव-

3339

हार यांचें जें स्वतः मिळविलेलें ज्ञान आहे व असल्या बाबतींत कोठून कोठून माहिती मिळवावी त्याचे जे मार्ग यांस ठाऊक आहेत, त्यांच्या योगानें यांनीं मला जितकें साहाय्य केलें तितकें हे करूं शकतील असें प्रथमतः म्हणण्याची माझी तयारी नव्हती. ज्यांचा ज्यांचा या कामाशीं संबंध येईल त्या त्या सर्वांच्या विश्वासास पात्र होतां येईल अशा रीतीनें यांना करावें लागलेलें काम ज्यांना करतां येईल असे मला फारच थोडे इसम ठाऊक आहेत. ” जेम्स गिब्स.

थोडक्याच दिवसांनीं या खात्यामध्यें पूर्वीं कांहीं पैशाची अफरातफर झाल्याचें रावसाहेबांस आढळून आलें. रावसाहेबांनीं सर्व चौकशी करून एक रिपोर्ट वरिष्ठांस सादर केला. त्यांत आरोपीवर फौजदारी करावी असा अभिप्राय दिला होता. “ खटला केला असतां शिक्षा होईल इतका भरपूर पुरावा असल्याशिवाय सरकारनें या भानगडींत पडूं नये ” असें मि. गिब्स यांचें मत होतें. याचा शेवट एक दोन माणसें कामावरून दूर करण्यांत झाला. केलेला खटाटोप व्यर्थ गेला या गोष्टीनें दुसऱ्याच्या हाताखालीं काम करण्यानें मतस्वातंत्र्यास बाधा येते ह्मणून रावसाहेबांच्या मनास थोडा जांच झाला.

प्राप्तीवरील कराच्या स्पेशल कमीशनरच्या कचेरींत अशा रीतीनें काम करीत असतां रावसाहेबांची व पुष्कळ व्यापाऱ्यांची ओळख झाली. त्यांत लखमीदास खिमजी हे प्रमुख होते.

या जागेवर असतां रावसाहेबांना आपलें काम संभाळून, जुन्या म्हणजे क्युरेटरच्या जागेचें काम त्या जागेवर आलेल्या मनुष्यास तो नवीन असल्यामुळें कांहीं दिवस शिकवावें लागे. तेंही करून त्यांनीं आपलें ज्ञानार्जनाचें काम पुढें चालविलेंच होतें.

मुंबईस नामांकित शास्त्री होते त्यांच्या भेटी होत. रामगीता, मनुस्मृति, सिद्धान्तरहस्य ( गोकुलनाथजींच्या टिकेसह ), ऋग्वेद इ. संस्कृत

शा

ग्रंथांचें रावसाहेब पठण करीत. प्रो. मॅक्स मुल्लर यांच्या निबंधांचें वाचन करीत. मूर्तिपूजा व कर्ममार्ग इ. विषयांवर वे॥ बाळोपाध्याय गुर्जर यांच्याशीं चर्चा करीत. विनायकशास्त्री दिवेकर (ज्यांस उत्तरपक्षाची आवड पुष्कळ होती, ते) व पांडुरंग शास्त्री व तुळजारामशास्त्री यांच्या सारख्यां-जवळ सूर्यवंश व चंद्रवंश यांचें उन्नतिकारक स्वरूप व वेदांचा अधिकार इ. विषयांवर संभाषण करीत. ( २१–८–१८६१ रो. ) जातिभेद व वेद यांवर भाऊ सामलांसारख्या बाळबोध गृहस्थांजवळ बोलत. आणि लखमीदास खिमजी, गोकुळदास तेजपाळ, मंगळदास नथूभाई, डॉक्टर भाऊ, राम बाळकृष्ण, गोविंद नारायण इ. स्नेह्यांशीं विद्येपासून हल्लींच्या शिकलेल्या लोकांनीं काय काय केलें पाहिजे इत्यादि विषयांवर चर्चा करीत. मि. एडवर्ड न्हियॉट्सेक ( जे विविधविषयसंभाषणकुशल विद्वन्मणि होते ते ) भेटल्यावर " आडनांवें " या सारख्या कांहीं स्वैर पण बोधप्रद विषयावर वादविवाद करीत. शिवाय स्टूडन्ट लिटरारि सोसायटीच्या शाळांचें काम व मराठी ज्ञानप्रसारकांत लेख लिहिणें इ. व्यवसायही चालू ठेवीत. वेळांत वेळ काढून डाक्तर भाऊंबरोबर घारापुरी सारखीं स्थळेंही पहावयास जात. इतके सर्व व्यासंग चालले असतां, आपला आणखी अभ्युदय कसा होईल याचा विचार त्यांच्या मनांतून नष्ट झाला नव्हता. अल्प संतोष त्यांना ठाऊक नव्हता. नोकरीवर असतां मागें सांगितल्याप्रमाणें मन कष्टी होण्याला एकादें कारण उपस्थित होई. ही स्थिति इतरत्र सुद्धां होती. एकसारखी नोकरी करणें, यानें बुद्धीला मांद्य येतें असें कित्येकांचें ह्मणणें यांच्या कानावर येत असे. उदाहरणार्थ—कृष्णाजीपंत नूलकर यांनीं २२।७।१८६१ रोजीं एक इंग्रजींत पत्र लिहिलें होतें त्यांत ते ह्मणतातः- " आधींच खालावलेला कारकुनांचा धंदा दिवसानुदिवस अधिकाधिक खालावत आहे. पेन्शन घेण्याची खरी इच्छा होते. जो तुटपुंजा संग्रह केला आहे तेवढ्यावर तहान भूक भागवावी असें वाटतें. पण हें राहो. मला समा-

जांतून उठून गेल्याप्रमाणें वाटतें. उन्नतीचें नांव नाहीं. आमच्या आयुष्याचा दुसरा उपयोग होत नाहीं. निराकांक्षेनें चित्तास ग्लानि येते व पुढील सर्व चरित्र सन्मुख उभें राहून माझेकडे टक लावून पाहतांच 'विचार कर' ह्मणूनच मला सांगत आहे कीं काय असा मला भास होतो व माझ्या आयुष्यांतील उत्तम भाग अगदीं शुष्क रीतीनें गेल्याबद्दल माझा मलाच तिरस्कार वाटूं लागतो ".

अशाच तऱ्हेची खळबळ रावसाहेबांच्याही मनांत सुरू झाली होती. त्यांनीं स्वतांचे पर्वतप्राय गूण परमाणू प्रमाणें वर्णन करून एवं गुण-विशिष्ट एक मनुष्य आहे त्यानें अशा अशा विवक्षित स्थितींत काय करावें तें कृपा करून सांगा असें एका इंग्रज स्नेह्यास इंग्रजींत पत्र लिहिलें होतें. त्याच्या स्थल प्रतींत ज्याला उद्देशून हें पत्र लिहिलें होतें त्याचें नांव नाहीं. " मत्प्रियकर—आपला महामूल्य वेळ माझे करतां अल्प प्रमाणांत खर्च करावा अशी विनंति करण्याचें धाडस आपल्या परवानगीनें करीत आहें. पुढील जन्मकथा सदय अंतःकरणानें ऐकून घ्या; व या पत्राच्या अन्तिम खण्डांत वर्णन केलेल्या प्रसंगांत सांपडलेल्या एका मनुष्यास आपल्याकडून कांहीं साहाय्य मिळेल किंवा नाहीं तें कळवा व तसें करणें आपल्यास रुचेल कीं नाहीं तेंही सांगा. मिथ्यानाम देऊन त्या मनुष्याची जन्मकथा आपणापुढें ठेवल्याबद्दल मला क्षमा करा. खरा पुरुष मागें ठेवण्या करतां त्याला मिथ्या-नाम बुद्ध्या दिलें आहे. त्याचें खरें नाम विदित केलें असतां, मला वाटतें, आपलें मन त्याविषयीं पक्षपाती होईल अथवा न जाणों वेळेला विरुद्ध-भावनायुक्तही होईल तथापि आग्रह धरिल्यास त्याचें खरें नांव आपणास कळेल. समक्ष भेट न घेतां पत्रद्वारें भेट घेण्याचा उपक्रम केला आहे त्याचा हेतु एवढाच आहे कीं विचारलेल्या प्रश्नाला उत्तर असें द्यावें कीं तसें द्यावें याचा अगोदर विचार करण्यास आपणाला वेळ मिळावा.

येथें एक व्यक्ति आहे तिला आपण घटकाभर "अ" हें नांव देऊं. तो सरासरी २९ वर्षांच्या उमरीचा, सामान्य बुद्धीचा, कालेजांत मिळालेल्या बेताबाताच्या शिक्षणाचा असूनही कांहीं मोठ्या सरकारी हपीसरांच्या आदरास पात्र झालेला, व जीवनयात्रा करावयास निघालेल्या बरोबरच्या सहचरांशीं तोलून पाहतां उत्कर्षपथानें जितकें दूर जाणें हिंदी मनुष्याच्या वांट्यास येतें तितका दूर तो गेलेला आहे. या बाबतींत दैवास दोष देण्यास "अ"ला कारण नाहीं. तो अद्यापि नोकरी करीत आहे. तींत राहून त्याला अजून उत्तरोत्तर कांहींशी लाभवृद्धि होण्याची व अन्तीं पूर्वी केलेल्या सेवेबद्दल घरीं रिकामें बसून वेतन मिळण्याची अपेक्षा आहे. हें अर्थातच त्याच्या सद्वर्तनावरच अवलंबून राहील.

लोकांत सन्मान्य पदवी प्राप्त झाली असूनहीं "अ"ला असें कळून आलें आहे कीं गेल्या दहा वर्षांत त्याला कांहीं एक द्रव्यसंचय करितां आला नाहीं. हातानें मिळवावें व तोंडानें खावें असा रोजचा क्रम आहे. जर कांहीं दुर्दैवानें अपघात होऊन हातपाय मोडण्याचा प्रसंग आला तर पोटाकरतां दुसऱ्याचा आश्रय घ्यावा लागेल अशी त्यास भीति वाटत आहे. हिंदी लोकांच्या (ज्यांच्या नशीबीं दुसऱ्याच्या हाताखालींच काम करावें लागतें त्यांच्या) मार्गांत अडचणी तरी किति आहेत! दिवसांतील अमुक हा वेळ आपला, असें त्यांस ह्मणतां येत नाहीं. नोकरी शिवाय दुसरा धंदा त्यांस कायदेशीर रीतीनें करतांच येत नाहीं व लोकांपुढें असलेल्या प्रचलित विषयावर जर भावि कल्याणाची आशा असेल तर त्यांस तोंडही उघडतां यावयाचें नाहीं. नव्हे, त्यानीं उघडतांच कामा नये! ही जी मानसिक गुलामगिरी आहे ती फार विघातक होईल असें "अस" वाटत आहे, म्हणून एक व्यापारी त्याला हाताखालीं काम देण्यास मेहरबानीनें राजी झाला आहे. त्याचें अंतेवासित्व पतकरावें असें "अ"चे मनांत आहे. त्याच्या आणखी काय काय आकांक्षा आहेत त्या मला आपले जवळ सांगतां येत नाहींत. मला जें

कांहीं आणखी कळविण्याचा त्यानें अधिकार दिला आहे, तें एवढेंच कीं तो कष्टाळु आहे, इंग्रजी बरें लिहितो, हिशोबाचें काम जाणतो, आणखी अंगीं काय काय गूण आहेत त्यांची ओळख देणें हें काम प्रत्यक्ष अनुभवावर टाकणें त्याला आवडतें. स्वतांचें भांडवल आहे तेवढें सर्व तो बरोबर घेऊन येईल व तें कोणतें म्हणाल तर त्याचें एक डोकें व दोन हात!

या मनुष्या करतां आपण कांहीं करूं शकाल असें आपणास वाटतें काय? तो म्हणतो १० वर्षांपूर्वी असलें साहस त्याच्यानें सहज झालें असतें; त्याची हल्लीं समाजांत योग्यता वाढली आहे व तिचा दर्जा त्याला राखणें भाग आहे, तेव्हां चाकरीचें नियमितकाळांतलें नियमित व ठरींव उत्पन्न सोडून देणें वेडेपणाचें आहे; व ज्या रस्त्यानें नुसतें जावयाला सुद्धां शहाणे लोक भितील तेथें धांवत जाण्याचें धाडस करणें हा मूर्खपणा आहे. व त्याच्या विनंतीवरून मी एवढें लिहिलेलें लांबलचक भारूड स्वेच्छेनेंच आपल्याला त्रास देण्याकरतां आपलेकडे पाठविलें आहे व आपल्या वेळाचा व्यय करूं पहात आहें त्याबद्दल क्षमा मागून पत्र पुरें करतों."

या प्रश्नाचें उत्तर आलें नाहीं. आलें असल्यास उपलब्ध नाहीं.

रावसाहेब जरी नोकरीचा एक व्यवसाय करीत होते तरी नोकरी शिवाय आणखी दोन व्यवसाय आपण करावे असें त्यांस वाटत होतें. ते, एक व्यापार व दुसरा वकिलीचा अभ्यास. घराहून वडिलांचें एकदां पैशांचें मागणें आलें तेव्हां रावसाहेबांनीं उत्तर पाठविलें कीं मला सवड नाहीं. व्यापार करण्याचें मनांत आहे." त्यावर वडिलांनीं लिहिलें "मागें रत्नागिरीस ग्रंथ छापिला असाच (ह्मणजे ग्रंथ लिहून आपल्या हिमतीवर तो छापून मागाहून विकत बसणें हा) व्यापार असेल तर तो करावा असें आमच्या विचारांत येत नाहीं (१।९।१८१७ चें पत्र)

या वेळीं नानासाहेब लिमये यांनीं सुद्धां व्यापारांत पडूं नये असाच

उपदेश केला होता. कृष्णाजीपंत नूलकर यांस व्यापाराची कल्पना रुच-ली नाहीं. त्यांनीं रावसाहेबांस लिहिलें " एकादी तुमच्या गुणांस योग्य अशी—सुरेखशी सरकारी नोकरी मिळाली तर तुह्मांला बरी. पण व्यापा-रांत पडणें बरें नाहीं, असे मला साधारणपणें वाटतें. कोणता व्यापार करणार तें कळल्याशिवाय मला इतकें सुद्धां लिहितां यावयाचें नाहीं. पहिल्या वर्गाच्या मुनसफीच्या जागेवर आरंभ करावयास नाहीं का तुह्माला सांपडणार ! " ( ३।७।१८६० चें इं. प. ) करसनदास, रावसाहेबांस व्यापारांत ओढीत आहेत असें समजून हरि बाळकृष्ण लिमये यांनीं एक पत्र लिहिलें तें " करसनदास हे तरी नवीन व्यापार कर-णार. अनुभव घेतलेला नाहीं. भागीदार मिळवून ते आपले येकस्याचे नांवा-वर सवड सांपडेल तसा व्यापार चीन व विलायत या देशांशीं करणार. परंतु अनुभवशीर कोणी त्यांत सामील असेल तर फार चांगलें. मी एप्रिल महिन्यांत येईन तेव्हां समक्ष याचा विचार केल्यानंतर आपला भाग ठेवणेंच तर ठेवावा; पूर्वी ठेऊं नये. "

हे आप्तेष्टांचे मित्रे बोध रावसाहेबांस मानवले नाहींत. प्राप्तीवरील कराची आकारणी वसूल करीत असतां व्यापाऱ्यांचे हिशोब पहाण्याचे प्रसङ्ग फार येत. लखमीदास खिमजी, मंगळदास नथूभाई व करसनदास माधवदास इ. फार धूर्त धाडसी व सचोटीच्या व्यापाऱ्यांचा रोज सहवास घडूं लागला. त्यामुळें व्यापारांत होणाऱ्या फायद्याचें वर्म रावसाहेबांस कळूं लागलें. व व्यापार करून पहावा म्हणून ११।७।१८६१ रोजीं लखमीदास खिमजी यांस रावसाहेबांनीं गुजराथींत पत्र लिहिलें तें:— " विनंति जे हाल एकसो रुपयांनी नोट मोकली छे ते मारे खाते जमा करजो " इ. हा रावसाहेबांचा व्यापारांतील " ओनामा " होय. पुढील धडे शिकण्याचा त्यांचा विचार चालू होताच. " चांगली संधि आली असतां मी व्यापारांत शिरणार आहें. पण तसें घडणें हें

बरेंचसें परिस्थितीवर अवलंबून राहील " असें रावसाहेबांनीं डा. हार्कनेस यांस ११।९।१८६२ च्या इं. पत्रांत कळविलें होतें.

कायद्याचा अभ्यास करावा हेंही रावसाहेबांच्या मनांत पुष्कळ दिवसांपासून होतें. १८५३ सालांतच रेग्यूलेशनचीं पुस्तकें घेऊन त्यांचें वाचन रावसाहेबांनीं चालू केलें होतें. तें कळतांच नानासाहेब लिमये यांनीं रावसाहेबांस लिहिलें:—"रात्रौ जागरण करूं नये अशी माझी विनंति आहे. कालेजांत असतांना तुम्हीं कसे श्रम घेतां त्याचा मला पूर्ण अनुभव आहे म्हणून मी तुम्हांस लिहीत आहें" ( १८५३ च्या जून महिन्यांतील इं. पत्र). त्याप्रमाणेंच घराहून वडिलांनीं लिहिलें:— " तुम्ही हल्लींचे पत्रीं लिहितां कीं हपीसांत जातों; काम होईल तितकें करतों; दुसरें अधिक करीत नाहीं. परंतु फारसीचा अभ्यास चालविला आहे व कायद्याचीं बुकें नेवविलींच आहां. त्यास आमचें सांगणें इतकेंच आहे कीं, आहे विद्या इतकियानें निर्वाह आहे. आणि यद्यपि दुसरी करणें तर जेथें शरीर स्वस्थ व हवा चांगली तेथें करावयास येईल इतकियांत न साधे असें होणार नाहीं. व साहेबांची कृपा आहे तरी त्यांसच करुणा येऊन तुमची शक्ति पाहून बदलीही चांगले ठिकाणीं करतील. सरकारी काम मागील तुंबलें असेल तें मेहनत घेऊन चालत्ये तारखेवर आणूं पहाल तर तसें ही हवा अंगीं चांगली पडेतों करूं नये ". मागें एकदां रावसाहेबांनीं एकापत्रीं "न शरीरं पुनः पुनः" या चरणार्धाचा पूर्वार्ध काय म्हणून वडिलांस विचारलें होतें. व तो त्यांस वडिलांनीं कळविला होता, त्यानंतर लागलेंच नाना साहेब मंडलिक यांस कळलें कीं रावसाहेब अभ्यास करीत आहेत. तेव्हां नानासाहेबांनीं निकडीचें पत्र लिहिलें:—

" मुनसफीच्या कामास श्रम फार. हल्लींचे × कामास श्रम

× क्युरेटरच्या

कमी. आतां ही जागा कायम नाहीं तेव्हां पुन्हा पूर्वींची जागा करणें म्हणजे, फिरणें होत नाहीं सबब रजा किंवा राजी, घ्यावी, द्यावी लागेल. वेळ येईल तसें करावें लागेल व " न शरीरं पुनः * पुनः " याचा पूर्वार्ध विचारला होता त्याचें स्मरण देतों. दिवस कळवा म्हणजे मेणा अथवा डोली करून यावें. इकडे बरें वाटेल. दिवस कळवा म्हणजे रावजीस पुढें पाठवितों. "

सारांश सेवासुखासनावर बसलेलें त्यांचें मन एकाबाजूस व्यापार व दुसरे बाजूस वकिली यांकडे झोंके खाऊं लागलें. परंतु हळूहळू झोंका वकिलीच्या अभ्यासाकडेच झुकूं लागला. रास्तगोफ्तार–मध्यें लेख लिहीत असत तें काम रावसाहेबांनीं बंद केलें. परंतु अमूकच दिवसांत अभ्यास करावयाचा असा त्यांचा संकेत झाला नव्हता.

अभ्यासाकरतां रजा घ्यावी असा निश्चय करून एक वर्षाच्या बिन पगारी रजेचा अर्ज रावसाहेबांनीं केला. तो पाहून वरिष्ठांनीं रजा देत नाहीं असें म्हटलें; नाहीं म्हटलें तर म्हटलें, पण नाहीं म्हणतांना अपमानकारक शब्दांची योजना केली। ती रावसाहेबांस सहन न होऊन लागलाच त्यांनीं राजिनामा दिला. याचें वाचकांस आश्चर्य वाटेल. परंतु तें काम पूर्ण विचाराचें होतें. अविचाराच्या लहरींत कांहीं तरी केलेलें मागाहून पश्चात्तापास कारण होणारें चंचल वर्तन नव्हतें असें पुढील प्रकरणावरून समजेल.

---

* हा सर्वचरण असा आहे

॥ पुनर्दारा पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः ॥

## प्रकरण १४ वें.

# नोकरीचा राजिनामा.

सहसा विदधीत न क्रियाम् ।
अविवेकः परमापदां पदम् ॥
वृणते हि विमृश्यकारिणम् ।
गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥ १ ॥ (किरात)

रावसाहेबांच्या पायांत सेवाशृंखला कशी दृढ होत गेली त्याचा परिचय वाचकांस झालाच आहे. आतां या प्रकरणांत तिचे दुवे हळूहळू ढिले होऊन तटकन कसे तोडले गेले त्याचें वृत्त संक्षेपानें दिलें आहे. "बगींतून बसून मि. अर्स्किन यांकडे गेलों. बोलतांबोलतां सरकारी शाळांस मदत करण्याविषयीं बोलणें निघालें. लोकांकडून लिहून घ्यावयाच्या करारनाम्याविषयीं बोलणें निघालें. 'माझ्या अमूक तारखेच्या—मला वाटतें गेल्या दिसेंबर महिन्यांतल्या—पत्राची नक्कल तुम्हांजवळ आहे काय ?' असें मि. अर्स्किन यांनीं मला विचारलें. मीं म्हटलें 'माझ्याजवळ नाहीं पण मि. हार्कनेस यांजजवळ आहे.' तरमग मि. अर्स्किन म्हणाले 'मि. हार्कनेस यांजजवळून घ्या'. हें वृत्त मि. हार्कनेस यांस कळवितां त्यांस राग आला असें दिसलें. आणि मग मि. हार्कनेस ह्मणाले 'तुह्मीं मि. अर्स्किन यांजवळ बोललेतच आहांत त्यांच्या कचेरींतूनच घ्या.' एवढें झाल्यावर मी पत्रांची फाईल तशीच ठेविली. मि. अर्स्किन यांनीं वांद्रें येथील शाळांविषयीं मि. हार्कनेस यांजवळ कांहीं गोष्ट काढावयास सांगितली होती. परंतु मि. हार्कनेस जरा चिढलेले दिसल्यामुळें शब्दांचा उगाच व्यय करावा असें वाटलें नाहीं. मीं त्यांस मदत केली नाहीं असें त्यांनीं आपल्या भाषणांत

सुचविलें! वाहवा! माझ्या श्रमांचा चांगलाच मोबदला मिळाला म्हणावयाचा!" ( २३-६-१८५६ ची रो. इं )

रात्रंदिवस कायावाचा मनेंकरून काम करणाऱ्या रावसाहेबांस हा मोबदला निराशाजनक वाटला असला तर काय नवल!

" मि. बासवेल यांस भेटण्यास घोड्यावर बसून गेलों. ते म्हणाले. 'मला काम आहे. जर कांहीं महत्वाचें काम असेल तरच भेट होईल.' तसलें कांहीं काम नसल्यामुळें मी घोडा फिरवून गांवाकडे धांवडवीत आलों. असल्या लोकांस भेटणें मला आवडत नाहीं. याच्यापुढें मी मि. बासवेल यांस बहुधा भेटणार नाहीं. परंतु व्हिजिटर या नात्यानें माझें काम मला उत्तम करावयाचें असल्यास, ज्या लोकांचा मी द्वेष करतों—अर्थात हा द्वेष राष्ट्रभिन्नत्वापासून सहजीं उत्पन्न होणारा नव्हे, पण असल्या व्यक्ती गर्विष्ठ व कोपप्रकृति असतात म्हणून उत्पन्न झालेला आहे—त्या लोकांशीं मला स्नेह ठेविला पाहिजे. प्रत्येक इंग्रज कर्नल जेकब असला पाहिजे अशी आशा करतां कामा नये. परंतु अधिक स्वतंत्र स्थितीची प्राप्ति करून घ्यावी असें मला वाटतें" ( १८५६ ची रो. इं. ) वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून अपमान व ज्यांचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशा इतर अधिकाऱ्यां पासूनही झालेला अपमान पाहून स्वातंत्र्याची ज्योत रावसाहेबांचे मनांत उत्पन्न झाली असावी. परंतु ती एकदम प्रदीप्त न होण्यास वडिलांच्या कर्जाचें तीवर झांकण पडलेलें होतें.

".नाणीझ या गांवासंबंधाचा अर्ज लिहून वडिलांकडे पाठविला. गांव जप्तींत असल्यावेळच्या उत्पन्नाची सर्व बाकी सरकारांतून परत मिळेल अशी खात्री आहे. मग माझे वडील ब्रम्हस्वांतून मुक्त होतील व नोकरी लवकर सोडून देण्याचे माझे बेत पुरे करतां येतील; परंतु तूर्त हे बेत मनोराज्यांतील आहेत. वेडेपणाची आशा करावयास लावून

वंचना करणारे आहेत! परमेश्वरावर भरंवसा ठेवितों म्हणजे सर्व नीट जुळून येईल. परमेश्वर दयाळू आहे. ज्यानें आम्हांस जन्माला घातलें आहे जो नित्य आम्हांकडे वात्सल्यानें पाहतो, तोच आम्हांला सततचा आधार आहे." ( १०।२।१८५७ रो. इं. )

"सरकार माझे वडीलांस नाणीझचें दरम्यानचें उत्पन्न देईल. मग मी ठरविला आहे तितका पैसा जमवीन आणि आजपासून ७ वर्षांनीं सरकारी नोकरी सोडीन. खाजगी मनुष्याप्रमाणें स्वतंत्र राहूं लागेन व आनंदानें परमेश्वराचे आभार मानीन." ( २०।२।१८५७ रो. इं. )

"चेंम्बरच्या पुस्तकांत ध्येय या विषयावर एक स्फुट वाचलें. माझ्या पुढें कांहीं ध्येय आहे का? याचा विचार करूं. होय. माझ्यापुढें एक ध्येय ठेवलेलें आहे; पण तें फार दूर आहे. तें कोणतें तर प्रामाणिकपणें उद्योग करून निदान ६० हजार रुपये मिळवावयाचे व मग स्वतंत्रपणें रहावयाचें. हें काम सोपें नाहीं. प्रथम कामाचा वीट सोडला पाहिजे व उद्योग सतत करण्याची संवय जोडली पाहिजे. १८५२ सालीं मी कच्छमध्यें असतांना कर्नल जेकब ह्मणत असत कीं न्यायखातें साऱ्यांत उत्तम. पण माझ्या वयाचीं अद्यापि २५ वर्षें पुरीं झालीं नसल्यामुळें मला त्या बाजूनें कांहींच करतां आलें नाहीं. सदर कोडतें मला परीक्षेला बसूनच देत नाहींत. येत्या मार्चमध्यें माझ्या वयाचीं २५ वर्षें पुरीं होतात; मग मला परीक्षेला बसून उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ( १८।५।१८५७ रो. इं. उ. )

पुढील महिन्यांत रेग्युलेशनें वाचण्यास रावसाहेबांनीं आरंभ केला.

रावसाहेब स्वहिताकरितां नोकरींत शिरले होते हें खरें आहे परंतु नोकरींत असतां लोकहिताची चिंता त्यांस वाटून लोकहित करण्याचें साधन नाहीं यामुळें त्यांस खेद होई.

" लायब्ररींत जाऊन वाचून आलों. मध्यें अगदीं कंटाळा आला. कां तें समजत नाहीं. परंतु मन विरस झाल्यासारखें वाटलें. आपल्या हल्लींच्या हुद्यापासून लोकांस विशेष उपयोग होत नाहीं असें वाटलें. आणि किंचित् वाईट वाटलें. परंतु हें नीट नाहीं. परमेश्वराच्या इच्छेनें सर्व नीट होतें, त्यापेक्षां हें नीटच आहे. " ( १६।९।१८५७ रो. )

क्युरेटर असतांना मि. हॉवर्ड यांनीं रावसाहेबांच्या रिपोर्टावरून त्यांचें काम तपासण्यास मि. कोक यांस पाठवून दिलें व त्यांनीं रावसाहेबांस ह्मटलें कीं जो तो तुम्हांस शिव्या देत आहे. हे शब्द ऐकून रावसाहेब संत्रस्त झाले होते वगैरे हकीकत मागें आलीच आहे. हा प्रकार नोकरीचा वीट आणण्यास अंशतः कारण कसा झाला तें वृत्त मागें आलें आहे.

प्राप्तीवरील कराच्या कलेक्टरच्या कचेरींत मोठ्या अधिकाराची हौस बाळगणारे एक अधिकारी होते. रावसाहेबांस आपल्या हाताखालीं मागून घेण्याचा यांचा मानस होता. मि. गिब्स म्हणाले:—" मिस्टर अमुक अमुक यांनीं येऊन मला विचारलें कीं–' तुमचें काम संपलें असल्यास रावसाहेब मंडलिक यास माझ्या मदतीस तुमची अडचण केल्याशिवाय पाठवूं शकाल कीं नाहीं ? '–मी त्यांस नाहीं म्हणून सांगितलें आहे. " पुढें मि. गिब्स यांनीं रावसाहेबांस सांगितलें " मी तुम्हांला त्यांच्या हाताखालीं केव्हांहीं जाऊं देणार नाहीं. मिस्टर अमुक अमुक हे माझे केव्हांपासून ओळखीचे आहेत. आपल्या हाताखालीं उगाच पुष्कळ लोक जमवावे एवढीच त्यांची हौस आहे. " ( १४।१।१८६० रो. ) येथेंच प्रसंग आल्यास वरील व्यक्तीचें व रावसाहेबांचें पटणार नाहीं अशी प्रस्तावना मि. गिब्स यांनीं करून ठेवली म्हणावयाची ! व पुढें रावसाहेबांस असें कळलें कीं १८६१ च्या अक्टोबर महिन्यांत मि. गिब्स हे रजा घेऊन विलायतेस जाणार व तीन वर्षें परत येणार नाहींत. " आतां मला जरा इकडे तिकडे पाहिलें पाहिजे. मि. गिब्स यांच्या जागेवर अमुक

येणार ! × × आपल्या हाताखालच्या हिंदी मनुष्याचा स्वतंत्र व सरळ बाणा त्यांस आवडेल कीं नाहीं याचा वानवाच आहे. हिंदी नोकर झटला कीं साधारणपणें त्याला स्वतंत्र अस्तित्वच नाहीं व मी एक दिवस मि. गिब्स यांस सांगितलें त्याप्रमाणें काम करतांना आपला सारासार विचार वापरून एकादी गोष्ट करण्याची त्याला फक्त एका अटीवर परवानगी असते. ती कोणती तर केलेली गोष्ट वरिष्ठांस पसंत न पडल्यास त्याचें प्रायश्चित्त भोगावयास त्यानें सज्ज असलें पाहिजे ही होय ! इंग्रजी संस्थांतलें वर्म आह्मांस कसें कळत नाहीं असें कर्नल जेकब विचारीत, त्याचें उत्तर माझे जवळ आहे. तें हें कीं आमच्या पुढें रोजचीं उदाहरणें असल्यावर नुसता तोंडचा उपदेश आह्मांला काय करायचा ! इंग्रजी संस्थांचा जेवढा चांगुलपणा आहे, तेवढा प्रथम कबूल करतों ( कारण या संस्थांच्या इतक्या उत्तम संस्था तार्किक दृष्टीनें पाहतां—व्यावहारिक दृष्टीनें नव्हे हो !—कोठेंही नाहींत. ) व विचारतों कीं इंग्रज आपल्या वर्णाबद्दल जितके जबाबदार आहेत तितकेच जबाबदार आम्हीं आपल्या वर्णाबद्दल असतां, असा वर्णभेद कां ? ” ( १५।२।१८६१ रो. इ. )

---

मि. गिब्स यांच्या मागें त्यांचे जागीं येणाऱ्या अधिकाऱ्याशीं आपलें पटणार नाहीं हें त्यांस कळून आलेंच होतें व तसें घडूनही आलें. “नवे स्पेशल कमीशनर यांनीं एका व्यापाऱ्याच्या संवत् १९१६ च्या जमा खर्चाच्या वह्या तपासल्या व १९१७ सालच्या तपासल्या नाहींत व जें कर्ज वसूल होण्याचा मुळींच संभव नाहीं तें बाद केलें नाहीं. या प्रकरणाचा निकाल लागल्यावर दुसऱ्या व्यापाऱ्याच्या वह्या तपासतांना कमीशनरनीं १९१७ सालच्या वह्या तपासल्या व १९१६ सालच्या तपासल्या नाहींत. ही गोष्ट त्यांच्या मी नजरेस आणली, त्याचा त्यांस राग आला. कारण त्यांची विसंगतता दाखवून दिली तें त्यांस रुचलें नाहीं. व ‘ मी १९१६

च्या तपासल्या, ' असें म्हणाले. माझी खात्री आहे कीं त्यांनीं या वह्या तपासल्या नाहींत. या व्यापाऱ्यानें वह्या आणल्या होत्या; परंतु त्या तपासण्याचें नाकारून कायद्या विरूद्ध वर्तन केलें. मी त्यांस कायदा काढून दाखविला व त्यांची चूक आहे असें सांगितलें. तरी ते माझें ऐकेनात व १९१७ सालच्या मात्र वह्या तपासल्या. त्याचें कारण मला वाटतें त्या वह्यांवरून जी त्यासालीं शिल्लक निघत होती ती १९१६ सालच्या वह्यांतील शिलकीहून अधिक असावी असें वाटतें." हें तत्वाला सोडून वर्तन झालें असें रावसाहेबांस वाटलें. पूर्ण विश्वासानें सर्व काम रावसाहेबांवर सोंपविलेलें होतें व आतां त्यांत विनाकारण फरक नव्या कमीशनरनें केला असें वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं रावसाहेबांनीं सर बार्टल फ्रियर, मुंबईचे गव्हर्नर, यांची परेळच्या बंगल्यांत भेट घेतली. त्यांनीं रावसाहेबांस कायद्याचा अभ्यास करण्याविषयीं उपदेश केला. रावसाहेबांनीं सालीसिटरची परिक्षा द्यावी असें कित्येकांच्या मनांत होतें. " करसनदास माधवदास यांनीं मला ॲटर्नीच्या ( सालिसिटर होण्याबद्दल जी आगाऊ द्यावी लागते त्या ) फी ची रकम उसनी देण्याचें अभिवचन दिलें. पण ती घेण्याचें मी नाकारलें. मध्यंतरीं मी खावें काय ? " शेवटीं २१।११।१८६२ रोजीं कायद्याच्या अभ्यासास आरंभ करून दिवाणी काम चालविण्याचा कायदा रावसाहेबांनीं वाचावयास घेतला. ६० पासून १०० कलमें रोज वाचीत असत. १८६३ च्या जानेवारी महिन्यांत रावसाहेबांनीं रजा मागितली. तो अर्ज वाचून मि. राबर्टसन चीफ सेक्रेटरी यांनीं त्यांस बोलाविलें व रावसाहेब जवळ जातांच म्हणाले" तुम्हांला रजा मी देणार नाहीं. सरकारी नोकरी म्हणजे आपली, इतर कामें करण्याची एक सोय झाली असें तुम्हीं समजतां ! " ( ३।१।१८६३ रो. ई. ) हे शब्द रावसाहेबांना सहन होण्यासारखे नव्हते. त्यांनीं लागलाच जागेचा राजिनामा दिला.

क्षुद्र कारणावरून अथवा कारणावांचून वरिष्ठांनीं चिढणें, जो गृहस्थ सहवास ठेवण्यास अनुचित आहे त्याशीं नोकर म्हणून सहवास ठेवण्याची अवश्यकता, स्वतंत्रपणें राहण्याची मोठी आवड, सरकारी हुद्यावर असतां लोकहित नियमित प्रमाणानेंच हातून होण्याची शक्यता, सरळभावानें काम करीत असतां वरिष्ठांच्या मनांत संशयास थारा मिळणें व काम करतांना रावसाहेबांच्या इतक्या कर्तृत्ववान पुरुषालाही स्वतंत्र अस्तित्व नसणें, इत्यादि सेवेचे अनुभव येत गेल्यावर, इमानें इतबारें नोकरी केल्याची कर्नल जेकबपासून मि. गिबूस यांच्या पर्यंत सर्व अधिकारी ज्यांची वाहवाच करीत आले त्यांस उद्देशून रजा देण्याचें नाकारतांना असले अपमानकारक शब्द वरिष्ठांनीं उच्चारले म्हणजे रावसाहेबांच्या महारंभरचनायुक्त सेवामंदिराच्या खालीं सहानुभूतिशून्य अधिकाऱ्यांनीं सुरुंग भरून ठेवला होता, त्यावर ठिणगीच लाविली म्हणावयाची !

रावसाहेबांनीं ताबडतोब एक अर्ज लिहिला, त्यांत रजा न दिल्यास सर्व सरकारी नोकरीचा ( ह्मणजे प्राप्तीवरील कराच्या कचेरींतील जागेचा व शाळा खात्यांतील क्युरेटरच्या जागेचा ) हाच राजिनामा समजावा, असें लिहिलें व आपल्या कडून मोकळे झाले !

रावसाहेबांनीं नोकरी सोडली परंतु तीपासून त्यांस कांहीं फायदे झाले. ‘ ज्यांस उत्तम धनी व्हावयाचें असेल त्यांनीं प्रथम उत्तम नोकर व्हावें ’ अशी ह्मण आहे. इंग्रज सरकारच्या राज्यकारभारांतील शिस्त ह्मणून जो गुण आहे, जी शिस्त पाळली जाते ह्मणून सर्व खात्यांतील कामें यंत्राप्रमाणें सुरळीत चालतात, ती रावसाहेबांचे अंगांत पूर्ण जडली. वकिलीचीं कामें, नेटिव्ह ओपिनियन पत्राचें काम, कांहीं स्नेह्यांचे रावसाहेब ट्रस्टी होते त्यांचीं कामें, घरच्या व मुंबईच्या प्रपंचांचीं व काउन्सिलचीं कामें इ. कामें निरनिराळ्या सरकारी खात्यांप्रमाणें त्यांवर मनुष्यें नेमून आपण स्वतां त्यांच्यावर देखरेख ठेऊन सुरळीतपणें रावसाहेब जन्मभर चालवूं शकले.

सरकार पुष्कळ लोकांचीं मतें मागवून त्यांचा खल करून नवा कायदा करतें अथवा जुन्यांत दुरुस्ती करतें त्याच प्रमाणें एकाद्या कायदे कानू संबंधें रावसाहेबांस मत द्यावयाचें झाल्यास स्वतः तज्ज्ञां कडून मतें मागवून आपली खात्री करून घेत व मग मत देत, ही सरकारी पद्धति त्यांनीं उचलली होती.

रावसाहेबांच्या हातून राज्यकारभाराचीं कांहीं कामें झालीं त्यामुळें राज्यकारभारांत काय काय अडचणी येतात त्या त्यांस कळून आल्या ह्मणून ज्यावेळेस सरकार एकादा कायदा करावयास निघे त्या वेळेस त्याची अवश्यकता दिसल्यास त्यास पाठिंबा रावसाहेब देत असत. शहरांतील मुलांस सक्तीनें देवी टोंचविण्याच्या कायद्यास गोस्तनदेवींचीलस वापरण्याच्या अटीवर रावसाहेबांनीं संमति दिली. नोकरींत असतांच त्यांना कर्नल जेकब सारख्या, मि. गिब्स सारख्या इंग्रज गृहस्थांचा परिचय झाल्यामुळें जरी "प्रत्येक इंग्रज गृहस्थ जेकब नाहीं" असें त्यांस आढळलें तरी तो न्यायमूर्ति फोर्ब्स आहे, नामदार वेडरबर्न आहे, डॉ- बर्डवुड आहे असें आढळून आलें.

याहून मोठा फायदा व तो सर्वांत मोठा होता, तो हा कीं रावसाहेबांची व्यापकबुद्धि न्यूनतर बुद्धीच्या मनुष्यास लायक असें काम एकावेळीं एकच करीत बसून संकोच पावत होती ती, तिला अमर्याद अवसर प्राप्त झाल्यामुळें, न्यायाचे कोर्टांत, म्युनिसिपॅलिटींत, विश्वविद्यालयांत, कायदेकानू करणाऱ्या राजसभेंत आपल्या प्रभावानें स्वतंत्रपणें लोकहितार्थ संचार करूं लागली !

## प्रकरण १५ वें.

# वकिलीचा अभ्यास.

**यो मे गर्भगतस्यादौ वृत्तिं कल्पितवान् प्रभुः ।**
**शेषवृत्तिविधानाय स वै सुप्तोऽथवा मृतः ॥ १ ॥**

राजिनामा दिल्याबद्दल रावसाहेबांस मुळींच वाईट वाटलें नाहीं. उलट मि. राबर्टसन यांनीं कांहीं दिवस राजिनामा बाजूला ठेवून दिला होता, तो लवकर स्वीकारावा, माझी फार गैरसोय होत आहे असें त्याचा स्वीकार होण्यापूर्वीं रावसाहेबांस लिहावें लागलें. तेव्हां ११ नोव्हेंबर १८६२ रोजीं दिलेला राजिनामा मंजूर करावयाचा दिवस १८६३ त फेब्रुवारीच्या २४ तारखेस उजाडला. याचें कारण असें दिसतें कीं रावसाहेबांच्या स्नेह्यांनीं मध्यस्थी केली त्यांत खुद्द गव्हर्नर सर बार्टल फ्रियर हे एक होते असें एका रावसाहेबांच्या पत्रावरून दिसतें. तेव्हां शेवटीं अशी शक्कल निघाली कीं रावसाहेबांचा राजिनामा कमीशनरच्या कचेरींतील नोकरीचा तेवढा घ्यावा. म्हणजे ते आपल्या क्युरेटरच्या जागेवर ( त्यांचा तीवर हक्क ठेवला असल्यामुळें) परत सहजींच जातात. व रजा देणें ती त्या जागेवर ते आहेत असें समजून द्यावी. तशी वर्षाची रजा त्यांस देण्यांत आली. ३१ जानेवारी १८६३ रोजीं नामदार गव्हर्नर साहेब ( सर बार्टल फ्रियर) यांस रावसाहेब भेटावयास गेले व "पक्का राजिनामा देण्याचें प्रत्यक्ष कारण झालें तें निवेदन केलें. ' तुह्मी आपलें नेहमीचें शहाणपण येथें वापरलें नाहीं ' असें गव्हर्नरसाहेब पहिल्यानें म्हणाले. नंतर मी एकंदर परिस्थितीचें स्पष्टीकरण केल्यावर ' तुम्हाला काय पाहिजे असेल ती मदत मी करीन ' असें मागाहून म्हणाले." रावसाहेबांच्या वडिलांस

राजिनामा दिला हें आवडलें नाहीं. त्यांनीं लिहिलें:—"चाकरी सोडण्याचा अभिप्राय कसा तो कळवावा. तो, व्यापार अगर स्वस्थ घरीं बसणें; त्यास चाकरीचें ऐश्वर्य नाहीं असें माझे बुद्धीनें. मग बेतास येईल तसें करावें." शेट करसनदास माधवदास यांची भेट ८।१।१८६३ रोजीं झाली. " तूर्त तुम्हीं मला मदतगार म्हणून माझ्या व्यापाराच्या धंद्यांत येतां काय ? " असें रावसाहेबांस त्यांनीं विचारिलें. रावसाहेबांनीं त्यांचे आभार मानून सांगितलें कीं, एप्रील महिन्यांत वकिलीच्या परीक्षेस बसणार आहें. तेथपर्यंत उत्तर देण्यास वेळ पाहिजे. परीक्षेला अवकाश अवघा तीन साडेतीन महिन्यांचा होता; तरी सुद्धां रावसाहेब नुसतीं परीक्षेचीं पुस्तकें घेऊन एकान्तांत बसले नव्हते. लिटलगोची परीक्षा चालली होती तेव्हां फेब्रुवारी महिन्यांत उमेदवारांवर देखरेख करीत होते. बी. ए च्या परीक्षेंत मराठी विषयांत मे. कॅन्डीबरोबर लेखी व तोंडीं परीक्षा घेत होते. सिंधी भाषेंत याचवेळेस हे परीक्षक होते. एकदां पहिल्या बी. ए. च्या परीक्षे संबंधानें कमिटी होती. तिच्या कामाला आरभ व्हावयाचा होता; कारण प्रो. वर्डस्वथ,व नामदार वेस्ट हे कागद तपाशीत होते.दरम्यान अवकाश सांपडला म्हणून रावसाहेब, मि. पिन्हे यांस भेटून आले. शिवाय नित्य संध्याकाळीं बाळ मंगेश वागळे, नूलकर व भागवत इ० मित्रांबरोबर समुद्रावर फिरावयास जात असत. जगन्नाथ शंकरशेट यांच्या नातीच्या लग्नसमारंभा सारख्या बड्या समारंभास हजर असत. स्टूडन्ट लिटररि सोसायटीचें काम बघत असत. एल्फिन्स्टन् च्या इतिहासाचें गुजराथी भाषांतर छापविण्याचें काम चालविलें हातें तें पहाण्यास छापखान्यांत जात असत. तेथें एकाद्या दिवशीं तीन तीन तास बसत. युनिव्हर्सिटीच्या परीक्षेच्या कमिट्या भरत तेव्हां जात असत. महादेव गोविंद रानडे यांच्या सारख्यांचें ज्ञानप्रसारक सभेंत व्याख्यान झालें तर तें चुकवीत नसत. अभ्यासाची वेळा थोडी सकाळीं, थोडी मधल्या वेळीं व थोडी रात्रीं अशी योजिली होती. पहिल्यानें एकटेच

अभ्यास करीत. मग मग शान्ताराम नारायण व अणणतराव भास्कर हे येत असत. कधीं कधीं विष्णुपंत केळकर येत असत व बामनराव पटवर्धन यां बरोबर वकीलाचा ( गाईड ) मार्गदर्शक वाचीत असत. कधीं कधीं ( जागा कोठें व वेळ केव्हां ?) तर " शिंव येथील किल्ल्यांत मेजर कॅन्डी यांचे येथें परीक्षेचे कागद तपाशीत असतां वेळ मिळाला तेव्हां. " अभ्यास करीत ( २०।३।१८६३ रो. इं. उ. )

वकिलीचा अभ्यास चालला असतांच बाळ मंगेश वागळे यांनीं एका बनारशी विद्यार्थ्याच्या आईची दुःखकारक कहाणी सांगितली. तिची सोय केल्याशिवाय रावसाहेबांस चैन पडेना. लगेच दुसऱ्या दिवशीं आपले स्नेही लखमीदास, गोकलदास तेजपॉल व खटाव मकनजी यांकडून १२५ रु. आणून दिले. ( २४।३।१८६३ रो.इं) कायद्याचें चांगलें ज्ञान होण्याकरितां रामप्रसाद रॉय यांच्या सारख्यांची टीका ( दिवाणी काम चालविण्याच्या कायद्यावरची ) वाचीत असत व हिंदुधर्मशास्त्रांची चर्चा कांहीं मुद्यांवर विनायकशास्त्र्यांबरोबर करीत असत.

असें करतां एप्रील महिना उजाडला. परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांचीं नांवें हायकोर्टांत दाखल करण्याची वेळा आली. रावसाहेबांची इतरांबरोबर १० ते ५–३० पर्यंत रखडपट्टी झाली. हें राजिस्ट्रार मि. पिन्हे यांस समजतांच आतां तुह्मीं जा उद्यां आलेत तरी चालेल असें ह्मणाले. दुसऱ्या दिवशीं नांव दाखल झालें तेव्हां मि.समर्स यांनीं रावसाहेबांच्या जवळचे प्रशंसापर दाखले पाहिले. तेव्हां ते उपदेश करूं लागले व म्हणाले "असल्या उत्तम उत्तम नेमणुका मिळाल्या असतां त्या सोडून कां जातां तें समजत नाहीं !" त्यांना गप्प बसाविण्याकरतां "नामदार गव्हर्नर यांच्या उपदेशावरून" असें रावसाहेबांनीं सांगितलें. एप्रीलची तिसरी तारीख उजाडली. आतां जेव्हां परीक्षेला ३ तीन दिवस उरले, तेव्हां मात्र आपल्या रुग्णाईत स्त्रीला पुण्यास औषधोपचारार्थ पाठवून दिलें. चवथ्या-

तारखेला रावसाहेबांनीं सात तास अभ्यास केला तसाच पांचवीला. परंतु रात्रौ गणेशशास्त्री व नारायण शास्त्री यांशीं गप्पा सांगत बसले.

सहावीला परीक्षेला प्रारंभ झाला. ती पांचवाजेतों चालू होती म्हणून युनिव्हर्सिटीच्या कॉनव्होकेशनला ( पदवीदानाच्या समारंभास ) जावयास मिळालें नाहीं. ( ६।४।१८६३ रो. इं उ. ) रावसाहेबांस याकाळीं संग्रहणीचा विकार जडला होता. त्यामुळें परीक्षेच्या दिवशीं एक दिवस प्रश्नांचा कागद देऊन लवकर उठून यावें लागलें ! तें पाहून रावसाहेबांस परीक्षेंत यश येणार नाहीं अशी काळजी त्यांच्या मित्रांस वाटली. तेव्हां "मीं माझ्या कामापुरतीं उत्तरें दिल्याशिवाय उठलों नाहीं" असें रावसाहेबांनीं त्यांस सांगितलें तेव्हां त्यांचीं मनें स्वस्थ झालीं. लेखी परीक्षा संपून तोंडी परीक्षेला अवकाश होता तितक्यांत रावसाहेब एक दिवस जगन्नाथ शंकरशेट यांकडे लेडी फ्रियर यांस मेजवानी होती तेथें गेले होते. दुसऱ्या दिवशीं परेळ येथें सरकार वाड्यांत होती तेथें गेले होते व तिसऱ्या दिवशीं रॉयल एशियॉटिक सोसायटीची सभा होती तिला गेले होते.

एके दिवशीं परीक्षेंत एका विषयांत फार खुबीदार प्रश्न विचारला होता. एका काल्पनिक खटल्यांतील कागदपत्र उमेदवारांना वाचून दाखविण्यांत आले. व त्यांचा सारांश त्यांस टिपून घेण्यास सांगून त्यावरूनच हुकूमनामा काय देणें तो लिहावयास सांगितला. १३ व्या तारखेस दुपारीं तोंडी परीक्षा होती. तरी रावसाहेब लेडी फ्रियर विलायतेस जावयाच्या होत्या त्यांस पोंचविण्यास अपालो बंदरावर गेले होते. दुपारीं तोंडीं परीक्षा झाली. " तोंडीं प्रश्नांचीं उत्तरें फार चांगलीं दिलीं. उत्तीर्ण होण्याची मला आशा आहे" ( १३।४।१८६३ रो. ) दुसऱ्या दिवशीं १४ व्या तारखेस परीक्षेचा निकाल लागला. गणपतराव भास्कर, शान्ताराम नारायण व रावसाहेब उत्तीर्ण झाले.

## प्रकरण १६ वें.

# व्यापार.

॥ पश्य कोटिद्वयोपेतं लक्षाय प्रणतं धनुः ॥

रावसाहेबांची परीक्षा उतरल्यावर सनद आपल्या तर्फे काढून घेण्याकरतां शान्ताराम नारायण यांस वकील पत्र देऊन रावसाहेब प्रथम पुण्यास गेले. तेथें मागें सांगितल्याप्रमाणें त्यांच्या पत्नीस औषधोपचारार्थ ठेविलें होतें त्यांनां भेटावयाचें होतें. तेथें जाऊन पहातात तों औषधपाण्याची व्यवस्था नीट झाली नव्हती ती त्यांनीं प्रथम केली. मग मित्र नारायणभाई दांडेकर, केरोपंत, नाना बर्वे, व विष्णुपंत भूपटकर इ० मंडळीस भेटले. नंतर लखमीदास खिमजी यांच्या बरोबर कराचीस जाण्यास २२ एप्रील रोजीं निघाले. तेथें व्यापारा निमित्त कांहीं इमारती बांधावयाच्या होत्या त्यांची जागा पहाणें, नकाशे तयार करणें कंत्राटदाराकडे काम सोंपवून देणें. इ० गोष्टी लखमीदास यांस करावयाच्या होत्या. “ मीं परीक्षेनंतर स्वच्छंदपणें पर्यटन करून आलों ” असें रावसाहेबांनीं मि. गिब्स यांना लिहलें होतें.

लखमीदास व रावसाहेब यांनीं कराचीच्या आसपास बऱ्याच ठिकाणीं प्रवास केला. बळवंतराव दफ्तरदार, कृष्णाजीपंत बाळ, महादेवशास्त्री पुराणिक, मुनशी नंदराम, शमसूद्दीन तय्यबजी; इ० पुष्कळ स्नेही भेटले. त्यांतच वसई येथें मुसनफ असतां ज्याच्या विरुद्ध रावसाहेबांनीं रिपोर्ट केला होता तोही उत्तमराम ...... भेटला ! येथें आल्यावर रावसाहेबांनीं कराची येथील हिंदूक्रिकेट क्लबाकडून एक आप आपसांत खेळांचा सामना करविला व स्वतां खेळावयास गेले ! “ अगदीं अनभ्यस्त

असल्यामुळें माझे दांडू एकदम निरस्त करण्यांत आल्यामुळें माझा डाव गेला. ” “ प्रत्येकानें दाखविलेलें सौजन्य व मित्रभाव तसाच प्रत्येकास झालेला आनंद पाहून” रावसाहेबांस फारच सौख्य झालें. दुसरे दिवशीं त्या मंडळीस आभार प्रदर्शक पत्र लिहून कांहीं रकम लखमीदास खिमजी व आपण मिळून बक्षिस दिली. व त्या रकमेंतून तंबू किंवा बिचोवा घेण्यास लिहिलें.

पुढें एक दिवस सुरतसिंगाचें गाणें ऐकून मुंबईस येण्यास निघाले.

नंतर पुन्हा पुण्यास पत्नीला भेटण्यास गेले. प्रकृतींत सुधारणा दिसली. तेथें नाना भिडे, मोरो रघुनाथ ढमढेरे, मोरोबा कानोबा, आबासाहेब पटवर्धन, दादा कानिटकर व कृष्ण शास्त्री यांस भेटले व मुंबईस आले. कांहीं दिवसांनीं त्यांनां पुन्हा पुण्यास जाऊन पत्नींस मुंबईस परत आणावें लागलें कारण तेथें राहून प्रकृति पुन्हा बिघडूं लागली. मुंबईस आले, परंतु वकिलीकडेच त्यांचें सर्व लक्ष नव्हतें. १८५५ सालीं सिंध मध्यें असतांच त्यांस कंपनींतले भाग विकत घेण्याचा नाद लागला होता. त्यांनीं सिंध रेलवे कंपनींत तीन भाग घेतले होते. ते व्यापाराकरतां होते कीं नुसते पैसे फायदेशीर रीतीनें अडकवून ठेवण्याकरतां होते तें समजत नाहीं.

कराचीहून परत आल्यावर कपाशीच्या भावाच्या तारा यांच्याकडे रोज खेळूं लागल्या होत्या. आणि १८६३ सालीं तर लखमीदास खिमजी यांची व रावसाहेबांची भागी झाली होती. याचवेळेला रावसाहेब लखमीदास यांस इंग्रजी शिकवीत असत. १८६३ सालीं व्यापाराचें क्षेत्र वाढूं लागलें. कावसजी एदलजी ह्या हुशार पार्शी व्यापाऱ्याची व यांची गट्टी झाली. व चीन देशांत अफूच्या पेट्या रावसाहेब पाठवूं लागले. अफूची ने, आण, जमशेटजी व नसरवानजी मेथा आणि मंडळी करीत असे. “तेजी असेल तर ५ पाटणाच्या पेट्या पाठवा” असा हुकूम दिल्याचा

उल्लेख १८।३।१८६३ च्या रोजनिशींत सांपडतो. नोटींचा व्यापार थोडा थोडा चालू असे. "संत्राल ब्यांकचे शेअर वीस, श्रावणाचे वायद्याचे, काल रोजीं विकले आहेत. दर शेंकडा तीस रूपये प्रमाणें. बाजार तेजीवर खरा परंतु ब्यांकेचा हिशोब तयार झाला. त्यांत पंचवीस हजारांची खोट गेल्या दिसंबरा पर्यंत बाकी राहिली आहे. तो हिशोब उदईक वर्तमानपत्रांतून बाहेर पडेल नंतर भाव घटेल किंवा कसें नकळे." ( २९।६।१८६३ चें हरि बाळकृष्ण लिमये यांचें पत्र )

यानंतर रावसाहेबांच्या मनांत व्यापार करावा कीं न करावा अशी चलबिचल चालू झाली तिचा तात्पुरता परिणाम म्हणूनच कीं काय त्यांनीं आपली लखमीदास खिमजी यांबरोबर असलेली भागी तोडून टाकिली ती संबंधें रावसाहेबांच्या २६।१०।१८६३ च्या रोजनिशींत उल्लेख आढळतो तो.

माझी तुमच्याशीं असलेली भागी येत्या दिवाळीपासून तोडून टाका, असें जेव्हां रावसाहेबांनीं लखमीदास खिमजी यांस सांगितलें तेव्हां "ही दिशा चांगली आहे. सोडूं नका असें त्यांनीं आग्रहानें सांगितलें. मी त्यांच्या मोहक वचनाला भुललों नाहीं व मी माझे बेत वारंवार इतके बदलीत आलों आहे कीं याच्यापुढें एकदांही बदलतां कामा नये. जरी लखमीदास यांनीं घालून दिलेल्या मार्गानें गेल्यास द्रव्याची अधिक प्राप्ति होईल तरी तेणेंकरून समाजांतील प्रतिष्ठेंत जास्ती भर पडणार नाहीं व इतकें म्हटलें तर पैसा म्हणजे काय पदार्थ आहे ? पैसा असून कल्याण करण्याची सत्ता पाहिजे व लोक तुमचें ऐकतील एवढें समाजांत वजन पाहिजे" २६।१०।१८६३ रो. इं. उ.

गोविंद आप्पा बाळेकर यांस "चांगली संधि पाहून कापूस गलबतांत माझे करतां भरावा असें" रावसाहेब १८६४ सालीं सांगत असत.

कोणी बळगी आप्पा नांवाचे गृहस्थ देशावरील तेल, तूप, गूळ इ. किराणा मालाचे भाव वारंवार रावसाहेबांस कळवीत असत. त्यांनीं एकदां रावसाहेबांस लिहिलें कीं फार दूरदेशाहून हे युरोपीयन लोक थोड्याशा भांडवलावर व्यापार करतात व आह्मीं हिंदी लोक त्यांच्याहून फार श्रीमंत असून त्यांच्याच नोकरीस राहून आपले पैसे कुलपांत ठेवण्यांतच सुख मानितों ! ( २६।८।१८६५ चें पत्र. )

बर्मा ट्रेडिंग कंपनी, ब्रिक्स कंपनी इ. नव्या घाडशी कंम्पन्या मुंबईस याच सुमारास निघाल्या होत्या त्यांचे भाग रावसाहेब घेत असत.

दादाभाई नवरोजी यांनीं एक लंडन ब्यँक नावाची पेढी विलायतेस स्थापन केली होती. ती यशस्वी झाली नाहीं. ती बुडूं लागल्यावर तिनें दुसऱ्या एका बुडत्या कंपनीचा आधार घेतला ह्मणजे तिच्याशीं आपला मिलाफ केला व दोघीही कंपन्या बुडाल्या. यांत रावसाहेबांचें फार नुकसान झालें. रावसाहेब व धीरजलाल यांनीं या मिलाफा संबंधें फिर्यादी केल्या होत्या त्यांचा उपयोग झाला नाहीं. या ब्यॉंकेचे भाग रावसाहेबांनीं नफा मिळविण्याकरितांच घेतले होते असें नाहीं. हिंदीलोकांनीं काढलेल्या धंद्यास उत्तेजन देण्याकरितांच त्यांनीं ते घेतले होते. व दुसऱ्यांकडूनही घेवविले होते. या ब्यँकेचा मुंबईचा व्यवहार सदानंद बाळकृष्ण हे चालवीत असत.

तिकडे वकीलीचा बेत चांगला बसला होता तरी व्यापाराचें अद्यापि मनांतील बेत ढांसळले नव्हते, ते अधिक बद्धमूलच होऊं लागले. शेअर घेण्याचा मोह अधिकच सुटत होता व आपल्याजवळ पैसे नसले तरी दुसऱ्या जवळचे आणूनही शेअर खरेदी करावे असें रावसाहेबांस वाटलें म्हणून त्यांनीं कांहीं दिवसांपुरती कांहीं रकम एका मित्राजवळ मागितली. रावसाहेबांसारख्या कुळास केव्हांही पैसे देण्यास हरकत नसतां तो नाहीं म्हणाला व आपण नखशिखांन्त कसे वायद्यांच्या नादीं लागून कर्जांत बुडून

गेलों आहोंत तें खेदकारक वृत्त त्यानें उघड करून सांगितलें. तें ऐकून रावसाहेब चकित झाले. व त्यांनीं मेथाजीला हुकूम दिला कीं बाबारे! माझे पैसे जर शिलकींत नसतील तर दुसऱ्याचे घेऊन केव्हांही शेअर घ्यावयाचे नाहींत. ( १०।९।१८६४ रो. इं. उ. )

करसनदासनें इंपीरियल बँकेचे शेअर घेववले. करसनदास म्हणतसे "सर्व शिकलेल्या लोकांनीं व्यापारांत पडावें.सुधारा वगैरे सर्व सोडा."वैशाखाच्या वायद्यांचा हिशोब मेथाजीनीं दिला नाहीं सबब गोपाळ बळवंत यांस रावसाहेबांनीं (१३।११।१८६४)रोजीं भागी बंद करण्यास लिहिलें. सदरहू गोपाळ बळवंत यांनीं रोजच्या रोज नीट हिशोब ठेविला नाहीं म्हणून रावसाहेबांस झालेल्या नुकसानी पेक्षां वाईट वाटलें. "मला रोजच्या रोज चोख हिशोब ठेवणारा मनुष्य पाहिजे. तोटा झाला तरी मी परवा करणार नाहीं असें करसनदास यांस त्यांनीं कळविलें." १४।११।६४ रो.

अमेरिकेच्या उत्तर व दक्षिण या दोन भागांतील संस्थानांची गुलामांच्या व्यापारानिमित्त आपसांत लढाई सुरू झाल्यामुळें त्या देशांत कपाशीची लागवड अगदीं बंद झाल्यामुळें हिंदुस्थानांतील कपाशीला मागणी फार आली व तिचा दर सारखा वाढत जाऊन थोडक्यांत बहुलाभाची अपेक्षा करणाऱ्या मंडळीला कांहीं सारासार विचार सुचेनासा होऊन सट्टयांचा प्रकार परकाष्ठेला पोंचला. तेव्हां लांबून पहाणारे विचारी लोक आतां पुढें काय होणार तें आधींच भविष्य करूं लागले होते; त्यांपैकीं डॉ. हार्कनेस हे होते. १७।४।१८६५ च्या एका पत्रांत रावसाहेबांस डाक्तर साहेबांनीं असें कळविलें "गेल्या कांहीं थोड्यावर्षांपर्यंत मुंबापुरीनें ऐश्वर्यपथानें जितकी धांव मारली आहे तितकी मारण्याचें दुसऱ्या एकाद्या शहराच्या किंवा प्रांताच्या वांट्यास आलेलें विरळा. हें असेंच पुढें सतत चालेल असें समजूं नये. व सावध होऊन माझे मित्र, पुढें येणाऱ्या संकटापासून आपलें रक्षण करतील अशी आशा करतों.

संस्थानांची सामग्री आतां सरत आली आहे. काहीं ना काहीं तरी अटींवर तह झालाच पाहिजे असें बहुतेकअंशीं ठरलेलेंच आहे म्हणून सट्टेकरतांना व्यापारीवर्गानें पूर्ण सारासार विचार केला पाहिजे ".

जेथें रावसाहेब जात तेथें शेअरांची गोष्ट निघे. शेठ करशेटजी नसरवानजी कामा यांकडे कांहीं कामानिमित्त गेले होते तेथें त्यांनीं विचारिलें " कांहीं शेअरांची देवघेव किंवा व्यापार करतां कीं नाहीं ? " रावसाहेब म्हणाले माझे जवळ तूर्त २५ बँकेचे शेअर आहेत. " मग कामाजी म्हणाले " आम्हीं तुमचे करतां कांहीं कामगिरी करूं. " रावसाहेबांनीं कामगिरी करावयास सांगितलें नाहीं. परंतु असें दिसतें कीं १८६५ मध्यें रावसाहेबांचें नुकसान फार झालें. त्यांनीं एक दिवस करसनदास माधवदास यांस सांगितलें कीं ह्या माझ्या हिशोबांच्या वह्या घ्या व हिशोब पुरा करा. मला फार सट्टा बसला आहे. ही आफवा लवकरच सर्वत्र झाली असें पुढील पत्रांवरून दिसतें.

" लोक ह्मणतात तुम्हीं पंचवीस हजार रुपयांना खालीं आलां. " ( २२।५।१८६६ चे रामभाऊ उदास यांचें पत्र. )

रावसाहेबांचे समकालीन दक्षिणी स्नेही या व्यापारापासून दूर रहात व म्हणतः–सरकारी नोटांचा व्यापार तेवढा तुमच्या कामाचा आहे. फार तर प्रसिद्ध व्यापारी खंडाप्पा गुळवे यांचा मुंबईकर मुनीम तुमचा मुनीम होऊं शकेल व तुम्हांस लागेल तो माल, तो दलाली घेऊन पुरवील व तुम्हीं त्यास पुरवावा. इतकें म्हणण्या इतके ते पुढें जाऊन सरकारी नोकरांनीं व्यापार करूं नये असा निर्बंध नाहीं का असें विचारून लागलेच मागें जात म्हणून बुडाले नाहींत.

याच्या पुढें रावसाहेबांनीं सर्व व्यापार सोडला. बारीक सारीक बर्फ तयार करणाऱ्या कंपन्या, ज्यांस भांडवल थोडें लागतें व बर्फाचा खप

सतत असतो म्हणून फायदेशीरही होतात, त्यांतही आग्रहास्तव सुद्धां शेअर घेत नसत. यापुढें व्यापाराविषयीं कोठेंही उल्लेख त्यांनीं केलेला आढळत नाहीं. मात्र एखादा पारिभाषिक शब्द पूर्वीं केलेल्या व्यापाराच्या स्मृतीचा अवशेष म्हणून त्यांच्या पत्रव्यवहारांत येत असे. "मी चाले पर्यंत तुम्हांवर वरात करणार नाहीं" असें एकापत्रांत कोंकण येथील त्यांचा व्यवहार पहाणारे विष्णुपंत जोगळेकर यांस पत्र लिहिलें होतें. वरात या शब्दाचा अर्थ कळला नाहीं. असें जोगळेकर यांनीं भीतभीत विचारल्यावर त्यांस रावसाहेबांनीं लिहिलें कीं " वरात ह्मणजे रुपये देण्याची चिठ्ठी, ती हल्लीं मुंबईत करीत नाहींत "

## प्रकरण १७ वें.

# प्रथम ग्रंथलेखन

**सकृदुक्तगृहीतार्थो लघुहस्तो जितेंद्रियः।**
**शब्दशास्त्रपरिज्ञाता एव लेखक इष्यते॥ १ ॥**

रावसाहेब वकिली करूं लागले तेव्हां त्यांच्या आयुष्याच्या अतिमहत्वाच्या भागास आरंभ झाला. त्याच्या वर्णनास प्रारंभ करण्यापूर्वी विद्यापीठांत असतांना व नोकरींत असतांना रावसाहेबांनीं जी साहित्य-सेवा केली तिचें संक्षिप्त वर्णन या प्रकरणांत दिलें आहे. रावसाहेबांचा पाहिला निबंध उपयुक्त ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचला गेला. ही संस्था मुंबई एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें १।९।१८४८ रोजीं स्थापित झाली होती. तिचा उद्देश व्याख्यानें देऊन व निबंध वाचून ज्ञानाचा प्रसार करणें हा होता. पुढें लवकरच सभासदांनीं सभेंत दिलेलीं व्याख्यानें व

वाचलेले निबंध छापून काढण्याकरितां संस्थेनें ज्ञानप्रसारक नांवाचें मासिक पुस्तक काढिलें. त्याच्या दर अंकाची किंमत अगदीं अल्प ह्मणजे ४ आणे ठेविली होती. संस्थेचे कामदार खालीं दिल्या प्रमाणें होते.

| | |
|---|---|
| दादोबा पांडुरंग | अध्यक्ष |
| महादेव गोविंदशास्त्री | उपाध्यक्ष व चिटणीस |
| विनायक हरिश्चंद्रजी | खजीनदार |

व्यवस्थापक मंडळीचे सभासद

वरील तीन गृहस्थां शिवाय, आणखी नारायण दिनानाथजी, लक्ष्मण नृसिंह जोशी, नारायण विष्णु व दाजी परशुराम हे होते.

सभा, दर गुरुवारीं भरत असत. या सभेच्या सभासदांतील कांहीं लेखक व त्यांचे विषय खालीं दिले आहेत.

| लेखक | विषय |
|---|---|
| प्रो. केरो लक्ष्मण छत्रेः— | भरती व ओहोटी, कालसाधन, हवा,इ०. यांचे निबंध सचित्र व सकोष्टक असत. |
| बाळ भास्करः— | हिंदुलोकांची स्थिति—बाळाजी विश्वनाथ कारकुनाचा पेशवा झाला. महादाजी शिंदे खिजमतगाराचा राजा झाला. हरिपंत फडके पाणक्याचा मंत्रि झाला. कुतुबुद्दिन गुलामाचा बादशहा झाला. अशी आठवण देऊन "मनावर घ्या व उद्योग करा" असा उपदेश लेखकानें या निबंधांत केला आहे. |
| विश्वनाथ नारायणः— | व्यवहारशास्त्राचे उद्देश व लाभ. |
| जनार्दन हरि आठल्येः— | विद्या. |
| हरि केशवजीः— | शिक्षेपासून लाभ |

( टांकी घाय साहे । पाषाण देव झाला आहे ॥ )

भास्कर दामोदर पाळंदे:— सृष्टिसौंदर्य.
मुंगीच्या संसाराचें वर्णन.

लमक्ष्ण शास्त्री हळबे: —
अर्थ ज्ञानाविणें श्रुति नसे थोर । वैदिक हे भार वहाति वृथा ॥

इतके उपयुक्त विषय त्यांतील एका सभासदानें म्हटल्याप्रमाणें "लेकरांनीं चालविलेल्या संस्थेंत येत असत." "या लेंकरांनीं चालविलेल्या संस्थेंत" सर्वच लेखक अथवा व्याख्याते लेंकरें नसतील पण रावसाहेब मात्र लेकरूंच होते कारण व्यवहारशास्त्रावर त्यांणीं निबंध लिहिला त्यावेळेस त्यांच्या वयाला १५ पुरीं होऊन सोळावें वर्ष लागण्याचा सुमार होता. तेव्हां यांच्या कोंवळया लेखणीचें उद्यावण झालें त्या प्रसंगीं वर वर्णन केलल्या षड्रस पक्वान्नांचा आस्वाद तिला मिळाला. त्यामुळें पुढें तीच लेखणी जून झाल्यावर रसपुष्ट लेख लिहूं लागली.

यानंतर द्यूतनिषेध ही कल्पित गोष्ट लिहून याच मासिकांत त्यांनीं छापविली. तींत द्यूतादिव्यसनांपासून अपाय कोणते होतात तें दाखवून कष्टानें मिळविलेलें द्रव्य यशास येतें असें तात्पर्य दिलें आहे. *

## संवयी आणि अभ्यास

रावसाहेबांचा पहिला ग्रंथ म्हणजे "संवयी आणि अभ्यास" हा होय. हा आकृतीनें लहान आहे पण महत्वानें थोर आहे. रावसाहेबांनीं एवढी विद्वत्ता व एवढा मोठेपणा कसा मिळविला या प्रश्नाचें उत्तर हा ग्रंथ देत आहे. अमेरिका खण्डांतील डाक्तर जान् टाड् यांणीं केलेल्या "विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक" या पुस्तकाच्या संक्षेपावरून कांहीं व कांहीं अन्यस्थलीं संपादिलेल्या ज्ञानावरून रावसाहेब "स्वकल्याणाचा एक

* रावसाहेबांचा या व्यसनावर कटाक्ष होता. मुंबईतून आगगाडी सुटली म्हणजे कुर्ल्याच्या पुढें जुगार किती चालतो तें सांगून कांहीं उपाय योजण्यास स्वतंत्र रितीनें पोलीस कमीशनरकडे त्यांनीं एक अर्ज केला होता.

उपाय"म्हणून एक ग्रंथ लिहीत होते. त्याचे दोन भाग होते.१संवयी व २ अभ्यास. या भागांस "व्याख्यानिक" स्वरूप देऊन रावसाहेबांनीं प्रथम पृथक्‌पणें ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचिले व नंतर १४।१०।१८५७ रोजीं ते एकत्र करून छापिले तेव्हां " हा ग्रंथ निदान एका पुरुषास जर चांगल्या संवयी लागण्यास कारणीभूत होईल तर सर्व श्रम हरतील " अशी इच्छा रावसाहेबानीं प्रस्तावनेंत प्रदर्शित केली आहे.

हा ग्रंथ त्यांनीं आपले मानलेले गुरू व मित्र कर्नल ली ग्रॅन्ड जेकब यांस " लोक सुधारणेचा लहानसा उपाय " ह्मणून कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. या ग्रंथाचा सारांश असा आहे:—

आपल्या लोकांस उतरती कळा प्राप्त होण्यास सत्य व उद्योग यांचा अनादर होत गेला हें कारण होय. आहार निद्रा इ० पशुसाधारण क्रियांमध्यें आमच्या लोकांच्या उद्योगाचें पर्यवसान होतें. आणि तो उद्योगही मनस्वी होतो तेणें करून प्रवृत्ति मार्गाची सिद्धि होत नाहीं. मनुष्याच्या उत्पत्तीचा हेतु काय ? कर्तव्य अकर्तव्य काय? मनुष्यासारख्या उच्चस्थितीच्या प्राण्यानें ईश्वराच्या अगाध करणीचा शोध लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असंख्य सृष्ट्यंतर्गत व्यापारांच्या नियमांचें उद्घाटन केलें पाहिजे; व त्यापासून लोकोपकार करण्यास प्रवृत्त झालें पाहिजे. असा उद्योग करण्याची प्रवृत्ति होण्यास आमच्या लोकांच्या संवयी बदलल्या पाहिजेत.

संवयी सहज लागून जातात; त्यांतून ज्या वाईट त्या तर लवकरच जडतात. त्यांचीं बन्धनें तोडणें पायांतील बिड्या तोडण्याहून दुर्घट आहे.

एवढ्याकरतां ज्यांपासून मुहूर्ता मुहूर्तास तुमचें सौख्य व उपयुक्तता, वृद्धि पावतील अशा संवयी पाडून घ्या. त्या येणें प्रमाणें.

१ प्रत्येक दिवशीं काय करावयाचें त्याचा पूर्वी संकेत करून ठेवण्याची.

२ सतत श्रम करण्याची.

निरुद्योग्याच्या तोंडीं जी म्हण आहे ती अशी " धांवण्यापेक्षां चालणें बरें; चालण्यापेक्षां निश्चल उभें राहणें बरें; उभें राहण्यापेक्षां बसणें बरें व बसण्यापेक्षां पडून राहणें बरें ! " असा निरुद्योगी दयेस पात्र आहे.

आमचे लोक कालसंपत्ति किती बेसावधपणें उधळून टाकीत आहेत ! ही संपत्ति जोंवर व्यर्थ जात आहे तोंवर हा देश संपत्तिमान होऊन आपल्या योग्यतेनुसार उच्च स्थितीप्रत पावेल ही अपेक्षा करणें मौर्ख्य आहे.

३ सतत उद्योग चालवणें भलत्याच्यानें होणार नाहीं याकरतां तिसरी संवय जडवून घेतली पाहिजे ती मनोनिग्रह करण्याची.

विचार करून उतावीळपणा सोडा. कांहीं उद्योग काढला असतां आमच्या लोकांत हा प्रश्न पुढें येतो " यापासून तूर्त फायदा काय तो सांगा ! " शिजे तंव ज्यांस धीर नाहीं त्यांस मग पिके तंव कोठचा ! दूर लाभावर दृष्टी ठेवा.

४ कालनियमाची.

अहो ! जे केवळ पोटार्थी, ज्यांचा केवळ परान्नावर निर्वाह, तेही कोणी अत्यादरें आमंत्रण केलें असतां कालातिक्रम केल्या वांचून रहात नाहींत, मग इतरांकडे पहाण्यासच नको; फार काय ! या ज्ञानप्रसारक सभेंतही सभासदांचा वरील दोषाविषयीं निषेध करण्याचे प्रसंग मागें आले होते.

५ प्रातःकाळीं लवकर उठण्याची. लवकर उठतां यावें म्हणून लवकर निजणें अवश्य आहे.

६ जो पुरुष भेटेल त्यापासून कांहीं उपदेश घेण्याची. या जगांत सदोदित डोळे उघडे ठेविले पाहिजेत तसे कानही ठेविले पाहिजेत.

ज्ञान जें संपादन करावयाचें त्याला स्थैर्य पाहिजे ह्मणून आणखी एक संवय पाहिजे ती,

७ आपल्या वृत्तींविषयीं व कृती विषयीं दृढ विचार करण्याची.

जो विषय पहावयाचा असेल तो वर वर पाहूं नका. पुरते पणीं पहावयास अवकाश नसेल तर अवकाश मिळे तों थांबा व मनन करून विचारांस स्थैर्य आणा.

८ शरीर व पोषाख, साधीं, स्वच्छ व नीट ठेवण्याची. शरीर हें आत्म्याचें घर आहे त्याची अंतःस्वच्छता ठेवा व बाहेरून पोषाखाची ठेवा.

९ जें काय करणें तें चांगलें करण्याची. उदाहरणार्थ कांहीं लोक घाईघाईनें अशीं टिपणें करून ठेवतात किंवा पत्रें लिहितात कीं कांहीं दिवसानीं त्यांचीं त्यांसच वाचत नाहींशीं होतात.

१० आपल्या मनोवृत्ती स्वाधीन ठेवण्याची.

११ तारतम्य विचारशक्ति दृढ करण्याची.

१२ आईबाप, मित्र आणि सोबती यांशीं योग्य रीतीनें वागण्याची. मित्र जोडावे ते निवडक व निस्पृह असावे. जुन्यांशीं संघटण ठेवावें व नवीन पाडावें. कारण या नाशिवंत जगांत स्थलांतरानें व मरणानें इतके फेरफार होतात कीं जो सांप्रतच्या काळांत नवीन स्नेह जोडीत नाहीं त्यास लवकरच मित्र नाहींसा होतो.

### अभ्यास.

कोणत्याही देशाच्या मोठेपणाची इमारत सत्य व उद्योग या दोन मजबूत चिऱ्यांवर उभारावी लागते. या दोहोंसही अभ्यासाची जोड लागते. पोटापुरतें मिळवून स्वस्थ बसूं नये. शाळांतील अभ्यास हा मार्ग दाखविण्याकरतां आहे. पहिली शाळा सोडल्यावरच वास्तविक अभ्यास दुसरी शाळा जें जग त्यांत सुरवात होते. विद्या ह्मणजे ज्ञान तें मिळविणें, हें काम शेवटपर्यंत चालणारच आहे. परिमित आयुष्यांत

अपरिमित ज्ञानसागर काय आपण उल्लंघणार आहों ? ह्मणून आपण सर्व आमरणान्त विद्यार्थी आहों असें समजून अभ्यास कसा करावा या विषयीं सुचना.

१ नित्याभ्यासाचें कालमान

बहुधा दिवसास सहा तास याप्रमाणें अगदीं मनाचा होईल तितका निग्रह करून व्यासंग केला असतां पुरे. एकाद्या जाड कांचेपासून अग्नि पाडावयाचा असला तर त्या कांचेवर सूर्यांचे किरण पाडून त्या किरणांचें सर्व तेज एका मध्यवर्ति बिन्दूवर आपण आणतों तसें सर्व मन त्या विषयांत गुंतविलें पाहिजे.

२ अभ्यासाचे वेळीं शरीराची व्यवस्था नीट ठेवणें. नीच मेजाशीं बसून अभ्यास करण्यापेक्षां उभें राहून करणें बरें. तेणें करून पुढें कमर अशक्त होत नाहीं व पोंक येत नाहीं. अभ्यास जेवढा दिवसा होईल तेवढा पार पाडावा. प्रकाशाची ज्योति डोळ्यांवर पडूं देऊं नये. शरीर निश्चल ठेवावें पण निद्रारीशीं गांठ पडेल इतकें नसावें.

३ अभ्यास करणें तो पुरतेपणीं करणें.

अभ्यास करीत असतां जीं जीं प्रकरणें येतील त्यांचा निर्णय न करणें आणि मनाची पूर्तता न करून घेणें हें अर्ध बोबड्या विचारांचा बाप आहे.; याची प्रजा गोंधळ, आणि त्यांशीं जो संघट्टण ठेवील, तो पोंकळ भारथी ! पण्डित नव्हे.

४ कठीण अभ्यासाची संवय ठेवणें.

५ पुनः अवलोकन ( पुनरावृत्ति ) करण्याची.

६ अभ्यास करीत असतां थकल्यामुळें विश्रान्ति मिळण्या करतां अभ्यास टाकून न देतां, दुसऱ्या तऱ्हेचा अभ्यास करून मनोरंजन करण्याची.

या निबंधांत अभ्यासाविषयीं कांहीं विचार सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचें फळ सिद्ध होण्यास तदनुसार आचार झाला पाहिजे. "बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें"

मित्रहो ! आपल्यामध्यें स्वस्थ बसून गोष्टी सांगण्याची आणि निरर्थक वेळ घालविण्याची दुष्ट संवय पडून गेली आहे. ही जरी व्यभिचारादि दुष्टचालीपेक्षां वरून पाहिलें असतां निरुपद्रवी चाल दिसत्ये तरी ही सर्व दुर्गुणांची माता आहे. हिचा आळसाशीं समागम होऊन जी प्रजा उत्पन्न झाली आहे, तिणें आपला देश उद्ध्वस्त करून टाकिला आहे. आतां उद्योग व अभ्यासरूप खड्ग धरून जर तुम्हीं तिचा शिरच्छेद न कराल तर ती तुमचा सर्वस्वापहार करील.

( यासाठीं सर्वांनीं निरंतर अभ्यास करून आपल्या देशाचें कल्याण करावें अशी आशा शेवटीं केलेली आहे. )

हा ग्रंथ वाचल्यावर कृष्णाजीपंत नूलकरांनीं रावसाहेबांस लिहून कळविलें कीं तुह्मीं असले ग्रंथ लिहिण्यांत गुंतलेले पाहून जो आनंद होत आहे तो व्यक्त करतां येत नाहीं. माझ्या आळसाला व अध्ययनाला धिक्कार असो ! ( ९।१।१८५८ )

" संवयी आणि अभ्यास हे ग्रंथ ह्मणजे तुमच्या भावी ग्रंथलेखनाच्या उद्योगाचा ओनामा आहे असें समजतों. यापुढें तुम्हीं आपल्या बुद्धीचा व ज्ञानाचा फायदा आपल्या देशबांधवांस असेच ग्रंथ लिहून द्याल, त्याच प्रमाणें बहुजनसमाजाला न समजणारे अशा मोठमोठ्या संस्कृत शब्दांचा वारंवार उपयोग न करण्याची खबरदारी घ्याल अशी आशा करतों. प्राकृतांत शब्दसंग्रहाची मोठी धनत्तर विहीर आहे संकृतांतील नदीकडे सारख्या धांवा घेतल्याशिवाय तिच्यांतून हवा तेवढा पुरवठा होण्यासारखा आहे."

" ग्रंथकारानें प्रतिकूल टीका ऐकून उमेद व ग्रंथ लेखनाचे प्रयत्न सोडूं नये. चांगल्या ग्रंथाची किंमत लोकांना कळूं लागल्यास त्यावर बरेच दिवस जावे लागतात. कधीं कधीं तर ग्रंथकाराची हयात संपून जावी लागते." ३१।१।१८५८ चें ज०जेकब यांचें पत्र.

पेशव्यांच्या राज्यपद्धतीवर रावसाहेबांनीं लिहिलेला निबंध स्टूडन्ट लिटररि आणि सायन्टिफिक मंडळीनें छापिला होता असें २।१०।१८५७ च्या लिमये यांनीं लिहिलेल्या पत्रावरून दिसतें. माडर्न हिस्टरी या ग्रंथाचें भाषांतर करण्याचा रावसाहेबांचा बेत होता तो सिद्धीस गेला नसावा.

## बोधसार.

हा पद्यात्मकग्रंथ नांवाप्रमाणें उपदेशपर व सारभूत अशा कवितांचा संग्रह होता. यांत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास व मोरोपंत यांच्या कवितांतील वेंचे दिलेले होते. त्यांत रावसाहेबांच्या एका आप्तानें ( नांव कळलें नाहीं ) रचिलेल्या कांहीं कविता होत्या. हे सर्व वेंचे संगतवार लावून आरंभीं समर्पक प्रस्तावना व नंतर विषयानुक्रमणिका अशीं दिलेलीं होतीं. पद्यग्रंथमालेंतील हें पहिलें पुष्प होय. हा ग्रंथ जनार्दन हरी आठले यांनीं आपल्या जगन्मित्र छापखान्यांत शिळाप्रेसवर १८५७ त छापिला. किंमत आठ आणे होती व प्रती हजार काढविल्या होत्या. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रती तीन हजार काढविल्या होत्या. बऱ्याच प्रती घेऊन आश्रय देण्याचें मेहरबान हावर्ड साहेब त्यावेळेचे डायरेक्टर यांनीं कबूल केलें होतें.

## सिंधी भाषेचें लघुव्याकरण.

रावसाहेब सिंधमध्यें असतां त्या भाषेचा अभ्यास करून तिचें चांगलें ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें. शाळाखात्याकरतां त्यांनीं एक "सिंधी भाषेचें लघुव्याकरण" नांवाचा ग्रंथ लिहिला होता. तो रावसाहेब ठाण्यास आल्यावर छापून प्रसिद्ध झाला.

## यंग साहेबांच्या बीजगणिताचें भाषांतर

कराचीस असतां यंगकृत बीजगणितांचें सिंधींत भाषांतर काजी अबदुल व रावसाहेब या दोघांनीं मिळून केलें होतें. त्याची पृष्ठसंख्या ५०० होती. ठाण्यास बदली झाल्यामुळें छापण्याचें काम तेथील शाळा-

खात्याकडे सोंपवून दिलेलें होतें. व पुरें करण्याकरतां त्या खात्यास बरेच वेळां निकड करावी लागली. हा ग्रंथ शिळाप्रेसवर छापविला होता.

या कामाबद्दल रावसाहेबांस मेहनताना ह्मणून ५०० रुपये मिळाले. "नियमाप्रमाणें ह्मटलें ह्मणजे मूळ इंग्रजी दर एक छापील पानाबद्दल एक रुपया या हिशोबानें द्यावयाचे पण सिंधींत बीजगणित करण्यास विश्वनाथ यानें इतके परिश्रम घेतले आहेत व इतक्या काळजीनें तें काम केलें आहे कीं दर सिंधीपानाबद्दल एक रुपया देण्याचें ठरविलें आहे". ( सरकारी ठराव नं. १५४. १४।७।५९ )

## लक्ष्मीशास्त्र.

कराचीस जाण्यापूर्वीं रावसाहेबांनीं लक्ष्मीशास्त्रासंबंधीं एका चांगल्या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर केलें होतें. त्याबद्दल त्यांस ३०० रुपयांचें डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें बक्षिस दिलें होतें. मूळ ग्रंथ मिसेस मार्सेटबाईचा प्रश्नोत्तर रूपानें लिहिलेला होता. त्याचें भाषांतर करण्याचें काम प्रोफेसर ग्रीन यांच्या देखरेखीखालीं हरी केशवजी व रावसाहेब या दोघांनीं केलें. तें वरील सोसायटीनें १८५४ मध्यें छापविलें होतें असें ह्मणतात.

## दिवाणी कायद्यांची चूर्णिका.

१८५९ सालीं मुंबई इलाख्यांतील दिवाणी कोडतांत चालू असलेल्या १८३४ पासून १८५७ पर्यंत झालेल्या सर्व कायद्यांची चूर्णिका रावसाहेबांनीं प्रसिद्ध केली होती. तिची किंमत १ रु. होती. सरकारचा आश्रय मिळाला होता.

## हिन्दूलोकांच्या मध्यन्तरीय अवस्थेविषयीं विचार,

वरील विषयावर रावसाहेबांनीं ज्ञानप्रसारक सभेपुढें एक निबंध वाचला, तोच १८६२ मध्यें छापून प्रसिद्ध केला.

" सिकन्दर पादशाहाच्या पूर्वीचे, त्याच्या वेळचे आणि विक्रमापर्यन्तचे

लोक, व चाळीसपन्नास वर्षांअलीकडील लोक, यांच्या स्थितींतील कांहीं गोष्टींमधील अन्तर दाखविणें हा या निबंधाचा हेतु होता. ”

“ सांप्रतचे लोक × × × साधारण रीत्या निःसत्त्व व नामर्द झाले आहेत. प्राचीन ग्रंथामध्यें पाहूं गेलें तर त्यावेळचे लोक विरक्त व फार बेपर्वा होते. ”

“ हिंदुस्थानांतील लोक आपल्या राजाचें कल्याण होवो असें ईश्वराजवळ मागत असत परन्तु इराणी लोकांप्रमाणें त्यापुढें साष्टांग नमस्कार घालीत नसत. ”

“ तत्वविचारशास्त्रप्रकरणांत पाहूं गेलें असतां सर्व उत्तम ग्रंथ ( षड्दर्शनादि ) प्राचीन आहेत. नामदेव, तुकाराम व रामदास हे प्रेमळभक्त होऊन गेले खरे. परन्तु पुढें पुण्यतिर्थांची भिक्षा मागून त्यांतून आपल्या संसाराची बेगमी करण्याचे संप्रदाय राहिले आहेत. दुसरी परंपरा राहिली नाहीं. ज्या वस्तूच्या शोधार्थ ते झटत होते तिजविषयीं अनास्थाकरून लोक शब्दच घेऊन कुटीत बसूं लागले. आंतील दूध जाऊन फुटकीश्रीफलमाता हातांत येत चालली आहे असा सुमार दिसतो ”.

“ ज्योतिष व भूगोल विद्या या शास्त्रांविषयीं पहातां असाच हर्ताळ माजत चालला आहे. भास्कराचार्यांच्या अलिकडे प्रख्यात सिद्धान्तकार कोणी झालेला आढळत नाहीं परंतु जर कोणी गणितानें चुक्या काढून दिल्या आणि त्याच्या पाठपुराव्यास नलिकाबन्ध करून आकाशांतील तारे दाखविले तर ही सुधारणा कुलाब्याच्या केरोपंतांनीं किंवा गोवर्धनपंतांनीं इंग्रजी ज्योतिषावरून केली, म्हणून उपयोगी नाहीं असे उद्गार येतात.”

“ भूगोल वर्णनाविषयीं म्हणावें तर आमचे लोक मुळीं परदेशांत जाण्याच्याच आड येतात. आह्मीं कूपकूर्म झालों ! ”

"कालगणनविद्या व इतिहास हीं तर आह्मीं सोडूनच दिलीं आहेत. पाछ्हा व बिरबल यांच्या गोष्टी लोक सांगूं लागले आहेत. व हे अवतारी पुरुष होते असा लोकांचा ग्रह होऊन गेला आहे. आणि लोकांच्या मनाची स्थिति अशी झाल्यामुळें शुकबहात्तरी व महाभारत आणि वेताळ पंचविशी व रामायण यांची योग्यता साधारण लोकांच्या दृष्टीनें एकच होऊन गेली आहे."

"वैद्यक शास्त्रामध्यें वाग्भटा नंतर वैद्यकाचें संगतवार विवेचन करण्याचा प्रयत्न किंवा नवीन शोध करून कोणी शास्त्राची मर्यादा वाढविली नाहीं. सांप्रत तर वैद्य ह्मटले ह्मणजे हिंग, जिरें, मिरें, मसालेवाले असतात. त्यांस त्यांच्या विषयांची उपपत्ति माहित नसत्ये. पथ्यापथ्य विचार त्यांपासून दोन कोस लांब रहातो. रोगाचें निदान पुस्तकांत असतें. चिकित्सा ह्मटली ह्मणजे, वृद्ध स्त्रियांचा सल्लचानें शुभाशुभ ग्रह पाहून, ग्रामदेवाचा कौल घेऊन व वैद्यबुवांकडे जो निरोप्या गेला असेल त्याचीं व त्यावेळचीं सुचिह्नें दुश्चिन्हें पाहून नंतर होत असत्ये. मग या क्रमाप्रमाणेंच औषधाची योजना झाल्यावर त्या दुर्दैवी आजाऱ्यास प्रस्थान ठेवण्याचा समय येतो. कित्येक जुन्या रितीनें शिकलेले वैद्य चांगले विद्वान व विचारशील आहेत हें मला माहीत आहे. प्राचीन वैद्य शास्त्रास खची करून इंग्लिश वैद्यकाचें पूरण भरलें असतां या देशाचें कल्याण होईल."

(याच प्रमाणें शिल्पशास्त्राविषयीं रावसाहेबांनीं उद्‌गार काढले आहेत.)

"सभेच्या नियमाप्रमाणें धर्माविषयीं कांहीं लिहावयाचें नाहीं तथापि धर्माचें सोंग घेऊन जीं पुष्कळ वंचकें या देशांत पसरलीं आहेत त्याविषयीं लोकांनीं शोध करावा. राज्यरीतीविषयीं ही वाटाघाट करण्यास प्रतिबन्ध आहे तथापि जेथें हिंदूंच्या सर्व स्थितीचा विचार चालला आहे तेथें:—

**सर्वांनीं कायद्यास मान द्यावा; आपआपली विवक्षित कामें इतरांच्या हक्कांवर पाय न देतां बजावावीं; जेजे अधिकार सरकार आपणास देईल तेते इमानानें व धैर्यानें बजावून त्यांहून अधिकांचा उपभोग घेण्यास योग्य व्हावें** या सर्व गोष्टी उचित आहेत. इतकें सांगणें अवश्य दिसतें आणि हें सांगण्यास सभेच्या नियमांस कांहीं बाध आहे असें वाटत नाहीं."

( १८६२ सालीं दिलेलें वरील मत फार महत्वाचें आहे, व ६० वर्षे होऊन गेल्यावरही राजकारणाची कोणती दिशा होईल तें अगदीं बिनचूक दाखवीत आहे. यांत रावसाहेबांची दिव्य दृष्टि दिसून येत आहे. )

"प्रत्येक विषयाचा शोध लावावयाला पाहिजे. या देशाच्या इतिहासास प्रारंभ केव्हां झाला तें माहित नाहीं. ज्या विद्या पहाव्या त्यांतून कांहीं इंद्रानें सांगितल्या; कांहीं सूर्यानें उपदेशिल्या; कांहींची प्रवृत्ति गन्धर्वांपासून झाली. असा बहुतेक या विषयांचा प्रकार आहे. या विषयांत लाक्षणिक भाग किती व वास्तविक किती आहेत याचा विचार प्रतिपदीं झाला पाहिजे. आम्हीं इतके जडबुद्धि झालों आहों कीं आकाशांत ढग पाहिला असतां कोठेंतरी लढाया चालल्या आहेत. पतन तारे दृष्टीस पडले असतां कोणी विख्यात पुरूष जन्मास येत आहे. भाकरीस फुगारा आला असतां व विस्तव फुरफुरला असतां पाहुणा येत आहे. इत्यादि क्षुद्र कल्पनांनीं आम्हीं गुंग होऊन गेलों आहों".

" चांगला कित्ता प्रथम समर्थांनीं घालून दिला पाहिजे. "

" समुद्रास भरती आली, ह्मणजे पाणी भरून पुनःओहोटतें; परन्तु तें ओहोटत जातां जातां त्याची मागें जाण्याची सीमा होऊन पुनःतें वाढूं लागतें त्याचप्रमाणें कोणत्याहि लोकांचे उत्कर्षापकर्ष होतात असें दिसतें. अलीकडे दोन हजारवर्षें पर्यन्त या देशाचा सर्वप्रकारें अपकर्ष होतां होतां पाणी संथ होऊन भरती लागण्याचा समय आला आहे. या

देशाच्या नशीबाचें तारूं आजवर इकडून तिकडे अडखळत होतें तें सांप्रत ज्या देशास लागलें आहे तो देश विद्येचें व स्वतन्त्रतेचें आद्यस्थान आहे. ह्मणून आतां तरी भरती येईल; तेव्हां विद्या, कला, कुशलता व शौर्य्य इतक्या जिनसांनीं तें तिकडून भरून येईल अशी आशा आहे. सर्वांनीं सावध होऊन द्रव्यद्वारा व शरीरद्वारा स्वदेशकल्याणार्थ प्रयत्न करावा ”.

## मुंबई इलाख्याचा इतिहास व भूगोल.

याची रूपरेषा रावसाहेबांनीं हातीं घेतलेली होती, व त्यासंबंधानें सर अर्स्किन यांच्या संग्रहीं असलेली कांहीं कोष्टकांक प्रमाणसिद्ध माहिती ( १८५६ सालीं ) मागविली होती, व ही बातमी सर्वतोमुखीं झाली होती. या ग्रंथांत त्यांचे मनांतून काठेवाडांतील संस्थानें, कच्छ भावनगर, जुनागड, पालनपूर, रेवाकांठा, महीकांठा वगैरे यां विषयींची स्वतांची माहिती द्यावयाची होती. बडोद्याबद्दल एक स्वतंत्र भाग लिहिणार होते. त्याचप्रमाणें जंजिरा येथील हबशांचे वसाहतीची माहिती व जव्हार, सांवंतवाडी, कोल्हापूर व साधल्यास दक्षिणेंतील सर्व संस्थानें यांची संक्षिप्त माहिती देणार होते. हा यत्न अपुरा राहिला असें दिसतें.

## हिंदुस्थानचा इतिहास.

हा ग्रन्थ रावसाहेबांनीं नामदार मांउट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन साहेब यांच्या मूळ ग्रंथावरून भाषांतररूपानें तयार केला. या कामास त्यांनीं १८५४ मध्यें प्रारंभ केला. परंतु सरकारी नोकरीचें काम संभाळून हें काम करावयाचें होतें तें तीन वर्षांनीं सुद्धां पुरें झालें नाहीं असें पाहून त्यांनीं तें त्वरित संपविण्याचा निश्चय केला. “ १८५४ मध्यें आरंभ करून अजून हा ग्रंथ माझ्यानें तडीस गेला नाहीं ही गोष्ट मोठी लाजिरवाणी आहे तर आतां याची पाठ घेऊन सुटलें पाहिजे. नाहीं तर तो पुरा होणार नाहीं. कृतनिश्चय करून बाकीचें अगदीं अवश्य तितकेंच केलें

पाहिजे" ( ७।९।१८५७ ची. रो. ) एवंच पिपीलिकेच्या चालीनें हें काम पुरें होऊन १८६१ मध्यें याचे पहिले दोन भाग प्रसिद्ध झाले. त्यांतील पहिला भाग एल्फिन्स्टन कॉलेजचे मुख्याध्यापक जॉन हार्कनेस् यांस शिष्यत्वाचे नात्यानें कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. "यांत शब्दास शब्द न उतरतां सरळ मराठी भाषेंत ग्रंथकाराचा आशय कळविण्याचा यत्न केलेला आहे." सरकारी कामाचा वेळ खेरीजकरून फावल्या वेळांत लिहिलेला हा भाग मेहरबान हावर्ड डैरेक्टर आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन व दक्षिण भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी यांच्या उदार आश्रयानें छापून बाहेर पडला.

दुसरा भाग मि. हावर्ड, डैरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांस, "त्यांनीं एकंदर देशी सारस्वताला उदार आश्रय दिल्याबद्दल त्यांचे उपकार प्रसिद्धपणें कबूल करण्याच्या उद्देशानें, अर्पण केलेला आहे".

या भागांचा उपोद्घात १८६२ त छापला गेला व तो "मेजर जनरल ली ग्रँड जेकब यांस हिंदी लोकांच्या कल्याणार्थ स्वहितनिरपेक्ष प्रयत्न केल्या बद्दल गाढकृतज्ञतेची दर्शक खूण म्हणून अर्पण केलेला आहे". पहिल्या दोन भागांत श्री रामाच्या उत्तर हिंदुस्थानांतून लंकेवर केलेल्या स्वारीच्या वर्णनापासून तों मोगल बादशहांच्या समाप्तीपर्यंत वर्णन आहे. उपोद्घात म्हणून जो तिसरा भाग आहे, तोच फार महत्वाचा आहे. "या देशांतील धर्म, कायदे, चाली इत्यादिविषयीं युरोपांतील एका बुद्धिमान् व विचारी पुरुषाचा निःपक्षपाती अभिप्राय कसा होता हें समजण्याची संधि मराठी वाचणाऱ्यांस या भागानें प्राप्त झाली". हिंदूंचा धर्म त्यांच्या रीतिभाती, स्वभाव, त्यांचीं तत्वदर्शनें, शास्त्रें, विद्या, जमीन-धाऱ्याची शिस्त, राजे व प्रजा यांचे परस्परांशीं संबंध या प्रकरणांविषयीं त्याचे विचार, शोध, व ज्ञान अप्रतिम आहेत. बाळशास्त्री जांभेकर यांस एल्फिस्टन् साहेबांचा हा ग्रन्थ आवडून त्यांनीं ह्याचें संक्षिप्त सार काढलें होतें.

रावसाहेबांनीं केलेल्या संपूर्ण ग्रंथाची जरूर कॉलेजांतील वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांस होती तशीच देशीभाषांतील शाळांच्या विद्यार्थ्यांस होती, त्यामुळें यांच्या ग्रंथास भरपूर आश्रय मिळाला. डे. व्ह. भाषांतर मंडळीनें सुद्धां आश्रय दिला होता. " सरकारी शाळेंत शिकविण्यास हा ग्रंथ उत्कृष्ट प्रतीचा आहे ". असें मत नारायणभाई दांडेकर यांनीं दिलें आहे.

तिसऱ्या भागावर ह्मणजे उपोद्घातावर केरो लक्ष्मण यांनीं असें मत दिलें:—"माझ्या मतें हा भाग तिन्हीं भागांत उत्तम आहे. आमच्या देशांतील धर्म, नीति, चाली व रीती यांवर एका विद्वान व सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन करणाऱ्या इंग्रजानें दिलेले विचार या भागांत येतात. आमच्या देशाकरतां हे विदेशी लोक जें करीत व लिहीत आहेत त्यापैकीं एकही गोष्ट नीट शोधपूर्वक निरीक्षण करून, आह्मांपैकीं २० कोटींत अथवा त्याहून अधिक जनसंख्येंतून एकजण पुढें येऊन लिहूं शकत नाहीं ही गोष्ट आह्मां सर्वांस फार लज्जास्पद आहे. कांहीं प्रकारें डा. भाऊ, तुम्हीं स्वतां व दुसरी काहीं बंगाल्यांतील पटुमति तरुण मंडळी हीं कदाचित् अपवाद म्हणून जन्मलां आहांत. ह्मणून तुमच्या प्रयत्नास यश येवो ".

" ज्या दिवशीं मी अखिल पृथ्वींतील प्रमुख विद्वान लोकांच्या यादी-वर दृष्टि टाकिली असतां त्यांत तुमचें नांव माझ्या देशबांधवांच्या नावां-तून चिरकाल राहण्याकरतां प्रामुख्यानें ग्रथित केलेलें पाहीन त्यादिवशीं मला फारच अभिमान वाटूं लागेल " ( १०।२।१८६२ चें इं. पत्र )

१८६२च्या जानेवारीला परिशिष्टाचें भाषांतर संपलें. १८६२मध्यें याच ग्रंथाचें गुजराथींत भाषांतर रावसाहेबांनीं केलें व भाषांतर करण्याचा हेतु काय होता तो रावसाहेबांनीं सर बार्टल फ्रियर मुंबईचे गव्हर्नर यांस १४।७।१८-६२ च्या पत्रांत कळविला होता तो असा: "एल्फिस्टन् साहेबांसारख्या उच्च

दर्जाच्या राजकारणी व तत्त्वज्ञ पुरुषाचीं मतें ज्यांत ग्रथित झालीं आहेत अशा ग्रंथाचें भाषांतर **नेमस्तांस मार्ग दाखवील, भ्याडांस धीर देईल व अत्याचाऱ्यांस आंवरून धरील व मोठें कार्य करील.** *

हा जो येथें भाषांतर करण्याचा ह्मणून हेतु दाखविला आहे तोच्च रावसाहेबांच्या एकंदर चळवळींचा हेतु होता असें धरण्यास हरकत नाहीं. मोठ्या पुरुषांच्या मुखांतून प्रसंगोपात्त त्वरेनें निर्गत झालेली वाणी गुर्वर्थ असून सिद्धादेश कथन करते.

उपयुक्त इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर करणें अथवा अशा इंग्रजी पुस्तकांत ज्या विषयांचें प्रतिपादन केलेलें आहे त्यांचा चांगला अभ्यास करून त्यावर मनन करून अगदीं स्वतंत्रपणें संक्षिप्त अथवा विस्तृत रितीनें आपल्या अज्ञ देशबांधवांस पाश्चात्य ज्ञानाचा लाभ करून देणें ही जी जबाबदारी ज्या आमच्या लोकांस पहिल्यानें पाश्चात्य ज्ञान प्राप्त झालें त्यांच्यावर येऊन पडली, तिची जाणीव आपणांस आहे असें रावसाहेबांनीं एल्फिन्स्टकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर करून सिद्ध केलें. त्यांची प्रशंसा झाली. पुस्तकास आश्रय मिळाला. कॉलेजांतील वरच्या दोन परीक्षेंतील अभ्यासक्रमांत त्याचा प्रवेश झाला. पंधरा वर्षें लोटलीं. नंतर या पुस्तकावर शस्त्र उचलणारे निघाले. ते विष्णु शास्त्री होत. त्यांनीं भाषापद्धतीवर कांहीं निबंध आपल्या मालेंत लिहिले आहेत. त्यांत मराठी भाषा, कांहीं परकीय लोकांनीं दूषित केली व कांहीं स्वकीयांनीं, असें म्हणून वरील भाषांतराच्या १५०० पानांच्या ग्रंथांतून दूषित भाषापद्धतीचे ४।५ मासल्याकरतां उतारे देऊन शास्त्रीबुवा म्हणतात. " वरच्यासारखे भाषेचे प्रकार प्रस्तुत भाषांतरांत येथून तेथून आहेत. "

---

* It will guide the moderate, encourage the timid and check the violent &c.

यावर कोणी चांगले उतारे दाखवून देऊन यांचें म्हणणें खोटें पाडण्यास प्रतिपक्षी उभा राहील ' तर आम्हीं चांगले भाग नाहींत असें कोठें म्हणत होतों ' अशी सबब सांगून त्यास गप्प बसविण्याकरतां शास्त्रीबुवा पुढें म्हणतात "मधून मधून भाषांतर चांगलें आहे खरें, व कोठें कोठें शब्दहि चांगले निवडून घेण्यासारखे घातले आहेत, पण ज्यांकरितां हें भाषांतर ग्रंथकारानें केलें त्यांस याचा काडी इतका उपयोग होण्यासारखा नाहीं असें म्हटल्यास हरकत नाहीं" व पुढें ह्मणतात "असे इतिहासग्रंथ असल्यावर एकंदर लोकांचे ठायीं इतिहासाचें एवढें अज्ञान असल्यास नवल काय !"

मराठी भाषेवर शास्त्रीबुवांचें वडिलार्जित प्रेम होतें. पितापुत्रांकडे मराठी भाषा पाणी भरीत होती. तिला कोणी दूषित करील तर शास्त्रीबुवांस केव्हांही रुचणार नाहीं. परंतु, तिला शुद्ध ठेवण्याच्या औत्सुक्यभरांत, तिलाच पुष्कळ ठिकाणीं अलंकृत करीत असतां कतिपय प्रसंगीं कोणी तिला दूषित करून गालबोट लाविल्यास त्या त्याच्या यत्नांचा काडी इतका उपयोग नाहीं असें म्हणून जी रावसाहेबांची निंदा शास्त्री बुवांनीं केली ती खचित वृथापुष्ट झाली असें दिसतें.

हें भाषांतर "काडीभर उपयोगी पडण्यासारखें आहे कीं नाहीं" हें पाहण्याच्या दृष्टीनें प्रस्तुत लेखकानें वाचिलें. तों त्यास पुष्कळ भाग उपयुक्त असा आढळला. म्हणून रावसाहेबांच्या विरुद्ध लोकांचा शास्त्रीबुवांनीं करून दिलेला समज अथवा गैरसमज दूर व्हावा या बुद्धीनें काहीं उतारे खालीं दिले आहेत.

"कासीम याणें सिंधमध्यें ज्या पुष्कळ स्त्रियांस बंदींत घातलें, त्यांमध्यें राजा दाहिर याच्या दोन मुली होत्या. त्या रूपलावण्यानें युक्त असून मोठ्या घराण्यांतल्या असें समजून त्या आपला अमीरिल मोम्नीन् यास ( खलीफास ) नजर कराव्या असा त्याणें विचार केला. त्याप्रमाणें त्या

दोघींस दरबारांत नेऊन जनानखान्यांत प्रविष्ट केल्या. त्यांतील वडील कन्येच्या सौंदर्याविषयीं खलीफानें गोष्टी ऐकल्यावरून, तिला पाहण्याची अत्यंत उत्सुकता त्यास प्राप्त झाली होती. नंतर तिला जेव्हां खलीफासमोर आणिली, तेव्हां तिनें रडून आसवांचा पूर सोडिला आणि शेवटीं सांगितलें 'मला स्वदेशाहून इकडे पाठविण्याचे पूर्वीच कासिमानें मजवर जुलूम केला, ह्याकरितां मी आपल्या नजरे समोर उभी रहाण्यास योग्य नाहीं!' तिचें सौंदर्य पाहून खलीफास दया आली, आणि आपल्या चाकरानें आपला असा अपमान केला म्हणून क्रोधायमान होऊन त्याचा सूड घ्यावा अशी त्या संतापाच्या पहिल्या लहरींत त्याची वृत्ति फिरून कासिमास कच्च्या कातड्याच्या पोत्यांत शिवून तसाच दमास्कस येथें पाठवून द्यावा; असा त्यानें हुकूम केला. तो हुकूम बजावून कासिमाचें शव आल्यावर तें त्यानें राजकन्येस दाखविलें. तें पाहून तिला परमानंद झाला. नंतर तिनें खलीफास सांगितलें कीं कासिमानें कांहीं मजवर जुलूम केला नव्हता. तो निर्दोषी होता! परंतु त्याणें माझा बाप मारला, व आमचा वंशच्छेद केला, त्याचा सूड उगवावयाचा होता म्हणून मी असें केलें! तें ऐकून खलीफ चकित झाला".
भाग १ पृ० ६१।६२

"इराकनामक इराणी प्रांताचा अधिपति मरण पावला तेव्हां आपलें काम साधून घ्यावें असें महंमुदानें कसें मनांत आणिलें व 'माझा भ्रतार जिवंत होता तेव्हां मी तुला भ्यालें असत्यें, परंतु आतां अनाथ बायकांवर हात टाकण्या करतां तुझें उदार मन पुढें होणार नाहीं आणि ज्या कलहापासून तुझ्या कीर्तीची वृद्धि होणार नाहीं त्या कलहांत गुंतून तूं आपलें नांव जोखमांत घालणार नाहींस, कारण तूं ज्ञाता आहेस. म्हणून मी स्वस्थ आहें" इत्यादि इराकच्या विधवेचें पत्रवाचून हिंदुस्थानावर ११ वेळां स्वाऱ्या करणारा महमूद हतवीर्य कसा झाला त्याचें हें वर्णन हृद्यंगम आहे. भाग १ पृ० ११८

पुष्कळ वेळा मूळ अतिभार वाक्यांचें भाषांतर करतांना रावसाहेब तशीच वाक्यरचना अर्थाचा सुबोधपणा राखून करीत; उदाहरणार्थ "हे (रजपूत) आळशी होते किंवा नाहीं हें इतिहासांत लिहिलेलें नाहीं × × × परंतु जर वर लिहिलेल्या सद्गुणांस ( वीरश्री, कुलाभिमान दाक्षिण्य इत्यादींस) आळस आणखी मिळविला, आणि मुसलमानांचा पुष्कळ दिवस जुलूम चालल्यामुळें जे दोष उत्पन्न झाले आहेत, ते वरील सद्गुणांतून वजा करून टाकिले, तर बाकी राहिलेले गूण सांप्रतच्या रजपूत लोकांमध्यें पाहूं गेलें असतां मिळत आहेत." (भाग पहिला पृष्ठ १६३)

"हे ( मोगल ) कोणाला धर्मोपदेश करीत नसत, कारण यांसच धर्म नव्हता;कोठें सुधारणेचें आरोपण करावें, तर यांजवळ मुळीं बीजच नव्हतें" इ० मोगललोकांच्या संक्षिप्त वर्णनापेक्षां भाषांतरांत संक्षिप्त पद्धति चांगली उतरली आहे ( भाग १ पृष्ठ १८३. )

"नासरुद्दीन बादशहाच्या भलेपणाविषयीं एक गोष्ट सांगतात.ती अशी कीं एकेदिवशीं बादशहा याणें आपण लिहिलेला एक ग्रंथ आपल्या दरबारांतील एका मानकऱ्यास दाखविला. त्यांत त्याणें पुष्कळ चुक्या काढून दाखविल्या. त्या बादशहानें नीट केल्यानंतर जेव्हां तो अमीर निघून गेला, तेव्हां याणें ते शोध खरवडून टाकून पुनः ग्रंथ जसा होता तसा केला. हें पाहून यास कोणी असें करण्याचें कारण विचारिलें. तेव्हां याणें सांगीतलें कीं ती प्रत पूर्वींचीच शुद्ध होती, असें मला माहित होतें; परंतु आपल्यामतें चांगली बुद्धि सांगणारा असा जो अमीर त्याचें मन दुखविण्यापेक्षां ते शोध घालावे हें मला बरें वाटलें" भा.१ पृष्ठ १९८

तात्पुरतें च्छंदानुवर्तन दाखविणाऱ्या बादशहाच्या सच्छीलाच्या वर्णनाचें स्वारस्य कायम ठेवून भांषातर चांगलें साधलें आहे.

"त्यावेळीं या ( महम्मद तघलखा ) एवढा वक्ता व कुशल बादशाहा कोणी नव्हता. ×× कोणास कांहीं चमत्कारिक रोग झाला असतां त्याचीं

लक्षणें कशीं पालटतात हें पहाण्याकरतां हा आजारी लोकांजवळ जाऊन स्वस्थ बसत असे. हा आपले निमाज नियामितवेळीं पढत असे. दारूस शिवत नसे. आणि आपलें आचरण आपल्या धर्मांतील नीतिवचनांप्रमाणें ठेवित असे. लढाईमध्यें शौर्य व चपलता यांविषयींची याची प्रख्याति असे. या सर्व गुणांवरून हा कोणी अद्भुत पुरुष आहे असें त्यावेळचे सर्व राजे मानीत ( भाग १ पृष्ठ २४९ )" यांतिल शब्दरचना सरळ व साधी आहे.

" पांच दिवसपर्यंत शहरांत लूट चालली होती व आग लागली होती; हें तैमूरलंग स्वस्थपणें पाहत होता व आपला जय झाला ह्मणून उत्साह करीत होता. शेवटीं जेव्हां लोकांचे प्राण घेतां घेतां याचें लष्कर थकलें, आणि लुटावयास शहरांत कांहीं राहिलें नाहीं, तेव्हां यानें परत जाण्यास निघण्याचा हुकूम दिला, आणि जाण्याच्या दिवशीं यमुनातीरीं फिरूजशहा याणें बांधिलेल्या संगमरवरी दगडाच्या मशीदींत मनःपुरसर व नम्रतेनें प्रार्थना करून ईश्वराचे आभार मानिले". ( भाग १ पृष्ठ २७५ ) यांत मनाचा घट्टपणा तंतोतंत उतरला आहे.

"तेथें (दरबारांत) आपणावर सांप्रत प्रसंग कसा आला आहे, अथवा लूट किति मिळवावयाची आहे अथवा किति देश साध्य करावयाचा आहे या नेहमींच्या विषयांपैकीं काहीं बोलणें काढिलें नाहीं. तसेंच धर्माविषयींहि कांहीं सांगावयासारिखें हा बोलला नाहीं; परंतु सांप्रत आपणावर जी वेळ गुजरली आहे तींत सर्वांनीं आपलें सत्व राखावें यांविषयीं हा त्यांस बोलला; आणि पराजय झाल्यास मृत्युच येईल, परंतु जय झाल्यास कीर्ति मिळेल ! असें संधान आहे. हें त्यांस समजाविलें." (भाग १ पृष्ठ ३११ ). बाबराचें सरळ वक्तृत्व वाचकांस पटेल असें हें भाषांतर झालें आहे.

" या देशांतील हवा सुंदर असून सभोंवारच्या पर्वतांवर बर्फ पडलें

असतांहि या देशांत सर्वकाळ वनस्पति हिरव्याचार असतात. व येथें एकसारखा वसंतऋतूच आहे असा भास होतो. निरनिराळ्या देशांत होणारे वृक्ष या प्रदेशांत पसरले आहेत. नाना प्रकारचीं फळें व अपरिमित जातींचीं फुलें हीं पर्वतांतून व खालच्या तळवटांतून आपसुखानें वर्षाव करीत आहेत. खालच्या सपाट देशांत खिंडींतून झरे उत्पन्न होऊन अथवा पर्वतांतून धोधे निघून जिकडे तिकडे उदकाचा प्रसर झाला आहे आणि तें पुष्कळ ठिकाणीं सांचून तलाव झाले आहेत. त्यांतून दोन तलावांच्या किनाऱ्यांची शोभा व तेथील बागाईताची शोभा वर्णनीय आहे." इ०भाग १ पृ० ४७४ हें काश्मीर वर्णन चांगलें साधलें आहे.

"इतक्यांत चांदबीबी भरचिलखत अंगावर चढवून तोंडावर पदर व हातांत नागवी तलवार घेऊन धांवत आली. आणि त्या लोकांस थांबवून आणि मोंगलांचा पहिला हल्ला हटवून जो जो इलाज त्या ठिकाणीं होण्याजोगा होता तो तो करून, त्यांजबरोबर लढत राहिली. तटाखालच्या खंदकांत जी लोकांची गर्दी झाली होती तिजवर तिणें बाण, दारू व दुसरे ज्वालाग्राही पदार्थ यांचा पूर सोडिला, तोफा लागू केल्या, गोळ्या व तीर यांचा पाऊस पाडिला. ++ शेवटीं मोंगलांस हल्ल्याचें काम दुसऱ्या दिवसावर टाकून आपलें लष्कर परत घेऊन जावें लागलें."

हें भाषांतर मनोरंजक आहे. ( भा. १ पृष्ठ ४९४ )

"ज्या खोलींत अकबर निजलेला होता. तेथें सर्व उमराव लोकांस बलावून आणण्याची मला ( सिलीमला ) त्याणें आज्ञा केली. त्यावेळीं अकबर म्हणाला कीं ज्या लोकांनीं मजबराबर इतकीं वर्षें श्रम केले आणि मला कीर्ति मिळवून दिली, त्यांशीं तुझें वांकडें असावें हें मला सहन होत नाहीं. पुढें ते सर्व जमल्यानंतर त्यांजवळ त्याणें सुयुक्त संभाषण केलें, आणि आशाभरित दृष्टीनें त्यांकडे पाहून 'मी कोणाचा अपराध केला असेल तर क्षमा करावी' असें मागणें मागितलें." भाग १ पृ० ५०८

"तिच्या ( **नूर**जहानच्या ) रसिकतेनें पादशहाच्या दरबाराची शोभा वाढली, आणि तिच्या चांगल्या व्यवस्थेनें तेथील खर्च कमी केला. तिणें कल्पना चालवून राजमहालांतील सामानांत फेरफार केले. पूर्वींच्या पेक्षां बायकांस साजत असें स्त्रियांचे पोषाग सुरू केले. ×× ती शीघ्र कवि असे. त्यामुळें व दुसऱ्या गुणांनीं तिनें जहानगीरास मोहित केलें होतें." भा. २ पृ. ४९

"जहानगीरानें **नूर**जहान हिच्या शिकवणीनें त्यावेळच्या त्याच्या स्थितींतील जेवढ्या गोष्टी त्यास अनुकूल होत्या त्यांपासून झालें तितकें आपलें कार्य करून घेतलें. आपल्या नेहमींच्या शिताफीनें **मो**हबतखान याचें बोलणें कबूल केलेंसें ढोंग दाखविलें. असफखानाचा मजवर विशेष जुलूम होता त्यांतून आतां सुटल्यामुळें मला आनंद झाला असें तो सांगूं लागला. आणि **मो**हबतखानास इतकेंहि कपट करून सावध केला, कीं जसें माझें तुजविषयीं चांगलें मन आहे तसेंच **नू**रजहान इचेंहि आहे असें तूं समजूं नको; आणि प्रसंगवशात् तुझे बेत मोडून टाकण्याकरतां लहान लहान बंडें होतील त्यांविषयीं खबरदारी राख अशी त्याणें **मो**हबतास कपटानें सुचना केली. या कपटांनीं **मो**हबताच्या डोळ्यांस पडदे बांधले. आणि आपल्या जवळ बादशहा खऱ्या रीतीनें चालेल असें त्यास वाटून लोकांच्या मसलतीविषयीं त्याणें तितकी काळजी वाहिली नाहीं." ( भा. २ पृष्ठ ८२ )

"यानें (शहाजहाननें) एक मयूरासन करविलें. तें याच्या डामडौलाचें व उधळेपणाचें विलक्षण प्रतीक होय. त्याचें नांव मयूरासन पडण्याचें कारण, तें पुष्कळ हिरे व जवाहिराचें मोठें अवडंबर रचून त्यांत मुख्य मोराची शोभा असे; तो मोर सर्व जवाहीराचा केलेला असून त्याचा पिसारा पसरलेला असे. आणि जसे स्वाभाविक पिसाचे रंग असतात, त्याप्रमाणें नीळ, पाच व माणकें हीं व दुसरीं योग्य रत्नें यांचें काम करून तसे रंग उठविलेले होते. तें सिंहासन जो पाही, तो दीपावून जात असे." भा॰ २ पृ. १४५.

"त्यावेळीं शिवाजी तेथें ( प्रतापगड येथें ) रहात होता. तेव्हां जर तुम्हीं बराबर लोक आणले तर मी भिऊन जाईन या करतां तुह्मीं एकटे मला भेटावयास याल तर मी तुमची प्रत्यक्ष भेट घेऊन तुमच्या तोंडून माझ्या अपराधांची क्षमा झाल्याचें ऐकेन असें त्या मराठ्यानें ( शिवाजीनें ) कबूल केलें ". भा. २ पृष्ठ १८६

शिवाजीच्या तोंडीं घातलेल्या या वाक्याच्या प्रत्येक कान्हामात्रांतून त्याचें मोहक वाक्चातुर्य बाहेर पडत आहे.

"शेवटीं आपल्या बाहेरील दोस्तांशीं बरोबर बंदोबस्त झाल्यावर एके दिवशीं सायंकाळीं तो स्वतः एका पेटाऱ्यांत लपून बसला, आणि त्याचा मुलगा दुसऱ्यांत बसला. आणि पाहरेकरीलोकांमधून निघून गेला. परंतु त्याविषयीं कोणाच्या मनांत संशय आला नाहीं. त्याच्या बिछान्यावर एक चाकर निजून राहिला होता. तो पळून गेल्याचा वहिमा पुष्कळ वेळपर्यंत आला नाहीं. इतक्यांत इकडे तो एका आड जागीं गेला, आणि तेथें घोडा तयार करून ठेविला होता त्यावर स्वार होऊन आपल्या मुलास मागें बसवून हरतऱ्हा करून मथुरेस चालता झाला इ. " ( हें वर्णन साधें व सरळ आहे ) भा. २ पृ. २००

" प्रतिनिधी हा त्याचा ( बाजीरावाचा ) मोठा प्रतिस्पर्धी होता व या दोन्हीं कारभाऱ्यांचे अभिप्राय अगदीं एकमेकां विरुद्ध असून त्यांचा कार्यभागहि विरुद्ध होता. मराठे लोकांची सत्ता आणखी प्रसृत झाली असतां वाईट परिणाम होईल अशी त्या प्रतिनिधीस मनापासून भीति होती. ह्मणून शाहूराजाचें सांप्रतचें राज्य बंदोबस्तानें मजबूत करावें, आंतल्या आंत तंटे आहेत ते मोडावे, आणि उत्तरहिंदुस्थानांतील देश जिंकण्यापूर्वीं दक्षिणेंतील मुलखांत आपली सत्ता दृढतर बसवावी असा तो सक्त भांडतसे. बाजीरावाचा विचार याहून शहाणपणाचा व धैर्याचा होता. त्यानें असें पाहिलें कीं आपलें

जें लुटारू घोडेस्वारांचें लष्कर आहे हें शत्रूच्या मुलखांत फार उपयोगी पडतें. परंतु ते घरीं ठेवलें असतां अगदीं बेकैद होईल++या हेतूनें एकदम उत्तरेकडील प्रांतांत एकदम स्वारी करावी असा त्यानें उपदेश केला, आणि मोंगलांचें राज्य हें मध्यावर तर अगदींच खराब झालें असून एरव्हींहि आंतून दुर्बल झालें आहे. ××× तो ह्मणाला 'हें पोंखरलेलें खोड आपण तोडूं या, म्हणजे त्याच्या खांद्या आपोआप पडतील' त्याणें हा विचार मोठ्या वक्तृत्वानें व औत्सुक्यानें राजास समजाविला; तेणें करून त्याचे सर्व संशय दूर झाले. आणि आपला झेंडा नर्मदेच्या पलिकडे नेऊन लावण्यास मला परवानगी द्यावी असा जेव्हां बाजीरावानें आग्रह केला तेव्हां शाहूराजास मोठें स्फुरण चढून तो म्हणाला कीं तुम्हीं तो हिमालयावर लावा !"

भाग २ पृ० ३४८

या वीरपरिषदेंतील वक्तृत्वपूर्ण मंत्र्याचें वर्णन फार उत्साहकारक आहे.

"मराठे लोक हे घांस दाणा मिळविण्याच्या कामांत फार हुशार आहेत. त्यांच्या छावण्यांतून प्रत्यहीं सूर्योदयीं लहान लहान घोडे व तट्टू यांवर बसून लांबच्यालांब रांगा निघालेल्या दिसतात आणि ते लोक चोहींकडे जाऊन गुरांस वैरण, घरांचीं ओढून आणलेलीं जळवणाकरतां लांकडें, आणि जेथें गांवढेकरी लोकांनीं पेवांतून दाणा लपविलेला असेल त्यांतून उकरून काढलेला दाणा या सर्वांचीं ओझींच्या ओझीं घेऊन रात्र पडावयाच्या पूर्वीं परत येतात. इ० ( हें वर्णन स्वाभाविक आहे. )

भाग २ पृ० ४५०

"जिंकून घेतलेल्या देशाची व्यवस्थाहि तशीच उदारपणाच्या रीतींनीं केली आहे. कोणी राजानें एक देश घेतला ह्मणजे प्रथम लागलीच दवंडी पिटून सर्वांस अभय द्यावें. त्या देशांतील धर्म व शास्त्रें (म्ह०कायदे) हीं तशींच राखून त्यांस मान द्यावा, आणि कांहीं वेळ जाऊन त्या नवीन घेतलेल्या देशांतील लोक भरंवसा ठेवण्याजोगे झाले असें समजलें ह्मणजे

तेथील जुन्या राजवंशांतील एक पुरुष गादीवर बसवावा. आणि त्याणें त्या राजाचा कारभार जिंकून घेणाऱ्या राजाच्या तंत्रानें चालवावा" यांतील राजकारण सहज समजण्यासारखें आहे. (उपोद्घात ३१. मनुस्मृति. राजधर्म)

"प्रत्येक गांवकी आप आपले आंतील कारभार चालवित्ये. जो महसूल सरकारास द्यावयाचा तो गावांतील लोकांपासून वसूल करित्ये. आणि पुरी रक्कम भरणा करण्याचें जोखम एकंदर गांवकीवर असतें. गांवच्या हद्दींतील गुन्हेगार लोकांचा बंदोबस्त गांवकीकडून ठेवला जातो व तितक्या जाग्यांत कांहीं माल चोरीस गेल्यास त्याची जबाबदारी गांवकीवर असत्ये. हलक्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा करणें व कोणत्याहि कज्जांचा प्रथमतः निवाडा ठरवणें एवढ्या बाबतींत गावांतील लोकांचा इनसाफ गांवकीकडून होतो. गांवचे तंटे व देवालयें दुरुस्त करणें, गांवकीकडील होमांचा व धर्मादायांचा खर्च चालविणें व तसाच उत्साहांच्या वेळीं कांहीं धर्मसंबंधी क्रिया करण्यास व कांहीं खेळ करण्यास खर्च लागेल तो करणें हें गांवांतील सर्व खर्च करण्यास पैका जमविण्याकरतां गांवकीकडून लोकांवर पट्टी बसत्ये."

" प्रत्येक गांवाच्या लोकांचे जे समुदाय तीं लहानशीं लोकसत्तात्मक राज्येंच होत; ++ जेथें दुसरा कोणताच बंदोबस्त टिकत नाहीं तेथें हे समुदाय टिकतात असें दिसतें. वंशामागून वंश धुळीस मिळाले; घालमेलीमागून घालमेली झाल्या; हिंदू, पठाण मोंगल मराठे, सीक व इंग्लिश हे सर्व एकामागून एक सत्ताधीश झाले परंतु हे गांवकीचे समुदाय तसेच राहिले आहेत " ( उपोद्घात ११२ )

हें गांवकीचें स्वरूप यथार्थ आहे.

"आधानकालीं प्रत्येक आत्म्यास एक सूक्ष्म देह व त्यावरून एक स्थूल देह असे प्राप्त होतात. याप्रमाणें आत्मा व प्रकृति यांचा संबंध झाला ह्मणजे बाह्य प्रकृतीपासून जे आभास उत्पन्न होतात ते इंद्रियें नेऊन

आंत पोंचवितात. मन हें त्या सर्वांस एकत्र करितें; ते अमुक विभूतीपासून उत्पन्न झाले असा त्यांचा पत्ता अहंकार लावून देतो. मग बुद्धि त्यांपासून अनुमान करून जें ज्ञान इंद्रियांस प्राप्त होत नाहीं तें संपादन करित्ये. इकडे आत्मा हा अकर्ता असून हें सर्व पाहत तटस्थ असतो. तो सर्व पाहतो परंतु जसा आरसा सर्व रूपांच्या प्रतिमा घेतो, परंतु त्याचें रूप अगदीं बदलत नाहीं त्याप्रमाणें आत्मा हा कशापासूनहि विकार पावत नाहीं. आत्म्यानें प्रकृतीचें स्वरूप पुरें पाहून जाणलें ह्मणजे त्याचा कार्यभाग संपला. मग तो मुक्त होतो व प्रकृति आणि तो आत्मा यांचा संबंध नाहींसा होतो. याविषयीं मूळ ग्रंथांत असा दृष्टांत दिला आहे कीं प्रकृति ही नर्तकीसारिखी आपलें स्वरूप दाखवित्ये; तिचें स्वरूप आत्म्यानें पाहिलें ह्मणजे ती पुढें येत नाहीं आणि मग आत्म्याचा जो मुख्य उद्देश मोक्ष तो त्यास प्राप्त होतो." उपोद्घात पृष्ठ २१४. शास्त्रीय विषयांत सुद्धां सुबोधरचना साधलेली आहे.

असो शास्त्रीबुवांच्याविरुद्ध साक्ष देणारे इतके उतारे शास्त्रीबुवांनीं रावसाहेबांवर आणिलेला आरोप खोटा आहे इतकें ठरविण्यास पुरे आहेत.

## धीरत्व

**मा ते कर्मफलहेतुर्भूः। मा ते संगोऽस्त्वकर्मणि॥** (भगवद्गीता)

रावसाहेबांच्या कागदपत्रांत एका व्याख्यानाचें टांचण केलेलें आहे. अक्षर त्यांचेंच आहे. त्यांतील विषय फार महत्वाचा आहे. रावसाहेबांचे जे उद्योग सतत चालू असत ते करण्यास त्यांची प्रवृत्ति सतत कशी होत असे तें यावरून दिसून येत आहे व त्यांच्या यशाचें साधन काय होतें तें त्यावरून दिसून येतें; ह्मणून त्या आधींच संक्षिप्त टांचणास आणखी संक्षेप देऊन त्यास अति संक्षिप्त स्वरूप देऊन खालीं दिलें आहे.

### हिंदुस्थानांतील लोकांस धीरत्वाची अवश्यकता.

धीरत्व हा गूण ज्याच्या अंगीं असतो तो धीर पुरुष समजावा. तो

सदोदीत आनंदित असतो. त्याला दुःख कधींच होत नाहीं. असा धीरत्व हा त्याचा गूण एक किमया आहे.

कोणत्याही प्रसंगीं ज्याचें मन, ( अंतरंग व बहिरंग ) उपाधींनीं विकार पावत नाहीं असा पुरुष धीर समजावा. असें होणें ह्मणजे पाषाणवत् होणें नव्हे. पाषाणवत् आणि धीर पुरुष यांत महदन्तर आहे. तें मा 'कर्मफलहेतुर्भूः मा तेसंगोऽस्त्वकर्मणि ' या गीतावाक्याच्या आधारानें दाखवितों. गीता हें एक उत्कृष्ट व्यवहारोपयोगी उपनिषद् आहे. त्यांतील वरील वाक्याचा अक्षरशः अर्थ असा आहे कीं कर्मफलें हेतु म्हणजे कारण ज्यास, असा तू होऊं नकोस; तुझा संबंध कर्मलोपाशीं ठेवूं नको. तात्पर्य अमूक कर्माचें फल अमूक होईल अशा आशेनें कर्म करूं नको व असें कर्म करण्यांत अर्थ नाहीं म्हणून कर्माचा मुळींच त्याग करूं नको. उद्योग कर पण फलाच्या लोभानें नको.

असा उद्योग करणें तो ज्ञानतः केला पाहिजे कारण मनुष्य हा ज्ञानवान् प्राणी आहे. त्यास आनंद पाहिजे असतो. दुखप्राप्ति तो टाळीत असतो. मनुष्याच्या जन्माचा उपयोग काय? तर 'जीवस्य तत्वजिज्ञासा. ' तत्वजिज्ञासा ' ही ज्ञानप्राप्तीनें होत असते. अज्ञान व दुःख हीं दोन्हीं एकच आहेत. व ज्ञान व आनंद हीं एकच आहेत. हा आनंद कसा मिळेल तर सतत उद्योगानें व कर्मानें. आनंद प्राप्त होण्यास काहीं उद्दीपक लागतें. मादकपदार्थसेवन हें उद्दीपक नव्हे. कारण मागाहून ग्लानि येते. दुःख होतें.

सतत उद्योग व सतत आनंद होण्यास सतत निरपेक्ष अथवा विरक्तकर्म करण्यानें होतो. या गुणास धीरत्व म्हणावें.

रावसाहेब सर्व कामें याच निरपेक्षतेच्या तत्वावर करीत असत. त्यांचे सहकारी मित्र नसरवानजी कामा स्वर्गवासी झाले तेव्हां त्यानीं दुखवटयाची तार केली. 'यांच्या निधनानें मुंबईकरांची हानि झाली' असें म्हणून यांची

जागा कोण घेईल? "क्ष" का असें विचारून ज्या कार्याचें फळ मिळत नाहीं त्या आमच्या कार्यांत पडतो कोण अशी पृच्छा रावसाहेबानीं केली आहे.

या निबंधांत कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांची सांगड ज्ञानतः कर्म सतत करावें असें सांगून रावसाहेबांनीं केली आहे. म्हणून रावसाहेब हे ज्ञानी कर्मवीर होते. हा निबंध १८६० च्या सुमारास लिहिला आहे. तेव्हां गीतेचा अर्थ प्रवृत्तिपर लावण्याचा उपक्रम फार जुना आहे, असें दिसून येतें.

---

## प्रकरण १८ वें.

# वकिली.

॥ अगाधहृदया भूपाः कूपा इव दुरासदाः ॥
॥ घटका गुणिनो नोचेत्कथं लभ्येत जीवनम् ॥ १ ॥

रावसाहेबांची परीक्षा उतरली तेव्हां आपल्या पत्नीस पुण्यास औषधोपचारार्थ नेऊन ठेविलें होतें. त्यांस भेटावयास मे महिन्यांत गेले होते. तेव्हां त्यांस एक वकीलपत्र एका कामांत मिळालें तें त्यांचें पहिलें काम असावें. नंतर सोळाव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ते कराचीस जाऊन आल्यावर सनद घेण्याकरितां हायकोडतांत २७।५।१८६३ रोजीं गेले होते. तेथें मि. पिन्हे. शास्त्रीबुवा, पांडुरंग बळीभद्र, वासुदेव जगन्नाथ व शान्ताराम नारायण यांस भेटले व उत्तम उत्तम कायद्यांच्या पुस्तकांची यादी करून आणिली.

१८६२ सालीं हायकोर्टाची नवीन व्यवस्था अमलांत आली. तेव्हां इंग्रजी न जाणणारे जुने वकील तेथें वकिली करीत होते. त्यांना रेग्यु-

लेशन ( २ ) खालीं सनदा मिळालेल्या होत्या, त्या त्यांच्या गैरवर्तनाशिवाय काढून घेतां येत नसत. त्यांचीं कामें देशी भाषा जाणणाऱ्या न्यायाधीशांपुढेंच निकालास ठेवावीं असा नियम केलेला होता. हा हक्क बजावून घेण्यांत **माधवराव खारकर** व हरिपंत पटवर्धन हे प्रमुख होते. तरी ही पिढी सरत आली होती व कुळाचें नुकसान होऊं नये ह्मणून अनेक वेळां आपलीं कामें नवीन इंग्रजी जाणणाऱ्या तरतरीत वकीलांसच आणून देत. ही वेळ **रावसाहेबांसारख्यास** तर पुढें येण्यास फारच अनुकूल होती.

**जून** महिन्यांत उन्हाळ्याची सुटी संपतांच कोर्ट उघडलें व **रावसाहेबांचें** काम सुरू झालें. **रावसाहेबांची** वकिलीची परीक्षा उतरली हें वाचून **जेकब** साहेब यांनीं एक अभिनंदनपर पत्र लिहिलें, "तुमची हायकोर्ट वकिलीची परीक्षा पास झाली म्हणून तुमचें अभिनंदन करतों. आतां पुढें केव्हांतरी तुम्हीं हायकोर्टांत न्यायासनावर न्यायाधीश म्हणून विराजमान व्हाल. पण मी तें ऐकण्यास जीवन्त राहणार नाहीं." ( २।९।१८६३ चें पत्र ) "यावेळेस. आतां काय तुम्हीं विद्यावान्, व्यापारी, व न्यायनिपुण वकील, झालांत" असें कौतुक त्यांचे मित्र करूं लागले ( २५।११।१८६३ चें **नूलकर** यांचें पत्र )

**रावसाहेबांचा** आरंभापासून बेत चांगला बसला. " मी १८६३ च्या एप्रील मध्यें पास होऊन **जून**मध्यें हायकोर्टाच्या अपील शाखेकडे वकिली करूं लागलों. नोकरींत असतां मला जो पगार मिळे त्याच्याहून अधिक प्राप्ति मला पहिल्या महिन्यापासून होऊं लागली आहे. ( २२।९।१८६३ चें सर अर्स्किन **पेरी** यांस पत्र )

"**मला** माझा नवीन धंदा आवडतो व मी श्रमही पुष्कळ करीत आहें. मराठी जिल्ह्यांतून मला कामही पुष्कळ मिळत आहे" ( मि. स्टयुअर्त यांस २०।१२।६३ चें पत्र ) "मुंबई हायकोर्टाच्या हल्लींच्या न्यायाधीशांस

कायद्याचें व लोकांच्या रीतीभातीचें ज्ञान चांगलें आहे. मुख्य न्यायाधीश पहिल्या प्रतीचे आहेत व बाकीचे बुद्धिमान आहेत असें मला वाटतें, यामुळें काम करण्यास हुरूप आली आहे " ( २८।९।६३ चें जेकब साहेबांस पत्र )

" माझा धंदा चांगला चालेल अशीं लक्षणें दिसत आहेत. मी थोडक्याच दिवसांत थोडेसे हजार रुपये संग्रहीं टाकतों व विलायतेस बॅरिस्टर होण्याकरितां येतों. परंतु असें तूर्तच म्हणणें म्हणजे आकाशांत 'गंधर्व नगरांची रचना करण्यासारखें आहे. " ( जेकब साहेब यांस २४।७।१८६३ चें पत्र )

रावसाहेबांचें कुळांजवळ मागणें फार बेतवार असे. अगदीं पहिल्यानें यांसच कोणी सल्ला विचारीत तेव्हां सांगत कीं मी नवीन आहे माझे पेक्षां हुषार वकील पाहिजे असेल तर पांडुरंग बाळिभद्र किंवा शांताराम नारायण हे आहेत. ( २८।५।१८६३ चें कुळास पत्र. )

धीरे धीरे अशा रीतीनें काम करीत असतां लवकरच काम इतकें वाढलें कीं " माझ्यानें आतां उरकत नाहीं " असें गोपाळपंत विश्वास ( रावसाहेबांच्या बंधूंचे व्याही ) यांस रावसाहेबांनीं कळविलें.

प्रथम लिहिल्याप्रमाणें विलायतेस जाण्याचा मानस रावसाहेबांचा होता. त्यांस सर बार्टल् फ्रियर मुंबईचे गव्हर्नर यांनीं उपदेश केला होता. पण वडिलांची मंजुरी मिळेना. त्यांनीं ८।१२। १८६३ च्या पत्रांत रावसाहेबांस लिहिलें, " तुम्हांस नामदार साहेबांचा सल्ला विलायतेस जाऊन बॅरिस्टर होण्याची परीक्षा द्यावी असा आहे म्हणोन आम्हांस कळवोन आमचा रुकार विचारितां तर सदरहू प्रमाणें करावयाचें, ऐसीयास आमचा रुकार नाहीं. कारण आजपर्यंत जी अबरू तुम्हीं मिळवून जो लौकिक संपादन केलात तो सर्व व्यर्थ होणार आणि ही तरी देऊन द्रव्य संपादन करावयाचें, तर येरव्हीं जें मिळत आहे हेंच लक्ष

कोटी समजतों. यांतून अधिकाची आशा नको. आणि साहेब महसूबहि माझे बुद्धीनें तुमची परीक्षा पहाणेचे बुद्धीनें रुकार देत असतील एरव्हीं आपल्या धर्मास त्या देशीं जोर येणें हें कसें घडेल ? हें त्यांचे लक्षांत असेलच आणि त्यांची पूर्ण कृपा तरी या देशीं मोठ्या पगाराच्या जागा बहुत आहेत व मुंबई शहरांत तुम्हांस पाहिजेत तर तेथें असतील. श्रीमंत राजश्री देशमुख यांस जागा नामदार साहेबांनींच युरोपियन लोक नवे देऊं असें म्हणत असतांनांच दिली. सारांश त्यांची मर्जी म्हणजे पाहिजे तसें करूं शकतात. म्हणोन आमचा रुकार तुम्हीं जावें असा नाहीं. या उपरी बेतास येईल तसें करावें." रावसाहेबांनीं पित्राज्ञा पाळावयाचें ठरविलें असें त्यांच्या पुढील पत्रावरून दिसतें.

"मी नव्यानेंच वकिलीला सुरवात केली असें पाहिलें, म्हणजे माझें काम फार चांगलें चाललें आहे. मला नोकरीपासून जी प्राप्ति होती तीहून आतां अधिक होत आहे. आतां यापुढें दहा वर्षे तरी सरकारी नोकरी पतकरणार नाहीं. माझ्या मार्गांत कांहीं गृहगत गोष्टी आड येत आहेत. त्या जर मला दूर करतां आल्या तर इंग्लदांस येऊन तेथें बॅरिस्टरच्या परीक्षेचा अभ्यास करावा असा मानस आहे. हें अवश्य आहे हें मला समजून आलें आहे. परंतु तें घडवून कसें आणावें या विषयीं माझें पक्कें बस्तान बसलें नाहीं. मातापितरांचें व पत्नीचें मन दुखविलें पाहिजे. पश्चिम हिंदुस्थानांतील सर्व ब्राम्हशक्तीबरोबर झगडावें लागेल ! व आधींचीं सर्व समाजबन्धनें त्यांच्या जागा भरण्यास जवळ साधन नसूनही तोडावीं लागतील.

× × × ×

काळ हा पुष्कळ गोष्टी घडऊन आणतो, तो पुढील मार्ग सुलभ करून टाकील ( २८।९।१८६३ चें ज. जेकब यांस पत्र. )

वकिली सुरू केल्यावर तीन, चार वर्षांनींच रावसाहेबांचें बस्तान उत्तम बसलें. त्यास उद्देशून त्यांचे मित्र विनायकराव भागवत यांनीं त्यांस

२६–२–१८६७ रोजीं एक पत्र लिहिलें. "तुम्हांला आतां बार्टल फ्रियर यांच्या आश्रयाची गरज नाहीं. तुम्हीं आपल्या पायावर आतां उभे राहूं लागलेत हें पाहून आनंद होत आहे. सरकारी नोकरींत कांहीं काळ घालविण्यानें तुम्हांला कामाची शिस्त लागली आहे. विशेष डोकें खर्च करून काम करण्याची अभिरुचि प्राप्त झाली आहे. विविध विषयांचें ज्ञान व दीर्घ दृष्टि तुमच्या वेळच्या लोकांस कितिकांस आहे ! या गुणांत व्यवहार नैपुण्याची भर पडलेली आहे ! "

अशा रीतीनें आरंभींच काम चांगलें जमलें तरी रावसाहेबांचे हितेच्छु स्नेही त्यांनीं नोकरींत रहावें अशी इच्छा करीत. व पुन्हां रजा संपतांच नोकरीवर येणार कीं नाहीं अशी पृच्छा करीत. तशा तऱ्हेच्या पृच्छेला रावसाहेबांनीं खालील प्रमाणें उत्तर दिलें होतें.

" मी पुन्हां शाळाखात्यांत नोकरीवर रुजू होणार नाहीं. व नेक नामदार गव्हर्नर साहेब ( सर बार्टल फ्रियर ) यांच्या इच्छेस मान देऊन मी वर्षभर त्या खात्यांतून रजा घेऊन निघालों. मुंबईस गव्हर्नर साहेबांची स्वारी येतांच राजिनामा देण्याचा माझा मानस आहे. मी वाईट काम घेत नसल्यामुळें जितकीं कामें माझेकडे जमलीं असतीं तितकीं जमत नाहींत. तरीही प्राप्तीवरील कराच्या हफीसांत कर आकारणीचे कामावर असतां जो मला पगार पडे त्याहून अधिक किफायत हल्लींच्या धंद्यांत होत आहे. ईश्वरेच्छेनें मला याच सरळ मार्गापासून च्युत न होण्याचें सामर्थ्य येईल, तर अंतीं हा धंदा मला यशोदायक झालाच पाहिजे याविषयीं मला शंका सुद्धां वाटत नाहीं. मी कायद्याचें ज्ञान वाढविण्याकरितां आणखी अभ्यास करीत आहें. लॅटिन समजत नाहीं म्हणून थोडी अडचण भासते ती दूर होण्यास त्या भाषेचा अभ्यास करीत आहें. ( डाक्तर हार्कनेस यांस पत्र ).

डाक्तर हार्कनेस यांचेंही मत तसेंच पडलें. त्यांनीं १८।१२।१८६३

रोजीं पत्र लिहिलें “ बुद्धिसामर्थ्य व सचोटी यांचा संयोग नेहमींच साऱ्या धंद्यांत आढळून येत नाहीं; पण सुदैवानें जेथें तो होतो तेथें त्या धंद्याचें महत्त्व लोकांत वाढतें.” प्रसिद्ध बॅरिस्टर अॅन्स्टी यांनीं एका स्नेहाजवळ सांगितलें कीं मि. मंडलिक हे आतां इंग्रजी बॅरिस्टराप्रमाणें काम चालवितात.

काम वाढल्यामुळें रावसाहेबांचा वेळ त्याची वांटणी कितिही काटकसरीनें केली तरी तो पक्षकारांस पुरत नाहींसा झाला. त्यांत त्यांचे इतर व्यवसाय असल्यामुळें सर्वांस त्यांची गांठ पडण्याची मारामार पडूं लागली. तिचें वर्णन त्यांचे मित्र कृष्णराव भावे यांनीं १९।४।१८६५ च्या पत्रांत चांगल्यारीतीनें केलें आहे तें असें,

“आपला धंदा वकिलीचा फार उत्तम चालला आहे अशी कीर्ति ऐकितों. त्यांतच अपकीर्तिहि लोक सांगतात, कीं आमची गांठ पांच पांच तास मालकाशीं पडत नाहीं. इंग्रज लोकांस भेटून येणें जितकें सोपें आहे त्याहून आपली भेट होणें फार कठीण, यामुळें आपल्याकडे कामानिमित्त जाणाऱ्यांचीं मनें खट्ट होतात. आपल्या धंद्यास म्हटलें म्हणजे सदरहू रीत योग्य नाहीं. तो धंदा अर्थसंपादन करण्याचा आहे. तें कारस्थान, या वृत्तीनें चांगलें सफल होणार नाहीं. असें मजलाहि वाटतें. आपलाहि उद्योग मुख्य हाच आहे असें नाहीं. आपल्या मनांत विचार निराळाच असेल. वकिली हें एक उगीच त्या विचारांतोन मन निघाल्यावर करमणुकीचें साधन आहे असा माझा अभिप्राय आहे. तथापि मजला असें वाटतें कीं धंद्यांत करमणुकीच्या कांहीं वेळा नेमून सर्वत्रांस भेटण्याचा नेम ठेवून तितक्यांतल्या तितक्यांत थोडें बहुत भाषण करून त्यांस लावून दिलें असतां वजन चांगलें होईल.”

लोक पाल्हाळ लावतात म्हणून त्यांच्याशीं फार बोलावयाचें नाहीं असा रावसाहेबांचा निश्चय होता.

मिरज येथील हरिपंत पराजपे हे कज्जाचें कागद स्मॉकोटींस लावून

पायवाटेनें पुण्यास प्रथम आले. कारण त्याविळेस दक्षिण महाराष्ट्रांत आगगाडीचा रस्ता नव्हता. पुढें मुंबईस आले. गांवांत कोठें जेवणखाण न करतां आधीं रावसाहेबांस भेटण्यास आले. रावसाहेब बाहेर जावयास निघाले होते. दारांत यांस पहातांच रावसाहेब म्हणाले "तुमचें काम काय आहे तें थोडक्यांत सांगा." रावसाहेबांना वेळ नसतो हें यांस ठाऊक होतें. तशांत बाहेर जावयास निघालेले; मग काय काम आहे तें थोडक्यांत कसें सांगावें याची एंचाईत इतरांस पडली असती. हरिपंतास पडली नाहीं. हे गृहस्थ पडले संस्थानांतील हजरजबाबी! त्यांनीं हात जोडून उत्तर दिलें." "खालच्या कोर्टांत माझे विरुद्ध निवाडा झाला आहे तो फिरवून माझे तर्फे निकाल व्हावा म्हणून अपील करण्यास आपल्याकडे धांव घेतली आहे." रावसाहेब हजर जबाब ऐकून हंसले व त्यांस उदयिक भेटण्याची वेळ नेमून बाहेर गेले.

रावसाहेबांचें पहिलें काम पुणें येथील गंगाधर केशव भिडे यांचें होतें. त्याचा निकाल रावसाहेबांच्या तर्फे झाला. (७।८।१८६३ रो.) पहिल्यानें स्टांपाच्या व किरकोळ खर्चांच्याशिवाय फी १५ रुपये घेत असत. ७।८ वर्षांनंतर १५ रुपये कागद वाचणावळ घेत. हांशील असेल तर काम चालविण्याचें कबूल करून आणखी १५ रुपये खर्चाशिवाय घेत. (१४।५ १८७० चें प्रभाकर जोशी यांस पत्र) कागद वाचण्यास अर्धा तास पुरला नाहीं तर पुढें पुढें ३० रुपये घेऊं लागले. बळवंतराव रानडे यांनीं फीच्या दरांत वाढ केल्याचें कारण विचारलें. त्यांस उत्तर लिहिलें कीं मला जन्मभर वकिली करीत बसावयाचें नाहीं. ( ७।१०।१८७२ चें पत्र. )

कागद पुष्कळ नसले पण दावा मोठा आहे तरी ३० रुपये घेत असत. व पक्षकार अकिंचन असल्यास समयीं कांहीं घेत नसत. "पांचशें रुपये अंदाजाचा कज्जा असला म्हणजे फी बयाणा मिळून तीस रुपये घेण्याचा माझा शिरस्ता आहे. नादार असल्यास समयीं फुकटही काम घेतों".

(बाबासाहेब विवलकर यांस पत्र ३।१।१८७४.) १८८४ च्या सुमारास हाच बयाणा साठ रुपये केला. त्यांत काम कमी करण्याचा हेतु होता."जें येईल तें काम घ्यावयाचें नाहीं ह्मणून बयाणा साठ केला आहे."(२५।६।१८८६ चें बळवंतराव रानडे यांस पत्र ) महत्वाच्या खटल्यामध्यें बक्षिसासंबंधें विशेष ठराव करीत असत. असे ठराव कज्जा हातांत घेतेवेळीं केले असतां कायदेशीर आहेत. कज्जा हातांत घेतल्यावर मागाहून मात्र करतां येत नाहींत. पुष्कळ सावधपणा ठेऊनही कधीं कधीं बूड येत असे.

कोल्हापुर येथील गोपाळ हणमंत सरलष्कर बहादुर अज्ञान तर्फे पालन करणार त्यांच्या मातोश्री कमळजाबाई साहेब यांचे वकीलपत्र रावसाहेबांस बाईचे मुक्त्यार यांनीं दिलें होतें. त्यावेळेस फीबद्दल विशेष प्रकारचा ठराव केलेला होता. ह्मणजे तो अशीलाच्या होणाऱ्या फायद्याच्या रकमेच्या प्रमाणांत होता. ठरावाप्रमाणें काम फत्ते झालें. बक्षीसाच्या पैशांबद्दल पोलिटिकल एजन्ट यांचा खुलासा आणून पुढें पत्रव्यवहार करणें म्हणजे लेखणीस शीण देणें आहे असें ठरल्यावर रावसाहेबांनीं हायकोर्टांत फिर्याद आणली. अव्वल कज्जांत त्यांस यश आलें; परंतु अपीलांत मुखत्याराला विशेषप्रकारचा ठराव करण्यास त्याला दिलेल्या मुखत्यारपत्राच्या भाषेवरून अधिकार होता असें दिसत नाहीं असें ठरलें व कज्जा बुडाला.

कामांत हांशिल असलें तर काम घ्यावयाचें हा रावसाहेबांचा नियम असल्यामुळें कांहीं हटवादी पक्षकारांशिवाय बरेच लोक रावसाहेबांचा अगोदर अभिप्राय घेणें शहाणपणाचें मानीत. कज्जाचे महत्वाचे मानानें ३० मोहरा अभिप्रायाकरतां मागत असत. तरीसुद्धां अभिप्रायार्थ कामें बरीच येत. अभिप्राय मागणारे तरी कधीं कधीं प्रश्न विचारण्यांत फार चिकित्सकपणा दाखवीत व कज्जाचें स्वरूप विलक्षण रितीनें वर्णन करीत तें रावसाहेबांस आवडत नसे असें खालील पत्रावरून दिसतें.

"वि. वि. आपलें सहा मिनहूचें पत्र आलें तें पावलें × × × आपण नांव गांव वगैरे न लिहितां परीक्षेचे प्रश्नांसारखा अभिप्राय विचारिला आहे तसा देण्याची माझी वहिवाट नाहीं. नांव गांव सुद्धां जसा प्रकार घडला असेल त्याप्रमाणें कच्ची हकीगत देऊन अभिप्रायाचे प्रश्न रीतीप्रमाणें पाठवावे, म्हणजे विचार करण्यास ठीक पडेल (वामनराव बापट यांस पत्र)

वकिली करतांना सार्वजनिक महत्त्वाचे खटले वेळ पडल्यास फुकटही चालवण्यास रावसाहेब तयार असत. धारेकरी व जप्ती या संबधाचा महत्त्वाचा प्रश्न एक बर्वे या नांवाच्या मनुष्याच्या कज्जांत उपस्थित झाला होता. तो कज्जा रावसाहेबांनीं फुकट चालविला व "भगवत्सत्तेनें" जिंकिला, व ज्या इसमांनीं तो कज्जा यांचेकडे पाठविला होता त्यांस लिहिलें कीं "कबूल केल्याप्रमाणें या कज्जांत मी कांहीं घेतलें नाहीं × × × आतां इतकें सांगतों कीं असले धारेकरी किती आहेत व जप्त्या किती झाल्या व त्यांनीं सरकारास अर्ज किती केले ही माहिती व केलेल्या अर्जांच्या नकला मिळतील तेवढ्या व त्याचप्रमाणें जबाबाच्या नकला पाठवाव्या. सार्वजनिक कामाकरतां पाहिजे आहेत. (शिवरामपंत काणे यांस८।१०।१८७१चें पत्र.)

रावसाहेबांकडे पुष्कळ राजेरजवाडे व जहागीरदार, यांचीं कामें जीं लवकरच येऊं लागलीं तीं शेवट पर्यंत येत होतीं.

प्रसिद्ध बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस, श्रीमंत पेशवे यांचे मुख्य मंत्री, हे निवर्तल्यावर, त्यांच्या जिवूबाई* नांवाच्या पत्नीनें

* नाना फडणीस यांच्या विधवेनें लोहगड किल्ला कसा झुजविला व सर ए. वेलस्ली ( मागाहून डयूक आफ वेलिंग्टन ) यांनीं काय युक्ति केली; नंतर तिनें किल्ला कसा स्वाधीन केला व पनवेलीस येऊन प्रथम कशी राहिली व नंतर ती मेणवलीस कशी गेली; व दुसरें वाटेल तें तिला मिळण्याचा संभव असतां दत्तक घेण्याचेंच तिनें कसें पत्करिलें. इ० हकीकत थोर इंग्रजांच्या तोंडून ऐकल्याचा उल्लेख १८६५ च्या रावसाहेबांच्या रोजनिशींत आहे.

एक मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव माधवराव असें ठेविलें होतें. आपल्या हुकमतीशिवाय कोणीही जहागीरदारानें दत्तक घेऊं नये असा ठराव कोर्ट आफ डायरेक्टरनें १८५३ सालीं केला. त्याच्या पूर्वी हें दत्तविधान झालें होतें.

परंतु १८५४ सालीं सदरहू जिवूबाई यांच्या निधनानंतर १२००० रुपयांचें वतन, अम्बाईपूर येथील गायरान व मेणवली गांव या सर्वांचा प्रत्याहार करून बेलबागेंतील श्रीरामाच्या देवळाचें वतन तेवढें सरकारनें ठेविलें. त्या योगानें "एक वेळ धनराशीवर लोळत असलेल्या, पेशव्यांच्या मुख्य प्रधानाच्या पदाचा उपभोग घेणाऱ्या, अखिल भरतखंडांतील राजेरजवाड्यांत अद्वितीय प्रतिष्ठा पावलेल्या प्रत्यक्ष नाना फडणवीसाच्या मुलाला आतां सुद्धां पहिल्या वर्गांतील सरदाराला एकदम नुसत्या निर्वाहाच्या साधनाभावें साधारण स्थितींतील गृहस्थाप्रमाणें लोकांत राहतां येऊं नये इतकें एका लेखणीच्या झटकाऱ्यासरसें दैन्य यावें हें अनुचित आहे ह्मणून त्याचा प्रतिकार व्हावा" असा अर्ज सार्वभौम महाराणी सरकाराकडे करण्याचें काम रावसाहेबांकडेच आलें होतें. त्यांत त्यांनीं पुण्यांतील नाना फडणवीस यांचा वाडा मिळावा अशी सुद्धां मागणी केली होती. या अर्जावरून मेणवली गांव परत मिळण्याचा ठराव विलायत सरकारनें १८६६ त केला. ( ५-१२-१८६६ चें सखाराम बापू जोशी नि॥ फडणीस यांचें पत्र.)

रावसाहेबांकडे याप्रमाणें संस्थानिकांचीं कामें येऊं लागलीं. करवीरस्थ श्रीमंत महाराज अहिल्याबाईसाहेब यांनीं एक काम रावसाहेबांकडे पाठविलें होतें. व सदरहू राणीसाहेब आपलें काम रावसाहेबांकडे पाठवितांना आपल्या ७।७।१८६७ च्या पत्रांत म्हणतात:—

" विद्वत्ता, प्रामाणिकपणा, आणि धरलेल्या कामास मनःपूर्वक झटण्याची उत्सुकता हे सर्व गूण आपल्या अंगीं असल्याचें ऐकून आपण या-

कामीं लौकर आणि खचित यश मिळवाल अशी इकडील इच्छा आहे "
१९।७।१८६७ च्या पत्रांत पुन्हां म्हणतात " आपल्यासारख्या स्वराज्याभिमानी लोकांनीं ( आमच्या कामाकरतां ) झटलें पाहिजे "

राणी अहिल्याबाईसाहेब या वटोदरस्थ श्रीमन्त महाराज गणपतराव गायकवाड यांच्या कन्या होत. १८५४ सालीं यांचें लग्न झालें तेव्हां लाखों रूपये पिताजींनीं खर्च केले. ४।८।१८६६ रोजीं यांच्या पतीचा कैलासवास झाला. यांनीं पुढें कै. श्रीमंत महाराज राजाराम महाराज यांस दत्तक घेतलें. यांच्या अज्ञानपणांतील राजधानीच्या कारभारासंबंधीं हें दहाकलमी काम होतें. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हें काम घेण्याचें रावसाहेबांनीं नाकारलें.

संस्थानिकांच्या कामांत सातारकर श्रीमंत आबासाहेब महाराज भोंसले यांच्या प्रकरणांत रावसाहेबांनीं मोठी कामगिरी मोठी कळकळ बाळगून केली. मराठीसाम्राज्याचे संस्थापक पुण्यप्रतापी श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांचे हे वंशज होते. १८४९ सालीं लार्ड डलहौसीच्या ठरावाप्रमाणें सातारचें राज्य इं पनीसरकारचे राज्यास जोडण्यांत आलें. त्यावेळेस श्रीमंत छत्रपति शहाजीराव महाराज यांच्या मागें राहिलेल्या राणीसाहेब श्रीमंत सगुणाबाईसाहेब ऊर्फ आईसाहेब महाराज यांनीं १८६५ सालीं श्री. आबासाहेब यांस दत्तक घेतलें. श्री. सगुणाबाई साहेब यांनीं राज्य खालसा करणाऱ्या हुकमा विरुद्ध दयाळू महाराणी व्हिक्टोरिया यांकडे योग्यद्वारा अर्ज केलाच होता. परंतु त्याचा निकाल होण्यापूर्वींच १८७४ सालीं श्रीमंत सगुणाबाई साहेब यांस निर्घृण काळानें हिरावून नेलें. त्यावर फार दिवस गेले नाहीं तोंच आबासाहेब महाराजांस इंग्रजसरकारांतून यादी लिहून आली; तींत श्री. आईसाहेब महाराज यांस मिळत होती ती नेमणूक बंद केल्याचें वृत्त कळवून त्यांच्या पदरीं असलेले १६७ गडकरी व २६ संरक्षक शिपाई कमी

केल्याचा हुकूम देऊन महाराजांच्या वहिवाटीस असलेले राजवाडे खालीं करून द्यावे अशी मागणी केली होती.

महाराजांच्या पदरीं बहिरराव× पिंगळे म्हणून कारभारी होते. त्यांच्या मार्फत हें काम रावसाहेबांकडे आलें होतें.

काम कांहीं परक्याचें नव्हतें, आगन्तुकाचें नव्हतें, नवोदय भाग्यवन्ताचें नव्हतें, " महाराष्ट्रीयांस प्रकर्षच्छायागुणानें आश्रयभूत अशा महाराष्ट्र भूमींत दृढमूल झालेल्या सत्कुलवृक्षाच्या अंकुराचें होतें. तुह्मांसारख्या सुज्ञ व प्रसिद्ध पुरुषाची विशेष प्रसिद्धि होण्याचा हा समय आहे. वारंवार असा समय येत नाहीं. " असें. २-५-१८७४ चें खुद्द आबासाहेब महाराजांच्या हातचें पत्र रावसाहेबांस येतांच १८७४ सालीं जें काम रावसाहेबांनीं हातांत घेतलें तें त्याचा शेवट लागेतों म्हणजे १८८४ सालापर्यंत सोडलें नाहीं.

त्यांनीं एक छापील अर्ज हिंदुस्थान सरकारकड पाठविला. त्या अर्जांमध्यें खर्चास नेमणूक, रहावयास इमारती व सन्मानास उच्च वंशाला शोभेल अशी पदवी, गडकरी व संरक्षक शिपाई इतकीं मिळावीं अशा मुख्य मागण्या होत्या. हें काम पुढें महाराणी सरकारापर्यंत न्यावयाचें होतें. तेथें काम चालविण्यास पाटणा येथील प्रसिद्ध बॅरिस्टर मि. टेलर यांची योजना रावसाहेबानीं केली. व त्यांस एक तार केली तीः—" मुंबई सरकार वर्षासन चालविण्याचें नाकारतें. वाडे स्वाधीन करा म्हणतें. कुलक्रमागत किताबाचा उपयोग करूं देण्याचें नाकारतें. सेवकांस दूर करा म्हणतें. ' छत्रपति ' ही राजचिन्हांकित पदवी आम्हीं नाहीं मागत. फक्त कुलाभिधान ' महाराज ' एवढीच. सातारकरांचें कुल दक्षिण हिंदुस्था-

×श्री शिवाजी महाराजांनीं मराठी साम्राराज्याची संघटित रचना केली त्यावेळीं १६७४ सालीं पेशवे पदावर नेमले गेलेले प्रसिद्ध जे पिंगळे म्हणून होते त्यांचे हे वंशज होते.

नांत पूज्य. सर्व लोक हळहळत आहेत. कठोर निकाल. व्हिक्टोरिया राणीसाहेब न्यायी. डलहौसीचे हुकमाची बजावणी स्थानिक सरकार करूं पहातें. त्या विरुद्ध लॉर्ड सॅलिसबरी यांकडून तहकुबी मिळवा. पुरातन कुटुंबाचा लोप लांबणीवर टाका. पार्लमेंत सभेंत प्रश्न विचारवा. अर्जाचे कागद पाठविले. राणी साहेबांचा अर्जही (टपाल मार्गे) पाठविला."

काम सुरू करतांना रावसाहेबांस फारशी आशा कोणी दाखविली नाहीं तरी प्रयत्न करण्याचा त्यांचा निश्चय कायम होता. " या महत्वाच्या प्रश्नाचा निकाल तुम्हीं म्हणतां तसाच होणार असला तरी मृत मनुष्याविषयींचें कर्तव्य मला पुरें करावयाचें आहे व सर्वांत वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हें काम पोंचवावयाचें आहे. " ( एका मित्रास पत्र )

रावसाहेबांनीं असा जो निश्चय केला होता त्याला मुख्य कारण असें होतें कीं कांहीं तरी दाद लागेल अशी त्यांना स्वतांना खात्री वाटत होती. " राजवाड्यांतून जर राणीसाहेबांच्या ( आईसाहेब महाराजांच्या ) दत्तक मुलास काढून लावण्यांत आलें तर ती एक राष्ट्रीय आपत्तिच होईल. अद्यापि ही गोष्ट कशी टाळतां येईल तें सुचवावें. इतिहास समूळ पुसून टाकतां यावयाचा नाहीं. व सरकार जर विचार करील तर असें करण्याची त्यास बुद्धि खचित होणार नाहीं असें मला वाटतें. " ( ११।९।१८७४ चें मि. टेलर यांस पत्र. )

हें काम मोठ्या खर्चाचें होतें व खर्चाचे पैसे मागें पुढें पोंचले तरी रावसाहेब काम अडून देत नसत. "सातारकरांच्या मुक्त्यारानें पुरेसा पैसा मला दिला नाहीं तरी मी आपणास हुंडी पाठवीत आहे. " मि. टेलर यांस २५-९-१८७४ चें पत्र. )

सातारकर महाराजांचा खटला समजावून देऊन येथील व विलायतेंतील वर्तमानपत्रांची व मासिकांची सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न करण्याचा रावसाहेबांचा बेत होता. त्याकरितां लघु आकाराचीं कांहीं

पुस्तकें वांटण्यास ते लिहिणार होते. रावसाहेब मुंबईस, व मि. टेलर विलायतेस, म्हणून त्यांस कज्जा समजावून देण्यास तुम्हांस वेळ मिळेल काय म्हणून दादाभाईस रावसाहेबांनीं २५।९।१८७४ च्या पत्रानें विचारिलें होतें. " समाजांत प्रतिष्ठा येईल अशी लहानशी पदवी, व तिचा मान राखतां येईल अशीं निर्वाहाचीं साधनें म्हणजे सवलतीचा तनखा, देण्यांत आला तर महाराजांस व सरकारास शर्मप्रद होईल व हा जुना झालेला व्रण बरा होईल. "

" ही शेवटली पण क्षुल्लक नव्हे अशी बाब ( महाराजांस वाड्यांतून काढण्याची—समाजांत जरा त्यांस कमीपणा आणणारी ) तुम्हीं दुरुस्त करूं शकाल काय ? " अशीं उत्तेजनपर पत्रें मधून मधून रावसाहेब मि. टेलर यांस पाठवीतच असत.

हें काम कांहीं सोपें नव्हतें; फार कठीण होतें; सरळ नव्हतें; फार भानगडीचें होतें; फार विचाराचें होतें; त्वरित होण्यासारखें नव्हतें म्हणून कालावधि लागला यांत आश्चर्य नाहीं. "तितक्या अवधींत कलेक्टर बदलले. मुंबईचे गव्हर्नर बदलले. कलकत्त्याचे गव्हर्नर बदलले. अविचारी औदार्य, व विचारी कृपणपणा या दोन टोंकांच्या मध्यें सरकारच्या धोरणाच्या लंबकानें झोंके अनेक घेतले असतील ! पण खालून वर व वरून खालीं असे कागदी घोडे नाचवितां नाचवितां सरकारनें उदारपणें महाराजांची स्थिति सुधारण्यास कांहीं तरी चांगली व्यवस्था करण्याचें ठरविलें ". ती व्यवस्था पुष्कळ समाधानकारक होती. निदान तसें रावसाहेबांस वाटलें होतें. व महाराजांचें कायमचें हित केल्याचें श्रेय सरकारास मिळणार होतें.

सरकारनें केलेला ठराव अमलांत आणण्याच्या कामीं रावसाहेबांनीं साहाय्य करण्याचें कबूल केलें व रावसाहेब एकंदर व्यवस्था कशी करावी याविषयीं उपाय सुचवतील असें महाराजांस लिहून गेलें. महाराजांची मान्यता येतांच रावसाहेबांस या कामीं साहाय्य

करण्यास पोलिटिकल एजन्टही सिद्ध होतेच. तथापि परमेश्वराची योजना तशी नव्हती. महाराजांस सरकारी ठरावांतील कांहीं अटी अमान्य होऊन प्रकरण तेथेंच थांबलें व सरकारनेंही "या कामासंबंधें तुम्हीं केलेल्या प्रयत्नास यश आलें नाहीं" असा सखेद उल्लेख रावसाहेबांस लिहिलेल्या एका पत्रांत केला, त्याशिवाय पुढें या प्रकरणाचें काय झालें तें कळण्यास रावसाहेबांच्या पत्रांत मार्ग नाहीं.

एवढ्या जोखमाचें काम रावसाहेबांनीं आपल्या शिरावर घेऊन एकंदर कागद पत्र वाचून, अर्ज तयार करण्यापासून तो मध्यंतरीं लागणारी माहिती वेळोवेळीं सरकारास पुरवून केवढे परिश्रम घेतले होते व नेहमीं प्रमाणें केवढी कळकळ दाखविली याची कल्पना त्याकामांतील कागदपत्र वाचल्याशिवाय व आंतील वाटाघाटी कळल्याशिवाय होणार नाहीं.

शेवटीं रावसाहेब एका मित्रास ह्मणाले. "एकंदर व्यवस्था इतक्या चांगल्या पंथाला येऊन ती सर्व फुकट जावी ह्मणून वाईट वाटतें. मी हें काम हातीं घेतलें तेव्हां या कामाचा शेवट कांहीं सन्मानार्थ बक्षिस घेतल्याशिवाय—सन्मान मिळविल्याशिवाय नव्हे हो!—तडीस नेईन असें वाटत होतें."

अशा रीतीनें जरी सातारकर राजे यांच्या कामांतून रावसाहेब निघाले तरी त्यांच्या विषयींची कळकळ व अभिमान त्यांच्या मनांतून केव्हांही नाहींशीं झालीं नव्हतीं. याचें एक उदाहरण विक्टोरिआ महाराणीसाहेबांच्या ज्युबिलीच्या वेळीं घडून आलें. रावसाहेबांनीं आपल्या एका इंग्रज मित्रास २३।२।१८८७ चें पत्र लिहिलें त्यांत त्यांनीं लिहिलें—"माझ्या जुन्या सातारकर पक्षकाराकरितां या ज्युबिली महोत्सवांत कांहीं तरी करतां येईल तर इच्छा होती. कोलब्रुककृत एल्फिन्स्टनचें चरित्र नुकतेंच वाचलें तेव्हां त्याच्या पूर्वस्थितीचें मला स्मरण झालें."

काठेवाडांतील संस्थानांची सुद्धां कामगिरी रावसाहेबांकडे येत असे.

येथील कांहीं संस्थानांत भायादांचें, म्हणजे भाऊबंदांचें, मोठें प्रस्थ माजलेलें होतें. कधीं कधीं त्यांची कांहीं विशेष व्यवस्था करावी लागे. त्यांची दौलत एकत्र करून राज्यकारभार करणाऱ्या मंडळांत त्यांनीं निवडलेले कांहीं सभासद घ्यावे अशाविषयीं कांहीं तंटा होता. त्यांस स्वतंत्र होण्याचीही फार हौंस असे. ब्रिटिश सरकाराशीं झालेल्या तहनाम्यावरून प्राप्त झालेल्या कच्छच्या रावांच्या हक्कास कांहीं बाध येईल अशी कांहीं व्यवस्था करण्याचा हट्ट १८६९ मध्यें भायाद धरून बसले. तें प्रकरण विलायतेस नेऊन निकाल लावून घ्यावयाचा होता. त्या कामीं रावसाहेब रावांचे वकील होते. मुंबईस आणखी एक सालिसिटर मदतीस होते. ते सालिसिटर, रावसाहेब व कच्छचे राव * हे एकत्र बसून बरेच महिने खटल्याचा खल करीत होते.

जुनागड संस्थानापासून आम्हीं राजकीय खातें व न्यायाचें खातें या दोन्हीं बाबतींत स्वतंत्र आहों असें मंग्रोळ दरबारचें म्हणणें होतें. तें काम १८७६।७७ सालीं रावसाहेबानीं १५ महिने केलें.

दक्षिणेंतील सरदारांची कामें रावसाहेबांकडे येत असत. वतनदार घराण्यांतील दत्तकाचीं प्रकरणें येत असत. त्यांत दत्तक मुलगा घ्यावयाचा असतां राजास अट घालतां येते कीं नाहीं असले बिकट कायद्याचे प्रश्न असत.

श्रीमंत गायकवाड सरकार यांची पाटिलकी, कित्तूर प्रकरण इ० संबंधें कांहीं कामाची हकीगत रावसाहेबांच्या कागदांत सांपडते तींत त्रोटक ऐतिहासिक माहिती आहे. दुसरीं अनेक संस्थानिकांचीं प्रकरणें रावसा-

* कच्छचे राव आपल्या भायादांशीं भांडूं लागले तें ऐकून रावसाहेबांस जेकब साहेब म्हणाले " जा, जाऊन राव भेटले म्हणजे त्यांस सांगा ज्या खांदीवर तुम्हीं उभे आहांत तीच तुम्हीं तोडीत आहांत. "

हेबांकडे आलेलीं दिसतात. पण त्या सर्वा संबंधें रावसाहेबांनीं पुढें काम चालविलेलें दिसत नाहीं म्हणून अधिक विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि या संबंधें क. जेकब यांनीं लिहिलेलें पुढील पत्र वाचण्यासारखें आहे.

बाह्यतः दृश्यमान होणारे संस्थानिकां विषयींचे अन्याय बघून अथवा सर्वत्र दूरवर पसरलेल्या असंख्य सरदारांच्या दुर्दैवी कहाण्या ऐकून भलतिकडे मन वाहूं देऊं नका. कारण बऱ्याचशा आपत्ती आपल्याच कुलंगड्यानीं त्यांनीं आपल्यावर ओढून आणलेल्या असतात. हें तर हिंदुस्थानांतील अशिक्षित सरदारांचे मोठें पाप आहे ! कपटप्रबंधाचा कसा काय परिणाम होईल हें समजण्या इतकें हल्लीच्या युगांत वस्तुस्थितीचें ज्ञान ते होऊं देत नाहीं. एक गोष्ट मात्र खरी दिसते. पुढें आणलेला पुरावा विश्वसनीय वाटतो व सांगितलेली गोष्ठ संभवनीय दिसते परंतु उलट तपासणी कसून केली म्हणजे सर्वच व्यूह कसा घडघडतो तें तुम्हीं जाणतच अहांत. ( १२।११।१८६७ )

रावसाहेबांनीं राजेरजवाड्यांचीं कामें मोठ्या हिंमतीनें केलीं परंतु अनेक वेळां त्यांचा मेहनताना बुडालेला आहे. राजेलोक दुसऱ्याच्या पायांनीं चालतात. कांहीं दिवसांनीं जर एक राजे जाऊन दुसरे आले किंवा मध्यस्थ मर्जींतून उतरले म्हणजे नवे राजे म्हणत. " जुना व्यवहार आम्हांला उलगडण्यास जड जातो;" मध्यस्थ म्हणत " आमचें आतां चालत नाहीं. आम्हीं काय करावें" तथापि लौकिक वाढल्यामुळें पैशाचें नुकसान रावसाहेबांनीं फारसें गणतींत धरलेलें नाहीं.

## प्रकरण १९ वें.

# रावसाहेबांच्या वकिलीचें रहस्य.

। परं भूयःप्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ॥ ( भगवद्गीता )

रावसाहेबांनीं वकिलींत जें अपूर्व यश संपादन केलें, त्याचें रहस्य लोकांस कळावें व त्याचा फायदा नवीन होतकरू वकिलांस व्हावा म्हणून तें रहस्यकथन या प्रकरणांत केलें आहे.

वकिलीच्या परीक्षेला नसलेलीं परंतु कायद्याचें ज्ञान वाढविणारीं इतर पुस्तकें सदोदित रावसाहेब वाचीत असत.

वकिलीला आरंभ होतांच पक्षकारांनीं नेमल्या वेळींच भेटलें पाहिजे असा रावसाहेबांनीं नियम केला व त्याची अम्मलबजावणी ते सक्तपणें करूं लागले.

" अगदीं सकाळीं येण्याचें ठरलें असतां उशीरां आल्यामुळें पक्षकारास १० वाजे तों माझी भेट होण्यास थांबावें लागलें. " (२३।६।१८६३रो.इं.)

ज्या कज्जांत कांहींच हांशील नाहीं तो घ्यावयाचा नाहीं असा रावसाहेबांचा ठराव असे. तेवढ्यावरून पेण येथील एक अपील * रावसाहेबांनीं घेण्याचें नाकारिलें.

" खालच्या कोडतानें एका मुद्याचा निकाल पुराव्याचा नीट विचार करून केला होता. दुसरा एकच प्रश्न उरला होता तो महंमदी कायद्याचा होता. पहिल्या मुद्याच्या निकालावर अवलंबून होता. तो विरुद्ध झाल्यानें आतां त्यांत अर्थ उरला नाहीं. " ( २६।९।१८६३. रो. उ. )

---

* "अभिप्राय देणें हें न्यायाधीशाचें काम मीं करतों." ( दुसऱ्या अशाच कामीं सातारचे ओक यांस ७।९।७२ चें पत्र. )

ज्यांत हांशील नाहीं तें काम हातीं न घेण्याचा जो रावसाहेबांचा नियम होता त्याच्या वाजवीपणाबद्दल वाखाणणी होण्याचा प्रसंग एके दिवशीं आला तो असाः—

एकदां एक पक्षकार रावसाहेबांकडे कागद घेऊन आला. ते वाचून पहाण्याचें रावसाहेबांनीं कबूल केलें. वाचून पहातात तों अपीलाचे कामीं विचारांत घेण्याजोगा एकही मुद्दा आंत नाहीं. म्हणून त्यांनीं काम हातांत घेण्याचें नाकारिलें. पुढें एक दिवस त्या पक्षकाराला दुसरा एक वकील अपील करतों असें म्हणणारा भेटला व त्यानें अपील तयार करून एका इंग्रजी बॅरिष्टराकडे, अपील मंजूर करून घेण्याकरितां व दरम्यान अपील मुदती बाहेर गेलें ती हरकत माफ करून घेण्याकरतां दिलें. तें काम कोडतांत निघावयाच्या दिवशीं रावसाहेबही त्यांचा एक दिवाणी अर्ज निघावयाचा होता म्हणून कोडतांत गेले होते. तेव्हां त्यांस सदरहू बॅरिस्टर जवळ येऊन म्हणाले. “ ज्या पक्षकाराचे तर्फे तुम्हीं अपील करीत नाहीं असें म्हणालेत तेंच अपील मी आतां कोडतांत दाखल करीत आहें. व नियमाच्या बाहेर उशीर झाला तो माफ करून घेण्यास मी हेंच कारण सांगणार आहे. ” पुढें बॅरिस्टरसाहेब व रावसाहेब यांचा संवाद खालीं दिल्याप्रमाणें झाला.

बॅ०–मि. विश्वनाथ ! तुम्हीं अपील कां गुदरलें नाहीं ?

वि०–त्यांत एकही मुद्दा घेण्यासारखा नव्हता. माझी सदसद्विवेकबुद्धि ते काम घेऊं देईना.

बॅ०–तुम्हीं कांहीं तरी कारणांची यादी दाखल करावयाची होती व म्हणावयाचें होतें मी आतां अपील चालवीत नाहीं ! असें कांहीं तरी केलें असतेंत तर अपील मुदतींत तरी झालें असतें !

वि०–हं ! असा कायदा आहे काय !? तुम्हीं म्हणता तसें करण्याचा

अधिकार देणारा एकादा कायदा मला मुळींच माहीत नाहीं ! कोर्ट मला कदाचित् विचारील तर माझीं कारणें काय आहेत तीं स्पष्ट सांगेन.

बॅ०— बरें तर ! मी आतां अपील तयार केलें आहे. व या मनुष्याचा ( एका मुसलमान बाईच्या मुक्त्याराचा ) मुदतमाफीचा अर्ज मंजूर झाला तर तें दाखल करण्यांत येईल.

वि०—फार चांगलें !

यानंतर कोडतानें अर्ज वाचिला. व आंतील सर्व खोडसाळ प्रकार कोडताच्या नजरेस आला. " मंडलिक यांनीं कागद घेतले. तीस रुपये घेतले व अपील गुदरण्याचें कबूल केलें अशीं असत्य विधानें त्यांत केलेलीं होतीं. "

खरा प्रकार प्रथम दिलाच आहे. गोषांतील एका स्त्रीचा कज्जा होता एवढेंच यांत विशेष होतें. न्या. वेस्ट म्हणाले. " रावसाहेबांनीं कज्जा न घेतांना फार तारतम्य ज्ञान दाखविलें. न्या. फोर्बस म्हणाले. " रावसाहेबांनीं जें वर्तन केलें तें वकीलांच्या संघांतून इतरांच्या हातून सहसा झालें नसतें "

यावर रावसाहेब म्हणाले " ही प्रशंसा अनिवार झाली व कोडताचें माझेविषयीं चांगलें मत आहे त्याला मी योग्य आहें असें वर्तन सदैव ठेवण्याची आशा करतों". तो अर्ज व अपील दोन्हीं नामंजूर झालीं.

ह्याच तत्त्वाचा त्यांना क. जेकब साहेबांनीं ७–१२–१८७७ च्या पत्रांत उपदेश केला होता. " कांहीं कांहीं कामें अशीं असतात कीं पक्षकार कितिही बुद्धिमान असल तरी यश येण्याचा संभव नसतो, अशा कामीं तुम्हीं आपल्या बुद्धीचा व्यय करूं नका; असें तुम्हांस मी तुमचा सर्वांत जुना मित्र म्हणून उपदेश करतों. अशा कामाची मांडणी उत्तम करूं शकाल, दोषांत गुणत्व आणण्याचा प्रयत्न कराल व त्यास शक्य तेवढी बळकटी आणाल व आपली फी मिळवाल; पण फळ काय !

म्हणून सर्वांत शहाणपणाची गोष्ट म्हटली म्हणजे खऱ्या कामांतच आपली बुद्धिसर्वस्व खर्च करा. आशा नसेल तर तडजोड करावी हा मार्ग उत्तम ".

रावसाहेबांनीं वकिलीच्या कामाबरोबर अर्ज लिहून देण्याचेंही काम सुरू केलें पण त्यासंबंधें एक त्यांची शिस्त असे ती एका पक्षकारास त्यांनीं अशी स्पष्ट करून सांगितली " तुमच्या बंधूंकडून अमूक संस्थानच्या मुख्य प्रधानाच्या जागेचा राजिनामा जुलमानें देवविला आहे. माझी फी मिळाली ह्मणजे मी तुह्मांस शिरस्त्याप्रमाणें अर्ज लिहून देईन व लोकांपुढेंही त्यांचें काय ह्मणणें आहे, तें शक्य असल्यास मांडीन. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करीन. परंतु या कामांत माझें खासगी वजन खर्च करीन अशी जर तुमची समजूत असेल तर मात्र ती फार चुकीची आहे. माझ्याहातून तें केव्हांही घडणार नाहीं. मला खटपट आवडत नाहीं व मी जें स्वतां करणार नाहीं तें तुह्मांस करा असा उपदेश करणार नाहीं." यावर पक्षकार ह्मणाले " आमचे कायदेशीर मार्ग दाखविणारे तुम्हीं. म्हणून कायदेशीर मार्ग दाखविण्यास तुह्मांकडे आह्मीं काम सोंपवितों. "

एक मुसलमान घरीं भेटला व म्हणाला मी सुरतेच्या नबाबांकडून "आलों आहे ". मी त्यास सांगितलें " नबाबसाहेबांचें पत्र मला तुम्हीं आणल्याशिवाय मी तुम्हांस ओळखणार नाहीं. " त्या सरसा तो निघून गेला. ( ६।११।१८६४. रो. )

पुढील उतारा बोधपर म्हणून १९।१२।१८७९ च्या रोजनिशींत रावसाहेबांनीं लिहून ठेवला आहे तो खालीं दिला आहे.

केशवरावः—पेणेस एक कज्जा चालवावयाचा आहे. त्यांत मुलगा मुलीचा असून दत्तक घेतला आहे. तो आम्हांस रद्द करावयाचा आहे. त्यास ऐकतों कांहीं ठराव आहेत. ते व शास्त्रार्थ असल्यास द्यावे.

उत्तर०—ठराव आतां झाला आहे; पण तो बरा नसून देशरिवाज उलट आहे. सांगा तुम्हीं आहे कीं नाहीं ?

के० होय, देशचाल आहे—पण—

उ० होय पण तुम्हीं लोभाविष्ट होऊन आतां ती नाहीं असें ह्मणणार!

( केशवरावांनीं अंसप्रदेश असंतोषदर्शनार्थ संकुचित केले )

मी पुढें तसेंच म्हटलें:—तर मी ग्रंथ तयार करीत आहें त्यांत खरा मजकूर लिहित आहें; त्या विरुद्ध मी तुम्हांस शास्त्रार्थ देणार नाहीं.

के०—पण त्याला छापावयास दिवस लागतील. इतक्यांत—

उत्तर—इतक्यांत मीं कांहीं खोटें कालत्रयीं देणार नाहीं.

अहमदनगराहून एक गृहस्थ वकिलातनामा घेऊन आले. वकिलातनामा देतांना " बक्षिस " मागूं लागले. " तुमच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं असें सांगून त्या बाक्या चोरास घालवून दिला " २५।१।१८६४ रो.)

" सरकारावर फिर्याद करणें हें फार पैशाचें व महत्वाचें काम आहे. यासाठीं पुरा विचार केला पाहिजे ( रत्नागिरीचे बळवंतराव रानडे यांस २।३।१८७१ चें पत्र )

" घरगुती खटले ( उदाहरणार्थ पितापुत्रांचे ) दोन पैसे नफानुकसान सोसून आपसांत अगर कोणी नेकीचा मनुष्य मध्यस्थ घेऊन मोडावे. वकील या नात्यानें असा उपदेश करणें हें जरी नुकसानीचें असलें तरी त्या धंद्याचा दर्जा वाढविण्यासारखें असतें." शिवाय हा उपदेश सर्वांस कुटुंबस्वास्थ्य देणारा आहे ( १३-३-१८७० चें गोंधळेकर यांस पत्र )

कज्जे विकत घेऊन भांडण्याच्या विरुद्ध रावसाहेब असत. " वकिली म्हणजे सराफी असली तरी दुसऱ्याचे कज्जास पदरचे पैसे लावणें पसंत नाहीं. स्वतांची फी वगैरे जी प्राप्ति व्हावयाची ती समंई मागून झाली तरी चिंता नाहीं. " ( ४।३।१८७० चें पांडोबा दातार यांस पत्र )

अनेकवेळां कुळें किंवा त्यांचे मध्यस्थ चांगले करार मदार करून पुढें

अगदीं रावसाहेबांस खर्चासंबंधें तोंडघशीं पाडीत. पण रावसाहेब काम शेवटास नेल्याशिवाय टाकीत नसत. ‘ क्ष ’ यांणीं अद्यापि एक कवडीही भरली नाहीं. एकाही वकिलीची फी भरली नाहीं. तरजुमे करण्यास द्यावयाचे त्यांचा खर्च नाहीं. वेळेवर पत्राचा जबाब नाहीं. नव्वद दिवसांची मुदत सरली, ( आज सुटीनंतर सरते. ) अद्यापि त्यांकडून मनुष्य नाहीं. असा प्रकार आहे. हें काम न घेण्यास मला जर ठाकुरद्वारीं + १५ रुपये भरण्यास सांगाल तर मीं आनंदानें भरीन. आपणास इजा, मला त्रास, व मालकाच नुकसान, इतकीं बंद होतील. मालक भरंवशाचे कूळ ह्मणून तगाद्याची जराशी ढिलाई झाली. ‘ प्रारब्धस्यान्तगमनम् ’ या न्यायानें तडीला नेलेंच पाहिजे. ( ११।७।१८७३ चें बापूसाहेब आठल्ये यांस पत्र. )

“ क्ष यास सांगावें अवश्य तेवढा पैसा पाठवावा. अद्याप खर्चा-करतां कांहीं पोंच झाली नाहीं. × × × परंतु ही गोष्ट कामाचें माप पुरें घालण्याच्या आड येतां कामा नये. ” ( १४।१।१८८५ चें बापूसाहेब आठल्ये यांस पत्र. )

“ मि. जार्डिन यांस हातचें सोडूं नये. तीन्हीं कज्जांत त्यांस गुंतवून ठेवावें. खर्चाच्या पैशाची तजवीज कशी करावयाची ही गोष्ट फक्त तूर्त एक तुम्हांला किंवा मला ठाऊक असूंद्या. नदी तरून कांठाशीं बुडण्यासा-रखें होईल.” ( १०–३–१८८६ चें बापूसाहेब आठल्ये यांस पत्र )

काम पुष्कळ येऊं लागलें म्हणून रावसाहेब हाताखालीं माणसें पुष्कळ ठेवीत असत. त्यांची निवड चांगली असे. व त्यांचाही उत्तरोत्तर उत्कर्षच झाला असें आढळून आलें. गणपतराव भास्कर हे अगदीं पहिल्यानें यांच्या बरोबर काम करीत असत. ते स्मॉलकॉज कोडताचे मुख्य जड्ज झाले होते. कृष्णाजी नारायण खेर यांस १८७५ सालीं नोकरीवर ठेविलें होतें.

+ टीप—श्रीरामाचे पुढें.

गोविंदराव रानडे बी. ए. हे हपीसांत कारकुनीच्या कामावर होते. पुढें ते सेक्रेटॅरिअॅट मध्यें मोठ्या हुद्यावर चढून पेनशनींत गेले.

नागोपंत दिवाण हे यांच्याकडे कारकून होते. पुढें मराठी वकिलीची परीक्षा देऊन कोल्हापूर येथें वकिली करूं लागले व गबर झाले.

शामराव विठ्ठल हेही यांचेबरोबर काम करीत असत. पुढें ते स्वतंत्रपणें काम करूं लागले व फार प्रसिद्धीस आले.

यशवंतराव उर्फ बापूसाहेब आठल्ये हे यांच्यासह बरींच वर्षें काम करीत असत. पुढें ते नायब दिवाणाच्या जागेपर्यंत, बडोद्यास वाढले होते.

दाजी साहेब खरे हे त्याच प्रमाणें, यांच्याकडे काम पहावयास असत. त्यांनीं वकिलींत पुष्कळ लौकिक संपादन करून वयाच्या ६० व्या वर्षी परलोक गांठिला.

वकिलीचा धंदा हा फार प्रतिष्ठित मानलेला आहे. वकिलाचें मुख्य काम आपल्या अशीलाच्या पक्षाचें मंडन करून न्यायाच्या कामांत न्यायाधीशास मदत करणें हें आहे. हीं दोन्हीं कामें करण्यास कायद्यांत वाकब असे लोक लागतात. पण त्याशिवाय ते प्रामाणिक व पापभीरू, सुनीतिमंत असे असावे लागतात. १८७९ सालीं हायकोर्टांत एका मनुष्यानें सनदेकरतां अर्ज केला. त्याची पूर्वींची वर्तणूक फार संशयास्पद होती. तेव्हां आपल्याबरोबर मांडीला मांडी लावून काम करण्याची संधि त्यास देऊं नये अशी कुरकुर वकीलमंडळांत सुरू झाली. तिचा शेवट लावण्यास पुढें कोणी व्हावें असा प्रश्न होता. रावसाहेबांना अप्रामाणिक मनुष्याची फार चीड असे. त्यांनीं लागलेंच पुढें होऊन वरील गृहस्थास सनद कां देऊं नये याविषयींची कारणें शोधून काढण्याचे कामावर २।३ वकिलांची कमिटी, प्लीडर्स असोशिएशन मार्फत जमविली व तिनें कांहीं काम केलें. पुढें साक्षीपुरावा घेऊन पूर्ण चौकशी करून रिपोर्ट करण्याकरतां आपण पुढें झाले व सर न्यायाधीशांकडे

अर्जदाराची पूर्वपीठिका देऊन छापील रिपोर्ट पाठवून दिला. त्यावरून सर न्यायाधीशांनीं अर्जदाराचा सनदेबद्दलचा अर्ज नामंजूर केला.

याकामीं त्यांस शान्ताराम नारायण, घनश्याम नीळकंठ नाडकर्णी, शामराव विठ्ठल कैकिनी, माणिकशहा जहानगीरजी यांची मदत होती.

वकिलीचा धंदा श्रेष्ठ आहे. त्याची पदवी फार उच्च आहे. या गोष्टीचा अभिमान त्यांना किति असे त्यांचें एक उदाहरण देऊन हें प्रकरण पुरें करतों.

औपचारिक कृत्यांत देखील वकिलांच्या हातून कांहीं चुकत आहे अशी त्यांस शंका आल्यास त्याची नीट चौकशी करून कोणता योग्य उपचार आहे तो शोधून काढीत व त्याप्रमाणें रावसाहेब वागत असत यास उदाहरण असें झालें:–न्यायमूर्ति वेस्ट्रॉफ् हे १८८२ च्या एप्रिल महिन्यांत पेन्शन घेऊन स्वदेशीं गेले. हे फार विद्वान होते. वकिलांचे कैवारी होते. वकिलांचा दर्जा जेणेंकरून वाढेल तें करावयास ते तत्पर असत. यामुळें ते वकिलांच्या मंडळींत सुद्धां फार लोकप्रिय होते. तेव्हां उत्साहभरांत वकील मंडळीनीं त्यांस लेखी मानपत्र देण्याचा ठराव केला. लेखी मानपत्राचा प्रकार रावसाहेबांस अनुचित वाटला. कारण बॅरिस्टरांची कधीं कोणत्याही केवढ्याही मोठ्या न्यायाधीशास लेखी मानपत्र देण्याची वहिवाट नाहीं. कलकत्त्याकडील वहिवाट आनंद प्रसाद बॅनर्जी यांजकडून कशी आहे ती माहिती तारेनें मागविली. तिचें उत्तर "लेखी मानपत्र देण्याची" असें आलें. तरी त्यांस तो प्रकार रुचला नाहीं. रावसाहेबांस मोठा पेंच पडला होता. एक तर सर्व बरोबरीच्या वकिलांनीं ठराव केला तो कसा मोडावा; दुसरा असा कीं वैयक्तिक संबंधानें न्या. वेस्ट्रॉफ् हे यांचे स्नेही होते तेव्हां त्यांना मिळणाऱ्या मानास एक औपचारिक पायरी उतरावयास कसें लावावें! रावसाहेबांनीं हा पेंच नामदार फुल्टन साहेब यांच्या मार्फत खुद्द न्या. वेस्ट्रॉफ् साहेब यांकडूनच पुढील पत्र लिहून सोडवून घेतला. "विलायतेस ॲटर्नी जनरल हे अशा प्रसंगीं आपण तोंडीं भाषण करतात. तीच वहिवाट मला बरी वाटते. अपील

शाखेचे आह्मी वकील बॅरिष्टरांपेक्षां दर्जानें कांहीं कमी नाहीं. लेखी मानपत्र देऊन आमचा दर्जा कमी करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. इ० मजकूर माझें कर्तव्य ह्मणून न्यायमूर्तींच्या कानावर घातल्यावर दिलेला उपदेश मानणें भाग आहे ".

न्यायमूर्तींचें मत लेखी मानपत्र नको असें पटलें.

याप्रमाणें पदोपदीं इतरांस उदाहरणें घालून दिलेल्या सत्तत्वांचीं उदाहरणें अनेक देतां येतील. परंतु विस्तारभयास्तव सर्वतोमुखीं असलेलें पुढील मार्गदर्शक वकिलीचें नीतितत्त्व वगळतां यावयाचें नाहीं.

सुभानराव वाघोलीकर नांवाच्या एका गृहस्थांवर फौजदारी खटला झाला होता तो सेशनमध्यें पुण्यास चालावयाचा होता. त्यांनीं रावसाहेबांस वकील पत्र दिलें होतें. खटल्याचा दिवस तारेनें रावसाहेबांस आगाऊ कळविलेला होता. तो दिवस शुक्रवार होता. त्या दिवसाची रजा घ्यावी कदाचित् शुक्रवारीं सर्व काम न संपलें तर शनिवारावरही जाईल म्हणून त्या दिवसाचीही रजा घेऊन ठेवावी अशी विनंति केलेली होती. याहून दिवस जास्त लागणार नाहींत पण न जाणों वेळ आहे वखत आहे. सोमवारचीही घेतलेली बरी अशी विशेष प्रार्थना केलेली होती. रावसाहेबांनीं तशी व्यवस्था करून ठेविली होती. फी रु. सहाशें ठरली होती.

गुरुवारीं दुपारीं २ वाजतांच्या गाडीनें पुण्यास जाण्याचें ठरलें होतें. ते परस्पर कोडतांतूनच काम आटपून जाणार होते. परंतु दुपारीं जेऊन खाऊन कोडतांत जावयास निघतांना आपल्या कुटुंबास "पुण्यास जात आहें, काय हवें नको" म्हणून विचारावयास गेले. कुटुंबाची प्रकृति इतकी नाजूक होती कीं तिला हवेंतला सूक्ष्म फरक दाखविणाऱ्या यंत्राची उपमा दिली तर शोभण्यासारखी होती. रावसाहेब आपल्या कुटुंबाच्या शरीरास तर त्रास होऊं देत नसतच परंतु मनासही होऊं न देण्याची खबरदारी घेत असत.

रावसाहेब गुरुवारीं आज जाणार व कदाचित् सोमवारावर काम गेलें म्हणजे त्यांचें दर्शन मंगळवारपर्यंत होणार नाहीं म्हणून त्यांच्या कुटुंबास फार अवघड वाटून नुसतें त्यांचें कुटुंब त्यांस म्हणालें " वाटलें तर जाण्यापूर्वी घरीं नुसतें शिरून जावयाचें. " परंतु एवढी प्रिय पत्नीची सुचना म्हणजे रावसाहेबांस प्रेमातिशयामुळें आज्ञाच वाटून जातां जातां घरीं शिरून पत्नीला कुशल विचारून स्टेशनवर जातात तों गाडीची शिटी वाजून गाडी निघाली होती. घड्याळ काढून पहातात तों वेळ बरोबर आहे असें समजलें. रावसाहेबांस, आपली वेळ चुकली यासबबीवर मुदत मागण्याकरतां सेशन जड्जाकडे तोंड वेंगाडण्याचें जीवावर आलें. तिथल्या तिथें त्यांनीं ट्रॅफिक मॅनेजर जेथें होते तेथें तारा वगैरे करून स्पेशल ट्रेन काढण्याची व्यवस्था केली व पुण्यास निघून गेले. शुक्रवारीं सर्व दिवसभर कज्जा चालून साक्षी पुरावा संपला व वकिलांच्या भाषणावर कज्जा शनिवारावर तहकूब अशी त्याच रात्रीं मुंबईस तार आली. व शनिवारीं संध्याकाळीं सुभानराव दोषमुक्त झाले म्हणून तार आली. रावसाहेबांनीं या कामाकरतां स्पेशल ट्रेन स्वतांच्या खर्चानें काढून वेळेवर हजर राहून संकेतपालन करण्यांत जी कर्तव्य जागृति दाखविली तिची स्तुति जी अद्यापिही गाण्यांत येत आहे ती यथार्थ आहे.

रावसाहेब मंडलिक यांची ख्याति राजे रजवाडे, वतनदार, जहागीरदार व जनता यांच्या हक्काचे संरक्षक म्हणून विशेष आहे. त्यांच्या हक्काकरतां भांडण्यांतच त्यांचें आयुष्य खर्च झालें. व हक्क संरक्षणार्थ हातांत घेतलेल्या पुष्कळ कामांत त्यांस यशच मिळत गेलें.

आपाजी बल्लाळ देसाई यांनीं एका पत्रांत रावसाहेबांस लिहिलें कीं आपण अभिजात कुलोत्पन्न वतनदारांच्या हक्कांचें संरक्षण करणारे या मनूंतले केवळ पराक्रमी अर्जुन अहांत.

रावसाहेब फडणीस मेणवलीकर यांचे वतीनें काम करीत असतां मेणवली गांव सुटल्यावर आणखी पुढें अर्जदारें खटपट करण्याबद्दल विनंति

करतांना रावसाहेब फडणवीस लिहितात "पुन्हां अर्ज करणें तो आपले हातून व्हावा अशी इच्छा आहे. कारण, आपणांस इकडील अभिमान थोर. लिहिण्याचे कामांत आपले इतके बाकबगार थोडे निघतील."

श्रीमंत शाहू छत्रपति महाराज करवीर संस्थानचे माजी अधिपति यांच्या आजीबाई श्रीमंत महाराज मातुश्री अहिल्याबाई यांनीं आपल्या कांहीं कामाकरतां रावसाहेबांस वकील पत्र दिलें होतें. तेव्हां त्यांनीं लिहिलें:—" विद्वत्ता, प्रामाणिकपणा आणि हातीं धरलेल्या कामांत मनःपूर्वक झटण्याची उत्सुकता हे सर्व गूण आपल्या अंगीं असलेल्याचें ऐकून सदरील कामीं आपली मदत घेण्यांत आली आहे इ० *" (११।६।१८६७ चें मातुश्री अहिल्याबाईराणीसाहेब यांचें पत्र )

हा लिहिण्याच्या कामांत वाकबगारपणा, ही अर्जुनाची वेधशक्ति, रावसाहेबांच्या अंगीं कोठून आली ? उपजतच होती ? कीं श्रमानें प्राप्त झाली ? याचा विचार केला पाहिजे. असले अलौकिक गूण एकदम कोणालाही प्राप्त होत नाहींत. हें पुढें दिलेल्या डेमास्थनीसच्या गोष्टीवरून सिद्ध होत आहे.

डेमास्थनीस हा सर्वोत्कृष्ठ वक्ता ग्रीस देशांत होऊन गेला. त्यानें अनेक सरस भाषणें केलीं, पण त्यानें केलेल्या देशसेवेबद्दल त्यास मुकुट अर्पण करून त्याचा सन्मान कांहीं देशबांधवांनीं करावयाचें योजिलें असतां, त्याच्या वैऱ्यानें अशा करण्यास हरकत घेतली त्या वेळेस आपल्या वैऱ्याचें म्हणणें खोडून टाकण्याकरतां आत्मसंरक्षणार्थ डेमास्थनीस यानें जें भाषण केलें तें त्याच्या सर्व भाषणांत उत्कृष्ठ होय; म्हणजे तें जगांतील उत्कृष्ठ वक्त्याचें उत्कृष्ठ भाषण होय.

* राणीसाहेबांनीं सर्वपत्र कारकुनाकडून लिहवून शेवटील अक्षरें बहुत काय लिहिणें, हीं स्वहस्तानें मोडींत लिहून मोहोर करविली आहे. यावरून १८६७ सालीं राजघराण्यांतील स्त्रियांस लिहितां वाचतां येत होतें असें दिसतें.

तें वाचावयास कोणी लागला म्हणजे आनंदाच्या लहरी उत्पन्न होतात व अगदीं बहारीच्या भागास आरंभ झाला म्हणजे वाचक अगदीं तल्लीन होऊन जातो व त्या भागाचें वाचन समाप्त होतांच तें पुस्तक खालीं ठेवून देतो. त्यास वाटूं लागतें कीं वाचलें इतके पुरें झालें. येथें वक्तृत्वकलेची अन्तिम सीमा आपण पाहिली. येथून पुढें वाचणें म्हणजे आनंदपर्वताच्या उच्च शिखरावरून कडेलोट करून घेण्यासारखें आहे.*

प्रश्न असा कीं एवढी वक्तृत्व कला डेमास्थनीस सारख्या प्रथमतः तोतरें बोलणाऱ्या व कृश शरीराच्या अशक्त मनुष्यास कशी साध्य झाली ! याची गोष्ट अशी आहे कीं, डेमास्थनीस याचा पिता फार संपन्न गृहस्थ होता. दुर्धर व्याधीनें पीडित होत्साता आपलें मरण जवळ आलें असें पाहून पुढें आपल्या लहान दुर्बल मुलाचें व स्त्रीचें काय होईल याची चिंता करूं लागला, तेव्हां मृत्युपत्र करून काहीं व्यवस्था करून ठेवावी असें त्याच्या मनांत आलें. त्याप्रमाणें त्यानें एक मृत्युपत्र करून स्त्रियेचा व मुलाचा संभाळ करण्याची व स्थावरजंगम मिळकतीची व्यवस्था करण्याची सर्व जबाबदारी आपल्या एका स्नेह्याकडे सोंपवून त्यास कांहीं मेहेनताना देण्याचें ठरवून सुखानें स्वर्लोक गांठिला. परंतु पित्याचा मित्र मृत्युपत्राप्रमाणें न वागतां डेमास्थनीस व त्याची माता यांची हेळसांड करून मालमत्तेची अफरातफर करता झाला. पुढें सज्ञान झाल्यावर ग्रीस देशाच्या शेंकडों प्रतिनिधीं पुढें उभें राहून त्याच्या विरुद्ध गाऱ्हाणें करण्यास डेमास्थनीसला कोणी साहाय्य करीना, म्हणून हें काम स्वतांच त्यास करावें लगलें. तेवढ्याकरतां त्यानें अचाट श्रम घेऊन प्रचण्ड तयारी

---

* कृष्णशास्त्री यांनीं अनेकविद्यामूलतत्वांत जी या वक्त्याचीं फिलिप्सच्या विरुद्ध लढाईस उभें राहण्यास आपल्या थंड देशबांधवास चेतविण्याकरतां ज्या झंझावातप्रबल भाषणांचीं भाषांतरें दिलीं आहेत त्यांत या भाषणाच्या भाषांतरास जागा मिळाली पाहिजे होती.

केली. तोंडांत लहान दगड धरून समुद्रकांठीं उभें राहून मोठमोठ्यांनीं ओरडून पहिल्यानें आपला तोतरेपणा घालविला. व डोंगर चढून उतरून आपल्या छातीला बळकटी आणली व इतकी सुन्दर वक्तृत्व कला संपादन केली कीं आपली सर्व मिळकत ग्रीस देशाच्या हजारों प्रतिनिधींपुढें वक्तृत्व करून त्यांच्या हुकमानें परत मिळविली. त्याचप्रमाणें रावसाहेबांचें वडील नानासाहेब व रावसाहेब यांस अतिशय परिश्रम घेऊन वडिलार्जित वतन मिळवावें लागलें. व तें मिळवितांना जे श्रम करावे लागले त्यांतच रावसाहेबांच्या संस्मरणीय वकिलीच्या सामर्थ्याची किल्ली आहे, असें पुढील दिलेल्या हकीकतीवरून कळेल.

मागें दुसऱ्या प्रकरणांत पृष्ठ सात येथें सांगितल्याप्रमाणें १७३३–३४ सालीं विसाजीराम मंडलिक यांसीं शाहू छत्रपति महाराज यांचे आज्ञेवरून जगजीवन परशराम पंडित यांणीं नाणीज हा गांव जल, तरू, पाषाण निधिनिक्षेप, हल्लीं पट्टी, पेस्तर पट्टी, खेरीज हक्कदार इनाम करून दिला; त्या दिवसापासून माजी अंमलांत व इंग्रजी अंमलांत हा गांव मंडलिक यांकडे अविच्छिन्नपणें इनाम चालत असतां १८१८ सालीं कोणाकडे इनाम गांव चालत होते ते हुकमाशिवाय चालों नये. येविर्षी ताकीद झाल्यावरून मंडलिक यांनीं आपल्या निसबत कारकून यांजकडून सनदा रुजू करविल्यावरून मेहरबान रीड साहेब यांहीं त्या सनदा पाहून पूर्वापार चालत आल्याप्रमाणें गांव चालविण्याविषयीं नारो गणेश हवलदार यांस २४।१०।१८१८ रोजीं हुकूम पाठविला. × × ×

पुढें १८३४ सालीं कलेक्टर यांनीं जाहीरनामा प्रकट केला कीं सनदा कौल व हरएक कागद असेल तो तीन महिन्यांचे मुदतींत तालुका निहाय हजीर न केल्यास मंजूर धरला जाणार नाहीं. त्यावरून नारो धोंडदेव मंडलिक यानीं सनदा हजर केल्या त्यावर रामजी कदम मामलेदार

रत्नागिरि, यांनीं सनदा खऱ्या नाहींत असा आपला अभिप्राय दिल्यावरून तीन चार वर्षें इनामाची रक्कम मंडलिक यांस मिळाली नाहीं. ती त्यांनीं रेव्हिन्यू कमीशनर व कौन्सिल यांकडे अर्ज करून मिळविली.

१८३७ च्या मार्च महिन्यांत २५ तारखेस १८२७ चें रेग्युलेशन १७, कलम १० प्रमाणें कलेक्टर यांनीं मंडलिक यांस इनामाच्या चौकशीस हजर राहण्याची नोटीस दिली. नारो धोंडदेव कागद पत्र घेऊन हजर राहिले. मि. स्पूनर यांनीं कागदपत्राची पहाणी करून २०।२१।१८३८ रोजीं मंडलिक यांच्या विरुद्ध निकाल दिला व इनाम जप्त केलें. सनदा बनाऊ आहेत परंतु बहुत वर्षें होऊन गेल्यामुळें तसा पुरावा देणें शक्य नाहीं. तें सोडविण्यास व झालेलें नुकसान भरून मिळण्यास रत्नागिरि येथील सदर अमीन कोडतांत नारो धोंडदेव यांनीं १०।११।१८४० रोजीं ४३८।१८४० नंबरचा अव्वल दावा आणला. वादीचे वकील काशिनाथ रामचंद्र किबे व सरकारचे वकील विनायक सदाशिव ठाकूर हे होते.

सरकारचें म्हणणें असें पडलें कीं ज्या कागदावर, ज्या शाईनें सनदा लिहिल्या गेल्या त्या कागदाचा व शाईचा तजेला निराळा दिसतो. व त्या सनदांचे पाठीवर मोर्तबे डीकवणी बंदाचे सांध्यावर असावी तसी नाहीं. ह्मणून त्या सनदा खऱ्या नाहींत. ह्मणून माजी मामलेदार यांनीं रिपोर्ट केला. माजी अमलांतील झडत्या पुणें मुक्कामीं आहेत त्यांचा मोकाबला पाहिला पाहिजे; त्याखेरीज दुसरा आधार नाहीं. त्यावरून अंजनवेल तालुक्याच्या व रत्नागिरि तालुक्याच्या जुन्या झडत्या, बेहेडे, अजमास व ताळेबंद इ० कागदपत्रांची तपासणी करतां कित्येक ठिकाणीं या गांवच्या जमाबंदी कित्येक सालीं वादीच्या वडिलांच्या नांवें, मोकाशाचे सदरांत आहे. कित्येक सालीं इनामाचे सदरांत आहे. कित्येक ठिकाणीं बदल मुशाहिरा खेरीज कबज किंवा तैनात इनाम

या सदरांत खर्च लिहिली आहे. कांहीं सालीं इनाम शब्द न लिहितां खर्च लिहिला आहे. बहुत वर्षें झालीं सबब सनदा बनावट आहेत असा पुरावा करणें मुष्कील आहे. सनदा खऱ्या मानल्या तरी गांव "बदल मुशाहिराचे" सबबीनें चालला होता. म्हणजे वादीचे वडिलांकडे पेशवाईत अंजनवेलच्या मुजुमदारीचा दरक होता त्याजमुळें चालला होता. आतां ईंग्रजींत दरक बंद झाला सबब १८२७ चा कायदा १७क. ३५ र. ४ प्रमाणें सरकारांत परत घेण्यास सबब पुरी आहे. मि. रीड साहेबांची चवकशी फुरसुतीच्या अभावीं पुरी नव्हती. वादीच्या सनदांवरील मोर्तब जगजीवन परशराम यांच्या इतर सनदांवरील मोर्तबांसारखे नाहींत.

सनदांचा तजिला नवीन या प्रतिवादीच्या म्हणण्यावर वादीचा जबाब असा होता कीं आम्हीं सनदा जतनेनें संभाळून ठेवल्या होत्या.

वादीनें, काहीं गांव मोकासा सदरांत असून इनाम चाललेले दाखविले. व दाखल्यास मोर्तबाच्या चिठ्या व इजमायली हिशेब दिले. याकामांत वादी तर्फे पेशवे सरकारचे माजी दफ्तरदार पांडुरंग रामचंद्र देवधर ऊर्फ आबासाहेब ढमढेरे व रावसाहेब पेंडसे व सरकारतर्फे रा. ब. नरसो लक्ष्मण दफ्तरदार, निसबत अजम रेव्हिन्यू कमीशनर, यांसीं सवाल लिहून पाठवून जबाब लिहून कोर्ट मार्फत आणविले होते. हे साक्षी वाकबदार व अब्रूदार म्हणून त्यांच्या शब्दावर शब्दार्थ व वहिवाट या संबधें भरंवसा कोडतानें ठेविला. जगजीवन परशराम यांच्या आणखी सनदा पाहून त्यांचे सिके मोर्तब येक प्रकारचे होते असें नाहीं असें कोडताच्या नजरसे आलें.

मुजुमदारी धोंडो नारायण याणें १८५९ त मिळविली तेव्हां त्याच्या पूर्वजानें १८३४ त मिळविलेला इनाम गांव मुजुमदारीचा मुशाहिरा होऊं शकत नाहीं हेंही कोडतास मान्य झालें, दोन्हीं तालुक्याच्या झडत्यांत इनाम शब्द सांपडतो या वरून दोन्हीं तालुक्यांत भूल होईल अशी शंका

कोडतास आली नाहीं. सनदा खोट्या म्हणतां येत नाहींत. जतनेनें ठेवल्यामुळें मैला झाल्या नाहींत. इंग्रजी अमल सुरू होण्या पूर्वीं गांव बहूत वर्षें भोगवट्यास असल्यामुळें तो हवा तेव्हां जप्त करण्यास कलेक्टर साहेबांस अखत्यार नाहीं. सदर अमीन **वासुदेव शिवराम खारकर** होते. त्यांनीं २९।८।१८४३ रोजीं निकाल दिला तोः—कोडत वादीस नुकसान देववीत नाहीं. सदरहू कागदपत्र वाचून कोडतास दिसून येतें कीं वादीचा दावा वाजवी आहे. सबब वादी तर्फे निवाड पत्र देण्यात येतें कीं सनदांप्रमाणें वंशपरंपरनें गांव वादीकडे कलेक्टर यांनीं चालवावा वसुलाचे रुपये परत द्यावे. व दिलेल्या दाव्या पुरता खर्चाचा हुकूम केला.

याच्यावर सरकारनें सीनियर असिस्टंट जज्ज यांचे कोडतांत ११। १८४४ चें अपील केलें त्यांत सरकारचे वकील **भिकाजी लक्ष्मण मसुरेकर** होते. या अपीलांत एक नवीन मुद्दा होतो तोः—

आपण युरोपीयन सरकारी अमलदार आणि सरकारी कामांतील वर्तणुकी बाबत आपणास अव्वल कज्जांत प्रतिवादी केलें होतें. याज करतां रेग्युलेशन १८२७ का०२ कलम ३७ व ४३ व सदर दिवाणी अदालतीचे जज्जसाहेब यांहीं इन्टरप्रिटेशन केलें तें गव्हर्नमेंट गॅझिट ता. ४ माहे जानेवारी सन १८४४ यांत छापिलेलें आहे त्याप्रमाणें या कज्जाचा इनसाफ करण्यास सदर अमीन यांजला अखत्यार नाहीं या करतां सदर अमीन यांचा निवाडा रद्द व्हावा.

**सीनीयर** असिस्टंट जज्ज यांचें मत जुन्या तक्रारींसंबंधें सदर अमीन यांच्या मताप्रमाणें पडलें. परंतु नवीन कायद्याच्या मुद्यावर जज्ज साहेबांचें मत **सीनीयर** अ. जज्ज यांनीं अगोदर मागितलें तेव्हां जज्ज साहेबांनीं एकतर्फी मजकूर ऐकून लिहून कळविलें कीं नवीन इन्टरप्रिटेशनचा मतलब मागील कामास लावला तर लोकांचें नुकसान होईल. जसें तुमचे नजरेस येईल तसा इनसाफ तुह्मीं करावा. या नंतर **सीनीयर**

अ. जज्ज यांनीं अजम विष्णु भिकाजी फडके, मुकादम, त्रिंबक महादेव पोत्ये, बाळाजी सदाशिव फाटक, बाळाजी महादेव आगाशे, दाजी नारायण लेले या पंचांकडे सनदांचा प्रश्न पुन्हां ठेवला. त्यांनींही सनदा खऱ्या आहेत. गांव इनाम आहे. चाकरी बद्दल चालत आला नाहीं असा अभिप्राय दिला मग सीनीयर अ० जज्ज मि० प्राइस यांनीं खर्चासह २८।१०।१८४५ रोजीं अपील रद्द केलें.

याच्यावर अदालत जिल्हा कोंकण, जज्ज साहेब यांचे कोडतांत सरकारानें अपील नंबर १७०।१८४६ चें लाविलें. व कलेक्टरा विरुद्ध कज्जा चालविण्याचा अखत्यार नेटिव्ह सदर अमीनास नाहीं अशी नव्या इन्टरप्रिटेशन प्रमाणें तक्रार केली.

कोडतानें ठरविलें कीं इन्टरप्रिटेशनबद्दलचा अभिप्राय या कोर्टानें एकतर्फी केला होता. आतां कोडताचे नजरेस असें येतें कीं कायद्याचा मतलब इंन्टरप्रिटेशननें ठरविला त्या प्रमाणें चालावें. नुकसानीवर नजर देऊं नये. इन्टरप्रिटेशनांवरून फक्त कायद्याच्या अर्थाची सफाई झाली. तो अर्थ ज्या तारखेपासून कायदा चालू झाला त्या तारखेपासून चालू झाला असें समजावें. कनिष्ठ कोडतांत हें इन्टरप्रिटेशन झाल्यावर एक अर्ज झाला असतां तिकडे त्या कोडतानें दुर्लक्ष केलें. कोडतानें खर्चासह वादीचा दावा रद्द केला पण कलेक्टरच्या पहिल्या हुकमावर जज्ज कोडतांत अपील करण्याचा रस्ता रेग्युलेशनांप्रमाणें मोकळा ठेविला. हा निकाल मि. लम्सडन यांनीं १२।३।१८४७ रोजीं दिला.

या हुकुमाविरुद्ध नाना मंडलिक यानीं सदर दिवाणी अदालतींत अपील केलें होतें तेथें ९।१२।४८ रोजीं विरुद्ध निकाल झाला.

नंतर कलेक्टर यांच्या निवाडपत्रावर जिल्हा जज्ज कोंकण यांचे कोडतांत अपील नंबर ७४।१८४९ चें नाना साहेबांनीं केलें. यांत नवीन मुद्दे फार नव्हते. कलेक्टर यांचें ह्मणणें पडलें कीं

अपीलेन्ट हे पेशव्यांचे सोयरे आहेत ह्मणून त्यांच्या साक्षीदारांनी त्यांच्या तर्फे साक्षी दिल्या त्यावर भरंवसा ठेऊं नये. जज्जसाहेबांचें मत पडलें कीं अपीलेन्ट, पेशवे यांचे सोयरे असतील; परंतु साक्षीदार हे इंग्रज सरकारचे चाकर आहेत. सदर अमीन यांनीं केलेल्या ठरावाची कारणें जज्जसाहेब मि. रॉबर्ट कीज यांस मान्य होऊन ७।३।१८५० रोजीं निकाल मंडलिकांच्या तर्फे केला.

यानंतर सरकारनें सर्टिफिकेट मिळवून मुंबईस सदर दिवानी अदालतींत इस्पेशल अपील केलें. परंतु सनदा खऱ्या आहेत. व इनामाबद्दल आहेत; चाकरीबद्दल नाहींत असें नामदार जान् वार्डन, नामदार लेगेट, व नामदार ग्रंट या त्रिमूर्तीनीं ठरवून १६।२।१८५३ रोजीं अपीलाचा निकाल मंडलिकांतर्फे केला.

१८४० सालीं जी फिर्याद आणली तिचें काम १२ वर्षांनीं, एका तपानें, संपलें पण तितक्यानें मंडलिक यांचें नष्टचर्य संपलें नव्हतें. इनामतीचें उत्पन्न घेण्यास नानांनी दरखास्त दिली. गांव ताब्यांत देण्याला शनिवार आड येऊन सरकार मुदत मागून घेई; म्हणून दरखास्त मंजूर होण्यास आणखी दोन वर्षें गेलीं व इनामांचें उत्पन्न व कज्जाचा खर्च पदरांत पडावयाची वेळ आली. मंडलिकांच्या वकिलानें ११।७।१८५६ रोजीं मागच्या सर्व वर्षांची इनामाच्या उत्पन्नाची बाकी मिळाली अशा मजकुराच्या पावतीवर सही सुद्धां केली. तों त्याचदिवशीं १८२७ च्या १७ व्या रेग्युलेशनच्या ३८ व्या कलमाप्रमाणें इनाम परत घेतल्याची नोटीस त्यांवर बजाविण्यांत आली. नोटीशीबरोबर हुकुमाची नक्कल सुद्धां नव्हती. म्हटलें आहे.—

। रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम् ।
। भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्रीः ॥
। इत्थं विचिंतयति कोशगते द्विरेफे ।
। हा ! मूलतः कमलिनीं गज उज्जहार ॥

अन्यायरूपी रात्रीचें तम नाहींसें होईल. न्यायरवीचा उदय होऊन आनंदकारक प्रकाश पडेल, लक्ष्मीचें उगमस्थान नाणीजरूपी पंकज हंसूं लागेल असें आशाकोशांत भ्रमराप्रमाणें चिंतन करीत बसलेला बिचारा नाना मंडलिक १८५७ च्या रेग्युलेशनरूपी गजाकडून मूळापासूनच नाणीजरूपी कमलिनीसह उच्चाटन पावता झाला !!

मुरूडाहून रत्नागिरि, तेथून ठाणें, तेथून मुंबई इत्यादिठिकाणीं फिर्यादी करतां, अपीलाकरतां, हेलपाटे मारण्यांत पुण्यापर्यंत पुरावा गोळा करण्याकरतां फेरे करण्यांत, वकिलांना कज्जा समजावतांना उरस्फोड करण्यांत व पैशाच्याराशी खर्च करूनही काय होतें याविषयींच्या काळजींत रात्रीच्या रात्री उन्निद्रावस्थेंत घालविण्यांत नानांचीं १६ वर्षें गेलीं व निकाल असा झाला याहून विचित्र दैवाची अधिक विचित्र करणी कोठें पाहावयास सांपडेल !

प्रबलव्याधीनें जर्जरित झालेल्या एकाद्या रोग्यास दूरदर्शी व क्रियाकुशल वैद्यानें चूर्ण, रस, कषाय इ. शतशः उपाय करून वर्षेच्या वर्षें जपून अगदीं शेवटीं त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा घालून वांचवावा, परंतु निर्घृण काळानें बारीकसा अदृश्य फांस टाकून त्याचा जीव हरण करावा त्याप्रमाण नाणीजगांव जीवितसंशयांत बहुत वर्षें असतां सदर अदालतींतील तीन जज्जांनीं आपली मात्रा चालवून वांचविला पण सरकारी नोटिशीनें नाहींसा केला! बा नाणिजा ! तुला किती वेळा तरी वांचवावा! वांचिवला तरी तूं पुन्हां पुन्हां मरतोस ! तरी प्रेतगतिंगत हा नाणीज पुन्हां परतो म्हणून रावसाहेबांनीं पुढें प्रयत्न चालविला. त्यांचा धीर खचला नाहीं. म्हणन " **प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति** " या भर्तृहरीच्या म्हणण्याप्रमाणें रावसाहेबांची गणना उत्तम जनांत होते.

मुंबईस कज्जा येई तों सर्व काम नानांनीं स्वतां चालविलें. मधून मधून कज्जाची हकीकत मात्र रावसाहेबांस कळवीत. परंतु इस्पेशल अपीलाची

व्यवस्था रावसाहेबांनींच केलेली दिसते. अपीलासंबंधीं कागदाचीं टांचणें आहेत त्यावर रावसाहेबांचें हस्ताक्षर आहे. त्यांस सर्व कज्जाची माहिती होतीच.

इंग्रज सरकारच्या राज्यांत अन्यायाविरुद्ध दाद मागण्याच्या पायऱ्या आहेत. आतां वरच्या पायरीवर चढून जाण्याच्या तयारीस रावसाहेब लागले.

रावसाहेबांनीं १०।२।१८५७ रोजीं मुंबईचे गव्हर्नर. यांकडे एक अर्ज केला. गांव इनाम कसा मिळाला, माजी अमलांत व इंग्रजी अमलांत मिळून १०० वर्षांवर भोगवटा झाल्यावर रत्नागिरीच्या कलेक्टरांनीं गांव जप्त कसा केला, त्याच्या नंतर अर्जदारानें कायदेशीर इलाज कोणकोणते केले, बारा तेरा वर्षें मोठ्या खर्चानें सर्वांत उच्च प्रतीच्या न्यायाच्या कोडतांत तीन न्यायाधीशांचें समाधान होईल अशा रीतीनें आपल्या हक्काची शाबीदी कशी केली व आपल्यातर्फे निवाडा कसा मिळविला, दरखास्तीचें काम दोन वर्षें कसें चाललें, व ११।७।१८५६ रोजीं गांव ताब्यांत देण्याचा हुकूम कसा झाला व त्याच दिवशीं नामदार गव्हर्नर साहेबांच्या हुकुमावरून पुन्हा जप्त कसा करण्यांत आला तें सांगून अर्जदाराकडे पिढ्यान पिढ्या भोगवट्यास असलेला हा गांव अर्जदाराचे दुर्दैवानें कोणत्या सबबीवर जप्त करण्यांत आला तें अर्जदारास कळविण्याची विनंति केली. व १८४० पासून १८५६ पर्यंत गांव जप्तींत होता त्या दम्यानचें उत्पन्न मागितलें. अर्जावर सही नानांची होती.

यानंतर १५।३।१८५७ रोजीं अर्जदाराचें किति नुकसान झालें आहे तें कळवून योग्य विचार होण्याची विनंति केली. हा अर्जही नानांच्या नांवाचा होता. पुन्हां १७।६।१८५७ रोजीं तिसरा अर्ज केला. त्यांत प्रत्यक्ष अर्जाचा निकाल लावण्यास वेळ लागेल परंतु सदर अदालतीनें देवविलेलें १८४० पासून १८५६ पर्यंतचे दम्यानचें उत्पन्न

सुमारें ४००० देण्याचा हुकूम द्यावा. ही रक्कम सरकाराला क्षुल्लक वाटेल पण ती मिळाली असतां या खटल्याच्या एकान्त दुर्दैवी अखेरीमुळें हैराण झालेल्या अर्जदाराची स्थिति सुधारेल असें लिहिलें होतें.

सरकारानें रेव्हिन्यू कमीशनर यां मार्फत आपले अभिप्रायासह हें प्रकरण रत्नागिरीचे कलेक्टर यांकडे रवाना केलें आहे अशी समजूत अर्जदारास जुलै महिन्याच्या आरंभीं आली. व १३ जुलै १८५७ रोजीं रत्नागिरीच्या कलेक्टरांकडून लिहून आलें कीं आपलेकडे इनाम ह्मणून चालत आलेला गांव इनाम ह्मणून चालविणें विषयीं व मागील बाकीचा वसूल आपल्यास आदा करण्याविषयीं अजम रत्नागिरीचे मामलेदार यांस आज रोजीं हुकूम देण्यांत आला आहे; तरी रत्नागिरीच्या मामलेदार कचेरींत हजर व्हावें ह्मणजे ते सर्व हुकूम अमलांत आणतील. शेवट गोड झाला.

हा कज्जा रत्नागिरीपासून पुण्यापर्यंत व रावसाहेबांचे मित्र कराचीपर्यंत होते त्यांपर्यंत सर्वतोमुखीं गाजत होता. व त्याकडे सर्वांचे डोळे लागले होते. सर्व लोकांस आनंद झाला. सर्वांनीं अभिनंदनपर पत्रें पाठविलीं. या कामीं त्रास किति पडला असेल ती वाचकांनींच कल्पना करावी. परंतु या कज्जाचा परिणाम फार उत्तम झाला. रावसाहेबांस हक्काकरतां शेवटपर्यंत चिकाटीनें लढण्याची संवय लागली. जसे जसे त्या कामीं त्यांचे परिश्रम वाढत गेले तशीतशी त्यांची भांडण्याची शक्तिही श्रम करणाऱ्या पैलवानाच्या शक्ती प्रमाणें रोजच्या रोज वाढतच गेली. यांत इंग्रजी कोर्टांची खालपासून वरपर्यंत स्वतंत्र न्यायबुद्धि दिसून आली. व त्यामुळें रावसाहेबांची त्यांवर फार श्रद्धा बसली. व वकील होण्याची बुद्धिही याचमुळें त्यांना झाली असेल हें सर्वथैव खरें नसलें तरी त्यांच्या यशाची किल्ली नाणीजच्या कज्जांत आहे.

नाणीजप्रकरणीं यशाचे बहुतेक वांटेकरी स्वतां असून नानांनीं तें सर्व श्रेय आपल्या पुत्रासच दिलें " गांव व ऐवज सुटल्याचें समजलें. आमची

सर्वप्रकारें काळजी गेली. हें सर्व करणें तुमचें ये विषीं तुह्मींही आपल्या देहास बहुत इजा आजसुमारें १२ वर्षे दिलीत आतां तुह्मीं काळजी तिळप्राय ठेवूं नका ( २२।७।५७ चें पत्र. )

रावसाहेबांनीं आपले मित्र **क. जेकब** यांस लिहिलें कीं १८ वर्षांच्या मागील उत्पन्नासह माझा इनाम गांव सरकारनें परत दिला हें लिहावयास मला फारच हर्ष वाटत आहे. तुम्हाला खरें सांगतों तुम्हीं म्हणता त्याप्रमाणें विचार शक्तीच्या "राजी"चा विजय झाला आहे व नैतिक दृष्ट्या हा जय *क्रेसीच्या लढाईत किंवा + एजिनकोर्टच्या लढाईत मिळविलेल्या जयाहून अधिक मोठा आहे. १।१०।१८५७ चें इं. पत्र ) या वेळेस रावसाहेबांच्या मित्रांचीं अभिनंदनपर पत्रें आलीं त्यांत जनुकाका आठल्ये यांनीं लिहिलें:—कीं " अण्णासाहेब ! तुम्हीं सिंहाच्या जबड्यांत हात घालून हरिण बाहेर काढलेंत !" ( ७।७।१८५७ चें पत्र. )

वाचक हो ! या इतिहासावरून तुम्हांला रावसाहेबांचे अंगात देसाई म्हणतात ती अर्जुनाची वेधशक्ति अथवा आठल्ये म्हणतात त्याप्रमाणें सिंहाच्या जबड्यांत हात घालण्याची सर्वदमनाची शक्ति कोठून आली तें समजेल.

---

*इंग्लंदचा प्रख्यात वीरकुमार ब्लॅक प्रिन्स यानें या लढाईत फ्रान्स देशाचा राजा फिलिप्स यावर जय मिळविला.

+इंग्लंदचा राजा पांचवा हेनरी यानें फ्रान्सचा राजा लुई यावर १४१५ रोजीं या लढाईत जय मिळविला.

## प्रकरण २० वें.

# नेटिव्ह ओपिनियन.

। प्रहर्तुं वित्तराशीभिर्नाहं राजाऽस्मि वित्तवान् ॥
। अन्तः सहानुभूतिर्मे बहिश्चस्फुरति लेखनी+ ॥ १ ॥

( टिपेंत दिलेल्या सुरेन्द्रनाथ बॅनर्जीस रावसाहेबांनीं लिहिलेल्या पत्रांतील एका वाक्याचें भाषांतर–स्वकृत. )

प्रसिद्ध बॅरिस्टर ॲन्स्टी हे ह्मणत असत " हिंदुस्थानांत लोकमत कसें तें नाहींच. यांत थोडी दर्पयुक्त अतिशयोक्ति होती व आहे असें धरिलें तरी तथ्यांश बराच होता. हिंदीलोकांचें असें राजकीय, सामाजिक, नैतिक इ० विषयांवर त्यांच्या समजाप्रमाणें मत होतें. ( व तें कोणास नसतें ? रानटी लोकांचेंही त्यांच्या व्यवहारापुरतें असतें ) परंतु या मताचा प्रवाह अगदीं निर्जीव असल्यामुळें उगमाशींच जिरून गेला कीं काय असें वाटे. कधीं जोरानें वाहत असे पण नियमित पणानें वाहत नसे व वाहूं लागला तर समाजांतील बखेड्यानीं कुण्ठित होत असे; त्यामुळें लोकमत अस्तित्वांत असूनही त्याची गणना होत नसे. हिंदीलोकांचीं म्हणून मतें प्रसिद्ध करण्यास पुष्कळ इंग्रज लेखकांनीं केलेले प्रयत्न निष्फळ होत अथवा कित्येक वेळां हानिकारक होत. अशी स्थिति सुमारें १८५८ पर्यंत होती. " आपलें मत काय आहे हें हिंदुस्थानच्या लोकांना जाहीर करतां येत नाहीं इतकेंच नव्हें पण

---

+ I am not a Raja to send you heaps of wealth, yet I have my sympathy within and my pen without.

कोणी उदारधी इंग्रज त्यांची तरफदारी करूं लागला तर त्यास नुसता पाठिंबाही देतां येत नव्हता. याचें कारण काय ?" असें विचारतां रावसाहेबांनीं ९।१।१८५९ च्या पत्रांत क. जेकब यांस पुढील उत्तर दिलें. "आमच्यापैकीं ज्यांना इच्छा आहे, त्यांच्याजवळ साधन नाहींत, ज्यांच्या जवळ साधनें आहेत त्यांना इच्छा नाहीं. माझी अजून निराशा झाली नाहीं. कालावधि लागेल; कालावरच माझा भरंवसा आहे. आम्हीं सर्वांनीं आपलें कर्तव्य केलें तर कालात्ययानें—मला दिसत आहे त्यावरून एक पिढी गेल्यावर—आम्हांस यश येईल. तूर्त सलाम."

वर्तमानपत्रें ही संस्था मूळची युरोपियन लोकांची आहे परंतु राजपक्षास दोन गोष्टी सांगून आपल्या हिंदी बांधवांस नेहमीं साहाय्य करण्याचें यांच्या हातून होत नसे. यांचा व सरकारचा लढा पडला ( उदाहरणार्थ एकाद्या कायद्यानें यांच्या खिशास चट्टा बसला ) ह्मणजे, हे आकाश पाताळ एक करतात व तसें नसलें कीं हे मूग गिळून हिंदी बांधवांस मिळेल त्यांत संतुष्ट राहावयास सांगतात. तथापि चळवळीनें कार्यभाग होतो हा धडा बिन अधिकारी इंग्रज लोकांनींच शिकविला म्हणून ते हिंदी लोकांस गुरूंचे ठिकाणीं आहेत. त्यापैकीं प्रमुख असे पुढील गृहस्थ होऊन गेले. डा. बुइस्ट, मि. कानन, मि. राबर्ट नाईट, मि. मलू, मि. मॅक्लीन, डा. बर्डवुड, मि. जेम्स टेलर इ.

रावसाहेबांस जेव्हां आपलें मत प्रदर्शित करण्याची संधि क. जेकबसारख्या गृहस्थानें विचारल्यास येई तेव्हां ते निर्भीडपणें स्वमतप्रकाशन करीत. पण त्याचा फायदा जनतेस होत नसे. कारण असलीं पत्रें ज्याला लिहिलेलीं असतात त्याला लिहिणाराचें मत कळवणारीं पण खासगी स्वरूपाचीं असतात. "संवयी आणि अभ्यास" यांसारखे विशिष्ट विषयांवर लिहिलेले निबंध रावसाहेब छापून प्रसिद्ध करीत ते लोकांस वाचावयास मिळत. परंतु सार्वजनिक हिताचे जे जे विविध विषय लोकांपुढें नित्यशः येत त्यावर त्यांचीं मतें काय आहेत तीं लोकांस प्रसंग पडतांच कळण्याचा मार्ग नव्हता.

कराचीहून मुंबईस आल्यावर रावसाहेब रास्तगोफ्तार पत्रांत इंग्रजी लेख लिहीत असत परंतु तेवढ्यानें त्यांची तहान भागत नाहींशी झाली. १८६१ पासूनच एक स्वतंत्र मताचें पत्र काढावें हा विचार त्यांचे मनांत होता त्याविषयीं विनायकराव भागवत यांशीं चर्चा केली असा १५।७।१८६१ च्या रोजनिशींत उल्लेख सांपडतो.

पुढें १८६२ सालीं अगदीं अखेरीस रावसाहेबांचे मनांत कायद्याचा अभ्यास करावयाचें येऊन स्टूडन्टस् लिटरारि सोसायटीचे कामाशिवाय सर्व कामें बंद करावयाचीं असा निश्चय त्यांनीं करसनदास मूळजी यांस कळविला; पण एक अर्धातासपर्यंत कृष्णाजीपंत नूलकर, विनायकराव भागवत व नानाभाई राणिना व रावसाहेब असे मिळून दर आठवड्यास प्रसिद्ध होणारें व सुशिक्षित हिंदीलोकांनीं चालविलेलें इंग्रजी पत्र काढण्याविषयीं वाटाघाट केली.

नंतर रावसाहेब १८६३ सालांतील मार्च महिन्यांत वकिलीची परीक्षा पास झाले. व लागलीच पुढल्या महिन्यांत मुंबई हायकोर्टाचे अपील बाजूस वकिली करूं लागले. तेव्हां पुन्हां वर्तमान पत्रांत लिहिण्यास ते मोकळे झाले. व स्वतःचें वर्तमान पत्र काढावयाचें ठरविलें. वर्तमानपत्राचा मुख्य उपयोग स्वपक्षाचें समर्थन करण्याकडे होतो. मतभेदानें पक्षभेद होतो. आपआपल्या पक्षाच्या समर्थनार्थ निरनिराळीं वर्तमानपत्रें लागतात. ही गोष्ट हिंदुस्थानाखेरीज इतर देशांची झाली. परंतु हिंदुस्थानांत दरएक पक्षाला एक एक वर्तमानपत्र चालविणें खर्चाकडून झेंपत नाहीं. ही स्थिति हिंदी वर्तमानपत्रांचीच होती किंवा आहे असें नाहीं तर इंग्रजी पत्रांची सुद्धां होती व आहे. येथील इंग्रज लोकांत पक्षभेद सांगण्यासारखा नाहीं. ह्मणून एक वर्तमानपत्र टाइम्ससारखें चाले व चालत आहे. त्याच ठिकाणीं एकादें गॅझेटसारखें कांहीं वर्षें चाललें. त्या दोघांत वास्तविक पक्षभेद नव्हता; जो होता तो उघड

उघड पोट भरण्याकरतां स्वीकारलेला नव्हता. तो कोणता ह्मणाल, तर हिंदी लोकांचा पक्ष कधीं कधीं उचलून धरावयाचा. तेवढ्यानें कांहीं पोट भरत नसे. या ह्मणण्याची सत्यता दाखविण्याकरतांच कीं काय कोण जाणें हिंदी लोकांची बाजू उचलणारें तें मुंबई गॅझेट मागेंच बंद पडलें.

रावसाहेबांचा पक्ष नवा होता व त्याच्या समर्थनार्थ त्यांस स्वतंत्र पत्र पाहिजे होतें त्याप्रमाणें हा विचार त्यांनीं दादाभाई नवरोजींस कळविल्यावरून पत्रास आश्रय मिळण्यास होईल ती मदत करीन ह्मणून त्यांनीं वचन दिलें. ( २४।१२।१८६३ रो. इं. ) "पत्र उत्तम निघालें पाहिजे. खर्चाकडे पाहून उपयोग नाहीं असें करसनदास व आह्मीं ठरविलें होतें. नारायण महादेव यांजवळ तीन वर्षांचा ठराव करण्यास मला अधिकार दिला होता." ( रो. इं. )

१८६४ च्या आरंभापासून, रावसाहेबांच्या स्वतांच्या मालकीचें पत्र, "नेटिव्ह ओपिनियन" या नांवाचें आठवड्यांतून एकदां इंग्रजींत प्रसिद्ध होऊं लागलें. पत्राचें नांव 'नेटिव्ह ओपिनियन' दिलें याचें कारण त्यांत, "रागानें कोण आंठी घालीत आहे अथवा लोभानें कोणाच्या चेहऱ्यावर हास्याची छटा दिसूं लागली आहे इकडे लक्ष्य न देतां राजकीय, सामाजिक, व नैतिक विषयांवर नेटिव्हांचीं स्वतंत्र मतें प्रसिद्ध करावयाचीं होतीं." त्यांत चालकांचा मुख्य हेतु "सरकारास साहाय्य करण्याचा होता." सरकाराचें स्वरूप विराट पुरुषाच्या स्वरूपासारखें, "सहस्रशीर्ष, सहस्राक्ष व सहस्रपाद् आहे." तरी ही "नेटिव्ह लोकांच्या स्वतंत्र मतांची त्याला अपेक्षा आहे. सरकारनें हातीं घेतलेल्या विषयांवर नेटिव्हांनीं स्वतंत्रपणें चालविलेली चर्चा त्यास इष्टच आहे. म्हणून जी माहिती फक्त नेटिव्हांसच असूं शकेल ती देऊन सरकारास साहाय्य करण्याचा" त्यांचा हेतु होता. याशिवाय चालकांचे मनांत "नेटिव्ह लोकांस स्वतंत्रपणें विचार करावयास लावून त्यांच्या विचारांस उच्च वळण

लागण्याकरतां " " त्यांच्या गुणदोषांचें विवेचन करून " " त्यांस सन्मार्ग दाखवून " " मित्राप्रमाणें त्यांच्या हिताचें संरक्षण करावयाचें होतें. " " वेदान्ती म्हणतात तसा हा उदरनिमित्त घेतलेला वेष नव्हता " " युरोपियन व नेटिव्ह यांच्या मधील गैरसमज नाहींसा करून सख्य वाढवावयाचें होतें. " " हे सर्व हेतू जर अंशतः साधतील तर या कार्यांत घातलेल्या भांडवलाचा व्यापारी दृष्टीनें पूर्ण नाश झाला तरी चालकांची तयारी होती." समग्र इंग्रजींत असें नेटिव्हांनीं स्वमत प्रदर्शनार्थ चालविलेलें असें हें पत्र होतें म्हणून प्रथम सांगितल्याप्रमाणें या पत्रास ' नेटिव्ह ओपिनियन ' हें सार्थ नांव चालकांनीं दिलें होतें.

प्रथम दर आठवड्यास प्रचलित महत्त्वाच्या राष्ट्रीय विषयांवर शिरोभागीं अग्रलेख; नंतर आठवड्यांत घडून आलेल्या कमी महत्त्वाच्या अशा गोष्टींवर चर्चा; व शेवटीं बोधप्रद व मनोरंजक वर्तमानसार असे इष्ट तेच प्रकार या पत्रांत येत असत. सारांश पश्चिम हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पक्षाचें हें एक पत्र होतें यांत संशय नाहीं.

यांचे अंक प्रथम ५०० काढीत असत व महिना खर्च निदान खालीं दिल्याप्रमाणें होता.

| | |
|---|---|
| एडिटर व व्यवस्थापक वि० भागवत | २०० रु. |
| १ कारकून | १५ |
| १ शिपाई | ८ |
| १ छपाई | ४७४ |
| | ६९७ |

वार्षिक वर्गणी १५ *रुपये होती. त्याचा आकार लोकाभिरुचीप्रमाणें उत्तम ठरलेलाम्हणजे 'सॅटरडे रिव्ह्यूचा' होता. पुढें **नारायण परमानंद** यांस व्यवस्थापक व एडिटर तेवढ्याच पगारावर नेमून **भागवत** यांस १०० रुपये पगारावर दुय्यम एडिटर नेमिलें होतें. लेखक या नात्यानें **नारायण परमानंद** यांची अगोदर ख्याति झालेली होती. त्यांच्याशीं दोनवर्षांचा करार करण्यांत आला. त्याच्या आंत ते काम सोडून गेले तर ५० रु. दरमहा **परमानंद** यांनीं **नेटिव्ह ओपिनियन**च्या मालकांस द्यावे, परंतु मालकांनीं त्यांस मुदतीच्या आंत जावयास सांगितलें तर त्यांनीं **परमानंद** ह्यांस दरमहा १०० रु. द्यावे असें ठरविलें होतें.

याचे कांहीं अंक विलायतेस जात असत. एका इंग्रज वाचकानें ५।४।१८६४ च्या पत्रांत **रावसाहेबांस** कळविलें कीं, तुमचें **नेटिव्ह ओपिनियन** देशहित करील असा संभव दिसतो. कारण त्यांतील व्यक्ति–द्वेषरहित समर्याद लेख बुद्धिमान मनुष्याच्या हातचे आहेत असें वाटतें. हें पत्र **युनियन** प्रेसमध्यें छापून काढावें असें ठरण्यापूर्वी जुन्या सोनापूर गल्लींत **जनार्दन** बापूजी हे एक " इन्डियन बॅनर नांवाचें " पत्र आपल्या छापखान्यांत काढीत असत. त्या छापखान्यांत **नेटिव्ह ओपिनियन** छापून काढावें अशा विषयींचा कांहा पत्रव्यवहार **रावसाहेबांचे** मित्र **कावसजी** यांनीं चालविला होता. एकमेकांच्या अटी न जुळल्यामुळें त्यांतून त्याचवेळेस कांहीं निष्पन्न झालें नाहीं. पुढें लवकरच

---

* पत्र सरकारच्या आश्रयाशिवाय चालवावयाचें होतें. मागील वर्षीं एका पत्रानें आश्रय स्वीकारल्याचें वृत्त **रावसाहेबांच्या** कानावर आलें तेव्हां त्यांनीं डायरींत असें लिहून ठेवलें आहेः–" तर मग त्यानें आपणास विकून घेतलें! आतां या कारकीर्दीविरुद्ध 'ब्र' काढण्याची याची छाति नाहीं. ही सांगड फार अपवित्र झाली. हिचीं फळें उभयतांस पोट भरून खायला मिळतील. मिळोत! (१६।३।१८६३.)

परमानंद हे आपली अन्यत्र सोय पाहूं लागले कारण त्यांच्या योग्यतेच्या मनुष्यास २०० रु. हें वेतन अल्प होतें.

वाटला होता तेवढा आश्रय पहिल्या वर्षाच्या अन्तीं मिळाला नाहीं. पुढें राजधानीपेक्षां बाहेर गांवच्या लोकांकडून आश्रय मिळून पत्राची वाहवा होऊं लागली व लवकरच खर्चापुरतें उत्पन्न वाढेल असें चालकांस वाटलें. भिडे भाडेनें वाढविलेल्या वर्गणीदारांच्या पैशावर पत्र चालविण्या-पेक्षां आम्हीं पत्र बंद करूं असा चालकांचा बाणा होता.

या वर्तमानपत्राची ख्याति वाढतच होती. मि. काघ्लॅम साहेबांनीं उदास यांस लिहून कळविलें, " जन्मापासून आजपर्यंत झालेली आपल्या वर्तमानपत्राची वाढ अभिनंदनीय आहे. " विनायकराव भागवत यांनीं २६।५।१८६५ च्या पत्रांत कळविलें कीं, " फ्रेंड पत्राची सर नेटिव्ह ओपिनियनला आली आहे अशीं कृष्णशास्त्री व रामकृष्णपंत भाण्डारकर यांचीं सर्टिफिकिटें मजजवळ आहेत. "

विनायकराव भागवत, नवानगर येथें ५०० रुपयांवर सेक्रेटरी म्हणून १८६५ च्या अक्टोबर महिन्यांत जामसाहेबांकडे नोकरीवर गेले. ते वेळेस रामभाऊ उदास हे त्यांच्या जागीं आले व नारायण महादेव परांजपे हे नेटिव्ह ओपिनियनच्या संस्थेस येऊन मिळाले. १८६६ त बाळकृष्ण लक्ष्मण बापट हे मिळाले.

कोलंबोचे प्रसिद्ध हिंदी बॅरिस्टर मुत्तुकुमार स्वामी यांनीं रावसाहेबांस १५।११।१८६५ च्या पत्रीं नेटिव्ह ओपिनियनविषयीं आपलें मत कळविलें तें असें:—हिंदुस्थानची आठवण मला जेव्हां जेव्हां होते तेव्हां तेव्हां विश्वनाथ हें नांव त्यापासून पृथक् करतां येत नाहीं. लढते, लढते, जिते रहो! मला नेटिव्ह ओपिनियनचा अंक मिळतो व टाइम्स-चाही मिळतो. तुमचें पत्र आस्ते आस्ते विजयी होत आहे.

रावसाहेब स्वतां या पत्रांत लेख लिहीत असतच; व त्यांचे मित्र कावसजी एदलजी खंबाटा* हेही लिहीत असत. क. जेकब साहेबांनीं असें कळविलें कीं, 'नेटिव्ह लोकांनीं लिहिलेल्या इंग्रजी लेखांत जें हिंदी वळण दिसून येतें तें तुमच्या वर्तमानपत्रांतील लेखांत दिसत नाहीं. पुन्हां त्यांनीं १९–११–१८६६ च्या पत्रांत कळविलें कीं विलायतेंतील लोकांस असें वाटतें कीं हें पत्र हिंदुस्थानांत राहिलेल्या पण असंतुष्ट असलेल्या इंग्रज गृहस्थांनींच चालविलें आहे.

पुढें २४–९–१८६७ त सुद्धां क. जेकब साहेबांनीं रावसाहेबांस कळविलें, 'नेटिव्ह ओपिनियनची योग्यता मोठी आहे असें मी मानतों. त्यांतील कांहीं उत्तम लेखांत तुमचें वळण मी तेव्हांच ओळखूं शकतों." याच पत्रांत जेकब साहेबांनीं वर्तमानपत्रांत कोणत्या जाहिराती घ्याव्या न घ्याव्या या विषयीं असा उपदेश केला होताः—' हालोवेच्या गोळ्यांच्या जाहिरातीशिवाय तुमचें पत्र चालावें अशी मी इच्छा करतों. वाटलें तर ती अगदीं थोडक्यांत व जरा कोना कोपरा पाहून अशी छापा. प्रमुख जागेवर असल्या जाहिराती छापणें म्हणजे प्रतिष्ठित पत्रांस कमीपणा आणणें असें आमच्या इकडे समजतात. मग तुमच्या तिकडे काय समजतात कोणाला ठाऊक? पहिल्या वर्गाच्या पत्राचा संबंध या स्वयंसिद्ध वैद्यांशीं काडीभरही उपयोगाचा नाहीं."

---

* एका युरोपियन मित्रास यांच्या विषयीं २३–६–७० चें शिफारसपत्र रावसाहेबांनीं दिलें होतें तेः—मि. कावसजी हे जुने एल्फिन्स्टोनियन असून डॉ. हार्कनेसचे शिष्य आहेत. हे इंग्रजी लेखकांत सर्वांत उत्तम नसले तरी उत्तमांतले आहेत. हे एक वेळ रास्त गोफ्तारचे लेखक होते; आतां नेटिव्ह ओपिनियनचे मुख्य लेखक आहेत.

यांचा संबंध याच्यापूर्वी ४।५ वर्षें नेटिव्ह ओपिनियनशीं होता. कावसजींचें लेख रावसाहेबांनीं प्रथम १८५८ सालीं वाचले तेव्हां पासून ते लेखकाचें काम अन्यत्र करीत असत.

१८६६ सालापासून यांत हायकोर्टाचे निवाडे देण्याकरतां एका पृष्ठाची भर घालण्यांत आली. बाहेर गांवच्या वकिलांस तर हा बेत आवडून अंक जास्त खपूं लागले. या रिपोर्टांचे उतारे घेण्याचा हक्क आपणाकडे पुढें राखून ठेवण्यांत आला यामुळें कांहीं बाहेरगांवचीं गुजराथी पत्रें यांतून उतारे घेऊन भाषांतर करीत तीं नाखूष झालीं.

पुढें दोन वर्षांनंतर "हें पत्र घेऊन वाचावें" अशी केवळ मराठी जाणणाऱ्यांस झालेली इच्छा पुरविण्याकरितां मराठींत लेख त्यांतच लिहिण्याची व्यवस्था वर्गणी वाढविल्याशिवाय करावी असें ठरलें. त्याकरितां एका जादा पृष्ठाची भर आकारांत घालण्यांत आली. वर्गणीदार वाढविण्याचा त्यांत शिवाय हेतु होता. १।७।१८६६ ला मिश्र अंक निघाला. कांहीं मुशाहिरा घेऊनही स्वतंत्र पत्रव्यवहारच्या कामाकरितां बाहेर गांवचे चांगले लोक मिळत नसत. कांहीं वर्षें झाल्यावर खर्च व उत्पन्न यांचा आढावा घेतल्यावर असें दिसून आलें कीं १२,६०० रुपये तोटा आला. तो मालकांनीं पदरचा लावला. त्यांचें ओझें कमी करण्याकरतां एका उदार गृहस्थानें ४००० रु. दिले. व दुसऱ्यानें १००० रु. दिले. त्यांची नांवें देण्याची इच्छा नव्हती.

पुढें पुढें त्यांत हायकोर्टाचे निवाडे मराठी लोकांकरतां छापून पुरवणी म्हणून वाटले जात. त्यांचें काम रावसाहेब स्वतां व गणपतराव भास्कर हे करीत व दरमहा ५० रु. पगार घेत. १८६६ च्या नोव्हेम्बर मध्यें, एका प्रसंगीं नामदार आर्नोल्ड यांनीं या रिपोर्टांची तारीफ केली होती.

१८६९ च्या जून महिन्यांत छापखान्यांतील एका कारकुनानें नीट हिशोब न ठेविल्यानें छापखान्याचें फार नुकसान झालें असें आढळल्यामुळें छापखाना काढून टाकून मि. नानाभाईकडे छापण्याचें काम रावसाहेबांनीं सोंपविलें. व्यावहारिक दृष्ट्या जरी मोठा तोटा झाला असला तरी इतका तोटा सोसण्याचें कारण असें कीं नैति-

कट्टष्ट्या आम्हांस लाभच झाला असें मालकांस वाटलें. मुंबईच्या बाहेरील लोकांस नेटिव्ह ओपिनियनचा उपयोग फार झाला. त्यांस जरा स्वस्त अशा इंग्रजींत निघणाऱ्या स्वतंत्र मताच्या वर्तमान पत्राची जरूरी होती मराठी पत्रांवर त्यांची तहान भागेना. कारण मराठी वर्तमानपत्रांत दुसऱ्या पत्रांतील लेखांचीं भाषांतरें समग्र अथवा सारांशरूपानें थोड्याशा फरकानें येत असत. आणखी त्यांत येणारे विषय म्हणजे " सूत्रदरिद्र-तेला पावलेले दोनच असत. एक विधवापुनर्विवाह व दुसरा स्त्रीशिक्षण."

१८७० च्या जानेवारी महिन्यापासून मे अखेरपर्यंत रावसाहेब आपल्या कुटुंबाच्या प्रकृतिस्वास्थ्याकरितां महाबळेश्वर मुक्कामीं जाऊन राहिले होते. रावसाहेब मुंबईत असतां नेटिव्ह ओपिनियनच्या लेखांतील प्रुफ लेखकांकडून मंजूर होऊन आलें म्हणजे, त्यावर एकवेळ नजर टाकून, कांहीं कमी जास्ती करावयाचें कीं नाहीं तें पाहून छापावयाला शेवटचा हुकूम देत असत. महाबळेश्वरास विश्रान्तीकरतां गेल्यावर मात्र असें करणें शक्य नव्हतें; कारण सर्व लेख, पत्र निघावयाच्या तारखेपर्यंतही तयार नसत. तितक्यांत कांहीं महत्वाचा विषय निघाला तर असा उशीर होणें साहजिक होतें. मग त्याचें प्रुफ महाबळेश्वरास पाठवून रावसाहेबांची मंजूरी घेण्यास सवड नसे. म्हणून तें काम त्यांनीं आपले मित्र गणपतराव भास्कर यांचेकडे सोंपविलें होतें. यावेळीं उदास येथें नव्हते. त्यांच्या जागीं गोविंद कृष्ण रानडे बी. ए. हे होते. जरा कांहीं दिवस बाळकृष्ण शास्त्री बापट कांहीं काम छापखान्यांत बघत असत. मि. कावसजी यांच्या तल्लख लेखांतील एखादा शब्द गणपत-रावजी बदलीत. मि. कावसजी यांनीं रागानें एक दिवस रावसाहेबांस लिहिलें कीं, " शनिवारीं घडलेल्या प्रकारावरून पहातां मला स्वाभिमान धरून तुमच्याशीं संबंध ठेवतां येत नाहीं, असें स्पष्ट सांगावें लागत आहे." नेटिव्ह ओपिनियनमधले लेख नेहमीं निर्भीडपणें लिहिलेले असत. तरी

कावसजींचें समाधान तेवढ्यानें होत नसे. त्यांनीं मागें एकदां १०।१०-१८६४ च्या पत्रांतच कळविलें होतें तें असें:—" तुमच्या लेखांतील समर्यादपणा व पोक्तपणा ह्मणजे कोणते गूण आहेत ? मुळमुळितपणाशिवाय दुसरे नाहींत ! स्थानिक नांव मिळविण्याचे आलेले प्रसंग तुह्मीं अनेक वेळां घालविले आहेत."

एका हिंदी मनुष्याची मोठ्या हुद्यावर नेमणूक झाली. कावसजी त्यावर टीका करतांना आपल्या लेखांत ह्मणाले " यांचें कल्पित शिक्षण इ०." गणपतरावांनीं कल्पित शब्द काढून टाकला. तें कावसजींस आवडलें नाहीं. नानाभाई राणिना यांनीं सांगितलें कीं व्यक्तिविषयक चेष्टा करणारे लेख कावसजी यांनीं लिहूं नये हें खरें; पण वादग्रस्त व शीघ्र-संक्षोभकारक लेख आह्मीं आपल्या पत्रांत नेहमीं लिहावे.

रावसाहेब जाग्यावर ( मुंबईस ) असले म्हणजे सर्व लेखकांची समजूत घालून जो इष्ट तो फेरफार त्यांच्या लेखांत करून घेत. तें कांहीं अंशी तरी साधावें म्हणून त्याची एक खुबी गणपतरावांस रावसाहेबांनीं सांगून ठेविली होती ती अशी " मन स्थिर, व डोकें शांत, ठेवा. सावधान राहून लेखांतील अकारण तीव्रता दिसेल ती जरा सौम्य करा." तथापि दुय्यम लेखकांशीं शान्तपणें करावी लागलेली ही रोजची वाटाघाट पाहून रावसाहेबांनीं विनायकराव भागवत यांस लिहिलें कीं एकदां एकाला एडिटरच्या कामावर नेमला म्हणजे त्याची लेखणी आंवरून धरावयाला किती कठीण जातें तें एकट्या नारायणालाच ठाऊक ! ( ८।५।१८७० )

तरी एकदां एडिटर म्हणून रावसाहेबांनीं एकादा मनुष्य नेमिला म्हणजे त्याच्या कामांत ते हात घालीत नसत याचें एक उदाहरण डायरींत लिहिलेलें सांपडतें.

× × मंगेश यांचा छल एका कान्स्टेबलनें केला होता त्याची कहाणी

सांगत ते आले व म्हणाले ‘ **ने.** ओपिनियनच्या एडिटरला माझ्या गाऱ्हाण्याविषयीं लिहावयास सांगा.’ मी म्हटलें ‘एडिटर माझा नोकर नाहीं. **नेटिव्ह** ओपिनियनला जर कांहीं किंमत असेल तर त्याच्या कामांत हात घालणें त्यास आवडणार नाहीं. व नसेल तर तुम्हीं भरीस पडण्यांत अर्थ नाहीं’ ते म्हणाले:–‘ हें पत्र नेटिव्हांचें मत प्रदर्शित करणारें आहे म्हणून माझें गाऱ्हाणें ऐकलें पाहिजे नाहीं तर मी वर्गणी देणार नाहीं.’ मी सांगितलें ‘ असला संशयित वर्गणीदार आम्हांस नको ’

मि. **टक्कर** यांनीं, एकदां मि. **कावसजींस** विचारलें ( कारण हे, **ने.** ओपियनमध्यें लेख लिहितात हें त्यांस माहित नव्हतें ) “ **नेटिव्ह ओपि**नियनच्या लेखकांस कांहीं फायदा पडतो काहो ? ” त्यावर मि. **कावसजी** यांनीं उत्तर दिलें “ आम्हीं स्वेछाप्रेरित होऊन लेखकांचें काम करतों रोजिंदारीवर करीत नाहीं. आमच्या श्रमाच्या मुळाशीं प्रेम आहे. ” हें ऐकून मि. **टक्कर** साहेबांस आनंद वाटला व त्यांनीं आमच्या लेखांतून दिसून येणाऱ्या स्वतंत्र बाण्याची स्तुति केली. ( १६।४।७० चें मि **कावसजी** यांचें **रावसाहेबांस** पत्र. )

इतकी प्रतिष्ठा या पत्रास यावयास कांहीं उत्तम मंडळीच्या वयाचीं ५।६ उत्तम वर्षें व सततोद्योग कारण झाला यांत संशय नाहीं व हें पत्र इतकें लोकप्रिय झालें होतें कीं “ **नेटिव्ह** ओपिनियनचा अंक कधीं एकदां बाहेर पडून हातांत पडतो ” असें लोकांस होत असे.

**नाना**भाई **राणिना** यांकडे पत्र छापावयाचें काम गेल्यापासून दुसरी एक गैरसोय होऊं लागली. ताज्या प्रचलित विषयांवर अगदीं टीका करावयाची ह्मणजे मुख्य मजकूर अगदीं शेवटल्या दिवशीं छापावयास येई. वेळेवर अंक निघण्याकरतां जादा मनुष्यें तरी ठेवावीं लागत अथवा उशीरां बसवून मनुष्यांस सवाई द्यावी लागे. खर्च वाढे व छापखान्याच्या इतर व्यवसायांत थोडी अडचण पडे. त्यामुळें त्यांची थोडी कुरकुर सुरू

झाली. छपाईकरतां जुना छापखाना पुन्हां सुरू करतां येईल कीं काय असा विचार सुरू झाला. त्याचें सामान पडलेंच होतें. बाळकृष्णशास्त्री बापट हे तो छापखाना घेण्यास तयार झाले. पत्राची ही जबाबदारी अंगावर घेतां येईल तर पाहूं लागले. मालकी, छापखाना व पत्राची व्यवस्था, शास्त्रीबुवांच्या हवालीं करण्याचा विचार रावसाहेबांनीं १६–१–१८७० च्या सुमारास चालविला होता. कार्यबाहुल्यामुळें नेटिव्ह ओपिनियनची व्यवस्था रावसाहेबांनीं १८७१ सालीं दुसऱ्यावर सोंपविली. "नेटिव्ह ओपिनियनची व्यवस्था माझेकडे नाहीं. मी मला वाटेल तेव्हां थोडें लिहीत असतों." ( १८।४।१८७४ चें ज. जेकब यांस पत्र) १८७२ मध्यें खप वाढावा म्हणून १५ ची वर्गणी १२ करण्यांत आली. १८७६ सालीं इंदुप्रकाशाचे मालक विष्णुशास्त्री पंडित हे परलोकवासी झाले. तेव्हां या छापखान्याची व्यवस्था पहाण्यास १८७६ सालीं इंदुप्रकाश छापखान्यांतील अनुभविक गृहस्थ मोरो विठ्ठल वाळवेकर हे मिळाले. त्यांस नारायण महादेव परांजपे हे येऊन मिळाले. नारायण महादेव यांस त्यांचे बंधू हरिभाऊ परांजपे साहाय्य करूं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं प्रसिद्ध बापुसाहेब आठल्ये हे लेखकांचें काम करीत. पुढें लवकरच नारायणराव परलोकवासी झाल्यावर हरीभाऊ परांजपे यांकडे छापखान्याची व पत्राची व्यवस्था आली व हरिभाऊ हे नित्यनेमानें लवकर उठून व्यायाम घेण्यास महालक्ष्मीच्या समुद्राकडे जात असत. तेव्हां घरीं जातांना रावसाहेबांच्या बंगल्यावर येऊन त्यांच्या सन्निध हपीसांत बसत, वेळ झाल्यास रावसाहेब त्यांस काम करतां करतांच एकादें दुसरें स्फुट तोंडीं सांगत तेवढें लिहून घेऊन परत येत. रावसाहेबांच्या मागें हें पत्र हरिभाऊ परांजपे यांनीं बरेच दिवस चालविलें होतें. लेखकाचें काम ते स्वतां व मि. व्हियाट्सेक, दामोदर कृष्ण करंदीकर. बीए. एल्. एल् बी., रामभाऊ सहस्रबुद्धे वगैरे करीत असत. हरीभाऊंचे मागें हें पत्र बंद झालें.

## नेटिव्ह ओपिनियन पत्राबद्दल कांहीं इंग्लदमध्यें प्रसिद्ध झालेलीं मतें.

ज्यांचें चालकत्व विश्वविद्यालयाच्या ग्रॅजुएटांकडे असतें त्यांचें स्वरूप इतर कोणी चालविलेल्या पत्रांहून भिन्न असतें. बी. ए. मंडळीं हॅलम, मेकाले, व बर्क यांच्या लेखांत अवगाहन केलेली असते. व राजपक्षावर प्रजापक्षानें मिळविलेला जय त्यांस सारभूत वाटू लागतो. व त्या धोरणानें हे लोक लेख लिहूं लागतात. म्हणून त्यांस कांहीं अँग्लोइन्डियन पत्रें "विषारी सर्प" "कृष्णकारस्थानी," "धंद्यानें राजद्रोही" इत्यादि विशेषणें देऊं लागतात व थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांस ब्रिटिश राज्याचे शत्रू समजतात. व यांची मुस्कुटदाबी करावी अशा सुचना करूं लागतात. असा गहजब ने. ओपिनियन पत्रावर आला नाहीं. सर जार्ज बर्डवुड यांनीं लंदन मध्यें एका सोसायटी पुढें "हिंदी वर्तमान पत्रें" हा विषय मुद्दाम व्याख्यानास घेऊन सांगितलें कीं "हिंदू पेट्रियट, नेटिव्ह ओपिनियन, रास्त गोफ्तार व इंदुप्रकाश यांचा खप चांगला असून यांच्या लेखांत स्वतंत्र बाणा व राजभाक्ति दिसून येते." पुढें १८७२ सालांत २।११।१८७२ च्या सॅटरडे रिव्हयू मध्यें हिंदी वर्तमानपत्रांवर टीका करतांना एका लेखकानें खालीं दिल्याप्रमाणें मत दिलें आहे:—"कलकत्त्यास हिंदूपेट्रियट व बेंगाली; मुंबईस अर्धें इंग्रजींत निघणारें नेटिव्ह ओपिनियन, मित्रोदय व इंदुप्रकाश इतकीं पुढारी पत्रें आहेत. त्यांचें वजन जलदीनें वाढत आहे. नेटिव्ह ओपिनियनमधील लेख फार चांगले लिहिलेले असतात. 'ब्रिटिश राज्याचा सूर्य हिंदभूमीवर सतत प्रकाशित राहो अशी इच्छा प्रत्येक हिंदी मनुष्याची आहे.' हा नेटिव्ह ओपिनियनमधील उतारा इंग्लडची हिंदुस्थानास गरज आहे असा ठरीव सिद्धांत प्रकाशित करीत आहे."

१८७१ च्या ऍप्रिल महिन्यांत ७ वर्षें नेटिव्ह ओपिनियनची सेवा करून, त्याचे एडिटर आपल्या वाचकांस रामराम करून मोकळे झाले. त्यावेळेला हें पत्र चालवितांना, बुद्धिनैपुण्य व सदसद् विवेक बुद्धि दाखविली म्हणून इन्डियन मिररनें, फार परिश्रम घेऊन चांगला विजय मिळविला म्हणून पेट्रिअटनें, फार काळजीपूर्वक पत्र चालविलें म्हणून गुजराथ मित्रानें, त्यांची स्तुति केली. या लेखांत रावसाहेबांचे नांव नाहीं. मोघमपणें एडिटर असा शब्द वापरला आहे. १८७१ च्या ने. ओ. च्या कोठल्याही अंकांत रावसाहेब एडिटरच्या कामांतून मोकळे झाले असा उल्लेख नाहीं. किंवा दुसरा एकादा लेखक काम सोडून गेला असाही उल्लेख नाहीं. परंतु सात वर्षें सेवा केलेले एडिटर रावसाहेबच असावे असा तर्क करण्यास जागा आहे. “ मी हल्लीं तें काम करीत नाहीं ” असा उल्लेख रावसाहेबांच्या एक दोन पत्रांत १८७१ च्या पुढें सांपडतो. यावरून हे लेख रावसाहेबांस उद्देशून लिहिले असावे.

नेटिव्ह ओपिनियन पत्रांतील निवडक लेख छापून प्रसिद्ध करण्यासारखे आहेत. कारण तें एक स्वतंत्र पत्र होतें, कोणाच्या आश्रयावर अवलंबून नव्हते. स्वतंत्र झऱ्याच्या प्रवाहांतील पाण्याप्रमाणें त्यांतील लेख निर्मळ होते.

ने. ओ. च्या स्वतंत्र मताची शुद्धि अबाधित राहण्यास मुख्य कारण असें होतें कीं, या पत्राच्या उत्पन्नावर त्याचे चालक पोटाकरतां अवलंबून नव्हते. फायद्याकरतां भलत्यासलत्या जाहिराती सुद्धां या पत्रांत ते घेत नसत, इतकेंच नव्हे तर स्वमतप्रसारार्थ पदरास खोट लावून घेण्यास चालक तयार होते त्यामुळें त्यांस कोणाची हांजी हांजी करावी लागत नसे. आपलें खरें मत तेंच ते देऊं शकत. वर्तमानपत्र हेंच जर त्यांचें पोटाचें साधन असतें तर वाचकांची खुषामत करतांना त्यांचें मत दूषित झालें असतें.

या पत्रांतील सर्व लेखांचा सारांशही देणें येथें शक्य नाहीं म्हणून त्या पत्राचें स्वरूप काय होतें तें संक्षेपतः देण्याचें योजिलें आहे.

प्रथम प्रचलित विषयावर अग्रलेख, कांहीं लघु संपादकीय लेख, नंतर हिंदुस्थानांतील अनेक वर्तमानपत्रांतील व इंग्लंदांतील वर्तमानपत्रांतील कांहीं विषयांवरील लेखांचे उतारे येत, ते बहुशःखालील पत्रांतील असतः—

सरामपूर ( श्री रामपूर ) येथील फ्रेन्ड आफ इन्डिया; अलाहाबाद येथील पायोनियर; सॅटरडे रिव्ह्यू ( लंदन ); बेंगाली; हिन्दू पेट्रियट; ज्ञानप्रकाश ( पुणें ); इंदुप्रकाश ( मुंबई ); होमन्यूस ( इंग्लंद ); वृत्तप्रकाश ( नगर ); मार्निंग हेरल्ड; सत्यदीपक; मद्रास टाईम्स; पूर्णचंद्रोदय ( इंदूर ); न्यायसिंधु; जामेजमशेद; इंग्लिशमन ( कलकत्ता ); इन्डियन मिरर; डाकाप्रकाश; सिलोन आब्सरव्हर; टाइम्स ( मुंबई ); गॅझेट ( मुंबई ); ऑब्सरव्हर ( पुणें ); सिन्डियन; ओव्हरलन्ड मेल; डेली न्यूस; मद्रास स्टॅन्डर्ड; बेळगांवसमाचार; जगान्मित्र ( रत्नागिरि ) महाराष्ट्रमित्र ( सातारा ); शुभसूचक ( सातारा ); नाशिकवृत्त; बरारसमाचार; गुजराथी; रास्तगोफ्तार; गुजराथामित्र; चाबूक; हरकारू; इ० इ०

इतक्या पत्रांतील उतारे देण्याचा मतलब जागा भरून काढण्याचा नव्हता. निवडक उतारे शोधून काढण्यांत जितका वेळ लागत असे तितक्यांत नवे लेखही लिहितां आले असते. परंतु वाचकांचें मनोरंजन होऊन कांहीं ज्ञानाचा लाभ व्हावा व लोकमत विशेषतः हिंदुस्थानांतील लोकांचें *काय आहे तें सर्वांस कळावें हा उतारे देण्याचा मतलब होता. उतारे देतांना त्यांतील लेखांवर अल्प टीका येत असे. फ्रेंड

* वर्तमानपत्रांतील लेखांचे संक्षिप्त अथवा विस्तृत उतारे लोकमत प्रचलित विषयांवर कसें आहे तें कळावें ह्मणून रावसाहेब त्यांतील छापील भाग कापून घेऊन दुसऱ्या कागदांस चिकटवून त्यांचीं पुस्तकें बांधवून आपल्या संग्रहीं ठेवीत असत.

आफ इन्डिया ( हिंदुस्थानाचा मित्र ) हें नांव धारण करणारें पत्र श्रीराम पूरास निघत असे. तें हिंदी आकांक्षांचे विरुद्ध असे. त्यावर ने. ओ मध्यें नित्य टीका येई. एकदां तर " मुखपृष्ठावर असलेलें हिंदुस्थानचा मित्र हें आपलें नांव बदलावें " अशी ही सुचना ने. ओंत आली होती.

नंतर विविध विषयांवर उपयुक्त माहिती देऊन वर्तमानपत्र हें नांव यथार्थ होण्यापुरतें थोडें वर्तमानसार देण्यांत येई.

आबालवृद्धांस विशेषतः खेडेगांवच्या लोकांस प्रिय असलेली सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांची व नेमणुकांची बातमी असे. ती देतांना नेमणुका चांगल्या कोठल्या व वाईट कोठल्या तें जरूर तेथें सांगण्यांत येई.

रत्नागिरीच्या हायस्कूलांतील युरोपियन प्रिन्सिपॉल यांच्या कारकीर्दीवर लेख लिहून नेटिव्ह ओपिनियननें त्यांची बदली करून घेतली होती. "हे वेळेवर शाळेंत जात नाहींत. दोन वर्षांत एकही मुलगा मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसूं शकला नाहीं; हे नालायक आहेत. यांच्या पगाराचा पैसा हिंदुस्थानांतील गरीब रयतेच्या पैशावर बोजाच आहे. येथील उष्ण हवेंत नांदण्यासारख्या यांना संवयी नाहींत. त्यांना घरची थंड हवा चांगली. आह्मास विद्याज्ञान करून स्वार्थ साधावयास आलेल्या या गृहस्थांच्या विरुद्ध लिहून यांचें नुकसान करण्याचा आमचा हेतु नाहीं ! भांडारकरांसारख्या बुद्धिमान बी. ए. ला रत्नागिरीस आणल्यास लोकांचा फायदा होईल." याप्रमाणें डा. भांडारकर यांची नेमणूक झाली.

म्युनिसिपल कमीशनरच्या जागेवर डा. बर्डवुडसारख्या थोर इंग्रज गृहस्थाची नेमणूक व्हावी अशी शिफारस ने. ओ. करी.

मुंबई म्युनिसिपालिटीच्या रोजच्या कामांवर लिहिलेले लेख वाचनीय आहेत. मि. क्राफर्ड हे कमीशनर असतां त्यांच्या उधळपट्टीवर या पत्रांत अनेक लेख आले होते. हें पत्र हात धुवून त्यांच्या पाठीस लागलें होतें.

संस्थानिकांचा पूर्वेतिहास येत असे. त्यांची लोकसंख्या, उत्पन्न, व राज्यव्यवस्था कशी आहे त्याची हकीकत येत असे. कारण हिंदी संस्थानिकांवरील लोकांचें प्रेम या सुमारास जरा वाढलें होतें. दलहौसीनें पुष्कळ संस्थानिकांस राज्य करीत बसण्याच्या दगदगींतून वांचविलें होतें. व थोडे उरले त्यांस राजकीय पदार्थसंग्रहालयांत जुन्या राजांचे नमुने ह्मणून शिक्षणाच्या रुमालानें साफ सूफ करून रक्षण करून ठेवले असतां जुन्या काळाचें स्मारक ह्मणून तरी ते पहावयास मिळावे अशी लोकांची शुभेच्छा असे. हिंदी संस्थानें व इंग्रजांचें राज्य या विषयावर ने. ओपिनियनमध्यें लेख बरेच आले आहेत. ते वाचनीय आहेत. "त्यांत ब्रिटिश राज्याशीं आमचा संबंध जुळून आला आहे यांत मोठें राष्ट्रीय कार्य आहे. त्याचीं चिन्हें बघणाऱ्यास स्पष्ट दिसत आहेत. त्यांची राज्यव्यवस्था प्रागतिक आहे व तिची वाढ उत्तरोत्तर होणारी आहे, त्यामुळें आह्मीं स्वतां ब्रिटिश राज्य अधिक चाहतों" असें सांगून ब्रिटिश अम्मलापासून नफे तोटे दाखवून संस्थानांतील अम्मलाचे नफे तोटे दाखवून दिले आहेत. ब्रिटिश राज्याच्या जमेस व खर्चास घालण्यासारखें जें होतें तें घालून लोकांपुढें १८६८ सालीं हा खर्डा स्पष्टपणें ठेवून "संस्थानिकांनीं न्यायखातें व अम्मलबजावणीचें खातें हीं निराळीं करावीं; चांगले कायदे करावे; व तिजोरींतून खासगी खर्चास उचलावयाच्या पैशास आळा घालावा" असें सुचविलें आहे. व पुढें ह्मटलें आहे कीं "संस्थानांतील अम्मल जर ह्मणण्यांत येतो इतका जुलमी असता तर इंग्रजांची उत्तम व्यवस्था मनांत आणून या संस्थानिकांची सर्व प्रजा एक दिवस उठून दुसऱ्या दिवशीं संस्थानांची सरहद्द ओलांडून मुलां बाळां ढोरां पोरां सुद्धां इंग्रजांची प्रजा बनली असती व मग हिन्दी संस्थानिकांच्या वाटोळे फक्त सारंगीवाले, तबलजी व पैंजण घालून नाचणाऱ्या वारयोषिताच उरल्या असत्या!"

" इंग्रजांनीं उदार शिक्षण देण्याची व मुद्रणस्वातंत्र्याची अशा ज्या दोन देणग्या दिल्या आहेत त्यांनीं सर्वांचें कल्याण होऊन इंग्रजाची प्रतिष्ठा वाढेल" असें सांगून "इंग्रजांच्या राज्यपद्धतीच्या संसर्गानें संस्थानिकांनीं अंतर्व्यवस्था बदलावी " असें सुचविलें आहे.* व तशी आशा करण्यास जागा आहे असें दाखविण्यास सर रिचर्ड टेंपल मुंबईचे माजी गव्हरनर यांच्या पुस्तकांतील खालील उतारा दिला आहे.

" या शिवाय संस्थानिकांच्या विषयीं सत्यधर्मानें बोलावयाचें म्हणजे असें म्हटलें पाहिजे कीं आमच्या शंभर वर्षांच्या या देशावरील वर्चस्वाच्या काळांत पुष्कळ चांगले हिंदी राजे होऊन गेले. त्यांची मोठी यादी देण्याची गरज नाहीं. ते प्रसिद्धच आहेत. त्यांशिवाय उत्तम मंत्री होऊन गेले. उदाहरणार्थ म्हैसूरचा पूर्णिया, इंदूरचे तात्या जोग, हैदराबादचे सालरजंग; ग्वालेरचे सर दिनकरराव व त्रावणकोरचे सर टी माधवराव. "

हे लेख इंग्रजींत होते ते इतके लोकप्रिय झाले कीं ते पुस्तक रूपानें पुन्हां छापवावे लागले.

राजकीय मंडळ्या व वर्तमानपत्रें यांचें कार्य कोणतें याविषयीं रावसाहेबांचें एक आवडतें मत असे. त्याचा उल्लेख ने. ओ. मध्यें होत असे:—" हिंदी वर्तमानपत्रें व सभा यांचें कार्य व विलायतेंतील पार्लमेंट सभेंतील अधिकारारूढ पक्षास विरोध करणाऱ्या सभासदांचें कार्य हीं एकच आहेत. अधिकाररुढ पक्षानें करूं घातलेल्या कामांस पार्लमेंट सभेंत

* या शिवाय ब्रिटिश लोकांच्या राज्यव्यवस्थेच्या तत्त्वाचा विजय हिंदीसंस्थानांत झालेला पहाण्याची ईच्छा ने. ओ. नित्य करी. ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा नियमितपणा व प्रामाणिकपणा या दोन गुणांचें अनुकरण करून कारभार करण्याची, प्रजा अज्ञानांधःकारांत पिचत न पडूं देण्याची व प्रजेस अन्यायाची बाधा न होऊं देण्याची इत्यादि सुचना संस्थानिकांस ने. ओ. नित्य करी.

विरोध करून त्यांची कसोशीनें तपासणी करून लोकांच्या अनहिताचा भाग त्यांतून काढून टाकून बाकीचीं कामें तडीस नेण्यास मदत करावयाची हें तें कार्य होय."

"या संस्थांनीं प्रचलित विषयांचा नीट अभ्यास करावा, देशासंबंधें सर्व तऱ्हेची माहिती गोळा करावी, काय काय सुधारणा होण्यासारख्या आहेत काय काय इष्ट आहेत इ० इत्थंभूत माहिती मिळवावी म्हणजे या संस्थांचें वजन पडलेंच पाहिजे."

"विलायतेस ॲन्टी कॉर्न ला लीग ही संस्था पहिल्यानें तुच्छ मानिली जाई. पुढें अत्यन्त प्रयासानें त्या संस्थेनें लोकमत आपले बाजूस वळवून घेतलें हें प्रसिद्धच आहे. तिचें अनुकरण करून आमच्या संस्थांनीं आपल्या मनाप्रमाणें प्रजेचें कल्याण करून घेणें शक्य आहे. ३।४।१८७०"

"एवंच सरकारनें केलेल्या कृत्यांतील चांगलेपणाची वाखाणणी करणें हें निराळें आहे. व त्यांतील खोड दाखवून देणें हें निराळें आहे. परंतु खोड दाखवून देणें हें ती नाहींशी करण्याच्या हेतूनें दाखविण्यांत येत आहे," असें या पत्राचें धोरण त्यांतील लेख वाचल्याबरोबर ध्यानांत येण्यासारखें आहे.

टीका करतांना शब्दछल मुळींच करण्यांत येत नसे. काय लिहावयाचें तें स्पष्टपणें लिहिलें जाई. "मनांतले विचार दाबून ठेऊन उगाच केलेला शब्दांचा उच्चार सोनाराच्या नळींतून इकडून तिकडे गेलेलें वारें होय." म्हणून अवास्तविक स्तुतीच्या मागें ने. ओ. केव्हांही लागलें नाहीं कारण "अशी स्तुति फार मादक आहे. तिच्या योगानें मुत्सद्दी मोह पावतात, तत्त्वज्ञानी विचारभ्रष्ट होतात व राज्यें नाश पावतात."

ने. ओ. मध्यें "बाहेरगांवचा न्याय" या सदराखालीं मॅजिस्ट्रेट व जिल्हा अधिकारी यांनीं केलेल्या निकालांवर खरपूस टीका येत

असे, त्याचा उद्देश पुढें दिल्याप्रमाणें होता. " स्वेझच्या कालव्यापासून पुढें या बाजूला लोकमत नाहीं. कायदे अथवा सशास्त्र राजसंस्था लोकमताच्या दाबाशिवाय निष्फल होत असतात म्हणून अधिकारी हिंदी असोत अथवा इंग्रज असोत, त्यांच्या कृत्यावर टीका करून तीं दूर पर्यंत प्रसिद्धी पावतील असें करावयाचें " अनेक वेळां हायकोर्टानें असले अन्याय नजरेस आल्यावर दूर केल्याचीं उदाहरणें ने. ओ. मध्यें दिलेलीं आढळतात. " ब्रिटिश राज्याची बळकटी लोकमतावर आहे " असें प्रतिपादन या पत्रांत वारंवार येत असे. "

वाक्स्वातंत्र्याबद्दल व लेखनस्वातंत्र्याबद्दल ने. ओ. सरकारास दुवा देत असे.

" ज्या गोष्टी आम्हांला नडतात त्यांविषयीं उघडपणें व खासगी रीतीनें कुरकूर करण्यास जॉन बुलला जेवढा इंग्लंडांत, तेवढा येथें आम्हांस अधिकार आहे. " " आम्हांस राजकीय हवामापन यंत्राकडे संतत सूक्ष्म नजरेनें पहात रहावें लागतें. कारण एकाद्या वेळेस+×+ येथील लोहकान्त उष्णता उत्पन्न करील, हवा पातळ होईल व राजकीय व्यापारावर परिणाम करणारे निराळेच वारे अन्य दिशेनें वाहूं लागतील ! त्याचा नकाशा आमचे पाशीं नाहीं " इ. इ. वर्णन वाचून ने. ओ. हें राजकीय पक्षाचें काम नावड्या प्रमाणें करण्यास अवतरलें होतें हें उघड आहे.

ने. ओ. नें प्रामाणिकपणें केलेली टीका सरकारांत आदरास पात्र होई. साऱ्याच्या थकलेल्या बाकीवर व नोटीशीच्या खर्चावर अल्प व्याज घेण्याचें एका अधिकाऱ्यानें ठरविलें. त्यावर ने. ओ. मध्यें टीका आल्यावर तो हुकूम रद्द झाल्याचें सरकारनें ने. ओ. ला कळविलें.

कित्येक इंग्रजी पत्रकारांस राहून राहून हिंदी लोकांची नालस्ती करावयाची संवय आहे. तिला अनुसरून कोणीं कांहीं लिहिल्यास स्वाभि-

मानपूर्वक त्याचा निषेध ने. ओ. करीत असे. एकदां " हिंदीलोक हे कृतज्ञ नाहींत. त्यांच्या कोशांत ' मी आभार मानतों ' हा शब्दसमुच्चय नाहीं. " अशी तक्रार कांहीं इंग्रजी पत्रांत सुरू झाली. तेव्हां ने. ओ. मध्यें हिंदुस्थानचे हितशत्रु वारन हेस्टिंग्स यांच्या तोंडचें मि. बर्क यांच्या खटपटीनें त्यांची कोडतांत चौकशी चालली असतां कृतज्ञतेबद्दल हिंदी लोकांस दिलेलें शिफारसपत्र छापून काढून त्याच्या जोडीला हिंदी धर्मास नांवें ठेवणाऱ्या मिशनरी लोकांपैकीं एकानें दिलेलें शिफारसपत्र ने. ओ. नें छापिलें:–" मी आधींच घेतलेल्या शपथेवर असें सांगतों कीं हिंदी लोक स्वभावानें सौम्य व दयाळू आहेत. त्यांस अपकार केला असतां ते जितके चिढतील त्याहून त्यांवर उपकार केला असतां अधिक कृतज्ञता दाखवतील. पृथिवीच्या पाठीवर प्रबल दुर्विकारांस थारा न देणारे जे सुधारलेले देश आहेत त्यांपैकीं एक त्यांचा देश आहे." (वारन हेस्टिंग्स). " कृतज्ञता हिंदी लोकांच्या रोजच्या राहाणींत आढळून येते. ते एकवेळ त्यांस केलेला अपाय विसरून जातील, पण उपाय केलेला कधीं विसरणार नाहींत. हें मी २२ वर्षें व २८ दिवसांच्या अनुभवानें सांगतों. ( चार्लस फोर्ब्स १८।१२।१८३९ ). ही प्रतिस्पर्ध्याबरोबर सामना करण्याची पद्धति ने. ओपिनियनची सर्व पत्रांस साधत नाहीं.

वरील गैर समजाचा प्रकार वर्ज करण्याचा ने. ओ. उपदेश करी:–"इंग्लंदच्या हिंदुस्थानाशीं घडून आलेल्या संयोगानें हिंदी राष्ट्राच्या सामाजिक, बौद्धिक, नैतिक व धार्मिक जीविताला चैतन्य प्राप्त झालें आहे. दोन्हीं राष्ट्रांनीं एकमेकांतील गैरसमज दूर करून विचारविनिमय सुरू केला पाहिजे. "

" हिंदुस्थानाच्या राजकीय भूमितीचा पांचवा सिद्धांत ( जो गर्धभाला बुजवणाऱ्या पुलाप्रमाणें नूतन विद्यार्थ्यांस भासतो तो ) वलांडून सर्वांला गेलें पाहिजे. त्यास राजेरजवाडे, हिंदीप्रजा, ब्रिटिशप्रजा व घरचेमुत्सद्दी हे अपवाद नाहींत. सर्वांस स्वताच्या कर्तव्याचे व. जबाबदारीचे धडे शिकले पाहिजेत. "

पार्लमेंतसभेंतील वादविवादांत जेवढा बोधप्रद भाग असे तेवढा ने० ओ० नेहमीं प्रसिद्ध करी.

युनिव्हर्सिटीमध्यें पदवीदान समारंभाच्यावेळीं कलकत्ता, मद्रास व मुंबई येथें झालेलीं भाषणें हीं पहिल्यापहिल्यानें फार उत्तम असत. शिक्षण व तें देण्याचे हेतू व त्याचे परिणाम यांविषयीं जें विद्वानांस म्हणतां येईल तें सर्व त्या वेळेस बोलून झालें नव्हतें म्हणून हल्लीं जीं पदवीदानसमारंभाच्या वेळीं या देशांत सर्वत्र भाषणें होतात त्यांपेक्षां त्यावेळच्या भाषणांस फार रंग चढे व सर्व लोकांचें लक्ष त्यांकडे स्वाभाविकपणेंच वेधलें जाई. "जुन्या-वैभवाची स्मृति तत्काल नष्ट होणार नाहीं हें साहजिक आहे व क्षम्य आहे, परंतु हल्लींच्या चढाओढीच्या काळांत जे चढणार नाहींत ते पडतीलच, जे पुढें धावणार नाहींत ते कदाचित् या शर्यतींत मागें राहतील" इ. तरुणांस उपदेश करणारें सर सेटन कार यांचें १८६८ मधील कलकत्ता येथें झालेलें भाषण फार सरस वक्तृत्वानें भरलेलें ने. ओ. मध्यें समग्र आलें होतें. निवडक विद्वानांचीं व्याख्यानें या पत्रांत सतत येत असत. सांख्यादि तत्त्वज्ञानावर डा. भांडारकरांसारख्यांचीं व्याख्यानें, हिंदुस्थानाचें दारिद्र्यावर दादाभाईचे निबंध व बंगालीवक्ते बाबू केशवचंद्रसेन यांचीं नव्या धर्मावर व्याख्यानें हीं फार मननीय असत, तीं ने ओ. आदरेखून प्रसिद्ध करी.

एकदां पहिल्या पायरीपासून शेवटल्या पायरीपर्यंत अन्यायाविरुद्ध दाद मागून घेण्याचे उपाय ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत कसे कसे उपलब्ध आहेत ते क्रमवार देण्यांत आले होते, ते वाचले म्हणजे हातानें बोट धरून "चाल चाल" या मंत्राचा उच्चार करून लहान बालकांस चालावयास शिकविणाऱ्या आईची अथवा दाईची आठवण होते.

काउन्सिलांच्या कामगिरीवर नेहमीं टिका असे. तींत काउन्सि-लांचीं कामें घाईनें करूं नये अशी मुख्य सूचना असे ती रावसाहेबांच्या पत्रव्यवहारांतही आढळते.

फार कायदे करणें म्हणजे फार औषधें घेऊन शरीरप्रकृति बिघडून घेण्यासारखें आहे असें वारंवार प्रतिपादन येत असे.

नवा कायदा करावयाचें घांटूं लागलें, कीं पुढील दोन तीन मुख्य प्रश्न विचारले जात.

१ कोणती अडचण दूर करण्याकरतां कायदा करण्यांत येत आहे ?

२ ही अडचण दूर करावी अशा किती मागण्या लोकांकडून आल्या आहेत ?

३ हा कायदा केवळ प्रयोगाखातर केला जात आहे काय ?

कायदे करणारा तसाच कायद्याच्या मसुद्यावर टीका करणारा हे दोघे कायद्यांत निष्णात असावे लागतात. त्याशिवाय तत्त्वार्थ निघत नाहीं. रावसाहेब स्वतां कायद्यांत निष्णात असल्यामुळें त्यांनीं केलेली टीका विचारार्ह असे.

लोकांमध्यें कधीं कधीं कांहीं प्रश्न फार खळबळ उडवितात. त्यांवर लेख लिहिणें हें लोकशिक्षण व लोकांचें मनोरंजन व लोकांच्या हक्कांचें संरक्षण करणें या तीन कार्यांशिवाय वर्तमानपत्राचें चवथें कार्य गणिलें जातें. तें कार्य करतांना ज्या विषयांवर **ने.ओ.** लेख लिही तेः–कुलींचा प्रश्न; काळा गोरा यांत दिसून आलेला फरक; आगगाड्यांतील व्यवस्था अथवा गैर-व्यवस्था; जोड्याचा व बुटांचा प्रश्न; शेअर बझारांतील सट्टेबाजी; वऱ्हाड प्रांत; कोडतांतील देखावे ( ज्यांत अनुक्रम अंक टाकून त्यांत प्रसिद्ध बॅरिस्टर ॲन्स्टी यांनीं कोडतांत केलेल्या दण्डेलीचें वर्णन येत असे तें. )

रेलवेंत स्त्रियांस कधीं कधीं त्रास पोंचल्याचीं उदाहरणें आढळलीं तर **ने.** ओ. हिंदी लोकांसच दोष देत असे व म्हणेः–"आपल्या स्त्रीचें रक्षण जर करतां येत नाहीं तर युरोपीयनांप्रमाणें बरोबर घेऊन स्त्रियांना कशाला फिरवावें ! दुष्ट लोकांची खात्री पीनल कोडाच्या कलमांतील शब्दां-वर केलेल्या टिकेनें होत नसते. घोड्याचा चाबुक घेऊन त्याच्या प्रहा-

रानें चांगली खातरी त्वरीत होते. व अशा बहाद्दराला ब्रिटिश मॅजिस्ट्रेट पुरुषार्थ दाखवितां येतो ह्मणून मानच देईल व सहानुभूति दाखवील. "
सोल्जरांची लीला येत असे; तशी एकदां सोल्जरांच्या हातून हिंदी मनुष्यास इजा झाली तेव्हां त्यांनीं इस्पितळापर्यंत त्यास वाहून नेल्याची हकीकत सुद्धां आली होती. यावरून असें सिद्ध होतें कीं एकाद्या विशिष्ट वर्गाबद्दल विनाकारण पूर्वमत न होऊं देण्याची खबरदारी **ने.ओ** घेत असे.

स्त्रीशिक्षणास तर हें पत्र वाहिलेलेंच होतें. त्यासंबंधें सर्व चळवळींची हकीकत **ने. ओ.** मध्यें प्रसिद्ध होई. विधवाविवाहाच्या बाबतींत प्रथम **ने. ओ.** नें चांगली कामगिरी केली आहे.

शिमग्याच्या सणांतील बीभत्स प्रकार सोडण्याचा उपदेश या पत्रांत येत असे.

दुष्काळ अग्निप्रलय इ. आपत्तीनें लोक त्रस्त झाले असतां आपत्तिनिवारणार्थ द्रव्य गोळाकरून त्यांचा विनियोग इष्ट तऱ्हेनें **ने. ओ.** करीत असे.

याशिवाय साधकबाधक प्रमाणें देऊन खालील विषयांवर लेख येत असतः—होम चार्जिस; लष्करी खर्च; सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश होण्याकरतां दोन ठिकाणीं परीक्षा घेण्याची सुचना; न्यायखात्याची व अम्मलबजावणी करणाऱ्या खात्याची फारखत; स्वराज्य ( कांहीं तरी प्रातिनिधिक पद्धतीचें ); साम्राज्याच्या खर्चाची विभागणी; राज्यकारभारांत आमचें अंग; हिंदुस्थानाकरतां हिंदुस्थान; बहुजनसमाजास प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता; लवाद कोर्टें; दारूचें व्यसन*; वाङ्मयात्मक शिक्षण, विरुद्ध, यांत्रिक शिक्षण; शारीरिक शिक्षण; प्रवासवर्णनें; बनारस, आग्रा व कानपूर इ. शहरांचीं वर्णनें.

---

* हिन्दू, मुसलमान, व खिस्ती यांच्या धर्मपुस्तकांतील मद्यपाननिषेधक वाक्यांसह या विषयावर लेखांमागून लेख येत असत. त्यांत अबकारी खात्याला "अपकारी" असें नांव देऊन मद्याला "अग्निरस" ही संज्ञा दिलेली आढळते.

वर दिलेल्या विषयांत जे राजकीय गाऱ्हाणीं गाणारे कांहीं विषय आहेत, त्यांस ऐतिहासिक महत्व आहे. कारण आतां राजकीय सुधारणा बरीच होऊन लोकांस अधिक राजकीय हक्क प्राप्त झालेले आहेत.

किरकोळ विषय कोणते अगोदर ध्यावे यांविषयीं रावसाहेबांनीं आपलें धोरण पात्रिकेचे संपादक शिशिर बाबू यांस एकापत्रीं कळविलें होतें तें असें:—" मीं जर तुमच्या ठिकाणीं असतों तर तूर्त कायदे काउन्सिलें व सिव्हिल सर्व्हिस हे विषय जरा बाजूला ठेऊन आगगाड्या, चौकिदारी व सर्व्हे इ. सर्व विषय रयतेच्या दाराशीं भिडलेले हातांत घेतले असते. या विषयींचीं, गाऱ्हाणीं दीर्घकालीन आहेत."

कांहीं कांहीं फार मनोरंजक व बोधप्रद विषय येत त्यांत पुढें दिल्याप्रमाणें विषय असत. अकबराचा धर्म; पीटर धी ग्रेट रशियाचा बादशहा याचें मृत्युपत्र ( ज्यांत रशियन लोकांची तत्कालीन राजनीति व तिचें भावि धोरण हीं दिसून येत आहेत तें. )

"लॅटिन भाषेपेक्षां शब्दप्राचुर्यवती, ग्रीक भाषेपेक्षां अर्थानुनेय व दोघीं पेक्षां स्निग्ध" या शब्दांत वुइल्यम जोन्स यांनीं वर्णन केलेली व "पूर्णपणें व स्पष्टपणें साहजिक रीतीनें अमूर्त कल्पना प्रदर्शित करण्यास इंग्रजी भाषेहून समर्थ अशी परिपूर्ण" म्हणून डाक्तर हॉग यांनीं वाखाणलेली जी संस्कृत भाषा तिचेवर निबंध येत असत. दारिद्र्य, उद्योग इ० सर्वकाळीं सारख्या महत्वाच्या विषयांवर छोटेखानी निबंध येत ते फार सुटसुटीत असत. उदाहरणार्थ पुढील शिक्षण या विषयावरील निबंधाचा भाग, ( प्यारा पहिला. )

## शिक्षण.

आतां या काळांत शिक्षण ह्मणजे काय हें सांगत बसणें एकवेळ सांगितलेली गोष्ट पुन्हां सांगण्याप्रमाणें आहे.

अज्ञानाचा नाश शिक्षणानें होतो. शिक्षणानें रानटी मनुष्यास आपल्या पाशवी शक्तीचें आवरण करतां येतें. मत्सरी मनुष्यास मात्सर्याचा लोप करतां येतो. व्यसनी मनुष्यास व्यसनाकडे असणारी प्रवृत्ति नाहींशी करतां येते. दरिद्री जनास दारिद्र्याच्या वेदनांचें शमन करतां येतें व श्रीमन्तास त्याच्या प्रमाणातीत लक्ष्मीचा मद व गर्व यांचा ऱ्हास करतां येतो. इ०

विरोधाभास हा अलंकार रावसाहेबांचा आवडता असे तो त्यांच्या पत्रव्यवहारांत आढळतो तसा ने. ओ. मधील लेखांतही आढळतो. त्याचा एक मासला असा आहे:—

"जिंकणाऱ्यास कोण जिंकतो? जिंकलेला! आम्हांला जिंकणारास आम्हीं जिंकलें असा गर्व कधीं कधीं निरुपद्रवी जिंकलेल्यांस करतां येतो. रोमन लोकांनीं ग्रीकांचा पाडाव शारिरीक बळानें केला पण ग्रीकांनीं बुद्धिबळानें त्यांवर सूड काढला. तसाच प्रकार थोडा आतां घडून आला आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास करून येथून गेलेले जर्मन, संस्कृत भाषेचा अभ्यास तेथील विद्वानांकडून करवूं लागले आहेत व आतां त्यांचा मोर्चा इंग्लंदकडे वळला आहे. व लवकर फ्रान्सिच्या लढाईचा सूड क्राइव्हच्या देशावर काढणार असा रंग दिसत आहे. हिंदूच्या पवित्र भाषेतील पाणिनीच्या व्याकरणाच्या पद्धतीनें भाषाविज्ञान व व्युत्पत्तिशास्त्र यांस चालन मिळालें आहे. इ० "

या लेखांत जित झालेल्यांची जेत्यांस जिंकण्याची इच्छा ( कशा का रीतिनें होईना? ) दिसून येते, असें म्हणावें लागतें कारण मनुष्यजाति ही लढवय्यी आहे. तिच्यांत लढाई करण्याचें वारें गुप्तपणें संचरत असतें, नाहीं तर मुक्तिफौजेसारख्या केवळ धार्मिकसंस्थेला व्यावहारिक नांव देण्याकरतां युद्धशास्त्रांतील फौज हा एक शब्द कशाला हौसेनें हुडकून काढण्यांत आला असता? याच विरोधात्मक धर्तीवर कांहीं म्हणी वापरण्यांत

येत, त्या लेखांस फार शोभा आणीत; उदाहरणार्थ:—शत्रूकडून पराभव पावण्यांत जेवढा धोका आहे त्याहून मोठा धोका शत्रूवर विजय मिळविण्यांत आहे.

कधीं कधीं ने. ओ. आशावादित्वाच्या भरांत भविष्य करून ठेवी. त्यांतील एक उदाहरण मासल्यास पुढें दिलें आहे.

"आह्मीं असें भाविष्य करून ठेवतों कीं सेनेटमध्यें जेव्हां हिंदी लोकांचा अधिक भरणा होऊन त्यांचें बहुमत होईल त्यावेळेस देशी भाषांतीलच बी. ए. पुष्कळ निपजतील. हल्लीं इंग्रजीचें ज्ञान होईतों देशी भाषांची जरूरी लागते. पुढें त्यास इतकी बंदी होते कीं ती पाहून कोणी ह्मणेल कीं या भाषा व टिंबक्टू प्रांतांतील भाषा सारख्याच ह्मणून या त्याज्य होत."

"पुढें अशी वेळ येईल कीं विद्यार्थ्यांस पाश्चात्य देशांतील कोणतीही भाषा अवश्य ह्मणून शिकविली जाणार नाहीं. डॉक्टरी विद्या शिकणारानें, इंग्रजी कायदा शिकणारानें पाहिजे तर लॅटिन शिकावें; मुसलमानानें पाहिजेतर अरबी शिकावें; हिंदूला पूर्वजांच्या ज्ञानोदधींत अवगाहन करणें असेल तर संस्कृत शिकावें; परंतु ज्यास कांहीं तरी करून सरकारी नोकरींत अथवा खासगी नोकरींत पोट भरावयाचें असेल त्यानें मायभाषेंतच बी. ए. नव्हे, एम्. ए. सुद्धां व्हावें !" हें भाविष्य उत्तरोत्तर कसें खरें ठरत जात आहे हें पाहिलें ह्मणजे वरील भविष्य करण्यांत **ने. ओ.** नें जी दिव्यदृष्टि दाखविली तिचें कौतुक वाटतें.

स्वतंत्र लेख जबाबदारी जाणून **ने. ओ.** लिही. "त्यांमध्यें स्वतंत्र बाणा व राजभक्ति एकत्र दिसून येते", असें मत इंग्लदांतसुद्धां प्रसिद्ध होतें. पृष्ठ २०५ पहा. हें कार्य साधण्यांत हिंदीवृत्तकारांची जबाबदारी काय आहे ती दाखविणारें **ज. जेकब** यांचें पत्र देऊन हें प्रकरण पुरें करण्यांत येत आहे.

"आम्ही हिंदुस्थानांत आलेले लोक परक्यालोकांत गणिले जातों. पोट भरलें म्हणजे ढेंकर देण्यास घरीं जावयाचे असें समजण्यांत येतें. ही

गोष्ट आह्मांस प्रतिकूल आहे. तुमच्या आमच्या चालीरीती भिन्न आहेत ही दुसरी प्रतिकूल गोष्ट आहे. देशांतील उद्योग आमच्यामुळें नष्ट होतात अशी तिसरी प्रतिकूल समजूत आहे. या गोष्टीशीं सामना करण्यास अनुकूल होणारी गोष्ट एकच आहे ती ही कीं आमच्या सुराज्याची खरी-खरी किंमत लोकांस कळून येणें; परंतु व्यापारी वर्गाशिवाय ती चांगलीशी कोणास कळून येत नाहीं व बहुजन समाजास त्याची किंमत चांगली कळवून देण्याचें काम कोणीही कर्तव्य म्हणून मनावर घेत नाहीं व तुम्हांस आम्हीं अपाय करतों अशा समजुती बहुजनसमाजांत ज्यांच्यायोगें उत्पन्न होतील असे सूचक लेख लिहिण्यांत येतात. ही स्थिति समाधानकारक नाहीं. समर्याद, निर्मळ अंतःकरणानें टीका करणें—ती कितीही कठोर शब्दांत केलेली असेना—ही एक गोष्ट आहे. परंतु विचार केल्याशिवाय दोष देणें, निष्कारण अपराध माथीं लादूं पहाणें व सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेल्या कृत्यांच्या हेतूंचा विपर्यास करणें या सर्व गोष्टी अगदीं निराळ्या आहेत. या गोष्टींनीं हानिच होणार आहे. या शिवाय या लेखकांचा दुसरा कोणता बरें हेतु असावा ! ‘ सव सोनारकी येक लोहारकी ’ * ही म्हण नीट ध्यानांत आणा. पुन्हां पुन्हां उडवलेले शिंतोडे, वारंवार केलेली कुरकूर व मत्सरानें माथीं मारलेले अपराध हीं शेवटीं बहुजनसमाजरूपी लोहारास आपल्या हातोड्याचा एकच ठोका मारावयास लावतील. ! ”

लेखांतील परुषाक्षर शब्द ज. जेकब यांस आवडत नसत. ते म्हणत “ ज्या कार्याकरतां कठोर भाषा वापरावयाची त्याच कार्याचा तिनें नाश होतो. कठोर भाषा ही नुसत्या वक्तृत्वाला जोर आणते. परंतु जेथें तर्कानुबद्ध लेखानें कार्य साधावयाचें आहे तेथें तर्कशक्तीला कठोर शब्द हानिकारक होतात. तर्क सबळ नसला म्हणजे तो निष्फळ होतो व तो निष्फळ झाला कीं शेषं कोपेन पूरयेत् या न्यायानें लेखकाचा पक्ष खोटा आहे म्हणूनच तो अपभाषण करीत आहे असें ठरतें. ”

---

* ही म्हण जेकब साहेबांनीं या पत्रांत मुद्दाम मराठींत लिहिली आहे. ज्या लेखांवरून लार्ड लिटन यांनीं वर्तमानपत्रांचा कायदा केला त्यास उद्देशून हें पत्र आहे.

## प्रकरण २१ वें.

# मुंबईंतील जुगार.

हें कामकोपलोभक्रोधमहानर्थकोटिचें वतन ॥
"बत" न ह्मणे, कवण कितव, धर्महि दुःखांत पावला पतन ॥१॥
(मोरोपंत.)

नेटिव्ह ओपिनियन हें पत्र रावसाहेबांनीं लोकशिक्षणाकरतां व लोकजागृतिकरतां सुरू केलें परंतु जेव्हां मुंबई असोशिएशनसारखीं सरकारांतून दाद लावून घेण्यास रावसाहेबांच्या हातांत साधनें नव्हतीं, तेव्हां रावसाहेब पहिल्यानें स्वत: सार्वजनिक गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याकरतां योग्य अधिकाऱ्यांची समक्ष अथवा पत्रद्वारा भेट घेत असत. (२-२-१८६४) रोजीं त्यांनीं मि. एलिस, पोलिस कमीशनर, मुंबई, यांस खालील पत्र मुंबईच्या आसपास चालणाऱ्या जुगाराविषयीं लिहिलें होतें.

" कुर्ल्यासारख्या साष्टी तालुक्यांतील ठिकाणीं जुगार खेळण्याचें व्यसन वाढत चाललें आहे तें बंद करण्याकरतां कांहीं उपाय योजण्यांत यावे ह्मणून तुह्मांला पोलिसकमीशनर या नात्यानें जाहीरपणें अर्ज करणार आहें. ही चाल बंद करण्याकरतां जर एकादा कायदा करण्यांत आला तर तो कायदा मुंबईंत चालू असलेल्या सर्व भट्ट्यांतील धुराचा उपद्रव बंद करण्यापेक्षां अधिक श्रेयस्कर होईल. मी नुकताच ठाणें व कल्याण या बाजूला धंद्यासंबंधानें जाऊन आलों. डब्यांच्या रांगाच्या रांगा जुगार खेळणाऱ्या लोकांच्या झुंडींनीं भरभरून

चालल्या होत्या. यांतील बहुतेक लोक फार भयंकर असतात. या बाबतींत रेल्वे कंपनीनेंच यापूर्वी अर्ज करावयास पाहिजे होता व दुसऱ्या कोणीही अजून या बाबतींत चळवळ सुरू केली नाहीं, ह्मणून आश्चर्य वाटतें."

वरील पत्रांत ह्मटल्याप्रमाणें **रावसाहेबांनीं** खालील अर्ज(९।७।१८६४) ला पाठवून दिला.

**बी. ए. एलिस, एस्कायर, रेव्हिन्यू व पोलिस कमिशनर, उत्तरप्रांत, यांचे हुजुरास.**

१८५६ च्या कायद्यानें मुंबई पोलिसांस दिलेल्या जबर अधिकारानें भ्यालेल्या लोकांनीं प्रत्यहीं शिंवाच्या (कॉजवे) पलिकडे जुगाराचा खेळ भयंकर प्रमाणावर चालविला आहे. हा प्रकार मोठा शोचनीय आहे. कारण याचे परिणाम फार दुःखद आहेत. हें व्यसन केवळ कुर्ला वगैरे ठिकाणाला धरून आहे असें नाहीं. आह्मांला खात्रीलायक आधारावरून असें कळून आलें आहे कीं हें व्यसन या इलाख्यांतील इतर भागांत विशेषतः **ठाणें**, अहमदाबाद व **कराची** या शहरांच्या आसपास पसरत चाललें आहे. स्थानिक सरकारनें लवकर कायदा करून उपाय योजले पाहिजेत, असें वरील गोष्टी मोठ्यानें ओरडून सांगत आहेत असें आह्मींही नम्रपणानें सुचवितों.

खुद्द मुंबई शहरांत जर जुगाराचा बंदोबस्त कायद्यानें करण्यांत येतो तर मुंबईच्या बाहेरच्या जागेंत कां करतां येऊं नये? मुंबई शहर व बेट यांच्या बाहेरील ठिकाणीं सध्यां जुगार ह्मणजे रिकामपणाचा निरुपद्रवी वेळ दवडण्याच्या मार्ग आहे असें खुशाल समजलें जातें अशी आह्मांस भीति वाटते. शिंवाच्या (कॉजवे रस्त्याच्या) एका बाजूला कायद्यानें जुगाराचा झालेला नायनाट व दुसऱ्या बाजूला त्याची असलेली भरभराट असा देखावा ब्रिटिश कायद्याच्या सर्वशक्तिमत्वाविषयीं व पावित्र्याविषयीं

हितकर कल्पना लोकांच्या मनांत उत्पन्न करून देण्यास समर्थ नाहीं अशी आह्मांला भीति वाटत आहे. या व्यसनापासून प्रत्यक्ष रीतीनें होणारे परिणाम तर आह्मांस दुःखकारक वाटतातच. परंतु त्यापासून अप्रत्यक्षरीतीनें होणारे परिणाम कांहीं कमी दुःखकारक वाटत नाहींत. असल्या परिणामांपैकीं कांहीं पुढें देत आहोंत. ठाणें व मुंबई यांच्या दरम्यान आगगाडींतील सर्व वर्गांतील (विशेषतः स्वानुभवावरून पहातां दुसऱ्यावर्गांतील) उतारूंच्या जीवास व जिनगीस धोका आहे. जुगार खेळणाऱ्यांची एकदम गर्दी कुर्ल्यांच्या स्टेशनवर कशी होते हा प्रकार प्रसिद्धच आहे. मुंबईहून कुर्ल्यास येतां जातां हे दुर्दैवी प्राणी चोऱ्या व त्यांहून निकृष्ट गुन्हे कसे करतां येतील यांची योजना करून ते करूनही टाकतील अशी भिती धरण्याला कारणें आहेत. तुमच्या हातीं असलेल्या सत्तेचा लोकांमध्यें असलेल्या वजनाचा उपयोग करून हजारों लोकांचें जेणें करून नैतिक व सामाजिक हित होईल तें करण्याला तुह्मीं झटतां अशी ख्याति आहे, ह्मणून वरील गोष्ट तुमच्या नजरेस आणणें हें आमचें कर्तव्य आहे असें समजतों. ह्मणून तुह्मीं आतां आपल्या चांगल्या नांवाचें व अधिकाराचें वजन खर्च करून स्थानिक सरकाराकडून जुगार खेळणें हा खेळ नसून गुन्हा आहे व जसा मुंबईंत तसा बाहेरगांवींही शिक्षेस पात्र आहे असें ठरविणारा कायदा करून घ्यावा.

आपले इ०

वि. ना. मंडलिक
गणपतराव भास्कर.
एन्. व्ही. बापट.
खर्सेटजी नसरवानजी कामा
आर्देसर फ्रामजी मूस.

## प्रकरण २२ वें.

# रेव्हिन्यूसर्वे बिल अथवा पैमाषिचा कायदा.

ॐ नमः सिद्धम्

हें पैमाषीच्या कायद्याचें प्रकरण रावसाहेबांच्या राजकीय धड्यांचा ओनामा होता. जमिनीवर दस्त बेताचा ठेवला असतां सरकार व प्रजा या उभयतांस तो कल्याणप्रद होतो. म्हणून सर्वत्र समत्व राखून दस्त बसविले पाहिजेत. जमिनीच्या मालकांचे व इतरांचे जे हक्क आहेत त्यांचें रक्षण केलें पाहिजे इ. तत्त्वांवर मोजणीचीं जीं कामें या प्रांतांत १८३६-३७ पासून सुरू होतीं, त्यांचा परिणाम काय झाला आहे तो पाहून मुंबई इलाख्यांत सर्वत्र पैमाष लागू करण्यास व तीसंबंधें नियम करण्यास वरील कायद्याचा मसुदा १८६४ च्या आगष्ट महिन्यांत मुंबई सरकारच्या कायदे करणाऱ्या काउन्सिलांत पुणें मुक्कामीं आणण्यांत आला. त्या वेळेस काउन्सिलांत खालीं लिहिल्याप्रमाणें सभासद हजर होते.

सर बार्टल फ्रियर ( गव्हर्नर साहेब ) अध्यक्ष.
१ सर मॅन्सफिल्ड.
१ नामदार डबल्यू. ई. फ्रियर.
१ ,, जे. डी. इन्व्हॅरॅरिटी.
१ ,, ए. डी. राबर्टसन
१ ,, रुस्तमजी जमशेटजी जीजीभाई.
१ ,, जगन्नाथ शंकर शेट
१ ,, प्रेमाभाई हेमाभाई.
१ ,, डब्ल्यू. आर. कॅसल्स
१ ,, हार्ट.

मुंबई इलाख्यांत सर्व जिल्ह्यांत जमिनीची मोजणी करणें, चतुःसीमांची आंखणी करणें, सरकार दस्त ठरविणें व पुढील व्यवस्था करणें, जमिनीच्या मालकांच्या हक्कांची नोंदणी करणें व आधींच केलेल्या मोजणीचे ठराव मान्य करणें इ० या कायद्याचे उद्देश आहेत असें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें.

हा कायदा त्याचदिवशीं विचार करण्याकरितां एका कमिटीकडे सोंपविण्यांत आला. त्या कमिटींत खालीं दिलेले सभासद होते.

नामदार फ्रियर
,, हार्ट
,, राबर्ट्सन
,, जगन्नाथ शंकरशेट
,, माधवराव विठल विंचूरकर.

त्यांनीं तत्त्वतः हा कायदा मान्य केला व त्यांतील नियमांत सुधारणा करून या कायद्याच्या नियमांचीं भाषांतरें कानडी, गुजराथी, मराठी व सिंधी इतक्या भाषेंत करावीं असें ठरवून कायदा पास करावा अशी शिफारस २५ आगष्ट रोजीं केली.

खासगी व्यक्तीनें सरकारास जमा न देतां उपभोगलेला गांव इ० इ० व्याख्या इनाम* गांवाची या कायद्यांत केलेली होती. व खोताला सरकारास जमा द्यावी लागत असल्यामुळें ४९ कलमाप्रमाणें हा कायदा खोतांस लागू व्हावयाचा होता. तेणेंकरून खोताचा जो आभावणीचा हक्क होता, तो नष्ट होत होता. या हक्कानें दरवर्षी पिकें तयार झाल्यावर त्यांचें कुळांसमक्ष मोज माप करून अर्धेल व तिर्धेल या मामूल वहिवाटीप्रमाणें कुळांकडून धान्यरूपानें वसूल घेण्याचा खोताचा पुरातन हक्क होता. सरकारास जें देणें द्यावयाचें तें पांचवर्षांच्या उत्पन्नाच्या सरासरीवरून लिलावांत जे धान्याचे दर होतील त्या दरानें किति भरावयाचें ते ठरत

* Alienated villaje.

असे; परंतु आतां ३८ व्या कलमाप्रमाणें खोतानें कुळांकडून वसूल किति मागावा तें ठरविण्याचा अधिकार या सर्व्हेच्या अम्मलदारांस देण्यांत आला होता.

दुसरें असें कीं ३७ व्या कलमानें सर्व्हेची जी कांहीं ३० वर्षांची मुदत असेल ती संपे तोंपर्यंत वार्षिक कबुलायत न घेतां खोतांकडे गांव राहूं देण्याचा ठराव करण्याचा पूर्ण अधिकार सेटल्मेंट हफीसरानां दिलेला होता.

महाराष्ट्राच्या गादीचे स्थापनकर्ते श्रीशिवाजी महाराज यांचा अवतार झाला नव्हता तेव्हांपासून खोत अस्तित्वांत मालक ह्मणून होते. पेशवाईचा अंत झाल्यावर वार्षिक कबुलायती खोतांपासून इंग्रज सरकार घेऊं लागलें. पण त्या कबुलायतींचा अर्थ इतकाच होता कीं " अस्मानी सुलतानी झाली किंवा कुळें निघून गेलीं तरी आह्मीं जमा भरूं " अशी कबुली खोतांकडून घ्यावयाची. एका खोतास काढून दुसरा खोत तेथें बसविण्याचा अधिकार या कबुलायतींनें सरकारास येत नव्हता. खोताशीं आतां मुदतीचा करार करण्याचा अधिकार या बिलानें सरकारी अधिकाऱ्यांस दिल्यानें खोतीचा शेवट जवळ आला अशी खोतांस भीति सुटली. पण ते पडले गरीब दरिद्री ! अर्ज्या करून, वकील देऊन, बॅरिस्टर उभा करून, सरकाराशीं भांडणें त्यांस कसचें झेंपतें ! परंतु खोतांचा वाली मुंबईस जागत होता. तो कोण तर रावसाहेब मंडलिक. त्यांनीं या कायद्यास शक्य तेवढा विरोध करावयाचा निश्चय केला, व तें काम मोठ्या धीटाईनें व पुष्कळ अंशीं स्वतःच्या खर्चानें त्यांनीं केलें.

ते स्वतः खोत असल्यामुळें स्वतां पुढें येणें त्यांस इष्ट वाटलें नाहीं. कारण त्यांची ही सर्व खटपट स्वार्थमूलक आहे असें तीस नांव ठेवण्यांत आलें असतें. या कामीं त्यांनीं आपले मित्र करसेटजी नसरवानजी पार्शी यांस पुढाकार दिला होता. व तो त्यांनीं आपला वेळ खर्च करून व वेळीं पदरचे पैसेही खर्च करून स्वीकारला होता. यांनीं खटपट करून

एक अर्ज केला होता. या कायद्याचें दुसरें वाचन व्हावें असें सुचविण्यास सरकार तर्फे ना. मि. इन्व्हरॅरिटी उठले व त्यांनीं सोराबजी जहांगीर व ब्रदर्स यांचा अर्ज, "आमच्या गांवास सर्व्हे लागू करावी" असा आला होता, तो या कायद्याच्या उपयुक्ततेची साक्ष म्हणून सभेस सादर केला. लगेच मि. खर्सेटजी नसरवानजी कामा व मि. विश्वनाथ नारायण मंडलिक व दुसरे यांचा अर्ज आला होता त्याची संभावना करतांना ना. मि. इन्व्हरॅरिटी म्हणाले:—" या अर्जाचें स्वरूप मघांच्या अर्जाच्या स्वरूपाहून भिन्न आहे. यांत व्यक्त झालेला मनोभाव भिन्न आहे. या कायद्याच्या हेतूविषयीं अर्जदारांचा गैर समज झाला असावा असें मला सत्कृद्दर्शनीं वाटलें; परंतु नीट वाचून पाहिल्यावर असें वाटतें कीं हा अर्ज प्रामाणिकपणानें लिहिलेला नाहीं. लेखकांचें अज्ञान जागोजाग प्रदर्शित झालें आहे. मुद्याला सोडून बरेंच संगतिविहीन अवडंबर माजविलेलें आहे. अज्ञानी लोकांस चिथावण्याचा यांत हेतु दिसतो." हा अर्ज १५ कलमी होता. त्यांतील पंधरावें कलम व विनंतिकलमें हीं महत्वाचीं होतीं.

कलम १५—सरकाराला जेवढा कर अवश्य म्हणून बसवावा लागेल तेवढा देण्याची अर्जदारांची राजी आहे व तेवढा कर तुम्हीं द्या असा उपदेश आपल्या देशबांधवांस करावयास त्यांची खुषी व तयारी आहे; परंतु हा कायदा पास करून घेण्याकरितां जी अनुचित घाई करण्यांत येत आहे ती प्रशस्त नाहीं असें अर्जदार सन्मानपूर्वक म्हणतात. कारण हिच्या योगानें जमीनीच्या मालकाच्या हक्कास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें खूप इजा पोंचणार आहे म्हणून नेक नामदार गव्हर्नर साहेबांस अशी विनंति करण्यांत येत आहे कीं खालील प्रश्नांचा विचार सभासदांकडून करवावा.

१ जमिनीसंबंधानें सर्व हक्कांचें संरक्षण व्हावें. सार्वजनिक हिताची

सबब योग्य आहे असें सिद्ध झाल्याशिवाय कोणाचाही हक्क नष्ट करूं नये. नष्ट करणें अवश्य झाल्यास योग्य नुकसानी भरून द्यावी.

२ गांवच्या व शेताच्या मालकांच्या व्यवस्थेंत हात घालूं नये.

३ खाजगी जमिनींतील झाडांवरील मालकींत हात घालूं नये.

४ सर्व्हे खात्यानें मध्यें हात घातल्यास आपल्या इनाम गांवाची मोजणी करणें इनामदारांच्या खुषीवर ठेवावें.

५ मोजणीचें काम, जमीन मोजणें व तिचा आकार ठरविणें, याच्या पलीकडे न जाऊं देण्याची खबरदारी ठेवली पाहिजे. म्हणजे जमिनीचें क्षेत्रफळ व आकार यांची नीट नोंद नोंदणीबुकांत सरकारास करतां यावी परंतु जमिनीच्या मालकांच्या हक्कांत हात घालण्यास मोजणीच्या निमित्तानें साधूं नये.

६ चतुःसीमेचे तंटे दिवाणी कोर्टाकडे निकालाकरतां हल्लींप्रमाणेंच रहावे.

७ सर्व्हे विरुद्ध दिवाणीकडे अपील करण्याचा जो हल्लींचा हक्क आहे तो नष्ट होऊं नये.

यावर ना. मि. इन्व्हरॅरिटी म्हणाले "आमच्या कायद्यांत सर्व हक्कांचें संरक्षण करण्याची तजवीज आहे. गांवच्या मालकांच्या वहिवाटींत हात घातलेला नाहीं. खाजगी जमिनीवरील झाडें तोडण्याचा हक्क नष्ट केलेला नाहीं. इनामदारांनीं आपआपल्या गांवची सर्व्हे वाटेल तर करावी असेंच ठरविलें आहे सर्व्हेचें काम जमिनीची मोज करण्याचें आहे. मालकीच्या पुराव्याशीं त्याचा संबंध येत नाहीं. जमिनीसंबंधें व दुसऱ्या हक्कांसंबंधें फिर्याद करण्याचे कामीं दिवाणी कायद्याचा अधिकार नष्ट केलेला नाहीं."

"या कायद्यानें जमिनीच्या मालकांची मालकी दृढ केलेली आहे. जमिनीची सुधारणा करण्यास पैसा खर्च करावा असें या कायद्यामुळें त्यांस वाटण्याचा संभव आहे. सर्व्हेनें उदारपणें ठरविलेल्या जमाबंदीचें काम लोकांपुढें २५ वर्षें आहे. व त्याचा फायदा लोकांस देण्याचा सरकारचा

विचार आहे. आपमतलबी लोकांच्या ओरडीस मान देऊन हा कायदा पसार करण्यास विलंब करणें ह्मणजे अतिशयोक्तीनें भरलेल्या भीतिकारक विधानांनीं रयतेमध्यें असंतोष उत्पन्न होऊं देण्याचें पाप शिरावर घेण्यासारखें आहे. तथापि आपलें ह्मणणें स्पष्टपणें सिलेक्ट कमिटीस समजून सांगण्याकरतां अर्जदार कामा व मंडलिक यांस संधि मिळावी ह्मणून सविस्तरपणें कायदा पसार करण्याचें काम पुढील बुधवारपर्यंत तहकूब ठेवावें, पण आज दुसरें वाचन पुरें व्हावें " असें सुचवून ना. मि. इन्व्हरॉरिटी खालीं बसले.

नंतर माधवराव विंचूरकर यांनीं इनामजमिनीच्या मोजणीसंबंधानें व लोकलफंडासंबंधें सुचना केल्यानंतर भावनगरचे दिवाण गौरीशंकर उदेशंकर यांनीं पाठवून दिलेल्या सुचना सभेस सादर केल्यानंतर गव्हर्नरसाहेबांनीं मि. कामा व रावसाहेब मंडलिक यांनीं पाठविलेला दुसरा अर्ज वाचून दाखविण्यास सेक्रेटरीस हुकूम केला. दुसऱ्या अर्जाचा संक्षिप्त मजकूर खालीं दिल्याप्रमाणें होताः-

" * * * हा कायदा करण्यांत फार घाई करण्यांत येत आहे व तीमुळें ज्यांचें नुकसान होणार आहे अशा हजारों जमिनीच्या मालकांच्या हरकती ऐकून घेण्याची त्यांस संधि देण्यांत येत नाहीं. "

" कायद्याच्या मसुद्याचीं भाषांतरें फक्त गेल्या महिन्याच्या २० व्या तारखेस प्रसिद्ध झाल्यामुळें लोकांच्या हातांत पडलीं न पडलीं तोंच त्यांस आपलें म्हणणें सरकारास कळवितां यावयाचें नाहीं.या कायद्याविरुद्ध फार महत्वाच्या हरकती घेण्यासारख्या आहेत त्याकरतां निदान ३ महिन्यांची मुदत द्यावी. लाखों रुपयांच्या किंमतीच्या वडिलार्जित जमिनीचे हक्कांस धोका आला असतां लोकांचें म्हणणें ऐकून घेणें जरूर आहे त्याकरितां मुदत द्यावी. "

नामदार गव्हर्नरसाहेब म्हणाले—"अर्जांतील मजकूर ऐकल्यावर सर्व्हेच्या चांगुलपणाविषयीं स्वतांच साक्ष दिल्याशिवाय दुसरें वाचन पुरें करतां

कामा नये." नंतर १८३५ सालापासून ( म्हणजे ज्या सालीं पहिल्यानें या प्रांतांत ते सरकारी जागेवर आले, ज्यासालीं पनवेलपासून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर गाड्या प्रथम दृष्टीस पडत नसत, एकादी पडली तर ती दगडी चाकाची, खताची गाडी, बैलांच्या जोड्यांच्या जोड्या लावल्या तरच ओढली जाईल इतकी जड असे व ज्या सालीं कापूस, धान्य वगैरे पदार्थांच्या अगणित जड गोण्या वहाणाऱ्या विंजाऱ्यांच्या सहस्रावधि बैलांच्या तांड्यांनीं रस्ता भरलेला असे, त्या सालापासून ) आज तागायत रयतेचा मनोरंजक इतिहास विदित करून नामदार गव्हर्नर साहेब म्हणाले—" रयतेस जमीन सुधारण्याची गोडी लागली आहे. दारिद्र्योदधीच्या तळाशीं बुडून राहिलेले लोक म्यां पाहिले आहेत. बेचिराख झालेलीं खेडींही पाहिलीं आहेत. जमा वसूल करण्यांत ताळ नसे. हलक्या अधिकाऱ्यांकडून जुलूम होत असे. वारंवार सूट द्यावी लागे. परंतु सर्व्हेच्या नेमस्त मागणीनें आतां हें मान फिरलें आहे. व बंगाल्यांतील जमीनदारांप्रमाणें लोक हे मध्यस्थ असल्यानें आपलें नुकसान होईल ह्मणून ओरड करीत आहेत हें साहाजिकच आहे; कारण रयतेचा फायदा ह्मणजे यांचा तोटाच आहे. तथापि खोतांना सर्व्हेचे फायदे कळून आले म्हणजे तेही अनुकूल होतील. आतांपर्यंत त्यांच्या प्रांतांत सर्व्हे नाहीं म्हणून ते भीत आहेत. सर्व्हे म्हणजे काय हें लोकांस माहित झालेलें आहे. घाई होत आहे ही तोहमत व्यर्थ आहे"

यानंतर कांहीं सभासदांचीं पुष्ट्यर्थ भाषणें झाल्यावर दुसरें वाचन समाप्त झालें. व अर्जदार कामा व रावसाहेब मंडलिक व विनायकराव भागवत यांस असें कळविण्यांत आलें कीं, येत्या २१ तारखेपर्यंत कायद्याच्या विरुद्ध कांहीं तक्रारी करणें असेल तर सिलेक्ट कमिटीपुढें सादर केल्यास ऐकण्यांत येतील ( १६-९-६४ )

एकविसाव्या तारखेस कमिटी भरली होती. जगन्नाथ शंकर-

शेट व प्रेमाभाई यांस आपलें म्हणणें समजून देण्यास रावसाहेब स्वतां पुण्यास गेले होते. २१ तारखेस रावसाहेबांनीं आपल्या वतीनें एक मि. कूपर नांवाचे बॅरिष्टर दिले होते. त्यांना कायद्याप्रमाणें कमीटीपुढें बोलण्याचा अधिकार आहे असें ठरल्यावर त्यांनीं भाषण केलें त्याचा सारांश:—"मेसर्स कामा व मंडलिक यांनीं मला नुकतेंच आपलें म्हणणें समजावून दिलें आहे, परंतु मला कायद्याच्या कलमांचा विचार करावयास वेळ मिळाला नाहीं; तथापि हा कायदा पहिल्या पायरीवरून वरपर्यंत घाईनें पळवित नेण्यांत आला आहे. ११ आगष्टला कायद्याचीं कलमें गॅझेटांत छापून प्रसिद्ध झालीं. सप्टंबरच्या आठव्या तारखेपर्यंत सिलेक्ट कमीटींत पसंत झालेल्या कलमांचें भाषांतर प्रसिद्ध झालें. पुष्कळ कलमांचें स्वरूप निःसंशयपणें इन्क्विझिटोरियल् आहे. ह्मणजे तीं रोमच्या धर्माधिकाऱ्यांच्या कडक शासनपद्धतीचीं जुलमी आहेत. अर्जदारांना तक्रारी ऐकवण्याचा हक्क आहे. त्यांना तशी संधि देण्यांत आली नाहीं. अर्जदारांनीं यापूर्वीं दोन अर्ज केलेच आहेत. शनवारच्या अर्जावर रविवारीं त्यांस जबाब आला कीं तुमचें ह्मणणें बुधवारीं ऐकण्यांत येईल. इतक्या अवधींत अर्जदारांस साक्षी पुरावा गोळा करणें शक्य नाहीं. त्यांचा पुरावा घेतल्यावर कलमें बदलावींच लागतील अशी माझी खात्री झालेली आहे." मि. कूपर यांनीं तिसरा अर्ज वाचून दाखविला. त्यांत पुराव्यासह कायद्यास हरकत घेण्यास ३ महिन्याची मुदत मागितली होती.

सर वुइल्यम मॅन्स्फील्ड म्हणाले "रयतेला चिथविण्याचा प्रयत्न अर्जदारांचा दिसतो. त्याला खरा उपाय म्हटला म्हणजे हा कायदा त्वरित पसार करून द्यावा हाच होय."

गव्हर्नर साहेब ह्मणाले:—"द्दश्य स्वरूपाच्या सकारण हरकती घेण्यासारख्या असत्या तर अर्जदारांनीं घेतल्या असत्या. गौरीशंकर उदेशंकर

भावनगरचे बुद्धिमान दिवाण यांना जर लांबून घेतां आल्या तर मि. कामा, मि. मंडलिक, यांस जवळून घेतां आल्याच असत्या. कामा हे येथें लोकप्रसिद्ध आहेत व विश्वनाथ नारायण मंडलिक हे तर उच्चतम शिक्षण मिळालेले गृहस्थ असे लोकांत नांवाजलेले आहेत. येथें असलेल्या कोणत्याही गृहस्थाप्रमाणें तें लिहिण्यांत व आपली बाजू समजावून सांगण्यांत तरबेज आहेत. कामा यांचा बिलाशीं संबंध कसा येतो हें त्यांस सांगतां येत नाहीं. पण वि. ना. मंडलिक हे जन्मतः खोत आहेत. पहावें तर अर्जावरून त्यांस कोणत्या हरकती कायद्यास घ्यावयाच्या आहेत तें स्पष्ट दिसत नाहीं. ”

“ स्वतः येऊन हरकती घेण्याची त्यांची सर्वतऱ्हेनें लायकी असतांना व कमिटीनें त्यांचें ह्मणणें नीट ऐकून घेतलें असतें असें असतांना स्वतः न येतां बॅरिष्टर मार्फत हजर रहातात व अशीलांचें ह्मणणें समजावून घ्यावयला मला मुदत पाहिजे एवढेंच त्याच्या तोंडून वदवतात. जर काहीं एवढें योग्य कारण मुदत देण्याला असतें तर मी तेव्हांच मुदत दिली असती परंतु तसें कारण नसतां इतका उपयोगी कायदा अमलांत येण्याचें लांबणीवर टाकावें असें मला वाटत नाहीं. ”

मग पुढें सभासदांत चर्चा सुरू झाली. यावेळेस डॉक्टर भाउदाजी, मंगळदास नथूभाई, व ६३ दुसरे यांचा अर्ज दाखल झालेला वाचून दाखविण्यांत आला. त्यांच्या मागण्या कामा व रावसाहेब मंडलिक व भागवत यांच्या प्रमाणेंच होत्या.

कामा व मंडलिक, कृष्णाजी विनायक, राहाटघरचे खोत यांचा तिसरा अर्ज वाचून दाखविण्यांत आला. त्यांत मुख्यतः असें लिहिलें होतें कीं आह्मीं कायदेपंडितांचा सल्ला घेतला आहे. त्यांत हा कायदा पास करण्यांत आला तरी तो अमलांत न येऊं देण्याचे कायदेशीर उपाय आहेत. तरी तसा प्रसंग येऊं नये म्हणून आधींच आमच्या हरकती

कळविण्यास अधिक मुदत द्यावी. मि. टी. सी. ऍन्स्टी व मि० हेलर या बॅरिस्टरद्वयाचें म्हणणें आमच्या वतीनें ऐकून घेण्याची मेहेरबानी करावी. ' आम्हीं असंतुष्ट जनांपैकीं आहोंत. अयोग्य हेतूनें या कायद्याविरुद्ध चळवळ आम्हीं करीत आहोंत;' इत्यादि जसें सभेंत आमचें वर्णन केलेलें आहे, तसे आम्हीं नसून आम्हीं पूर्ण राजभक्त प्रजाजन आहोंत ( २८।९।६४ )

अर्जदारांस पुढील अर्थाचें उत्तर मिळालें " तुम्हांस हरकती घेण्याची संधि दिली असतां तिचा फायदा घेण्यांत आला नाहीं. आतां जास्त सवलत देतां येत नाहीं. पाहिजे तर तिसरें वाचन चालू असतां लेखी हरकती पाठवून द्याव्या त्यांचा विचार होईल."

तिसऱ्यावाचनाकरतां सभा ८।१०।१८६४ रोजीं पुण्यांत भरली तेव्हां कामा व मंडलिक यांचा नवा हरकत अर्ज दाखल झाला. त्यांत वेळ देण्यांत आला नाहीं याबद्दल आश्चर्य प्रदर्शित करून मुख्य सात तक्रारी केलेल्या होत्या व त्यांचीं कारणें दिलेलीं होतीं. सोबत पुणे दरबारच्या व कंपनीसरकारच्या वेळेच्या जुन्या खोती सनदा दाखल केल्या होत्या. या अर्जांतील प्रत्येक हरकतीवर चर्चा होऊन कायद्याचें तिसरें वाचन पुरें होऊन कायदा वरील तारखेस पसार झाला.

बॅरिस्टर मि. कूपर यांनीं मुदत मागतांना भाषण केलें त्यांत ' पुरावा हजर करण्याकरितां ' असें न म्हणतां रानांतील जाळ्यांतून शिकार हुडकून काढतात त्याप्रमाणें पुरावा हुडकून काढण्याकरितां ( to hunt up ) हे इंग्रजी शब्द वापरले. मि. इन्व्हॅरॅरिटीनें त्याचा फायदा घेतला व अर्जावर शिंतोडे टाकून आमच्या अर्जाची अप्रतिष्ठा करण्याचा प्रयत्न केला अशी १९।९।१८६४ च्या रोजनिशींत रावसाहेबांची नोंद आहे.

या कामांत प्रसिद्ध बॅरिष्टर मि. ॲन्स्टी यांचें मत त्यांची फी देऊन रावसाहेबांनीं घेतलें होतें ( २२।९।१८६४ रो. उ ).

हा कायदा पसार झाल्यावर रावसाहेब स्वस्थ बसले नाहींत. पुढील अर्ज करण्याचें काम मि. हेलर म्हणून एक बॅरिस्टर होते, त्यांकडे दिलें होतें. परंतु त्यांच्यानें १५ दिवसांत तें झालें नाहीं. नुसती प्रस्तावना लिहून झाली होती. म्हणून तें काम रावसाहेबांनीं स्वतांच करण्याचा निश्चय केला व एका दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत व दुसऱ्या-दिवशीं दुपारपासून चार वाजेतों बसून पुरें केलें. ४।१२।१८६४ रो. उ.

या नव्या अर्जावर डॉ. भाऊ व कामाजी यांनीं सह्या केल्या होत्या. हा अर्ज गव्हर्नर जनरल यांकडे १७।१२।१८६४ रोजीं पाठविण्यांत आला.

या अर्जाचा जबाब आला तोः—अर्जदारांच्या सर्व हरकतींचा पूर्ण विचार केल्यावर गव्हर्नर जनरल यांस या कायद्यास संमति न देण्यास कांहीं एक कारण दिसत नाहीं. या कायद्यांतील मुख्य तत्त्वें व विशेषतः ३७।३८ कलमें (ज्यांस अर्जदार विशेष हरकत घेत आहेत तीं ) पूर्ण पसंत आहेत. असें ठरविल्यानें गव्हर्नर जनरल हे अर्जदारांचें मुळींच नुकसान करीत नसून इतर लोकांच्या हकाचें संरक्षण अवश्य म्हणून करीत आहेत.

रावसाहेबांची उमेद येथेंही खचली नाहीं. त्यांनीं आपलें मत एका ठिकाणीं पुढें दिल्याप्रमाणें प्रदर्शित केलें होतें "आम्हांला जें कांहीं पाहिजे आहे तें फक्त या दोन गोष्टी. ( १ ) सर्वत्र शांतता व ( २ ) धाऱ्याच्या पद्धतीस कायमपणा. यापैकीं पहिली आम्हांस लाधली आहे; परंतु दुसरीविषयीं म्हणाल तर मुंबईंतील कायदेकानू करणारे सरकारी मंत्री अशास्त्रसिद्ध मुशींत तिला घालून तिच्यावर प्रयोग करून पहात आहेत. तथापि ब्रिटिशराज्याची प्रजा या नात्यानें आम्हांलाही कांहीं सनदशीर उपाय लब्ध आहेत. म्हणून जर अशा आणीबाणीच्या वेळेस आपल्या हक्कांच्या संरक्षणार्थ आमचे लोक उभे राहाणार नाहींत,

व जरूर पडल्यास आरूढप्रताप सार्वभौममहाराज्ञीच्या पदांपुढें आपले प्रतिनिधी जर सादर ठेवणार नाहींत तर ही त्यांची वर्तणूक त्यांस लाजिरवाणी होईल. ” यानंतर गव्हर्नर जनरल यांच्या पुढची पायरी म्हणजे स्टेटसेक्रेटरी यांचेकडे पाठवावयाचा अर्ज, सिलोन येथील प्रसिद्ध बॅरिस्टर मुत्तुकुमारस्वामी मुदलियार यांच्या कडून तयार करविला. हे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. परंतु राजकारणांत पडण्याच्या पहिल्याच प्रसंगीं रावसाहेबांनीं केवढी चिकाटी दाखविली तें दिसून येत आहे. राजकीय कामें कशीं करावीं त्याचाही अनुभव त्यांस मिळाला तो लहान सहान नव्हता.

---

## प्रकरण २३ वें.

# बाम्बे असोशिएशन.

॥ सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः ॥
॥ अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः ॥ १ ॥
( रामायण )

थोड्या थोडक्यांत सुखासमाधानानें, अल्पसंतुष्टपणें, अगदीं कुरकूर केल्याशिवाय, कंटकपणानें राहणें, मग तें घरीं असो राजद्वारीं असो, ही संवय हिंदीलोकांची मूळपासूनची कोणा देवाच्या शापामुळें पैदा झाली होती तें कोणास अद्यापपर्यंत ठाऊक नाहीं. तिच्यामुळें ऐहिक सुखांत भर पडली नाहीं. राजकीय दृष्ट्या आलस्यानें हानि झाली.राष्ट्रांत जोम शिरला नाहीं. सार्वजनिक दुःखें नेहमीं ओरडल्याशिवाय सोसलीं जाऊं लागलीं. कारण काय, तर ह्मणे “तीं फार वेळ काढावयास नकोत! जरा प्रत्येकानें

थोडी थोडी गैरसोय सोसली झणजे झालें." पण राष्ट्र झणजे अशाच प्रत्येक व्यक्तीचें बनलेलें असल्यामुळें सारें हिंदी राष्ट्र सोसक झालें होतें. एकतंत्री राजसत्तेच्या वाढीला फार अनुकूल झालें होतें.

तथापि इंग्रजांनीं शिक्षण दिल्यापासून पाश्चात्य संस्थांच्या ज्ञानानें लोकांचा विदेहीपणा जरा डळमळूं लागला. सरकार हें सर्वज्ञ आहे. प्रजेला ज्या आधिव्याधींची बाधा होत असेल ती अंतर्ज्ञानानें जाणून तिचें निरसन सरकारनें आपण होऊन केलें पाहिजे ही जुनी कल्पना मागें पडूं लागली व सरकार झणजे एक कायद्यानें उभारलेली महारंभरचना-युक्त संस्था आहे. झणजे तिच्यांतील प्रत्येक राज्याधिकारी पुरुष कायद्यानें वागण्यास बांधलेला आहे व केलेले कायदे अनुल्लंघनीय आहेत. प्रजाजनांपैकीं कोणाची वाजवी तक्रार असेल तर अर्जद्वारा, सार्वजनिक संस्थांचे द्वारा, लोकमताचे मध्यस्थीनें दाद मागून घेणें त्याचें कर्तव्य आहे. तसें करण्याचा त्याचा हक्क आहे. ही विचारसरणी लोकांस सुचूं लागली. व ती जॉन् बुलला* पटण्यासारखी आहे. म्हणून तो वरील मार्गाचें अवलंबन केलें असतां अधिक उदार बनतो.

बंगाल्यामध्यें इंग्रजी विद्येचा प्रसार सर्वांत अगोदर झाला व त्यानें कायदेशीर राजकीय चळवळ तेथें लोकांत उत्पन्न करून आपला प्रभाव अगोदर दाखविला. १८५२ च्या सुमारास कलकत्ता येथें ईस्ट इन्डिया कंपनीच्या अमदानींतच ब्रिटिश इन्डियन असोशिएशन या नांवाची एक राजकीय संस्था स्थापन झाली व "गरीब परवर खुदावन्त जनाब साहेब, बन्दे गुलामकू जिस तऱ्हासे हुजूर फर्मावेगे उस तऱ्हासे बन्दा गुलाम हुकूम बजानेमें बिलकूल तय्यार है"ही दरबारी भाषा तेथील प्रजेच्या मुखीं खिळलेली होती ती बदलून गेली. एवढेंच नाहीं तर सरकारांत कायदे कानू होण्याचें घांटत असतां स्वस्थ बसून राहण्यांची व मागाहून कुरकूर

* हें इंग्लिश मनुष्याचें टोपण नांव आहे.

करीत बसण्याची चाल तेथील शिकलेल्या लोकांनीं स्वीकारली नाहीं. उलट मन मोकळें करून कायदे कानू करणाऱ्यांस भरपूर लोकहिताची उपयोगी माहिती देण्याच्या युरोपीयन लोकांच्या पद्धतीचा स्वीकार केला. वरील असोशिएशनचे प्रमुख चालक बाबू ख्रिस्तोदास पॉल हे होते. बंगाल्यांत "बन्दा गुलाम" प्रकृतीचे लोक पाहिल्यानें होते. तसे येथें नव्हते. परंतु येथें शाकवृत्तीचे लोक होते.हे स्वास्थ्याभिलाषी होते. रुजल्या ठिकाणींच हवा, पाणी, व अन्न यांच्या सेवनानें वृद्धि पावणें व कालान्तरानें आपली जाति पुढें चालण्याची व्यवस्था फलोदयानें झाली कीं शुष्क होऊन नष्ट होणें म्हणजे मृत्युवश होणें, हा या शाकवृत्तिलोकांचा जीवनक्रम होता. अशा मनुष्यांस रावसाहेब 'मानवी बटाटे' म्हणत. यांचें पीक रानोमाळ व कल्पनातीत होतें व अजूनही आहे. तथापि इंग्रजी शिक्षणाचा प्रसार इकडे बंगाला देशाच्या मागून झाल्यामुळें लोकांची शाकवृत्ति थोडी उशिरां कां होईना, पण नाहींशी होऊं लागली व बंगाल्यांतील लोकांचें अनुकरण करून बाम्बे असोशिएशन नांवाची संस्था मुंबईकरांनीं प्रथम काढली.

ही संस्था कंपनीचें राज्य असतांच १८५२ च्या सुमारास स्थापन झाली होती. तिचे अध्यक्ष जगन्नाथ शंकरशेट होते. व सन्माननीय चिटणीस डा.भाऊ होते. तिचीं ठराविक कामें मागें पुढें मिळून केव्हां तरी होत असत. १८६० सालच्या जानेवारी महिन्यांत विनायकराव जगन्नाथ शंकरशेट यांच्या बंगल्यावर व्यवस्थापक मंडळीनें आदरेखून तयार करून ठेवलेली चवथ्या, पांचव्या व सहाव्या वार्षिक सभेची हकीकत मंजूर करून घेण्याकारितां सभा भरली होती. अशी स्थिति लवकरच कां झाली? तर या सभेचें चालकत्व पुष्कळ अंशीं स्वार्थैकदक्ष मुंबईच्या व्यापाऱ्यांकडे होतें, कारण तेच त्यावेळेस मुंबईचे पुढारी होते, व अशा पुढाऱ्यांच्या यादींत "जी" "चंद," "भाई" व "दास"

या बहुमानवाचक प्रत्ययांनीं शोभलेलीं नांवेंच अधिक सांपडत. याचा परिणाम अथवा दुष्परिणाम एक असा झाला होता कीं जेव्हां व जवढ्या बाबतींत यांच्या खिशाला चट्टा बसे तेव्हांच व तेवढ्या बाबतींत हे चळवळ करीत. उदाहरणार्थ इनकमटॅक्स रद्द करण्याविषयींची चळवळ या सभेनें चांगली केली. यांत नवल नाहीं. कारण पैशाकरतांच हे व्यापारी जन्म पावतात व पैशाकरतांच जगतात व पैशाकरतांच मरण पावतात ! शेअरबझाराच्या सपाट्यांत या व्यापारीमंडळींचें डोकें ठिकाणावर नव्हतें. तेव्हां राजकीय चळवळ अगदीं मंदावून गेली होती. म्हणून एकंदर रयतेचीं गाऱ्हाणीं सरकाराच्या कानावर घालण्याच्या कामास खरा आरंभच झाला नव्हता. थोडा झाला होता तो टिकला नव्हता. कुळें अडाणी होतीं. मुंबईच्या बाहेर जमीनीच्या मालकांस सरकार म्हणजे काय याची खरी कल्पना नव्हती. नेहमीं दृष्टीस पडणारे कुलिफ, मामलेदार व कलेक्टर यांचे शिपाई व त्यांचे यजमान यांशिवाय त्यांस सरकार ठाऊक नव्हतें. कांहीं शिकलेले लोक होते—जे कूळ नव्हते, जमीनदार नव्हते, व्यापारी नव्हते—पण त्यांचें वजन कोठेंही नव्हतें. पोट त्यांच्या पाठीस लागलेलें होतें व ते पोटाच्या पाठीस लागलेले होते. हे नोकरींत शिरल्यावर वरिष्ठांच्या चेहऱ्यावरील हास्यावर यांचें टेबलापुढील जीवित अवलंबून होतें. मग खरी राजकीय चळवळ करणारा होता कोण ? याला उत्तर म्हणजे सह्याद्रीच्या भयाण दरींतून निघालेला अधिक भयाण प्रतिध्वनि "कोण" हा होता !

अशी बॉम्बे असोशिएशनची मोडकळीची स्थिति पाहून रावसाहेबांचे मनांत एक सुंदर विचार आला. नेटिव्ह ओपिनियन पत्र हें लोकशिक्षणाचें व लोकजागृतीचें काम करीत होतें. याच्या पुढें त्यांस राजकीय चळवळीला संघटित स्वरूप द्यावयाचें होतें. त्याला साधन वरील असोशिएशन सारखी संस्था त्यांस पाहिजे होती. ती आयतीच मिळाली. नवी संस्था

निर्माण करण्यापेक्षां जुनी मोडकळीस आलेली हातांत आल्यास तिचा जीर्णोद्धार केलेलाच बरा. देऊळ नवें बांधण्यापेक्षां ज्याच्या भींती ढांसळून गेल्या आहेत, ज्यांतील मूर्ति उछिन्न झाली आहे, अशा देउळाच्या भिंतींची डागडुजी करून आंत नव्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणें हेंच युक्तिसिद्ध व श्रेयस्कर आहे. देउळाच्या जुनेपणामुळें जो एक लोकांच्या मनांत त्याविषयींचा महिमा वसत असतो त्याचा फायदा उद्धारकास मिळतो, खर्च व श्रम कमी पडतात. बॉम्बे असोशिएशनकडे निरखून पाहिलें असतां रावसाहेबांस असें आढळलें कीं प्रथम सांगितल्याप्रमाणें गेल्या कित्येक वर्षांत वरील संस्थेच्या सभा बऱ्याच काळांत भरल्या नव्हत्या. तिच्या कामाकाजाची हकीकत काय आहे व तिचे हिशोब काय आहेत हेंही प्रसिद्ध झालें नव्हतें. अध्यक्षांची पूज्य मूर्ति विलुप्तजीवित होऊन सात महिने होऊन गेले होते. एकदां उपचार म्हणून हें दुःखकारक वृत्त ऐकून सर्व सार्वजनिक संस्थांनीं यथोचित शब्दांत दुःखोद्गारही काढले, तरी या संस्थेचे सभासद जागच्या जागीं थंडच राहिले होते व स्वकर्तृत्वाचा त्यांस पक्का विसर पडला होता. अशा परिस्थितींत तिचा जीर्णोद्धार करावा असा रावसाहेबांनीं विचार ठरविला.

रावसाहेब या सभेचे सभासद होऊन ४।५ महिने झाले होते. त्यांनीं सर्वसाधारण सभा भरण्याचा व्यक्तिशः प्रयत्न केला तो सफळ झाला नाहीं, हें पाहून उपाध्यक्ष व सर्व सभासद यांच्याकडे आपल्या सहीनें इंग्रजींत लिहिलेलीं छापील पत्रकें १९।६।६६ तारखेस वांटून आंतील मजकुराकडे तत्काळ लक्ष देण्याची त्यांस रावसाहेबांनीं विनंति केली. त्या पत्रकाचा सारांश असा होताः—

आपआपल्या हिताला जपण्याकरितां व्यापारी लोकांच्या, मळेवाल्यांच्या, ख्रिस्ती लोकांतील नाना पंथांच्या निरनिराळ्या नांवाच्या संस्था आहेत. पण आमच्या राणीसाहेबांच्या इतर प्रजेच्या नाहींत. म्हणून आमच्या

हक्कांचें संरक्षण होऊन आमची उन्नति होण्याकरितां असल्या संस्थांची अवश्यकता आहे.

एका काळीं असल्या संस्था ह्मणजे सरकाराशीं विरोध करणाऱ्या अतःएव राजद्रोही मंडळ्या आहेत असें समजण्याचा पुष्कळांचा संप्रदायच झाला होता. याच्याहून चुकीचा संप्रदाय अन्यत्र मिळावयाचा नाहीं. सदोष राज्यपद्धति व अज्ञानादि तम यांतून आमचा उद्धार करण्यास्तव परमेश्वरानेंच इंग्रजी अम्मल आमच्यावर चालू केला आहे, त्याबद्दल-काशीपासून रामेश्वरापर्यंत कोठेंही जां—वरच्यावरच्या सुशिक्षित लोकांत अहर्निश दुवा न देणारा एकही इसम मिळावयाचा नाहीं. परंतु सरकारच्या पद्धतींत सुधारणा घडवून आणण्या सारखें कांहीं उरलेंच नाहीं असें त्यावरून निष्पन्न होत नाहीं. खुद्द ब्रिटिश लोक इग्लंदांत काय करतात, व ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेच्या मुळाशीं काय सारभूत तत्त्व आहे, त्याचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं प्रत्येकानें आपआपलें म्हणणें सरकारापुढें स्पष्टपणें वेळेवर मांडलें पाहिजे व इंग्रज सरकाराचें राज्य वसाहतींवर सुयंत्र चालण्यास अशा संस्थांची अवश्यकता आहे. कलकत्त्यास या संस्थेच्या बहिणीनें सार्वजनिक कल्याणाच्या बाबतींत एका वर्षांत २३ निरनिराळ्या विषयांची चर्चा केली असें दिसून येईल. तीन इलाख्यांत तीन काउन्सिलांची स्थापना करून सरकारानें आम्हांस असें आह्वान केलें आहे कीं " लोकहो ! तुमच्या राज्यव्यवस्थेविषयीं तुमच्या इच्छा काय आहेत त्या आह्मांस कळवा. " मग या संस्थेसारख्या संस्थेनें पुढें येऊन मुंबईद्वीपाचें प्रतिनिधित्व पत्करून उदार भावनेनें प्रेरित झालेल्या हिंदुस्थानसरकारच्या या हांकेस " ओ " द्यावयास नको काय ?

या उज्ज्वल, स्पष्ट व उत्साहजनक प्रार्थनेचा उपयोग चांगला झाला. नवे सभासद करविण्याकरतां, वर्गणी जमविण्याकरतां जोराचा प्रयत्न

झाला. १४।१२।१८६७ रोजीं लोकांची सभा भरून बॉम्बे असोशिएशनचा जीर्णोद्धार करण्याचा ठराव झाला. व तो फार यशस्वी झाला. * तेव्हां सर मंगळदास नथूभाई यांस अध्यक्ष, नवरोजी फर्दुनजी यांस चिटणीस नेमण्यांत आलें. जवळ जवळ शंभर सभासद झाले. वार्षिक वर्गणीचा आंकडा ५००० पांच हजारांवर गेला. सभासदांत खालील मंडळींचीं नांवें झळकूं लागलीं.

सर जमशेटजी जीजीभाई, सन्माननीय अध्यक्ष; सर मंगळदास नथूभाई, अध्यक्ष; नवरोजी फर्दुनजी, चिटणीस; नवरोजी वाडिया; केशवजी नाईक; वरजीवनदास माधवदास; विनायक जगन्नाथ शंकरशेट; नारायण दिनानाथ; गोविंद गंगाधर शास्त्री; बाळ मंगेश वागळे; कावसजी जहांगीर; नसरवानजी एम्. पेटिट; अहंमदभाई हबीबभाई; मुरारजी गोकुळदास; ( सर ) दिनशा माणकजी पेटिट; लखमीदास खिमजी; वंद्रावनदास पुरुषोत्तमदास; सोराबजी फ्रामजी पटेल; रघुनाथ नारायण; के.आर. कामा, शान्ताराम नारायण; आत्माराम पाण्डुरंग; जनार्दन सखाराम गाडगीळ; विष्णु परशराम शास्त्री; रामचंद्र उदास; विश्वनाथ नारायण मंडलिक; नानाभाई हरिदास; खण्डेराव चिमणराव बेदरकर; वीरभद्र मदीवल्लाप्पा; दादोबा पाण्डुरंग; साजो कृष्ण धोंड; धोंडो शामराव गरुड; धिरजलाल मथुरादास; बाळाजी

* इतकें यश रावसाहेबांस येईल असें कित्येकांस वाटलें नव्हतें. या सभेची पहिली खालावलेली स्थिति त्यांनीं आपले मित्र शिरगांवकर यांस कळविली. तेव्हां त्यांनीं रावसाहेबांस लिहिलें. “ मुंबई असोशिएशन आतां गतप्राण झाली आहे असेंच म्हणावयाचें. तिचे दिवस करून मोकळे व्हा. व तिच्या जागीं एक नवीनच संस्था निर्माण करा. ” रावसाहेबांनीं जुन्या सभेसच १८६६ सालीं जी चेतना आणली, ती आणखी ३० वर्षें प्रेसिडेन्सी असोशिएशन निघे पर्यंत चांगल्या स्थितींत होती.

पाण्डुरंग; भाऊ दाजी; कमरुद्दीन तय्यबजी; सोराबजी शापूरजी बेंगाली; आर्देसर फ्रामजी मूस; बाबाजी काशिनाथ इ. सभासद वर्ग होता.

७।१।१८६८ रोजीं सर्व सभासदांची सभा भरून पुढील कामगिरी करण्यांत आली.

१ जनरल कमिटीची स्थापना.

२ नवे सभासद करण्याचा ठराव.

३ बॉम्बे असोशिएशनचा जीर्णोद्धार झाल्याचें वर्तमान सरकारास कळविण्याचा ठराव.

४ त्याच प्रमाणें कलकत्त्याच्या ब्रिटिश असोशिएशनला, मद्रासच्या नेटिव्ह असोशिएशनला, व लंदन येथील ईस्ट इन्डियन असोशिएशनला कळविण्याचा ठराव.

५ कान्हनेन्टेड सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश होईल अशा सवलती मिळविण्याकरितां स्टेट सेक्रेटरींस अर्ज करावयाचा ठराव.

या सभेचे सेक्रेटरी मि. नवरोजी फर्दुनजी हे फार हुशार व दक्ष होते. अर्जाचा मसुदा हे करीत व रावसाहेबांनीं पंसत केला म्हणजे तो पुढें जाई. " होतां होईतों कडक भाषा अर्जांत टाळतां येईल तेवढी टाळावी " अशी साधारण सुचना नवरोजी यांस एका पत्रांत रावसाहेबांनीं करून ठेविली होती.

बाहेरगांवच्या वकीलांचीं नांवें रावसाहेबांपासून मि. फर्दुनजी यांनीं मागून घेऊन आपल्या संस्थेचे सभासद वाढविण्याची पुष्कळ खटपट केली.

सार्वजनिक कल्याणाचा जो प्रश्न निघेल त्यासंबंधें लोकांचें म्हणणें काय आहे तें सरकारास कळविण्यांत सभेनें केव्हांही दिरंगाई केली नाहीं. नवीन व्यवस्था झाल्यापासून खालील विषय १८६९ पर्यंत सभेपुढें विचारास आले होते.

१ कापसाची विक्री करतांना वाईट कापसाची चांगल्या कापसांत ओक भेसळ करीत. त्याच्या प्रतिबंधार्थ सरकारनें तयार केलेला एक कायद्याचा मसुदा.

२ महाराणी साहेबांचे द्वितीय चिरंजीव ड्यक आफ् एडिन्बरो यांस मानपत्र देण्याचा ठराव.

३ सक्तीनें देवी काढण्याची इष्टता.

४ बोरघांटांत जी. आय. पी. रेल्वे लाईनीवर मोठा अपघात होऊन मोठी प्राणहानि झाली म्हणून उघड्या पडलेल्या मृतांच्या आप्तांस कांहीं साहाय्य करण्यास सरकारास विनंति करावी याविषयीं रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं सभेस लिहिलेल्या पत्राचा विचार.

५ लोकलफंडाचा विनियोग सार्वजनिक कामाकडे करण्याकरतां तालुका कमिटींतील व जिल्हा कमिटींतील सभासद कमिशनरकडून नेमिले जात असत ते तसें न करतां जमिनीच्या मालकांस निवडणूक करण्याचा अधिकार देण्याविषयीं सरकारास अर्ज करावा अशी सुचना सदरहू गृहस्थांनीं केली होती तिचा विचार.

पुढील दोन महत्त्वाचे विषय १८७२ मध्यें सभेपुढें होते.

१ फौजदारी कायद्याचें काम चालविण्याच्या कायद्याचा विचार.

२ मि. फासेट साहेबांस पार्लमेंत सभेंत निवडून देणाऱ्या विलायतच्या मतदारांस उद्देशून लिहिलेलें गौरवाचें पत्र.

एकदां पार्लमेंत सभेनें एक हिंदुस्थानच्या व्यवस्थेसंबंधें तपास करण्याकरितां एक कमिटी नेमली होती, रावसाहेबांनीं साक्ष देण्यास जावें असें प्रथम घांटत होतें. “ परंतु मी जाऊं शकत नाहीं ” असें त्यांनीं मि. फर्दुनजी यांस कळविलें. परंतु कमिटीला विश्वसनीय माहिती मिळवून ती पुरवावयाचें काम असोशिएशननें अंगावर घेतलें होतें. या सभेच्या कांहीं सभासदांची एक कमिटी या सभेनें नेमली होती तींत रावसाहेब

होते. विविधप्रश्नांविषयीं माहिती जागोजागच्या आपल्या सहकारी मित्रांस पत्रें पाठवून रावसाहेबांनीं मागविली होती. ज्या विषयांवर माहिती मागविली होती त्यांचा संक्षेपतः उल्लेख खालीं दिला आहे.

१ जमिनीवरील सारा माफक व युक्त आहे कीं जड व प्रमाणातिशयित आहे? तसा असेल तर कोणत्या जिल्ह्यांत? उदाहरणें द्या.

२ सरकारच्या मागण्या पुरवून जमिनीच्या मालकास अथवा जमीन कसणाऱ्यास लागवडीचा खर्च वजा जातां कांहीं शिल्लक उरत्ये काय? ती मालकाच्या अथवा कसणाऱ्याच्या गरजा पुरवूं शकते काय?

३ सरकारी साऱ्याचें प्रमाण जमिनीच्या एकंदर उत्पन्नाशीं व खर्च वजा जातां होणाऱ्या निव्वळ फायद्याशीं काय आहे? एकंदर उत्पन्नाचा केवढा भाग सारा भरण्याकडे जातो?

४ साऱ्याशिवाय आणखी करांचा भार जमीनीवर पडतो काय? व तो गैरकायदा आहे काय?

५ ३० वर्षांची मुदत संपल्यावर साऱ्यामध्यें वाढ झाली तीविषयीं विशेष माहिती काय आहे? शेतकीच्या उत्पन्नाच्या व मजरीच्या वाढीचें जें प्रमाण आहे त्या मानानेंच साऱ्याची वाढ झाली आहे कीं अधिक आहे?

६ १०।२० वर्षांपूर्वीं धान्याचे व मजुरीचे दर काय होते?

७ शेतकरी वर्गाची व मजूर वर्गाची हल्लींची स्थिति काय आहे? व दहा वर्षांपूर्वीं कशी होती? हल्लींच्या काळीं शेतकऱ्यास व मजुरास निरामय निर्वाह करण्यास खर्च काय येतो? व दहा वीस वर्षांपूर्वीं किति येत असे?

८ हल्लीं जमिनीचा बाजार भाव काय आहे?

९ तीस वर्षां पुरत्या ठरविलेल्या साऱ्याच्या पद्धतीपासून शेतकऱ्यांचा फायदा काय झाला व तो कोणत्या जिल्ह्यांत? किती जमिनीच्या

मालकांनीं आपल्या जमिनी सावकारांकडे गहाण टाकिल्या आहेत किंवा इतरांस विकल्या आहेत ? अथवा गेल्या दहा वीस वर्षांत गहाण टाकलेल्या होत्या त्या कितिकांनी सोडविल्या आहेत ? सारा वसूल होण्याकरितां उभ्या पिकांच्या जप्त्या व जमिनींचीं लिलावें वारंवार केलीं काय ? सारा थकण्याची कारणें काय ? त्यांचा परिणाम काय ? अशी बाकी कोणत्या जिल्ह्यांत किती थकलेली आहे ? थकलेल्या बाकीवर सरकार व्याजाचा दर भारी ठेवतें काय ? साऱ्याची माफी सरकारनें कितिवेळां दिली आहे ? व ते देण्याचे प्रसंग कोणते ? लोकांना मदत करण्यास सरकारानें कामें कधीं कधीं काढलीं ?

१० कायम धाऱ्याच्या पद्धतीचे व मुदतीच्या पद्धतीचे नफे तोटे तुलनात्मक दृष्टीनें काय आहेत ? प्रत्येकीपासून जे नफे आहे ते होतील व तोटे आहेत ते टाळतां येतील अशी कांहीं धाऱ्याची पद्धति तुम्हीं सुचवुं शकाल काय ?

११ धान्याचे भाव वाढण्याचीं कारणें काय ?

१२ सारा वसूल करण्याकरितां जीं खातीं सरकारनें ठेविलीं आहेत त्यांचा खर्च जबर आहे कीं माफक आहे ? त्यांत काटकसर होणें शक्य आहे काय ? सारा वसूलीचें खातें व मामलेदारीचें फौजदारी खातें यांची फारकत होणें इष्ट आहे काय ?

१३ एका जिल्ह्यांतील विशिष्ट कामाकरितां उभारलेला लोकलफंड दुसऱ्या जिल्ह्यांत खर्च झाल्याची किंवा दुसऱ्याच कामाला लावल्याचीं उदाहरणें असतील तर द्या.

१४ रेव्हिन्यू व पोलीस या खात्यांतील लोकांनीं जुलूम केल्याचीं उदाहरणें असतील तर द्या.

१५ गाड्या व मजूर वेठीला धरितात त्यांची माहिती द्या. रेव्हिन्यू कामगार व पोलीस कामगार दौऱ्यावर गेले म्हणजे उद्मी लोकांस

बरोबर दुकान ठेवावयास लावतात कीं काय ? वेठीच्या गाड्यांबद्दल मजुरीबद्दल व उद्मी लोकांस दर कसा देतात ? त्यांचें नुकसान काय काय होतें ? अशी वेठ सरकारनें बंद केली आहे काय ? व बंदीचे हुकूम मानले जातात कीं मोडिले जातात ?

१६ हिंदुस्थान सरकारच्या, स्थानिक व म्युनिसिपल करांचा बोजा लोकांवर कसा पडतो ? तो कोणत्या वर्गांतील लोकांस जाचक होतो ? प्राप्तीचा कर व इतर कर यांच्या वसूलाच्या कामांत जुलूम झाल्याचीं असतील तर उदाहरणें द्या. स्टॅांपाचे दर वाढल्यामुळें फिर्यादींत दाद न मिळाल्याचीं उदाहरणें द्या.

१७ खालीं दिलेल्या खात्यांत निरर्थक होणाऱ्या उधळपट्टीचीं उदाहरणें द्या.

| | |
|---|---|
| सार्वजनिक खातें. | वैद्यक खातें. |
| न्याय खातें. | जंगल खातें. |
| रेव्हिन्यू खातें. | नोंदणी खातें. |
| मीठ अफू व कस्टमचीं खातीं. | शाळा खातें. |
| | लोकलफंड खातें. |
| पोलीस खातें. | सैन्य खातें. |
| तुरुंग खातें. | व साधारण खातें. |

१८ कांहीं उगीच कामाशिवाय व पगारखाऊ लोक ज्यांवर विनाकारण नेमले जातात अशा कांहीं मोठ्या पगाराच्या जागा आहेत किंवा काय ? सरकारीकामाच्या चोखपणांत कमीपणा न आणतां कोणता खर्च कमी करतां येईल.

१९ लोकांवर कांहीं जुलूम होतो काय ? कांहीं त्रास त्यांस पोंचतो काय ? असेल तर लोकांत असलेल्या असंतोषाचें वर्णन करा.

२० युरोपियन लोकांनीं हिंदीलोकांस वाईट रितीनें वागविल्याचीं उदाहरणें असतील तर द्या.

२१ बागाईत, कालव्याच्या पाण्यानें भिजलेल्या जिराईत जमिनीवर दर बिघ्यास कमाल व किमान सारा काय आहे ?

२२ ऊंस, भाज्या, भात, कापूस, गहूं, ज्वारी, बाजरी, हरभरा इत्यादि पिकांस दर बिघ्यास काय खर्च येतो ? व या उत्पन्नाला मणीं दर काय येतो ?

२३ रयतेच्या कुटुंबाला जे श्रम करावे लागतात त्याच्या मजुरीशिवाय दर बिघ्याला आणखी खर्च काय येतो ?

२४ दर बिघ्याला सारा देऊन निवळ फायदा काय होतो ?

२५ दर शेतकऱ्याला व मजुराला खाण्यापिण्याचा व कपड्यालत्त्याचा खर्च काय येतो ?

२६ शेतकरी व मजूर लोकांची स्थिति काय आहे ?

२७ मजुरीचे दर काय आहेत ?

२८ शेतकीच्या उत्पन्नाचे ( कापूस, गूळ, गहूं, ज्वारी, हरभरे इत्यादींचें ) मणीं दर काय आहेत ? इ. ही प्रश्नांची यादी लांब रुंद आहे त्यांची उत्तरें देण्यास विचारही खोल करावा लागला असेल. "यांची समर्पक उत्तरें साधार देणारे किति आहेत! मेंढ्यांच्या कळपांत उच्च स्वरांत जितका गोंगाट होतो तीतकी लोंकर पिकत नाहीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आमच्यामध्यें दुही आहे, नाहीं तर या काटकसरीच्या कमिटीमुळें हिंदुस्थानदेश हिमाचलापासून सेतुबन्ध रामेश्वरापर्यंत खडबडून जागा झाला पाहिजे होता." असें रावसाहेबांनीं मि. आर. डी. मेथा" (कलकत्त्याचे व्यापारी मित्र ) यांस पत्र लिहिलें होतें.

याप्रमाणें बाम्बे असोशिएशननें एकंदर कामगिरी केली ती समग्र वर्णन करणें म्हणजे तिचा निराळाच इतिहास लिहावा लागेल. म्हणून

ती कोणत्या प्रकारची होती एवढें दाखविण्याकरतां वरील संक्षिप्त हकीकत दिली आहे.

या सभेची उत्तरोत्तर भरभराटच होत गेली. १८७५ सालीं रावसाहेब व्हाईस प्रेसिडेन्ट झाले होते. व व्यवस्थापक कमिटींत ना. रोगे; लखमीदास खिमजी; मुरारजी गोकुळदास; दादाभाई नवरोजी; बाळाजी पाण्डुरंग; रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर; डा. आत्माराम पाण्डुरंग; रा. वि. माडगांवकर; काशिनाथ त्रिंबक तेलंग; बाळ मंगेश वागळे; धिरजलाल मथुरादास; नवरोजी फर्दुनजी असे होते. याहून अधिक चांगली मंडळी निवडतां आली नसती.

१८७६ मध्यें ( सर ) दिनशा पेटिट यांस प्रेसिडेन्ट नेमिलें होतें व यशवंत वासुदेव आठल्ये व आर्देसर फ्रामजी मूस यांस सेक्रेटरी नेमिलें होतें.

या सभेंत बाम्बे असोशिएशनचे मुख्य चालक रावसाहेब, नवरोजी फर्दुनजी व सोराबजी शापुरजी बेंगाली हे होते. व ते सर्व कर्तृत्ववान पुरुष होते. त्यांचें अन्तेवासित्व पतकरून या सभेंत मागाहून शिरलेली तरुण मंडळी विशेषेंकरून(सर)फिरोझशहा मेथा;(न्या.) काशिनाथ त्रिंबक तेलंग व (न्या.) बद्रुद्दीन तय्यबजी, तरबेज झाली. शिवाय ते स्वयंप्रकाश असल्यामुळें या संस्थेंत राहून रावसाहेबांनीं आंखून दिलेल्या कक्षेंत उपग्रहाप्रमाणें फिरत राहणें त्यांस पतकरलें नसावें. शिवाय तरुण मंडळीचे विचार वृद्धमंडळीच्या विचारांशीं जुळते राहणें सदोदित शक्य नाहीं. म्हणून “ वृद्धास्ते न विचारणीयचारिताः ” या वाक्यांतलें वारें त्यांच्या डोक्यांत शिरलें असेंच नसलें तरी स्वतंत्र रीतीनें देशसेवा करण्याचें या मंडळीनें मनांत घेतलें. यावेळेस विचारांची प्रौढी व परिपक्वता, मनाचा धृतिमान उत्साह, आजन्म कार्यासक्ति, स्वहितनिरपेक्षता इ० गुणपरंपरेच्या योगानें रावसाहेबांस अग्रपद प्राप्त झालें होतें. कोणतीही चळवळ कोणी करण्याचें योजिलें

तरी रावसाहेबांचा सल्ला घ्यावा लागे. त्यांस त्यांच्या अनुगांचा पूर्ण पाठिंबा होता. कोणत्याही कार्यास द्रव्य लागल्यास अवश्य तेवढें द्रव्य मिळविण्यास जशी कांहीं यक्षिणीची कांडीच त्यांजवळ होती अशी त्यांची कर्तृत्व शक्ति पुष्कळ होती. लोकांत व सरकारांत त्यांचें वजन होतें. त्यांच्या तंत्रानें वागणें सोयीचें व श्रेयस्कर होतें, म्हणून सर्व कारभार एक तंत्री रावसाहेबांच्या हातीं होता. व तेथपर्यंत या सभेंत राहिल्यानें नवीन तरुण मंडळीचें तेज यांच्या पुढें स्वतंत्रपणें पडणें शक्य नव्हतें. ही अनन्यसाधारण सत्ता यांच्या हातांतून हिसकावून घेण्याचें कांहीं मंडळीच्या मनांत आलें. असें रावसाहेबांच्या बापूसाहेब आठल्ये यांस लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसतें. " मीं स्वतां कानानें ऐकिलें नाहीं. परंतु अशी लोकवार्ता आहे कीं कांहींची तरी मुख्य तक्रार अशी आहे कीं मीं सर्व सत्ता बळकावून बसलों आहे. एतदर्थ मला बाहेर काढून लाविलें पाहिजे! कशाच्या बाहेर तें परमेश्वरालाच ठाऊक ! गेल्या शनिवारींच एका मित्राला जें सांगितलें त्याप्रमाणें हें जग एवढें मोठें आहे कीं त्यांत सहस्रावधि अ, ब, क, इ० मनुष्यांचा समावेश होईल. मनुष्यानें आपल्या आयुष्यक्रमांत व्यर्थ उक्तीपेक्षां कृति करून दाखविली पाहिजे. "

" असो. माझें काम येथें उत्तम चाललें आहे. सहावर्षांपूर्वीं तुमच्या मित्राच्या बहुतेक आकांक्षा एका पुण्यपावन प्रसंगीं अग्नींत भस्म झाल्या होत्या. तथापि अश्रांतपणें काम करण्याची शक्ति जी परमेश्वरानें त्यास देणगी म्हणून दिली आहे तिचा उपयोग करून घेण्याच्या सामर्थ्यांत अद्यापि कांहीं न्यून नाहीं हें मोठें गूढ आहे" (२-३-१८८६). या विषयींचा इशारा कांहीं वर्षांमागें नवरोजी फर्दुनजींनीं रावसाहेबांस दिला होता. त्याप्रमाणें या नवीन मंडळीनें एक नवी राजकीय संस्था मुंबई प्रेसिडेन्सी असोशिएशन नांवाची काढली. तिचे सेक्रेटरी मि० फिरोझशहा मेथा नामदार काशिनाथ त्रिंबक तेलंग व मि० दिनशा वाच्छा असे होते.

उद्देशपत्रकांतील नवीन सभा स्थापण्याचे हेतू जुन्या सभेच्या हेतूहून भिन्न नव्हते. हिंदुस्थान देशाचें हित हिंदी लोकांचा पक्ष उचलून धरून सनदशीर रीतीनें करणें हा मुख्य हेतु होता. असें असतां "विषवृक्षमपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्" या कालिदासोक्तीकडे यांचें लक्ष्य कसें गेलें नाहीं कोणाला ठाऊक ?

हा प्रकार इष्ट झाला कीं अनिष्ट झाला हें सांगतां येणें कठीण आहे. रावसाहेबांच्या करण्यास सरकारांत मान असे तो या नव्या मंडळीकडे पूर्ण किंवा अपूर्णपणें गेला नसावा असें पुढील उदाहरणावरून सिद्ध होत आहे. व तेवढें उदाहरण देऊन हें प्रकरण पुरें करण्यांत येत आहे.

नवी सभा स्थापन झाल्यावर एकदां इंग्लंदमध्यें पार्लमेंत सभेच्या सभासदांची पुन्हा निवडणूक व्हावयाचा प्रसंग आला. तेव्हां मि. फासेट व मि. जान ब्राईट हे उमेदवार उभे राहिले होते. यांस हिंदुस्थानाचे मित्र असें गणिलें जात असे. त्यांच्या बरोबर, हिंदुस्थानांत कांहीं दिवस काढून तिकडे परत गेलेले असे दुसरे इंग्रज गृहस्थ उमेदवार उभे राहिले होते. यांचा प्रवेश पार्लमेंत सभेंत झाल्यावर मि. फॉसेट व मि. ब्राईट हे जें हिंदुस्थानाच्यातर्फें बोलतील त्याच्या विरुद्ध हे दुसरे उमेदवार बोलतील, अशी भीति प्रेसिडेन्सी असोशिएशनच्या चालकांस पडली, कारण इकडून गेलेले गृहस्थ ह्मणणार आम्हीं खुद्द हिंदुस्थानांत राहिलेले डोळस गृहस्थ, प्रत्यक्ष तेथील स्थिति पाहून आलेले, तेव्हां आमचें ह्मणणें खरें का हिंदुस्थान न पाहिलेले मि. फासेटसारख्या आंधळ्या लोकांचें ह्मणणें खरें ?" ह्मणून फलाणे फलाणे गृहस्थ आमचें हित करतील व फलाणे फलाणे करणार नाहींत व ते आमचे प्रतिनिधी नव्हत इ० ठराव करून तो इग्लंदच्या मतदारांकडे पाठविण्याचें प्रेसिडेन्सी असोशिएशनच्या चालकांनीं ठरविलें. अखिल मुंबई इलाख्याच्या नांवानें चळवळ करावयास निघालेल्या या सभेच्या तीन चालकांच्या मतास लंदन

येथील हुर्ली स्ट्रीट निवासी ( सर्व इग्लंद देशाच्या नांवानें चळवळ करणाऱ्या ) तीन शिंप्यांच्या मतापेक्षां एकंदरींत पुष्कळ अधिक मान होता. तरी रावसाहेबांच्या मतास जेवढा मान होता तितका नव्हता हें वरील राजकीय " सूचिकर्मकुशल " गृहस्थांसही पटलें असावें. हा ठराव पुढें आणण्यास त्या सभेच्या चिटणिसांनीं रावसाहेबांस विनंति केली, ती रावसाहेबांस मान्य झाली नाहीं. असल्या ठरावांत रावसाहेबांचें अंग पाहिजे हें जन्मतः म्हणजे हिंदुस्थानावर पाय ठेवल्या दिवसापासून हिंदी लोकांच्या आकांक्षांविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या एका प्रसिद्ध इंग्रज गृहस्थाच्या ध्यानांत येऊन त्यांनीं रावसाहेबांस—विशेषतः ते मुंबईंत या वेळेस हजर असतां—गळ घालण्याकरतां एक पत्र लिहिलें. त्यास पुढील उत्तर रावसाहेबांनीं दिलें. " प्रेसिडेन्सी असोशिएशनपुढें येणाऱ्या ठरावाविषयीं मीं सोत्कण्ठपणें मन लावून विचार केला, परंतु तो ठराव हातीं घेण्याचा कांहीं मार्ग मला दिसत नाहीं, झणून वाईट वाटतें. मी त्या सभेच्या चिटणिसांस लिहून कळविलें तसेंच तुम्हांस कळवितों कीं माझ्या मतानें असा ठराव आणला असतां आम्हीं जें कार्य ब्रिटिश जनतेस, तिच्या उदार वृत्तीवर भिस्त ठेऊन, करण्यास सानुनय विनंति करणार आहोंत त्याचा बिघाड होईल. हा ठराव मीच आणावयाचा म्हणजे यथोचित भाषण करून तो आणला पाहिजे. तितकी तयारी करण्यास मला सवड नाहीं. " ( २९।९।८५ )

## प्रकरण २४ सावें.

# " ईस्ट इंडिया असोशिएशन "

Sporting the lion ramped and in his paws
Dandled the kid.

( मिल्टनकृत पॅरॅडाइस लॉस्ट )

**सिंहः पश्चिमपादयोर्मधुवने लीलापरः संस्थितः ।**
**दत्त्वा तस्य करे स्वयं निजशिरः क्रीडत्यजायाः शिशुः॥**

( वरील इंग्रजी ओळींचें भाषांतर स्वकृत )

ईस्ट इंडिया असोशिएशन या नांवाची ही संस्था दादाभाई नवरोजी यांनीं लंडनमध्यें १८६६ सालीं स्थापिली. तिची वार्षिक वर्गणी १ पौंड ( १० रु. ) होती. तिचे अध्यक्ष लॉर्ड लेव्हाडिन हे होते. शिवाय दुसरे बरेचसे लार्ड लोक, नाइट पदवी धारण करणारे वजनदार इंग्रज लोक व पार्लमेन्त सभेचे १५ सभासद, कर्नल व कॅप्टन झालेले मोठ्या पदवीचे इंग्रज लोक तिचे सभासद होते. त्यांमध्यें कर्नल साइक्स् ए. पी, मि. जान् डिकिन्सन्, मेजर इव्हॅन्स् बेल, मि. दादाभाई नवरोजी, मि. फिरोजशहा मेथा, मि. राबर्ट नाइट, मि. उमेशचंद्र बानर्जी, मि. मनमोहन घोस, मि. नवरोजी फर्दुनजी व बरेच जनरल जेकबसारखे हिंदी लोकांचे इंग्रज मित्र होते. सभेचे नियम व तेथें झालेलीं कांहीं कांहीं भाषणें हीं दादाभाईनीं रावसाहेबांकडे पाठवून दिलीं व पश्चिम हिंदुस्थानांतून त्या सभेला सभासद मिळवून देण्याविषयीं दादाभाईनीं रावसाहेबांस

विनंति केली. तेव्हां रावसाहेबांनीं तें काम चालू केलें. या सभेचे पुष्कळ सभासद झाले, त्यांपैकीं कांहीं खालीं दिले आहेत.

भावनगरचे ठाकूरसाहेब, मोर्वीचे ठाकूरसाहेब, सय्यद अहमदखान, वि. ना. मंडलिक, डा. भाऊ, मंगलदास नथुभाई, गोपाळराव हरी देशमुख, बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद, जनार्दन सखाराम गाडगीळ, वासुदेव जगन्नाथ कीर्तीकर, धोंडो शामराव गरुड, भास्कर हरी भागवत, जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक, कर्सनदास माधवदास, छबिलदास लल्लुभाई, लक्ष्मीदास खिमजी, करसनदास मूळजी, धीरजलाल मथुरादास, नानाभाई हरिदास, शान्ताराम नारायण, खण्डेराव बेदरकर, विष्णु परशराम शास्त्री इ. इ. २५० सभासद झाले होते.

काठेवाडांतील एका संस्थानिकानें ५० हजारांची देणगी दिली होती. तिचें व्याज या सभेच्या खर्चाकडे लावावयाचें होतें. इतर संस्थानिकांची मदत मिळाली होती.

इंग्लंदमध्यें एक लंदन " इंडियन असोशिएशन " म्हणून एक लहानशी हिंदी लोकांची संस्था होती. तिला काम करणारे उत्साही लोक मिळतनासे होऊन ती अगदीं निर्जीव झाली होती, स्वतंत्रपणें आपल्या पायांवर तिला उभें राहतां येईना असें झालें. ती दादाभाईंनीं या नव्या सभेस जोडून टाकिली. ब्रिटिशजनतेला हिंदुस्थान देशाविषयीं चांगली व विश्वसनीय माहिती नसते ती करून देणें, व इंग्लंद व हिंदुस्थान यांचा एक जीव करणें हा या सभेचा मुख्य हेतु होता.

हा हेतु सत्यनिष्ठा व देशाभिमान या गुणांनीं साध्य करावयाचा होता. पहिल्या सभेंत खालील विषयांवर दादाभाईंनीं स्वतः एक निबंध वाचला. ( १ ) हिंदुस्थानावर ब्रिटिशांचा अम्मल चालू आहे त्यानें परस्परांचें हित होत आहे किंवा नाहीं ? ( २ ) असेल तर ब्रिटन व हिंदुस्थान यांचा

संयोग शक्य तितका चिरस्थायी होण्यास उत्तम उपाय कोणते ? ( ३ ) व त्यांची योजना होत आहे किंवा नाहीं. ?

या भाषणांत दादाभाईच्या नीतीचें स्वरूप स्पष्ट रेखाटलेलें आहे.

" माझ्या देशबांधवांनीं उत्साह, सतत परिश्रम, स्वाभिमान व स्वार्थत्याग बाळगून उद्योग करावा. व कायदा व राज्यव्यवस्था यांचें उत्क्रमण होणार नाहीं अशी काळजी घेऊन देशकार्यास लागावें " अशी हिंदीजनांस त्यांनीं प्रार्थना केली.

जेकबसाहेबांनीं दादाभाईविषयीं (३–११–६७ च्या) एका पत्रांत असें मत दिलें. " नवरोजी हा चांगला व्यवहारनिपुण, परिपक्व, व सूक्ष्मबुद्धीचा पुरुष दिसतो. " जेकब साहेब हवे त्याची तारीफ करीत नसत. त्याच पत्रीं त्यांनीं दुसऱ्या एका हिन्दी गृहस्थाविषयीं लिहिलें " क्ष हा हुषार आहे, पण त्याचें डोकें चुकीच्या कल्पनांनीं घेरलेलें आहे. प्रजासत्ताकवाद्यांच्या म्हणींचें व विचारांचें बरेंच अध्ययन त्यानें केलेलें आहे. पण हिंदुस्थानाविषयीं आह्मांला माहिती सांगत असतां त्याच देशाविषयीं स्वतःचें अज्ञान प्रकट करीत आहे. तेणेंकरून येथील लोकांचा गैरसमज होईल.भलत्याच मागण्या करून त्याचे हातून अपाय होण्याचा संभव आहे."

प्रचलित हिंदीप्रश्नांवर माहितीनें भरलेले व सुशिक्षित हिंदी लोकांचीं त्यांवरील मतें प्रदर्शन करणारे निबंध या सभेपुढें वाचण्यास निरनिराळ्या लोकांकडून दादाभाईनीं मागविले होते. व रावसाहेबही त्या तयारीला लागले होते. व हिन्दीलोकांनीं लिहिलेल्या निबंधावरून त्यांची खरी योग्यता दिसून येत आहे असे उद्गार दादाभाईनीं १७।८।६७ च्या पत्रांत काढिले होते.

१८६७ सालीं सेक्रेटरी ऑफ स्टेट या संस्थेचे पेट्रन झाले. याचसालीं ही सभा भरवून आपला आवडता विषय, म्हणजे सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत व इंग्लंडांत दोहों ठिकाणीं भरवावी या विषयींचा ठराव

दादाभाईनीं सभेपुढें मांडिला. तो सारांशरूपानें असा होता. " प्रसिद्ध मोंगल बादशहा अकबर यानें उदारनीतीचा अंगिकार करून हिंदी बुद्धिमत्तेचें साहाय्य घेऊन हिंदी लोकांचें हित तेंच आपलें हित असें मानून राज्यकारभार हांकता झाला व आपलें महत्व स्थापन करून गेला. तद्वतच+ सिव्हिल सर्व्हिस दोहों ठिकाणीं भरून राज्यकारभारांत बुद्धिवान व लायक हिन्दी लोकांचा प्रवेश व्हावा म्हणून अर्जद्वारा ब्रिटिश सरकारास विनंति करण्याकरतां काय व्यवस्था करावी तें ठरविण्याकरितां एक कमिटी नेमावी " हा ठराव सभेंत पास झाला.

१८६९ च्या मे महिन्याच्या २३ व्या तारखेस मुंबईस फ्रामजी कावसजी हॉलमधें ईष्ट इंडिया असोसिएशनची शाखा मुंबईस काढण्याकरतां मुंबईकरांची सभा भरली होती. त्या सभेस पुष्कळ हिंदी व कांहीं इंग्रज हजर होते. मुख्य वक्ते मि. दादाभाई होते. तिचे उद्देश खालीं दिल्याप्रमाणें होते. (१) मूळ इंग्लंदांतील सभेकरतां द्रव्यनिधि जमविणें; (२) हिंदुस्थानाविषयीं हरएक माहिती इंग्लंद मधील सभेस पुरविणें; (३) ती सभा ज्या गोष्टी हिंदी लोकांच्या कल्याणाकरतां करील त्यांची लेखी माहिती हिंदुस्थानांतील लोकांस कळविणें; (४) सभेच्या मासिक पुस्तकांतील लेखांची माहिती भाषांतरद्वारा अथवा व्याख्यानरूपानें येथील लोकास देणें; असे होते. तथापि अर्ज्या वगैरे करण्याचे काम बाम्बे असोशिएशन

---

+ आपल्या ऐन उमेदींत हिंदी आकांक्षांचें जें बीज दादाभाईनीं रुजत घातलें त्यास उदार इंग्रजांच्या सहानुभूतीचा जलसेक मिळून मोठा वृक्ष होऊन ४०।४५ वर्षांनीं फुलूं लागला आहे. १८२३ सालीं ब्रिटिश सरकारच्या कृपाछत्राखालीं तो फलदायकही झाला, ही फार आनंदाची गोष्ट आहे. हिंदुस्थान व इंग्लंद या दोन ठिकाणीं एकदम सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घेण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. त्याबद्दल सर्व हिंदी प्रजा ब्रिटिश सरकारास कृतज्ञ बुद्धीनें दुवाच देत राहतील.

कडेच ठेवावें असें ठरलें होतें. या सभेचे १५० सभासद प्रथम दर्शनीं झाले होते. ही सभा स्थापन होण्यापूर्वी ई. इं. असोशिएशनला विनायक गंगाधर शास्त्री, रावसाहेब मंडलिक, नवरोजी फर्दुनजी, आर्देसर फ्रामजी मूस, कैकुस्रू काब्राजी, सोराबजी मोदी यांनीं साहाय्य केल्याबद्दल दादाभाईनीं मुद्दाम आभार मानले. या सभेंत सर बुइल्यम वेडर्नबर्न हे दुसरे वक्ते होते. सर जमशेटजी जीजीभाई यांस या सभेचे अध्यक्ष; व सर मंगळदास; फ्रामजी नसरवानजी; ना. बहिरामजी जीजीभाई; शेट विनायकराव शंकरशेट ( सर ) दिनशा पेटिट; डाक्टर भाऊ; विनायक गंगाधर शास्त्री; करशेटजी नसरवानजी कामा; व वरजीवनदास माधवदास यांस उपाध्यक्ष नेमण्यांत आलें. नंतर व्यवस्थापक मंडळी नेमण्यांत आली.

तेव्हां डा. भाऊंस अध्यक्ष; व (सर) वेडरवर्न यांस उपाध्यक्ष; व फिरोज शहा मेथा व बाळ मंगेश वागळे यांस चिटणीस व सोराबजी शापुरर्जी बेंगाली; सी. एन् कामा; रावसाहेब मंडलिक; मि. वुड; मि. मल, मि. रघुनाथ नारायण, आ. फ्रा. मूस; शांताराम नारायण; मि. खंडेराव चिमणराव बेदरकर; के आर कामा; रे. धनजी भाई; महादेव गोविंद रानडे; डा. आत्माराम पांडुरंग; रा.गो. भांडारकर; मंचरजी कावसजी मर्झबान; जनार्दन सखाराम गाडगीळ; विष्णू परशराम शास्त्री; यांस व्यवस्थापक मंडळीमध्यें सभासद नेमिलें गेलें. एवढे सभासद केले याचे कारण एवढेंच होतें कीं, सभास्थापनेचे जे मुख्य उद्देश होते त्यांप्रमाणें कामाची वांटणी या सभासदांचें तीन भाग करून प्रत्येकाकडे एक एक सोंपवून द्यावयाची होती. पुढें एकदां ना. तेलंग व मि. भावनगरी या सभेचे चिटणीस होते. १८८५ सालीं जव्हेरिलाल याज्ञिक या सभेचे सेक्रेटरी होते. पुढें या शाखेचे अध्यक्ष रावसाहेबांस नेमिलें होतें. “ या सभेनें आपलें काम चांगलें केलें. व पुढें करण्याची योग्यता तिचे अंगांत

आहे." असें रावसाहेबांचें मत होतें ( दादाभाईस ४।५।८५ चें पत्र ) या सभेनें एक वृत्तपत्र काढलें होतें. सभेच्या कामगिरीचें स्वरूप दाखविण्याकरतां पुढील वृत्त पुरें होईल.

ईष्ट इंडिया असोशिएशनच्या मुंबई शाखेच्या सभेची मंडळी सरकारी कामगारांनीं केलेलीं प्रजाहिताचीं कामें कृतज्ञपणें मान्य करून त्या सत्कृत्याबद्दल त्या कामगारांचें गौरव करण्यास तत्पर असे. तसें केल्यानें राज्यकर्ते व प्रजाजन यांचा सलोखा वाढे व प्रजेला काय केलें असतां सौख्य होईल तें स्पष्टपणीं सरकारासही कळून येत असे. अशा तऱ्हेचें एक गाड उदाहरण १८८३ च्या आगष्ट महिन्यांत घडून आलें. मेजर सर एव्हलिन् बेअरिंग के. सी. एस. आय्, हिंदुस्थान सरकारचे फडणीस, यांची बदली इजिप्त देशांत लष्करी खात्यात झाली. त्या वेळेस त्यांनीं केलेल्या लोकहिताच्या कामगिरीबद्दल त्यांस मानपत्र समर्पण ई. इ. असोशिएशनच्या मुंबई शाखेनें केलें. त्याकरितां सभासदांची सभा भरली होती, तिचे अध्यक्ष रावसाहेब होते. मेथा व तेलंग वगैरे मंडळीनें या कामांत भाग घेतला होता. "राज्यकारभार करण्यांत दिवसानुदिवस प्रजेला अधिकाधिक भाग घेतां यावा, अशी लोकांमध्यें जी आकांक्षा उत्पन्न झाली आहे ती पुरवून त्यांच्यावर राज्यकारभाराचें काम अधिकाधिक सोंपविणें हें इष्ट आहे व वाढत्या दारिद्र्याला आळा घालण्यास एक उपाय आहे असें सर बेअरिंग यांनीं १८८२ च्या मार्च महिन्यांत आपल्या भाषणांत स्पष्टपणें जाहीर केलें म्हणून; स्थानिक स्वराज्यप्राप्तीचा लाभ लोकांस करून देण्याचा जो हिंदुस्थान सरकारचा मुख्य उद्देश ते अमलांत आणून त्याच्या योगानें राजकारणाचें शिक्षण पर्यायानें लोकांस लावून दण्यास व सार्वजनिक कामांत आपलें तन मन धन अर्पण करण्याची हौस उत्पन्न करण्यास सर बेअरिंगनीं साहाय्य केल म्हणून; सरकारास लागणारें सामान येथें पैदा होणारें

येथेंच विकत घेऊन देशांतील भांडवलाचा उपयोग देशांतील उद्योगधंदे वाढविण्याकडे करण्याच्या कामीं यांनीं श्रम घेतले म्हणून; मिठासारख्या जीवनास आवश्यक असणाऱ्या पोषक द्रव्यावरचा कर कमी कसा करतां येईल हें दाखवून देऊन तो कमी करण्यांत हिंदुस्थान सरकारास साहाय्य केलें म्हणून; शेतकरी लोकांची कर्जबाजारी स्थिति सुधारण्याकरतां सर वेडरबर्न यांनीं ब्यांका स्थापन करणें व त्यांस कर्ज देणें वगैरे ज्या योजना केल्या होत्या तिकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष दिलें म्हणून; दुष्काळांत लोकांस साहाय्य करण्याकरितां निधि काढून ठेवावयाचें ठरविलें म्हणून; राजपुताना रेलवेचे गव्हांची ने आण करण्याचे दर कमी केले म्हणून; व गव्हांच्या पिकाचे उत्तम उत्तम नमुने विलायतच्या बाजारांत पाठवून त्यांस अधिक किंमत आणून देण्याकरितां खटपट केली म्हणून; इजिप्त मध्यें हिंदी सैन्य लढण्यास पाठविलें, त्याच्या खर्चाकरतां हट्ट धरून इंग्लंद देशांतून ५००,००० पाउंड आणविले म्हणून; तुरुंगांतील कारखान्यांकडे विशेष लक्ष दिलें म्हणून व जमीन महसूलाच्या आकारणीची वाढ करण्याची आहे, म्हणून कांहीं मुदतीचा निर्बंध घातला म्हणून; सर बेअरिंग यांची त्यांना दिलेल्या मानपत्रांत प्रशंसा केलेली होती. यांत पर्यायानें लार्द रीपन यांनीं जें उदार धोरण स्वीकारलें होतें तिला प्रजाजनांचा पूर्ण पाठिंबा होता असेंही दाखविण्याचा हेतु असावा हें उघड आहे.

अध्यक्ष या नात्यानें वरील मानपत्रदानाच्या प्रसंगीं रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांशः—

" हिंदी साम्राज्यासारख्या विस्तीर्ण व विचित्र साम्राज्याचें फडणवीसाचें काम यशस्वी रीतीनें पार पाडणें ही लहान सहान नित्य पाहण्यांत येणारी साधारण कामगिरी नव्हे. ती कामगिरी सर ई. बेअरिंग यांनीं करून दाखविली एवढेंच नाहीं, परंतु ती करतांना हातीं मोठी साम्राज्य-

सत्ता असलेलें हिंदुस्थान सरकार आपल्या स्वाधीन केलेल्या भिन्न भिन्न लोकांच्या हिताकरितां शक्य तितकें झटत आहे याची जाणीव त्यांनीं दाखविली आहे.”

“यांनीं जमाखर्चाचा खर्डा काउन्सिलास सादर करतांना असें बोलून दाखविलें कीं जरी हिंदुस्थान देशाच्या उत्पन्नाच्या बाबी पुष्कळ आहेत व त्या वाढण्यासारख्या आहेत तरी हिंदुस्थानांतील लोक फार दरिद्री आहेत ही गोष्ट ज्यांच्या हातांत या देशाच्या राज्यनौकेचें सुकाणूं आहे, त्यांनीं मनांत बाळगिली पाहिजे. अफगाणिस्थानाशीं युद्ध, कित्येक वर्षांचा सालोसालचा दुष्काळ, इजिप्तवरील स्वारी इत्यादि गुंतागुंतीच्या अडचणींतूनसुद्धां वाट काढून ज्यांनीं पुष्कळ सुधारणा केल्या त्यांचें नांव इतिहासांत सदोदित राहील. मिठावरच्या कराचें ओझें कमी केल्यामुळें या देशांतील गरीब लोकांचा फार फायदा झाला आहे. तद्वतच तारांचा दर कमी करून पोस्ट खात्याची सुधारणा करून अडचणींशीं झगडण्यांत ब्रिटिश मनुष्याच्या मनाचा खंबीरपणा आपल्या अंगांत आहे असें यांनीं दाखविलें. अफूचा व्यापार बंद करण्याची चळवळ मध्यें इतकी बळावली होती कीं पार्लमेंट सभेचें लक्ष्य तिनें आपलेकडे बरेंच वेधून घेतलें होतें. परंतु ब्रिटिश जनतेची या बाबतींत चांगली खातरी करून देण्याइतकें अवसान यांनीं दाखविलें. रेलवे संबंधींची व खासगी उद्योगधंद्यांसंबंधें यांनीं जी सुधारणा केली आहे तिचीं गोड फळें मागून येणाऱ्या पिढीस खावयास मिळतील; कारण कोणतीही सुधारणा घ्या, ज्या सुधारणेच्या योगानें खर्चांत काटकसर होईल व उद्योगधंद्याची वृद्धि होईल तीहून टिकाऊ, तीहून महत्वाची व तीहून फायदेशीर दुसरी कोणतीही सुधारणा असणें शक्य नाहीं.” २७।८।१८८३

या संस्थेच्या सभांतून रावसाहेबांचीं अनेक भाषणें झालीं होतीं त्यांपैकीं कांहींचा सारांश पुढें दिला आहेः—

( " हिंदुस्थानाची औद्योगिक प्रगति " या विषयावर मि. मार्टिन वुड यांनीं एक निबंध वाचिला त्यावर रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांश)

" या सभेच्या हेतूंबद्दल पुष्कळ गैरसमज उत्पन्न झालेला आहे. हिंदुस्थानाच्या सामाजिक व राजकीय सुधारणेची जशी कळकळ या सभेस वाटते तशी औद्योगिक सुधारणेचीही वाटते. या देशांत हल्लीं अस्तित्वांत असलेल्या सर्व उद्योगधंद्यांची वृद्धि करणें म्हणजेच त्याची कायमची उन्नति करण्यासारखें आहे. नवीन इंग्रजी पंडितांचा जो वर्ग उत्पन्न झाला आहे त्याच्याविषयीं प्रशंसापर उल्लेख मला करतां येत नाहीं. गाढ अज्ञानसागरांत आपले अज्ञान बांधव बुडत असतां त्यांस वर काढण्याची शक्ति अथवा उद्योगसातत्य याच्या अंगांत नाहीं. समाजांतील औद्योगिक गल्लीकुच्चीचे मार्ग सोधून काढल्याशिवाय मेकाले, अॅडिसन अथवा ह्यांसारख्या इतर विद्वानांच्या लेखांचा अभ्यास करणारे हे लोक आपल्या देशाचें कल्याण करूं शकणार नाहींत. हे गुलाब व मोतियाच्या अत्तरांचे शोक असलेले लोक देशाची उन्नति करण्यास माझ्या मतें असमर्थ आहेत. उद्योग करणाऱ्या धंदेवाल्यांपैकीं मी आहें असा अभिमान मनुष्यास वाटला पाहिजे. सुया तयार करणें किंवा तंबाकूच्या नळ्या तयार करणें या दोन्ही धंद्यांस मान्यता आणतां येईल व त्यांपासून मोठा फायदा मिळवितां येईल. या विस्तृत देशाच्या भूगर्भाचा शोध केला तर कितीक खाणींचा ठाव लागेल. मध्य हिंदुस्थानांत कोळशाच्या व लोखंडाच्या धनत्तर खाणी आहेत असा शोध भूगर्भशास्त्रवेत्त्यांनीं लाविला आहे. त्यांतून खनिज पदार्थ काढण्याचें काम आमच्या लोकांचें आहे. वाङ्मयाचा अभ्यास हा नुसता पाया आहे. त्याच्यावर शास्त्रीय ज्ञानाची उभारणी करणें आहे. " ( १८७७ )

( सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेकरितां इंग्लंदास जाणाऱ्या हिंदी-विद्यार्थ्यांच्या वयाची यत्ता वाढवावी म्हणून पार्लमेंट सभेस अर्ज-

करण्याकरितां ई. इ. असोशिएशनची सभा भरली होती. तेव्हां राव-साहेबांनीं केलेल्या भाषणांचा सारांश )

"* १८५२।५३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीच्या अम्मलांतच सिव्हिल-सर्व्हिसची परीक्षा सुरू होऊन तीस वाटेल त्याला बसण्याची मुभा मिळाली व त्याकरतां बरींच वर्षे विलायतेंत झगडा करावा लागला. पहिल्याच वर्षी यशस्वी झालेल्या उमेदवारांत मि. पील एक्सिक्युटिव्ह काउन्सिलर, व न्यायमूर्ति वेस्ट हे होते. त्याच वेळेला योग्य विचारानेंच वयाची यत्ता तेवीस वर्षांची ठरविण्यांत आली होती पण ती हळुहळु कमी करण्यांत आली त्याचा परिणाम हितकारक झाला नाहीं. असें होतां होतां पार्लमेन्ट सभेंत एक कायदा करण्यांत आला त्या वेळेस हिंदी लोकांना जवळ जवळ या परीक्षेचीं द्वारें बंद करण्याचें श्रेय एका सत्पुरुषानें घेतलें ( हंशा ). मीं असें ह्मणतांना हिंदी लोकांकरतां मागील दरवाजा खुला केला होता हें विसरलों नाहीं. परंतु पुढील दरवाजा लावतां लावतां अजीबात कां बंद करण्यांत आला त्याचीं कारणें उपलब्ध असलेल्या खलित्यांत मिळत नाहींत."

"तीं कारणें कांहीं असोत, हेतू कसलेही असोत, त्यांचा परिणाम झाला तो अनिष्ट झाला. लार्ड ऑकलन्ड व लॉर्ड बेन्टिंग यांच्या वेळेला हिंदुस्थान सरकारनें एक शिक्षणाची प्रचंड योजना तयार केली होती, ती लार्ड मेकॉलेच्या कर्तबगारीनें अम्मलांत येऊन पाश्चात्य वाङ्मय कला व शास्त्रें व तत्त्वज्ञान यांचें ज्ञान हिंदभूच्या लेंकरांस करून देण्याचें निश्चित झालें. व सर मेट्कॉफ् यांनीं असें बोलून दाखविलें कीं पाश्चात्य ज्ञानमंदिराचे रस्ते हिंदी लोकांस बंद करावयाचे झाले तर मीं त्यांत नाहीं. इंग्लंदांतला केवढाही मोठा मुत्सद्दी घ्या, तो अशी बंदी व्हावी अशी इच्छा केव्हांही

* याच्यापूर्वी उमेदवारांची अगोदर निवडणूक करून मग त्यांस कांहीं विशिष्ट शिक्षण देण्यांत येत असे. तें पुरें झाल्यावर त्यांची हुद्यावर नेमणूक होत असे.

करणार नाहीं. हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या प्रगतीला आळा घालणें हा एक शाप देण्याचा प्रकार समजेल व पाश्चात्य ज्ञानाचे मार्ग हिंदी लोकांस मोकळे ठेवून त्यांनां पुढें जाऊं देण्यानें जर इंग्रजांस घरचा मार्ग धरावा लागला तरी बेहेत्तर आहे असें समजेल.–तेव्हांपासून इकडे शिक्षणाचा प्रसार होऊं लागला. विश्वविद्यालयाची स्थापना होऊन आज २८ वर्षें झालीं मानसिक व नैतिक शक्ति निर्माण झाली आहे. तिला सरकारानें चांगल्या मार्गाला लावून दिलें पाहिजे. ज्या सुशिक्षित वर्गाला सरकारनेंच निर्माण केलें त्याची आतां मागणी आपल्या देशाच्या राज्यकारभारांत योग्य तेवढें अंग असूं द्या अशी होत आहे ती कबूल करणें मेहेरबानीवर अवलंबून ठेवण्यास नको तर चांगली परीक्षा घेऊन तींत उत्तीर्ण होण्यावर ठेवावें हें उचित आहे. ती मागणी मान्य न करणें म्हणजे वाफेचा स्फोट होऊन शिक्षणाचें यंत्र बिघडूं नये म्हणून त्यांत जीं संरक्षक द्वारें ठेवलेलीं आहेत त्यांचे पडदे बंद करण्यासारखें आहे. म्हणून ज्यांनीं हें शिक्षणरूपी महायंत्र सुरू केलें आहे, त्यांच्याच मार्गानें जाऊन आह्मीं आपल्या अडचणी दूर करून घेण्याकरितां जेवढा कायदेशीर उपाय आमच्या हातीं आहे तेवढा आपण कायद्यानें प्रस्थापित असलेल्या राज्यांत योजीत आहोंत." ( १३।८।१८८४ )

इतक्यावरून असें दिसून येईल कीं या संस्थेचें स्वरूप वाखाणण्यासारखें होतें. सरकारी बडे बडे अधिकारी संस्थानिक व ब्रिटिश प्रजाजन व व्यापारी इ० भिन्न भिन्न हितसंबंध असलेले लोक या संस्थेचे सभासद होते. हा मोठाच पर्वकाळ होता असें मानलें पाहिजे. ब्रिटिश लोक आपल्या हिंदी बांधवांस राजकीय धडे शिकवीत होते. हें पाहून त्यांच्यावर औदासिन्याचा आरोप ठेवावयास या सभेनें जागा ठेवली नाहीं.

ही सभा पुढें चालली असती तर आपआपसांतले गैरसमज दूर

होऊन राज्यकर्ते व त्यांचे प्रजाजन यांत बळकट प्रेमभाव उत्पन्न होण्यास, व तो वाढण्यास कारणीभूत झाली असती.

कित्येक लोकांस ईस्ट इन्डियन असोशिएशनची मुंबईची शाखा नकोशी झाली. या सभेंत इंग्रज व हिंदी असे मिळून काम करीत असत तें व्यर्थ झालें, हें ऐकून रावसाहेबांनीं दाजीसाहेब खरे यांस इंग्रजी पत्र लिहिलें त्याचें भाषांतरः—

" ज्यांना ही सभा नको त्यांनीं साफ तसें सांगून चालतें व्हावें. व जातांना सर्व अनुयायीवर्गासही शक्य तर घेऊन जावें. मुंबईस या सभेच्या एका शाखेची जरूर आहे. मी आंत नसलों तरी माझी जागा मी दुसऱ्यास देईन व काम चालवीन. दादाभाईचा फक्त नैतिक जोर पाहिजे. मी कालेजांत असतां काम करीत असें, तितकें आतां करूं शकतों हें भाग्य आहे. ज्यांचें सांगतां येत नाहीं. " (२१।२।१८८५ )

याप्रमाणें रावसाहेबांच्या सार्वजनिक राजकीय चळवळीची रूपरेषा काय होती तें वाचकांस कळून येईल. एका प्रकारें पहातां राजकीय चळवळींचीच त्यांस विशेष हौस होती. इतकें त्या बाबतींत काम करीत तरी आणखी करवत नाहीं म्हणून रावसाहेब खट्टू होत. " टाइम्स-मधील तुमच्या पत्राबद्दल मी आभारी आहें. हल्लीं लोकरुचि बिघडल्याचीं चिन्हें दिसत आहेत, म्हणून वाईट वाटतें. प्रकाशाचा सहचर अंधःकार असतो म्हणून मन सभय होतें. जर मला राजकीय प्रकरणांत आणखी काम करतां आलें असतें तर तुमच्या व कोट्यावधि मुक्यांकरतां झगडणाऱ्या तुमच्यासारख्या लोकांच्या आशीर्वादास पात्र झालों असतों. पण हे डोंगर चढण्याइतकें कठीण काम आहे. " ( १३।३।१८७८ चें जेकबसाहेब यांस पत्र ).

रावसाहेबांच्या काळीं धार्मिक व सामाजिक काय चळवळी झाल्या व त्यांशीं रावसाहेबांचा संबंध कसा काय आला तें वृत्त पुढें दिलें आहे.

---

## प्रकरण २५ सावें.

# धर्मांतर.

**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥**

( भगवद्गीता ).

सरकारी इंग्रजी शाळांतून व कालेजांतून स्वधर्मविषयक शिक्षण मिळत नसे. म्हणून त्यांत जाणाऱ्या मुलांस पुढें मोठें झाल्यावर स्वधर्मविषयीं थोडी उदासीनता क्वचित् प्रसंगीं प्राप्त होई. तथापि परधर्मावर त्यांची श्रद्धा बसत नसे. मिशनऱ्यांच्या शाळांतून व कालेजांतून परधर्माचें म्हणजे ख्रिस्ती धर्माचें शिक्षण मिळे तरी कोणी तेथें शिकलेला मनुष्य धर्मांतर करी अशी गोष्ट विरळाच घडून येई. एकाद्या हिंदूनें धर्मांतर केल्यास त्याची लोकांस कींवच येई व फार खेद वाटे.

" १८५४ सालीं बाबा पद्मनजी हे हिंदू गृहस्थ ख्रिस्ती झाले. त्या वेळेस त्यांची कींव सर्वांस वाटली. त्यांच्या धर्मांतरामुळें पालकाकडे राहून जन्मभर शोक करीत बसणें, त्यांच्या दुर्दैवी स्त्रीला पडेल कीं काय अशा शंकेनें लोकांस फार हळहळ वाटली. " ( वि. ना. भागवत यांचें पत्र ).

बंडानंतर जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर, येथें व विलायतेंत मुत्सद्दी लोकांत " चुकलें कोठें " व " काय केलें म्हणजे पुनः बंडासारखा आपत्ति देशावर कोसळणार नाहीं " याविषयीं चर्चा पुष्कळ सुरू झाली. कोणी म्हणत दत्तकाची परवानगी, जहागीरदार व राजेरजवाडे यांस त्यांच्या पुरातन चालीप्रमाणें व शास्त्राप्रमाणें, दिलीच

पाहिजे; व निपुत्रिक असण्याच्या अपराधाबद्दल कोणत्याही राजास त्याचें राज्य ब्रिटिश राज्यांत सामील करण्याची शिक्षा देऊन उपयोगाचें नाहीं. यासंबधानें टाइम्सनें सुद्धां लेख अनुकूल लिहिले आहेत, व पुष्कळ इंग्रज मुत्सद्दी दत्तकाच्या हक्काचें संरक्षण झालें पाहिजे या मताचे झाले; परंतु कित्येक धर्मनिष्ठ मिशनऱ्यांस वाटत होतें कीं, खरा उपाय म्हणजे बायबलाच्या ज्ञानाचा अधिक प्रसार हिंदुस्थानांत करावा. यांत कांहीं भ्रमिष्ट होते, कांहीं कल्पनासृष्टींतच गुंगून राहणारे होते, तर कांहीं कुटिलतर्कनिष्णात होते. त्यांच्याकडून सरकारी शाळांतून बायबल शिकवावें अशी सूचना येऊं लागली. बंड हें कां झालें ? तर धर्मभोळेपणामुळें व अज्ञानामुळें. असें नसतें तर गाईच्या चरबीनें भिजवलेलीं काडतुसें, अधिकारी आम्हांस देतात, असल्या खऱ्याखोट्या गोष्टींनीं शिपाई चिढले नसते. इतउपर त्यांस अज्ञानांत राहूं देणें इष्ट नाहीं, व बायबलच्या ज्ञानापासून अनंत फायदे दाखविण्यांत येऊं लागले. त्यांतील कांहीं कल्पनातीत होते. पुढें असलेला एका इंग्रजी पत्रांतील प्रबंधाचा उतारा मनोरंजक आहे म्हणून दिला आहे. “ पश्चिम हिंदुस्थानांत एका लहानशा संस्थानचा एक लहानसा राजा होता. मुंबईच्या पत्रांत कांहीं सणसणीत लेख एकानें छापले होते. ते त्या राजाकडे कोणी पाठवून दिले. कारण त्यांत त्याच्या कारकीर्दींतील कांहीं दोष उघडकीस आणलेले होते. त्यासरसे राजेसाहेब फार चिढले, व लिहिणारा कोण असेल त्याचा शोध लावण्याकरितां अनेक हेरांची त्यानें योजना केली. अपराधी म्हणून त्याच्यापुढें एक संन्याशी लवकरच उभा करण्यांत आला पण अशा मनुष्यावर असला आरोप ठेवणें हें त्या हिंदू राजाला विलक्षण दिसलें. संन्याशानें राजाविरुद्ध असे लेख हिंदुस्थानांत लिहिणें म्हणजे एकाद्या टमरेलविक्यानें लंदनमध्यें लॉर्ड डर्बी सारख्या उमद्या उमरावाचे विरुद्ध भडाभड लेख लिहिण्याप्रमाणेंच

होतें. पण चमत्कार काय ? तो लघुवेष्टनाच्छादित व भस्मभूषित संन्यासी आग्रहानें म्हणूं लागला " अहो हे लेख माझे आहेत असें सिद्ध करण्याचा माझा हक्क आहे !" "तो कसा" असें विचारतांच तो ह्मणाला "माझें शिक्षण एका मिशनरी शाळेंत झालें. ख्रिस्तीधर्म स्वीकारणें माझें कर्तव्य आहे असें वाटलें नाहीं एवढेंच नाहीं पण स्वधर्मालाच चिकटून राहणें हेंच माझें कर्तव्य आहे असें वाटलें. त्याप्रमाणें मी देशभर हिंडत असतों, व खोटीं, अन्यायमूलक, व क्रौर्यप्रवृत्त कृत्यें हुडकून त्यांस चवाठ्यावर आणीत असतों व जेथें जेथें चांगलें ह्मणून आढळेल त्याला टेंका देऊन उचलून धरीत असतों. व मी हेंच पुढें करीत राहणार ! " विस्मयानें चकित होत्साता तो राजा म्हणाला " तर मग मी तुला मुख्य मंत्रिपदावर नेमितों. " संन्यासी ह्मणाला " मीं तें पद स्वीकारण्याचें नाकारतों. मला माझें दुसरें कार्य आहे. तथापि मी माझे सारखाच चांगला मंत्री तुला पाहून देतों. त्याचें शिक्षण माझेबरोबरच झालें आहे." या दिलेल्या वचनाप्रमाणें, त्या राजाला त्या संन्याश्यानें मंत्री पाहून दिला. तो कोण ? तर ज्या वर्तमानपत्रामध्यें याचे लेख आले होते, त्याचाच प्रत्यक्ष अधिपति व मिशन शाळेंत असतां ज्या सत्याचा व ज्या न्यायाचा महिमा तो शिकला त्या सत्याचा व न्यायाचा डंका वाजवीत दूरदूर हिंडण्याचें आपलें व्रत चालविण्यास तो संन्यासी लांब निघून गेला. " असे गुणग्राही राजे, असे कर्तव्यदक्ष संन्याशी व वर्तमानपत्राचे निर्भिड अधिपति व असे मिशनरी शाळांतल्या धर्मशिक्षणाचे परिणाम पाहून मोठमोठे मुत्सद्दीही चकित झाले तर नवल काय !*

---

* हा अद्भुत प्रबंध डाक्तर मॅक्लाउड यांनीं ज्या गोष्टींच्या आधारानें रचिला ती मूळ गोष्ट खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

व्यापारी कुटुंबांत जन्मास आलेला एक बंगाल्यांतील तरुण गृहस्थ, कांहीं दिवस इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाल्यावर, प्रवास करण्याच्या प्रबल इच्छेनें प्रेरित होत्साता हिमालय पर्वताच्या प्रदेशांत कांहीं दिवस फिरत राहिला. तेथें सृष्टि-

हा वादविवाद चालला असतां ज. जेकब यांस त्यांनीं पत्रीं विचार-ल्यावरून बायबलाच्या ज्ञानाचा प्रसार हिंदुस्थानांत सर्वत्र करावा कीं काय या प्रश्नावर आपलें मत रावसाहेबांनीं एका पत्रीं कळविलें होतें:—

त्यांत त्यांनीं ख्रिस्ती धर्मांतर्गत जी नीति* आहे तिचे प्रशंसक हिंदू

---

सौंदर्याचें अवलोकन करून परत आल्यावर संसारांत न शिरतां संन्यस्त वृत्ति पतकरून, स्वामी आनंदाश्रम हें नांव परिधान करून फिरत फिरत जामनगरास प्रस्थापित झाला. तेथपर्यंतचा त्याचा कुलवृत्तान्त अज्ञातच होता. नंतर तो **ने. ओ.** मध्यें बातमीचीं म्हणून पत्रें लिहूं लागला. त्यावरून हा लेखक कोण ह्मणून चौकशी सुरू झाली. त्याच्या लेखांचा **जा**मसाहेबांस राग येऊन आपल्यापुढें त्यास आण-विलें. **जा**मसाहेबांस त्यानें आपला अपराध कबूल करून स्पष्ट सांगितलें कीं राजधर्माच्या नियमांचा भंग करून परमेश्वरानें तुझ्या स्वाधीन केलेल्या प्रजेचा छळ तुझे हातून जोंपर्यंत होत आहे तोंपर्यंत मी याच मार्गाचा अवलंब करणार. **जा**मसाहेबांनीं तुरुंगांत त्यास कोंडून ठेविलें. कांहीं दिवसांनीं **जा**मसाहेबांस कळून आलें कीं निरपराधी स्पष्टवक्त्यास आपण तुरुंगांत ठेविलें ! म्हणून **जा**मसाहेबांस पश्चा-त्ताप झाला व त्यांनीं संन्याशास सोडून देऊन राज्यकारभारांत सल्लामसलत देण्याची नव्हे तर प्रत्यक्ष राज्यकारभार पहाण्याची **जा**मसाहेबांनीं त्यास विनंति केली. ती त्यानें मान्य केली नाहीं. परंतु योग्य मनुष्य शोधून आणतों असें वचन दिलें. त्यावरून कांहीं दिवस जाहिरात वगैरे देऊन पाहिली. शेवटीं **ने**टिव्ह **ओ**पिनियनच्या एडिट-रचें काम करणारे **वि. ना. भा**गवत यांस कारभारी नेमण्यास सांगितलें व तें **जा**मसाहेबानीं ऐकिलें. पुढें **भा**गवत यांस या निष्काम साधूच्या उपदेशाप्रमाणें चालल्यानें यशप्राप्ति झाली. संन्यासीबुवांच्या अंगांत सत्यप्रीति हिमालयांतील वासानें आली असून **डॉ**क्टर **मॅ**कलाउड् यांनीं मिशन शाळेंतील शिक्षणाकडून ती आली असा आत्महितार्थ फरक करून चांगली गोष्ट याच गोष्टीवरून बनवलेली असावी, असें मानण्या इतकें दोहोंत साम्य आहे.

* "दुसऱ्यानें आपणांस जसें वागवावें असें आपणांस वाटतें तसें त्यास वागवावें" ही जी **ख्रि**स्ताची एक आज्ञा आहे तिचा उल्लेख **रा**वसाहेबांच्या लेखांत आदरानें केलेला आढळतो.

लोकांमध्यें आहेत असें प्रथम सांगून, " देवळांत प्रार्थनेला जाणें, गोमांस, अजमांस यांचें सेवन करणें, संकीर्ण समाजाशीं सहवास ठेवणें इत्यादींनी मनुष्यास मुक्ति मिळते काय ? " अशी पृच्छा केली आहे.

" स्वतः मुक्त झाल्याशिवाय दुसऱ्यास मुक्त करण्याची पात्रता ख्रिस्ती-जनांस कशी प्राप्त होणार ? नीतीचा नुसता तोंडानें उपदेश न करितां स्वतः ( १ ) सर्वदा सत्य बोलल्याशिवाय, व ( २ ) ईश्वराला भिऊन वागल्याशिवाय व ( ३ ) वाणीप्रमाणें करणी करून दाखविल्या-शिवाय इतरांस नीतिमंत व सत्यभक्त कसें बनावाल ? व ईश्वराची भीति बाळगण्यास कसे लावाल ? " अशी दुसरी पृच्छा केली आहे. नंतर कांहीं युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांच्या दुष्ट कृत्यांकडे बोटें दाखवून " प्रत्यक्ष ख्रिस्त जर डोळे उघडून वरून खालीं पृथ्वीवर नजर टाकील तर तत्प्रणीत धर्माचा प्रसार करण्याकरितां त्याचेच अनुग कोणत्या उपायांची योजना करूं पहात आहेत तें पाहून तो संत्रस्त होईल " असें सांगून हिंदुलोकांत बायबलच्या ज्ञानाचा प्रसार करण्याच्या विरुद्ध मत दिलें आहे. ( ३।८।१८६० चें पत्र )

( परंतु खऱ्या ख्रिस्ती मनुष्याला रावसाहेब केवढा मान देत याविषयीं २१।४।१८६५ च्या रोजनिशींत पुढील उतारा आढळतो तो वाचण्या-सारखा आहे.

" न्यायमूर्ति ए. के. फोर्ब्स हे आसन्नमरण स्थितींत आहेत हें ऐकून जीवाला फार काळजी लागली आहे. त्यांचें जर कांहीं बरेंवाईट झालें व होईल अशी भीति वाटत आहे तर न्यायदेवतेच्या अंगावरील एक दागिनाच गळून पडेल ! मनुष्य जातीचा उत्तम मित्र नाहींसा होईल ! माझ्या मताप्रमाणें ते खरे खरे ख्रिस्तानुयायी आहेत. सर्व निरीक्षकांत निरीक्षक ! श्रद्धावान धर्मात्मे व आशापूर्ण ! आमच्या करतां परमेश्वर त्यांस दीर्घायु करो ! " )

इतक्यानें ज. जेकब यांचें समाधान झालें नाहीं. १८-१२-१८६० रोजीं त्यांनीं दुसरें पत्र पाठविलें त्यांत त्यांचें मत संक्षेपतः असें पडतें:- " आपणास ख्रिस्ती म्हणविणारे गोरे अ, ब, क यांनीं जर काळ्या ड, फ, ग यांच्याशीं पशुतुल्य वर्तन केलें म्हणजे तो दोष ख्रीस्तीधर्माचा नव्हे कारण ख्रिस्तीधर्म यास पशुतुल्य वर्तन करण्यास शिकवीत नाहीं. जी नीति व जे सद्गुण ख्रिस्ती धर्म यांस शिकवितो त्यांस हे लोक मानीत नाहींत. त्याला ख्रिस्ती धर्म करणार काय ? ख्रिस्ती धर्म जर इतरांशीं क्रौर्यानें वागावयास शिकविता तर मग हे परिणाम ख्रिस्तीधर्मशिक्षणाचे आहेत म्हणून तें शिक्षण नको असें म्हणतां आलें असतें. परंतु ख्रिस्ती धर्माची नीति ज्या अर्थी गुन्हे करण्याच्या अगदीं विरुद्ध आहे त्या अर्थी कांहीं ख्रिस्ती, नांवाचे ख्रिस्ती असतात म्हणून ख्रिस्ती धर्माचें शिक्षण नको असें म्हणतां यावयाचें नाहीं. ख्रिस्ती धर्माचें शिक्षण नको असें म्हणण्यास याच्याहून अधिक सबळ कारणें आणलीं पाहिजेत; उदाहरणार्थ असें म्हणा कीं आपआपल्या मुलांविषयींचे जे आईबापांचे हक्क आहेत त्यावर गदा येते. "

" उत्तम नागरिक बनविण्याकरितां मुलांस मानसिक शिक्षण देण्याची जबाबदारी आम्हांवर आहे, ह्मणून हिंदू आईबापांनीं कराच्या रूपानें दिलेले पैसे बायबलाचें शिक्षण देण्याकरितां खर्च करितों, असें जर सरकार ह्मणेल तर न जाणो ! चुकून माकून केव्हां ना केव्हां तरी माझा मुलगा धर्मांतर नाहींना करणार ? या धोक्यांत, मुलांना शिक्षण अवश्य आहे एवढ्याकरितां, हिंदू आईबापांस सतत ठेवणें हें सरकारला प्रशस्त नाहीं. जें प्रत्यक्ष रीतीनें करतां येत नाहीं तें अप्रत्यक्ष रीतीनें करतां कामा नये. खासगी शाळा काढणाऱ्यांची गोष्ट निराळी. शाळेंत नांव नोंदण्यापूर्वीं कोणत्या अटी पाळाव्या लागतील हें त्या संस्थांच्या चालकांस नियमित करतां येईल. आईबापांची खुषी नसेल तरी सर-

कारी शाळेंत बायबल शिकवावें व त्यांच्या हक्कांचे विरुद्ध जावें असें इंग्लंडांतील समजूतदार लोक केव्हांही म्हणणार नाहींत. परंतु ५७ चें बंड जर खरोखर अज्ञानामुळें झालें असेल तर तें अज्ञान दूर केलें पाहिजे हें उघड आहे. तेव्हां बायबलाच्या शिक्षणाचा परिणाम नव्या पिढीवर काय होईल हें मला समजावयाला पाहिजे. मिशनरी शाळेंत बायबल शिकवितात त्यांत शिकणाऱ्यांपैकीं जितके लोक धर्मांतर करितात तितकेच लोक सरकारी शाळेंत शिकावयास जाणाऱ्यांत तेथें बायबल शिकाविलें जात नसूनही धर्मांतर करितात कीं काय हें मला समजलें पाहिजे."

यावर उत्तरादाखल रावसाहेबांनीं १।१२।६१ चें पत्र लिहिलें तें:—धर्मांतराविषयीं मत देण्यापूर्वीं हल्लींच्या शिक्षणाचा येथील लोकांच्या मनावर काय परिणाम होतो तें पाहिलें पाहिजे. शिकणाऱ्या लोकांचें मी दोन मोठे वर्ग करितों. पहिल्या वर्गांत एकेश्वरवादी (Monotheists) येतात. हा वर्ग फार लहान आहे. यांतील लोक फार विद्वान असतात. दुसऱ्या वर्गांत अनेक देवतावादी( Polytheists ) येतात, व यांत बाकी बहुतेक लोकांचा समावेश होतो. दोन्ही वर्ग ईश्वरवादीच ( Theist ) आहेत. इंग्रजी शिक्षणानें साधारणपणें पहातांना दुसऱ्या वर्गांतील इंग्रजी शिकलेले लोक जे धर्माविषयीं विचार करण्याच्या भानगडींत पडतात ते विश्वदेवतावादी होतात. कांहीं तरी एक धर्म सर्व विश्वाला साधारणपणें मान्य होईल असा शोधून काढावयाला पहातात किंवा (२) चार्वाक मतवादी विषयासक्त होतात; अथवा (३) शून्यवादी होतात. पहिल्या वर्गांतील एकेश्वरवादी लोकांची श्रद्धा बटूलर, स्टुअर्ट इत्यादिकांचे ग्रंथ वाचून हलत नाहीं व आपल्या देशांत जे महान् महान साधुपुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें वाचून त्यांस डॉ. विलसन् सारिखे राजकारणी ख्रिस्तीधर्मोपदेशक जे परिश्रम करितात त्यांत

कांहीं अपूर्व अथवा कौतुकार्ह दिसत नाहीं. उलट ते असें समजतात कीं हे धर्मोपदेशक आमच्या सामाजिक व नैतिक हक्कांवर अप्रत्यक्षपणें हल्लाच करीत आहेत."

"मधून मधून एखादद्दुसरा धर्मांतराचा जो मजेदार प्रकार दिसून येतो त्यांत व कळसूत्री बाहुल्यांच्या खेळांत अंतर मला तर कांहीं दिसत नाहीं व दिसणें शक्य नाहीं. हे धर्मांतराचे प्रकार जे मला आढळून आले ते सारे अगदीं हीन जातींतील लोकांतून झालेले आहेत व माझ्या माहिती मिळविण्याच्या साधनांवरून जी माहिती मिळाली त्यावरून असें आढळून आलें कीं उच्च जातींतील जे लोक येशूच्या कळपांत ओढले गेले त्यांच्या मनांतील हेतु केवळ परमार्थ साधण्याचा नव्हता. असें म्हणतांना माझ्या मनांत ख्रिस्ती नीतीचा उपहास करावयाचा नाहीं; कारण ख्रिस्ती नीति चांगली आहे व आत्म्याचा उत्कर्ष करणारी आहे. परंतु जी आमच्या धर्माची नीति नीट शोध करून अनुसरली असतां ख्रिस्ती नीतीपेक्षां अधिक चांगली नसली तरी तिच्या इतकी चांगली आहे, तिचा पद्धतवार कां विनाश करावा तें मला समजत नाहीं. आम्हीं तरी माणसेंच आहोंत, आणि म्हणूनच माणसें या नात्यानें आम्हांस कांहीं हक्क आहेत, व जर आमची अशी समजूत आहे कीं कोणी कोणाच्या धर्मांत हात घालूं नये तर ज्या सरकारचा अवतार आमच्या धार्मिक स्वातंत्र्याचें पालन करण्याकरितां आहे, त्यानें तर आमच्या धर्मांत ढवळाढवळ शेवटपर्यंत करूं नये. भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं, 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' म्हणजे मनुष्य जर आपआपलींच कामें करीत राहील तर त्याला सिद्धि प्राप्त होईल. मिलचे सारे ग्रंथ वाचून जेवढें ज्ञान होतें, त्याच्याहून आमच्या सामाजिक इतिहासाचें ज्ञान या एका चरणाच्या वाचनानें होतें. मी अद्यापि मिशनरी शाळेंत जाऊन बायबल शिकणारे लोक किती बाटतात व सरकारी शाळेंत

जाऊन बायबल शिकल्याशिवाय किती बाटतात याची चौकशी केली नाहीं, केल्यावर कळवीन. ”

## धर्मांतर केलेला.

एवढें खरें कीं या वेळीं धर्मांतर करणाऱ्या लोकांस मान मुळींच नसे व तो सर्वांस दूष्यच वाटे. धर्मांतर केलेल्यास तो बाटला असें म्हटल्यास राग येत असे. रावसाहेबांनीं जें एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर केलें त्यांत धर्मांतर करणें याच्याबद्दल बाटणें असा शब्द वापरल्याबद्दल टाइम्समध्यें कडक टीका आली होती, व तींत असें ध्वनित केलें होतें कीं रावसाहेब व त्यांचे अनुयायी यांस हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती झालेल्या लोकांविषयीं बोलतांना दुष्ट वाणी वापरण्याची संवय लागली आहे. याला २४–६–६१ च्या पत्रांत रावसाहेबांनीं उत्तर दिलें त्याचा सारांशः—“ वरील आरोप तुम्हीं माझ्यावर व माझ्या सहकारी मित्रांवर आणल्यामुळें व त्यांत आमच्या शीलाबद्दल शंका घेतल्यामुळें उत्तर देण्याच्या भानगडींत पडत आहें. ‘ बाटणें ’ हा शब्द ‘ बटावणें ’ या शब्दापासून निघाला आहे. ‘ बटावणें ’ म्हणजे एका जातीचीं नाणीं देऊन त्याच्याबद्दल दुसऱ्या जातीचीं नाणीं घेणें म्हणजे “ बाटणें ” या शब्दाचा मूलार्थ “ बदलणें ” हा होय. अर्थात धर्म बदलणें म्हणजे धर्मांतर करणें हा होय. आणि मी हा शब्द त्याच मूल अर्थी वापरला आहे. ”

“ बाटणें याचा रूढार्थ दूषित होणें असा आहे हें मला नाकबूल नाहीं तथापि ग्रंथकर्त्याच्या मनांतील अर्थ कोणता आहे हें पहावयाचें झाल्यास मागचा पुढचा संदर्भ पहावा लागतो व मागें पुढें लिहिलेल्या मजकुरांत शब्द कोणच्या अर्थी कसे वापरले आहेत तें पाहलें पाहिजे. उदाहरणार्थ— ‘कन्व्हर्शन’ या शब्दाचें भाषांतर त्याच बुकांत निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या तऱ्हेनें केलें आहे. ”

एवढ्यावरून असें कळून येईल कीं बाटणें हा शब्द फक्त धर्मांतर करणें याबद्दल वापरलेला असून तुम्हीं ज्याचा एवढा बाऊ केला आहे त्या दूषित अर्थी वापरलेला नाहीं."

या स्पष्टीकरणानें टाईम्सचें समाधान किति झालें तें कळलें नाहीं.

दुसरी एक गोष्ट या धर्मांतर केलेल्या कांहीं लोकांत आढळून येत असे ती ही कीं, धर्मांतर केल्यानंतर तसें केल्यानें जें वास्तविक अगर काल्पनिक आत्मविषयक सुख मिळालें असेल त्याचें स्वस्थपणें सेवन करावयाचें सोडून व शान्ति वरावयाची सोडून, जशी कांहीं चिढल्यासारखी होऊन आपल्या जुन्या धर्मावर अद्वातद्वा तोंडसुख घेण्यास धर्मांतर केलेली मंडळी वारंवार तुटून पडे. नव्या धर्मांत वैशिष्य काय आहे त्या सद्गुणांचें वर्णन न करतां जुन्या धर्माची विटंबना एकदम चालू करी. हल्लीं अशा तिच्या मानभाविपणास कोणी विचारीत नाहीं. पण त्या वेळीं लोक किति महत्व देत असत कोण जाणे! वरील धर्मांतर केलेल्या कांहीं लोकांच्या खोडीचें एक उदाहरण १८५७ सालीं घडून आलें. "यमुनापर्यटन" "अथवा हिंदुस्थानांतील विधवांच्या स्थितीचें निरूपण" या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध बाबा पद्मनजी यांनीं छापिलें. शिक्षणानें आपणास एक प्रबुद्ध समजणारा गृहस्थ यमुना नांवाच्या, आपल्या लाडक्या व मिशनऱ्यांच्या शाळेंतून शिक्षण घेऊन बाहेर निघालेल्या, पण अद्यापि बाप्तिस्मा न घेतलल्या स्त्रीसहवर्तमान व्यभिचारिणी विधवांचे खेळ बघत हिंडत आहे असें त्यांत प्रथम दाखविलें आहे.

शेवटीं यमुना विधवा होते, व वैधव्यदुःख, धर्माच्या शान्तीनें कमी करते व येशूला तिची दया येऊन तो कांहीं वर्षांनीं तिला एक धार्मिक व सुशिक्षित असा सुखदुःखाचा सोबती देतो व त्याजबरोबर ती आपल्या मरणकाळापर्यंत ईश्वराची भक्ति व मनुष्याचें कल्याण करण्यांत सुखानें दिवस घालविते व पुढें दुसऱ्या आवृत्तींत त्याच्याशीं ख्रिस्ती रीतीप्रमाणें

यमुना लग्न लावते ! हें पुस्तक बीभत्सरसप्रधान आहे. यांत दुसरी एक गंमत अशी आहे कीं याच कादंबरीला प्रस्तावनारूप एक लहानसा संस्कृत भार्षेत लिहिलेला निबंध दादोबा पांडुरंग यांनीं मराठी भाषांतरासह जोडिला आहे. त्यांत विधवाविवाहाचें मंडन केलेलें आहे. त्या निबंधाचा जर या पुस्तकाशीं संबंध झाला नसता तर विधवाविवाहाचे तर्फे त्यानें कांहींशी तरी कामगिरी केली असती. चांगलें फळ नासलेल्या फळाच्या संगतीनें नासतें तें असें.

दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं दादोबांची प्रस्तावना जागेवरून उडाली व भाषेच्या व विषयाच्या संबंधेंही ग्रंथकारानें कांहीं फरक केला.

या पुस्तकावर इतकी टीका करणें म्हणजे त्याला फार महत्व देण्यासारिखें आहे. परंतु त्या काळाची स्थिति दाखविण्याकरितां हा खटाटोप केला आहे. या ग्रंथास आश्रय चांगला मिळाला. पुष्कळ इंग्रज गृहस्थ डा. वुइल्सन, रे. शेषाद्रिसारखे इंग्रजी व हिंदी मिशनरी लोक, डाक्तर भाऊ दाजा, जगन्नाथ शंकरशेट, रामचंद्र बाळकृष्णाजी, पांडुरंग बळिभद्र, भास्कर दामोदर पाळंदे, नाना मोरोजी इत्यादि श्रेष्ठ लोक त्याचे आश्रयदाते होते.

शाळा खात्याचे अधिकारी मि. हेन्स यांनीं विचारल्यावरून या पुस्तकावर खरमरीत टीका करून त्याच्या विरुद्ध अभिप्राय रावसाहेबांनीं ९।७।१८५७ च्या पत्रीं कळविला होता, तरी पुढें मि. बाबा पद्मनजी यांनीं मराठी व इंग्रजी कोश स्वतां रचून छापिला; त्यावेळेस नेटिव ओपिनियनमध्यें मत देतांना रावसाहेबांनीं ग्रंथकाराची तारीफ केली होती. ती वाचून बाबा पद्मनजी यांनीं दोघांचे सामान्य मित्र जनार्दन रामचंद्रजी यांस लिहिलें कीं माझ्या कोशावर इतकी प्रशंसापर व अनुकूल टीका येईल असें मला कधीं वाटलें नाहीं. या रीतीनें प्रेम दाखविल्याबद्दल मी रावसाहेबांचा फार ऋणी आहें. ग्रंथांतील बारीक सारीक

चुक्या टीकाकाराप्रमाणें मलाही अवगत आहेत, पण त्यांच्याकडे त्यांनीं थोरपणानें दुर्लक्षच केलें आहे.

रावसाहेबांचा वाद ख्रिस्तीधर्मानुयायीव्यक्तिविषयक मुळींच नसे, त्या व्यक्तीच्या कृतीशीं असे. कृति शुद्ध दिसली तर लगेच तिची प्रशंसा करण्याची रावसाहेबांची तयारी असे, असें वरील उदाहरण सांगतें, याला पुष्टि खालील उदाहरणें देतील.

रे. धनजीशहांचा व रावसाहेबांचा पत्रव्यवहार मित्रत्वाच्या नात्याचा सांपडतो. त्याचप्रमाणें रे. शेषाद्रि यांचाही सांपडतो. ते व त्यांची पत्नी यांचें रावसाहेबांकडे जाणें येणें असे. यांचें धर्मांतर स्नेह जडण्याचे आड आलें नाहीं.

---

## प्रकरण २६ सावें.

# सामाजिक सुधारणा.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

( भगवद्गीता )

अकबराच्या नीतीचा अवलंब जर अवरंगझेबानें केला असता तर हिंदू व मुसलमान यांचें युद्ध जुंपलें नसतें. व हिंदूपद्पादशाहीची स्थापना झाली नसती. या अनुभवाचा फायदा इंग्रज सरकारनें घेतला व धर्माच्या बाबतींत बहुतेक अंशानें तें तटस्थ राहिलें. बहुतेक अंशानें असें म्हणण्याचें कारण प्रसंग पाहून ही वृत्ति सरकारनें सोडलेली आहे. पण ती अगदीं नियमित कार्यापुरतीच सोडलेली आहे. उदाहरणार्थ विधवाविवा-

हाचा कायदा द्या. ज्या जातींत विधवांचा विवाह रूढ नाहीं, त्या जातींत तसा विवाह झाला असतां त्या विवाहापासून होणाऱ्या संततीला फक्त कायदेशीरपणा आणण्यापुरताच हिंदूच्या सामाजिक चालीरितींत हात घालण्याचा वरील कायदा करण्यांत सरकारचा हेतु होता, अधिक नव्हता. कारण पहिल्या पतीच्या मालमिळकतीवरील अशा विधवेचे असलेले सर्व हक्क या कायद्यानें नष्ट होऊं दिले आहेत. सतीच्या चालीचें उच्चाटण करतांना इंग्रज सरकारनें प्रथम पुष्कळ युक्तिवाद केले होते. पहिल्यानें कांहीं दण्ड भरून परवानगी देण्यांत येई व ती देतांना ही स्त्री आप्तेष्टांच्या चिढवण्यानें किंवा चढवण्यानें सती जाण्यास उद्युक्त झाली आहे कीं काय याची चौकशी होत असे. व विचार करावयास मध्यें वेळ मिळाल्यामुळें ती स्त्रीही आपला बेत कधीं कधीं रद्द करीत असे. आंकडे टोचण्याची चाल व येल्लाम्माच्या जत्रेंत नग्न होऊन प्रदक्षिणा घालण्याची स्त्री पुरुषांची चाल इत्यादि सुधारलेल्या राष्ट्रास न शोभणाऱ्या चाली इंग्रज सरकारनें साधे हुकूम काढून प्रजेमध्यें क्षोभ उत्पन्न केल्याशिवाय बंद केल्या आहेत, व

**कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।**
**इति ते संशयो माऽभूत् राजा कालस्य कारणम् ॥**

या भीष्मोक्तीचें सत्य पटवून दिलें आहे. तथापि सामाजिक चालीरितींत हात घालण्याच्या कामाला इंग्रज सरकारनें ठेवलेली पुष्कळ मर्यादा, शांततेचा सर्वत्र प्रसार व आपत्प्रसंगाचा अभाव यांच्यामुळें आपल्या पुरातन चालीरितींप्रमाणें वागावयास व पूर्वग्रह श्रद्धायुक्त संभाळून ठेवावयास मोकळीक राहिली. व सामाजिक सुधारणेचे जे प्रश्न आहेत ते लोकांपुढें अगदीं हळुहळु येत गेले व ते लोकांस आपले आपणच सोडवावे लागले. ते प्रश्न कसे उद्भवत गेले व त्यांशीं रावसाहेबांचा संबंध कसा येत गेला व त्यांनीं त्यांत कार्यभाग काय घेतला तें वृत्त या प्रकरणांत दिलें आहे.

## उष्ट्रारोहण.

रावसाहेब सिंधमध्यें असतां उष्ट्रारोहणाचा प्रश्न निघाला होता. त्या वेळीं नानासाहेब मंडलिक यांनीं लिहिलें कीं:—काशीपासून रामेश्वरापर्यंत संप्रदाय नाहीं व हें जनावरही शुद्धांत नाहीं. पुण्यास गेल्यावर शास्त्रार्थ पाहून कळवीन.

पुढें ७।३।१८५४ चे पत्रांत ते लिहितात " उंटावर बसण्यास ब्राह्मणास निषेध आहे. बसल्यास मोठें प्रायश्चित्त नाहीं. कांहीं प्राणायाम व गायत्रीजप प्रायश्चित्तेंदुशेखर ग्रंथांत सांगितला आहे." रावसाहेबांनीं उष्ट्रारोहण केलें नाहीं. नेहमीं घोडाच उपयोगांत आणीत.

## छापीशाई.

" श्रीमत्भागवत व छापील पुस्तकें पाठविलीं त्यांचें अवलोकन करीत आहें. आमचे वडिलांनीं नाशिकास आश्रम संपादन केला तेव्हां चैत्र मासीं दर्शनास गेलों होतों. तेथें या शाईविषयीं शंका उत्पन्न झाली. आतां सहजीं सुचवितों कीं शाईच्या कृतींत कांहीं अधर्म आहे कीं काय? माहिती असल्यास कळवावें. सुखवस्तीस आहों." (रावजी दातार याचें १२।९।१८५८ चें वसईहून पत्र.) रावसाहेब ज्या पोथ्या सोंवळ्यांनीं वाचीत त्या हस्तलिखीत असत.

## पटवर्धनी पंचांग.

" आमचें पंचांगसुधारक पटवर्धन यांनीं दसरा अगोदर साजरा केला, हें तुह्मीं ऐकिलें काय? या बाबतींत त्यांच्या मताप्रमाणें वागण्यांत त्यांनीं कांहीं चूक केली नाहीं. त्यापासून दुसऱ्यांस अडचण नाहीं. तथापि मला वाटतें तें नम्रपणें मी सांगतों कीं अशा प्रसंगीं औचित्याचा व आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करतां यांनीं समाजापुढें एकदम २।३ टिपें टाकून धांव घेतली. यांत कांहीं मोठा धार्मिक प्रश्न

उद्भवला होता असें नाहीं. किंवा असें न केल्यानें कांहीं धार्मिक कृत्यें भ्रष्ट होऊन परमेश्वराचा कांहीं त्याच्यावर कोप होणार होता असें नाहीं, नुसता दसऱ्याचा सण केव्हां साजरा करावयाचा तो प्रश्न ! मग सर्व लोक जो दिवस पाळतात तो पाळण्यास काय हरकत होती ? ( ३।१०।१८६० चें वासुदेव बापूजी कानिटकर यांचें पत्र ) रावसाहेब जुन्या पंचांगाप्रमाणें सणवार पाळीत.

## बलिदान *

" दसऱ्याच्या दिवशीं म्हसोबा पुढें रेड्याचा सन्मानानें वध झालेला पाहून मला आश्चर्य वाटलें. ब्राह्मण लोक जे केव्हांही हिंसा करीत नाहींत ते असल्यास मान देतात ! " ( १०।१०।१८५५ रो. उ. )

हें रावसाहेबांचें मत त्यांनीं शेवटपर्यंत कायम ठेविलें होतें. महालक्ष्मीच्या रस्त्यावर घेतलेल्या नव्या बंगल्याच्या आवारांत एका बेहळयाच्या झाडाखालीं अजापुत्रांस बळि देण्याची वहिवाट तेथील माळी लोकांत होती ती रावसाहेबांनीं एकदम बंद करून टाकिली.

## यज्ञ व हिंसा.

रावसाहेबांची धर्मश्रद्धा प्रसिद्धच होती. परंतु ती अंधश्रद्धा नव्हती. कांहीं बाबतींत धर्मकृत्यें कार्याकार्य विचाराच्या कसोटीस लावून पहाण्याची त्यांना संवय होती. यज्ञांत जी पशुहिंसा विहित होती ती त्यांस पसंत नव्हती. " वैदिकी हिंसा हिंसा न भवति " या नांवाचा ग्रंथ बना-

---

* बलिदानाची कल्पना त्यावेळीं किती प्रकारची होती हें खालीं दिलेल्या विनायकराव भागवत यांच्या पत्रावरून दिसेल:—

मी येथें खेडेगावांत ( जन्मग्रामीं चिपळुणाजवळ पाग येथें ) पडलों आहे. रेलवेचे पूल बांधतांना व घांट बांधतांना सरकारला कांहीं मनुष्यें बळी द्यावयास पाहिजे आहेत, अशा बातम्या पसरल्या आहेत. हें लोकांचें अज्ञान अनुकंप्य आहे. ( १२।५।१८५६ ).

रसचे गोविंद रघुनाथ थत्तेशास्त्री यांनीं लिहिला होता तो रावसाहेबांनीं मुद्दाम आणविला होता. त्यांतील विवेचनानें त्यांचें मत बदललें नाहीं. अलिबागचे श्रीमंत भाऊसाहेब आंग्रे यांनीं यज्ञ केला होता. तेव्हां कांहीं थोर थोर शास्त्री ऋत्विज झाले होते तें त्यांस अगदीं आवडलें नाहीं.

## श्रावणी.

या वार्षिक विधींत कांहीं अनवश्यक प्रकार आढळून आल्यावर रावसाहेबांनीं त्या विधींत फेरफार केले. व त्याप्रमाणें ते श्रावणी शेवटपर्यंत करीत आले. सर्व मंत्र रावसाहेबांस पाठ येत असल्यामुळें रावसाहेब श्रावणी स्वतः करीत असत. "श्रावणी केली. पांडुरंग पाध्ये आचार्य होते. पंचगव्य नाहीं. स्नानविधि नाहीं. व ऋषिपूजन नाहीं."

(१६।८।१८६४ ची रो. उ.)

## भुतें खेतें.

कोकणांतील लोक गुरांच्या गोठ्यांत गोच्चीड उत्पन्न झाल्यावर साफसफाईचे उपाय न करतां भुताखेतांचे उपाय करीत.

"गोचीड हा जीव अमंगळपणापासून उत्पन्न होतो. त्यांत भूत नाहीं. मी औषधी पूड पाठवितों ती लावतांच हा जीव गळून पडेल." भुताखेतांवर मंडलिकांचा भरंवसा पहिल्यापासून नव्हता असें दिसतें.

'चि. सौ. अन्नपूर्णाबाई दोन प्रहरीं नदीवर गेल्यामुळें तेथें उपद्रव झाला असें कांहींना कळलें आहे. तितकें मला कळलें नाहीं."

(२०।१२।१८६२ चें नानांचें पत्र.)

## उपास तापास.

न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरेत् ॥

(भगवद्गीता)

रावसाहेबांचे वडील हे पक्के कर्मठ होते. व त्याचप्रमाणें रावसाहेबांचे दोन्ही बन्धू होते. वडिलांचें लक्ष रावसाहेबांची वागणूक कशी आहे इकडे फार असे. रावसाहेब ठाण्यास असतां कांहीं मुरूडकर मंडळी तेथें १८५९ त जाऊन आली. त्यांनीं नानासाहेबांस जाऊन मोघम बातमी कळविली कीं रावसाहेब सुधारले. त्याबद्दल नानासाहेबांनीं रावसाहेबांस पत्रीं कळविलें कीं, आम्हीं असें असें ऐकितों त्यावर रावसाहेबांनीं विचारिलें "सुधारलेला या शब्दाचा अर्थ काय व मी सुधारलों म्हणजे आपण काय समजतां ?" त्यावर नानासाहेबांनीं पत्र लिहिलें तें:—सुधारलेल्या शब्दाचा अर्थ आम्हीं प्राकृत लोक, वाईट चाल लागली असा करितों. येरव्हीं वास्तविक शब्दार्थ चांगलाच आहे. सुधारल्याची बातमी सर्वत्र जालेली आहे. ती आजच नव्हे, दोन तीन वर्षें. परंतु ती आमचे नजरेस येत नाहीं. तथापि कांहीं पिकल्याशिवाय विकत नाहीं तेव्हां यांतील कांहीं तरी खरें असेल तर तुम्हांस गोड न लागेल म्हणोन आजवर बोलिलों नव्हतों. तत्राप अण्णा लिमये यांनीं सांगितलें होतें. वरचे कलमीं लिहिलें त्यापैकीं फार वाईट वाटतें तें तुम्हीं येकादशी उपोषण करण्याचें सोडिलें. तें होत नाहीं म्हणोन त्यास इलाज नाहीं; परंतु तिचें स्मरण नाहीं हें गैर. आणि कपिला षष्ठी, संक्रांत, ग्रहण हीं पर्वें खोटीं म्हणतां हें ऐकितों. परंतु हें खोटें असेल असें तुम्हीं म्हणणार नाहीं. परंतु या पर्वांत स्नान नाहीं तर नाहीं, परंतु खाण्याचा प्रतिबंद तुम्हीं ठेवीत नाहीं असी बातमी; यांतून कांहीं खरें आहे किंवा नाहीं हें उत्तर पाहिजे व समई जरी यांत कांहीं नाहीं असें मनांत आलें असेल तर लोकरितीप्रमाणें चालण्यापासून गैर फायदा नाहीं.

"सुधारलेत" म्हणजे काय हें नानासाहेबांनीं चिरंजीवांस स्पष्ट करून सांगितलें यामुळें कोणाचाही गैरसमज होण्याला कारण उरलें नाहीं. अगदीं कर्मठ ब्राम्हणाच्या दृष्टीनें नानासाहेबांचें म्हणणें बरोबर

होतें. आधीं कराची येथील कडक हवेंत व नंतर ठाणें जिल्ह्यांतील वाईट हवेंत सतत श्रम करून प्रकृतीचें स्वास्थ्य न राहिल्यामुळें उपासतापासाची पिढीजात संवय रावसाहेबांची सुटली असल्यास नवल नाहीं.

## पाद्र्याकडे पानसुपारी.

। पयोऽपि शौण्डिकी हस्ते मदिरां मन्यते जनः ।

याच्यापुढें रावसाहेब काय करतात यावर सर्व लोकांचें लक्ष लागलें होतें. व त्यांत त्यांचे कांहीं स्नेही होते. ते नानासाहेबांप्रमाणेंच स्पष्ट बोलणारे होते. त्यांपैकीं गंगाधरपंत टिळक यांनीं २६।८।६२ रोजीं एक पत्र रावसाहेबांस लिहिलें तें असें:—आपले बंधू रा. रा. रावजी येथें (रत्नागिरीस) आले होते त्यांनीं सांगितलें कीं आपण व दुसरे दोन मुंबईतील संभावित व सभ्यगृहस्थ याणीं पाद्रीच्या घरीं कांहीं धर्मविरुद्ध वर्तन केलें; या विषयीं छापलें होतें तें त्याणीं वाचल्यावरून त्यांस व तें ऐकून मला फार वाईट वाटलें, कारण तें कर्म आपल्या हातून झालें असेल ह्मणून नव्हे. असें कर्म आपल्याकडून होणारच नाहीं अशी जे सज्जन व संभावित गृहस्थ आहेत त्यांची खात्री आहेच, परंतु हलक्या लोकांत उगाच वाईटपणाचा गवगवा झालेला ऐकण्यासच वाईट वाटतें. ही गोष्ट बिनीवाले, सदर अमीन यांकडे निघाली होती. त्या वेळीं त्याणीं ही गोष्ट आपल्याकडून होणार नाहीं, परंतु महाराजांच्या खटल्यांत आपली साक्ष झाली त्या आकसानें कोणी छापिलें असावें असा त्याणीं अंदेशा घेतला तो जर तसा असेल तर जितक्या पत्रांतून सदरील पत्राप्रमाणें वाईट मजकूर छापला गेला होता तितक्यांकडून उलट लिहवावें, तसें होत नसेल तर तितक्यांवर फिर्याद करावी. सारांश वर्तमानपत्रांत आपल्या विषयीं जें छापलें गेलें तें खोटें असें प्रसिद्ध झालें पाहिजे. सदरहूबद्दल काय झालें तें फुरसुदीनुसार कळविण्याची तजवीज व्हावी.

( कचेरीहून घरीं आल्यावर परधर्मीयांस स्पर्श केल्यानें लागलेल्या पापाच्या क्षालनार्थ घरीं येतांच स्नान करणाऱ्या लोकांचा हा काळ होता. इतकें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे. )

वरील पत्रास उत्तर ह्मणून रावसाहेबांनीं २६।८।६२ चें पत्र लिहून खुलासा केला तो असाः—आपण वर्तमानपत्रांतील मजकुर लिहिला त्यास इंग्रजी पत्रें पाहिलीं असतां कांहीं अव्यवस्थित प्रकार मजकडून झाला नाहीं हें आपल्या पाहण्यांत येईल. जाहीरसभा होती तेथें मी गेलों होतों व तुरे व विडे घेऊन आलों इतका प्रकार. मराठींत काय वाईट छापलें आहे तें मी अद्यापि पाहिलें नाहीं. व तें पाहण्याचा माझा इरादा नाहीं. कारण असुयेनें प्रवृत्त होऊन जर कोणी पुण्यजन वाईट बोलतील तर एकटा त्यांचीं तोंडें किती धरील ? आतां माझीं जीं घरें गांवोगांव बांधलेलीं आहेत त्याणीं हा खराखोटा प्रकार उघड केला असतां माझी ना नाहीं. मला कोणी विचारीपर्यंत लोकांस काय सांगत सुटावें ? आणि जर माझ्याविषयीं लोकांत बेभरंवसा उत्पन्न झाला असेल तर कितिही सांगून फळ काय ? आतां जे मीं हें लिहितों त्यांत कांहीं सयुक्तिक न दिसेल तर बेशक लिहावें. बापूसाहेब यांचा तर्क खरा आहे. पण मी कोणाचें नांव घेऊं इच्छीत नाहीं.

कर्सनदास मूळजी हे महाराजांच्या खटल्यांत विजयी झाले, व सामाजिक सुधारणेच्या एका बाबतींत यश आलें ह्मणून त्यांच्या अभिनंद-नार्थ डा. वुइल्सन यांकडे जाहीरसभा होती. तिला रावसाहेब गेले होते. व हारतुरे व विडे घेऊन आले. हें वर्तन शौण्डिकीहस्तगतदुग्ध जसें मद्य दिसतें तसें धर्म विरुद्ध दिसलें. कांहीं लोकांना इतपत सुद्धां धर्मबाह्य वर्तन रावसाहेबांकडून होणार नाहीं असें खात्रीनें वाटत होतें. "आपलें नीतियुक्त वर्तणुकीविषयीं असें बोलण्यास माझें मन सरळ भावानें आदरपूर्वक सर-सावत नाहीं. वरील गोष्टीविषयीं कित्येक निवडक मनुष्यांनीं शंका

घेतली असतां शोभेल. याशिवाय निस्पृहपणा, दृढनिश्चय, विद्या, वेळो-वेळीं अभ्यास करण्याची उमेद, सत्कालक्षेप हे आपले गुण विदित आहेत." ( हरी नारायण मोडक यांचें पत्र.* )

## स्त्रीशिक्षण.

आमच्या देशांत पहिली समाजसुधारणा म्हणजे स्त्रीशिक्षण ही होय. हिला प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या चरमार्धांत झाला. पंजाबांत, जेथें कोणत्याही भागापेक्षां स्त्रियांस स्वातंत्र्य कमी, तेथें स्त्रीशिक्षणाचा फैलाव अधिक होता × ही आश्चर्याची गोष्ट आहे. रावसाहेबांचा जन्म अगदीं कर्मठ कुटुंबांत झाला असल्यामुळें पाश्चात्य लोकांच्या समाजव्यवस्थेच्या धरतीवर आपल्या समाजाच्या चालीरितींत फेरबदल करण्याची कल्पना त्यांस लवकर रुचण्याचा संभव फार कमी होता. असें असतांही स्त्रीशिक्षण त्यांस फार प्रिय होतें. व त्यांच्या कुटुंबांत त्याचा थोडा प्रवेश झालेला होता. त्यांच्या मातोश्रींच्या हातचें ( १८५६ ) सालीं रावसाहेब ठाणें मुक्कामीं असतांना घराहून मोडींत लिहिलेलें पत्र सांपडतें. त्याचें अक्षर वळणदार नाहीं तथापि मोठें व सुवाच्य आहे. बायकी भाषेंत

---

* तथापि येवढें खरें कीं कोकणांतली मंडळी रावसाहेबांच्या वर्तनावर एकसारखी नजर ठेवी. १८७० सालीं रावसाहेब आसूद मुक्कामीं कुलदेवतेच्या दर्शनास गेले होते. तेव्हां रावसाहेबांनीं सोहेरांत श्मश्रू करविली कीं काय ? असें पांडुरंग दाजी बाळ यांनीं विष्णूपंत जोगळेकर यांस ( बरोबर नेहमीं असणाऱ्या घरगुती मनुष्यास ) विचारिलें होतें.

× हिंदुस्थान सरकारच्या १८५० सालच्या सिलेक्ट रेकार्ड मधील उतारा रावसाहेबांच्या १८५५ च्या रोजनिशींत सांपडतो. "पंजाबांतील सर्व भागांत स्त्रीशिक्षणाचा फैलाव झालेला आढळतो. गांवठी शाळांतून मुली, शिक्षक व शिक्षकिणी हिंदू मुसलमान व शीख ह्या तिन्ही मुख्य जातींत आढळतात. यांची संख्या अर्थात मोठी नाहीं परंतु अशी स्थिति अन्यत्र कोठेंही नसलेली उत्तेजनकारक आहे."

मात्र फरक झालेला दिसत नाहीं. रावसाहेबांच्या पत्नीस रोजगारावर कराचीस येण्यापूर्वीच लिहितां वाचतां येत असे. व त्या प्रथम कोकणांत असतां व रावसाहेब दूर असतां त्यांचा पत्रव्यवहार होत असे. " पत्नीला मनाप्रमाणें शिक्षण देण्याच्या आड दोन गोष्टी प्रथम प्रथम आल्या. प्रकृतीचें अस्वास्थ्य व मातोश्रींचा दुराग्रह या दोन गोष्टींनीं माझ्या स्त्रीच्या शिक्षणाची पिछेहाट होत आहे. "

( २८।६।५५ इं. उ. रो. )

पुढें रावसाहेबांच्या पत्नी पोथ्या पुस्तकें नित्य वाचीत, रामरक्षा व गीता यांचा पाठ करीत व धोरणानें कामापुरता अर्थही लावीत. इतर ठिकाणीं रावसाहेबांच्या स्नेह्यांत इतका प्रयत्न झालेला दिसून येत नाहीं. १४।५। १८५६ च्या पत्रांत विनायकराव भागवत लिहितात " मी माझ्या पत्नीस शिकविण्याचा प्रयत्न केला पण यश आलें नाहीं. " अर्थात ही त्या वेळची स्थिति होती. या बाबतींत त्यांच्या इतर मित्रांच्या पत्रांतून स्वस्त्रीच्या शिक्षणाची जबाबदारी ओळखून आम्हीं अमुक प्रयत्न केला व अमुक यश आलें असा उल्लेख आढळत नाहीं. १८५४ सालीं कृष्णाजीपंत नूलकर यांनीं एका पत्रांत रावसाहेबांस लिहिलें:—" माझ्या पत्नीला शिक्षण देण्याविषयीं आपण केलेल्या युक्तिसिद्ध उपदेशाबद्दल मी आपला फार आभारी आहें. आम्हीं उभयतां एकत्र रहाण्याचा सुदिन येईतों शिक्षणपंथास तिला लावण्याचें मला होणार नाहीं याबद्दल वाईट वाटतें. " रावसाहेबांस मात्र या कामीं यश चांगलें आलें.

स्त्रियांची योग्यता थोर आहे, व आम्हीं त्यांस ती ओळखून त्यांच्या योग्यतेप्रमाणें वागविलें पाहिजे हे विचार त्यांच्या मनांत १८५५ सालाच्या सुमारास घोळत होते.

" लेफ्टनन्ट् सेटनचें लग्न कॅप्टन आर्थर यांच्या बहिणीशीं झालें. त्यासंबंधानें मि. फ्रियर यांकडे फराळ घातले होते. तो समारंभ

पहावयास सांपडला. तेथील प्रकार विशेषतः स्त्रीजातीला प्राप्त झालेली स्वतंत्रता व वरिष्ठ दर्जा हीं पाहून मी चकीत झालों. आमच्या देशांत स्त्रीपुरुषांस ही स्थिति केव्हां प्राप्त होईल ? " ( ११।७।५५ रो. उ. )

स्त्रियांनीं गायनकला शिकावी असें त्यांचें मत होतें म्हणून त्यांनीं स्त्रीगीत नांवाचा एक ग्रंथ **गोवर्धनपंत छत्रे** यांनीं केलेला १८६४ सालांत **स्टूडन्ट्स लिटररी** अॅन्ड **सायन्टिफिक** मंडळीच्या शाळांतील मुलींकरतां छापून प्रसिद्ध केला. त्यांत बायकांच्या गाण्यापैकीं कांहीं प्रसिद्ध गाणीं स्वरबद्ध व तालबद्ध करून तन्तुवाद्यावर कशीं वाजवावीं तें समजावून सांगितलें आहे. **स्टडंटस् लिटररी** अॅन्ड **सायंटिफिक सोसायटीच्या** विद्यमानें मुंबईस स्त्रियांकरतां निराळ्या कन्याशाळा स्थापून आपल्या मित्रांच्या साहाय्यानें पुढाकार घेऊन त्या चांगल्या स्थितींत ठेवण्याचें श्रेय **रावसाहेबांच्याकडे** आहे. यांच्या शाळा तपासण्यास प्रसिद्ध **केरो लक्ष्मण छत्रे** आले होते. त्यांनीं १७।१।१८६३ च्या पत्रांत असा शेरा दिला आहे कीं ' मी तुमच्या कन्याशाळा पाहिल्या व तेथील शिस्त व त्यांची दिसून आलेली हुशारी पाहून मला फार संतोष झाला." मुलींच्या शाळा काढल्या म्हणजे बायका लिहिणार वाचणार होऊन भर दिवसा दुसऱ्याचा हात धरून जातील अशा खेडेगांवांत राहणाऱ्या लोकांच्या चमत्कारिक व प्रबल पूर्वग्रहाची बाधा या मुंबईकर स्त्रीशिक्षणाभिमान्यांस केव्हांही झाली नाहीं. उलट रस्त्यांतून एखादा पंतोजी अथवा मोबेद, यांच्या मागून अथवा मागेंपुढें पाट्या घेऊन शाळेंत जाणाऱ्या मुलींचे घोळके हस्तमुखानें जातांना लवकरच दिसूं लागले. प्रोफेसर **केरो लक्ष्मण छत्रे** यांनीं **रावसाहेबांस** एका पत्रीं आपल्या मुलींच्या शिक्षणांत कोणता अभ्यासक्रम इष्ट आहे त्या विषयीं आपला अभिप्राय पुढें दिल्याप्रमाणें कळविला होता.

"स्त्रियांचें कार्यक्षेत्र म्हणजे तिचें घर व कार्यें म्हणजे घरकामें. असें आहे, तर मग लहान लहान मुलींना तत्त्वज्ञानासारखे उच्च विचार शाळांतून सुचण्याला वेळ कोठें आहे. विचार करून नव्या नव्या कल्पना काढण्यापेक्षां आधींच कोणी काढलेल्या कल्पनेप्रमाणें काम करून दाखविण्याचें त्यांस अधिक चांगलें साधतें. कांहीं अपवादात्मक व्यक्ती सोडून बीजगणित, भूमिति इत्यादि इत्यादि उच्च तऱ्हेच्या गणिताचें ज्ञान माझ्या मतें त्यांना निरुपयोगी आहे. जिथच्या तिथें शब्दावर जोर देऊन कसें शुद्धपणें वाचावें तें शिकवा. साधें व्याकरण, घरचे हिशोब ठेवणें, चित्रें काढणें, व गाणें, इत्यादि शिकवा. टोप्या, अंगरखे, व चोळ्या इत्यादि कपडे कसे बेतावे व शिंवावे यांकडे जास्त लक्ष द्या. भक्ष्यपदार्थांचे गुणावगूण सांगून उत्तम स्वयंपाक करावयास त्यांस आलेंच पाहिजे. त्यांस आरोग्यशिक्षण द्या व टापटीप ठेवावयास शिकवा व नेहमीं उपयोगी पडेल, असें औषधांचें ज्ञान द्या. एवंच वर सांगितलेलें सर्व प्रकारचें ज्ञान ज्याला आहे त्यानें खालील विषयावर पुस्तकें स्त्रियांकरितां रचून तयार करावीं.

१ सुलभ चित्रकलेचें पुस्तक.

२ मुलांचें संगोपन व शिक्षण यावर सुलभ पुस्तक.

३ शरीरसंपत्ति व ती कशी राखावी या विषयींचें सुलभ पुस्तक.

४ घरच्या वैद्यकीवर सुलभ पुस्तक.

५ शिंवणकामावर सुलभ पुस्तक.

६ टापटीप व वेळाच्या किंमतीवर सुलभ पुस्तक.

७ घरचे हिशोब ठेविण्याकरितां चोपड्या .

८ मुलांमुलींस व मैत्रिणींस पत्रें लिहिण्याचे मायने असणारें पुस्तक.

९ आमच्या देशांतील स्त्रियांस म्हणण्यासारख्या गाण्यांचें व भजनांचें पुस्तक.

स्टूडन्टस् लिटररी ॲन्ड सायन्टिफिक सोसायटीच्या मुलींच्या शाळा चांगल्या भरभराटीस आल्या तेव्हां शिकलेल्या स्त्रीशिक्षकांची उणीव भासूं लागली. कारण मुलींचे आईबाप, मुली जरा जाणत्या झाल्यावर शिक्षकवर्ग पुरुष असल्यामुळें शाळेंतून काढून घेऊं लागले. म्हणून राव-साहेबांनीं सरकारांत एक अर्ज स्त्रीशिक्षणपक्षपाती पुढाऱ्यांच्या सह्या घेऊन पाठविला होता. त्यांत स्त्रीशिक्षक तयार करण्यांत नार्मल स्कूल मुंबईस व अहमदाबादेस काढण्यांत यावें अशी मागणी केली होती. मिस् कार्पेन्टर या इंग्रज विदुषीबाईच्या या देशांतील आगमनाचा फ़ायदा या वेळेला मिळाला. दादाभाईंनीं येथील लोकांच्या विचारानें विलायतेहून एक अर्ज पाठविला होता. त्यावर मुंबईचे लोक इंग्लदमध्यें राहत होते त्यांच्या सह्या होत्या. त्याचा विचार होऊन सरकारांतून दादाभाईस २१।२।१८६८ रोजीं उत्तर आलें कीं पांच वर्षें पर्यंत नार्मल स्कूल काढण्याची योजना हिंदुस्थानसरकार करीत आहे. तिला स्टेट-सेक्रेटरी मंजुरी देत आहेत. पण एक अट अशी आहे कीं उदार लोकांनीं तितकेच रुपये वर्गणीनें गोळा करून सरकारांत भरले पाहिजेत.

या सरकाराच्या उदार आश्रयाचा उपयोग मंडळीनें चांगला करून घेतला. इष्ट तेवढे रुपये गोळा करून २८।६।१८६९ रोजीं नार्मल स्कुलांत शिकावयास जाणाऱ्या स्त्रियांस शिष्यवृत्ति देण्याचें जाहीर करण्यांत आलें.

याप्रमाणें इष्ट व शक्य तेवढें साहाय्य स्त्रीशिक्षणाचे कामीं रावसाहे-बांनीं केलेलें आहे. व त्याचीं फळें आज हिंदुसमाजास चाखावयास मिळत आहेत.

डाक्तर आनंदीबाई जोशी अमेरिकेंतून वैद्यक शिकून आल्यावर त्यांची कोल्हापूर संस्थानांत नेमणूक होईतों कांहीं काळ गेला. तितक्यांत त्यांना दुर्धर व्याधि जडला.व जवळ खर्चास नाहीं.व्हावी तशी मदत लोक करीत नाहींत अशी कहाणी दाजीसाहेब खरे यांनीं रावसाहेबांजळ गातांच

त्यांनीं थोडी रकम त्यांस देण्याकरतां दाजी साहेबांजवळ दिली. स्त्रीशिक्षणाचा अभिमान याप्रमाणें **रावसाहेबांनीं** शेवटपर्यंत बाळगिला होता.

## नाचाचा समारंभ.

दादाजीं बरोबर कीर्तनाला हरिबुवांचे देवळांत गेलों. परंतु कीर्तनकाराचे ऐवजीं तेथें *नायकीण आलेली आढळली! परंतु मीं पांच मिनिटें बसण्याचें कबूल केलें होतें त्याप्रमाणें बसून उठून आलों.

( ९।४।१८६९ रो. )

१५।२।१८६१ सालीं **राम बाळ** कृष्णाजी कलकत्त्याहून मोठ्या सरकारी कामगिरीवरून आले. तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ त्यांच्या स्नेह्यांनीं नाचाचा समारंभ केला. त्याची निमंत्रणपत्रिका **रावसाहेबांकडे** आली होती तीवर त्यांनीं असें लिहून ठेवलें आहे:—असल्या समारंभास शक्य तर जाऊं नये, असा निश्चय केला आहे.

२३।२।१८६७ रोजीं धिरजलाल मथुरादास यांकडे नाचाच्या समारंभास **राव**साहेब गेले नाहींत. २७।८।१८७० रोजीं **ठाणें** येथील **आचार्य** यांचे येथें नूतन गृहाच्या वास्तुशांतीप्रीत्यर्थ केलेल्या नाचाच्या समारंभास **राव**साहेबांस आमंत्रण होतें. **राव**साहेब गेले नाहींत.

## लग्न व खर्च.

१२।१२।५७ रोजीं **गोविंद नारायण माडगांवकर** यांनीं एक **राव**साहेबांस असें पत्र लिहिलें होतें:—हा लग्नाचे वेळीं मुंबईकर जो भपका व जी उधळपट्टी करतात त्यावर तुमचें ह्मणणें काय आहे ? ज्या आमच्या शिक्षणाचा आह्मीं एवढा गौरव करतों त्याचाच का हा सारा परिणाम ?

---

* हा चैत्राचा महिना असल्यामुळें तेथें रामनवमीच्या उत्सवांत गायनाची हजिरी देण्याचा नायकीणींचा प्रघात होता. तेव्हां कथेला प्रारंभ होण्यापूर्वी एकाद्या नायकीणीनें हजिरी लावली असेल. बुवांनीं कीर्तन आहे असें खोटें सांगितलें असें होत नाहीं.

ह्या शिक्षणानें आमच्यांत कोणचें असें रूपान्तर घडवून आणिलें आहे कीं त्याचा आम्हीं इतका गर्व वहावा ? खरें बोलावयाचें ह्मणजे अजून आम्हीं खऱ्या शिक्षणमंदिराचा चांगला पाया सुद्धां घातला नाहीं. बरोबर दिशा उमगल्याशिवाय शिक्षणप्रसारांत केलेले आमचे प्रयत्न आरंभावस्थेंतच निष्फळ होतील. योग्य दिशा आमच्या लोकांस दाखविण्याचे जों जों आम्हीं प्रयत्न करावेत तों तों लोक अधिकाधिकच चुकत जात आहेत. व वेडेपणा करण्याचा हट्टच धरीत आहेत. जोंपर्यंत त्यांस असल्या मूर्खपणाच्या चालींत मोठा आनंद वाटत आहे, तोंपर्यंत त्यांच्या हातून कांहीं चांगली गोष्ट घडून येईल अशी आशा करणें नको.

शिकलेल्या लोकांत लग्नांतील फाजील खर्च कमी करावा अशी इच्छा थोडी थोडी उत्पन्न झाली होती असें हें पत्र सांगतें.

या बाबतींत रावसाहेबांनीं एका मित्राची चांगली कान उघाडणी केली होती. “ कर्ज काढून लग्नें करण्याची चाल आहे ती दुसऱ्या खराब चाली आहेत त्यांतलीच आहे. ती पुढें चालवावी असा मी कोणास समजून उमजून सल्ला देण्यास खुषी नाहीं. केवळ लग्न झालें ह्मणजे सर्व आयुष्याचें सार्थक झालें असें मला वाटत नाहीं. ”

( ७।४।१८५९ चें हरिपंत दातार यांस पत्र. )

## लग्नाखातर कर्ज.

मोरोपंत नांवाचे रावसाहेबांचे एक कारकून होते त्यांस त्यांनीं एकदां स्पष्ट लिहिलें होतें !–“ जर मुलगी सांगून येत असली तर पैसे कर्ज काढून खर्च करण्याचें कारण नाहीं. जर दरमहा रुपये सावकारास लावून देण्यास खुषी आहांत तर तसे वर्ष सहा महिने जमविल्यानें थोडक्याच समयांत कार्य होऊं शकेल. ”

“ लग्नाच्या कामांत मुख्य हें तत्त्व ध्यानांत ठेवावें कीं एक पैसुद्धां कर्ज काढावयाचें नाहीं. याबद्दल सर्व जगाचा कोप झाला तरी

चिंता नाहीं. यांत सर्व आलें. प्रतिष्ठेला भुलून लक्षाधीश भयाभंगास गेले. हरिकृपेनें चालत आहे तों तसा मी जाण्यास कबूल नाहीं."

## हुंडा.

॥ ब्राम्हो विवाह आहूय दीयते कन्यकार्थिने ॥

हुंड्याच्याचाली विरुद्ध रावसाहेब होते. बऱ्हाणपूर येथील प्रसिद्ध श्रीमंत भुस्कुटे व सर दिनकरराव राजवाडे या दोन बड्या कुटुंबांची सोयरीक जुळवून आणविण्यांत रावसाहेब मध्यस्थ होते. तेव्हां हुंड्याच्या प्रश्नावर पुढील प्रमाणें आपला अभिप्राय त्यांनीं पत्रीं कळविला होता.

" मुलगी माझ्यामतें उत्तम आहे. कूळ ठीक आहे. आपल्या बेतास आल्यास माझी कबुली आहे असें श्रीमंत ताईसाहेब यांस सांगावें. दागिन्यांबद्दल एक अक्षरही विचारूं नये. आपण वधू पहावी. त्यांनीं वर पहावा आणि परस्परांस आनंद होईल असें कार्य करावें. संपत्ति क्षणभंगुर आहे. ती रामाच्या आदिशक्तीची च्छाया आहे. ह्मणून तिला मान द्यावा. परंतु मुख्य यजमानास सोडून तिला भुलूं नये."

( बाबासाहेब भुस्कुटे यांस पत्र. )

४।२।१८८६

रावसाहेबांनीं मुलाचें लग्न केलें तेव्हां त्यांस मनसोक्त हुंडा मिळाला असता. परंतु लग्न करते वेळीं हुंड्याची गोष्ट निघाली तेव्हां माझा मुलगा विकावयाचा नाहीं, असें त्यांनीं व्याह्यांस सांगितलें, व हुंडा मुळींच घेतला नाहीं.

## बालविवाह.

बालविवाहाची चाल या देशांत बराच काल प्ररूढ होती. इंग्रजी शिक्षणास आरंभ झाल्यावर या चालीविषयीं शिकलेल्या लोकांत चर्चा

सुरू झाली. " सोमण आले. लहानपणीं लग्नें करण्याविषयीं बोलून निजलों " ( १।२।१८६९ रो. उ. )

" स्त्रियांच्या पूर्णावस्थेची कल्पना हिंदूलोकांची कशीही असो मी तिला ( माझ्या पत्नीला ) अद्यापि लहान मूलच समजतों, आणि अजून कांहीं दिवस माझ्या बहिणीजवळ तिला कोकणांत ठेऊन आणखी वाढून द्यावी अशी माझी इच्छा आहे. " ( कृष्णाजीपंत नूलकर यांचें २७-१-१८५७ चें पत्र. )

नूलकरांप्रमाणेंच शिकलेल्या लोकांचें मत बदलत गेलें असेल. परंतु रावसाहेबांचें मत मात्र बदललें नाहीं. रावसाहेबांनीं आपल्या मुलाच्या लग्नाविषयीं वे॥ वामनराव जोशी यांस १४।९।१८८० च्या पत्रांत लिहिलें कीं आज मुलाच्या अकराव्या वर्षाचा आरंभकाल पाठविला आहे. सालमजकुरीं त्यास गृहस्थ करावा मग आपण स्वस्थ रहावें.

या मताप्रमाणें रावसाहेबांनीं आपल्या चिरंजीवांचें लग्न त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षीं करून टाकिलें. ही चाल रावसाहेबांइतक्या शिकलेल्या लोकांत गेल्या शतकाच्या अगदीं शेवटापर्यंत प्ररूढ होती. न्यायमूर्ति तेलंग यांनीं संमतिवयाच्या कायद्यातर्फे भाग घेऊनही आपल्या दोन्हीं मुलींचीं लग्नें लहानपणींच करून " अष्टवर्षा भवेत्कन्या " या स्मृतिवचनाला मान देते झाले.

आजमितीला मात्र या बाबतींत मोठ्या प्रमाणावर पुरातनमताभिमान्यांच्या आचारांत सुद्धां स्थित्यंतर झालें आहे. त्याचा संबंध सुधारणेच्या इच्छेशीं थोडा असून समाजाच्या आर्थिक स्थितीशीं अधिक आहे.

## वृद्धविवाह.

याबद्दल रावसाहेबांच्या पत्रव्यवहारांत फारसा खल झालेला दिसत नाहीं यावरून असें दिसतें कीं, शिकलेल्या लोकांस लौकर त्यांत कांहीं गैर

दिसूं लागलें नसावें; परंतु यांतही १८५० सालच्या एका पत्रांत रावसाहेबांस एका मित्रानें असें पत्र लिहिलें होतें:—“ आपण माझे मित्र आहांत व माझ्या सर्व हितगुजाच्या गोष्टींचें भांडार धन्याप्रमाणें आपल्या स्वाधीन केलेलें आहे. म्हणून जी गोष्ट आपल्या शिवाय मी कोणाजवळही बोलणार नाहीं तीवर आपलें मत द्या. बाबांचा हेतु पुन्हां लग्न करण्याचा आहे; या विषयीं आपलें मत काय आहे? माझ्या मतें बाबांनीं हा लग्नाचा विचार सोडून द्यावा.” यावर रावसाहेबांनीं काय मत दिलें तें त्यांच्या पत्रव्यवहारांत कोठें आढळलें नाहीं. एकाद्या मित्राचा, उतार वयांत प्रसंग पडला म्हणून, दुसरें लग्न करण्याचा बेत रावसाहेबांस समजला तर ते त्यास विचारीत ‘ लग्न करीत आहांत, पण नीट विचार केला आहेना ? ”

रावसाहेबांचें हें मत पुढें स्पष्ट दिसून आलें. असाच प्रसंग त्यांच्या प्रिय पत्नीच्या विरहानें खुद्द त्यांचेवर आला तेव्हां त्यांस लग्न करावें असें नुसता उपदेश करून रहाणारा नव्हे परंतु पुढें मोठी, मोहक, कुलीन व चतुर मुलगी उभी करण्यास तयार अशा एका मिरज येथील विद्वान मित्रास त्याचें किंचितही मन न दुखावितां व आपलें मत विरुद्ध असलें तरी युक्तीला धरून कसें आहे तें शांतपणें व स्पष्टपणें रावसाहेबांनीं लिहून कळविलें तें असें:—

“ + + + आतां आपण मला शरीरसंबंधाविषयीं गौरवानें लिहिलें तें आपलें सौहार्द पाहून मी आपला आभारी. आपण लिहिलें तें जरी सर्वांशीं खरें धरिलें तरी मी मागील सुटींत मुलगा घेतला आहे त्याचा व्रतबंधादि होऊन तो मार्गास लागला ह्मणजे मी सुटलों असें मानितों; आणि जरी मी अद्यापि साधक अवस्थेंत आहें ह्मणून ‘ बलवान् इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ’ हें मला पूर्ण लागत आहे, तरी फक्त अन्नाकरितां आतां दुसरा प्राणी देहाच्या संबंधानें विपत्तींत पाडावा असें मन घेत

नाहीं ज्या मुलीविषयीं आपण लिहितां तिलाही पुसलें तर ती पूर्व-वयस्क नवरा असावा असेंच सांगेल; आणि पत्नी देह सोडून गेली तरी तिचा ऋणानुबंध तिनें तोडिला नाहीं, असें मी मानतों. तेंच ईश्वर खरें करो."

आपला सेवक
**वि. ना. मंडलिक.**
१७।११।१८७९

रावसाहेबांप्रमाणें या काळींही विचारी लोक असत व खऱ्या आर्य-संस्कृतीप्रमाणें आचरण करीत; त्याचा एक मासला खालीं दिला आहे. सरदार विंचूरकर यांच्या थोर घराण्यांतील एका पुरुषाचें हें पत्र आहे.

" संततिस्थान शुद्ध आहे असें ज्योतिषी सांगत असतांही लग्न न करण्याचा आपला बेत " रावसाहेबांस मराठी पत्रांत त्यांनीं कळविला होता.

" हल्लीं जगाचा प्रवृत्त व्यवहार, स्त्रियांचे नैसर्गिक गूण, स्वतांच्या वयाची अवस्था, अशा कित्येक प्रकारचा पोक्त विचार करून इतउत्तर गृहस्थाश्रम करणें नाहीं असा मनाचा दृढनिश्चय करून केवळ भगवत्सेवेंत कालातिक्रम करीत आहें. संतति असावी असें शास्त्र आहे. तरी पुष्कळ बंधूंतून येक जर पुत्रवान असेल तर सर्व पुत्रवान समजले जातात."

"बासष्ट त्रेसष्ट वर्षांचे सुमारास वाराणसीस जाण्याचें मनांत आहे. पुढें आयुर्दायाचें मान लक्षांत आणून अंत्याश्रम स्वीकारण्याचा हेतु आहे. आयुष्याचा नियम नसल्यामुळें पश्चात् अपकीर्तीचें बीज इहलोकीं ठेऊन बरोबर पाथेय तेंच न्यावें लागेल असे अनेक विचार मनांत येऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्यासाठीं मन अत्यंत पराङ्मुख आहे."

( सही रघुनाथ विठ्ठल विंचूरकर ).

यांत केलेला वृद्धविवाहनिषेध, बंधूंच्या मुलांवर मनांत असलेलें सुतनिर्विशेष प्रेम, वृद्धापकालीं भगवद्भजनांत काल घालविण्याची इच्छा व शेवटीं संन्यास घेऊन चारही आश्रमांची पूर्णता करण्याचा आदर हे आर्य संस्कृति दाखविणारे थोर गुण सरदार घराण्यांतील थोर पुरुषास भूषणावह आहेत.

## बहुपत्नीकत्व.

एक पत्नी हयात असतां दुसरी करणें या चालीच्या विरुद्ध रावसाहेब होते. स्वतांची स्त्री अगदीं विकलांगी असतां तिची सेवा करण्यांतच भूषण मानूं लागले व घरच्या जुन्या चालीच्या मायेच्या मनुष्यांनीं संतत्यर्थ दुसरें लग्न करण्याची गोष्ट तोंडावाटे काढतांच त्यांस फार दुःख झालें.

एक विद्वान शास्त्री व रावसाहेब यांची पत्रोपत्रीं ओळख झाली. पुढें रावसाहेबांकडे मुंबईस येण्याचा प्रसंग आला. शास्त्रीबुवांनीं एक पत्नी हयात असतां दुसरी संततिप्रीत्यर्थ केली होती, ही गोष्ट मागाहून रावसाहेबांस कळली तर कदाचित् त्यांस राग येईल म्हणून रावसाहेबांनीं त्यांस मुंबईस येऊन भेटीचें जें आमंत्रण दिलें होतें तें स्वीकारते वेळीं आपल्या हातून हें सदोष वर्तन घडलें असल्याचें रावसाहेबांस पत्रीं अगोदर कळवून टाकिलें !

## खाण्यापिण्याचा विधिनिषेध.

खाण्यापिण्याचा विधि निषेध हा प्रथम प्रथमच्या सुधारकांस आमच्या शास्त्रांतील अगदीं अप्रयोजक प्रकार वाटला. व सर्व तऱ्हेच्या सुधारणेची रचना या विधिनिषेध दूर करण्यावर अवलंबून आहे अशी त्यांची समजूत होऊन गेली. अशा सुधारकांविषयीं रावसाहेबांचें मत नेहमीं प्रतिकूल असे.

" सुधारणेच्या या सर्व योजनांच्या मुळाशीं असलेले तात्त्विक प्रश्न हिंदुधर्माच्या मुळाशीं आहेत. तिकडे हे सुधारक लक्षच देत नाहींत अथवा त्याचा उघड उघड उपहास करतात. ' बिस्किटें व ब्रॅन्डी ' यांचा आधार घेऊन समाजाची रचना ( पुनर्रचना ) करण्याची आशाच नको ! सुधारकी नीतीला ऐहिक आधार उपयोगाचे नाहींत, पारमार्थिकच पाहिजेत. तसे जोंपर्यंत ते नाहींत तोंपर्यंत त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ होतील एवढेंच नाहीं पण समाजास अपायकारक होतील. "

" सुधारकांस जर आपले मनोविकार आंवरतां येत नाहींत व सुधारकांपैकीं बहुतेकांचें आचरण जर अगदीं निरर्गल असतें तर मग आम्हीं त्यांचें अनुकरण करावें अशी इच्छा त्यांनीं कशी व कां करावी ? जें तुम्हांस स्वतः करून दाखवितां येत नाहीं तें दुसऱ्यास कसें सांगतां येईल. तुम्हीं सुधारकांनीं स्वतां काय असें केलें आहे किंवा करीत आहात कीं त्याच्या जोरावर तुमचें अनुकरण करा असें तुम्हीं आम्हांला सांगूं शकाल ? तुम्ही केलेला स्वार्थत्याग कोठें आहे ! + × × हे कर्मभ्रष्ट प्रचारक हिंदुस्थानचें पुनर्ज्जीवन करणार आहेत. हिंदुधर्माच्या विपुल धर्मभोळेपणावर हे नास्तिक, हे विषय सुखलंपट राजेश्री, आम्हांपुढें उच्चस्वरांत शब्दपांडित्य काय करणार ? या थोर विभूतींतील एकाच्या सहवासाहून मला अगदीं सर्वांत धर्मभोळ्या हिंदूचा सहवास पतकरेल ! "

" याच विषयावर पुढें लक्ष्मीदास खिमजी यांशीं भाषण झालें. या दुर्दैवी देशावर येऊन पडलेलें सर्वांत मोठें संकट म्हणजे मद्यपानाचा प्रसार हें होय असें जें माझें म्हणणें तें त्यांस मानवलें. "

( १०।१।६१ रो. ई. उ. )

## परमहंसक्लब.

१८६०।६१ च्या सुमारास राम बाळकृष्णाजीप्रभृति मंडळीनीं वरील नांवाचा एक क्लब काढिला. त्याला दिलेलें 'परम हंस' हें नांव जें शुकाचार्यां-

सारख्या महान विरक्त मुनींनांच देण्यांत येतें, तें त्यांनीं आपल्या क्लबास दिलें होतें तें यथार्थ होतें किंवा काय या विषयीं शंका आहे. कारण जरी या क्लबाचे सभासद क्लबानें घालून दिलेल्या नियमांनीं आचार करण्यास बांधलेले होते तरी त्यांचा तो आचार सभासदांव्यतिरिक्त कोणाच्या ओळखीचा झाला नव्हता. रावसाहेबांचें मत या क्लबाच्या विरुद्ध असें दिलेलें रोजनिशींत सांपडतें.

नंतर हा क्लब अज्ञात वासांत असतांच गुप्त झाला.

## प्रार्थनासमाज.

हा समाज मुंबईस १८६९ सालीं स्थापन झाला. त्यापूर्वी बरेच वर्षांपूर्वीं ह्मणजे १८३० सालीं कलकत्त्यास राजा राम मोहन राय यांनीं ब्रह्मसमाज स्थापन केला. हे दोन्ही एकेश्वरी पंथ आहेत. सृष्टीचा एक कर्ता तो ईश्वर होय. तो अनंत अद्वितीय आहे. त्याखेरीज बाकी सर्व सृष्टवर्गात दाखल आहे. समाज फक्त ईश्वराची पूजा करील दुसऱ्या कोणाची करणार नाहीं. तो सर्वांचा पिता व आह्मीं माणसें सर्व त्याचीं लेंकरें. ह्मणून सर्वांनीं भावाप्रमाणें एकमेकांशीं वागलें पाहिजे.

ही विश्वबन्धुत्वाची व समतेची कल्पना चांगली आहे. ब्रह्मसमाजाचे अध्यक्ष देवेंद्र टागोर होते व प्रचारक प्रसिद्ध वक्ते बाबू केशव चंद्रसेन होते. हिंदुत्वाचीं कांहीं लक्षणें धारण करावीं अशा मताच्या समाजाच्या सभासदांनीं आपल्या समाजास 'आदि समाज' हें नांव दिलें व ज्यांस तसें कांहीं चिन्ह ठेवावयाचें नाहीं त्यांनीं आपल्या समाजास प्रागतिक हें नांव दिलें. हिंदु, ख्रिस्ती, पार्शी व मुसलमान यांस या समाजांत सामील होतां येतें. परंतु हिंदूनीं वेदांचें विसर्जन समुद्रांत केल्यावर, ख्रिस्त्यानें बायबलाचा कडेलोट सुनी पर्वतावरून केल्यावर व पार्शी व मुसलमान यांनीं अशीच वाट अनुक्रमें झेन्दाविस्ता व कुराण यांची लावल्यावर

सर्व विश्वाला उत्तम मार्गाला लावणारा एकादा नीतिग्रन्थ जर या समाजवाल्यांनीं निर्माण केला असता तर या समाजाचें वर्चस्व फार वाढलें असतें. आर्यसमाजानें व थिऑसफीनें अनुग मिळविण्यांत फार आघाडी मारली आहे. कारण एकास वेद व दुसऱ्यास सर्व धर्मग्रंथ मान्य आहेत.

रावसाहेबांच्या कागदपत्रांत या दोन्हीं ( ब्रह्म व प्रार्थना ) समाजांच्या विरुद्ध अथवा तर्फे नांव घेऊन कांहीं उल्लेख सांपडत नाहीं. निरनिराळ्या धर्मपंथाच्या लोकांनीं स्वमतप्रकाशन करीत असतां इतरांच्या धर्मसमजुतींची निंदा करीत सुटूं नये असें रावसाहेबांचें मत होतें.

" जें जें म्हणून इतर लोक पवित्र मानतात त्याची निर्भर्त्सना करीत सारखा एखादा मनुष्य जर रस्त्यांत फिरेल तर त्यानें आपलें डोकें पहिल्यानें संभाळावें हें बरें आणि क्ष जर हिंदुस्थानांत नसता तर जें तो करीत आहे तें करूं शकला नसता. "

( नारायण रावजी जोगळेकर, यांस पत्र. )

बाबू केशव चंद्रसेन यांचीं व्याख्यानें ऐकण्यास टाउन हॉल मध्यें रावसाहेब जात असत. नारायण परमानंद प्रार्थनासमाजाचे सभासद असून त्यांस नेटिव्ह ओपिनियनचे रावसाहेबांनीं मुख्य लेखक नेमिलें होतें. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

हा समाज स्थापन करण्यांत प्रस्थापकांचा उद्देश एक राष्ट्रीयधर्म काढण्याचा होता. "*आह्मीं एक राष्ट्रीय धर्म काढण्याचा प्रयत्न केला, पण यश आलें नाहीं असें " रावसाहेबांना एका प्रार्थनासमाजाच्या अनुयायी मित्राचें पत्र आलें होतें.

---

* We tried to establish a national religion, but failed.

## महाराजांचा खटला.

लोकांच्या पुढें "सुधारक" ह्मणवून रावसाहेब पहिल्या प्रथम १८६० सालीं आले.

या सालीं सत्यप्रकाश व रास्तगोफ्तार या पत्रांत यदुनाथजी महाराज यांच्या विरुद्ध कांहीं लेख प्रसिद्ध झाले. त्यावरून त्या पत्राचे मालक, करसनदास मूलजी व तें पत्र छापून प्रसिद्ध करणारे नानाभाई राणिना यांच्यावर बे अब्रूची फिर्याद हायकोर्टांत महाराजांनीं दाखल केली. ह्या लेखांत महाराजांच्या कांहीं आक्षेपार्ह चालींवर खरमरीत टीका आली होती. कोडतांत रावसाहेबांनीं प्रतिवादीतर्फे व महाराजांचे विरुद्ध अशी साक्ष दिली होती. त्यावेळेस आपल्या जबानींत ते ह्मणाले कीं, सुधारक शब्दाचा जो वाजवी अर्थ ह्मणजे धर्मसंशोधक असा आहे, त्या अर्थानें मी सुधारक आहें. व धर्माला प्राक्कालीन शुद्ध स्वरूप प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे.

या महाराजांच्या ह्मणजे वल्लभाचार्यपंथाशीं रावसाहेबांचा किंवा त्यांच्या एकंदर विविध जातीय दक्षिणी समाजाचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नव्हता. मग ते या साक्ष देण्याच्या भानगडींत कां पडले व महाराजांच्या कांहीं भक्तांच्या रोषास विनाकारण कां हेतु झाले, याचें कित्येकांस गूढ वाटेल; परंतु त्याचा जबाब त्यांनीं आपल्याच जबानींत दिला आहे. या खटल्यांत तुमचा हितसंबध काय असें विचारतांच रावसाहेबांनीं असें सांगितलें कीं बहुजन समाजांतील मी आहें एवढाच आहे.

यांचे सहकारी मित्रही या खटल्यांत महाराजांविरुद्ध साक्ष देण्यास गेले होते त्यांत प्रमुखत्वें डा. भाऊ, जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक, लखमीदास खिमजी वगैरे होते.

हा काळ फार सुशिक्षित लोकांचा मोठ्या चर्चेचा होता.

"कर्सनदास माधवदास यांबरोबर वरळीकडे फिरावयास गेलों. सामाजिक उन्नतीचा रस्ता, मांसाशन व मदिरापान—पुरातन कालीं व प्रस्तुत कालीं—या विषयावर चर्चा झाली ( २४।१०।१८६३ रो. ई. उ. )"

"हिंदूंची शारीरिक अवनति; त्यांची राहाणी; त्यांचें खाद्य; त्यांत होत गेलेला फरक; अपूर्व कल्पनाशक्ति, अथवा रचनाशक्ति यांचा त्यांच्यांत असलेला अभाव; मराठींत वेद छापून काढणें; केशवपन, व सेनासाहाय्य देण्याच्या करारानें सामन्तांची उत्पत्ति इ० विषयांवर **वि. ना. भागवत** यांबरोबर चर्चा झाली. "( ९।११।१८६३ रो. उ. )

" हिंदूंचा धर्म, मुक्तिमार्ग यांवर पाध्ये यांबरोबर. "

" देवतांवर हिंदूंचा विश्वास, वेदान्त व प्रकाशित वेदान्त " यांवर **जे. पेरी** यांजबरोबर.

" ब्रह्मसमाज व मूर्तिपूजा " यांवर डाक्टर भाऊंशीं.

" धर्माची अवश्यकता व जाति व सत्य यांवर मि. लीवार्नर यांबरोबर ( १८६४ रो. उ. )

पुढें थोड्या क्रियेचा काळ आला.

## पुनर्विवाह.

**॥ नष्टमृते प्रव्राजिते क्लीबेच पतिते पतौ ॥**
**पञ्चस्वापत्सुनारीणां पतिरन्यो विधीयते**

( पाराशर स्मृति )

या नंतरची या प्रांतांतील सामाजिक सुधारणेची चळवळ म्हटली म्हणजे पुनर्विवाहाच्या प्रसारार्थ झालेली होय. इंग्रजी शिक्षणास आरंभ बंगाल्यांत आधीं झाला होता. तेव्हां या सुधारणेच्या विषयाचा न्यायदृष्टीनें व शास्त्रदृष्टीनें विचार करावयास तेथीलच लोक आधीं लागले. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं विधवाविवाहमंडनार्थ एकग्रंथ

लिहिला. व त्यावरून जी बंगाली लोकांनीं चळवळ केली तिच्या योगानें १८५६ सालच्या जुलै महिन्यांत विधवाविवाह कायदेशीर ठरविणारा कायदा सरकारानें केला.

नाहीं म्हणावयास १८५४ सालीं इकडे कांहीं खटपट लोकांत सुरू होती. तेव्हां रावसाहेब कराचीस होतेः–"त्यांचे मित्र वि० ना० भागवत यांनीं लिहिलें " मुंबईस पुनर्विवाहोत्तेजक संस्था स्थापण्यांत येत आहे. तीस फक्त पायाच्च नाहीं. खासगी द्वेषामुळें कार्याचा मात्र नाश होत आहे."

या विषयावर रावसाहेब कधीं कधीं आपल्या मित्रांजवळ वाद करीत असत. " समाजांतील मनाला उद्वेग आणणाऱ्या कांहीं चाली रीतीच्या बंधनांतून हिंदू स्त्रियांची मुक्तता कशी होईल ह्या विषयीं नाना जवळ बोलणें झालें. ( २२।४।१८६१ रो. उ. )

एकाद दुसरा कोणी स्नेही मधून मधून आठ वर्षांच्या मुलीवर गुदरलेल्या या उद्वेगकारक प्रसंगाची वार्ता कळवी. परंतु ही करुणास्पद विधवांची स्थिति सुधारण्या करतां काय करतां असें विचारणारा राव-साहेबांपुढें कोणी १८६५ पर्यंत उभा राहिला नव्हता. १८ अक्टोबर १८६५ तारखेचें एक पत्रक स्वतांच्या सहीचें सरदार गोपाळराव देशमुख यांनीं मित्रमंडळींत वाटलें त्यांतील एक रावसाहेबांकडे आलें होतें. त्याचा भावार्थ खालीं दिल्याप्रमाणें होता. " नारायण जगन्नाथ भिडे वकील, यांचें कुटुंब निवर्तल्यामुळें त्यांवर पुनर्विवाहाचा प्रसंग येऊन तसा विवाह करण्याचा त्यांचा हेतुही आहे."

" आणि गतभर्तृकास्त्री करण्यास शास्त्राची अनुकूलता आहे असें जाणोन ते करणार परंतु त्या गोष्टीस कांहीं विद्वान व निश्चयी मंडळीची अनुकूलता पाहिजे आणि तशी अनुकूलता आहे किंवा नाहीं हें सम-जण्याकरितां प्रथम अशा प्रकारचीं पत्रें आपले सारखे सूज्ञ व निश्चयी

गृहस्थांकडे पाठविलीं आहेत. आणि भिडे यांनीं तसें केलें असतां कदाचित् अज्ञ मनुष्यांकडून वाळिताचा वगैरे उपसर्ग झाल्यास त्या सुखदुःखाचे आम्हीं बराबरीनें वांटा घेण्यास निश्चयानें राजीं झालों आहों तरी असा सर्वांचा निश्चय कळविण्या करतां येक रुपयाचे स्टांप कागदावर करारनामा अडचणी न घालितां सुलभ रीतीचा करावा त्याचा नमुना येणें प्रमाणें."

'आम्हीं खालीं सह्या करणारे यांणीं प्रत्येकासीं व सर्वांसीं प्रमाणपूर्वक असा करार केला आहे कीं रा. रा. भिडे यांणीं विधवेबरोबर पुनर्विवाह केल्यास त्यांसीं अन्नोदक विवाहादिक व्यवहार आज पर्यंत चालत आल्याप्रमाणें करण्यास आम्हीं कबूल आहों.'

"याचा बेत असा आहे कीं प्रथम आपण आपला विचार आम्हांस कळवावा. या नंतर जितक्यांची अनुकूलता दिसेल त्यांची संख्या व नांवें उलट आपल्याकडे लिहून पाठवूं आणि संख्या बरीच आहे असें दिसल्यास आपल्याकडेस सदरहू नमुन्याप्रमाणें सहीकरतां जो कागद पाठवूं त्याजवर सही करून पाठवुन द्यावा. कारण पडल्यास आपलें नांव प्रगट केलें जाईल. तेथपर्यंत विश्वासपूर्वक गुप्त राखूं."

याच्या खालीं भिडे यांची मान्यता होती. या पत्रकाला १४।११। १८६५ रोजीं रावसाहेबांनीं नकारात्मक इंग्रजींत उत्तर दिलें. त्याचा सारांश असा होता. "आपणामध्यें आधींच पुष्कळ जाती झाल्या आहेत. त्यांतच आणखी एक नवी जाति निर्माण करावी असें मला तत्त्वतः मान्य नाहीं. सामान्य जनता पुढें येऊन योग्य तेवढा पाठिंबा या कार्याला अद्याप देत नाहीं हा तिचा दोष नाहीं कारण न्याय्य व सरळ मार्गानें, जनतेची या सुधारणेच्या इष्टत्वाबद्दल समजूत घालण्याचे प्रयत्न अद्यापि कोणी केलेले नाहींत. पुनर्विवाहास शास्त्राज्ञा आहे म्हणून रा. रा. भिडे पुनर्विवाह करण्याच्या विचारांत आहेत. या विषयीं मी

एवढेंच ह्मणतों कीं मनूच्या स्मृतींत पुनर्विवाहास आधार नाहीं. व दुसऱ्या ऋषींच्या स्मृतींत आधार शोधूं जाणें ह्मणजे शशशृंग शोधीत रानें वनें धुंडण्यासारखेंच आहे. ”

“ भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न नव्या चालींचा हिंदुसमाजांत प्रवेश झालेला आह. त्यांतीलच ही एक आहे असें समजावें. ”

“ म्हणून रा. रा. भिडे यांच्या सारखा संभावित गृहस्थ तितक्या योग्यतेच्या स्त्रीशीं पुनर्विवाह करून ही पुनर्विवाहाची चाल हिंदुसमाजांत पाडीत असेल तर तें त्यांस भूषणावह आहे. परंतु जो लेख–( जरी कायदेशीर रीतीनें आंत लिहून दिल्याप्रमाणें वागावयाला मला भाग पाडणार नाहीं तरी–) नीतिदृष्ट्या मला बांधून घेईल, माझें सर्व स्वातंत्र्य जन्मभर नष्ट करील व माझी इच्छा नसतां ज्यांचा माझा परिचय नाहीं किंवा ज्यांचा माझा परिचय असून ज्यांचे गुणावगुण पहातां ज्यांच्याशीं सहवास ठेवणें अगदीं अनिष्ट आहे, त्यांच्याशीं, केवळ त्यांनीं रा. रा. भिड्यांना असा लेख लिहून दिला एवढ्या करतां अन्नोदकग्रहण पूर्वक वैवाहिक व्यवहार मला करावयाला लावील, तो मी लिहून देण्यास तयार नाहीं. ”

तथापि रावसाहेब अन्य तऱ्हेनें पुढें येऊन पुनर्विवाहास साहाय्य करण्यास तयार होते.

मुंबईंत एक १४।१२।१८६५ रोजीं पुनर्विवाहोत्तेजक सभा स्थापन झाली. त्यांत रावसाहेबांचें अंग जाहीरपणें होतें. तिचे प्रथमतः ७४ समासद होते त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

१ आनरेबल माधवराव विठ्ठल विंचूरकर, २ मोरोबा कानोबा, ३ गोपाळराव हरी, ४, धीरजलाल मथुरादास, ५ बाळाजी पांडुरंग, ६ गणपतराव भास्करजी, ७ वासुदेव बल्लाळ खरे, ८ जनार्दन विनायक बापट ९ नारो बाळकृष्ण पटवर्धन, १० जगन्नाथ सदाशिवजी, ११ हरिचंद

सदाशिवजी, १२ सिताराम विष्णु प्रभू १३ गणपतराव गोपाळ, १४ विठ्ठल नारायण पाठक १५ हरी बाबजी, १६ महादेव व्यंकटेश १७ नारायण वासुदेव, १८ गणेश गंगाधर, १९ विनायक यशवंत, २० गोपाळ रावजी, २१ भिकाजी बळवंत गर्दे, २२ रामचंद्र आनंदराव उदास, २३ बापू कृष्णाजी, २४ नारायण बापूजी साठे, २५ शांताराम नारायण, २६ खंडेराव चिमणराव, २७ शामराव नारायण, २८ भास्कर हरि भागवत, २९ नारायण महादेव परमानंद, ३० बाळ मंगेश वागळे, ३१ नीळकंठ महादेव, ३२ शांताराम विठ्ठल, ३३ साजो कृष्ण धोंड, ३४ आप्पाजी बापूजी, ३५ सखाराम परशराम, ३६ मार्तंड बाळकृष्ण, ३७ कृष्णाजी वासुदेव, ३८ आप्पाजी परशराम रानडे, ३९ कृष्णाजी विनायक ठाकूर, ४० महादेव रामचंद्र, ४१ गंगाधर सिताराम, ४२ बाळकृष्ण बापूजी, ४३ वामन कृष्णाजी देशमुख, ४४ गोविंद नरहर साठे, ४५ दाजी शास्त्री लेले रेवदंडेकर, ४६ चिंतामण विनायक, ४७ चिंतो कृष्ण देशमुख, ४८ विष्णु परशराम शास्त्री, ४९ लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री, ५० सदाशिव हरि खरे, ५१ रावजी गणेश, ५२ माधवराव पांडुरंग बर्वे, ५३ विश्वनाथ नारायण मंडलिक, ५४ विनायक जगन्नाथ शंकरशेटजी, ५५ मंगळदास नथुभाई, ५६ विनायक वासुदेवजी, ५७ वासुदेव पांडुरंगजी, ५८ नारायण दीनानाथजी, ५९ नारायण दाजी, ६० महादेव गोविंद रानडे, ६१ दादोबा पांडुरंग, ६२ रामचंद्र बाळकृष्णजी, ६३ आत्माराम पांडुरंग, ६४ निळकंठ अनंत जोशी, ६५ शेट हंसराज करमसी, ६६ भिकाजी अमृत, ६७ बाळकृष्ण सदाशिव भिडे, ६८ रघुनाथ नारायण खोटे, ६९ हरिचंद्र चिंतामण, ७० काशिनाथ मैराळ शास्त्री, ७१ मोरोबा विनोबा, ७२ विश्वनाथ गोविंद चोळकर, ७३ माधव नारायण शिरगांवकर, ७४ विष्णु बळवंतराव.

२८ जानेवारी १८६९ मध्यें सभासदांची सभा भरून तिचे उद्देश कांहीं नियमांत गोंविले होते. त्यांतील मुख्य असे होतेः—

१ विधवापुनर्विवाह करणें मानवी स्वभावास नीतीस व धर्मशास्त्रास अनुकूल असतांही आपल्या लोकांमधें पुष्कळ वर्षांपासून या चालीचा प्रचार बंद होता. त्याची सांप्रतच्या स्थितीस फार अवश्यकता आहे. यास्तव याचा उद्धार करावा हा या मंडळीचा उद्देश आहे. ह्मणून हिनें "पुनर्विवाहोत्तेजक असें नांव घेतलें आहे."

२ हा हेतु सिद्धीस नेणें करतां ही मंडळी हरएक प्रकारचा यत्न करील ह्मणजे या विषयासंबंधीं ग्रंथ वगैरेचा प्रसार करील. पुनर्विवाहास योग्य दिसेल अशी मदत करील. या सर्व कामाकरतां इतर ठिकाणीं आपल्या शाखा स्थापन करील, आणि हेंच काम सिद्धीस नेण्यास मनुष्यें नेमील.

३ ज्या ज्ञातींत पुनर्विवाह नाहीं त्या ज्ञातींतील जे गृहस्थ आपला हेतु या मंडळीच्या उद्देशाप्रमाणेंच असून या सभेचे सभासद होण्या विषयीं आपली इच्छा दिलेल्या नमुन्याप्रमाणें लेखनद्वारा कळवितील त्यांस व्यवस्थापक मंडळीच्या अनुमतें सभासद केलें जाईल इत्यादि पुढील नियम सभेचीं कामें चालविण्याबद्दल होते. याच्या सभा कांहीं आंग्रे यांच्या वाडींत सरदार विंचूरकर यांच्या बिऱ्हाडीं भरत असत. अशी सभा निघणार आहे हें वृत्त ऐकून कृष्णाजीपंत नूलकर यांनीं ५।११।६५ चें इंग्रजी पत्र रावसाहेबांस लिहिलें त्याचा सारांश—

"पुनर्विवाहाची रूढी पाडणें ही फार महत्वाची सुधारणा आहे, स्वतां पुनर्विवाह करून लोकांस उदाहरण घालून देण्यास जो पुढें येईल त्याचें खाजगी वतन सर्व प्रकारें निर्दोष असेल तर बहुजनसमाजावर त्याचा कांहीं परिणाम घडेल. नुसतीं मतें घेऊन सामाजिक संघ स्थापन करून कांहीं होणार नाहीं."

पुनर्विवाहोत्तेजक सभा निघणार आहे व तींत रावसाहेबांचें अंग आहे असें समजतांच मुत्तुकुमार स्वामी या लंकानिवासी बॅरिष्टरानें २५।

३।६५ चें पत्र रावसाहेबांस इंग्रजींत लिहिलें त्याचें भाषांतरः—" हिंदुधर्म-सुधारक होण्याचा आपला विचार सोडूं नका. पश्चिम हिंदुस्थानच्या इतिहासांत तुमचा जन्म म्हणजे धार्मिक सुधारणेचें सीमाचिन्हच होऊं द्या. तुमच्या सारख्या शीलाचे जर पन्नास लोक हिंदुस्थानभर पसरतील तर हिंदुस्थान काय काय होणार नाहीं ! "

या अवधींत रा. रा. भिडे, पुणें अदालतींतील वकील, यांचा पुनर्विवाह रा. रा. मोरोपंत पेंडसे यांच्या कन्येशीं मुंबईनजीक वांद्रें मुक्कामीं अगदीं बभ्रा केल्याशिवाय झाला होता. तो झाला कीं न झाला हें कोणास कळलें नाहीं. हिंदुसमाजांत योग्य सुधारणा व्हावी असें मनापासून इच्छा करणारे रावसाहेबांचे परम मित्र मि. जे. गिब्स् यांनीं या पुनर्विवाहाच्या वेळेस हजर राहण्याची २०।११।१८६५ च्या पत्रांत रावसाहेबांस विनंति केली तिचा सारांश.

" एक पुनर्विवाह लवकरच होणार आहे. हें तुम्हांस विदित आहेच. अमुक गृहस्थ मुलीचें कन्यादान करणार आहे. परंतु कांहीं प्रतिष्ठित साक्षी पाहिजे आहेत. नाहींतर लोक म्हणतील हा पुनर्विवाह झालाच नाहीं. "

" शक्य तर हजर रहावेंच. "

या पुनर्विवाहाचे वेळेस रावसाहेब हजर नव्हते.

त्यानंतर तसेच बरेच दिवस गेले. ३।२।६७ रोजच्या अंकांत ने. ओ. मध्यें ' पुनर्विवाहास तयार ' ह्मणून एकाची जाहिरात आली होती. पुढें १५।६।१८६९ रोजीं एक पुनर्विवाह मुंबईस मोठ्या थाटाचा झाला. वर, रा. रा. पांडुरंग करमरकर, जात चित्पावन ब्राह्मण, वय २५, धंदा शाळामास्तर, जिल्हा खानदेश, ( मूळगांव अडी तालुके रत्नागिरि ) वडिलांचें नांव विनायकराव करमरकर; वधू, रा. रा. वामन प्रभाकर परांजपे यांची कन्या वेणूबाई, जात चित्पावन ब्राह्मण, वय १७.

विवाह करण्याचें निश्चित झाल्यावर पहिल्यानें, १ वे॥ विष्णु परशराम शास्त्री, २ श्रीकृष्ण शास्त्री तळेकर, ३ विष्णू मोरेश्वर भिडे, ४ गोपाळराव हरी देशमुख, ५ महादेव गोविंद रानडे, ६ जनार्दन सखाराम गाडगीळ व ७ विष्णू परशराम रानडे यांच्या सहीनें एक विज्ञप्तिपत्र पुष्कळ पुढारी लोकांकडे पाठविण्यांत आलें. त्यांत दोन चार प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें मागविलीं होतीं.

१ पुनर्विवाहितांशीं अन्नव्यवहार आपण करणार कीं नाहीं ?

२ आपण न याल तर स्त्रियांची लग्नामध्यें जरूर असते; तर कुटुंबास पाठविणार कीं नाहीं ?

३ यावयास नच झालें तर पुनर्विवाहितांशीं अन्नव्यवहार केलेल्याशीं अन्नव्यवहार करणार कीं नाहीं ?

नंतर तिथिनिश्चय झाल्यावर हितेच्छू मंडळीस छापील कुंकुमपत्रिका विधवाविवाहोत्तेजक सभेमार्फत पाठविण्यांत आल्या. लग्नास प्रशस्त जागा रा. रा. मोरोबा कान्होबा यांनीं आपल्या गवाळीतलावाजवळील बंगल्यांत दिली होती. देवकस्थापनेपासून वरातीपर्यंत सर्व विधी झाले. नांवें घेणें व घांस देणें या सांप्रदायांस फाटा मिळाला नाहीं. " मंडळीनें कोठें बालाग्रही कमी पडूं दिलें नाहीं. "

लग्नसमारंभास मंडळी हजर होती तीः—इंग्रज बडे गृहस्थ—नामदार मेलव्हिल; मि. वायली; डा. दलास; डा. वुइल्सन; मि. हर्न; डा. हंटर; मि. मॅक्फर्सन; मिसेस प्रेस्काट; मि. मल; मि. वुड आणि त्यांचें कुटुंब; रे गार्डनर; मि. फ्लिन; मि. वेडरबर्न इ०; हिंदी बडेगृहस्थः—डा. भाऊ, शेरीफ; रा. ब. नाना मोरोजी, मॅजिस्ट्रेट; रा. रा. धिरजलाल मथुरादास, सरकारी वकील; डा. आत्माराम पांडुरंग; रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक; प्रोफेसर महादेव गोविंद रानडे, एम्. ए. एल्. एल्.

बी., प्रो. रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, एम्. ए., इ.

या विवाहांत मंडपशोभा करणाऱ्यांचीं नांवें छापून आलीं पण भोजनपंक्तीस जेवणारांचीं नांवें छापून आलीं नाहींत. "हा सर्वप्रकार गर्वातिशयाचा झाला. इतकें अवडंबर माजवावयास नको होतें." असें कृ. नूलकर यांनीं २०।६।६९ च्या पत्रांत कळविलें.

हा पुनर्विवाह पुनर्विवाहोत्तेजक सभेच्या मार्फत १ ला असें म्हणतात. परंतु सभेच्या चिटणीसांमार्फत ३ रा असें म्हणतात.

हा पुनर्विवाह घडवून आणणारे म्हणजे प्रथम निर्दिष्ट केलेले विज्ञप्तिपत्र काढणारे ७ असामी व वामन प्रभाकर परांजपे व त्यांची बहीण वेणूबाई व पांडुरंग विनायक करमरकर व तत्पक्षीय एक नारायण अशीं ११ व नाना भिडे मिळून बारा, यांवर व यांच्याशीं अन्नव्यवहार करणाऱ्या मंडळीवर बहिष्कार घालावा असें श्री जगद्गुरू शंकराचार्य मठ संकेश्वर व करवीर यांच आज्ञापत्र व काशिस्थ विद्वान मंडळींची त्यांस अनुमति हिंदुधर्मव्यवस्थापक मंडळानें आणवून त्यांच्या नकला गांवोगांव रवाना केल्या. त्याबरोबर वरील मंडळीस व तीबरोबर अन्नव्यवहार ठेवणाऱ्या मंडळीवर लोक भडाभड बहिष्कार घालूं लागले.

जगन्नाथाचे वाडींतील लोक एका संसर्गीयास नळावर अडवून फार त्रास देतात अशी एक तक्रार महादेव गोविंद रानडे यांनीं रावसाहेबांकडे केली होती.

दुसऱ्या पुनर्विवाहांतील वधूवरें रत्नागिरीकडील असल्यामुळें तेथें फारच चळवळ उडाली. रत्नागिरीस वामनराव मोडक हे इंग्रजी शाळेवर हेडमास्तर होते. त्यांनीं पुनर्विवाहावर दोन व्याख्यानें पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल व युक्तिसिद्धतेबद्दल दिलीं. पुढें बहिष्काराचा प्रश्न निघाल्यावर ते म्हणाले " पुनर्विवाह अशास्त्र म्हणता त्याबद्दल मला संशय आहे.

इतकें माझें म्हणणें श्रीमत् जगद्गुरूंस कळवा. व माझें संशयनिरसन झाल्याशिवाय पुनर्विवाहितांवर बहिष्कार घालावा किंवा घालूं नये या विषयीं मीं मत देऊं शकत नाहीं." इतक्यावरून त्यांच्यावर बहिष्कार घालण्यांत आला. पुढें न्हावी, धोबी बंद करावयाचा प्रयत्न चालला आहे असें वृत्त त्यांनीं २१।८।६९ च्या पत्रांत रावसाहेबांस कळविलें. बहिष्काराचा प्रकार होईल व सुधारक लोकांस त्रास होईल अशी आशंका रावबहादुर रानडे वगैरे मंडळीस होतीच म्हणून त्यांनीं एक विनंतिपत्रिका इंग्रजींत मुंबई व पुणें येथील वजनदार लोकांकडे लवकरच पाठविली होती. तिचा सारांश:—

" ब्राह्मण ज्ञातींत पहिला पुनर्विवाह घडवून आणण्याचें श्रेय आम्हीं व आमचे कांहीं मित्र आपलेकडे घेत नाहीं. पुराणमताभिमानी-लोकांनीं फारच विरोध केला आहे व असंयमशील पुढाऱ्यांनीं फार द्वेष उत्पन्न केला आहे. ज्ञातीकडून निष्ठुर शासनपद्धति सुरू कर-विण्यास त्यांस शंका वाटत नाहीं. आमच्यावर त्यांनीं बहिष्कार घातला आहे. दुःशील, विद्याशून्य व अप्रतिष्ठित लोक आमचा न्याय करण्यास निघाले आहेत ! आमचें म्हणणें ऐकून घेतल्याशिवाय, वाद केल्याशिवाय आम्हीं ज्ञातिबहिष्कृत आहोंत असें ठरवीत आहेत. पुन-र्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीं जरी तुम्हांला संशय वाटत असला तरी अल्पसंख्याक सुधारक, बहुसंख्याक ज्ञातिसमाजाकडून चिरडले जाणार नाहींत अशी खबरदारी घेणें हें तुमचें काम आहे. तुम्हीं धंदेवाले लोक व राजकारणांत पडणारे लोकही अल्पसंख्याक आहांत. उद्यां जर कोणी संख्याबलानें तुमच्या विरुद्ध संप करील तर तुमच्या प्रकृतींत क्षोभ नाहींका उत्पन्न होणार ? होईल. तर मग अल्पसंख्याकांचें आतां संरक्षण करा. तुम्हीं मध्यें पडलांत तरच बलात्काराचा प्रतिकार होईल व वाद-विवादाला अवकाश मिळेल."

"ह्मणून जें जें काहीं तुम्हाला प्रिय वाटत आहे, पवित्र वाटत आहे, त्या त्या सर्वांची शपथ घालून तुम्हांला आम्हीं विनंति करतों कीं आमचें अंगीकृत पवित्र कार्य तडीस जाऊंद्या "× १८।६।६९.

सही **महादेव गोविंद रानडे.**
सही **जनार्दन सखाराम गाडगीळ.**

बहिष्कारावर उपाय ह्मणून सुधारकांनीं कायद्याकडे बोटें दाखवून बहिष्कार हा दण्डार्ह आहे अशी ओरड केली. त्यावर (न्यायमूर्ति) **नानाभाई हरिदास** यांनीं कायद्याचे आधार देऊन प्रसिद्ध केलें कीं जातीला बहिष्कार घालतां येतो. सभांतून वादविवाद करण्यास **विठोबा अण्णा दफ्तरदार** व **विष्णुशास्त्री पंडित** असे परस्पर शास्त्रार्थावरून भांडण्यास सिद्ध झाले. तोंडीं भांडणाबरोबर लेखी भांडणही सुरू झालें. **विठोबा अण्णांनीं** एक पुनर्विवाहमतखण्डनार्थ ग्रंथ लिहिला होता.

तसाच **विष्णुशास्त्री पंडित** यांनीं **ईश्वरचंद्र विद्यासागर** यांच्या पुनर्विवाहावरील ग्रंथाचें मराठींत भाषांतर करून छापिलें होतें.*

पुढें सुधारकांवर बहिष्कार घालून जसा पुरातनमतवाद्यांनीं त्यांचा छळ केला तसा सुधारकांनीं पुरातनमतवाद्यांवर पीनलकोडाचें शस्त्र

---

× वक्तृत्वपूर्ण वाक्यांनीं पत्र किंवा भाषण पुरें करावयाचें ही जी रावबहादूर रानड्यांची पद्धत असे ती या पत्रांत चांगली दिसून येत आहे.

* हें पुस्तक **जमखेंडी** संस्थानचे अधिपति यांना अर्पण केलें होतें तें अर्पण करतांना त्यांचा नेहमींचा मायना न लिहितांना " **रामचंद्र अप्पासाहेब** एस्कायर यांस " असाच वापरला होता. एस्कायर ही पदवी सरकारांनीं श्रीमंत **आप्पासाहेब जमखेंडीकर** यांस दिलेली कोणास आठवत नाहीं. तेव्हां ती पंडितानींच दिली असली पाहिजे. उत्साहाच्या भरांत केलेला हा अप्रयोजकपणा क्षम्य आहे.

उभारून फौजदारींत फिर्यादी केल्या. येथें जरा त्यांनीं विचार करावयास पाहिजे होता. न केल्यानें उभय पक्षाचें वितुष्ट आलें.

विधवाविवाहनिषेधाची पुरातन चाल एकदम नष्ट करण्यास भगीरथ प्रयत्न करावे लागतील. तिचें पुरातनत्वच तिला पावित्र्य आणीत आहे. दीर्घकालिक वहिवाटीनेंच समाजावर तिची सत्ता कायम बसलेली आहे. तिच्या सशास्त्रतेबद्दल संशयाचें बोट सुद्धां तिच्या भोंवतीं फिरत असलेल्या प्राचीन श्रद्धेच्या सुदर्शनांत शिरून तिला स्पर्श करण्यास असमर्थ आहे. वाऱ्या वावटळींत टिकलेला जुनाट व दृढमूल झालेला वृक्ष एकदम उपटून टाकण्याचा प्रयत्न केला तर आसमन्तात् भूमिभाग जसा खण्डित होऊन जातो तशी पुनर्विवाह न करण्याची पूर्वापार चाल राष्ट्राच्या मनोमय भूमींत दृढमूल झालेली असल्यामुळें तिचें उन्मूलन कोणी करील तर राष्ट्राची मनोमय भूमि धक्का बसून हादरून जाईल, हें साहजिक आहे म्हणून पुरातनमतवाद्यांशीं जरा समजुतीच्या मार्गानें सुधारकानीं वागावयास पाहिजे होतें.

वास्तविक पुनर्विवाह हा एक समाजाच्या स्वातंत्र्याचा उपाय आहे. समाजाचें मुख्य ध्येय नव्हे. असें असतां विरुद्ध बाजूच्या लोकांस पीनल कोड दाखविण्यांत सुधारकांची चूक झाली. पुनर्विवाह करावा या प्रामाणिक समजुतीबद्दल आपला छळ होत आहे ह्मणून उलट पुनर्विवाह करूं नये या प्रामाणिक मताबद्दल उलट पक्षीयांचा छळ करण्यास सुशिक्षित ह्मणवून सुधारकांनीं कां केला ? समाजसंस्था ही पीनल कोडाच्या कलमांवर रचलेली नाहीं. एकाद्या यःकश्चित् क्लबाला सुद्धां अनिष्ट मताच्या पुरुषास अथवा स्त्रीस त्याचा सभासद न होऊं देण्याचा हक्क आहे. तर लोकसमाजासारख्या संस्थेस सर्वसंमत प्रचाराच्या विरुद्ध आचरण करणाऱ्यास समाजबहिष्कृत कां करतां येऊं नये ? समाज बहुसंख्याक आहे. त्याच्यापुढें अल्पसंख्याक सुधारक टिकणार

नाहींत. त्यांनीं स्वतः तत्त्वाकरतां झगडलें पाहिजे, हें अगदीं खरें आहे. पण अशा झगडण्यांत यश मिळविण्यास नैतिक बलाची अवश्यकता आहे. हरिश्चंद्राप्रमाणें सत्व राखण्यास छळ सोसण्याची, अथवा श्रीरामचंद्राप्रमाणें पडतील ते कष्ट काढण्याची सहनशक्ति अंगीं असावी लागते. पौराणिक उदाहरणें नको असतील तर इंग्लंदच्या इतिहासांतील तत्त्वाकरतां अगदीं किंचिदपि मनाला दुःख होऊं दिल्याशिवाय स्वतःचा हात अग्नींत कोळसा होई तों भाजून टाकण्याचा क्रॅन्मरच्या मनाचा निश्चय व निग्रह असावा लागतो. हे गूण शंकर पांडुरंग पण्डित ह्मणाले त्या प्रमाणें सुधारक ह्मणविणाऱ्यांत कोठें आहेत ?

ज्या तुकाराम व ज्ञानेश्वर या संतांच्या पालख्यांबरोबर जमणारा भक्तजनांचा असंख्य मेळा जातांना पुणें येथील ग्रंथसंग्रहालयांतून रा. ब. रानड्यांनीं पहातांच त्यांच्या डोळ्यांतून घळघळां अश्रुधारा प्रेमभरानें नयनांतून वाहूं लागल्या त्या तुकारामादि संतांनीं त्यांचा छळ करणाऱ्यांविरुद्ध कोणत्या पीनलकोडाचा आधार घेतला होता कीं ज्याचें फळ ह्मणून आज दोनशें वर्षांनंतरही लाखों भक्तांचें मन ते वेधूं शकत आहेत! येथें फक्त सहनशीलपणा, पुण्यपावन चारित्रपद्धति व स्वार्थत्याग, मनोनिग्रह, कार्यनिष्ठा, दृढनिश्चय हे त्यांच्या कामीं आले. सूड घेण्याची कल्पना आली नाहीं. शिवाय ज्या समाजाचें हित करावयाचें आहे त्याच्यांत मित्रभावानें मिळून मिसळून वागलें पाहिजे कीं नको ? आपण थोडें पुढें जाऊन त्यावर ठेवलेल्या प्रेमभावामुळें आपल्यामागून त्यास विलोभून आणणें बरें ? कीं त्याचें शत्रुत्व संपादून त्यापासून अगदीं अलिप्त राहून पुष्कळ पुढें जाऊन उपलब्ध असलेल्या शस्त्रास्त्रांचें भय घालून आमच्यामागून या असें सांगणें बरें ?

करसनदास मूलजी यांनीं उपस्थित केलेल्या महाराजांच्या प्रकरणामुळें गुजराथी समाजांत क्षोभ उत्पन्न झाल्यावर ज्ञातीकडून बहिष्कारादि

शस्त्राचे प्रयोग सुरु झाल्यावर रावसाहेबांनीं केलेला उपदेश देऊन हें लांबलेलें प्रकरण आंखडतें घेण्यांत येत आहे. “ चित्तांत शान्तीचा आदर करा. भीति धरूं नका व धैर्यानें प्रतिपक्ष्याच्या सन्मुख उभे रहा ! येऊन येऊन किती कष्टमय प्रसंग येतील त्यांस तोंड देण्यास सज्ज रहा. शक्य तितक्या उत्तम रीतीनें, दरम्यान आपली कुशलता खर्च करून लोकांत असलेल्या वजनाचा उपयोग करून घ्या.” ( रो.उ.९।१०।६३.)

असो. पुढें ही चळवळ अकालीं पडलेल्या पर्जन्यवृष्टीप्रमाणें निष्फळ झाली.

ज्ञातिबहिष्कृत झालेल्या लोकांकडे मुलींचीं कार्यें निघाल्यावर त्यांच्यापुढें एक प्रश्न निघाला तो असाः—आपला कांहीं संबंध नाहीं अशी विधवा पुष्कळ प्रयासानें नुसती सधवा करण्याचा हट्ट धरून बसावें, हें बरें कीं त्या हट्टाच्यापायीं सर्व समाजाच्या विरुद्ध जाऊन आपल्या प्रत्यक्ष मुलीला, पोटच्या गोळ्याला, आपल्या समाजांतील प्रतिष्ठेमुळें जन्मभर सुख होईल असें ऐश्वर्यवान उत्तम सासरें मिळेल तें घालवून आपल्या सुदैवी मुलीला समाजांत वजन नसलेल्या एकाद्या सुधारकास देऊन मुद्दाम दुर्दैवी बनवावें ? या प्रश्नाचा पोक्त विचार करून कांहीं बहिष्कृत लोक प्रायश्चित्त घेऊन मोकळे झाले. त्यांचा उत्साह व प्रायश्चित्त यांच्या मध्यें लग्नमुहूर्त ज्यांत नाहींत असे वांझोडे दिवस तेवढे गेले.

पुढें पुनर्विवाहोत्तेजक ही सभा केव्हां बंद झाली व ती कशी झाली याची माहिती मिळत नाहीं. एकदोन वर्षें तिच्या नियमानुसार तिच्या सभा आंग्रे याच्या वाडींत भरत असत एवढीच कायती माहिती उपलब्ध आहे.

या पुढें सुधारकांचे दोन तीन वर्ग झालेः—एक ( १ ) आपणांस इष्ट वाटलेली सुधारणा समाजांत घडवून आणण्याकरितां त्याच्याशींच तटकून वागणारा—( व पैशाच्याजोरावर तसें वागणें सोपें गेलें ); (२) समाजांत राहून त्याची सुधारणा करण्यास समाजावर असलेलें आपलें वजन खर्च

करून केवळ नैतिकबलानें सुधारणा करणारा; व (३) समाजाशीं अगदीं शक्य तेवढा अल्प विरोध करून सुधारणा घडवून आणणारा. रावसाहेब दुसऱ्या वर्गांत येतात. हें कसें तें चालू प्रकरणावरून समजेल. पुढें त्यांनीं रावजी भवानराव पावगी हे विलायतेहून आल्यावर त्यांस शंकराचार्यांकडून कर्मार्ह व पंक्तिपावन करून कसें घेतलें, तें वृत्त ज्यांत आहे त्या पुढें येणाऱ्या प्रकरणावरून दिसून येईल.

न्यायमूर्ति तेलंग तिसऱ्या वर्गांत येतात व त्या विषयावर त्यांनीं आपलें मत एका व्याख्यानांत देऊन टाकलें होतें.

रा. ब. रानडे यांसही पुढें पुढें वाटूं लागलें असावें कीं समाजाशीं तटकून राहून उपयोगी नाहीं. त्याची सुधारणा करण्यास त्यांतच राहिलें पाहिजे; असें नसतें तर त्यांनीं पंचहौद मिशनमध्यें चहा पिण्याबद्दल त्यांस प्रायश्चित्त घ्या म्हणून श्री शंकराचार्य यांनीं आज्ञापिलें तेव्हां त्यांनीं त्यांच्या आज्ञेस मान दिला नसता व प्रायश्चित्त घेऊन पुन्हां समाजांत आले नसते.

## जातिभेद.

ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् बाहू राजन्यः कृतः ॥
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रोऽ जायत ॥

(पुरुषसूक्त)

जाति ही संस्था हिंदुस्थानांत फार पुरातन काळापासून अस्तित्वांत आहे. ती हिंदुस्थानांतील डोंगर व नद्या यांच्याइतकीच पुरातन नसली तरी पुरुषसूक्ताहून पुरातन असली पाहिजे. कारण जातींची उत्पत्ति या सूक्तांत वर्णन केलेली आहे. हें जातिसंस्थेचें गतकालीन युगांतील पुरातनत्वच तीस पावित्र्य आणीत आहे. आतांपर्यंत हिंदुस्थानांतील राजकीय उलाढालीच्या वावटळींतून बचावलेलें तिचें स्वरूप पाषाणाप्रमाणेंच दृढ आहे. तिचें बळ मोठें आहे. जातिबहिष्कार हें तिच्याजवळ

असलेलें शस्त्र मृत्यूच्या पाशाइतकें सामर्थ्यवान् आहे. जातींतील सर्व व्यक्तींचे विचार एक असतात, आचार एकच असतात. पूर्वापार इतिहास एक असतो, सांप्रदाय एक व धर्म एक असतो. म्हणजे नैतिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक इ. सर्व प्रकारच्या एकस्वरूपी बंधनांनीं जातिसमाज बांधलेला असतो. त्यांतील व्यक्ती एका ठिकाणाहून कोठेंही जावोत त्यांच्या आचार विचारांत फरक मुळींच पडत नाहीं व ते आचार देशांत सर्वत्र इतक्या कडक रितीनें आपोआप पाळले जातात ( व तेसुद्धां कोणीतरी समाजसंरक्षक शास्ता जागोजाग असल्याशिवाय ! ) कीं तें पाहून तर सर्वांस आश्चर्यच वाटेल. समाजसुखाकरतांच मनुष्य जन्म घेतो व जगतो. हीं सर्व बंधनें तोडून कोणताही मनुष्य सौख्य पावणार नाहीं. कोणताही सुधारक जातिसमाजाशीं सहजपणें निराळा राहूं शकणार नाहीं. जातीच्या बाहेर राहून जातिसमाजाची सुधारणा व्हावयाची नाहीं. जाति हें असें एकादें लोखंडी यंत्र नाहीं कीं त्याची जातीपासून अलिप्त राहणाऱ्या सुधारकानें किल्ली फिरवल्याबरोबर तें चालूं लागेल. सुधारकांस नैतिक बलाची अपेक्षा आहे. त्याबलानेंच हाडामांसाच्या समाजव्यक्तींवर त्याचें वजन पडेल. एरव्हीं पडणार नाहीं. सुधारकांच्या विचाराबरोबर त्यांचें मन धावूं लागेल पण समाजाचें शरीर त्याच्या बरोबर येणार नाहीं. एवढेंच नाहीं. परंतु त्यांस विरोध करण्यास तें जाग्यावरून हालणार सुद्धां नाहीं. कारण सुधारकाप्रमाणें जातिसमाजाला सुद्धां विचारस्वातंत्र्य आहे. जो मनुष्य सुधारणेच्या तत्त्वांनीं वेडा झाला असेल तोच जातीच्या बाहेर राहण्याचें पतकरील. काय सुधारणा करावयाची तें प्रथम ठरवून मग प्रत्येक समाजसुधारकानें नैतिक बल वाढवून आत्मसंयमनादि गुणांच्या शक्तीवरच सुधारणा करण्याचें मनांत बाळगलें पाहिजे. सुधारणेच्छूच्या लहरीवरून किंवा इच्छेवरून समाजांतील अनिष्ट चाली ज्या ज्या त्या समाजांत आहेत त्या त्या नैतिक

बलानेंच नाहींशा होतील. इतर सर्व तऱ्हेची शक्ति मोघत्व पावेल. सर्व तऱ्हेच्या सुधारणांबद्दल रावसाहेब नेहमीं म्हणत:—डाका येथें मलमलीचा ताका कोष्ट्याला हुकूम दिला कीं विणून मिळतो तशी सुधारणा हुकमी मिळत नाहीं. *

आहेत त्या जाती पुष्कळ आहेत अधिकांची जरूर नाहीं असें राव-साहेबांचें मत होतें. प्रकरण २६ पृष्ठ ३०१ पहा.

**नाना मंडलिक** यांचे व्याही रा. रा. **गोपाळपंत विद्वांस** हे नोकरीस कराचीस होते. त्यांनीं रावसाहेबांस २७।१२।६० च्या पत्रांत अशी पृच्छा केली होती. " जरूर पडल्यास मी धूत वस्त्रावर जेवलों तर बाध आहे किंवा कसें ? त्याचप्रमाणें अन्य उच्च जातीच्या मनुष्याच्या पंक्तीस किंवा त्याच्या हातचीं फराळ किंवा जेवण जेवण्यांत काय दोष आहे ? "

त्याला उत्तर रावसाहेबांनीं असें लिहिलें कीं ' तुमच्या प्रश्नांतच उत्तर आहे परंतु ज्या अर्थीं तुमच्या मनांत शंका आली आहे त्या अर्थीं तुम्हीं तो प्रकार करू नये असें वाटतें.'

या प्रकारावरून जातिभेद अगदीं तीव्र स्वरूपांत कायम रहावा असें रावसाहेबांस १८६७ पर्यंत वाटत नव्हतें. परंतु पुढें पुढें रावसाहेबांचें व सुधारकांचें पटत नाहींसें झालें. कारण सुधारक हे बहुशः नवोदित भाग्याचा जो एक इंग्रजी शिकलेला वर्ग तयार झाला होता व जो एकटाच पैशाच्या बलावर उत्पन्न झालेल्या दोन तीन पिढ्या टिकेल अशा उद्दामपणानें जातींशीं तटकून राहूं शकत होता त्यांतूनच उत्पन्न झालेला होता. हे सुधारणेच्छू समाजाच्या उद्धाराच्या गोष्टी बोलूं लागले म्हणजे अगदीं अचिंतितपूर्व, अनादरयुक्त, विचारनिरपेक्ष रीतीनें जुन्या चालींविषयीं बोलतांना बरळत सुटत. यांचें संस्कृताचें

* Civilization is not made to order like Dacca musleen.

ज्ञान शारदादेवीच्या मंदिराच्या रस्त्यावर बाजूला दूर उभें राहून मिळविलेलें असावयाचें ! व तुकारामबुवांची गोधडी किंवा रामदासाची कफनी उसनी आणून यांचें शरीर भूषविलेलें असावयाचें ! एवढ्या गोष्टी मात्र खऱ्या होत्या. पण मोठमोठ्या विषयांवर भाषण करतांना अगदीं अप्रयोजक शब्दांचा ते उपयोग करीत असत. इंग्रजी शिक्षणाबरोबर जीं दुर्व्यसनें फैलावलीं होतीं तिकडे न पहातां वेदांची व पुराणांची, त्यांतील एक अक्षर कळल्याशिवाय, नालस्ती करूं लागत. स्कंदपुराणांतील सप्त समुद्रांपैकीं मधुचा ( मद्याचा ) सागर कोठें आहे! अशी निंदागर्भमुखानें चौकशी करीत. परंतु पाश्चात्य लोकांपासून उपलब्ध झालेल्या मधूच्या ( सुरेच्या ) सागराच्या लाटांत गटंगळ्या खात होते, त्याचें त्यांस भान नसे !

कित्येक वेळां सुधारक लोक सुधारणा हा एक व्यापारच समजूं लागले. कोणी विलायतेस उदरभरणार्थ अथवा चैनीकरतां गेला ह्मणजे आह्मीं सुधारणेप्रीत्यर्थ गेलों असें प्रतिपादन करूं लागे. येथें सुधारणेच्या शर्यतींत त्यानें आपलें घोडें दामटलें एवढी गोष्ट खरी मानली पाहिजे. परंतु सुधारणेकरतां विलायतेस गेलों होतों अशी प्रौढी जर तो मारूं लागला तर रथचक्रारूढ मक्षिका रथचक्रवेगानें प्रचलित झालेला धूलिग्रस्त वायुस्तंभ म्यां प्रक्षुब्ध केला अशी प्रौढी मारूं शकेल !

पुढें पुढें सुधारक म्हणजे बेताल बरळणारे होते तसे ते बेताल वागणारे आहेत असें आढळून आलें.

" मला असें कोणी सांगितलें आहे कीं तुमच्या ( राष्ट्रीय सभेच्या ) मंडळीनें इतकी व्यवस्था ठेविली असूनही पुष्कळ, ब्राह्मण प्रतिनिधी फार निर्लज्जपणें वागले व दुसरेही कित्येक ब्राह्मण नसले तरी हिंदू असून उघडपणें सार्वजनिक हॉटेलांत जाऊन मुसलमानलोकांसमवेत राहिले."

"असाच प्रकार जर पुढें चालावयाचा असेल तर मग यांतील सर्वांचा येथेंच अंत होईल तर फार बरें. इतकेंच अधिक बोलून अथवा करून दाखविण्यापूर्वीं म्हणतों." (२७।१।८९ चें नवल बिहारी वाजपेयी यांस पत्र.)

या प्रमाणें रावसाहेब समाजसुधारकांच्या विरुद्ध जातिभेदासारख्या प्रकरणांत होते तरी मनुष्या मनुष्यांतील जातिभेदजन्य जे मात्सर्यादि दुर्गूण आहेत त्यां पासून ते अगदीं अलिप्त होते. त्यांच्या कोणत्याही लेखांत अगर पत्रव्यवहारांत—ज्यांत हजारों पत्रांचा संग्रह आहे त्यांत—एका मनुष्याची सुद्धां तो अमूक जातीचा आहे म्हणून निन्दा किंवा स्तुति केलेली आढळत नाहीं. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

त्यांच्या मित्रगणांत भिन्न प्रांतांतील व विभिन्न जातीचे स्वधर्मीय व परधर्मीय लोक होते. इंग्रज, पार्शी, मुसलमान, दक्षिणी व गुजराथी हिंदू, बंगाली व कांहीं मद्रासी इत्यादि सर्वांशीं ह्यांचें वर्तन फार प्रेमळ असे.

रावसाहेब एज्युकेशन खात्यांत व्हिजिटर असतां त्यांच्याबरोबर एक इंग्रज इन्स्पेक्टर होते. त्यांनीं, एका मिश्र जातीच्या मास्तराची शिक्षण पद्धत आवडली नाहीं ह्मणून रागानें त्या मास्तराची त्याच्या जातीवरून निर्भर्त्सना केली तें ऐकून रावसाहेबांनीं त्यांची ( इन्स्पेक्टरांची ) या गैरवर्तनाबद्दल चांगली कान उघाडणी केली.

एका इंग्लंदांतील विद्वान गृहस्थास रावसाहेबांच्या मार्फत प्रेक्षणीय वस्तूंचें व पुरुषांचें दर्शन घ्यावयाचें होतें. तेव्हां रावसाहेबांनीं पहिल्याप्रथम नारायण परमानंद यांची ओळख करून दिली. नारायण परमानंद हे रावसाहेबांकडे नेहमीं जाणाऱ्या येणाऱ्यां पैकीं होते. गणपतराव भास्कर कोठारे हे तर त्यांचे प्रेमाचे सहाध्यायी व कांहीं दिवस वकिलीच्या कामांत साथीदार होते. व महालक्ष्मीच्या वाटेवर बंगला घेतल्यावर आपल्या जागेंत त्यांस बंगला बांधावयास जागा कांहीं शर्थीवर विकत देऊन आपल्या शेजारीं स्थापन करून घेतलें.

डाक्तर अनंत चंद्रोबा हे कराचीस असतां यांचे कुटुंबवैद्य होते. कांहीं दिवस रावसाहेब ठाण्यास आले असतां कुटुंबाची मंडळी सिंधमध्यें असतां डाक्तर अनंत यांच्याकडे तिचें संरक्षण सोंपविलेलें होतें. राम बाळकृष्ण हे त्यांचे गुरूजी होते. परमहंस क्लबाचे प्रस्थापक होते. परंतु गुरूवर जें सच्छिष्याचें प्रेम पाहिजे त्यांत अणुरेणुही कमी नव्हतें.

एका कलेक्टराचें वर्तन रावसाहेबांस आवडलें नाहीं. "व अशा मनुष्यांचा मी द्वेष करतों परंतु हा द्वेष राष्ट्रभिन्नत्वामुळें सहजीं उत्पन्न होणारा नव्हे." असें त्यांनीं रोजनिशींत लिहून ठेविलें आहे. (राजिनामा प्र.पृष्ठ१०८पहा) बाळकृष्णदादा सायण्णा, पुण्याच्या मॉर्गन बाळकृष्णा या लिलांववाल्या कंपनीचे मालक, हे रावसाहेबांचे परमस्नेही होते. त्यांचा मान रावसाहेब फार ठेवीत. हे मुंबईस आले असतां माजघरांत त्यांस आपल्याप्रमाणेंच रुप्याचें ताट, तांब्या व पेला भोजनसमयीं मांडवीत असत. कधीं कधीं महाबळेश्वरीं गेल्यावर बायका मनुष्यांसकट रावसाहेबांच्याच शेजारीं रावसाहेबांच्या बंगल्यांत रहात असत. यांच्या मातोश्री महाबळेश्वरीं येणार म्हणून रावसाहेबांस आनंद झाला. नारायण दाजी यांचे राव-साहेब ट्रस्टी होते. 'गणपत कृष्णाजी' या छापखान्याचे मालक, आत्मा-राम कान्होबा, यांनीं मरणसमयीं रावसाहेबांस हांक मारून माझी सर्व व्यवस्था तुम्हीं करा असें सांगितलें व मुलगा मोठा होईतों त्यांनीं केली. जनरल जेकब हे इंग्रज गृहस्थ त्यांचे एक उत्तम स्नेह्यांपैकीं होते. हें वाचकांस विश्रुतच आहे. या देशांतील एक वेळ हिंदु असलेल्या पण मग ख्रिस्ती झालेल्या लोकांशीं पुन्हां रावसाहेब स्नेहानें वागत असत. नारायण शेषाद्रि व त्यांची स्त्री ही रावसाहेबांचे घरीं येत असत. बाबासाहेब खोत विंधणेकर व महमदअल्ली रोगे हे मुसलमान गृहस्थ रावसाहेबांचे परमस्नेही होते. कलकत्त्याचे आर. डी. मेथा, नवरोजी फर्दुनजी, खरसेटजी नसरवानजी कामा, सर दिनशा पेटिट इ.

अनेक पारशी मित्र होते. पण सर्वांशीं अगदीं ममतेनें वागत. मनुष्याच्या जाती भिन्न झाल्या तरी त्या एकाच विराट पुरुषाचे अवयव आहेत म्हणून जातिनिरपेक्ष प्रेम सर्व मनुष्यांनीं एकमेकांवर ठेविलें पाहिजे हें वर्म जें पुरुषसूक्तांत कथन केलें आहे तें रावसाहेबांनीं जाणून त्याप्रमाणें आचरण ठेविलें होतें म्हणून तेही सर्वांस सारखेच प्रिय झाले होते.

त्यावेळेचे सर्व पुढारी समाजावर जातिनिरपेक्ष प्रेम करीत असत. हल्लीं मात्र कांहीं जातींत त्या त्या जातीचे म्हणून जे पुढारी निघाले आहेत ते दुर्दैवानें आपलें पहिलें कर्तव्य म्हणजे इतर जातींशीं सरळ नसणें हेंच आहे असें मानूं लागले आहेत. हें कोठें थांबेल तें सांगतां येत नाहीं. पण जरा थांबून, जरा विचार करून, थोडी सहिष्णुता व सहनशीलता धरून, हे सर्वजण रावसाहेबांचा सर्व जातींवर सारखें प्रेम करण्याचा जो स्वभाव होता त्याचें अनुकरण करतील काय ?

## नाटक

। नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ।

सुभाषित.

रावसाहेब कराचीस असतां मि. फ्रियर यांच्या आग्रहावरून १८५३ सालीं नाटक पाहण्यास गेले होते. रावसाहेब भुज व कराची येथें असतां १८५३ सालीं सांगलीची एक नाटक मंडळी मुंबईस आली होती. ती रामायण व महाभारतांतील नाटकें ग्रँटरोड येथील नाटक गृहांत करून दाखवी. नट संख्या ३५ होती.

( १३।४।५३ चे नारायण बल्लाळ लिमये यांचें पत्र. )

तिच्या नादीं पुष्कळ लोक लागल्यामुळें खेळास गर्दी फार होत असे. शिकलेल्या नादीं लोकांत डॉ. भाऊ रसिक असल्यामुळें ते अगदीं प्रमुख होते. १८६६ सालीं एल्फिन्स्टन कालेजच्या विद्यार्थी मंडळीनें नाटक केलें तें पहाण्यास रावसाहेब गेले

नाहींत. पुढें १८६८ सालीं मुंबईंतही कांहीं गुजराथी मंडळ्या निघाल्या होत्या. निरनिराळ्या मंडळींतील नटांचें आपसांत जातिवैर असतें तें क्षणभर विसरून निरनिराळ्या मंडळ्यांतील चांगल्या चांगल्या नटांनीं एका ठिकाणीं जमून एक नाटक, नव्या तालमेच्या स्थापनेस्तव पैसा मिळवण्यास करून दाखविलें. त्यावेळेस नट पुन्हां घरोघर जाण्यापूर्वीं कांहीं शोकी पण संभावित लोकांनीं त्यांस आपला जातिमत्सर सोडून देण्यास उपदेश केला व सांगितलें कीं अनेक अर्धवट मंडळ्यांतून एक एक नट निवडून एक चांगली मंडळी बनवावी व लोकांचें मनोरंजनाचें कार्य अपूर्व प्रकारें सदोदित करावें. चांगल्या कलाकुशल व रसिक नटां-जवळ त्यांनीं नाट्यकलेचें शिक्षण घ्यावें व संभावित मर्मज्ञ लोकांच्या परीक्षक मंडळीपुढें रंगाची तालीम करून दाखवावी व ते संतुष्ट झाले म्हणजे लोकांना रंगभूमीवर खेळ करून दाखवावा. ही सर्व व्यवस्था करण्यास एक मंडळी नेमावी व तिनें पसंत केलेलेच खेळ करावे व सर्व व्यवस्थेचे नियम ती करील त्याप्रमाणें वागावें इ.

याप्रमाणें मि. कैखुस्रु या नांवाच्या एका पार्शी गृहस्थानें उद्योगाला सुरवात केली. आपलें साहाय्य या कामीं मिळावें अशी रावसाहेबांस त्यांनीं विनंति केली व सांगितलें कीं आपणांस माफक तसदी पडेल, फार पडणार नाहीं. विनायक जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ, के. आर. कामा, सोराबजी शापुरजी बंगाली, आर्देशर फ्रामजी मूस इ. थोर व संभावित गृहस्थांचें साहाय्य मिळालें आहे. आपलें नांव या मंडळींत घालूं देण्याची परवानगी द्या.

( ५।४।६८ चें सदरील गृहस्थाचें पत्र )

इतकी जड जड मंडळी त्यावेळीं हलकी मानली जाणारी जी नाट्यकला तिच्या सुधारणेकरतां जमवून बरीच अवजड व्यवस्था मि. कैखुस्रु यांनीं केली, तरी रावसाहेब त्यांच्या भानगडींत पडले नाहींत. पहिल्या पासून

रावसाहेबांचा कल नाटकांकडे नव्हता. "मला जरा विमनस्कतेनें गांठलें. हातांत वाचावयास नाटक घेतलें. परंतु तें बेचव वाटलें. समाजशास्त्राच्या अभिवृद्ध्यर्थ भरलेल्या सर्वराष्ट्रीयसभेची हकीकत बरी वाटली."

५।७।६० रो. ई. उ.

रावसाहेबांस नाटकें पाहण्याची आवड कमी होती किंवा आवडीहूनही वेळ अगदीं कमी होता. एकाहून एक मोठीं कामें पुढें सज्ज असतां वेळ रिकामा कसा उरणार ? सर्वच वेळ काम करीत असतां कंटाळा येत नसे काय ? आला तर कांहीं करमणूक नको होती काय ? "कंटाळा येत असेल तर" ते म्हणत "निराळ्या जातीचें काम हातांत घ्या म्हणजे करमणूक होऊन कंटाळा जाईल."

त्यांचे मित्र बापूसाहेब आठल्ये यांनीं किर्लोस्कर कंपनींतील प्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर यांच्या मंथरेच्या भूमिकेची रावसाहेबांजवळ फार प्रशंसा करून तेवढें तरी एक नाटक ( रामराज्यवियोग ) पहा अशी आग्रहानें शिफारस केली त्यावेळेस ते म्हणाले "संसार म्हणजे नाटकच आहे." जन्माचें नाटक करून घेणाऱ्या हल्लींच्या तरुण मंडळीस हे विचार मानवणार नाहींत.

रावसाहेब कधीं कधीं घोड्याचे खेळ पहावयास जात असत. "डॉ. भाऊ व मंगळदास यांबरोबर घोड्याची सरकस पहावयास गेलों." ( रो. उ. )

चित्रपटाचा समारंभ असल्यास कधीं कधीं जात. "मी, माझी बायको, व चि० कृष्णाबाई व अण्णाची मुलगी दुर्गाताई यांसमवेत लंडनशहराचें व सिबास्टपूल येथील लढाईतील देखाव्यांचे चित्रपट पहावयास गेलों. ८–३० वाजतां परत आलों. रो. ई. उ.

त्याचप्रमाणें शक्तीचे प्रयोग पाहण्यास जात असत "नीरा नरसिंगपूरचा बाबाजी पेलवान यानें हातानें कवड्या फोडून दाखविल्या व विड्याचीं पानें बोटानें कातरलीं. ( रो. उ. )

## ज्योतिःशास्त्र.

**चतुरंगबलोराजा जगतीं वशमानयेत् ।**
**अहं पंचांगबलवान् आकाशं वशमानये ॥ १ ॥**

ज्योतिःशास्त्रावर रावसाहेबांचा पूर्ण भरंवसा होता. तो आनुवंशिक होता. लहानपणापासूनच रावसाहेबांचें वर्षफळ त्यांचे वडील काढीत असत व इष्ट तेवढें जपजाप्य, हवन व. दानें करीत असत. "तुमचे लग्नास कर्तरी योग आला. त्यानिमित्त ग्रहमख केला; दानें राहूचीं व शनीचीं, व शनीचा जप २३०००, राहूच्या जपाचें उदक सोडिलें आहे". "उदईक षड्ग्रही आहे म्हणून ग्रहमख करणार आहें." असें नाना लिहून कळवीत. पुढें कुटुंबाच्या सततच्या रुग्णावस्थेंत ग्रहगतींवर सारखें लक्ष ठेवण्याचें काम दापोलीचे विद्वान् ज्योतिषी वामनराव जोशी हे करीत. मोठमोठालीं कामें हातांत घेण्यास किंवा लांबच्या प्रवासास निघण्यास मुहूर्त नेमलेल्या वेळांत सांपडला तर रावसाहेब विचारीत. "अमुक महत्त्वाचा मसुदा तयार आहे. आपण लिहाल त्या स्थिर वेळेवर कायम करून त्याच्यावर सही करावयाची आहे. पुढील२४।२६ दिवसांत योजून कळवावें." वेळ नसेल तर महत्कार्यारंभ मुहूर्ताशिवाय करून त्याच्या पूर्ततेस किती दिवस लागतील असें मागाहून विचारीत. "एकास कर्जमुक्त करण्याचें आरंभिलें आहे. त्याच्या राशीस एक ग्रह (कामगार) आड येत आहे. तो निघण्यास किती दिवस लागतील?" "ग्रंथ पुरा झाला. पौर्णिमेला शेवटचें पान छापण्याची परवानगी दिली. याचा ऊर्जित काळ केव्हां"? अशा तऱ्हेचे स्वस्थपणा आल्यावर प्रश्न विचारीत असत. (२९।५।८० चें जोशीबुवांस पत्र.)

जोशीबुवांच्या उत्तरांतील कांहीं मजकुरांत मोघम सांकेतिक भाषा असे. "उत्तरदिशेस बच बच झाली आहे म्हणून लवकरच दीड महिन्या-

नंतर देव योग आणील. दक्षिणदिशेबद्दल मोठी विचाराची गोष्ट आहे." ३।११।८२ चें जोशीबुवांचें पत्र.

येथें एक गोष्ट सांगावयाची ती ही कीं सदरहू जोशीबुवा ज्योतिर्विद्यंत जसे प्रवीण होते तसे मोठे लोकव्यहारनिपुण व धोरणी होते. ते रावसाहेबांकडे वारंवार येत असत. तेथें येणाऱ्या विद्वान व कर्त्या पुरुषांत उठत बसत असत. मोठमोठ्या प्रचलित विषयांवर चर्चा होत असे. ती ऐकण्याची संधि त्यांस येत असे व ते विषय समजण्यासारखी त्यांची बुद्धि होती. त्यामुळें ते फलज्योतिर्विषयक पुष्कळच सार्वजनिक प्रश्नांचीं उत्तरें चोख देऊ शकत. कलकत्त्याच्या काऊन्सिलाचे रावसाहेब १८८५ सालीं सभासद होते. तेव्हां "झमिनदार व त्यांची रयत" यांच्या हक्कासंबंधाचें 'बेंगाल रेंट बिल' चर्चेला निघावयाचें होतें. व मलबारींचाही प्रश्न ( जो लोकांत गाजत होता व ज्याविरुद्ध रावसाहेब होते तो ) मिळून या दोन विषयांचें भविष्य रावसाहेबांनीं जोशीबुवांस विचारिलें होतें त्याचें उत्तर त्यांनीं दिलें तें खालीं दिलें आहे.

" बंगाल बिलाबद्दल आपण काम कराल. सरकारचे मनांत बहुत दिवस तें बिल करावयाचें आहे, त्यास आपला कांहीं इलाज नाहीं; आपला जो योग्य अभिप्राय असेल त्याप्रमाणें वागल्यानें ईश्वर पाठिराखा होतो. तसेंच मलबारी याणीं जरी सरकारास लिहिलें तरी वेळेवरून पहातां आपले म्हणण्यास सध्यां यश येईल परंतु कांहीं अवकाशानें कलि संचार करणार असें वाटतें. ( १८८५ चें पत्र )

महादेवबागेंतल्या रावसाहेबांच्या सभेनंतर मलबारी यांचें कांहीं चाललें नाहीं. पुढें कांहीं वर्षांनीं रावसाहेबांच्या निधनानंतर संमतिवयाचा कायदा करण्यांत आला.

नष्ट वस्तूचा शोध कसा लागेल हा प्रश्न रावसाहेब पाहवीत असत.

मागें सांगितल्याप्रमाणें प्रयाणास मुहूत साधल्यास बघवीत असत. व दुसऱ्यासही सांगत असत. 'सोमवारीं २३ तारखेला अमृतसिद्धियोग आहे, तथापि पुढील अभंग ध्यानांत ठेवा.'

विठोबाचें नांव घ्यावें। मग पाऊल टाकावें ॥
अवघा मुहूर्त शकुन। हृदयीं विठ्ठलाचें ध्यान ॥ १ ॥

८।२।८५ चें बाळकृष्ण दादांस पत्र.

## प्रकरण २७ वें.

# स्टूडन्ट्स लिटररि ॲन्ड सायन्टिफिक् सोसायटी.

जितुकें कांहीं आपणास ठावें। तितुकें हळु हळु शिकवावें।
शाहाणे करून सोडावे। बहुत जन ॥

( रामदास )

एल्फिन्स्टन् इन्स्टिट्यूटमधील प्रोफेसर मि. हेन्डरसन व बाळ गंगाधर शास्त्री या दोघांच्या उद्योगानें या साहित्यविषयक संस्थेची स्थापना १८४७ च्या अगोदर झाली. त्यांस पुढें तिसरे प्रो. म्यॉक्डूगल व चवथे प्रो. रीड येऊन साहाय्य करण्यास मिळाले. प्रोफेसर रीड हे तिचे अध्यक्ष होते. व प्रोफेसर पॅटन हे कोशाध्यक्ष होते. त्यांनीं या मंडळीचें १८४७ सालीं कार्यक्षेत्र वाढविलें व ही संस्था फार ऊर्जितावस्थेस आणिली. इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांचें ज्ञान वाढविण्याचा जो मूळचा हेतु त्याला व्यापक स्वरूप देऊन अगदीं लहान मुलें व मुली यांस शिक्षण देण्याचें कार्य या संस्थेनें आंगावर घेतलें. शाळा काढल्या तर किती आईबाप आपल्या मुलींस शाळेंत पाठवितील त्याचा

अंदाज काढून दोन वर्षांत पार्शी व हिंदू यांच्या आठ शाळा काढल्या. याला जागा कोणी दिली, शिक्षक कोठून आणले, पुस्तकाची व्यवस्था कशी केली, याचें सर्वांस आश्चर्य वाटे. या स्तुत्य देशसेवेच्या कार्यांत पहिल्या पहिल्यानें शिक्षकांचें काम विद्यार्थ्यांनीं स्वतां केलेलें आहे. जागा उदार धनिकांपासून मिळविण्यांत आल्या व पैशाकरतां वर्गणीच्या याद्या स्वतां विद्यार्थी व प्रोफेसर फिरवीत असत. ज्या उदार पुरुषांनीं जागा पुरविली त्यांत जगन्नाथ शंकरशेट, मंगलदास नथूभाई, शेठ भगवानदास पुरुषोत्तमदास व भाऊ दाजी हे प्रमुख होते. कांहीं इंग्रज लोक १०० पर्यंत ही वर्गणी देत. या संस्थेचे बक्षिससमारंभ मोठ्या थाटानें होत असत. त्या दिवशीं शें दिडशें बैलांच्या रेंकल्यांतून चोहों-कडून बालचमू येऊन सभाङ्गणीं प्रविष्ट होतांच त्यांच्या रांगा लाव-ण्यांत येत. नाना तऱ्हेच्या रंगीत पोशाखांनीं मंडित झालेल्या या बाल-कांच्या हस्तमुख चेहेऱ्यांकडे पाहिलें असतां मधुमासांत फुललेल्या वृक्ष-वाटिकेचा भास होत असे. बक्षिसें वांटण्याचें सुखदायक कार्य नामदार दुसरे एल्फिस्टनसाहेब मुंबईचे तेव्हांचे लोकप्रिय गव्हर्नर, तसेच सदर दिवाणी अदालतीचे मुख्य जज्ज नामदार अर्स्किन् पेरी किंवा लेडी कॅनिंग यांच्या सारख्या लोकोपकारी व्यक्तींच्या हातून होत असत.

हें सर्व कशाचें फळ तर प्रोफेसर रीड व प्रोफेसर पॅटन यांच्या उद्यो-गाचें, बुद्धिमत्तेचें, हिंदी लोकांविषयीं त्यांच्या मनांत सदैव असलेल्या सहानुभूतीचें होय.

हे प्रोफेसर जरी नुसते कालेजांतील विद्यार्थ्यांस नेमलेल्या विषयांतच प्रवीण करण्यांत आपला नियमित वेळ व असलेलें बुद्धिसामर्थ्य खर्च करते तरी सुद्धां ते लोकांच्या प्रशंसेस पात्र झाले असते. परंतु विद्या-र्थ्यांचीं डोकीं नुसतीं ज्ञानभाण्डारें आहेत व गुरूचें कार्य ह्मणजे तीं ज्ञानानें परिपूर्ण भरून टाकावयाचीं एवढेंच आहे असें ते समजत नव्हते. ते समजत

होते कीं समाजहित करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे व उदार शिक्षणानें मंडित झालेल्या तरुण विद्यार्थ्यांचें तर तें पवित्र कर्तव्यच आहे. ह्या उच्च विचारांचें बीज वरील प्रोफेसरद्वयानें तरुण पिढीच्या मनोमय भूमींत पेरून ठेविलें व त्यास प्रेमजलाचें सिंचन केलें. हल्लीं जो मोठा वृक्ष या संस्थेचा झालेला आहे तो यांच्याच परिश्रमाचें व शिस्तीचें फळ आहे. पॅटन साहेब ४।५ वर्षांनीं अकालीं मृत्यु पावले. त्यांच्या पत्नीला आपल्या मुलांचें शिक्षण सुलभ जावें म्हणून मोठा फंड जमवून विद्यार्थ्यांनीं अर्पण केला व आपली कृतज्ञता योग्य रितीनें दाखविली. पुढें मि. रीड १८५३ सालीं विलायतेस बॅरिस्टर होण्यास गेले तेव्हां या संस्थेच्या सभासदांनीं त्यांस मानपत्र दिलें त्यावेळेस ११५ सभासदांच्या वर सह्या होत्या. यावरून सभासदांची संख्या याहूनही अधिक असावी.

रावसाहेबांचा संबंध या संस्थेशीं ते एल्फिन्स्टन् इन्स्टिट्यूटमध्यें आल्या दिवसापासून होता. व वकिलीच्या परिक्षेला बसावयाचा निश्चय त्यांनीं जेव्हां १८६२ सालीं केला तेव्हां इतर सर्व धंदे ह्मणजे नोकरी व लेख लिहिणें इ. सोडून दिले पण या संस्थेचें काम तेवढें सोडलें नाहीं. यावरून त्यांची या संस्थेवरची भक्ति दिसून येते. १८६६ सालीं सभासदांनीं रावसाहेबांस सेक्रेटरी निवडले होते. धनिकांजवळून जागा फुकट किंवा अल्पभाड्यानें मिळविणें, शाळेंत शिकविणें व वर्गणी जमविणें यांत रावसाहेब फार मेहनत घेत असत. प्रेमचंद रायचंद व कावसजी जहांगीर या उदार लोकांजवळून रावसाहेबांनीं मोठी मदत मिळविली होती. गंगादास किशोरदास म्हणून एक सद्गृहस्थ होते त्यांची मदत रावसाहेबांस निधि जमविण्यांत फार झाली होती. ज्ञानाचा प्रसार मुंबईच्या बाहेर व्हावा म्हणून या शाळांशिवाय ज्ञानप्रसारक म्हणून एक मासिक पुस्तक या संस्थेनें काढलें तें मराठींत व गुजराथींत निघत असे.

ज्ञानप्रसारकामध्यें रावसाहेब निबंध लिहिण्याचें काम करीत असत.

प्रकरण सतरा पहा. पहिल्यानें दर अंकाची किंमत दोन आणे ठेवलेली होती. ती पुढें चार आणे करण्यांत आली. आरंभापासून सुमारें दहा वर्षांनीं मुलींच्या शाळांतील शिक्षणक्रमाचाही बेत चांगला बसविण्यांत आला. लेखन, वाचन, गणित, इतिहास, भूगोल, गायन, नीतिपाठ व शिवणकामासारखीं, घरगुती कामें शिकविण्यांत येत. सारांश तरुण मण्डळीच्या उत्साहांत पेटवलेली ही ज्ञानज्योति अद्यापि प्रकाशित आहे. व मुलींच्या अज्ञान तिमिराचा नाश करण्याचें काम अद्यापिही करीत आहे.

या शाळांवर रावसाहेब फार कडक रीतीनें देखरेख ठेवीत असत, त्याचें एक उदाहरण त्यांनीं आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलें आहे, तें असें:—एक फार बडे गृहस्थ स्टूडन्टस लिटररी सोसायटीच्या मुलींच्या शाळेंत गेले. परंतु वर्गांतून गेले नाहींत. शाळा पाहण्याचा हेतु नव्हता. आपल्या जातीची मुलगी लग्नाची तेथें होती ती स्वतां करतां पहावयाची होती. म्हणून त्यांनीं तिला पाहण्याची या शाळेंत ठरविली होती, म्हणजे कोणाला समजल्याशिवाय तिला पाहतां यावें. हें जेव्हां मला समजलें तेव्हां मास्तरास बजावून सांगितलें कीं आमच्या शाळा नवऱ्या मुलींचे बाजार नव्हत ! १।२।६५.

पार्शी शाळांची व्यवस्था आतां त्यांची ते निराळी पहातात व हिंदूची हिंदू पहातात. १८७४ सालीं श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर मुंबईस आले होते. त्या वेळेस वरील संस्थेच्या मुलींच्या शाळांच्या बक्षिस समारंभास होळकरसरकारांस निमंत्रण केलें होतें. श्रीमंत होळकर सरकार व्यवस्था पाहून फार प्रसन्न झाले व २००० रुपये संस्थेस देणगी देते झाले. या सभेचे अध्यक्ष रावसाहेब १८७६ व १८८२ मध्यें झालेते १८८५–८६ पर्यंत होते. तेव्हां ना. तेलंग व बापूसाहेब आठल्ये संयुक्त सेक्रेटरी होते. या संस्थेशीं आरंभापासून जडलेला रावसाहेबांचा संबंध आमरणान्त होता.

## प्रकरण २८ वें.

# वकिलांची सभा.

॥ **उत्साहैकधने हि वीरहृदये नाप्नोति खेदोन्तरम्** ॥ सुभाषित.

रावसाहेब वकील झाल्याबरोबर वकीलांच्या मंडळाचे सभासद झाले. ही सभा स्थापण्याचा मुख्य हेतू वकीलांचा दर्जा वाढविण्याचा होता. हायकोर्टांतील वकील विद्वान असून त्यांस बॅरिष्टरांप्रमाणें अव्वल दावे व अपीलें चालविण्याचा हक्क प्राप्त करून घेण्याचा रावसाहेबांनीं बराच प्रयत्न केला. मेहरबानी ह्मणून एकाद्या दुसऱ्या विशेषबुद्धिमानाकरतां हा हक्क त्यांस नको होता.

असा प्रयत्न करण्याचें कारण असें दिसतें कीं कांहीं बॅरिस्टर, वकीलांशीं न्याय्य वर्तन करीत नसत, तें एखादे वेळेस इभ्रतदार वकिलास दुःखदायक होत असे. " धीरजलाल येऊन ह्मणाले मी न्या. फोर्बस् यांच्या नजरेस बॅरिष्टर लोक जें वकीलांशीं अन्यायाचें वर्तन करतात तें आणून दिलें व ह्मणाले मी बॅरिष्टर कोणत्याही कज्जांत करणार नाहीं. " मीं ह्मणालों " तुम्हीं तर पुष्कळ बॅरिष्टर करतां ? तेव्हां पुष्कळ दोष तुमच्याकडेच. मी त्यांस साहाय्य करण्याचें कबूल केलें पण सांगितलें कीं बॅरिष्टरांपेक्षां वकीलांकडेसच अधिक दोष येत आहे." (१८६४ रो.)

तथापि वकिलांच्या फायद्याची प्रत्येक गोष्ट करावयास रावसाहेब अनुमोदन देत नसत.

" मि. धीरजलाल यांकडे सभा झाली. प्रत्येक कज्जांत दोन वकीलपत्रें पक्षकाराकडून घेववावीं अशी योजना विचाराकरतां निघाली.

असें करण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं ह्मणून मी असल्या नियमानें बांधून घेण्यास तयार नाहीं. ही गोष्ट मुळींच पक्षकारांच्या खुषीवर अवलंबून असली पाहिजे. त्यांत मी ढवळाढवळ करण्यास कबूल नाहीं. लोकांना आपलें हित समजत आहे. त्यांना ही गोष्ट करण्यास भाग पाडण्याचा आह्मांला अधिकार नाहीं" ( १३–७–१८६३ रो. )

मि. धीरजलाल यांनीं सुचविलेल्या व्यवस्थेनें कांहीं नवशिक्या वकिलांच्या पोटाची सोय झाली असती. परंतु पक्षकारांवर हा विनाकारण बोजा आहे असें वाटल्यामुळें या चळवळीस रावसाहेबांनीं उचलून धरिलें नाहीं. कोणत्याही गोष्टीचा एवढ्याकरतां व्यापक दृष्टीनें विचार करावा लागतो.

रावसाहेब या सभेचे अध्यक्ष होते. कोणत्याही कायद्याच्या मसूद्यावर सरकारांत या सभेचा अभिप्राय पाठविणें झाल्यास तसें करण्यास जी कमीटी नेमण्यांत येई तींत रावसाहेब असत.

रावसाहेब या सभेंत जितक्या आस्थेनें काम करीत तितक्या आस्थेनें दुसरे काम करीत नसत म्हणून त्यांस फार वाईट वाटे. एकदां त्यांच्या आवडत्या स्टूडन्ट्स लिटररि सोसायटीच्या शाळांचा बक्षिससमारंभ त्यांचे मित्र नामदार फ्रियर साहेब, मुंबईचे गव्हर्नर, यांच्या हस्तें व्हावयाचा होता. त्याचदिवशीं वकिलांच्या सभेची वेळ नेमलेली होती. रावसाहेबांनीं रिपोर्टाचें वाचन पुरें केलें व पुढचें काम इतर मित्रांकडे सोंपवून नेमलेली वेळ चुकवावयाची नाहीं म्हणून वकिलांची सभा भरावयाची होती तेथें गेले. जाऊन पाहतात तों दोनच वकील हजर होते तें पाहून रावसाहेबांची फार निराशा झाली व म्हणाले "वकिलांनीं दुसऱ्याच्या नव्हे पण आपल्या हिताकरतां तरी वेळेवर यावयाचें होतें." असें जरी घडून येई तरी वकिलांची इभ्रत राखण्याचा प्रसंग आला म्हणजे फार उत्साहानें काम करीत असत त्याचीं उदाहरणें या ग्रंथांतील प्रकरण १९ वें, पृष्ठें १७६–७ वाचलीं म्हणजे कळतील.

---

## प्रकरण २९ वें.

# डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी.

( दक्षिणेंतील प्राकृत भाषेंत भाषांतरें करणारी मंडळी )

। इह सरसि सहर्षं मञ्जुगुञ्जाभिरामम् ।
॥ मधुकर कुरुकेलिं सार्धमम्भोजिनीभिः ॥
। अनुपममकरन्दामोददत्तप्रमोदा ।
॥ त्यजति बत न निद्रां मालती यावदेषा ॥ १ ॥ सुभाषित.

वरील नांवाची संस्था १२।१०।१८५९ सालीं प्रथम स्थापन झाली. तींत रावसाहेबांचें अंग पुष्कळ होतें. त्यावेळचे महाराष्ट्रांतील विद्वान लोक या मंडळीचे सभासद होते. त्यांतील विशेष हा कीं मि. फ्लिन् नांवाचे इंग्रज गृहस्थ या सभेचे सेक्रेटरी होते. यांस मराठी इतकें उत्तम येत होतें कीं हें हायकोर्टांत मुख्य भाषांतरकाराचें काम करीत होते.

या सभेचे उद्देश दर तीन महिन्यांनीं एक चांगला बोधपर व हित-प्रद ग्रंथ छापून प्रसिद्ध करून वर्गणीदारांकडे रवाना करावयाचा असा होता. वार्षिक वर्गणी ५ रुपये ठेविली होती.

१८६० सालीं रावसाहेब या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद झाले. मराठींत ग्रंथरचना वाढविण्यास जशी शिक्षण खात्याचे डायरेक्टर मदत करीत तशी गुजराथीभाषेंत ग्रंथरचना वाढविण्यासही करीत. लोकांनीं "गुजराथ ग्रंथ मंडळ" स्थापन केलें होतें. इंग्रजी ग्रंथांचें भाषां-तर करणें अगर नवे ग्रंथ लिहिणें हा त्या मण्डळाचा मुख्य उद्देश होता. या गुजराथी मंडळाचे पुरस्कर्ते न्या. फोर्ब्स हे होते. व गुजराथी सारस्व-ताला यांचा चांगला आश्रय असे. हे काठेवाडांत असतांना अधिकारी

या नात्यानें फार लोकप्रिय होते. यांनीं 'रासमाला' हा ग्रंथ लिहिला होता. गुजराथी कवींचा व शास्त्री पंडितांचा दुसरा भोज असें त्यांस म्हणत. यांच्या सल्ल्यानें प्रसिद्ध गुर्जरकवि दलपतराम दादाभाई हे गृहस्थ या मंडळाच्या अभिवृद्ध्यर्थ झटत असत. यांचें शेअरबझारांत फार नुकसान झालेलें ऐकून न्या. फोर्ब्स यांनी आपल्या निधनापूर्वीं भेटीस आले असतां कवि दलपतराम यांस १००० रु. बक्षिस दिले.

न्यायमूर्ति फोर्ब्स यांच्या विनंतीवरून या सभेचे सन्माननीय सेक्रेटरी होण्याचें रावसाहेबांनीं कबूल केलें. ( २९।२।१८६४ ची. रो. ई. ) गुजराथी भाषेंतील वर्णव्यवस्था ठरविली गेली त्यावेळेस रावसाहेबांनीं कांहीं वर्णविचारावर सुचना केल्या होत्या, त्या या मंडळास पसंत पडल्या होत्या. रावसाहेबांस गुजराथी चांगलें येत असे. एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें त्यांनीं गुजराथींत भाषांतर करून छापलें होतें.

याचप्रमाणें "कानडी भाषांतर सोसायटी" १८६१ मध्यें स्थापली गेली होती, तिचेही रावसाहेब सभासद होते. कानडींत उत्तम ग्रंथांची निपज करणें हाच तिचा मुख्य हेतु होता. तिचे चालक मि. जे. लिस्टर होते. या मंडळीनें इसाबनीति, बाळमित्र, आरबी भाषेंतील सुरस गोष्टी या इंग्रजी पुस्तकांचें भाषांतर कानडींत प्रथम हातीं घेतलें होतें. कानडींत कांहीं रावसाहेबांनीं ग्रंथ लिहिला नव्हता. त्यांस ती भाषा येत नव्हती परंतु कशाकरतां कोण जाणे ( बहुतकरून कांहीं ताडपत्रावरील लेख वाचण्याच्या हेतूनें ) वयाच्या ५२–५३ वर्षीं एका शास्त्रीबुवांजवळ कानडीचा अभ्यास रावसाहेबांनीं चालविला होता.

या वेळेस ग्रंथ लेखनाचें काम मुख्यतः भाषांतर स्वरूपाचें होतें. भाषांतरकार क्वचित् प्रसंगीं मूल ग्रंथावरून आपण केलेल्या भाषांतराची अथवा रचलेल्या नव्या मूलग्रंथाचीं नमुन्याचीं १० पानें परीक्षक मण्डळाकडे पाठवीत असत. परीक्षकांस जर त्यांची कृति आवडली तर

उद्योग पुढें चालवावा अशी शिफारस लेखकास परीक्षक करीत. परंतु ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्या ग्रंथाची मालकी विकत घेतली जाईल इत्यादि आश्वासन देण्यांत येईलच असा नियम नाहीं अशी त्या लेखकांची खात्री करून दिल्याशिवाय परीक्षक स्वस्थ रहात नसत. " ग्रंथाची भाषा संप्रदायाला धरून असावी, आंतील लेखानें वाचकाच्या मनाचें रंजन व्हावें, त्यास बोधप्राप्ति व्हावी, कांहीं व्यवहारज्ञान मिळावें; सारांश त्या पुस्तकास लोकांकडून मागणी यावी असें त्याचें अंतरंग सुंदर व्हावें " अशा अटी घातलेल्या असत. या मंडळीनें दिलेल्या उत्तेजनामुळें लेखकवर्गास वेळ पुरा पडेनासा झाला. केरोपंत छत्रे यांनीं गणिताबरोबर ज्योतिष हातांत घेतलें होतें. मेजर कॅण्डी यांनीं कांहीं कायद्याच्या ग्रंथांची भाषांतर हातांत घेतलीं होतीं.

शिक्षणाच्या कामास लागणारीं अवश्य पुस्तकें अनेक निघालीं व पुष्कळ ग्रंथकारांस योग्य उत्तेजन मिळालें.

## प्रकरण ३० वें.

# शिष्टदर्शन.

। गुणिनि गुणज्ञो रमते नागुणशीलस्य गुणिनि परितोषः।

सुभाषित.

वकिलीची परीक्षा देऊन स्वतंत्रपणें वकिली करूं लागल्याबरोबर, रावसाहेबांच्या ओळखी मोठ्या व विद्वान लोकांबरोबर होऊं लागल्या. कांहीं नमुन्या दाखल १८६४ व १८६५ च्या रोजनिशींतून घेऊन पुढें दिल्या आहेत.

खंडेराव महाराज गायकवाड, त्यांच्या उतरण्याच्या ठिकाणीं भेटले. धुलीपसींग, डाक्तर वुइल्सन्कडे व घरीं प्रसिद्ध इंग्रजीलेखक, राबर्ट नाइट. नारायणाचार्य नृसिंहाचार्य गजेंद्रगडकर हे नारायणशास्त्री यांबरोबर आले. फार विद्वान गृहस्थ. कज्जा फी शिवाय घेतला. मिस कार्पेन्टर ( इंग्रज विदुषी ). कॅपटन् मॅन्सफील्ड; प्रो. वुइल्यम्स्; एच. एस. मेन; आस्ट्रियाचे बॅरन क्युबेक; यांच्या भेटी झाल्या. दापोलीस मि. टक्कर, मुन्सफ भेटले, त्यांनीं कॅपटन् ब्रिग्स; मि. वार्दिंग्टन, असिस्टंट कलेक्टर; व मि. रसेल, हेड मास्तर, रत्नागिरि हायस्कूल, यांची ओळख करून दिली.

७।२।१८६५ रोजीं राजे दिनकरराव रघुनाथ जोशी राजवाडे यांची भेट झाली. अगदीं रोजचे विषय सोडून संभाषणाचा रोंख अध्यातासावर तें चाललें तरी फिरला नाहीं. मतिवैदग्ध्य पुष्कळ दिसतें. रे. शेषाद्रि यांची ओळख झाली, (महाबळेश्वर). डाक्तर लिव्हिंग्स्टन, आफ्रिकेंतील प्रसिद्ध प्रवासी, यांची ओळख गणेशखिंडींत नामदार फ्रियर यांनीं करून दिली. हे शरीरानें ठेंगणे, पण सुदृढ हास्यमुख असे आहेत. आफ्रिकेंत दोन भाषा आहेत. धर्माचे लिखित ग्रंथ नाहींत पण आचारप्रणित धर्म आहे असें सांगत होते.

मोठ्या लोकांच्या भेटीचा हाच क्रम जन्मभर चालू होता.

---

## प्रकरण ३१ वें.

# मध्यम ग्रंथलेखन.

॥ काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ॥ सुभाषित.

२०।१२।६२ च्या सुमारास किन्डरस्लेक्कृत पुराव्याच्या कायद्याचें संक्षिप्त भाषांतर रावसाहेबांनीं केलें. प्रमाणशास्त्र अथवा पुराव्याच्या

कायद्याचीं मूलतत्वें असें त्यास नांव दिलें होतें. याच्या सर्व प्रती एका पुस्तक विकणाऱ्या दुकानवाल्यानें घेतल्या. या कामांत मुकुंदराव भास्कर याचें साहाय्य होतें. याचें गुजराथींत भाषांतर रावसाहेबांनीं केलें होतें. १८६४ सालीं पोंवाडे व गाणीं मिळविण्याची खटपट करीत होते. १८६५ सालीं रामदास स्वामींची हकीकत मिळवीत होते.

## मराठी हिंदुधर्मशास्त्र.

हा ग्रंथ प्रथम १८६५ मध्यें रावसाहेबांनीं छापला. त्यांत हिंदुधर्मशास्त्रावर " मिताक्षरादि संस्कृत ग्रंथांच्या आधारें मूळ रचना करून त्यावर माजी सदर दिवाणी अदालत, हायकोर्ट व प्रिव्ही काउन्सिल यांचे ठराव कोणते झाले व त्यांत हिंदुधर्मशास्त्राचा आधार कसा घेतला आहे व त्यांत फेरफार किति झाला आहे, तें दर्शविण्यासाठीं सदरहू ठरावांचे आंत दाखले घालून हें पुस्तक रावसाहेबांनीं छापविलें. याशिवाय यांत मद्रास, बंगाल व आग्रा येथीलही ठराव घेतले होते. ग्रंथाचीं पृष्ठें २०० पर्यंत होतीं. किंमत रु. ६ ठेविली होती. हिंदुधर्मशास्त्रावर त्यांची मूळापासून प्रीति होती असें या ग्रंथावरून दिसतें व त्याचा त्यांनीं अभ्यास पुढें चालू ठेऊन पुढें मनुस्मृतीचा ग्रंथ केवढा छापला व आपलें नांव अजरामर करून कसें ठेविलें तें पुढें येईलच.

सरकारनें आश्रय दिला होता. हें पुस्तक लवकरच छापून निघालें, त्यावर रा. रा. मुकुंद भास्कर यानीं अभिप्राय दिला कीं " तुमच्या धर्मशास्त्राच्या पुस्तकांतून तद्विषयक आधार काढणें फार सुलभ झालें आहे. भाषा अगदीं सोपी आहे ". " आपण हिंदुधर्मशास्त्रावर एक पुस्तक छापिलें होतें त्या दिवसापासून मराठी जाणणाऱ्या वकीलांस अडचणी होत्या त्या दूर झाल्या. त्यामध्यें मूळच्या हिंदुधर्मशास्त्राची स्थिति काय, त्याचा चालू व्यवहारांत किति उपयोग होतो, ठरावांच्या योगानें काय

काय फरक होतो, हायकोर्टांनीं मूळग्रंथावरून ठराव केले आहेत ते कितपत उपयोगांत आणले जातील व त्यापासून काय गोंधळ होण्याचा संभव आहे त्यावरून दिवाणी कोर्टांत त्याचा किति उपयोग करतां येईल याविषयीं जेथें तेथें शंका घेऊन फार उत्तम रीतीनें विवरण केलेलें आढळतें " असें मत या पुस्तकावर दुसऱ्या आवृत्तीच्यावेळीं एका मराठी वकीलानें दिलेलें आढळतें.

त्याची एकही प्रत कोठें मिळेनाशी झाली ह्मणून १८८२ सालीं दुसरी आवृत्ति रावसाहेबांनीं हातांत घेतली. "सिमल्यास जाण्याचा तुमचा बेत आतांपर्यंत टिकला आहे कीं नाहीं मला समजलें नाहीं. या सफरींत मी सुद्धां सामील झालों असतों. पण हातांत पुष्कळ कामें घेतलीं आहेत. त्यांत मुख्य ह्मणजे माझ्या मराठी हिंदुधर्मशास्त्राची दुसरी आवृत्ति. पहिली आवृत्ति १८६५ सालीं काढिली. तिची प्रत आतां उपलब्ध नाहीं." (मि. वेडरबर्न यांस २४–९–८२ चें पत्र )

## मराठी कोश.

एक मराठी कोश रचून प्रसिद्ध करावा हा विचार रावसाहेबांच्या मनांत घोळत होता. याची रचना अगदीं स्वतंत्रपणें करावयाची नव्हती. १८२९ सालांत मुंबईत नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें नेमलेल्या पंडितांनीं एक मोठा प्राचीन कोश ( चार भाग व पुरवणी ) शिलाप्रेसवर छापून काढला होता; त्याचा आधार घ्यावयाचा होता व त्यांत नानाप्रकारचे फेरबदल करून जवळ जवळ अर्धें शतक लोटल्यावर काळाला अनुसरून जे जे नवीन शब्द घ्यावयाला पाहिजेत ते ते, नव्या कोशांत घालून त्याची सुधारणा करावी असें त्याचे मनांत होतें. लोकव्यवहारोपलब्ध माहिती, धार्मिक व सामाजिक चालीरीती, लोक ज्या शास्त्रांचा व कलांचा अभ्यास करितात व ज्या नोकऱ्या व धंदे करितात त्यांसं-

बंधीं नवे ग्रंथ, दृष्टांत व ह्मणी. यांचा त्यांत संग्रह करण्याचे हेतूनें रावसाहेबांनीं पुष्कळ तपास करून ठेविला होता. या शिवाय शाळाखात्यांत जीं पुस्तकें नेमिलेलीं होतीं त्यांचा व जे कोश हिंदुस्थानांत अगर ग्रेटब्रिटनमध्यें अगर युरोपांत प्रसिद्ध झालेले होते त्यांचा फायदा विषयाच्या अनुरोधानें व उद्योगाला बाध येणार नाहीं या मानानें रावसाहेब घेणार होते. या कार्याकरितां शाळाखात्याकडून साहाय्य मिळण्याकरितां व त्यांस कांहीं सूचना करावयाच्या असतील तर करण्यास त्यांनीं शाळाखात्याचे डायरेक्टर मि. चॅटफिल्ड यांस एक विनंतिपत्र लिहिलें होतें.

या त्यांच्या पत्राचा डायरेक्टर साहेबांनीं विचार केला व त्वरितच त्यांनीं रावसाहेबांस सुचना करण्याकरितां मेजर कॅन्डी, प्रोफेसर भांडारकर व कृष्णशास्त्री चिपळुणकर यांची एक कमिटी नेमिली होती. कृष्णशास्त्री यांनीं निरानिराळ्या विषयांचें निरूपण करून एक यादी पाठविली होती तींत त्यांनीं ग्रामीण शब्दांचा विस्तार, शुद्ध व श्रेष्ठ संस्कृत शब्द, जुने प्रचालित शब्द,प्रचारांत आलेले इंग्रेजी शब्द, इत्यादिकांची चर्चा करण्याचें सुचविलें होतें. त्याच प्रमाणें मेजर कॅन्डी यांनीं कांहीं सूचना केल्या होत्या.त्यावरून कोणच्या धरतीवर काम करावयाचें तें आणखी स्पष्ट करून रावसाहेबांनीं सांगितलें होतें तें असें “ महाराष्ट्रभाषेचा शोधपूर्वक इतिहास देण्याचा मी प्रयत्न करणार आहें. शब्दांचें मूळरूप काय व हल्लींचें काय व हल्लींचें रूप त्यांस प्राप्त होतांना कोणता अर्थ प्राकृत भाषेंतून आला तें शक्य तेवढें स्पष्ट करून द्यावयाचें आहे. संस्कृत भाषेपासून निघालेल्या प्राकृत भाषा म्हटल्या म्हणजे १ महाराष्ट्री, २ शौरसेनी, ३ मागधी, ४ पैशाची, ५ अपभ्रष्ट ( शिंदी वगैरे ) व ६ पाली, या सर्वांचा संबंध मराठीशीं थोडा बहुत येतो. विशेषतः पहिल्यानें नमूद केलेल्या महाराष्ट्रीचा येतो; कारण ती पासूनच हल्लींच्या मराठीभाषेचा उगम मुख्यतः

झालेला आहे. शालिवाहन सप्तशती व सेतुकाव्य वगैरे कालिदासाचे ग्रंथ पाहिले म्हणजे महाराष्ट्री-प्राकृत भाग तेव्हांच दृष्टोत्पत्तीस येतो. इतर प्राकृत भाषांनीं सुद्धां हातभार लाविलेला आहे तो कोणता हें भगवतीसूत्र व इतर ग्रंथ यावरून समजण्यासारखें आहे. त्या ग्रंथांचें शक्य तेवढें परिशीलन करून मी माझ्या कोशाची प्रत तयार करीन अशी आशा बाळगितों.

संस्कृतापासून किती शब्द आले या विषयींची माहिती देण्यास पुणें येथील कोश व मोल्स्वर्थ यांनी प्रसिद्ध केलेला कोश यां पासून फार महत्त्वाचें साहाय्य होईल. या प्रमाणें सांप्रतच्या अनुभवावरून मी असें म्हणतों कीं स्वतंत्र शोधनिरूपण करून सुधारणा करण्याला जागा पुष्कळ आहे.

शेवटीं सविस्तर रचनेसंबंधे कंटाळवाणा व निष्फळ वादविवाद वर्ज करून मुद्याच्या गोष्टी ठरवून घेण्यास कमिटींचें साधारणपणें मत घेण्यास मी खुषीनें तयार आहे. ”

शाळाखातें या कोशाचे कामांत रावसाहेबांना आणखी मदत करण्याला तयार होतें असें दिसतें. जुन्या कोशावरची आपली मालकी या कोशांत त्याचे आधार घेण्यापुरती त्यानें सोडली होती. या सालीं रावसाहेबांनीं प्रकृतीचे स्वास्थ्याकरितां रजा घेतली होती व फावल्या वेळांत मनाला आराम, व मराठी भाषेच्या पुस्तकांत भर हीं दोन्हीं कामें रावसाहेब करणार होते.

नारायणभाई व मेजर वाडिंगटन् यांनीं केलेलें देशी भाषा शिकविणाऱ्या शाळांच्या दुस्थितीचें वर्णन वाचून रावसाहेबांना फार वाईट वाटलें व त्यावरून शाळा मास्तरांच्या उपयोगाकरितां असा कोश काळजीनें तयार करावयाचा होता. “ या कोशाचा उपयोग जर आमच्या शाळा मास्तरांना करतां येणार नाहीं तर अद्यापि आम्हांस शिक्षणाचे बाबतींत

म्हटलें तर घुळाक्षरें ही शिकावयाचीं आहेत असें रावसाहेबांनीं एका पत्रांत लिहिलें होतें. याची किंमत रावसाहेब १५ पासून १८ पर्यंत ठेवणार होते.हा कोश पुढें झाला नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय.कां तें कोठें कळलें नाहीं. एवढी हकीकत देण्याचा हेतु हाच आहे कीं या पुढें कोणीतरी लेखक पुढें येऊन असा किंवा याहून चांगला यथाकालोचित सुधारणा करून कोश रचण्याचें मनावर घ्यावें व महाराष्ट्र भाषेची सेवा करावी.

## तुकारामाची गाथा

ह्या ४५०० अभंगाच्या पंढरपूर व इतर ठिकाणच्या गाथा संपादन करून फार मोठ्या ठशांत गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत १८६७ त रावसाहेबांनीं छापून काढविला. त्याच्या १००० प्रति काढविल्या होत्या. यांची भाषा जशी मूळ भक्तराज तुकाराम यांची होती व जशी बहुधा उमगली तशी ठेविली होती. ग्रंथाची किंमत १० रु. ठेविली होती.

## नाना फडणवीसांचें चरित्र.

नाना फडणवीस यांच्या जहागिरीचें काम रावसाहेबांकडे वकील या नात्यानें आले होतें. त्यावेळेस कांहीं कागदपत्र पाहून त्यांचें चरित्र लिहावें अशी रावसाहेबांस इच्छा उत्पन्न झाली होती. परंतु " खुद्द नानांनीं लिहिलेली हकीकत येथें नाहीं. त्यांच्या लहानपणची हकीकत कामावर रुजू झाल्यापासून पानिपतचे स्वारींहून येऊन कामावर पुन्हा रुजू होई-पर्यंत लिहिलेली होती ती विलायतेस गेली असें ऐकण्यांत येतें. " असें गोपाळ वैशंपायन नि॥ रावसाहेब फडणवीस यांनीं कळविलें तेव्हां निराश होऊन रावसाहेब स्वस्थ बसले.

## प्रकरण ३२ वें.

# म्हैसूर.

## दत्तकाचा अधिकार विरुद्ध संस्थानें खालसा करण्याचा अधिकार.

॥ एते सत्पुरुषाःपरार्थघटकाःस्वार्थान्परित्यज्य ये ॥
(भर्तृहरि)

म्हैसूरचें राज्य फार जुनें आहे. तेथील राजा आपणास शालिवाहनाचा वंशज म्हणवितो. हैदरअल्ली प्रथम म्हैसूरच्या एका राजाचे पदरीं सरदार होता. त्यानें म्हैसूरचें राज्य बळकाविलें होतें. तें त्याचा मुलगा प्रसिद्ध टिपू सुलतान याजकडे आलें. पुढें इंग्रजांचें टिपूशीं युद्ध झालें. टिपू धारातीर्थी पतन पावला. त्याच्या राज्याचा कांहीं भाग इंग्रजांनीं घेतला व प्रथम जो हिंदूराजा म्हैसूर प्रदेशावर राज्य करीत होता त्याच्या वंशांतील एक अंकूर, कृष्णराज वैडूर्य, याच्या हवालीं शेष भाग केला. लार्ड वेलस्ली यांनीं वरील राजास ३०।६।१७९९ सालांत गादीवर बसवून त्याच्याशीं स्नेहभावानें यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारा तह केला. त्या वेळेस या बालराजाचें वय अवघें ५ वर्षांचें होतें.

टिपू सुलतानाचा पुर्णिया नांवाचा जो प्रसिद्ध मन्त्री होता, त्यास या नव्या राजाचा रिजन्ट नेमिलें. त्यानें १८११ पर्यंत कारभार पाहिला व २० लाख रुपयांची तिजोरींत शिल्लक पाडली. आतां वरील बालराजे १६ वर्षांचे होऊन वयांत आले. पण भावि दुर्दैव त्यांच्या सन्निध उभें राहून हसूं लागलें.

। यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवकता ।
। एकैकमप्यनर्थाय किमुतत्र चतुष्टयम् ॥

या न्यायानें राजेसाहेबांची दृष्टि फिरली व प्रजेच्या हिताकडे ते दुर्लक्ष करूं लागले. प्रजा असंतुष्ट झाली व १८३१ सालांत बंडाची वेळ आली, तेव्हां मद्रासरकाराला मध्यें हात घालावा लागला. राजेसाहेबांस अधिकार द्यावे न द्यावे याविषयीं वर्षानुवर्ष चर्चा चालली होती व तें प्रकरण कैक वर्षें भिजत पडलें होतें. राजेसाहेबांस औरस संतति नव्हती म्हणून राज्यास वारस करून ठेवण्याकरतां १८६५ च्या जून महिन्याच्या १८ व्या तारखेस म्हैसूरच्या राजानें एक मुलगा दत्तक घेऊन ठेवला. अधिकार परत न देतां या राजाच्या नंतर राज्य खालसा करावयाचें असें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें. तेव्हां या म्हैसूर प्रकरणाला आरंभ झाला.

पुढें हें प्रकरण अर्जद्वारा मि. डिकिन्सन यांनीं पार्लमेंटपर्यंत पोंचविलें होतें. शिवाय म्हैसूर खालसा करूं नये असा अर्ज इतर नामांकित ८० इंग्रज गृहस्थांनीं केला होता. त्यांत मि० जे. फ्रेझर हैदराबादचे रेसिडेन्ट; ले. कर्नल लो, काउन्सिलर व लखनौचे रेसिडन्ट; मे. ज. ली. ग्रँड जेकब, पोलिटिकल कमीशनर, दक्षिण प्रांतांतील संस्थानें; मि. जान् क्राफर्ड, एथ्नालॉजिक सोसायटीचे अध्यक्ष; मि. गोल्डविन् स्मिथ, इतिहासाचे प्रोफेसर व प्रसिद्ध मॅक्स मुल्लर भट्ट इ. होते. कांहीं इण्डिया काउन्सिलमधील सभासदांचें मतही विरुद्ध होतें. या इतक्या बड्या मंडळीचें मत म्हैसूर खालसा करूं नयें असें होतें तरी दुसरे कांहीं बडे लोक होते त्यांचें मत म्हैसूर खालसा करावें असें होतें. त्यांत मुख्य दोघे होते. एक सर जॅकसन, कलकत्ता येथील वरिष्ठ कोडताचे न्यायाधीश, व दुसरे ड्यूक ऑफ् आर्गाइल, इंग्लंदांतील मंत्रिमंडळांत उच्च पदारूढ मुत्सद्दी. या उभयतांनीं लार्ड दलहौसीच्या राजनीतीचें धोरण दोन ग्रंथ १८६५ मध्यें लिहून

उचलून धरलें होतें. त्यांच्या ग्रंथांतील मुद्यांचें खण्डन रावसाहेबांनीं एक लघ्वाकार पुस्तक लिहून केलें. त्याचें नांव " दत्तकाचा अधिकार विरुद्ध संस्थानें खालसा करण्याचा अधिकार " असें होतें.

या प्रकरणाचा शेवटचा निकाल पार्लमेंटसभेनें लावला नाहीं तोंच अगदीं ऐन वेळेवर रावसाहेबांनीं आपलें लघ्वाकार पुस्तक विलायतेस आपल्या खर्चानें छापविलें. त्याचीं प्रुफें तपासणें वगैरे काम करण्यास त्यांस कांहीं इंग्रज गृहस्थ त्यांच्या पक्षाचे मिळाले. या पुस्तकाच्या पुष्कळ प्रती काढविल्या त्या तेथील व्यापारी मंडळ, सार्वजनिक संस्था, पार्लमेंट सभेचे सभासद, मोठमोठ्या वृत्तपत्रांचे अधिपती, रिव्ह्यूंचे चालक व इव्हॅन्स बेल सारखे हिंदुस्थानचे मित्र, फार प्रसिद्ध ग्रंथ संग्रहालयें इत्यादींस सढळपणें पाठविल्या; त्यांतल्या कांहीं मुंबईच्या टाइम्समार्फत इकडील पुढाऱ्यांस पाठविल्या. प्रांतांचे गव्हरनर व गव्हरनर जनरल व कमीशनर, काऊन्सिलर, सर्व इलाख्यांचे न्यायाधीश, व हिंदुस्थानांतील प्रमुख पत्रें, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, बाबू ख्रिस्तोदास पॉल, डॉक्तर महेंद्रलाल सरकार, कन्यालाल दे व रामनाथ टागोर यां सारखे विद्वान लोक, मि. वेडरबर्न सारखे इंग्रज मित्र यांस स्वतः पाठविल्या. कांहीं उरल्या त्या विक्रीस ठेवतांच खपल्या व रावसाहेबांकडे त्यांच्या मागण्यावर मागण्या आल्यामुळें दुसरी आवृत्ति काढावी लागली. या पुस्तकांत रावसाहेबांनीं राजे लोकांच्या दत्तक घेण्याच्या हक्काचें समर्थन फार समर्पक रीतीनें केलें आहे. रावसाहेबांस अंगीकृत कार्यांत यश आलें व त्यांच्या विद्वत्ताप्रचुर लेखाची फार प्रशंसा झाली.

या ठिकाणीं रावसाहेबांचा व म्हैसूरचा संबंध काय हें जाणण्याची प्रबल इच्छा लोकांच्या हृदयांत कुतूहल बुद्धीनें उत्पन्न व्हावी हें साहजिक आहे. रावसाहेब १८६३ पासून वकिली करीत होते तेव्हां म्हैसूर सरकारचे हे वकील झाले असतील म्हणावें तर आमच्या पक्षाचें समर्थन

करा अशी कांहीं विनंति करणारी यादी म्हैसूरकरांकडून किंवा त्यांच्या पक्षपाती लोकांकडून आलेली रावसाहेबांच्या कागदपत्रांत सांपडत नाहीं. म्हैसूर सरकारच्या पदरीं चांगले हुशार व ज्ञाते इंग्रज सल्लागार होते. अर्जद्वारा दाद मागण्याचें सर्व काम करण्यास मुंबई पर्यंत येण्याची त्यांना अवश्यकता वाटली नाहीं. किंवा त्यांच्या प्रांतांतील एकाद्या सार्वजनिक पुढाऱ्याकडून सुद्धां या दत्तक प्रकरणाची कामापुरती तरी बातमी पुरविणारीं पत्रें आलेलीं सांपडत नाहींत. एवढेंच नव्हे तर म्हैसूरसरकारास मुंबईचे रावसाहेब मंडलिक म्हणून एक वकील त्यांच्या करतां झटत आहेत अशी खबर या पुस्तकाची एक प्रत त्यांच्याकडे रावसाहेबांनीं पाठवीतोंपर्यंत नव्हती. हें महाराजांच्या शिरस्तेदाराकडून २८।१०।६६ च्या इंग्रजी पत्रावरून उघड होत आहे. त्या पत्राचें भाषांतर.

" प्रियकर महाराज !

आपल्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ माझ्या वांट्यास आजपर्यंत आला नाहीं. तरी पण निष्कामबुद्धिपूर्वक फार चातुर्यानें केवळ उघडपणें निदर्शनास येणाऱ्या आपल्या अंगच्या न्यायाभिलाषानें प्रेरित होऊन म्हैसूरसरकारच्या दत्तविधानाच्या समर्थनार्थ आपण प्रयत्न केला त्याबद्दल व्यक्तिशः माझ्या, व सामान्यतः माझ्या देशबांधवांच्या वतीनें, स्नेहातिशयानें व अगदीं शुद्ध भावानें आपले आभार मानण्यास जर अधिक विलंब केला तर मला माणुसकी नाहीं असें ठरेल."

"महाराजांना न्याय मिळाला तर हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीला अतिशय समाधान वाटेल असें स्पष्टपणें व यावच्छक्य निपुणतेनें हिंदुस्थान व इंग्लंद या दोन्हीं देशांतील जनतेच्या प्रत्ययास आणून देण्या इतकें उत्तम, ऐन आणीबाणीच्या वेळीं प्रसिद्ध झालेलें, आपलें हें पुस्तक आहे असें उच्च स्वरानें प्रकट करावयास मला अत्यानंद होत आहे. "

"आपलें वाचनसुलभ पुस्तक महाराजांच्या पक्षांतील पवित्रतेचा गुण जगाच्या निदर्शनास यथार्थ व स्पष्ट रितीनें आणीत आहे. याचें वजन लोकमतावर पडून महाराजांस अनुकूल असें वळण त्यास सुदैवानें लागेल अशी माझी पक्की खात्री आहे."

"महाराजांच्या या एका बाबीवरून पहातां आपण एकंदर हिंदी राजांच्या पक्षाचें समर्थन करतांना आपण दर्शविलेलें मनोधैर्य व तेजस्विता हीं वर्तमानपत्रद्वारा महाराजा व त्यांचे मंत्री यांस विदित झालीं आहेत असें मीं अभिमानानें आपणास कळवितांना मला गहिंवर येत आहे. आपल्या गुणांची योग्य प्रशंसा ज्या शब्दांत होईल त्या शब्दांनीं आपले धन्यवाद गाऊन महाराज व त्यांचे मंत्री हे फार सुख पावत आहेत."

"मला एक आंतून प्रेरणा होत आहे ती दाबली तर मला योग्य दिसणार नाहीं म्हणून मी पुढील थोड्या ओळी लिहित आहें. महाराज व त्यांचे मंत्री यांच्या मनांत आपल्याबद्दल निर्भर कृतज्ञता वसत आहे असें मी होऊन क्षणाचाही विलंब न लावतां आपणास कळवीत आहें. कारण त्यांच्या पक्षाच्या समर्थनार्थ अकृत्रिम सहानुभूति आपण दाखविलीत, आपली व महाराजांची ओळख मुळींच नसून आपण महाराजांस अगदीं परके असून महाराजांच्या अनन्यहार्य अशा हक्कांस धक्का देण्यांत आला असतां त्याचा समूल निषेध करण्याचे बाबतींत त्यांस न्याय मिळावा एवढ्याच शुद्ध हेतूनें आपण प्रेरित झाला आहांत असें पाहिलें ह्मणजे आपल्या सहानुभूतीचें महत्व फारच वाढतें."

"पत्र पुरें करतानां आणखीं एवढेंच ह्मणतों कीं न्याय्य पक्षाचें प्रबल समर्थन करून आपण सर्व लोकांत मोठ्या मान्यतेला पोंचला आहांत. मला व माझ्या देशबांधवांला तुम्हीं आपले ऋणी करून ठेविलें आहे. व आम्हीं मनोभावानें कृतज्ञच राहूं."

" आपलें उत्तरोत्तर कल्याण होवो, व आयुरारोग्य वृद्धि होवो अशी इच्छा करणारा."

आपला विश्वास्य

**एन्. क्रिस्तम्पल्ली,**

महाराजांचा शिरस्तेदार.

रावसाहेबांनीं हें कार्य अगदीं निष्काम बुद्धीनें अंगावर घेतलें होतें. पदरचें वित्त व त्याहून अधिक मूल्यवान वेळ वेंचण्यांत अन्यायाचा प्रतिकार करणें एवढाच त्यांचा हेतु होता हें या पत्रावरून उघड होत आहे. या म्हणण्याला पुष्टि देणारा पुरावा म्हणून आणखी एक गोष्ट नमूद करण्या सारखी आहे. हा ग्रंथ विलायतेंत छापला तेव्हां तिकडे वजन असलेल्या एखाद्या मनुष्याच्या नांवानें छापला असतां कार्य साधण्याचा अधिक संभव असल्यास तसें करूं देण्याविषयीं रावसाहेबांची तयारी होती. परंतु त्यांच्या स्नेह्यांनीं तुमचेंच नांव राहूंद्या असा सल्ला दिला; कारण तेथील किंवा येथील इंग्रज गृहस्थाच्या नांवानें पुस्तक छापल्यास, तिकडले लोक म्हणावयास लागतील कीं " हा ग्रंथ धनलोभास्तव हव्या त्यापक्षाचें समर्थन करण्यास उद्युक्त असणाऱ्या मोलानें रडावयास घातलेल्या चळवळ्यानें छापलेला आहे. " किंवा " हा ग्रंथ आपल्याच लोकांवर कांहीं कामावरून रुसून जाऊन प्रतिपक्षाला मिळालेल्याच एकानें लिहिला आहे; " अथवा " जन्मतःच देशविघाताकडे प्रवृत्ति असलेल्या एकाद्या विवेकहीनानें लिहिला आहे असें म्हणून त्या ग्रंथाची किंमत कमी करू लागतील " म्हणून त्यावर लिहिणाराचेंच नांव पाहिजे असें ठरलें. शिवाय लिहिणारा संस्कृतज्ञ वकील असून मनूच्या कायद्यांत प्रवीण आहे व इतक्या लांबून इकडे धांव घेत आहे त्यावरून त्याचा पक्ष खरा आहे अशी भावना लेखकाचें नांव पुस्तकाचे पृष्ठावर असल्यानें होईल. " म्हणून आपले नांवानें हा ग्रंथ रावसाहेबांनीं प्रसिद्ध केला. नाहींतर तो मान

कार्यावर नजर देऊन दुसऱ्यास देण्यास अथवा गमावण्यास रावसाहेब्रांची तयारी होती, हा मनाचा केवढा उदारपणा आहे !

आतां या पुस्तकाच्या प्रस्तावनेकडे वळूं. सर जार्ज रसेल क्लार्क के. सी. बी.; के. सी. एस्. आय्; इंडिया काउन्सिलचे सभासद, मुंबईचे द्विवार नेमलेले गव्हरनर, व हिंदुस्थानच्या लोकांच्या हक्कांचें संरक्षक म्हणून जे गाजलेले होते त्यांस हें पुस्तक त्यांच्या परवानगीनें समर्पण करून रावसाहेब्रांनीं जी प्रस्तावना लिहिली तिचा सारांशः—

"सर चार्लस् जॅक्सन् यांनीं लिहिलेलें 'दलहौसीच्या हिंदुस्थानांतील कारकीर्दीचें समर्थन' व ड्यूक ऑफ आर्गाइल यांनीं लिहिलेलें 'दलहौसी व कॅनिंग यांच्या अंमलाखालील हिंदुस्थान' या दोन पुस्तकांत, संतानाभावें ब्रिटिश राज्याकडे नेटिव्ह संस्थानिकांचा वारसा येतो व म्हणून तें संस्थान ब्रिटिश मुलखास जोडावें या मतावर जे कांहीं विचार आले आहेत त्यावर मी या पुस्तकांत टीका केली आहे. यावरील ग्रंथकारांतले एक पडले हिंदुस्थानांतील हायकोर्टाचे जज्ज व दुसरे ब्रिटिश पार्लमेंतमधील प्रधान मंडळांतील एक व शक्यतर हिंदुस्थानच भावी गव्हरनर जनरल, यांच्या समोर राजकारणाचे आखाड्यांत शिरून दोन हात करण्यास दण्ड थोपटून हिंदुस्थानांतील एकानें उभें राहावें हें सकृद्दर्शनीं लहान तोंडीं मोठा घास करण्यासारखें दिसलें नाहीं तरी जरा विलक्षण दिसेल. परंतु 'एतद्देशीय संस्थानिकांचे हक्क तेच आमचे हक्क, त्यांचा मान व मरातब तोच आमचा मान व मरातब असें समजून त्या हक्कांचा व मानमरातबांचा आम्ही संभाळ करूं आणखी इतर जनांशीं ज्या कर्तव्यांनीं आम्हीं बांधलेले आहांत त्याच कर्तव्यांनीं आम्हीं हिन्दुस्थानांतील आमच्या मुलखांतील प्रजाजनांशीं बांधलेले आहोंत, असें मानूं व तीं कर्तव्यें सर्वशक्ति परमेश्वराच्या कृपेनें आम्हीं इमानानें व शुद्ध भावानें पाळूं' असें राजयोग्य

वचन ज्या राणीसाहेबांनीं १८५८ मध्यें दिलें आहे त्या राणीसाहेबांचीच एतद्देशीय लोक प्रजा आहेत हें ध्यानांत ठेऊन **राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यामध्यें कांहीं गैरसमज झाला असेल तर तो दूर करून आपल्या शक्तीप्रमाणें व बुद्धिसामर्थ्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याचा कारभार सुरळित चालण्यास साहाय्य करणें** व एवढें जें उदार वचन महाराणी साहेबांकडून देण्यांत आलें आहे त्याचें चीज करणें आमच्या हिंदी प्रजेचें कर्तव्य आहे."

" ब्रिटिश लोक व हिंदुस्थानांतलि लोक यांच्यामध्यें दुर्दैवानें अद्यापि अंतर पुष्कळ आहे त्यामुळें पार्लमेंत सभेनें हिंदुस्थानाविषयक दाखविलेली आस्था स्थिर नसते. एकदां ती असे कायदे हिंदुस्थानास करून देते कीं ते हव्या त्या देशास हव्या त्याकालीं भूषणावहच होतील. एकादेवेळीं आमच्याशीं जी तिची वागणूक असते ती स्वतंत्र मनुष्याच्या हक्काशीं अगदीं विरोधी दिसते. या त्वरित होणाऱ्या स्थित्यंतरावरून असें दिसतें कीं हिंदुस्थानांतील लोकांच्या मनोभावाचें व मताचें यथार्थ ज्ञान ब्रिटिश मुत्सद्यांस करून देण्यांत येत नाहीं; त्यामुळें त्यांचा समज नीट होत नाहीं; त्यांनीं योजलेले उपाय निराधार असतात व त्याचा परिणाम असा होतो कीं राज्याच्या कारभाराची यशस्विता दैवायत्त होते."

" पदार्थविज्ञान शास्त्राच्या प्रकरणांत असें आढळतें कीं सामान्य सिद्धांत ठरविण्याकरितां विशिष्ट उदाहरणांचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची आपली रीत आहे. तीच रीत राजनीतिप्रकरणास व इतिहासलेखनास लागू आहे. मागील उपायांचे परिणाम काय झाले तें पाहून पुढील उपायांची योजना आपण शोधपूर्वक करीत असतों. १८५७ सालीं ज्या दंग्यास येथें प्रारंभ झाला व ज्यास कोणी शिपायांचें बंड म्हणतात कोणी प्रजाक्षोभ म्हणतात, ( यांस कांहींही नांव द्या. नावांत सुद्धां अर्थ बराच

असतो परंतु नुसत्या नावांकडे लक्ष देऊन मुद्दाम चुकीचा समज करून घेऊं नका. ) ते इंग्लंद व हिन्दुस्थान येथें जे प्रगतिपक्षाचे पुरस्कर्ते आहेत त्यांस इशारत देत आहेत. ”

“ भूगर्भशास्त्रवेत्ता प्रस्तरीभूत स्थितींत अथवा उलट स्थितींत क्रमवार असलेल्या भूच्या अंतर्भागाचें पर्यालोचन करून त्याच्या रचनेचा विचार करूं लागतो. त्याचप्रमाणें जगताचा इतिहास लिहूं जाणारा एका कालांत घडून आलेल्या गोष्टींवरून त्या त्या कालाचा इतिहास लिहितो. हिंदुस्थानविषयक कांहीं वाद निघाला कीं अगदीं प्राथमिक तत्त्वांचें कथन केल्यापासून आरंभ करावा लागतो हें त्या देशाचें मोठें दुर्दैव आहे. या तत्त्वांची मुत्सद्यास काहीं सोईच्या वेळेवर इतकी वारंवार विस्मृति घडत असते कीं या प्राथमिक तत्वांचें विवेचन कंटाळवाणें झालें तरी अगदीं विस्तृतपणें केल्याशिवाय गत्यंतर नसतें. सजातीय कारणापासून सजातीय कार्योत्पत्ति होते, हें अगदीं खरें आहे. तरी कांहीं इंग्रज मुत्सद्दी असें घेऊन चालतात कीं हा नियम हिंदुस्थानास लागू नाहीं. परंतु इतकें मात्र खरें आहे कीं हिंदी लोकांच्या मनाची अत्यन्त सुखनम्य प्रकृति, हिंदू लोकांची पराकाष्ठेची सहनशीलता व दैन्ययुक्तस्वभाव यांनीं वर वर बघणारा फंसून जातो व त्यास वाटतें कीं वरवर दिसत आहे ही प्रसन्न बहिः स्थिति अंतः स्थितीची म्हणजे हिंदी जनांच्या अखिल मनोभावनांची व आकांक्षांची दर्शक आहे. पृष्ठभागावर बघून ज्यांचें समाधान होतें व खोल बघण्याची ज्यांची मनीषा नाहीं ते गुप्त सुरुंगावर आपलें मंदिर उभारण्याच्या भ्रमांत पडतात.”

“ कोणीही इंग्रज आपलें झोपडें म्हणजे धडधाकट किल्ला समजतो. त्यांत पाहिजे तर वाऱ्यानें शिरावें पण प्रत्यक्ष राजानें हुकमाशिवाय शिरतां कामा नये. नेटिव्ह संस्थानें खालसा करून ब्रिटिश मुलखाला जोडावीं असें म्हणणारा इंग्रज माझ्यामतें वरील विधानास अपवाद नाहीं.

तो जेव्हां ब्रिटिश राज्यास संस्थानें जोडून सर्वत्र प्रदेशसमता करावी असा उपदेश करतो, लोकांच्या हक्कावर सविस्तर प्रवचन करतो, लोकहिताच्या व तशाच इतर बाह्यतः रमणीय अशा विषयांची चर्चा करतो तेव्हां उदार तत्त्वांचा आपण आश्रय करीत आहों अशी कल्पना करतो. दुसऱ्यास तोषीस लावून सुधारणा करणें निराळ व स्वतः झीज सोसून सुधारणा करणें निराळें.* लोकांनीं आपणाशीं जसें वागावें अशी तो इच्छा करितो तसें तो दुसऱ्याशीं वागत आहे काय? दुसऱ्याचे हक्क तेच आपले हक्क असें तो समजत आहे काय? असें मी त्यास विचारितों."

"ज्या ज्या वस्तूंचा इंग्रज गृहस्थ द्वेष करतो किंवा ज्यांचा ज्यांचा त्याला वीट आलेला आहे ती ती वस्तु आपली हिंदुस्थानच्या लोकांस हवीशी वाटते, गोड वाटते! इतका हींदी लोकांचा देहस्वभाव भिन्न असूं शकतो असें तो समजतो काय? हिंदी गृहस्थाच्या हृदयांत स्वसंरक्षण करण्याच्या अंतः प्रेरणेचा अगदीं अभाव आहे काय?"

"कांहीं अल्प स्वल्प निरर्थक वस्तूंचा संग्रह करून जो जन्मभर उराशीं बाळगून मरतांना मुलाला देऊन इंग्रज गृहस्थ सांगतो कीं 'बाबा हा आमच्या कुलांतील अनन्यहार्य वस्तूंचा संग्रह आहे. याचें आपल्या वंशांत शेंकडों वर्षें संरक्षण झालें पाहिजे.' हा कुलक्रमागत वस्तूंचा अभिमान इंग्रजांसच आहे व आपल्या कुलक्रमागत अविभाज्य वस्तूंचा, पितृपरंपरेचा, पुरातन सन्मानाचा, व याहून विशेष म्हटलें म्हणजे राज्यांचा, संस्थानांचा, राजभवनांचा, ग्रामांचा, भूमीचा व वतनांचा—जीं जीं सर्व एवढ्या राज्यक्रांत्यांतून बाकी सर्व विपर्यस्त झालीं असतां अद्याप जशीच्या तशींच आहेत त्यांचा—अभिमान हिंदूंना नाहीं इतका फरक हिंदूंच्या देहस्वभावांत शक्य आहे काय?"

---

* Do unto others as you would be done by them हें बायबल मधील दहा आज्ञांचें सारभूत जें महातत्त्व आहे तें रावसाहेब नेहमीं आपल्या लेखांत वापरीत असत.

" हिंदुस्थानसरकार राज्याचा कारभार फार गुप्त रीतीनें करतें ही गोष्ट सर्वांत दुर्दैवाची आहे. त्यामुळें राजा व प्रजा यांस परस्परांविषयींचें ज्ञान होत नाहीं. "

" राजकीय खातें व गुप्त खातें हीं अगदीं निराळीं ठेविलीं पाहिजेत. कारण अंशतः जनाच्या अमर्याद रुक्ष दृष्टीपासून त्याचें संरक्षण झालें पाहिजे. अंशतः म्हणतों याचें कारण असें कीं हिंदुस्थानसरकार व इंग्लंद या दोघांचें संयुक्त नैतिक व शरीरबल इतकें मोठें पाहिजे कीं तें आपले सर्व कारभार दिवसा ढवळ्या करूनही टिकलें पाहिजे. गुप्तपणा हा एक सोईचा प्रकार आहे; परंतु ज्याच्यापलीकडे राजकर्त्यांनीं कांहीं पाहतां कामा नये असें तें राजनीतीचें अंग नव्हे. पोप महाराजाच्या हातून कधीं प्रमाद घडत नाहीं असें रोमन कॅथालिक पंथाच्या लोकांनीं म्हटलें असतां त्यांस इंग्रज लोक हसतात. तर मग राष्ट्र या दृष्टीनें प्रसंग पडला तरीही आपल्या राजकीय चुका जे कबूल करीत नाहींत व उघड मनानें त्या चुक्यांची दुरुस्ती करीत नाहींत ते आपणांस पोप महाराजांचे निरनिराळे अवतार समजत नाहीं काय ? वाणी व करणी हीं निराळी नसावीं. जेव्हां एक पक्ष खरा व न्यायाचा आहे असें सिद्ध होतें तेव्हां ब्रिटिश पार्लमेंटसभेंत नुसतें तोंडानें नव्हे पण करणी करून असें दाखविलें पाहिजे कीं ती सभा अन्याय दूर करीतच असते. असें उघडपणें एका अन्यायाचें निरसन करून दाखविलें असतां त्याचें नैतिक बल हजारों बागनेटांच्या बलाहून श्रेष्ठ ठरेल. सत्याचें स्वरूप सदोदित एकच आहे. जें सत्य फ्रॉन्स देशांच्या लोकसभेंत तेंच सत्य अमेरिकेंत ( वॉशिंगटनच्या हिमधवल भवनांत ). सामाजिक राजकीय नैतिक आणि धार्मिक सत्याचें वजन त्यांच्यावर पडण्यास अथवा त्याची किंमत करण्यास हिंदी लोक नालायक असण्याइतकी त्यांची व त्यांच्या देहांची रचनाच आहे असें ब्रिटिश मुत्सद्यांची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. "

" एखाद्या मनुष्यास जखम झाली असतां त्याला निसर्गाच्या नियमा-प्रमाणें मूर्च्छा येते आणि रक्तस्राव बंद होतो. ह्मणून त्याची जखम बांधण्यास अवसर मिळतो. मूर्च्छावस्थेंतच तसें न केल्यास जखमांतून पुन्हा रक्तस्राव होतो व जखमी मनुष्य प्राण सोडतो."

" अशी अवस्था घायाळ झालेल्या हिंदुस्थानाला प्राप्त झाली आहे. म्हणजे एकदां रक्तस्राव होत आहे व एकदां मूर्च्छा येत आहे. सध्यां नैतिक मूर्च्छा प्राप्त झाली आहे. तेव्हां चतुर शस्त्रवैद्यांनीं पुढें येऊन जखमा बांधून रक्तस्राव बंद करून त्यास येणारी क्षीणता एकदम थांबविली पाहिजे. शारिरीक शक्ति दुराचारानें ऱ्हास पावते व सर्वांस ठाऊकच आहे कीं लवकरच त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. हिंदी संस्थानें ब्रिटिश मुलुखाला जोडून टाकावीं अशा मताच्या लोकांची नैतिक दुराचाराविषयीं कल्पना अशी आहे काय कीं मागाहून त्याबद्दल शिक्षा भोगावी लागणार नाहीं ? निसर्गाचे कायदे स्थि‹ ‹वरूपी आहेत."

सत्याचें स्वरूप सर्व बाबतींत एकच आहे. नैतिक व राजकीय बाबतींत सत्याचे परिणाम एकच आहेत. असत्य हें बहुरूपी असून सत्य एक रूपी आहे म्हणून ज्यामुळें सत्यपथ क्षणभरही सोडून जाण्यास ब्रिटिश राष्ट्र प्रवृत्त होईल त्यापासून त्यास परावृत्त करण्यास धोक्यांत पडूनही प्रयत्न केला पाहिजे."

" झालेली सत्यच्युति दाखवून देण्याकरतां हें लघ्वाकार पुस्तक लिहून हिंदुस्थानचे कल्याण इच्छिणाऱ्या लोकांस सादर करण्यांत येत आहे. हें पुस्तक लिहून झाल्यावर म्हैसूर प्रकरणांतील कागद सर हेन्री राउलिन्सन यांनीं विनंति केल्याप्रमाणे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. तें पाहून एक आनंदाची गोष्ट अशी दिसून येत आहे कीं इंडिया काउन्सिलांत म्हैसूर खालसा करण्याच्या तरफेच्या लोकांचें बहुमत असतां त्याशी विरोध करण्यास संख्याबल नसलेली कांहीं मंडळी नैतिक बलावर सिद्ध झाली

आहे; यांत सर जी. क्लार्क, सर एफ् करी, सर एच्, मॉन्टिगामरी सर जॉन् ( ज्यांशीं काहींसा माझा मतभेद आहे ते ) आणि कॅप्टन् ईस्टविक् यांनीं आपले निर्भयपणें मत देऊन हिंदुस्थानच्या इतिहासांत न्याय व सत्य याचे वाली म्हणून चिरकाल स्थान मिळण्यास आपला हक्क शाबीत करून ठेवला आहे." या पुस्तकाचे तीन भाग आहेत.

## पहिल्या भागाचा सारांश.

या भागांत दत्तकाच्या कायद्याचें स्वरूप विशद करून सांगीतलें आहे. संतानाभावें दत्तक पुत्र घेऊन पितृऋणांतून मुक्त झालें पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा आहे तिला अनुसरून दत्तक घेण्यापूर्वी सार्वभौम राजाची परवानगी लागत नाहीं असें स्मृतिवचनांच्या आधारें प्रतिपादन केलेलें आहे.

कोणत्याही हिंदी राजानें आजपर्यंत या धार्मिक कर्तव्यापासून उत्पन्न झालेल्या दत्तक घेण्याच्या हक्कास स्पर्श केला नाहीं. ईस्ट इन्डिया कंपनीने आजपर्यंत काय केलें असेल तें राहूं द्या पण याच्यापुढें महाराणीसाहेबांचा जाहीरनामा आमच्या हक्कांच्या वाटोळें सुदर्शनाप्रमाणें फिरून त्याचें रक्षण करील.

हिंदूंचा दत्तक घेण्याचा हक्क संपूर्णाङ्ग मृताच्या पारमार्थिक कल्याणाकरतां आहे. दत्तक पुत्रानें श्राद्धपक्षांत सव्यापसव्य करीत पाहिजे तर बसावें पण त्याच्या ऐहिक मत्तेवर वारसा सांगू नये असें ह्मणणें केवळ थट्टा आहे. पृथक्पणा शिवाय पृथुकरण करण्यासारखें आहे. भिन्नत्वा शिवाय भेद करण्यासारखें आहे.

अत्युक्तीशिवाय रंगवून, बाह्यशोभेनें अंतरंग लपविल्याशिवाय हिंदी लोकांनी आपली गाऱ्हाणीं राजशासन करणाऱ्या लोकांपुढें मांडण्याचें नीतिधैर्य दाखविलें असतें तर त्यांची प्रकटपणें चौकशी निःपक्षपातानें झाली असती व शिपायांचें बंड झालेंच नसतें.

## दुसऱ्या भागाचा सारांश.

दत्तक घेणाऱ्याला हिंदुधर्मशास्त्रानें कोणताच निर्बंध ठेवला नाहीं. त्याला लग्न करण्याचा जितका अधिकार आहे तितकाच दत्तक घेण्याचा आहे. राज्य खालसा करावयाला मिळावें म्हणून जर दत्तक घेण्याची बंदी सार्वभौम राजा करील तर लग्न करूं दिलें असतां संस्थानाला वारस होईल या भीतीनें संस्थानिकांस लग्न करूं देण्याची बंदी तो करूं शकेल.

राजपुतान्यांतील संस्थानें सर्वांत पुरातन आहेत. त्यांचें मुख्य शास्त्र असें आहे कीं मेवाडचा संस्थानिक केव्हांही मृत्यु पावत नाहीं. त्याचा तत्काल पुनर्जन्म व्हावयास तो अदृश्य होतो.*

ब्रिटिश सरकाराची शक्ति आतां फार वाढली आहे. परंतु तिचा उपयोग बुद्ध्या कांहीं अन्याय करण्याकडे तें करणार नाहीं अशी खातरी आहे. सत्याचा व न्यायाचा मार्ग तें आतां सोडणार नाहीं असा भरंवसा आहे. सत्य व न्याय हे दोनच त्याचे मार्गदर्शक असले पाहिजेत.

१८५८ च्या जाहीर नाम्यांत आम्हांवर अम्मल कसा करावा व आपल्या दोस्तांना म्हणजे हिंदी राजेरजवाड्यांना कसें वागवावें या विषयींची आपली इच्छा व्हिक्टोरिया महाराणीसाहेबांनीं स्पष्ट करून सांगितली आहे.

हा खलिता हिंदुस्थानांत असलेल्या एकंदर ७०,००० सत्तर हजार शूर ब्रिटिश सोल्जरांपेक्षां अधिक योग्यतेचा आहे. दोनही देशांस बळकटी आणण्याकरतां बांधलेला हा एक बुरूजच आहे. व जो मुत्सद्दी, यास लघु मानील तो नकळत ब्रिटिश सरकारच्या इभ्रतीवर असलेला हिंदी लोकांचा विश्वास शोषण करीत राहील. हिंदी संस्थानिकांनीं जी दोस्ती ब्रिटिश सरकाराशीं आत्मसंरक्षणार्थ केली ती कांहीं आपण समूळ नष्ट होण्याकरतां नाहीं.

---

* King never dies, long live the king.

म्हणून मोठे मुत्सद्दी मि. टकर यांनीं म्हटलें आहे त्याप्रमाणें जरी तरवारीचें सामर्थ्य मोठें आहे, जरी आमची सार्वभौम सत्ता सर्व संस्थानिकांनीं कबूल केली आहे, जरी संस्थानिकांशीं झालेले तह आम्हीं मोडले असतां संस्थानिकांना आमचा हात धरवत नाहीं तरी त्यांना अन्यायानें वागवितां येत नाहीं.

## भाग तिसरा.

यांत फिरून एकवार परभूम्यपहारतृष्णा आंवरून धरावी व दोस्त संस्थानिकांशीं केलेले तह संभाळावे अशी विनंति करून हा भाग संपविला आहे.

या पुस्तकांतील आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ जागोजाग वेदांतील, स्मृतींतिल, व विद्वान मुत्सद्यांच्या लेखांतील, कायद्याच्या पुस्तकांतील उतारे दिलेले आहेत. या पुस्तकाची लेखन शैली सरस पण गंभीर, निष्कपट पण प्रबुद्ध, स्पष्टोक्तिप्रचुर व तीक्ष्ण, पण सभ्य व समर्याद आहे; त्यामुळें ती फार हृदयंगम झालेली आहे. या पुस्तकाची भाषा प्रदीप्त भावनेनें प्रेरित झालेली आहे तरी लेखकाचा हेतु ब्रिटिश राज्याचा कारभार सुरळीतपणें चालण्यास मदत करणें हा आहे. पृष्ठ पहा. म्हैसूरसरकारच्या हक्करूपी शरीरास जो चिमटा बसला तो आपल्याच शरीराला बसला, त्याच्या तीव्र वेदना म्हैसूरसरकाराबरोबर आपल्यालाच होत आहेत अशी रावसाहेबांची तादात्म्य वृत्ति या पुस्तकांत दिसून येत आहे. हें पुस्तक वाचून जेकबसाहेबांनीं ३।९।१८६६ च्या पत्रांत रावसाहेबांस कळविलें कीं तुमचें पुस्तक तुमचा गौरवच करवील, इंग्लंड व हिंदुस्थान येथें तुमची कीर्ति वाढवील आणि लार्ड क्रॅनब्रोर्न यांच्या मनांत काय करावें अशी शंका उत्पन्न झाली असल्यास न्याय्य मार्ग दाखवून देईल.

दलहौसीचा पक्ष उचलून धरणारे विलायतेंतील लोक यावेळेस लार्ड क्रॅनब्रोर्न यांचें मन आपल्या पक्षाकडे ओढून घेण्यास अत्यंत प्रयत्न

करीत होते. म्हैसूर प्रकरणांतला निवाडा फिरविल्यास ब्रिटिशांची इज्जत जाईल व त्यांच्या सत्तेला धक्का बसेल अशी त्यांनीं ओरड सुरू ठेविली होती. परंतु हें पुस्तक वाचल्यावर पुष्कळांस वाटूं लागलें कीं हा प्रश्न चटकन सोडविणें अवघड आहे. हा चिकणी सुपारीप्रमाणें चिकट व कठीण आहे. दांतांनीं त्वरित फोडूं गेल्यास दांतांस इजा होण्याचा संभव आहे.

"तुमच्या पुस्तकाकडे लोकांचें बरेंच लक्ष लागलें आहे असें दिसतें. कांहीं बडे इंग्रज लोक लॉर्ड हे, व मि. लो ( होमन्यूस पत्राचे अधिपति ) इ. 'या पुस्तकाचा लेखक विलायतेस आला आहे किंवा काय ? व तुमचे ओळखीचा आहे कीं काय ?' अशी चौकशी मजजवळ करीत आहेत. ( २१।३।६७ चे दादाभाईचें पत्र ).

सरते शेवटीं १८६७ सालीं पावसाळ्यांत पार्लमेंट उघडतांच म्हैसूर-प्रकरण वादविवादास निघालें. मूळ ठराव लॉर्ड हे यांनीं पुढें आणिला; तेव्हां लार्ड क्रॅनब्रोर्न यांनीं त्याचा निकाल रावसाहेबांच्या म्हणण्या-प्रमाणें म्हैसूर सरकारच्या तर्फे दिला. व १८५८ नव्हेंबर १ तारखेच्या महाराणी साहेबांच्या जाहीरनाम्याचे पाय अधिक सदृढ केले. त्यांस स्टॅफर्ड नार्थकोट यांनीं पाठिंबा दिला होता. दीर्घोद्योग, चिकाटी, व बुद्धिसामर्थ्य याबद्दल रावसाहेबांची ख्याति सर्वत्र झाली.

औरस संतति नाहीं म्हणून म्हैसूर खालसा केलें नाहीं हें ठीक झालें. व म्हैसूर खालसा करूं नये या विचाराला इंग्लंदमधील व हिंदुस्थानांतील लोकमताचा पाठिंबा मिळाला म्हणून तें खालसा कर-ण्यांत आलें नाहीं. परंतु अशा लोकमताचा आधार मिळण्याकरतां सर्व संस्थानिकांनीं आपलें वर्तन सदोदित चोख ठेवलें पाहिजे. प्रजेला योग्य न्याय दिला पाहिजे व प्रजेची नैतिक व औद्योगिक सुधारणा केली पाहिजे. तिला संतुष्ट ठेवून आपण सुधारलेल्या इंग्रज सरकारचे दोस्त असण्याच्या

लायकीचे आहोंत असें सदैव सिद्ध केलें पाहिजे. असें संस्थानिकांच्या हातून न होईल व प्रजेचा छळ होईल, प्रजेचें रक्षण करण्या करतां घेतलेला पैसा व्यसनांत खर्च होईल तर लोकांच्या मताचा पाठिंबा त्यांच्या बाजूला कसा राहील ?

पहिल्या आवृत्तीच्या प्रसिद्धीपासून काय धडा घेतला तें दुसऱ्या आवृत्तींत आपल्या देशबांधवांच्या उपयोगाकरतां रावसाहेबांनीं मुद्दाम सांगितला आहे, तो हा कीं " जें कार्य करून घ्यावयाचें आहे त्याचें समर्थन यथान्याय व समर्याद असें ब्रिटिशजनतेपुढें केलें ह्मणजे आपल्याला यथोचित फलप्राप्ति ही होतेच. ब्रिटिश जनतेला वस्तुस्थितिपरिज्ञान जरा मंदगतीनें होतें असें सन्मानपूर्वक म्हणावें लागतें. परंतु एकदां तिचे लक्षांत आपलें कार्य सःप्रमाण सिद्ध आहे असें आलें कीं मग तिच्याहून अधिक निःपक्षपाती न्यायाधीश कोणाला मिळावयाचे नाहींत. सरकार लवकर निकाल करीत नाहीं असें ओरडणाऱ्या देशाभिमानी पुरुषांनीं एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं इंग्रजांचें राज्य हें व्यवस्थित व सनदशीर आहे. व असल्या राज्याचें सर्व सत्व वादविवादांत आहे. म्हणून मी सर्व राजकीय संस्थांस अशी नम्रपणें सूचना करतों कीं राज्यकारभार करतांना जे प्रश्न पुढें उभे राहिले असतील त्यांतील मुद्यांवर योग्य निकाल सरकारास देतां यावा, म्हणून बहुप्रयत्नानें अवश्य ती माहिती गोळा करून त्यास पुरवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. "

रावसाहेबांच्या सर्व राजकीय चळवळींची रूपरेषा वरील उपदेशांत आहे असें वाचकांस आढळून येईल.

## या पुस्तकावरील अभिप्राय.

एका हिंदी संस्थानाचें रक्षण करण्याकरतां प्रत्यक्ष विलायतेंतील जनतेपुढें जाऊन उभें रहाण्याबद्दल कलकत्त्याच्या बेंगाली पत्रानें २७।१०।१८६६ च्या अंकांत स्तुति केली.

लार्ड वेलस्लीच्या काळीं हिंदुस्थानांत लोकमत म्हणून नव्हतें. एकाही बाबतींत एकी ठाऊक नव्हती. हिंदी लोकांत आपसांत भेद होते व त्या भेदांतही भेद होते. तो काळ आतां बदलून गेला आहे. इंग्रजी सत्तेच्या खालीं भिन्न भिन्न वर्गांतील लहान लहान अवयवांचा संयोग होऊं लागला आहे. राष्ट्रीय भावना उत्पन्न होऊं लागली आहे. दळण वळणाच्या साधनांच्या व वर्तमानपत्रांच्या वृद्धीबरोबर यापुढें ज्या लोकमताकडे दुर्लक्ष करतां यावयाचें नाहीं तें लोकमत कसें आहे त्याचें स्पष्ट दिग्दर्शन विश्वनाथाचें हें लघु पुस्तक करीत आहे. ( अथीनियम, लंडन १५।१२।१८६६ )

एक मुंबईचा हिंदी हायकोर्ट वकील, इंग्लंदच्या जनतेपुढें उभा ठाकून हिंदूंच्या दत्तविधानाच्या पुरातन चालीवर शांतपणें वादविवाद करीत आहे व तो आम्हांस हक्कानें ऐकावयास लावीत आहे हें विलक्षण आहे. " डलहौसीची नीति हिंदुस्थानास मुक्तिप्रमाणें शर्मप्रद आहे " हें जें ड्यूक आफ् आर्गाइल व सर जॅक्सन शिकवीत आहेत त्याविषयीं हिंदी लोकांचें मत काय आहे तें मि. मंडलिक हे स्पष्टपणें सांगत आहेत. तें पूर्णपणें विचारार्ह आहे. इंग्रजी दृष्टीनें आम्हीं या विषयाचें पर्यालोचन केलेंच आहे. आतां हिंदी दृष्टीनें केलें पाहिजे. (लंडन प्रेस व सेंट जेम्सिस क्रॉनिकल २४।११।१८६६ ).

कांहींनीं रावसाहेब व त्यांच्यासारखेच ग्रंथ लिहून खटपट करणारे मेजर ईव्हॅन्स बेल या दोघांवरही पुष्पांजली वाहिली आहे. " दत्तक मुलगा या शब्दांचा उच्चार झाला कीं " नानासाहेब दत्त ह्मणून पुढें उभा राहतो" ही त्याची आठवण मुळींच सुखदायक नाहीं. मि. *आयर

---

*हे एक वेळ जमेका बेटाचे गव्हर्नर होते. यांनीं जें धोरण धैर्यानें एका प्रसंगीं स्वीकारलें तें स्वीकारण्यांत थोडी कसूर केली असती तर त्या बेटांतील सर्व गौर काय मंडळींचें उच्चाटण तेथील लोकांनीं केलें असतें.

हे जर मुंबईचे गव्हर्नर झाले आणि त्याचवेळेला लोकांत जर दंगा झाला तर या मंडालिकांचा कांटा वाटेंतला उपटून काढा अशी आह्मीं शिफारस करूं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें निग्रोलोकांकरतां अथवा रेड इन्डियनांकरतां स्वतंत्र प्रदेश राखून ठेवण्यांत केव्हांही घाई करणार नाहींत समजलांत ! ( धी ब्रिटिश प्रेस लंदन २९।९।६६ )

हिंदी लोक व इंग्रज लोक यांची परस्परांविषयीं मतें कलुषित झालीं आहेत तीं पहिले प्रमाणें चांगली नाहींत. तडजोडीचा मार्ग बुझाला आहे. कोणत्या गोष्टीवांचून एकमेकांचें अडून राहिलें आहे हें जाणण्याची कोणालाच पर्वा नाहीं. अशी स्थिति प्राप्त झाली असतां आपल्या देशबांधवांचीं मतें काय आहेत तें इंग्लंदांतील इंग्रज मुत्सद्यांस कळवून राजा व प्रजा या मधील गैरसमज दूर करण्याचा हिंदी गृहस्थानें केलेला प्रयत्न आम्हांस इष्टच आहे. व "हिंदी लोकांची कमालीची सहन शक्ति, मार्दव, अतिरिक्त नम्रता व आज्ञाधारकत्व यांनीं वर वर पाहणारा फंसून जातो. या गुणांनीं त्याच्या मनांतील खऱ्या खऱ्या भावना कळून येत नाहींत" असें या पुस्तकाच्या लेखकाप्रमाणेंच आमचें मत आहे. व ही भयंकर फंसवणूक होऊं न देण्याचा एक उपाय ह्मणजे हिंदी लोकांस पुढें येऊन आपलीं मतें काय आहेत हें सांगण्यास उत्तेजन देणें हा होय.( सॅटर्डे रिव्ह्यू लंदन ८।९।६६ )

संस्थानें खालसा करण्याची हौंस दलहौसीबरोबर मृत झाली असें मानणारे कांहीं उत्साही लोक होते. व ज्या चुकयांमुळें बंड झालें त्या चुका पुन्हां इंग्रज करणार नाहीं अशी आमची खात्री ते करीत असत. परंतु जुना शत्रु पुन्हां प्रकट झाला आहे. व तो मायावी असल्यामुळें त्याचें स्वरूप भयंकर आहे. म्हैसूर खालसा करावयाचें आहे. कारण हल्लींचा निपुत्रिक राजा मृत झाला कीं त्याचा वारसा आमचेकडे शेषभोगाधिकारी म्हणून येणार आहे ! दलहौसीचें भूत इंडिया काउन्सिलां-

तील सभासदांच्या अंगांत संचारत आहे. शक्य तर म्हैसूरविरुद्ध आपले बेत ते तडीस नेणार आहेत. सर हेनरी लारेन्स, जनरल फ्रेझर लो, आणि जेकब व दुसरे अँग्लोइन्डियन लोक व इंडिया काउन्सिलचे बुद्धिवान सभासद, सर जार्ज क्लार्क, सर जान विलोबी, सर हेनरी मांटगामरी, सर फ्रेडरिक करी, सर कॅप्टन् ईस्टवुईक यांनीं आपलें मत म्हैसूर खालसाकरण्याच्या विरुद्ध देऊन ठेवलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ( धी मार्निंग स्टार, लंडन २२।१०।६६ )

प्रस्तावनेंतला भाग कडक आहे परंतु त्याचा इंग्लंदांतील जनतेवर चांगला परिणाम होईल. (कलकत्ता येथील नॅशनल पेपर." ३१।१०।६६)

आमचें मत म्हैसूरच्या प्रश्नावर निश्चित झालेलेंच आहे. परंतु आह्मांकडे पाठविलेल्या पुस्तकाचें निरीक्षण आह्मांला केलेंच पाहिजे. कायदा जाणणारे म्हणत असतील कीं म्हैसूरच्या राजाचें राज्य त्यास हक्कानें परत दिलें पाहिजे तर एकदम परत देऊन टाका. परंतु तज्ज्ञलोक ह्मणत असतील कीं हिताहिताच्या दृष्टीनें राज्य देणें इष्ट नाहीं तर देऊं नका. म्हैसूर परत दिलें तरी ब्रिटिश बागनेटांची त्या राज्याच्या सुरक्षिततेकरितां जरूरी आहे. यांत लोकांस अन्यायानें वागविण्यांत येत आहे. म्हैसूरच्या राजाला राज्य परत दिल्यास त्यानें आपल्या पायांवर स्वतंत्र रितीनें उभें राहिलें पाहिजे. नाहींतर पडलें पाहिजे. हिंदूंची मनें कितीही संस्कृत झालीं तरी आतां कोणता मनुष्य आपल्या आगगाड्या, आगबोटी, चहाचे व काफीचे मळे व तसेंच पुढें अगदीं घराजवळ जवळ आलेत म्हणजे, आपलीं कुळें, व मुलें—आपल्या पसंतीवर जर गोष्ट राहिली असेल तर—हिंदूराज्याचे व्यवस्थेखालीं ठेवण्यास राजी होईल ? ( बंगलोर हेरल्ड १९।१२।६६ )

या ग्रंथाचा कर्ता मोठ्या क्षमाशांतीच्या गोष्टी सांगायला पुढें आला आहे. तुह्मीं ह्मणे संस्थानें खालसा करण्याची नीति सोडून द्या ! व दत्तक मुलगा घेण्यास परवानगी देण्याची धरा !

मि. विश्वनाथ यांची विषयाची मांडणी सोत्साह व वक्तृत्वपूर्ण आहे. पण आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ दिलेलीं कारणें पोंकळ आहेत. त्यांच्या म्हणण्याला एकच जबाब आहे. संस्थानें खालसा झाल्यानें ज्यांचें नुकसान झालें आहे त्या हिंदी राजांनीं राजदण्ड हातीं धरतांना कायद्याचीं जीं मूल तत्वें आहेत तीं मनांत बाळगलीं असतीं व प्रजेला संतुष्ट ठेविलें असतें व मनुष्यजातीला धक्का बसेल असे गुन्हे दिवसा ढवळ्या तरी होणार नाहींत अशी खातर जमा दिली असती तर लोकांच्या इच्छेविरुद्ध ह्या वारशाच्या प्रश्नांत शिरावयास इंग्रज सरकारास कारणच उरलें नसतें.

दत्तकाची संस्था परिणामीं हितकारक नाहीं. पुष्कळ वेळां दुरुपयोग होण्याचा संभव आहे. हिंदू लोकांना तरी दत्तकाचें स्वतां महत्व कळत नाहीं, हें दत्तविधानाचा जो विधि सांगितला आहे ( म्हणजे काय करावें तर तूप दही व भोजन वगैरे ब्राम्हणास द्यावें इ० ) त्यावरून सिद्ध होत आहे. हा सर्व विधि ब्राम्हणांनीं पोटाकरतां काढिला आहे. ग्रंथकार म्हणतो ‘ नांव राहण्याकरतां दत्तकपुत्र पाहिजे ’ इंग्लंदात शेषभोगाधिकारी नातेवाईकांकडे मालमत्ता जाऊन नांव नाहीं का राहात ?

आणखी एक शब्द. खालसा संस्थान करूं नये इतक्या अर्थाचा महाराणीच्या जाहीरनाम्यांतील वाक्यांश दिला आहे. पण खालसा संस्थान केव्हां करूं नये याला ज्या अटी आहेत त्या दाखविणारा शेष वाक्यांश—अंतस्थ शांतता व सुराज्य यानींच होणाऱ्या समाजाच्या अभिवृद्धीचा उपभोग घ्यावा—हा कां दिला नाहीं ? विश्वनाथ मोठ्या आत्मश्लाघापर शब्दांत म्हणत आहे ‘ येथें शब्दच्छल नाहीं ’ तर त्यास आम्हीं विचारितों वर दाखविल्या ठिकाणीं शब्दच्छल आहे कीं नाहीं तो ? ( औंध गॅझेट २।२।६७ )

नार्टनच्या स्वभावाचे इंग्रज या पुस्तकाचें स्वागत आनंदानें करतील. याची भाषा शब्दानें साधी, अर्थानें स्पष्ट व युक्तिवादानें बळकट आहे.

पुस्तक कायद्याच्या ज्ञानानें भरलेलें आहे. मि. जॅक्सन व ड्यूक आफ आर्गाइल यां सारख्या कसलेल्या लेखकांस उत्तर देतानां प्रतिपक्ष्यांच्या बुद्धिमत्तेचा मान लेखकानें ठेवलेला आहे, हें लेखकाच्या लेखनपटुत्वाची साक्ष देत आहे. इंग्लंदांहून, हिंदुस्थानांतील फ्रेंड आफ् इंडिया इ. कांच्या वचनांवर भरंवसा ठेऊन वरील दोन लेखकांनीं हिंदुस्थानासंबंधें एका विषयावर लिहितांना काय हसूं आणण्यासारख्या चुका केल्या आहेत तें या पुस्तकांत नीट दाखलिलेलें आहे. आपल्या हक्काचें संरक्षण इंग्रज शेवट पर्यंत करतात पण हिंदू वाद घालीत शान्तपणें घरीं बसतात, म्हणून राज्यभ्रष्ट होतांना त्यांना कमी वेदना होतात असें नाहीं. शास्त्राप्रमाणें प्रसिद्धपणें दत्तक घ्यावा असें आहे. तसें म्हैसूरच्या राजानें आपलें काम केलें आहे. सत्य आहे तें वारंवार लोकांच्या नजरेस आणलें असतां त्यास अधिक तेज चढतें म्हणून आपल्या मतास चिकटून राहणाऱ्या राजकारणी पुरुषांच मन वळविण्याकरतां या लेखकाचें अनुकरण इतरांनीं करावें. ( मद्रास स्टॅन्डर्ड २ नोव्हेंबर ).

राणीच्या जाहीरनाम्यानंतर ह्मैसूर खालसा करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. संतानाभावीं ह्मैसूरच्या राज्याचा लोप हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यांत होऊं देणें ह्मणजे सत्याचा व न्यायाचा लोप होऊं देण्यासारखें आहे. हें तत्त्व ज्यांस पटत नसेल त्यानें मि. मंडलिक यांचा "दत्तविधान करण्याचा अधिकार विरुद्ध संस्थान खालसा करण्याचा अधिकार" हा ग्रंथ ज्याची विलायतच्या व हिंदुस्थानच्या पत्रांनीं वाहवा केली आहे तो वाचावा. ( मेजर इव्हॅन्स बेल. )

या पुस्तकाच्या बुद्धिमान लेखकास आह्मीं असें विचारतों " तुला प्रत्यक्ष ह्मैसूरास जाऊन घर करून राहणें कितपत आवडेल तें सांग पाहूं ! " ( मुंबई गॅझेट. )

" हिंदी संस्थानिकांचा जो मान व मरातब तो आमचा असें मानून त्यांचा सन्मान करूं व हिंदी लोकांविषयीं आमचीं कर्तव्यें आम्हीं सद्-

सद्विवेक बुद्धीनें प्रेरीत होऊन विश्वासूपणें करूं" या महाराणीसाहेबांच्या जाहीरनाम्याकडे बोट दाखवून आम्हीं आपलीं वचनें पाळलीं नाहींत व पुढेंही तीं पाळलीं जाणार नाहींत. अशी इशारत एका सुशिक्षित हिंदी गृहस्थानें आम्हांस द्यावी हें आम्हांस फारसें भूषणावह नाहीं. 'दत्तकाचा अधिकार विरुद्ध संस्थानें खालसा करण्याचा अधिकार' हें मंडलिक यांच्या पुस्तकाचें अशुभसूचक नांव आहे. संस्थानें खालसा करण्याचा अधिकार आम्हांला पाहिजे आहे. म्हणून संस्थानिकांस असलेला दत्तकाचा अधिकार काढून घेण्यांत येत आहे. यांत दुहेरी अन्याय होत आहे. असें लेखकानें फार प्रबल व उघड समजण्यासारखीं कारणें देऊन सिद्ध केलें आहे. दत्तकाचा प्रश्न हा हिंदुधर्मशास्त्राचा आहे. तो त्या शास्त्रानेंच सोडविला पाहिजे व दत्तक घेण्याला राजाची परवानगी लागत नाहीं असें त्या शास्त्राप्रमाणें सिद्ध झाल्यावर सार्वभौम राजाकडे शेषाधिकार येतो कीं नाहीं या प्रश्नाचाही निकाल आपोआप लागतो. राजा मृत होतो पण त्याचें राज्य मृत होत नाहीं. हें तत्व हिंदूधर्मशास्त्रास व इंग्रजी कायद्यासही संमत आहे आमच्या फायद्याकरतां आह्मीं ह्या दोन्ही तत्त्वांच्या चिंधड्या उडविल्या आहेत, हें नाहीं ह्मणतां यावयाचें नाहीं. म्हैसूरप्रकरणाचा येथें निकाल होण्याच्या ऐन प्रसंगीं 'राणीसाहेबांच्या जाहीरनाम्याचा अनादर करूं नका' अशी सूचना ग्रंथकर्त्यानें केली आहे. तिचा योग्य विचार होईल अशी आशा आहे. (होम न्यूज् २६।९।६६)

कलकत्ता येथील हिंदी वकिलांस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून भांडत बसण्यांतच मौज वाटत आहे. सार्वजनिक कल्याणाची यांची फारकत झालेली आहे. मुंबईचा हायकोर्टवकील मि. जनार्दन या प्रमाणें 'प्रमाण शास्त्रावर' ग्रंथ लिहिणारा बेंगाल हायकोर्टांत वकिल कोठें आहे! ड्यूक आफ आर्गाइल अथवा सर चार्लस जॅकसन सारख्या प्रवीण सार्वजनिक पुढाऱ्यांशीं दत्तकाधिकाररूपी रणक्षेत्रीं सामना करून

धर्मशास्त्राच्या शस्त्रानीं लढून त्यांस मंडलिकाप्रमाणें चीत करणारा स्वतंत्रवृत्तीचा धैर्यवान बंगाली वकील कोठें आहे ! दत्तक घेण्याला सार्वभौमराजाची संमति नको हें मंडलिक यांनीं शास्त्रवचनपरंपरेनें सिद्ध केलें आहे. रोज नवीं नवीं तत्त्वें काढणें व नीति बदलणें हा पोरखेळ आहे. व त्यांत भय आहे असें आम्ही सांगतों. ( हिंदू पेट्रिअट. )

पहिल्या भागांत मंडलिक यांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेण्याचा अधिकार गरीब रयतेपासून मोठ्या राजापर्यंत सर्वांस आहे असें सिद्ध केलें आहे. दुसऱ्या भागांत हें राज्य सार्वभौमसरकार दत्तकाला परवानगी देण्याचें नाकारून खालसा करूं शकत नाहीं असें सिद्ध कलें आहे; व तिसऱ्या भागांत ड्यूक आफ् आर्गाइल व सर जॅक्सन यांच्या संस्थानें खालसा करण्याच्या साधारण मतावर टीका करून तीं खोडून टाकिलीं आहेत. औंध वगैरे संस्थानें कांहीं विशिष्ट राजनीतीला अनुसरून ब्रिटिशसाम्राज्यान्तर्गत करण्यांत आलीं व मुत्सद्दी जनानीं दिलेलीं कारणें त्या वेळेस सप्रमाण दिसलीं असतील. पण अद्यापि त्यांच्या विरुद्ध वादविवाद करतां येण्यासारखा आहे. या पुढें असा वाद माजूं नये म्हणूनच राणी साहेबांनीं जाहीरनामा काढला आहे. व त्यांतील वाक्याच्या अर्थाचा अनर्थ करून भागणार नाहीं. राणीसाहेबांनीं दिलेल्या वचनाप्रमाणेंच ह्मैसूरप्रकरणासारख्या प्रश्नांचा निकाल लावला पाहिजे.

हिंदी चाली रितींत कोणत्याही पूर्वींच्या सार्वभौम राजानें हात घातला नाहीं. म्हणून आह्मीं घालूं नये हें विश्वनाथाचें ह्मणणें आह्मीं सर्वच मान्य करीत नाहीं. हिंदी चालीरितींत हात घालण्याची आम्हांला सत्ता आहे. कायद्यानें हात घालण्याचा हक्क नसेल, पण आम्हीं हिंदी चाली रीतींत हात घातलाही आहे. सती जाण्याच्या, आंकडे टोचण्याच्या व जगन्नाथाच्या रथाखालीं चिरडून जाण्याच्या हक्कांत आम्हीं हात घातला आहे. व हात घातला ह्मणून विश्वनाथालाही वाईट वाटत नसेल. तथापि

एकाद्या संस्थानिक दुर्वर्तनी निघून प्रजेचा छळ त्याच्याकडून किति करूं द्यावा ही जबाबदारी आमची सार्वभौम राजाची आहे. तीसंबंधीं प्रश्न सोडविणें कठीण काम आहे. आह्मीं एकादें संस्थान खालसा केलें म्हणजे तें स्वार्थाकरतांच होय, त्यांत जनतेचें कल्याण करण्याची इच्छा हें नुसतें निमित्त आहे असें आम्हीं विश्वनाथाबरोबर म्हणत नाहीं व आम्हीं असें म्हणत नाहीं म्हणजे दलहौसीसांप्रदायाचें आम्हीं सर्वदा समर्थन करण्यास तयार आहों असेंही नाहीं. आतांचे दिवस निराळे आहेत. त्या वेळचे दिवस निराळे होते. तेव्हां जें इष्ट होतें तें आतां नाहीं. महाराणीसाहेबांच्या जाहीरनाम्यांतील वाक्यावर मंडलिक यांची भिस्त आहे. व तीं वाक्यें नुसतीं वाग्भूषणें आहेत, शब्दावडंबरें आहेत असा कोणाचा समज होऊं देतां कामा नये. सत्य व दानत या दोन वस्तूंला मान द्यावयास आम्हींच तरूण हिंदी लोकांस शिकाविलें आहे. इत्यादि कारणांचा विचार करतां म्हैसूर प्रकरणाचा नीट निकाल करावा अशी आम्हीं शिफारस करतों.

“ झालेला अन्याय ” विश्वनाथ म्हणतो “आम्हीं दूर करूं शकतों असें दाखविण्याची उत्तम संधी पार्लमेंतसभेस आली आहे. म्हैसूर प्रकरण निकालास पार्लमेंत सभेंत आलेलें आहे. इन्डिया काउन्सिलच्या पांच सभासदांचे अनुकूल अभिप्राय पडले आहेत परंतु मि. मँगलससारखे न्याय्य रीतीला अयोग्य,बालिश रीतीला योग्य, अशीं कारणें पुढें आणीत आहेत. त्याचें हिंदी लोकांच्या मनांस दुःख होत आहे ‘ यावच्चंद्र-दिवाकरौ ’ असे शब्द घालून केलेला जो तह तो काय नुसतें बाक्षिस पत्र आहे काय ? ह्मैसूरचा महाराजा तह मोडील तर खुद्द त्याला शिक्षा करा. परंतु परभूम्यपहारतृष्णेपुढें ब्रिटिश राष्ट्रानें तहचे तह गुंडाळून ठेवावे ह्मणजे आध्यात्मिक उन्नतीच्या उच्चपथावरून जड भौतिक अधोगतींत घसरत जाण्याप्रमाणें आहे.

राजकीय प्रकरणांत प्रामाणिक व न्याय्यरीति हीच उत्तम नीति होय.

शेवटल्या वाक्याचा जबाब देतानां आम्हीं आमच्या गुणदोष विवेच-कांच्या—मंडलिक यांच्या—नजरेस एकच गोष्ट आणन देतों ती हीं कीं या पुस्तकांतील राजकीय प्रश्नावर ज्या स्वतंत्रपणें व ज्या निर्भिडपणें ग्रंथकारानें चर्चा केली आहे, ती स्वतंत्रता व तो निर्भिडपणाच त्याची खात्री करून देईल कीं ब्रिटिश राज्य हें प्रामाणिक आहे व न्यायी आहे. त्याच्या हातून चुका झाल्या असल्या तरी केवळ संस्थानिकांशीं वागतांना सरते शेवटीं एका भूम्यपहारतृष्णेचें प्राबल्य चालूं देणार नाहीं. ( टाईम्स आफ् इंडिया २३।११।६६ )

आपल्या देशाच्या हितानहितासंबंधीं प्रश्नांवर हिंदी लोक काय ह्मणतात तें ऐकण्यास आह्मांस नेहमींच आनंद होत असतो ह्मणून आह्मीं मंडलिक यांच्या पुस्तकाचें प्रेमानें स्वागत करतों.

दत्तकाची संस्था ही अगदीं धर्मभोळेपणाची आहे त्यांत अर्थ नाहीं. असें दलहौसी सारख्या सूज्ञ राजकारणी पुरुषास वाटत होतें तसेंच दत्तक पुत्र हा औरस पुत्राप्रमाणेंच गुणावह आहे अशी हिंदूंची भाक्ति आहे. व तो घेण्याची निपुत्रकांवर सक्ति आहे असें मॅन्गल्स् सारख्यांसही कळत नाहीं. मॅन्गल्स् ह्मणतात, 'दत्तक पुत्र हिंदी राजांस घेण्याचा हक्क आहे. श्राद्धपक्ष करतांना सव्यापसव्य करीत बसून राजाची खाजगी मालमत्ता पाहिजे तर त्या दत्तक पुत्रानें घ्यावी. पण राज्य घेऊं नये.' मॅन्गल्स हे आह्मां आंधळ्यांचे एक डोळे राजे आहेत. मोठ्या पदावर आरूढ आहेत. इंन्डिया काउन्सिलचे सभासद आहेत. मोठे अनुभवी आहेत व म्हैसूर संस्थान खालसा करण्याच्या कामीं त्यांनीं दिलेली कारणें सरकारला सबळ वाटलीं.

या ग्रंथानें हिंदी लोकांचें खरें मत व शास्त्र कळून आलें आहे. अद्यापिही खाड्यांत पडण्याची वेळ टाळतां येईल. ( डेलीन्यूस १७।९।६६ )

या शिवाय ज्या विद्वान व बड्या लोकांस पुस्तकाच्या प्रती पाठविल्या होत्या त्यांच्यापैकीं काहींनीं साभार स्वीकार केला. काहींनीं शुभचिंतन केलें व सर जार्ज क्लार्क ह्मणाले कीं विश्वनाथाचीं मतें इष्ट अशा लोकांस मीं समजाऊन सांगेन.

## प्रकरण ३३ वें.

# विश्वविद्यालय.

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥ १ ॥

कंपनीसरकारचें राज्य सुरू झाल्याबरोबर हिंदी लोकांस इंग्रजी शिक्षण द्यावें कीं, न द्यावें हा मोठा प्रश्न ब्रिटिश मुत्सद्यांपुढें उभा राहिला. त्याचा निकाल त्यांनीं केला नाहीं तोंच इंग्रजी शिक्षणाच्या शाळा* मिशनऱ्यांनीं कंपनीच्या मुलखांत काढल्या होत्या. परंतु त्यांचा संबंध इंग्रजी विद्येच्या दानाशीं जेवढा होता त्याहून ख्रिस्ती धर्मविषयक ज्ञानाच्या प्रसाराशीं अधिक होता. परंतु पुढें मेकॉलेसाहेबांनीं १८३५ सालांत हिंदी लोकांस इंग्रजी शिक्षण देण्याचा आपला अभिप्राय स्पष्ट जाहीर केला; व हिंदुस्थानच्या भावी कल्याणाचा बेत कायम केला. त्यांनीं लिहिलें कीं इंग्रजी ज्ञानानें पुढील काळीं इंग्रजी लोकसत्ताक संस्थांची मागणी हिंदी लोक करूं लागतील असा संभव आहे. तें किती दिवसांनीं तें सांगतां येत नाहीं, पण तशी वेळ आली तर माघार घेण्याचा किंवा

---

* सरकारी व खाजगी शाळा व कॉलेजें यांबरोबर आपलीं शाळा व कॉलेजें काढून प्रथम पासून हातीं घेतलेलें हें शिक्षणाचें काम मिशनऱ्यांनीं अद्यापिही पहिल्या उत्साहानें सुरू ठेविलें आहे. त्यांत हजारों गरीब विद्यार्थ्यांची सोय झाली व होत आहे.

त्यांच्या मागण्यांचा अव्हेर करण्याचा मी प्रयत्न करणार नाहीं. अशी वेळ केव्हांही येवो पण ती ज्या दिवशीं येईल तो दिवस इंग्लंडच्या इतिहासांतील सर्वांत मोठ्या गौरवाचा होय.*

जशी जशी शिक्षणानें हिंदी लोकांच्या अंगीं स्वतः राज्य चालवून स्वतः रक्षण करण्याची योग्यता वाढेल तशी तशी इंग्रज लोकांनीं त्यांच्यावरील सत्ता हळू हळू काढून, त्यांस पूर्ण स्वातंत्र्य द्यावें लागलें तर देण्याची त्यांच्या मनाची तयारी आहे असें आगाऊ दाखविल्याबद्दल मेकॉले साहेबांचा धन्यवाद लोक अद्यापि गातात. लार्ड वुइल्यम बेंटिंग यांचेंही मत इंग्रजी भाषा हिंदी लोकांस शिकवावी असें होतें. सार्वजनिक शिक्षणाचीं खातीं पुष्कळ ठिकाणीं काढावीं व प्रत्येक इलाख्यांत विश्वविद्यालयांची स्थापना करावी व उच्च शिक्षणाकरतां सरकारी कॉलेजें काढावीं व शिक्षकवर्ग उत्पन्न करण्याकरतां ट्रेनिंग कालेजें काढावीं व खाजगी

*हिंदी लोकांना इंग्रजी शिक्षण द्यावें असें प्रतिपादन करतांना मद्रासचे प्रिन्स नार्टन एका प्रसंगीं ह्मणाले "हिंदुस्थानांतील बहुजनसमाजास सुशिक्षित करून त्यांचीं मनें चांगलीं संस्कृत झाल्यावर त्या शिक्षणाच्या व संस्कृतीच्या परिणामानें जर ब्रिटिशांचा हिंदुस्थानांतील अम्मल संपला व अशा प्रसंगीं आमच्या खांद्यावर डोकें ठेवून असलेल्या देशाविषयीं जें आमचें कर्तव्य तें आह्मीं केलें असें जर इंग्लंद देश अभिमानानें ह्मणूं शकेल तर जो ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील अम्मलाचा शेवटला दिवस उगवेल त्याकडे मी शान्त व प्रसन्न मनानें पाहीन." यावर रावसाहेबांचे एक इंग्रज मित्र कर्नल जेकब ह्मणतातः—

"पुतळा उभारून स्मारक करण्याच्या लायकीचा जर एकादा मनुष्य कोणी असेल तर हा एक प्रिन्स नार्टन होय. याच्यासारखे लोक आपल्या बरोबरीच्या लोकांस खालीं टाकून वर वर चढत जातात. याच्यांतच इंग्रज मनुष्याचा खराखरा उदार स्वभाव अधिक अंशानें उतरलेला असतो क्षुद्र मनोविकारांची यांस बाधा होत नाहीं. व आपण नुसते अँग्लो इंडियन आहोत हें विसरून 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाचा अंगीकार करतात." २८-११-६५ चें पत्र.

शिक्षण संस्थांस द्रव्यसाहाय्य करावें इत्यादि विचार कंपनी सरकारच्या अंमलांतच १८५४ सालांत घाटूं लागले व विश्वविद्यालयांची स्थापना १८५७ सालीं अमलांत आली.

विश्वविद्यालयांच्या स्थापनेचा मुख्य उद्देश उदार शिक्षणाचा प्रसार होय. वाङ्मय, शास्त्रें, कला इत्यादि ज्ञानाच्या भिन्नभिन्न शाखांत प्राविण्य संपादन केलेल्या तरुणांच्या परीक्षा घेऊन ज्ञानोचित पदवी दान करून त्यांची मान्यता करणें हा एक ज्ञानप्रसाराचा विश्वविद्यालयानें स्वीकारलेला मार्ग होय. ही इंग्रजी संस्था सर्वांस पूज्य वाटते. हिचें स्थान, मन पवित्र करतें. तेथें जातीचा विरोध नाहीं. धर्माचें बंड नाहीं. देशकालकृत भेद संभवत नाहीं. येथें फक्त विद्यादेवीचे भक्त विद्येची सेवा करण्यांत गढलेले असतात. ही विश्वविद्यालयाची कल्पनाच मनांत आदर उत्पन्न करणारी आहे. अशा विश्वविद्यालयाची स्थापना कंपनीसरकारच्या राज्यांतच बंडाचा उद्भव झाला होता व सर्व हिंदुस्थान शोकग्रस्त झालें होतें तरी झाली होती; यावरून कंपनीचें राज्य चालविणारे लोक किती उदार होते तें दिसून येत आहे. नामदार एल्फिन्स्टन हे त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर स्वतः कोणत्याही विलायतच्या कालेजांतून बाहेर पडलेले नव्हते तथापि कालेजांस आश्रय देणारी विश्वविद्यालयाची संस्था ते निर्माण करूं शकले इतकें त्यांचें बुद्धिसामर्थ्य व संघटनाचातुर्य होतें.

या ॲक्टाप्रमाणें नेमणुका झाल्या त्याः—

चॅन्सेलरः—नामदार एल्फिन्स्टन साहेब मुंबईचे गव्हर्नर.

फेलोंच्या वर्गातः—मुंबईचे सर न्यायाधीश; मुंबईचे लार्ड बिशप; कांहीं काउन्सिलचे सभासद; शिक्षण खात्याचे डायरेक्टर; प्रसिद्ध कालेजांतील मुख्याध्यापक; शिवाय डॉ. वुइल्सन सारखे बरेच विद्वान इंग्रज लोक होते.

कांहीं हिंदी लोक होते त्यांत सर जमशेटजी जीजीभाई, जगन्नाथ शंकरशेट, भाऊ दाजी व महम्मद अली रोगे, मुंबईचे काझी, असे होते.

चॅन्सेलर, व्हाइसचॅन्सेलर व फेलोज् मिळून जो संघ होतो त्याला सेनेट म्हणतात.

विद्येच्या ज्या निरनिराळ्या वैद्यक, कला, रसायन शास्त्र, कायदा, गणित इ. शाखा आहेत त्या शाखांची व्यवस्था करण्यास पोट मंडळें नेमलेली असतात. ज्याच्या त्याच्या ज्ञानाप्रमाणें प्रत्येक फेलोचा कोठल्या नाहीं कोठल्यातरी पोट मंडळांत समावेश करण्यांत येतो. या पोट मंडळाचे सभासद आपसांत निवडणूक करून प्रतिनिधी निवडतात त्यांस सिंडिक म्हणतात. शिवाय कांहीं सिंडिक, सेनेट ही सभा निवडते. व त्यांच्या सभेस सिन्डिकेट म्हणतात. विश्वविद्यालयाचें काम सुरळित चालण्यास नियम, कार्यक्रम वगैरे करण्याचा अधिकार सेनेटच्या सभेकडे असतो. शेवटला निर्णय या सभेकडे असतो. सेनेटनें केलेल्या नियमांची अम्मल बजावणी करून विश्वविद्यालयाचा कारभार करण्याचें काम सिन्डिकेटकडे आहे. तो कारभार रजिस्ट्रार मार्फत ही सभा करते. सिन्डिकेट सभा दरमहिन्यास शुक्रवारीं कामकाजाकरतां भरते, व सेनेटही वर्षांतून ८।१० वेळां भरते. प्रत्येक विद्याशाखेचे सभासद आपला आपण मुख्य निवडतात. त्यास डीन म्हणतात. प्रथम फेलो, मग सिन्डिक, मग डीन अशा मानाच्या पायऱ्या आहेत. त्याच्यावर व्हाइस चॅन्सेलर व सर्वांत मुख्य चॅन्सेलर हा मान फक्त इलाख्याच्या गव्हर्नरासच मिळतो. १८६२ सालीं रावसाहेब प्रथम विश्वविद्यालयाचे फेलो नेमले गेले. ललितकला, कायदा व सिव्हिल इन्जिनीयरिंग या शाखांच्या पोटमंडळाचे रावसाहेब सभासद होते. फेलो नेमले जाण्याच्या अगोदरच कालेजांतील पहिल्या परीक्षेंत त्यांस १८६१ मध्यें मराठीचे परीक्षक नेमलें होतें. मुशाहिरा १०० रुपये मिळाले. बरोबर मि. कॅन्डी हे होते. पुढें पहिली बी. ए. व दुसरी बी. ए. या परीक्षांच्या १८६२ व १८६३ सालच्या अभ्यासक्रमांत कोठलीं मराठी व गुजराथी पुस्तकें नेमावीं हें ठरविण्याचें काम रावसाहेब व डा.

भाऊ या दोघांकडे सोंपविलें होतें. १८६२ सालीं पुन्हां त्यांस मराठी व सिंधी या दोन भाषांचे परीक्षक नेमण्यांत आलें. १८६५ सालीं त्यांस मॅट्रिकच्या परीक्षेंत परीक्षक नेमिलें होतें. परीक्षक या नात्यानें त्यांचें वर्तन फार कडक असे. कोणी उमेदवार भेटावयास आला ह्मणजे ह्मणत "उमेद्वारानें उत्तरें देण्यांत चपलता व कुशलता दाखवावी. व्यर्थ दुसऱ्यास भेटण्यांत कालाचा अपव्यय करूं नये."

१८६८ सालीं त्यांस एल्. एल्. बीच्या परीक्षेंत पहिल्यानें परीक्षक नेमिलें. त्यावेळेस १३।४।६८ रोजीं बाळ मंगेश वागळे यांनीं त्यांस पत्र लिहिलें तें असें:—"तुम्हांला, तुमच्या मोठ्या बुद्धिमत्तेला व हिंदुधर्मशास्त्राच्या तुमच्या पूर्ण ज्ञानाला दिलेला हा मान मी फार मोठा समजतों."

हा मान त्यांस १८६८ पासून १५ वेळां मिळाला. परीक्षक या नात्यानें त्यांचें वर्तन अगदीं निःपक्षपाती असे. असें सांगतात कीं प्रसिद्ध हायकोर्ट वकील दाजी आबाजी खरे व त्यांचे सहाध्यायी (सर.) नारायणराव चंदावरकर हे दोघे रावसाहेब परीक्षक असतां एल् एल्. बी. च्या परीक्षेस बसले होते. कागद तपासल्यावर रावसाहेब पहातात तो दोघांना सारखे गूण मिळालेले! हिंदूलॉ हा परीक्षेचा विषय होता. बक्षिस कोणाला द्यावें याचा विचार पडला. तेव्हां पुन्हा उत्तरें वाचून पहातां फरक असा दिसून आला कीं (न्या.) चंदावरकर यांनीं आधार म्हणून स्मृतिवाक्यें लिहिलीं होतीं. हें अधिक विद्वत्तेचें लक्षण होतें. तेवढ्यावरून बक्षिस चंदावरकर यांस देण्याचें रावसाहेबांनीं ठरविलें.

एके सालीं एम. ए. च्या परीक्षेला एक बुद्धिमान विद्यार्थी बसला होता. पर्शियन भाषेंत भाषांतर करण्यास कांहीं ओळी दिलेल्या होत्या. त्या भाषांतरापैकीं मधल्या भागाचें भाषांतर ज्या कागदावर त्यानें केलें होतें तो कागद त्याच्या हातून सर्व कागद एकत्र बांधतांना गळाला

होता म्हणून, अथवा कसा तरी नाहींसा झाला होता. परीक्षकानें ५० पैकीं ५ गूण दिले होते. हें प्रकरण रावसाहेबांकडे कागद सांडल्याची शंका येऊन निर्णयार्थ आलें होतें. शिक्षणविषयक संस्थांशीं अगदीं संबंध नसलेल्या एका आरबी व पर्शियन या दोन्हीं भाषेंत प्रवीण असलेल्या अशा गृहस्थाचें साहाय्य रावसाहेबांनीं घेतलें होतें. तपास करतां त्यांस आढळलें कीं दोनतृतीयांश ओळींचें त्यानें केलेलें भाषांतर श्रेष्ठ दर्जाचें होतें. शेवटल्या उपलब्ध पानावरील वाक्यांशानें मधल्या म्हणजे सांडलेल्या पानावरील मजकूर पुरा केलेला होता. त्यावरून त्यानें समग्र भाषांतर केलें होतें व उपलब्ध असलेलें भाषांतर २५ गूण देण्याच्या लायकीचें होतें असें ठरविलें व त्या विद्यार्थ्यास त्या विषयांत पास धरण्यास हरकत नाहीं असें विश्वविद्यालयाचे रजिष्ट्रार यांस कळविलें.

विश्वविद्यालयाचा फेलो नेमला जाणें हा मोठा मान आहे. हा मान कोणास द्यावा या विषयींचें मत रावसाहेबांनीं करून ठेवलेल्या फेलो नेमण्यास लायक अशा मनुष्यांच्या यादीवरून समजतें. त्यांत तीन प्रकारच्या मनुष्यांस जागा होती. १ फार विद्वान; २ साधारणपणें विद्वान परंतु शाळा खात्यांत जन्म घालविल्यामुळें शिक्षणविषयक फार अनुभव मिळवलेले; व ३ स्वतां विद्वान नसून शिक्षणाचे अत्यंत पक्षपाती*

प्रथम मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना झाली त्यावेळीं मॅट्रिक्युलेशन

* यांतील एकाच्या नावांपुढें अशा अर्थाचा शेरा आढळतो:—एकंदरींत फार यशस्वी विद्यार्थी. हे गृहस्थ येथील विद्या पुरी करून आपलें ज्ञान वाढविण्यास विलायतेस जाऊन आले होते.

पुढें एकाच्या नांवापुढें अशा अर्थाचा शेरा आढळतो:—केवळ विद्यासंपन्न ह्मणून यांची शिफारस नलगे. व्यापारीशिक्षण, व सार्वजनिक संस्था यांकरतां ज्यांनीं पुष्कळ कामगिरी केली अशा एका प्रासिद्ध कुटुंबांतील हे एक आहेत. या कुटुंबाचें स्मारक ह्मणून अद्यापि एकादी संस्था अस्तित्वांत आहे.

पासून बी. ए. च्या परीक्षेपर्यंत मराठी, गुजराथी इत्यादि देशीभाषांचा प्रवेश सर्व अभ्यासक्रमांत झालेला होता. एम्. ए. च्या परीक्षेकरतां मात्र संस्कृत किंवा लॅटिन शिकावें लागे.

१८६२ सालीं देशी भाषांस विश्वविद्यालयांतून अर्धचंद्र देण्याचा प्रयत्न झाला तेव्हां तसें करण्यास पुढील कारणें एकानें दिलीं होतीं :—" मॅट्रिक्युलेशन पर्यंत देशी भाषांची जी परीक्षा होते, ती नीट होते. व तींत कांहीं परीक्षकांस कुशलता दाखवितां येते. पण पुढें काय ? पुढल्या परीक्षेंत नेमण्यासारखीं पुस्तकें कोठें आहेत ? आहेत तीं येणेंप्रमाणें.

१ मॉरलक्लॉसबुक. ( गुजराथी व मराठी या दोन भाषांत याचें भाषांतर होऊन १५ वर्षें झालीं आहेत. )

२ अनेक विद्यामूलतत्व.

३ कोलम्बसाचें चरित्र. ( याचें भाषांतर होऊन १५ वर्षें झालीं आहेत. )

४ विद्येचे उद्देश, लाभ व संतोष. ( हें पुस्तक छापून ३० वष झालीं आहेत. )

५ एल्फिन्स्टनकृत इतिहासाचें भाषांतर. (हें प्रसिद्ध होऊन दोन वर्षें झालीं आहेत.)

चरित्र निरूपणः—हें छापून दहा वर्षें झालीं. ( फक्त गुजराथींत. )

६ मराठी सहावें पुस्तक.

७ मराठी कवींचें वर्णन अथवा नवनीत. ( हें छापून ½ वर्ष झालें आहे. )

८ बालमित्र. ( हें छापून ३० वर्षें झालीं आहेत. )

९ मराठी सातवें पुस्तक.

१० निबंधमाला. ( बक्षिसांचे निबंध. )

हीं पुस्तकें पहा व जर आक्सफर्ड किंवा केंब्रिज येथील विश्वविद्यालयांतील वरील परीक्षेंत राक्षसास मारणारा जॅक हें पुस्तक जर अभ्यास-

क्रमांत नेमलें असतें तर त्यांस तुम्हीं काय म्हटलें असतेंत तें सांगा ! असलीं पुस्तकें येथें अभ्यासक्रमांत ठेवून संस्कृत व लॅटिन यांची जागा अडवून ठेवण्यासारखें आहे. नाहीं म्हणावयाला **तुकाराम** व **रामदास** या कवींच्या ग्रंथांचें अवलोकन बी. ए. झाल्यावर सुद्धां करतां येईल. ”

“मॅट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत देशी भाषांत नापास होणारे विद्यार्थी पुष्कळ सांपडतात. पण वरच्या एफ्. ए. च्या परीक्षेंत नापास होणारे फार थोडे व बी. ए. च्या परीक्षेंत नापास होणारा एकाद् दुसराच म्हणून देशी भाषा काढून त्यांच्या ऐवजीं संस्कृत व लॅटिन या भाषा शिकविल्या जाव्या. ” अशी सुचना त्यानें केली होती. ती संबंधें सर्व कागद् पत्र **रावसाहेबांकडे** आले होते.

देशी भाषांच्या उच्चाटणाच्या विरुद्ध **रावसाहेब** होते. स्वमताच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं कारणें दिलीं होतीं त्यांचा सारांश असा आहे.:—

“ असल्या महत्वाच्या विषयाचा विचार करतांना ‘ आक्सफर्ड व **केम्ब्रिज** ’ या बड्या नांवांचें वजन मनावर पडूं देतां कामा नये. **ग्रीक** व **लॅटिन** यांचा प्रवेश तेथें होण्यास कारणें निराळीं आहेत. तीं १ सत्ताभिमान; व २ ख्रिस्ती धर्मज्ञानास आश्रय दिल्याबद्दल या भाषांबद्दल मूढविश्वासमूलक पूज्यबुद्धि. अगोदरच हिंदी विद्यार्थ्यांस **ग्रीक** व **लॅटिन** या भाषां इतकी कठिण भाषा जी इंग्रजी तिचा अभ्यास करावा लागतो. म्हणून इंग्रजी भाषा **ग्रीक** व **लॅटिन** या भाषांच्या ऐवजीं होईल व देशीभाषांचा अभ्यास चौकस रीतीनें केला तर तोही कठिणच होईल.”

“ **पेशव्यांना** जर पुण्यास मराठी विश्वविद्यालय स्थापावयाचा प्रसंग आला असता तर संस्कृत भाषेचा प्रवेश तेथें सजला असता; परंतु येथून देशी भाषांचे निष्कासन करणें म्हणजे इंग्लडांतील विश्वविद्यालयांतून इंग्रजी भाषेचेंच निष्कासन करण्या सारखें आहे. **मॅट्रिक्युलेशनच्या** परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या मुलाचें संस्कृत बेताचें असल्यामुळें

पुढें तो मराठीचा तिरस्कारच करूं लागेल. वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांतील काहीं १५ वर्षांचीं जुनीं आहेत व कांहीं ३० वर्षांची आहेत. सरकारी बुकडेपोनें मराठी देशी पुस्तकांची अनन्यहार्य मालकी घेतली आहे तिचा परिणाम याबाबतींत झालेला दिसत आहे. कांहीं प्रमाणभूत होतील असे ग्रंथ लिहिण्याचें काम **गोविंद विठ्ठल महाजन** ऊर्फ **भाऊ महाजन** यांनीं हातीं घेतलें होतें. ब्रिटिश अम्मल सुरू होऊन आतां ४० वर्षें होऊन गेलीं. जुन्या तऱ्हेच्या छापखान्यांतून पुस्तकें निघूं शकत नव्हतीं. शकतीं तर जुनीं चरित्रें, बखरी व काशीराव यांच्या हकीकतीसारखे ग्रन्थ होते. पंचतंत्र, विदुरनीति, विक्रमचरित्र इ० पुस्तकें शिक्षणखात्याच्या अगदीं आरंभीं आरंभीं छापून प्रसिद्ध झाललीं आहेत."

"सुंदर भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें पाहिजे असतील तर बाळमित्र व इसापनीति हीं आहेत. यांची भाषाशैली साधी, सुंदर व तेजस्वी आहे. अद्यापपर्यंत या गुणांवर दुसऱ्या कोणत्याही पुस्तकानें ताण केली नाहीं व इतक्यांत करील असें मला वाटत नाहीं. इतर मराठी गद्य अगदीं नुकतेंच जन्मास आलेलें अतःएव नवीन आहे ह्मणून तें त्याज्य आहे. त्यास उत्तर असें आहे कीं तें कांहीं काळाने जुनें होईल. जर जुने ग्रंथ दुसरे पाहिजे असतील तर कोठल्याही विश्वविद्यालयापेक्षां जुने ग्रंथ येथें उपलब्ध आहेत."

देशी भाषांतील गद्य ग्रंथाची निंदा करतांना जे संस्कृत ग्रंथ कालेजांत शिकवतात ते गद्यग्रंथ नसून काव्यग्रंथ आहेत ही गोष्ट हे निंदक विसरतात. ह्मणून देशी भाषांचें उच्चाटन केल्यापासून निर्भेळ हितच होईल असें अजून सिद्ध झालें नाहीं. असेंही पुन्हां सांगण्यांत येतें कीं देशी भाषा पुढें करतां पण त्या भाषांतील ग्रंथांतील विचार मूळ संस्कृत भाषांतूनचना घेतलेले आहेत ? खरें आहे. पण ज्ञानेश्वरी पंडितांना

समजत नाहीं. मोरोपंत व वामन पंडित यांनीं मराठी लिहितांना संस्कृ-तावर वरात केली आहे. संस्कृतज्ञ महान शास्त्री मराठींत नैपुण्य दाखवीत नाहींत. कॅन्डी साहेबांच्या पंडितास मराठीचा चौकस रीतीनें अभ्यास करावा लागला ! मराठी भाषेचें संवर्धन अजून करणें आहे" असें सांगून रावसाहेब पुढें म्हणाले.

" गृहस्थ हो ! जी भाषा इंग्रजी भाषे इतकीच जुनी आहे, जी अभ्यासनिभृतविद्यार्थ्यांची लालसा पुरवील अथवा व्यवसायी मनुष्या-च्या सर्व व्यवहारांस पुरा पडेल इतका जिचा शब्दसंचय आहे, आपणास माहीत आहे अशा कोणत्याही भाषेइतकी भावि उत्कर्षाचीं जींत लक्षणें दिसत आहेत ती भाषा आज श्रेष्ठपदास पावलेल्या संस्कृत भाषेच्या निनादयुक्त गौरवास व ॲटलॅन्टिक महासागराच्या पलीकडील अन्य-छिद्रलब्धावकाशपरंपरेंतून जन्म पावलेल्या प्रचारांस बळि देण्याचें ठर-वून तिचा घात करण्याचें तुमचे हातांत आहे ! म्हणून काय करावें तें तुमच्या सुविचारसिद्ध मतावर सोंपवितों ! "

शेवटीं सभेंत जेव्हां विषय निघाला त्यावेळेस त्यांनीं जें भाषण केलें त्याचा सारांश खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

" मी मि. वेस्ट यांच्या ठरावास आनंदानें पुष्टि देत आहें. विश्व-विद्यालयांतून देशी भाषांचें पूर्ण उच्चाटन झाल्यावर जी उणीव उत्पन्न होणार आहे ती भरून काढण्याचें काम संस्कृत व लॅटिन या भाषांचा प्रवेश अभ्यासक्रमांत होऊं दिल्यानें होणार नाहीं. हल्लीं सुद्धां देशी भाषांच्या अभ्यासांत इतकी हयगय होत आहे कीं आपल्या समाजाचे विचार काय आहेत ते बरोबर समजून सांगण्यास हल्लींचे बरेच विद्यार्थी ह दुभाषी या नात्यानें काम करण्यास असमर्थ आहेत असें मला दुःखानें म्हणावें लागतें. विद्यार्थी देशी भाषांत जें लिहितात व बोलतात तें धड इंग्रजी नाहीं व देशी भाषेंतलेंही नाहीं. मातृभाषेचें त्यांना

परिपूर्ण ज्ञान नसतें याचाच हा परिणाम आहे असें मी निःशंकपणें सांगतों. इलाख्याचे मुख्य ठिकाणीं जीं कालेजें आहेत त्यांच्या भींतींच्या आंत देशी भाषांस विद्यार्थी मज्जावच करितात. संस्कृतासारख्या चतुरस्र व महारंभरचन भाषांच्या अभ्यासानें बुद्धीचें सामर्थ्य वाढवून ती परिपूर्ण करतां येते असे फायदे कितिही दाखविण्यांत आले तरी मातृभाषेचें अपरिपक्वज्ञान उगमाशीं विद्यानदीचा प्रवाह गढूळ करील असें भय वाटत आहे. ”

रावसाहेबांस यश आलें नाहीं. युनिव्हर्सिटीच्या मंदिरांतून मराठी भाषेची हकालपट्टी व दुष्यन्ताच्या दरबारांतून शकुन्तलेची हकालपट्टी यांत पुष्कळ साम्य आहे. भेद एकच आहे तो हा कीं, तिला बाहेर निघून जातांना आपला वाली कोणी नाहीं ह्मणून जितकें अवघड वाटलें तितकें मराठीला विश्वविद्यालयाच्या मंदिरांतून बाहेर जातांना वाटलें नसेल कारण तिला एक तरी वाली मिळाला होता.

वास्तविक पाहिलें असतां असें दिसतें कीं जे लोक आज जिवंत आहेत त्यांची सजीव भाषा सोडून स्मृतिगत झालेल्या लोकांची मृत भाषा शिकवणें हें मागें पाऊल टाकण्यासारखें आहे. संस्कृत व लॅटिन भाषा उत्तम आहेत. त्यांना उत्तेजन देणें निराळें व देशी भाषांच्या डोक्यांवर घाव घालणें निराळें. पोटाकरतां शिकल्या जाणाऱ्या इंग्रजी भाषेला भुरळलेले विद्यार्थी मातृभाषेचा अभ्यास कधींच करणार नाहींत. म्हणून देशी भाषांच्या उच्चाटनाबरोबर त्यांचा अभ्यास बंद झाला असें समजावयास हरकत नाहीं. संस्कृत भाषेला जागा मिळाली हें पण उत्तम झालें. तींत सारस्वत उत्तम असल्यामुळें देशी भाषांस वळण लावण्याकरतां तिची गरज आहे. नुसत्या इंग्रजीच्या ज्ञानानें गर्वित झालेल्या विद्यार्थ्यांच्या डोक्यांत जुन्या संस्थांविषयीं तुच्छता उत्पन्न होण्याची भीति संस्कृत भाषेच्या अभ्यासानें नष्ट होईल यांत संशय नाहीं. आपल्या कीर्तिमान पूर्वजांच्या बुद्धिमत्तेची

कल्पना बरोबर व्हावयास संस्कृत भाषेच्या अभ्यासाशिवाय साधन नाहीं म्हणून हल्लीं देशी व संस्कृत या दोन्ही भाषांस विश्वविद्यालयांत थारा मिळाला ही गोष्ट सर्वांत उत्तम झाली आहे.

यानंतर १८८५ सालीं फ्रेंच भाषेचा प्रवेश विश्वविद्यालयांतील कालेजांत होण्याचा प्रसंग आला होता. तेव्हां मि. वाय्. एन्. रानडे यांस रावसाहेबांनीं पुढील पत्र लिहिलें होतें:–श्रेष्ठवर्गीय भाषांत फ्रेंच भाषेचा समावेश करण्याच्या मी विरुद्ध आहे. व दुसऱ्या सिन्डिकनीं असाच अभिप्राय प्रदर्शित केला आहे. अजून ठराव पुढें आला नाहीं, म्हणून मराठीच्या भक्तानीं जर आपलें म्हणणें नीटपणें निदर्शनास आणून दिलें तर त्यांचें काम होईल. जें जें असल्या श्रेष्ठवर्गीय भाषांचे तर्फे म्हणतां येईल त तें मराठीच्या तर्फे म्हणतां येईल. ( १२।४।१८८५ )

## डेक्कन कॉलेज्

१८७६ सालीं डेक्कन कालेजांतील विद्यार्थ्यांनीं अशी ओरड केली कीं त्या कालेजांतील दोन अध्यापक शिकविण्यास नालायक आहेत. हळू बोलतात व काय बोलतात तें समजत नाहीं. पुढें दाद मागून घेण्याकरतां सर्वांनीं वर्गांत हजर राहावयाचें नाहीं असा कट केला. मुख्याध्यापकानें त्यांची खात्री करून दिली कीं वाटेल तेव्हां वाटेल त्यास वर्गांतून गैरहजर रहातां यावयाचें नाहीं. जरा समजूत पटल्यासारखें त्यांस वाटलें परतु १९ व्या शतकाची पूर्ण छाप त्यांच्यावर पडली होती. त्यांनीं सभा भरवून गव्हर्नर साहेबांचेकडे अर्ज करावयाचे ठरविलें, व दोन तृतीयांश विद्यार्थ्यांच्या सह्या घेऊन त्यांनीं अर्ज पाठवून सुद्धां दिला.

त्यांची आणखी तक्रार अशी होती कीं मुंबईइलाख्यांत दोन सरकारी आर्ट कॉलेजें आहेत. एक एल्फिन्स्टन् कॉलेज व दुसरें डेक्कन कॉलेज. पहिलें श्रीमंताचे व दुसरें गरीबांचे. पहिल्यांत प्रोफेसर चांगले असून त्यांची संख्या अधिक आहे. दुसऱ्यांत प्रोफेसर थोडे, विषय

थोडे, व त्यांचे बुद्धिसामर्थ्यही थोडें. यामुळें डेक्कन कॉलेजातील मुलें परीक्षेंत पुष्कळ पास होत नाहींत, इत्यादि इत्यादि व पुढें काय होतें त्याची वाट पहात बसले. तेव्हां दोन दिवसांतच त्यांस कळलें कीं बी. ए. च्या वर्गांतील मुलगे मानानें वडील म्हणून अधिक शहाणे त्यांस एक वर्षपर्यंत परीक्षेला बसण्याची बंदी झाली. व बुद्धीला वर्षभर तांब लागण्याची वेळ आली. शिष्यवृत्ति मिळण्यास नालायक ठरले. मधल्या वर्गांतले मुलगे शिष्यवृत्ति मिळण्यास १॥ वर्ष व तिसऱ्या वर्गांतील मुलगे वर्षभर नालायक ठरले.

निनांवी पत्रें लिहिण्यापेक्षां या मुलांनीं आपलें खरें मत अर्जांत नमूद करून उघड उघड वर सह्या केल्या व माफीचा साक्षी कोणीही पुढें आला नाहीं व या खवळलेल्या समुद्रांत आह्मीं सर्व एकाच होडींतून प्रवास करून सगळेच बुडूं किंवा तरूं अशी जूट दाखविली म्हणून यांचा गुन्हा कमी योग्यतेचा आहे असें कांहीं वृत्त पत्रांस वाटलें. विद्यार्थ्यांनीं पुन्हां माफी अर्ज डायरेक्टरकडे केला होता. व त्यांच्या पालकांनींही केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर गव्हर्नर साहेबांकडे अर्ज गेले होते. गव्हर्नर साहेबांनीं शिक्षा कमी केली. यांची शिक्षा कमी करण्यांत रावसाहेबांचें अंग होतें असें पुढील काशिनाथपंत तेलंग यांच्या दोन पत्रांवरून दिसतें. "या गरीब विद्यार्थ्यांचें तुम्हीं मध्यें पडल्यास कांहीं तरी हित होईल. त्यांस किती काळजी लागून राहिली आहे त्याची कल्पना तुम्हांस होत असेलच. याच्या अगोदर मी तुम्हांस याविषयीं भेटलों नाहीं हा माझाच दोष आहे"

गव्हर्नर साहेबांनीं दया करून शिक्षा दीडवर्षांवरून सहा महिन्यांवर आणली. नंतर काशिनाथपंतांनीं दुसरें पत्र रावसाहेबांस लिहिलें तें:—

"डायरेक्टरानीं केलेली एक वर्षाची शिक्षा कमी करून बाकीची सहा महिन्यांची मुलांस भोगावयास ठेवण्यांत आली. परंतु सहा महिन्यांची

कमी शिक्षा भोगावयास पडली तरी वर्ष फुकट जातेंच ह्मणून शिक्षा कमी झाल्यानें मुलांचा फायदा होत नाहीं म्हणून एकवार आपण जी मुलांची कामगिरी केली ती तशीच पुन्हा एकवार करण्याची तुम्हांस विनंति करीत आहें. वरील उपकार ज्या सद्गृहस्थाच्या अथवा सद्गृहस्थांच्या साहाय्यानें तुम्हीं केलीत त्याच्या अथवा त्यांच्या नजरेस वरील गोष्ट आणून द्यावी, व निकाल जितका लवकर होईल तितका पाहिजे आहे. इ."

रावसाहेबांनीं जी खटपट केली त्यावरून विद्यार्थीवर्गाबद्दल सहानुभूति रावसाहेबांच्या हृदयांत किति वास करीत होती तें दिसून येत आहे.

पूर्वीं मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसण्यापूर्वीं परीक्षेला बसणाऱ्या मुलांचें वय १६ असलें पाहिजे असा नियम होता. त्या नियमाच्या विरुद्ध रावसाहेबांचें मत होतें. ते म्हणाले "अशी वयाची यत्ता ठरविणें म्हणजे मुलाच्या बौद्धिक सामर्थ्यावर बलात्कार करण्यासारखें आहे. तीक्ष्ण बुद्धीच्या कित्येक मुलांस आपलें शिक्षण थांबवून धरावें लागलें आहे. अशा मुलांस अगोदर कालेजांतील शिक्षण मिळूं दिलें असतां पुढें जर त्यांस विलायतेस अधिक शिकण्यास जावयाचें असेल तर फायदाच होईल."

जर कांहीं नवीन नियम करावयाचे झाले, व तेणेंकरून विद्यार्थ्यांचे असलेले हक्क हिरावून घेण्यानें ते जर त्यांस ( विद्यार्थ्यांस ) बाधक होत असतील तर ते नियम गतकालापासून लागूं करूं नये. भाविकालसापेक्षच त्यांचा अम्मल व्हावा असें रावसाहेब ह्मणत असत. ( १८-९-१८८२ चे रे० ब्लेक यांस पत्र ).

१८७३ पासून १८८८ पर्यंत त्यांस लॉचे सिन्डिक निवडण्यांत आलें होतें. बोर्ड ऑफ अकाउन्ट्सचे सभासद नेमिलें होते. १८८९ सालीं

रामसाहेबांस डीन निवडण्यांत आले होतें. हा मोठा मान हिंदी गृहस्थांस पहिल्यानेंच देण्यांत आला होता.

आजपर्यंतचीं स्मारकें हिंदी लोक आपलीं आपण करून ठेवीत असत. इंग्रजी शिक्षणाबरोबर लोकांनीं स्मारकें करण्याची पद्धत नवीनच या देशांत सुरू झाली आहे. परंतु तशीं स्मारकें ज्याचें स्मारक करावयाचें त्याच्या मृत्यूनंतरच करण्याची वहिवाट आहे. परंतु या वेळीं रावसाहेबांच्या मित्रांस व इतर चाहत्यांस त्यांच्या गुणावर असलेल्या प्रेमाला ऊत येऊन त्यांच्या हयातींतच त्यांचें स्मारक करण्याचें ठरविलें.

त्यांची एक सभा पेटिट हालमध्यें भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष सर दिनशा माणकजी पेटिट यांनीं भाषण केलें त्यांत रावसाहेबांचे विषयीं त्यांनीं खालील प्रशंसापर उद्गार काढले. " मनुष्य हयात असून सार्वजनिक हिताचीं कामें करण्यांत गुतला आहे तोंच त्याची स्मृति राखण्याकरतां एखादें स्मारक कृत्य करावें हें अकालिक होय असें कधीं कांहीं लोक म्हणतात. माझ्या स्वतांविषयीं विचाराल तर माझें मत तसें नाहीं; आणि माझा अशी खात्री आहे कीं तुमचेंही कोणाचे तसें नाहीं. जी जी सार्वजनिक हिताची गोष्ट करावयाची निघेल तींत तींत रावसाहेब गेल्या तीस वर्षे सक्रिय भाग घेत आले आहेत. आणखी तेवढ्या अवधींत त्यांनीं पुष्कळ यश संपादन केलें असें खात्रीनें म्हणतां येतें. ते जन्मभर लोकांच्या व सरकारच्या विश्वासास पात्र झाले आहेत. व दोघांविषयीं आपलें कर्तव्य यशस्वी रीतीनें करतांना त्यांनीं वर्णनीय बुद्धिसामर्थ्य व स्वतंत्रतेचा बाणा दाखविला आहे."

" या नगरींतील लोकांची व तशीच एकंदर देशाची सेवा जी यांनीं केली आहे, ती अमोलिक आहे. व तिच्या विषयीं त्यांचा गौरव करणें अगदीं युक्त आहे."

नंतर वरजीवनदास माधवदास म्हणाले, " आम्हीं एतद्देशीय लोक

रावसाहेबांस पुष्कळ वर्षे उत्तम शहाणे व यशस्वी कार्यकारी असे जे आमचे पुढारी आहेत त्यांतील एक आहेत असें मानीत आलों आहोंत. व सर्व महत्त्वाच्या प्रसंगीं त्यांचा उपदेश आम्हीं घेत आलों आहोंत. आपल्या देशबांधवांचें हित साधण्याकरतां त्यांनीं स्वहितनिरपेक्ष स्वार्थ-त्याग दाखविला आहे. + + + मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या कामाकाजांत यांच्या वजनानें तिचें फार हित झालें आहे. तें साधण्याकरतां स्वतांचा काय, काळ व कांचन यां कडे त्यांनीं मुळींच पाहिलें नाहीं.” स्मारकार्थ जमलेले पैसे विश्वविद्यालयाच्या स्वाधीन करून त्यांतील व्याजांतून त्यांचा आवडता विषय जो मनुस्मृति त्यांत प्राविण्य दाखवणाऱ्या विद्यार्थ्याला एक सुवर्णपदक देण्याचें ठरविण्यांत आलें. या स्मारकाचा उल्लेख करतांना १८८८ सालीं जो पदवीदानाचा समारंभ झाला त्या प्रसंगीं व्हाइस चॅन्सेलर या नात्यानें सर रेमंड वेस्ट यांनीं भाषण केलें. त्याचा सारांशः—राजकीय बाबतींत अथवा सामाजिक बाबतींत अथवा दुसऱ्या एकाद्या बाबतींत चळवळ करण्याची जी दिशा रावसाहेबांनीं पतकरली होती तिच्या विषयीं भिन्न लोकांची भिन्न मतें असतील परंतु या विश्वविद्यालयांत हे शिक्षणाचे संवर्धक, मोठ्या भक्तीनें व इमानानें त्याचे साहाय्यकर्ते आहेत असें प्रत्येक जण कबूल करील अशी माझी खात्री आहे. या कामीं त्यांनीं अविश्रांत श्रम घेऊन जी सेवा केली ती अखंड आहे. व त्यांच्या कामाची अशी प्रशंसा लोकांकडून होत आहे व त्यांचें नांव विश्वविद्यालयासारख्या संस्थेच्या कागदपत्रांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जात आहे हें पाहून जेवढें आम्हांस सुख होत आहे त्याहून अधिक सुख दुसऱ्या कशाहूनही होणें शक्य नाहीं. आमच्या या संस्थेंतील जीं उत्तम व सर्वांत योग्य अशीं माणसें होऊन गेलीं त्यांच्या नांवाप्रमाणें यांचें नांव सुप्रतिष्ठित होईल. यांच्या अंगीं सलूपिशस, व्हेरो व मसीनास या प्रत्येकाचे गूण व सर्वत्रांची कीर्ति एकवटलेली आहे.

## विश्वविद्यालयांतील तर्कबद्ध वाक्प्रसारिणी मंडळी.

( University Dialectic Society. )

वरील मंडळीचे मोठे मोठे विद्वान लोक सभासद असत. त्या सभेचा सभासद होण्याचा मान रावसाहेबांस २९।६।१८८२ रोजीं मिळाला होता. या मंडळींतील वादविवाद पार्लमेंट सभेच्या धर्तीवर होत असत. विषय फार महत्वाचे असत. व वक्ते फार विद्वान असत. मासल्या करतां कांहीं खालीं दिले आहेत.

वक्ता मि. फाक्स विषय. इंग्रजांचें परराष्ट्रीय धोरण कोणच्या तत्त्वावर निश्चित करण्यांत यावें ?

वक्ता विषय. राजपक्ष व प्रजापक्ष यांचें संमिश्रण इष्ट आहे काय ? असेल तर शक्य आहे काय ?

वक्ता मि. के. विषय. इजिप्त.

... ... विषय. स्थानिक स्वराज्याच्या अधिकारप्राप्तीपासून हिंदुस्थानाचा फायदा होणार काय ?

वक्ता न्या. मि. वेस्ट. विषय. हिंदी लोकांस निःशस्त्र ठेवण्याची नीति इष्ट आहे काय ?

वक्ता मि. पिंकर्टन् विषय. खुला व्यापार हिंदुस्थानास हितावह आहे काय ?

## शिक्षण कमीशन.

१८८२ सालीं सरकारनें शिक्षण कमीशन बसविलें होतें. "मुंबई शहरांत लोकांत असलेली तुमची प्रतिष्ठा, पश्चिम हिंदुस्थानांतील शिक्षण खात्यांतील व सार्वजनिक कामांतील तुमचा मोठा अनुभव लक्षांत घेतां तुमच्या साक्षीनें कमीशनास फार मदत होईल व देशाचें कल्याण होईल असें आम्हांस वाटत आहे," असें मि. ली. वार्नर यांनीं अगोदर रावसाहेबांस पत्र लिहिलें होतें. व कमीशननें काय प्रश्न विचा-

रवयाचे तें ठरविलेलें होतें, पण त्यांशिवाय जर रावसाहेबांस आणखी कांहीं प्रश्न विचारावे व त्याच्यावर लोकांचे अभिप्राय घ्यावे असें वाटत असेल तर ते प्रश्न सुचवावे अशीही विनंती त्यांत केली होती. व आगाऊ कांहीं प्रश्नांवर चर्चाकरण्या करतां रावसाहेबांच्या घरीं भेटीकरतां वेळ नेमून घेतली होती.

या कमीशनचे सभासद खालीं दिल्याप्रमाणें होते. नामदार हन्टर सी. आय. ई. एलएल. डी. अध्यक्ष. एच. पी. जेकब एस्कायर; डब्ल्यू स्कूनर; एस्कायर, एम्. ए. आय् सी. एस्.; का. त्रिं. तेलंग एस्कायर, एम्. ए. एल. एल. बी. ॲड्व्होकेट; यांच्यापुढें प्रोफेसर वर्ड्स्वर्थ; बद्रुद्दिन तय्यबजी; नवरोजी फर्दुनजी, गोकुळदास पारख; काजी शाबुद्दीन; मि. जाईल्स; म. मो. कुंटे वगैरे विद्वान मंडळीच्या साक्षी झाल्या होत्या. मुंबईचे लार्ड बिशप यांनीं लेखी टिपण पाठवून दिलें होतें. पुढें मुंबईस कमीशन आलें तेव्हां यांच्या साक्षी करतां नेमलेल्या दिवशीं रावसाहेबांस दुसरीं कामें असल्यामुळें त्यांनीं आपलीं उत्तरें छापून सादर केलीं होतीं.

कमीशनचे प्रश्न व रावसाहेबांचीं उत्तरें यांचा सारांश:—

प्रश्नः—हिंदुस्थानांत लोकांस जें शिक्षण देण्यांत येतें त्याविषयीं जीं तुमची मतें बनलीं आहेत तीं तशीं बनण्यास संधि कशी मिळत गेली ?

उत्तर.—माझा या देशांतील शिक्षणाशीं संबंध आज ३४ वर्षांचा आहे. एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटच्या कॉलेजमध्यें व शाळेमध्यें मी दोन वर्षेपर्यंत रोज दीवसार्धापुरता शिक्षक होतों. एक बिगारी यत्तेवर मानाचा शिक्षक होतों; व तसाच मुलींच्या शाळेचा सुपरिंटेंडेंट होतों. कराचीस शिंदी नार्मल क्लास पहिल्यानें निघाला त्यांत मानाचा पहिला शिक्षक होतों. सिंधमध्यें पोलिटिकल खात्यांत सर बार्टल फ्रियर यांच्या हाताखालीं कांहीं दिवस व कांहीं दिवस सर ली. ग्रॅन्ड जेकब यांच्या हाताखालीं असतां, सिंध व कच्छ येथील गांवठी शाळा

तपासल्या होत्या. जिल्हा ठाणें व कुलाबा व मुंबई शहर येथील सरकारी शाळांचा मी ६ वर्षेंपर्यंत व्हिजिटर होतों. मुंबईस गव्हर्नमेंट डेपोचा कांहीं वर्षें मी क्युरेटर होतों. मला मुंबई युनिव्हर्सिटीनें बरींच वर्षें परीक्षक नेमिलें होतें. १८६२ सालापासून त्या युनिव्हर्सिटीचा फेलो आहें. १८७३।७४ सालीं कायद्याचा सिन्डिक होतों. उत्तर हिंदुस्थानांत व अन्यत्र प्रवास करतांना तेथील शिक्षणाच्या संस्थांचें निरीक्षण बारकाईन मीं केलें आहे.

प्रश्नांत घातलेल्या एज्युकेशन या शब्दाचा अर्थ अनिश्चित आहे. तो स्पष्ट केला पाहिजे म्हणजे माझें म्हणणें काय आहे तें समजण्यास बरें पडेल.

शाळेमध्यें जे ( इन्स्ट्रक्शन ) विद्या दान करण्यांत म्हणजे देण्यांत येतें तेणेंकरून आह्मांस कांहीं ( एज्युकेशनची ) शिक्षणाची प्राप्ति होते. म्हणजे विद्यादान व शिक्षण हे दोन्हीं शब्द निराळे आहेत, असें ध्यानांत ठेविलें पाहिजे. शिक्षण म्हणजे अंदाजानें म्हणतां संवयी जोडवणें, मनुष्याच्या नैतिक व बौद्धिक बलाचा उत्कर्ष करणें अथवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याला पुरुषार्थक्षम करणें. शारीरिक व मानसिक बलाचा ( आत्मा व मन व बुद्धि यांचा ) शक्य तेवढा विकास करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं आणणें. हें कार्य स्वतां चांगलें उदाहरण घालून व शान्तपणें वळण लावल्यानें साधतें. ( एज्युकेशनचे ) शिक्षणाचे उत्तम परिणाम हातीं लागावयास सतत सोत्साह उद्योग करावा लागतो. शिक्षणाला प्रारंभ मुलगा पाळण्यांत असतांनाच होतो. मनुष्याच्या बुद्धीची पूर्ण वाढ होण्यास गृहशिक्षणाची अवश्यकता आहे. वर्ग सुटतांच शाळेंत लागणारी शिस्त थांबते. पुढें कालेजांत गेल्यावर प्रोफेसराच्या खोलीबाहेर मुलगा आला कीं थांबते. याच मुळें पुष्कळ दोष उत्पन्न झाले आहेत व ते लपवून कांहीं उपयोग नाहीं. शिक्षणाचें निर्दोष कार्य पहिल्या काळीं

प्रो. हार्कनेस व पॅटन यांनीं केलें व आतांच्या काळीं प्रो. वर्ड्स्वर्थ करीत आहेत. पहिल्या काळीं हार्कनेस व पॅटन् यां सारखे प्रोफेसर ( गुरू ) मिळत असत. ते स्वतां एल्फिस्टन साहेबांनीं निवडून आणले होते. आतां मि. वेस्ट म्हणतात तसे प्रोफेसर वर प्रोफेसर मिळतात! कसले? हा प्रश्न दुय्यम आहे.

मि. मिचेल म्हणतात आतां विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलतां लिहितां येतें व उद्धटपणा दाखवितां येतो. असें कां होणार नाहीं?

मनुष्य हा सवयींचा केलेला आहे. व ह्या संवयी गृहशिक्षणावर अवलंबून आहेत. तें जेथें नाहीं, तेथें त्याची उणीव कशानेंही भरून येणार नाहीं, असें मीं एज्युकेशन हा शब्द ( इन्स्ट्रक्शन ) विद्यादान शब्दाचा प्रतियोगी शब्द आहे असें मनांत बाळगून बोलत आहें. हिंदी लोकांच्या शिक्षणावर ज्या कित्येक गोष्टींचा परिणाम होतो, त्यांतीलच सरकार ज्या गोष्टी करतें, त्या आहेत. कारण त्या गोष्टींनीं चांगलें किंवा वाइट उदाहरण घालून देतां येतें. उदाहरणार्थ लक्ष्मीशास्त्राचे कायदे असे असे आहेत. ते सदैव मानले पाहिजेत. लोकांची कोणत्याही बाजारांत कोणत्याही वस्तूची मागणी व त्यां वस्तूचा पुरवठा यां विषयीं जे नियम आहेत त्यांत हात घातला असतां काय अनर्थ होतात तें आम्हांस एकीकडे शिकविलें जातें व दुसरीकडे असे कायदे करण्यांत येतात कीं, एका सपाट्यासरशी लोकांची पत नाहींशी होते. नैतिक व राजकीय स्थिति बदलते. असे प्रकार या देशाच्या दख्खन प्रांतांत घडून येत आहेत.

या शिवाय सरकारी विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांनीं स्वतांच्या वर्तनानेंही चांगलें वाईट उदाहरण घालून देतां येतें. वरिष्ठांचें आपल्या हातांखालील लोकांशी वर्तन चांगलें नसलें तर सर्व विद्याज्ञान परिणामीं नष्ट होतें. उदाहरणार्थ एकादा बि. ए. झालेला अथवा न झालेला एकादा

हिंदी गृहस्थ विद्याखात्यांतील आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटावयास जातांच तो त्यास आगाशींतून पहातांच विचारतो " क्या मंगता है ? " या वर्तनानें १० शाळा घालून जें हित व्हावयाचें तेवढें नष्ट होतें. ह्या उदाहरणानें त्या गृहस्थाचा स्वभावही तसाच बनतो व या रीतीनें, परंपरेनें साऱ्या विद्याखात्याची शिस्त बिघडते.

प्रश्नः—( २ ) तुमच्या इलाख्यांतील प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था चांगल्या पायावर स्थापित झाली आहे व समाजाला ज्या तऱ्हेच्या शिक्षणाची उणीव भासूं लागली आहे, त्या तऱ्हेचें शिक्षण देण्यास तिच्या अंगीं कुवत आली आहे कीं नाहीं ? शिक्षण पद्धतींत कोणती सुधारणा पाहिजे तें सुचवूं शकाल काय ?

उत्तर— नाहीं. त्या गोष्टीस बरेच दिवस लागतील. प्राथमिक शिक्षणकार्य लोकांनीं आपलें आपणच केलें पाहिजे. १८५५ सालीं शिक्षणाची व्यवस्था करण्यास लोकांची ( बोर्ड आफ् एज्युकेशन नांवाची ) पंच कमिटी होती ती रद्द करण्यांत आली. ही चूक झाली. शाळामास्तरांचें वजन नष्ट झालें आहे. विद्याखातें म्हणजे एक यंत्रच झालें आहे. तपासणी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. पत्रव्यवहार व कोष्टकें वाढलीं आहेत. गांवोगांवच्या शाळांत पंच नाहींसे झाले आहेत.

प्राथमिक शिक्षणाचा व्याप किति असावा तें फ्रेंच लोकांनीं कायद्यानें ठरविलें आहे तें असें:—

प्राथमिक शिक्षण म्हणजे:—नैतिक शिक्षण, लेखन, वाचन, भूगोल (मुख्यतः फ्रान्स देशाचा ), इतिहास ( विशेषतः फ्रान्स देशाचा आज तारखेपर्यंतचा), कांहीं कायदा म्हणजे काय, लक्ष्मी शास्त्र म्हणजे काय, यांचें थोडीशी कल्पना होण्याजोगें ज्ञान, गणितशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, व त्याचा उपयोग शेती व आरोग्य यांशीं असलेला त्याचा संबंध, कला, अंगमेहन-

तीचीं कामें, हरत-हेच्या धंदेवाइकांस लागणारीं हत्यारें, चित्रकला, मातीचे नमुन करणें, तालिम, गायन, मुलांस लष्करी कवाईत व मुलींस शिंवणकाम.

हाच क्रम फेरफार करून हिंदुस्थानच्या स्थितीला जुळेल असा करून घेतला पाहिजे. खालील सुधारणा व्हाव्या असें मीं सुचवितों.

१ गणितांत तत्परता, तोंडच्या हिशोबांत प्रवीणता व हिंदी जमा खर्चांत कुशलता पाहिजे.

२ नीतिशिक्षण हें फार इष्ट आहे व याचे परिणाम चांगले होतील.

३ ( धंदे शिक्षणाची आम्हांस फार जरूरी आहे. तथापि सध्याच्या कमिशन पुढें हा विषय नाहीं ह्मणून वाईट वाटतें )

प्रश्नः—( ३ ) तुमच्या इलाख्यांत प्राथमिक शिक्षणाचा लाभ करून सर्व लोक घेतात किंवा त्यांतील कांहीं वर्गाचे लोक घेतात ?

उत्तरः—काहीं वर्गाचे लोक घेतात. लाखों लोकांस येथें जरी थोडक्यांत पोट भरतां येतें तरीही तें भरण्याची पंचाइत पडते. जीव जगवितां आला म्हणजे झालें असें म्हणून झगडत असलेल्या लोकांच्या मुलांना शाळेंत जाणें शक्य नाहीं.

प्रश्नः—( ५ ) गृहशिक्षणाला तुम्हीं किति महत्व देतां ?

उत्तरः— याचें उत्तर माझ्या पहिल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरांत येतें. मनुष्याच्या मनाची पूर्ण वाढ ही कांहीं ५।१० वर्षांनीं होत नाहीं. तिला युगें लोटावीं लागतात. आमची संस्क्रुति आनुवंशिक आहे व ती आमच्या हातीं द्रव्याचा एक मोठा निधिच आहे.

प्रश्नः–( ६ ) शेती पुष्कळ असलेल्या गांवीं लोकांस प्राथमिक शिक्षण देण्यास ज्या सरकारच्या मदतीनें अथवा मदतीशिवाय चालणाऱ्या खाजगी संस्था आहेत यांवर सरकार किति अवलंबून राहूं शकेल ?

उत्तरः—मुंबई, पुणें व अहमदाबाद यां सारख्या शहरांशिवाय अन्य ठिकाणीं खाजगी प्रयत्नांवर सरकार अवलंबूं शकणार नाहीं.

या ठिकाणीं खाजगी प्रकारें प्रयत्न करणाऱ्या मिशनऱ्यांच्या संस्था आहेत. परंतु त्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास योग्य नाहींत व त्यांना या कामांकरतां पैशाचें साहाय्य करणें अनुचित आहे असें जें दादाभाई नवरोजी व नवरोजी फर्दुनजी म्हणतात तें मला पूर्ण मान्य आहे. या इलाख्यांत पुणें येथें बाळ गंगाधर टिळक व दुसरे मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीधर यांनीं उच्चप्रकारचें इंग्रजी शिक्षण देण्याचें सार्वजानिक काय चालविलें आहे. त्यांच्या प्रयोगास अनेक अडचणींतून यश येत आहे. व त्यांचे बेत सर्वच तडीस जातील तर या इलाख्याभर शाळांचें जाळेंच निर्माण करतील. त्यांना यश यावें अशी माझी इच्छा आहे व उत्तेजन देण्यास त्यांची लायकी आहे.

प्रश्नः—(१४) प्राथमिक शिक्षणाच्या शाळा कशा वाढवितां येतील ? व त्यांचा जास्त उपयोग कसा करतां येईल ?

उत्तरः—या शाळा आपल्या आहेत अशी भावना आपल्या लोकांत उत्पन्न करवून त्यांच्याशीं त्यांचा हितसंबंध जुळवून आणल्यानें.

प्रश्नः—(१७) सरकारच्या ग्रॅन्ट इन् एड् पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर शाळा व कालेजें काढण्यास समर्थ व तत्पर असे लोक तुमच्या इलाख्यांत आहेत काय ?

उत्तरः—आमच्या कालेजांस खास व्यक्तींची दानशूरपणाची मदत झाली आहे. तथापि इंग्लंदांत जें काम करण्यास राजांना सरदारांस व उदार धनिकांस कित्येक शतकें लागलीं तें हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशांस लवकर साधणार नाहीं.

प्रश्नः—( २० ) द्रव्याचें साहाय्य करतांना त्रयस्थपणा धर्मासंबंधें कितपत राखला जातो ?

उत्तरः—त्रयस्थपणा राखण्यांत चूक होत असल्यास ती मिशनऱ्यांच्या संस्था संबंधें होत आहे. हिंदी प्रजेनें दिलेल्या करांतील पसे ज्या मिश-

ऱ्यांच्या संस्थांचे मुख्य उद्देश हिंदीधर्म नष्ट करण्याचा आहे त्यांस देणें अन्यायाचें आहे.

प्रश्नः-( २१ ) श्रीमंत लोक उच्च शिक्षणाच्या कामीं पैसे खर्च करण्यास तयार नाहींत या म्हणण्यांत तथ्य किति आहे? तुमच्या इलाख्यांत कालेजांत फी घेतात ही कमी पडते कीं काय ?

उत्तरः—युरोप व अमेरिका या दोन देशांपेक्षां लोक अधिक पैसा देतात. सरकारी कालेजांतील फी फार जड आहे. एल्फिस्टन कालेजाची स्थापना करतांना लोकांनीं पैसे बरेच दिले आहेत. त्याची फी कमी केली पाहिजे.

प्रश्नः—( २२ ) नुसत्या फीवर चालविलेली खासगी शाळा किंवा कालेज तुम्हांला माहित आहे काय ?

उत्तरः—पुण्यास एक भरभराटीस आलेली शाळा आहे ती टिळक व त्यांचे सहकारी चालवितात. व मुंबईस दोन शाळा कांहीं पार्शी गृहस्थांनीं चालविल्या आहेत.

प्रश्नः—( २३ ) खाजगी कालेज, त्याठिकाणीं सरकारी कालेज असतांना तितकेंच वजनदार होऊं शकेल काय? असेल तर त्यास तसें होऊं देण्यास काय केलें पाहिजे ?

उत्तरः—होय. अशा संस्था कलकत्त्यास आहेत. पुण्याची संस्था तशीच हितकर होईल; तिला आश्रय दिला पाहिजे.

प्रश्नः—( २४ ) उच्च शिक्षणाच्या कामांत कांहीं अनिष्ट चढाओढ लागल्यानें नुकसान होत असल्यास त्यास उपाय कोणते ?

उत्तरः—चढाओढीची अवश्यकता आहे. चढाओढीनें जितक्या शाळा व कालेजें निघतील तितकीं निघालीं पाहिजेत. कारण शिक्षणाचें काम लोकांचे हातीं गेलें पाहिजे.

या संस्था जितक्या भिन्न भिन्न नमुन्यावर निघतील तितकें इष्ट आहे. कारण सृष्टि सुद्धां बहुविध आहे.

प्रः—( २५ ) शिकलेल्या हिंदी लोकांस किफायतशीर धंदा यांस्यास येतो काय ?

उः—दिवसानुदिवस हें काम कठीण होत चाललें आहे. व वरिष्ठ जागा त्यास बंद ठेवीत गेल्यास तें अधिकाधिक कठीण होत जाईल.

प्रः—(२८) या देशाला जरूर आहेत त्यांपेक्षां अधिक विद्यार्थी प्रवेश परीक्षांना बसत नाहींत काय ?

उः—यांची संख्या फार फाजील आहे असें वाटत नाहीं पण कला-कौशल्याचे शिक्षणाभावीं ही संख्या अशीच अनिष्ट रीतीनें वाढेल.

प्रः—(३२)हल्लींच्या शाळांच्या तपासणीसंबंधें तुमचें मत काय आहे ?

उः—माझ्या मतें हल्लींची पद्धति अवजड आहे. एका जिल्ह्यास एक डे. इन्सपेक्टर पुरा आहे. इनस्पेक्टर मुळींच नकोत. पहिल्या प्रतींची हाय-स्कुलें डायरेक्टरनें तपासावींत व इतरांची तपासणी जिल्हा कमिट्यांनीं करावी. व डेप्युटी इन्सपेक्टरानें असेसराचें काम करावें.

प्रः—-३४।३५ सर्व शाळांतून लावलेल्या अभ्यासाच्या क्रमिक पुस्तकां विषयीं तुमचें काय मत आहे, शाळांची तपासणी व क्रमिक पुस्तकें या संबंधें जें विद्याखात्याचें धोरण आहे त्यानें खाजगी शिक्षणविषयक संस्थांची वाढ खुंटत आहे कीं काय ? स्वाभाविक मुलांत असलेली बुद्धि विकास पावते कीं नाहीं ? देशी सारस्वताची उपज कुंठित होते कीं काय ?

उः—सरकारी डेपो बंद करावी. क्रमिक पुस्तकें लिहवणें व त्यावर देखरेख ठेवणें कमिटीकडे सोंपवावें व तिला विद्याखात्यांतील कामगारांनीं साहाय्य करावें. हल्लींच्या क्रमिक पुस्तकांत पुष्कळ सुधारणा इष्ट आहेत. यांचा विचार अधिक विस्तृतपणें पद्धतशीर विवरण केल्याशिवाय समा-धानकारक रीतीनें करतां येणार नाहीं.

प्रः—३६ व ३७ अखिल हिंदुस्थानाकरतां जर अव्यंग शिक्षणाची योजना केली तर सरकारनें कोणतें शिक्षण कार्य आपल्या अंगावर घ्यावें व कोणतें खाजगी संस्थाकडे सोंपवावें ? सरकारनें जर शाळा व कालेजें यांतून सर्व अंग काढून घेतलें तर त्याचा शिक्षणप्रसारावर काय परिणाम होईल ? स्थानिक संस्थांच्या स्थापनेंमुळें जो स्वावलंबनाचा गुण लोकांस जडत आहे त्याची वाट काय होईल ? शिक्षणाच्या उत्तम पणांतील अस्सलपणा कमी होईल काय ? होईल असें वाटत असेल तर तसें न होऊं देण्यास काय केलें पाहिजे ? हल्लीं शाळांतून व कालेजांतून कर्तव्य अकर्तव्य काय इ. नैतिक तत्त्वांच्या शिक्षणाला जागा मिळत आहे कीं नाहीं ?

( ३८ ) सरकारानें जर आपलें अंग शाळा व कालेजें यांत दिलें जाणाऱ्या शिक्षणांतून काढून घेतलें तर शिक्षणाची इयत्ता बिघडेल अशी भीति तुम्हांला वाटते काय ? जर वाटत असेल तर असें न होऊं देण्याविषयीं काय उपाय योजले पाहिजेत ?

प्रः—( ३९ ) सरकारी शाळांत व कालेजांत नीतितत्वांचा ( कर्तव्य अर्कतव्य ह्या विषयींचा) बोध होण्याची कांहीं नवीन तजवीज केलेली आहे काय ? ह्या विषयीं तुम्हांस कांहीं सुचना करावयाच्या आहेत काय ?

उः—(३६ ते ३९) सरकारानें आतांच एकदम अंग काढून घेतलें तर त्याचा परिणाम विघातक होईल. आमच्या शिक्षणविषयक सर्व संस्था मिशनऱ्यांच्या स्वाधीन सरकार करणार कीं काय अशी भीति आतां जें कमीशन बसलें आहे त्यावरून लोकांत उत्पन्न झाली आहे. लोक कदाचित् चुकत असतील किंवा नसतील, काय वाटेल तें ह्मणा पण मिशनऱ्यांवर लोक विश्वास ठेवीत नाहींत. गरीब लोक त्यांच्या शिक्षणविषयक संस्थांचा उपयोग करून घेतात. पण तो कां तर सरकारी संस्थांची अधिक फी त्यांस झेंपत नाहीं. आम्हीं हिंदी लोकांनीं पुष्कळ परिश्रम केले

आहेत परंतु ऑक्सफर्ड व केंब्रिजचीं विश्वविद्यालयें हिंदुस्थानांत निदान आमच्या भागांत तरी निपजण्यास बराच काळ गेला पाहिजे.

प्रः—(४०) मुलांचें शारीरिक बळ वाढावें ह्मणून शाळा व कालेजें यांत कांहीं उपाय योजण्यांत येत आहेत काय ? या विषयीं तुह्मांस कांहीं सुचना करावयाच्या आहेत काय ?

उः—या दिशेनें कांहीं प्रयत्न झालेले आहेत. पण समाधानकारक रीतीनें झालेले नाहींत. या देशांत कोणते खेळ प्रचारांत आहेत व ते कसे खेळतात याविषयीं माहिती देणारें सचित्र पुस्तक छापून शाळा खात्यानें प्रसिद्ध करावें. पोहणें व घोड्यावर बसणें या दोन्हीं तऱ्हेच्या व्यायामांस उत्तेजन दिलें पाहिजे. गेल्या तीस वर्षांत यांची आवड कमी होत जात आहे. यानें फार अपाय होत आहे. " खेळांचें तत्त्वज्ञान हें एक उत्साहवर्धक शास्त्र आहे. " अशा नांवाचें एक पुस्तक मला कोणी दाखविलें. त्यांत जसा प्रयत्न केलेला आहे तसा शिक्षण खात्यानें करावा. उद्योगाची वाण नाहीं पण मार्ग दाखवून देणाऱ्यांची आहे.

प्रः—(४१) तुम्हाला मुलांच्या शिक्षणाची लोकांनीं चालविलेली एकादी संस्था ठाऊक आहे काय ? असेल तर तिची काय पद्धति आहे? (४२) शाळाखात्यानें काय काय संस्था काढल्या आहेत ? त्यांत काय शिकवितात ? त्यांत काय सुधारणा होणें शक्य आहे ? (४३) मुलगे व मुली यांकरितां भिन्न शाळा चालविण्यासंबंधें तुमचें मत काय आहे ? (४४) मुलीं करतां शिक्षक निर्माण करण्याचा उत्तम मार्ग कोणता ?

उः—(४१ व ४२०) स्टूडन्टस लिटरारि व सायन्टिफिक सोसायटी या खासगी संस्थेशीं मूळ स्थापनेपासून माझा संबन्ध आज ३४ वर्षें आहे. तिच्या शाळांतून देशी भाषांतून चाललेलें शिक्षण माझ्या मतें साधारणपणें आमच्या लोकांस पुरेसें आहे. (४३) मी मिश्र शाळा पद्धतीच्या विरुद्ध आहें. आमच्या समाजाच्या स्थितीस तें अनुचित आहे. (४४)

मी नार्मल स्कूलांची शिफारस करतों. त्यांचा अजून व्हावा तितका उपयोग होत नाहीं.

प्रः—(४७) हल्लींच्या शिक्षणांत काय मुख्य दोष आहेत? व ते कसे दूर करतां येतील ?

उः—संस्कृताचा अभ्यास केवळ संस्कृतविद्या वाढविण्याच्या उद्देशानें होत नाहीं. शिक्षण कोणत्या भाषेंत द्यावें या वादांत संस्कृत भाषा बाजूला सारली गेली आहे. परंतु संस्कृत भाषा—तिच्या राजकीय दुर्बलावस्थेंत सुद्धां—अद्यापि हिंदुस्थानांतील सर्व भागांत विद्वान आर्य लोकांची सामान्य भाषा ( lingua franca ) आहे. पुण्यांतील जुन्या कोलेजांचा बराच उपयोग झाला. कांहींएक विशिष्ट कामाप्रीत्यर्थ खर्च व्हावा म्हणून काढून ठेवलेल्या एका खासगी द्रव्यनिधीवर हें कॉलेज चाललें होतें. १८५१।५२ सालीं नवें कॉलेज निघालें. संस्कृत विद्येची नुसती छाया राहून मूळ पदार्थ-तत्त्व नाहींसें झालें आहे. पुरातन संस्कृतशिक्षणाचा संप्रदाय तो कसा होता त्याचीं टिपणें विद्यार्थ्यांस करावयास लावून त्यास राखण्याचा प्रयत्न झालेला पाहून हंसू येतें. ज्ञानार्जनाचा डोळेमिटून चालण्याचा राजपथसुलभ मार्ग अद्यापि निघाला नाहीं.

संकृत विद्येला उत्तेजन योग्य दिल्यास अजून सुद्धां शास्त्री पंडित निर्माण होतील. हल्लीं पंडित या शब्दाचा जो अर्थ समजतात त्या अर्थी मी पंडित हा शब्द वापरला नाहीं. हल्लीं पंडित हा शब्द कोणत्या अर्थी वापरतात तो अथ ध्यानांत आला ह्मणजे आमची किति अवनति झाली आहे तें दिसून येईल. प्रथम पंडित हा शब्द फार विद्वत्तादर्शक होता. आतां तो फक्त युरोपीयन लोकांस देशी भाषा शिकविणाऱ्या मुनशीला लावतात. योग्य उपाय योजले व या विद्येला जरा जोम आणण्यांत आला तर एकंदर शिक्षणाला या एका उपायानें उत्तेजन येईल.

प्रश्नः—( ४८ ) उच्च शिक्षणावर सरकार जो पैसा तुमच्या इलाख्यांत खर्च करतें तो अनवश्यक आहे काय ?

उत्तर:—माझ्या मतें आमचीं कालेजें सुसंपन्न स्थितींत नाहींत व अधिक द्रव्य व अधिक गुणाढ्य माणसें पाहिजेत. कमीशनची बेअदबी केल्याशिवाय म्हणतों कीं त्यानें दिवसानुदिवस पाणी घालून ताक वाढविण्याचें योजूं नये. या पुढचा सरकारानें योजावयाचा उपाय म्हटला म्हणजे (जो एक दिवस योजावाच लागेल तो) हा कीं राष्ट्राचा अवाढव्य वाढलेला खर्च कमी करण्याचा होय. हें काम राक्षसी आहे परंतु केलें पाहिजे. जी जी नवी योजना निघते ती ती पासून नवें खातें निर्माण होतें व कसेंही करून आत्मरक्षण केलेंच पाहिजे हा सृष्टीचा कायदा आहे त्याला अनुसरून प्रत्येक खातें स्वप्रीत्यर्थ युद्ध चालू ठेवतें ज्या गोष्टी कांहीं रुपयांनीं व्हावयाच्या त्यांस हजारों रुपये लागूं लागतात. सारस्वताला उत्तेजन देण्याच्या कामीं वरील अनुभव पुष्कळच येतो. आमचीं संस्कृत पुस्तकें त्यांची यादी करून घेण्यास युरोपला पाठवीत असतों. (नं. २०५३ तारीख २७–१२–१८४१ चा शिक्षण खात्याचा ठराव पहा) व अशुद्ध हस्त लिखित प्रतींचे फोटो काढण्यास हजारों खर्च होत आहेत. रव्हिन्यूखातें, पोलिस खातें व सार्वजनिक कामें करण्याचें खातें व इ. दुसरीं खातीं महान् व ऐश्वर्यवान् आहेत. व त्यांच्या वैभवास गरीब लोकांचें राजकीय, नैतिक व साहित्याविषयक शिक्षण बळी पडत आहे. याला एक उदाहरण देतों मुंबईची म्युनिसिपॅलिटी मुंबईतील शिक्षणकार्य आपल्या अंगावर घ्यावयाला तयार आहे. दुसऱ्या कोणत्याही सरकारी खात्याप्रमाणें चोख रीतीनें तें कार्य चालविण्यास तिची तयारी आहे. पण तें कार्य तिच्या स्वाधीन करावें कीं नाहीं याची काथ्याकूट आज पंधरा महिने चालू आहे. व सरकारी अधिकाऱ्यांबद्दल योग्य सन्मान मनांत बाळगून मी म्हणतों कीं ते अजून जाग्यावरून हललेच नाहींत. मुंबई शहरास संस्था चालविण्याचें सामर्थ्य आहे. व तिनें मोठ्या संस्था

स्वतंत्र रीतीनें चालविल्या आहेत, व मोठमोठाले उपायही योजले आहेत. असें असतां त्याकामांत आमच्या गळ्यांत सरकारी अध्यक्षांचें व आदेशकांचें ओझें लादण्यापुरतें मिष शोधून काढणें हें हल्लींच्या मनूस साजेसें नाहीं. स्वराज्य म्हणजे स्वराज्य अथवा तो एक समजूत करण्याचा प्रकारच होईल. आह्मीं आमचें शिक्षणकार्य नीट संभाळूं निदान आह्मी कसें संभाळतों, तें करून दाखविण्यास अवधि मिळण्याइतकी आमची योग्यता आहे. मी नव्या कायद्यांच्या विरुद्ध आहे. लोकांना त्यांची गरज असली तर गोष्ट निराळी. शिक्षण प्रसारास अशा कायद्यांची अवश्यकता नाहीं.

प्रः—(५०) शाळाखात्यांतील लोक उच्च शिक्षणावर अनन्यसाधारण आसक्ति दाखवितात हें कांहींचें ह्मणणें खरें आहे काय ? शाळा कशा चालवाव्या कसें शिकवावें इ. कामांत वाकब अशा लोकांची शाळा खात्यांत बाहेरून भरती केली पाहिजे काय ?

उः—नाहीं. आहेत त्या लोकांनींच अधिक श्रम केले पाहिजेत. मग काय पाहिजे असें विचाराल तर हळू हळू, संथपणें मनाची समता राखून परिश्रम केले पाहिजेत. आम्हीं निसर्गानुकारी बनलें पाहिजे. सतत उद्योग व श्रम यथोचित मार्गानें केले पाहिजेत.

प्रः—(५२) मुख्य शाळांस दुय्यम शाळांचें रूप द्यावयाचे प्रयत्न होत आहेत काय ?

उः—शाळाखात्याचें काम ज्या रीतीनें चाललें आहे तिनें कल्पनासामर्थ्य व सजीवता हीं नष्ट होत आहेत.

प्रः—(५३) शाळेंतील किंवा कालेजांतील फी मुलांच्या पालकांच्या ऐपतीप्रमाणें ठेवावी काय ?

उत्तरः—नये ठेवूं. ती सर्वत्र सारखी असावी परंतु ती बेताची असावी.

प्रश्नः—(५५) परीक्षा घेऊन द्रव्यसाहाय्य करणें तें करण्याची पद्धति कोणत्या जातीच्या शिक्षणसंस्थांस लागू करावी ?

उत्तरः—सर्व संस्थांस सारखी लागू करावी. व विशिष्ट मताचें धर्मशिक्षण देण्यांत येणार नाहीं ही त्यांत अट ठेवावी.

प्रश्नः—(५८) शाळेंत किंवा कालेजांत एक जण ज्यास्तींतज्यास्ती किती मुलें शिकवूं शकेल ?

उत्तरः—कोठेंही चाळीस; पण कालेजांतील अगदीं वरिष्ठ वर्गांत हीं संख्या अधिकच नियमित केली पाहिजे. मी एल्फिन्स्टन कालेजांत वरचें गणित शिकविलें आहे. तेव्हां वर्ग लहान असत. जरा मोठ्या वर्गांसही शिकवूं शकलों असतों.

साहित्य शिकविण्याचे वर्ग, शास्त्र शिकविण्याच्या वर्गांपेक्षां लहान असावे.

प्रश्नः—(६०) धर्मासंबंधें अगदीं त्रयस्थ राहण्याचा जो नियम आहे त्याच्या अगदीं अक्षरशः अर्थ केला म्हणजे सर्व शाळा व कालेजें यांच्या व्यवस्थेंतून सरकारनें अंग काढून घेतलें पाहिजे कीं काय ?

उत्तरः—नको. परंतु ज्या संस्थांतून विशिष्ट मतांचें धर्मशिक्षण देण्यांत येतें त्या सर्व संस्थांस मग त्या हिंदूच्या, मुसलमानांच्या अथवा ख्रिस्त्यांच्या असोत सरकारानें द्रव्य साहाय्य करूं नये असें माझें मत आहे.

प्रश्नः—( ६१ ) विश्वविद्यालयाचे प्रोफेसर ही जी संस्था आहे तिनें उच्च शिक्षणांत सुधारणा होणार नाहीं काय ?

उः—मला वाटतें तात्कालिक फलाची अपेक्षा करण्याची आमच्या देशांत संवय पडली आहे ती अनिष्ट आहे. वर्तमानकाला पुरतेंच आमच्या श्रमाचें धोरण नसावें. सार्वकालिन परिणामाकडे दृष्टि ठेविली पाहिजे.

प्रश्नः—( ६२ ) एक वर्ग पालटून वरच्या वर्गांत मुलें जाऊं देणें हें परीक्षांवर अवलंबून ठेवावें कीं त्या त्या वर्गांतील शिक्षकांवर सोंपवून द्यावें ?

उत्तरः—परीक्षांवर नसावें. शिक्षकांवर सोंपवावें परीक्षांवर ठेवल्यानें चांगल्या मुलांची निराशा होते.

प्रश्नः—( ६५ ) बी. ए. च्या वर्गापर्यंत शिकविण्यास युरोपियन प्रोफेसर कोठें कोठें नेमले पाहिजेत ?

उत्तरः—वाग् संप्रदायाप्रमाणें इंग्रजी शिकविण्या पुरतें ज्याची जन्म भाषाच इंग्रजी आहे त्यासच नेमावें इतर सर्व विषय शिकविण्यास योग्य मनुष्य कोणीही असला तरी चालेल. हल्लीं हिंदी किंवा इंग्रजी प्रोफेसरांच्या नेमणुका योग्य पद्धतीप्रमाणें होत नाहींत म्हणून मला वाईट वाटत आहे.

प्रः—( ६६ ) हिंदी लोकांनीं चालविलेलीं कालेजें असलीं तर त्यांतून युरोपियन प्रोफेसरांची जरूर आहे काय ?

उः—होय. इंग्रजी शिकविण्याकरतां, युरोपचा इतिहास शिकविण्याकरतां व भाषाविज्ञान शिकविण्याकरतां निदान आणखी कांहीं कालपर्यंत तरी.

प्रः–(६७) तुमच्या इलाख्यांत विशिष्ट परिस्थितीमुळें एकाद्या विशिष्ट वर्गाला ( उदाहरणार्थ मुसलमानांस ) कांहीं विशिष्ट तऱ्हेनें सवलती इंग्रजी शिक्षणाच्या कामीं दिल्या पाहिजेत काय ?

उः—मला असें वाटत नाहीं. हा फक्त शिक्षणविषयक प्रश्न आहे त्याचें मी निश्चितपणें उत्तर दिलें आहे. राजकीय दृष्टीनें सरकारला जें उत्तम दिसेल तसें तें करीलच. तूर्त तो प्रश्न माझ्या अधिकाराच्या बाहेर आहे.

प्रः—( ६८ ) हिंदी लोकांनीं चालविलेल्या शाळा अथवा कालेजें युरोपियन लोकांनीं चालविलेल्या शाळांशीं अथवा कालेजांशीं स्पर्धा करतानां यशप्राप्ति त्यांस येईल काय ?

उः—येईल कलकत्त्यास सध्या यशप्राप्ति होत आहे. मुंबईत व पुण्यास पुष्कळ शाळा यश संपादन करीत आहेत.

२३।१२।१८८२

## प्रकरण ३४ वें.

# रायल एशियॅटिक सोसायटी.

## मुंबई शाखा.

**। गुरुरेकः कविरेकः सदसि मघोनः कलाधरोऽप्येकः ।**
**॥ अद्भुतमत्रसभायां गुरवः कवयः कलाधराः सर्वे ॥ १ ॥**

( सुभाषित. )

ही एक विद्वान लोकांची मंडळी आहे. तिचा संबंध चालू काळाशीं थोडा असून जुने काळाशीं पुष्कळ आहे. प्राचीन इतिहासाचा शोध ही एकच तिची लालसा आहे. येथें जातिवैर, देशवैर, व धर्मवैर यांला जागा नाहीं. जाती उत्पन्न झाल्या पूर्वीं, अथवा देशविभाग झाल्यापूर्वीं, अथवा निरनिराळे धर्मपंथ प्रस्थापित होण्यापूर्वीं, हल्लींच्या मनुष्यजातीचे पूर्वज कसे होते, किंवा निरनिराळ्या देशांचें दळणवळण हल्लींचीं खण्डें पडण्यापूर्वीं पृथ्वीवर कसें होतें, अथवा निरनिराळे पंथ एकाच धर्माचीं कशीं रूपान्तरें आहेत या गोष्टीकडे या मंडळीच्या सभासदांचें सर्व लक्ष असतें.

या सभेच्या ग्रंथसंग्रहालयांत अशिक्षित रूक्ष मनुष्याचा पाय पडावयाचा नाहीं. रानटी मनुष्य सदैव दूर राहील. या मंडळाचे सभासद स्वतां शांति वरून दुसऱ्याला शान्ति वरावयाला लावतात. येथें भेद काय तो पोषाखांतच दिसतो. याचा अनुभव एक वेळ या सभेच्या ग्रंथसंग्रहालयांत पाऊल टाकिलें कीं येईल.

या सभेच्या ग्रंथसंग्रहालयांत **रावसाहेब** कालेजांत असतांच त्यांस प्रोफेसर घेऊन जात असत. तेव्हांपासूनच त्यांची या मंडळीवर भक्ति बसली होती. परंतु **रावसाहेब** या सभेचे सभासद १८६२ सालीं झाले.

सभासद झाल्यापासून 'रॉयल एशियाटिक सोसायटीचें' काम रावसाहेब चांगलें मेहनत घेऊन करूं लागले. लायब्ररीस लोकांनीं बक्षिस दिलेले ग्रंथ किंवा तीकरतां विकत घेतलेले ग्रंथ यांची नीटशी नोंद नव्हती. बुकांची बांधणी मजबूत करून त्यांवर अनुक्रम घातले पाहिजे होते. हिशोबाच्या वह्या पद्धतवार पाहिजे होत्या. पुराणवस्तुसंशोधन व जुनीं नाणीं वगैरे यांचीही अधिक चांगली व्यवस्था पाहिजे होती. बंगालकडील कांहीं शास्त्रीय माहितीचीं मासिकें मागवावयाची सोय करून ध्यावी, वर्तमानपत्रांपेक्षां विविध विषयांवरील ग्रंथ ज्यांनीं बुद्धीचा विकास होतो तीं ध्यावीं अशा सुचना रावसाहेब व्हाईसप्रेसिडेन्ट व जाइट चिटणीस होते तेव्हां करीत. या मंडळीचें नानाविषयांवर लेख प्रसिद्ध करण्याचें पुस्तक असे तें लवकर लवकर प्रसिद्ध करण्याची ह्मणजे चातुर्मासिक करण्याची उमेद रावसाहेबांनीं धरिली होती. त्याचें चालकत्व त्यांचेकडे काहीं दिवस होतें. मि. फ्लीट व तेलंग ( पुढें न्यायमूर्ति ) लेख लिहून मदत करीत. ( जेकब साहेबांस पत्र. ( १५।९।७४ )

" या मंडळीच्या कामांत घोटाळा आढळला तो काढून टाकावा ह्मणून मी संयुक्त सेक्रेटरी झालों. माझे साथीदार डा. कॉडरिंग्टन हे आहेत. ते खूप मेहनत घेतात. त्यांच्यावर ग्रंथसंग्रहाचें काम, ह्मणजे पुस्तकें वाचावयास देणें घेणें हें काम सोंपविलें आहे. मी मासिकाच्या प्रसिद्धीचें व पैशाच्या हिशोबाचें काम पहातों व दोघे एकमेकांस मदत करतों काम पुष्कळ आहे, पण मला तें आवडतें. या जुन्या संस्थेला नवी शक्ति येईल तर पहात आहें. एक मासिकाचा अंक वेळेवर निघाला. दुसरा निघत आहे. आपल्या पुराणांची वाट काय लागली तें पहातों. " ( जकब साहेबांस पत्र. १।१।१८७५ )

नोकरीच्या निमित्तानें सिंधमध्यें असतांनाच त्यांनीं एक निबंध "उम्मरकोट येथील सोद राजे" या विषयावर लिहून या मंडळीच्या सभेंत

वाचावयास १८५५ मध्यें पाठविला होता. मध्यहिंदुस्थानांतील म्हणजे सर्व क्षत्रियांच्या एकवेळच्या खाणींत निपजून जे पारमारवंशांतील राजे उम्मरकोटापर्यंत आपली विजयी स्वारी नेते झाले त्यांची या निबंधांत ५०० वर्षां पूर्वींची हकीकत आहे तिचा सारांशः—रट्टो नांवाच्या उम्मरकोट येथील मोंगल अधिपतीचा पराभव करून त्याचा पारमार वंशांतील ब्राहुद्र नृपानें शिरच्छेद केला तेव्हां त्याचें शिर २५ पावलें घडघडत जातांना त्यास ( तेथील दंतकथेप्रमाणें ) वाचा फुटून तें असें सांगतें झालें कीं तुझें राज्य फक्त पंचवीस पिढ्याच चालेल. व हें भविष्य खरें झालें असें तीच दंतकथा सांगते. एवढ्या पिढ्यांतील राजांचीं नांवें स्थानिक वैतालिकांच्या लेखी संग्रहावरून मिळवून रावसाहेबांनीं निबंधांत दिलीं आहेत. यांचा पुढें नूर महंमदानें पराभव केला. उम्मरकोट हें नांव येथें पहिल्यानें येणाऱ्या विजिगीषु ब्राहुद्रराजानें स्वतां बांधलेल्या किल्ल्याचें नांव आहे. येथूनच अर्ध्या मैलावर असलेल्या एका "अख" नांवाच्या झाडाखालीं अकबर जन्मास आल्याचें वृत्त सांगतात. या अकबराचें नांव या "अख" वृक्षाच्या नांवा पासून निघालें असें म्हणतात.

या वृक्षाहून अधिक निवाऱ्याची जागा अकबराच्या मातोश्रीस प्रसूतिप्रीत्यर्थ मिळाली नाहीं याचें कारण अकबराचा पिता परत परशिआंत अफगानिस्थानाच्या वाटेनें पळून जात होता. उम्मरकोटच्या हमीरनांवाच्या राजानें आश्रय देऊन यांचें रक्षण केलें म्हणून पुढें अकबरानें या राजास राणा ही पदवी कृतज्ञतेनें दिली. पुढें याचे शेजारीं तालमूर व कोल्हारा या राज्यांचे राजे आपसांत कलह करूं लागले. कोल्हाऱ्याचे मुसलमान राजे यांनीं काबूलाहून मदत आणविली. तिकडून आलेल्या सैन्यानें लूट करून स्वदेशीं प्रयाण केलें. पुढें कोल्हाऱ्याच्या राजानें जोधपूरकरांची मदत मागितली. जोधपूरकरांचें सैन्य कोल्हाऱ्याच्या राजास मदत न करतां उम्मरकोटचेंच राज्य आपल्या धन्याकरतां काबीज करून बसलें इत्यादि मनोरंजक हकीकत या निबंधात आहे.

याचप्रमाणें यासभे पुढें निबंध वाचनाचें काम रावसाहेबांनीं सतत चालविलें होतें. १८६५ सालीं मुरूडचा इतिहास हा निंबध यासभेपुढें वाचला. त्याचें स्वरूप सारांशरूपानें याग्रंथांतील पहिल्या प्रकरणांत तिसऱ्या पानावर दिला आहे.

## पश्चिम हिंदुस्थानांतील नागपूजा.

या निबंधांत नागपंचमीच्या पूजेचें हल्लीं ती लोक जशी करतात तसें वर्णन दिलेलें आहे. नंतर नागाची कहाणी दिलेली आहे. ह्या पूजेचा विधि व्रतराजांतून घेतलेला आहे; व व्रतराजांतील उतारे हेमाद्रींतून घेतलेले आहेत. यावरून पुराणांच्या आधींच्या काळांत या पूजेचा संप्रदाय पडला असावा व ज्या ठिकाणीं कहाणींत सांगितल्याप्रमाणें शेत नांगरतांना नागिणीचीं पिलें मारिलीं गेलीं व तिनें परत सूड घेतला तें ठिकाण आसाम प्रांतांतील माणिपूर हें असावें. तेथें डोंगरांत नाग नांवाचे एक लोक रहातात. ही नागपंचमीची पूजा कोकणापेक्षां घांटावर अधिक उत्सवानें करतात. सातारा जिल्ह्यांत बत्तीसशिराळें म्हणून एक गांव आहे तेथें नागकुळी म्हणून एक सर्पाची जात आहे तींत विषारीपणा अगदीं थोडा आहे. म्हणून त्यांतील एक सर्प पकडून आणून लोक त्याची पूजा करतात. इतरत्र मात्र गंधाचे नाग काढून त्याची पूजा करतात. व दाक्षिण हिंदुस्थानांत नागाचीं कित्येक ठिकाणीं देवळें आहेत त्यांत निजाम साहेबांच्या राज्यांतील भोमपहाडें येथील देऊळ फार प्रसिद्ध आहे. कानडा जिल्ह्यांत नागाची पूजा पंचमीलाच करतात. परंतु तेलंगणांत व तामील प्रांतांत कार्तिक, वैशाख अथवा माघ या महिन्यांत शुद्ध चतुर्थीला करतात. ह्मणून त्या दिवसाला "नागलु चवथी" ह्मणजे नागचतुर्थी ह्मणतात. दाक्षिण कानड्यांत सुब्रह्मण्य (ह्मणजे 'सुब्बर मणि' ह्मणजे नागरत्न) या गादीं नागाचा उत्सव मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी रोजीं

करतात. येथें हजारों यात्रा भरते. महा व्याधीनें ग्रस्त झालेले व भूतबाधा झालेले येथें बरे होण्याकरतां येतात. निपुत्रिक लोक पुत्र मागावयास येतात. उत्सवाचे दिवशीं पुजाऱ्याच्या अंगांत संचार होतो; आणि तो प्रत्यक्ष नागांच्या बिळांत हात घालून मूलमृत्तिका काढून भक्तजनांस थोडी थोडी वांटून देतो. या पूजेचें कानड्यामध्यें फारच प्रस्थ माजलें होतें. तेथें नागपत्री म्हणोन नागदेवाचे भक्त असत. त्यांच्या अंगांत नागदेवाचा संचार झाला म्हणजे ते भविष्यकथन करूं शकत. लोक भावानें आपले खाजगी तंटे त्यांच्याकडून तोडवून घेत. नागपत्रींचें आमंत्रण आलें म्हणजे वादीस किंवा प्रतिवादीस नाकारतां येत नसे. सुब्रह्मण्याच्या देवळाच्या जवळील रानांत नागवेत म्हणून एक वेताची जात आहे; ती जवळ बाळगली असतां सर्पाचें भय नाहीं अशी समजूत आहे. गुजराथेंतही नागपूजा होत असते. गुजराथेंत जैनमताचा प्रसार असल्यामुळें सर्पासारख्या विषारी प्राण्याला सुद्धां इतर निरुपद्रवी प्राण्याबरोबर खाणें पिणें मिळालें तर नवल नाहीं. कारण जैन हा सर्पाला सुद्धां मारीत नाहीं. व त्याला प्रयत्नानें जीवें धरून गाडग्यांत घालुन लांब जंगलांत नेऊन सोडतो. गुजराथेंतील कहाणी मात्र थोडी निराळी आहे. ती अशीः—एकदां एका गांवीं फार विद्वान पण फार दरिद्री ब्राह्मण राहात होता. त्यास कुटुंबाचा उदरनिर्वाह करतां येईना. त्याची स्त्री फार भक्तिमान होती. ती प्रपंचाकरितां दूरदेशीं जाण्यास त्याला विनंति करती झाली. ती त्यास मान्य होतांच बरोबर पाथेय म्हणून द्यावयास कांहीं नव्हतें म्हणून तिनें एक मडकें शर्करामिश्र पाण्यानें भरून दिलें. ब्राह्मण चार पांच कोस गेल्यावर श्रांत होत्साता एका उंच वटवृक्षाखालीं रानामध्यें विश्रांति घेण्यास पडला व त्यास गाढ झोंप लागली, कारण ते उन्हाळ्याचे दिवस होते व उष्मा असह्य होता. ब्राह्मण निद्रित असतां वटाच्या ढोलींतून तक्षक नाग बाहेर येऊन मडक्यांतील पाणी शोषून

टाकल्यावर वेटाळें घालून आंतच बसला; हें, ब्राह्मण जागा झाल्यावर त्यास कळलें. त्यानें मडक्यास दादरा बांधून घरीं जाण्या करतां तें मडकें घेऊन निघाला व मनांत ह्मणाला "फार उत्तम! बायको मला त्रास देते, तिला नेऊन हा नाग देतों म्हणजे आम्हां सर्वांचा नाश होऊन संसाराच्या त्रासांतून सुटूं." घरीं आल्यावर त्याच्या स्त्रीनें मडकें उघडून पाहिलें तों तिला आंत हिऱ्यांचा हार दिसला तो घेऊन त्यांनीं नगरशेटजीस दिला. नगरशेटजीनें ब्राह्मणास विपुल द्रव्य देऊन आपल्या पेटींत हार ठेविला. राजानें हें वृत्त ऐकून तो हार शेटजीजवळ मागितला. शेटजी पेटी उघडून पहातात तों आंत हाराच्या ठिकाणीं एक बालक मुखानें अंगुष्ठ चुंफित असलेलें आढळलें. तो आश्चर्यचकित झाला. त्यास पुत्रसंतान नव्हतें म्हणून त्यानें हा मुलगा वाढविला. षोडषाव्या वर्षीं त्याचें लग्न केलें. सखीच्या सांगण्यावरून आपण कोणच्या वंशातले आहांत तें मला सांगा असा हट्ट त्याची स्त्री धरून बसली; तेव्हां उभयतां काशीस जाण्यास निघालीं. वाटेंत एका कूपाजवळ येतांच त्यानें नागाचें स्वरूप धारण केलें व तो फडा उभारून चालता झाला. तो अदृश्य होतांच त्याची स्त्री रडूं लागली तेव्हां तिला एका नागऱ्यानें नागपंचमीचें व्रत करावयास सांगितलें तें केल्यावर तिला पतिचा पुन्हा लाभ झाला.

अमरसिंहानें नागलोक पाताळांत असल्याचें वर्णन केलें आहे व त्याचा राजा शेष आहे ह्मणून वर्णिलें आहे. महाभारतामध्यें नाग व सर्प यांचें वसतिस्थान समुद्र ह्मणून सांगितलें आहे. आमच्या स्तोत्रांमध्यें एक नागस्तोत्र सांपडतें. तें ह्मटलें असतां नागविषाची भीति नसते. निपुत्रिक मनुष्य, नारायण नागबलि या नांवाचा एक विधि करतात. यावरून हिंदूंच्या आचारांत नागपूजा किती शिरली आहे तें दिसून येतें. ऋग्वेदांत नागपूजेचे मंत्र आहेत. तसेच यजुर्वेदांत आहेत. वेदानंतर सूत्रें आलीं; त्यांतही नागपूजेचा प्रकार आढळतो. मनुस्मृतींत सृष्टीच्या उत्पत्तीच्या वर्णनांत

नागाला स्थान दिलें आहे. महाभारतामध्यें नागकन्या व मनुष्यें यांचे विवाह झालेले वर्णिले आहेत. अर्जुनाचें मणिपुरांत उलुपीशीं लग्न झालें. भगवत्गीतेंतही नागाचा उल्लेख आहे. सूर्यसिद्धांतकार नागांनां भारतवर्षांतच स्थल देतो. भास्कराचार्यांचें तसेंच मत आहे. भागवत पुराणांत मात्र नाग ह्मणजे सूर्याचे किरण असें ह्मटलें आहे. राम आणि कृष्ण अवतारांत रामाचा भाऊ लक्ष्मण यास शेषाचा अवतार समजतात व कृष्णाचा भाऊ बलराम यास नागाचा समजतात. कृष्णावतारांतील कालिया नागाची गोष्ट प्रसिद्धच आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश या देवतात्रयींत सुद्धां नागाचा संबंध येतो. विष्णु तर शेषशय्यारूढ दाखविलेला आहे आणि शेष शिवमस्तकारूढ दाखविलेला आहे. मेदिनीकोषाच्या कालांत नागाचा अर्थ डोंगरांत र हाणारा रानटी मनुष्य असा होतो. हल्लीं नाग हें नांव धारण करणारे लोक रानटी स्थितींतच आहेत. मध्यप्रांताविषयींच्या राज्यकारभाराविषयीं जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यांत नागबनशी या नांवाचे लोक ८००–९०० वर्षांपूर्वी पाटणा संस्थानांत राज्य करीत होते असें म्हटलें आहे. त्यांच्या राणीनें पुष्कळ देवळें बांधलीं होतीं. जर तेथें शिलालेख सांपडतील तर फार फायदा होईल. वेदांतील कांहीं स्तोत्रें आश्लेषा अथवा सर्प नक्षत्रावर रचलेलीं आढळतात. पृथ्वीला सर्पराज्ञी असें वेदांत म्हटलें आहे. एतावता नागांचें साम्राज्य पृथ्वीवर, आकाशावर व पाण्यावर पसरलेलें आहे. कृष्णावतारांतील कालियामर्दन, नागांशीं झालेलें युद्ध दाखवितें. जनमेजयाचें सर्पसत्र व आस्तिकानें केलेलें त्यांचें संरक्षण, नागकन्या व अर्जुन यांचें लग्न हीं मनुष्यांचा व नागांचा तह झाला असें दाखवितात. या नागपूजेचा प्रकार पृथ्वीमध्यें इतरत्र कसा काय आहे तो पाहिल्यावर नागाचा खरा इतिहास लिहितां येईल.

## महाबळेश्वर येथील कृष्णा नदीचा उगम.

महाबळेश्वर हें खेडें कृष्णेच्या उगमाशीं वसविलेलें आहे. गुरु, कन्याराशीला गेला म्हणजे गंगा आपल्या बहिणीला म्हणजे कृष्णेला भेटावयास येते असें समजून तेथें यात्रा लोटते. येथील महाबळेश्वराचें देवळ बांधून सव्वाशें वर्षें झालीं. या देवळाच्या मागून कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री आणि सावित्री अशा पांच नद्यांचा उगम झाला आहे. हें देवळ सातारा येथील अंगळ यांनीं बांधविलें. हें देवळ ब्राह्मणाचें असून त्याच्या व्यवस्थापकांत एक कोळी असतो. त्यांस गंगापुत्र म्हणतात. अमरकोशांत कृष्णेचें नांव नाहीं. अमरकोश खिस्ती शकाच्या प्रारंभास झाला आहे. तेव्हां कृष्णेचें महात्म्य खिस्तीशकाच्या नंतरचें आहे. विष्णुपुराणांत तिचें नांव सांपडतें. अशी दंतकथा आहे कीं सातारचे राजे मोरे व त्यांच्या राण्या येथें स्नानास येत असत. कृष्णामहाबळेश्वरापेक्षां गोकर्ण महाबळेश्वर आधीचें असावें.

नंतर रावसाहेबांनीं गोकर्ण महोबळेश्वराचें वर्णन दिलें आहे. त्यांत रावणानें शंकरापासून आत्मलिंग आणण्याचा केलेला प्रयत्न कसा फसला व महाबळेश्वराची स्थापना कशी झाली तें वृत्त दिलें आहे. रावण हा डोंगराळ प्रदेशांतील रानटी जातीचा चांगला नमुना धरावयास हरकत नाहीं असें सांगून नागपूजेशीं तसाच लिंगपूजेच्या प्रचाराशीं रानटी जातीचा संबंध येतो असें अनुमान काढलें आहे. ( १४ जुलै १८७० )

## ‘ शालीवाहन व त्याची सप्तशति ’

( १९ मार्च १८७३ )

शालिवाहनास शातवाहन म्हणतात व महाराष्ट्रांत चालू असलेल्या शकाचा तो कर्ता होय. त्याचा जन्म कुंभाराच्या वंशांत झाला होता. मराठींत प्रसिद्ध झालेल्या शालिवाहनचरित्रांत तो आपल्या आईला कौमार्यावस्थें-

तच तिच्या चौथ्या वर्षीं झाला असें म्हटलें आहे. महाराष्ट्रांतील हिंदु धार्मिक कृत्य करूं लागला म्हणजे कलियुगाची किती वर्षें झालीं तें, धार्मिक कृत्य ज्या स्थळीं होतें त्याची भूगोलावरील जागा व शालिवाहन शकाचें वर्ष इत्यादिकांचा उच्चार करतो. नर्मदेच्या दक्षिणेस या शकाचें माहात्म्य आहे. याची राजधानी प्रतिष्ठाण म्हणजे गोदावरीच्या काठीं असलेलें पैठण होय. हेमचंद्रानें आपल्या कोशांत विक्रमादित्य, मुंज आणि भोज यांच्याबरोबरीनें शालिवाहन संस्कृत भाषेंत प्रवीण होता असें सांगितलें आहे. जैन ग्रंथकारांनीं शालिवाहनाचीं अनेक चरित्रें सन्मानानें लिहिलीं आहेत. कारण त्यांच्या मताप्रमाणें त्यानें शेवटीं शेवटीं जैनधर्म स्वीकारला होता. शालिवाहनानें लिहिलेला ' शालिवाहन सप्तशति नांवाच्या गाथाकोशाची एक शंभर वर्षांची जुनी हस्तलिखित प्रत मिळाली आहे. तिची भाषा महाराष्ट्रीय प्राकृत आहे. ती टिकेशिवाय समजावयाची नाहीं; परंतु त्या भाषेवरून मराठी भाषा निघाली असें दिसून येतें. उदाहरणार्थ खालील शब्द पहा.

| महाराष्ट्री प्राकृत | मराठी. |
|---|---|
| आत्ता | आते. |
| झुरई | झुरते. |
| तुज्झ | तुझें. |
| फलई | फाडितो. |
| मंजरं | मांजर. |
| बोड ( बोडियो ) | मुलगा. |
| इ० इ० | |

हल्लीं उपलब्ध असलेली जुनी मराठी कविता म्हणजे मुकुंदराजाची होय त्याच्या मागून ज्ञानेश्वर झाला व १२७२ त आपली ज्ञानेश्वरी लिहिता झाला. ज्ञानेश्वरीची मराठी भाषा व हल्लींची मराठी भाषा यांत जितकें

अंतर आहे त्याच्यादुप्पट अंतर शालिवाहन सप्तशतीची व ज्ञानेश्वराची मराठी यांत आहे. सप्तशतीच्या ग्रंथांत शंभर शंभर श्लोकांचीं सात शतकें आहेत. प्रत्येक भागाच्या शेवटीं एक श्लोक आहे तो भाषेच्या मासल्या करतां दिला आहे.

**रसिंअजणहिअअ दइए कइवच्छल पमूह सूकइ णिम्मविए ।**
**सत्तसताम्मि समत्तं पढमं गाहास अं एअम् ॥ १ ॥**

अर्थः—याप्रमाणें रसिक जनांच्या हृद्‌याला आनंद देणाऱ्या कविवत्सल प्रमुख महाकविमुख्यांनीं रचलेच्या सप्तशत गाथांपैकीं पहिल्या शतकाची समाप्ति.

हीं शालिवाहनसप्तशति सात कवींनीं मिळून लिहिली आहे त्यांत शालिवाहन सातवा होता. या श्लोकांत लाक्षणिक अर्थ भरला असून शृंगार रस भरला आहे. मंगळाचरणांत पशुपतीची प्रार्थना आहे. ती प्रार्थना शालिवाहन जैन असता तर त्यानें केली नसती. नंतर बृहत्कथासरित्सागरमधला शालिवाहन व सप्तशतीमधला शालिवाहन हे भिन्न आहेत असें रावसाहेबांनीं सिद्ध केलें आहे.

## संगमेश्वर माहात्म्य.

१३–२–१८७५

संगमेश्वरमाहात्म्य हा ग्रंथ रावसाहेबांनीं वरील सोसायटीला संग्रहार्थ दिला. त्यांतील शेवटले पांच श्लोक सह्याद्रि खंडांतील आहेत. ती हस्तलिखित प्रत १७१३ त लिहिलेली आहे यावरून दाक्षिण कोंकणांतील संगमेश्वर हें स्थान फार जुनें असावें. वरील ग्रंथ चौलुक्य राजांपैकीं कर्ण नांवाच्या राजाच्या पदरीं असलेल्या शेब नामक कवीनें रचिला आहे. हा कर्णेश्वर राजा करवीराकडून येथें आला. या कवितेंत असें म्हटलें आहे कीं कोल्हापूरच्या महालक्ष्मीचें देवळ बांधणारा व येथील कर्णेश्वराचें

देवळ बांधणारा कर्ण हा एकच. सह्याद्रि खंडांतील श्लोकांत या क्षेत्राला काशीप्रयागाची योग्यता दिली आहे. कर्णेश्वराच्या देवळांत कांहीं अक्षरें कोरलेलीं दिसतात ती अशीं:—

गद्यगो ११
दाम 8 ॥ थचेद्म
देवोध्मतारा

१०० द्रजद्प.

कोल्हापुरास महालक्ष्मीच्या संबंधें देवळांत लेख सांपडतात त्यांत कर्णानेंच श्रीयंत्राकारी देवळ बांधलें असा उल्लेख आहे.

## वलभी ताम्रपट

वलभी ताम्रपटांच्या लेखांची प्रतिमा वरील कोरींव लेखासुद्धां व त्यांच्या भाषांतरासुद्धां रावसाहेबांनीं १८७५ सालांत रा. ए. सोसायटीस संग्रहार्थ दिली.

यांतील दोन ताम्रपट, असिस्टन्ट पोलिटिकल एजन्ट गोन्डाल स्टेट, यांच्या कडून मिळाले होते. यांतील एक संवत् ४०३ मधला आहे. तिसरा ताम्रपट वाल्याचे ठाकुर साहेबांनीं दिला. यांतील दान रुग्ण लोकांच्या सुश्रुषेकरतां भिक्षुजनांस केलेलें होतें. दान देणाऱ्या राजांत शिलादित्याच्या अलिकडील कांहीं आहेत. ठाकूर साहेबांनीं कांहीं मृण्मय शिक्का मोतब पाठवून दिले होते त्यांवरून पहातां वलभी हें काठेवाडांतील राजांच्या राजधानीचें शहर असावें असें रावसाहेबांनीं अनुमान काढलें आहे.

पुढें कच्छ, भूज वगैरे प्रांतांत फिरत असतां कोटेश्वर व नारायण सरोवर यांच्या आजू बाजूस अनेक देवळांवर व विहिरींवर कोरींव लेख आहेत त्यांचीं शेंपन्नास टिपणें या सभेस रावसाहेबांनीं सादर केलीं आहेत. त्यांच्या तारखा पहातां त्यापासून जुना शोध लागण्याचा कांहीं संभव दिसत नाहीं कारण ते लेख अलीकडचे आहेत.

## मुंबईच्या लिटररि सोसायटीचें दफ्तर.

रावसाहेब रॉयल एशियाटिक सोसायटीचे सभासद १८६२ सालीं झाले. नंतर त्यांस जुने कागद पहातां असें आढळून आलें कीं मुंबई लिटररि सोसायटी या नांवाची एक संस्था मुंबईत फार पुरातन कालीं अस्तित्वांत होती. तिची मूळ स्थापना २६ नोव्हेंबर १८०४ रोजीं परळ मुक्कामीं झाली. त्याप्रसंगीं सर जेम्स मॅकिन्टाश यांनीं चिरसंस्मरणीय भाषण केलें होतें. व ही पूर्वगामी संस्था कालांतरानें 'रायल एशियाटिक सोसायटींत' सामील झाली. आतां तिचे कागदपत्र विस्कळीत स्थितींत दिसले, ते निरुपयोगी होण्यापूर्वीं छापून काढणें इष्ट होतें. तें काम रावसाहेबांनीं आपल्या खर्चानें १८७७ सालीं केलें. यांचे मित्र सोराबजी शापूरजी बेंगाली यांनीं मदत म्हणून कांहीं रुपयांची हुंडी पाठविली होती ती रावसाहेबांनीं साभार परत केली. त्या काळच्या शोधकांनीं केलेलीं विधानें या काळीं नवीन मिळालेल्या पुराव्यावरून हल्लींच्या काळच्या शोधकांनीं खोटींही ठरविलीं असतील. किंवा अपूर्ण स्थितींतले शोध आतां पूर्णत्वाला नेले असतील तें कळण्याकरतां मागचा पुढचा परस्पर संबंध सांखळीप्रमाणें जुळवणाऱ्या टिप्पण्या रावसाहेबांनीं दिल्या होत्या. प्राचीन शोध, राजनीति, हिंदुस्थानांतील वाङ्मय इ. विषयांची आंतील निबंधांत सप्रमाण चर्चा होती. या संग्रहाचे तीन भाग झाले. त्यांची किंमत वीस रुपये ठेविली होती. नजर म्हणून या संग्रहाचे भाग हिंदुस्थान व युरोप येथील विद्वानांकडे पाठविले होते. बंगाल, मद्रास व मुख्यतः मुंबई सरकार यांनीं सढळ हातानें प्रती विकत घेऊन साहाय्य केलें. संस्थानिकांनींही अल्प स्वल्प मदत केली. सर सालरजंग, निझाम साहेबांचे प्रसिद्ध दिवाण, यांनीं एक प्रत मागविली होती. खर्चाच्या इतकीच जवळ जवळ किंमत ठेवल्यामुळें थोडी घस सोसावी लागेल असें रावसाहेबांस वाटत होतें. ( डायरेक्टर यांस १२।७।७६ चें पत्र ). बऱ्याच

विषयांचें वाचन आपोआप घडल्यामुळें रावसाहेबांचा बराच फायदा या ग्रंथप्रकाशनानें झाला. ( कर्नल जेकब यांस २२।६।७६ चें पत्र )

रायल एशियाटिक सोसायटीच्या सभेपुढें रावसाहेबांनीं केलेल्या भाषणांचा सारांश.

## न्या. फोर्ब्स्.

डॉ. विल्सन यांनीं न्यायमूर्ति फोर्ब्स् यांच्या मृत्यूबद्दल खेदप्रदर्शन करणारा ठराव मांडतांना मुंबई येथें रायल एशियाटिक सभेंत प्रास्ताविक भाषण प्रथम करून नंतर रावसाहेब ह्मणाले:—डॉ. विल्सन यांच्या ठरावास मी शोकगर्भ मुखानें पुष्टि देतों. न्यायमूर्तींशीं परिचय असण्याचा विशेष हक्क मला प्राप्त झाला होता. तो परिचय फारा दिवसांचा नव्हता. तथापि तितक्यांत माझी खात्री अशी होऊन गेली होती कीं त्यांच्या मृत्यूनें माउंटस्टयूअर्ट एलफिन्स्टनच्या पद्धतीचा एक गृहस्थ नाहींसा झाला. इंग्रज गृहस्थांच्या अंगीं जे विशिष्ट गुण असतात ते सर्व त्यांच्या अंगीं होते. त्यांतच उत्तम औदार्य व दया, पुरुषार्थक्षम दृढ निश्चय व मानापमानाच्या थोर कल्पना यांची भर पडल्यामुळें सौराष्ट्रांत व गुर्जरराष्ट्रांत (ज्या प्रांतांत त्यांचें बहुतेक कामाचे दिवस गेले त्यांत) मोठ्या संस्थानिकापासून तो गरीब शेतकऱ्यापर्यंत सर्व दर्जाच्या लोकांस ते प्रिय झाले होते. ब्रिटिश राज्याचे खरे आधारस्तंभ म्हटले म्हणजे न्यायमूर्ति फोर्ब्स यांसारखे लोक होत. त्यांच्यायोगानें ब्रिटिश सरकारच्या न्याय बुद्धीवर लोकांचा विश्वास बसतो. त्यांच्या उदाहरणानें भ्याडांस धैर्य येतें. अति प्रसंगीं संधृष्टांस भय प्राप्त होऊन राज्ययंत्राचा तोल जशाचा तसा राहतो. त्यांचा 'रासमाला 'हा ग्रंथ प्रसिद्धच आहे. या देशांतील जुन्याजुन्या अगणित संस्थांचा लोप, त्यांचा इतिहास कोणी लिहून ठेवीत नाहीं म्हणून, होत आहे, यास्तव त्यांस खेद होत असे. या देशांतील जुना कवितासंग्रह व इतिहाससंग्रह यांत आमच्या लोकांच्या रीतिभाती

ग्रथित झाल्या आहेत. त्यांचें संरक्षण कसें होईल या विषयीं ते सदैव चिंता बाळगीत. शास्त्र व तत्त्वज्ञान यांस राजकीय महत्त्व प्राप्त होऊन उच्च स्थान मिळाल्याशिवाय समाजांत त्यांचा अभ्यास करण्याचा शिष्ट संप्रदाय सुरू होत नाहीं. उच्च दर्जाचे लोकांस विद्याव्यासंग करण्याची संवय फोर्बस् साहेबांसारख्या लोकांच्या मुळें लागते. लढवैय्ये क्षत्रिय, बहुलाभापेक्षी ( सट्टे ज्यांस सदैव प्रिय असे ) वैश्य व विद्याव्यासंगी ब्राह्मण व धाडसी पार्शी, हे सर्व विभिन्न प्रकारचे लोक फोर्बस साहेबांच्या ऐक्यपोषक स्वभावामुळें गुजराथ सारस्वत मंडळांत सामील झाले. मृत्यू पूर्वी त्यांचा वरदहस्त कोणाच्यातरी डोक्यावर त्यांनीं ठेवला असेल अशी मी आशा करतों.

त्यांनीं गुजराथ कवींना दाखविलेलें औदार्य विक्रमादित्यास अथवा भोजराजास शोभण्यासारखें होतें. असें दाखविणारी एक गोष्ट त्यांच्या निघनापूर्वी घडून आलेली नुकतीच माझ्या ऐकिवांत आली आहे.*

( १४–९–१८६५ )

## मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

सातारच्या राणीसाहेबांचें मन वळवून सातारच्या स्वर्गवासी राजेसाहेबांच्या सार्वजनिक ग्रंथसंग्रहांतील जुन्या बखरी पहावयास मिळवितां येतील. आतां त्या त्यांच्या खासगी संग्रहांत असतील. मी गेल्या वर्षी महाबळेश्वरास असतां महाराष्ट्र गादीचे संपादक शिवाजी महाराज यांचे जे धर्मगुरु रामदास स्वामी यांच्या बखरीची एक प्रत मला मिळाली होती; तींत कांहीं गोष्टी कथन केल्या आहेत त्यावर त्यांच्या अनुयायी जनांच्या मंडळाबाहेरील कोणाचा विश्वास बसणार नाहीं. तरी ती बखर मनोरंजक आहे. व दोनशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील वस्तुस्थिति कशी होती व त्या वेळच्या लोकांचे विचार कसे होते तें तींत दिसून

* कविवर्य दलपतराम यांस दिलेली देणगी.

येत आहे ह्मणून ती छापून प्रसिद्ध करण्या लायक आहे. त्यांत इनाम करून दिलेल्या जामिनीच्या वृत्तान्ताचा जो भाग आहे त्याचा आज उपलब्ध असलेल्या दुसऱ्या लेखी पुराव्यावरून कांहीं खरेखोटेपणा ठरवितां येईल. सर बार्टल फ्रियर यांच्या संग्रहीं असलेल्या लेखी कागदपत्रांचा संग्रह त्यांच्या एकंदर संग्रहाबरोबर कलकत्ता व मुंबई यांच्या मधील समुद्रांत बुडाला म्हणून वाईट वाटतें. मेणवलीस नाना फडणीस यांच्या संग्रहांत कांहीं बखरी असतील पण त्या फार नसतील असें मला वाटतें. सर बार्टल फ्रियर यांच्या सूचनेवरून नाना फडणीस यांच्या मुलाजवळ या मंत्रिवराचें संपूर्ण चरित्र लिहिण्याची गोष्ट काढिली परंतु त्यांनीं मला सांगितलें कीं त्यांच्या घराण्यांत जी माहिती उपलब्ध होती ती सर्व कॅप्टन मॅक्डोनाल्ड हे त्यांचें चरित्र लिहित असतां त्यांच्या स्वाधीन केली. परंतु सर्वांत मराठ्यांच्या इतिहासाचें उत्तम साधन म्हणजे पुण्याचें दप्तर होय. त्यांत कागदपत्रांच्या राशी आहेत. ते अनुक्रमणिकेसह छापले पाहिजेत. त्यांत मराठे सरदारांचें दैनिक वृत्तांत असावे. ते अपूर्ण स्वरूपाचे असतील. विद्वान व लेखनकुशल बुद्धिमान लोकांच्या दैनिक वृत्तांता इतके मनोरंजक नसतील. परंतु त संग्रहोचित आहेत. कांहीं दिवसांपूर्वीं पुणेंदफ्तरचा कांहीं भाग शाळा खात्याच्या स्वाधीन करावा किंवा काय या विषयीं एक कमिटी नेमली होती, तिचे सभासद कृष्णशास्त्री चिपळूणकर, रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. व रावसाहेब भास्कर दामोदर पाळंदे हे होते. परंतु तो बेत तसाच जिरला असें मला वाटतें. जुन्या दफ्तरांत आतां ज्या कागदपत्रांच्या राशी उगाच पडून राहिल्या आहेत त्या प्रकाशित केल्या असतां सर्वांस उपयोगी पडतील. म्हणून मी अशी सूचना करतों कीं एक लहानशी कमिटी दोन तीन सभासदांची नेमावी व तिनें पद्धतवार काम करावें म्हणजे मराठ्यांच्या कारकीर्दीचें चित्र काढतां येईल.

मुंबईच्या ‘ रायल एशियाटिक सोसायटीच्या ’ कामासंबंधानें कांहीं मजकूर जेकबसाहेबांना कळवितांना रावसाहेबांनीं १२।७।७२ च्या पत्रांत असें लिहिलें होतें:—“ आम्हांस भाषाविज्ञान व नाणीं यांचा फार व पूर्वकालीन व सद्यःकालीन इतिहासाचा थोडा नाद लागला आहे. माझें हें मत चुकीचें म्हणा परंतु आमची स्थानिक ‘रायल एशियाटिक सोसायटी’ जर पुणें येथील सर्व दफ्तरांतील निवडक भाग प्रसिद्ध करील तर त्यानें जेवढें हित होईल तेवढें हित ज्यांच्या पुरातनत्वाविषयीं शंका आहे अशा एकमेकांशीं संबंध नसलेल्या ताम्रपटांवरील लेखांवर टीका व ती काल निर्णयाला आधार नसतांना करीत बसल्यानें होणार नाहीं. सर्व पुराणांचीं व स्मृतींचीं भाषांतरें होऊन तीं प्रकाशित झालीं पाहिजेत असें मीं म्हणतों. या दिशेनें प्रयत्न झालेले दिसत नाहींत. ”

वरील पत्रांवरून रावसाहेबांचें प्रेम इतिहासावर व पुराणें व स्मृती यांवर फार होतें असें दिसतें. इतिहासावरील प्रेम त्यांनीं अगदीं लहानपणीं ह्मणजे १८६० मध्यें एल्फिस्टनच्या इतिहासाचें मराठींत भाषांतर करून व्यक्त केलें. १८७२ सालींच त्यांनीं ‘ रायल एशियाटिक सोसायटीच्या ’ मासिक सभेपुढें पेशव्यांचें दफ्तर छापण्याची परवानगी मागण्यास सरकारांत अर्ज करावा असा ठराव आणण्याचा आपला मनोदय या संस्थेचे सन्मान्य सेक्रेटरी मि. टेलर यांस २४।११।७२ च्या पत्रांत कळविला होता. त्याप्रमाणें जर कांहीं खटपट होऊन दफ्तर रावसाहेबांच्या स्वाधीन झालें असतें तर एक उत्तम ग्रंथ निर्माण झाला असता.

हा दफ्तर छापण्याचा नाद सुटलासा झाल्यावर रावसाहेब स्मृतींच्या प्रकाशाना कडे वळले.

## रत्नमाला.

रत्नमालेवर प्रवचन केल्याबद्दल नायमूर्ति न्यूटन यांचे आभार मानतांना रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांश:—

खितवासी मि. ए. किन्लॉक फोर्ब्स यांनीं केलेल्या रत्नमालेच्या उत्तम भाषांतरावर आज उज्ज्वल प्रवचन केल्याबद्दल न्यायमूर्ति न्यूटन, आमचे अध्यक्ष, यांचे आभार प्रदर्शित करणारा ठराव सभेपुढें आणण्यांत मला फार आनंद होत आहे. यांत दिलेल्या ऐतिहासिक माहितीबद्दलच या ग्रंथास किंमत द्यावयाची असें नाहीं तर ज्या लोकांचे पराक्रम तो वर्णन करीत आहे त्यांची रीतभात कशी होती त्यावर हा ग्रंथ प्रकाश पाडीत आहे, ह्मणून आहे. ज्यावरून आपणांवर पुढें कोणचे प्रसंग यावयाचे आहेत त्यांचें भाकित अगोदर करतां येतें त्या सद्‌-सत्‌शकुनांचें व शुभाशुभलक्षणांचें जें त्यांनीं हुबेहुब चित्र काढिलें आहे तें आजामितीस बहुतेक भागांत लागू पडण्यासारखें आहे.

रत्नमाला ज्या शाहिरानें रचली तो शकुनांकडे ज्या दृष्टीनें पहात होता त्याच दृष्टीनें हिंदी लोकांतील शेंकडा ५० लोक मुंबईत सुद्धां अद्यापि बघतात. विधवेचें, गंधरहित कपाळ असलेल्या मनुष्याचें, मार्जाराचें, काकाचें, (Blue Jay) निळ्या ज्ये पक्षाचें व अशाच प्राणीमात्राचें दर्शन अशुभ आहे असें अद्यापि अज्ञानी लोक समजतात. असलीं पुस्तकें छापतांना वरील टिपणासह छापावींत म्हणज या देशांतील लोकांचें अंतर्गत रहाणी कशी आहे तिचें "निरीक्षण" करणाऱ्या बाहेर देशांतील लोकांना उपयोगी पडेल.

पंतप्रतिनिधि, जत व फलटणचे राजे यांची मेमॉयर्स जीं अध्यक्षांनीं सादर केलीं तीं फार मौल्यवान आहेत. असें सांगून नंतर पुणें येथील दफ्तराविषयीं रावसाहेब म्हणाले. " कांहीं वर्षांपूर्वी हावर्ड यांची सूचना अमलांत आली नाहीं. त्यांतील खरे खरे राजकीय स्वरूपाचे कागद पाहिजे तर निराळे काढून या सोसायटीच्या स्वाधीन करावे. तरी सुद्धां मोठा फायदा होईल. आज येथें डॉ. विल्सन नाहींत. तसेंच भाऊ दाजी नाहींत म्हणून मी न्या. न्यूटन यांचे आभार मानण्याचा ठराव पुढें आणतों."

## न्यायमूर्ति न्यूटन.

न्यायमूर्ति न्यूटन यांस बॉम्बे रायल एशियॅटिक सोसायटीचे सन्मानीय सभासद करावे अशी सूचना नामदार टक्कर यांनीं आणिली तीस पुष्टि देतांना रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांशः—

मि न्यूटन यांच्या येथून देशीं जाण्यानें दक्षिण महाराष्ट्राच्या राजधानीचा एक सन्मित्र नाहींसा झाला. पुणे एजन्सीशीं संबंध असलेले अनेक लोक या सभेला हजर आहेत परंतु ज्यांनीं कै. बाळासाहेब रास्त्यांसारखे सरदार—हल्लींच्या काळीं दरबारांत दिसून येणारे त्यांचे केवळ आभास नव्हे हो—स्वतां डोळ्यांनीं पाहिले होते व ज्यांनीं त्यांची ओळख करून घेतली त्या न्यूटन सारख्या गृहस्थाचा वर्ग आतां नाहींसा होत आहे. यांचें शिक्षण भिन्न असून, मार्गदर्शक नीतीचें प्रमाणही भिन्न असून अगदीं समग्र निराळया तऱ्हेच्या लोकांच्या गुणाची किंमत हे ओळखूं शकत व त्यांच्या कल्याणाकरतां प्रयत्न करूं शकत. सरदारांचा इतिहास व चरित्रपद्धति यांचें यथार्थ ज्ञान करून देतील अशा कागदपत्रांचा संग्रह करण्यांत यांनीं किती परिश्रम घेतले आहेत ते या मंडळीच्या संग्रहांतील कागदपत्रच सांगतील. मि. न्यूटन हे स्वतां धार्मिष्ट असून भिन्न देशांतील भिन्न धर्मीयांच्या मतांस मान देण्याची यांची प्रवृत्ति उदारपणाची होय. हिंदुस्थानांत जे भिन्न भिन्न जातीचे लोक आहेत त्यांच्यांत अंतर फार आहे तें नाहींसें करण्यास मि. न्यूटन सारख्या मनःप्रवृत्तीच्या मनुष्याची मदत होते. हिंदुस्थान व इंग्लंद हे दोन देश एकमेकांचा जो जो फायदा करूं शकतील त्या त्यांत सर्वांत मोठा म्हटला म्हणजे या दोनही देशांतील लोकांच्या विचारी माणसांच्या मनांचा उदात्त संयोग घडवून आणणें हा होय. या दृष्टीनें पहातां आमच्या अध्यक्षांच्या जाण्यानें मोठा तोटा होणार आहे व तो बरेच दिवस भासणार आहे तर त्याची जाणीव आम्हीं ठेविली पाहिजे. म्हणून मी या ठरावास आनंदानें पुष्टी देतों.

## न्या. गिब्स्.

नामदार गिब्स यांनीं रायल एशियॅटिक सोसायटीची जी सेवा केली तिच्याबद्दल त्यांचे आभार मानते वेळेस रावसाहेब ह्मणालेः—१८०४ मध्यें स्थापन झालेल्या ज्या लिटररी सोसायटीचा नामनिर्देश गव्हर्नरसाहेबांनीं केला हिचे कागद पत्र छापण्यांत ना. गिब्स यांनीं मला मदत करून या सोसायटीची अप्रत्यक्ष रीतीनें सेवा केली. या देशांतील निरनिराळ्या इलाख्यांतील लोकांना चांगलें शिक्षण मिळाल्याशिवाय व कोणी मार्गदर्शक भेटल्याशिवाय या देशाची जी प्रगति झाली ती कशी होत गेली याचा इतिहास लिहितां यावयाचा नाहीं या करतां युरोपियन लोकांकडे आमच्या मार्गदर्शकाचें काम सोंपवावें लागेल. ह्मणजे मनुष्याला ज्ञानप्राप्ति करून घेण्याला जे निरनिराळे मार्ग आहेत ते त्याच्या हातांत येतील. सरकार आह्मांला मदत करील व तें करीतही आहे. तथापि या सोसायटीनें चालविलेल्या शोधाचें काम हें आमचें आह्मींच केलें पाहिजे. आह्मीं या बाबतींत कसें वागावें तें सांगण्याकरतां नामदार साहेबांनीं येथें येण्याची जी तसदी घेतली त्याबद्दल त्यांचे आह्मीं आभारी आहोंत. युरोपियन व माझे देशबांधव हे दोघेजण मिळून नवे शोध लावण्याच्या कामीं प्रयत्न करतील अशी मी आशा करतों.

युरोपियन व माझे देशबांधव यांच्यापुढें शोध चालविण्याला एवढें मोठें क्षेत्र आहे कीं त्याच्या इतकें अमर्याद दुसरें म्हटलें म्हणजे एक विश्वच होय.

१८५९ सालीं रावसाहेब मुंबई येथील जिआग्राफिकल सोसायटीचे सभासद झाले. पुढें मुंबईच्या अग्रि हॉर्टिकल्चरल सोसायटीचे सभासद झाले.

१८७२ साली इंग्लंदांतील रॉयल एशियाटिक सोसायटीचे तहाहयात

सभासद् झाले. तेव्हां पासून जुन्या वैदिक ग्रंथांविषयीं त्या सोसायटीचा व रावसाहेबांचा पत्रव्यवहार होत असे.

१८८० सालीं रावसाहेबांस बेंगाल एशियॅटिक सोसायटीचे सभासद नेमण्यांत आलें. १८८४ सालीं स्टॅटिस्टिकल सोसायटी ऑफ् लंडन चे फेलो नेमण्यांत आलें व त्याचप्रमाणें रायल जिऑग्राफिकल सोसायटी ऑफ् ग्रेट ब्रिटन व आयर्लंड चे सभासद नेमण्यांत आलें.

---

## प्रकरण ३५ वें.

# वक्तृत्वोत्तेजक सभा.

। तद्वक्ता सदसि ब्रवीतु वचनं यच्छृण्वतांचेतसः ।
॥ प्रोल्लासं रसपूरणं श्रवणयोरक्ष्णोः विकासश्रियम् ॥
। क्षुन्निद्राश्रमदुःखकालगतिहृत्कार्यान्तरप्रस्मृतिम् ।
॥ प्रोत्कण्ठामनिशं श्रुतौ वितनुते शोकं विरामादपि ॥ १ ॥

( सुभाषित )

१८६७ सालीं मुंबईस पहिल्यानें मराठींत वक्तृत्वसमारंभ झाला उमेदवार चारच होते. रावसाहेब मंडलिक, प्रो. रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर व प्रो. छत्रे हे पंच होते.

दुसऱ्या वर्षींच्या समारंभांत रावसाहेब, नाना मोरोजी, दादोबा पांडुरंग, प्रो. भांडारकर व शंकर पांडुरंग पंडित हे पंच होते.

१८७१ सालीं विषय होता तो शिवाजी महाराज यांनीं २५ वर्षें यवनांशीं लढाया करून राज्य स्थापन केल्यावर त्यांस १६७४ रांत राज्याभिषेक झाला. त्याप्रसंगी ज्या शूर लोकांच्या साहाय्यानें त्यांस

राज्यपद प्राप्त झालें त्यांस व हिंदुधर्माचा ( हिंदुनांवाचा ) अभिमान बाळगणाऱ्या दुसऱ्या शिष्ट गृहस्थांस उद्देशून संभाषण करतांना आपण शिवाजी राजे आहों अशी कल्पना करावी.

रावसाहेबांच्या कागद पत्रांत वक्तृत्वसमारंभाच्या जाहीरातीच्या पाठीवर उमेद्वारांचीं नांवें, वक्त्यांच्या आङ्गी दिसून येणाऱ्या कोणत्या वक्तृत्वाचें लक्षण असलें पाहिजे तें व त्यांस दिलेले गूण यांचें शिस्तवार टांचण याच साला पुरतें सांपडतें त्यावरून पुढील माहिती दिली आहे. अनुक्रमवार उमेद्वारांच्या नांवांपुढें शेरे आहेत ते.

१ युक्तिवाद थोडा; ऐतिहासिक माहिती थोडी; भरपूर विसंगतपणा; भाषा फार अलंकारिक.

२ दृष्टांतवैपुल्य; भाषणाचा ओघ स्थिर.

३ ऐतिहासिक माहिती अधिक; हावभाव नाटकी.

४ पोपटपंजी; वक्तृत्त्वगुण शून्य.

५ इतिहासाचें ज्ञान नाहीं; भाषा अशुद्ध.

६ तयारी चांगली; भाषणांत फार त्वरा; चित्ताकर्षक.

७ भांबावून भाषण थांबवून गेला.

७ व्याकरण नाहीं; अव्यवस्थित. इ.

## प्रकरण ३६ वें.

# नाना मंडलिकांचा प्रपंच

**प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुह्मीं कष्टी व्हाल ॥**
**प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुह्मीं विवेकी. ॥ १ ॥**
**( रामदास )**

**नाना** मंडलिक यांच्या चरित्रांतील प्रास्ताविक भाग तिसऱ्या प्रकरणांत आला आहे. आतां त्याच्या पुढील भाग या प्रकरणांत दिला आहे. चित्रास जसा पृष्ठभूविभाग तसा **नानांचा** चरित्रभाग **रावसाहेबांच्या** चरित्रास सौंदर्यकारक झाला आहे. तरूणपणीं संपत्ति हातांत आली असून तिचा दुरुपयोग न करतां **नानांनीं** प्रपंच नीटनेटका केला व परमार्थसाधन करून भलेपणा मिळविला. **नानांच्या** लहानपणीं व नंतर, जंगम व स्थावर मिळकितीची देखरेख त्यांच्या मातोश्री **गंगाबाई** यांनीं कारकुनांच्या मार्फत केली. **नाना** वयांत आल्यावर ते स्वतां देखरेख करूं लागले. तेव्हांपासून सरकार दरबारचा त्यांच्याभागें जो सारखा वेध लागून राहिला होता तो बहूत काळ टिकला होता. प्रथम इनामकमिशनानें यांस पुराव्याचे कागदपत्र घेऊन जितकें हिंडविलें*त्याहून, त्याच्या निमि-

* जागोजाग हिंडावयाचें काम नाना घोड्यावर बसून किंवा वेळेस पायींही करीत असत व तशी त्यांस बरीच वर्षें शक्ति होती. कराचीस असतां **रावसाहेबांनीं** त्यांस तिकडे येण्यास विनंति केली होती. व चालण्याचे श्रम केल्याशिवाय यावें असें आग्रहानें लिहिलें होतें. तेव्हां **नानांनीं** त्यांस पुढील पत्र लिहिलें:—आम्हीं कराचीस डोलींत व घोड्यावर बसून येऊं. पायीं चालणार नाहीं. पायीं जाण्याची ताकद आहे पण गुदस्तां दोन वेळ ज्वर आला म्हणून येत नाहीं. हल्लीं घोडी आहे तिनें निर्वाह होतो. मागील घोडी एका गड्याचे ओझें घेऊन आम्हांस घेऊन मजल करी. चाल नाहीं पण दोन प्रहरीं १० मैल मजल घेतसे.

त्त सांगाव्या लागलेल्या नाणीझ गांवच्या कज्जानें मुरूडाहून रत्नागिरीस व तेथून ठाणें व मुंबईकडे वर्षानुवर्ष सारखें हिंडविलें. याची समग्र हकीगत १९ व्या प्रकरणांत दिली आहे.

मध्यें विसावा मिळत नसे असें नाहीं परंतु मिळाला तर त्याचा सद्व्यय करण्याच्या संधींत एकाद दुसरें नवें प्रकरण उपस्थित होई. त्याची वाट नाना आपल्या नेहमींच्या धोरणानें लावीत आसत. मासल्याकारितां एक दिलें आहे तें:—पूर्वीं तिसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें धोंडोपंत मंडलिक यांणीं पेशवाईंत ४५०० रुपये भरून १७८८ सालीं अंजनवेल तालुक्यांत सरदेश व देशकुळकर्ण हे दरख कांहीं महालांवर मिळविले * त्यांसंबंधीं सर्व काम त्यांचे कारकून पांडुरंग गोविंद आपटे यांचेकडून व इतर कारकुनांकडून करून घेत आले. त्यांच्यामागें नाना मंडलिक तेंच काम आपले क्रियाबळकर्ते कारकून विनायक उर्फ धारोपंत ओक यां मार्फत १८३९ सालापर्यंत ह्मणजे सुमारें ६१ वर्षेपर्यंत करीत आले. तेव्हां रत्नागिरीचे कलेक्टर मि. कोल्स् यांकडून लिहून आलें कीं तुह्मी वतनदार कुळकर्णी नाहीं. जप्तींत असलेल्या वतनांचे तुम्हीं सरकारांतून नेमलेले वहिवाटदार अहांत. सन १८४३ चा आक्ट कलम ११ प्रमाणें तुमचे तर्फेनें गुमास्ता नेमून घ्यावा असें आक्टांत कोठें आढळत नाहीं. त्यावरून तुम्हांस लिहिण्यांत येत आहे तरी खुद्द तुम्हीं सदरहू देशपांडेपणाची चाकरी करण्याकरतां १५ नवंबर १८४९ चे आंत अंजनवेल येथील मामलेदार यांकडे

* सदरहू वतनाचे चाकरीबद्दल पेशवे अमलांत ६५० व रयतेकडून ४०० रुपये मिळून १०५० रु. दरवर्षास मिळत होते. त्यांपैकीं कांहीं जुने दरख इंग्रजी अंमलांत नव्या व्यवस्थेनें बंद झाल्यामुळें ६५० जाऊन ४०० रु. सरकारांतून भातें मिळूं लागलें होतें.

हजर होऊन जाब कळवावा, तसें न केल्यास सदरहू कामावरील तुम्हीं आपला हक्क सोडला असें समजून सरकारचे नजरेप्रमाणें बंदोबस्त होईल.

त्यावर पूर्वापार मुकत्यार मार्फत वहिवाट चालू असल्याचें नानांनीं रेव्हिन्यू कमीशनर यांस कळविलें. त्यावरून वरील गोष्टींचा पुरावा कलेक्टरानीं मागितला. त्यावर ३५०० रुपयांचा पेशवे दप्तरांतील दाखला व पहिले रसदवाले दामले यांस १००० रु. दिल्याची पावती असे दस्त ऐवज हजर केले. याच कामीं १८२८ सालीं मि. रीड यांनीं चवकशी केली होती. त्या प्रकरणाचे कागद हजर केले. त्याचा उपयोग झाला नाहीं म्हणून नानांनीं विनंति अर्ज केला कीं, सदर अदालतींत मी सरकारावर घातलेला नाणीझ गांवचा कज्जा चालू आहे. सबब ह्या कज्ज्याचा निकाल होईतों स्वतां हजर होववणार नाहीं. सबब जो काम करीत आहे त्याचे हातून काम घ्यावें. त्यावर कलेक्टर यांनीं ७।१।१८५१ ला जबाब पाठविला कीं नाणीझ गांवच्या कामीं तुमचेवर सरकारनें अपील केलें आहे, तें मंजूर जाहलें आहे. त्याचा फैसला तूर्तच होतो असें नाहीं दोन वर्षें पर्यंत लागतील तेव्हां आतां तुम्हांस अपीलाचे ठिकाणीं रहाण्याची कांहीं सबब दिसत नाहीं. वकीलास माहिती दिल्यावर तो काम चालवील. सबब या महिना अखेर तुम्हीं चिपळूण मामलेदार यांकडे हजर व्हावें. ‘ या उपर जाजती मुदत मिळणार नाहीं ’ असेंही हुकुमांत फरमाविलें होतें.

हें पत्र घरीं मुरूडास आलें; तेव्हां नाना मुंबईस आहेत असें त्यांचे चिरंजीव गंगाधर ऊर्फ रावजी याणीं कळविलें. तरी आतां जास्त मुदत मिळणार नाहीं व मुदतींत हजर न झाल्यास सरकारांतून बंदोबस्त केला जाईल असें वडिलांस कळवावें म्हणून दुसरा हुकूम आला. एवंच नाना कामावर हजर झाले नाहींत असें सरकारांत लिहून गेल्यावरून सन

१८५४ सालीं **नानां**स वतनावरून काढून दुसरे इसम नेमण्याचा हुकूम झाला.

"श्रम करून मला राहणें स्वतां कसें होईल! **रावजी**स कसें बनेल! पन्नास वर्षें वहिवाट हाच जोर वतनाचा, कृपा सरकार करणार परंतु बोलिलें पाहिजे." निदान पहिल्यारसद्वाल्याला भरलेले रुपये तेहीं परत द्यावे असा अर्ज मुंबईचे गव्हर्नरसाहेबांकडे करून नाना "बहूत बोलिले" पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. व तुम्हांला **धोंडो नारायण** यांणीं भरलेली रसद् परत मिळण्याचा हक्क नाहीं असा जबाब आला. "कृपा सरकार करणार परंतु बोलिलें पाहिजे" हा मार्मिक कित्ता जो **नानां**नीं घालून दिला तो रावसाहेबांनीं चांगला गिरविला.

**नानां**स वैद्यकीचें ज्ञान चांगलें होतें. कांहीं मात्रा व भस्में घरीं तयार करीत असत. **माधवनिदान** व त्यावर **रुग्विनिश्चय** नांवाची टीका व आतंकदर्पण इ. ग्रंथ संग्रहीं असत. केवळ **लोलिंबराजा**वरच त्यांच्या वैद्यकी ज्ञानाची भिस्त नव्हती. **नानां**चा हा वैद्यकीचा नाद **रावसाहे**-बांनांही लागला होता त्यासंबंधें पुढें एका प्रकरणांत हकीगत दिली आहे.

संस्कृतविद्येचा नाद **नानां**स असावा असें त्यांच्या संग्रहीं असलेल्या पुढील पुस्तकाच्या यादीवरून दिसतें. पंचमहाकाव्यें; मुरारनाटक; गोवर्धनटीका; अलंकारचंद्रिका; शृंगारतिलक; घटखर्पर; (?) सन्याभरण; नलोदयकाव्य; कुवलयानंद; भामिनीविलास; गीतगोविंद; रसमंजरी; पदमंजरी; भाषामंजरी; भर्तृहरि; महाकौमुदी; कालमाधव; त्रिस्थलीसेतु; सामुद्रिक; न्यायशास्त्र; तर्कप्रकाश; नेयवाद; तर्कसंग्रह; पूर्वमीमांसा; गंगालहरी; विज्ञानेश्वर; शालिग्रामशिलापरीक्षा; कौमुदीव्याकरण; तर्कशब्ददीपिका; गौरीकांति; तर्कामृततरंगिणी; इ०

पत्रव्यवहाराची कला **नानां**स चांगली साधली होती. तिचें वळण रावसाहेबांस लागलें होतें. कसें तें पुढील वर्णनावरून कळेल. **नाना**

मंडलिक हे सरकार दरबारांत वागलेले होते. ज्याला दरबारी रीत माहीत नाहीं. राजप्रकरणांत कांहीं कळत नाहीं त्याचा प्रवेश शनवार वाड्यांत होणें शक्यच नव्हतें किंवा झाल्यास राज्य प्रकरणाचे धडे न मिळतां तो कोरा राहणें शक्य नव्हतें; त्यामुळें त्यांचें लिहिणें बोलणें पुणेरी असे. अमरकोश, रूपावळी समासचक्र, वृत्तरत्नाकर इ० ग्रंथांचें पठण त्यांनीं केलें होतें. कांहीं काव्यांत त्यांची प्रगति झालेली होती. सुभाषितें, वृद्ध वचनें पाठ झालेलीं होतीं. व सुन्दर लोकोक्त्या त्यांस मुखोद्गत होत्या. त्यांचीं अवतरणें त्यांच्या पत्रांतून आढळतात. त्यांचे लेख सभ्य व प्रौढ भाषेंत असत. सविस्तर असत पण पाल्हाळीक नसत. मुद्याच्या बाहेर एक अक्षर संबंध पत्रांत लिहित नसत.

रावसाहेबांस नाना पत्र लिहित तेव्हां त्यावेळच्या पुणेरी दरबारी पद्धतीनें " चिरंजीव सहस्रायु विजयी भव " असें आरंभीं लिहित. पुढें "अण्णा यास नारायण धोंडदेव यांचे आशीर्वाद" लिहून कुशल वृत्त कळवून पुढील मजकुरास आरंभ करीत. १, २, ३, असे अंक घालून विषयाप्रमाणें पत्रांतील मजकुराचे भाग पाडीत व पत्र संपवितांना "याप्रमाणें अमुक कलमी ( शेवटच्या भागाचा आंकडा घालून ) मजकूर लिहिल्यावरून कळेल" असें लिहून आशीर्वचनपूर्वक पत्र पुरें करीत.

शेवटीं सही करीत नसत कारण पत्रारंभींच लिहिणाराचा नामनिर्देश होत असे. सही ही नेहमीं खतपत्रांतच त्यावेळचे लोक करीत असत. मुद्देसूद लिहिण्याचा धडा नानांनींच रावसाहेबांना शिकविला; त्याप्रमाणें रावसाहेबांच्या लिहिण्यांत जी पत्रांतील मुद्याच्या समर्थनार्थ सर्व लोकांस पसंत अशी समर्पक म्हण अथवा लोकोक्ति देण्याची पद्धति दिसते, ती रावसाहेबांनीं नानांपासूनच उचलली. " गुण संपादन करा " असें सुचवितांना नाना पत्रीं लिहित " घोडा चंदी गुणावर मिळवतो. " खोती व इनामी गांवावर कारकून असत पण त्यांवर देखरेख ठेवण्यास नाना, सारखे

फिरत रहात असत व म्हणत " कोणत्याही कामांत ज्याची त्यासच आस्था तशी जर कारकुनांस असती तर चाकरांनीं शेतें व बटकीनें घरें होणार नाहींत, ही म्हण आहे ती खोटी होईल. " "चंदनाचा अधिकार घांसून घेणेचा. " चंदनाला लोक आपल्या फायद्यासाठीं घांसतात तेव्हां घांसून घेण्याचा हा त्या परवश व गुणी चंदनाचा अधिकार आहे, असें वडिलांनीं लिहिल्यावरून लोकसेवा करण्याचें व्रत पतकरण्यास चिरंजीवांस केवढें उत्तेजन मिळालें असेल याची कल्पना होण्यासारखी आहे. " नखानें काम वेळींच होण्यासारखें आहे. तें जून झाल्यावर कुऱ्हाडीनें होणार नाहीं. " ही म्हण वेळेवर उपाय करण्यास लावणारी आहे. बर्वे यांच्या विरुद्ध मंडलिक यांनीं चालू वहिवाटींत लावलेला दावा बुडाला तें वृत्त कळवितांना नानांनीं रावसाहेबांस लिहिलें " येथें पाहिजे त्या गप्पा व वल्गना लोक करतात. ऐकण्याची सोय नाहीं. कारण दगड तरून शेणी उर्फ गोंवऱ्या बुडाल्या असें जाहलें आहे !" हें वाक्य फारच उत्साह उत्पन्न करणारें आहे. हें सांगावयास नकोच. रावसाहेबांचा उत्कर्ष ऐकून ते दूर असल्यामुळें नानांनीं रावसाहेबांस पत्र लिहिलें कीं " आपण तरी जवळ यावें नाहींतर मला तरी जवळ न्यावें " इतका प्रेमाचा ऊत जरी नानांस येत असे व मुलगा फार विद्वान निघाला होता तरी आपला मान कमी होईल अथवा अपमान ज्यानें होईल असा शब्द सुद्धां नानांनीं कधीं काढला नाहीं. पत्रोत्तरीं जेव्हां लिहावयाचें तेव्हां ते स्पष्ट लिहून शेवटीं " आम्हांस सुचेल तें बहूत लिहितों, उपयोग तेवढें घ्यावें, नको तें टाकावें " असें लिहीत. नानांचें मोडी अक्षर फार वळणदार व सुवाच्य असे. त्यामुळें लोक त्यांचा कित्तागिरवीत असत. नानांनीं लोकांस अक्षराचें वळण लावलें. व त्यांच्या चिरंजीवांनीं प्रस्तुत, चरित्रनायकांनीं, सर्व राष्ट्राला वळण लावलें असा अनुगुण संयोग घडून आला, तो सुख कारक आहे.

नानांच्या पहिल्या पद्धतीप्रमाणें पत्रांत कांहीं शब्द संक्षेपानें लिहिले जात. 'पा' या अक्षरापुढें दोन कान्हे दिले म्हणजे तें अक्षर 'पासून' किंवा 'पर्यंत' इत्यादि एकाहून अधिक शब्दांचें दर्शक होतें. यावरून रावसाहेबांनीं वडिलांस एकदां लिहिलें कीं आपल्या पत्रांत असले संक्षेप फार असतात. तेव्हां पत्र वाचतां वाचतांच अर्थ समजण्यास विलंब होतो. त्यावर नानांनीं स्पष्ट जबाब लिहिलाः—'मु' या अक्षरास कान्हे दिले ही संवय आणि पेशजींचे उत्तरीं 'पा' स कान्हे दिले आहेत त्याचे अर्थ तीन लिहिले हे घाई मुळें. येरव्हीं आम्हीं पाहिल्यावर मनांत आणितां सात अर्थ आम्हांस सुचतात, याहून अधिक तुम्हांस सुचतील कारण ही तर्काची गोष्ट आहे. आदिपश्चात् अक्षरावरून अर्थ करावयाचा; येरव्हीं अर्थ तीन किंवा अधिक होतील."

"आतां यापुढें कान्हे न देण्याची वहिवाट ठेऊं. तशीच तुम्हींही मनांत आल्यास अक्षर वाचावयापेक्षां लिहिण्याची संवय ठेवावी. याचें उत्तर तुम्हीं पाठवालच कीं वाचतां येत नाहीं. हेंही खरेंच परंतु तें आम्हांस मात्र लागू! असो." ३१७।६८ चें पत्र.

रावसाहेब पत्र फार त्वरेनें लिहित त्यामुळें त्यांचें अक्षर सर्वांस लागत नसे. त्यावरून ३-१२-५८ रोजीं नानांनीं त्यांस लिहिलें कीं पत्र पावलें मजकुर कांहीं कळला; कांहीं अक्षरें लागलीं नाहींत. येविषीं 'संवयी आणि अभ्यास' या पुस्तकांत तुम्हीं लिहिलें आहां. असो. त्वरेनें लिहिल्यामुळें असें होतें." या वाक्यांत केवढी खोंच आहे! यथार्थ उत्तर थोडक्यांत देतां आल्यामुळें सानंद गर्वही आहे. रावसाहेबांचे अक्षर वळणदार होतें परंतु त्यांना आयुष्यांत ज्या गोष्टी कमी होत्या असें वाटत होतें, त्यांत मुख्य गोष्ट कोणत्याही कामास वेळ पुरत नसे ही होती.

जुन्या मनुष्यांचीं कांहीं धोरणें असतात. कांहीं चालीरीती असतात. तीं धोरणें व त्या चालीरीती संभाळल्या असतां सौख्य होतें. अशा धोरणानें रावसाहेबांनीं वागावें म्हणून नाना मधून मधून त्यांस सूचना करीत असत.

"तिकडे (भुजेस) गुरें सवंग महाग कांहीं मिळत असतील व दूध कसें मिळतें तें मान पाहून उमेदपूर्वक गाय घेतल्यानें दर्शन व शेवटीं गोमय इत्यादि सोयी होतात. समई बदली होईल तेव्हां पात्र पाहोन अल्प दक्षणा देऊन धर्म करावी. युक्ती सुचली ती लिहिली आहे. यासीं रागास न यावें."

"इंग्रजी पगारदाराची रीत आपणास लागू नाहीं. पगारावर पगार मिळवून एक पगार हाताशीं शिल्लक ठेविला पाहिजे. परदेशांत २०० रुपये तरी शिल्लक असावेत. सोनें असल्यानें जोखम कमी. बाळगण्यास इतका फायदा आहे. व हवे तेव्हां रुपये येतात. खरेदी सोनें करते वेळीं मासा दोन मासे जास्त घेऊन मासल्याकरतां वेगळें ठेऊन बाकी सोनारापाशीं द्यावें. म्हणजे पुन्हा कसास लाऊन पहाण्यास चांगलें पडतें. कस, ताव देऊन पहावा."

"कोणी गृहस्थ बिऱ्हाडीं आल्यास त्याचा आदरसत्कार ठेवावा. रोजगारावर नजर नसावी. भाषण सदा सर्वकाळ नम्र असावें. मी लिहिणें युगमाहात्म्यास वाजवी नव्हे, परंतु स्वभाव जात नाहीं."

एकदोन घरची प्रेमाची मंडळी **रावसाहेबां**जवळ असे. कांहीं झालें तरी **रावसाहेबांस** जपणारी अशी जाग्यावर तीच म्हणून त्या मंडळीस **नाना** लिहीत.

"अण्णाचा स्वभाव सोसक बहूत; तर मन जाणून दोन वेळ अधिक विचारण्यास कंटाळा किंवा खेद करूं नये" (अनंत भटजींस पत्र.)

**भुज** व **करा**ची येथील **रावसाहेबांचें** काम मोठ्या हुद्याचें नव्हतें. **ठाणें**-येथील व्हिजिटरचें काम निराळें होतें. तेथें, पुष्कळ लोकांवर सत्ता चालवावयाची होती. हाताखालच्या लोकांकडून हांजी हांजी होण्याचा संभव फार होता. म्हणून **नानांनीं** लिहिलें "प्रकृतीस जपून काम कोणतें करण्याची उतावीळ करूं नये. तुमचे स्वभावाप्रमाणें, तोंडावर तुम्हांस कोणी समई नजर चूक

झाली तरी सांगणारा मिळेल असें वाटत नाहीं. कारण असें सांगणें भल-त्याच्यानें होणार नाहीं. ” एकत्र कुटुंबांत कोणी एक रोजगार करतो व दुसरे मुलगे पोष्य वर्गांत पडून रहातात हें त्या रोजगाऱ्यास आवडत नाहीं हें साहजिक आहे, परंतु सर्व कुटुंबाचा सारखा संभाळ करण्याची ज्याच्या-वर जबाबदारी असते अथवा ज्याची इच्छा असते, त्या कुटुंबांतील मुख्य जो वडील कर्ता मनुष्य त्याला निराळेंच धोरण ठेवावें लागतें; तें **नानां**चे अंगीं होतें म्हणून त्यांनीं **रावसाहेबां**स असें लिहून कळविलें:— “ तुमची ज्ञैत ( नियत ) सरकार चाकरीवर चांगली आहे म्हणोन ईश्वर कृपा करतो. कुंटुबाचीं माणसें बहूत. कोणाचे नशीबानें चालतें हा नेम नाहीं. ”

**नाना** हे दरबारी माणूस म्हणून त्यांनीं एकदां लिहिलें “ साहेबाची मर्जी संपादन करावी. ” **नाना** स्वतः फार हिशोबी मनुष्य होते व हिशोब चोख ठेवीत म्हणून त्यांनीं एकापत्रीं **रावसाहेबां**स लिहिलें होतें “ जो रोज खर्च कोणी करील त्यावर सायंकाळीं सई करण्याचा पाठ ठेवावा. यांत तुम्हीं स्वतः रोज हिशोब नाहीं केला तरी चालेल पण तपासावा ”.

“**संवयी** आणि अभ्यास” हें पुस्तक वडिलांस वाचावयास **रावसाहेबांनीं** पाठविलें त्यावर **नानांनीं** अभिप्राय दिला त्यांत चिरंजीवांचें कौतुक फार खुबीनें केलें आहे. “ पुस्तक आलेलें निम्मे वाचलें. बाकीहि वाचोन पाहूं. त्यांत मोठा मुद्दा आढळ जाहला. बोले तैसा चाले हें लि ॥ अहा. अभ्या-साविषयीं तर आमची उमेद नाहींच हें आशिर्वाद. ”

रावसाहेबांचे वागण्याचे कडक नियम **नाना** जाणून होते. मद्यपानाच्या विरुद्ध **रावसाहेब** होते, म्हणजे त्यांच्या घोडेवाल्यानें मद्य पितां कामा नये अशी सक्ती असावयाची. तेवढी कदाचित् शक्य असेल परंतु इष्ट नाहीं हें जाणून **नानांनीं** एकदां **रावसाहेबां**स लिहिलें “ **कृष्णा कानशा** चांगला बरा होईपर्यंत त्यास थंडीस जपावें. दारू हा त्याचा भक्ष आहे; ती थोडी देववीत असावी. ”

नाना हे लोकांकडून आर्जवानें काम करून घेत. रावसाहेब हे तक्रार करून घेत. रावसाहेबांचीं पत्रें १८५६ सालाच्या सुमारास डाकेच्या त्या वेळच्या व्यवस्थेमुळें अथवा अव्यवस्थेमुळें वेळेवर पोंचत नसत. रावजींनीं लिहिलें कीं पत्रें आमचीं आम्हींच जाऊन आणतों. शिपायी येऊन पत्र पोंचण्यास दोन महिने लागतात. रावसाहेबांनीं त्यांस तक्रार करा म्हणून सांगितलें.त्यावर नाना म्हणाले"पोष्टांतील कारकून हेच आमचे वरिष्ठ. ते आमचीं कामें करतील तेवढीं वरिष्ठांकडून होणार नाहींत"

नानांनीं रावसाहेबांच्या विद्येला कसें प्रोत्साहन दिलें तें मागें आलेंच आहे. पुढें त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव भाऊ व मधले चीरंजिव रावजी या उभयतांस पुत्र झाले होते. त्यांतील दोघेजण ( पांडुरंगराव भाऊंचे चिरंजीव व धोंडोपंत रावजींचे चिरंजीव ) असे मराठी शाळेंत असतांच त्यांनींही रावसाहेबांप्रमाणें विद्या करून प्रसिद्धीस यावें अशी नानांची इच्छा होती व ती साहाजिकच होती व त्यांच्या विद्येचें काम रावसाहेबांनीं हातांत घ्यावें असा नानांचा हेतु होता.

दोघांच्या विद्याभ्यासाची हकीकत रावसाहेबांस नाना कळवीतच असत पण त्यांतल्या त्यांत "धोंडू बाबा"ची आपल्या अभ्यासाविषयींच रावसाहेबांस पत्रें येत व त्यांत कधीं पुस्तकांची मागणी असे. तीं पुस्तकें रावसाहेब पाठवून देत असत व त्यांचा उपयोग मुलें चांगला करून दाखवतात असें रावसाहेबांस समजतांच त्यांनीं मुलांस उत्तम शिक्षण देण्याचा बेत केला. व उत्तम मनुष्य कोण मिळतो या विचारांत असतां त्यांस गंगाधरपंत टिळक यांचें नांव ध्यानीं आलें. तेव्हां प्रथम रावसाहेबांनीं त्यांस मोघम पत्र लिहिलें व त्यांत एका श्रीमंताच्या दोन मुलांस कसें शिकवाल असा प्रश्न विचारला. त्याचें उत्तर गंगाधरपंत टिळकांनीं पुढें दिल्याप्रमाणें लिहिलें:—

" द्विज म्हणजे दोन वेळा ज्या मनुष्याचा जन्म होईल तोच मनु-

ध्यत्वांत आला नाहीं तर प्रत्यक्ष द्विपाद् पशुः * विद्येच्या योगानें बरें काय, वाईट काय, ग्राह्य कोणतें, त्याज्य कोणतें, ईश्वराविषयीं आपणाविषयीं, आपले वडील इत्यादिकांविषयीं कर्तव्यें कोणतीं वगैरेचें जेव्हां ज्ञान होईल तेव्हां दुसरा जन्म होतो. मग तो पुरुष, वडिलांस चांगला पुत्र, मुलांस चांगला बाप, भावांबहिणींस चांगला भाऊ, बायकोस चांगला नवरा, धन्यास चांगला चाकर, व चाकरास चांगला धनी, व इष्टमित्रांस चांगला स्नेही होतो, म्हणजे मनुष्यत्वास येतो. पूर्व वयांत अशी एक वेळ येते कीं मुलांचे वडील किंवा गुरु किती जरी सुनीति सांगत असले तरी ऐकूं नये असें त्यांस वाटून प्रथम अल्प स्वल्प म्हणजे बाजारांतील भजीं वगैरे जिनसा तेथेंच खाणें व भांग ओढणें इत्यादि दुर्गुणांस तीं प्रवृत्त होतात. त्यावेळीं योग्य तजवीज न झाली तर पुढें मोठेपणीं दुराचारें करून वागतात. अशी वेळ मी शिकवीत असलेल्या मुलास जर प्राप्त झाली तर त्याच्या हाडास किंवा शिरांस इजा न होण्यासारखा मीं त्यास बारीक काठीनें किंवा दोरीनें अंगावर वळ फुटे पर्यंत मारीन. तेव्हां घरच्या बायका पुरुषांनीं येकदम मजवर तुटून न पडतां व पुरुषांनीं त्यास उपचारही न करितां गुरुजीनीं ठीक केलें ! पुन्हां असें केलें असतां खूप मारण्याविषयीं आम्हीं त्यास सांगूं असें म्हटलें पाहिजे. व बायकांनीं व चाकर माणसांनीं त्यास लोणी हळद लावून पुन्हां असें करूं नको नाहीं तर ते याहीपेक्षां अधिक मारतील असें म्हटलें पाहिजे. असा प्रसंग येतोच असें नाहीं. आलाच तर एक दोन वेळां येईल. या एक दोन वेळ खेरीज करून वाईट कामाविषयीं माझें बोलणें त्यास जसें जसें माराप्रमाणें वाटूं लागेल तसा तसा मीं त्यास मित्राप्रमाणें वागवीन व प्रतिदिवशीं डोळ्यांस, व शरीरास श्रम होण्यापूर्वी खेळावयास नेत जाईन."

* हें वाक्य **जन्मतः जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते.** या वचनाचा अनुवाद दिसतो.

"तपास, एक गायनास, दोन; अभ्यासास, तीन; व मार्गास, चार; असें वाक्य आहे त्यामानानें या मुलाबरोबर मी आणखी तीन मुलगे शिकवावयास आणीन."

"मला शेजारींच घर मिळावें. त्यास एक स्वयंपाकी व एक गडी पाहिजे. आदित्यवारीं मात्र मुलांस घरीं जावयास सुटी देईन म्हणजे त्यांस वाईट संगति लागणार नाहीं. नाहींतर परीट आणि कोळसेविक्याप्रमाणें होईल. आज अमक्याच्या घरीं जेवावयास जावयाचें आहे. उद्यां तमक्याचे घरीं जावयाचें आहे, परवां तमक्याच्या लग्नास जावयाचें आहे असें मी होउं देणार नाहीं. या अगर बहुत कारणांकरितां व मुलांचे कल्याणाकरितां नववे किंवा दहावे वर्षी लग्न न करितां मी सांगेन तेव्हां करावें, साध्या खाण्यानें त्यांची बुद्धि आणि शरीरप्रकृति हीं चांगली राहतील."

"मुलांस पुस्तकावरून शिकवावें त्याचे पेक्षां प्रत्यक्ष उदाहरणानें लक्षांत वागतें त्याकरितां आमचे येथें अधिक विद्वान जनांस जेवावयास बोलवून मुलांचे देखत वाईट आचरण करणाऱ्या येखाद्या गृहस्थाचा वाईट परिणाम कसा झाला किंवा चांगल्या मार्गानें जाणाऱ्याचा चांगला परिणाम कसा झाला तो, त्या विद्वानांकडून बोलवावयाचा. येकादे वेळीं मी शिकविलेल्या विषयांची बाहेरील उदाहरणें समजण्याकरितां महिना पंधरा दिवस पुढें शिकविणें चालविणार नाहीं. समयीं समजूत पाडण्याकरितां यंत्रे वगैरे दाखविण्यास ज्ञानप्रसारक सभेस नेईन. अगर गारुड्याचा तमाशा करवीन. मला इंग्रेजी येत नाहीं व संस्कृत येत नाहीं सबब तर्कसंग्रहासारखा विषय दुसऱ्याकडून शिकववीन. तसेंच बुकें शिकवून

+याला खालील सुभाषिचा आधार दिसतो.

। एकस्तपो द्विरध्यायी त्रिभिर्गीतं चतुः पथम् ।
। सप्तपञ्चकृषीणांच संग्रामोबहुभिर्जनैः ॥ १ ॥

शहाणपणा येत नाहीं याच करितां एकादे दिवस पुण्यास, एकादे दिवस रत्नागिरीस व एकादे दिवस हर्णईमुर्डीस नेईन." ( २५–११–६३ )

ही इतकी कडक शिस्त रावसाहेबांना पतकरून त्यांनीं दोन्हीं मुलें गंगाधरपंतांचें स्वाधीन केलीं. त्यांतील एक घोंडूबाबा हे फार हुशार निघाले. असें गुरुवर्य भांडारकरांच्या २५।८।१८६५ च्या इंग्रजी पत्रावरून दिसतें.

"तुमच्या पुतण्यांपैकीं एक धोंडु गंगाधर हा मंडलिकांचें बुद्धिमत्तेबद्दल जें नांव गाजत आहे तें राखील याबद्दल मला संशय नाहीं. त्याच्या काकाच्या मुद्रेवर स्पष्टपणें चिन्हित झालेलें बुद्धिसामर्थ्य व दृढ निश्चय याच्या नेत्रांवर व भ्रुकुटीवर अनुक्रमें दृश्यमान होत आहेत."

आपण मोठ्या मनुष्याचे आप्त हें ध्यानांत ठेवलें म्हणजे तुमच्या अभ्यासाच्या गोष्टी ध्यानांत राहल्या नाहींत तर चालतील त्यांवाचून परीक्षा उतरेल. असा या मुलांचा समज झाला असल्यास तो दूर करण्याकरतां रावसाहेबांनीं त्यांस 'परीक्षा म्हणजे काय? व तींत स्वतेजानें उतरण्यांत अधिक काय आहे' इ० प्रश्न विचारले होते. उत्तरें योग्य तींच मिळालीं होतीं.

गंगाधरपंतांनीं मुलांच्या गृहशिक्षणाकडेही लक्ष्य दिलें असें त्यांच्या पुढील पत्रावरून दिसतें.

"मुलांस कीर्तनास चांगला हरिदास आला तर नेतों. पोंहावयास थोडें शिकवीन. नाहीं तर ताप घेतील." ( १०।७।१८६४ )

शिष्यवर्ग बरोबर घेऊन समुद्रतीरीं परिभ्रमण करतांना गंगाधरपंत आपल्याला भेटतात असें प्रसिद्ध मि. क्राफर्ड यांनीं एका पत्रीं रावसाहेबांस कळविलें होतें.

पुढें १८६८ सालीं बढतीवर गंगाधरपंतांची अहमदनगर येथें बदली झाली. रावसाहेबांचे पुतण्ये त्यांच्या देखरेखीला लवकरच मुकले.

अशा रीतीनें नानांनीं उत्तम रीतीनें प्रपंचाचें काम केलें. व त्यांच्या आयुष्याचे दिवस बहुतेक सुखांत गेले. पण त्यांच्यावर एक एवढें दुःख एकदां कोसळलें कीं इतकीं वर्षे भोगिलेलें एकान्त सुख दुःखच वाटूं लागलें. व तें खरें आहे कारण केशवमिश्रांनीं नैयायिकतर्कभाषेंत म्हटलें आहे.

सुखमपि दुःखानुषंगाद् दुःखम् ।
मधुनि विषसंयुक्ते मधुनोऽपि विषपक्षनिक्षेपवत् ॥

दुःखाशीं मिश्र होतांच, सुख हें दुःखरूपी होतें. याला दृष्टांत मध हा विषाशीं संयुक्त होतांच सर्वच विषारी होतो.

नानांची सर्वांत धाकटी म्हणून आवडती मुलगी कृष्णाबाई हिला सुस्थळीं केळशीकर दाजीबा बिवलकर यांचे केशवराव या नांवाचे एका मुलास दिलें होतें. तिला माहेरीं आणावयास म्हणून १८६० च्या सप्टेंबर महिन्यांत माघारी पाठविले होते ते परत आले. कोणी कांहीं बोलेना परंतु परत आले एवढे शब्द कोणी उच्चारले ते कानीं पडतांच नाना सुलट झालें असें समजून म्हणाले "हें वाजवी झालें" व स्वस्थ बसले. परंतु लोक पुन्हां म्हणाले तसें असतें तर आम्हीं आनंद पावतों, हें ऐकून मात्र त्यांस मूर्च्छा आली व शुद्धीवर आल्यावर शोकग्रस्त झाले. येथें समाधानाला जागा नव्हती. पतिनिधनाचा दुर्धर प्रसंग लग्न झाल्यापासून ३–४ वर्षांचे आंतच मुलीवर आला. नानासाहेब यांच्या म्हणण्याप्रमाणें कृष्णाबाईचे पति आपल्या इतर भावांपासून विभक्त असतांहीं, आपण विभक्त नव्हतों, असा त्यांच्या स्वतांच्या समजाप्रमाणें, बहाणा करून चवथा हिस्सा भावजयीला जाईल म्हणून पुन्हां त्रिवर्गांतच फारकत करून कृष्णाबाईस थोडेसे दागिने भांडीकुंडी व अन्न वस्त्राबद्दल कांहीं सोय करून तिचे दीर मोकळे झाले. पुढें कृष्णाबाईला संभाळण्याचें दुःखावह कर्तव्य नानासाहेबांवर पडलें. हृदयाला पोळून काढणाऱ्या तिच्या

स्थितीचें वर्णन नानासाहेबांनीं २।९।६०रोजीं रावसाहेबांस पोंचलेल्या एका पत्रांत केलें आहे तें असें:-“ चिरंजीव कृष्णाबाई रत्नागिरीहून इथें आणली. शोकामु–.अन्न एकवार भिक्षेचें जाई न जाई,अशामुळें हैराण आहे. आमची समजूत पाहिजे तशी होते. परंतु मुलगीची होणेंस जागा नाहीं. आणि लहान ह्मणण्यास मात्र.परंतु सर्व समजतें.यामुळें श्रम फार आहेत.असो ईश्वर ठेवील तसें राहणें भाग. ” या एका दुःखाशिवाय नानांस संसारांत दुसरें दुःख परमेश्वरकृपेनें ठाऊक नव्हतें.

नानांचें चरित्र कित्ता घेण्याजोगें आहे. तें पूर्ण जुन्या चालीचे कर्मठ ब्राम्हण होते. ब्राम्हणाचीं नित्य कर्में जाणत होते. व आचारानें फारच पवित्र होते. कोणत्याही तऱ्हेचा अपवाद त्यांच्या विरुद्ध ऐकिवांत नाहीं. प्रपंचाची कामें करीत असतां परमार्थावरही ह्यांची दृष्टि असे. रोज फावल्यावेळीं भारत व रामायण घरीं असतां श्रवण करीत. १८५९ सालच्या फाल्गुन महिन्यांत शुद्ध २ रोजीं सहस्रभोजनास त्यांनीं प्रारंभ करून ६ रोजीं पुरें केलें. १८६० सालीं त्यांनीं कोट तुळशी वाहून श्री विष्णूची पुजा केली. तिच्या सांगतेकरतां रावसाहेब मुरुडास गेले होते. नाणीझच्या कज्जांतून १८५७ सालींच मुक्त झाले होतेच. सरकारांतून जप्त इनामाची बाकी ४००० सुमारें आली होती. ती घेऊन क्वचित् झालेलें ब्रम्हस्व देऊन टाकून मोकळे झाले. व द्वितीय चिरंजीव घरचा प्रपंच संभाळण्याजोगे आहेत हें जाणून कांहीं दिवस त्यांच्यावर सर्व विश्वसंबून कांहीं यात्रा करण्याचें नानांनीं मनांत आणिलें.

१८६१ च्या अक्टोबर महिन्यांत वडील चिरंजीव भाऊ, नातू धोंडोपंत ( दुसऱ्या चिरंजीवांचा मुलगा ) सर्वांत धाकटी कन्या कृष्णाबाई, पत्नी व आपण स्वतः अशा खाशा स्वाऱ्या ५ व एक खोत, बाई, व आणखी ब्राम्हण अशीं ३ व डोल्यांस गडी १९ व कान्हेरे यांचा प्रसिद्ध

घोडा,* घरची एक घोडी व दोन डोल्या अशा लवाजम्यासह मुरुडाहून स्वाऱ्या निघाल्या त्या पायमार्गी पुण्यास प्रथम गेल्या व तेथून पायमार्गें नाशिकची व त्रिंबकेश्वरची अशा यात्रा झाल्यावर पुण्यास परत येऊन पंढरपुरची व महाबळेश्वरची यात्रा करून परत गेल्या. या नंतर दोन तीन वर्षांनीं नानांनीं काशीयात्रा केली. त्यावेळची यात्रा हल्लींसारखी सुलभ नव्हती. पायांनीं यात्रा करण्यांत अधिक पुण्य आहे असा समज होता. बरोबर मंडळी भरपूर होती. नोकरांपैकीं पांढऱ्या व पार्वती शिगवणीण हीं दोन कुळवाडी ग्रामस्थांचीं माणसें यात्रेस नेलीं होतीं. त्यांची खुशाली दरपत्रीं त्यांच्या घरच्या माणसांस कळविण्याकरतां लिहिलेली असे. कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १७८६ ला मंडळीसह नाना निघाले. ते शके १७८७ च्या आषाढांत घरास सर्व मंडळीसह सुखरूप परत आले. हीं वर्षे १८६४।१८६५ इसवी सनाचीं येतात. यात्रा इतकी पुष्कळ वेळ घेणारी होती म्हणून नानांनीं रत्नागिरी येथें दोन्हीं नातवांस, एक पहिल्या मुलाचा मुलगा व दुसरा दुसऱ्याचा यांस, आधीं भेटावयास घरीं आणून परत रत्नागिरीस पोंचविलें व गेल्यावर पत्रीं मुद्दाम उपदेश केला कीं

---

* नानासाहेब कान्हेरे ( नाना मंडलिक यांच्या जांवयाचे बन्धू ) यानीं सिंगा घेतला. ४० रुपये दिले. चांगला आहे. तुर्की चालतो, आंगची. व चवढही थोडी चालतो, दोन दिवस ठाणावरून सुटला नाहीं, तर दमविल्याशिवाय चालत नाहीं व बुजतो; व उपायीं येतो. उपायीं म्हणजे दोन्हीं पायांवर उभा होऊन समयीं उलट पाडतो. व कधीं मानेवरून पाडतो. नानासाहेबही सदरहू प्रमाणें येक दोन वेळ खालीं आले. आघाडीस लोखंडी सांखळी पाहिजे, नाहीं तर सुताची दोरी चावून तोडतो. बहूत खोडकर नाहीं. नाल पुढच्या पायांस करूं देतो. मागील पायांचा विचार ! आमच्या घोडीपेक्षां तसू अर्ध तसू उंच दिसतो. याचें कारण जरा देशावरचा तजेला, व निगा चांगली राहिली. दोन बकऱ्या बळगून दूध पाजीत आहेत. म्हणून सरस उंच दिसतो. तीन चार वर्षांचा आहे. ( नानांचें पत्र )

“ *विद्या केलीत तर त्यास वांटणी घेणार कोणी नाहीं. तुमची तुमचे उपयोग हें मनांत आणून मेहनत करावी. ”

जागाजाग पत्रें लिहून रावसाहेबांनीं व्यवस्था करून ठेविली होती. पुण्यावरून अहमदनगरच्या रस्त्यानें यात्रा पुढें गेली. नागपूर येथें किबेसाहेब यांच्या पेढीवर, जबलपूर येथें करसेटजी कंपनीच्या दुकानावर पत्रें मागविलीं होतीं. वाटेंत रावसाहेबांचे मित्र लखमीदास खिमजी यांची भेट झाली. पागोटें, लुगडें, खण व बनाती वगैरे वस्त्रांचा आहेर करून यात्रेकरू मंडळीचा त्यांनीं सत्कार केला. प्रथम अयोध्या, मथुरा, काशी, गया, वृंदावन, गोकुळ पंचक्रोशी इ० सर्व तीर्थें करण्यांत आलीं. काशीस श्रीमंत बिवलकर यांच्या वाड्यांत वसति होती. डोल्या केल्यामुळें बायकांचे हाल झाले नाहींत. रावसाहेबांचे मनांतून वडिलांनीं ६०।६५ वर्षांचें वय झालें असतां यात्रेस जावें असें नव्हतें पण ते ऐकेनात. ते म्हणाले “ नित्य नवी जागा पहातां पहातां जी जागा नेमली असेल तेथें देह पडेल. मग श्वापदांनीं किंवा कृमींनीं किंवा भस्मानें जें होणें तें होईल. ” ९१० रुपये घरचे म्हणून नानांनीं घेतले व रावसाहेबांनीं ३९९८॥= दिले. अंदाज व खर्च बरोबर झाला. परत आल्यावर शेट लखमीदास यांस अग्रवाह पितांबर व त्यांच्या स्त्रीस लुगडें व चोळखण, कुंकवाचे पुडीसह दिले. त्याचप्रमाणें धाकलीबाईस. नानांस परत आल्यावर सर्वांबरोबर फार आनंद झाला. “ स्नानास गेलों असतां कृष्णाबाईकडून संभळी सांडली त्यांत उपकरणीं गेलीं; पण गंडकी शिळेची शालिग्राम मूर्ति पडली. सुमारें १०० वर्षें पुजा केलेली. मी खुद्द २५ वर्षें—ही फक्त चुटपुट लागण्याजोगी गोष्ट झाली. ”

---

* या बोलण्याचा रोंख पुढें ४३८ पृष्ठांत विभक्तपणाचा मजकूर येईल तो वाचला म्हणजे समजेल.

हिंदू कुटुंबाची स्वाभाविक अवस्था एकत्रपणा ही होय. विभक्तपणा ही कृत्रिम अवस्था होय. एकत्रपणाचें प्रस्थ नानांच्या वेळीं फार असे. व ती स्थिति मंडलिक यांच्या कुटुंबास चांगली मानवली होती. नाना स्वतः त्यांच्या मागें लागलेल्या कज्जाचीं कामें पहात होते. रत्नागिरीपासून मुंबईपर्यंत खेपा मारीत होते. त्यांचे दुसरे चिरंजीव रावजी हे शेती भातीच्या पसरलेल्या तेगाराकडे लक्ष देत असत. त्यांचे थोरले चिरंजीव भाऊ जरा निवृत्ति मार्गाचे होते, तरी नाना व रावजी कामानिमित्त बाहेरगांवीं गेल्यावर घरीं राहून गुरें ढोरें यांची निगा राखून चाकर माणसांवर देखरेख ठेऊन, पै पाव्हण्यांचा आदर सत्कार करून घर संभाळीत असत. रावसाहेब तर रोजगार करीत असत व संसारांत लग्नकार्यादि कामांस लागणारा खेळता पैसा लागे तो पुरवीत असत. व झालेलें कर्ज फेडण्यांत चांगली मदत करीत. "येक पगार शिल्लक ठेऊन बाकीची हुंडी करावी. जाजती शिल्लक ठेवणें ती व आणखी नवीन कांहीं खर्च करणें तर सध्यां ब्रम्हस्व आहे तों करूं नये. [ रावजी यांचें रावसाहेबांस भुजेस असतां पत्र ] मुंबईस बदली झाल्यावर काय खर्च येतो याची भाड्यापासून चौकशी होत असे. "भाडें पांच रुपये, सोय असल्यास फार नाहीं."

१८५७ सालअखेर पर्यंत नाणीझचें १२।१३ वर्षांचें जप्त झालेलें उत्पन्न सरकारांतून परत मिळेतों रावसाहेबांची, व पगारांतून खर्च होऊन राहिलेल्या शिलकेची ओळख नव्हती; कारण ते ती सर्व वडिलांचें कर्ज फेडण्यास पाठवीत असत. वडलांचें कर्ज फेडण्याची त्यांस सारखी आंच लागून राहिली होती.

"बिऱ्हाड केल्यामुळें ७० रुपये जास्त आगन्तुक खर्च झाले. हे रुपये वडिलांचें कर्ज फेडण्याकडे मला लावतां आले असते. मातोश्रींना लिहिलें कीं येत्या महिन्यांत ५०० रुपये देण्यास तयार आहेत व महिन्याभरानें आणखी ५०० देतां येतील." ( १५।२।१८५६ रो. )

" आपांस लिहिलें कीं कुंभवें व मासूं येथील धान्य विकून बाबा बिवलकर यांचे १००० रुपये देऊन टाकण्याची व्यवस्था करावी". पुढच्या महिन्यांत मी पांचशें रुपये पाटवून देतों. वडिलांचें कर्ज पैन्‌पै देऊन टाकल्याशिवाय मला चैन पडावयाचें नाहीं. मग मला मिळेल आहे तेवढ्यानें मीं अगदीं संतुष्ट राहीन. " ( १७।२।५६ रो. उ. )

नाणीझच्या मागचें शुक्ककाष्ठ १८५७ त सरलें त्यावर २ वर्षे चांगली स्थावरा स्थावर झाली. व कुटुंबाला वर डोकें उचलावयाला अवसर सांपडला. त्यांत रावसाहेबांना मुंबईची कायमची नोकरी मिळाली व पगार बराच झाला. तेव्हां त्यांतून आतां जर घरच्या संसारास भर पडली तर कुटुंबाची भरभराट चांगली होईल. असा विचार नानांच्या मनांत आला. व तो येणें अगदीं साहजिक होतें. दुसरी गोष्ट अशी झाली होती कीं, आपले चिरंजीवांस व्यापाराचा नाद लागला आहे, म्हणून त्यांच्या सर्व पगाराच्या शिलकीचा ओघ घराकडे वळलेला बरा. व्यापाराकडे वळल्यास एकाद्‌वेळेला वाटेंतच जिरून जाईल अशी नानांस फार भीति वाटत होती. म्हणून त्यांनीं एकदां स्पष्ट लिहिलें " आतां तुम्हांकडून अद्‌मासें सत्तावीस किंवा अठ्ठावीस महिन्याचा पगार तुमचा खर्च वजा जाऊन शिल्लक रहावा. तो वैशाखमासपैकीं हजार रुपयांची नोट घेतलीत; त्यांतहि कांहीं लिमये यांचें देणें होतेंच. व सोनें खरेदी, जास्त नाहीं, व शिवाय शिल्लक नाहीं असें तुम्हीं कळवितां. खर्च करतां त्याच्या हिशोबाची आम्हांस गरज आहे असें नाहीं. तुमचें म्हणणें वाजवी आहे; परंतु जें कळतें तें लिहितों. तुमचे नोटी व बुकें वगैरे कारखान्यांत फायदा फार व मुंबईचे व्यापारांत नफा फार याविशीं आज कोणी विचारील तर समाधान करतां येईल. आम्हीं कांहीं व्यापार केले नाहींत. तत्रापि लोकांत लौकिक कांहीं तरी पगाराचा पैसा घरीं येतो असा आहे. याजमुळें जरी पैसा शिल्लक नाहीं

असें ह्मणावें तरी लोक 'खरें नाहीं' असें ह्मणतात आणि तसें त्यांस वाटतें तेंहि खरें आणि समई आपल्या पाशीं नसल्यास दुसऱ्याचे घेऊन आखेर करावी लागते. आम्हीं कोठें तरी निर्वाह करूं परंतु सर्व मनुष्यांची निभावणी होणें नाहीं. रुपये व्यापारास नकोत, आमची अब्रू संभाळण्यास म्हणजे १०१५ रु. प्रसंगास कोणी मागतो त्यास देण्यास पाहिजेत. आमचें मनास येईल असें नाहीं. लिहिण्याचा स्वभाव म्हणून लिहितों."

(२।९।१८५९.)

"येथें लोकांचे घेतल्यास समई -।।।- मिती पडते ते तुम्हांकडून येते तर आठ आणे पडती. फार नफ्यावर नजर देऊन व्यापार, नोटी किंवा दुसरें करूं नये. त्यापासून फायदा नाहीं असी आमची समजूत खचित आहे. आणि जरी इकडे पैसा पाठविणें नसेल तरी हें यापुढें दुसऱ्यांस कळूं नये. यांतून बरें वाटेल तें घेऊन वाईट तेंच टाकावें." (१।१०।१८५९ चें पत्र.)

इतकें लिहून नानांचे म्हणणें रावसाहेबांस मान्य होईना. कुटुंबांतील मुलामुलींच्या लग्नकार्यास व कुटुंबांतील मुलांचा विद्याभ्यास वगैरे जो खर्च लागतो त्याला मदत रावसाहेब करीत परंतु शिलकींतून व्यापार करण्याची कल्पना रावसाहेबांनीं सोडली नाहीं व घरीं सर्व शिल्लक पाठविण्याची धरली नाहीं. या सुमारास नानांच्या वयास साठ वर्षें होऊन गेलीं होतीं. कालमानानें त्यांचे एक दोन हेतू होते. ते रावसाहेबांस त्यांनीं विदित केले. पहिला असा कीं त्यांस घरच्या बन्धूंस एक ठिकाण द्यावयाचें होतें तें त्रिवर्ग बन्धूमिळून पुढें बक्षिस करून दिलें व दुसरा असा कीं सर्वांत वडील चिरंजीव जे भाऊ त्यांची कांहीं सोय विभक्तपणाचे वेळीं करावी व मागाहून त्यांचा संभाळ करावा.

वडिलांच्या या सुचनेला रावसाहेबांनीं मान्यता लिहून कळविली,

कारण " आह्मीं दोघे (रावसाहेब स्वतः व त्यांचे बन्धू रावजी) सामर्थ्य-वान व ते ( रावसाहेबांचे जेष्ठ बन्धू भाऊ ) पंगु. अद्याप पावेतों मति अशी आहे कीं ज्याला ईश्वरानें मेहनत करण्याचें सामर्थ्य दिलें आहे त्याणें श्रम करावे व ज्यास कांहीं नाहीं त्याची सोय करावी. सध्या मेहनत करण्यास शक्ति आहे त्याचा फायदा घेऊं द्यावा " व पुढें वांटपाबद्दल कांहीं सुचना रावसाहेबांनीं केल्या. रावसाहेबांच्या मनांत चाकरी करावयाची ती वडिलांस कर्जमुक्त करण्यापर्यंतच होती. व अपमान सोसूनही ते चाकरी करीत राहिले होते. पुढें कर्ज फिटतांक्षणीं स्वतंत्र रीतीनें रहातां येईल इतकें द्रव्यार्जन करून मग धंद्यांतूनही निघावयाचें त्यांच्या मनांत होतें. हें वृत्त राजिनाम्याच्या प्रकरणांत आलेंच आहे. बरें घरीं संसारक्षेत्र मोठें असल्यामुळें त्याकडे लावून दिलेला द्रव्यौघ हवातेवढा जिरण्यासारखा होता. परंतु तिकडून तो न वळविल्यास रावसाहबांचे स्वतःचें असें कांहींच शिल्लक राहावयाचें नाहीं व स्वतंत्रपणें राहण्याची इच्छा दुरावत जाईल ह्मणून रावसाहेबांनीं विभक्त होण्याचें मनांत आणलें, तें नानांसारख्या फक्त एकत्र कुटुंबांतल्या सरसकट कल्याणाकडेच पाहणाऱ्या, मुलाच्या मोठ्या रोजगाराच्या कीर्तिवरच संतुष्ट न राहणाऱ्या पुरुषास आवडलें नाहीं तर नवल नाहीं; शिवाय मुलगे पित्याचे देखत विभक्त होणें हें अगदीं जनरूढीच्या विरुद्ध किंबहुना दुर्लौकिकाचें कारक असेंही तेव्हां मानलें जात असे—नव्हे अजून सुद्धां मानलें जातें. ह्मणून हें पत्र वाचून नानांचा फार गैर समज झाला. व त्यांस वाटलें कीं आतां फार दिवस कुटुंब एकत्र राहणें शक्य नाहीं व आमची अब्रू राहणें शक्य नाहीं इत्यादि काय त्यांना वाटलें असेल तें कोण जाणे ! त्यांनीं एक रागानें रावसाहेबांस ३।८।१८६२ रोजीं पत्र लिहिलें. " यापुढें पैशाचें नुकसान होऊं देऊं नये. सुखरूप व्हावें. त्यांत आमचा संतोष आहे. मनांत येक आणि बाहेर येक असे मनुष्य तुमचे प्रकृतीस नको व दुर्गुणी नको. हें जें होतें तें आतां प्रकृती व वयमानानें

कांहीं फिरलें असें दिसतें तेंहि बरेंच आहे. आतां माझ्या स्वभावाप्रमाणें आणखी कांहीं लिहिणें सुचतें परंतु फारच वाढतें. जसें समक्ष बोलण्यास नीट तसें लिहिण्यास प्रशस्त नाहीं. म्हणून बाकी लिहिण्यांत आलें. येरव्हीं दृष्टांत वगैरे थोडे थोडे सुचतात, परंतु वेद तेही अलीकडील ! मग स्मृति, इतिहास किंवा भर्तृहरींची नीति वगैरे केवळ अलीकडील ! तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर हे तो पाहिल्याच प्रमाणें ! मीं तो केवळ कालचा ! सबब कांहीं लिहिण्यास कळत नाहीं. आपल्या मनासारखें वांटप झाल्यावर काशीयात्रेस उभयतांस जाणें. निदान गांवात राहणें नाहींच. ”

नानांच्या सर्व आयुष्यांत अण्णांवरतीं ते इतके मनापासून खरे रागावलेले आढळण्यांत नाहीं. हें वडिलांचे पत्र वाचून मनाची काय स्थिति झाली ते रावसाहेबांनीं आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे. “ काल वडिलांचे पत्र आल्यापासून चित्त अगदीं आकुल झालें आहे. ३१।८।६२ ”

“ आज सकाळीं दुसरें पत्र आलें त्यांत कांहीं अंतस्थ हेतु मी बाळगून आहें असें समजून मला दोष दिला आहे. आमरणान्त परमेश्वर कोणत्याही अंतस्थ हेतूपासून मला अलिप्त ठेऊन माझें रक्षण करील असा माझा भरंवसा आहे. तरी अप्रामाणिकपणा माझ्या अंगीं आहे असा संशय वडिलांनीं घ्यावा हें पाहून मला खेद होत आहे. रडूं येऊं दिल्याशिवाय माझ्यानें राहावेना. माझी शेवटची इहलोकींची प्रेमग्रंथि अशा रीतीनें तुटूं पहात आहे. इकडे व्याधिरूपी कीटक माझ्या पत्नीचा देह हळू हळू कोरून खात आहेत. व तिकडे माझीं मातापितरें असला आरोप माझ्यावर आणीत आहेत. व तें पैशाकरतां ! व मी तर इतक्या दिवस तेवढाच अभिमान बाळगून होतों.” ( १।९।६२ रो. इं. उ. )

रावसाहेबांच्या हृदयांत पितृवात्सल्याची भरती आली. त्यांनीं एका मागून एक अशीं वडील व मातोश्री या उभयतांस दोन, मजकुरानें लहान पण अर्थानें थोर अशीं, पत्रें लिहिलीं. " वडिलांचे श्रावण वद्य तेराचें पत्र पावलें. त्यावरून जीं जीं मीं पत्रें लिहिलीं व जें बोलिलों त्यांतील हेतू माझ्या अदृष्टयोगानें निराळे होऊन तुम्हांस दुःख देण्यास मात्र मी निर्माण झालों असें झालें. वडिलांस योग्य दिसेल तसें व्हावें. त्यांत माझें कल्याण आहे. " इतक्यानें समाधान न होऊन दुसरें पत्र त्याच दिवशीं लिहिलें.

" वडिलाचें १३ चें आशिर्वाद पत्र आलें ते पावलें. पत्र वाचून चित्तास फार खेद झाला; कारण पुत्रापासून पित्यास सुख व्हावें असा साधारण धर्म असतो. मजकडून सुखाचे उलट होतें व झालें. मीं जें कांहीं समक्ष बोलिलों व वडिलांचे पत्रास जें उत्तर लिहिलें तेणेंकरून वडिलांस त्रास झाला असें वाटतें. संसारांतील गोष्टींत मजसारख्या तरुणास समजत नाहीं व त्यांविषयीं मी अगदीं अज्ञ आहें यामुळेंच मजकडून वडिलांचें मनास दुःख पोंचलें त्याविषयीं मी आपल्या अज्ञानत्वास धिःकारून लिहितों. विभक्तपणाचा प्रकार जो वडिलांचे मनांत आहे तसें करण्याचें कारण मला दिसत नाहीं कारण वडिलांच्या मागें आम्हां बंधूंचें व इतरही कुटुंबाचें नीट रीतीनें चालणें हें आपल्या पुण्याईवर आहे. आपले इच्छे-प्रमाणें चालेल यांत मला संशय वाटत नाहीं. इतकेंही असून काहीं कागदपत्रांचें करावें येवढेंच वडिलांचे मनांत असेल तर इच्छेप्रमाणें व्हावें वडिलांस मी विचार लिहावे असें नाहीं. जी आज्ञा होईल ती मान्य आहे. कितिही लांब व विस्तारयुक्त लिहिलें तरी मजविषयीं वडिलांस जो राग आला असेल त्याविषयीं क्षमा होऊन आशीर्वाद होई पर्यंत त्या लिहि-

ण्याचा अर्थ माझे दुर्दैवानें पूर्ण उलटच झाल्याप्रमाणें होईल."*३१।८।६२

आणखी कांहीं दिवसांनीं आलेला उमाळा मातोश्रीं जवळ दोन ओळी पत्र लिहून रावसाहेबांनीं काढून टाकिला. " या जगाच्या राहाटींत गोडी लागण्यास दोन हेतू होते. पैकीं येक रोगानें तुटल्यासारखा झाला आहे. व दुसरा तुटूं पहात आहे. ईश्वरेच्छा."

**नाना मुरूडास** असतां बहुतेक दरवर्षी **रावसाहेब** त्यांच्या दर्शनाला घरीं जाऊन येत. कधीं कोट तुळसी वाहिल्या त्यांची सांगता करावयाची आहे. कधीं सहस्र भोजन घालावयाचें आहे. त्या प्रसंगीं हजर असावें अशी वडिलांची आज्ञा होई. ती रावसाहेब अमान्य करीत नसत. बोटी चालू होण्यापूर्वीं घरीं पायरस्त्यानें जाऊन येत. तेव्हां आपल्या इनामी व खोती गांवांतून **रावसाहेब** जात असत.

१८६४ च्या या कोंकणच्या सफरींत **रावसाहेब** मांसू नांवाच्या आपल्या शेतीच्या गांवास गेले होते. व कुळांस त्यांच्या भेटीची आठवण राहावी म्हणून कुणबी, गवळी, म्हार, चांभार वगैरे एकूण एक गांवकऱ्यांस **राव-साहेबांनीं** जेवणावळ घालविली. तिची तयारी **नाना मंडलिक** यांनीं उत्तम ठेविली होती. ३०० पान जाग्यावर झालें. व ३०० पानाची अन्नसामुग्री जीं म्हातारीं कोतारीं येऊं शकलीं नाहींत त्यांस घरीं पोंच-विण्यांत आलीं. **रावसाहेबांचा** सन्मान गांवकऱ्यांनीं रात्रौ नाच तमाशे

---

* मातेच्या विरुद्ध तक्रारींनीं भरलेल्या **अन्तिपेतर** याच्या पत्रांची रास पाहून **शिकंदर** बादशहा म्हणाला " जा जाऊन **अन्तिपेतर** याला सांगा कीं माझ्या आईच्या अश्रूंचा एक थेंब या सर्व पत्रांतील मजकूर साफ पुसटून टाकण्यास समर्थ आहे." या वाक्यांत जशी मातृवत्सलता भरलेली आहे तशी पितृवत्सलता **रावसाहेबांच्या** वरील पत्रांत आहे. व यापुढें जो वेगळे होण्याचा प्रश्न दोघांनींही सोडला तो **नानांच्या** आणखी ८।९ वर्षांच्या हयातींत निघाला नाहीं. त्यांच्या पश्चात् दोन वर्षांनीं त्रिवर्ग बन्धू विभक्त झाले.

करून केला. समारंभ मध्यरात्रपर्यंत चालला होता. " कांहीं सोंगें आणविलीं होतीं. त्यांत एक पोलिस शिपायाचें व गांवच्या महाराचें अशीं दोन सोंगें प्रथम आलीं. त्यांचें सभाषण झालें. त्यांत पोलिसांचा लोकांवर होणाऱ्या जुलुमाचा विषय होता. नंतर एक तऱ्या, एक शिपाई ... साहेबांची " बुबू " अशीं तीन सोंगें आलीं. त्यांच्या भाषणांत ... तरीची स्थिति इ० विषय होते. या खालच्या लोकांच्या मनांत वरच्या लोकांच्या कृतिविषयीं काय शिजत आहे, तें दाखविणारी वाफ या सोंगांच्या बतावणीनें बाहेर सोडण्याचें उपयोगी काम होत आहे. " ( ७।५।१८६४ ची रो. )

अशारीतीनें संसारयात्रा आनंदानें करीत असतां नानांची साठी उलटून सत्तरी पुरी होत आली. तों १८६९ सालीं अक्टोबर महिन्यांत त्यांची प्रकृति बिघडली म्हणजे प्रथम उजवा हात वायूनें जड झाला, तेलानें बरा. पुन्हां, जड झाला, मग एक पाय जड झाला. पोटदुखी अधिक झाली. अन्नावर वासना नाहीं. अशक्तपणा आला आहे इ. रावजींच्या १७।१०।६९ च्या पत्रावरून दिसतें. यांतून ते बरे झाले होते. परंतु प्रकृति जी खालावली ती सुधारली नाहीं.

१८६९ सालीं रावसाहेब वडिलांस भेटून परत आले. १८७० सालीं नानांनीं आसुदास कुळस्वामीच्या पुढें सहस्र भोजन घातलें. पुन्हा १८७० चा पावसाळा उलटला पण कार्तिक अखेर पुन्हां आजारानें त्यांस गांठलें " मूळ पडसें, त्यांत ज्वर, अन्न नकोसें, त्यांत ओकारी, कफवात आहे- डोळ्यांवर ढांप, आंवढा गिळत नाहीं, विषम ज्वर आहे. औषध कोंकणांतील प्रसिद्ध वैद्य जगोबादादा देत होते. ते वयमान म्हणाले" अशीं पत्रें रावसाहेबांस स्नेह्यांची आलीं होतीं.

या दुखण्यांतून नाना उठले नाहींत त्यांस मार्गशीर्ष शु॥ ८ मीस ३ घटका रात्रीस देवाज्ञा झाली.

"कैलासवासी नाना मंडलिक यांणीं आम्हांस संगत दिली. ते परलोकास ... ते पुण्यश्लोक पुरुष. त्यांजला आपला काल समीप आल्याचें समजलें. ... विषयीं बोलणींहि झालीं." (२५।१२।७०चें जगन्नाथ वैद्य यांच पत्र.) ...वे लोक फार हळहळले "आमचा एक वयोवृद्ध लोकमान्य प्रामाणिक ...पदेष्टा नाहींसा झाला." ( वैद्य यांचें पत्र. )

" गणपतराव ७½ वाजतां सकाळीं बागुल यांचे पत्र घऊन आले व ह्मणाले तुमचे प्रिय व पूज्य वडील यांचा काल काळ झाला. काल बुधवारीं शु॥ ८ अष्टमीस प्रातःकाळीं सुमारें चार घटिका रात्रीस. एकून माझ्या प्रिय वडिलांस मी अंतरलों. एक बंद जगताशीं होता तो तुटला." [रो. उ]

हें वृत्त १ तारखेस कळलें. सहा तारखेला रावसाहेब मुरूडास गेले. हर्णैस बळवंतराव बागुल आले होते. घरीं जाऊन मातोश्रींस भेटले. त्या शोकग्रस्त झाल्या होत्या. त्यांच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. सातव्या दिवशीं मढीवर तिलांजली द्यावयास गेले. तेव्हां ह्मणाले "माझें केवढें नुकसान झालें तें आतां पूर्णपणें कळों आलें."

सर्व दिवस झाल्यावर १५ व्या दिवशीं परत मुंबईस येण्यास निघालें. वडिलांची क्रिया वर्षश्राद्धापर्यंत मोठ्या खर्चानें यथाशास्त्र यत्किंचित् उणें पडूं न देतां रावसाहेबांनीं केली. १८७१ सालीं वर्षश्राद्धाकरतां रावसाहेब घरीं जाऊन आले. नाना फार कर्मठ होते. पक्के संसारी होते. व उत्तम दरबारी होते. यांत कर्मठपणाचा सर्व गूण त्यांचे थोरले चिरंजीव भाऊ यांनी उचलला होता. व ते किति आत्मसंतुष्ट होतें तें त्यांच्या विषयींच्या पुढील प्रकरणावरून दिसून येईलच. संसारलालसा व कर्मठपणा हे दोन्हीं गूण त्यांचे दुसरे चिरंजीव रावजी यांनीं उचलले होते. रावजीनीं जर एवढा संसार उचलला नसता तर नानांना कज्जाचीं कामें व कोट तुळसी लाहान मोठ्या यात्रा, हीं साधलीं नसतीं. नानांचे तिन्हीं गूण रावसाहेबांनीं उचलले होते. व पाश्चात्य ज्ञानाची आंत भर पडल्यामुळें त्यांचा विलक्षण उत्कर्ष रावसाहेबांच्या अंगीं झाला होता.

## प्रकरण ३७ वें.

# भाऊ मंडलिक.

**गोणाई म्हणे नाम्या सांडीं देवपिसें ।**
**बळें घर कैसें । बुडवीसी ॥ १ ॥**

हे **रावसाहेबांचे** ज्येष्ठ बंधु होते. यांची वृत्ति अगदीं सात्विक होती. यांनीं निवृत्ति मार्गाचा अवलंब केला होता. एकत्र कुटुंबांत राहून संसाराचा भार वहाण्याच्या भानगडींत हे सहसा पडले नाहींत. सरकार दरबारीं काम करण्याची कला यांना साध्य नव्हती. परंतु गृहकृत्यां पैकीं आपणास येईल तें व होईल तें काम करून राहिला वेळ हे स्नानसंध्येंत खर्चे करीत. असें झटल्यापेक्षां स्नानसंध्या करून वेळ राहिला तर गृहकृत्यांत खर्च करीत. हीं गृहकृत्यें म्हणजे आगरवाडीची जोपासना करणें, गुरें ढोरें यांची व्यवस्था ठेवणें व आल्यागेल्याचें आदरातिथ्य करणें याच्या पलिकडे गेलीं नव्हतीं. स्नानसंध्येंत पुष्कळ वेळ घालविण्या-बद्दल दोन्हीं बंधू व वडील, यांस बोलत; म्हणून यांनीं एक पत्र प्रथम **रावसाहेबांस** लिहिलें कीं अण्णासाहेब! तुह्मीं, **रावजी** व वडील **नाना** असे एकंदर विचारेंकरून सांगावें. प्रातःकालीं स्नानसंध्या कोठपर्यंत करावी व जेऊन दोन प्रहारानंतर काय करावें व तें सविस्तर या यादीवर मांडून द्यावें. त्याप्रमाणें मीं आपला चालेन यांत अंतर होणार नाहीं. हें लिहिलें. सही. हस्ताक्षर खुद्द **भाऊ मंडलिक**. आषाढ शु॥ १ शके १७८२.

त्यांस ‘ सदुद्यम ’ करावा असें **रावसाहेबांनीं** एकदां लिहिलें. प्रवृत्तिपर मनुष्याचा सदुद्यम, निवृत्तिपर मनुष्यास कळण्या जोगा नसतो म्हणून त्यांनीं **रावसाहेबांस** परत पत्र लिहिलें तें:—“आपण ‘ सदुद्यम ’ करावा

हें लिहिलें, हें पद स्पष्टपणें लिहावें. आह्मीं शक्त्यनुसार उद्योग करून स्नानसंध्या करतों. व नमस्कार थोडे जसे होतील तसे व साधतील तसे घालितों." यांत त्यांस सर्वच 'सदुद्यम' वाटला. त्यावर रावसाहेबांनीं जबाब पाठविला त्याचा त्यांस थोडा राग येऊन परत जबाब शांतवृत्तीनें पण प्रणसर्णात रीतीनें भाऊंनीं लिहिला तो असा. "तुम्हीं पत्र पाठविल्याप्रमाणें मजकूर कळों आला. त्यांतील ग्रहण होईल तसें करीत आहोंच. भागवतांतील चौथे स्कंधांतील त्रिसाव्या अध्यायांतील श्लोक घेतला आहे तो असा.

। **गुणायनं शीलधनं कृतज्ञं** ।
॥ **वृद्धाश्रयं संवृणुते नु सपदः** ॥
। **प्रसीदतां ब्रह्मकुलं गवांच** ।
॥ **जनार्दनस्सानुचरश्चमह्यं** ॥ १ ॥

सदरहू अर्थ सद्गुणावह होतो—आहे, व दुसरेप्रकारावर होतो. जें वृद्ध सांगत आले त्या मार्गानें जावें, असा प्रकार होऊन श्रीभगवान—सर्वत्र आहे, भक्तीस्तव; असा होतो."

सारांश तुमचा 'सदुद्यमाचा' मार्ग निराळा व आमचा निराळा. त्यांत तुम्हांस सुख, तर आम्हांस यांत सुख. तुम्हांस उद्योगाचें वेड तर आम्हांस देवाचें वेड. असा निर्वाणीचा जबाब लिहून मोकळे झाले. **भाऊंचा** वेदान्त नुसती उगीच बडबड करीत बसण्यापुरता नव्हता, व्यवहार्य होता, हें वरील पत्रावरून उघड होत आहे. ह्मणून विद्वान बन्धूंस सुद्धां ते सडेतोड जबाब देऊं शकले.

**रावसाहेबांचें भाऊंवर** प्रेम अधिक असे. त्यांस आपण स्वदस्तुरचें पत्र लिहीत जावें असा **रावसाहेब** आग्रह धरीत त्यावेळेस एक कलमी व एक अर्थी मजकुराचें मोडींत पत्र लिहीत, तें असें. " सहस्रायु चिरंजीव सर्वदा विजयी भव राजश्री अण्णा **मंडलिक** यांसीं **रामचंद्र नारायण मंडलिक** यांचे अनेक आशीर्वाद. आपले प्रकृतीस जपावें. माझी प्रकृत जी

आहे तीच आहे. तुम्हांस श्रीकृपेनें यशोवृद्धि सर्व गोष्टीची असावी आणि आम्हीं पाहावें ही इच्छा, तशीच रावजीची. मिळोन कल्याण व्हावें. परमेश्वर इच्छेनें घडावें हीच श्रीजवळ प्रार्थना करीत आहें. नवल विशेष मजकूर तो वडिलांचे पत्रीं असेल. मी कांहीं पाहिला नाहीं. त्वरेनें लिहिले आहे. सबब सर्वदां कुशळ वृत्त लिहोन आनंदवीत असीलें पाहिजे कळावें हे आशीर्वाद." रवाना मिति

सही

इतकें लिहिण्या पलीकडे ते कसल्याही भानगडींत पडले नाहींत.

पित्याचें हृदय तें पित्याचेंच. नाना मंडलिक यांचें प्रेम भाऊंवर जास्त होतें. यांची काळजी नानांस फार वाटे. इतर मुलगे विभक्त होणार अशी कुणकुण त्यांचे कानांवर आली तेव्हां त्यांनीं रावसाहेबांस असें पत्र लिहिलें:—चिरं० भाऊ हा प्रपंच पहाण्याचे उपयोगी नाहीं. हें ज्ञानच कमी. त्यांस ऐकूं येत नाहीं. त्यामुळें बहुत अडचणी. हे प्रकार तुम्हांस माहीत आहेतच. तत्राप आमचा सांगावयाचा धर्म. मान्य करणें न करणें हें तुम्हांकडे. सौ. सूनबाई जाणत्या असोन नेणत्या; सबब त्यांचे कृतीवर नजर ठेऊन तुम्हीं उभयतां विभक्त जाहलां तर यांत विभाग यांचे स्वाधीन न करतां तुम्हीं संरक्षण करून यांचें पोषण करावें. पांडुरंग ( भाऊंचा मुलगा ) ही आज वय आहे यांत परीक्षा होत नाहीं. तत्राप जड बुद्धि मंद दिसते. पुढें तुमचे नजरेस येईल तसें करावें. ती मुकत्यारी तुमची आहे."

यांचे सर्व आयुष्य पुण्यमार्गानें गेलें व मागें दोन मुलगे व एक मुलगी ( लग्न झालेली ) अशी ठेऊन हे १८७७ सालीं कालवश झाले. ह्यांची सज्जन पणाविषयीं फार ख्याति होती.

## प्रकरण ३८ वें.

# रावजी मंडलिक.

**सुखा आंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सांडूं नये ।**
**कष्ट करितां त्रासूं नये । निरंतर ॥ १ ॥** (रामदास)

रावसाहेबांच्या मधल्या बन्धूंचें नांव गंगाधर असें होतें.त्यांस सारे रावजी म्हणत. त्यांस मराठी शिक्षण पूर्ण मिळालें होतें. परंतु घरच्या संसाराचा गाडा एकट्या नानांच्यानें झेंपण्यासारखा नव्हता म्हणून नानांनीं त्यांस प्रपंचांतच घातलें. हे फार कर्मशील व अनलस होते. संसारांत चांगलें लक्ष घालीत असत. नानांना कोडतांत कज्जे सांगतांना फिरावें लागे. तेव्हां रावजी घरीं असले म्हणजे त्यांस कांहीं काळजी वाटत नसे. आगरांतील सुपारी जमवून वाळवण्यापासून तों रिकामपण सांपडल्यास सुंभ विणण्यापर्यंत संसाराचें काम हे पहात असत. खोती व इनाम गावांचें काम पहाण्यास कारकून होतेच. त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचें काम हेच करीत. मामलेदार वगैरे सरकारी अधिकाऱ्यांचें बोलावणें आलें तर पागोटें चढवून हजर होण्यास रावजी सदैव तत्पर असत. नानांच्या मागें कोर्टाचीं कामें यांनींच संभाळलीं व यश संपादन करण्यास कोणताही प्रयत्न करणें शिल्लक ठेवीत नसत किंतीही कष्ट पडले तर त्रास मानीत नसत. घरच्या कामाचा पत्रव्यवहार हेच करीत असत. नानांचे संसारी गुण यांच्या अंगांत पूर्ण उतरले होते. वडिलांचें कर्मठपणाचें कुलव्रत यांनीं ६।७ वर्षें चालविलें. व १८७६ सालीं मागें मुलांमुलींचा मोठा परिवार ठेऊन स्वर्लोक गांठिला.

## प्रकरण ३९ वें.

# रावसाहेबांच्या मातोश्री.

**त्रयः पुरुषस्यातिगुरवो भवन्ति । पिता माता आचार्यश्च तेषां नित्यमेव शुश्रूषुणा भवितव्यम् । यत्ते ब्रूयुस्तत्कुर्यात् । तेषां प्रियमाचरेत् । न तैरननुज्ञातः किंचिदपि कुर्यात् ॥**

( विष्णुस्मृति )

रावसाहेबांच्या मातोश्रीचें नांव लक्ष्मीबाई यांस घरांतील लहान मंडळी थोरल्या आई ह्मणत. वडील निवर्तल्यावर नाना पुण्याहून सहकुटुंब कोंकणांत रहावयास आले. तेव्हांपासून लक्ष्मीबाईनीं तीन चार वेळां यात्रेच्या निमित्तानें व एक वेळा माहेरीं लग्न निघालें होतें त्याच्या निमित्तानें कांहीं दिवस मुरूड सोडलें होतें. ते दिवस वर्ज करून बाकी आयुष्याचे दिवस त्यांचे मुरूडासच गेले; कारण मोठ्या संसाराच्या जबाबदारीमुळें त्यांस मुरूड सोडणें सोईचें नव्हतें. संसाराची पूर्ण मालकीण या नात्यानें घरींच बसणें सुखाचें होतें. सुना आज्ञापर, नोकर सेवातत्पर व पति अनुकूल, यांनीं सुखकर झालेल्या साम्राज्यांतच त्या गर्क होत्या.

पराक्रमी मुलाच्या रोजगारावर कराचीमुक्कामीं मात्र एकदां गेल्या होत्या. त्यांत भगवान द्वारकाधीशाचें दर्शन व नारायण सरोवराचें स्नान हा एक हेतु होता. धार्मिक प्रवृत्ति रावसाहेबांच्या मातापितरांमध्यें विशेषें करून होती. मुलाच्या रोजगारावर जरी थोरल्या आई येत नसत तरी मुलाकडे त्यांचें लक्ष सदोदित असे. व उचित प्रसंगीं जी सूचना करावयाची ती नेमकी करीत असत. ठाणें येथील रावसाहेबांची नोकरी

फिरती होती. तेव्हां नोकर मंडळी बरीच लागे. रावसाहेबांनीं एका नोकरास कोकणांतून घरांत आणण्याची व्यवस्था त्याचा स्वभाव कसा ए...य आहे हें न जाणतां केली आहे व त्यासंबंधानें रावसाहेबांस सावध ...रण्याचें काम नानांनीं किंवा रावजींनीं कांहीं नात्यासंबंधानें केलें नाहीं असें जाणतांच थोरल्या आईनीं पत्र लिहून तो नोकर कां पसंत नाहीं तें रावसाहेबांस नेमकें कळविलें.

रावसाहेब लहान असतां एक वेळा जेवावयास बसले होते. जेवतां जेवतां पंक्तींमध्यें बसलेल्या मंडळींत त्यांच्या विद्याभ्यासाचा प्रश्न निघून हा मुलगा पुढें रोजगारी होणार असें भाकित एकानें करून ठेविलें. तें ऐकून “ तूं जर याप्रमाणें रोजगारी झालास तर मला काय देशील ?” असें मातोश्रींनीं विचारिलें. त्याला उत्तर पटकन “ दागिने ” म्हणून अण्णांनीं दिलें. तें अण्णांच्या ध्यानांत ते पुढें रावसाहेब झाले तरी होतें. व त्यांनीं शिल्लक पडण्याची वाट न पाहतां म्हणजे कर्ज काढून तें वचन पुरें केलें.

नाणीझच्या कज्जाचा शेवट रावसाहेबांच्या तर्फे सरकारमार्फत झाल्यावर कांहीं झालेल्या कर्जाचें निवारण झालें. मुलामुलींच्या कार्यांना लागणारी संसाराची भर रावसाहेब करीतच होते. अशा रीतीनें संसाराचा बेत उत्तम बसला होता. तेव्हां माहेरवाशिणींस त्यांस माघारपणाला अगर बाळंतपणाला आणून वगैरे त्यांची व्यवस्था नीट करण्यावरच मोठ्या आईचें समाधान झालें नाहीं. त्यांची सांपत्तिक स्थितिही सुधारण्याचा प्रयत्न रावसाहेबांना सांगून त्यांनीं केला. कारण रावसाहेबांच्या जवळ पैसे किती शिल्लक राहतात याची बरोबर कल्पना थोरल्या आईस नव्हती. या प्रसंगाचें वर्णन रावसाहेबांनीं आपल्या रोजनिशींत करून ठेविलें आहे.

“ माझ्या मातोश्रीनीं बोलतां बोलतां माझी बहीण सौ. माई दामली इच्या नवऱ्यास कांहीं रक्कम—बरीच मोठी—कर्जाऊ देतोस का ह्मणून

विचारलें. पुढें त्या म्हणाल्या आतां तूं लाखोपति झाला आहेस. व्यर्थ पडून राहिलेल्या शिलकींतून कांहीं देऊन तिला मदत करावीस."

मीः—"आई! माझे जवळ शिलक नाहीं. जें कांहीं उरतें त्यानें च मी माझे भाऊ, बहिणी व दुसरे आप्त व मित्र यांस मदत करतों व तशीच पुढें करण्याची आशा करतों. परंतु याकरतां माझी कर्ज काढण्याची तयारी नाहीं."

आईः—"अरे अण्णा! तूं श्रीमंत आहेस. तूं आतां मुंबईस लिहिशील तर हवा तेवढा पैसा आणशील! कांहीं जड जड हुंड्या पाठव तरी! व सौ. माईच्या नवऱ्याला मदत कर तरी!"

मीः—"मला या गोष्टीचा विचार केला पाहिजे. आतांच मदत करावयाचें मनांत आणलें तर कर्ज काढावें लागेल." आपल्या शब्दावर मातोश्रींचा भरंवसा पटला नाहीं म्हणून रावसाहेबांना जरा खेद वाटला.

तथापि हा मातोश्रींचा शब्द रावसाहेबांनीं खालीं पडूं दिला नाहीं. सौ. माईस एक घरवाडी ठिकाण विकत घेऊन बक्षीस करून दिलें.

नानांच्या पश्चात् सुद्धां रावसाहेबांनीं मातोश्रीचें कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. त्यांच्या इच्छेवरून पुराण सांगण्यास एक पुराणिक ठेवला होता. त्यास २०० शें रुपये वर्षासन देत असत. मातोश्रींची काशीयात्रा नानांच्या हयातींत झाली होती. काशीयात्रेपूर्वींच त्या नाशिकची यात्रा करून आल्या होत्या. रामेश्वरची यात्रा राहिली होती ती करण्याची इच्छा दर्शवितांच रावसाहेबांनीं मुंबईहून सेकंडक्लास डबा राखून ठेवून बरोबर अवश्य नोकर माणसें व एक चांगलें इंग्रजी जाणणारा कारकून ( नागोपंत दिवाण ) देऊन व जागोजाग मद्रास, त्रिचनापल्ली, व मदुरा वगैरे ठिकाणच्या मित्रांस पत्रें देऊन व तारा करून स्टेशनापासून बिऱ्हाडापर्यंत सर्व उतरावयाची सोय उत्तम करवून वार्धक्योत्पन्न अशक्तपणा असतांही फुलांत घालून ने आण केल्याप्रमाणें १८७२ सालीं त्यांची यात्रा तडीस

नेली. बरोबर गंगेची कावड होती. लागतील तसे रुपये वाटोवाट पोंचवीत असत. पण वेळ पडल्यास एकदम रुपयांची गरज लागल्यास बरोबर एक रुप्याचें ताट व कांहीं सोन्याच्या पुतळ्या देऊन ठेवल्या होत्या, म्हणजे त्यांची विक्री करून गरज भागवितां यावी.

यानंतर रावसाहेबांच्या मातोश्री घरींच रहात असत. घरीं मंडळी दुसरी होती. तथापि त्यांस कांहीं कमी पडूं नये म्हणून आपला एक कारकून घरीं ठेविला होता. व त्यांची व्यवस्था जी रावसाहेबांनीं ठरवून दिली होती तींत कांहीं ढवळाढवळ कोणाला करूं देत नसत. "तीर्थरूप मातोश्रींचे कामांत मी हयात आहे तों कोणास पडण्याचें कारण नाहीं. दुसऱ्या जवळ मग तो ब्रह्मदेव कां असेना—माझ्या आईला तोंड वेंगाडण्यास करूं नये. ( १८।७।८१ चें वि. जोगळेकर यांस पत्र ).

एकंदर व्यवस्था उत्तम होती. रावसाहेबांची धाकटी बहीण कृष्णाबाई यांच्या सेवेंत सज्ज होती. दुसऱ्या सुना घरीं होत्या. नोकरमाणसें होतीं; तरी यांस पतिनिधनदुःखाशिवाय दोन सुवृत्त पुत्रांच्या निधनानें फार शोक झाला होता. त्यामुळें प्रकृतिमान दिवसानुदिवस अस्वस्थ होत होत गेलें. १८८५ सालीं प्रकृति खालावल्यामुळें रावसाहेबांनीं तर्टेशास्त्री यांस नाशकाहून मुद्दाम मुरूडास पाठवून दिलें. गूण वाटल्यावर ते परत आले. पण १८८५ च्या मे महिन्यांत एक दोन ज्वर आल्याचें निमित्त झालें व सकाळीं स्नान करून तुळसीची पूजा करीत असतां 'कृष्ण कृष्ण' असा मुखानें उच्चार करून आईनीं तुळसीपुढें डोकें टेकलें तें टेकलें. पुण्यवन्ताचा आर्यसंस्कृतीप्रमाणें अन्य तऱ्हेनें शेवट होणें शक्य नाहीं.

## प्रकरण ४० वें.

# रावसाहेबांच्या पत्नीचा अंगरोग.

। पूर्वदत्तेषु या विद्या । पूर्वदत्तेषु यद्धनम् ।
॥ पूर्वदत्तेषु या भार्या । अग्रे धांवति धावति ॥ १ ॥

( सुभाषित. )

उत्तम कुळांत जन्म, मातापितरांचें दीर्घकाल सुख, बंधुभगिनींचा लाभ, प्रचंड विद्या, उत्तम शरीरसंपत्ति, स्पृहणीय धनधान्यप्राप्ति व सर्वांहून मोठी कीर्ति, मिळून जीं जीं सुखाचीं साधनें आहेत तीं तीं सर्व रावसाहेबांस प्राप्त होतीं. त्यांची पत्नी तर रावसाहेबांच्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे गुणांनीं इतर स्त्रियांपेक्षां फारच श्रेष्ठ होती. तिचें वर्तन त्यांना पाहिजे तसें होतें. पण एवढ्या गोष्टींत एक न्यून होतें. त्यांची स्त्री निरोगी नव्हती तेवढ्यानें रावसाहेबांच्या सौख्यदुग्धांत विरजण पडलें होतें.

अन्नपूर्णाबाईंच्या व्याधींचें लिहिलें तर एक चरित्रच होईल व तें त्यांच्या खुद्द चरित्रापेक्षां थोडेंसें लहान होईल एवढेंच. त्यांना वयाच्या सत्राव्या वर्षापासून ज्या एक एक व्याधी जडूं लागल्या त्या सर्वांचा त्यांच्या वयाच्या ४५ व्या वर्षी त्यांच्या बरोबरच शेवट झाला. १८५२ मध्यें सुमारें त्यांच्या वयाला १७ वर्षें पुरीं झाल्यावर त्यांस प्रथम आमवायूची पीडा झाली. मोठ्या तत्त्वज्ञानी पुरुषालाही रडविणारी दंतपीडा कांहीं उष्ण उपायांनीं मध्येंच उद्भवली. दांतांतून रक्तस्राव होऊं लागला. ही पीडा आकस्मिक कारणांबरोबर उद्भवलेली होती. ती, तीं कारणें नष्ट झाल्यावर नष्ट झाली. पुढें १८५४ मध्यें कंबरेमध्यें डाव्या बाजूला विद्रधि म्हणून रोग झाला. त्या योगानें येणारी सूज पाठीच्या कण्यापर्यंत

योंचत असे. त्याकरतां जळवा लावून रक्त काढविलें व अग्नितप्त लोहयाची शलाका आंत रोंवून दूषित रक्त वाहून जाण्यास मार्ग करून ठ्यांत आला त्यायोगानें झालेली जखम महिनाभर वाहून बरी झाली. परंतु कधीं कधीं कंबरेमध्यें डावे बाजूस कळ उत्पन्न होऊं लागली. या वेळेपासून त्यांना सरळपणें सारखीं पाउलें टाकून चालतां येत नाहींसें झालें. चालतांना जरा पाय काढल्यासारखें दिसे. लोक असें चालणें पाहून हंसतील या भीतीनें नित्याची गांवांतील हालचाल त्यांनीं कमी केली. बारीक ताप अंगांत मधून मधून असे. त्या तापावर व पायांतील वायूवर कषाय, चूर्णें व तैलें यांचे उपचार कोंकणांत, सासरीं व माहेरीं असतांना चालू असत. रोजगारावर यांचें जाणें लवकर घडलें नाहीं. कच्छ, भूज व सिंधमधील हवा यांस मानेल न मानेल अशी सर्वांस भीति वाटत होती. १८५५ सालीं रोजगारावर कराचीस गेल्यावर तेथें कांहीं स्त्रियांसच होणारा रोग उमगून आला व त्यावर उपाय केल्यानें तो नाहींसा झाला इतकेंच नाहीं पण आणखी दोन वर्षें ह्मणजे १८५७ पर्यंत सौ. अन्नपूर्णाबाईच्या प्रकृतींत रोगाचें कांहीं शेष राहिलें नाहीं. हें पाहून सर्वत्रांस फार आनंद झाला. तो फार दिवस टिकला नाहीं. १८५८ साल उजाडतांच १५ दिवस राहून राहून ताप येऊं लागला. त्यापासून पुढें सर्व कंबरेला कळा लागूं लागल्या त्या वर्षभर सुरू होत्या. पुन्हां औषधी उपचार केल्यानें त्याही बहुतेक बंद झाल्या मात्र मधून मधून डाव्या बाजूंत कळ निघत असे. याप्रमाणें १८६०पर्यंत बरेंचसें नीट होतें ह्मणायचें; परंतु या सालापासून गर्भाशयामध्यें शूळ उत्पन्न होऊं लागला. तो प्रथम कधीं महिन्यानें एकदां, कधीं चार महिन्यांनीं एकदां, असा उत्पन्न होई व घटका दोन घटकांनीं राही.

१८६३ सालीं त्यांस पुण्यास एका वैद्याचें औषध देण्याकरतां ठेविलें

होतें. वैद्यबुवांनीं प्रकृति पाहून वायुगोळा बरा होईल असें सांगवत नाहीं असें मत दिलें. या वैद्यानें कांहीं क्षारयुक्त व रेचक औषधें दिलीं त्या योगानें गर्भाशयाला सूज आली. त्यावर त्यांनीं पोटॅश आयोडाईड, आयर्न आयोडाईड व इंद्रजव पोटांत दिल्यानें ५ महिन्यांनीं गुण आला, तथापि शिरागत पीडेमुळें तांठ उभें राहतां येत नाहींसें झालें. व चालतां, उठतां व बसतां पोंक काढावें लागे. शिरांच्या वायूवर डॉ. भाऊंनीं जळवा लाविल्या. गूण आला नाहीं. पुढें १८६४, १८६५ व १८६६ सालीं महाबळेश्वरास हवेकरतां चार चार महिने त्यांसह रावसाहेब स्वतः जाऊन रहात. वेळ पडेल तितक्याच पुरता औषधोपचार करीत असत.

१८६३ च्या पुढें गर्भाशयांत कळा यावयाच्या बंद झाल्या. पण त्याच्यापुढें अन्नाशयांत कळा येऊं लागल्या. कोणी म्हणेल कीं कळा ज्या गर्भाशयांत वसत होत्या त्यांनीं स्थलांतर केलें.

याच्या नंतर १८६८ सालीं कांहीं सोमलाचें एक औषध एका वैद्यानें दिलें त्यानें वान्त्या झाल्या, डोळ्यांना आग सुटली, पोटांत कळा येऊं लागल्या. शास्त्रोक्त उतारा दिल्यावर वरील विषाचीं चिन्हें नाहींशीं झालीं. याच वेळेला डाव्या गुडघ्याचे सांधे तांठ झाले व स्नायुक्षोभ होऊं लागला. नंतर महाबळेश्वरास जातांक्षणींच गुडघ्याच्या तांठपणा शिवाय सर्व चिन्हें नाहींशीं झालीं. या वेळेस डॉ. भाऊ यांनीं ९।४।६८ च्या पत्रांत मत दिलें कीं यांस क्लोरोफार्म देऊन गुंगी आल्यावर पाय हळू हळू सरळ केले पाहिजेत असे न केल्यास पुढें पाय बरे होण्याची आशा गेली असें समजा.

पुढें १८६९ मध्यें मूळव्याधीची पीडा कमी होती ती जडली. रक्तस्राव होऊं लागला. परंतु ही पीडा लवकरच सरली तथापि उजवा गुडघा आजपर्यंत जो नीट होता तोही डाव्या गुडघ्यासारखा

धरला व दोहों गुडघ्यांत कळा उठूं लागल्या. कंबरेपासून गुडघ्यांपर्यंत एक कळांचा संचार सुरू झाला. १८७० सालच्या जुलैपासून यांच्या प्रकृतीस साधारणपणें अशक्तता येऊं लागली. थोडा थोडा उफाचा विकार जडला व हाताची कोंपरेंही धरलीं व सुजून दुखूं लागलीं. पुढें पुढें गुडघ्यांचा भाग इतका तांठ झाला कीं गुडघ्यांपासून दोनचार बोटांच्या लांबीहून पाय अधिक लांब सरळपणें ताणतां येत नाहींसे झाले. व तेवढेही ताणतांना कष्ट पडूं लागले. म्हणजे मूळ दुखण्याचा उद्भव झाल्यापासून या १७–१८ वर्षांच्या अखेर व्याधींची बाकी शरीरांत किति राहिली होती तर दोन्हीं गुडघ्यांच्या सांध्यांचा तांठपणा, अन्नाशयामध्यें शूळ, त्यानें व पायांतील कळांनीं नित्य निद्राभंग, व हातापायांची आग, एवढ्या प्रकृतीच्या मानानें क्षुधा बेताची असे. कधीं मुंबईत राहणाऱ्यांस होणारा अवरोध होत असे.

या स्थितीचें वर्णन १–४–७४ च्या पत्रीं रावसाहेबांनीं जेकब साहेबांस लिहून पाठविलें होतें तें असें:—" माझ्या स्त्रीची स्थिति टॅन्टालेस सारखी झाली आहे. नवरसपरिपूर्ण पक्वान्नांनीं भरलेलें ताट त्याच्याजवळ येऊन मुखस्पर्श झाला नाहीं तोंच अदृष्ट व्हावें अशासारखी जी तिची स्थिति झाली आहे ती काळजाला घरें पाडणारी आहे. "

तरीही रावसाहेबांची यांच्या दुखण्याविषयीं अगदीं निराशा झाली नव्हती. त्यांनीं एका प्रसिद्ध विद्वान ज्योतिषाकडे आपली कुंडली पाठवून त्यास कांहीं प्रश्न विचारिले होते त्यांत दोन तीन पुढें दिल्याप्रमाणें होते. १, " स्त्रीस आरोग्य होईल किंवा नाहीं ? २, संततियोग आहे किंवा नाहीं ? ३, असल्यास किति ? " म्हणून " सुचतील ते व मिळतील ते उपाय त्यांनीं केले तरी त्यांचे पाय वायूनें धरलेले होते ते होतेच. त्यांना चालतां येऊं लागलें नाहीं. या एका व्यवधानामुळें पुढची चाल बंद झाली " असें रावसाहेबांस वाटलें. परंतु त्यांनीं आपल्या पत्नीची सेवा

एका मोठ्या तत्त्वावर चालविली होती. " माझी पत्नी ज्या व्याधिग्रस्त स्थितींत आहे त्या स्थितींत मी स्वतां असतों तर व्याधिशमनार्थ, व्याधिवेदनापहारार्थ तिनें माझी जशी सुश्रूषा करावी असें मला वाटलें असतें तशी सुश्रूषा मी तिची केली पाहिजे असें मला वाटतें. " ( जनरल जेकब यांस पत्र. )

जरी रावसाहेबांच्या मनाची स्थिति अशी होती तरी रावसाहेबांच्या घरच्या मंडळीची दृष्टि निराळी होती. वर निर्दिष्ट केलेल्या ज्या उच्च तत्त्वाकरतां हिंदुधर्माची आडकाठी नसतां दुसरें लग्न रावसाहेबांनीं केलें नाहीं त्या तत्त्वाचें पालन जुन्या काळच्या लोकांस अवश्य कर्तव्यांतलें वाटलें नाहीं. संततिसाठीं रावसाहेबांनीं द्वितीय संबंध करावा असें त्यांचें मत होतें व तें अगदीं दुनियेच्या निराळें होतें असें नाहीं. " नानांनीं एक दिवस मजला एक कुंडली दाखविली ती पाहून ज्याची कुंडली ती आहे त्यास बायकोचें सुख नसावें असें मी सांगितलें. नंतर ते बोलले कीं ही कुंडली अण्णांची आहे. पुढें नानांनीं प्रश्न केला कीं दुसरें लग्न करावें कीं काय ? ही आश्चर्यकारक गोष्ट नाना सांगत होते. आश्चर्यकारक म्हणजे असें कीं ज्यास बायकोचें सुख नाहीं त्यास दुसरी बायको करून तिजपासून सुख कसें होईल " इत्यादि हकीकत ज्योतिषी बुवांनीं रावसाहेबांच्या कानावर घातली. रावसाहेबांस फार वाईट वाटलें.

" माझ्या घरची चौकशी करण्याबद्दल मीं तुमचा फार आभारी आहें. माझी स्त्री अगदीं परस्वाधीन झाली आहे. व चरित्रभाग संपेतों तशीच राहणार. मला शक्य तेवढे उपाय करीत आहें. व शेवटपर्यंत करीत राहीन. मीं पुढें लिहितों हें वाचून तिच्या बद्दल तुम्हांला वाईट-वाटेल. माझ्या आप्तांना दया वाटली नाहीं तर नाहींच पण त्यांनीं मी दुसरें लग्न करावें म्हणून आपली पराकाष्ठा करून पाहिली. परंतु तें करणें अशक्य आहे असें सांगितल्यावरून ते आम्हांला दोघांना सोडून गेले.

आयाबद्दल मी उपकारच मानतों. [ १५-१२-७३ चें जनरल जेकब पाऊस पत्र. ]

विषयसौख्याकरतां जर रावसाहेबांनीं एकपत्नीत्वाचा त्याग केला नाहीं तर केवळ संततिसौख्याकरतां आपलें एकपत्नीव्रत रावसाहेब सोडतील असें शक्य नव्हतें. वडिलांच्या पडत्या फळाच्या आज्ञेस रावसाहेबांनीं मान दिला नाहीं हें त्यांच्या अलौकिक धैर्यास उचितच आहे. परमेश्वराची योजना कांहीं निराळीच असते त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत असतात. त्यांतल्या महत्त्वाच्या तेवढ्याच ध्यानांत रहातात.

अन्नपूर्णाबाईंची एक कृष्णाबाई म्हणून धाकटी बहीण होती. ती मुरूडचे पांडोबा दातार यांस दिलेली होती.ती धाकटी म्हणून तिच्यावर अन्नपूर्णाबाईंचें फार प्रेम होते. तिचें राहणें कोकणांतच असे. १८७० सालीं तिला एक सुंदर पुत्ररत्न झालें. सर्वत्रांस आनंद झाला. मुलाचें नांव धोंडूबाबा असें ठेविलें होतें. वरील पुत्रलाभाचा आनंद फार दिवस टिकला नाहीं. कारण कृष्णाबाईस बाळंतपणांतच ज्वर येऊं लागला. त्यावेळेस मुंबईची डाक्टरगिरीविषयीं ख्याति झाली होती. त्यांतून डॉ. भाऊंची विशेषच. डॉ. भाऊ हे रावसाहेबांचे परम स्नेही. आपलें सर्व कौशल्य खर्च करून कृष्णाबाईस आरोग्य करून देतील असें सौ. अन्नपूर्णाबाईस वाटून कृष्णाबाईस मुलासह मुंबईस आणविलें. रावसाहेबांनीं शक्य ते उपाय केले. " पण ते व्यर्थ गेले व सौ० कृष्णाबाई दातार २६-३-१८७१ रोजीं सकाळीं ५-३० वाजतां निवर्तल्या. 'ईश्वरेच्छा बलीयसी' गेल्या दोन महिने पर्यंत यांच्या करतां श्रम केले तेवढे दुसऱ्या कोणाकरतां केलेले आठवत नाहीं. मला माझ्या वकीलीच्या धंद्यांत सुद्धां थोडी झीज सोसावी लागली. देवीची उपमा सजण्याइतकी ती सुशील होती. तिच्या पतीस व आम्हां सगळ्यांस हें दुःख सहन करण्यास परमेश्वर सामर्थ्य देवो. मी अगदीं शोकाभिभूत झालों आहें. कालांतरानें विसर पडेल. "

" पांडोबा दातार आज येथें आले. बिचारा काय करील. फार सुंदर, कर्तव्यदक्ष व सर्वप्रकारें उत्तम अशा पत्नीचा विरह प्राप्त झाला." इतके रावसाहेबांनीं रोजनिशींत केलेलें वर्णन वाचलें ह्मणजे पांडोबा दातार यांचे किती नुकसान झालें, मंडलिकीणबाईस किती दुःख झालें हें सांगावयास नको. तूर्त तरी मुलाचें संगोपन मंडलिकीणबाईवर पडलें. नव्हे मुलाला त्याच्या आईनें मंडलिकीणबाईस निरविला होता. " तिला [ माझ्या पत्नीला ) एक धाकटी बहीण होती. ती गेल्या जानेवारींत औषधोपाय होतील, अशा आशेनें आमच्याकडे आली. सात महिन्यांच्या एका सुन्दर मुलाचें संगोपन करण्याचें काम आधींच दुखणाईत असलेल्या मावशीवर [ माझ्या पत्नीवर ] सोंपवून क्षयाच्या विकारानें ती कालवश झाली." ( जेकब साहेबांस पत्र )

पुढें रावसाहेब पत्नीसह व लहानग्या धोंडूसह आसुदास गेले. तेथें पांडोबा दातार आले. याच ठिकाणीं बंगला बांधून तेथील हवा उत्तम म्हणून कृष्णाबाईस औषध देण्यास रावसाहेब ठेवणार होते. " मनुष्याचा अभिमान, सर्व वृथा म्हणून गणलेल्या गोष्टींहून, वृथा आहे. ती आतां कायमची गेली. पुन्हां परत येणार नाहीं. अशा स्थितींत पांडोबानें येऊन रावसाहेबांच्या कानावर आपलें दुसरें लग्न करण्याचा बेत कळविला व सहानुभूतिशून्य अशा माझ्या घरच्या मनुष्याच्या हातांत अर्भकाला देऊं नका अशी विनंति रावसाहेबांच्या मंडळीस केली " नंतर मंडलिकीणबाई मुलास घेऊन माहेरीं जाऊन राहिल्या. तिथें एक दाई मुलास दूध पाजावयास मिळाली होती. तिचें दूध त्यास मानवलें नाहीं. अंगावर खरूज कांटा उठला इत्यादि कारणांवरून मंडलिकीणबाईनीं मुलगा आपले जवळच ठेवण्याचें ठरविलें. व त्यांना तो दूरही इतक्यांत करवला नसता. रावसाहेब महाबळेश्वरास गेले होते ते फिरून पोलादपुराहून कोकणांत आले व सर्व मंडळीसह मुंबईस निघून आले. मुलगा सुंदर व गुणी

असल्यामुळें त्यानें रावसाहेबांचें व त्यांच्या पत्नीचें मन चांगलेंच वेधून घेतलें. व रावसाहेब या मुलाची फारच काळजी घेऊं लागले. ती इतकी कीं एकदां सरकारवाड्यांत गव्हर्नरसाहेबांकडे दर्शनमेळा व्हावयाचा होता. चि. धोंडूला फार खोकला झाला होता. रावसाहेब त्याला टाकून गेले नाहींत.

याच मुलाला पुढें आंकडी नांवाच्या बालरोगाची बाधा झाली होती ती रावसाहेबांनीं फार काळजीनें औषधोपचार केले तेव्हां नीट बरी झाली.* याच्या योगानें तर या मुलावर सर्वांची माया जडली. व मुलाला रावसाहेबांचा व मंडलिकीणबाईचा अत्यन्त लळा लागला. हें एक परमेश्वरी सूत्रच होतें.

आपल्या आवडत्या बहिणीच्या विरहदुःखानें सौ. अन्नपूर्णाबाईची प्रकृति पुढें सुधारत गेली नाहीं. डॉ. भाऊ दाजी, नारायण दाजी, अनंत चंद्रोबा, आत्माराम पांडुरंग; डॉ. भिकाजी चोबे, सातारकर गोरे वैद्य, तात्याशास्त्री थोरात, पनवेलकर इत्यादींचे उपाय चालले होते.

वनस्पतींचीं पाळें मुळें, फळें यांचीं ओझींच्या ओझीं काढ्याकरतां व तैलाकरतां आंगण्यांत येऊन पडत असत.

१८७१ सालीं ह्यूम म्हणून एक मेस्मेरिझमचे प्रयोग करणारे आले होते. त्यांनीं डॉ. भिकाजी व डा. नारायण दाजी यांच्या समक्ष आपल्या मानासिक शक्तीचा प्रयोग करून पाहिला. परंतु रावसाहेबांची पत्नी घाबरून गेल्यामुळें कांहीं उपयोग झाला नाहीं.

---

* मुंबई येथील नामांकित वैद्य, जेठाशंकर यांनीं बनवलेल्या औषधानें या रोगावर गुण आला. तें औषध त्यांच्याकडून बरेंच करवून घेऊन रावसाहेबांनीं आपल्याजवळ लोकांस धर्मार्थ देण्याकरितां बाळगिलें होतें. त्याचें नांव ' लक्ष्मीनारायण रस. '

दैविक उपाय सुरू होतेच. रोगाचें निदान करून अमुक उपाय हटकून लागू पडेल असें कोणीं सांगूं शकला नाहीं. मिळून

। वैद्या वदन्ति कफपित्तमयान् विकारान् ।
॥ ज्योतिर्विदो ग्रहगतिं परिवर्तयन्ति ॥
। भूताभिषङ्ग इति भूतविदो वदन्ति ।
॥ प्राचीनकर्म बलवद् मुनयो वदन्ति ॥ १ ॥

कफ, पित्त, वायु इत्यादिकांच्या क्षोभापासून विकार झाला असें सांगणारा वैद्य, भूतबाधेचा परिणाम असें वदणारा पंचाक्षरी, ग्रहांच्या अनिष्टतेमुळें हा प्रकार घडला असें वर्तविणारा ज्योतिषी, प्राचीन कर्माचें हें बलवत्तर फल आहे अशी समजूत करून कपाळाला हात लावणारा मुनि, यांपैकीं रावसाहेबांच्या पत्नीस कोणी कांहीं गुण देऊं शकला नाहीं. म्हणून त्यांनीं १८७२ च्या दिसेंबर महिन्यांत त्यांच्या दुखण्याचा पूर्वेतिहास लिहून विलायतेस आपले स्नेही जनरल जेकब यांकडे पाठविला. कोणीं कांहीं प्रयत्न करून तेथील डाक्टर त्यांस चालती करूं शकेल तर त्या डाक्टरास तो मागेल तें बक्षिस द्यावयाचें कबूल केलें; पण कोणीही हें दुखणें साध्य आहे असें म्हणेना.

जेकब साहेबांनीं ती छापील हकीगत लंदनमधील उत्तम डाक्टर म्हणजे किंग्स् कॉलेज मधील सिनीयर फिजिशियन, जार्ज जान्स्टन एम्. डी. इ. पदव्या धारण करणारा होता, त्याकडे फी देऊन पाठविली. त्यानें मत दिलें कीं, "हा वातोन्माद ( हिस्टेरिया ) आहे त्याच्या योगानें शरीरांतील सांधे आकुंचित झाले आहेत. सर टॉमस वॅट्सन यांनीं वातोन्माद या रोगाची चिकित्सा आपल्या पुस्तकांत केली आहे, व उपायही सांगितले आहेत त्याप्रमाणें करावे, म्हणजे क्लोरोफार्म किंवा इथर देऊन गुंगी आल्याबरोबर हातपाय एकदम तांठ करतां येतील. कांहीं वेळ गार पाण्यानें सांधे नित्य धूत जावे. थोडें थोडें चालण्यास

उत्तेजन द्यावें, विपुल पौष्टिक अन्न द्यावें, झोंप येण्यास क्लारल हैड्रेट द्यावें हो शक्ति येण्यास लोह व क्विनिन द्यावें." परंतु डाक्तर भाऊ व नारायण यांजी व दुसरे डाक्तर यांस असा उपाय रोग्यानें भिऊन करूं दिला नाहीं. म्युं१८७४ सालीं एकानें परीक्षा केली. म्हणजे रोगाचीं नांवें सांगितलीं तीं अग्निमांद्य, आर्ष व या जोडीला प्रतिष्ठित दिसणारें असें तिसऱ्या रोगाचें नांव वाताष्ठिला. पुढें १८७६ सालापासून रावसाहेब स्वतः निराश झाले. " माझ्या बायकोची स्थिति फारच दुःखकारक आहे, मनुष्याला समजत आहे तितक्यांत म्हणावयाचें म्हणजे ती बरी होईल हें अशक्य आहे. तिला ज्या तीव्र वेदना होतात त्या असह्य आहेत ! काय करील बिचारी सारें तिलाच सोसलें पाहिजे इतके दिवस पार पडले. " ( बाळकृष्ण शास्त्री बापट यांस पत्र २।१।७६. ) आतां उत्तम शुश्रूषा हा एक मार्ग उरला होता व दुसरा त्यांचें मन सदैव प्रसन्न ठेवणें हा. तथापि सौ. अन्नपूर्णाबाईचा स्वभाव असा कांहीं खंबीर होता कीं "इकडे अयई ओयई इ. शब्दांचा उच्चार करून कण्हत कण्हत होणाऱ्या वेदना सोसत नाहींत असें स्पष्ट सांगत असतां देवा आतां मरण देऊन सोडव अशा शब्दांचा उच्चार त्यांनीं केव्हांही केला नाहीं. कारण आपल्यास कांहीं गुण पडावा, कांहीं अल्पस्वल्प अंशानें तरी वेदना कमी व्हाव्या म्हणून रात्रंदिवस सावध राहून शुश्रूषा करणाऱ्या व करविणाऱ्या, लागेल तेवढा वेळ व पैसा या कामीं खर्च करणाऱ्या आपल्या प्रेमळ पतिच्या मनाला खेद होईल ! इतके हाल सोशीत असतां जशी दुसरी एकादी संसारी स्त्री संसारांत लक्ष घालील तिच्याहून अधिक ह्या घालीत असत. रोजच्या भाज्या आणल्यावर आपल्यापुढें आणवून काय करावयाच्या त्याचा हुकूम घरच्या माणसांस देत असत. धान्यें आणवून लोणचीं पापड वगैरे घालवून नीट जागच्या जागेवर ठेवण्यासवरण्याचें काम आपल्या देखरेखीखालीं नित्य करवीत. १०।१५ दिवशीं खुर्चीवर बसून जिकडे तिकडे फिरववीत, व ध्यान

इतकें ठेवीत कीं कोणास कांहीं पदार्थ सांपडला नाहीं तर नेमकें सांगत कीं अमक्या माडीवर जिन्याचे डावे बाजूस घडवंची आहे तीवर पित ळेच्या तपेल्यावर बरणी आहे तींत तो सांपडेल. या शिवाय आल्यागे गेल्याच्या पाहूणचाराची व्यवस्था याच पहात असत. संपूर्ण गृहकृत्यांत त्यांनी अणुरेणूही कमी पडूं देत नसत. घरांतील सणवार, गणपति, हरितालिक, वटपूजन, दसरा, दिवाळी या सणांची नीट व्यवस्था अखंड होत असे. त्यांची वाचा मधुर होती. स्वभाव ममताळु होता म्हणून चाकरमनुष्यें वश्य असत. व सेवेमध्यें कधीं कंटाळून जात नसत. इतक्या व्याधी असून शुचिर्भूतपणांत न्यून केव्हांही पडलें नाहीं. अगदीं उजाडत उठून नित्य-विधि झाल्यावर स्नान करून सोंवळें नेसून जेवणास माडीवरून जेवण-घरांत आपल्यास नेववीत असत. जेवणघरांत तुळशीची पूजा, जपजाप्य व गीतावाचन झाल्यावर जेवण होत असे. तेवढें आपल्या हातानें होई, परंतु हाताच्या शिरा तांठ झाल्यामुळें उचललेला घांस तोंडांत जावयास उशीर लागे. भोजनोत्तर परत वर आल्यावर खुर्चीवरून गादी घालून त्यांस निजवावें लागे. थोडी वामकुक्षी केल्यावर तेलें वगैरे लावून घेत. येथून तेथें नेण्याकरतां खुर्च्या केलेल्या होत्या त्या उचलण्याकरतां मागें पुढें २।२ असे चार दांडे लावलेले होते. अंगाला खुर्चीचे भाग रुततील म्हणून ओंवळयाच्या सोंवळयाच्या गिर्द्या केलेल्या होत्या. गाडींत बसून बाहेर हवा खाण्यास जात असत त्यावेळेस गाडींत खुर्ची नीट राहील अशी व्यवस्था केलेली होती. ही खुर्ची आगगाडीच्या डब्यांतून सटकन आंत बाहेर घेतां येईल अशी केलेली होती. कोंकणांत किंवा महाबळेश्वरास जातांना किंवा मुंबईतही फिरावयास मेणा ठेवलेला होता. त्याचे आठ भोई होते. यांच्या बरोबर त्यांस काशीयात्रा घडली होती. अंगाची कातडी नाजुक झाल्यामुळें जडवस्त्र सोसत नसे. पातळें नेसावीं तर छचोर पणा दिसतो एवढ्या करतां २० तोळ्या पर्यंत वज-

नाचीं सोळा सोळा हात लुगडीं लांबच्या पेठांतून काढवून आणीत. प्रवासांत बरोबर वैद्य असे व घरींही रात्रौ वेळ पडलीतर भाऊ दाजींचे मुख्य कंपाउन्डर अनुभवानें बनलेले डाक्तर बंगल्यावरच निजावयास असत. प्रकृतिमान कमी जास्त झाल्यास प्रसिद्ध जेठा शंकर वैद्य वरच रहात असत. अस्पर्श काळामध्यें ही नाडी पहावयास हे शिवत असत व दिवसांतून दोन तीन स्नानें पडलीं तरी करीत असत.

जरी पत्नीच्या सेवेला जिव्हाळ्याचे आप्त जवळ ठेविलेले होते, मोलाचे नोकर होते, तरी पडेल ती सेवा रावसाहेब करण्यास तयार होते. " मी नशीबवादी नाहीं तरी असल्या सत्व पहाणाऱ्या संकटानीं मनुष्याचा स्वभाव सुधारण्याचें मोठेंच कार्य होतें असा माझा समज झाला आहे व तेवढेंच मला सध्यां समाधान आहे. माझी पत्नी आतां बरी होईल असें मला वाटत नाहीं. कदाचित् शारीरिक कष्ट कमी होतील. (१८–४–७४चें जेकब साहेबांस पत्र, ही कर्तव्यजागृति अगदीं कित्ता घेण्याजोगी आहे. व ती रावसाहेबांनीं तप दीड तप दाखविली होती असें पाहिलें म्हणजे तर फारच आश्चर्य वाटून त्यांचें कौतुक लोक करीत. दाखल्यास पुढील पत्र पहा. " तुम्ही म्हणतां ती निरंतरची अर्धांगी पुण्यास औषधी उपाय करण्यास जाणार म्हणून तुम्हीं स्टेशनावर गेलां होतां. सर्व प्रसंगीं दिसून येणारा तुमचा कर्तव्योद्योग अंत:करणांत होत असलेल्या वेदना झांकून टाकतो. तुमचा आनंदी चेहरा रहस्यभेद करणार नाहीं म्हणून त्या वेदनाचा अंत:संचार स्वस्थपणें चालू रहातो." (बाळ मंगेश वागळे, याचें पत्र.)

---

## प्रकरण ४१ वें.

# मुंबई म्युनिसिपॅलिटी.

। यो दृष्टः स्फुरदस्थिसंपुटवशात्तिर्यक्प्रवालांकुरः ।
॥ दैवात्स द्विदलादिकक्रमवशादारूढशाखाशतः ॥
। स्निग्धं पल्लवितो घनं मुकुलितः स्फारच्छदं पुष्पितः ।
॥ सोत्कर्षं फलितो भृशंच विनतः कोप्येष चूतद्रुमः ॥ १ ॥

हल्लींची मुंबईची म्युनिसिपॅलिटी ह्मणजे ब्रिटिशराज्याखालीं अतिशय वृद्धि पावलेल्या स्थानिक स्वराज्याचा ऐश्वर्यवान यशस्तंभच आहे. व हें स्थानिक स्वराज्य यशस्वी करून दाखविण्यामध्यें रावसाहेबांनीं १८६३ सालापासून ह्मणजे जेव्हां त्यांस जे. पी. नेमिलें, तेव्हां पासून आमरणान्त श्रम घेतले होते. त्याची बरोबर कल्पना वाचकांस करून देण्यास मुंबई म्युनिसिपॅलिटीचा थोडा पूर्वेतिहास दिला आहे.

पोर्चुगलच्या राजानें इंग्लंदचा राजा दुसरा चार्लस यास मुंबई बेट आंदण दिल्यापासून तिच्या उद्धारास आरंभ झाला.

१७९२ त पार्लमेंत सभेनें तिसरा जार्ज यांच्या कारकीर्दींत एक कायदा केला. त्यांतील एका कलमानें जस्टिस आफ् धी पीस ( संक्षिप्त नांव जे. पी. अथवा सुलेह* मंत्रि ) ही पदवी निवडक नागरिकांस देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल ( फोर्ट वुइल्यम, बेंगाल ) यांस देण्यांत आला, व दुसऱ्या एका कलमानें कलकत्ता, मुंबई व मद्रास या शहरांतील रस्ते स्वच्छ ठेवण्याकरतां हलालखोरांची नेमणूक करण्याचा, रस्त्यांची दागदुजी करण्याकरतां माणसें नेमून तें काम त्यांचेकडून कर-

* हा गुजराथी भाषेंतला शब्द आहे.

वून घेण्याचा, त्या कामाच्या खर्चाकरितां शहरांतील घरांच्या वार्षिक उत्पन्नाच्या विसाव्या हिश्शापर्यंत घरपट्टी बसविण्याचा, व ती देण्यास घरांच्या मालकांनीं टाळाटाळी केल्यास त्यांच्या जंगम मिळकतीची जप्ति व विक्री करून तिचा वसूल आपण नेमलेल्या माणसांकडून करून घेण्याचा असे अनेक अधिकार **जे. पीं.**च्या ×सभेस देण्यांत आले. या **जे. पीं.**ची स्थापना पुढें फार उपयुक्त वाटूं लागली. कारण आतांपर्यंत मुंबई शहर व बेट यांतील गुन्हेगारांस शिक्षा करण्याचें काम कांहीं एका विशिष्ट तऱ्हेच्या नियमांप्रमाणें कसें बसें चालत असे. आतां वीस वर्षांनीं म्हणजे १८१२ त एक नवा कायदा करण्यांत आला. त्याप्रमाणें शहरांत बंदोबस्त ठेवण्याकरितां **जे. पीं.**तून दोन **मॅ**जिस्ट्रेट नेमण्यांत आले. त्यांस पोलिस **मॅ**जिस्ट्रेट ह्मणत. यांना इंग्लंदमधील **जे. पीं.**चे अधिकार तंतोतंतपणें होते. व फौजदारी कायद्याची अम्मलबजावणी करण्याकरितां तीन **मॅ**जिस्ट्रेटांचें एक कोडत बनविण्यांत आलें. त्यांस वरील दोन पोलिस **मॅ**जिस्ट्रेटांच्या मदतीस एक **जे. पी.** आळीपाळीनें बसावा असें ठरविण्यांत आलें. यांच्या कोडतास **पेटी सेशन्स** कोडत ह्मणत. कायद्याची अम्मल बजावणी करण्यास लागणारे अम्मलदार म्हणजे युरोपियन कान्स्टेबल नेमण्याचा अधिकार **जे. पीं.**च्या त्रैमासिक सभेस देण्यांत आला*. याच कायद्याच्या कलमाप्रमाणें खालील नियम करण्यांत आले:—

× या सभा त्रैमासिक असत. वर्षांतून एकदां त्यांची थोरली साधारण सभा भरत असे.

* यांत शहरांत पोलिसचा बंदोबस्त नीट ठेवण्याची व आरोग्यरक्षणार्थ योग्य तजवीज करण्याची वाखाणण्यासारखी कंपनी सरकारची इच्छा प्रथम दिसून आली.

× १ घर बांधतांना रस्त्याचा भाग लोकांनीं आंत घेऊं नये; २ विहिरींभोंवतीं उंच कठडे चुन्याचे बांधावे; ३ गाड्या योग्य बाजूनें बेतानें हांकाव्यात. ४ भाड्याच्या गाड्यांस नंबर द्यावे; ५ रस्त्यांत घोडे। बैल उगीच सोडून जाऊं नये; ६ रस्त्यांत उगीच खाडे करूं नये; ७ रस्त्यांत घाण करूं नये इ.

हे नियम मोडणारास गुन्ह्याच्या भयंकर स्वरूपाप्रमाणें, गुन्हेगाराच्या धाष्ट्र्याप्रमाणें अगर गुन्ह्याच्या पुनरुक्तीप्रमाणें शिक्षा करण्याचा अधिकार पेटीसेशन्सच्या कोडतास देण्यांत आला. शिवाय गुन्ह्यास आळा बसावा म्हणून दारू गाळणें, शस्त्रें, नाणीं, धार्मिक मिरवणुकी, जन्ममरणाची नोंद, लग्नांची नोंद, गुलामगिरी इ० बाबतींत कांहीं नियम करण्यांत आले; व मुंबई शहर व बेट यांत दारूच्या विक्रीचें नियमन करण्याचा अधिकार जे. पीं.स देण्यांत आला. ज्वालाग्राही पदार्थांचा संग्रह न करूं देण्याचा व शहराच्या तटाच्या आंत इमारती कशा बांधाव्या त्याविषयीं नियम करण्याचा अधिकारही त्यांसच देण्यांत आला.

एवढ्यावरून असें दिसून येईल कीं म्युनिसिपॅलिटीचीं म्हणून जीं कामें समजण्यांत येत होतीं तीं जे. पीं.ची सभा व मॅजिस्ट्रेटांचें त्रिकूट यांतच वांटलीं गेलीं होतीं. मॅजिस्ट्रेटत्रिकुटानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला कीं नाहीं हें कळत नाहीं परंतु आणखी तीन वर्षांनीं पुन्हा एक कायदा करून शिक्षा करण्याचा त्यांचा अधिकार कमी करण्यांत आला. त्यावर १८२७ मध्यें आणखी एक कायदा करण्यांत आला. जमीन-महसूल, दुकानावरचा कर, बटाकीवरचा कर, गांवठी वाद्यांवरचा कर, लग्नमंडपावरचा कर, घरावरचा कर, गाडीघोड्यावरचा कर व कोडतांची फी इ० बाबीं संबंधानें नवे नियम करण्यांत आले. यानंतर

× सार्वजनिक रस्त्याचा भाग हळुच एकादी आपली पायरी म्हणून तरी दगड बसवून, आंत घेण्याची संवय लोकांमध्यें अद्यापिही दिसून येते.

मॅजिस्ट्रेटत्रिकुट व जे. पीं.ची सभा व सुप्रीम कोर्ट यांच्यामध्यें अधिकारानें वरिष्ठ कोण याबद्दल लढे पडूं लागले. राजिनाम्यापर्यंत पाळ्या येऊं लागल्या.

१८३६ त सरकारनें जुन्या नियमांत कांहीं फेरफार करण्याचें ठरविलें व ते नियम जे. पीं.च्या सभेकडे पाठविले. या फेरफारामुळें पार्लमेन्ट सभेनें जे. पीं.च्या सभेस दिलेले अधिकार नवीनच तयार केलेल्या बोर्डाकडे (पथकाकडे) जाणार असा संशय येऊन जे. पीं.च्या सभेनें रागास येऊन एक ठराव केला तो असा:—

सन्माननीय जे. पीं.ची सभा खेदानें नमूद करून ठेवते कीं म्युनिसिपॅलिटीच्या निधीचा खर्च नागरिकांच्या हिताकरतां करण्याचा अधिकार जो पार्लमेन्त सभेनें या सभेस दिला व जी कामगिरी या सभेवर सोंपविली ती काढून घेण्यांत मुंबई सरकारनें तिचा मान मुळींच ठेवला नाहीं; एवढेंच नव्हे तर असा असा कायदा करणार आहोंत याचा गंध सुद्धां ग्याझेटांत त्या कायद्याचा मसुदा येई तों न लागूं देऊन मुंबई सरकारनें या सभेचा—या बादशहाच्या जे. पीं.च्या सभेचा—अनादर केला आहे.

१८४५ त एक नवा कायदा करण्यांत आला. पोलिसच्या कामाचे व म्युनिसिपल कामाचे जे कांहीं कर होते, त्यांच्या वसुलाची व खर्चाची चांगली व्यवस्था करावी एवढाच या कायद्याचा हेतु होताः वरील कायद्यानें एक सप्तसंख्याक संरक्षक पथकाची, ( कान्सर्व्हन्सी बोर्डाची ) निर्मिति झाली. तीप्रमाणें त्याचे सभासद होते तेः—२ पोलिस मॅजिस्ट्रेट, ( त्यांतील मानानें ज्येष्ठ तो अध्यक्ष ) जे. पीं.च्या सभेनें निवडलेले, २ युरोपियन व ३ हिंदी जे. पी. म्युनिसिपल करांच्या उत्पन्नाच्या निधीवर देखरेख ठेऊन त्याचें नियमन करण्याची सत्ता जे. पीं.च्या सभेला या कायद्यानें देण्यांत आली होती. तरी ही सत्ता निर्जीव

होती. या सत्तारूपी बडग्याचें भय वरील पथकरूपी मार्जारांस मुळींच वाटलें नाहीं. वस्तुतः पहातां म्युनिसिपल निधि, हें पथक ह- तसा खर्च करी. पोलिसच्या खर्चाचे ४५,००० रुपये म पोलिसकडे खर्च करण्यास काढून ठेवावे लागत. या खुद्द पथका याचा हुकूम मोडणाऱ्यांस शिक्षा करण्याचा अधिकार नव्हता तेव्हां कराचा वसूल करण्यांत अडचण पडूं लागली. १८५० त कांहीं नवे नियम झाले. त्यांप्रमाणें तंबाकूवर कर बसविण्यांत आला. दरम्यान मुंबई शहराचा व्यापार वाढला. वसति वाढली. तेव्हां पाण्याची व्यवस्था करणें व इतर स्वच्छता ठेवणें हा कामें या पथकास झेंपलीं नाहींत.

ह्मणून १८५६ सालीं सरकारानें पुन्हां नवा कायदा करण्याचें मनांत आणलें व १८५८ सालीं नवा कायदा केला. या नव्या काय- द्यानें सप्तसंख्याक पथक जाऊन त्या ऐवजीं तीन कमी- शनरांची स्थापना झाली. त्यांतील एकाची नेमणूक सरकारनें करावयाची व दुसऱ्या दोहोंची नेमणूक जे पीं.च्या सभेनें करावयाची असें ठरलें. यांतील जो कमीशनर पुरा दिवस काम करील त्यास वार्षिक मुशाहिरा १०,००० मिळे. व जो अर्ध दिवस काम करी व बाकी इतरत्र काम करी त्यास ४००० मिळे. हे अगदीं बेजबाबदार अधिकारी होते. यांचें नि- यमन करणें जे. पीं.च्या सभेच्या हातीं जवळ जवळ अगदीं नव्हतें. या कायद्याचा एक हेतु म्युनिसिपल कराचा वसूल व्यवस्थेनें करण्याचा होता. पण त्या सर्व निधीची व्यवस्था करणें या त्रिकुटाच्या मर्जीवर एकदोन अपवाद सोडून होतें. कांहीं कामें न केल्याबद्दल व कांहीं नीट न केल्या- बद्दल लोक यांस दूषण देऊं लागले. यांस काम करण्याची अनिच्छा होती अथवा हे काम करण्यास असमर्थ होते असें नाहीं. एक भरपगारी भरवेळेचा, दुसरे दोन अर्ध पगारी, अर्ध वेळेचे; त्यांचें लक्ष दोन ठिका-

णाचे कामावर; सम सत्ता जबाबदारीची, व कामाची विभागणी मात्र विषम! जिथें एकमेकांच्या कामांत ते खो घालूं लागले. तेणें करून त्यांचीं कामें बरोबर होत नाहींशीं झालीं. याला आणखी कारणें अशीं झालीं कीं म्युनिसिपल कायदे मोडणारास शिक्षा करण्याचें काम खुद्द यांच्याकडे नव्हतें व ज्या पोलिसांकडे तें होतें त्यांवर यांचा ताबा नव्हता, त्यामुळें मागच्या बोर्डाच्या कामांत व यांच्या कामांत फरक काय झाला ह्मणाल तर पगारा निसबत २४,००० रुपये खर्च अधिक पडे. कामासंबंधें बोलतांना अगदीं नाहीं ह्मणावयास यांनीं विहाडच्या तलावाचें पाणी नळ बांधून आणलें, हें खरें.

परंतु यांस अगोदरच झपाट्यानें वाढत जाणाऱ्या मुंबईशहराची स्वच्छता राखणें झेंपलें नाहीं. बोरघांट पुरा झाला. त्यानें इतर प्रांतांशीं दळणवळण वाढलें. अमेरिकेशीं कापसाचा व्यापार सुरू होऊन वाढत गेला. रेलवेचा विस्तार झाला. माहिम मुंबईला जोडलें गेलें. गिरण्यांची स्थापना होऊं लागली. टाउनहाल व एल्फिन्स्टन हायस्कूल यां सारख्या मोठमोठ्या इमारती बांधल्या गेल्या. मधले समुद्राचे दांडे बुजवून कुलाब्याशीं मुंबई जोडण्यांत आली. पोटाकरतां व व्यापाराकरतां धांव घेणाऱ्या मंडळीनें मनुष्यवसाति वाढली.

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणें, दलदलीच्या जागा भरून काढून त्या वसाति करण्यास लायक करणें या तीन गोष्टी नामदार एल्फिन्स्टन यांच्या मनांत करावयाच्या होत्या. त्यांतील एक म्हणजे नळाचें पाणी विहाड येथील तलावांतून आणणें, एवढें मात्र बोर्डाच्या हातून झालें. दुसरें कांहीं होईना म्हणून १८६१ सालीं म्युनिसिपल कायदा सुधारण्याविषयींची चळवळ सुरू झाली. तींत मि. कॅसल्स, मि. ग्रीन, मि. ग्रॅन्ट, मि. कॅनन व सर जमशेटजी. मि. कूपर हे गृहस्थ प्रमूख होते. या वेळेस नामदार फ्रियर, मुंबईचे गव्हर्नर, यांनीं मुंबईच्या आरोग्याची स्थिति कशी काय आहे तिचा शोध करण्याकरितां एक

कमीशन बसविलें. त्याचे मुख्य डा. ह्यूलेट व डा. लीथ होते. त्यांना श्रीमंत लोकांनीं बांधलेल्या उंच भाड्यांवरून मुंबईतील राक्षसी घाण चांगलीच दिसली ती पाहून तिच्या पायीं उद्भवलेल्या पटकी सारख्या अत्यंत प्राणहानिकारक रोगांनीं उडवलेल्या फन्नाचा १८६४ सालीं त्यांनीं रिपोर्ट केला.

१८६३ सालीं म्युनिसिपॅलिटीच्या रचनेंत कांहीं फेरफार करण्यांत आला व पुढें १८६५ सालीं एक नवा कायदा करण्यांत आला. त्यानें जे. पीं.ची कारपोरेशन नामक कायमची सभा स्थापण्यांत आली. या कारपोरेशनला एक सील ( शिक्का मोर्तब ) देण्यांत आलें. जमिनीचे मालक होण्याचा अधिकार दिला. कर बसविण्याचा, तो वसूल करण्याचा, व त्या वसुलावर कर्ज काढण्याचा अधिकार दिला, परंतु सर्व विधायक सत्ता व जबाबदारी सरकारनें नेमलेल्या एका कमीशनरकडे सोंपविण्यांत आली. मात्र त्यानें जे. पीं. च्या सभेला ( आतांच्या कारपोरेशनला ) दरवर्षीं जमाखर्चाचा खरडा सादर करावयाचा होता. व तो मुद्दाम भरविलेल्या सभेंत तपासून सुधारणा करण्याचा अधिकार कारपोरेशनकडे ठेविला होता. कारपोरेशनच्या सभा वर्षांतून चार वेळा भराव्या व सात सभासद हजर असले तर काम चालवावयास हरकत नाहीं असें कायद्यानें ठरविलें होतें.

म्युनिसिपॅलिटीचे हिशोब तपासून भरणा केलेल्या रकमा व खर्च करावयाच्या रकमा कायदेशीर रीतीनें घेतां व देतां येतील कीं नाहीं तें पाहण्यास एक कंट्रोलर नेमण्यांत आला. त्याचप्रमाणें एक आरोग्य संरक्षक ( हेल्थ हपीसर ) व एक इंजिनियर असे दोन आणखी कामगार नेमण्यांत आले. या सर्वांची नेमणूक करणें सरकारानें आपल्या हातांत ठेविलें. म्युनिसिपॅलिटीच्या कामापुरतें कमीशनरच्या ताब्यांत पोलिस देण्यांत आलें. कमीशनरची नेमणूक तीन वर्षांनीं सरकारनें करावयाची

असें ठरलें होतें* पहिली नेमणूक मि. क्राफर्ड यांची या जागेवर झाली. ही नवी रचना फार उदार मनानें व दूर दृष्टीनें सर बार्टल फ्रियर यांनीं केली. तींत पुढें निवडणुकीचें तत्त्व घालून १८७२ चा प्रसिद्ध म्युनिसिपल अॅक्ट करणें सुलभ झालें. नवे कमीशनर मि. क्राफर्ड यांनीं बेतानें खर्च केला असता अथवा कन्ट्रोलरनें वर दाब ठेविला असता तर हाच कायदा पुढें बरेच दिवस टिकला असता. + असा संभव असतां ही नवीन व्यवस्था लोकांस अगदीं आवडत नाहींशी झाली. लोकमत फार क्षुब्ध झालें. व जी चळवळ झाली ती अभूतपूर्व होती. म्युनिसिपल कायद्यांत क्रांति घडवून आणण्याची वेळ आली. तींत रावसाहेबांचें पहिल्यापासून अंग होतें. त्यांस त्यांचे मित्र मि. नवरोजी फर्दुनजी व मि. बेंगाली यांचें फार साहाय्य होतें. ज्या युरोपियनांची मुंबईत बोटभर जमीन नव्हती, तेही येऊन यांच्या पक्षास मिळाले. त्या सर्वांचा इतिहास फार महत्वाचा व मनोरंजक आहे. तो पुढें दिला आहे.

म्युनिसिपॅलिटीचें काम या १८६५ च्या कायद्याप्रमाणें चालविण्यास

* ⅔ सभासदांचें मत पडल्यास कमीशनरला काढून टाकण्याचा अधिकार कारपोरेशनला आतां प्राप्त झाला होता.

+ याच्या अगोदर जो मुंबई म्युनिसिपॅलिटीचा पूर्वेतिहास दिला आहे तो त्रोटक आहे. जर कोणास त्याच्या ही अगोदरचा पोर्तुगीझ अम्मलापासूनचा पाहिजे असेल तर मि. एस्. एम्. एडवर्ड्स यांनीं लिहिलेलें सुन्दर मुंबईचें गॅझेटीअर वाचावें. म्युनिसिपल कायद्या पुरतें मि. मायकेल यांचें म्युनिसिपॅलिटीची कायदेशीर रचना हें पुस्तक वाचावें. जुने रूल्स आर्डिनन्सिस व स्टॅटयूट्स वाचावे. व पुढील चळवळीसंबंधें ने. ओपिनियनचे १८६६ ते १८७२ चे अंक वाचावे. तसेंच सर दिनशा वाच्छा यांचा म्युनिसिपॅलिटीच्या विस्ताराचा इतिहास वाचावा. रावसाहेब मंडलिक यांचे लेख व भाषणें हें पुस्तक त्यांच्या चिरंजीवांनीं प्रसिद्ध केलें आहे तें वाचावें.

जें यंत्र तयार झालें होतें त्याचे मुख्य तीन भाग होते. १ ज्या जे. पीं. ची कारपोरेशन सभा बनली ते; २ कमीशनर व कंट्रोलर; व ३ या यंत्रास गति देणारा कायदा. या तिघांमध्यें थोडे थोडे दोष होते. कोणते ते पाहूं. जे. पीं.ची निवडणूक घरपट्टी देणारे नागरिक करीत नसून त्यांची नेमणूक सरकार करीत असे. मात्र ते बहुशः संस्कृतचित्त व बुद्धिमान नागरिकांतूनच पसंत केले जात. जे. पी. दोन प्रकारचे असत. १ युरोपियन व २ हिंदी. हिंदी लोकांची संख्या मुंबईत या सुमारास ८,६१,५१६ होती. व युरोपियन लोकांची १०,३१६ होती. म्हणजे ८० हिंदीलोकांस १ युरोपियन पडे. तरी युरोपियन व हिंदी जे. पी. यांची संख्या जवळ जवळ निम्मे निम्मे होती. हिंदी जे. पीं.त कांहीं घरपट्टी देणारे असत. त्यांस निधि पाहिजे तर प्रतिनिधि द्या हें तत्त्व माहीत नव्हतें. युरोपियन जे. पी. हे प्रामाणिक व उद्यमक्षम असत. परंतु त्यांना घरपट्टीवाल्यांस काय पाहिजे आहे तें कळत नसे. मग शहरांतें सुधारणा हिंदीलोकांच्या संवयी वगैरे लक्ष्यांत घेतां कोणती पाहिजे हें सभेंत कोण बोलणार? लोकांचा पैसा पट्टीच्या रूपानें वसूल केला जाई त्या मानानें शहरांत सुधारणा करून त्याचा मोबदला मिळतो कीं नाहीं हें कोण पहाणार? युनिव्हर्सिटी नुकतीच स्थापन झाल्यामुळें पदवीधरांचा झरा जोरानें वाहूं लागला नव्हता. कांहीं हिंदी जे. पी. सभेला जात नसत. कांहीं, युरोपियन जे. पीं.चे मित्र, म्हणून सभेला जाऊन स्वस्थ बसत. कांहींनां इंग्रजी ज्ञान कमी, ह्मणून आपलें म्हणणें हजर जबाब देऊन, युक्तिवाद करून सभेस खरें करून दाखवितां येत नसे; व कांहीं "आपल्या तुटक्या इंग्रजीस हंसणार नाहींत ना?" अशी शंका घेऊन मौन स्वीकारीत.

हेंही चांगलें होतें;पण कांहीं हिंदी जे.पी.कमीशनरच्या वक्तृत्वास भाळून त्याच्याकडे वळत व तसें मत देत. म्हणून सभेंत जे स्वतंत्र मताचे हिंदी

जे. पी. होते. त्यांचें कांहीं चालत नसे. अशा स्थितींत युरोपियन लोकांच्या निश्चित बहुमतावर व युरोपियन लोकांच्या तोंडाकडे दीनवाण्या दृष्टीनें बघत बसणाऱ्या हिंदी जे. पीं.च्या लघुमतावर मि. क्राफर्ड हे पदारूढ झाले.

मि. क्राफर्ड हे सिव्हिलियन होते. मनानें खंबीर, शरीरानें बळकट व संवयीनें उद्यमक्षम होते. उपायप्राचुर्याबद्दल यांची ख्याति होती, परंतु यांची मुख्य खोडी ही होती कीं ते उधळये होते. आधीं खर्च करून मंजुरी मागाहून सावकाश घेत असत व यांना जे कंट्रोलर मिळाले होते, ते शिराळशेटी इतके उदार होते. मि. क्राफर्ड खर्च करावयास पहात तो कायदेशीर आहे कीं नाहीं, तो करण्यास कायद्याची मंजुरी आहे कीं नाहीं इत्यादि पहाण्याचें जें त्यांचें मुख्य काम तेंच ते करीत नसत.

म्युनिसिपॅलिटीच्या यंत्राचे दोन भाग असे होते. आतां राहिला तिसरा भाग म्हणजे त्यास चालन देणारा कायदा. त्याचें असें झालें होतें कीं कामाच्या सोयीकरितां कमीशनरच्या हातीं सर्व विधायक सत्ता दिली होती व तो कोणास फारसा जबाबदार धरलेला नव्हता.

शिवाय या कायद्यानें असें ठरविलें होतें कीं जे. पीं.च्या सभा वर्षांतून चार वेळा भराव्या. हें अर्थात त्या वेळेला अनुरूपच होतें. जे. पीं.च्या अंगीं कायमचा आदरेख नव्हता असें नाहीं. पण जे. पीं.मध्यें पुष्कळ व्यापारी होते, ते कपाशीच्या व्यापारांत गुंतलेले होते, धनिक होते ते शेअरबझारांत गढलेले होते व दोघेही नव्या कंपन्यांच्या भाराखालीं चेंगरलेले होते. मग त्यांना अधिक वेळ म्युनिसिपॅलिटीच्या कामाला कसा मिळणार ! इतका मिळाला हाच फार मिळाला म्हणा ! अशा स्थितींत मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या उत्पन्नासारखें उत्पन्न, व तें सार्वजनिक कामाकरतां खर्च करण्याची अबाधित सत्ता, मि. क्राफर्ड यांच्या हातीं आली मग काय विचारावें ! यांच्या कृती कित्येकांस मूळा

पासूनच आवडत नाहींशा झाल्या. तरी प्रथम दर्शनीं असें दिसून येतें कीं मि. क्राफर्ड आले तेव्हांच म्युनिसिपॅलिटीची तिजोरी भरलेली नव्हती तरी मि. क्राफर्ड हे लवकरच सर्व बाबतींत सुधारणा करतील असें त्यांच्या बुद्धिमत्तेवरून लोकांस वाटलें, व त्यांनीं बऱ्याच बाबतींत लोकांची निराशा केली नाहीं. "अहो पन्नास वर्षांची सांचलेली घाण काढावयाची आहे. ती काढून मी म्युनिसिपॅलिटीचें काम चोख व स्वस्त असें करून दाखवितों. मला तशीं माणसें कामावर नेमूंद्या" इ. इ. अभिवचनें देऊन त्यांनीं कामाला प्रारंभ फार धीटाईनें केला.

जे. पीं. च्या सभेला (कारपोरेशनला) त्यांनीं अधिक चेतना आणली. सभासद अधिक हजर राहूं लागले. रस्ते स्वच्छ केले. गटारांतील घाण कमी केली. शहराचें आरोग्य सुधारलें व मृत्युसंख्या कमी झाली.

मि. क्राफर्ड यांची मुख्य कामगिरी म्हटली म्हणजे त्यांनीं पूर्वीं जीं हलालखोरांचीं, रस्ते दुरुस्त करण्याचीं, पायखाने झाडण्याचीं कामें एक सत्ताधारी कंत्राटदारांमार्फत करून घेण्याची पद्धति होती ती रद्द करून या कंत्राटदारांचें बंड मि. क्राफर्ड यांनीं मोडून टाकिलें. व हीं सर्व कामें म्युनिसिपॅलिटीच्या नोकरांकडूनच त्यांची संख्या वाढवून करून घेऊं लागले. घरपट्टीची आकारणी करणारे जास्त कामावर घेतले. वसूल करणारे अधिक ठेवले. जप्ति करणाऱ्या बेलिफांचा ताफा तयार केला. आपल्या दाराशीं घाण ठेवणाऱ्या घरवाल्यांस मॅजिस्ट्रेटांपुढें भराभर उभें करूं लागले. या कामाकरतां अधिक खर्च मंजूर करून घेऊं लागले. व मार्किटें, कसाईखाना व मैला पाणी कुलाब्यास वाहून नेऊन व समुद्रांत सोडून देणें इ. कामाच्या योजना पुढें आणूं लागले. कांहीं लोक वा ! वा ! म्हणूं लागले. पण रावसाहेब व त्यांचे साथिदार तसें म्हणत ना ! जर शहराचें आरोग्य सुधारलें व मृत्युसंख्या कमी झाली तर मग रावसाहेब, त्यांच्या पक्षाचे लोक व मि. क्राफर्ड यांच्या

मधील तंट्याचें कारण काय होतें ? तें थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे असें होतें:—" कापड असेल त्या मानानें लहान मोठा आंगरखा होता. " असें लोक म्हणत व मि. क्राफर्ड म्हणत. " नाहीं ! जेवढा आंगरखा अवश्य आहे, नव्हे हितावह आहे, तेवढा शिंवलाच पाहिजे ! कर्ज झालें तरी बेहेत्तर आहे ! " लोक म्हणत:—" दिवाळें वाजावयास नको असेल तर कोणत्याही कुटुंबानें आपल्या उत्पन्नाच्या आंतच खर्चाचें मान ठेवलें पाहिजे. " मि. क्राफर्ड म्हणत:—" नाहीं ! कोणत्याही देशानें (मग नगरानें अर्थातच) आपल्याला अवश्य तो अथवा हितावह तो खर्च केलाच पाहिजे. कर्ज झालें तरी चिंता नाहीं ! " विरोध करणाऱ्यास गप्प बसविण्याची कला, अडचणी दूर करून आपला मार्ग मोकळा करण्याची हातोटी हीं मि. क्राफर्ड यांच्या अंगीं होतीं. त्यामुळें गानलुब्ध मनुष्य जसे गवयाच्या फरमासीला तसे युरोपियन जे. पी. स्वतां प्रामाणिक असून, उद्योगी असून मि० क्राफर्ड साहेबांच्या आपातरमणीय पद्धतीला भुलून जाऊन, तो मागेल तेवढ्या रकमा विमुक्तहस्त मंजूर करीत. लाखों रुपयांचें उत्पन्न म्युनिसिपॅलिटीस पुरें पडत नाहींसें झालें. उसने आणलेल्या पायांवर ती चालूं लागली. हें भविष्य रावसाहेबांस कळलें होतें. याचा प्रतिकार कसा करावा त्याचा विचार त्यांनीं चालविला होता. तथापि रावसाहेबांच्या असें नजरेस येऊन चुकलें होतें कीं या कामांत फारसा पुरुषदोष नसून पद्धतींत कांहीं उणीव होती ती दूर केली पाहिजे, म्हणून म्युनिसिपल कायद्यांत सुधारणा करून घेण्यांत खासगी सभा भरवून त्यांनीं पहिल्यापासून खटपट चालविली होती. पण तसें करतांना त्यांस फार सावधगिरी ठेवावी लागे.

" भाऊंनीं मला एक दिवस सांगितलें कीं तुम्हीं मि. क्राफर्डविषयीं बोलतांना सावधगिरी ठेवा. मझगांवकॅसलमध्यें जी सभा झाली तींत जें तुम्हीं बोललां त्याविषयीं " क्ष " मनुष्य पराचा कावळा करीत

आहे. तुमचें म्हणणें खोटें असेल तर तसें ठरविण्यास सर्वांस तुम्हीं आव्हान केलेंत. तो मनुष्य व त्याचे साथिदार हे शिकस्त करून पहात आहेत. ही मंडळी म्हणजे घूकांचा जमाव आहे. " ( रो. उ. ) न

याचा अनुभव रावसाहेबांस आला. " एकदां जे. पीं. च्या सभेंत मी गेलों तेव्हां 'या तुम्हीं माझे लोकनियुक्त विरोधी!' असे म्हणून मि. क्राफर्ड यांनीं माझें स्वागत केलें. मी म्हटलें मी असा एक असेन. त्या सभेंत वैमनस्य उत्पन करण्यासारखेंच त्यानें वर्तन केलें. त्याच्या प्रतिपक्षांस डाक्तर बर्डवुड 'अप्रतिष्ठित' म्हणाले. मी त्यांस सांगितलें हें वर्तन अयोग्य आहे. आमच्या समाजांत कांहीं चुगल्ये आहेत ते आमच्या खासगी सभांची बातमी यांस कळवितात. ते क्ष व ज्ञ आहेत " (रो उ.)

याच्यापुढें रावसाहेब या क्ष व ज्ञ मनुष्यांविषयीं फार सावध असत असें पुढील एका उताऱ्यावरून दिसतें. " क्ष मला बोलावून म्हणाले " म्युनिसिपॅलिटींत उधळपट्टी फार चालली आहे व घरवाल्यांवर फार जुलुम चालला आहे. शेट लोकांस बोलतां येत नाहीं, लिहितां येत नाहीं, पुष्कळांस असा मार बसत आहे, सार्वजनिक कामाची हौस नाहीं. ३५ लाख हा कर प्रमाणातीत आहे. भंगीपट्टीचा कर हा काय-देशीर आहे असें ठरतां कामा नये "

" असल्या पुष्कळ गोष्टींचें मूळ 'क्ष' हाच आहे. तो बोलतो फार पण प्रत्यक्ष करणीची वेळ आली ह्मणजे काय करतो ? हा प्ररूढ ढोंगी ठरलेलाच आहे. प्रायश्चित्त घेतांघेतांच करिष्यमाण नव्या पापांची योजना करून ठेवतो. " (रो. उ.) कांहीं हा झगडा तटस्थ वृत्तीनें पहात होते. " न्या. टक्कर चेम्बर मध्यें भेटले व ह्मणाले मि. क्रॉफर्ड व जे. पी. हे दोघेही चुकत आहेत. मि. क्रॉफर्डसाहेबांस मुंबईच्या खऱ्या हिताकरतां तुह्मीं पाठिंबा दिला पाहिजे." मी ह्मटलें "मि. क्रॉफर्ड यांचा अविचारपणा हा दोष आहे. कोणाला चिढवण्यासारखें न बोलण्याची

त्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे. ह्मणजे सर्व काम प्रत्येकाला हवें तसें आनंदांत होईल. ” ( रो. उ. )

रावसाहेबांच्या पक्षास अद्यापि यश येऊं लागलें नव्हतें. कमीशनची नेमणूक त्रैवार्षिक होती तिची मुदत १८६८ मध्यें सरावयाची होती. २६।४।१८६८ रोजीं कारपोरेशनच्या अध्यक्षांनीं सभेंत मोठें भाषण करून मि. क्राफर्ड यांची तारीफ केली, मि. डोसाभाई फ्रामजी यांनीं त्यांस पुष्टि दिली व मि. क्राफर्ड यांनीं उभयतांचे आभार मानले. मि. क्राफर्ड याच्या कामाची मुदत वाढविण्यांत आली.

१८६८ च्या जुलाइ महिन्यांत कमीशनर यांनीं सभेंत सांगितलें कीं २५ पंचवीस लक्ष रुपये वसुलाची बाकी राहिली आहे. साडेबारा लाख रुपये कमीशनरनें जे. पीं.ना विचारल्याशिवाय कर्ज काढले. तरी जे. पीं.नीं त्यास चक्रावर धरिलें नाहीं. यावर ने. ओ.मध्यें “ परस्पर प्रशंसा करणारी मंडळी ” असा लेख आला व पुढें अशाच चित्ताकर्षक मथळ्या खालीं लेख येऊं लागले.

सरते शेवटीं नवरोजी फर्दुनजी यांनीं एक दिवस जे पीं.च्या सभेंत यशवंतराव बाबा व तेमुलजी श्राफ ( दोघेही मि. क्राफर्ड यांच्या गळ्यांतले ताईत ) यांच्याविषयीं चौकशी करावी असा ठराव १८६८ सालीं *अक्टोबर महिन्यांत आणला. मि. क्राफर्ड ह्मणाले “ मीं त्यांस त्यांच्या अनुयायांसह दूर केलें आहे. पुन्हां कामावर घेणार नाहीं. एवढा भरंवसा माझ्यावर ठेवा. ” असल्या लोकांस जाब विचारला पाहिजे असा हट्ट मि. सोरावजी शापुरजी बेंगाली यांनीं धरला होता. व त्यांची उपसूचना मंजूर झाली. यशवंतराव बाबा यांस इंग्रजी येत होतें किंवा नव्हतें तें ठाऊक नाहीं. हजारों रुपये वसुलाचे जमा करावयाचे होते ते त्यांनीं आणून भरले, एवढा तरी त्यांचा गुण वर्णनीय आहे. मि. क्राफ-

* ने. ओ. ११।११।१८६८.

ऊंचे चाहते, मि. फर्दुनजींस लोकप्रियतेच्या मागें लागलेले असें ह्मणाले. पुढें असें आढळून आलें कीं एकंदर लाखों रुपयांच्या तुटीचा खाडा क्राफर्डशाहींत खणला गेला. यांत म्युनिसिपॅलिटीचा गाडा रुतून बसला. बहुतेक जुपीटरची प्रार्थना करूं लागले. थोडेजण खांदा घालूं लागले. "अहो पन्नास वर्षांची घाण काढावयाची आहे" अशा आजपर्यंत मारलेल्या थापा यापुढें टिकण्याचा संभव उरला नाहीं.

पुढें म्युनिसिपॅलिटी व तिचे कामगार व त्यांचे पगार यांत होणाऱ्या खर्चाची चौकशी करून रिपोर्ट करण्याकरतां क्राफर्डचे मित्र 'जाऊंद्या झालें तें झालें असें' ह्मणत असतां १८६८ मध्यें एक कमिटी नेमली गेली. तिचे अध्यक्ष अॅड्व्होकेट जनरल, नामदार बेली हे होते. व रावसाहेब व मि. फर्दुनजी व कहानदास मंच्छाराम हे सभासद होते.

म्युनिसिपॅलिटीच्या कामाविषयीं रावसाहेबांचें मत फार प्रतिकूल होतें. रिपोर्टांत मि. क्राफर्ड यांनीं व परिशिष्टांत असें ह्मटलें होतें कीं सेक्रेटॅरिअटमधील पांच खात्यांत जेवढे कारकून आहेत, त्यांची संख्या म्युनिसिपॅलिटींतिल कारकुनांच्या संख्येहून चौपट आहे तरी त्यांच्याहून दुप्पट पत्रव्यवहाराचें काम म्युनिसिपॅलिटींतील कारकून करतात ! या वरून मि. क्राफर्ड यांचे कारकून फार अलौकिक बुद्धीचे असले पाहिजेत, अथवा त्यांचे काम अगदींच सोपें असलें पाहिजे असें रावसाहेबांनीं मत दिलें. रावसाहेबांनीं अकाउन्टन्ट जनरल याकडून माहिती आणविली होती तीवरून असा शेरा लिहिला कीं हेड क्लार्कची जागा त्यांच्या कचेरींत दीडशेंहून जास्त पगाराची नाहीं मग म्युनिसिपॅलिटींत तशी नसावी. सरकारी खात्यांत अकाउन्टन्टचा पगार ३०० वर नाहीं; तरी एक एकजण कोट कोट रुपयांचा व्यवहार पहात असे. म्युनिसिपॅलिटीचा सर्व व्यवहार तेहतीस लाखांवर नव्हता म्युनिसिपॅलिटी, अकाउन्टन्ट हें नांव उगाच देते. त्या जागेचें काम कारकुनीचें आहे. मुख्य अकाउन्टन्ट मि. मेडमन्ट हे १५०० रुपये पगारावर आहेतच.

याच प्रमाणें स्टोअर हाउसच्या कामावर टिका होती. पनवेल येथें विटांचा कारखाना ड्रेनेजच्या कामाकरतां मि. क्राफर्ड यांनीं काढला होता, तो एकदम बंद करावयाची शिफारस रावसाहेबांनीं केली. या प्रमाणें दर एक खात्यांत कांहींना कांहीं तरी सुधारणा करण्याची सुचना केलेली होती.

बिलें वसूल करतांना बिलकलेक्टर एक शिपाई बरोबर घेऊन जाण्याची पद्धति बंद करून जाहीर नोटीस देऊन नेमल्या वेळांत नेमल्या ठिकाणीं बँकेंत पैसे भरतात तसे भरावयास सांगावे अशी एक शिफारस रावसाहेबांनीं केली होती.

या रिपोर्टाचा जे. पीं.नीं नीट विचार केला नाहीं. युरोपियनांचें बहुमत होतें.

मि. हॅन्काक म्हणाले "मि. विश्वनाथ यांनीं आपला रिपोर्ट लिहिण्यांत मेहनत थोडी घेतली आहे व विचार तीहून थोडा केला आहे असें दिसतें; तथापि मि. क्राफर्ड यांच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्यास जागा आहे" असें वादविवादांतीं म्हणाले. रावसाहेबांनीं लोकमत प्रक्षुब्ध करण्याचा क्रम चालविला होता. मि. क्राफर्ड यांस ते "प्राडीगल सन +" ची उपमा देत.

१८७० मध्यें मि. क्राफर्डनीं म्युनिसिपल कचेरीकरतां जागा भाड्यानें घेतली. भाडें लोकांच्या ऐपतीच्या मानानें फार दिलें. मि. मार्टिन वुड टाईम्सचे एडिटर हे रावसाहेबांचे मित्र होते. त्यांनींही या चळवळीस हातभार लावतांना एक लेख लिहिला त्यांत ते असें ह्मणाले:— सूर्याच्या प्रकाशानें तिन्ही खण्डांत ज्या मोठमोठ्या अंधकाराच्या राशी

+ या लाडक्या व उधळ्या मुलानें घरांतून बाहेर निघून पित्यानें दिलेलें सर्व द्रव्य उडवून पुन्हा पित्याच्या वात्सल्यावर भरवंसा ठेऊन घरीं परत आगमन केलें व पित्यानें त्याचा अंगीकार केला. ही सुन्दर गोष्ट बायबल मध्यें आहे.

नष्ट होतात त्या सर्वांहून अधिक अंधःकाराच्या राशी म्युनिसिपॅलिटीचीं बिलें वसूल करण्याच्या पद्धतींत भरलेल्या आहेत वगैरे वगैरे नांवें देण्याचे शब्द जेवढे माझ्या भाषच्या संग्रहांत आहेत ते सर्व सरून गेले

मैदानांत तंबू मारूं देण्याच्या कामांत अव्यवस्था, गाड्यांना लायसेन्सें देण्यांत घालमेल इ. अनेक विषयांवर रोज चर्चा सुरू झाली. खर्चाच्या चवकशीविषयीं बऱ्याच कमिट्या बसल्या. इतर पुष्कळ सुचना उपसुचना यांची रेलचेल उडाली. व्यक्तिविषयक वाद सुरू झाला. **ने ओ.**मध्यें लेख कोण लिहितो व त्याचा मालक कोण अशी अप्रस्तुत चौकशी **जे. पी.** करीत. **कावसजी जहानगीर** यांनीं १०,००० रु. म्युनिसिपॅलिटीचें कर्ज फेडण्यास बक्षिस देऊं केले व इतरांस तसें करण्यास विनविलें.

**क्राफर्ड** यांच्या पांच वर्षांच्या कारकीर्दीचें चित्र **नारायण वासुदेवजी** यांनीं एका सभेंत काढलें. "३१।३।१८७१ ची शिल्लक ४५,१८०-८-६ इतकी आहे. दुसरा दिवस उजाडतांच सरकारला विहारच्या तलावाच्या कर्जाच्या रकमेचा हप्ता भरावयाचा आहे. मागील पंधरा लाखांचें व्याज भरावयाचें आहे, तें दिलें म्हणजे बाकी १४,५८० रु. रहाते. तींतून **मार्च** महिन्याचा नोकरांचा पगार व इतर खर्च द्यावयाचा आहे तो कसा देणार ? म्हणजे **मार्च** महिन्याच्या खर्चा करतां एप्रिलच्या वसुलाची वाट बघायची किंवा कर्ज काढावयाचें. ही स्थिति प्रशस्त नाहीं. आमचें दिवाळें निघणार आहे !! "

संत्रस्त झालेल्या रेटपेयर्सनीं ( घरपट्टी देणाऱ्यांनीं ) एक सभा स्थापिली व दोन हजार सह्यांचा अर्ज **जे. पीं.**च्या बेंचास केला. त्यांत ( १ ) जुलमी कर; ( २ ) जप्तीचीं वारंटें घेऊन दूत म्हणून दारांत उभे राहिलेलें बेलिफांचें मंडळ; ( ३ ) म्युनिसिपल कचेरींतील नोकरांचा अस्ताव्यस्त खर्च; ( ४ ) सार्वजनिक कामावरील अनियमित खर्च व ( ५ ) कमीशनरची अरेरावी सत्ता इतक्या गोष्टींविरुद्ध तक्रार होती. शेवटीं **जे. पीं.**नीं मोठी सभा भरविली.

र अॅन्ड्र्यू स्कोबल हे अध्यक्ष होते. ३० जून १८७१ रोजीं सभा त्यानें भरली ती ७ जुलाई रोजीं बरखास्त झाली. खालीं दिलेले लोक हजर होते.

प्र मि. मॅक्लीन ( गॅझेटचे चालक ); मि. वुड ( टाईम्सचे चालक ); मि. हेन्री ( पी. ओ. कंपनीचे एजन्ट ); मि. टेलर ( सेक्रेटरी चेम्बर ऑफ कामर्स ); डा. ब्लेनी; मि. मल् ( टाइम्सचे मालक ); सर जमशेटजी; नवरोजी फरदुनजी; रावसाहेब मंडलिक; बदरूदीन तय्यबजी; 'सर' फिरोजशहा मेथा; महादेव गोविंद रानडे ( मागाहून न्यायमूर्ति ); शेठ वरजीवनदास माधवदास (माधव बागवाले); डॉ. आत्माराम; हारमसजी दादाभाई व नाना मोरोबा; मि. कॉनन; डॉ. भाऊ; डॉ. नारायण दाजी; बाळ मंगेश वागळे; जनार्दन सखाराम गाडगीळ; कमरुद्दीन तय्यबजी; गणपतराव भास्कर; दादोबा पांडुरंग करसेटजी आर. कामा; खण्डेराव चि. बेदरकर; म. मो. पितळे; महादेवराव शिरगांवकर; ना. म. परमानंद; डॉ. सखाराम अर्जुन; डॉ. लीथ; मि. मोर्लेन्ड; मि. हॅन्काक; न्या. ग्रीन; मि. नाईट ( स्टार आफ् इंन्डियाचे चालक ); नारायण वासुदेव व विनायक जगन्नाथ शंकरशेट. सभेंत गर्दी फार होती.

चर्नीरोड स्ट्रीट व एलफिन्स्टन सर्कल गाड्यांनीं भरून गेलीं होतीं. तुकाराम तात्यांच्या नेतृत्वाखालीं लोकांनीं हातांत निशाणें घेऊन बॅन्ड बाजा लावून मोठी मिरवणूक काढली. ती बरोबर जमून आलेले लोक उंच काठ्यांवर एक तक्ता बसवून त्यावर ' म्युनिसिपॅलिटीच्या कामांत घोटाळा आहे, तो काढण्याकरतां टाऊन हालांत सभा आहे तेथें सर्वांनीं यावें ' असें लिहून तो बरोबर मिरवीत आणून टाऊनहालच्या पायऱ्यां-वर येऊन बसले. लोकांनीं जवळचे रस्ते भरून गेले. लोकांचे थवे समुद्राच्या लाटांप्रमाणें टाऊन हालच्या पायऱ्यांशीं आदळत होते व कान्स्टेबल

खडकासारखे उभे राहून पुढें जागा नाहीं म्हणून सांगत होते. वृद्ध टीचीं म्हणूं लागले अशी गर्दी आमच्या पहाण्यांत नाहीं. दिवाणखान्यांतांचें लोक फार गुदमरूं लागले. वारा नाहीं, पंखा नाहीं ! लोकांनीं हाले सोसले; कारण झालेलीं भाषणें वक्तृत्वपूर्ण होतीं. ज्यांना एकादें भाषण समग्र ऐकण्याची संवय नाहीं, त्यांनीं तीन दिवस हजर राहून २६ भाषणें ऐकिलीं. सर ॲन्ड्र्यू स्कोबल हे अध्यक्ष होते. मि. फोर्ब्स बोलावयास उठले तेव्हां प्रचंड टाळ्यांचा गजर झाला. ते बोलूं लागले तेव्हां 'मोठ्यानें बोला. मागील मंडळीस ऐकावयास येत नाहीं' अशी मि.आर्मिस्टन यांनीं इशारद दिली. मि. फोर्ब्स यांनीं जुलमी करानें क्षुब्ध झालेल्या लोकांचें चित्र काढलें. व नोकरानें ( कमीशनरनें ) जे. पीं. स कसें फसविलें तें सांगितलें. लोकांवर कर किती असावा तें सांगितलें. बेलिफांच्या तांड्यावर टीका केली. टाउन ड्यूटीज या गरीबांच्या दाण्यावर व जळवणावर शेवटीं पडतात असें सांगितलें. वर्कशापच्या, गॅसच्या, व गटारांच्या कामाकरतां काढलेल्या पनवेलच्या विटांच्या कारखान्यावर टीका केली. कमीशनरांच्या उधळपट्टीचा व तींतून उद्भवलेल्या कर्जाचा निषेध केला. अधिकाऱ्यांच्या मोठ्या पगारांवर व जमाखर्चाच्या खर्ड्यांवर टीका केली. कंत्राटें देण्याच्या पद्धतीला हरकत घेतली. व ऑफिसकरतां भाड्यानें घेतलेली जागा घेण्यांत घाई झाली इ. दोष काढिले. म्युनिसिपॅलिटीचें दिवाळें निघणार म्हणून सांगितलें. व कमीशनरवर जे. पीं. चा दाब कसा राहूं शकत नाहीं, तें सांगून म्हणाले "हा सर्व घोटाळा म्युनिसिपॅलिटीच्या कायद्याचा आहे. तो दुरुस्त करा."

हें भाषण चाललें असतां कॅपटन् पेन वरास 'हें ऐका' असें मधून मधून दोनदांच म्हणाले परंतु हें भाषण संपतांच 'हें ऐका' असें सहा वेळां म्हणाले !

नंतर लोकांचे प्रतिनिधी किति असावेत; सरकारनें नेमलेले किति असा-

वेत; कोणते कामगार पाहिजेत; त्यांचा पगार किति असावा; त्यांच्यावर हिशोबाची तपासणी कशी व्हावी इत्यादि ठरविणारा एक कायद्याचा मसुदा लोकांपुढें ठेविला, त्याचा सारांश.

( १ ) हल्लीं एका कमीशनराकडे जी सत्ता आहे ती दूर व्हावी व सर्व विधायक सत्ता व जबाबदारी म्युनिसिपल कामासंबंधें असेल ती एका टाउन काउन्सिलकडे ( नागरिकांच्या सभेकडे ) सोंपवावी; तींतील सभासदांची संख्या १६ असावी—म्हणजे ते ६ सरकारनियुक्त, ६ जे. पीं. च्या बहुमतानें निवडलेले,व ४ घरवाल्यांनीं निवडलेले असे असावेत. जे. पीं.च्या संघाचा जो अध्यक्ष तोच या नगरसभेचा अध्यक्ष असावा. या सभेच्या मदतीस एक पगारी चिटणीस नेमावा. (यांत थोडें,४ सभासदांपुरतें, प्रातिनिधिक पद्धतिचें अवलंबन नव्यानें करण्याचें योजिलें होतें असें दिसून येईल. )

( २ ) जुन्या कायद्याखालीं जी सत्ता कमीशनरकडे आहे ती सर्व या १६ सभासदांकडे असावी.

( ३ ) ५०० रु. पगाराच्या नेमणुका करण्याचा अधिकार या टा. काउन्सिलकडे असावा. याहून मोठ्या जागांवर नेमणुका करण्याचा अधिकार जे. पीं. च्या मोठ्या सभेकडे असावा. त्याचप्रमाणें म्युनिसिपल अकाउन्टन्ट; एक्झिक्युटिव्ह इंजिनियर; व हेल्थ हफीसर ( आरोग्य खात्यावरील मुख्य कामगार ) यांच्या नेमणुका सरकार करीत आलें पण त्या आतां टा. का.च्या सभेनें कराव्या. व जे. पीं.ची मंजुरी घ्यावी.

या सुचनांचा उद्देश म्युनिसिपॅलिटीचें थोडक्या खर्चांत चांगलें काम व्हावें हा होता.

नंतर ते म्हणाले, “ सावधपणानें व काळजीनें म्युनिसिपॅलिटीचीं कामें चालविलीं पाहिजेत. त्यांत धसमुसळेपणा कामाचा नाहीं ! वाटतील त्या खरेद्या ! हवीं तशीं कंत्राटें ! दराचा ठराव नाहीं ! कामें संपविण्याला

मुदत नाहीं ! मानेल तें भाडें देऊन म्युनिसिपल कचेरीकरतां जागा भाड्यानें घेणें ! इ० उधळेपणानें कसा निभाव लागेल !" भाषण संपवितांना म्हणाले, " जे. पी. बन्धू हो ! तुम्हीं येथें, याचा किंवा त्याचा हितसंबंध राखण्यास जमलां नाहीं. यावर किंवा त्यावर उपकार करण्यास आलां नाहीं. जें कर्तव्य केलें नसतां मोठे प्रसंग उद्भवतील तें करण्यास जमलां आहांत. तर मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें मत द्या." डा. ब्लेनी यांनीं या सुचनेस पुष्टि दिली.

मि. फोर्ब्स यांनीं आणलेल्या ठरावास अनुमोदन देतांना* राव-साहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांशः—

" या चळवळीच्या उत्पादकांचे त्यांनीं केलेल्या परिश्रमांबद्दल जेवढे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत. असें म्हणतांना मीं मुंबईच्या म्युनिसिपॅलिटीस कर देणाऱ्या गरीब लोकांचें बहुमत प्रदर्शित करीत आहें. माझ्या आधीं ज्यांनीं भाषणें केलीं त्यांतील बहुतेकांनीं म्युनिसि-पॅलिटीच्या कायद्यांत कांहींतरी सुधारणा झाली पाहिजे अशी स्पष्ट कबुली दिली आहे. मि. मॅक्लीन आपल्या ठरावांत म्हणतात आमचा खर्च वर्षानुवर्ष वाढतच चालला आहे. व आम्हीं त्याला आळा घालूं शकलों नाहीं, म्हणून दाद मागण्याकरतां सरकारकडे धांव मारावी लागत आहे. याला इलाज म्हणजे प्रातिनिधिक तत्त्वाला म्युनिसिपॅलिटीच्या कायद्यांत मि. फोर्ब्स यांच्या मागणीप्रमाणें त्यांनीं सुचविलेल्या इतर उपायां-

*म्युनिसिपॅलिटीच्या इतिहासाविषयीं लिहिलेल्या आपल्या पुस्तकांत सर दिनशा एदल्जी वाच्छा यांनीं रावसाहेबांचा उल्लेख " मर्द मंडलिक " या शब्दांनीं प्रथम करून नंतर "नवरोजी फर्दुनजी यांचे दोस्त, महाराष्ट्रांतील कुशाग्र पंडित, कायद्यांत कसलेले वकील, सार्वजनिक कामाच्या सभांतून दृष्टोत्पत्तीस येणारे व जगन्नाथ शंकरशेट यांच्या मागें समग्र हिंदुसमाजाच्या भावि आशा होऊन बसलेले " अशी प्रशंसा केली आहे.

बरोबर जागा देणें हाच होय. आतांच एक वक्ते म्हणाले सरकाराजवळ आम्हीं जाऊन फार मोठी मागणी केली तर कांहींच हातांत पडणार नाहीं, अशी भीति आहे. परंतु म्युनिसिपॅलिटीची सद्यःस्थिति व ती सुधारण्याकरितां तिच्या कायद्यांत काय काय फरक केले पाहिजेत या विषयींचें आमचें खरें मत देतांना वरील भीति आड येतां कामा नये. पूर्वीं एकावेळीं कोणाही हिंदी गृहस्थास जे पी.ची पदवी प्राप्त होत नसे. ती स्थिति बदलणें इष्ट वाटलें. व चवथे वुइलियम यांच्या कारकीर्दींतच हिंदी लोकांतून जे.पीं. ची निवडणूक होऊं लागली. व ती झाली ह्मणूनच १८६५ चा कायदा होण्यास मार्ग सुलभ झाला, व हा कायदा होण्याच्या वेळीं मि. कॅसल्स हे ह्मणाले ' पूर्वींच्या म्युनिसिपॅलिटीच्या रचनेंत व्यंगें आहेत असें अनुभवानें आढळून आलें आहे. ' त्याचप्रमाणें आतां १८६५ च्या कायद्याविषयीं त्यांत व्यंगें आहेत असें मत देण्याची पाळी आली आहे, अशी खात्री ज्यांची आजपर्यंत झाली नाहीं त्यांची खात्री आजचीं भाषणें ऐकून होईल. १८६५ च्या कायद्याचा अनुभव सहा वर्षें घेतला. तितक्या अवधींत वीस लाखांचा चुराडा झाला व या कायद्यांत व्यंगें आहेत अशी आमची खातरी झाली आहे पण या कायद्यांत काय काय उणें आहे तेंच जे. पीं.च्या संघाला कळत नाहींसें झालें आहे. जे. पीं.च्या हातांत पिशवीच्या दोऱ्या होत्या त्या वेळींच ओढून इष्ट तो परिणाम घडवून आणण्याची जबाबदारी जे. पीं. ची होती असें कोणी सांगतात. परंतु १८६५ चा कायदा झाला त्यावेळीं तो कायदा करणाऱ्यांचा हेतु काय होता तें पाहिलें ह्मणजे तो सर्व जबाबदारी कमीशनरवर ठेवण्याचा होता असें दिसतें. सर बार्टल फ्रियर ( गव्हर्नर ) ह्मणाले ' हा कायदा अंमलांत आला कीं म्युनिसिपल कमीशनर हेच जबाबदार होतील. ' असें असून सुद्धां ही कमीशनराची कारकीर्द फार महाग पडली; व जे. पीं.च्या

कामा विषयीं विचाराल तर त्यांत सुद्धां अपयशच आलेलें आहे. मागें, सध्यां चालू असलेल्या कायद्याप्रमाणें म्युनिसिपॅलिटीच्या कामाची व्यवस्था उत्तम रीतीनें करण्याकरतां काय काय नियम करावे ते सुचविण्याकरतां जे. पी. नीं एक कमिटी बसविली होती. तींत आतांचे अध्यक्ष मि. स्कोबल व मि. हावर्ड हे होते. त्यांनीं एक युक्ति काढली होती. तिचा हेतु कमीशनरला तर चांगला टेंका द्यावयाचा पण तसें करतांना रीती बाहेर तो वागूं लागेल तर आळा घालावयाचा होता. त्यापूर्वीं बसलेल्या दुसऱ्या एका कमिटीला ( जींत कै. जगन्नाथ शंकरशेट यांनीं काम केलें होतें तिला ) आपल्या हातांत ताबा व जबाबदारी पाहिजे होती म्हणून तिनें असें मत देऊन ठेविलें कीं म्युनिसिपॅलिटीच्या द्रव्यनिधीच्या खर्चावर व म्युनिसिपॅलिटीच्या अधिकाऱ्यांवर जे. पीं.चा ( म्हणजे कर देणाऱ्या लोकांचे प्रतिनिधी म्हणून कांहीं अंशानें कोणी असूं शकले तर जे आज मितीला आहेत त्यांचा ) ताबा जो कायदा ठेवणार नाहीं त्याचें अस्तित्व कोणीही सहन करतां कामा नये. आतां अशीच असह्य स्थिति प्राप्त झाली आहे. मि. मॅक्लीन सांगतात जे. पीं.च्या संघानें आपलें काम यशस्वी रीतीनें केलें नाहीं तो मोडा व टाउन काउन्सिलची स्थापना करा. मंगळदास नथूभाई यांनीं काउन्सिलांत सांगितलें कीं म्युनिसिपॅलिटीच्या कचेऱ्यांच्या ज्या जागेला हल्लीं वार्षिक भाडें ३०,००० रु. भरावें लागत आहे तें म्युनिसिपॅलिटीच्या कारभाराची व्यवस्था नीट लागल्यास निम्मेच भरावें लागेल ! आमचे कमीशनर मग काय करीत आहेत ? १५०० बद्दल दरमहा ३००० देत आहेत ! ”

पुढें रावसाहेब म्युनिसिपल अधिकाऱ्यांच्या पगारावर टीका करतांना म्हणाले, “ डाक्तर स्टोव्हेल(ज्यांच्यासारखे वाकबगार अधिकारी शाळा-खात्याला मिळाले नाहींत ते ) ४००रु. पगारावरच काम करीत होते.” नंतर रावसाहेबांनीं सांगितलें “इतक्या उपसुचना आल्या आहेत तरी त्यांत एकी

शिवाय दुसऱ्या साऱ्यांस तें नांव देण्याच्या लायकीच्या सुद्धां नाहींत. ती एक कोणती म्हणाल तर **जे. पीं**.चा संघ अजीबात अकीर्तिकर म्हणून रद्द करावा अशी शिफारस करणारी होय. इतर सुचना सुधारणेच्या पंथालासुद्धां लागलेल्या नाहींत. असल्यास त्या आस्ते कदम स्वरूपाच्या आहेत. सुधारणा करण्याची त्यांची इच्छा नसून सुधारणेशीं विलास * करीत बसण्याचीच आहे. त्या अर्धवट आहेत. जेथें तेथें थांबत आहेत. उद्दिष्ट स्थलांस न पोंचणाऱ्या आहेत. ”

“मि. **फोर्बस्** यांचा मसुदा प्रातिनिधिक तत्त्वाचा प्रवेश कायद्यांत करून म्युनिसिपॅलिटीच्या नव्या कारभाराचा ग्रंथ रचीत आहे.”

“प्रातिनिधिक तत्त्वाचा आपण अवलंब करूंया व सरकार जर तें तत्त्व मान्य करणार नाहीं तर त्याचा दोष सरकारकडे; आम्हीं कांहीं मागीतलें नाहीं असें होऊं देऊं नका. या तत्त्वाचा अवलंब औंधमध्यें म्युनिसिपल कायद्यांत १८६४ तच सरकारनें केला आहे. जो अधिकार लखनौ सारख्या शहरांत १८६४ त लोकांच्या पदरांत पडला तो १८७१ सालीं आम्हीं मुंबईत नुसता मागूंसुद्धां नव्हे काय ? ”

“ म्युनिसिपालिटीचा कारभार पाहणारे काउन्सिलर जर कर देणाऱ्या लोकांना जबाबदार असावयास पाहिजेत तर ते लोकांचेच प्रतिनिधी असले पाहिजेत. व कमीशनर हा बाह्य शक्तीच्या ताब्यांत असतां उपयोगी नाहीं. तो लोकांस जबाबदार पाहिजे. तो सरकार नियुक्त नसावा. तशा कमीशनरचा काय उपयोग होतो तें गेलीं सहा वर्षें सांगतच आहेत. ( टाळया ) ह्मणून मी सांगतों ( व मी सांगतों ते युक्तिसिद्ध आहे. त्याला मुंबई शहराचा मागला इतिहास व युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनें शिक्षणांत झालेली प्रगति यांनीं पुष्टि येत आहे. ) कीं तुह्मीं प्रातिनिधिक तत्त्वाचें समग्रतः—अंशतः नव्हे—अवलंबन करणारा कायदा करवून घ्या,

---

* Cocquetting with Municipal Reform

मागील कायद्याच्या दोषांनीं परिप्लुत असा अर्धवट कायदा करवून घेऊं नका. जनतेला काय पाहिजे आहे तें मागा व आपल्या कर्तव्यांतून मोकळे व्हा. मीं निमूटपणें कांहीं बोलल्याशिवाय मि. फोर्ब्स यांच्या सुचनेस मत देणार होतों; परंतु त्यांच्या सुचनेचे वास्तविक गूण मला तसे करूं देत नाहींत. या चळवळीस लोकांचा पाठिंबा आहे असें सांगण्यास म्युनिपॅलिटीला अल्पसा कर देणारा एक या नात्यानें मि. फ़ोर्ब्स यांच्या ठरावास अनुमोदन देत आहें." ( ३० जून १८७१ )

मि. फर्दुनजी यांनीं रावसाहेबांप्रमाणें मि. फोर्ब्स यांच्या ठरावास पुष्टि दिली. कमीशनरच्या पाप.च्या ढेरी उपसल्या व प्रातिनिधिक तत्त्वाची तरफदारी केली. ते म्हणाले "मी नुकताच इंग्लंदमध्यें होतों तेव्हां लिव्हरपूल म्युनिसिपॅलिटीच्या सभासदांची निवडणूक चालली होती. नागरिक, टाउन काउन्सिलमध्यें काम करण्यास फार उत्सुक होते. ते व्याख्यानें देऊन काय काय कामगिरी करूं, खर्च वेंच कसा कमी करूं व उत्तम व्यवस्था ठेवण्यास कसे प्रयत्न करूं तें समजून सांगत होते. व असे लोक निवडून आल्यावर मी त्यांची व्यवस्था पाहिली ती उत्तम होती. सारांश म्युनिसिपॅलिटीचीं कामें इकडे एका बेजबाबदार कमीशनरच्या हातून जशीं होतात; त्याहून टाउन काउन्सिलच्या हातून कामें फार सुंदर होतात. येथील टाउन काउन्सिल व तेथील टाउन काउन्सिल यांत फरक एवढाच कीं लिव्हरपूल येथील टाउन काउन्सिलमधले सर्व सभासद लोकांनीं निवडलेले असतात. त्यांच्या निवडणुकीशीं सरकारचा कांहीं संबंध नसतो."

नंतर सभा बुधवारावर ढकलली गेली. मूळजी ठॅकरसी यांनीं मि. फोर्ब्स यांच्या मतास बळकटी आणणारी आपली पहिली सही वर घालून २००० सह्यांचा अर्ज सभेंत दाखल केला.

कॅ. हॅन्कॉक यांनीं मि. फोर्ब्स् यांच्या ठरावाच्या विरुद्ध भाषण केलें.

त्यांच्या मताप्रमाणें टाउन कोउन्सिलकडे ( नगर सभेकडे ) विधायक सत्ता मुळींच नसावी तिनें फक्त देखरेख करावा पण खरी विधायक सत्ता सरकारनें नेमिलेल्या कमीशनरकडेच असावी. यांच्या मतास मि. मॅक्स-वेल यांनीं पुष्टि दिली.

नारायण वासुदेवजी व मि. मॅक्लीन यांनीं आपला मधलाच रस्ता पृथक् सुचना आणून काढला होता. त्यांना कॅ. हेन्री व मि. आर्मिस्टन यांनीं पुष्टि दिली. मि. फोर्ब्स यांच्या विरुद्ध बाजूच्या या सर्व लोकांचा आशय दुसऱ्या शब्दांनीं असा होता कीं हिंदी लोक अजून, हे हक्क मिळविण्यास लायक झाले नाहींत ! जणूं काय पार्लमेंट सभा एकदमच आकाशांतून खालीं उतरली !

सर जमशेटजी हे मि. हॅन्काक यांच्या तर्फें मत देतांना त्यांस आलेल्या निनांवी पत्रांस उद्देशून म्हणाले, ' आम्हीं निनांवी पत्रांच्या धमकावणीला भिणारे नाहीं.' मि. आर्मिस्टन हे मि. फर्दुनजी व रावसाहेब यांस लागून बोलतांना म्हणाले:–" म्युनिसिपॅलिटीचें काम कसें चाललें आहे तें पहाण्यास १८६८ मध्यें कमिटी बसली तींत हे दोघे होते. त्यांतून लोकांतर्फें फुकट काम करण्यास तयार असलेले मि. फर्दुनजी यांनीं रिपोर्टच लिहिला नाहीं. "

मि. फर्दुनजी यांनीं उत्तर दिलें मी इंग्लंड मध्यें याच कामाची माहिती करून घेत होतों.

मि. आर्मिस्टन:– मि. नारायण मंडलिकांनीं रिपोर्ट लिहिला पण तो केव्हां ? १८७१ त !

मि. मंडलिक:–रिपोर्ट लिहिण्याची मुदत १८७१ च्या मार्च महिन्यापर्यंत ठेवलेली होती हें विसरलांत वाटतें !

मि. नाईट कांहीं पेंडोळीं घेऊन आले होते. ते आपलें भाषण वाचून दाखविणार होते तोंच कांहीं सभासदांनीं त्यांच्यावर बहिरी ससाण्या-

प्रमाणें झडप घालून भाषण वाचून दाखविण्याची मनाई केली. नंतर ते म्हणाले " म्युनिसिपॅलिटीचे कर फार हलके आहेत ते वाढवून दुप्पट खर्च केल्याशिवाय म्युनिसिपॅलिटीचें काम चांगलें चालावयाचें नाहीं. " यांनीं मि. हॅन्काक यांचे तर्फे मत दिलें. मि. क्राफर्ड यांची तरफदारी करणारा यांच्याहून चांगला दुसरा गृहस्थ मिळाला नसता. त्यांनीं मि. क्राफर्ड यांची वकिली केली. पुन्हा बुधवारीं अशीच गर्दी होती. मि. क्राफर्ड यांच्या हातून सुटतों कीं नाहीं याविषयीं उत्सुक असलेल्या लोकांनीं भरलेल्या सभागृहांत वक्ते आवेशांत येऊन एकमेकांस टोंचून बोलूं लागले. शिकलेल्या लोकांस मि. क्राफर्ड यांची उधळपट्टी समजली होती यांत नवल नाहीं पण अज्ञानी लोकाससुद्धां समजलीं होती. " या साहेबाच्या पायीं आह्मांस कर द्यावे लागतात. " असे उद्गार त्यांच्या तोंडांतून वारंवार येऊं लागले. काम चाललें असतां मि. क्राफर्ड यांच्या तर्फेचे लोक हसूं लागले ह्मणजे हा अपशकुन आहे असें इंग्रजी येत नसूनही लोक समजत व मि. क्राफर्ड यांच्या विरुद्ध बाजूचे लोक हसूं लागले ह्मणजे सुचिन्ह आहे असें समजून काय प्रकार झाला ते शेजारीं बसलेल्या इंग्रजी समजत असलेल्या गृहस्थास विचारीत. अडाणी लोक या सभेला येत हें पाहून एकानें टाईम्समध्यें एक इंग्रजी पत्र छापलें होतें. व ते एका अडाणी माणसाकडून आलें असें दाखविण्या करतां खालीं " रामा " अशी सही घातली होती. त्याची भाषा बगीवाले इंग्रजी बोलतात तशी होती. त्यांत कराफड साहिबाला फोर्स साहेब घालवून देणार आहेत म्हणून आनंद प्रदर्शित केला आहे. कारण कराफड सार्‍यांस धमकावतो. कराफडाला पगार ३००० देतात; त्याला भाड्याला हजार ! बाझार करावयाला हजार ! व पेनशनीला हजार ! यामुळें आम्हासनी कर फार द्यावे लागतात. ही गोष्ट १८६५ तली. १८७१ त १५०० बस हैत. २५० ला बंगला मिळतो. बाझाराला हजार कशाला ? इ० मजकूर होता.

सभा पुन्हा शुक्रवारावर ढकलली गेली. ७००।८०० जे. पीं. पैकीं सभेला २०।२५ मिळतां मारामार पडावयाची, तेथें आज पुष्कळ हजर राहिले. तीन वर्षांनीं एकदां येणारे आज हजर होते. नेहमींच्या जे. पीं. च्या सभेंत ज्यांचीं तोंडे दिसत नसत व उघडत नसत ते प्रकट होऊन बोलके झाले !

लोक १८६५ च्या कायद्यावर वार करावयास सज्ज झाले. व त्यांनीं एवढा प्रहार केला कीं, त्यानें या कायद्याचीं कणशः शकलें झालीं.

याच्या आधीं या सभेंत भाषण करणारे म्हणून ज्या वक्त्यांचा उल्लेख होऊन गेला आहे त्यांच्या भरीस अनेक विद्वान इंग्रज व हिंदी वक्त्यांचा उल्लेख आदरयुक्त केला पाहिजे. नुकतेच विलायतेहून बॅरिस्टर होऊन आलेले मि. फिरोजशहा मेथा; मि. हारमसजी दादाभाई; मि. जान कॉनन ( चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट); मि. मॅक्लीन ( मुंबई गॅझेटचे एडिटर ); मि. बद्रुद्दीन तय्यबजी ( न्यायमूर्ति ); मि. विनायक जगन्नाथ शंकरशेट; मि. वुड; मि. ग्रीन ( बॅरिस्टर ); मि. बेंगाली इ०

मि. क्राफर्ड यांनीं उत्तरा दाखल भाषण केलें. त्या प्रसंगीं ते इलियड-मधील ट्रोजन युद्धांतील ऑजक्षाप्रमाणें शत्रुपक्षांत, अथवा खेड्यापाड्यांत यात्राप्रसंगीं कुस्तीस आव्हान करणाऱ्या पेलवानाप्रमाणें उभे राहिले. व म्हणाले " अरे ! मीं गरींबाचा शत्रु ! मग मित्र कोण तो दाखवा ! रत्नागिरी जिल्ह्याभर फिरतांना मला गरीबांचा मित्र म्हणत तें काय ! व चिढून जाऊन म्युनिसिपॅलिटीचें काम कसें चाललें आहे तें पाहण्यास नेमलेल्या कमिटीस उद्देशून या कमिटीच्या मंडळीच्या डोक्यांतील मगज दूषित होता असें म्हणाले. चाकरानें धन्याचा उत्तम मान ठेविला म्हणावयाचा !

शेवटीं लोकांनीं थोडक्या फरकाची मधल्या रस्त्याची मॅक्लीनची सुचना सभेंत मंजूर करून घेतली. सभा बरखास्त झाली पण लोकांचें काम पुढेंच राहिलें होतें. त्यांनीं अर्ज करून एकंदर म्युनिसिपॅलिटीच्या कामाच्या

चवकशीची व्यवस्था व्हावी. त्यावरून सरकारनें एक कमिटी नेमली. तींत मि. होप, मि. बेंगाळी इ.लोक होते. तिला होप कमिटी म्हणतात. तिच्या चवकशींत म्युनिसिपॅलिटीच्या कामांत ८७ लाख रुपयांची तूट निघाली म्हणजे खर्चांत तूट ५० लाखांची व विहाड येथील तळें बांधण्याप्रीत्यर्थ सरकारचें देणें. हा परिणाम कसला तर मि. क्राफर्ड यांनीं दरवेशाप्रमाणें जे. पीं.च्या सभेस नाकांत वेसण घालून तिच्या कडून हसूं येण्यासारख्या कृती करविल्या. कोणी जे. पी. विरुद्ध बोलल्यास मी जबाबदार आहें असें गंभीर मुद्रेनें वाक्य उच्चारून हालोवेच्या गोळ्यांचें नाम जसें रुग्ण जनांस तसा त्यांस मोह पाडीत; पण ते आतां ही जबाबदारी बरोबर घेऊन विलायतेस पळून ( नव्हे, रजेवर निघून ) गेले. कन्ट्रोलरनें हिशोब तपासले नाहींत व चाकराचा धनी झाला. त्यानें हा प्रसंग आला.

नंतर म्युनिसिपल कायद्याची दुरुस्ती करण्याकरतां सरकारनें १८७१ सालीं एक मसुदा तयार केला.

त्यावर रावसाहेबांचें मत होतें तें: " स्थानिक ( म्युनिसिपल ) सत्ता वास्तविक लोकांचे हातांत राहिली पाहिजे, ह्मणजे तत्त्वतः लोकसत्तात्मक असली पाहिजे. सरकारी खात्याच्या स्वरूपाची नसावी. "

" चुक्या होणें हा मनुष्यस्वभाव आहे. सहज उपलब्ध असलेल्या ज्ञानानें मनुष्य जर वागूं लागेल तर तो चुकणार नाहीं. आमच्या सामाजिक किंवा राजकीय संस्था युरोपांतून अगर अमेरिकेंतून आह्मीं आणतां कामा नये. आमच्या म्युनिसिपॅलिटीची रचना जी काय होणार आहे ती येथेंच उगम पावणारी पाहिजे विधायक सत्ता असलेली नागरिकांची सभा ( Town council ) असावी व त्यांत $\frac{2}{3}$ सभासद हिंदी व $\frac{1}{3}$ युरोपियन असावे. या नागरिकांच्या सभा भरतील त्या मानानें अथवा महिनेवारीनें किंवा अन्य तऱ्हेनें कांहीं नांवाचें किंवा प्रत्यक्ष वेतन तिच्या सभासदांनीं घेतां कामा नये. जर कोणी गृहस्थ अमूक एक ठराविक वेळां-

पेक्षां अधिक वेळा सभांना योग्य कारणाशिवाय आले नाहींत तर त्यांनीं राजिनामा दिला असें समजून त्यांच्या ठिकाणीं दुसरे निवडले जावे. हा माझ्या मतें महत्त्वाचा मुद्दा आहे."

"अधिक किंमतीच्या (किंवा अशी कांहीं अट घालून) घराच्या मालकांना मताधिकार असावा घरवाल्यांशिवाय इतर लोकांनाही मत देण्याचा-हक्क असावा. उदाहरणार्थः—युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांस, निरनिराळ्या सुशिक्षित धंदेवाल्यास, जास्टिस् ऑफ् धी पीस् वगैरे वगैरे लोकांस. कमीशनरची नेमणूक दोन वर्षांनीं एकदां सरकारानें करावी व पूर्वीप्रमाणेंच $\frac{2}{3}$ मतें पडलीं म्हणजे त्याला काढतां यावें. कन्ट्रोलर अगदीं स्वतंत्र अधिकारी असावा."

"नगरांत येणाऱ्या मालावर कर (Town duties) नसावेत. हा कायदा अधिक संक्षिप्त व सुव्यवस्थित असावा."

सरकारचा मसुदा तयार होतांच या विषयावरील शेवटची चर्चा रावसाहेबांनीं खुद्द मुंबईचे गव्हर्नर सर सेमूर फिट्झराल्ड यांजवळ केली असें पुढील रोजनिशींतील उताऱ्यावरून दिसतें "मलबारहिलवरील सरकारवाड्यांत म्युनिसिपॅलिटीच्या संबंधें कांहीं प्रकरणांवर चर्चा करण्यास नामदार गव्हर्नरसाहेबांच्या निमंत्रणावरून गेलों होतों. मी आपलें स्पष्ट मत दिलें कीं कांहीं तऱ्हेचे प्रातिनिधिक तत्त्वाचे हक्क लोकांस देणें ओळीलाच आलें आहे. नामदारांच्या काउन्सिलचे सभासद विरुद्ध होते. मी ह्मटलें हें त्यांचें मत वरिष्ठजनमतैकावलम्बी आहे. नामदार म्हणाले हेंच खरें. साडेचार वाजतां तेथून निघालों पाऊण तास वाद झाला."

शेवटीं १८७२ सालीं नामदार वुडहाऊस यांच्या कारकीर्दींत म्युनिसिपॅलिटीचा नवा कायदा झाला; त्यांत प्रातिनिधिक पद्धतीचा अंगीकार फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला. ६४ कारपोरेशनच्या

सभासदांपैकीं ३२ लोकांनीं निवडलेले, १६ जे. पीं.नीं निवडलेले व १६ सरकारनें नेमलेले असावे असें ठरलें. शिवाय स्टँडिंग कमिटीच्या १२ सभासदांपैकीं ८ कारपोरेशननें निवडावे व चार सरकारनें नेमावे असें ठरविण्यांत आलें. आणखी मुख्य मुख्य अधिकारी नेमण्याचा अधिकार कारपोरेशन सभेस मिळाला, व त्या नेमणुकांस मंजुरी देण्याचा अधिकार सरकारानें आपणाकडे ठेविला. कमीशनराची नेमणूक आपणांकडे ठेविली.

या कायद्यांत एक खोड रावसाहेबांनीं काढली होतीः— जों पर्यंत कमीशनरची नेमणूक करण्याचा अधिकार टाउन काउन्सिलकडे किंवा कारपोरेशनकडे सोंपविला नाहीं तों पर्यंत प्रत्यक्ष दुःखहरण होणार नाहीं. असें जरीं २४।८।१८७२ च्या एका पत्रांत रावसाहेबांनीं दादाभाईस कळविलें होतें तरी नवा कायदा झालेला रावसाहेबांस बराच पसंत होता, असें जनरल जेकब यांस लिहिलेल्या खालील पत्रावरून दिसतें.

"निवडणुकीच्या तत्त्वाचें बियाणें प्रथमच पेरलें गेलें. गेल्या शनिवारीं म्युनिसिपॅलिटीच्या लोकनियुक्त उमेदवारांची निवडणूक झाली. माझी निवडणूक तीन भागांतून झाली आहे. मी कोठून उभा रहाणार तें आजच ठरविणार आहें. पूर्वींपेक्षां आम्हांला अधिक यश आमचे कामांत येईल अशी आशा करतों. परंतु पुष्कळसें कमीशनरवर अवलंबून राहील, कारण नव्या कायद्यानें खरा अधिकार सर्वच त्याच्याकडे आहे. १।८।१८७३

अशा रीतीनें या प्रकरणाच्या मथळ्यावर दिलेल्या संस्कृत श्लोकांत वर्णन केलेल्या द्विदल कोयी पासून ज्याप्रमाणें क्रमशः शाखाशत पल्लवित सपुष्प, सफल आणि आपल्या प्रकर्षच्छायेखालीं अनेक मनुष्यांस आश्रय देण्याला समर्थ असा आम्रवृक्ष निर्माण होतो त्याप्रमाणें दोन, तीन पेटी

मॅजिस्ट्रेट व कांहीं जे. पी. यांपासून उद्भवणारी छोटेखानी म्युनिसिपॅलिटी कालें करून विस्तार पावत पावत मोठें प्रचण्ड स्वरूप प्राप्त झाल्यानें कोट्यावधि रुपये उत्पन्नाच्या व लक्षावधि जनांनीं आकीर्ण अशा शहराची व्यवस्था लावण्यास समर्थ झाली आहे हें पाहून कोणास कौतुक वाटणार नाहीं? हल्लींचे कारपोरेशनचे सभासद जर जो प्रश्न पुढें येईल त्याच्या विषयीं सप्रमाण दाखलेसूद माहिती मिळवून त्याचा उलगडा केवळ सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें सोडवतील तर ते किमया करून दाखवतील एवढें सामर्थ्य व अधिकार त्यांच्या अंगीं हल्लीं आलेलीं आहेत.

## म्युनिसिपॅलिटिच्या अध्यक्षपदाचा मान.

नवा कायदा झाल्यापासून रावसाहेबांची निवडणूक कारपोरेशनमध्यें लोकांकडून ( रेट पेयर्स किंवा जे. पी. यांकडून ) शेवट पर्यंत होत असे. व कारपोरेशन त्यांस टाउन् काउन्सिलचे सभासद त्याच प्रमाणें निवडीत असे. रावसाहेबांनीं म्युनिसिपॅलिटींत केलेली कामगिरी सभासदांस मान्य झाली. व रावसाहेबांस १८७९ सालीं कारपोरेशननें अध्यक्ष निवडून त्यांचा सन्मान केला. तेव्हां महादेव गोविंद रानडे यांनीं त्यांस एक पत्र ९।१।७९ रोजीं लिहिलें. त्यांत त्यांनीं रावसाहेबांची खालीं लिहिल्या प्रमाणें प्रशंसा केली आहे. "मुंबईच्या नागरिकांनीं कारपोरेशनचे अध्यक्ष म्हणजे लार्ड मेयर तुम्हांला निवडून जो तुमचा जयघोषांत गौरव केला त्याबद्दल मला तुमचें अभिनंदन करूं द्या. आम्हां सर्वांना तुम्हांस दिलेल्या या मानाच्या पदवीचा सकारण अभिमान वाटत आहे. नामदार जगन्नाथ शंकरशेट व डॉ. भाऊ यांच्या मागें तुम्हीं हिंदू लोकांचे पुढारी म्हणून त्यांच्या जागीं आलां अहांत. हिंदूंचा समाज संख्याबलानें व द्रव्यबलानें मोठा आहे. त्यांत तुमच्या सारख्या सर्व जातीच्या व धर्माच्या लोकांकडून एकमतानें पुढारीपणाचा मान मिळवलेला मनुष्य

पाहिजे होता. त्या मानाचा उपभोग घेण्यास ईश्वर तुम्हांस पुष्कळ आयुष्य देवो. अगदीं तरुणपणींच सरकारी सेवेचा मोहपाश तोडून तुम्हीं स्वतंत्र झालां व तेव्हां पासून सतत परिश्रम करून सर्व सुसिक्षित लोकांचेंही धुरणीत्व तुम्हीं प्राप्त करून घेतलें आहे. म्युनिसिपॅलिटीच्या कल्याणार्थ जे तुम्हीं अविश्रांत उद्योग करीत आलांत त्याचें आम्हांस फारच कौतुक वाटत आहे. दोन्हीं बाजूनीं तुम्हीं आम्हांस अत्युत्तम उदाहरण घालून दिलें आहे. त्याचेंही लौकरच साफल्य होईल अशी आशा करतों. जरूर पडल्यास स्वसुखाचा अभिलाष सोडून सार्वजनिक काम करण्याला वाहून घेण्याची भक्ति हल्लीं आमच्यांत दिसून येत आहे, त्यापेक्षां ती वाढावी अशी इच्छा करणारे पुष्कळ लोक तुम्हांस उत्तरोत्तर सारखी यशाची प्राप्ति करून देणाऱ्या तुमच्या चरित्राकडे प्रेमदृष्टीनें सारखे पहात राहिले आहेत. असें तुम्हांस सांगतों त्यावर भरंवसा ठेवा. ”

रावसाहेब म्युनिसिपॅलिटींत कारपोरेशनचे अध्यक्ष असतां आपला अनुभव वे॥ वामनराव जोशीबुवा यांस कळवितांना म्हणाले “हल्लीं आठ दिवस म्युनिसिपॅलिटीच्या संबंधानें रोज सभा असते. असें काम चाललें आहे. दररोज कांहीं कांहीं युरोपियन मेंबर बोलून बोलून घोळ पाडतात व मला चुकविण्याचा प्रयत्न करतात. ” परंतु रावसाहेब कायदेपंडित असल्यामुळें त्यांस अडचण कांहींही पडली नाहीं. व अध्यक्षाचें काम रावसाहेबांनीं उत्तम केलें.

रावसाहेब अध्यक्ष असतां वादविवादांना सजीवता येत असे. अध्यक्ष या नात्यानें काम करीत असतां त्यांनीं दाखविलेला स्वतंत्र मताचा बाणा निपःक्षपातीपणा व सभ्यता या गुणांनीं ते हिंदी व युरोपियन सभासदांसही मान्य झाले. त्यांनीं त्यांस दुसऱ्या वर्षाकरतां अध्यक्ष निवडलें. ते अध्यक्ष असतांच ५।३।१८७८ रोजीं तुळसीच्या तळ्याचा अनावरण

सभारंभ सर रिचर्ड टेंपल यांच्या हस्तें झाला. तेव्हां रावसाहेबांस एक रुप्याचा हातोडा नजर करण्यांत आला. या समारंभाच्या वेळीं तुळशी तलावाचा एकंदर इतिहास रावसाहेबांनीं लोकांस वाचून दाखविला.

रावसाहेबांनीं म्युनिसिपॅलिटीचें काम एकंदर ३६ . वर्षें सारखें केलें, व तें किति उत्तम केलें व त्यांनीं सभासदांवर कशी छाप बसविली होती तें डॉ. ब्लेनी यांनीं रावसाहेबांस लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसेलः—

" तुम्हीं आमची कड घेऊन आमच्या पक्षाचें समर्थन करण्यास उभे राहिलेत म्हणजे जें काम होईल तें मोठ्या सेनेच्या हातून होणार नाहीं " ( ३–२–७६ टॉमस ब्लेनी )

हें कसें तें दाखविण्याकरतां काहीं निवडक म्युनिसिपल प्रश्नांविषयीं त्यांनीं केलेल्या कांहीं भाषणांचा सारांश दिला आहे.

## पोलिसचा खर्च.

प्रथम दिलेल्या म्युनिसिपॅलिटीच्या इतिहासांत असें आढळेल कीं म्युनिसिपॅलिटीशीं पोलिसच्या बंदोबस्ताचा संबंध होता. तेव्हां पोलिस ठेवण्याला जो खर्च येतो त्याचा खर्च म्युनिसिपॅलिटीनें किति सोसावा व सरकारानें किति सोसावा या संबंधानें म्युनिसिपॅलिटी व सरकार यांच्यामध्यें बरेच दिवस मतभेद होता. जे. पीं.च्या संघानें तो खर्च सरकारनें म्युनिसिपॅलिटीजवळून घेऊं नये असा एकदां ठराव केला असतां म्युनिसिपॅलिटीच्या विधायक कामगारांनीं १८७१ च्या नोव्हेंबर महिन्यांत गेल्या दहा महिन्यांचा खर्च सरकारांत भरला. त्यावेळीं त्या कामगारांच्या विरुद्ध निंदाव्यंजक ठराव जे. पीं.च्या सभेपुढें आला असतां रावसाहेबांनीं एक स्वतंत्र ठराव आणला होता. तेव्हां त्यांनीं जें भाषण केलें त्याचा सारांशः—" म्युनिसिपॅलिटीच्या गरीब बिचाऱ्या काम-

गारांना, ( गरीब बिचाऱ्या असें म्हणतों कारण, ज्या सरकाराचे हे नोकर आहेत व म्हणूनच ज्या सरकारास हे शेवटीं जबाबदार आहेत, तें सरकार एका बाजूला व नवीन चेतना मिळाल्यामुळें आपली सांवरासांवर करीत बसलेली म्युनिसिपॅलिटी दुसऱ्या बाजूला ) अशा स्थितींत एक गोष्ट सांगतात तींतील दुर्दैवी मनुष्याप्रमाणें आपण कोणत्या बाजूला ओढून धरावें तें कळत नाहीं. म्हणून मी म्हणतों अशा कामगारांच्या वर्तनाचा निषेध करणारा हा जो ठराव आहे, तो लक्ष्यवेध करण्यास असमर्थ आहे. संधान सोडून प्रहार करणारा आहे. वार करण्याची जागा आणखी खोल आहे. कारपोरेशनची स्थापना एका कायद्याप्रमाणें झालेली आहे, तिचा संभाळ करण्यास आपण जर अगदीं सज्ज असलों नाहीं तर आपण आपलें कर्तव्य केलें नाहीं असें होईल. त्याच कायद्याच्या योगानें म्युनिसिपॅलिटीची संस्था व तिचा निधि यांची व्यवस्था चालावयाची आहे. तो कायदा मुंबईच्या काउन्सिलानें आम्हांस करून दिला आहे. त्याला गव्हर्नर जनरल यांची संमति मिळाली आहे व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं मंजुरी दिली आहे. व तो कायदा रद्द होई तोंपर्यंत म्युनिसिपल निधीवर आमचा हक्क केवढा आहे, तें निश्चित झालें आहे. त्यांत फरक होणें शक्य नाहीं; म्हणून मि. मॅक्लीन म्हणतात त्याप्रमाणें म्युनिसिपॅलिटीच्या अधिकाऱ्यांजवळून सरकारनें पैसे घेणें म्हणजे कोणत्याही खासगी व्यक्तीकडे जाऊन त्याच्या खजीनदाराला खजिन्यांतील पैसे वांटून टाक असें सांगण्यासारखें आहे. ज्या सरकारच्या हातांत त्यांची नेमणूक आहे त्या सरकारच्या सांगण्यानें ज्या म्युनिसिपॅलिटीच्या कामगारांनीं पैसे भरले त्यांच्याविरुद्ध नुसता एक निंदाव्यंजक ठराव आणून आमचें काम भागणार नाहीं. असल्या बाह्योपचारानें अन्तर्गत व्याधीचें शमन होणार नाहीं.

म्युनिसिपल कायद्याचें उल्लंघन सरकारच्या हातून होणार नाहीं असा कायदेशीर बंदोबस्त करितां येईल कीं नाहीं त्याविषयीं कायदे-पंडितांचा सल्ला घ्यावा. व जर याचा बंदोबस्त करतां येण्यासारखा नसेल तर आम्हीं अशा परिस्थितींत सांपडलों आहोंत कीं बजेटास मंजुरी देण्याचें साफ नाकारून म्युनिसिपॅलिटीचा सर्व कारभार स्वतांचे हातांत घेण्याची सर्व जबाबदारी सरकारावर टाकावी हेंच आमचें कर्तव्य होय !

पोलीसचा खर्च दिलाच पाहिजे हें प्रत्येकास ठाऊक आहे. परंतु एक वेळा बजेटास मंजुरी दिल्यावर मागाहून त्यांत फिरवाफिरव करण्याचा अधिकार जे. पीं.ना नाहीं ही गोष्ट सरकारास विदित असली पाहिजे. एक बारीकसा कायदा सरकारानें करावयाचा होता. व इष्ट तो फेरबदल करून घ्यावयाचा होता. परंतु तसें सरकारानें केलें नाहीं. मागेंच एक ठराव झाला होता, त्यामुळें सरकाराला पोलिसच्या खर्चाचा कांहीं एक भाग वहिवाटीप्रमाणें सोसावा लागत आहे. हा ठराव गैराशिस्त होता कीं नव्हता हा प्रश्न निराळा पण आजपर्यंत त्या ठरावाप्रमाणें सरकार वागत आलें आहे. व म्युनिसिपॅलिटीला जी परिस्थिति प्राप्त झाली आहे, तिला तेंच जबाबदार आहे. ही परिस्थिति म्युनिसिपॅलिटीनें आपण होऊनच आपणावर ओढून आणली नाहीं. आम्हीं कांहीं वर्षांपूर्वी म्युनिसिपॅलिटीच्या खर्चा संबंधें चवकशी करावयास सांगत होतों. तेव्हांच जर सरकारानें बंदोबस्त केला असता तर आमची स्थिति कांहीं निराळीच झाली असती व असा अपमानकारक प्रसंग आह्मांवर आला नसता. ह्मणून मी असा ठराव आणतों कीं मुंबई सरकाराच्या हातून म्युनिसिपॅलिटीच्या कायद्याचा भंग होऊं नये व लोकांच्या पैशाचे ट्रस्टी या नात्यानें आमचें संरक्षण होण्याकरितां आह्मीं ( जे. पीं.नीं ) काय खबरदारी घेतली पाहिजे, याविषयीं आमच्या अध्यक्षानीं कायदेपंडितांचा सल्ला घ्यावा. व याच्या

पुढें पुन्हां असें वर्तन घडल्यास कामावरून दूर केलें जाईल अशी इशारत म्युनिसिपॅलिटीच्या सर्व अधिकाऱ्यांस याच्या दरम्यान देऊन ठेवावी. हरएक प्रसंगीं जेथें कायदेशीर इलाज आहे, त्याला प्रथम मान दिला पाहिजे हें तत्त्व ध्यानांत ठेवावें." ( १६।११।१८७१ )

( ही सुचना पोल घेतल्यावर नामंजूर झाली असें दिसलें. )

कायदेशीर इलाज करून पाहिले पाहिजेत. हें तत्त्व रावसाहेबांनीं लोकांस मुद्दाम बजावून सांगितलें आहे. शिवाय आम्हीं सार्वजनिक पैशाचे ट्रस्टी आहोंत व ट्रस्टी या नात्यानें आपल्या हक्कांचें संरक्षण आम्हीं केलें पाहिजे हें पवित्र कर्तव्य आपणापुढें त्यांनीं ठेविलें होतें असें हें भाषण सांगतें.

## कॉन्टेजस डिसिझिस ॲक्ट.

( संयोगजन्य रोगाविषयींचा १८६८ चा चवदावा कायदा )

वरील कायद्याचें काम मुंबईंत सुरळित रीतीनें चालण्याकरतां मुंबईच्या म्युनिसिपॅलिटीनें कांहीं पैसा सरकारास द्यावा अशी मागणी सरकारनें मुंबई म्युनिसिपॅलिटीकडे १८८० सालीं केली. मुंबईंत एक रुग्णालय काढून तेथें वेश्याजनांची तपासणी नियमित काळीं करावयाची होती. अशा कामांत लोकांचा पैसा खर्च करणें अशास्त्र आहे अशी रावसाहेबांची खात्री होती म्हणून त्यांनीं कारपोरेशनपुढें वरील मागणीच्या विरुद्ध ठराव आणला.

आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ रावसाहेबांनीं माहिती पुष्कळ गोळा केली होती. आपले स्नेही डा. भाऊ, डा. भिकाजी अमृत चोबे, डा. अनंत चंद्रोबा, डा. कुना व वैद्यशास्त्र संपन्न तर्टे शास्त्री यांकडे पुढील प्रश्न उत्तरार्थ पाठविले होते.

१ मि. राबर्टसन यांनीं जे. पीं.च्या सभेंत असें विधान केलें कीं हल्लीं उच्च प्रतीच्या हिंदू लोकांत आनुषंगिक ( Secondary ) व मूळ

( Tertiary ) उपदंशाच्या रोगाचा प्रसार फार भयंकर झाला आहे. तर आपल्या मतानें मि. राबर्टसन यांचें म्हणणें खरें आहे कीं काय ?

२ असेल तर त्याच्या प्रतिबंधार्थ म्हणून केलेला हा कायदा उत्तम उपाय आहे कीं काय ?

३ मुंबई व इतर ठिकाणीं हा कायदा लागू केला पाहिजे किंवा कसें ? व त्याचा विचार करतांना हिंदू लोकांची सद्यःस्थिति मनांत आणून या कायद्याचे राजकीय, सामाजिक व नैतिक परिणाम काय होतील या मुद्याकडे विशेष लक्ष द्यावें.

सर्वांचें मत या कायद्याच्या विरुद्ध होतें.

तर्टे शास्त्री यांनीं विरुद्ध मत देतांना वाग्भट व सुश्रुत यांतील कांहीं उतारे देऊन, या रोगाच्या उत्पत्तीविषयीं कांहीं कारणें सांगून हल्लीं प्रसृत झालेल्या या रोगास फिरंग रोग असें ग्रंथान्तरीं नांव आढळतें त्यावरून याचें उत्पत्तिस्थान हिंदुस्थानाच्या बाहेर होतें असें लिहिलें होतें.

डॉ. अनंत चंद्रोबा यांनीं पुढें दिल्याप्रमाणें मत दिलें. "या कायद्यातर्फे बोलणाऱ्याच्या डोळ्यांपुढें युरोपांतील स्थिति उभी राहिलेली होती असें वाटतें. माझ्या बाहेर गांवच्या व येथील एकंदर २५ वर्षांच्या अनुभवांत इतर खण्डांतील रुग्णालयांत आढळणारें या रोगाचें भीतिदायक स्वरूप या देशांत मुळींच आढळलें नाहीं. मुंबईतील माझ्या १२ वर्षांच्या अनुभवानें उच्चप्रतीच्या लोकांत या रोगाचा प्रसार फार झाला नाहीं असें मी सांगूं शकतों. मध्यमवर्गांतील व उत्तम वर्गांतील मिळून सहाच रोगी माझ्या हातीं आले होते. लंदन शहरांत जसा या रोगाचा प्रसार झालेला आहे तसा येथें नाहीं. आमच्यांतील जी प्रशंसनीय लग्नपद्धति आहे— जी हिंदी समाजांत दुःखविमोचनाचें कार्य उत्तम तऱ्हेनें करीत आहे—

तिचा उपयोग उपदंशप्रसारास सर्वतः आळा घालण्यास उंच तटा-प्रमाणें झालाच पाहिजे. ”

“ नैतिक दृष्टीनें या कायद्याचा परिणाम समाजास अत्यंत विघातक होईल. ”

डॉ. भिकाजींनीं मत दिलें कीं उपदंश हा रोग कांहीं अगदीं खालच्या वर्गाचे लोकांत आहे. मध्यम वर्गांत फारच कमी प्रमाणांत आहे. व वरच्या वर्गांत सर्वांत कमी आहे. हा कायदा एका अर्थीं दुर्व्यसनास उत्तेजन देणारा आहे. कांहींही केलें तरी हा रोग समाजांतून समूळ नाहींसा करणें शक्य नाहीं, मात्र या कायद्यानें त्यां रोगापासून होणारे हाल कमी करतां येतील म्हणून भूतदयेच्या सबबीवरच याचें समर्थन करतां येईल.

रावसाहेबांच्या इतर कांहीं विलायतेस जाऊन आलेल्या मित्रांचेंही असेंच मत होतें. १२।८।८० ज्या पत्रांत मि. नवरोजी फर्दुन-जींनीं रावसाहेबांस लिहिलें होतें कीं, “ युरोपांतील पुष्कळ शहरांत सार्वजनिक रस्त्यांत फिरत येणाऱ्याजाणाऱ्या लोकांस त्रास देण्याची संवय जशी तेथील वेश्याजनास लागलेली आढळून येते तशी हिंदुस्थानांतील शहरांत येत नाहीं. ही मोठ्या सुखाची गोष्ट आहे. ”

रावसाहेबांनीं हा विषय हातांत घेतला आहे हें पाहून कांहीं दुसऱ्या नागरिकांकडून माहिती व सुचना येत; त्यांत एकानें अशी पृच्छा केली होती कीं, वेश्यांचीच तपासणी करावी असें काय त्यांनींच पाप केलें आहे ? तपासून त्या शुद्ध ठरल्यावर त्यांच्याकडे जाणाऱ्या व त्यांस फिरून अशुद्ध करणाऱ्या पुरुषांची कां तपासणी करूं नये ?

या कामांत रावसाहेबांस इंग्रज लोकांचा पाठिंबा होता. मुंबईच्या प्रमुख लोकांनीं एक अर्ज मुंबई सरकारकडे पाठविला होता. त्यावर पहिली सही मुंबईचे लार्ड बिशप ( ख्रिस्ती धर्माचे सर्वांत वरिष्ठ अधि-

कारी ) यांची होती. त्याच्याबरोबर मि. मॅक्लीन व ग्रेटन ग्रिअरी वगैरे इंग्रज लोकांच्या सह्या होत्या. सर मंगलदास प्रभृति पुष्कळ वजनदार हिंदी लोकांच्या सह्या होत्या.

रावसाहेबांची या विषयावर तीन भाषणें झालीं त्यांतील पहिलें टाऊन काउन्सिलांतलें ६।७।८० रोजीं व दुसरीं दोन २३।७।८० व १३।८।८० या तारखांस कारपोरेशनमध्यें झालीं. तीं नेहमींप्रमाणें मुद्देसूद व निर्भीड, पण शिष्टसंभाषणसंप्रदायास धरून होतीं. तीं ऐकावयास या कायद्याच्या विरुद्ध असलेली एक इंग्रज विदुषी गॅलरींत येऊन बसत असे. पहिलें भाषण श्रवण करून तिनें रावसाहेबांस एकपत्र लिहिलें कीं, 'तुमचें पहिलें भाषण ऐकावयास एक इंग्रज स्त्री अमुक ठिकाणीं जी बसली होती, ती मी. मी अमक्याची धर्मपत्नी. आपण होऊन जे जीवित धोक्यांत घालतात अशा कांहीं थोड्या लोकांच्या संरक्षणार्थ असला कायदा नको आहे. आह्मांला समदर्शी यथान्याय स्वरूपाचा कायदा पाहिजे.' नांव प्रसिद्ध करावयास बाईची मनाई असल्यामुळें नांव देतां येत नाहीं. परंतु या बाईनीं जी कांहीं इतर माहिती या विषयासंबंधें रावसाहेबांस लिहून पाठविली तीवरून असें दिसतें कीं या बाई फार विद्वान, विचारी व लोकोपयोगी कृत्यांस हातभार लावणाऱ्या होत्या. रावसाहेबांचीं भाषणें लार्ड बिशप यांनीं वाचून पाहिलीं व त्यांच्या मार्गे "उदात्त" हें विशेषण लावून १६।८।८० च्या पत्रीं प्रशंसा केली.

रावसाहेबांनीं या कायद्या विरुद्ध केलेलें भाषण वाचून डॉ. राजेंद्रलाल मित्र यांनीं रावसाहेबांस १८।७।८० चें असें पत्र लिहिलें. "हा संयोगजन्य रोगप्रतिबंधक कायदा हल्लींच्या सुधारणेच्या युगास कालिमा आणीत आहे. या युगांतील जनांचा तो धिक्कार करीत आहे. हरतऱ्हेनें तुम्हीं त्यास विरोध करीत आहांत हें फार चांगलें आहे. आमच्या कलकत्त्यास हा कायदा आहे. याच्या मोठ्या नैतिक आधींची मला कल्पना सुद्धां होत नाहीं.

याचा त्रास विविध आहे. मुक्तमर्याद विषयासक्त लोकांच्या हितापेक्षां त्यांचें अनहित अधिक करीत आहे. त्यांच्या शिवाय याची जरूरी कोणास भासत नाहीं. तुम्हीं म्हणतां तसा मूढ विश्वास आम्हांमध्यें आहे. तो आम्हांस मिळणाऱ्या शिक्षणाची पैदास आहे. जें जें कांहीं इंग्रज अथवा युरोपियन म्हणेल तें खरेंच असलें पाहिजे. संस्कृत वाङ्मयाचे शंकराचार्य म्हणजे वेबर साहेब ! म्हणून आम्हीं परकीयांपासून उसन्या घेतलेल्या या मतावर माझा विश्वास नाहीं ! वेबस्टरने रामायण लिहिलें व मॅक्समुल्लरनें वेद लिहिला असें कां म्हणू नये ? "

" संयोगजन्य रोगप्रतिबंधक कायद्यानें नीतीचा, पायांखाली तुडवून चिखल केला आहे. परमेश्वर मुंबईच्या लोकांचें यापासून रक्षण करो ! कलकत्त्यास याचे प्रयोग झाले ते समाधानकारक नाहींत. हा एक आचार भ्रष्ट करण्याचें साधन आहे. जांच करण्याचें यंत्र आहे. व हा ज्यांस चालवावा लागतो त्यांसही तो आवडत नाहीं. जे ह्याच्याखालीं सांपडतात ते ह्याचा द्वेष करतात. "

रावसाहेबांनीं सहा जुलई १८८० रोजीं टाउन काउन्सिलपुढें या विषयावर पहिलें भाषण केलें त्याचा सारांशः—१८७१ व १८७७।७८ सालीं पार्लमेंट सभेनें नेमलेल्या कमिशनांनीं जें मत दिलें तें वाचल्यावर या संयोगजन्यरोगप्रतिबंधक कायद्याचा अम्मल लागू करून घेण्याच्या सुचने विरुद्ध बोलतांना आणखी नवीं नवीं कारणें द्यावीं लागणार नाहींत. आजची सुचना माझ्या मताप्रमाणें सर्वांत विपरीत स्वरूपाची आहे. व मीं मुद्दाम असें सांगतों कीं, हिंदुस्थानच्या इतिहासांत असला उपाय योजलेला मिळणार नाहीं. मला सार्वजनिक कामाचा तीस वर्षांचा अनुभव आहे. मला या विषयावरील मोठमोठ्या इंग्रजी लेखकांचा व राज्यकारभारांतील कागदोपत्रांचा पूर्ण पाठिंबा आहे. १८७१सालच्या रॉयल कमिशनच्या रिपोर्टावरच कांहीं ' सुशील व प्रिय-

दर्शन लोकांनीं '( मी ज्यांतील एक आहे त्यांनीं ) हा कायदा मुंबईशहरास लागू करण्याविरुद्ध एक अर्ज सरकारांत पाठवून दिला आहे. कमीशनर म्हणतात 'वेश्याजनांचीं नांवें नोंदून त्यांची तपासणी नियत कालीं बळें करून करण्याच्या कायद्यास यश आलें नाहीं.' ही गोष्ट कायद्याचे प्रत्यक्ष परिणाम काय झाले त्याच्या पुराव्याची गोष्ट झाली. पुढें अध्यक्ष मि. मॅसी म्हणतात 'वैद्यशास्त्रदृष्ट्या उपदंश रोगास या उपायानें प्रतिबंध झाला हें खरें परंतु या उपायाकडे नीतिदृष्टीनें व सभ्य रीतीच्या दृष्टीनें पहातां कमिशनाच्या सभासदांपैकीं बहुतेक या कायद्यास संमति द्यावयास कबूल नाहींत. दर पंधरवड्यास या दुर्दैवी प्राण्यांची तपासणी करणें कीळसवाणें आहे. कांहीं प्रकारच्या गोष्टी बाहेर येत त्या तर फारच दुःखदायक असत.' आमच्या येथें तर दर आठवड्यास तपासणी झाली पाहिजे अशी मागणी झाली आहे हें ध्यानांत ठेवा. आतां मी रायल कॉलेजचें जें भिषक् मंडळ आहे त्याच्या अध्यक्षांचें मत [ जें माझ्या मतें प्रमाणभूत धरलें पाहिजे तें ] काय तें सांगतों. तसेंच पार्लमेन्टचे सभासद काय म्हणतात तें सांगतों.

नेक नामदार मि. हेवूले म्हणतातः—

'मीं या कायद्याच्या विरुद्ध मत देणार व त्याला एकच अगदीं साधें कारण आहे. व तें हें कीं नेहमीं पाप करण्याकरतां स्वच्छ जागा लोकांस मिळवून देण्याचें काम राजाचें नाहीं हा कायदा कोणत्याही देशास लागू केला कीं प्रथम नीतीची कल्पना नष्ट होते व नंतर लागलीच प्रत्यक्ष नीतिच भ्रष्ट होते. पहा या अभागी प्राण्यांस तुम्हीं न्यायाधिकारी लोक हाताशीं धरतां तें त्यांचें परावर्तन करण्याकरतां नव्हे. त्यांस प्रतिबंध करण्याकरतां नव्हे. त्यांची सुधारणा करण्याकरतां नव्हे. तर केवळ ज्या लोकांस तसलें अमंगल कृत्य करावयाचें असेल त्यांस उचित स्थल मिळावें म्हणून. या टिकला भांगला केलेल्या दैवहतक स्त्रियांस

पापांतच आनंद मानण्यास शिकवीत आहांत व जर त्यांच्या जवळ कांहीं शिसेरी भरण्यासारखें कांहीं असेल तर तें दूर करून त्यांस त्यांचा धंदा चांगला चालविण्यास अधिकच मोहक करून सोडीत आहांत असें शहरांतील मिळविलेली माहिती सांगत आहे. यास जर तुह्मीं नीतिभ्रंश ह्मणत नसाल तर कशास ह्मणाल ? कायदा करण्या-पूर्वीं माझें हेंच मत होतें व आतां सुद्धां हेंच आहे. अहो ! तुह्मांला खऱ्या वस्तुस्थितीचें ज्ञान नाहीं. कारण तुह्मीं तपासलेल्या वेश्यांकडे जाणाऱ्या पुरुषांची तपासणी कोठें करीत आहांत ? तुम्हीं त्यांस बरा होण्याचा स्वस्त मार्ग दाखवून तेथेंच त्यांस सोडीत आहांत ! ’

मि. स्टॅन्फेल्ड म्हणालेः—

‘ ख्रिस्ताची आज्ञा आहे कीं रोग बरे करा. पण ते व्यसनापासून परावृत्त करण्याकरतां. तुम्हीं रोग बरा करा असें म्हणतां पण तें कशा करतां तर या वेश्या जनांचा बाजारांत क्रयविक्रय होण्याकरतां ! हा दाखवून दिलेला भेद न समजण्या इतके पार्लमेंटचे सभासद मठ्ठ नाहींत. ’ असलीं भाषणें झाल्यावर दुसरें कमिशन बसविण्यांत आलें. तेव्हां प्रोफेसर हक्सले ह्मणाले ‘ असल्या कायद्यानें कोठेंही फायदा झाल्याचें शास्त्रीय पुराव्यानें सिद्ध झालें नाहीं. ’ ( येथें डॉ. कुक ह्मणाले प्रो. हक्सले हे प्राणिशास्त्र-वेत्ते असतील, अगदीं मोठे असतील पण शस्त्र वैद्य नाहींत )

रावसाहेब म्हणाले “ इंग्लंद, स्काटलंड व आयर्लंड येथील २०० नामांकित वैद्यशास्त्रविशारद लोकांचीं मतें काय आहेत तें दाखवून मीं असें सिद्ध करतों कीं कांहीं स्त्रियांस रोगापासून अभय देऊन त्यांस दुर्व्यसनी लोकांकरतां राखून ठेवण्यानें फायदा होईल हा भ्रम आहे.”

मि. डोसाभाईः—तें मत तुमचें तुमचे जवळ ठेवा माझ्यावर तें कोणी लादूं पाहील तर माझी हरकत आहे.

**रावसाहेब** पुढें ह्मणाले " माझ्या एकट्याचें मत काय आहे तें सांगण्याकरतां मी सभेचा इतका वेळ केव्हांही घेणार नाहीं. "

राजसत्तेनें व्यसनास आळा घालणारे कायदे कसे करावे या विषयाचें **लंदन युनिव्हर्सिटीचे** प्रोफेसर काय म्हणतात तें पहा:—

" तपासणी करतां चालविलेलीं इस्पीतळें ह्मणजे कुंटणखान्याहून दुसरीं नाहींत ! "

डा. **कुक**:—आमच्या कायद्यास असला हेतु डसवून देणाऱ्या या विधानाला माझी हरकत आहे.

**नवरोजी फर्दुनजी**.—वक्ता भाषण करीत असतां अशा रीतीनें मध्येंच अडथळा असा करावा काय ?

नंतर **रावसाहेबांनीं** पुष्कळ हास्पीटलांत काम करणाऱ्या डाक्टरांचीं मतें वाचून दाखविलीं. हा कायदा निरुपयोगी आहे असा त्या सर्वांचा मथितार्थ निघत होता. यांत कांहीं मतें डा. **शामराव नारायण**, डा. आत्माराम **पांडुरंग**, इत्यादि हिंदी डाक्तरांचीं होतीं. व त्यांस हिंदी लोकांच्या संबधींचें अधिक ज्ञान झालें असल्यामुळें मान द्यावा असें सांगितलें. नंतर मुंबईच्या **म्युनिसिपॅलिटीच्या** आरोग्यरक्षण खात्याच्या डाक्तरांचीं मतें वाचून दाखविलीं, तीं सर्व **रावसाहेबांस** अनुकूल होतीं. तशींच **मद्रास** व कलकत्ता येथील डाक्तरांचीं मतें वाचून दाखविलीं व शेवटीं सोल्जरांकरतां **क्रिमियन** लढाईंत फार कष्ट सोसणाऱ्या व त्यांच्यावर देखरेख ठेवणाऱ्या मिस् **फ्लारेन्स नाईटिंगेल** या परोपकारी बाईचें ( त्यांच्या मताला पुष्टि आणणारें ) मत सांगितलें.

नंतर **रावसाहेबांनीं** असें बजाविलें कीं, जर तुम्हीं मला येथें यश येऊं देणार नाहीं तर मीं **प्रथम ब्रिटिश प्रजाजन या नात्यानें व्हाईसरायांकडे अर्ज पाठवीन व अवश्य पडल्यास स्टेट सेक्रेटरी-**

**कडे पाठवीन व दोन्हीं ठिकाणीं फसल्यास प्रत्यक्ष पार्लमेंट सभेकडे धांव घेईन !**

नंतर लोककल्याणाकरतां सक्तीनें वेश्यांची तपासणी कां करूं नये, असें मि. डोसाभाई म्हणाले होते, तिकडे रावसाहेब वळले व म्हणाले " सक्तीनें जर देवी टोंचल्या नाहीं तर त्यांची बाधा आपोआप इतर सर्व जनतेला होईल. ती न होऊं देण्याचें त्यांच्या हातांत नाहीं. पण हा संयोगजन्य रोग आपण होऊन जडवून घेतल्याशिवाय कोणत्याही प्राण्याला होणार नाहीं. इतका मोठा फरक असतां देवी टोंचण्याची सक्ति या तपासणीच्या सक्तीशीं तोलतां येणार नाहीं. "

" आम्हांला नेहमीं असा टोमणा मारण्यांत येतो कीं, हिंदुस्थानांत लोकमत म्हणून कांहीं नाहींच ! आमच्या विभिन्न जातीय समाजांत आपल्या राजकीय, सामाजिक व नैतिक महत्त्वाची जाणीव सुधारलेल्या ब्रिटिश साम्राज्यांत हळुहळु उत्पन्न होऊं लागली आहे. म्हणून या वेळेस आमचीं वृत्तपत्रें व लेखक पुढें सरसावतील व हा कायदा पटावर ठेऊं दिल्याशिवाय मनुष्यमात्राचें कल्याण इतर सहस्रशः रीतीनें करतां येतें तें करण्यांत साहाय्य करतील असा भरंवसा बाळगतों " ( टाळ्या ) २३ जुलई रोजीं रावसाहेबांनीं कारपोरेशन मध्यें खालीं दिल्याप्रमाणें सूचना आणलीः—

" १८६८ च्या १४ व्या कायद्याप्रमाणें सरकार जें मुंबईस तपासणीचें इस्पितळ काढणार आहे, त्याच्या खर्चाकरतां मुंबई म्युनिसिपॅलिटीस मुळींच पैसा देतां येत नाहीं. "

मि. डोसाभाई फ्रामजी यांनीं डाक्तर कुक यांच्या पुष्टीसह उपसुचना आणली कीं:—

म्युनिसिपॅलिटीनें दर वर्षास येत्या सप्टेंबर महिन्यापासून १५००० रुपये देत जावे.

नंतर मुंबईच्या लार्ड बिशप साहेबांची ज्याच्यावर पहिली सही आहे असा एक मुंबई शहरांतील नागरिकांचा अर्ज या कायद्याविरुद्ध आला आहे व तो या विषयावरील सोबतच्या कागदपत्रांत सामील आहे असें रावसाहेबांनीं सांगितलें. व मागल्या भाषणांतील मुख्य मुद्यावर आणखी शास्त्रीय लोकांच्या मतांचा पुरावा आपल्या मताच्या तर्फेचा दिला. त्यांत असलीं इस्पितळें अन्यत्र ज्या डाक्तरांनीं चालविलीं त्यांचीं मतें होतीं.

" भूतदयेच्या दृष्टीनें उपदंश रोग बरा करण्याच्या हेतूनें नवीनच एकादें इस्पितळ काढाल तर मी माझ्या खिशांतून द्रव्य काढून देईन पण या कायद्याच्या अम्मल बजावणीकडे म्युनिसिपॅलिटीस कर देणाऱ्या नागरिकांचे पैसे द्या असें म्हणणार नाहीं." असें सांगून रावसाहेब म्हणाले " आज पंधरावर्षें इंग्लंदांत या कायद्यानें प्रस्थापित झालेलीं इस्पितळें आहेत. त्यांपासून फायदा न होतां एकजात हानिच झाली आहे. दुर्व्यसनाला मनोहरता आणिली आहे. उन्मार्गगामियांची भीति नष्ट केली आहे. व या विषयासंबंधें निषेधोचित भलभलत्याच कल्पना लोकांच्या डोक्यांत भरवून दिल्या आहेत. त्या आतां माझ्या देशबांधवांच्या तरुण पिढीच्या डोक्यांत या कायद्यानें शिरणार म्हणून तुमच्या हातांत असेल तेवढें तुम्हीं कराल अशी पक्की आशा मनांत बाळगतों. माझ्या तरुण देश-बांधवांस, या तपासण्या व हा प्राणी हा धंदा करण्यास योग्य आहे अशीं सर्टिफिकिटें इ० कल्पना अगदीं नवीन आहेत. या वेश्याजनांच्या धंद्याहून अधिक नीच धंदे मनुष्य जातींत प्ररूढ आहेत ते आधीं सुधारण्यासारखे आहेत असें मि. मिल म्हणतो तिकडे लक्ष द्या. "

नंतर १३ आगष्ट रोजीं रावसाहेबांनीं आपल्या आक्षेपकांस पहिल्या-प्रथम उत्तर दिलें. ' ज्या इसमांनीं कायद्याच्या विरुद्ध भाषण केलें त्यांचीं विधानें व्याप्ति अतिव्याप्ति या दोन दोषांनीं बाधित आहेत. व तीं विधानें मूळ वस्तुस्थितींत बदल करून केलेलीं आहेत, ' असें

डा. कुक म्हणाले तें उचित आहे काय असा प्रश्न रावसाहेबांनीं विचारला; त्यावर डा. कुक म्हणाले ' प्रतिपक्षांनीं खोटीं विधानें केलीं असें म्हणण्याचा माझा हेतु नव्हता. '

डा. कुक शिवाय म्हणाले होते कीं या कायद्याचा अम्मल यशस्वी न होण्यास एक कारण झालें तें कोणतें तर तें काम चालविणाऱ्या अधिकाऱ्यांची निवड करतांना काळजी घेतली नव्हती. त्यावर रावसाहेबांनीं प्रश्न विचारला कीं तुम्हीं डा. नॅप यांना का अनुलक्षून बोललेत ? तेव्हां डा. कुक यांनीं खुलासा केला कीं माझें डा. नॅप यांच्या वैद्यशास्त्राच्या ज्ञानाविरुद्ध कांहीं म्हणणें नव्हतें परंतु मी व डा. हन्टर यांचें म्हणणें असें होतें कीं या कायद्याची अम्मलबजावणी त्यांच्यानें होण्यासारखी नव्हती.

या चर्चेंत असें निघालें कीं कोणी एक अधिकारी निवडले गेले होते त्यांची परीक्षा कसलीही उतरलेली नव्हती व त्यांचे नांव मि. ॲन्डरसन असें होतें. त्याचा उल्लेख करून रावसाहेबांनीं पृच्छा केली कीं जर वैद्यविद्यापारंगतास जें काम साधत नाहीं तें करण्यास एकादा मनुष्य ज्यास वैद्यकीय ज्ञानाचा गंध नाहीं ( मग तो मि. ॲन्डरसन असो वा डा.ॲन्डरसन असो अथवा दुसऱ्या कसल्या तरी पदवीचें धारण करणारा असो ) असा मनुष्य नेमलेला आहे तर त्याचा पगार देण्यास आमचा पैसा खर्च करणें गैर वाजवी नाहीं काय ? मागच्या पेक्षां आतां अपयश येण्याचा अधिक संभव नाहीं काय ? येथें डा. कुक यांनीं पुन्हा उठून खुलासा केला कीं डा. नॅप यांच्या बुद्धिमत्तेबद्दल मला शंका मुळींच नाहीं. ते वैद्यकीचा धंदा करण्यास अगदीं लायक आहेत. तेव्हां डा. नॅप यांच्या अब्रूला कमीपणा आतां येणार नाहीं म्हणून आनंद वाटतो असें रावसाहेब म्हणाले. नंतर आपल्या तर्फे हॅन्सर्डच्या पार्लमेन्टरी रिपोर्टांतून कांहीं पुरावा वाचून दाखविला. व डा.

कुक आपल्या भाषणांत जातां जातां म्हणाले कीं, वेश्याधर्म हिंदुधर्म-विहित आहे. व या वाक्याच्या पुष्ट्यर्थ जेजुरीच्या मुरळ्या व कोंकणांतील भाविणी यांकडे बोट दाखविलें. या वाक्याचा समाचार घेतांना रावसाहेब म्हणालेः—डा. कुक यांस अल्पांशानें सुद्धां हिंदुधर्माचें ज्ञान नाहीं व असणें शक्य नाहीं. जगभर सर्व समाजांत कांहींना कांहीं तरी अनिष्ट प्रकारच्या चाली असतात. त्यांचें निर्मूलन करण्याचे प्रयत्न सफल होत नाहींत. इकडे बालहत्या असली तर पृथ्वीच्या दुसऱ्या गोलार्धांत तशीच बालहत्या कारणभिन्नत्वानें प्ररूढ आहे. युरोपांत ( baby farming ) बेबी फार्मिंग आहे. मी या गोष्टीचा उपयोग करीत आहें तो त्यांची नालस्ती कारण्याकरतां नाहीं. मुरळ्यांचें अस्तित्व हें सामाजिक उत्सर्गाप्रमाणें आहे. त्यांचा हिंदुधर्माशीं संबंध नाहीं. युरोपांत असेच सामाजिक उत्सर्ग असतांना त्यांचाही खिस्ती धर्माशीं संबंध नसतो हें सर्व विश्रुतच आहे. कोणी मला मुरळ्यांच्या संस्थेस हिंदुधर्मांत आधार आहे असें कोणाचें वचन आधारादाखल दाखवील तर तें चुकीचें आहे, असें दाखविणें माझें कर्तव्य आहे. मी आज तीस वर्षें हिंदुधर्मशास्त्रविषयक ग्रंथांचा अभ्यास करीत आहे. व मोठमोठ्या विद्वानांच्या संसर्गानें मला ज्ञान प्राप्त झालें आहे. त्यामुळें हिंदुधर्म शास्त्रांत मुरळ्यांच्या संस्थेस आधार नाहीं असें निक्षून सांगतां येतें. ( सभासदांनीं या बोलण्यास संमति दिली. )

नंतर डॉ. ड्रिसडेल यांचें मत रावसाहेबांनीं वाचून दाखविलें तें असेंः—"या अनीतिकारक धंद्याला लायसेन्स ( परवाने ) दिल्यानें फ्रान्स देशांतील नीतीचे नाण बोध झालें आहे. नियत कालीं चालविलेल्या तपासण्यांनीं स्त्रियांची लज्जा नष्ट झाली आहे." पुढें रावसाहेब म्हणाले "असें असतां ज्या कार्यापासून फलनिष्पत्ति होईल कीं नाहीं असा संशय आहे त्या कार्यांत लोकांचा पैसा खर्च करावा काय असा प्रश्न

साधारणपणें समंजसपणा असलेल्या मनुष्यानें विचारावयास नको काय? कोणच्या तरी दुर्व्यसनास उत्तेजन येण्यास लोकधेनूचें दुग्ध कां पिळून काढावें? या नीतिभ्रष्ट प्राण्यांची सुधारणा तुम्हीं कोठें करीत अहांत? फलाण्या फलाण्या वेश्या आपल्या धंद्यास लायक आहेत असा दाखला तुम्हीं देणार व अशा स्त्रियांच्या कुण्टणखाना चालविण्याच्या धंद्यास तेजी आणणार! असल्या गैरशिस्त तत्त्वांवर रचलेल्या कायद्याच्या अम्मल बजावणीच्या खर्चाकरतां एक पै देण्यांत मी सामील होणार नाहीं." [ टाळ्या. ] नंतर १५००० वर्गणी देण्याची उपसुचना [ मि. डोसा भाईनीं आणलेली व डॉ. कुकर्नी अनुमोदन दिलेली. ] सभासदांच्या विचारास दाखल केली ती १७ विरुद्ध ३३ मतांनीं नामंजूर झाली.

या एकंदर वृत्तांतावरून हातीं घेतलेलें काम, कसें झटून दीर्घ परिश्रमानें रावसावहेब तडीस नेत असत तें दिसून येत आहे. दुसरी गोष्ट लोकांच्या पैशाचा व्यय कसा होत आहे त्याविषयीं किती सावध रहात तेंही दिसून येत आहे. एवढ्या करतांच लोकांच्या पैशांनीं भरलेल्या म्युनिसि-पॅलिटीच्या तिजोरीचे संरक्षक पहारेकरी असें म्युनिसिपॅलिटीविषयक पुस्तकांत रावसाहेबांस अनुलक्षून मि. वाच्छा यांनीं म्हटलें आहे. कोणी निष्कारण भलतींच विधानें आपल्या धर्माविरुद्ध केलीं असतां त्यांस तत्काल उत्तर देऊन गप्प बसविण्याचें समर्थ्य यांच्या आंगीं दिसून येत आहे.

## मुंबईचें ड्रेनेज

### ( मलमूत्र वाहून नेण्याचे नाले. )

१८७० सालीं नामदार सर रिचर्ड टेम्पल, मुंबईचे गव्हर्नर, यांनीं बसविलेल्या एका कमिशनचें मत असें पडलें कीं पुरीषोत्सर्ग, जमिनींतून बांधलेल्या गटारांतुन सोडून देण्याची पद्धति मुंबई शहरास लागू पडेल;

परंतु हें मत १८६९–७० सालच्या सरकारी कमिशननें दिलेल्या मताच्या विरुद्ध पडलें; ह्मणून यांतील खरें कोठलें त्याचा शोध रावसाहेब करूं लागले. त्यांस नवीन योजना भयावह वाटली ह्मणून त्यांचे स्नेही नानाभाई राणिना यांच्या साहाय्यानें एक घरवाल्यांचें मोठें मण्डळ स्थापण्याचा व त्याच्यामार्फत वरील विषयांवर चर्चा करण्याचा व पुढें आलेला प्रश्न सोडविण्याचा रावसाहेबांनीं संकल्प केला. त्याप्रमाणें त्यांनीं लोकांच्या कांहीं सभा भरविल्या व डा. ब्लेनी यांनीं प्रथम व्याख्यानें दिल्यावर आपण स्वतां वरील विषयावर व्याख्यानें दिलीं.+ पहिली सभा २३ दिसेंबर १८८२ रोजीं फ्रामजी कावसजी हॉलमध्यें भरली. दादाभाई नवरोजी यांचे सुचनेवरून सर जमशेटजी जीजीभाई यांनीं अध्यक्ष पद स्विकारिलें. मग रावसाहेबांनीं इंग्रजींत भाषण केलें त्याचा सारांश.

" युरोपांतील लंदनच्या आरोग्याचा इतिहास या विषयावर पहिला निबंध प्रथम १८४४ सालीं स्टॅटिस्टिकल सोसायटीपुढें वाचला गेला, तेव्हां युरोपमध्यें आरोग्यशास्त्र निर्माण झाल्याचें वृत्त लोकांच्या कानीं आलें. या पूर्वीं आतां विलक्षण वाटणारे कांहीं आरोग्यशास्त्रविषयक नियम ब्रिटिश साम्राज्याच्या राजधानींत मानले जात परंतु आरोग्य शास्त्र असें कांहीं तोंपर्यंत निर्माण झालेलें * नव्हतें. आज आपण ज्या इमारतींत जमलों आहोंत त्या ठिकाणाच्या आसपास पुरीषोत्सर्ग ज्यांत सोडून देण्यांत येत असे अशीं गटारें होतीं, असा सर टेंपल यांच्या कमिशननें आपला ग्रह करून घेतला आहे. कारण अशीं गटारें येथें नव्हतीं

+ मि पेस्तनजी कामा यांचे मार्फत बंद गटारांची पद्धत चीन देशांत कॅन्टन व शांघाय प्रांतांत होती ती विषयीं माहिती रावसाहेबांनीं आणविली होती.

* जें जें करण्याचा विलायतेस वूट निघाला असेल त्याचे त्याचे प्रयोग येथें करीत बसावयास नको. असें सांगण्याचा रावसाहेबांच्या बोलण्याचा रोंख दिसतो.

व नाहींत; म्हणून त्या चुकीच्या पायावर गटारांतून पुरीषोत्सर्ग सोडण्याचें सारें आख्यान या कमीशननें रचलेलें आहे." या शहराच्या एका अभागी भागाचा म्हणजे कामाठीपुऱ्याचा उल्लेख करून रावसाहेब म्हणाले "एखाद्या बलीवर्दाच्या दृष्टिपथावर तांबडी चिंधी पडली म्हणजे तो जसा बुझतो तसा या भागाच्या नांवाचा उच्चार कांहीं जणांच्या कर्णपथावर पडला कीं ते बुझतात." ( टाळ्या )

"पण* तो भागच मला पुष्कळ वर्षांपासून प्रतिनिधि निवडीत आला आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळा जे. पीं. नीं माझी पुन्हां निवड करतांना एवढें मताधिक्य दाखविलें कीं माझा उद्योग अन्यूनपणें चालू ठेवण्यास मला फार उत्तेजन आलें आहे." ( टाळ्या )

"नागरिकांतील भिन्न भिन्न वर्गांतील वजनदार लोकांचा मोठा समूह या आमच्या सभांत येत आहे व आमचीं व्याख्यानें लक्षपूर्वक, आस्थेनें व उत्साहानें ऐकून आमचें ह्मणणें समजून घेत आहे हें पाहून असें स्पष्ट वाटतें कीं शहराच्या ड्रेनेजची व्यवस्था कशी करावी या विषयींचें लोकांत असलेलें अज्ञानतम दूर करण्याकरितां जो कोणी तर्क लढवून प्रकाश पाडील तो या शहरच्या लोकांवरच नव्हे तर सर्व हिंदुस्थानावर उपकार करीत आहे असें जर एखादा ह्मणेल तर कृत्रिमपणाच्या दोषास पात्र झाल्याशिवाय त्याचें ह्मणणें खोटें आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं." ( टाळ्या )

"असें असतां ज्या नाल्यांच्या व्यवस्थेवर आमच्या व आमच्या मुलांबाळांच्या जीविताची सुरक्षितता अवलंबून आहे तीविषयीं आह्मीं जी सप्रमाण माहिती देतों तीवर टीका करतांना आह्मीं दिलेली माहिती

* ज्या मतदार लोकांनीं दोन वेळां निवडून माझा सन्मान केला त्यांच्या तर्फेनेंच निवडून येण्याची माझी इच्छा आहे अशी खात्री ठेवा (कराडी लिंगू यांस पत्र)

खरी आहे कीं खोटी आहे तें पाहण्याचें बाजूस ठेऊन आमचे हेतू चांगले नाहींत असें ह्मणण्याचें प्रतिपक्षी धाडस करतात हें पाहून मनास फार खेद होतो. ग्रेट ब्रिटन व इतर युरोपांतील देशांत दिवसानुदिवस वृद्धिंगत होणाऱ्या सनदशीर राज्यव्यवस्थेचीं जीं शहाणपणाचीं तत्त्वें आहेत त्यांना धरूनच आह्मीं यशप्राप्तीच्या प्रीत्यर्थ लढत असतां आमच्या घरगुती प्रश्नांवर आह्मीं चर्चा करीत असतां, जो कोणी आमची निंदा करील तो हिंदी शिक्षणाच्या वृक्षाला ( ज्याला आज कलकत्त्यास बसलेलें कमीशन बळकटी आणण्यास पाणी घालीत आहे त्याला ) घाय करून त्याचा जीवनरसच शोषून घेत आहे असें म्हटलें पाहिजे. आज आम्हीं ज्या तऱ्हेच्या विषयावर चर्चा करणार आहोंत तसल्या विषयावर आपलें स्वतंत्र मत निर्भीडपणें देण्यास आधीं कोणी ( निदान या इलाख्यांत तरी ) फारसा पुढें सरसावत नाहीं. ही गोष्ट शोचनीय आहे. न जाणों आम्हीं जाणून बुजून नसलों तरी चुकत असूं; म्हणून जो कोणी तें दाखवून देईल त्याचे आम्हीं आभारच मानूं." इतकी प्रस्तावना करून मुख्य विषयाकडे रावसाहेब वळले व म्हणाले "हल्लीं ज्या प्रकारची नाल्यांची व्यवस्था दिसून येते त्याच प्रकारच्या नव्हे पण कोणत्या तरी एका प्रकारच्या ड्रेनेजच्या व्यवस्थेचें ज्ञान या देशांत सर्व खेड्यापाड्यांतील लोकांस होतें व आहे त्यांत ढवळाढवळ इष्ट नाहीं. खताकरतां जपून राशी करून सांचविलेलें गोमय अमूकच ठिकाणीं ठेवलें पाहिजे असा एक वट हुकूम कांहीं प्रांतांत सोडिलेला होता. परंतु हा हुकूम लवकरच रद्द करण्यांत आला. पुष्कळ वर्षांपूर्वीं मराठींत छापलेलें डा. गिब्सन यांचें एक लघु पुस्तक जो कोणी पाहील त्यास खेड्यापाड्यांतील लोक आरोग्य शास्त्राच्या नियमांचें उल्लंघन केल्याशिवाय आपलीं कामें चालवीत होते असें त्यास कळून येईल. आमच्या राज्यकर्त्यांच्या उदार नीतीमुळें जें लोकांमध्यें एक नैतिक व बौद्धिक बळ उत्पन्न होत आहे त्याचा फायदा जर खरोखर घेण्याची सरकारला इच्छा असेल ( नव्हे मला वाटतें तशी

इच्छा सरकारला वाटत आहे. ) तर प्रमाणांकित सर्व तऱ्हेची माहिती आरोग्यविषयक नियम व कायदे करण्याचे हेतू, व त्यांचीं कारणें हीं सर्व छापून जितक्या आणवतील तितक्या प्रसिद्धीस तीं आणावीं अशी सुचना करतों. "

" कलकत्ता रिव्ह्यू भाग २७ या मधील डा. शेव्हर्स यांचा लेख वाचा. त्यांत असें म्हटलें आहे कीं कुराण व हिंदुधर्मशास्त्र यांत असे कांहीं आरोग्यविषयक नियम घालून दिले आहेत कीं ज्यांचें पालन सूक्ष्म रीतीनें केलें असतां तेवढ्यानेंच आरोग्य रक्षणाचें कार्य होईल."(टाळ्या)

" मि. शेव्हर्स पुढें म्हणतातः–घन व द्रवीभूत असें मलमूत्र मिसळून गटारांतून वाहून नेतां कामा नये. तीं पृथक् ठेवण्याचा आपला हेतु असला पाहिजे. सोनखत हें होतां होईतों जमिनींतच मिसळवून दिलें पाहिजे. म्हणजे त्याच्या स्वाभाविक पृथक्करणानें जमिनीला खत मिळून शेतांतील पिकांस पुष्टि येते. एका मोठ्या रसायन शास्त्रवेत्त्यानें म्हटलें आहे कीं इंग्लिश लोक स्वच्छ आहेत पण आपल्या शेतास ग्वॅनो नांवाची पांखरांची शींट खत म्हणून बाहेर देशातून आणतात व त्याच्याहून अधिक किंमतीचें आपलें खत समुद्रांत साफ धुवून टाकतात. "

" चीन देशांत कचऱ्याचा कणशः शेतीकडे उपयोग करून घेतात. मग हिंदुस्थानांत तसा कां करून घेऊं नये? हा बेत जरा कल्पना सृष्टींतच शक्य असणारा वाटतो. तथापि अगदीं दाराशीं घाण म्हणून पडून राहणारा कचरा रोगराईचा उद्भव होऊं दिल्याशिवाय जमीनीचा जमीनीला परत देण्याची काळजी घेतां येईल असा एक या शास्त्रीय युगांत काल येईल. "

" वास्तविक पाहूं गेलें असतां घामटपणा हा हिंदुस्थानच्या लोकांत त्यांचा देहस्वभाव म्हणून आढळून येत नाहीं. अगदीं कनिष्ठ वर्गांतले

लोक जे दारिद्र्यांत बुडालेले आहेत ते मात्र अस्वच्छ आहेत. कलकत्त्याच्या येथून सोसायटीपुढें दिलेल्या व्याख्यानांत एक व्याख्याते ह्मणाले 'या देशांत रोगाचा प्रतिबंध करणे ही कल्पना नवीन आहे.' ह्या व्याख्यात्यांचें मत चुकीचें आहे असें ह्मणणें मला भाग आहे."

"ज्यांनीं संस्कृत ग्रंथ (विशेषतः आचारावरील) वाचले आहेत त्यांस असें आढळून येईल कीं त्यांतील नियम फार कडक नसले तरी फार विस्तृत प्रकारचे असून गांवांतील घाण नाहींशी करण्याच्या कामीं फार उपयुक्त आहेत. आमच्या वैद्यशास्त्रावरील संस्कृत पुस्तकांचा चांगला सूक्ष्म रीतीनें अभ्यास केला असल्यामुळें मी असें सांगूं शकतों कीं रोगाचा प्रतिबंध कसा करावा व आरोग्याचें रक्षण कसें करावें यांवरच कांहीं नियम करण्यांत त्या ग्रंथकारांचा मोठा कटाक्ष आहे. कांहीं नियम तत्त्वज्ञान स्वरूपाचे आहेत. कांहींस धर्मावगुण्ठन दिलेलें आहे. तथापि तुम्हीं शास्त्रीय दृष्टीनें या नियमांकडे पाहूं लागलां तर त्यांत फार उपयुक्त ज्ञान सांठविलेलें आहे असें आढळेल. मी सांगतों त्यावर विश्वास ठेवा. तुमच्या नवीन पद्धतीचे सायफन व आंत हवा शिरणार नाहीं अशा तऱ्हेनें डांक लावून ज्यांचीं तोंडें मिळविलेलीं आहेत असें नळ आमच्या कोट्यावधि लोकांच्या बुद्धीस अगम्य आहेत म्हणून जर तुम्हांला आमच्या बहुसंख्य समाजास बरोबर घेऊन योग्य रीतीनें इष्ट स्थलप्राप्ति करून घ्यायची असेल तर आतां समाजांत जी उच्च व सन्मान्य पदवी तुम्हांस प्राप्त झाली आहे तीस साजेल असें वर्तन तुम्हीं केलें पाहिजे. वर सांगितलेल्या आचारविषयक नियमांत हटवाद मुळींच नाहीं. त्यांतील तत्त्वज्ञान अगदीं साधें आहे व कालांतर झालें तरी, स्थित्यंतर झालें तरी, किंबहुना युगांतर झालें तरी, ते नियम निराबाध राहतील. मी आतांपर्यंत हिंदुलोकांच्या आचारविषयक नियमांविषयीं जें बोललों तेंच पार्शी व मुसलमान या लोकांविषयीं बोलूं शकतों. या दोन्हीं लोकांचा स्वच्छता ठेवण्याविषयीं विशेष कटाक्ष आहे." [ टाळ्या ]

" परंतु आतांच्या युगाकडे पाहिलें तर आमच्यांत कृत्रिमपणा फार वाढला आहे व त्यापासून मोठें भय उत्पन्न झालें आहे. सुधारणेच्या समुद्रांत प्रवास करीत असतां मार्गांत खडक आहेत. त्यांची नक्की जागा ओळखूं येण्याकरतां पाण्यांतील तरत्या बुरुजांची अवश्यकता आहे. ते असतील तर आमचें राजकीय व सामाजिक तारूं खडकावर आदळणार नाहीं. आतां आपण पुढें येऊन व्यवहारज्ञान वापरून कार्य करावें याविषयीं निर्भीडपणें मत दिलें पाहिजे. "

"मानवी बुद्धीवरील आपल्या निबंधांत मि. लॉक म्हणतो ' पत्रामध्यें कांहीं अनिष्ट बातमी असेल या भीतीनें तें कांहींजण वाचीतच नाहींत ! व कांहींजण तर कठीण स्थिति आढळून येईल म्हणून हिशोबच करीत नाहींत !' असला प्रकार आम्हांला आमच्या परिस्थितींत कामाला येणार नाहीं. शास्त्र हें सृष्टीच्या बाहेरून कोठून आलें नाहीं. सृष्टीच्या नियमांवरच त्याची रचना व वृद्धि होत असते. तें साधें आहे. नियमनिश्चित आहे. सहज दृष्टोत्पत्तीस येणारें आहे. अनलंकृत आहे. म्हणून नीरस वाटेल, चित्ताकर्षक नसेल, पण विनयशील आहे. युक्तिप्रयुक्तीनें वाहवा मिळविण्याऱ्या लालसेची त्याला बाधा झालेली नाहीं. म्हणून जो कोणी एखादी ड्रेनेजची व्यवस्था लावण्याची एकादी स्वाभाविक योजना पुढें आणील व त्या योजेनेनें मी सांगितलेला कार्यभाग होत असेल, तर तिला धरून बसा. दुसरी तिच्याहून चांगली योजना हातीं आल्याशिवाय मी तुम्हांला विनवणी करून सांगतों तिला सोडूं नका व अन्यत्र चुकून जाऊं नका. अत्यंत स्वच्छता ठेवणें व लोकांवर येणाऱ्या सर्व तऱ्हेच्या आपत्ती टाळणें हें तुमचें कर्तव्य आहे. तें करीत असता मार्गच्युत करणारें कोणत्याही बाह्यरुचिर निष्प्रयोजक शब्दावडंबराला भुलून जाऊं नका. कोणती योजना उत्तम ह्याचा शोध करीत असतांना आपल्या मार्गांत येणाऱ्या मोठ्या अडचणी विविध आहेत. त्या दूर केल्या

पाहिजेत. त्या मसीना नामक सामुद्रधुनींत शिरतांना दोहोंबाजूस असलेल्या सिला नामक राक्षसाप्रमाणें व कॅरिबडीस नामक भोंवऱ्याप्रमाणें आहेत; ह्मणजे एकास दूर ठेवून जावें तर दुसऱ्यांत घसरून जाण्याची नाविकास भीति उरतेच. मुंबई शहरच्या ड्रेनेजची व्यवस्था करण्याविषयींची नवी योजना ( जी आजपर्यंतच्या योजनांत क्रमानें पांचवी आहे ती. ) खुद्द लडनमध्यें किंवा ग्रेट ब्रिटनमध्यें कोणत्याही शहरांत असलेल्या व्यवस्थेपेक्षां फार आघाडी मारून पुढें गेलेली आह ! अखिल युरोपखंडात ज्या पंडितांनीं उत्तम आरोग्यविषयाचें ज्ञान मिळविलें आहे, त्या सर्वांत मि. चॅड्विक हे जरी श्रेष्ठ नसले तरी ग्रेट ब्रिटन येथील पंडितांत या विषयांत प्रमाणभूत आहेत. त्यांचें मत लंडनच्या नाल्यांविषयीं काय आहे तें पाहूं. ते ह्मणतात 'लंडन शहरांत जमिनीच्या खालून गटारें बांधल्यानें व त्यांत सोनखत सोडून दिल्यानें पुढील काळांत भीति वाटण्यासारखी स्थिति प्राप्त झाली आहे.' मि. चॅड्विक यांनीं आपलें मत विलायतेंत प्रसिद्ध केलें. तेथील हवा वादविवादांत उलट सुलट बोलणाऱ्या उभयपक्षांस मानवते."

"परंतु आमच्या येथें पहा., आमचे सर्जन जनरल, वैद्यकीय खात्याचे मुख्य, ( मीं व्यक्तिविषयक बोलत नाहीं. मी हें अधिकारपद धारण करणाऱ्यांविषयीं बोलतों. ) यांनीं त्या विशिष्ट पदावर आरूढ झाल्यावर अधिकारी या नात्यानें एकदां मत दिलें, ह्मणजे एकंदर वैद्यक खात्यातील सर्व अधिकारी शिष्टाचारास अगर समयौचित्यास बळी पडून भिन्न मत तिराईत म्हणून देण्यास अगदीं नालायक होतात !" ( टाळ्या )

" मोठमोठ्यांनीं निकाल दिलेल्या कामांत विरुद्ध मत प्रतिपादन करणें साहसांत गणिलें जाईल ! परंतु आज ' मलमूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यांची व्यवस्था या सारख्या ' विषयावर जर मानलेला शिष्टाचार

बाजूला ठेवला नाहीं तर आह्मीं स्वतांचें व आमच्या सर्व वर्गाच्या शहरवासिजनांचें अगणित नुकसान करणार आहोंत ! " ( टाळ्या )

" म्युनिसिपॅलिटीसारख्या सार्वजनिक संस्था एखादा पंथ स्वीकारीत असतांना तो अनिष्ट आहे असें कोणास आढळलें तर पुढें येऊन तो पंथ कसा चुकीचा आहे तें दाखवून देण्याचें त्याचें कर्तव्य आहे. वास्तविक असल्या समूहवाचक संस्था या एक टीकाकार म्हणतो त्याप्रमाणें अशरीर असल्यामुळें त्यांस लाथ मारतां बसत नाहीं व अनात्म असल्यामुळें तारतांही येत नाहीं ! म्हणून आतां वजनदार घरांच्या मालकांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून या योजनेची नीट वाट लावली पाहिजे. आतां स्थानिक स्वराज्याची योजना तयार होत असतां आम्हांस यश येईलच. आमचें सर्व सामर्थ्य खर्च करून सरकारास साहाय्य करणें हें या आम्हां कीर्तिमंत साम्राज्याच्या नागरिकांचें कर्तव्य आहे. मला कांहीं अधिकारी ठाऊक आहेत त्यांस असें वाटतें ( व कसें तें सांगतांना मला दुःख होत आहे. ) कीं समाजाला विचार करण्याचा जो अधिकार आहे त्याची अनन्यसाधारण मालकी आपणा एकट्यांसच असावी ! " ( टाळ्या )

"परंतु दुःखांत सुख एवढें आहे कीं आतां कांहीं वर्षांपूर्वीं स्थिति होती ती उरली नाहीं. आतां आम्हांस स्वातंत्र्याचें वारें लागलें आहे. ड्रेनेजच्या व्यवस्थेच्या बाबतींत आम्हांला जर लंडनच्या वर ताण करावयाची आहे तर युरोपांत एकाद्या ग्रामपुरोहिताच्या भूमीवर त्याची जेवढी सत्ता असते तेवढी आम्हांला म्युनिसिपॅलिटीच्या कामांत असली पाहिजे, याचा तुम्हीं विचार करा." थोरल्या कायदे कानू करणाऱ्या सभेंत आमच्या प्रतिनिधींचा अभाव आहे असें सांगून रावसाहेब ह्मणाले " याचा आतां मी उल्लेख करीत आहें कारण आतां त्याला प्रसंगच तसा आला आहे. तो थेट तुमच्या चुलीपर्यंत धांव मारणार आहे. तुम्हांला तो टाळतां

येणार नाहीं अशी जबाबदारी तुमच्यावर येऊन पडणार आहे. म्युनिसिपॅलिटीच्या दुसऱ्या कोणत्यातरी विषयानें तुम्हांमध्यें जागृति उत्पन्न करून त्यांत मन घालावयास तुम्हांस लावलें नाहीं तरी हा मुंबई शहराच्या व इतर शहरांच्या मलमूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यांच्या व्यवस्थेचा विषय म्युनिसिपॅलिटीस प्राणभूत असल्यामुळें तुम्हांस तो हयगय करूं देणार नाहीं. एक चूक तुमची या कामांत होऊंद्या म्हणजे शंभर जीवांची हानि झालीच ह्मणून समजा."

"ही गोष्ट मात्र आमचे म्युनिसिपल कमीशनर यांस जितकी चांगली समजली आहे तितकी दुसऱ्या कोणास समजली नाहीं. हें त्यांच्या सकाळीं प्रसिद्ध झालेल्या पत्रावरून दिसून येत आहे. सोनखत गटारांत सोडून देण्याच्या योजनेंत पुढचें राहूंद्या, पण सध्यां तरी फरक करण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे व कायमचा फरक करतील अशी आशा बाळगून ठेवतों. आजवर कमिट्या व कमीशनें किती बसलीं? व त्यांचे रिपोर्ट किती झाले? परंतु त्यांचीं मतें परस्पर विरोधी निघालीं. कांहीं वरळीच्या समुद्रांत ड्रेनेज मिळवून देण्याच्या विरुद्ध डॉ. ब्लेनी प्रमाणेंच आहेत. शेवटल्या कमीशननें एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें आहे."

"मुंबईचे वायुशास्त्रवेत्ते काय म्हणतात तें यांच्या गांवींही नाहीं. वायुशास्त्राप्रमाणें वर्षांतून ८ महिने वरळीच्या बाजूनें वारे वहात राहिले पाहिजेत. म्हणजे वर्षांतून ८ महिने पूतिगन्धीनें दूषित अशी हवा सर्व शहरभर पसरून राहणार! कांहींनीं हायकोर्टांतून हुकूमनामे मिळविण्याविषयीं बोलणें केलें आहे, परंतु एक मनाई हुकूम निघाला आहे त्याच्या पायीं म्युनिसिपॅलिटीला ३०० रु. महिना भुर्दंड भरावा लागत आहे. मी जें ह्मणतों कीं आठ महिने सृष्टिनियमाप्रमाणें वरळीकडून वहाणाऱ्या वाऱ्याबरोबर दुर्गन्धि सर्वत्र पसरते त्याच्या खरेपणाबद्दल मलबारहिल, महालक्ष्मी व खंबालाहिल या नांवानें प्रसिद्ध असलेल्या शहराच्या भागांत दुर्दैवानें

ज्यांस रहावें लागत आहे ते साक्ष देतील. त्या सर्वांस मी विनवून सांगतों कीं फक्त एवढ्याचा शोध चांगला करण्याकरतां एक लहानशी कमिटी बसवा त्रासाकडे पहावयाचें नाहीं. परंतु आपल्या स्वतांच्या व स्वतांच्या कुटुंबाच्या आरोग्याकडे पहावयाचें आहे. इतकें केलें तर परिणामी कांहीं फायदा होईल. ( टाळ्या ). सरते शेवटीं एक सांगतों कीं, कोणताही उपाय योजणें तो घाईनें योजूं नका. आमची म्युनिसिपॅलिटी घाई करीत नसते. हल्लींची नाल्यांची दुःस्थिति ही तुमच्या हेळसांड करण्यानें व उदासीन रहाण्यानें प्राप्त झाली आहे ! म्युनिसिपॅलिटीस साहाय्य करा, सरकारास उपयोगी पडा ह्मणजे कांहीं चांगली युक्ति निघेल. तुह्मीं स्तब्धपणें एका जागेवर स्थिर बसणें शक्य नाहीं ! तुह्मीं जाग्यावरून हललेंच पाहिजे. तें मागें ह्मणा अथवा पुढें ह्मणा ! पण पुढें जाणें हें बहुतेक अशक्य दिसत आहे. तथापि आह्मांला काय पाहिजे आहे तें नीट समजून घेऊन पुढें जाऊं लागलांत तर तें साध्य आहे. मला रिकामी ओरड नको आहे. धीरानें काम करा अशी शिफारस करतों. आज आह्मांपुढें असलेली ड्रेनेजची व्यवस्था जी भीतिदायक स्थितीला जाऊन पोंचली आहे तिचीं कारण आमची व आमच्या कारपोरेशनची हयगय व आळस हीं दोन आहेत."

"समुद्राकडील वारा १८ तास वहात असतो तो आमच्या हातांत जेवढें होण्यासारखें आहे तेवढें सर्व करून तो वारा शक्य तितका शुद्ध राहील असें केलें पाहिजे. व ज्या सुचनेच्या योगानें समुद्राच्या वाऱ्यांतील आरोग्यावह गुण कमी होईल ती सुचना मी भयावहच समजतों."

"मलेरिया रोगाला वारा फार दूरवर वाहून नेऊं शकतो तें साष्टी बेटांतील दलदलीच्या जागा मुंबईच्या आरोग्यास कशा नडतात त्यावरून सिद्ध होत आहे." मुंबईच्या आसपास जीं खाजणें व दुसऱ्या निंद्य अशा नापिक जमिनी आहेत त्यांचा उपयोग मळाच्या कामीं केला

तर सरकारचा फायदा होईल ह्मणून त्या जमिनी सरकारनें म्युनिसिपॅलिटीस द्याव्या असें मि. क्राफर्ड यांनीं दिलेलें मत व स्टेट सेक्रेटरी यांचा त्या अर्थाचा खलिता नंतर रावसाहेबांनीं वाचून दाखविला. त्याप्रमाणेंच वरळीच्या समुद्रांत मलमूत्र सोडून दिल्यास सर्व शहराची हवा विषारी होईल असा इषारा देणारा मि. ॲटकिन्स यांचा रिपोर्ट रावसाहेबांनीं वाचून दाखविला. नंतर रावसाहेब ह्मणाले "मीं मंडळींचा वेळ पुष्कळ घेतला असूनहीं माझें ह्मणणें अर्धेच सांगून झालें व अर्धे राहिलें या करतां ज्यांनीं माझें ह्मणणें लक्ष देऊन ऐकण्याची मेहेरबानी आज केली ते जर पुन्हा तशीच करतील तर मीं माझें ह्मणणें पुढच्या सभेंत पुरें करीन." २३।१२।१८८२

रावसाहेबांचें दुसरें व्याख्यान ६।१।१८८३ रोजीं इंग्रजींत झालें त्याचा सारांशः—"मागल्या व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें सोनखताविषयीं लिहितांना १८७९ च्या कमीशननें एक खोटा ग्रह करून घेतला होता. तो असा कीं, सोनापुर व डुक्करवाडी येथें सोनखत ज्यांत सोडून देण्यांत येत अशीं गटारें होतीं. मलमूत्र वाहून नेण्याचा नाल्यांचा विषय फार महत्वाचा आहे; यास्तव कलकत्त्याचे डा. मॅक्डोनाल्ड म्हणतात त्याप्रमाणें वादविवादांत नेमस्तपणा राखला पाहिजे व ज्या गोष्टींचा आधार म्हणून ध्यावयाचा आहे त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल सूक्ष्म विचार केला पाहिजे. एवढ्याकरतां मी खालील प्रश्न म्युनिसिपॅलिटीच्या आरोग्य खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडे पाठवून त्यांची उत्तरें आणविलीं आहेत."

प्रश्नः—जमिनीच्या पोटांतून बांधल्याजाणाऱ्या गटारांत हवा खेळती ठेवण्याची काय व कशी तजवीज केली आहे?

उत्तरः—५-६ चौरस इन्ची शॅफ्टसनीं.

प्रश्नः—हल्लीं जीं जुनीं मध्येंच द्वारें ठेविलीं आहेत त्यांचें काय करावयाचें ?

उत्तरः—कृत्रिम रीतीनें हवा खेळवितांना तीं बंद करावयाचीं. परंतु आंत मळ सोडतांना व तपासणी करतांना उघडीं ठेवावयाचीं.

प्रश्नः—यापुढें असलीं द्वारें ठेवणार कीं नाहीं ?

उत्तर.—तपासणीकरतां व स्वच्छतेकरतां तीं अवश्य आहेत.

प्रश्नः—घरांशीं, गल्लींशीं, रस्त्याशीं मुख्य गटाराचा संबध जुळवण्याकरतां शॅफ्ट्स ठेवणार किंवा नाहीं ?

उत्तरः— होय.

प्रश्नः—डा. कुक यांच्या म्हणण्याप्रमाणें चिमण्या ठेवणार कीं नाहीं ?

उत्तरः—नाहीं !

प्रश्नः—रोज दरमाणशीं संडास धुऊन टाकण्याकरतां किती गॅलन पाणी खर्च करणार ?

उत्तरः—नेमके किति तें सांगतां येणार नाहीं. परंतु खालील तीन प्रकारांनीं सफाई करावयाची; ( क ) मळ चुरडून पूड करणें; ( ब ) आपोआप संडास स्वच्छ ज्यांच्या योगानें करतां येतील अशीं पाण्याचीं टांकी ठेवणें; ( क ) समुद्राच्या पाण्याचा उपयोग करणें. ( ड ) दरमाणशीं दररोज २ गॅलन पाणी देणें.

"गृहस्थहो ! कलकत्त्याचे डा. मॅकडोनाल्ड हे दर माणशीं ३० गॅलन पाणी मागत आहेत. वरील उत्तरांत दाखल झालेल्या योजनेसारख्या योजनेविषयीं ( लॅन्सेट, वैद्यकशास्त्रावरील लंदन येथें निघणारें मासिक, १८८२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अंकांत) काय ह्मणत आहे तें पहा."

"जमिनींतून घातलेल्या गटारांस मध्यें द्वारें करून लोखंडाच्या ताड्या तोंडाशीं बसवून तीं उघडीं टाकणें व आंतून हवा खेळवण्याकरतां

शॅफ्ट्सची योजना करणें इत्यादि उपायांस तें मासिक अपायकारक म्हणत आहे. मृत्यूचे वाडे असें नांव देऊन लंडनच्या महालांचें वर्णन करतांना तें ह्मणतें:–' हे राजवाडे झोंपड्यांपेक्षां वाईट आहेत ! गटारांतून उद्गीर्ण झालेली विषारी हवा वाड्यांतून नळ्यांच्या मार्फत शिरत राहील ! इ० × × × × ' असल्या उपायांशीं आम्हांला कांहीं कर्तव्य नाहीं ! ' अहो ' पण आमच्यांतील कोणी थोडक्या कारणानें मूर्छित पडणारे लोक म्हणतील ' १७ लक्ष आधींच आमचे या कामांत खर्च झाले आहेत ! म्हणून आपण गोळी गिळली तर सगळी गिळली पाहिजे ! मग काय वाटेल तें होवो ! ' गृहस्थहो ! मीं तुम्हांस या मार्गाचें अवलंबन करण्यास सांगणार नाहीं. मीं तुम्हांस विनंति करून सांगतों जरा थांबा ! विचार करा व तुम्हांला योग्य दिसेल तें करा. "

" मागील खेपेला तुम्हांला मी वरळी येथें आणून सोडलें होतें. आतां दैनिक पत्रांत एक गृहस्थ येथें कसलीही दुर्गंधि नाहीं असें मत प्रदर्शित करीत आहे ठीक आहे ! त्याविषयीं आमची खात्री करून देण्याकरतां ज्या ठिकाणीं पंपानें पाणी समुद्रांत सोडून देण्यांत येत आहे, त्याच्या संनिध त्या गृहस्थानें घर बांधावें व जी गंधावह हवा तेथून निपजेल तिचा उपभोग खुशाल एकट्यानें आनंदानें घ्यावा ! "

नंतर रावसाहेबांनीं दोन तीन कमिशनांचीं वरील योजनेविरुद्ध असलेलीं मतें वाचून दाखविलीं. त्यांत पश्चिम समुद्रांत गटारांतील पाणी सोडणें हें समुद्राकडील आरोग्यावह वारे दूषित करणें आहे. असें डा० लीथ यांचें मत होतें व जवळ जवळ तशींच मतें. डा० ह्यूलेट व डॉ० रॉलिन्सन यांचीं होतीं त्यांचा उल्लेख केला.

नंतर गटारांत विषारी वायू कसे उत्पन्न होत असतात तें शास्त्रीय पद्धतीनें दाखवून त्यांतच मळमूत्र मिश्र केलें असतां विषमज्वर व पटकी यां सारख्या भयंकर रोगांचे जंतू कसे उत्पन्न होतात तें रावसाहेबांनीं

सांगितलें व म्हणाले "या रोगांनीं पछाडलेल्या लोकांची मळमूत्राची गटारांत भर पडली म्हणजे त्यांच्या वाढीला फायदेशीर अशी जागा सांपडते; परंतु वरील रोगांनीं पछाडलेल्या लोकांचें मळमूत्र खुल्याजागेंत टाकलें असतां सूर्याच्या उन्हाच्या तडाक्यांत तें सुकून गेल्यानें रोगांचे जन्तू मरून जातात ! परंतु सर्व शहरभर घरांना गटारांशीं जुळवणाऱ्या नळांचें जाळें रोगांच्या जंतूंच्या वाढीस अनुकूल अशा परिस्थितींत पसरल व त्यांतून रोगी व निरोगी या सर्वांचें मळमूत्र वाहूं लागलें म्हणजे त्या जंतूंच्या आयुष्याचा विमा उतरल्यासारखें होऊन पुढें पुढें या शहरांतील पाण्याचा पुरवठाच दूषित होऊन वरील रोगांची सांथ उत्पन्न होण्यास साहाय्य होतें. गटारें बांधण्यांत तुम्हीं वाटेल त्या तऱ्हेचा माल वापरलात, तरी तें टळणार नाहीं अशी खात्री देतां याव-याची नाहीं. म्हणून जेथून मळमूत्र वाहून नेणारीं गटारें बांधलीं आहेत तेथून अथवा त्यांच्या जवळून पिण्याच्या पाण्याचा नळ घालणें हेंही धोक्याचेंच आहे. या करतां गटारांचा घरांशीं संबंध नसावा व शह-रांतील गटारें होतांहोईतों उघडा असावीं."

"हिंदुस्थानांत आरोग्य रक्षणार्थ योजावयाच्या विविध उपायांविषयीं पार्लमेंटचे रिपोर्ट आहेत. त्यांत डा. बेअर यांचें ह्मणणें दिलेलें आहे तें असें. 'मुंबईंतील घरांचा संडासांशीं संबंध नाहीं. ते अगदीं दूर बांधलेले असतात, ह्मणून रस्त्यांतील गटारें बांधण्यास कांहीं हरकत नाहीं.' हें मत आतां बाजूला ठेऊन जमिनींतून बांधलेल्या गटारांतून मळमूत्र मिसळावयास सांगून व तशा गटारांचा संबंध नळ्यांनीं घरांशीं जोडून मृत्यूला आमंत्रण देऊन उंबरठ्याशीं त्याची स्थापना करण्यास सांगत आहेत !"

"असा माझ्या पुढें पुरावा असल्यानें गटारांचा संबंध घरांशीं नळ्यांनीं ठेवण्याची योजना जी पुढें आली आहे तिला विरोध करावा लागत आहे, ह्मणून वाईट वाटतें. रस्त्याच्या बाजूचीं उघडीं गटारें ( ज्यांचें नांव

निघालें असतां हसण्याचा शिष्टपणाचा प्रघात पडला आहे तीं ) बांधण्याची शिफारस नुकती आतांपर्यंत होत असे. तीं कुंभारवाड्यांत मि. ब्रॅहॅम, डे. इंजिनियर, यांनीं बांधलेलीं होतीं. कामाठीपुऱ्यांतील गटारांच्या उघडेपणामुळेंच तीं चांगल्या हवेच्या संसर्गानें बाहेर दुर्गंधि पसरवीत नाहींत. असें डा. वेअर ह्मणतात. गटारें उघडीं ठेवलीं व गटारांचा घरांशीं नळांनीं संबंध जोडला नाहीं ह्मणजे गटारांतून घरांत घातक वायू शिरणार नाहींत. मीं तीस वर्षें अनुभव घेतलेल्या एका शास्त्रज्ञाचें मत घेतलें आहे. तो म्हणतो आम्हांस एका क्रीडाश्वावर बसवून डुलविण्यांत येत आहे. मीं पुढें म्हणतो कीं, या क्रीडाश्वाचें जीन व लगाम डुक्करवाडी व धोबीतलाव येथून लटोपटींचीं आणलेलीं आहेत ! " * नंतर स्कोबल कमिशनचा रिपोर्ट रावसाहेबांनीं आपल्या तर्फे असलेला वाचून दाखविला. त्यानंतर ज्या खोलींत मनुष्यें रहातात तिच्याशीं कोणत्याही गटाराचा संबंध ठेवतां कामा नये, असें ज्यांत स्पष्ट म्हटलेलें आहे तो गणेशखिंडींतील गव्हर्नर साहेबांच्या बंगल्यातील मळमूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यांच्या व्यवस्थेविषयीं रिपोर्ट वाचून दाखविला. मि. लॅम्सडेन, सॅनिटरी कमीशनर, यांचा त्याच मताचा रिपोर्ट रावसाहेबांनीं वाचून दाखविला, तो असा:— लंदन शहरांत असले प्रकार पुष्कळ आहेत, गटारांविषयीं सर्व अनर्थ टाळावयाला एकच उपाय आहे. तो हा कीं, गटाराचा घराशीं संबंध ठेवतां उपयोग नाहीं ! पुढें रावसाहेब म्हणाले:—

" ही अवस्था जर गणेशखिंडींतील एका राजवाड्याची तर २४००० मुंबईच्या घरांची काय होईल ? "

* डुक्करवाडी व धोबीतलाव येथें पहिलीं जमिनींतून वहाणारी गटारें होतीं असा खोटा समज अधिकाऱ्यांनीं करून घेतला आहे. असें प्रथम रावसाहेबांनीं सांगितलें होतें. त्यांस अनुलक्षून हा अलंकार वापरलेला आहे.

" १८७९ सालीं मी कामाठीपुऱ्याचे तर्फें निवडून आलों असतां तेथील गटारांची व्यवस्था पाहून आलों. डाक्टर वेअर बरोबर होते. आह्मीं ही सुधारणा केली, ती केली अशी फुशारी मारतों. कोणी अधिकाऱ्यानें नवीन योजना आणली म्हणजे ती मंजूर करतांना तो जबाबदार आहे असें म्हणतों व ती योजना अमलांत आलीच पाहिजे असें मत देतों ! या जबाबदारीचा अर्थ काय ? या नळ्या घालण्याबद्दल मॅनहोल्स ठेवण्याबद्दल व सर्व कामाठीपुऱ्याभर मृत्यूचा सुलभ संचार करून देण्याबद्दल कोण जबाबदार आहे ? पुन्हां विचारतों कोण जबाबदार आहे ? असें असतां जे आम्हीं या योजनांचे विरुद्ध येथील व विलायतेंतील पुरावा आणून हजर करतों त्यांस दोष देण्यांत येतो. कारण आधिकारिकी यक्षिणीच्या कांडीनें तुमच्या डोळ्यांपुढें उत्पन्न झालेला भ्रम दूर करतों. ! "

"आतां आमचे टीकाकार ह्मणतात 'पण काय हो ! आह्मीं १७ लाख आधींच खर्च करून बसलों आहोंत ते !' खरें ! त्यावर मी विचारतों आणखी खर्च करून आमच्या पैकीं आणखी मुलें माणसें मारून कां द्यावीं ! "

"१८७८ च्या हिंदू पेट्रियट मध्यें टेम्स कानसर्व्हेटर्सचा रिपोर्ट आला आहे. तो पहा. त्यांत ते ५ कोटी खर्च होऊनही ड्रेनेजची व्यवस्था चांगली झाली नाहीं असें गाणें गात आहेत. खुद्द लंडन शहरच्या ड्रेनेजच्या व्यवस्थे संबंधें सर्वांत मोठे प्रमाणभूत शास्त्रज्ञ मि. चॅडविक् काय म्हणतात तें पहा:—घरांमध्यें गटारांत उत्पन्न झालेले विषारी वायू नेऊन सोडण्याची ही व्यवस्था म्हणजे एक नलिकायंत्रच झालें आहे ! × × याच विषारी वायूमुळें पुष्कळ सरकारी कचेऱ्यांच्या इमारती सोडून अन्यत्र जाण्याची वेळ आली होती. " नंतर १८७९ मध्यें टाईम्समध्यें एक लेख या प्रकारच्या व्यवस्थेच्या विरुद्ध आला होता. तो रावसाहेबांनीं वाचून दाखविला. व म्हणाले " १८७९ मध्यें जर ही

स्थिति होती तर आतां आठ वर्षांतच ही अपायकारक ठरलेली व्यवस्था मुंबईस हितकारक होईल इतका फरक होण्यास ज्वालामुखी पर्वताचाच प्रचण्ड स्फोट झाला पाहिजे एरव्हीं होणार नाहीं."

नंतर मागील कमीशनांच्या मतांवर १८७० चा सरकारी ठराव नवीन व्यवस्थेला प्रतिकूल असलेला वाचून रावसाहेब म्हणालेः—

"गृहस्थहो आह्मीं टीका केली ह्मणजे ती विनाशात्मक आहे. रचनात्मक नाहीं असें ह्मणतात. त्यावर मीं विचारितों आह्मांला रचना कोठें करूं देत आहेत?"

"एकावर एक योजना करण्याचे हे प्रकार कसे आहेत? तर पहिल्या गांवठी शाळेंत जाणाऱ्या हिंदी मुलाची गोष्ट सांगतात तसे. तींत सांगितल्याप्रमाणें एक मुलगा होता तो बी रुजत घाली, वर पाणी शिंपी व लागलीच एक दोन दिवसांनीं उकरून पाही असे करतां करतां बी पहिल्यापेक्षां बिघडली आहे असें पाहून अगदीं त्रासून जाई. मग पुन्हां बी जमिनींत पुरून टाकी व असा क्रम तीनचार वेळां केल्यावर ती बी रुजण्याचा प्रयत्न करून न वाढतां मरून जाई!"

"हीच स्थिति आमच्या सांडपाण्याच्या व्यवस्थेची आहे. एक कमिटी बसते. ती एक योजना तयार करते. ती योजना कशी काय फलद्रूप होते तें पाहून झालें नाहीं तोंच ती बाजूला सारून दुसरी कमिटी बसविण्यांत येते. तिची वाट मागल्या कमिटीप्रमाणेंच लागते. तिसरी कमिटी बसते व तिची कळी उमलल्या पूर्वींच कुरतडून टाकण्यांत येते. शेवटीं मि. स्कोबलचें कमीशन बसतें. एक दीर्घ श्रमावह योजना तयार होते. कारपोरेशन तिला संमति देते. त्याप्रमाणेंच पूर्वींच्या अवनत कालांतील मामलेदारा प्रमाणें हेंही कमीशन अश्वारूढ होत्सातें आमच्याकडे पाठ करून धांवत येतें कारण त्याचेंही काम निरुपयोगी म्हणून बाजूला सारण्यांत येऊन नवीन कमीशन बसण्याचा संभव असतो!"

" १८७० च्या शेवटल्या ठरावानंतर आमच्या अनेक पिढ्या झाल्या असें समजण्यांत येतें. आमचीं सर्व घरें पाडून पुन्हां बांधलीं गेलीं आहेत असें मानण्यांत येतें. आमच्या शेंकडों वर्षांच्या चालीरीती ज्यांस आम्हीं इतक्या चिकाटीनें धरून बसतों त्या सर्व अगदीं पार बदलून गेल्या असें धरून चालतों व आमच्या कारपोरेशनच्या कांहीं सभांत मंजुरी मिळते व नवें कमीशन जन्मास येतें व मागच्यावर स्वार होतें. मागें काय झालें तिकडे पहात नाहीं व अगदीं शेवटला रिपोर्ट जो होईल ( म्हणजे स्वतांचा ) तो केवळ शेवटला म्हणून मान्य करितें. अशा रीतीनें मळ-मूत्र वाहून नेणाऱ्या नाल्यांच्या व्यवस्थेंत ज्या अडचणी आहेत त्या कागदोपत्रीं तरी दूर होतात. जर अशी वस्तुस्थिति आहे तर अशा सर्व योजना निष्फल झाल्याच पाहिजेत असें मी जोरानें सांगतों व त्या निष्फल व्हाव्या हेंच योग्य आहे. त्या योजनांच्या थड्यावर त्यांच्या मृतीचें कांहीं कारण लिहावयाचें अवश्यक ठरल्यास मी असें लिहीन कीं, या योजना त्यांच्या अतिशयेंकरून नष्टजीव झाल्या. "

सर जमशेटजी अध्यक्ष ह्मणालेः—" व्याख्यात्यांचीं मतें तींच आमचीं मतें असें ह्मणावयास सभेस असलेले श्रोते बांधलेले नाहींत. तथापि काळोखांत उडी घेऊन खाड्यांत पडण्यांत धोका आहे. ह्मणून जरा थांबून विचार करण्यास जो व्याख्यात्यांनीं कळकळीचा उपदेश केला तो अत्यंत उपयोगी आहे. लोकांमध्यें शहरवासिजनाचें जीवित ज्यावर अवलंबून आहे त्या प्रश्नाची याच्या अगोदर वाटाघाट सुरू झाली नाहीं, ह्मणून वाईट वाटतें; परंतु या गोष्टीचा मुळींच आरंभ न करण्यापेक्षां उशीरां करणें बरा. "

मि. फिरोजशा मेथा ह्मणालेः—हीं व्याख्यानें फारच प्रशंसनीय झालीं. डा. सखाराम अर्जुन यांनीं त्यांस पुष्टि दिली. नंतर एक कमिटी नेमण्यांत आली. तिनें वर्गणी गोळा करून हीं व्याख्यानें छापून काढून

तीं लोकांस वांटावीं व मुंबईसरकार व हिंदुस्थानसरकार, यांच्या नजरेस वरील मलमूत्रविसर्जनाच्या पद्धतींत काय दोष आहेत ते आणून द्यावे असें ठरलें.

या व्याख्यानांचा परिणाम चांगला झाला. डाक्तर ब्लॅन्क यांनीं ( जे मलमूत्र गटारांत सोडण्याच्या तर्फेचे होते त्यांनीं ) पुढें येऊन एक उत्तरादाखल व्याख्यान दिलें, त्यांत ते ह्मणाले कीं तूर्तच मलमूत्र या नव्या गटारांत सोडूं नये. बाकी ह्या नव्या तऱ्हेच्या योजनेनें पूर्वींपेक्षां स्वच्छता अधिक चांगली राहील. या व्याख्यानास स्वतां नामदार गव्हर्नर साहेब, हायकोर्ट जज्ज व पुष्कळ सरकारी अधिकारी हजर होते.

त्यानंतर लोकांत चर्चा पुष्कळ सुरू झाली. ती चालू ठेवण्याकरितां रावसाहेबांनीं पुन्हां एक मुंबई गॅझेटमध्यें पत्र छापून प्रसिद्ध केलें होतें त्याचा सारांशः—

तुमच्या पत्राची मौल्यवान जागा व तुमचा मौल्यवान वेळ मीं हें पत्र लिहून घेतला नसता परंतु आज आमच्या पुढें जो प्रश्न आहे तो जर नीट रीतीनें सोडविण्यांत आला नाहीं तर आमच्या जीवास धोका येणार आहे. तो मला बोलावयाला लावीत आहे. आतां माझे युरोपियन व हिंदी मित्र विचारतात "काय हो ! असें होतें तर इतके दिवस कां बोललां नाहींत ?" त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, होय. मी बोललों पण माझे शब्द ऐकतो कोण ?

पुढें या पत्रांत मागील व्याख्यानांचा सारांश देऊन रावसाहेब लिहितातः—

"जे उंच टेकडींवर राहतात ते निंच मैदानावर राहणाऱ्या लोकांस हंसतात ! मी सर्व सार्वजनिक व्याख्यात्यांस विनंति करून सांगतों कीं बाबांनो कडक जोरदार अथवा अलंकृत भाषा म्हणजे सत्य नव्हे, शास्त्र नव्हे किंवा सबळ कारण नव्हे"

" आम्हांला आतां सरसपणें सांगण्यांत येतें कीं, सृष्टीच्या नियमांचा आश्रय सोडा, कलेला व तिच्या साधनांस मान द्या."

" स्थानिक स्वराज्य हें नुसतें शब्दावडंबर नसेल तर अधिकाऱ्यांच्या पाशांतून तें मोकळें असलें पाहिजे."

" राऊळांत देव कोठलाही स्थापित असूंद्या. सत्तादेवीपुढें तेवढा स्वाभाविक रीतीनें कांहीं तरी धूप जाळण्यांत येतोच हें खरें आहे. परंतु आह्मीं मात्र असल्या देवतोपासनेपासून दूर चाललें पाहिजे. असें न केल्यास विनाशप्राप्ति होईल. कारपोरेशननें कांहीं प्रयोग करून पहाण्यास मंजुरी दिली आहे परंतु ते प्रयोग करण्यांत आले आहेत कीं नाहीं किंवा कसे केले आहेत तिकडे कोणीही पाहिलें नाहीं. नवे नवे उपाय व त्यांच्या योजनेकरितां पैशांची भरती वारंवार चौकशी केल्याशिवाय करण्यांत येत आहे. हें पाहिलें ह्मणजे आम्हां नगरवासिजनांस राजकीय मूर्छा आली आहे व तिच्या दुसऱ्या अवस्थेप्रत पोंचलों आहोंत. हें स्थानिक स्वराज्याच्या प्राप्तीला विघातक आहे." ( ३१।५।१८८३ )

या मोठ्या व्याख्यानांच्या मोठ्या सारांशावरून रावसाहेबांच्या अंगचे कांहीं विशिष्ट गूण दिसून येतात. १ सार्वजनिक हिताची कळकळ, २ ड्रेनेज सारख्या महत्त्वाच्या विषयावर तद्ज्ञ लोकांमध्यें मतभेद झाला असतां आपली स्वतांची बुद्धि चालवून त्यांतलें तथ्य शोधून काढण्याची आवड, ३ तत्त्वशोधनार्थ पडतील ते श्रम करण्याची हौंस, ४ विरुद्ध मताच्या लोकांशीं हटवाद न सांगतां युक्तिवाद करण्याची प्रवृत्ति, ५ युक्तिवाद करतांना शिष्टाचाराचें सदैव अवलंबन करणें व ६ सार्वजनिक प्रश्न सोडवितांना सरकारास साहाय्यभूत होणें. हे गूण अनुकरणीय आहेत. हल्लीं ज्याला त्याला सार्वजनिक हिताची कळकळ सुटली आहे अशा काळांत या भाषणांचा फार उपयोग होईल व मळमूत्र वाहून नेण्याचे नाले कसे बांधावे तें त्यांस समजून येईल.

रावसाहेबांचें हें मत शेवटपर्यंत कायम होतें. पुढें घरांतील मोऱ्या या बंद केलेल्या गटारांशीं जोडवयाचा प्रश्न निघाला तेव्हां ते कलकत्यास होते. त्यांनीं तेथून हरकिसनदास यांस लिहिलें कीं सव्वा कोट रुपये खर्च होईल त्याला भीत नाहीं परंतु घरांतील मोऱ्या अशा गटारांशीं जोडण्यानें प्राणघात होईल. १०।१।१८८६

रावसाहेबांच्या अशा कांहीं कांहीं कामागिऱ्यांबद्दल कांहीं म्युनिसिपल रिपोर्टांत प्रशंसापर उल्लेख आहेत.

## चितायंत्रें

१८८७ सालीं मुंबई म्युनिसिपॅलिटीच्या कारपोरेशनच्या सभेंत हिंदू लोकांतील जातिहीन लोकांची प्रेतें त्वरित भस्म करून टाकण्याचीं यंत्रें आणविण्याची योजना पुढें आली होती, तिला विरोध करतांना रावसाहेबांनीं एक ठराव आणला तो असाः—हिंदूंपैकीं जातिहीन व दुसऱ्या कांहीं लोकांचीं प्रेतें दहन करण्याचीं यंत्रें उभारण्याची योजना कारपोरेशनला मान्य होणें शक्य नाहीं. असें करणें हिंदूंच्या धर्मशास्त्रा-विरुद्ध आहे. या भट्टयांचा विचार निघतांक्षणीं समग्र हिंदुसमाज साशंकित झाला आहे. सर्व देशभर, चिता रचून मृतांचें दहन करण्याची जी साधी पद्धति आहे, तीप्रमाणें दरिद्री हिंदूंचीं प्रेतें दहन करण्याकरतां जो खर्च येईल तो चालविण्या करतां धर्मार्थ कांहीं रक्कम म्युनिसिपॅलिटी देण्याचें करील.

नंतर कमिटीच्या तर्फे दिलेलें मत आह्मीं परत घेतों अशा अर्थाचा ( सर ) हरकिसनदास व थॅकरसी मूळजी यांचा अर्ज रावसाहेबांनीं वाचून दाखविला. त्याप्रमाणेंच कांहीं जातींचे मुख्य मुख्य पुढारी लोक, मुंबईचे शास्त्री, पंडित गट्टुलालजी गोस्वामी, देवकीनंदनाचार्यजी यांचे अर्ज व दुसरा मुंबईकरांचा अर्ज प्रविष्ट करून रावसाहेब म्हणालेः—

" १८६८ सालीं मि. क्राफर्ड यांनीं हा प्रश्न उपस्थित केला होता. त्या वेळेसच त्यांनीं कलकत्ता येथें असला प्रेतदहनाचा प्रकार यशस्वी झाला नाहीं असा रिपोर्ट केला होता. "

" आणखी दहा वर्षांपूर्वीं मर्गेलिया आणि कंपनी यांच्या पत्रावरून हा विषय सभेपुढें आला होता. त्यावेळीं अॅ. कमिशनर डा. वेयर यांनीं विरुद्ध रिपोर्ट करतांना असें लिहिलें होतें कीं या भट्ट्या कामास येणार नाहींत व हिंदू लोक फार विरोध करतील. "

"कलकत्त्याहून म्युनिसिपल सेक्रेटेरी कडून मी माहिती मागविली होती तींतून असें निष्पन्न झालें होतें कीं भट्ट्यांचें काम समाधान कारक झालें नाहीं. ह्मणून त्यांच्या उभारणीचें काम टाकून देण्यांत आलें. धर्म शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें या भट्ट्यांत प्रेतदहनविधि करतां येत नाहीं. शेजारच्या लोकांस उपद्रव झाल्याशिवाय तें कार्य करणें शक्य नाहीं. हा अनुभव कलकत्त्यांच्या लोकांचा झाला. ज्यांच्या हिताकरतां ह्या भट्ट्या रचावयाचें घाटत आहे त्या मुंबईच्या लोकांचें मत काय आहे तें प्रथम निर्दिष्ट केलेल्या अर्जांत नमूद आहेच."

" या भट्ट्या रचण्याच्या विरुद्ध इतके पुष्कळ लोक उठले आहेत कीं त्यांच्या मताला मान मिळणें अवश्य आहे."

डा. ब्लेनी यांनीं अनुमोदन दिलें. इतरांनीं पुष्कळ उपसूचना आणल्या त्यांस उत्तर देतांना रावसाहेब ४।११।८७ रोजीं ह्मणाले " ज्यांनीं भट्ट्यांच्या योजनेला विरोध आणिला आहे त्यांच्या मनांतून अप्रीतीचें प्रदर्शन करावयाचें आहे अशी तोहमत त्यांवर जी आणण्यांत आली आहे तिचा मी कोणालाही शक्य असेल तितक्या त्वेषानें राणीसाहेबांचा एक नोकर म्हणून निषेध करतों. लोकांना कारपोरेशनला अर्ज करण्याचा हक्क आहे व त्या कारपोरेशनचा एक सभासद या नात्यानें त्या अर्जाचा परामर्श घेण्याचा मला हक्क आहे

व मला हक्क आहे, असें पुष्कळ वक्त्यांनीं उदारपणें कबूल केलें आहे. डॉ. ब्लेनी यांनीं त्याच्या संरक्षणार्थ भाषण केलें आहे." याच्यावर कर्नल मेरिवेद्र म्हणाले:—

रावसाहेबांचे तोंडांतून असलें काहीं विधान निघालें असें मी ह्मटलें नाहीं.

रावसाहेब पुढें ह्मणाले:—"तीन अर्जांपैकीं एक जातीच्या मुख्याकडून आला नव्हता असें म्हणणें औचित्याला धरून नव्हतें. या अर्जावर आठ कारपोरेनशच्या सभासदांच्या, जे. पीं. पैकीं कित्येक पुढाऱ्यांच्या वगैरे सह्या होत्या. काडीचीही किंमत नसलेले हे लोक नव्हत. जर कोणी याप्रमाणें टेर उडवूं लागला तर अजदार किंवा सभासद या नात्यानें मुंबईमध्यें तर स्वतांचें म्हणणें सांगण्यास पुढें येण्याची सोय उरणार नाहीं. गट्टूलालजींचें अर्जावर दुसरें नांव आहे. तें वाचून जे कोणी नाक मुरडतील त्यांस मी असें सांगतों कीं मुंबईतील फार मोठ्या समाजांतील ते एक आहेत. त्यांच्या नंतर साठ शास्त्र्यांचीं नांवें आहेत. हे हिंदू धर्मशास्त्राचे प्रोफेसर आहेत. त्यांनीं अर्ज केला म्हणजे त्यांचें मत तिरस्करणीय ठरत नाहीं. मुंबई सरकार अथवा हिंदुस्थान सरकार सुद्धां त्यांस तसें लेखणार नाहीं. या अर्जाच्या विरुद्ध एक दुसरा अर्ज आला आहे. समाजांतील प्रत्येक वर्गाशीं उदारपणें वागण्याला माझी तयारी आहे. तरी असें सांगतों कीं, ज्या मनुष्यानें आपला समाज सोडला आहे त्याला त्या समाजाविषयीं असले अनुदार उद्गार काढणें व त्या समाजाचा मी पुढारी असें ह्मणणे अगदीं वाजवी नाहीं."

"सर मंगळदास नथूभाई यांची सही अर्जावर कोठें आह असें विचारण्यांत आलें आहे. त्याचा जबाब त्यांनीं गुजराथी वर्तमानपत्रांत दिला आहे, त्यांत ते ह्मणतात कीं कमीशनर यांनीं ही भट्टयांची कल्पना माझ्या (मंगळदास यांच्या) संमतीनें पुढें आणली

आहे हें खोटें आहे. आमच्या समाजाला तुह्मी पाहिजे तर अज्ञान ह्मणा पण त्यांच्या धर्मसमजुतीला मान दिलाच पाहिजे, ही गोष्ट तुह्मीं विसरतां कामा नये." नंतर पृथक्‌पणें मि. मार्टिन, व डा. आर्नोट व कर्नल मेरिवेदर यांच्या उपसूचना नाकारण्यांत आल्या व रावसाहेबांचा ठराव मान्य झाला. ( २९।११।१८८७ )

---

## प्रकरण ४२ वें.

# खोती कज्जा.

॥ करिति वतन जतन पतन मतन भल्यांतें तथापि तें वरिति ॥
( मोरोपंत )

हिंदी लोकांचें आपल्या वडिलार्जित जमिनीवर जें आसक्त प्रेम आहे, तें आह्मांस माहीत असून त्यास आह्मीं मान देतों. व तद् संबंधीं जे त्यांचे हक्क आहेत त्यांचें रक्षण करण्याची, राजाच्या न्याय्य मागण्या आहेत त्यांना विरोध न आल्यास, आमची इच्छा आहे. कायदे करतांना व त्यांची अम्मल बजावणी करतांना लोकांच्या पुरातन हक्कांकडे, चालीरीतींकडे व वहिवाटींकडे योग्य लक्ष देण्याची आमची साधारणपणें मनीषा आहे. *

रावसाहेबांनीं ज्या कांहीं प्रचण्ड कामगिऱ्या केल्या व ज्या करण्याकरतां त्यांना आपला पैसा व त्याहून अधिक मूल्यवान वेळ खर्चून आपलें

---

* हें वाक्य दयाळू महाराणीसाहेबांच्या प्रसिद्ध जाहीरनाम्यांतील आहे. एका खोती कज्जांत वादीनें त्याकडे बोट दाखविल्याचा उल्लेख जिल्हाजज्जानें ठरावाचीं कारणें लिहितांना केला आहे.

शरीरही श्रम करून शिणवावें लागलें त्यांत खोती कज्जाची कामागिरी ही गणली जाते. पैमाषीचा कायदा मुंबईच्या कायदे काउन्सिलांत आला तेव्हांच खोतीकज्जे उपस्थित होतील असें रावसाहेबांनीं जाणिलें होतें. ह्मणूनच त्यांनीं त्या कायद्याच्या मसुद्यांत फरक करवून घेण्यास आपली शिकस्त करून पाहिली. तें वृत्त या ग्रंथांतील बावीसाव्या प्रकरणांत दिलेंच आहे.

या कायद्याच्या अन्वयें सरकारानें प्रथम जमिनीचें मोजमाप केलें, प्रतबंदी ठरविली आणि सरकारदेणें तीसवर्षांच्या मुदतीपर्यंत कायमचें ठरविलें. तें देणें, म्हणजे आपल्या जमिनीवरचा सारा, जमीन करणारानें सरकारांत भरावा व त्या जमिनीचा उपभोग वंशपरंपरा मुक्तशंक घ्यावा असें ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें रयतवारी पद्धत दक्षिण महाराष्ट्रांत सुरू झाली. पहिल्या काळीं सारा वसूल करणारे कांहीं देशमुख देशपांड्ये असे मध्यस्थ गांव कामगार होते त्यांस कांहीं नक्त नेमणूका त्यांच्या हक्काबद्दल करून देऊन कांहीं सनदी वतनदार व इनामदार यांस वगळून सारा वसूल करण्याच्या कामांत सरकार व रयत यांचा प्रत्यक्ष संबंध सुलभ रीतीनें सुरू करतां आला व सुरू झाला. परंतु हें नातें घाटांवरून उतरून डोंगराळ रत्नागिरी जिल्ह्यांत जोडावयास आणतांना मार्गांत अनतिक्रम्य अडचणी आल्या.

या विस्तृत देशांतील शेतीही तशीच विस्तृत आहे. जमिनीवरील सत्ताप्रकारही भिन्न ठिकाणीं भिन्न आहेत. बंगाल्यांत जमीनदारी आहे. ह्मणजे रयत व सरकार यांच्यामध्यें मातबर जमीनदार आहेत. गुजराथेंत तालुकदार आहेत व मध्यप्रांतांत मालगुजार आहेत. तसे रत्नागिरि जिल्ह्यांत खोत आहेत त्यांचें तेथें आस्तित्व पेशव्यांच्या किंबहुना शिवाजी महाराजांच्या आधींपासून आहे. त्यांच्या हक्काबद्दल त्यांस सनदा मिळालेल्या आहेत. खोतीचा इतिहास वाचला ह्मणजे असें दिसून येतें कीं,

खोतांची उत्पत्ति अगदीं निसर्गाला धरून आहे. घाटांवरील जमिनीसारखी कोंकणांतील जमीन, कसणाऱ्याच्या अल्पश्रमानें धान्योत्पत्ति करण्यास, असमर्थ आहे. कोकणांत विशेषतः रत्नागिरि जिल्ह्यांत जेथें खोतीगांव पुष्कळ आहेत तेथें जमीन दरिद्री आहे. शेंकडों वर्षांपूर्वी तेथील गांव बेचिराख होते. जमिनी ओसाड व जंगलगर्क होत्या. त्या सुफलदा करण्यास पुष्कळ श्रम व भांडवल खर्च करण्याची जरूरी पडली. पडित व बुडित जमीन लागवडीच्या कामास लायक करण्याकरतां पुष्कळ खोत अनेक ओसाड गांवांत आणावे लागले. जमिनीची सुधारणा करण्यांत खोतांना भांडवल खर्च करावें लागलें. बांधबंधस्ती करून जंगलगर्क जमीन साफ सुफ करावी लागली. जमीन लागवडीस आणण्यास फार श्रम करावे लागले. खोती गांवांत या कामाकरतां खोतांनीं बाहेरून कुळें आणलीं व गांव वसविले व भरभराटीस आणले. मजुरीचीं माणसें हल्लीं प्रमाणें त्याकाळीं मिळत नसत म्हणून त्यांना जमिनीच्या उत्पन्नाचा अंश देण्याची वहिवाट पाडावी लागली. ती साधारणपणें भात जमिनींत जें उत्पन्न होईल त्यांतील द्वितीयांश व वरकस जमिनींत जें होईल त्यांतील तृतीयांश खोताला कुळानीं भरावें; त्याच्याहून अधिक खोतानें कुळाजवळून मागूं नये, अशी होती. कित्येक वेळां खोत विशेष ठराव कुळांशीं करीत असे. एकंदर सारा जो सरकारांत भरावयाचा तो खोतानें सरकारांत परभारा भरावा. त्याची तोशीस कुळांवर पडूं नये हें कुळांसही फायदेशीर झालें. कारण दुष्काळांत व सुकाळांत उत्पन्नाच्या मानावरच खोतास अंश द्यावयाचा असे. अशा व्यवस्थेपासून सरकारास ही वार्षिक उत्पन्नाची बाब खोतांनीं निर्माण करून दिली.

ह्मणून खोती ह्मणजे काय याचें थोडक्यांत साधारण उत्तर असें आहे:—खोतानें, ठरलेला सारा सरकारांत भरणा करावा व एकंदर जमिनीचें उत्पन्न खोती कुळांजवळून वर सांगितलेल्या अर्धेल व तिर्धेलीच्या

मामूल वहिवाटीप्रमाणें होईल त्या उत्पन्नाचा किंवा कित्येक बाबतींत विशेष केलेल्या ठरावाप्रमाणें अंश घ्यावा. याशिवाय वेठीस कुळें जेवण घालून आणण्याचा खोतास हक्क असे. तवसें, भोंपळा घेण्याचा हक्क असे. खोतकी संबंधानें बारीक सारीक प्रश्नांवरून फिर्यादी होऊन हायकोर्टापर्यंत अपीलें येऊन मागें निर्णय झाले होते. या सत्ताप्रकाराची सूक्ष्म चवकशी अनेक बुद्धिमान व शोधक इंग्रज अधिकाऱ्यांनीं १८१८ पासून केली; त्यांत मि. चॅपलिन्, कॅप्टन विनगेट्, मि. डनलाप्, लेफटनन्ट डावेल, मि. एल्फिन्स्टन, मि. ग्रॅन्ट डफ, मि. राबर्टसन, मि. टार्कन्ड हे प्रमूख होते.

हा वर जो साधारणपणें खोतीचा सत्ताप्रकार दिला आहे त्यांत हात घालण्याचा अधिकार पैमार्षीच्या कायद्यानें सव्हें कमीशनरांस आला होता. ३८ साव्या कलमाप्रमाणें कुळांकडून खोतानें वसूल किति घ्यावा तें ठरविण्याचा, व ३७ व्या कलमाप्रमाणें खोतांकडून वार्षिक कबुलायती न घेतां सव्हेंच्या तीस वर्षांच्या मुदतीपर्यंत खोतांशीं ठराव करण्याचा अधिकार वरील अधिकाऱ्यांस आला होता.

खोतांचें ह्मणणें असें होतें कीं सव्हेंच्या अधिकाऱ्यांनीं जमिनीची सव्हें करावी. मग खोतांस कुळांनीं काय द्यावें तें ठरविण्याचें काम ह्या अधिकाऱ्यांचें नव्हे.

तरी मेजर फ्रॅन्सिस, मेजर वाडिंगटन्, व कलेक्टर मि. नेर्न्स हे पुढील कामाला मनापासून लागले. त्यांनीं प्रथम १८६६ च्या मार्च महिन्यांत सुवर्णदुर्ग तालुक्यांतील वेशवी महालांतील कांहीं खोत जमा केले व त्यांच्या पुढें कांहीं पट्टा सही करतां सादर केला. तीस वर्षें पर्यंतच्या कबुलायती घेण्याचा अधिकार वरील कायद्यानें त्यांना कसा प्राप्त झाला आहे व पट्टा मान्य न केल्याचा काय परिणाम होईल इ० गोष्टींची खुलासेवार माहिती आर्जवयुक्त वाणीनें दोन तीन दिवस

मोडून जमलेल्या खोतांना त्यांनीं दिली. तरी दुर्दैवी खोत हो म्हणत ना ! नव्या पट्ट्यावर सह्या न केल्यास गांव सोडावे लागणार अशा * बातम्या सर्व जिल्ह्यांत पसरल्या व खोतांची तारांबळ उडाली, तेव्हां नेटिव्ह ओपिनियनमध्यें नित्य लेख येऊं लागले. " बंगाल्यांतील जमीनदारांची जशी ब्रिटिश इंन्डियन असोशिएशन आहे व जशी रामचंद्राच्या अयोध्या प्रांतांत तालुकदारांची सभा आहे व या दोघींनीं जसें आपल्या हक्कांचें संरक्षण केलें तसें परशरामक्षेत्रस्थांनीं सभा स्थापून आपल्या हक्कांचें रक्षण करावें अशी सूचना रावसाहेबांनीं केली. त्यामुळें खोतांस धीर आला.

" वडिलार्जित जमीनीवरील हिंदी लोकांचें प्रेम आम्हीं जाणत आहोंत व त्यांस आम्हीं मान देतों व त्या जमिनीचें व त्यासंबंधें सर्व हक्कांचें संरक्षण करण्याची व पुरातन हक्क, वहिवाट व सांप्रदाय हे संभाळूनच नवे कायदे करण्याची आमची इच्छा आहे" या १८५८ च्या जाहीरनाम्यांतील महाराणी साहेबांच्या वचनाकडे बोट दाखवून प्रजा या नात्यानें खोतांचें संरक्षण करणें सरकारास भाग आहे असा अर्ज करण्यास खोतहितेच्छू ह्मणून एक सभा १८६६ सालीं खोतांनीं स्थापन केली. तिचे नियम रावसाहेबांस पसंत होते.

ज्या खोतांनीं पट्ट्यांवर सह्या केल्या नाहींत त्यांचे गांव जप्त होऊन सरकार मार्फत वहिवाट सुरू झाली. त्यांची संख्या लहान नव्हती.

मामूल वहिवाटी प्रमाणें कुळांकडून जो वसूल खोत घेत आले त्यांत फिरवाफिरव केल्या बद्दल व नवा पट्टा सर्व्हे कमीशनर यांनीं मागितला

* एका महालकऱ्यानें कांहीं धमकीवजा या पट्ट्या संबंधें नोटीसा काढल्या. त्यावर ने. ओ.मध्यें टीका आली. त्यावरून सरकारानें लागलीच चौकशी करून कलेक्टरांच्या मार्फत वरील महालकऱ्याच्या उत्साहातिरेकास दोष दिला व अशा नोटिशी काढण्यास कलेक्टरचा हुकूम नव्हता असें कळविलें

तो लिहून देण्याचें खोतांनीं कबूल केलें नाहीं ह्मणून सरकारानें गांव जप्त केले, ती जप्ति उठविण्या करतां, गांव परत ताब्यांत मिळण्याकरतां, दरम्यानचें उत्पन्न खर्चासह मिळण्याकरतां इ., खोतांनीं सरकारावर भराभर फिर्यादी लावल्या. त्यांत आंबेगांवासंबंधीं महादाजी रामचंद्र गोंघळेकर यांनीं आणलेली, कोळबांद्रें या गांवच्या खोतानें आणलेली, देवसडें व सोनगांव या गांवांसंबंधें रावसाहेबांच्या बंधूनें आणलेल्या अशा फिर्यादी मुख्य होत्या.

बाकी इतर कांहीं फिर्यादी सागाचीं झाडें तोडलेलीं जप्त झालीं तीं सोडवण्याकरितां, गैर कायदा मोजणींत अधिक सारा बसविल्याबद्दल व कुळें काढून टाकण्याच्या हक्काबद्दल होत्या. पैमाषीच्या कायद्याचीं ३७।३८ कलमें खोतांस लागू आहेत कीं नाहीं? कुळांजवळून खोत मामूल वहिवाटी-प्रमाणें मागणी करतो तींत ढवळाढवळ करण्याचा अधिकार वरील कायद्यानें सरकारास आहे कीं नाहीं? नवीन तऱ्हेचा पट्टा नाकबूल केल्यास खोताचा गांव जप्त करतां येतो कीं नाहीं ? इ० मुद्दे कज्जांत लागले होते.

कज्जाची तयारी प्रथमपासून करण्यांत रावसाहेबांचें अंग होतें. शाहूमहाराजांनंतरचे कोल्हापुरचे राजे, विजापुरचे राजे, हबशी सरकार व पेशवे यांनीं दिलेल्या सनदा व त्यांच्या दफ्तरांतील झडत्या आंबे-गण कज्जांत हजर करवलेल्या होत्या. उभयपक्षकारांतर्फे साक्षींची गर्दी झाली होती.

खोती कज्जे चालविण्यास रावसाहेब स्वतां रत्नागिरीस गेले होते. बरोबर त्यांचे साथीदार गणपतराव भास्कर होते. त्याशिवाय रत्नागि-रीचे तीन वकील मदतीस होते. त्यांत बळवंतराव रानडे व वासुदेव हरि आठल्ये व हर्णैचे नाना गोळे हे प्रमुख होते.

प्रत्येक सुनावणीचे वेळीं रावसाहेबांस रत्नागिरीस हजर राहणें शक्य नव्हतें. एके दिवशीं सकाळच्या बोटीनें सरकारतर्फे काम चालविणारे

कांहीं वकील आदल्या दिवशीं रात्रौ रावसाहेबांस भेटले होते. ते सकाळच्या बोटीनें रत्नागिरीस निघून गेले ते एकाएकीं कां गेले असा कांहीं संशय रावसाहेबांच्या मनांत उत्पन्न झाला व त्यांस वाटलें कीं मी तेथें नसतां कांहीं महत्त्वाचे साक्षी तपासले जातील किंवा पुरावा सादर करण्यांत येईल, ह्मणून रत्नागिरीस हजर राहिलेंच पाहिजे. परंतु बोट सकाळीं निघून गेली. वेळेवर कोडतांत हजर राहणें शक्य नव्हतें. रावसाहेबांनीं लगेच स्वतः बोट आपल्या खर्चानें काढविली. बंदरें करीत जाणारी सकाळीं निघालेली बोट पोंचावयाच्या आधींच जाऊन रत्नागिरीस पोंचले. या अचानक कृतीचें कौतुक अद्यापि कोकणचे लोक करीत असतात. रावसाहेब मंडलिकांची गोष्ट निघाली कीं ही स्पेशल बोट काढल्याची गोष्ट निघालीच ह्मणून समजा. या बोटीचें नांव हॅवलॉक असें होतें. आपल्या १०।१।१८६५ च्या डायरींत 'स्पेशल बोट काढण्याचें आणखी एक कारण रावसाहेबांनीं देऊन ठेविलें आहे:—

"पायांनीं अदू झालेल्या स्थितींत लोकांनीं तिला पहावें अशी पत्नीची इच्छा नव्हती या विशेष कारणामुळें स्वतंत्र बोट जनरल हॅवलॉक ही करून पत्नी व मित्र यांसह रत्नागिरीस जाण्यास निघालों." २१ तारखेला रावसाहेब सकाळीं रत्नागिरीस पोंचले व दोन दिवस खोती कज्जा चालवून २३ तारखेस त्याच बोटींतून परत आले.

१९।१०।१८६९ रोजीं प्रसिद्ध आंबेगणच्या कज्जाचा निकाल मि. लार्पेन्ट यानीं करून हुकुमनामा लिहिला त्याचा आशय असा होता:—

आंबेगणची जप्ति उठवावी; दरसालच्या कबुलायतीपेक्षां अधिक ओझें ज्या कबुलायतीनें खोतावर बसणार नाहीं अशी कबुलायत १८६५ च्या पहिल्या कायद्याप्रमाणें ३० वर्षांची अथवा वर्षाची देऊन वादीनें गांव वहिवाटीस घ्यावा. प्रतिवादीनें दरम्यानचें उत्पन्न द्यावें. खर्चाचा बोजा ज्याचा त्याच्यावर.

तथापि गोंधळेकर यांनीं त्यांच्या विरुद्ध निकाल जेवढा अंशतः झाला तेवढ्यापुरतें हायकोर्टांत अपील केलें. मंडलिक यांच्यातर्फे निकाल रत्नागिरीस झाला, त्याच्यावर सरकारनें अपील केलें आणखी कांहीं फिर्यादी खोताला कुळें हवीं तेव्हां काढून टाकतां येतात या हक्कावरून रत्नागिरीस चालून हायकोर्टापर्यंत अपीलें झालीं होतीं. मिळून सरकार व खोत व खोत व कुळें या संबंधांचें बरेच तंटे उपस्थित झाले.

"खोतांना न रुचणारे उपाय योजले गेल्यामुळें खोत व कुळें यांच्यामध्यें फार वैमनस्य उत्पन्न झालें आहे. व कित्येक ठिकाणीं कुळेंही नाराज होऊन खोत व कुळें हीं दोघेंही सरकाराविरूद्ध एक झालीं आहेत." असें मि. हॅवलॉक यानीं १८६८ सालीं नमूद करून ठेवलें होतें. हायकोर्टांत अपीलें झाल्यापासूनचें सर्व काम रावसाहेबांकडेच होतें. हें काम फार पैशाचें व श्रमाचें होतें. लोकांची जूट जमून व्हावी तशी मदत होत नाहीं म्हणून कधीं कधीं नाउमेद होते असें रावसाहेब म्हणत. तरी अंगीकृत कार्य त्यांनीं सोडलें नाहीं. या अपीलांत तरजुमे पुष्कळ करावयाचे होते. कांहीं खासगी मंडळी फुकट भाषांतर करण्यास पुढें आली. पण मागाहून रावसाहेबांच्या कारकुनाजवळ पैसे मागूं लागली तें पाहून जरी पैशाचा पुरवठा झाला नाहीं तरी त्यांची मदत घेतल्याशिवाय पैसे भरूनच सरकारी भाषांतरकारा कडून भाषांतरें करून घेण्याचा रावसाहेबांनीं निश्चय केला. परमेश्वर तो निश्चय तडीस नेईल असा त्यांचा भरंवसा होता. ( २८।१।१८७० चें बळवंतराव रानडे यांस पत्र. ) कांहीं ठिकाणीं पैसे गोळा केल्याचें वृत्त रावसोहबांच्या कानावर येई पण पैसे हातांत पडत नसत. "रुपयांबद्दल बहुत वेळां लिहिलें आतां लिहावयास लाज वाटते" ( ५।७।१८७० चें नाना गोळे यांस पत्र. ) कांहीं रुपये नाना गोळे व काटदरे व निळोपंत ओक यांनीं पाठविले.

" राजापुरा कडील पैसे येतील असें बळवंतराव रानडे, वकील रत्नागिरी यांच्या व तुमच्या बोलण्यांत होतें. ते अद्यापि आले नाहींत वेळेवर आलेतर उपयोग होईल असें अनेक वेळां लिहून पाहिलें आतां लिहिण्यास लाज वाटते" अशी तक्रार रावसाहेबांनीं गाळे यांजकडे २२।७।१८७० च्या पत्रीं केली होती.

इकडे पैशाची तूट व भाषांतराची लूट चालली असतां तोडीची बातमी उठली होती. तीवर विश्वास ठेऊन अपिलांची परिपूर्ण तयारी करण्याच्या प्रयत्नास शिथिलता आणूं द्यावी व तोड न झाल्यास आयत्या वेळेस घाई घाईनें अपिलांचें काम अपुरतेपणीं करावें किंवा तयारी परिपूर्ण करून अपिलें सुनावणीस आणून हाय कोर्ट काय न्याय देईल तो मनासारखा नसला म्हणजे, अरेरे तोड होत होती तिकडे दुर्लक्ष केलेंत, असें हळहळत बसणाऱ्या खोतांचा सहजीं अंगावरयेणारा दोष पतकरावा हे दोन पेंच रावसाहेबांच्या पुढें उभे राहिले. त्या वेळेस त्यांच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें कोणतीही गोष्ट करणें, ती विचारानें करण्याचें ठरविलें.

या कज्जाच्या कामांत उभय पक्षांनीं सावधगिरी ठेवली पाहिजे असा उपदेश रावसाहेबांनीं नाना गोळे, वकील हर्णै, यांस केला होता व जें आपसांत ठरेल तें अथवा हायकोर्टांत ठरेल तें उभयपक्षांनीं ग्रहण करावें. असा निश्चितसंकल्पाचा मंत्रही सांगून ठेविला होता. १२–२–१८७० चें पत्र.

योग्य रीतीनें समजी झाल्यास थोडी झीज सोसूनही करावयाची परंतु तसें न होईल तर जितका कायद्यानें ठरविलेला इलाज असेल तेवढा केल्याशिवाय रहावयाचें नाहीं. असा आपला झालेला निश्चय त्यांनीं गोळे यांस विचारान्तीं कळवून ठेवला होता. ( १३–६–१८७३ चें पत्र ) "समजीचें मेघडंबर उठलें आहे हें खास ( २२–६–१८७३ चें वासुकाका आठल्ये यांस पत्र ) परंतु हितवृष्टि होईल किंवा नाहीं

अथवा झाल्यास किति होईल याचा कायम अंदाज नव्हता. याच वर्षी मे महिन्यांत रावसाहेब महाबळेश्वरास होते. “ महाबळेश्वर येथें समजीचा कायम विचार ठरला नाहीं. परंतु तसा रंग आल्यास त्यांत सर्वांचें हित होईल असें घडवून आणण्याच्या प्रयत्नांत कांहीं कमी व्हावयाचें नाहीं. काम मोठें आहे. पुष्कळ वर्षे खोतांनीं अनास्था केली आहे तथापि मूळ ठीक आहे. यास्तव सर्व मिळून प्रयत्न केल्यास परिणाम वाईट होणार नाहीं असें मला वाटतें.” ( काडद्रे यांस २८।६।१८७३ चें पत्र. ) परंतु पुढें लवकरच नीट चिन्हें दिसूं लागलीं. म्हणून रावसाहेबांनीं ‘ वतनदार खोतांचा इतिहास ’ या नांवाचा लब्धाकार ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला त्याचा सारांश—

## वतनदार खोतांचा इतिहास.

“ हें पुस्तक लिहिण्याचा हेतु कुळें व खोत यांचा परस्परांत पडलेला लढा आणि सरकार व खोत यांच्यामध्यें चाललेले कज्जे यांची आपसांत समजूत व्हावी हा आहे. ”

‘ दक्षिण कोकणांतील खोत हे कोण ? ’ या मुख्य प्रश्नास उत्तर देतांना रावसाहेब लिहितात “ खोतांच्या जवळ असलेल्या सनदा व कौल हीं पाहिलीं असतां असें दिसतें कीं या खोतांनीं आपले खोती गांव वसविले, झाडें झुडपें तोडून पडित जमीन लागवडीस आणली, पाट बंधारे बांधले, रस्ते बांधले व डोंगराळ प्रदेशांतील जमिनी पिकासंबंधें शक्य तितक्या उत्तम स्थितीस आणल्या. ”

“ खोत हे निझामशहाच्या इतके जुने आहेत. विजापूरकरांचें राज्य असल्या वेळेचे आहेत. शिवाजीमहाराजांच्या आधींचे आहेत. पेशव्यांनीं त्यांच्या हक्कास मान दिला आहे. ” नंतर, या भांडवलवाल्यांनीं पडित जमिनी लागवडीस आणल्या इ. मतें प्रतिपादन करणारे मि. पेली, मि. चॅपिलन् व मि. डनलाप यांच्या १८२२ च्या आधींच्या लेखांचे उतारे

देऊन रावसाहेब ह्मणतात " खोत हे इतर मधमाशांनीं कणशः जमविलेला मध तेवढा खाणारे आळशी मधमासे नाहींत असें वरील उतारे देण्यांत माझा हेतु आहे. " नंतर कांहीं पूर्वीच्या काळीं वतनदार खोतांचें वतन मान्य करणारे कौल व सनदा यांचा इतिहास दिला आहे. त्यांतच सुरधडें गांवच्या खोतांचें वतन मूळ मालकाकडे चालू ठेवणारा रामशास्त्री यांनीं आदिलशाहीच्या वेळचे कागद पत्र तपासून केलेल्या ठरावाची हकीकत दिली आहे. खोती वतन हें मिराशी हक्काप्रमाणेंच वंशपरंपरा आहे. त्याची खरेदी विक्री करतां येते असें सिद्ध करण्यास केळें व फुणगुस गांवच्या खोतांस मिळालेल्या सनदांचे उतारे दिले आहेत. सुशेरी गांवाचा तर एक मालक खोत व त्याच गांवचा इनामदार दुसरा असें उदाहरण आहे. म्हणजे खोत कुळांकडून आपल्या हक्काप्रमाणें वसूल करून खोत फायदा घेऊन जो सारा सरकारांत नेहमींप्रमाणें भरतो तो सारा या गांवीं सरकारला न भरतां इनामदाराला देतो, असें दाखविलें आहे. मि. कॅन्डी यांनीं आपल्या रिपोर्टांत असले मालकी हक्क खोतांकडे अनेक नवीं नवीं राज्यें होऊन गेलीं तरी राहिले आहेत असें म्हटलें आहे, त्याचा उतारा दिला आहे. बाणकोटचे परकार यांस इंग्रज बहादुर कंपनी सरकारनें दिलेल्या सनदेचा उतारा आहे. तो खोतांचे गांव वतनी कसे आहेत तें दाखवितो. नंतर पुष्कळ गांवांची खासगीजमिनीप्रमाणें वांटपपत्रें खरेदी विक्री गहाण पाहाण झालेलीं दिलीं आहेत. हीं सर्व हायकोर्टापर्यंत न्याय्य ठरल्याचीं उदाहरणें आहेत. मि. एलिस यांचें खोतांचे तर्फे काउन्सिलांतील भाषण दिलेलें आहे.

नंतर ११।४।१८२९ च्या सदर अदालतीचा निवाडा दिलेला आहे. त्यांत खोताला वतनावरून काढण्याचा कलेक्टरला अधिकार नाहीं असा ठराव केलेला आहे तो कारणांसह छापलेला आहे. हा कज्जा कुलाबा जिल्ह्यां-

तील होता. नंतर खोतीकुळांस खोत, धारेकरी बनवीत असा उल्लेख असलेला एक खलिता मि. ब्लेन कलेक्टर यांच्या हातचा दिला आहे. धारेकरी, अर्धेली, उपरी, दुप्पटकरी इ० कांच्या हक्कांच्या व्याख्या दिल्या आहेत.

शेवटीं १८२५ मधला एक सरकारी ठराव दिला आहे. त्यांत असें ह्मटलें आहे कीं खोती हक्काचें मूळ कांहींही असो, खोतांनीं जो हक्क मिळविलेला आहे तो असा आहे कीं त्यांत आतां हात घालणें न्याय्य होणार नाहीं व तसेंच राजनीतिदृष्ट्या शहाणपणाचें होणार नाहीं.

असें ह्मटल्याला ५० वर्षें झाल्यावर आतां जुने हक्क बुडवून नवे नवे तयार कसे करतां येतील अशी रावसाहेबांनीं नंतर पृच्छा केली आहे.

शेवटीं रावसाहेबांनीं पुन्हां खालीलप्रमाणें खोतांच्या हक्कांचा सारांश दिला आहे. खोत हा गांवचा मालक आहे; त्यास तो गांव गहाण टाकतां येतो; विकतां येतो; खोती कुळांचीं धारेकरी कुळें बनवितां येतात; आपल्या मार्फत सारा सरकारास कुळांनीं द्यावा असा ठराव करून धारेकऱ्यापासून ठरलेल्या साऱ्याहून अधिक सारा घेतां येत नाहीं व खोती कुळांपासून ठरावाप्रमाणें व जेथें ठराव नसेल तेथें झालेल्या उत्पन्नांतून अर्धेल तिर्धेल घेण्याची मामूल वहिवाट आहे. येवढ्यापर्यंत हवें तेवढें उत्पन्न घेतां येतें;अधिक घेतां येत नाहीं.सरकारला खोतानें कबुलायत दिली ह्मणजे ती सरकारला नाकबूल करतां येत नाहीं, असें ३५ अपील वरून ठरलें आहे. पेशव्यांनींसुद्धां एकही खोताचा हक्क काढून घेतला नसतां, आतांच सर्व्हे लागू करून, खोत हा नुसता मध्यस्थ आहे, वसूल जमा करणारा आहे, अशी त्याची नालस्ती करून मामूल वहिवाटीप्रमाणें त्याचा वसूल घेण्याचा हक्क, नष्ट करावयास कां उद्युक्त व्हावें तें कळत नाहीं. नंतर त्यांनीं तडजोड कशी करावी तें सुचविलें आहे, व त्याकरतां आधार म्हणून त्यांचे मित्र नारो बाबाजी गोळे, हर्णैचे वकील, यांची

फ्रॅन्सिस साहेबांजवळ मुलाखत होऊन त्यांचें जें बोलणें झालें त्याचा उपयोग केला आहे. सरते शेवटीं सांगितलें आहे कीं शक्य तितक्या उत्तम प्रमाणांत रत्नागिरींतील शेती आल्यामुळें येथें कायम धाऱ्याची पद्धति लागू करावी. ( १।२।१८७४)

इकडे अशी चळवळ चालली असतां करवलेलीं भाषांतरें छापून काढण्याचा हुकूम रावसाहेबांनीं दिला. रावसाहेबांच्या अंगीं उत्साहशक्ति, चिकाटी व आत्मविश्वास हे गूण मोठ्याप्रमाणांत असल्यामुळें, जरी त्यांस वाटत होतें कीं हायकोर्टांत आपल्यास न्याय मिळेल,तरी न्याय न मिळाल्यास विलायतपर्यंत खोती कज्जाचें काम नेण्याचा त्यांचा संकल्प होता. "आपली एकी आहे तर विलायतेपर्यंतही जरी हेलपाटा पडला तरी तो चुकविणार नाहीं."(बळवंतराव रानडे यांस पत्र.) याप्रमाणें हायकोर्टनें निकाल देण्याच्या पूर्वीपासूनच त्यांनीं पुढची तयारी सुरू ठेवली होती.

बॅरिष्टर मि. वुड. ( टाइम्सचे लेखक ) यांस विलायतेस २१।३।१८७४ रोजीं जावयाचें होतें. त्यांनीं तेथें गेल्यावर हें काम हातीं घ्यावें अशी विनंति त्यांस रावसाहेबांनीं करून ठेवली होती ( १६।३।७४ चें मि. वुड यांस पत्र. ) रावसाहेबांचे मित्र नवरोजी फर्दुनजी हे विलायतेच्या फायनॅन्स कमिटीपुढें साक्ष द्यावयास गेले होते. त्यांस खोतांबद्दल तिकडे कामगिरी करावयास सांगितली होती. ( १६।३।१८७४ चें पत्र. )

त्याचप्रमाणें मि. टेलर यांस पत्र पाठविलें होतें. या तिघांसही आपण लिहिलेल्या वतनदार खोतांच्या इतिहासाची पुस्तकें पाठवून दिलीं होतीं व आम्हांस न्याय मिळण्याकरतां आपल्या हातून होतील तितके कमालीचे प्रयत्न करा अशी विनंति केली होती, व स्टेट सेक्रेटरी यांचें लक्ष तिकडे कसें वेधतां येईल तें सांगावें असें दुसऱ्या पत्रांत विनविलें होतें. बाबू खीस्तोदास पाल यांस २३।४।१८७४ रोजीं अशीच विनंति केली होतीः—

"मला एक आठवडाही कलकत्त्यास येण्याची सवड नाहीं, म्हणून वाईट वाटतें. दहा भाग वाचण्यापेक्षां एका भेटींत काम अधिक झालें असतें तथापि आपल्या साहाय्यावर माझी भिस्त आहे व तेवढ्यावरच मी पुढें चाल करून जाणार आहें."

इतक्यामध्येंच मि. इ. टी. कॅन्डी यांनीं खोतकीवर एक सुन्दर पुस्तक लिहिलें त्यांत १७५४ सालीं रत्नागिरी पैकीं कांहीं खोती गांव इंग्रजसरकाराकडे पेशव्यांकडून आले व पुढें १८१२।१३ मध्यें कोल्हापूर व वाडी या संस्थानांकडून आले व १८१८ मध्यें सर्वच आले असें सांगून तेव्हांपासून खोतकीचा एकंदर इतिहास सर्व सरकारी हपीसरांच्या मतासकट दिला आहे. त्यांत शेवटीं त्यांनीं खालीं दिल्याप्रमाणें मत दिलें आहे. "सर्व्हेहपीसरांस कोणाच्या मालकी हक्काचा निर्णय करण्याचा अधिकार नाहीं असें तो कायदा करणाऱ्यांनीं प्रथम ह्मणून, मागाहून ३७।३८ कलमें घालून कोणतें कूळ कायमचें आहे व कोणतें उपरी आहे (हवें तेव्हां जा ह्मणून सांगतां येण्यासारखें आहे.) तें सर्व्हे कामगाराला ठरवितां येईल असें जें ह्मणण्यांत येतें तें विसंगत आहे अथवा विसंगत असून अन्यायाचें आहे." पुढें कांहीं तरी तोडीचा निकाल करावा असें सुचवितांना लिहिलें:—"वतनदार खोतांना कांहीं महत्त्वाचे हक्क प्राप्त झाले आहेत. तें खोतांस नुकसानी भरून दिल्याशिवाय हिरावून घेतां यावयाचे नाहींत; व कांहीं कुळें खोतांना हवीं तेव्हां काढून टाकतां येतात हें खरें आहे." या पुस्तकाचा प्रशंसापर उल्लेख करून मि. टेलर यांस आपलें पुस्तक पाठवून रावसाहेबांनीं खालीं दिल्याप्रमाणें २४।५।१८७४ रोजीं पत्र लिहिलें:—
"ब्रिटिश लोकांवर असलेल्या विश्वासाचें संरक्षण करण्याकरतां मीं दहावेळां ग्वालेरच्या किल्याचा त्याग करीन असें जें ड्यूक आफ वेलिंग्टन यांनीं प्रसिद्ध विधान केलें आहे तें सध्याच्या अधिकाऱ्यांनीं ध्यानांत ठेव-

ण्यासारखें आहे. आमच्या सनदा आम्हांला [खोतांना] जमिनीचे मालक बनवीत असतां तुह्मीं नुसते दस्ताचे मक्तेकरी व अनुत्पादक मध्यस्थ आहांत असें आह्मांला सांगतात किंवा असलें कांहीं तरी कुत्सित नांव देतात." जे. जेकब यांस पुढें दिल्याप्रमाणें पत्र लिहिलें:–"तुम्ही ईस्ट इंडियन असोसिएशन पुढें बोलतांना म्हणालेत कीं आम्हीं पुष्कळ झटलें पाहिजे. तें मला कबूल आहे. परंतु आम्हांला जेवढी सहानुभूति दाखविली जाते त्याहून मोठें बक्षिस आमच्या प्रयत्नांना मिळालें पाहिजे. रत्नागिरीच्या खोतीचा प्रश्न घ्या. माझी सत्याची बाजू आहे. असें मला माहीत आहे. सर्व गोष्टी माझ्या तर्फे आहेत व सर्व्हेच्या लोकांच्या विरुद्ध आहेत. तरी चूक झाली आहे, असें दाखविण्यास मला दहा वर्षें लागलीं. झालेलें नुकसान भरून काढण्यास किति दिवस लागतील तें नकळे. पण इतक्यांत कितिकांचा नाश झाला. किती भिकेस लागले! तुमचे नातेवाईक मि. इ. टी. कॅन्डी स्पष्ट बोलले याबद्दल त्यांची वाखाणणी केली पाहिजे." २६।९।१८७४

असें चाललें आहे तों सरकांत कांहीं तडजोडीचा ठराव काढावा असा विचार चालू झाला असें नाना गोळे यांस लिहिलेल्या पत्रावरून दिसतें.

"येथून जाण्यापूर्वीं टक्कर साहेबांनीं काउन्सिल हॉलमध्यें मला बोलावून नेलें तेथें खोतीबद्दल पुष्कळ बोलणीं झालीं. शेवटीं मि. फ्रॅन्सिस यांस मीं एकवार भेटावें असें ठरल्यावरून मी एकवार त्यांबरोबर कांहीं चर्चा करण्यांकरतां त्यांस भेटलों. भेटीचा परिणाम कांहीं जमेस धरण्यासारखा नाहीं, म्हणून त्यांनीं मला पुन्हा बोलाविलें. तेव्हां मी त्यांस कळविलें कीं ज्या गोष्टी मी आपणाजवळ बोललों, त्यांतून सरकार कोणत्या कायम करतें याचा कांहीं तरी पक्केपणा झाल्याशिवाय उगाच बोलण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. मि. राजर्स व मि. चॅपमन हे दोघे ह्यावेळेस नहरास

गेलेले होते. ह्मणून या प्रसंगीं आणखीं कांहीं निष्पन्न झालें नाहीं. मि. फ्रॅन्सिस वेंगुर्ल्यास गेले आहेत. ४।५ मेला परत येतील. मि. राजर्स यांची गांठ घेऊन काय होतें तें कळवितों. त्याप्रमाणें आपण येण्याचें करावें." ३०।४।१८७४

अशा रीतीनें रावसाहेबांची सारखीं चळवळ चालली असतां केळशीं येथील बळवंत लक्ष्मण परांजपे (दप्तरदार) हे सरकारचे चीफ सेक्रेटरी मि. चॅप्मन यांस भेटावयास गेले असतां रावसाहेबांच्या खोतांच्या इतिहासाविषयीं बोलणें निघून मि. चॅपमन ह्मणाले "या ग्रंथांत रावसाहेबांनीं कांहीं तडजोडीचा मार्ग सुचविला नाहीं." ही हकीगत दप्तरदार यांनीं रावसाहेबांस भेटीच्या प्रसंगीं कथन केली. रावसाहेब ह्मणाले "मि. चॅपमन यांनीं माझ्या सूचना वाचल्या नसाव्या अथवा त्यांस त्या समजल्या नसाव्या." पुढें मि. चॅपमन यांनीं रावसाहेबांजवळ भेटीची इच्छा पत्रानें प्रदर्शित केली. त्यावरून रावसाहेब त्यांस १।५।१८७४ रोजीं भेटले व त्यांचीं बोलणीं अगदीं मित्रत्वाच्या नात्यानें झालीं व पुढील वर्तन तसेंच होतें हें खालील पत्रावरून दिसतें.

नामदार एफ्. एस्. चॅपमन यांस,

"शेवटली इंग्रजी सनद १८३३ मधली आहे. सर्व जमिनी, शेतें, वृक्ष, तरू, नदीनाले, तृण काष्ठ पाषाण व तदंगभूत हक्कांसह तुमची वडिलार्जित आहे असें त्या सनदेंत खोताला लिहून दिलें आहे. तथापि सरकार या लोकांस दस्ताचें मक्तेदार ह्मणत आहे, इ० इ०. सरकारानें सर्वांस न्याय द्यावा अशी माझी इच्छा आहे. कुळांस न्याय द्यावा; मालकांस न्याय द्यावा व आपलें नांवही न्यायानेंच राखावें. आधींच निश्चित करून ठेवलेल्या अनुमानांच्या समर्थनार्थ शब्दच्छल चालविला आहे तें पाहून मन उद्विग्न होऊन असें वाटतें कीं आतां पुढें योजावयाची भाषा ती अगदीं असंदिग्ध असावी. खोतांच्या हक्कांस तडजोडीच्या बोलण्याची बाधा न यावी. हें पत्र नेहमींच्या संवयीप्रमाणें घाईनें लिहिलें आहे."

मुख्य वादाच्या गोष्टीचे कागद रावसाहेबांनीं तयार ठेवले होते व त्याप्रमाणें सरकाराजवळचेही कागद वाचावयास मागितले होते.

पुढें सर फिलिप वुडहाऊस, मुंबईचे गव्हर्नर—मि. चॅपमन्, मि. राजर्स, मि. लीवार्नर व रावसाहेब यांनीं आपसांत मित्रभावानें चर्चा केली. शेवटीं सरकारनें १८७४ सालीं एक लहानसें कमीशन नेमून सर्व कागदपत्र तपासून १८७६ सालीं एक ठराव काढला व वादग्रस्त मुद्यांचा निकाल लावला. खोतांना सरकारानें सवलती दिल्या. खोतांनीं कुळांना सवलती दिल्या. २० वर्षांवर ज्यांकडे जमिनी कसण्यास होत्या त्या कुळांस कायमचा म्हणजे वंशपरंपरा जमीन वहाण्याचा परंतु दुसऱ्यास न देतां येण्याजोगा असा मामूल वहिवाटीप्रमाणें जमिनीकसण्याचा हक्क दिला. तो ठराव कबूल करतांना मि. कॅन्डी यांस पुढील पत्र रावसाहेबांनीं लिहिलें.

मत्प्रिय कॅन्डी यांस,

" शेवटला सरकारी ठराव तडजोड म्हणून कबूल करतों आणि तो नीट रीतीनें अम्मलांत येईल अशी आशा करतों. जें हल्लीं प्रचारांत नाहीं, जें आपल्या जागीं धीटपणें उभें राहतें त्या सत्याचा सर्वांमुखीं सन्मान होवो ! परंतु इतके दिवस दरिद्री रत्नागिरीचें नुकसान झालें त्याची वाट काय ? चालू कज्जाची तोड झाल्याशिवाय सरकारी ठराव कोणत्याही बाबतींत अमलांत आला असें ह्मणतां येत नाहीं. "

ह्मणून पुढें कज्जे तडजोडीनें घेण्याचें ठरलें. तोडीच्या कामांत खोतांतर्फें रावसाहेब होते व सरकारतर्फें मि. क्राफर्ड+साहेब होते. दोघे मित्रच होते. या सुमारास क्राफर्ड साहेब एका मित्राजवळ रावसाहेबांनीं या

+मि. क्राफर्ड व रावसाहेब यांची ओळख जुनीच होती (पृष्ठ४३० पहा ) व म्युनिसिपॅलिटींत मागें यांचें भांडण झालें होतें( प्रकरण४१पहा) तरी पुढें ते स्नेहीच होते. रावसाहेबांच्या पश्चात् ते पेनशनींत गेल्यावरही एकदां मुंबईस आले होते तेव्हां रावसाहेबांच्या चिरंजीवांस बंगल्यावर भेट देऊन गेले.

कामांत दाखविलेली चिकाटी पाहून त्यांना उद्देशून असें थट्टेनें ह्मणाले "खोती कज्जांचा निकाल रावसाहेबांस गोळी घालून ठार केलें तर नीट होईल." ही थट्टा रावसाहेबांच्या कानावर आली. तें रावसाहेबांनीं लक्षांत ठेऊन याच तोडीच्या कामांत महाबळेश्वरीं रावसाहेब व मि. क्राफर्ड असे दोघेच बसलेले असतां रावसाहेब, मि. क्राफर्ड यांस ह्मणाले "अहो खरेंच ! तुमच्या मनांतून मला गोळी घालून ठार करावयाचें होतें. बघा, तुमची छाती झाली तर ! मी एकटाच आहें. संधि चांगली आली आहे. !" क्राफर्ड साहेबांचा चेहरा पाहण्यासारखा झाला. "एवढी बारीकशी थट्टा सुद्धां तुमच्या कानावर आली ना ?" असें मि. क्राफर्ड ह्मणाले व दोघेही पोट धरून हंसले.

रावसाहेबांच्या चोख वर्तनाचें एक उदाहरण दिल्याशिवाय हें लांबलेलें प्रकरण पुरें करतां यावयाचें नाहीं. तडजोड करतांना रावसाहेब व मि. क्राफर्ड या दोघांनीं फार श्रम केले. प्रथम तोडीच्या शर्थी ठरविल्या त्या सर्व पक्षकारांस कळविल्या व त्यांची समजूत घालून दिली, व त्यांस मान्य झाल्यावर फिर्यादी काढून घेण्याकरतां मुक्त्यारपत्रें आणविलीं. खोती कज्जे पुष्कळ होते. त्यांतील प्रत्येक कज्जांत कुळांच्या हक्कांसंबंधानें तोड कशी करावी त्याची घासाघीस रावसाहेब करीत होते. परंतु तशी घासाघीस त्यांच्या घरचे कज्जांत कोणचीं कळें नवीं, कोणचीं जुनीं हें ठरवितांना त्यांनीं केली नाहीं यावरून त्यांचें चोख वर्तन दिसून येतें. घरगुती कज्जासंबंधें त्यांनीं पुढील पत्र मि. क्राफर्ड यांस लिहिलें होतें.

"या कज्जांतील एक खेडें ( देवसडें ) माझ्या पुतण्याचें आहे, व दुसरें सोनगांव हें माझें, माझ्या पुतण्याचें व धाग याचें अंशांशानें आहे. सर्व गोष्टींचा विचार करून उभयपक्षकारांस जें न्याय्य होईल ह्मणून कराल तें मला मान्य आहे. हा कांहीं अंशीं माझा स्वतांचा कज्जा आहे, ह्मणून मला जास्त कांहीं लिहितां येत नाहीं."

आपसांत ठरलेल्या या समजुतीप्रमाणें पुढें खोती ॲक्ट करण्यांत आला. त्या वेळेस मि. ॲशबर्नर यांच्या प्रास्ताविक भाषणावर रावसाहेबांनीं दैनिक पत्रांत टीका केली होती, व कायद्याच्या मसुद्यावर आपलें मत दिलें होतें.

यानंतर १८६८ सालीं जीं अपीलें हायकोर्टांत आलीं होतीं त्यांतील एका अपिलाचा निकाल १८८८ पर्यंत व्हावयाचा राहिला होता. त्यापासून रावसाहेबांस फार त्रास झाला. त्यांची प्रकृति अगोदरच फार बिघडली होती. परंतु अंगीकृत कार्य हें सोडावयाचें नाहीं असा त्यांचा निश्चय असल्यामुळें त्यांनीं तें काम शेवटास नेलें.

या कामासही जमलेल्या पैशाच्या भरीला पैसे बरेच लागले. ते रावसाहेबांनीं स्वतांच्या पदरचे लावले. खोत पडले साधारणतः गरीब. ते काय देणार! तथापि त्यांनीं फुल नाहीं फुलाची पाकळी दिली, म्हणून जनार्दनपंत वकील, देवरुख, यांस लिहिलें कीं,

**अकृत्वा परसंतापं । अगत्वा खलमंदिरं ॥**
**अक्लेशयित्वाचात्मानं । यत्स्वल्पमपि तद् बहु ॥**

शेष राहिलेल्या कामांत रावसाहेबांस प्रथमच वकीलपत्र खोतांतर्फे होतें परंतु त्याचा निकाल होण्यापूर्वीं ते सरकारी वकील झाले, म्हणून आपलें काम त्यांनीं दाजीसाहेब खरे यांकडे सोंपविलें. तें काम त्यांनीं रावसाहेबांच्या देखरेखीखालीं केलें. कोर्टांत खोतांतर्फे प्रसिद्ध बॅरिस्टर मि. मॅक्फर्सन यांनीं काम चालविलें. निकाल झाल्यावर बापुसाहेब आठल्ये यांनीं रावसाहेबांस लिहिलें कीं ज्याकरतां तुम्हीं जन्मभर कष्ट केलेत त्या खोती कज्जांचा शेवट झालेला पहाण्यास तुम्हीं जगलांत. १६।३।८८.

निकाल अगदीं मनासारखा झाला नाहीं. पुढें विलायतपर्यंत जाण्याचा बेत प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें सोडून द्यावा लागला.

## प्रकरण ४३ वें.

# कायदा विरुद्ध व्यक्तिविषयक तारतम्य.

सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयाद् न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥ १ ॥

[ मनुस्मृति ]

म्हैसूर प्रकरणावर रावसाहेबांचें लघ्वाकार पुस्तक यशस्वी झालें. नंतर १८७३ मध्यें त्यांनीं दुसरें लघ्वाकार पुस्तक लिहिलें. त्याला कारण असें झालें कीं, मुलकी अम्मलदारांनीं जमिनीवर बसविलेल्या साऱ्याची रक्कम व सारा आकारण्याची पद्धति चुकीची आहे या सबबीवर सरकारावर कांहीं जमिनीच्या मालकांनीं फिर्यादी केल्या. त्या हायकोर्टापर्यंत जाऊन त्यांचा निकाल वादीतर्फें झाला. तेणेंकरून या अम्मलदारांच्या सुरळीत कामांत घोटाळा पडूं लागेल तो पडूं नये ह्मणून अशा फिर्यादी चालविण्याचे दिवाणी कोडताचे अधिकार आकुंचित करणाऱ्या अथवा काढून घेणाऱ्या एका कायद्याचा मसुदा* मि. एलिस यांनीं कलकत्त्याच्या काउन्सिलांत आणला. तो कायदा अनिष्ट आहे असें दाखविण्यास हें पुस्तक रावसाहेबांनीं लिहिलें. त्याचा सारांशः—

" लार्ड कार्नवालिस यांनीं दोन गोष्टी चांगल्या केल्याः ( १ ) मुलकी खातें व न्याय खातें हीं निरनिराळीं केलीं. एकाहातांत असलेल्या राजसत्तेचा मोड केला व राजसत्तेचा दुरुपयोग नामशेष केला. ( २ ) स्वतंत्र न्यायाच्या कोडतांची स्थापना केली व अधिकारी या नात्यानें केलेल्या

* हें बिल प्रथम नामदार एलिस यांनीं कलकत्त्याच्या काउन्सिलांत १८७३ सालीं आणलें तें तयारींत यावयास २ वर्षें लागलीं. नंतर तें १८७५ सालीं नामदार होप यांनीं हातांत घेतलें.

कृत्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांवर केलेल्या फिर्यादी चालविण्याचा अधिकार कोडतांस दिला."

"या राजनीतींत जीं अंगभूत तत्त्वें आहेत त्यांवर हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याची भरभक्कम इमारत उभारलेली आहे. परंतु नामदार एलिस यांनीं हल्लीं जो कायद्याचा मसुदा, १८७३ च्या आगष्ट महिन्यांत गव्हरनर जनरल यांच्या सभेंत आणलेला आहे तो, हा पायाच ढांसळून पाडीत आहे. या कायद्यानें दिवाणी कोर्टाचा अधिकार नियमित अथवा नष्ट करण्यांत येत आहे. गव्हनर जनरल यांच्या इख्तदार सभेंत असल्या स्वरूपाच्या कायद्याचा प्रवेश होतां कामानये; या कायद्यानें एका मुलकी अधिकाऱ्याच्या ठरावावर दुसऱ्या मुलकी अधिकाऱ्याकडे अपील चालावयाचें आहे. पक्षकार व न्यायाधीश दोघेही मुलकी अधिकारी असावयाचे आहेत. कायदे बाजूला गुंडाळून ठेवण्याचें, जुन्या काळीं केलेले ठराव मोडण्याचें व देशांतील पुरातन मामूल वहिवाटींचा व बंधनकारक चालीरीतींचा उपहास करण्याचें सामर्थ्य या मुलकी अधिकाऱ्यांस यावयाचें असून त्याच्यावर कांहीं उपाय राहावयाचा नाहीं. तेणें करून महात्मा माउन्ट स्टयूअर्ट एल्फिन्स्टन यांनीं केलेल्या कायद्याच्या मर्मभूत तत्त्वांवर हल्ला यावयाचा आहे. म्हणजे आमचे मुलकी अधिकारी व्यक्तिशः इतके मोंगल बादशहा बनावयाचे आहेत व या बादशहांवर सुद्धां जे कांहीं जुन्या काळीं त्यांच्या मनांत भीति उत्पन्न करणारे दाब असत तेही आतां नसावयाचे आहेत. हें आमच्या राजसंस्थेवर मोठें संकट आलेलें आहे. जमिनीच्या मालकांच्या हक्कास बाध येणार आहे; म्हणून ब्रिटिश प्रजाजनांपैकीं एक या नात्यानें मीं हें पुस्तक लिहून माझें कर्तव्य करीत आहें. तें करतांना मी असें नम्रपणें दाखवून देतों कीं पुढें आणलेला कायदा करून घेण्यास सबळ कारणें दिलेलीं नाहींत. दिलेलीं आहेत तीं वास्तविक नाहींत. या प्रांतांत कायम धाऱ्याची पद्धति नसल्यामुळें

काहींतरी जमाबंदीचे ठराव करण्याविषयीं एका प्रकारचे नियम करण्याची वेळ आली आहे. एका व्यक्तीच्या च्छंदानुवर्तनावर चालणारी व्यवस्था व नियमबद्ध राज्यव्यवस्था या एकमेकींच्या विरूद्ध आहेत. पहिलीचा अम्मल दुसरीवर चालूं देणें ह्मणजे पाशवी शक्तीचा अम्मल मानवी शक्तीवर होऊं देण्यासारखें आहे. नियमबद्ध राज्यव्यवस्था ब्रिटिश मुत्सद्यांस मान्य झाली आहे व त्याप्रमाणें त्यांनीं कायदे केले आहेत. हिंदी लोकांस हीच व्यवस्था मान्य आहे असें सर हेनरी मेन यांचें ह्मणणें आहे."

" हक्काचा प्रश्न निघाला असतां राजा व रंक हे कायद्याच्या दृष्टीनें सारखेच आहेत असा अभिमान आमचे मुत्सद्दी सकारण वहातात, कारण आमचे कायदे याच तत्त्वावर रचलेले आहेत."

पुढें १७९९ पासून जीं रेग्युलेशनें झालीं त्यांत कलेक्टरवर न्यायाच्या कोर्टांचा ताबा ठेवलेला आहे, व तो कसा तें दाखवून दिल्यावर जातां जातां १८६८ च्या चवथ्या कायद्याचा ( सिटीसर्व्हेच्या ॲक्टाचा) उल्लेख करून रावसाहेब ह्मणतात. " हा कायदा मि. एलिस यांनीं १८६८ सालीं पुढें आणला. १८६९ मध्यें त्यास गव्हर्नर जनरल यांनीं संमति दिली. त्यांत देखील दिवाणी कोडतांस मुलकी प्रश्नांचा निकाल करण्याचे जे अधिकार देण्याची तजवीज प्रजेच्या हक्कांच्या संरक्षणार्थ ज्या मि० एलिसनीं केली तेच मि. एलिस आतां तेच दिवाणी कोडतांचे अधिकार ज्या अर्थीं काढून घेत आहेत त्या अर्थीं त्यांच्या स्वभावांत थोडक्या अवधींत मोठा फरक झाला असला पाहिजे. सध्यांच्या कायद्याचा मसुदा पुढें आणण्याचें कारण नामदार एलिस ह्मणतात त्याप्रमाणें असें घडून आलें."

" सर्व्हे व सेटलमेंट खात्यांतील अधिकाऱ्यांनीं बसविलेल्या व सरकारानें कायम केलेल्या जमिनीवरील साऱ्याची आकारणी गैर कायदा

---

* यांचा ग्रामसंस्था नामक ग्रंथ वाचावा म्हणजे कसें तें कळेल.

आहे म्हणून त्या अधिकाऱ्यांवर नुकत्याच फिर्यादी झाल्या. साऱ्याची रक्कम व ती ठरविण्याची पद्धति या विषयीं शंका घेण्यापर्यंत या फिर्यादींची मजल गेली. एका जमिनीच्या मालकानें आम्हीं ठरविलेल्या अवध्या चार रुपये आकारणीला हरकत घेऊन कोडतांत सरकारावर फिर्याद आणली. हायकोडतांत अपील जाऊन हायकोडतानें वादीतर्फे निकाल दिला, कारण उत्पन्नाच्या षष्ठांशाहून अधिक सारा सरकारास घेतां येत नाहीं. कलेक्टरास अधिक सारा बसविण्याची मामूल वहिवाट शाबीत करतां आली नाहीं."

"नुकत्याच फिर्यादी झाल्या या म्हणण्याला आधार मुळींच नाहीं. ब्रिटिश राज्याच्या पहिल्या दिवसापासून फिर्यादी होत आल्या आहेत- १८२६ सालीं जोशी यांची फिर्याद रत्नागिरीच्या कलेक्टरावर झाली व सुरतेस शेवटला निकाल झाला. नंतर १८६५ पासून १८७२ पर्यंत सर्व्हेच्या अधिकाऱ्यांवर व इतर अधिकाऱ्यांवर ३८४ फिर्यादी नुसत्या ठाणें जिल्ह्यांत झाल्या. कर्नल फ्रॅन्सिस यांनीं मागें एका जबानींत सांगितलें आहे कीं, एंकदर उत्पन्नाच्या पंचमांशाच्या अथवा षष्ठांशाच्या प्रमाणांत मी सारा बसविला आहे. परंतु मि. एलिस म्हणतात 'सारा बसविण्याचे नियम निश्चित नाहींत.' असें असेल तर चुकी होत आहे व हा कायदा झाल्यास चुकी दुरुस्त होण्याचा संभव उरत नाहीं. अशा चुक्यांस दीर्घायु करण्याचा या कायद्याचा हेतु असेल असें मला वाटत नाहीं."

"नुसत्या साऱ्याच्या आकारणीवरून फिर्यादी होत नाहींत, अशी मी जी तीन जिल्ह्यांतील माहिती मिळविली आहे, तीवरून दिसत आहे, तर लोकांची तोंडें बंद करण्यापेक्षां सर्व्हेचें काम नीट चालविण्याकरतां सर-बार्टल फ्रियर १८७१ च्या फायनॅन्स कमिटीपुढें म्हणाले त्याप्रमाणें पूर्वग्रह सोडून देऊन पूर्वापार चालत आलेल्या आचारांस व रूढीस धरून नियम करावे."

"हायकोर्टाच्या हातून जेव्हां केलेल्या नियमांचें उल्लंघन होईल तेव्हां हायकोर्टाच्या अधिकारांचें नियमन करण्याची वेळ येईल. हल्लीं जो कायदा पुढें आणला आहे त्याच्या योगानें हायकोर्टावर जो आक्षेप घेतलेला आहे त्यापासून आपला बचाव करण्यास हायकोर्ट समर्थ आहे. मला फक्त प्रजाजनांपैकीं एक या नात्यानें पहावयाचें आहे. तें एवढेंच कीं विनाकारण आमचे हक्क नाहींसे होऊं नयेत. कायदा मोडल्याशिवाय सव्हेंच्या लोकांस काम करतां येत नसेल तर हल्लीं आहेत त्याहून चांगले लोक त्या कामावर आणा पण आमचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न करूं नका."

"हायकोर्ट मुलकी अम्मलदारांचे ठराव बदलतें म्हणून हायकोर्टाचा अधिकार काढून घ्यावयाचा हा उपाय पाहिला म्हणजे एका हकिमाची आठवण होते. उघड्या हवेंतील प्राणवायू कदाचित् फुफ्फुसांची क्रिया जोरानें चालवील म्हणून त्याचें औषध घेणाऱ्या अभागी क्षयी रोग्याला अंधार कोठडींत कोंडून ठेवण्यास त्या हकिमानें सांगितलें. अर्थात आतां सभोंवताल्च्या दुष्ट हवेचें व त्याच्या फुप्फुसांच्या मंदक्रियेचें चांगलें पटूं लागलें. क्षीणतेची वृद्धि होऊन शारीरिक सृष्टींतील चमत्कार जो मृत्यु तो त्या रोग्यास प्राप्त झाला!"

"क्षणभर विचार केला असतां असें दिसून येईल कीं न्यायाच्या कोडतांतील शुद्ध वातावरणांतील न्यायरूपी प्राणवायु जर लोकांच्या क्षीण फुप्फुसांस, दुखावलेल्या हक्कांस, मुलकी अम्मल दारांनीं मिळूं दिला नाहीं तर लोकांचें राजकीय जीवित्व, राजकीय चमत्कार जो मृत्यु तो त्यांस येऊन नष्ट होईल. युरोपच्या व एशिया खण्डाच्या अर्वाचीन अथवा प्राचीन इतिहासांत असली प्रेमबंधन वाढविण्याची युक्ति मिळावयाची नाहीं."

"मि. एलिस यानीं दुसरें कारण हा कायदा करण्याचें असें सांगितलें कीं मुंबई इलाख्यांतील दिवाणी कोडतांस इतर इलाख्यांतील

दिवाणी कोर्टांपेक्षां हक्क अधिक आहेत, ते काढून सर्व देशभर सारखे हक्क करून ठेवावयाचे आहेत. हें कसें तें मि. एलिस यांनीं दाखवून दिलेलें नाहीं. समजा, या इलाख्यांतील हक्क अधिक आहेत. परंतु जे हक्क या इलाख्यांतील लोकांनीं ७५ वर्षें भोगलेले आहेत, ज्यांची महती त्यांस कळत आहे, ज्यांत ब्रिटिशांची न्यायप्रियता (जी न्यायप्रियता लोकांस आवडली ह्मणून या इलाख्यांतील लोक १८५७ च्या दिवूच्यांत चांगल्या रीतीनें पार पडले ती ) दिसून येत आहे, त्या लोकांच्या हक्कांवर, त्या ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवरील विश्वासावर आतां गदा आणलीच पाहिजे काय ? नवे कायदे करतांना तीन गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. जुना कायदा, त्यापासून तोटे व त्यावरील उपाय. जुन्या कायद्यापासून कोणते तोटे मि. एलिसनीं दाखविले आहेत ? कोणतेही नाहींत. ब्रिटिश न्यायाच्या कोडतांतील निवाड्यांवर लोक संतुष्ट आहेत. त्यांचा फायदा लोकांस मिळाला पाहिजे. "

नंतर हल्लीं मुंबई इलाख्यांत जे हक्क आहेत तेच किंवा तसले हक्क सर्व इलाख्यांतील दिवाणी कोर्टांस आहेत, असें रावसाहेबांनीं दाखविलें. त्याला आधार ल्युविसकृत राजनीतिविषयक युक्तिवाद, **ना. वे. प्राविन्सिसचें** रेकार्ड, **थामस मनरोकृत** कम्पनी सरकारची आर्थिक स्थिति, १८०३ सालचा ओरिसा प्रांताचा इतिहास, बंगाल व पंजाब या प्रांतांतील अॅक्ट, हाऊस आफ् कामन्सच्या कमिटीपुढें १८५३ सालीं झालेल्या साक्षी व मद्रासचीं रेग्युलेशनें इत्यादि पुस्तकांतून काढून दाखविले व रावसाहेबांनीं पुढें असें लिहिलें कीं देशभर एकच साऱ्याची पद्धति नसल्यामुळें एकच कायदे सर्वत्र असूं शकणार नाहींत. उदारणार्थ, बंगाल्यांत कायम धाऱ्याची पद्धति असल्यामुळें असल्या फिर्यादी आणण्याचें कारणच उरलें नाहीं. ह्मणून तेथील लोकांस अशा फिर्यादी आणण्याचा हक्क नको.

इकडील इंग्रजी पत्रकारांनीं व बंगाल्यांतील ' हिंदू पेट्रियट ' पत्रानें

या बिलाविरुद्ध चळवळ केल्याबद्दल त्यांचे आभार मानून व नेहमीं हिंदी लोकांच्या आकांक्षांच्या विरुद्ध जाणाऱ्या पण या वेळेस त्यांचा पक्ष उचलून धरणाऱ्या 'फ्रेंड आफ् इंडियापत्राचा' या कायद्यानें जमिनीवरील लोकांची मालकी नष्ट होईल असें अनुमान काढणारा उतारा देऊन हें पुस्तक संपविलें आहे.*

हें पुस्तक लिहून या पुस्तकाचा सर्वत्र प्रसार करून रावसाहेब स्वस्थ बसले नाहींत. या कायद्याच्या विरुद्ध लोकमत जागृत करण्याकरतां येथें व विलायतेंत बराच प्रयत्न त्यांनीं एकसारखा सुरू ठेवला. बंगालचे विद्वान लेखक, बाबू ख्रिस्तोदास पॉल यांची रावसाहेबांशीं फार मैत्री यावेळेस झालेली नव्हती असें दिसतें. परंतु पॉल बाबू हिंदी लोकांच्या हक्कांच्या संरक्षणार्थ सदैव डोळ्यांत तेल घालून जागत असत. म्हणून त्यांस रावसाहेबांनीं एक पत्र लिहिलें. त्या बरोबर आपल्या म्हैसूर प्रकरणाच्या दुसऱ्या आवृत्तीची एक प्रत पाठवून दिली. पहिल्या आवृत्ती-वर मागें पेट्रिअट पत्रांत अनुकूल अभिप्राय दिला होता त्याची आठवण दिली व वरील कायद्याविरुद्ध कांहीं कामगिरी करावयास सांगितली ती अशी—"मुंबई सिव्हिल सर्व्हिस पैकीं हिंदुस्थान सरकारचे मुख्य सभासद ना. एलिस हे एक सूचना आणणार आहेत. तिच्या संबंधें नामदार गव्हर्नर जनरल साहेबांस पाठवावयाच्या अर्जांच्या दोन छापील नकला या सोबत पाठविल्या आहेत. हा कायदा ज्यांस नडेल त्या लोकांकडून हजारों अर्ज जातील अशी माझी खात्री आहे. १८०७ मध्यें छापलेला कोलब्रुककृत बंगाल रेग्युलेशनांचा संग्रह पाहतां व क्लार्ककृत १८५४ मधील तसलाच संग्रह पाहतां मला असें आढळलें आहे कीं जेव्हां जेव्हां मुलकी अंमलदारांकडून कायदा मोडण्यांत येतो, तेव्हां तेव्हां त्यांच्यावर ना. एलिस

* शिवाय तीस चाळीस हजार सह्यांचा अर्ज कलकत्त्यास व पुढें विलायतेस पाठविण्याचें रावसाहेबांच्या मनांत होतें. ( २१।९।१३ गोळे यांस पत्र ).

यांच्या बिलांत नमूद केलेल्या सर्व बाबींत फिर्याद चालते. या माझ्या म्हणण्यास कोणी आक्षेप घेईल ह्मणून या विषयावर आपला सल्ला उत्तम प्रकारचा पाहिजे आहे. पुरवणी अर्जांत लिहिण्याकरतां मला वेळींच पुढील माहिती पाहिजे आहे. ती मेहरबानीनें आपण मिळवावी. १, कलेक्टर व त्यांच्या हाताखालचे मुलकी अधिकारी यांवर कोणत्या फिर्यादी आणतां येतात व त्यांस कोणत्या रूलीचा किंवा रेग्युलेशनचा आधार आहे? २, कायम धाऱ्याची पद्धत जेथें लागू नाहीं तेथें सारा निश्चित करण्याचे कांहीं नियम आहेत काय? जर असतील तर ते कोणते?.......मुख्यतः आह्मांला एवढें पाहिजे आहे कीं आमचें हें काम खुद्द राजसभेंत, पार्लमेंत सभेंत व बाहेर कोणी उत्साहानें हातांत घेतलें पाहिजे. ह्मणून नामदार **रामनाथ टागोर** ( माजी ब्रिटिश इंडिअन असोसिएशनचे अध्यक्ष ) यांची सहकारिता आपण मेहरबानीनें या कामीं मिळवावी अशी प्रार्थना आहे. या कामांत आपणास वकिलाचें मत घ्यावयास पडलें तर घ्यावें व त्याचे खर्चाकरितां १०० रुपयांची नोट या सोबत पाठविली आहे तींतून द्यावे. जास्त पडल्यास माझे जवळ मागावे व शिल्लक राहिल्यास आपल्या भागांत हल्लीं चालू असलेल्या दुष्काळानें ग्रस्त झालेल्या लोकांकरितां खर्च करावे. माझी स्वतःची खुद्द ओळख नसतां विषय गांभीर्यामुळें आपणांस त्रास द्यावयास मन वळत आहे व असें करितांना नकळत जो आपला वेळ घेत आहें व यांत लक्ष घालावयाला लावून फार त्रास देत आहें त्याबद्दल क्षमा असावी."

मि. **पॉल** यांनीं साहाय्य करण्याचें कबूल केलें व या बिलाच्या मसुद्यांत कांहीं फरक होईल अशी आशा **रावसाहेबास** वाटूं लागली असें मि. पॉल यांस लिहिलेल्या पुढील पत्रांवरून दिसतें.

" वरील सार्वजनिक प्रश्नाचा निकाल लावण्याकरतां आपण साहाय्य करणार अहांत त्याबद्दल मी आभारी आहें.

× × × × ×

हें बिल पुढें आणणारे गृहस्थ आपली नौका या बिलांतील हरकत घेण्यासारख्या बाबींच्या भारानें बुडतांना जेव्हां पाहतील तेव्हां वरील बिलाच्या मसुद्यांतून त्या बाबी आपण होऊन त्यांनीं फेंकून द्याव्या म्हणजे बुडती नौका जरा हलकी होईल." ( ९।१।१८७४ चें पत्र. )

" या बिला संबंधें आम्हीं लार्ड नार्थब्रुक यांकडे एक विनंतिपत्र पाठविणार आहों. हें बिल पास झाल्यावर लार्ड सॅलिसबरींकडे ही एक पाठवूं. यास इंग्लंदांतून आळा बसेल अशी आशा वाटत आहे." ( २६।६।७४ )

११–१–७४ रोजीं या बिलाच्या विरुद्ध केलेल्या अर्जाच्या व त्यावर लिहिलेल्या पुस्तकाच्या मि. नवरोजी यांच्याकडे रावसाहेबांनीं दीडशें प्रती विलायतेस पाठवून दिल्या व त्यांस अशी विनंति केली कीं, मेहरबानी करून या नीट वांटा व त्यावर लेख लिहववा. सर लॉरेन्स पील व इतर प्रीव्ही कौन्सिलच्या जज्जांची ओळख काढूं शकाल तर ठीक; कारण या कोर्टाच्या अम्मलासंबंधाच्या सार्वजनिक प्रश्नाकडे लक्ष देऊन हित अनहित पाहतील तर तेच पाहतील. पाटणाचे मि. टेलर यांस भेटा. त्यांस कांहीं प्रती पाठविल्या आहेत. आपण ५०० रु. टपाल खर्चास लावावे. याशिवाय या बाबतींत खर्च लागेल तर माझ्या नांवें लिहावा. तो मी बेबात आनंदानें व साभार करीन. मि. टेलर यांस पडेल तो खर्च द्यावा. एकही उपाय केल्याशिवाय शिलकींत पडूं देऊं नका." दुसऱ्या एका पत्रांत एक एक प्रत सर जॉन कीज्; प्रो. फॉसेट; सर जी. क्लार्क; सर ई. पेरी व सर बार्टल फ्रियर यांस देण्यास विनंति केली होती. लंडन येथील मि. टेलर यांच्याकडेही वर प्रमाणें २५–२५ प्रती अर्जाच्या व पुस्तकांच्या पाठवून त्यांस १२–१–७४ च्या पत्रांत पुढें दिल्याप्रमाणें रावसाहेबांनीं विनंति केली. " आपण आपलें वजन खर्च करून योग्य अधिकाऱ्यांपुढें जर आमचें ह्मणणें मांडाल व शक्य तेवढे श्रम

करून आमचें कार्य उचलून धराल तर मोठे उपकार होतील. आमचें कार्य ह्मणजे कायदा व न्याय यांनीं मुलकी अंमलदारांच्या लहरी वर्तनावर आणलेली फिर्याद होय. ही भाषा आपणाला कडक वाटेल पण आपण तें बिल वाचून पाहिलेंत तर आपणांस आढळेल कीं पार्लमेंन्ट सभेंत, वेस्टमिनिस्टर हॉलमध्यें, जी भाषा अशा प्रसंगीं वापरली गेली असती तीहून कडकपणांत ही भाषा निम्मे येणार नाहीं. ”

याचप्रमाणें त्यांनीं मि. हॅवलॉक साहेब यांस विनंति केली होती तीः—

“ हा नवा कायदा रद्द करण्याकरितां आपण होईल तेवढी शिकस्त करावी. एल्फिन्स्टनकृत कोड चांगलें चाललें आहे व बहुतकालें करून त्याचा चांगलेपणा सिद्ध झाला आहे. त्यांत आतां फिरवाफिरव कां ? जर येथें कायमधाऱ्याची पद्धत असती, तर एकदांचे हे मुलकी अधिकाऱ्यांचे व राणी सरकारच्या प्रजेचे तंटे कायमचे मोडले असते. ” ( ११।६।१८७४ चें मि. टेलर यांस पत्र. )

“ एलिस साहेबांचे बिलास इंडिया कौन्सिलमध्यें हरकत आली असें वृत्त समजतें तें खरें होवो. सर जार्ज क्लार्क व सर बार्टल फ्रियर यां सारखे मुत्सद्दी तें बिल टाकावयास लावतील. आमची दाद लागण्याची आशा तेथेंच आहे. ” ( २४।७।१८७४ चें मि. टेलर यांस पत्र. )

ऑनरेबल सर. ए. हॉबहाउस्, क्यु. सी, व आनरेबल डॉलयेल या दोघांकडे निरानिराळीं पत्रें पाठवून सोबत आपल्या पुस्तकाच्या प्रती पाठवून आपलें म्हणणें रावसाहेबांनीं कळविलें होतें. आनरेबल सर जी. कॅम्बेल यांस ५–१–७४ चे पत्रीं लिहिलें कीं सार्वजनिक प्रश्नाची चर्चा करण्यांत जें आपण लक्ष देतां व निःपक्षपातपणें नेहमीं मत देतां त्यावरून मला जरा धीटपणा येऊन मी आपणांकडे एक पुस्तक पाठवीत आहे. पुढें पत्रांत आपलें म्हणणें सविस्तर कळवून नंतर ओळखीशिवाय आकस्मिक रीतीनें तसदी देण्याबद्दल माफी मागून पत्र पुरें केलें आहे. आपले मित्र

जेकब साहेब यांसही रावसाहेबांनीं पुस्तकाची प्रत पत्रासोबत अशीच पाठविली होती.

नंतर मुंबईच्या एका इंग्रज मित्रास खालीं दिल्याप्रमाणें रावसाहेबांनीं पत्र लिहिलें. "पुढच्या मंगळवारींच आमचे कलेक्टर, नबाब बनणार आहेत×××मि. हाब्हाउस व मि. होप हे एकमेकांची स्तुति करतील व दोघांचीही स्तुति लार्ड नार्थब्रुक करतील. एल्फिन्स्टन साहेबांनीं बांधलेल्या हिंदी साम्राज्याच्या इमारतीचा भरभक्कम पाया लेखणीच्या झटकाऱ्यासरसा ढासळून पडणार आहे. मला मि. बर्क यांचें बुद्धिसामर्थ्य असतें किंवा सर अर्स्किन पेरी यांची हिम्मत असती तर मात्र फार दूरच्या या पूर्व दिग्भागांत म्यां उत्पन्न केलेला ध्वनि खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें दवडून लोकांच्या कर्णपथावर आदळवला असता व त्या सरशी तेथें मोठी चळवळ उडाली असती. पण आतां होपनिर्मित निबिड निराशारण्यांत पश्चिम हिंदुस्थान दीर्घ रोदन करीत राहील." २५।३।७६ हें पत्र एवढे परिश्रम केल्यावर यश येण्याची आशा बहुतेक नाहींशी झाल्यावर लिहिलेलें असावें पण त्या निराशेंतच पुढें काम केल्यास यश येईल अशी रावसाहेबांस वाटलेली आशा दिसत आहे.

एलिस बिल १८७६ च्या एप्रिल महिन्यांत कलकत्त्याच्या काउन्सिलांत पास झालें व सेक्रेटरी आफ स्टेट यांकडे मंजुरीला रवाना झालें. त्यास मंजुरी देऊं नये असें सेक्रेटरी आफ स्टेट यांस विनंति करण्याकरतां मुंबईकरांनीं शेरीफकडवून लोकांची सभा फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्यें भरविली. सभेला पुष्कळ इंग्रज व हिंदी

---

* हें बिल मि० एलिस यांनीं कलकत्त्याच्या काउन्सिलांत आणलें परंतु कांहीं काळ तें तसेंच पडून राहिल्यावर मि. एलिस यांच्या अभावीं मि. होप यांनीं हातीं घेतलें होतें. होप या नुसत्त्या शब्दाचा अर्थ आशा असा आहे म्हणून या वाक्यांत श्लेष साधला आहे.

गृहस्थ जमले होते. रावसाहेब, काशिनाथपंत तेलंग व मि. वुड यांचीं भाषणें उत्तम वक्तृत्त्वाचे मासले होते. वक्तृत्त्वाशिवाय त्यांत मोठा युक्तिवाद होता. रावसाहेबांनीं आपल्या भाषणांत मेसर्स होप व हाब-हाऊस यांनीं काउन्सिलांत केलेल्या विधानांचा समाचार घेतला. हें भाषण फार मोठें होतें म्हणून त्याचा सारांश दिला आहे.

" मि. होप म्हणतात कीं या कायद्याविषयीं गैरसमज उत्पन्न झालेला आहे. त्यांस मी असें विचारतों हा गैरसमज कोणी केला ? सरकारनें ? हायकोर्टानें ? लोकांनीं ? मला तर कोणी तें ठाऊक नाहीं. मुंबई सरकारचे या कायद्याविषयींचे कागदपत्र अद्याप प्रसिद्ध झाले नाहींत. म्हणून त्यांचा समज काय आहे तो कळत नाहीं. हायकोर्टानें आपलें मत अगदीं असंदिग्धपणें जुन्या कायद्याच्या तर्फे देऊन कोणाचाही गैरसमज करून दिला नाहीं. लोकांच्याबद्दल म्हणाल तर ज्यांवर मुंबई सरकारचें राज्य आज पन्नास वर्षें चालत आहे त्यांची स्थिति पाहिली असतां हल्लींचा राज्यकारभार सुरळितपणें चालण्याकरतां अथवा लोकांना संतुष्ट ठेवण्याकरतां अथवा शांततेचें रक्षण करण्याकरतां या कायद्याची अवश्यकता नाहीं एवढें मी खात्रीनें सांगूं शकतों. "

" मि. होप म्हणतात मुलकी अम्मलदारांची सोय व गैरसोय यांकडे लक्ष दिलें पाहिजे. जणुंकाय या एका सोयीच्या अथवा गैरसोयीच्या कडेच सर्व कायद्यांचा विशेषतः जमीन महसुलासंबंधीं कायद्यांचा रोंख असला पाहिजे. मुलकी अधिकाऱ्यांची जमिनीवरील कर वसूल करतांना झालेली गैरसोय—म्हणजे ती प्रासंगिक गैरसोय—महत्त्वाची असेल परंतु ती ज्यांच्याकडून कर वसूल करावयाचा असतो त्या लोकांच्या हक्कापेक्षां महत्त्वाची नाहीं ! तिच्याकरितां लोकांच्या हक्काचा भंग होतां कामा नये."

"मि. होप हे सांगत आहेत कीं १८७३ मध्यें जो बिलाचा मसुदा होता त्यांत आतां १८७६ मध्यें फरक केलेला आहे. मी विचारतों तो उदारपणें

केला आहे काय ? व तो उदारपणा सहज पाहतां दिसण्यांत येईल असा आहे काय ? नाहीं ! असें मी तुमच्या परवानगीनें सांगतों. जो फरक झाला आहे तो अगदीं क्षुल्लक आहे. ज्या फिर्यादी ब्रिटिशांनीं दिलेल्या सनदांच्या आधारावर आणतां येतील तेवढ्याच फिर्यादी चालविण्याचा अधिकार कोर्टांना या केलेल्या फरकानें दिला आहे. अशा फिर्यादी $\frac{१}{१०}$ आहेत. परंतु या इलाख्यांतील ज्या फिर्यादींनां आधार मामूल वहिवाटीचा आहे, अशाच फिर्यादी $\frac{९}{१०}$ आहेत. ”

“ मि. होप यांनीं इंग्लंदांतील जमीनदारांची हिंदुस्थानांतील जमीनदारांशीं तुलना केली आहे. त्याला माझ्या अगोदर भाषण करून गेलेल्या इंग्रज गृहस्थानें उत्तर दिलेंच आहे. त्यांस इंग्लंदच्या कायद्याची गुंतागुंत माझ्यापेक्षां चांगली कळत आहे. तथापि इंग्लंदच्या जमीनदारांच्या बरोबरीला हिंदुस्थानांतील जमीनदारांस वर उचलून बसवावयाचें असेल तर आमची मुळींच हरकत नाहीं. परंतु एलफिन्स्टन साहेबांच्या वेळेपासून किंबहुना १७९९ पासून ज्या उच्च स्थितींत जमीनदार आहेत तीं पासून त्यांस खालीं ओढण्याचा जर हेतु असेल तर त्यास आमची हरकत आहे. ”

“ मि. हाबहाउस म्हणतात १८२७ चें एलफिन्स्टनकृत कोड मुळींच सदोष आहे म्हणून त्यांतील दोष आतां काढले पाहिजेत. यांतला वास्तविक प्रकार काय आहे ? ना. एलफिन्स्टन् यांनीं १८२७ सालीं दोन कायदे केले. एक कायदा उदार स्वरूपाचा केला. तो जे प्रांत २९ वर्षांपेक्षां अधिक वर्षें ब्रिटिश अम्मलाखालीं होते त्यांस लागू केला व दुसरा आकुंचित स्वरूपाचा केला. तो जे प्रांत ब्रिटिश मुलखास नुकतेच जोडले होते ( दख्खन व खानदेश ) त्यांस लागू केला. तेव्हां जर आकुंचित स्वरूपाचा कायदा सर्व मुलखांस लागू करावयाचा असता तर तेव्हांच करावयाला काय हरकत होती ? उलट असें दिसून येतें कीं आकुंचित स्वरूपाचा कायदा नष्ट करून उदार स्वरूपाचा कायदा सर्व

पश्चिम हिंदुस्थानास लागू करावयाचा त्यांचा हेतु होता व त्याप्रमाणें उपायही योजण्यांत आले. १८२७ सालापासूनच मुलकी कोडताचे अधिकार या इलाख्यांत कमी करीत करीत १८६६ मध्यें खुद्द मि. एलिस साहेबांच्या देखरेखीखालीं अगदीं नष्ट करण्यांत आले व अदालत आणि दिवाणी कोर्टांस हव्या त्या फिर्यादी चालविण्याचे अधिकार देण्यांत आले."

"सारांश ना. एलफिन्स्टन् हे उदार मनाचे पुरुष होते. त्यांनीं दिवाणी कोर्टांत मुलकी अधिकाऱ्यांवर फिर्याद आणतां येते असा साधारण नियम केला व आणतां येत नाहीं अशा कांहीं अपवादात्मक बाबी ठेवल्या. परंतु आतां मि. हाबहाऊस हे हायकोर्टांत मुलकी अधिकाऱ्यांवर फिर्याद चालूं नये असा साधारण नियम करूं पहात आहेत व कांहीं चालाव्या हा अपवाद करीत आहेत."

"मुलकी अधिकारी हे राणीसाहेबांच्या महसुलाचे संरक्षक आहेत. ह्मणून जेव्हां जेव्हां त्या महसुलाला धक्का पोहोंचेल तेव्हां तेव्हां मुलकी अधिकाऱ्यांस हात घालण्याचा अधिकार पाहिजे. परंतु जर त्यांना तसा अधिकार पाहिजे तर प्रजाजनांना सुद्धां आपल्या हक्काचें संरक्षण करण्याकरतां दिवाणी कोर्टाची मदत मागण्याचा अधिकार पाहिजे."

"मि. होप म्हणतात कोर्टांतील फिर्यादीचा कोण तरी त्रास हा ! दोन बाजूला वकील व बॅरिस्टर तरी कसे झगडत असतात ! मुलकी कामाचे पारिभाषिक शब्दांचे अर्थ ज्या कोशांतून काढावे लागतात ते कोश तरी प्रमाणभूत कोठें आहेत ! साक्षीदार व्यक्तिशः हवें तें भाराभर बडबडतात त्याची छाननी करावयाची ! चारशें पांचशें पानें भरतील एवढें कागदाचे तर्जुमे करावयाचे ! पण एवढें कशाकरतां ? तर सर्व कज्जा ज्या एका शब्दावर अवलंबून असतो त्या शब्दाचा सांप्रदायिक अर्थ लावण्याकरतां !"

"यास उत्तर थोडक्यांत असें आहे कीं, मि. होप यांच्या मतानें आमची कोडतें, आमचे भाषांतरकार, आमचा पुराव्याचा कायदा व काम चालविण्याची पद्धति ही खालपासून वरपर्यंत चुकीचीं आहेत व मुलकी अम्मलदार मात्र नेहमीं दुरुस्त तोच न्याय जाणतो व तो न्याय त्याला अंतःप्रेरणेनें कळतो, असेंच ह्मटलें पाहिजे. कारण खरें शोधावयाची त्याची काय दुसरी पद्धत आहे ती आह्मांस त्यानें सांगितली नाहीं. कोशाविषयीं ह्मणाल तर मोल्स्वर्थच्या कोशाहून अधिक काळजीनें तयार केलेला कोश मला ठाऊक नाहीं. शिवाय आम्हीं असें स्पष्ट सांगतों कीं वरील दिवाणी कोडतें, भाषांतरकार व कोश यांच्याकडूनच आमची काय तड लागेल तीच हवी आहे, पण अंतःप्रेरणेनें एकाद्या शब्दाचा सांप्रदायिक अर्थ लावून मुलकी अधिकाऱ्याकडून आमच्या कामाचा शेवटचा निकाल लावून घेणें आम्हांस नको आहे. !"

"स्फोट होऊं नये म्हणून सर्व वाफेच्या इन्जिनांत वाफेच्या भांड्यांत अधिक झालेली वाफ बाहेर तत्क्षणीं घालविण्याचा एक संरक्षक पडदा असतो. त्या पडद्याशिवाय एकादें इन्जिन एकादा यांत्रिक शोधून काढील तोंपर्यंत दिवाणी कोर्टाचा हा जो मुलकी खात्याच्या इन्जिनांत संरक्षक पडदा आहे तो नाहींसा करणें इष्ट नाहीं. सर्व्हेप्रकरणांतील अनियमितपणा लोकांना हायकोर्टापर्यंत नेतांना आला म्हणूनच फायदा झाला असें हायकोर्टाच्या कागदपत्रावरून सिद्ध करतां येतें."

"मि. हाब हाऊस ह्मणतात सनदांची किंमत जरी त्यांत यावच्चंद्रदिवाकरौ असे शब्द घातलेले असले तरी त्यांतील केलेला ठराव जमीन देणारा किंवा घेणारा यांच्या हयातीच्या बाहेर टिकत नाहीं इतकीच आहे. अशाच तऱ्हेची कोटी मि. मॅन्गलस् यांनीं म्हैसूरप्रकरणांत केली होती. हायकोर्टानें या शब्दांचा अर्थ जसा सरळ आहे तसा धरावा असा निर्णय केलेला आहे. मि. हाब हाऊस हे सनदांचा अर्थ हवातसा करणाऱ्या हिंदी संस्थानिकांकडे बोट दाखवीत आहेत. अशी वाईट

गोष्ट संस्थानांकडून झाली असेल. परंतु मि. कॅन्डी हे गव्हर्मेंट सिलेक्शनमध्यें असें दाखवून देत आहेत कीं हिंदी संस्थानिक सनदांस मान देत असत. ”

शेवटीं रावसाहेब उपसंहार करतांना म्हणाले:—

“ पूर्वींची हिंदी संस्थानें हवींतेवढीं जुलमी होतीं, असें ह्मणा पण तीं सनदांस मान देत होतीं. आम्हीं इंग्लंदच्या लोकांकडे धांव घेत आहोंत. त्यांच्या हातून आम्हांस न्याय मिळवावयाचा आहे. स्टेट सेक्रेटरी हे त्यांचे मुख्य आहेत. त्यांच्यावर हें काम भंरवशानें टाकून मी उत्तराची वाट पहात बसतों. ”

या बिलासंबंधें रावसाहेबांनीं जी खटपट केली तींत पुढील गोष्टींचा बोध होतो. एकादा कायद्याचा मसूदा काउन्सिलमध्यें आला कीं त्याचें वास्तविक स्वरूप रावसाहेबांच्या लवकर व नेमकें लक्ष्यांत येत असे. व एकदां एकाद्या मसुद्यांत एकादा भाग परिणामीं अनहितकारक म्हणून त्यांची खातरी झाली कीं त्याची दुरुस्ती करण्याकरतां जेवढे म्हणून कायदशीर इलाज आहेत तेवढे केल्याशिवाय स्वस्थ न बसण्याचा रावसाहेबांचा निश्चय असे. त्याकरतां श्रमांकडे, पैशाकडे किंवा काळाकडे मुळींच पहावयाचें नाहीं हा त्यांचा निर्धार असे. तो शेवटपर्यंत टिकण्यास त्याला कर्तव्य जागृतीचा आधार असे. मी ब्रिटिश प्रजानन आहें, असा अभिमान धरून प्रजाननांच्या हक्कांचें संरक्षण करण्याच्या तयारीला लागत. प्रथम युक्तिवाद करीत. त्यांत विरुद्ध पक्षाच्या कोटिक्रमाचें सकारण खण्डण व आपल्या पक्षाचें निर्दोष तर्कप्रतिष्ठित मंडण करीत व तें करतांना त्यांच्या विपुल वाचनाचा त्यांस फायदा होई. क्रमाक्रमानें खालपासून वर पर्यंत अर्ज पाठविणें, सभा भरविणें व वर्तमान पत्रांत लेख लिहिणें, लिहवणें इ. राजमान्य गोष्टी करून लोकमत उत्पन्न करण्याची हातोटी त्यांस उत्तम साधली होती. ब्रिटिश राज्य व्यवस्थेच्या उदार तत्त्वांवर दाद मागून घेण्याचे जे मार्ग निश्चित झाले

आहेत त्यांवर त्यांची प्रीति होती व ती त्यांस साहाय्यकारी होत असे. ब्रिटिश राज्याच्या न्यायप्रियतेवर त्यांचा सदोदित भरंवसा होता. याप्रमाणें या कायद्याचा मसुदा सेक्रेटरी आफ् स्टेट यांनीं त्यांत कांहीं फेरफार करण्याचें सुचवून परत पाठवून दिला.

या बिलाच्या विरुद्ध रावसाहेबांनीं जे प्रयत्न केले त्यासंबंधें रावसाहेब व त्यांचे जुने मित्र डा. बर्डवुड यांच्यामध्यें थोडा पत्रव्यवहार झाला, त्यांतील उतारे दिल्याशिवाय हें प्रकरण पुरें करतां येत नाहीं.

"निरपेक्ष स्वातंत्र्य भक्ति, व सत्यनिष्ठा या तुमच्या अलौकिक गुणांबद्दल मी किति आदर बाळगतों हें तुम्हीं जाणतच आहांत. परमावधीची स्वातंत्र्यनिष्ठा म्हणजे ब्रिटिश राज्यावर दृढ निष्ठा होय" असें लिहून डा. बर्डवुड यांनीं दुसऱ्या पत्रीं पुढें लिहिलें कीं तुम्हीं मि. एलिस यांवर एकसारखे हल्ले चढविले व ते कसे तें स्पष्ट करून दाखविण्याकरतां रावसाहेबांस स्पष्ट लिहिलें कीं सर्व हिंदी वर्तमानपत्रांनीं केलेले हल्ले अर्थातच तुम्हीं केलेले हल्ले धरावयाचे, कारण सर्व हिंदी वर्तमानपत्रांच्या सेनेची हालचाल तुम्हीं उचलेल्या या नुसत्या करांगुलीच्या खुणांवर होत होती ही तुमची कर्तबगारी विश्रुतच आहे.

यावर रावसाहेबांनीं पत्र पाठविलें तें "मि. एलिस माझे मित्रच होते. व ते अद्यापिही आहेत, असें सांगण्यास मला आनंदच होत आहे. तथापि मि. एलिस यांवर व्यक्ति या नात्यानें जें माझें प्रेम आहे त्याहून ब्रिटिश राज्यावर अधिक आहे आणि जेव्हां अनुचित कायदे करण्यानें एकाद्या सुंदर ब्रिटिश इलाख्याचा नाश होईल कीं काय अशी भीति उत्पन्न करणारा एखादा मोठा सार्वजनिक प्रश्न उद्भवतो तेव्हां मी त्या कायद्यावर माझ्याकडून होईल तितकी टीका करतोंच आणि अशा परिस्थितींत जसा एकादा इंग्रज गृहस्थ आपलें कर्तव्य करील तसेंच मींही करीत असतों त्यापलिकडे कांहीं नाहीं असें मी समजतों."

## प्रकरण ४४ वें

# मुंबईचें कायदे काउन्सिल.

धर्मज्ञाः शुचयोऽलुब्धा भवेयुः कार्यचिन्तकाः ।
कर्तव्यं वचनं तेषां समूहहितवादिनाम् ॥ १ ॥
( याज्ञवल्क्य )

इंग्रज सरकारची हिंदुस्थानांत आपलें राज्य प्रस्थापित केल्यावर पहिली मोठी व उत्तम कामगिरी म्हटली म्हणजे सर्वत्र शान्ततेची स्थापना करणें ही होय. ही कामगिरी १८६० च्या सुमारास पूर्णपणें झाली. तेव्हां देशाच्या दक्षिणेस टिपू उरला नव्हता; मध्यप्रांतांत चितू पेंढारी नव्हता; व उत्तरेस ताबडतोब उपाय करावयास लावणारी शीख लोकांची "खालसा" फौज नव्हती. सत्तावन सालीं ब्रिटिशांच्या सत्तावनाला लागलेला वणवाही पार विझून गेला होता. आतां खऱ्या सुधारणेच्या काळाला आरंभ झाला होता. समशेर बहाद्दरांचा धंदा जाऊन खऱ्या मुत्सद्यांच्या कामगिरीची वेळ आली होती.

आतां इंग्रज सरकारच्या दुसऱ्या मोठ्या कामगिरीस प्रारंभ झाला. ही कामगिरी मोठ्या डामडौलाची नव्हती, पण कठीण होती. या वेळेस राज्याची अंतर्व्यवस्था करावयाची होती. जमाखर्चाची, जमीन महसुलाची, व्यापार वृद्धीची व शहरांच्या स्वच्छतेची व्यवस्था करावयाची होती. ही सर्व व्यवस्था कायद्यांच्या मार्फत करावयाची होती, कारण ब्रिटिशराज्याचा पाया म्हणजे कायदे होत. ते करण्याकरितां काउन्सिलांची स्थापना या वेळेला झाली.

यावरून पूर्वी कायदेच नव्हते असें समजावयाचें नाहीं. हिंदू लोकांचे कायदे मुख्यतः धर्मशास्त्रविहित असत. शिवाय देशाचार, कुलाचार व रूढी यांस शास्त्राहून बलवत्तर मानलें जाई. मुसलमानांचे कायदे कुराण विहित असत. कंपनीचें राज्य झाल्यावर मुंबई, मद्रास व बंगाल या तीन इलाख्यांचे गव्हर्नर आपआपल्या इलाख्यांपुरतें राज्य सुरळीत चालवण्यास नियमांवजा कायदे करीत असत व तसे करावे या विषयींचे कांहीं नियम १७७३ सालीं केलेले होते. या कायदे करणाऱ्या सभेंतील सभासद सर्व युरोपियनच असत. हिंदीलोकांचा प्रवेश यांच्या या सभांत झाला नव्हता तरीही हिंदी लोकांस हितावह असे कायदे लार्ड वुइल्यम बेन्टिकसारखे गव्हर्नर करूं शकत. लार्ड बेन्टिक ह्मणत असत " हिंदुस्थान देशावर आमचा अम्मल हिंदुस्थानच्या हिताकरतां चालवला पाहिजे. इंग्लंदांहून इकडे पाठवले जाणाऱ्या ८००।१००० लोकांच्याच हिताकरतां नव्हे. " पुढें १८५७ सालीं बंड झालें तेव्हां कित्येक इंग्रज मुत्सद्यांस वाटूं लागलें कीं कायदे करणाऱ्या सभेंत हिंदी लोकांना केलेली मनाई अपायकारक झाली. आह्मीं जे कायदे करतों त्यांच्या विषयीं हिंदी लोकांचें मत कळणें इष्ट आहे, नव्हे अवश्यक आहे. ह्मणून कायदे काउन्सिलांत हिंदी मनुष्य नेमण्याचा प्रघात १८६१ सालापासून झाला, हिंदी लोकांचें मत सरकारास उपलब्ध झालें; आपण केलेले कायदे लोकांस आवडतात कीं नाहीं हें कळूं लागलें, व त्याप्रमाणें कायदेकानू करणाऱ्या सभेंत काय चाललें आहे तें लोकांस प्रत्यक्ष दिसूं लागलें.

सर्वांत मोठी संस्था राजाची; परंतु कांहीं सुधारलेल्या देशांत राजसंस्था रद्द करण्यांत आली आहे. कांहीं ठिकाणीं तिचें अस्तित्व नामधारी आहे. त्याचें श्रेय पुरातन कालापासून आपण राजसंस्थेला मान देत आलों आहोंत तिचें स्मारक ह्मणून राजसंस्थेचे रक्षण केलें पाहिजे या

भावनेसच दिलें पाहिजे. एवंच कायदे करणाऱ्या सभेइतकी सत्ताधारी संस्था दुसरी नाहीं. अशी स्वातंत्र्यमूलक संस्था हिंदुस्थानांत स्थापण्यांत आली, तेव्हां लोकांना आनंद झाला व तींत त्यांचा प्रवेश झाला, तेव्हां तर त्यांस फारच आनंद झाला. काउन्सिलांत नेमणूक होणें हा फार मोठा मान समजूं लागले. काउन्सिलदाराला नामदार ही पदवी प्राप्त होत असे. हिंदी सभासदांच्या नेमणुका होत त्या सर्वच हिंदी लोकांचें खरें मत सांगूं शकतील अशा योग्य माणसांच्याच होत असत असें जरी धरून चाललें नाहीं तरी ते नेमलेले सभासद हिंदी लोकांच्या मतांची कल्पना बरीच बरोबर करून देण्यास शकतील असे असत. निदान इंग्रज लोकांस मराठी किंवा हिंदुस्थानी शिकविण्यास ठेवलेले गर्विष्ठ पंडित अथवा फाजील मुनशी हे आपल्या तुटक्या इंग्रजींत हिंदी लोकांचें मत कळवूं शकले असते त्यांहून या नेमलेल्या सभासदांकडून अधिक तुटकें मत कळविलें जात नसे हें उघड आहे. या नेमणुका बहुधा जहागीरदार व मुंबईचे व्यापारी शेट लोक यांतून होत असत. त्यांत सर जमशेटजी जीजीभाई यांच्या सारखे समाजांत प्रतिष्ठा पावलेले लोक असत. हें त्या काळाप्रमाणें ठीकच होतें, कारण तेव्हां मुंबईच्या बाहेरच्या लोकस्थितीचा अनुभव असलेले व शिकलेले असे लोक शहरांतून तयार झालेले नव्हते. कधींकधीं शिक्षणानें व अनुभवानें व प्रतिष्ठेनें थोर असे सरदार गोपाळराव हरि देशमुखांसारखे लोक असत.

वरिष्ठ शिक्षण किंवा प्रतिष्ठा हे गुण ज्यांत नाहींत ते सभासद रावसाहेबांस पसंत नसत. वरिष्ठ शिक्षण नसलेल्यांच्यातर्फे काय म्हणतां येईल तें मला माहीत नाहीं. व्ही. जे. शंकरशेट व इतर कांहीं हिंदी लोक यांस जी प्रतिष्ठा आहे ती त्यांस नाहीं. " प्रथम प्रथम सुविद्य अनुभवी व प्रतिष्ठित लोक एकएकदां नेमून झाल्यावर मुंबईकरांत १०।१२ वर्षांनीं शिलकींत फार उरले नाहींत असें रावसाहेबांचें मत होतें, असें पुढील पत्रावरून दिसतें.

" मुंबईचा हेवा करण्याचें कांहींएक कारण आतां उरलें आहे असें मला वाटत नाहीं. मी डीन स्विफ्ट नाहीं. ज्या मुंबईच्या लोकांस मोठे म्हणून गणलें जात आहे, त्यांस तिकडील सातव्या प्रतीच्या शहरांताल संभावितांच्या कोणत्याही क्लबांत सभासद होण्यास नालायक समजलें जाईल. ( २६।१०।१८७२ चे नूलकर यांस पत्र. )

वरील पत्राचा अर्थ एवढाच दिसतो कीं स्वभावतः च स्वतंत्र मत देण्यास लायक असे मनुष्य थोडे उरले होते. नेमणुकीच्या उपकृतीच्या भरानें त्यांची जिव्हा जड होऊन लोकांचें खरें मत ते कळवूं शकत नसत. रावसाहेबांची नेमणूक मुंबईच्या काउन्सिलांत १८७४ सालीं सर फिलिफ वुड हाउस, मुंबईचे गव्हर्नर, यांनीं केली, व त्यांस आपलीं मतें जीं नुसती वर्तमान पत्रांतून अथवा खासगी पत्रांनींच सरकारास अथवा खासगी स्नेह्यांस कळवितां येत असत, तीं आतां उघडपणें व स्पष्टपणें काउन्सिलांत प्रकट करण्याची संधि उदारपणानें दिली. रावसाहेब हे स्वतंत्र मताभिमानी म्हणून प्रसिद्धच होते. त्यांच्या नेमणुकीवर टाईम्सनें सविस्तर मत दिलें आहे त्याचा सारांशः—या मोठ्या हिंदी विद्वानाची नेमणूक केवळ गूण पाहून केलेली आहे. देशांतील वाढीस लागलेल्या बुद्धिमत्तेचा व सर्व सुशिक्षित हिंदीजनांचा या नेमणुकीनें गौरव झाला आहे. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें कायद्याचें ज्ञान विशेष प्रकारचें आहे. त्याला त्यांच्या इंग्रजी ज्ञानाची जोड मिळाली आहे. त्यांची लेखनशक्ति व वाक् शक्ति कोणत्याही शिकलेल्या इंग्रज गृहस्थांत आढळून आल्यास त्यास भूषणावहच होतील. त्यांचा स्वतंत्रमताचा बाणा अधिकारी वर्गास परिचित झालेला आहे. देशांतील संस्थांस उदार वळण देण्यांत व लोकहितकारी कायदे करण्यांत सुशिक्षित हिंदुजनांचें अंग असूं देण्याला सरकारनें आतां आरंभ केला आहे. आपलेकडे बहुमत नाहीं असें नूतन नामदारांस आढळेल, तरी लोकपक्षाच म्हणणें काय आहे

तें स्पष्टपणें सभेंत निवेदन करण्यांचें जें त्यांचें कर्तव्य आहे तें करण्यास ते कचरणार नाहींत असा आमचा भरंवसा आहे. भिन्नमतवाद्यांचा योग्य सन्मान ठेवण्यांत येतो असें आपल्या कामाच्या धोरणावरून सरकारचे विधायक सभासद लोकांस दाखवतील असाही आमचा भरंवसा आहे; म्हणून आम्हीं शहाणपणाची निवड केल्याबद्दल सरकाराचें अभिनंदन करतों.

रावसाहेबांची काउन्सिलांतील कामगिरी कशी होती तें वर्णन करण्यापूर्वी उदाहरणापुरती ब्रिटिश पार्लमेंत सभेची काम करण्याची पद्धत कशी आहे तें थाेडक्या रीतीनें पाहिलें पाहिजे.

पार्लमेंत सभेची नवी निवडणूक झाली म्हणजे राजपक्षांतील, प्रजापक्षांतील, मजूर पक्षांतील, संयुक्त वाद्यांतील इत्यादि विविध पक्षांतील कोणत्या पक्षांतील लोकांचें बहुमत आहे तें पहाण्यांत येऊन त्यांच्या पुढाऱ्यास राजाचें आमंत्रण येतें व त्याच्याकडे राज्याचा कारभार सोंपविण्यांत येतो. तो आपल्या अनुयायांतून मंत्रिमंडळ तयार करतो; पण या सर्वांवर एक मोठी जबाबदारी येऊन पडते ती ही कीं पार्लमेंतसभेपुढें आणलेल्या कायद्याचें स्वरूप एकंदर बहुमतास पात्र होईल असें तें बनविलें पाहिजे. अधिकारारूढ पक्षानें आणलेला कायदा जर बहुमतानें झिडकारला गेला तर इंग्लंदच्या प्रजेस पटेल अशा रीतीनें त्याला कारभार करतां येत नाहीं असें ठरतें. लोकांच्या विश्वासास तें मंत्रिमंडळ अपात्र होतें, व त्याच्याकडे इतःपर राज्याचा कारभार राहूं देणें अनिष्ट वाटून पुन्हां निवडणूक करण्याची वेळ येते. एवढ्याकरतां कोणताही कायदा सभेपुढें फार सावधगिरीनें आणावा लागतो.

अधिकारारूढ पक्षावर, ही जबाबदारी असते. त्याच प्रमाणें अधिकारांत नसलेल्या ह्मणजे बहुमत नसलेल्या पक्षांतील सभासदांवरही दुसरी एक

जबाबदारी असते. ती कोणती ह्मणाल, तर अधिकारारूढ पक्षानें एकादा कायद्याचा मसुदा सभेपुढें आणला कीं त्या कायद्याची जी कलमें अनहिताचीं असतील त्यांवर लक्ष देऊन त्या कलमांस शक्य तेवढा विरोध करण्याची. जो पक्ष हें काम करतो त्यास विरोधी पक्ष ह्मणतात. विरोधी पक्षाचें ह्मणणें ऐकून घेऊन त्यास अधिकारारूढ पक्ष उत्तर देतो. त्या कायद्याची कलमें हितावह कशीं आहेत तें दाखवून देतो. अशा रीतीनें त्या कायद्याच्या कलमांची चांगली छाननी झाल्यावर मतें घेण्यांत येतात व बहुमताप्रमाणें कायद्याची वाट लागते. याप्रमाणें पार्लमेंतच्या भाषेत बोलावयाचें ह्मणजे रावसाहेबांची काउन्सिलांतील कामगिरी विरोधी पक्षाच्या ह्मोरक्याची होती. अथवा आमच्या तत्त्वज्ञानाच्या भाषेत सांगावयाचें म्हणजे उत्तरपक्ष करण्याची होती.

येथील काउन्सिलांत त्यावेळेस दोनच पक्ष असत. एक राजपक्ष व दुसरा प्रजापक्ष. राजपक्षांतील लोक नेहमींच अधिकारारूढ असल्यामुळें राजकीय पक्षाशीं विरोध करण्याचें काम रावसाहेबांवरच पडे.

सरकारशीं असा विरोध करणें कित्येकांस राजद्रोह करण्यासारखें वाटतें पण हा विरोध सद्हेतुक असला म्हणजे राज्याचा कारभार व्यवस्थेनें चालण्यास साहाय्यभूत होतो; म्हणून तो विरोध राजद्रोहापासून अगदीं लांब असतो. अशा विरोधावर खुद्द इग्लंदच्या राज्यव्यवस्थेची भिस्त आहे. पक्षाभिमानाला पेटून अधिकारारूढ पक्षाला केवळ विरोधाखातर विरोध करावयाचा अशी हौस रावसाहेबांनीं कधींही धरली नाहीं. एवढेंच नाहीं पण पुढें आलेल्या कायद्यांत जीं चांगलीं कलमें असतील तीं पसंत करून जेवढीं कलमें त्यांच्या मतें दूषित दिसत तेवढ्यांसच योग्य तेवढा विरोध रावसाहेब करीत.

सरकारमार्फत कायद्याचा मसुदा सभेंत जो सादर करण्यांत येतो तो नेहमींच पुष्कळ अनुभवी सरकारी अधिकाऱ्यांचीं मतें घेऊन अवश्य

तेव्हांच जर सद्हेतूनें पुढें आणला जातो, तर मग विरोधाला जागा कुठें असते असा प्रश्न सहजच निघतो. त्याला उत्तर एवढेंच आहे कीं कायदे हे मनुष्यकृतच आहेत. त्यांत कांहीं आकस्मिक दोष राहावयाचेच. ते काढून टाकण्यास या विरोधीपक्षाचा उपयोग चांगला होतो. ह्मणून त्या पक्षांतील लोक पार्लमेंत सभेंत तर अगदीं पुढची जागा घेऊन बसतात.

रावसाहेबांनीं मुंबईच्या काउन्सिलांत व कलकत्याच्या काउन्सिलांत इतकें उत्तम रीतीनें काम केलें कीं तें पाहून रीस व रयत या पत्रानें पुढें दिल्याप्रमाणें उद्गार काढलेः—

"पेशवाई पुढें चालून तिसऱ्या बाजीरावाची कारकीर्द हिंदुस्थानांत झाली असती तर तींत रावसाहेब मुख्य प्रधान झाले असते व मुळींच इंग्लंदमध्यें रावसाहेबांचा जन्म झाला असता तर ते पार्लमेंत सभेंत मुख्य प्रधान झाले असते."

रावसाहेबांची नेमणूक होतांच त्यांनीं आपल्या एका मित्रास कळविलें कीं एकंदरींत हें काम मला आवडतें परंतु जबाबदारी मोठी वाटते.

परंतु तें काम त्यांस जड मुळींच गेलें नाहीं. त्यांनीं या वेळेस मोठी विद्वत्ता संपादन केली होती. बरींच वर्षें वकिली केल्यामुळें कायद्यामध्यें ते वाकब झाले होते. वादविवादांतील डावपेंच त्यांस चांगले अवगत झाले होते. मुंबईच्या बाहेरील लोकांच्या संपर्कानें त्यांचीं गाऱ्हाणीं त्यांस कळून आलीं होतीं. स्वतां सरकारी नोकर होते तेव्हां सरकारी अडचणींचा अनुभव त्यांस मिळालेला होताच.

काउन्सिलांत काम करतांना त्यांची भावना काय असे तिचें वर्णन त्यांनीं कलकत्ता येथील काउन्सिलांत "बेंगाल टेनन्सी" बिलावर भाषण करतानां केलें होतें. "काउन्सिलांतील या विषयावर काय थोडासा

प्रकाश मीं पाहूं शकेन तेवढा पाहून हिंदुस्थान सरकारास व त्यांच्या अधिकाऱ्यांस साहाय्य करण्यास मीं बांधलेला आहें "

मुंबईच्या काउन्सिलांत त्यांची तीन वेळां नेमणूक झाली तितक्यांत त्यांचें काउन्सिलांत वास्तव्य १८७४ पासून १८८४पर्यंत मधलीं दोन वर्षें १८७८व १८७९ वगळून होतें. * त्यांचें काम लोकांस पसंत होतेंच पण सरकारासही पसंत पडल्याचें एका गोष्टीवरून सिद्ध होत आहे. मध्येंच यांची नेमणूक सरकारी वकिलीच्या जागेवर झाली होती. सरकारी वकील म्हणजे सरकारी नोकर असतां काउन्सिलर होऊन लोकांतर्फे काम कसें करावें या विषयीं अडचण पडली असतां त्यांस, सरकारनें एकीकडे काउन्सिलरच्या जागेचा राजिनामा देववून सरकारी काउन्सिलचे जादा सभासद नेमिलें व अडचण दूर केली. इतकी पंचाईत करण्याची सरकारला जरूरी त्यांच्या आंगच्या प्रामाणिकपणामुळें, स्वतंत्र बाण्यामुळें व सद्हेतुमूलक वर्तनामुळें वाटली असावी यांत संशय नाहीं.

रावसाहेब, आपल्यास सरकारानें काउन्सिलदार नेमिलें व मान दिला या विषयीं मोठा अभिमान बाळगीत असत, असें पुढील उदाहरणावरून दिसतें. काउन्सिलर असतांच त्यांस शेरिफ नेमण्याचा विचार गव्हर्नरसाहेब करीत होते. शेरिफची जागा त्या वेळेस किफायतशीर होती. काउन्सिलरची जागा तशी नव्हती. उलट आणखी पैशाचा व्यय कर-

* हीं दोन वर्षें खंड पडण्याला कारण बहुशः एक असें झालें कीं सर रिचर्ड टेंपल मुंबईचे गव्हर्नर, यांचें व रावसाहेबांचें पटत नाहींसें झालें.एका विषयावर खासगी रीतीनें चर्चा करीत असतांना रावसाहेबांनीं सर रिचर्ड यांस ते आतां मध्यप्रांतांत नाहींत अशी आठवण दिली. अर्थात मध्य प्रांतांत यापूर्वीं कमीशनर असतांना त्यांस हवेंतसें वागण्याला अवसर पुष्कळ असे तसा येथें मुंबईच्या अधिक स्वतंत्र वातावरणांत मिळणें शक्य नाहीं असा भावार्थ होता. मी सर टेंपल यांस पचेनासा झालों आहें पुढें मी काउन्सिलर नेमला जाण्याचा संभव नाहीं असें त्यांनीं एका मित्रास १८७७ मध्यें लिहिलें होतें.

वणारी होती. "काउन्सिलांत काम करतांना लोक माझा पैशाहून मौल्यवान वेळही घेतात व शिवाय पैसेही अधिक खर्च करावयास लावतात" अशी खुद्द रावसाहेबांचीच तक्रार होती. तरी सुद्धां त्यांनीं काउन्सिलरची जागा सोडून शेरिफच्या जागेचा स्वीकार केला नाहीं.

कायद्याचीं कामें काउन्सिलांत चालू असतां रावसाहेबांनीं केलेली कामगिरी वाचकांस नीट समजावी म्हणून काउन्सिलांतील काम कसें चालतें त्याविषयीं थोडी माहिती पुढें दिली आहे.

प्रथम कोणताही कायदा करणें इष्ट आहे असें ठरलें ह्मणजे त्याचा एक मसुदा तयार करण्यांत येतो. त्यांत तो कायदा करण्याचे उद्देश सांगून त्याचा सरनामा, शब्दांच्या व्याख्या, व्याप्ति व त्याचा अम्मल सुरू होण्याची तारीख इ० अवश्य माहिती देऊन पुढें सर्व कलमें विभागशः छापून काढतात. त्याच्या प्रती काउन्सिलांतील सभासद, सर्व सरकारी खात्यांतील मुख्याधिकारी, लोकमत प्रदर्शित करणाऱ्या सार्वजनिक संस्था व कांहीं राजकारणी पुरुष इत्यादिकांत वांटण्यांत येतात.* या करतां इलाख्यांतील अगर देशांतील मुख्य मुख्य भाषांत या मसुद्याचे तरजुमे करण्यांत येतात व लोकांच्या माहितीकरतां छापून प्रसिद्ध केले जातात.

नंतर पुरेसा वेळ मध्यें गेल्यावर हा मसुदा काउन्सिलांत वाचून दाखविण्यांत येतो. या पहिल्या वाचनाच्या वेळेस कायद्याचें सर्व साधारण धोरण काय आहे व कोणत्या तत्त्वावर त्यांतील कलमें केलेलीं आहेत तें सांगण्यांत येतें. परंतु प्रत्यक्ष कलमांवर चर्चा होत नाहीं. नंतर सभास-

* रावसाहेबांस मत कथन करण्याचा मान नेहमीं मिळत असे व ते आपलें मत मोठ्या हौसेनें परिश्रम करून देत असत "मला विचारलें नसतें तर स्वस्थ बसण्याचा इरादा होता. परंतु आतां सरकारनें मत विचारल्यावर स्वस्थ बसतांच येत नाहीं. बसलों तर नैतिक भित्रेपणा अंगास येईल." ६।२।१८८७ चें बापूसाहेब आठल्ये यांस पत्र.

द्यांतून कांहीं मंडळी निवडून काढून त्यांची एक कमिटी बनवितात व त्या कमिटीकडे पुढील काम सोंपवितात. या कमिटीस निवडक कमिटी म्हणतात. या कमिटीच्या बैठकींत पुष्कळ महत्त्वाचें काम होतें. होऊं घातलेल्या कायद्याच्या मसुद्याच्या प्रती ज्यांच्याकडे पाठविलेल्या असतात त्यांच्या मतांचा विचार ही कमिटी करते. त्यांतील ग्राह्यांशाप्रमाणें मूळ मसुद्याच्या स्वरूपांत फरक करण्यांत येतो व केलेला फरक कां करण्यांत आला तें नमूद करून कमिटी आपला रिपोर्ट काउन्सिलास सादर करते. कमिटींतील ज्या सभासदांस हा बदललेला मसुदा पूर्णपणें मान्य असतो ते रिपोर्टावर सही करतात व ज्या सभासदांस तो अंशतः मान्य असतो ते तसें म्हणून सही करतात व ज्यांचें मत अगदीं भिन्न पडतें ते आपल्या मताची नोंद भिन्नमतप्रदर्शक लेखांत कारणांसह नमूद करून ठेवतात. निवडक कमिटीच्या ज्या सभासदांचें मत भिन्न पडेल त्यांचे भिन्नमतप्रदर्शक लेख या रिपोर्टाबरोबर काउन्सिलास सादर करण्यांत येतात. या रिपोर्टाच्या वाचनास दुसरें वाचन म्हणतात.

हें दुसरें वाचन फार महत्त्वाचें असतें. हें चालू असतां सभासदांस कायद्याच्या कलमावर वाद विवाद करतां येतो व नवीन सूचना आणतां येतात. त्यांवर मतें घेऊन बहुमताप्रमाणें कायद्यांच्या कलमांत फरक होत असतो व तसा फरक केल्यावर त्या मसुद्याचें वाचन तिसऱ्यानें करण्यांत येतें. हें वाचन औपचारिक असतें. तें झाल्यावर त्या मसुद्यास कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें.

काउन्सिलांत असतां एकच गोष्ट रावसाहेबांस प्रतिकूळ होती ती ही कीं त्यांनीं कितीही वाक्कौशल्य खर्च केलें; युक्तिवाद केला; मतस्वातंत्र्य दाखविलें; सप्रमाण दाखलेसूद माहिती दिली; तरी बहुमत त्यांच्या बाजूला नेहमींच होणें शक्य नव्हतें. निवडक कमिटींत त्यांच्या मताचें प्रमाण " होमिओप्याथिक व काउन्सिलांत सरकारच्या

मताचें प्रमाण ॲलोपॅथिक होतें," तरी ते केव्हांही भग्नोत्साह झाले नाहींत. आपलें कर्तव्य म्हणजे चांगले कायदे करावयास मदत करणें तें ते सतत करीत राहिले हें त्यांस भूषणावह होतें.

इतकें सांगून रावसाहेबांनीं निरानिराळ्या प्रसंगीं काउन्सिलांत केलेल्या भाषणांचा पुढें गोषवारा दिला आहे.

( रावसाहेब काउन्सिलचे सभासद झाले त्यावेळेस वतनदारांसंबंधीं असलेल्या कायद्याची दुरुस्ती करण्याचा विचार सभेपुढें होता. तेव्हां १५।१०।१८७४ रोजीं रावसाहेबांनीं भाषण केलें, त्याचा सारांश. )

"वतनाच्या दुमाल्या (खरेदी विक्री, गहाण पहाण इ.) संबंधें जें या कायद्यांत धोरण ठेवलेलें आहे तें मला पसंत नाहीं. पेशवाईंत वतनाची खरेदी विक्री राजाचे परवानगीनें करतां येत असे. एल्फिन्स्टनकृत कोडाप्रमाणें असें करण्याची सक्त मनाई असे. परंतु तिच्या अम्मलबजावणींत आज ३०।४० वर्षें ढिलाई होऊं दिल्यावर आतां ज्यांनीं हल्लींचा कायदा करण्याचा सल्ला दिला त्यांच्यासारखें माझें मत पडत नाहीं. दत्तकाच्या कबुलीसंबंधें हा कायदा जुन्या वहिवाटींत सुधारणाच करीत आहे व ती या देशांतील पुरातन कायद्यास धरून आहे. वतनदारांच्या प्रतिनिधींसंबंधें कलमें या कायद्यांत घालतांना नामदार कर्नल ॲन्डर्सन यांनीं पुष्कळ काळजी घेतली आहे व निवडणुकीच्या तत्त्वाचा अंगिकार केला आहे; तरी अनुभवांतीं आणखी सुधारणा करण्यास या कायद्यांत जागा आहे. नामदार क. ॲन्डर्सन यांनीं जी सूचना आणिली आहे तींत दर्शविल्याप्रमाणें वतनांस सजीवता येण्याची मला आशा वाटत आहे. हल्लीं सर्व वतनें प्रस्तरीभवनाच्या मार्गास लागलीं आहेत."

"ज्या एकाच्या कृत्यांवर दुसऱ्याचा ताबा नाहीं त्या एकाच्या कृत्याबद्दल दुसऱ्यावर समाईक जबाबदारी टाकण्याच्या विरुद्ध मीं मत देतों.

व बहुमत होणार नाहीं असें जाणून देतों. इलाख्याभर शिक्षणाचा प्रसार झाला आहे व आणखी होणार आहे. विद्येकरतां अथवा पोटाकरतां मूळ वतनाचें ठिकाण सोडून वतनदार लांब लांब जातील अशा-वेळीं समाईक जबाबदारीच्या सबबीनें त्यांचीं वतनें खालसा करणें अन्यायाचें होईल. वतनें खालसा करणें हें तत्त्व जुनेंच आहे. म्हणून तें राहूं द्यावें असें म्हणणें युक्तिसिद्ध नाहीं. सर-कारास बातमी देणें हें गांवनोकरांचें कर्तव्य आहे व ती बातमी जर राजकीय गुन्ह्याविषयीं असेल तर समाईक जबाबदारी असूंद्या असें म्हणेन. गुन्ह्याची चवकशी मॅजिस्ट्रेट यांच्या कोडतांत न करतां सेशन-मध्यें करण्यांत यावी, असा फरक करण्यांत आला आहे; त्यांत आणखी सवलती वतनदारांस मिळतील अशी आशा करतों. ”

“ गुरांस विषप्रयोग करण्याचे गुन्हे जर कांहीं जिल्ह्यांतच होत असतील तर तद्विषयक कलमें इतर जिल्ह्यांस लागू करण्यापूर्वी थोडा विचार करावयास पाहिजे. दहाव्या भागांत कामगिऱ्या ठरविण्याबद्दल व म्हारांची नोंद ठेवण्याबद्दल जीं कलमें आहेत तीं नवीन आहेत ह्मणून त्यांसंबंधें पुष्कळ काळजी घेतली पाहिजे. ”

“ आज आपण या कायद्याचा अम्मल करणाऱ्या सरकारी अधिका-ऱ्यांच्या हातीं मोठी पण कडक व सूक्ष्म सत्ता, हा कायदा करून देत आहोंत. अशा कायद्याची अवश्यकता सिद्ध झाल्यास मी पाठिंबा देईन परंतु असे कायदे करण्यांत आल्यावर त्यांची सक्त अम्मल बजावणी करण्यांत मी त्या कामीं नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांस जबाबदार धरीन व त्यांचें उल्लंघन झाल्यास साध्या कोडतांत पाहिजे त्यास फिर्याद करतां आली पाहिजे, म्हणजे इंग्रजी राज्यांत प्रत्येक अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा उपाय आहे असें राणी साहेबांच्या सर्वांत गरीब प्रजाजनास म्हणतां येईल. ( हा कायदा पास झाला. )

## मुलकी अम्मलदार व

### जमीन महसुलीचा कायदा ( १८७५ चा १ पहिला )

हा कायदा पुष्कळ महत्त्वाचा होता. जमिनीच्या महसुलासंबंधें व मुलकी कामगारासंबंधें जुने कायदे एकत्र करण्याकरतां हा नवीनं कायद्याचा मसुदा तयार करण्यांत आला होता.

१८७५ सालीं जानेवारीच्या विसाव्या तारखेस जो हा कायदा पहिल्या वाचनास निघून काउन्सिलाच्या ऐरणीवर ठेवण्यांत आला, त्यावर पुढें निवडक कमिटींत व काउन्सिलांत लोकमताचे घाव बसतांबसतां त्याची घडण पूर्ण व्हावयास २ वर्षें लागलीं.

याचें काम चालूं असतां रावसाहेबांनीं उतावीळपणा केव्हांही केला नाहीं. कार्यसूत्राला गांठ पडली असतां ती संथपणें सोडविण्याची युक्ति करून पहात होते. अडचणीची वाट आली असतां तटकन वरून उडी मारून जाण्याचा विचार सुद्धां त्यांनीं मनांत आणिला नाहीं. युक्तिवादाच्या सरळ वाटेनें, आपल्या साथिदारांना बरोबर घेऊन जात होते. बहुमताच्या वाऱ्याचा पाठिंबा नसतां संथपणें स्वतां चालविलेल्या वल्ह्यावर अधिक भिस्त ठेऊन आपली कार्यनौका कशी हांकावी एवढा धडा त्यांच्या या वेळेच्या कामगिरीपासून शिकण्यासारखा आहे. या कायद्याच्या प्रीत्यर्थ रावसाहेबांनीं फार परिश्रम केले होते. आधींच ते वतनी व इनामी जमिनीचे मोठे मालक होते. जमीनमहसूल, जमिनीवरील हक्कसंबंध, तिच्या वहिवाटीचे प्रकार, तिचे सत्ताप्रकार इ० बरीच माहिती त्यांस स्वाभाविकपणेंच होती. शिवाय मागें २२ व्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पैमाषीच्या कायद्याचें प्रकरण विलायतपर्यंत पोहोंचवितांना तींत बरीच भर पडली होती, तरी ती सुद्धां रावसाहेबांस अपुरी वाटून त्यांनीं १८०० सालापासून १८७५ पर्यंत

जे जे जमिनीसंबंधें कायदे कानू झाले त्या सर्वांचा अभ्यास केला. एवढ्या मोठ्या तयारीनें जी कामगिरी त्यांनीं काउन्सिलांत केली तिचें समग्र वर्णन येथें देणें शक्य नसल्यामुळें पुढें गोषवारा दिला आहे.

१८७५ सालीं जानेवारी महिन्याचा २० व्या तारखेस या कायद्याचें पहिलें वाचन व्हावें ह्मणून ना. चॅप्मन यांनीं सुचना आणली. तीवर रावसाहेबांनीं पुढें दिल्याप्रमाणें प्रास्ताविक भाषण केलें:—

" या कायद्याच्या मसुद्यांतील कांहीं व्याख्या व सर्वकलमें हीं फार काळजीनें विचारपूर्वक तपासलीं पाहिजेत. "

"१८२७ च्या १७ व्या रेग्युलेशनप्रमाणें या इलाख्यांतील जमीनदारांची जी स्थिति होती तिचें आतां या कायद्यानें मूलतः रूपांतर होणार आहे. मुलकी अंमलदारांनीं जमिनीचा महसूल कसा वसूल करावा व त्याची व्यवस्था कशी करावी तें दाखविण्या पुरते वरील रेग्युलेशनांत नियम घालून दिले आहेत; परंतु आतां पुढें आणलेल्या कायद्याच्या मसुद्याची उडी बरीच पुढें जात आहे. विवक्षित प्रकारच्या जमिनीच्या मालकीसंबंधें राजसत्तेच्या बळावर ज्यांची अम्मल बजावणी होत असते अशा स्वरूपाचा जो हा कायदा करण्यांत येत आहे तो अगदीं नव्यानें म्हणजे पहिल्या प्रथमच या देशांत करण्यांत येत आहे म्हणून यांतील सर्व कलमांचा विचार फार काळजी घेऊन अगत्यपूर्वक केला पाहिजे. मद्रास इलाख्यांतून जमिनीसंबंधाचीं कांहीं अपीलें प्रिव्ही काउन्सिलकडे गेलीं होतीं. त्यांचे निकाल नुकतेच झाले आहेत. त्यांकडे लक्ष दिलें असतां निवडक कमिटीला असें दिसून येईल कीं असल्या तऱ्हेच्या कायद्याची काय अवश्यकता आहे याचा विचार अगोदर केला पाहिजे व अवश्यकता आहे असें सिद्ध होईल तर असा कायदा सर्वथा केलाच पाहिजे असें मीही मान्य करीन, परंतु अनवश्यक असूनही हा कायदा केला तर त्याच्या पासून अपायच होणार आहे. राष्ट्रपुरुषाच्या

शरीरास जेव्हां अपाय होतो तेव्हांच तो दूर होण्यास नवे कायदे करावे हें जें कोर्ट आफ् डायरेक्टरचें मत आहे त्याची पुनरुक्ति मी करीत आहें."

"जंगलाच्या संबंधें या कायद्यांत जीं कलमें घातलेलीं आहेत त्यांत पुष्कळ सुधारणा केली पाहिजे. या देशाच्या भिन्न भिन्न भागांत जंगलाचे हक्क भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत. तिन्हीं इलाख्यांतील जंगलासंबंधीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांनीं जे ठराव केले आहेत त्यांच्या योगानें या कायद्यांत जंगलासंबंधीं जीं कलमें आहेत त्यांचें आहे तें स्वरूप राहूं शकणार नाहीं. नामदार चॅप्मन ह्मणतात तितक्या घाईनें हा कायदा करून घेतां यावयाचा नाहीं."

"रस्त्याच्या दोन्हीं बाजूंवरील झाडांसंबंधें पाहूं गेलें असतां लोक खासगी जागेंत रस्त्याच्या बाजूला झाडें लावतात तीं व सार्वजनिक जागेंत लावलेलीं झाडें यांत फरक केला पाहिजे. रस्त्याच्या बाजूला झाडें लावणें हें धर्मकृत्य आहे अशी येथील लोकांची समजूत आहे. याचें उदाहरण पाहिजे असेल तर पुण्याहून साताऱ्यास जाण्याचा जो जुना रस्ता आहे त्यानें गेलें असतां पाहावयास मिळेल."

"कुळांच्या हक्कासंबंधें मला दोन शब्द बोलावयाचे आहेत. १८०० सालापासून जे जे जमिनीसंबंधें कायदे झाले आहेत त्यांचें वाचन मी चालविलें आहे. तें अद्याप पुरें झालें नाहीं. त्या करतां मला वेळ पाहिजे आहे, परंतु जेवढें वाचन झालें आहे तेवढ्यावरून माझें असें मत झालें आहे कीं जमिनीच्या मालकांच्या स्थितींत या कायद्यानें अगदीं विपर्यास घडून येणार आहे. हा कायदा या इलाख्यांतील सर्व कुळांस लागू व्हावयाचा आहे त्यामुळें फिर्यादींची संख्या वाढेल. असाच अनुभव एकवेळ पंजाबांत आला होता. जुनीं कुळें व नवीं कुळें हा भेद जुनाच आहे परंतु आजपर्यंत यासंबंधें चुक्याच होत आल्या आहेत. मालकी हक्क व खण्ड वाढविण्याचा हक्क यांमध्यें फरक करण्याचा विचार

आहे असें सांगण्यांत आलें आहे. निवडक कमिटींत या संबंधाच्या कलमांत कांहीं संदिग्धपणा न राहूं देण्याची खबरदारी ठेवण्यांत येईल अशी आशा आहे."

"समरी सेटलमेन्टच्या कायद्याचें या कायद्याशीं एकीकरण करण्याचा विचार बाजूला ठेवावा असें मला वाटतें."

"समरिसेटलमेन्ट ज्या क्षेत्रांना लागू आहे त्यांच्या बाबतींत लोकलफंडासंबंधें जीं कलमें आहेत तीं कशीं अम्मलांत आणावीं त्याचा विचार निवडक कमिटींत व्हावा. ठाणें जिल्ह्यांत दोन कज्जे उपस्थित झाले होते. त्यांत लोकांचें ह्मणणें असें होतें कीं समरिसेटलमेन्टचे ठराव कायमचे झाले असल्यामुळें आतां जमाबंदी वाढवितां यावयाची नाहीं. हें ह्मणणें सयुक्तिक दिसतें ह्मणून असें सेटलमेंन्ट करण्यांत मूळ हेतु काय होता हें लक्ष्यांत घेऊन महसुलाच्या बाबतींत नुकसान झालें तरी सोसलें पाहिजे. अन्यायाविरुद्ध दाद मागण्याकरितां अपीलें करण्यासंबंधें जीं कलमें आहेत त्यांस माझी हरकत नाहीं."

या कायद्याचें पहिलें वाचन झाल्यावर पुढील काम निवडक मंडळीकडे सोंपविण्यांत आलें. रावसाहेबांस या कमिटींत काम करण्याचा मान मिळाला होता. रावसाहेबांना मसुदा पसंत नव्हता ह्मणून त्यांनीं एक प्राथमिक नोंद करून ठेवली होती ती अशी:—

"या मसुद्यांतील एकएक कलम घेऊन वादविवाद व्हावा. मला या मसुद्यावर सही करतां येत नाहीं. आजची निवडक कमिटी बसण्यापूर्वींच हा कायदा अगदीं तयारींत आणून आमची नुसती संमति घेण्यापुरता त्याचा मसुदा आमच्या पुढें ठेवण्यांत आला होता. वादाविवादास सवड नव्हती. मला या मसुद्यावर सही करतां येत नाहीं. याचे निरनिराळे भाग मला पसंत नाहींत. कसे ते मीं निवडक कमिटीला दाखवून दिले आहेत. यांतील काहीं कलमें चालू असलेल्या कायद्यांत अनवश्यक व जबरदस्त स्थित्यंतर घडवून आणीत आहेत."

" मुलकी अम्मलदारांच्या नेमणुकी व अधिकार, जमिनीचा महसूल व त्याचा वसूल, अम्मलदारांची काम चालविण्याची रीत इ. संबंधें जे कायद्याचे भाग आहेत त्यांतील तत्त्वें मला मान्य आहेत. त्यांविषयीं सविस्तर वादविवाद कलमवार करण्याची माझी तयारी आहे परंतु इतर कलमांचा विचार करण्यास मला वेळ पाहिजे. "

" या मसुद्यावर काय काय, कोणी कोणी मतें दिलीं आहेत तीं मला पहावयाचीं आहेत. त्यासंबंधीं व जंगलासंबंधीं सर्व पत्रव्यवहार तो मागविल्या तारखे नंतर कमिटिच्या दोन बैठका होऊन गेल्या तरी मला मिळाला नाहीं. " १५ । ३ । १८७५

वर सांगितल्याप्रमाणें कमिटीच्या इतर सभासदांचा रिपोर्ट रावसाहेबांकडे मताकरतां आला, तेव्हां रावसाहेबांनीं त्याच्यावर सही केली नाहीं. त्यांचे सहकारी मित्र महम्मदअल्ली रोगे यांनींही सही केली नाहीं. अशा स्थितींत कमिटीचा रिपोर्ट या दोघांच्या मताशिवाय छापला गेला. याचा उल्लेख करतांना पुढील खेपेस कायद्याचा मसुदा चर्चेला निघाला तेव्हां सर रिचर्ड टेंपल, मुंबईचे गव्हरनर, ह्मणालेः—

"सिलेक्ट कमिटीचे दोन सभासद नामदार रा.सा. विश्वनाथ नारायण मंडलिक व नामदार महमदअल्ली रोगे यांनीं कमिटीच्या रिपोर्टावर सह्या केल्या नाहींत. यांच्या सह्या रिपोर्टावर नाहींत ह्मणून मूळ मसुद्यांत बहुतेक अंशीं यांच्याच संमतीनें कमिटीनें जे फेरफार केले आहेत त्या सर्व फेरफारांच्या विरुद्ध हे दोघे सभासद आहेत असें समजावयास नको. फेरफार केल्यानें रूपान्तर पावलेला मसुदा पुन्हा छापून झाल्यावर त्याच्यावर विचार करण्यास वेळ व संधि पाहिजे असें यांचें ह्मणणें आहे. इतर सभासदांचें ह्मणणें आहे कीं यापुढें पुन्हां पुन्हां सर्व सभासदांना एकत्र जमवून वादविवाद करीत बसण्यांत अधिक कालक्षेप करण्यास नको. पाहिजे तर विरुद्ध असलेलें आपलें मत यांस मागाहून देतां येईल. " त्याप्रमाणें रावसाहेब व ना. रोगे यांनीं मत दिलें तेंः—

"लॅन्ड रेव्हिन्यू बिलाविषयीं जीं आमचीं मतें आहेत त्याविषयीं कांहींसा गैर समज झालेला दिसतो. २५ जानेवारी १८७५ रोजीं काउन्सिलची सभा भरली होती. त्या वेळीं आह्मांपैकीं एकानें साधारणपणें अशी स्पष्ट हरकत घेतली कीं ज्याअर्थीं आजचा कायदा जुने कायदे एकत्र करण्याकरतां करावयाचा आहे व, ज्याअर्थीं ( जुने ) कायदे एकत्र करण्याचा मुख्य हेतु सरकारी खात्यांना त्या कायद्यांची अम्मल बजावणी कमी अधिक मानानें सोयीवार पडावी एवढाच आहे असें सांगण्यांत येत आहे, त्याअर्थी लोकांच्या हक्कांस बाध आणणारीं नवीं कलमें आजच्या कायद्यांत नव्यानें घालतां येणार नाहींत. पुढें निवडक कमिटीचें काम सुरू झाल्यावर १०६ व ११५ या कलमांचा विचार होऊं लागतांच आह्मीं या कलमांस हरकत घेऊं असें स्पष्टपणें कळविलें होतें कारण या कलमांच्या योगानें अमुक एक मिळकत ही आमच्या मालकीची आहे असें सिद्ध करण्यास मुलकी अधिकारी जेव्हां जेव्हां आव्हान करतील तेव्हां तेव्हां तसें सिद्ध करण्याचा बोजा खाजगी हक्क असणाऱ्या मालकांवर टाकलेला आहे. दुसऱ्या कित्येक बाबतींतही आम्हीं वेळोवेळीं भिन्न मत प्रदर्शित केलें आहे. दुरुस्त केलेले मसुद्याचे ६ ते १५ भाग छापून आह्मीं विनंति केल्याप्रमाणें आम्हांकडे पाठविण्यांत आले असते तर आह्मीं आपला शेरा वेळेवर लिहिला असता व त्यांत आमचा मतभेद कोठें आहे तें दाखविलें असतें. आतां दुरुस्त केलेल्या मसुद्यांत जमिनीवरील खासगी हक्काच्या अस्तित्वाविषयीं ओळख सुद्धां ठेवलेली दिसत नाहीं ही गोष्ट अगदीं अन्यायाची आहे. सर्व इलाखाभर वतनवाडीवाले जमीनदार, भिन्न भिन्न वर्गाचे व नांवाचे, जमीनीवर मालकी हक्क असलेले पसरलेले आहेत व मालकी हक्काचा जो तत्त्वार्थ आहे त्याप्रमाणें ते खरे खरे मालक आहेत असें मान्य झालेलें आहे. याला व्यवहार मयूख खण्ड ४; स्टोक्स हिंदू लॉ बुक्स

पृष्ठ ४४; मुंबई हायकोर्ट रिपोर्ट भाग १२ पृष्ठ २२४ येथें प्रसिद्ध झालेल्या वैकुंठ बापूजी विरुद्ध मुंबई सरकार या कज्ज्यांतील ठराव; मूरकृत इंडियन अपीलें भाग ११ पृष्ठ ३४५ येथें प्रसिद्ध केलेला गंगागोविंद याच्या कज्ज्यांतील ठराव व एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास आवृत्ति तिसरी पृष्ठ २४९–२५० परिशिष्ट ५ वें इतकीं सर्व आधारभूत प्रमाणें आहेत. जमाबंदीचा ठराव करणाऱ्या खात्याचे अधिकारी उदाहरणार्थ मि. पेडर व मि. ट्रेव्हर यांच्या रिपोर्टावरून असें दिसतें कीं गुजराथेंत देखील खेडेगांवांतील गांवठणें हीं लोकांच्या खाजगी मिळकती आहेत. १८६५ चा एक नंबरचा कायदा ह्मणजे सर्व्हे ॲक्ट यांत मालक व खाजगी जमिनी यांचा निर्देश आहे. असें असतां नवीन कायद्यांत मालक ( owner ) या शब्दास उच्चाटण मिळालें आहे. या कायद्यांतील व्याख्या ( २५ व २५ अ ) अशा केलेल्या आहेत कीं, खासगी मालकी या इलाख्यांत कोठेंच उरली नाहीं असें त्यांनीं भासवावें ! ”

“ इनाम या शब्दाची व्याख्या अंशतः सूक्ष्मत्वानें केलेली नाहीं व ती अप्रत्यक्ष रीतीनें खासगी मालकी हक्कास नष्ट करणारी आहे. इनाम हा शब्द हल्लीं वापरतात तो जमीनीवरील साऱ्याच्या माफीचा दर्शक ह्मणून वापरतात. पण खरें पाहिलें म्हणजे हिंदी राजे एकाद्यास जमीन इनाम करून देत तेव्हां ते ती जमीन प्रथम तिच्या मालकाजवळून विकत घेत व मग ज्याला द्यावयाची त्याला देत हें प्रसिद्धच आहे. ( पहा रॉयल एशियाटिक मंडळीचें मासिक भाग ८ पृष्ठ ३९. ) यावरून असें सिद्ध होत कीं ह्या प्रकारची खासगी मालकी ज्या जमिनीवर आहे ती जमीन व सरकारी जमीन यांतील भेद स्पष्ट करून दाखविला पाहिजे होता. परंतु दुमाला ( Alienated ) आणि ( Occupant ) खातेदार यांच्या ज्या व्याख्या आहेत त्या दोघींनीं अत्यंत घोटाळा उत्पन्न केलेला आहे. कारण हल्लींच्या

शब्दाचे जे अर्थ निश्चित केलेले आहेत, त्यांवरून असें दिसतें की ( unalienated ) दुमालानसलेलें शेत म्हणजे सारा घेण्याचा सरकारचा जो हक्क असतो तेवढ्यापुरतेंच जें शेत कोणाला दिलेलें नसतें तें शेत;परंतु तद्विषयक हक्क नेमका काय आहे तें स्पष्ट केलेलें नाहीं. जंगलावरील हक्क,नदींतून वाहत आलेल्या गाळावरील हक्क इ० हक्क कोणाचे आहेत इत्यादि प्रश्नांचा ( ज्याचा उल्लेख या कायद्याच्या कलमांत ठिकठिकाणीं आहे त्यांचा ) निकाल करण्याकरतां unalienated दुमालानसलेलें शेत म्हणजे काय हें निश्चित करतांना वरील मुद्याचें महत्त्व लक्षांत येतें. सरकारानें आपल्या स्वतःच्या जमिनीचें काय वाटेल तें करावें, कारण खासगी जामिनीवर जो सारा बसवितां येतो तो नियमांप्रमाणें बसविण्याचा हक्क कायद्यानेंच सरकारास प्राप्त होतो. दादाभाई विरुद्ध कलेक्टर ऑफ ठाणा या कज्जांत हायकोर्टानें असें ठरविलें आहे कीं, वांद्र्याचा सुतीदार, वाडी ह्मणून तीवर आकारलेला सारा देत असतां, त्या वाडींत बंगला बांधल्याबद्दल कलेक्टरास दण्ड देण्याला पात्र होत नाहीं. कलम १३४ प्यारा २ यांत कुळांच्या हक्कासंबंधें ज्या प्रश्नांचा विचार केला आहे त्यांना आमची विचारार्ह स्वरूपाची हरकत आहे. विरुद्ध कब्जा माझ्याकडे चालत आला आहे, असें जमीनदाराच्या एकाद्या कुळाला सिद्ध करतां यावयास त्यानें आधीं मीं कायमचें कूळ आहे असें सिद्ध करावें लागेल. त्याचा बोजा इतके दिवस कुळावर असे. एकाद्या कुळानें दाखवून दिलें कीं, मी इनाम करून देण्याच्या पूर्वीपासून या विविक्षित खेड्यांत आलों आहे, तरच पुराव्याचा बोजा जमीनदारावर उलटून पाडलेला आहे. बाकी इतर बाबतींत वर सांगितल्याप्रमाणेंच पुराव्याचा बोजा आहे. कुळाच्या व जमीनदाराच्या दर्म्यानच्या संबंधांत कां ढवळाढवळ करावी हें समजत नाहीं. ( antiquity ) जुनेपणा ह्मणजे तरी काय तें दाख-

विण्याला या कायद्यांत कांहींच प्रमाण दिलेलें नाहीं. ह्मणून या कलमाची अंमलबजावणी करतांना निश्चितपणा साधावयाचा नाहीं. आणि शिवाय जेथें सरकारनें नवे ( occupancy ) खात्याचे हक्क उत्पन्न केले आहेत तेथें ते दुसऱ्याला देतां येत नाहीं, असें ठरविलें आहे."

"आणखी एका मुद्यावर आमचा मतभेद आहे व त्यावरून २०८ कलम व त्याच्या कक्षेंतील कलमांना आमची हरकत आहे. घराच्या जमिनीवर निदान सर्व मराठी जिल्ह्यांत तरी पूर्वीच्या कारकीर्दींत पुरातन कालापासून कोणी सारा दिला नाहीं, असें चौकशी अन्ती निश्चितपणें कळून आलें आहे. १८६८ चा चवथा कायदा करते वेळीं घराच्या जमिनीवरील साऱ्याच्या माफीचा पूर्ण विचार झाला होता. तशा माफीपासून, तेव्हांपासून आतांपर्यंत उलटलेल्या ८-९ वर्षांत अनर्थ झाल्याचें सिद्ध झालें नाहीं. १८२७ च्या ४ थ्या कायद्याच्या १७ व्या कलमाप्रमाणें सुद्धां घराखालील जमिनीवर कर बसवितां येत नाहीं असें सदर कोडताचे व हायकोडताचे ठराव आज सतत ५० वर्षें एकरूपानें होत आले आहेत. असें असतां मागाहून केलेल्या एका विलक्षण कायद्यानें ( कारण हिंदुस्थान सरकारच्या १८७६ च्या १० कायद्यास तसेंच म्हटलें पाहिजे ) ५० वर्षांचे न्यायकोडताचे ठराव विरुद्ध असतां १८२७ च्या कायद्याचा जो भलताच अर्थ करण्यांत आला आहे, त्याप्रमाणें या विशिष्ट तऱ्हेच्या खाजगी मिळकतीवर इनाम कमीशनच्या अपवादात्मक धर्तीवर कर बसविण्यांत सुरक्षितपणा नाहीं; अति प्रगतिपर लक्ष्मीशास्त्रवेत्त्यांनीं घर जमिनीचा हक्क इतर खाजगी हक्कापेक्षां विशिष्ट स्वरूपाचा आहे असें मत दिलें आहे."

"हा घरबन्ध हक्क या इलाख्यांत इतका पवित्र मानला जातो कीं, शपथ वहावयाची झाल्यास घरबन्धाची वहातात. ह्मणून आह्मीं ह्मणतों इतक्या विशिष्ट तऱ्हेच्या हक्कास नष्ट करणारा कायदा इतक्या लघुविचारानें करावा कीं न करावा याचा विचार करणें काउन्सिलाला भाग आहे.

*१८६८ चा चवथा कायदा कायम होऊन बसला आहे व त्याचीं कलमें, जीं पहिल्यानें गुजराथेंतच लागू होतीं, तीं आतां थोडा फेरफार करून इलाख्यांत सर्वत्र लागू करावयाचीं आहेत. म्हणून आह्मीं नामदार सभासदांस एवढेंच कळवितों कीं, ज्या तत्त्वांवर १८६८ चा कायदा उभारला गेला तींच तत्त्वें आतां जेथें जेथें हा कायदा लागू करण्यांत येईल तेथें तेथें ह्याची अंमलबजावणी करतांना ध्यानांत ठेवावीं."

"प्रजाजनांपैकीं दरिद्री वर्गास इनाम कमीशनचीं तत्त्वें व यंत्रसामुग्री लावूं नये. याशिवाय कलम १२६ (अ) या कलमास (जें ब्रह्मदेशांतील कायद्यांतून घेतलें आहे असें आह्मांस सांगण्यांत येत आहे त्यास) आह्मीं जोराची हरकत घेतों. 'सर्व खाणी, खनिज पदार्थ व भूमिगत द्रव्य यांवर हक्क सरकारचा आहे. पृष्ठभागावरच्या मूठभर मातीची झालेली नुकसानी मात्र कलेक्टर ठरवील तितकी मालकास भरून मिळेल,' असें ठरविणारा हा कायदा आमच्या पुरातन कायद्याहून भिन्न आहे. हा आमच्या जमीन धारण करण्याच्या पुरातन पद्धतीच्या विरुद्ध असून ६० वर्षांवरही उपभुक्त अशी मालकी हक्क असलेली ताबेदारी नष्ट करीत आहे. हीं कलमें पहिल्या मसुद्यांत नव्हतीं. सिलेक्ट कमिटीनें केलेल्याही मसुद्यांत नव्हतीं व आतां शेवटीं शेवटीं या कायद्यांत तीं प्रविष्ट करणें

* १८६८ च्या सर्व्हे ॲक्टांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, पांच वर्षांचा घराचा ताबा असला ह्मणजे घराच्या खालील जमिनीवरील साऱ्याची माफी मिळावयाची. हें तत्त्व काढून टाकून आतां असें ठरविण्यांत आलें आहे कीं, ज्या घरवाल्याकडून जमिनीवरील मालकीचा पुरावा होणार नाहीं, त्यांस घराखालील जमिनीचा सारा द्यावा लागेल. हा कायदा सर्वत्र लागू करणें कायदेशीर नाहीं. पण लागू करणें असेल तर पांच वर्षांचा ताबा माफी मिळविण्यास पुरेसा आहे, हें तरी १८६८ च्या कायद्याचें कलम जाग्यावर ठेवावें, असा रावसाहेबांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

वाजवी नाहीं. या कायद्याचें दुसरें वाचन होण्यापूर्वी वरील मुद्यांकडे सभासदांनीं लक्ष द्यावें. ”

विश्वनाथ नारायण मंडलिक
महमदअली रोगे
१७–६–१८७७

या प्रमाणेंभिन्नमतप्रदर्शक लेख रावसाहेबांनीं लिहिला व त्यावर महमदल्ली रोगे यांनीं सही केल्यावर २२।६।१८७७ रोजीं दुसऱ्या वाचनास आरंभ झाला.त्या वेळेस रावसाहेबांनीं आपल्या भिन्नमत प्रदर्शक लेखांत गोंवलेल्या तत्त्वांवर कोडयांवारी सूचना आणल्या. त्या बहुमत न झाल्यामुळें नाकारण्यांत आल्या. अपवादाखाल क्षुल्लक तीन सूचना मान्य झाल्या. ही पहिल्या दिवसाची स्थिति पाहून महमदअल्ली उठून ह्मणाले“ ह्या कौन्सिलांत कोणताही कायदा—मग तो गतकालापासून अमलांत येणारा असो किंवा भावि कालापासून अमलांत येणारा असो—मात्र तो सरकारानें आणलेला असला ह्मणजे पास झालाच पाहिजे अशी मला खात्री वाटत आहे. कारण या काउन्सिलांतील सभासदांत सरकारी नोकर आहेत ते त्या कायद्यातर्फे मत देतातच व त्यांना आवडो किंवा न आवडो नोकर या नात्यानें तसें मत द्यावयास ते बांधले गेले आहेत. काल ज्या सूचना आल्या व त्यांवर जीं मतें पडलीं तीं असें दर्शवितात कीं मतें देण्याच्या मुळाशीं पक्षाभिमान आहे. युरोपियन सभासद एका बाजूला मत देत आले व हिंदी सभासद दुसऱ्या बाजूला देत आले; परंतु हिंदी सभासदांचें बहुमत नसल्यामुळें आपली सूचना मान्य होणार नाहीं हें ते पूर्ण समजून होते. तथापि आपलें मत काय आहे तें नामदार गव्हरनरसाहेब व इतर युरोपियन सभासद यांच्या नजरेस आणून देणें हें आपलें कर्तव्य आहे असें हिंदी सभासद समजतात. न बोलतां स्वस्थ बसल्यास अपायकारक कायद्यांनीं आपल्या गरीब देशालाच नड होईल ह्मणून त्यांस एवढा खटाटोप करण्याची गरज पडली. ”

शेवटीं रावसाहेबांनीं या कायद्याच्या विरुद्ध मत दिलें.

## १८७५ चा तीन नंबरचा दस्तुरीचा कायदा.

हिंदुस्थान सरकारच्या १८६४ च्या पंधराव्या कायद्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत ८।७।१८६४ पासूनच दस्तुऱ्या बसाविण्यांत आल्यावर हा कायदा मुंबई इलाख्यास रीतीप्रमाणें लागू केला होता कीं नाहीं अशी उत्पन्न झालेली शंका दूर करण्याकरतां व सार्वजनिक रस्त्यांवर व पुलांवर दस्तुरी बसविणारीं कलमें एकत्र करण्याकरतां हा मसुदा कौउन्सिलांत निघाला होता. त्या वेळीं रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांशः—

" दुसऱ्या कलमास मी हरकत घेत आहें, कारण हें कलम गतकाल-सापेक्ष आहे ह्मणजे याची अम्मलबजावणी मागील काळापासून होणारी आहे. तिसऱ्या कलमांतील ८ व्या व ९ व्या ओळींस माझी हरकत आहे, कारण १८६९ च्या तिसऱ्या कायद्याप्रमाणें एकवार जो पैसा जे रस्ते बांधण्यांत खर्च केला आहे तोच पैसा त्याच रस्त्यांवर दस्तुरी बसवून लोकांवर कर लादण्याला कारण होऊं शकणार नाहीं. लोकल फंडांतून बांधलेले रस्ते व इलाख्याच्या इतर वसुलांतून बांधलेले रस्ते, निराळे करणें हें कठीण आहे हें मी जाणून आहें. शिवाय रस्ते बांधण्यास पैसा नाहीं हेंही मला माहीत आहे. परंतु दस्तुरी हें वसूल वाढविण्याचें साधन साधारणपणें असूं नये ही माझी पहिली हरकत आहे व दस्तुरीचीं नाकीं जवळ जवळ असूं नयेत ही दुसरी हरकत आहे. दुसऱ्या देशांत सहा किंवा आठ मैलांवर अशीं नाकीं असतील परंतु महसुलाच्या कारभारांत असें करणें ही चूक असल्यामुळें तिची पुनरावृत्ति या देशांत होणें इष्ट नाहीं. कोष्टकांत दाखविलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम देण्याससुद्धां माझी तयारी आहे. या रकमांची एवढी लोकांस भीति वाटत नाहीं. पण अशा रकमा त्यांस वारंवार द्याव्या लागतात, त्याची भीति वाटते. पोलादपूर

( अथवा किणेश्वर ह्मटलें तर चालेल ) व नागोठणें यांच्या मध्यें पांच दस्तुऱ्या आहेत; शिवाय म्युनिसिपल दस्तुऱ्या आहेतच. या गोष्टी या देशांत नसाव्या ह्मणून या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. ”

“पादचारी वाटसरूंवर कर बसविण्याविषयीं म्हणाल तर १८५१साल-च्या आठव्या ॲक्टाच्या पुढें या कायद्यानें आघाडी मारली आहे. १८६४ च्या हिंदुस्थान सरकारच्या १५ व्या ॲक्टाला धरूनच हा कायदा आहे, असें कोणी ह्मणेल त्यास माझें उत्तर असें आहे कीं, आमचें काउन्सिल एका तऱ्हेनें स्वतंत्र आहे. वरिष्ठ काउन्सिलाचें धोरण आम्हीं स्वीकारलें पाहिजेच असें नाहीं. जेथें पूर्वी नाव होती व लोकांस नोर द्यावयास पडत होतें तेथें पूल बांधण्यांत आल्यावर त्या पुलावरून पायांनीं जाणाऱ्यांवर तेवढाच कर बसविला तर हरकत नाहीं. ”

( या बिलाचें ३०।९।१८७५ रोजीं दुसरें वाचन झालें त्यावेळीं रावसाहेबांनीं केलेलें भाषण. )

“ दस्तुऱ्या बसविण्याच्या कामाला हिंदुस्थान सरकारची मंजुरी आज बरींच वर्षें मिळालेली आहे.तरी त्या मंजुरीचा फायदा या इलाख्यांत चुकीनें घेण्यांत आला नाहीं. तथापि त्या मंजुरीमुळें दस्तुऱ्या बसवितां येतात अशा प्रामाणिक समजुतीनें सरकारी अधिकारी वागत आले. परंतु तसें करणें गैरकायदा असल्यानें कोडतांत फिर्यादी होण्याचा संभव आहे अशी कायद्याच्या परिभाषेसंबंधें अडचण उत्पन्न झाली आहे, त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांचें फिर्यादींपासून रक्षण करण्यास मी या दुसऱ्या वाचनाच्या विरुद्ध मत देत नाहीं; तथापि दुसऱ्या कलमाच्या तर्फे मी मत देणार नाहीं. आज केलेले कायदे गतकालाला लागू करणें हें तत्त्वच चुकीचें आहे. प्रजेशीं झालेले जुने ठराव रद्द करणें व नवें ओझें तीवर बसविणें हीं दोन्हीं टाळलीं पाहिजेत. मीं पुढें आणलेल्या कायद्याच्या सुधारणेकरतां सूचना आणीन. ”

" नामदार गव्हर्नरसाहेबांनीं मागें एका वेळीं असें नमूद करून ठेवलें आहे कीं दस्तुऱ्या लोकांस अप्रिय आहेत. विशेषतः जे लोक एक आणा फंड देत आहेत त्यांस असें वाटत आहे कीं आणखी कर दिल्याशिवाय रस्त्यावरून जाण्याचा आमचा हक्क आहे. या लेखानें माझ्या मतास पुष्टि येत आहे. "

नामदार गव्हर्नरः—त्यांत लोकांस, दुसऱ्या दस्तुऱ्या अप्रिय आहेत एवढीच गोष्ट नोंदलेली आहे.

रावसाहेबः—हींच गोष्ट मला दाखवून द्यावयाची आहे. ही अप्रियता कोठून आली, याची आम्हांस चौकशी केली पाहिजे.. आपल्या डोक्यावरचें ओझें दुसऱ्याच्या डोक्यावर लादण्याची प्रवृत्ति जी मनुष्यमात्रांत दिसून येते तीमुळें ही अप्रियता उत्पन्न झाली आहे किंवा आतां सरकारनें जी पद्धति स्वीकारली आहे तीमुळें उत्पन्न झाली आहे, हें प्रथम पाहिलें पाहिजे. रस्त्यावरील रहदारी चालण्याकरितां त्यांची सुधारणा झाली पाहिजे असें म्हणण्याचा अधिकार आम्हांस आहे, व जादा कर भरावयास पडल्याशिवाय झाली पाहिजे असें म्हणण्याचा एक आणा फंड भरणाऱ्या लोकांस हक्क आहे. नावा व पूल इ. सोयी, ज्या एकंदर देशांतील महसुलाच्या पैशानें तयार केल्या जातात, त्यांची गोष्ट निराळी. एरव्हीं एकवार दिलेल्या पैशानें बांधलेल्या रस्त्यावरून जाण्यास पुन्हां कर बसविणें गैर आहे. अशा रस्त्यांची सुधारणा करणें झाल्यास स्थानिक लोकांची कुवत केवढी आहे तें पाहिलें पाहिजे. नामदार क. ॲण्डरसन विचारतात 'हा कर शेवटीं कोणाकोणावर पडतो ?' हा प्रश्न लक्ष्मीशास्त्राचा आहे व महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यावरील पुष्कळ कर पोटाकरतां धान्य विकत घेणाऱ्यांवर पडतो परंतु यांस वगळलें तरी रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या ( जे शेतकरी नाहींत अशा ) लोकांवरही हा दस्तुऱ्यांचा कर पडेल व तीनचार दस्तुऱ्यांचाही द्यावयास पडेल. रस्ते

पाहिजेत परंतु ते लोकांच्या आहारांतील पाहिजेत. ” ( वरील मतलबाची रावसाहेबांची सूचना नापास झाली. )

## मामलत्तदार कोडताचा १८७५ चा ५ वा कायदा.

### ( पहिलें वाचन )

( यावेळी रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांश. )

“ या कायद्याची चांगली दुरूस्ती व्हावी. मामलेदार फिर्यादी कशा चालवितात तें मी पाहिलें आहे. ते आपली करमणूक करून घेतात; परंतु तेणेंकरून रयतेची करमणूक होत नाहीं. हुकुमाच्या बजावणीशीं पाटील कुळकर्ण्यांचा संबंध नसावा, मामलेदारांच्या मनुष्यांकडूनच ती व्हावी. पाहिजे तर अधिक बेलिफ ठेवावे व अवश्य तेवढी फी द्यावी. ”

दुसऱ्या वाचनाच्या वेळीं ७।१।१८७६ रोजीं हाच मुद्दा रावसाहेबांनीं अधिक स्पष्ट करून सांगितला. “ गांव कामगारांचा कधीं कधीं मामलेदाराच्या हुकुमनाम्याशीं पक्षकार म्हणून हितसंबंध असतो म्हणून मामलेदारांच्या हुकुमाची बजावणी करण्याचें काम गांवकामगारांकडे नसावें. तसेंच त पक्षकाराकडेही सोंपवितां कामा नये. नवे बेलिफ नेमून त्यांकडून करून घ्यावें व त्यांच्यावर देखरेख पाटलाची असावी. गांवकामगारांस मेहनताना कमी असून अगोदरच त्यांस काम फार आहे, हें सरकारास मान्य आहे. १८२७ च्या १६ व्या रेग्युलेशन प्रमाणें गांवचें सर्व काम—जमिनींची नोंदबुकें ठेवण्यापासून तों बहुसंख्य प्रवाशांची बडदास्त ठेवण्यापर्यंत—त्यांच्यावर पडतें. ”

“ मी म्हणतों कीं गांवच्या जमिनीशीं मालकी हक्कानें संबंध असलेल्या व बजावणीकरतां काढलेल्या हुकुमनाम्याशीं हितसंबंध असलेल्या लोकांचा व कामाखालीं आधींच नमून गेलेल्या गांवपाटलाचा, मामलेदारांच्या हुकुमाची बजावणी करण्याशीं कांहीं संबंध नसावा. यांच्यावर देखरेख कोण करणार ? उलट बेलिफाची नेमणूक केल्यास त्यांवर देखरेख पाटील करूं

शकेल. बेलिफ जमिनीची विक्री करीत असतां पाटील हजर राहून तिच्यावर नजर ठेवितो म्हणून बेलिफ नवे ठेवून झाले तर मामलेदारांचे हुकुमनामे बजावून घ्यावे."

## सिटी सर्व्हेचा कायदा १८७६ चा नंबर ४ चा कायदा.

(या कायद्याच्या मसुद्यावर भिन्नमतप्रदर्शक रावसाहेबांनीं लिहिलेली नोंद)

"कमिटीच्या सभासदांतील बहुमतानें केलेल्या १० व कलमाच्या योजनेला मला पाठींबा देतां येत नाहीं. १८६८ च्या चवथ्या कायद्याच्या १० व्या कलमाप्रमाणें सदरहू कायदा पास होण्यापूर्वी जी सनदफी बाकी निघेल ती" हे शब्द या कलमांत घालण्यास माझी हरकत आहे. या कायद्याच्या कलमांची गत कालापासून अम्मलबजावणी व्हावी असा अधिकार या कायद्यानें दिलेला दिसत नाहीं. शहरांतील जमिनीवर अगोदरच प्रस्थापित झालेल्या हक्कांस बाध आणणारें कलम महसूलाच्या संबंधाच्या कायद्यांत घालूं देण्याला मी मत देऊं शकत नाहीं. असलीं कलमें कित्येक देशांत कोडतांत अन्यायाचीं ठरतील, राज्यव्यवस्थेस अननुरूप ठरतील म्हणून अकार्यसाधी व त्याज्य ठरतील. (केंटची टीका ५११ पान, १० आवृत्ति पहा) असले कायदे एकाच तत्त्वावर केलेले असतात. गतकालापासून अम्मलांत येणारा असला कायदा करण्याची जरुरी सिद्ध झालेली नाहीं. कांहीं राहिलेल्या चुका दुरुस्त करणें भाग असतें अथवा दुसरे हितावह उपाय करणें प्राप्त असतें तर मी याच्यातर्फें मत दिलें असतें." (याप्रमाणें रावसाहेबांनीं मूळ कमिटींतील योजनेवर मत दिल्यावर हा कायदा परत घेण्यांत आला. पुरातन कालापासून भोगवट्यास असलेल्या जमिनीच्या हक्काबद्दल सनद जर द्यावयाची असली तर तशी सनद घेण्यास

मालकांस पैसे देणें भाग पाडतां यावयाचें नाहीं असें रावसाहेबांचें मत होतें. )

## फेरी बोटींच्या कायद्यांत दुरुस्ती करणारा १८७५ चा ६ वा कायदा

या कायद्याच्या पहिल्या वाचनाच्या वेळीं रावसाहेब म्हणाले " या मसुद्यांत नमूद केलेल्या बोटींविषयीं कांहीं नियम करण्याचा अधिकार सरकाराला या कायद्यानें प्राप्त होणार आहे. ही सुधारणा इष्ट आहे तेवढ्यापुरतें मी या कायद्याच्या तर्फे मत देणार आहे. तथापि मला असें वाटतें कीं, चवथ्या कलमाची घडण फार विचार करून केली पाहिजे. या मसुद्यांत नमूद केलेलीं इतर बंदरें विशेषतः बाणकोट, रेवदंडा व महाड यांचा, मुंबईशीं पुष्कळ व्यापार चालतो; त्याच्यावर या कायद्याचा अनिष्ट परिणाम घडेल. असा व्यापार किति आहे याची माहिती या कायद्याचें सविस्तर विवेचन होण्यापूर्वी या सभेला सादर करण्यांत आली पाहिजे; या हरकती शिवाय माझी दुसरी कोणतीही हरकत नाहीं. "

नामदार राजर्सः—या बोटी मुख्यतः उतारूंच्या सोईकरितां निघालेल्या आहेत. बाणकोटची बोट रत्नागिरीच्या उतारूंस फारच सोयीस्कर झाली आहे. मुंबई–महाड कडील बोटीनें उतारूंस धरमतरीवरून मुंबईस पायीं येण्याचा जो हेलपटा पडत असे तो वांचणार आहे.

रावसाहेबः—म्हणूनच मी म्हणतों कीं बाणकोट, महाड व मुंबई यांच्या दरम्यानचा व्यापार किति आहे त्याचीं कोष्टकें मला पाहिजे आहेत. तीं लक्षांत घेऊन उतारूंची सोय होईल व इतर चालू असलेल्या व्यापारास प्रतिबंध होणार नाहीं अशी व्यवस्था करतां येईल. एक हातीं सत्ता बोटींना देऊन चालू असलेल्या व्यापारास धोका आणणें इष्ट नाहीं. ( ४।१।१८७६ )

## सक्तीनें देवी टोंचण्याचा १८७६ चा ५ वा कायदा.

या कायद्यावर रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांशः— "मुंबई असोसिएशनकडे या कायद्यावर आपलीं मतें पाठविण्यास ज्या लोकांस विनंति केलेली होती त्यांपैकीं मी एक होतों. गोस्तन देवींची लस जर देवी टोंचण्यास घेतली व देवी टोंचणें सक्तीचें केलें तर लोकांच्या पुष्कळ तक्रारी नाहींशा होतील. रोगट पशु हा रोगट मनुष्या-इतकाच दुसऱ्याच्या शरीरांत आपल्या शरीरांतील रोग ( उदाहरणार्थ उपदंशासारखे ) भिनवून देण्यास लायक आहे. परंतु कांहीं रोग मानवी शरीरांतच वास करणारे आहेत. त्यांचा मुलांत आनुवंशिक संचार झाला असला तर तें बऱ्याच वेळेस ओळखूं येत नाहीं. पशूंना असले रोग होत नाहींत. कांहीं किवणासारखे त्वग्रोग होतात. म्हणून पशू जर नीट तपासून घेतले तर हा कायदा सक्तीनें लागू करण्यांत अपाय मुळींच नाहीं."

"या गोष्टीचा विचार सिलेक्ट कमिटींत होईलच. हा कायदा मुंबई-शहरापुरताच असल्यामुळें मी या मसुद्याला पुष्टि देत आहे."

दुसऱ्या वाचनाच्या वेळीं आपलें मत कायद्याच्या तर्फेनें देतांना राव-साहेब म्हणालेः—

"एका मुलाची लस घेऊन दुसऱ्यास देवी टोंचण्याचा अधिकार देवी टोंचणाऱ्या नोकरांस २८ कलमानें द्यावयाचा आहे. पण तो गोस्तन देवीची लस मिळाली नाहीं तर द्यावयाचा आहे. असा प्रसंग विरळाच येणारा असतो व हा सर्व प्रकार लोकांच्या सुरक्षितेसाठींच आहे. त्यांच्यावर कांहीं प्रयोग करून पहावयाचा नाहीं. हा गोस्तन देवीचा प्रश्न मुंबईपुरता आतां सुटल्यासारखा दिसतो. म्हणून मी या कायद्याच्या तर्फे आनंदानें मत देत आहे."

## कपाशीच्या भेसळीचा ( १८७७ चा नंबर १ चा ) कायदा.

( नामदार रॅव्हन्स्क्रॉफ्ट यांनीं दुसऱ्या वाचना करतां मसुदा सादर केला तेव्हां रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांशः— )

अमेरिका व इंग्लंद या देशांत राजकीय घडामोडी चालू आहेत त्या नीटपणें समजण्या इतकी योग्यता हिंदी सभासदांच्या अंगी आहे कीं नाहीं याविषयीं कांहीं मत देऊन हा कायदा काउन्सिलांत आणणाऱ्या नामदार सभासदानें हिंदी सभासदांची संभावना केली होती त्याबद्दल त्या नामदार सभासदाचा समाचार प्रथम घेतांना रावसाहेब म्हणालेः—

" अमेरिका व इंग्लंद या दोन देशांत कशाकशा राजकीय घडामोडी चालू आहेत त्या समजण्याइतकी योग्यता हिंदी सभासदांची आहे असें या कायद्याचा मसुदा सभेंत आणणाऱ्या नामदार सभासदानें मानलें नाहीं असें म्हणतांना मला—कारण मी स्वतःच्या वतीनें बोलत आहे—फार दुःख होत आहे. माझ्यापुरतें मी सांगतों कीं सुशिक्षित ब्रिटिश प्रजाजन म्हणून वरील उलाढालींत जेवढें मन मीं घालावें तितकें घालीत असतों. अमेरिकेंत व युरोपांत उपस्थित होणाऱ्या प्रकरणांशीं आमचा हितसंबंध दिवसानुदिवस वाढत जाईल असा मला भरंवसा वाटत आहे. हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार होत आहे व त्याच्या योगानें योग्य प्रकारानें शिक्षण मिळालेला प्रत्येक हिंदी सभासद वरील राजकीय विषयावर वादविवाद करतांना कोणत्याही पाश्चात्य देशांतील गृहस्थाइतकी मिळवलेली माहिती व ज्ञान उपस्थित वादांपुरती दाखवील अशी आशा करण्याचा काळ फार लांब नाहीं. आमच्या मार्गांत अडचणी फार आहेत; परंतु आम्हीं शक्य तेवढें करीत आहोंत. त्यावरून १८६३ सालापासून कपाशीच्या भेसळीच्या संबंधानें कायदेकानू चुकीच्या तत्त्वावर होत आले आहेत, असें स्वतांपुरतें ह्मणण्याची मी परवानगी घेतों. "

" १८६३ सालापासून बाहेरगांवीं जे जे खटले उपस्थित झाले व जे कोडतांत आले ते सर्व मी नीट नमूद करून ठेविले आहेत. त्यांकडे पहातां चेम्बर ऑफ् कामर्स व तशा इतर संस्थांनीं ज्या हरकती या कायद्याविरुद्ध घेतल्या आहेत त्या योग्य आहेत. १८६५ साल हा मुंबईवर मोठा आपत्प्रसंग आला होता. तेव्हां विशिष्ट स्वरूपाचा कायदा करण्यांत आला होता हें खरें. पण तुह्मीं गतकालीन आपत्प्रसंगावर नजर देऊन भरभराटीच्या काळांत ( कारण आमची ब्रिटिश अमलाखालीं भरभराट होत आहे ) कायदे करावयाचे नसतात. उद्योगधंद्यासंबंधें कोणच्या ठोकळ तत्त्वावर कायदे करण्यांत येतात तिकडे लक्ष दिलें पाहिजे. व्यापाऱ्याच्या कोणत्याही जिनसांत भेसळ करणाऱ्या गुन्हेगारास योग्य शासन करण्यास पीनल कोडांतील कलमें पुरेशीं आहेत. कपाशींत भेसळ करण्यांत येते ती बंद व्हावी ह्मणून आम्हीं जर विशिष्ट कायदा करूं लागलों तर कोठें थांबावयाचें तें समजत नाहीं. तागाचा व चहाचा व्यापारही वाढत चालला आहे. ही गोष्ट सर्व युरोपियन सभासदांस महशूर आहेच. तेव्हां कपाशींत केलेली भेसळ शोधून काढण्यास केलेला आरंभ या नवीन व्यापाराच्या जिन्नसांत केलेली भेसळ शोधून काढल्याशिवाय थांबवितां यावयाचा नाहीं. १८६३ सालीं कमीशन बसलें होतें. त्याचें मत आज देशभर असलेल्या संस्थांनीं जें मत दिलें आहे त्याशीं जुळत आहे असें पाहतां ज्या गोष्टी पुढें ठेवल्या गेल्या त्या गोष्टींवरूनच झालेलें आपलें पूर्वमत स्टेटसेक्रेटरी बदलतील व सर्व देशाच्या अभिन्न स्वरूपाच्या एकमताला मान देतील अशी बळकट आशा आहे. हा कायदा अपायकारक आहे. कदाचित् अपायकारक हा शब्द फार जोरदार आहे असें दिसेल परंतु हायकोर्टांत गुन्ह्यासंबंधें जीं अपीलें आलीं तीं पाहिलीं असतां असें कळून येईल कीं या कायद्यानें जें हित होईल असें वाटलें

होतें तें हित झालें नाहीं. माझे नामदार मित्र ग्रहॅम यांच्या एका विधानास माझें उत्तर असें आहे कीं हा कायदा निरुपयोगी आहे असें ठरविण्याचा बोजा त्याला विरोध करणाऱ्या लोकांवर नाहीं. उलट तो उपयोगी आहे असें ठरविण्याचा बोजा त्याचा मसुदा पुढें आणणाऱ्यावर आहे."

" असला कायदा करावयाचा असेल तर या देशाचा व्यापार असा कायदा केला नाहीं तर बुडेल, तो पुढें चालावयाचा नाहीं व असा कायदा या देशाच्या हिताकरतां केला पाहिजे असें सिद्ध केलें पाहिजे."

## कापसाच्या भेसळीचा कायदा ( १८८० चा तिसरा )

हें बिल चर्चेला निघालें तेव्हां रावसाहेबांनीं अशी सूचना आणली कीं कापसामध्यें जी कपटानें भेसळ केली जाईल ती एका विशिष्ट व्यक्तीला फंसविण्याचे हेतूनें केली गेली असें भेसळ करणाऱ्या मनुष्याला शिक्षा देण्यापूर्वी सिद्ध केलें पाहिजे. परंतु नामदार ॲशबर्नर म्हणाले:—" मनुष्याचा हेतु त्याच्या मनांत गुप्त पुरलेला असतो तो कसा सिद्ध करणार. उदाहरणार्थ एकानें कापसाच्या गठ्ठ्यावर पाणी कपटानें ओतलें तर तें कोणत्या विशिष्ट व्यक्तीला फसवण्याकरितां ओतलें हें कसें सिद्ध करतां येईल!" मतें घेतल्यावर रावसाहेबांची सूचना नामंजूर झाली.

पुढें रावसाहेब तिसऱ्या वाचनाच्या वेळीं म्हणाले:—" रयतेच्या अदूरदर्शित्वामुळें हा कायदा करावयास पाहिजे असें सांगण्यांत येतें. त्यावर मी असें म्हणतों कीं, रयतेचा जो अदूरदर्शित्वाचा गूण आहे त्याचे वाईट परिणाम नाहींसे करण्यास आहेत ते कायदे पुरे आहेत. रयतेला जेव्हां अधिक शिक्षण मिळेल—आणि तें मिळेल यांत संशय नाहीं, कारण सरकार तीस शिक्षण देण्यास आपलेकडून होईल तितके प्रयत्न करीत आहे—तेव्हां आपले हिताला कसें जपावें तें रयतेला कळूं लागेल. कापूस घेणारा व विकणारा यांचे परस्परसंबंध नियमित करण्यास पीनल कोड

समर्थ आहे. मला रयतेचा अनुभव आहे. मी स्वतःही रयत आहें. त्यावरून मी सांगतों कीं रयतेच्या संरक्षणार्थ असला कायदा अवश्य नाहीं. सरकारानें नेमलेल्या कमीशनानें असला कायदा अनवश्यक आहे असें ठरविलें आहे म्हणून मी कायद्याच्या विरुद्ध मत देतों."

## अबकारीचा १८७७ चा ( तिसरा कायदा )

या कायद्याच्या मसुद्यावर ८।११।१८७७ रोजीं काउन्सिलांत वादविवाद झाला.

महसूलासंबंधीं कायद्यांचा अम्मल गतकालापासून सुरू होऊं नये अशी सूचना रावसाहेबांनीं आणिली ती ४ विरुद्ध ६ मतांनीं अमान्य झाली.

या कायद्याच्या ४१ व्या कलमांतील "सहा महिनेपर्यंत तुरुंगाची शिक्षा" हे शब्द वगळाव अशी सूचना रावसाहेबांनीं आणिली तेव्हां ते म्हणाले "कांहीं कर देण्याचें आपलें कर्तव्य कोणी न केलें तर त्यास दण्डाची शिक्षा असावी पण तुरुंगाची नसावी."

नामदार ॲशबर्नर:—"या कायद्याच्या सपाट्यांत सांपडणारे लोक जर गरीब मजूरांपैकीं असतील तर ते दण्ड कोठला देतील? असा अधिकार अंमलदारांच्या हातीं नसल्यास चोरून दारूची विक्री करणाऱ्यांस योग्य शासन करतां यावयाचें नाहीं."

नामदार बेंगाळी म्हणाले:—"निवडक कमिटींत हें तुरुंगाच्या शिक्षेविषयींचें कलम मी सुचविल्याप्रमाणें मसुद्यांत घालण्यांत आलें आहे. कांहीं लोक असे असतात कीं हजार किंवा पांच हजार रुपयांचा दण्ड त्यांच्या खिसगणतींत नसतो."

नामदार लँग म्हणाले:—"कायद्यांत शासन फार कडक पाहिजे परंतु उच्चवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या हातांतच त्याचा अम्मल ठेविला पाहिजे."

रावसाहेब म्हणाले:—"शासन फार कडक ठेवलें तर तें तसें ठेवण्याचा हेतु साध्य होत नाहीं. लोकांची सहानुभूति अम्मल करणाऱ्या अधिकाऱ्यातर्फे राहिली पाहिजे; परंतु गैरकायदा एकाद्या गरीब मजुराजवळ दारूचा माठ सांपडला व त्याच्या सन्मुख सहा महिन्याची तुरुंगाची शिक्षा उभी केली तर लोकांची सहानुभूति कोर्टाकडे वळेल काय ?"

रावसाहेबांची ही सूचना अमान्य झाली.

रावसाहेब नंतर ५१ व्या कलमासंबंधें म्हणाले " आरोपीनें विवक्षित गुन्हा केला हें सिद्ध करण्याचा बोजा फिर्यादीवर असतो तर या कायद्यांतच वरील तत्त्वाला अपवादक अशीं कलमें कां असावीं ?"

नामदार लॅंग यांस ही विचारसरणी मानवली, परंतु ना. अॅशबर्नर म्हणाले:–"दारू गाळण्याचें यंत्रच अशा तऱ्हेचें आहे कीं तें जो बाळगील त्याचा गैरकायदा दारू गाळण्याचाच हेतु असला पाहिजे असें समजून येतें. अफूच्या कायद्यांत असेंच कलम आहे. तें नसतें तर पदरीं असलीं यंत्रें ठेवूनही आरोपी दोषमुक्त होतील. ( रावसाहेबांची सूचना अमान्य झाली )

रावसाहेब नंतर मॅजिस्ट्रेट शब्दाच्या व्याख्येवर टीका करतांना म्हणाले:—" या शब्दाच्या व्याप्तींत फक्त पहिला व दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेट यावे. तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटकडे या कायद्यांविरुद्ध केलेले गुन्हे चौकशीस गेल्यास काय होईल ? सरकारच्या खजिन्यांत जेवढा पैसा जमा होईल त्याहून अधिक पैसा आरोपीच्या खिशांतून निघेल !"

ना. अॅशबर्नर म्हणाले:—भिल्लासारख्या गरीब आरोपीस चौकशीकरतां ५० मैल धांवडत न्यावें लागेल. तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटच्या मंडळींतूनच ना, मामलतदार निर्माण होतात ?"

नामदार गिब्स म्हणाले:—तुम्हीं शाळकरी मुलांतूनच पार्लमेंटचे सभासद निर्माण होतात असें म्हणून एकाद्या मुलास आणून कांहीं

प्रान्तांचें अधिपतत्व त्याकडे द्याल ! फक्त गैरसोय फार होईल व पुष्कळ वेळ फुकट जाईल या सबबीवर तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटकडे अबकारीच्या गुन्ह्यांची चवकशी करण्याचे अधिकार दिले पाहिजेत. ”

नामदार ॲण्डरसन् यांचें मत रावसाहेबांप्रमाणें पडलें. परंतु त्यांची सूचना अमान्य झाली.(यांत एक रावसाहेबांची सूचना मान्य झाली होती.)

## मुंबई म्युनिसिपल ॲक्टांत दुरुस्ती करणारा १८७७ चा ६ वा कायदा.

नामदार गिब्स यांनीं या मसुद्याचें दुसरें वाचन व्हावें अशी सूचना आणिली त्या वेळीं रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांश:—

“ आपला रिपोर्ट पाठवून दिल्यावरसुद्धां टाउन काउन्सिलनें केलेल्या शिफारशींचा निवडक कमिटीनें विचार केला आहे हें मला त्या कमिटीचा सभासद असल्यामुळें माहीत आहे. बगीवाल्यांस मत देण्याचा हक्क प्राप्त होईल या गोष्टीचा फार बाऊ केलेला दिसतो. वर्षास तीस रूपयांचा कर देणें या अटीनें मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो असें या कायद्यानें ठरविण्यांत आलें आहे. कोणत्याही कायद्यास अपवाद घालणें ते शक्य तितके थोडके असले पाहिजेत. केवळ बगीवाले म्हणून त्यांस हक्क कां मिळूं नये तें दाखवून दिलेलें नाहीं. ”

×“क्लजिअन” स्वरूपाचीं जीं कलमें आहेत त्यांचा विचार करतां असें दिसून येत आहे कीं या विषयींचा मसुदा टाउन काउन्सिलपुढें दोन वर्षें होता. असें असतां टाउन काउन्सिलानें ज्या सूचना केल्या त्यांत या कलमाविषयीं कांहीं उल्लेख नाहीं. गेल्या एकदोन आठवड्यांतच त्यांचें मत जर बदललें असेल तर आणखी एकदोन आठवड्यांत हेंही मत कां बदलणार नाहीं ? व आतां हीं कलमें पुन्हां घाला असें कां म्हणणार नाहीं ! कायद्यांत बदल करणें तो पुष्कळ विचार करून इष्ट आहे असें ठरल्याशिवाय मी त्यास संमति देणार नाहीं. सरकारी कचेऱ्यांवरील

×कारपोरेशनला किंवा कमीशनरला विशेष हक्क देणारीं.

म्युनिसिपल करांविषयीं विचाराल तर माझें म्हणणें असें आहे कीं सरकारनें म्युनिसिपॅलिटीशीं तोड केली आहे. म्युनिसिपॅलिटीनें जर कराची आकारणी केली असती व जितकी रक्कम ठरविण्यांत आली असती तीहून अधिक रक्कम सरकार देत आहे ही गोष्ट म्युनिसिपॅलिटीच्या फायद्याची आहे. तींत फरक करणें तो अडव्होकेट जनरल म्हणतात त्याप्रमाणें प्रांतिक वसूलाला बाध येत असेल तर सरकारची मंजुरी अगोदर मिळविली पाहिजे. तसें न केल्यास कित्येक वेळां कायदे पुरे न होतांना काउन्सिलांत पडून राहतात असा अनुभव आहे. आम्हीं म्युनिसिपॅलिटीच्या करांचें नियमन, व म्युनिसिपलिटीच्या खर्चांत काटकसर होईल अशी व्यवस्था केली आहे म्हणून मी या म्युनिसिपॅलिटीस फायदेशीर असलेल्या मसुद्याच्या तर्फे मत देतों." १९।१२।७७

## शिकारीच्या प्राण्यांचें संरक्षण करणारा १८८० चा तिसरा कायदा

या कायद्याची अवश्यकता दाखविणारीं ६ कारणें पुढें आणलेलीं आहेत. त्यांतील एक असें आहे कीं, असा कायदा जर आह्मीं केला नाहीं तर शिकारीचे प्राणी नमुन्यालासुद्धां उरणार नाहींत व हे प्राणी कित्येकांचें भक्ष्य असल्यामुळें त्यांच्या पोटाच्या अन्नसामग्रींत तुटवडा पडण्याचा संभव आहे. यासंबंधें मला जेवढा थोडा वेळ मिळतो, तेवढ्यांतच बरीच अंकप्रमाण माहिती सरकारांतून मिळविली आहे. जंगलाच्या कायद्याप्रमाणें ५०,५९७ सर्व्हे नंबर जंगलगर्क आहेत. त्यांत कांहीं नंबर तर प्रत्येकीं शंभर शंभर बिघे क्षेत्राचे आहेत. शिवाय १८००० बिघे राखींव आहेत. इतक्या मोठ्या प्रदेशांत शिकारीचे प्राणी खुशाल संचार करीत आहेत व विवक्षित कालींच शिकार करूं देण्याची परवानगी सरकार देत जाईल तर हे प्राणी नष्ट होण्याचा व पोटाच्या अन्नसामग्रींत तूट पडण्याचा प्रसंग केव्हांही येणार नाहीं."

" या कायद्याच्या समर्थनार्थ दुसरें एक कारण आणण्यांत आलें आहे तें हें कीं टोळ, उंदीर इत्यादि कृमिकीटकांचा नाश करण्याकरतांच कांहीं पक्षी उत्पन्न केलेले आहेत. तेव्हां या कृमिकीटकांचा उपद्रव नाहींसा करण्याकरतां त्यांचा संहार करणाऱ्या पक्ष्यांचें संरक्षण केलें पाहिजे. पक्ष्यांच्या या कामगिरीबद्दल कांहीं तूर्त पुरावा आणलेला नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासांत कांहीं उदाहरणें नमूद केलेलीं नाहींत. "

" आणखी एक कारण असें देण्यांत येतें कीं जिल्हा अधिकाऱ्यांस शिकार मुबलक मिळत जाईल. समाजावर असला कायदा लादण्याकरतां पुढें आणलेलें हें कारण खचित निर्जीव आहे व प्रत्येक गांवोगांव जीं जंगलें राखलेलीं आहेत व ज्यांपासून या देशांतील गरीब रयतेस त्रास पोंचत आहे त्यांत इतकी शिकार सांपडते कीं ती जिल्हा अधिकाऱ्यांस पुरून ज्या हिंदी लोकांची प्रवृत्ति या खेळाकडे आहे त्यांसही उरते. आणखी एक कारण असें देण्यांत येतें कीं जिल्हा अधिकाऱ्यांचें या शिकारीच्या पायीं हिंदी लोकांशीं दळणवळण वाढेल व परस्परांतील गैरसमज दूर होतील ! हा मुद्दा नामदार अॅशबर्नर यांजवळ मला दोन हात करावयास लावीत आहे.गेलीं २८ वर्षे नोकरीच्या पायीं व इतर चळवळीच्या पायीं या इलाख्यांतील व इतर इलाख्यांतील सर्वांत वरिष्ठ युरोपियन अम्मलदारांशीं माझें संघट्टन हिंदी सरकारी अधिकाऱ्यास शक्य आहे तितकें घडून आलें आहे व तें बरेंच आहे. हिंदी व युरोपियन गृहस्थांस एकत्र मिसळून सुखोपभोग घेण्याचा एक विषय उरला आहे व तो कोणता म्हणाल तर सहभोजनाचा!पण असें पहा, जेवण आमचे करतां आहे. जेवणाकरतां आपण नाहीं. म्हणून मी म्हणतों या जेवणाच्या प्रसंगाशिवाय युरोपियन व हिंदी गृहस्थ यांस जसें एकत्र जमतां येईल तसें या शिकारीच्या मिषाशिवायही एकमेकांत मिसळतां येईल. शंभरांत एकादा हिंदी संस्थानिक या शिकारीच्या भानगडींत पडतो. पण

हिंदी गृहस्थ या शिकारीचा नाद धरूं पाहील तर त्याच्या मार्गांत असंख्य अडचणी आहेत. त्यांतील शेवटली हत्यारांच्या कायद्यापासून उद्भवणारी आहे. म्हणून म्हणतों कीं जिल्हा अधिकाऱ्यांस ज्या हिंदी गृहस्थांशीं मिळून मिसळून वागावयाचें आहे त्यांस या शिकारीच्या प्रसंगाशिवाय दुसरे प्रसंग आहेत. मग हा कायदा करावयास सबळ कारण कोठें उरतें ? ”

“ शिवाय या कायद्याचें स्वरूपच असें आहे कीं एका विवक्षित वर्गांतील व्यक्तींची सत्ता वाढेल. या व्यक्ती कोणत्या म्हणाल तर हे आपले शिपाई. यांचा वर्ग म्हणजे एक अत्यन्त वाईट असें संकटच आहे. या संकटाकडे सरकाराचें लक्ष अनेक वेळां वेधलेलेंच आहे. नामदार गव्हर्नर साहेब ज्या खुर्चीवर विराजमान झाले आहेत तीवरच मागें विराजमान झालेले सर जार्ज क्लार्क यांनीं हें संकट या इलाख्यांतील सर्वांत मोठें असें म्हटलें आहे. मी समाजांतील सर्व वर्गांतील लोकांत मिसळतों म्हणून मी प्रत्येक शिपाई हव्या तेवढ्या मोठ्या पदवीच्या हिंदी गृहस्थास किति त्रास देऊं शकतो तें स्वानुभवानें जसें सांगूं शकतों तसें ज्या युरोपियन गृहस्थास पहातांच वरील शिपाई पळून जातो तो सांगूं शकणार नाहीं. असले कृत्रिम कायदे ( ज्यांचा राज्यकारभाराशीं कांहीं संबंध पोंचत नाहीं ते ) करण्याचीं यांहून अधिक कारणें मिळाल्याशिवाय ते वाढविण्याचें सरकारानें करूं नये. यांचे परिणाम आपणास अगोदरच सांगतां येतात. शिकारीच्या पशूपक्ष्यांस तोटा नाहीं. पोटाला पुरून उरेसे आहेत व या कायद्यापासून शेतकरी वर्गास कनिष्ठ अधिकाऱ्यांपासून इतकी पीडा प्राप्त होणार आहे कीं जर या कायद्याशिवाय चालण्यासारखें असेल तर सरकार चालवील असा माझा भरंवसा आहे. ही बाब दिसतांना क्षुल्लक दिसत आहे. ती विचारांत घ्यावयास नको असें वाटत असेल. या देशांतील सर्वांत उत्तम कायदा जो पीनलकोड त्या कायद्यासही माहित

नाहीं असे कृत्रिम गुन्हे असल्या कायद्यानें निर्माण होणार आहेत. म्हणून या कायद्याच्या अवश्यकते विषयीं अधिक पुरावा मिळे तों काउन्सिल हा कायदा करण्याचा विचार तहकूब करील असें मला वाटतें. आमच्या बहुजन समाजाच्या हिताकरतांच हा कायदा करण्याची वेळ आली तर तो करावा नाहींतर करूं नये. या कारणांस्तव या कायद्या विरुद्ध मत देणें माझें कर्तव्य आहे. असें मीं समजतों.

## फार्मसीचा ( १८८२ चा आठवा कायदा )

( विषारी औषधींची विक्री नियमित करणारा कायदा )

या कायद्याच्या पहिल्या वाचनाच्या वेळीं रावसाहेबांनीं केलेल्या भाषणाचा सारांशः—

" ज्या कारणांकरतां हा कायदा करण्याची अवश्यकता दिसून आली आहे त्यांच्या योग्यायोग्यतेविषयीं जो पुरावा गोळा केलेला आहे तो सर्व काउन्सिलच्या सभासदांकडे पाठविण्यांत आला नाहीं. सबब त्याच्या अभावीं जरी हा कायदा करण्यांत जो हेतु आहे तो श्लाघ्य असला तरी या कायद्यासंबंधें जीं तत्त्वें पुढें आलीं आहेत त्यांतील कांहीं हरकत घेण्यासारखीं आहेत. युरोपांतील कांहीं राष्ट्रांपेक्षां अधिक विस्तृत अशा या देशाला असले कायदे घाईघाईनें सर्व भर लागू करतां कामा नये. "

या कायद्यावर रावसाहेबांनीं भिन्नमतप्रदर्शक नोंद केली तिचा सारांशः—

" या कायद्याच्या कामीं पुढें आलेला सर्व पुरावा वाचून पाहिला. त्यांतून कांहींच निष्पन्न होण्यासारखें नाहीं म्हणून वाईट वाटतें. "

" १८८१ च्या मे महिन्याच्या २८ व्या तारखेस पोलीस कमीशनर सरकाराकडे एक खलिता पाठवितात. त्यांत केम्प आणि कंपनीच्या औषधविक्रीच्या दुकानांत औषधांचें मिश्रण करतांना चूक झाल्यामुळें

एका गृहस्थास मरण प्राप्त झालें, असें ते लिहितात व पुढें असें म्हणून ठेवतात कीं अशा सुव्यवस्थित दुकानांत चुकीनें जर इटलीच्या मुंबई- तील वकीलासारख्याचा प्राण जातो तर इतर ठिकाणीं ( म्हणजे लहान सहान दुकानांत जेथें एवढी व्यवस्था नसते तेथें ) भयंकर चुका होत असतील अशी कल्पना करावयास कांहीं हरकत नाहीं. ही पोलीस कमी- शनर साहेबांची कल्पनाच सारी या कायद्याच्या बुडाशीं आहे. कारण सारे पुराव्याचे कागद चाळून पाहिले त्यांत असल्या चुकीचें—जी पुन्हा घडूं नये म्हणून हा कायदा करण्याचें योजिलें आहे तिचें—दुसरें उदाहरण कणशः सुद्धां आढळून येत नाहीं. युरोप खण्डाची व या देशाची स्थिति भिन्न असूनही युरोपच्या धर्तीवर जे भ्रान्तिमूलक कायदे करण्यांत येतात त्यांचाच एक मासला या कमीशनरांच्या पत्रानंतर करूं घातलेल्या या कायद्यांत पहावयास मिळत आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं असें मी नम्रपणें सांगतों. ”

“ पोलीस कमीशनर साहेबांचें पत्र ओघानें सिव्हिल सर्जनकडे पाठवि- ण्यांत येतें. त्यांना कायदा करण्याची कल्पना पसंत पडते. युरोपमध्यें असा कायदा आहे मग येथेंच कां नसावा ! डाक्तर मूर यांचें मत सर- कारी तद्ज्ञांकडे जातें व हल्लींच्या स्वरूपाचा कायदा पुढें येतो. मी स्वतां अशा रीतीनें पुढें आलेल्या कायद्यांच्या विरुद्ध आहे. मी यांस राजकीय- जीवावर करून पाहिलेला शस्त्रप्रयोगच समजतों. जर मला ह्या काय- द्याचें तत्त्वच कबूल नाहीं तर त्याच्या कलमांच्या भाषेवर टीका करणें अगदीं निरर्थक वाटतें. अपघाताचें जें उदाहरण कमीशनरांच्या पत्रांत नमूद केलें आहे तें त्यांच्या ह्मणण्याचें समर्थन करीत नाहीं. औषधींच्या कामांत वाकब असलेल्या माणसाच्या हातून घडलेलें आहे.हा कायदा करणें ह्मणजे, प्रथम ४० ग्रेन पर्यंत मोठ्या प्रमाणांत ज्याच्या अंगांत ताप नाहीं अशाला क्किनीन द्यावें व मग खुशाल त्याला ताप येवून तो जावा तशा सारखें

होय. असल्या कायद्यांनीं समाजांत विनाकारण भीति उत्पन्न होते. १८२७ च्या कायद्यांच्या समूहांत प्राणघातक औषधींविषयीं कांहीं बंधनें आहेत तीं पुरेशीं आहेत. ”

## प्रांतिक रस्त्यांचा [ १८८२ चा सातवा ] कायदा.

या कायद्यावर भिन्न मतप्रदर्शक नोंद रावसाहेबांनीं केली तिचा सारांश:—

“ जें कार्य साधण्याकरितां हा कायदा करण्यांत येत आहे तें कार्य आधींच अस्तित्वांत असलेल्या कायद्यांनीं साधण्यासारखें आहे म्हणून या कायद्याची अवश्यकता नाहीं. ”

“ रस्त्यांचें वर्गीकरण चुकीचें दिसत आहे. कांहीं रस्ते मुख्यसरकारचे व कांहीं प्रांतिक सरकारचे असल्यामुळें त्यांचा खर्च म्युनिसिपॉलेट्यांवर पडूं नये. पुण्यांतील रस्त्यांवरील खर्चापैकीं खर्च ५/८ सरकारनें सोसला पाहिजे कारण या रस्त्यांचा उपयोग सरकारी सैन्य, तोफखाना व कमिसॅरिअट खातें यांसच अधिक होत असून त्यानीं हे रस्ते जेवढे झिजतात तेवढे लोकांच्या रहदारीनें झिजत नाहींत. ”

“ मनुष्याच्या नित्य व्यवहारांत हात घालणाऱ्या अनवश्यक कायद्यांची वाढ ही मोठी आपत्तिच आहे. अस्तित्वांत असलेल्या कायद्यांप्रमाणेंच जर कांहीं रुपयांचें उत्पन्न वाढवितां येत नसेल—माझ्यामतें तें वाढवितां येण्यासारखें आहे—तर असें कांहीं रुपयांचें उत्पन्न न झालें तरी बेहेत्तर पण असले नवे कायदे करण्यास मदत करणें नलगे. नव्या कायद्यांबरोबर नव्या नव्या खात्यांची वाढ होते व शेवटीं त्यांचें ओझें सरकारावर व प्रजेवर पडतें. त्यांची अवश्यकता सिद्ध झाल्याशिवाय नवे कायदे करण्यांत माझें अंग नसावें असें मला वाटतें. ”

१।१।१८८३

## महुडाच्या फुलांविषयीं ( १८८२ चा तिसरा कायदा. )

नामदार ॲशबर्नर यांनीं या कायद्याचें पहिलें वाचन केलें त्यावेळीं रावसाहेबांनीं केलल्या भाषणाचा सारांशः—

" या कायद्याच्या पहिल्या वाचनाला मला हरकत घ्यावी लागत आहे म्हणून वाईट वाटतें. या कायद्याची उभारणी चुकीच्या तत्त्वावर झालेली आहे. एल्फिन्स्टन कोडानें शुद्ध ताडीला स्पर्श सुद्धां केला नाहीं. ज्याच्या सेवनानें मनुष्य झिंगत नाहीं अशा खाण्याच्या निरुपद्रवी पदार्थांवर तो फेसाळूं लागल्या पूर्वीं कर बसविण्यांत जुन्या अबकारी कायद्याची चूक झाली आहे. महुड्याच्या फुलांसंबधीं म्हणाल तर भिल्ल व त्यांच्या सारखे दुसरे रानटी जातीचे लोकच हीं फुलें खातात असें नाहीं तर यांशिवाय दुसऱ्या जातीचे गरीब लोक खाण्याच्या कामी यांचा उपयोग करतात व गुरांना चारतात. या फुलांपासून मद्य तयार करीत असतील. तसें ते खाजुरापासून व उंसाच्या रसापासून करतात. म्हणून महुड्याच्या फुलांवरून जर लोकांस शिक्षेस पात्र धरूं लागाल तर दुसऱ्या कित्येक खाण्याच्या पदार्थांवरूनही धरावें लागेल. पुष्कळ लोक कारिंदे व महुड्याचीं फुलें यांवर उपजीविका करतात. "

"मला वाटतें हल्लींच्या कायद्याचें स्वरूप फार कठोर आहे. नेहमींच्या खाण्याच्या पदार्थांवर यानें उगीच हल्ला केला आहे. "

"मागला कायदा होतेवेळीं पुष्कळ अधिकाऱ्यांचा महुड्याच्या फुलांचा बंदोबस्त करण्याचा मानस होता. नामदार ॲशबर्नर यांच्या भाषणांत तंटेबखेडे झाल्याचा उल्लेख होता. परंतु त्या तंट्यांचीं कारणें बहुशः जुना कायदा व त्याची अम्मल बजावणी करण्याची पद्धति हीं होत. बिगर परवाना कोणी दारू गाळीत आहे कीं नाहीं हें शोधून काढण्याकरतां कांहीं दारू–मक्तेदाऱ्यांच्या माणसांनीं माझ्या एका गांवांत मशाली लावून येऊन सर्व गांवकऱ्यांच्या झोंपेचा मोड केला. मीं या संबंधें योग्य त्या

ठिकाणीं तक्रार केली आहे. निकाल अद्यापि समजला नाहीं. माझें मक्तेकरी कूळ झाडामागें मला सालिना चार आणे देऊन त्याचीं फळें भाताबरोबर खावयास घेई. परंतु आतां दर झाडामागें ९ रुपये कर त्यास द्यावा लागतो कांहीं वेळ ११ रुपये द्यावे लागतात व ते सुद्धां पांच पन्नास झाडांकरितां."

"अबकारीच्या कडक कायद्यांमुळें रोजची खाण्याची वस्तु नाहींशी होऊन या हातांनीं मिळवून दुसऱ्या हातानें तोंडांशीं नेऊन खाणाऱ्या गरीब लोकांस भलत्याच जातीच्या मादक पेयाचें सेवन करावें लागतें. वास्तविक मादक पेयांचा प्रसार बंद झाला पाहिजे व साधारणपणें निरुपद्रवी अशा पेयांच्या प्रसाराला आळा बसला पाहिजे. हिंदुस्थान सरकारचा एक खलिता सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इन्डिया इन् काउन्सिल यांस मागें गेलेला आहे त्यांत असें म्हटलेलें आहे कीं नारळ व त्यासारख्या उत्पन्नाच्या झाडांवर कर बसविला असेल तर त्याच्या फळावर शिवाय कर बसवूं नये. आज आम्हीं महुड्याशीं गेलों, उद्यां खाजुरीशीं जाऊं किंवा उंसाच्या रसाशीं जाऊं. मला वाटतें अबकारी खात्यानें आपल्या गुटिका सेवन करतां करतां त्या सरल्यामुळें गुटिका ठेवण्याचा डबाच आतां गिळण्याचा विचार चालविला आहे. तसें करण्याची माझी तयारी नाहीं. मी पहिल्या वाचनाच्या विरुद्ध मत देत आहें."

२८ जुलई १८८२ रोजीं नामदार गव्हर्नर साहेबांनीं दुसरें वाचन केलें. तेव्हां रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांश:—

"या कायद्याचे वाचनाचें काम प्रत्यक्ष गव्हरनर साहेबांनीं स्वतां हातीं घेतल्यामुळें मला सविस्तर भाषण करावें लागत आहे."

"या कायद्यांत कांहीं फेर बदल करावयाचा असतां दोहोंकडे लक्ष दिलें पाहिजे—सरकारच्या महसुलाकडे व बहुजनसमाजाचीं डोकीं शुद्धीवर सदोदित राहावीं हा जो सरकाराचा खरा हेतु आहे त्याकडे. एव-

ह्याकरतां फार मादक पेयांच्या प्रसाराला आळा बसला पाहिजे व ताडी सारखीं मद्यें (जीं फेंसाळलीं नाहींत तीं निरुपद्रवी असतात व फेंसाळलीं म्हणजे अपाय करतात तीं ) फुकट मिळावीं अर्थात झाडांचे मालकास फुकट मिळावीं व तीं फेंसाळल्यावर विकण्याची बंदी शक्य तितकी व्हावी."

"जातीच्या बंधनामुळें व शिक्षणाच्या संस्कारामुळें कोणत्याही मादक पेयाला शिवण्याचा मला प्रसंग आला नाहीं. तेव्हां ताडी ही काय वस्तु आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें मला सांगतां येत नाहीं. परंतु नुसती स्वच्छ ताडी ही निरुपद्रवी आहे अशाविषयीं कांहीं व्याख्यानें कालेजांत असतां ऐकावयास मिळालीं होतीं. मागल्या कायद्याच्या वेळीं याच काउन्सिलांत नामदार सोराबजी शापूरजी बेंगाली यांनीं सांगितलें कीं ताडी ही निरुपद्रवी आहे. आणि जर चोरून तिची विक्री कोठें होणें शक्य आहे तर तें तिच्यावरील कर वाढवल्यानेंच होय. एकदां कायदा करण्यांत आला कीं त्याची अंमल बजावणी शक्य तितक्या कडकपणें करूं नये असें ह्मणावयाला मी येथें आलों नाहीं. किंवा येथून दुसरीकडे गेलों तरी ह्मणणार नाहीं. परंतु आम्हीं जर केलेल्या कायद्यामध्यें फरक करीत आहोंत व सर्वांमुखीं ताडी ही निरुपद्रवी आहे व पौष्टिक आहे असें ठरत आहे तर या कायद्याची अंमल बजावणी कडकपणें करूं नये असें मीं ह्मटलें तर योग्य होईल. मला स्वतांला महुडाच्या फलांविषयीं देशांत प्रवास करीत असतां अनुभव कोठें आला आहे? मी लोकस्थिति कोठें पाहिली आहे? अशी टीका वर्तमानपत्रांत माझें मागील भाषण झाल्यावर चालली होती. मागें एक-जण—मला वाटतें नामदार ॲशबर्नर—ह्मणाले कीं महुड्याचा खाण्याच्या कामीं फारसा उपयोग करण्यांत येत नाहीं. परंतु आतांच नामदार गव्हर्नरसाहेबांचें जें भाषण झालें त्यानें तशी समजूत होत नाहीं. 'मोहाच्या फळांना व फुलांना खाण्याचे पदार्थ या

नात्यानें पुष्कळ ठिकाणीं महत्व प्राप्त झालें आहे.' असा उल्लेख मि. एल्फिन्स्टन यांनीं आपल्या इतिहासांत केला आहे. मि० हॅरिन्गटन यांनीं गुजराथ प्रांतांतील रेव्हिन्यू सर्वे सुपरिंटेण्डेन्ट यांस लिहिलेल्या पत्रांत असेंच म्हटले आहें. तसेंच मत खानेसुमारीच्या व फॅमिन कमीशनरच्या रिपोर्टांत सांपडतें."

"दारुबाजीच्या वाढीबद्दल नामदार गव्हर्नर साहेबांनीं जे आंकडे सादर केले ते फार उपयोगी आहेत. खालच्या वर्गाच्या लोकांच्या पानासक्तीविषयीं पुष्कळ माहिती दिली आहे. उच्च वर्गांतील लोकांत जी पानासक्ति वाढली आहे ती सुद्धां खेदकारक आहे. हा दोष अबकारी खात्याचा नव्हे. १८१९ सालीं नामदार एल्फिन्स्टन साहेबांनीं गव्हर्नर जनरल यांस पुढें दिल्याप्रमाणें रिपोर्ट केला होताः—'खालच्या वर्गांतील लोकांचें जें मुख्य दारुबाजींचें व्यसन असतें तें महाराष्ट्रांत आढळत नाहीं त्यामुळें तेथील लोकांची नीति चांगली राहिली आहे. हा सर्व मादक पेयांच्या विक्रीला उत्तेजन न देण्याचा सुपरिणाम आहे. व या बाबतींतलें सरकारी उत्पन्न थोडेंच असल्यामुळें आम्हीं जर मादक पेयांची विक्री बंद केली तर फार बरें होईल.' लोकमत, जातीचा निर्बंध व बहिष्काराची भीति या महाशक्ती आहेत. कर्नाटकांत तर प्रत्येक जातींत नीतिमार्ग सोडणाऱ्याचे शास्ते गणाचारी ह्मणून आहेत. परंतु हल्लीं जर कोणी पुण्याच्या स्थितीकडे पाहील तर दारूबाजी भयंकर प्रमाणांत वाढलेली दिसेल. एक दोन वर्षांपूर्वींच एक जिल्हा कोर्टांत वकीली करणारे गृहस्थ दारूच्या पायीं मृत होऊन दुष्कीर्तिकारक मंदिरांत पडलेले सांपडले. अशी गोष्ट वीस वर्षांपूर्वीं घडून आली असती तर समाजांत फार खळबळ उडाली असती परंतु आतां असल्या गृहस्थाकडे लोक उदासीन दृष्टीनें बघत आहेत! लायसेन्स दिलेल्या पुण्यांतील दुकानांची माहिती नामदार गव्हर्नर साहेब मागवतील तर ती पहा-

ांच ते आश्चर्य चकीत होतील. दारू गाळण्याच्या भट्ट्यांची संख्या कमी केल्याचें वृत्त कळल्यावर दारूचे परवाने व दारूची दुकानें कमी करण्यास अबकारी खात्यानें प्रवृत्त झालें पाहिजे. मला या काउन्सिलांत माझें कर्तव्य बजावण्याची काळजी लागलेली असते. तें करीत असतां जें मला सिद्ध करतां येणार नाहीं, तें मी बोलत नाहीं. आमच्या एका बाजूला लोकांच्या टिकेचा भोंवरा आहे व दुसऱ्या बाजूला खात्याच्या तरफदारीचा भोंवरा आहे. त्या दोहोंत ओढलें जाऊन बुडाल्याशिवाय आमचें तारूं मधूनच हांकारावें लागतें. एवढा वादविवाद होतो तो होतां कामा नये. निष्फल होईल तर मुळींच न करणें बरें व आमच्यापुढें जे कागदपत्र ठेवण्यांत येतात त्यांस न शिवणें बरें. ताडी हें मद्य स्वस्त करतां येईल कीं नाहीं हें पहावें अशी मी सूचना मागें केली होती ती आतां करीत आहें. गरीब लोकांचे महिन्याचे कांहीं आणे वाचले तरी ते त्यांना भारी आहेत. श्रीमन्त लोक आपले खर्च संभाळण्यास समर्थ आहेत व आपलें म्हणणें ऐकावयास लावण्यास समर्थ आहेत. ज्यांस असें करतां येत नाहीं त्या गरीबांच्या प्रश्नाचीच आपण चर्चा करीत आहोंत."

नंतर रावसाहेबांनीं कांहीं सूचना आणल्या. "पहिला दुसरा अथवा तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट हे शब्द" पहिला व दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेट या शब्दांबद्दल घालावे असा या कायद्याच्या दुसऱ्या कलमाचा आशय दिसतो. मला तें मान्य नाहीं. "तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट" हे शब्द गाळावे. या सुचनेस बहुमताची पुष्टि मिळाली नाहीं.

"३५, ३७ अथवा ४० या कलमाप्रमाणें कोणाला पकडण्यांत आलें अथवा कांहीं वस्तू जप्त करण्यांत आल्या तर त्यासंबंधीं तपास व गुन्ह्याची चौकशी करून शिक्षा करणें इ० गोष्टी फौजदारी कायद्याप्रमाणें करण्याचे अधिकार कांहीं विशिष्ट अबकारी खात्यांतील अधिकाऱ्यांस असावे" हें

जुन्या ४१ कलमांबद्दल घालण्यास काढलेलें नवें कलम मला मान्य नाहीं. अबकारी खात्यांतील गुन्ह्यांची वासलात लावण्याचें काम दुसऱ्या खात्याकडे असलें पाहिजे. घडलेल्या गुन्ह्यांचें काम पोलीसच्या स्वाधीन केलें पाहिजे. ”

नामदार गव्हर्नर म्हणाले जंगल खात्यांतील अधिकाऱ्यांस अबकारी खात्यांतील अधिकाऱ्यांपेक्षां अधिक मोठे अधिकार दिलेले आहेत. रावसाहेब म्हणाले हें तत्त्व मला मान्य नाहीं असें दुःखानें म्हणावें लागतें.

ता. २८।७।१८८२

## स्थानिक स्वराज्याचा कायदा.

पूर्वीं लोकलफंडाची व्यवस्था स्थानिक कमिट्यांकडे सोंपविलेली होती. ह्या कामांत चांगलें यश आल्यामुळें स्थानिक कामाकरतां हातांत असलेल्या फंडाच्या रकमेची व्यवस्था करण्यांत स्थानिक कमिट्यांस अधिक स्वातंत्र्य देण्याचा बेत करून स्थानिक कमिट्यांच्या रचनेंत व त्यांस दिलेल्या अधिकारांत सुधारणा करण्याकरतां सरकारनें १८८३ सालीं स्वराज्यविषयक कायद्याचा मसुदा काउन्सिलांत आणला. त्याचें पहिलें वाचन नामदार पील यांनीं केलें. तेव्हां रावसाहेबांनीं भाषण केलें त्याचा सारांशः—

“ या मसुद्याच्या हेतुपत्रकांवरून पाहूं गेलें असतां जितकी सुधारणा जुन्या कायद्यांत होईल असें अनुमान निघतें तीहून अधिक सुधारणा करण्याचें नामदार पील यांनीं योजिलें आहे म्हणून मी त्यांचें अभिनंदन करितों. मला फक्त मसुद्याच्या सोबत कागदपत्र जोडलेले आहेत त्यांसंबधें व खुद्द कायद्याच्या मसुद्यासंबधें बोलावयाचें आहे.”

“ या कायद्याचे दोन भाग आहेत ( १ ) लोकलबोर्डांची रचना व ( २ ) त्यांची नियामक सत्ता. मुंबई सरकारच्या १८६९ च्या तिसऱ्या कायद्यांत सुधारणा करून लोकलबोर्डावर टाकिलेल्या जबाबदारींची

कामें त्यांस नीट करतां यावीं म्हणून आतां, पहिल्यानें प्रयत्न करण्यांत येत आहे, या दृष्टीनें लोकलबोर्डाच्या रचनेसंबंधानें जीं कलमें आहेत त्यांतील कांहीं अपवादात्मक आहेत तीं सोडलीं असतां बाकीचीं कलमें प्रातिनिधिक तत्त्वाचें अधिक अवलंबन व्हावें अशी जी कमी अधिक लोकांची मागणी चालली आहे तिला अनुकूल आहेत. परंतु नियामक-सत्तेविषयीं जीं कलमें आहेत तीं वरील कलमांनीं साध्य होणाऱ्या प्रगतीची पिछे हाट करणारीं आहेत. पश्चिम हिंदुस्थानांतील स्वार्थत्यागी व स्वतां परिश्रम करण्यास उद्युक्त असलेल्या लोकांची हिंमत खचवणारीं आहेत. हा प्रकार पुढील दरवाजा बंद करून शत्रूस मागील दरवाजानें आंत घेण्यासारखा आहे."

"स्थानिक स्वराज्याचें सार कशांत आहे ? निरनिराळ्या खात्यांमार्फत सरकारनें चालविलेल्या देशाच्या राज्यकारभाराशीं विरोध केल्याशिवाय आपलीं अंतर्गत कार्यें आपणच स्वेच्छेनें करण्यांत आपलें नैतिक व बौद्धिक सामर्थ्य चालविण्याची लोकांची वास्तविक सत्ता म्हणजे स्वराज्य असें मी समजतों. अशा स्वराज्याची योजना म्हटली म्हणजे त्याच्या कारभारांत लोकांचें अंग शक्य तितकें पुष्कळ ठेऊन त्यावर सरकारी अधिकाऱ्यांची नियामक सत्ता शक्य तितकी कमी ठेविली पाहिजे; परंतु बराचसा समजुतीचा घोटाळा असें होऊं देण्याच्या आड येत आहे. आपल्या हातीं असलेले फंड स्थानिक लोकोपयोगी कामांत खर्च करण्यास लोकांस अधिक स्वातंत्र्य द्यावयाचें म्हणजे लोकांस अगदीं तलहीन गर्त्यांतून उचलून जणुं काय स्थानिक स्वराज्याच्या शिखरावर नेऊन आतां एकाएकीं ठेवावयाचें आहे, अशी कांहींची समजूत आहे, व स्थानिक स्वराज्यांत जितकें स्वातंत्र्य असतें तितक्या नियमित स्वातंत्र्याच्या प्राप्तीला आम्हीं अयोग्य आहोंत, अशी कांहींची समजूत आहे. पहिली समजूत मनोहर वाटली तरी चुकीची आहे असें निराळें सांगावयास नको. दुसरी समजूत निराधार आहे.

आम्हीं स्वराज्याला लायक नाहीं अशी ज्या मुत्सद्यांची कल्पना असेल त्यांस साधारणतः हिंदुस्थानच्या इतिहासाचें आणि विशेषतः पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासाचें ज्ञान नाहीं. बराच काल जर एकाद्या मानसिक अथवा शारीरिक शक्तीचा अनुपयोग होऊं दिल्यानें त्या त्या शक्तींचे जनक अवयव अंशतः क्षीण होतात हें मला मान्य आहे; परंतु वरील शक्तींचा उपयोग करून घेण्याच्या कामीं जर जरा आस्था दाखविण्यांत येईल तर नैराश्यावर आशेचा पगडा बसण्यासारखी आमची स्थिति अद्यापि आहे अशी माझी खात्री आहे. देशाच्या कारभारांत सतत लक्ष घालून श्रम केले असतां नैतिक व बौद्धिक बलाची भराभर वृद्धि होते हा नियम राष्ट्रास व व्यक्तींस लागू आहे. असा इतिहासज्ञांस अनुभव येतो. आम्हांस प्रथम सर्वच कामांत पूर्ण यश येणार नाहीं. तथापि पुढें आमच्या हातून चांगली कामगिरी होणार नाहीं सबब स्थानिक स्वराज्याची वृद्धि होणार नाहीं अशी शंका सुद्धां मला वाटत नाहीं."

"१८६२ सालीं ना. लँग, हे गव्हर्नर जनरल यांच्या काउन्सिलांत म्हणाले कीं स्थानिक लोकोपयोगी कामाकरतां स्थानिक कर बसवावे हें तत्त्व मला मान्य आहे. ××× मुख्य राजधानीकडे प्रत्येक कामाकरतां लोकांस बघत ठेवण्याची संवय मोडणें व ज्या गोष्टी लोक स्वतांच फार चांगल्या रितीनें करूं शकतील त्या त्यांच्या त्यानांच करावयास शिकविणें हें फार महत्वाचें आहे. १८६४ च्या हिंदुस्थान सरकारच्या २२४५ नंबरच्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं कित्येक शहरांची वाढ झपाट्यानें होत आहे म्हणून म्युनिसिपॅलिट्यांची स्थापना करून लोकांचीं कामें त्यांच्याकडेसच सोपविलीं असतां मोठाले मोठाले फायदे होणार आहेत. आपला स्थानिक कारभार करण्याचा अधिकार आपल्याच हातांत आहे असें समजलें म्हणजे बुद्धिवान् लोक तो कारभार करण्यांत पुढाकार घेतील व सरकारच्या तोंडाकडे पाहिल्या-

शिवाय तो कारभार चालवूं असा लोकांत आत्मविश्वास उत्पन्न होईल. अवसर प्राप्त झाला असतां तीं कामें करण्याची पूर्ण लायकी या देशांतील लोकांची आहे. नागरिकांच्या कर्तव्याची जाणीव लोकांच्या मनांत खोल भिनलेली आहे. हिंदुस्थानांतील ग्रामसंस्था या स्वतंत्र संस्थानाप्रमाणें स्वावलंबी संस्था होत. एकामागून एक परकीयांच्या स्वाऱ्या टोळधाडीप्रमाणें हिंदुस्थानदेशावर झाल्या परंतु समाजाची रचना या ग्रामसंस्थांनीं ढासळूं दिली नाहीं. शहरांमध्यें लोक पेठांतून वसति करतात, व्यापारी संघ बनवतात, पंचायतींची स्थापना करतात व संभूयश्रेणीकार्य करण्याची योग्यता दाखवितात. ब्रिटिश हिंदुस्थानांत आतां म्युनिसिपॅलिट्यांची स्थापना करावी लागणार. शहरसुधराईची कामें करण्यास सरकाराजवळ पृथक् पृथक् खर्च चालविण्यास पैसे शिलकींत नसणार व तीं कामें करून घेण्यास अवश्य ती मनुष्यसामग्री नसणार म्हणून आम्हांला जें अद्वितीय पद प्राप्त झालें त्याच्या योगानें आम्हीं एक कर्तव्य करण्यास उद्युक्त झालें पाहिजे तें कोणतें तर लोकांनींच आपल्यावर कर बसवून त्याचा उपयोग त्यांचीं कामें त्यानांच करूं देण्याचा अधिकार त्यांस देऊन टाकावा अशी इच्छा धरणें होय. ”

रावसाहेब पुढें ह्मणालेः—हीच नीति लार्ड बेंटिंक यांची होती. लॉर्ड ऑक्लंड व लार्ड कॅनिंग यांची होती. ह्मणूनच त्यांनीं आपल्या उदार नीतितत्त्वांस मूर्तस्वरूप देण्याकरतां पांच लक्ष पौंड स्थानिक सरकारास रस्ते वगैरे सार्वजनिक लोकोपयोगी कामाकरितां खर्च करण्यास वर्षास देण्याचें ठरविलें. या कृत्यास सहायभूत असे कोण होते ? तर व्हाईसराय सर जॉन (नंतर लार्ड) लारेन्स, काउन्सिलचे सभासद नामदार सर रावर्ट ( नंतर लार्ड ) नेपियर आफ मॅगडाला, नामदार हॅरिंगटन; नामदार एच. एस. मेन व सर चार्लस ट्रेव्हालियन इत्यादि मोठमोठे लोक होते. त्यांनीं जी योजना केली होती ती अर्थातच पूर्ण विचार करून केलेली

होती. याविषयीं दुसरे कोठून दाखला आणावयास नको. नागरिकांकडे नगरांची अंतस्थ व्यवस्था विश्वासानें सोंपविण्याचें काम यांनीं करण्याचें योजिलें ह्मणजे या देशांतील ब्रिटिश राज्याचा पाया भरभक्कम करण्याचा उपाय योजिला असें ह्मटलें पाहिजे."

"नंतर १८६९ चा तिसरा कायदा ह्मणजे लोकलफंडाचा कायदा झाला त्यावेळेस सर बॅरो एलिस ह्मणाले. 'हा कायदा करण्याचें कारण काय? तर लोकांचा विरोध; ह्मणजे स्व-तंत्रानेंच वागण्याचा बाणा होय. कायद्यानें भाग पाडल्याशिवाय लोक स्थानिक गरजा भागविण्याकरितां एक रुपयाही देण्यास खुषी नाहींत. तेवढ्याकरतां स्थानिक कमिट्यांची स्थापना करणें व लोकांस आपल्या अंतर्गत स्थानिक कारभार करण्याची गोडी लागून नागरिकांचीं कामें आपण होऊन लोकांनीं करावीं व सरकाराच्या शिरावरचें ओझें कमीं व्हावें हा या कायद्याचा एक हेतु आहे. शिक्षणाच्या मार्गें व पोलिस ठेवून संरक्षणाच्या मार्गें प्रजेचें हित करण्याकरतां पैसे लागतात. ते सरकारनें कोठले आणावयाचे? बरें पैसे न आले तर वरील गोष्टी मुख्य सरकारानें कशा साधाव्या? ह्मणून अवश्य तो पैसा उत्पन्न करावयाचा हा दुसरा हेतु आहे."

याप्रमाणें स्थानिक स्वराज्य लोकांस देण्याच्या तर्फें पूर्वीं सरकारी अधिकाऱ्यांचें मत काय आहे तें सांगून रावसाहेब पुढें ह्मणाले:-१८७१ सालीं नार्थवेस्ट प्राव्हिन्स मधील लेफ्टनंट गव्हर्नर कलकत्याच्या काउन्सिलमध्यें ह्मणाले.-येथें काउन्सिलची स्थापना कां करूं नये? त्याच्या स्थापनेची सर्व तयारी येथें आहे. सरकारी अधिकाऱ्यांस काउन्सिलास साहाय्य करण्यास येथें पुष्कळ स्वतंत्र मताचे हिंदी लोक आहेत.

अध्यक्ष, नामदार गव्हर्नर साहेब ह्मणाले:—प्रातिनिधिक पद्धतीच्या काउन्सिलाच्या स्थापनेविषयीं हें बोलणें विषयाला सोडून नाहीं काय? कौन्सिलाच्या स्थापनेचा प्रश्न आमच्यापुढें चर्चेला नाहीं. हातीं घेतलेल्या

कायद्यांच्या बाहेर वरील विषय आहे. अशारीतीनें प्रस्तुत विषयाला सोडून बोलूं लागलें ह्मणजे वादविवाद अमर्याद रीतीनें वाढेल.

रावसाहेबः—एक क्षणभर विषयांतर करण्याची माझी इच्छा नाहीं. बारा वर्षांपूर्वी नार्थवेस्ट प्राव्हिन्स मधले लोक काउन्सिलचीं कामें करण्यास लायक आहेत असें प्रतिपादन करण्यांत आलें व आम्हीं पश्चिम हिंदुस्थानांतील लोक तेव्हांच सर्वांत पुष्कळ पुढें गेलेलों होतों असें पुढें असलेल्या कागदपत्रांवरून दिसतें व आतांतर आणखीं पुढें गेलेलों आहोंत म्हणून माझें म्हणणें असें आहे कीं आजच्या सारखे कायद्याचे मसुदे काउन्सिलपुढें आले असतां आज जेवढे स्थानिक स्वराज्याचे हक्क द्यावे अशी मूळ योजना आहे तीहून अधिक हक्क देण्याचें निवडक कमिटींतील मंडळीनें पहावें हें उचित आहे. इतकेंच माझें म्हणणें आहे.

" नार्थ वेस्ट प्रॉव्हिन्सच्या लेफटनंट गव्हर्नर साहेबांनीं केलेल्या उपक्रमाची स्तुति करतांना लार्ड मेयो म्हणाले कीं सुराज्याचें बीं ज्या संस्थांच्या स्थापनेंत रुजत पडलें त्या संस्था स्थापण्यांत घेतलेले परिश्रम व खर्च केलेला काळ हीं श्रेष्ठ प्रतीचीं होत. या तत्त्वाला अनुसरून जेथें व जेव्हां कलेक्टरांनीं ( अध्यक्ष म्हणून काम करीत असतां ) लोकांचें साहाय्य मागितलें तेथें व तेव्हां ते लोकांनीं दिलें आहे. पण जेथें लोकांवरच त्यांनीं स्वारी करण्याचा प्रयत्न केला तेथें कांहीं केलें नाहीं कारण ते करूं शकले नाहींत. १८७५ सालीं सप्तवार्षिक जमाखर्चाची पद्धति सुरू करण्यांत आली तेव्हां तालुका कमिटीचें अस्तित्व ( जें नांवाचेंच होतें तें) नष्ट झालें. स्थानिक करांच्या रूपानें जमविलेला त्यांचा पैसा मुख्य सरकाराच्या देशांतील दळणवळण वाढविण्याच्या कामीं लावलेला लोकांनीं पाहिला. तें त्यांस आवडलें नाहीं. १८७२ सालीं जें हिंदुस्थानांच्या प्रगतीवर ब्लूबुक पार्लमेंटनें प्रसिद्ध केलें आहे त्यांत स्थानिक स्वराज्याची संवय लोकांस जडत आहे असें म्हटलें आहे. नार्थ वेस्ट प्राव्हिन्स व सिंध

मध्यें लोकांना आपला अध्यक्ष निवडण्याची मुभा दिलेली आहे. मद्रासच्या कायद्यांत तशी मुभा देण्याची सोय केलेली आहे. त्याचा निर्देश करून स्थानिक कराला चंगीची म्हणजे मुष्टिफंडाची (व्यापाऱ्यांना माल विकतांना त्यांतून फंड द्यावा लागत असे त्याची) उपमा दिलेली आहे. तिचा उद्देश स्थानिक कार्याकरतां स्थानिक कर देणें हें लोकांच्या परिचयातलें आहे असें सांगणें होय. एथपर्यंत हें स्थानिक स्वराज्य चालविण्याची या देशांतील लोकांची लायकी आहे. या मताविषयीं एकवाक्यता दिसून येत आहे व ती लायकी बदलून गेली आहे असें आढळण्यांत नाहीं. आतां भिन्न भिन्न इलाख्यांतील लोकांच्या हातून कशी काय कामगिरी झाली तें पाहूं."

"हाउस ऑफ कामन्सच्या हुकुमावरून स्टेट सेक्रेटरी, हिंदुस्थानसरकार व स्थानिक सरकार यांच्यामध्यें वरील विषयावर झालेल्या पत्रव्यवहाराचे उतारे १८८३ सालीं प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांत भिन्न मतांचा प्रकाश पडलेला आहे. त्यांतून कांहीं मूल्यवान माहिती दृष्टोत्पत्तीस येते. तींत भिन्न भिन्न अधिकाऱ्यांनीं भिन्न विभिन्न मतें प्रदर्शित केलीं आहेत. सिंधच्या कमीशनरचें मत असें पडलें आहे कीं 'स्थानिक स्वराज्याचें काम करण्यालायक बुद्धिमान् लोक जागोजाग आहेत. त्यांस फक्त उत्तेजन दिलें पाहिजे. सप्तवार्षिक जमाखर्चाचा अंदाज खर्डा अगोदर निश्चित करण्याची पद्धति सुरूकेल्यानें तालुका कमिट्यांस कांहीं करावयाचें उरलें नाहीं.' त्यांनीं पुढें असें म्हटलें आहे कीं, 'म्युनिसिपॅलिट्यांवरची व लोकल फंडावरची सत्ता सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं वाजवीपेक्षां फाजील प्रमाणांत आहे. कांहीं म्युनिसिपॅलिट्या सोडून दिल्या म्हणजे उरलेल्या नांवाच्याच आहेत; अहमदाबादच्या कलेक्टर साहेबांचें मत असें आहे कीं 'मसलत विचारण्यासारखे गांवोगांव लोक आहेत. त्यांचें अंग सार्वजनिक संस्थांत ठेवलें तर लोकांमध्यें सार्वजनिक कल्याणाचीं कामें करण्यास चांगली जूट होण्याची आशा आहे' सुरतेचे कलेक्टर ह्मणतात कीं 'हल्लींच्या शर्तींवर

लोकांना शिक्षणाच्या कामांत भाग घेण्यास सांगणें व्यर्थ आहे. कमि-ट्यांच्या हातांत कांडी एवढी सत्ता ठेवलेली नाहीं. तेव्हां लोक शाळांचें दर्शन घेत असले तर ते घेतात अधिकाऱ्यांच्या जुलुमानें ! अर्धवट विश्वास टाकल्यानें आमचे प्रयत्न सफल होण्याची आशा करा-वयास नको.' म्हणून मीं म्हणतों कीं कमिट्यांच्या हातीं कारभार देऊन उत्पन्नांतील नियमित भागावर पूर्ण सत्ता द्यावी व मग कडकपणें पण न्यायानें त्यांच्याशीं वागावें."

"पुष्कळ सार्वजनिक पैसा लोकांच्या संमतिशिवाय खर्च केल्याचीं उदाहरणें कुलाब्याच्या कलेक्टरांनीं कथन केलीं आहेत. सार्वजनिक सेवा करण्याची हौस सरकारी अधिकाऱ्यांच्या सत्तातिशयानें कशी चेंग-रून गेली आहे त्याचीं उदाहरणें सदरहू रिपोर्टांत आहेत. त्यांचें वर्णन करून नाशिकच्या कलेक्टरांनीं लोकांच्या हातीं अधिक सत्ता देण्याची जरूर आहे असें मत दिलें आहे. साताऱ्याचे कलेक्टर म्हणतात 'खर्चाचा खर्डा सालोसाल या कमिटी पुढें येतो. त्याचें स्वरूप अगदीं आगाऊ ठरवून ठेवलेलें असतें. कमिटीनें नुसती मंजुरी कांहीं एक फेरफार केल्या-शिवाय बिनतक्रार द्यावयाची असते. पूर्वीं पंचवार्षिक खर्डा असे. आतां सप्तवार्षिक झाला आहे. तालुका कमिट्यांस कांहीं कामच उरलें नाहीं. तेवढी दशा मात्र जिल्हा कमिट्यांची झाली नाहीं.' इतकें सांगून हे अधिकारी याच्यापुढें जें बोलले त्याच्या योगानें आपणाशींच विरोध करूं लागले असें दिसतें. कारण हे पुढें म्हणतात 'वरील सार्वजनिक संस्थांनीं आपण काय कामगिरी करूं शकतों तें अद्यापि आम्हांस करून दाखविलें नाहीं. याकरतां त्यांस अधिक अधिकार देण्याची माझी तयारी नाहीं.' लोकांनीं कर्तबगारी कां दाखविली नाहीं किंवा कोणी त्यांना दाखवूं दिली नाहीं इ० सांगत बसण्याच्या प्रकारापासून—एकाद्या अप्रिय गोष्टी निवेदन करण्याच्या नादापासून अलिप्त

राहिल्या प्रमाणें—ते अलिप्त राहिले. परंतु यांचेच असिस्टन्ट (मि. लिवार्नर) ह्मणतातः—'कांहीं निश्चित स्वरूपाची जबाबदारी तालुका कमिट्यांवर टाकून स्थानिक कराचा अंश—मग तो किति कां लहान असेना—त्यांच्या वांट्यास घालून त्यांचा बचाव केला पाहिजे.' स्थानिक उपयोगाची कामें बाजूला सारून मोठमोठ्या योजना अमलांत आणतांना तालुका कमिट्यांचें सरकारनें कसें चालूं दिलें नाहीं, त्याचें वर्णन सातार्‍याचे असिस्टंट कलेक्टर मि. लिवार्नर यांनीं फार चांगलें केलें आहे व सांगितलें आहे कीं 'म्युनिसिपॅलिट्यांसारख्या संस्थांस अधिक स्वतंत्रता दिली पाहिजे व सुधारणेच्या नांवाखालीं त्यांच्या कामाकाजांत ढवळाढवळ करतां उपयोग नाहीं. थोडीशी जबाबदारी तालुका लोकलबोर्डावर टाकून कांहीं वसुलाची रक्कम त्यांच्या स्वाधीन केली पाहिजे. ह्मणजे तालुका कमिट्यांचा नाश होणार नाहीं.' हिंदुस्थान सरकार जो जुन्या कायद्यांत मोठा फरक करणार आहे त्याकडे आपल्या अंमलाखालील प्रांताच्या आरामस्थानावरून दृष्टि टाकून आश्चर्य प्रकट करतांना खानदेशच्या कलेक्टरांची कल्पना उघड अशी झाली असावी कीं सरकारी अधिकार्‍यांचा जो वर्ग आहे त्याला हिंदी लोकांविषयीं माहिती दुसर्‍या कोणत्याही वर्गापेक्षां—मला वाटतें खुद्द हिंदीलोकांपेक्षां—अधिक आहे. हेच कलेक्टर पुढें ह्मणतात 'शिक्षण वाढत आहे. त्याबरोबर सार्वजनिक कामाची हौस असलेला सुशिक्षितांचा वर्ग निर्माण होत आहे. त्याचें साहाय्य लोकोपयोगार्थ न घेणें ह्मणजे उपलब्ध असलेल्या एका मोठ्या शक्तीचा व्यर्थ नाश करण्यासारखें आहे, असें जें हिंदुस्थान सरकार आपल्या ठरावांत ह्मणतें त्यांत चांगलें धोरण दिसून येत नाहीं. या सुशिक्षितांच्या वर्गानें काय दिवे लावले कोणाला ठाऊक! त्यांचा उजेड अजून शेतकीवर पडला नाहीं. कांहीं धंदा नसेल तर हा सुशिक्षितांचा वर्ग शेतकीकडे वळतो. प्रथम सरकारी नोकरी धुंडतो. न मिळेल तर वकील होतो. मुखत्यारी बघतो अथवा कारकुनी मिळ-

वितो व मोठाल्या शहरांत कांहीं धंदा काढतो. तो शेतें पिकवीत नाहीं व खेडेगांवांत रहाण्याचें त्याहून करीत नाहीं. ह्मणून शिकलेले व सार्वजनिक कामांत हौस बाळगणारे लोक आम्हांस लोकल बोर्डाकरतां मिळतांना मारामार पडेल.' पुढें रावसाहेब ह्मणालेः—" हे कलेक्टर साहेब जरा थांबते तर रत्नागिरी जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं त्यांस परस्पर उत्तर दिलें असतें. बोर्डाच्या कामाकडे सभासदांचें लक्ष लागावयास पाहिजे असेल तर त्यांस अधिकाऱ्यांच्या ताब्यांतून मुक्त केलें पाहिजे. त्यांना जर तोंड असून कांहीं बोलूं दिलें नाहीं तर आमचा हेतु साधणार नाहीं. तेथींल असिस्टन्ट कलेक्टर ह्मणतातः—'बोर्डाचें सारें काम मामलेदार करतो. आपल्या गांवच्या कांहीं अडचणी दूर होतील ह्मणून सोयीस्कर योजना सुचविण्यापलीकडे सभासदांस कांहीं करतां येत नाहीं. कमिटीनें सभेला सुचना कराव्या व वर्षानुवर्ष त्या अमलांत न याव्या हें पाहून लोकांना उगीच बोलावून एकत्र जमविण्यास असिस्टन्ट कलेक्टरास लाज वाटूं लागते. सार्वजनिक कामांत लक्ष घालण्यास उत्तम माणसें मिळत नाहींत. त्यांच्या हातांत खरी सत्ता दिल्यास व त्याबरोबर आपलें कांहीं कर्तव्य आहे अशी जाणीव जर त्याच्या मनांत उत्पन्न करून दिली तर उत्तम माणसें उपलब्ध होतील.' यांत सर्वांची गुरूकिल्ली आहे. जेथपर्यंत सरकारी अधिकारी आपल्याच तंत्रानें त्यांस वागवूं पहात आहेत व त्यांच्या उत्साहाचा भंग करीत आहेत तेथपर्यंत जें काय होईल तें ते स्वस्थ बघत राहतील; लोकांच्या हातांत स्वतंत्र सत्ता दिल्यास त्यांस नेहमींच प्रत्येक कामांत यश येईलच असें नाहीं; अपयश हें कित्येक वेळां आलेंच पाहिजे; पण आपला कारभार आपण पाहण्याची त्यांस मोकळीक असली पाहिजे. १८७६ सालीं बेळगांवच्या कलेक्टरांनीं लिहून ठेविलें आहे कीं, दोन मोठाले प्रान्तिक रस्ते करण्याचे ठरलें. त्याकडे पांच लाखांची बेळगांव लोकलफंडाच्या रकमेंतून मंजुरी

मिळाली. अशा स्थितींत स्थानिक स्वराज्य नांवाचेंच उरणार हें उघड आहे. मी फिरतीवर गेलों आणि आमच्या विहिरी व तळीं दुरुस्त करा अशी ओरड माझ्या कानीं आली नाहीं असें केव्हांही होत नाहीं.' इतकें असून कलेक्टरास लोकांच्या मनाप्रमाणें खर्च करतां येत नाहीं. म्हणून या कलेक्टरांनीं अशी शिफारस केली आहे कीं, लोकलबोर्डानेंच सर्व खर्चाला प्रारंभ केला पाहिजे. कमीशनर साहेब म्हणतात 'या प्रांतांतील लोकलबोर्डांचे कायदे इतर प्रांतांतील कायद्यापेक्षां प्रगतिपर आहेत. तथापि त्यांची अंमलबजावणी कशी होत आहे तें पाहिलें म्हणजे आमचा प्रांत इतर सर्व प्रांतांपेक्षां मागसलेला आहे. तें पाहून कोणी ह्मणेल कीं येथें लोकल बोर्डच नाहींत व कोणी कर देणाऱ्याचें ऐकावयासही बसला नाहीं. जिल्हाकमिट्यांवर नियामक सत्ता कमीशनरांकडे ठेवलेली आहे. कोणतीही खर्चाची बाब ठेवणें अगर काढून टाकणें हें कमीशनराकडे आहे असें १८७३ च्या २३ डिसेंबरच्या ३४१ अ.-५८८ नंबरच्या सरकारी ठरावानें ठरविलें आहे. कमीशनर सरकारचें ऐकणार. त्याच्या हाताखालील कलेक्टर कमीशनरचें ऐकणार व कलेक्टरचें जिल्हा कमिट्या ऐकणार.' हे उतारे लोकल बोर्डांचा पूर्वेतिहास कथन करतात व स्वराज्याबद्दल आमच्या लायकी विषयीं जे शंका घेतात व अजून आम्हांला स्वराज्याचे धडे शिकावयाचे आहेत असें जे ह्मणतात त्यांस उत्तर देतात. आपण काफिरिस्थानाविषयीं अथवा हॉटेंटान्ट्स लोकांच्या देशाविषयीं बोलत नाहीं; परंतु ज्या देशाच्या इतिहासास अतर्क्य पुरातनत्व प्राप्त झालें आहे; ज्या देशामध्यें नियमित स्वरूपाच्या राज्यसंस्था स्थापन झाल्या होत्या; ज्यांत विविध व उत्कृष्ट वाङ्मयाचा प्रसार झालेला होता; षड्दर्शनें, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, गणित शास्त्र, ज्योतिष शास्त्र, शिल्पशास्त्र व ज्याच्या अस्तित्वाविषयीं भव्य व महारंभरचनायुक्त मंदिरें व जयस्तंभ साक्ष

देत आहेत तें वास्तुविद्याशास्त्र, हीं इतकीं ज्या देशांतील लोकांस पूर्ण विदित होतीं; ज्या देशांतील लोकांस ललितकला पूर्ण अवगत होत्या त्या देशांविषयीं बोलत आहों, याचा विसर जे लोक आम्हांस ( हिंदी लोकांस ) स्वराज्याचा अनुभव घ्यावयाचा आहे असें ह्मणतात त्यांस पडत आहे असें वाटतें. लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधीं-कडून राज्य चालविण्याची पद्धति आह्मांला ठाऊक होती इतकेंच नव्हे तर चवदाव्या शतकापर्यंत मागें पाहिलें तरी सुद्धां पश्चिम हिंदुस्थानच्या तीर-प्रान्तीं एका विस्तृत भूविभागावर चतुःसंख्याक वृद्ध सचिवांच्या मंडळा-कडे राज्यकारभार सोंपविलेला असे. मुख्य सचिवाची नेमणूक वार्षिक असे. आतां स्थित्यंतर झालें आहे. सत्तेच्या ज्या यंत्राशीं तुलना करावयास सुद्धां दुसरें यंत्र मिळणार नाहीं असें उत्तोलन यंत्र ब्रिटिश सत्तेच्या प्रस्था-पनें बरोबर येथें प्राप्त झालें आहे. अशा सुलक्षण काळांत सुद्धां आह्मांला पुष्कळ स्वराज्यविषयक शिक्षण मिळवावयाचें आहे. तें प्राप्त करून देण्याची सोय या कायद्यांत केलेली आहे काय ? जे या बाबतींत अत्याशा करीत असतील त्यांच्या मतांशीं माझें मत जुळणार नाहीं. जसा इतर राज्यप्रकाराचा तसा स्वराज्याचा रस्ता सरळ नाहीं. स्वराज्याची स्थापना दृढपणें केली पाहिजे, धैर्यानें व उद्योगसातत्यानें त्याचें रक्षण केलें पाहिजे. ग्रीस देशांतील डेल्फॉय येथील देवास कौल लावण्याच्या काला-पासून अथवा यमुना व गंगा यांच्या मधल्या प्रदेशांत बसति करणाऱ्या ऋषींच्या कालापासून स्वराज्याचा प्रश्न सोडविण्यास कठीण गेला आहे पण हिंदुस्थानांतील लोकांनीं फार परिश्रम घेऊन तो जसा सोडविला आहे व त्याचीं स्वरूपें जशीं ओळखलीं आहेत, तसा तो कोणी सोडविला नाहीं व तशीं त्याचीं स्वरूपें कोणास ओळखलीं नाहींत. स्वराज्याचा अर्थ जरा विस्तृत घेतला म्हणजे येथें आलेले महंमद पंथी लोक ( मुसलमान ) इतर समाजाशीं सहकार करूं शकतात.

त्यांस जसे ते धर्मवेडे आहेत असें येथपासून पार्लमेंतसभेपर्यंत वर्णिलें जातें तसे ते नाहींत असें मी उत्तर हिंदुस्थानांतील त्यांचें काम पाहून म्हणतों. स्वराज्य नीट चालविण्यास पुष्कळ काम करावें लागेल. सृष्टींतील महाशक्तींचें अनुकरण करावें लागेल. आतां पुढें आज जो कायद्याचा मसुदा आला आहे त्यांत जी योजना केली आहे तीहून अधिक उदात्त योजना करण्यास आमच्या लायकीचा अधिक पुरावा पाहिजे काय? हा प्रश्न एका अर्थी स्थानिक आहे. दुसऱ्या अर्थी राष्ट्रीय आहे. तो प्रश्न स्थानिक आहे कारण आजचा कायदा फक्त मुंबईइलाख्यापुरताच आहे. तो प्रश्न राष्ट्रीय आहे; कारण या योजनेचा परिणाम देशांतील बाकीच्या इलाख्यांवर व्हावयाचा आहे. आमच्या इलाख्याची प्रगति इतर इलाख्यापेक्षां अधिक झालेली आहे, असें आम्हांविषयीं प्रतिकूल, नव्हे अगदीं वाईट मत, बाळगणारा कबूल करील. मग आतां या कायद्याच्या मसुद्यांत मागसलेल्या इलाख्यांत चालू असलेल्या लोकलफंडाच्या कायद्याच्या कलमांचा उल्लेख कां करण्यांत आला आहे? मध्यप्रांतांतील कायद्यांतील कलमांची अवतरणें या कायद्यांत कां घेतलेलीं आहेत? या मध्यप्रांतांतील कायद्यांचा जन्मच १८८१ सालीं झाला आहे व त्यांतले मुकादम हे आतां नुकतेच निर्माण झालेले आहेत. परंतु आमच्याकडील देशमुख, नाईक, पाटील, नाद्गौडे इ० लोकांचें अस्तित्व वंशपरंपरागत आहे. हे मराठ्यांच्या राज्या पूर्वींचे आहेत व त्यांच्या अगोदर होऊन गेलेलीं जीं मुसलमानीं राज्यें त्यांच्याही अगोदरचे आहेत. असें असतां मागसलेल्या मद्रास इलाख्याच्या सरकारची मजल बोर्डाचे अध्यक्ष बिन सरकारी असावे असें विधान करण्यापर्यंत गेली आहे. उत्तर प्रांतांतील कायद्यांत तर बोर्डाच्या सभासदांनीं आपणच आपला अध्यक्ष निवडावा असें योजिलें आहे व बिनसरकारी सभासदांची संख्या एकंदर सभासदांच्या संख्येपेक्षां $\frac{3}{4}$ शाहून अधिक

नसावी असें योजिलें आहे. म्हणून मीं विचारतों आमच्या या प्रगतिपर-इलाख्यांत सरकारी अध्यक्षांची जरुरी आहे काय ? लोकल बोर्डांच्या कामांत जर स्वातंत्र्य देऊन लोकांना आपलें कर्तव्य करावयास शिकवावयाचें आहे तर माझे मित्र बद्रुद्दिन म्हणतात त्याप्रमाणें लोकलबोर्डांचे अध्यक्ष त्याच जिल्ह्याचे सरकारी मुख्य अधिकारी म्हणजे जे कलेक्टर त्यांस नेमण्याच्या पद्धतीचा त्याग केला पाहिजे. उत्तर हिंदुस्थानांतील लोकल बोर्डाच्या कायद्यांत अध्यक्ष सभासदांनीं निवडावे अशी योजना आहे. तशी आमच्या कायद्यांत पाहिजे."

नंतर रावसाहेब बोर्डावर नियामक सत्ता कोणाची असावी या विषयींचीं जीं कलमें आहेत त्याकडे वळले व म्हणालेः—"नियामक सत्ता सरकारकडे असली पाहिजे हें खरें आहे. ती सत्ता किति असावी म्हणजे सरकारनें म्युनिसिपॅलिटीच्या कामांत केव्हां हात घालावा हें प्रथम निश्चित करून ठेविलें पाहिजे. कारण म्युनिसिपॅलिट्यांस आपला कारभार कसा करावा याची योजना करण्यांत पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. ज्या म्युनिसिपॅलिटीस अशी स्वतंत्रता नसेल ती म्युनिसिपॅलिटीच नव्हे! तिला म्युनिसिपॅलिटी हें नाम घेऊन मिरवावयचा अधिकारच नाहीं! तिनें केवळ गांवकीचे पंच, पाटील इत्यादि निर्जीव अधिकाऱ्यांपुढें बढाई मारावी!"

"लोकल बोर्डाची कामें कोणचीं हें प्रथम निश्चित करून टाकलें पाहिजे व हीं कामें कोणतीं हें ठरवितानां ज्या तत्त्वांचा अंगिकार केला असतां कोणत्याही ( उष्ण किंवा थंड ) देशांत साम्राज्याचें लोकलबोर्डाशिवाय दुसऱ्या कोणत्याही खात्यास अपाय केल्याशिवाय मनुष्याच्या गुणांचा सर्व प्रकारें विकास होईल अशा कांहीं जगन्मान्य तत्त्वावर दृष्टि ठेवली पाहिजे व अशी कामें निर्विवादपणें राखून ठेवलीं पाहिजेत. त्यांच्या व्यवस्थेंत कोणी हात घालतां कामा नये. सडका बांधणें अथवा

धर्मशाळा बांधणें किंवा त्यांची दुरुस्ती करणें, शाळांची तपासणी अथवा शाळा मास्तरांचा पगार संभाळणें या शिवाय कोणतीं कामें लोकलबोर्डांकडे असतात ? पण जीं असतात त्यांत कलेक्टरनें हात घालूं नये. त्यांना हीं कामें कशीं करावीं त्याचा मार्ग दाखवावा. पण त्यांना मुळीं हालतांच येऊं नये इतकें त्यांच्यावर वजन पडतां कामा नये. ”

“आणखी एक माझी सुचना अशी आहे कीं लोकल बोर्डांच्या कामांचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध व्हावा म्हणजे जें काम यांनीं केलें पाहिजे तें न केल्याबद्दल अथवा जें यांनीं करतां कामा नये तें केल्याबद्दल कोणाला तक्रार करणें असेल तर ती करावयास सोपें पडेल. या करतां थोडा खर्च लागेल पण लोकलबोर्डांच्या कामावर नजर राहील. ”

“शिक्षणानें अथवा जवळ मालमत्ता बरीच असल्यानें अथवा समाजांत प्रतिष्ठा असल्यानें प्राप्त झालेली आपल्या वरची जबाबदारी ओळखण्यास जे लोक लायक नाहींत त्यांना सोडून पौरजनाधिकार ( मतदेण्याचा ) मी दुसऱ्या कोणास एकदम द्यावयास तयार नाहीं असें कबूल करतों. कोणास मताधिकार द्यावयाचा हें ठरविल्यानंतर लघुसंख्याक वर्गाचे प्रतिनिधी बोर्डांत येण्याकरितां सरकाराला प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार असावा व पुढें पुढें अशांची ही संख्या दिवसानुदिवस शक्य तेवढी गरजे प्रमाणें कमी कमी करीत गेलें पाहिजे. ”

“ कोणत्या इसमाला बोर्डाचा सभासद होतां येऊं नये अशा बद्दल नियम कांहीं निश्चित तत्त्वांवर केले पाहिजेत. बंगाल्यांत ज्या इसमाच्या हातून जो गुन्हा केला असतां योग्य अधिकाऱ्याच्या लेखी हुकुमाशिवाय धरलें जाण्यास गुन्हेगार पात्र होत नाहीं तो गुन्हा झाला असेल तो लोकल बोर्डाच्या कामास नालायक धरला जात आहे. हें तत्त्व आम्हांस नको. माझे मित्र बद्रुद्दिन म्हणतात त्याप्रमाणें ज्या गुन्ह्याची समजी पक्षकार

आपसांत करूं शकत नाहींत असा गुन्हा ज्याच्या हातून झाला असेल त्याला बोर्डावर घेतां येऊं नये हें तत्त्व मान्य करण्यासारखें आहे. परंतु ज्या गुन्ह्यानें मनुष्य नीतिभ्रष्ट होतो त्या गुन्ह्यामुळें त्याला मज्जाव असावा असें मला वाटतें. हल्लींच्या कायद्यानें शेजाऱ्याच्या कानशीलांत लगावल्या बद्दल एकाद्याला पोलीस पाटलानें २४ तास चावडीवर बसवून ठेवलें तर तो नालायक ठरूं शकेल. हे कायदे लहान दिसतात. पण यांच्या मसुद्याची प्रसिद्धि होऊं द्यावी व लोकांस त्यांचा विचार करावयास पुष्कळ वेळ व चांगली संधि मिळावी " इतके सांगून रावसाहेबांनीं पहिल्या वाचनास संमति दिली.

या एकंदर दिलेल्या हकीगतीवरून असें आढळून येईल कीं रावसाहेबांची नेमणूक काउन्सिलांत झाल्यावर ज्या शतशः * मित्रांनीं त्यांचें अभिनंदन करून त्यांची कामगिरी चिरसंस्मरणीय होईल असा भरंवसा धरिला त्यांचा मनोभंग रावसाहेबांनीं केला नाहीं. + " या नेमणुकीनें तुमचा मान सरकारनें केला व आपला करून घेतला " या शब्दांत ज. जेकब साहेबांनीं केलेली स्तुति यथार्थ आहे असें रावसाहेबांनीं दाखविलें व तसें करण्यास त्यांच्या आंगचे अनेक गूण कारणी भूत झाले; त्यांत मुख्य म्हणजे

---

* यांत मि. **फिलन**, हायकोर्टातील चीफ ट्रान्स्लेटर, **विनायकराव भागवत**; **माधवराव शिरगांवकर**; **रावजी आठल्ये**; डा. **ह्यूलेट**; मि. **पीस्काट्**; **माधवराव बर्वे**; प्रो. **करखॅम**; वकिलांची असोसिएशन, **मुंबई** हायकोर्ट; **दादाभाई नवरोजी**; **वामनराव रानडे** ( खानदेश ); डॉ. **बर्डवुड**; डॉ. **मॅकेन्झी** इ. मुख्य होते.

\+ तुमची नेमणूक कायदे काउन्सिलांत झाली असें वृत्त आजच्या टपालांतून आलेल्या पत्रांनीं जाहीर केलें. मीं तुमचें मनापासून अभिनंदन करतों या नेमणुकीहून अधिक चांगली नेमणूक करतां आली असती असें मला वाटत नाहीं. तुमचा मान करून सरकारनें आपला मान करून घेतला. "

( ज. जेकब यांचें पत्र ४।९।७४ ).

अनन्यसाधारण स्पष्टोक्ति. त्यांच्या प्रत्येक महत्त्वाच्या भाषणांत स्पष्टोक्ति ही स्वत्वाची खूण दिसून येते. ज्यांत स्पष्टोक्ति नाहीं तें त्याचें भाषणच नव्हे असें साधारणपणें समजावें. परंतु तिच्या भरांत त्यांनीं शिष्टाचार केव्हांही सोडला नाहीं. दुसरा प्रतिपक्षी जर त्या भानगडींत पडला तर त्याला लागलाच जबाब देऊन ते स्वाभिमान प्रकट करीत असत. दुसरा एक गुण त्यांच्या भाषणांत दिसून येई तो हा कीं प्रतिपक्षांतील लोकांच्या सद्हेतूंबद्दल त्यांनीं शंका केव्हांही घेतली नाहीं. पुढें आलेल्या कायद्यांच्या कलमांच्या इष्टानिष्टतेविषयीं मात्र जबर शंका घेत असत. व्यक्ति-विषयक वाद माजविला नाहीं, कारण त्यांचा वाद किंवा विरोध व्यक्तींशीं नव्हता. फक्त तत्त्वांशीं होता. त्यामुळें पक्षाभिमानास त्यांनीं थारा दिला नाहीं. करूं घातलेल्या कायद्यांस आधारभूत असलेल्या तत्त्वांनीं राष्ट्रपुरुषाचें हित साधत आहे कीं नाहीं तें ते पहिल्यानें बघत. राष्ट्रपुरुषाचे मुख्य दोनच विभाग आहेत १ राजा व २ प्रजा. आणि तदनुरोधानें दोनच पक्ष आहेत. १ राजपक्ष व २ प्रजापक्ष. राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालाव म्हणून एकाद्या कायद्याची अवश्यकता आहे असें ठरलें तर ते त्याला पुष्टि देत असत. ते स्वतां सरकारी नोकरींत असत। राज्यकारभाराचीं महत्वाचीं कामें करून राज्यकारभारांतील अडचणींची व त्यांची ओळख झाली होती. "हिंदुस्थानचा राज्यकारभार हा मोठा कठीण प्रश्न आहे. तो तसा नसता तर हिंदुस्थानच्या राज्याचा कारभार चालविण्यांत मोठें भूषण कसें राहलें असतें !" ( ज. जेकब यांस पत्र १८७५ ) एवढ्या पुरते ते राजपक्षीय होते.

मूलाधारतत्त्वें त्यांस मान्य होऊन कायद्याची अवश्यकता चक्क दिसून आली म्हणजे ते प्रत्येक कलमाची चर्चा करून त्यांतलि अनिष्ट भाग वगळून टाकण्याची शिकस्त करीत. कोणत्याही भागांत अन्याय न होऊं देण्याची खबरदारी घेत व अन्याय होण्याचा संभव दिसल्यास

शाणी साहेबांच्या गरीब प्रजेस त्याच्या विरुद्ध दाद लागण्याची जागा करून ठेवण्याविषयीं काळजी घेत; या दृष्टीनें ते प्रजापक्षीय होते.

राष्ट्रपुरुषाच्या हितावर त्यांची मुख्य नजर असल्यामुळें त्यांच्या मतांत व कृतींत विसंगतता आढळत नाहीं.

एकच पुरुष शास्त्रज्ञ व शास्त्रकार बहुधा नसतो; परंतु त्याची शास्त्रज्ञता शास्त्रकार होण्यास सहाय होते. त्याप्रमाणें एकच पुरुष कायद्यांत प्रवीण व चांगला कायदे करणारा बहुधा नसतो. रावसाहेब कायद्यांत प्रवीण होते. तसेच कायदे कसे करावे तें ते जाणत होते. तें जाणण्यास त्यांचें कायद्याचें ज्ञान सहायभूत झालें.

याशिवाय त्यांच्या अंगात सदैव वास्तव्य करणारा एक गुण होता तो कर्तव्याची कळकळ होय. काउन्सिलाच्या कामाकरतां, कितिही श्रम पडले, पैसा खर्च झाला, वेळ गेला, तरी हीं सर्व त्यांना भारी वाटलीं नाहींत. प्रकृतीचें स्वास्थ्यसुद्धां त्यांनीं काउन्सिलच्या कामाच्या आड येऊं दिलें नाहीं. १८८२ सालीं काउन्सिलच्या कामाकरतां रावसाहेब पुण्यास बेचरदास यांच्या बंगल्यांत उतरले होते. "तेव्हां चिरंजीवांचा घोडा एकदां उधळला तो धांवत जाऊन धरीत असतां डाव्या पायावर इजा होऊन तत्काल आजारी झालों. अगदीं स्वस्थ अंथरुणावर पडून होतों. पण वेळ होतांच म्युनिसिपल बिलास पुष्टि देण्याकरतां स्वतां चालतां येत नव्हतें तरी लंगडत लंगडत काउन्सिलला गेलों. ज्वर भरूं लागला पण डोकें चांगलें चालत होतें." ( सर वेडरबर्न यांस १५।९।८२ चें पत्र ).

मोठमोठालीं स्थित्यंतरें त्वरित घडवून आणणारे कायदे त्यांस रुचत नसत. या संबंधें ते पुरातनमतवाद्याप्रमाणें आहे ती स्थिति बरी आहे असाच आग्रह धरीत.

घाई त्यांस आवडत नसे. भिन्नमतप्रदर्शक नोंद लवकर लिहावी अशी एका मित्रानें त्यांस सूचना केली तेव्हां त्यांनीं त्यास उत्तर लिहिलें:— " जर एकादी गोष्ट करण्यासारखी असेल तर ती चांगल्याप्रकारें केली पाहिजे. माझें काम मी उगाच कांहीं तरी वरच्यावर उडवाउडवी करून घाईघाईनें करण्यास कबूल नाहीं. ( मि. व्हिटवर्थ यांस पत्र १७।१२।१८७७ )

ही सर्व आस्था त्यांनीं त्यांचें बहुमत नसतां दाखविली. कारण नेहमीं निवडक कमिटींत व मसुद्याच्या चर्चेच्या वेळीं पुष्कळ कामगिरी करण्यासारखी असते असें त्यांचें मत होतें. त्यांच्या युक्तिवादामुळें एकादा मसुदा परत घेतलेला सांपडेल, पुष्कळ मसुदे सुधारलेले दिसतील, एकादा मुंबईच्या काउन्सिलांत पास झालेला हिंदुस्थान सरकारास अनुचित वाटून संमति देण्यास पात्र ठरला नाहीं असें आढळेल. उदारणार्थ—शिकारीच्या प्राण्यांचें संरक्षण करणारा कायदा. डा० महेन्द्रलाल सरकार यांची नेमणूक कलकत्त्याच्या काउन्सिलांत झाली तेव्हां काउन्सिलदारास काय करतां येईल त्याचा त्यांनीं एकापत्रीं उल्लेख केला आहे तो असा:—

" मत्प्रिय डॉक्टर महेंद्रलाल सरकार,

तुमची सुखावह नेमणूक ( काउन्सिलमध्यें ) झाल्याबद्दल मी वंग देशाचें अभिनंदन करून, माझ्या इकडील + जुबिली उत्सवाला आरंभ करतों. तुमच्या हातांत पुष्कळ सत्ता नाहीं हें खरें आहे; परंतु तुम्हांला चांगल्या सूचना करतां येण्यासारख्या आहेत व पुष्कळ विषयांची चर्चात्मक मांडणी महत् जनतेपुढें व महत्तर वरील कोडतापुढें करतां येईल. एवढा तुमचा मोठा अधिकार आहे व तुम्हांला जवळ जवळ एक शतकाच्या चतुर्भागा इतका अनुभव असल्यामुळें तुम्हांला त्या अधिकाराचा चांगला उपयोग करतां येईल." ( १६।२।१८८७ )

इतक्या गुणांमुळें त्यांची सर्वांवर छाप बसली. इतर सरकारी काउन्सिल-

+ व्हिक्टोरिया महाराणी साहेबांचा जुबिली महोत्सव या दिवसांत सर्वत्र सुरु झाला होता.

दार त्यांच्या भाषणाचा मान ठेवीत. “ माझें म्हणणें काय आहे तें ऐकून घेण्याची इच्छा सर्वप्रकारें दिसून येत आहे.” (उदास यांस पत्र)

येथील मोठमोठ्या लोकांचें मन त्यांनीं आपल्याकडे काउन्सिलांत असतांना वेधून घेतलें होतें. स्थानिक स्वराज्याचा कायदा काउन्सिलांत असतांना रा. ब. रानडे यांनीं लिहिलें कीं आपण इंचागणिक लढत रहाल अशी आशा करतों.

रावसाहेबांकडे शुभदृष्टीनें सतत बघत असणाऱ्या एका बड्या इंग्रज अधिकाऱ्यानें त्यांस लिहिलेल्या पुढील सुंदर पत्रांत त्याच्या कामगिरीची खरी किंमत पटवून दिली आहे. “ सर्व स्वतंत्र सभासदांच्या मताचा पाठिंबा महुडाच्या फुलांच्या कायद्याच्या वेळीं मिळवून घेतल्याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. सर्व स्वतंत्र सभासदांचें मत आपल्या बाजूस वळवून घेण्यापलीकडे आणखी तुम्हांस काय अधिक करतां आलें असतें तें मला समजत नाहीं. इंग्लंदांत सार्वजनिक कामाची जी उभारणी पुढारी करतात, तिचा पाया कोणता म्हणाल तर सरकारचे सत्ताधारी कार्यमंत्री जें जें प्रतिपादन करतील व आपल्या कृत्यांची जी जी उपपत्ति बसवतील त्या त्या सर्वांवर शंका घेत बसणें हा होय. हें कांहीं निरीक्षक विसरतात. म्हणून ते सरकारावर स्वतंत्र सभासदांचा विश्वास नाहीं असें गाऱ्हाणें गातात. हल्लींच्या सल्लागार काउन्सिलांचें काम म्हटलें म्हणजे दिलेल्या सल्ल्याचीं प्रमाणें काय पुढें येतात तीं फक्त ऐकून घेण्याचें आहे. सरकारावर विश्वास आहे असा ठराव पसार करून घेण्याचें नव्हे. हिंदी सभासदांनीं आपलें वादविवाद करण्याचें काम चांगलें पार पाडलें असें मला वाटतें. नव्हे-असें मला म्हटलेंच पाहिजे.”

ही रावसाहेबांची कामगिरी इतकी चिरस्मरणीय झाली आहे कीं त्यांच्या निधनानंतर २१ वर्षांनीं सुद्धां तिची प्रशंसा थोर लोकांनीं केली आहे.

सर सिडनहॅम क्लार्क, मुंबईचे गव्हर्नर यांनीं, १९१० सालीं दुसऱ्यानें काउन्सिलाची सुधारणा झाल्यावर नव्या काउन्सिलांत पहिल्या दिवशीं

भाषण केलें. तेव्हां प्रथम थोडक्यांत काउन्सिलच्या सुधारणेचा सुरस इतिहास निवेदन करतांना पहिल्या काळीं हिंदी काउन्सिलरांचा काउन्सिलांत प्रवेश सरकारच्या नेमणुकीमुळें होऊं लागला असें सांगून ते म्हणाले "त्यावेळचे कागदपत्र पाहिले असतां असें दिसून येतें कीं त्या काळांतलि सरकारानें नेमलेल्या हिंदी सभासदांनीं केलेल्या वादविवादांत सजीवता व चित्ताकर्षता वारंवार दिसून येत असे. त्यांत ( अशा सरकारनें नेमलेल्या लोकांत ) रावसाहेब विश्वनाथ मंडलिक, जे नुसत्या रावसाहेब या नांवानें प्रसिद्ध होते ते, प्रमुख होते. त्यांनीं आपल्या बुद्धीच्या व शीलाच्या जोरावर आपलें नांव चिरसंस्मरणीय करून ठेविलें आहे."

या भाषणांत नामदार सर सिडनहॅम यांनीं रावसाहेबांशिवाय इतर कोणत्याही काउन्सिलराची नांव घेऊन तारीफ केली नाहीं हा या भाषणांतील विशेष भाग होय.

याचप्रमाणें पुढील एक मार्मिक लेख वाचण्यासारखा आहे. "विश्वनाथ नारायण मंडलिक हे कोकणस्थ ब्राम्हण असून हिंदी वकील मंडळींतील उत्कृष्ट वकीलांपैकीं होते. विवेकबुद्धि, दूरदृष्टि व कोणत्याही बाबतींत बिनचूक निर्णय करण्याची शक्ति या गुणांत त्यांनीं समकालीन लोकांस बरेंच मागें टाकलें होतें. शिक्षणाविषयीं त्यांचीं मतें फार उदार होतीं व सार्वजनिक कामाकाजा संबंधें त्यांचें ज्ञान फार विस्तृत होतें."

"काउन्सिलांतील हिंदी सभासद हे आपल्या देशबांधवांचें हित व अनहित कशांत आहे तें बरोबर दाखवून देण्यांत फार उत्साह दाखवीत असत. वादविवादांत विश्वनाथ नारायण मंडलिक हे फार प्रमुख भाग घेत. ख्रिस्तोदास पॉल यांस जी पदवी बंगालच्या काउन्सिलमध्यें प्राप्त झाली होती तीच पदवी यांस मुंबईच्या कायदे काउन्सिलांत प्राप्त झाली होती. यांचे खाजगी वर्तन अगदीं उदाहरण घेण्यासारखें होतें. सार्वजनिक काम करण्याचें मोठेंच बुद्धिसामर्थ्य यांच्या अंगीं होतें. जे कोकणस्थ ब्राह्मण मराठ्यांच्या साम्राज्याचे मूलाधार होते त्यांतले एक हे होते. त्यांच्या देशबांधवांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता व ते त्यांस

फार पूज्य मानीत. माझ्या पहाण्यांत जे अत्यंत बुद्धिमंत हिंदी लोक आले त्यांपैकीं हे एक होते. सर रिचर्ड टेंपल.

हीं तिन्हीं मतें उच्चपदारूढ इंग्रजांचीं आहेत. पहिलें एका चिरपरिचित स्नेहलुब्धाचें आहे. दुसरें अगदीं अपरिचित पण कीर्तिलुब्धाचें आहे व तिसरें चिरपरिचित पण विरुद्धमतवादी अशा गुणलुब्धाचें आहे. सर रिचर्ड यांचें व रावसाहेबांचे जातक पटत नसे. विरुद्धमतवाद्यांच्या अंगांतील गुणांचें ग्रहण करण्याची जी बुद्धि इंग्रज लोकांत साधारणपणें दिसून येते ती सर रिचर्ड यांच्या अंगांत होती असें वरील मतावरून दिसून येत आहे. त्यांनीं हें मत "माझ्या वेळचे हिंदुस्थानांतील प्रसिद्ध पुरूष व अनेक वृत्तांत" या पुस्तकांत दिलें आहे.

आतां सरकारानें उदारपणें काउन्सिलचे क्षेत्र वाढविलें आहे. म्युनिसिपॅलिटीच्या—नव्हे लोकलबोर्डाच्या—अध्यक्षपदावरून दिल्ली येथील असेम्बूलीच्या अध्यक्षपदाचा रस्ता दिसूं लागला आहे. लोककल्याणेच्छूंनीं निर्भयपणें पुढें यावें. भित्र्यांचा वर्ग भरभराटीस येत नाहीं. मतभेदापेक्षां मतैक्यावर नजर द्यावी. "पुष्कळ बाबतींत आमचा मतभेद असला तरी एकमतानें काम करतां येईल अशा अनेक बाबी आहेत. मीं पुढील विषयांवर लक्ष पुरवीत आहें. कायम धाऱ्याची पद्धति, सार्वजनिक खात्यांत काटकसर इ. या विषयांवर आपण साधल्यावेळीं ऐकविलेलें आपलें ह्मणणें मला किंमतीचें वाटेल." हें रावसाहेबांचें रावबहादुर रानड्यांस लिहिलेलें १९।८।७४ चें पत्र ध्यानांत ठेवा. धर्मज्ञ व्हा म्हणजे प्रचलित कायद्यांचें ज्ञान प्राप्त करून घ्या. अज्ञान गांवढेकऱ्याला काजीपद प्राप्त झाल्यास तो कायदा करूं शकतो. पण कसला ? जो त्यालाच फांसावर चढवील असला ! व्यवहारज्ञान, तर्कशुद्ध विचारसरणी, गोड युक्तिवाद हीं वादविवादसमयीं दाखवून काउन्सिलाची प्रतिष्ठा वाढवा, व जनतेचें सौख्य व प्रगति वाढविण्याचा सरकारचा मनोदय पुरा करा व कर्तव्यांतून मोकळे व्हा.

3337